
शिवाजी सावंत
युगंधर
मेहता पब्लिशिंग हाउस

# युगंधर

शि वा जी सा वं त

# युगंधर

**YUGANDHAR**
by SHIVAJI SAWANT

**युगंधर** / कादंबरी
**शिवाजी सावंत**

© मृणालिनी सावंत
ए– १०२, द गेटवे, भारती विद्यापीठ शाळेजवळ, बालेवाडी, पुणे ४५.

प्रकाशक
सुनील अनिल मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी, पुणे ३०.

मुखपृष्ठ
चंद्रमोहन कुलकर्णी

मांडणी
फाल्गुन ग्राफिक्स

प्रकाशनकाल
२००० / २००१ / २००३ / २००५ / २००९ / २०१२
मेहता पब्लिशिंग हाऊस यांनी प्रकाशित केलेली
सातवी आवृत्ती : जानेवारी, २०१४ / आठवी आवृत्ती : मार्च, २०१४
नववी आवृत्ती : डिसेंबर, २०१५

**अर्थातच –**

।। **श्रीकृष्णार्पणमस्तु** ।।

पण –
जिच्याविषयी –
'तू नसतीस तर?' या एकाच प्रश्नात आहेत, माझ्या असण्याची सर्व–सर्व निर्विवाद उत्तरं!!
सगळ्या प्रतिकूलतेत कर्तव्यदक्ष ज्येष्ठ बंधू श्री. विश्वासराव यांच्या साहाय्यानं जिनं मंगेश, तानाजी आणि मी अशा भावंडांच्या जीवनांना आकार दिला – त्यासाठी अगणित परिश्रम हसत झेलताना जिच्या टाचा तडकल्या – त्या आता सदासाठी दृष्टिआड झालेल्या –
**(स्व.) मातुश्री राधाबाई गोविंदराव सावंत** हिच्या वंद्य चरणांना स्मरून आणि –
मराठीतील ख्यातश्रेयस, साक्षेपी व ज्येष्ठ बंधुतुल्य प्रकाशक –
श्री. अनंतराव कुलकर्णी आणि सर्व कॉन्टिनेन्टल परिवाराच्या साहाय्याने त्यांचे पुत्र अनिरुद्ध व रत्नाकर निष्ठापूर्वक त्यांनी मागं ठेवलेल्या, कटाक्षानं जपलेल्या मानवतावादी नाममुद्रेला –
व
जिनं ही प्रदीर्घ लिखावट सर्वांपेक्षा श्रीकृष्णापोटीच अथक निष्ठेनं लिहून घेतली –
जिनं प्रिय कन्या चि. कादंबिनी (सध्याची सौ. कादंबिनी पराग धारप) व चि. अमिताभ यांना संस्कारशील घडविलं –
जी माझ्यासाठी पहिली सावली नि दुसरा श्वासच आहे –
त्या पत्नी **सौ. मृणालिनी उर्फ कुंदास** –

सर्व वाचकांसह तिलाही आवडेल नक्कीच अशा शब्दांत –
अर्थातच –

।। **श्रीकृष्णार्पणमस्तु** ।।

**वि. वा. शिरवाडकर**
नाशिक–२.
९.२.९६

प्रिय शिवाजीराव,

'मूर्ति पुरस्कारा'साठी तुमचं मन:पूर्वक अभिनंदन. 'मृत्युंजय' आता महाराष्ट्राच्या नकाशातून भारताच्या नकाशात गेला आहे आणि तुम्हीही. हा गौरव तुमचा, तुमच्या लेखनाचा आणि पर्यायानं मराठीचाही आहे. फार आनंद वाटला. माझे शुभाशीर्वाद तुमच्या सोबत सतत आहेतच. श्रीकृष्णही असाच दिग्विजयी हाईल – होवो! दिल्लीतील तुमचं भाषणही आवडलं.

श्री. कोतवालांवरील तुमचा ग्रंथही मिळाला. एक श्रेष्ठ निष्ठाशील आणि निर्मळ कार्यकर्त्यांचं चरित्र तुम्ही लिहिलंत – यासाठी धन्यवाद! वसंतराव गुप्ते माझे मित्र, यांचे ते जवळचे आप्त आणि स्नेही. त्यामुळे अधिक समाधान.

आपला,
वि. वा. शिरवाडकर

# आचमन

'युगंधर' शब्दरूप झाली! मन एका अननुभूत कार्यपूर्तीच्या अवर्णनीय आनंदानं कसं शिगोशीग भरून आलंय. खरंतर या वेळी 'मनोगत' म्हणूनसुद्धा एकही शब्द लिहू नये, असं अबोध मनाच्या तळवटातून प्रकर्षानं जाणवतं आहे. 'जे काय बोलायचं असेल, ते जाणत्या भारतीय मनावर गेली हजारो वर्षं निर्विवाद अधिराज्य गाजविणाऱ्या 'काळ्याला' त्याच्या वर्णासारख्याच गडद 'करंद' भाषेत मनमुक्त बोलू देत. आपण आपलं आता, गेली तीस वर्षं हा 'कृष्णवेध' घेणाऱ्या थकल्या देहमनाला कथा 'श्रीकृष्णार्पणमस्तु' म्हणून प्रथम पुरेसा विश्राम द्यावा.'

हे 'आचमन' घेताना – 'आचमन' हे शीर्षक लिहितानाच या मनोगताला 'आचमन' हे नाव का? हे स्पष्ट करणं भाग आहे. 'आचमन' म्हणजे सद्हेतूनं समष्टीच्या श्रेयसासाठी, कल्याणासाठी परमशक्तीला मनोमन आवाहन करून प्राशन केलेली जलांजली! 'युगंधर' वाचून झाल्यावर वाचकाला याचा नक्कीच प्रत्यय येईल, याचा श्रीकृष्णकृपेनं पूर्ण विश्वास आहे. म्हणून तर हे मनोगताचं प्रकट–अप्रकट शब्द मिसळलेलं आचमन!

या वेळी काही श्रद्धेय सुहृदांच्या तीव्र स्मरणानं लेखणी क्षणैक मुग्ध–स्तब्ध झालीय. त्यांनी वेळोवेळी 'कुठवर आलाय युगंधर?', 'कधी पडणार हातात?' अशी आत्मभावानं वारंवार केलेली विचारणा ऐकताना मलाच उत्तर माहिती नसल्यामुळे देहूच्या तुक्या वाण्यासारखा माझा माझ्याशीच मूक संवाद जुंपत असे. त्या संवादाचा काहीच शेवट होत नसल्यामुळं काहीही उत्तर न देता, मी वरवर नुसताच हसत मौन पत्करी. त्या सुहृदांना खोटं दिलाशाचं उत्तर देण्याचं धैर्य काही माझ्याच्यानं होत नसे. त्यांतील दोन तर ज्यांच्या बहात्तर हजार धमन्यांतून साहित्याचं आणि माणुसकीचं प्रेम अहोरात्र थडथडत होतं, असेच होते.

पहिले ऋषितुल्य, श्रद्धेय तात्यासाहेब! इथून तिथवर पसरलेल्या साहित्य रसिकांचे कंठमणी कविशिखर कुसुमाग्रज – वि. वा. शिरवाडकर! दुसरे पुण्याच्या कॉन्टिनेन्टल या मराठी प्रकाशनाचे अनंतराव कुलकर्णी! 'युगंधर'चा माझ्या पद्धतीनं सर्वांगीण अभ्यास झाला. श्रीकृष्णचरित्राशी निगडित मथुरा, उज्जैन, जयपूर, कुरुक्षेत्र, प्रभास, द्वारका (वेरावळ), सुदामपुरी, करवीर असा शोधक प्रवास झाला. आवश्यक त्या संबंधित विद्वानांच्या मुलाखती झाल्या. कथावस्तूला प्रत्यक्ष भिडण्यासाठी मन झटचा घेऊ लागलं. याच वेळी नाशिकच्या गोदाकाठावर भरलेल्या व्याख्यानमालेचं एक आमंत्रण आलं. आदरणीय कुसुमाग्रजांना भेटायचं, असं मनोमन योजून मी ते लगेच स्वीकारलं.

त्या वेळी आकृतिबंधाची अडचण त्यांच्यासमोर ठेवताना मी म्हणालो, "श्रीकृष्णाच्याच तोंडून आत्मचरित्र शैलीत संपूर्ण कथावस्तू बांधायची म्हणतोय."

कुसुमाग्रज अरागस बालकासारखे प्रसन्न हसले. ‘श्रीराऽम’ची नांदी उठवून पटकन म्हणाले, “छान आहे कल्पना, करा प्रारंभ!”

निर्धारानं पुण्याला परतलो. योगायोगानं याच वेळी हरिद्वार (उत्तर प्रदेश) येथील रामकृष्ण सेवाश्रमाचे पूज्य स्वामी अकामानंद महाराज पुण्यात आले होते. ध्यानीमनी नसताना डॉ. इनामदार या त्यांच्या शिष्यांसमवेत ते घरी आले! त्यांना बघताच मनानं लगेच कौलही दिला – ‘या प्रदीर्घ लिखावटीचा शुभारंभही यांच्याच शिवहस्ते गंधफुलं वाहून, यांच्याच उजव्या अनामिकेनं शिवकर स्वस्तिक रेखून करायचा!’ त्यांनीही हसत लगेच संमती दिली. त्यांच्या हस्तेच अगदी साधं घरगुती पद्धतीचं पूजन करवून घेऊन, मी नम्रभावानं त्यांच्या चरणांवर माथा टेकविला. पाठीवर आपला प्रेमळ हात ठेवून स्वामीजी अपार प्रेमानं म्हणाले, ‘तथाऽस्तु – शुभं भवतु!’

श्रीकृष्णाच्या पहिल्याच ‘शुभकर’ प्रकरणाला हा असा अनपेक्षित प्रारंभ झाला. लेखनिका सौ. सुधाताई लेले नेमाने माझ्या निवासी येऊ लागल्या. श्रीकृष्णाचं प्रदीर्घ निवेदन हाच मी निवडलेला या सहित्यकृतीचा ‘आकृतिबंध’ होता. दोनशे पृष्ठं लिहूनही झाली.

अशाच एका धावत्या भेटीत, पुन्हा पुण्यात आलेल्या स्वामीजींना पूर्ण झालेलं लिखाण वाचून दाखविलं. गीतेच्या सखोल अभ्यासामुळं ते परम श्रीकृष्णभक्त! ही भक्ती अर्थातच आजच्या विज्ञानसंपन्न काळामुळं डोळस आहे.

श्रीकृष्णचरित्रातील शक्य तितके चमत्कार कठोरपणे टाळून त्याच्या जीवनकार्याचा वास्तव वेध घेण्याचा मी स्वीकारलेला साहित्यिक वसा त्यांनाही स्पर्शून गेला. लिखाण त्यांना मन:पूर्वक आवडलं. मग तासभर आम्ही श्रीकृष्णाच्याच चर्चेत दंगलो.

लिखाण पुढं चालू झालं. अशातच का कुणास ठाऊक माझं मलाच प्रकर्षानं जाणवू लागलं की, एकट्या श्रीकृष्णानंच बोलणं – एकूणच त्याच्या गीतेच्या अनुषंगानंही योग्य नाही! पुन्हा थांबलो. मग कित्येक महिने थांबलोच. लेलेबाईंकडून झालेलं लिखाण पुन्हा निर्दोष लिहून घेतलं. त्याही कधीच कंटाळल्या नाहीत.

मराठी प्रकाशक अनंतरावांचा आत्मभावानं एकच एक धोसरा सतत सुरू होता – “केव्हा देतोस युगंधर?”

मी आपला नमनालाच घडाभर तेल खर्चून मुकाट बसलेला. अशातच नाशिकला व्याख्यानासाठी जाण्याचा पुनश्च योग आला. त्या रामतीर्थात गेल्या–गेल्या ज्येष्ठ बंधुतुल्य व साहित्यअश्वत्थ तात्यासाहेबांना नेहमीसारखा सर्वप्रथम भेटायला गेलो.

ज्या प्रश्नाच्या माऱ्याला मी मनोमन बिचकून ‘कसं उत्तर द्यावं?’ याची तयारी करीत होतो, नेमका तोच प्रश्न, मी त्यांचे चरणस्पर्श करून उठताना माझे दोन्ही दंड धरून तात्यासाहेबांनी हसतच मला विचारला, “प्रथम सांगा – काय म्हणतोय युगंधर?”

त्यांनी ‘कुठवर आलाय युगंधर?’ असं काही नेहमीसारखं विचारलं नव्हतं. एव्हाना त्यांच्या बोलण्यातील, दोन ओळींमधला सुप्त आशय जाणून घेण्याची मला चांगलीच सवय झाली होती.

मी निरुत्तर – स्तब्धच! काही क्षण असेच गेले. कुसुमाग्रजांच्या इशारतीवर आलेला चहा

झाला. मग ते स्वत:शीच बोलल्यासारखे म्हणाले, "कशात अडलाय? तसा तो अडविणाराच आहे – नुसत्या यमुनाकाठच्या गवळणींनाच नाही – वेध घेणाऱ्यालाही!"

मी आकृतिबंधाचीच अडचण पुन्हा सांगितली. तसे कुसुमाग्रज अगदी अरागस हसले. म्हणाले, "तुमचा मृत्युंजयाचाच फॉर्म काय वाईट आहे?" हा त्यांच्या शैलीप्रमाणं सूचनावजा सल्ला होता. काही वेळ विचार करून मी म्हणालो, "वाचकांना ते मृत्युंजयाच्या आकृतिबंधाचं अनुसरण वाटेल."

"मुळीच नाही! आणखी दहासुद्धा कादंबऱ्या तुम्ही याच आकृतिबंधात महाभारतावर लिहू शकता! प्रश्न आहे तो व्यक्तिरेखा प्रथम तुम्हाला किती कळलीय याचा. मुळीच थांबू नका. मृत्युंजयाच्या फॉर्ममध्ये 'युगंधर' पूर्ण करा!"

मी गप्पगार झालो. केवढं तर्कशुद्ध उत्तर तात्यासाहेबांनी क्षणात दिलं होतं. प्रत्यक्ष श्रीकृष्णानं अर्जुनाला एका लक्षणीय क्षणी 'हा सूर्य; हा जयद्रथ!' असा रोकडा दाखला दिला होता. (मी अर्जुन नाही, हे मला पूर्ण मान्य आहे. तरीही वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज हे मराठी साहित्यद्वारकेतील द्वारकाधीशच, हे लक्षात घेता, ) त्यांचा सल्ला पूर्ण विचारांती मला श्रेयसाच्या आज्ञेसारखाच वाटला!

नाशिकहून परततानाच 'युगंधर' मध्ये कुणाकुणाला 'मुखर' करायचं, बोलकं करायचं याची माझ्या मनात दीर्घ चाळण सुरूही झाली. महाभारताचा सशक्त कणा असलेल्या श्रीकृष्णाभोवती शब्दश: हजारो स्त्री–पुरुष नांदून गेलेले. कुणाला निवडायचं? कुणाला टाकायचं? का? कसं? त्याची कसोटी काय? असं प्रश्नांचंच जंगी महाभारत मनी जुंपलं! यासाठी निकष कोणते लावायचे?

'शोध' होता श्रीकृष्णाचा! एका बहुआयामी व क्षणात म्हटलं तर स्वत:लाच दर श्वासागणिक स्पष्ट जाणवणाऱ्या जिवलगाचा व क्षणात निळंभोर आकाश व्यापून, काळ्याकरंद अवकाशापार जाणाऱ्या वजनरहित ब्रह्मांड व्यापणाऱ्या एका ऊर्जा केंद्राचं केंद्र असलेल्या, मोरपंखी, कालजयी, अजर व्यक्तिमत्त्वाचा!

जसजसा अधिकाधिक सखोल चिंतनात गेलो, तस–तसं प्रकर्षानं स्पष्ट होत गेलं की, श्रीकृष्ण त्याच्या अधिकात अधिक आयामांसह – जीवनच्छटांसह एकवेळ अंशमात्रानं समजून घेणं, मूकपणं शक्य आहे; पण तो इतरांना समजावून सांगणं – तेही ललित साहित्यातून समजावून सांगणं, कर्मकठीण आहे.

मग एकच एक ध्यास सुरू झाला. असं का होतं की, श्रीकृष्ण जवळातला जवळही वाटतो व हां–हां म्हणता क्षितिजापासून दूर–दूर कुठंतरी निघूनही का जातो! अनाकलनीय एक अनामिक हुरहुर लावून का जातो? असं का होत असावं, याचाच शोध घेण्याचा मग ध्यास जडला. त्यासाठी नित्य प्राणायामावर आधारलेली साधना सुरू झाली.

यातून पहिलाच विचारकौल आला तो हा की, 'श्रीकृष्ण' आपल्यात अंशरूपानं असूनही तो आपणाला जाणवत नाही, याचं कारण तो गेली पाच हजार वर्षं एकाहून एक चमत्कारांनी कसा अंतर्बाह्य नुसता लडबडून गेला आहे! भाबड्या अंधभावांच्या गुंतावळयात अडकून पडलाय.

त्याला विराट रूपातला, सहस्र हाता–मुखांचा कल्पून; महाभारताची जी हजारो वर्षांची

वाटचाल झाली आहे, त्यात अनेक प्रज्ञासंपन्न महाकवींनी आपल्या दीप्तिमान प्रतिभेच्या तेजस्वी समिधा अर्पून त्याला सामान्यांपासून कोटचवधी योजनं दूर नेऊन ठेवलं आहे! हे त्यांनी कोणत्या हेतूनं नाही केलं. अगदी निकोप; पण भाबडचा रससंपन्न भक्तिभावापोटी हे त्यांच्याकडून सहज व आपापत: झालं आहे. तसं तर अगदी अलीकडच्या इतिहासातील आग्र्याहून आपली बहुतेक सर्व माणसं व जनावरं यांसह शिताफीनं सहीसलामत सुटणाऱ्या शिवाजीराजांना तत्कालीन समाजपुरुषानं आदरभावानं 'शिवाचा अवतार' मानलं होतंच.

साधनामग्न निकोप व तटस्थ मनाला 'युगंधर'चं अतीव मोलाचं पहिलंच साहित्यसत्य स्पर्शून गेलं. श्रीकृष्णाचा या विज्ञानयुगाच्या शिगेला पोहोचलेल्या शतकाच्या अंताच्या लक्षणीय वळणावर उभं राहून वेध घेताना त्याच्या चरित्राभोवती भावुकपणानं चिकटवलेली शक्य तेवढी चमत्काराची पुटं कठोर, निर्धारी मनानं दूर सारली पाहिजेत. हेच काम प्रथम अवघड होतं.

भारताचार्य चिं. वि. वैद्यांसारख्या तज्ज्ञ व अभ्यासू भाष्यकारानं श्रीकृष्णाचं एकूण वय सांगितलं आहे, ते आहे एकशे एक वर्षं! हे शक्य आहे काय? आहे! हेच त्याचं (आजच्या प्रदूषित वातावरणातील मानवी वयोमानाचा निकष लावण्याचा तर्कदोष न करता.) स्पष्ट व स्वच्छ उत्तर आहे.

श्रीकृष्णाच्या या प्रदीर्घ जीवनातील अगदी जन्माच्या क्षणापासून असा एकही दिवस व क्षण जात नाही की, जयाच्या साक्षीनं काही ना काही 'घडत' नाही. श्रीकृष्ण हा सर्वार्थानं जीवन 'घडविणारी' विभूती आहे. त्याचा सर्वांत मोठा गुणधर्म आहे तो हा की, अंस घडविण्यासाठी जिथं-जिथं म्हणून जीवन बिघडविणाऱ्या दुष्ट व अशिव शक्ती आडव्या आल्या त्या-त्या त्यानं चाणाक्ष दूरदृष्टीच्या बुद्धियोगानं प्रथम अचूक हेरल्या. मग विलंब न लावता त्या समूळ निपटून काढल्या. वेगवेगळ्या बुद्धिकुशल मार्गांनी!

त्या निपटताना त्यानं दरवेळी आपल्या थक्क करणाऱ्या पौरुषाचा सर्वस्वी नवाच, अकल्पित असा आविष्कार घडविला. दरवेळी एकच शस्त्र नाही, एकच उपाय नाही, तर प्रत्येक प्रसंगी वातावरणानुसार योग्य उपाय त्यानं हाताळला. इथंच त्याचं भारतवर्षाच्या त्याच्या पूर्वीच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक व एकूणच समग्र भारतीय जीवनाला वळण देणारं 'युगंधरी' रूप स्पष्ट होत नाही काय?

'वाढव विकास' या जीवनाच्या मूलभूत लक्षणांच्या आड येणाऱ्या अशिव शक्ती नुसत्या निपटणं म्हणजे प्रत्यक्ष जीवन घडवणं ठरतं का? नाही! ती जीवनातली स्पष्ट एकारलेली नकारात्मक दृष्टी ठरते. श्रीकृष्णानं जीवन घडविणारी जी सकारात्मक दृष्टी व तीही पावलोपावली ज्या डोळसपणे राबविली, ती मला आजच्या ज्ञान, विज्ञान व प्रज्ञानाच्या सळसळत्या युगात साहित्यिक म्हणून फार-फार मोलाची वाटते.

जीवनात भेटलेल्या शब्दश: हजारो-लाखो स्त्री-पुरुषांशी तो निखळ बावन्नकशी 'प्रेमयोगानंच' वागला. यासाठीच श्रीकृष्ण कधीच शिळा किंवा टाकाऊ होणार नाही, हा मला पटलेला सिद्धान्त आहे.

उपनिषदकालापर्यंत पिढयान्पिढया झिरपत आलेलं एक वैदिक सूर्यकिरणवत, शाश्वत सत्य की, 'नहि मनुष्यात श्रेष्ठतर किंचित!' जे श्रीकृष्णाला कळलं ते तेवढचा

आयामांनी या देशात त्याच्यापूर्वी कुणालाच कळलं नाही, हे त्याच्या चरित्राचा अभ्यास करताना प्रकर्षानं माझ्या ध्यानी आलं. हाच विचारधागा पिंजताना आणखी एक महत्त्वाचा शोध लागला. श्रीकृष्णचरित्रातील केवळ गीताच तेवढी; आपण वैश्विक तत्त्वज्ञानातील अत्युच्च आविष्कार म्हणून स्वीकारली. पिढ्यान्पिढ्या वर्षानुवर्षं आपण ती शब्दश: अंधपणानं एकांगी नुसतीच घोकत राहिलो.

'गीता' तत्त्वज्ञानाचा सर्वश्रेष्ठ आविष्कार तर आहेच आहे; त्याविषयी कुणाचंही दुमत असण्याचं कारण नाही. माझं तर नाहीच नाही. मात्र पूर्ण अभ्यासानंतर सभान मी विधान करीत आहे की, 'त्याच्या पायठशाबरोबर एक 'अनुभवगीता' जी उमटत गेली, तिच्याकडं आम्ही पूर्ण दुर्लक्ष केलं! तेही त्याच्याच भारतभूमीत जन्मून!'

उदाहरणासाठी केवळ दोनच गोष्टी इथं देतो – श्रीकृष्णाच्या आठ राण्यांपैकी एक चक्क 'आदिवासी' कन्या होती! ऋक्षवान पर्वतातील जांबवान या आदिवासी राजाची कन्या – जांबवती ही!

पूर्ण अभ्यास व चिंतनानंतर मी म्हणूनच त्याच्या 'युगंधरी' चरित्राला समोर ठेवून विधान करतो आहे की, त्याच्यापूर्वी एकाही क्षत्रिय वा उच्च वर्णीयानं या जीवनगंगेला समूळ वळण देण्याचं आदर्श कर्म केलेलं नाही.

या क्षणी आवर्जून सांगितलं पाहिजे की, सर्वाधिक कठोरपणं भल्या-भल्यांनी आग्रहानं झोडपलं आहे, ते एकटच्या श्रीकृष्णाल! तेही गीतेतीलच एका श्लोकाला सतत पुढं करून की – 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टम्!'

इथंच प्रथम सावधपणानं ध्यानी ठेवलं पाहिजे की, महाभारत ही 'भाकडकथा' नाही. तो भारतवर्षाचा जुन्यात जुना उपलब्ध ऐतिहासिक दस्तऐवज आहे. फक्त प्रक्षिप्तांची पुटंच पुटं चढलेला!

प्रत्यक्ष महाभारताची अठरा पर्वांत व एक लक्ष श्लोकांत झालेली आजची परिणती ही अनेक प्रज्ञावंत ऋषींच्या प्रक्षिप्त (घुसडलेल्या) रचनांनी वाकून गेलेली संहिता आहे. मूळ 'भारत सावित्री' किंवा 'हा जय नावाचा इतिहास आहे', या पोवाडासदृश्य एकच काव्य-ग्रंथ तेरा पट वाढून आजच्या अठरा पर्वांत चांगला एक लक्ष श्लोकांत विकसित झालेला आहे! भारतीय जीवनप्रणालीचा प्रमाणभूत ग्रंथ म्हणून तो विश्वमान्य आहे. त्यातील 'गीता' हा तत्त्वज्ञानपर उपाख्यानाचा एक भाग आहे. 'गीता' ही महाभारताच्या कथासागरातील अशी मौल्यवान घागर आहे की, जिच्यातील थेंबाथेंबात मानवी जीवनाचा सागर शब्दश: घुसळून काढण्याचं सामर्थ्य आहे! कौरव-पांडव, श्रीकृष्ण यांचा संदर्भ या गीतापर्वांत आवश्यक तेव्हाच व तेवढाच आला आहे.

व्यक्तिगत जीवनात जांबवती ह्या एका आदिवासी कन्येशी विवाह करून तिला द्वारकेत आणणारा व पत्नी म्हणून गौरवाचं स्थान देणारा एकमेव कृष्णच आहे. राजसूय यज्ञात आमंत्रितांची उष्टी पात्र तो उचलतो, आपल्या गरुडध्वज रथाच्या चारही घोड्यांचा तो स्वत: खरारा करतो, सारथी दारुक याला रथाच्या मागील घेरात विचार करायला सांगून स्वत: वेग सावरून 'गरुडध्वज' रथाचं सारथ्य करतो.

जीवन घडविणारं कुठलंच कर्म तो कधीच निषिद्ध मानत नाही. मग तो वर्णाश्रमाचा मीच कर्ता असं कसं काय म्हणेल? हे साधं तर्कशास्त्रही आपण हजारो वर्षं मान्य केलेलं नाही.

कुठल्याही विचारवंतानं श्रीकृष्णचरित्रातील जांबवती हे सत्य ध्यानी घेऊन हा प्रश्न कधीच का उभा केला नाही, काही कळत नाही! मला सर्वाधिक आश्चर्य याचंच वाटतं.

श्रीकृष्णाचा गरीब सुदाम्याशी असलेला निरपेक्ष स्नेह, सारथी दारुक याच्याशी असलेला मनोभाव, गोकुळातील गोपांशी असलेला त्याचा मनमेळ निकोप मनानं बघणारा कोणता अभ्यासक याला 'वर्णनिर्माता' म्हणू शकतो? यासाठी विद्वानांना 'गुणकर्म' अशा लटक्या ढालीमागे लपण्याची आवश्यकताच काय?

माझ्या चिंतनचाळणीतून अशी अनेक प्रखर सत्यं मला 'श्रीकृष्ण' या व्यक्तिमत्त्वात स्पष्ट जाणवली. त्या सर्व सत्यांना मी या दीर्घ साहित्यकृतीत यथाशक्ती स्पर्श केला आहे.

श्रीकृष्णाचे त्यानं मानलेले सखे अनेक आहेत. पेंद्यासह सर्व गोप, बलराम, सुदामा, दारुक, सात्यकी, अर्जुन, संजय, महात्मा विदुर, भीष्म अशी त्यांची मोठी नामावली आहे. यातच उद्धव हा त्याचा चुलतबंधू हा तर परमसखा आहे. श्रीकृष्णानं केवळ त्याच्यासाठी गीतेनंतर 'उद्धवगीता' सांगितली. तेच 'श्रीमद्भागवत'. भारतीय युद्धानंतर एकट्या उद्धवाची व्यक्तिगत सेवा श्रीकृष्णानं शेवटपर्यंत स्वीकारली. 'ती का?' असा प्रश्न आजवर कुणी उभा केला नाही.

अर्थ स्पष्ट आहे. उद्धव श्रीकृष्णाचा नुसताच चुलतबंधू व एक जिवलग यादव म्हणून सखा नाही, तर आहे; त्याचा 'भावविश्वस्त'. महाकाव्य रामायणात श्रीरामाचा 'भावविश्वस्त' जसा भरत होता, तसाच किंबहुना त्याहुन मात्राभर वरचढमहाकाव्य महाभारतात 'उद्धव' हा श्रीकृष्णाचा भावविश्वस्त होता, हे या चिंतनात मला तीव्रपणे सर्वाधिक स्पर्शून गेलं. वाचकांनी बारकाव्यानं उद्धव अवश्य वाचावा.

युगंधरात बोलणाऱ्या ज्या निवडक व्यक्तिरेखा आहेत, त्या श्रीकृष्ण, रुक्मिणी, दारुक, द्रौपदी, अर्जुन, सात्यकी व उद्धव अशा क्रमानेच व सातच आहेत.

यातील नायक श्रीकृष्णाविषयी मी वेळोवेळी बोललो आहे, विविध लेख लिहिले आहेत, माझं त्याच्या व्यक्तिरेखेविषयीचं सर्वांगीण आकलन स्पष्ट व्हावं, म्हणून एक प्रदीर्घ प्रस्तावनाही लिहिलीय. ती १९९६ मध्ये 'मेहता पब्लिशिंग हाऊस' मार्फत पूर्वीच प्रकाशित झाली आहे. या पुस्तकात विस्तारानं सर्व लिहिलं आहे. चिकित्सक जाणत्यांनी 'युगंधर – एक चिंतन' हे पुस्तक अवश्य वाचावं.

इथं श्रीकृष्णातील 'श्री' या विशेषणाविषयी व तो 'जलपुरुष' कसा व त्याचे अन्य दोन जलपुरुषांशी असलेले मूक, गूढव सखोल भावबंध कसे एवढ्या मोजक्याच गोष्टींचा ऊहापोह करतो. 'श्री' या संस्कृत आदरवचनाला हिऱ्यासारखे अनेकानेक पैलू आहेत. 'श्री'चे अनेकार्थ आहेत. श्री म्हणजे 'सौंदर्य', 'अरोध सामर्थ्य', 'अलौकिक बुद्धिमत्ता', 'अगणित संपत्ती', 'अनंत गुणवत्ता' असे ते अर्थ आहेत. नुसता 'कृष्ण' श्रीकृष्णचरित्राशी निगडित 'श्रीमद्भागवत', 'महाभारत', 'हरिवंशपुराण', काही निवडक पुराणं या संदर्भग्रंथातून कुणाही चिकाटीच्या अभ्यासूला सापडू शकतो. 'श्री'ने युक्त कृष्ण सापडायला व मांडायला ललितलेखकाचीच आवश्यकता आहे, असं माझं नम्र; पण ठाम मत आहे.

महाकाव्य रामायणाचा नायक राम स्वगुणांच्या बळावर 'श्रीराम' झाला. महाभारताचा

नायक कृष्ण तसाच स्वगुणवत्तेच्या बळावर 'श्रीकृष्ण' झाला आहे. या दोन्ही महाकाव्यांत चुकूनही इतर व्यक्तिरेखांना 'श्री' उपाधी लावून श्रीलक्ष्मण, श्रीभरत किंवा श्रीअर्जुन, श्रीभीम म्हटलेलं नाही.

स्वच्छ व स्पष्टच नाही काय की, श्रीकृष्णातील 'श्री' प्रथम रचनाकाराला जाणवला पाहिजे. त्याला तो नीट आकळला पाहिजे. मग वीणावादक, ज्ञानदेवता, सरस्वतीच्या रक्तिम करांगुलीचा त्याच्या प्रतिभेला स्पर्श झाला, तरच त्याला गवसलेली नायकाची मूर्ती शब्दरूपात आली तर मांडता येणार. मला पूर्ण विश्वास आहे की, आता महाभारतातील व्यक्तिरेखांच्या आकलनात प्रगल्भ झालेल्या वाचकाला 'युगंधर' मधील प्रत्येक प्रसंगात 'दोन ओळींमध्ये' सुप्तपणं; पण निःसंशय वावरणारा 'श्री' नेमका स्पर्शून जाईल.

या चिंतनात एक थरारक नवं आकलन मला स्पर्शून गेलं. 'श्रीकृष्ण', 'भीष्म', व 'कर्ण' या पंचमहाभूतांपैकी 'जल' या महत्त्वाच्या तत्त्वाच्या 'जलपुरूष' व्यक्तिरेखा आहेत. आपल्या भेटीत त्या एकमेकांना अबोल-मूकपणं आदर राखतात. बालपणी जन्मतःच पित्याच्या मस्तकावरून महापुरातील यमुनेत टोपलीतून जीवनप्रवासाचा प्रारंभ करणारा 'श्रीकृष्ण', तसाच जीवनारंभ अश्वनदी, चर्मण्वती, गंगा अशा नद्यांवरून पेटिकेतून खडतर प्रवास करणारा 'कर्ण' व साक्षात गंगा या जलमातेचाच पुत्र असलेला 'गांगेय भीष्म' यांच्या सुप्त-अबोध मनातील 'जलपुरुष' हे नातं पकडत वाटचाल केली, तर आपण या तिन्ही महान व्यक्तिरेखांच्या थेट गाभ्यांनाच भिडतो, हा माझा अनुभव आहे. मग या व्यक्तिरेखा आतबाहेर वेगळयाच दिसू लागतात. एकदम वेगळयाच भाषेत त्या रचनाकाराशी बोलू लागतात.

युगंधरात आलेले 'नीलवर्णी' सखे 'श्रीकृष्ण-अर्जुन' यासाठीच वाचकांनी बारकाव्याने वाचावेत.

श्रीकृष्णाला सखे अनेक, गुरू दोन, भगिनी तीन, माता-पिता दोन, पत्नी आठ, पुत्र ऐंशी, कन्या चार; पण सख्या दोनच – पहिली राधा व दुसरी द्रौपदी.

'राधा' या जनमानसात पक्क्या रुजलेल्या व्यक्तिरेखेला भागवत, महाभारत, हरिवंशपुराण या श्रीकृष्णाशी निगडित अधिकृत संदर्भग्रंथांपैकी एकातही निसटताही संदर्भ नाही! उपस्थितांच्या एखाद्या दीर्घ यादीत तिचं नावसुद्धा नाही!

काय करायचं राधेचं? असं आहे तर ही राधा श्रीकृष्णचरित्राला चिकटली तरी केव्हा? कशी? तर पंधराव्या शतकात 'गीत गोविंद' या शृंगाररसाला वाहून घेतलेल्या जयदेव कवीच्या अत्यंत जनप्रिय झालेल्या शृंगाररसप्रधान रसाळ खंडकाव्यातून श्रीकृष्णचरित्राला चिकटली. या 'गीत गोविंदा'चा आधार घेऊन त्यानंतर अनेक शतकं या राधेला प्रतिभावंत कवींनी नाना आविष्कारांत, काव्यांतून मनसोक्त मढवून श्रीकृष्णासह सादर केलं. राधेचा पदर धरून हिंदी काव्यक्षेत्रात तर लंपट श्रीकृष्णानं शतकानुशतकं नुसता असमर्थनीय धुमाकूळ घातला. इथूनच वास्तवात भेटलेल्या प्रत्येक स्त्रीचा आदर करणारा श्रीकृष्ण स्त्रीलंपटतेकडं भरकटत गेला आहे.

खूप विचारानंतर 'राधा' ही व्यक्तिरेखाच संपूर्ण दूर ठेवायची, या कठोर निर्णयाला मी आलोही!

चिंतनाच्या अटीतटीच्या या धुंदळीत कसा कुणास ठाऊक, पण कवडशासारखा एक विचार आला. तो विचार असा होता की – शतकेन्शतके श्रीकृष्णभक्त 'राधेकृष्ण' हा घोष घुमवीत आलेत. त्या 'राधा' या शब्दाचा नेमका मूकार्थ तरी काय आहे, तो एकदा नीट बघू या तरी!

मग शब्दकोशांचा धांडोळा सुरू झाला. ज्या क्षणी मला 'राधा' शब्दाचा अचूक अर्थ गवसला त्या क्षणी माझ्यातील साहित्यकार थरारून उठला. आजही मी तो क्षण विसरू शकत नाही.

'राधा' हा जोडशब्द आहे! 'रा' म्हणजे लाभो-मिळो. 'धा' म्हणजे मोक्ष, जीवनमुक्ती!

'राधा' म्हणजे मोक्षासाठी तळमळणारा जीव! या शब्दार्थामुळं माझी संपूर्ण चिंतनतळी घुसळून निघाली. मी दूर सारलेली 'राधा' आता कितीतरी प्रचंड आवेगानं मनःकुहरात आपोआप येऊ लागली. मला गोकुळातील प्रत्येक गोपीत आता चक्क राधा जाणवू लागली! ते सर्वच तर मोक्षासाठी अपार तळमळणारे जीव होतं. एक खूणगाठ मनी पक्की झाली – राधा ही 'प्रातिनिधिक गोपस्त्री' म्हणून घेणं अत्यावश्यक आहे.
श्रीकृष्णकथेत राधा अटळ आहे. ती घेताना मात्र सावध संयमानंच घेतली पाहिजे. इथं मी ती तशीच घेतली आहे.

श्रीकृष्णाच्या भगिनी म्हणून दोनच व्यक्तिरेखा सर्वांनी मानल्या आहेत. एक घरचीच सुभद्रा, दुसरी मानसभगिनी द्रौपदी. पण तिसरीही एक आहे, ती तर अनुल्लेखाच्या घनघोर अंधारात लपलेली आहे. ती आहे, नंद-यशोदा यांना नंतर झालेली एकानंगा. श्रीकृष्णाची पालकभगिनी 'एका.' इथं तिला सीमित; पण योग्य न्याय देऊन योग्य तेवढ्याच साहित्यिक मात्रेनं हेतुतः घेतलेलं आहे.

श्रीकृष्णाचे गुरूही दोन आहेत. जीवनारंभीचे कश्यप कुलोत्पन्न सांदीपनी सर्वज्ञात आहेतच. इथं त्यांच्या आश्रमशिष्य युगंधराचं अवंतीच्या 'अंकपाद' आश्रमातील जीवन प्रत्ययकारी व चित्रदर्शी शैलीत प्रथमच भेटत आहे की नाही, ते वाचकांनीच ठरवायचं आहे. जगाला ललामभूत झालेला प्रगल्भ श्रीकृष्णाचा कालजयी, अमर तत्त्वज्ञानपर ग्रंथ ज्यांच्या ब्रम्हविद्येच्या शिकवणुकीमुळे साकारला ते श्रीकृष्णाचे अत्यंत महत्त्वाचे दुसरे गुरू – आचार्य घोर आंगिरस! त्यांच्या सर्व जीवनच्छटांसह इथं ते प्रथमच वाचकांशीही संभाषण करतील, याचा मला विश्वास आहे.

या कथावस्तूत दोन तशा वरवर सामान्य वाटणाऱ्या व्यक्तिरेखा आहेत – दारुक व सात्यकी. पहिला श्रीकृष्णाच्या 'गरुडध्वज' रथाचं श्रीकृष्णाच्या महानिर्वाणापर्यंत सारथ्य करणारा आज्ञाधारक, प्रज्ञाशील व कुशल सारथी. स्वतः श्रीकृष्ण सारथ्यांचा सारथी आहे. यातील लक्षणार्थ फार मार्मिक आहे. तो विचाररथांचं सारथ्य करणारा आहे. विचारवंतांचा विचारवंत आहे. म्हणून तर कृष्ण – किसन, कन्हैय्या, गोपाळ, गोविंद, मोहन, दामोदर, मुरलीधर, मधुसूदन, श्याम, मुकुंद, मिलिंद, माधव, श्रीकृष्ण, श्यामसुंदर, चक्रधर, गदाधर, अच्युत, नंदनंदन, यशोदानंदन, देवकीनंदन, द्वारकाधीश व वासुदेव – अशा एकाहून एक विशेषगुणयुक्त नावांनी विश्वविख्यात झाला. अशा या विचारवंतांच्या विचारवंताचं, सारथ्यांच्या सारथ्याचं जीवनभर सारथ्य करण्याचं परमसौभाग्य अखेरपर्यंत दारुकाला लाभलं. दारुक हा श्रीकृष्णाच्या सहवासात

रुक्मिणीहून अधिक काळ राहिलेली एकमेव व्यक्तिरेखा आहे!

माझ्या साहित्यिक आकलनाला दारुकामध्ये सकस व सुप्त अशी प्रभावी व्यक्तिरेखा प्रकर्षानं स्पर्शून गेली. श्रीकृष्णचरित्राशी निगडित सर्वच संदर्भग्रंथात हा दारुक सखा व सारथी फारच जुजबी बोलला आहे. त्याला मन व मुखभर बोलता करणं माझ्या लेखकीय मनाला आव्हानाचं वाटलं. त्याचाच मूकपणा धारण करून मी ते स्वीकारलं. श्रींच्या चारही दूधरंगी, शुभ्रधवल व चैतन्यशील पुष्ट अश्वांसह श्रीसारथी दारुक आपली म्हणून एक 'सारथीगीता' इथं खोलून दाखवतोय की नाही, ते अर्थातच वाचकांनीच ठरवायचं आहे.

जी गत दारुकाची तीच वेगळ्या अंगानं यादव सेनापती सात्यकीची आहे. श्रीकृष्णानंतर एकटचा सात्यकीचा 'आजानुबाहू-महारथी' असा स्पष्ट संदर्भ येतो. हे त्याचं 'आजानुबाहू' महारथीपणच मला त्याच्या कथेत बोलका करण्यासाठी भाग पाडून गेलं. श्रीकृष्ण जीवनभर ज्या-ज्या अरेराव दुष्टांशी बुद्धिचापल्यानं लढला त्यावरूनच तर तो जगातील अजिंक्य योद्धा ठरला. गीतेमुळं सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञ ठरला. (असा हा 'फिलॉसॉफर-वॉरियर!') माझ्या चिंतनात विविध ढंगांनी चालू लागला की, त्याच्या सावलीसारखा हटकून चालायचा तो अर्जुनच. पण हा श्रीकृष्ण विश्रामासाठी, कसल्याही परामर्शाच्या चर्चेसाठी बसला की, त्याच्या सावलीची जागा हटकून घेत आला तो, हा अठराकुलीन लाखो युद्धसंमुख यादवांचा महाविक्रमी, अनुभवी व वयस्क असा सेनापती, आजानुबाहू सात्यकीच!

श्रीकृष्ण अंत:पुरी कक्षात मन:पूत बोलला ते प्रिय पत्नी रुक्मिणीशी. त्याचं 'स्त्रीत्व' या जीवनसत्यासंबंधी वाद-विवाद, भ्रमण, संभाषण झाल, ते सखी द्रौपदीशी. तो त्याच्या प्रिय गरुडध्वज रथावर होता, तेव्हा तो बोलला ते सखा अर्जुनाशी, द्वारकेत, कुरुक्षेत्रावरच्या शिबिरात त्यानं मन:पूर्वक सल्लामसलत केली, ती आजानुबाहू सात्यकीशी आणि – आणि महाभारतीय युद्धानंतर द्वारकेत आल्यानंतर पुन्हा महर्षी घोर आंगिरसांशी भेट व संभाषण-चर्चा झाल्यानंतर द्वारकेतील त्याच्या उतारवयातील, चिंतनशील, अंतिम व्रतस्थ झालेल्या (मनानं वानप्रस्थ स्वीकारलेल्या.) श्रीकृष्णाच्या महत्त्वाच्या द्वारकेतील अंतिम वास्तव्यात त्याचा भावविश्वस्त झाला, तो एकमेव उद्धव!

या महाकथावस्तूतील 'उद्धव' ही माझ्या साहित्यिक भावकेंद्राला सर्वाधिक स्पर्शून गेलेली, सर्वाधिक रससंपन्न व्यक्तिरेखा आहे. कसलंही समर्थन देण्याचं दायित्व न मानलेली श्रीकृष्णानंतरची माझी ती प्रिय भावव्यक्तिरेखा आहे. श्रीकृष्ण व कर्ण या जशा एकाच नाण्याच्या दोन स्पष्ट बाजू आहेत, तशाच फार वेगळ्या व सखोल अर्थानं श्रीकृष्ण व उद्धव याही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत! तत्त्वज्ञानाच्या नाण्याच्या. अर्जुनासारखं शस्त्र घेऊन उद्धव श्रीकृष्णाबरोबर जीवनात उतरला असता तर? बलराम, अर्जुन, कर्ण यांना मागं टाकून गेला असता काय? चिकित्सकाला जागीच खिळवून विचार करायला लावणारा हा प्रश्न आहे.

कुठलंही शस्त्र हाती न धरलेल्या सुमित्र सुदाम्याला मस्तकावर श्रीकृष्णाच्या विमल नेत्रांतून पाझरलेल्या स्नेहल आत्मरसात अभिषेक होण्याचं दुर्लभ भाग्य लाभलं. तो

धन्य झाला.

हातचं कुठलंही शस्त्र कधीच न वापरलेला उद्धवही श्रीकृष्णाचा भावविश्वस्त झाला. तोही बदरीकेदारावर श्रीकृष्णानंतर त्याच्या नावाचा आश्रम उठवून धन्य झाला. कृतार्थ झाला. अमर झाला.

सुदामा व उद्धव या दोन टोकांच्या व्यक्तिरेखा आहेत. गोकुळातील गोपी व कामरूपातील श्रीकृष्णानं विमुक्त केलेल्या, पुन्हा पुनर्वसित केलेल्या सोळा हजार नारी ही दोन टोकांची स्त्री जीवनसत्यं आहेत. आचार्य सांदीपनी व घोर आंगिरस ही दोन टोकांची परमोच्च गुरुतत्वं आहेत. यादवश्रेष्ठ वसुदेव व गोपनायक नंद ही दोन टोकांची वंदनीय पितृस्थानं आहेत. पराकोटीचे भावआघात सोसलेली माता देवकी व आतबाहेर निखळ भाबड्या, प्रेमळ गोपगोपींची निरलस माता यशोदा ही दोन टोकांची पूजनीय मातृस्थानं आहेत. गोपसखी राधिका व पांडवसखी द्रौपदी या दोन कसल्याही लौकिकाच्या संकल्पनेच्या चिमटीत न सापडणाऱ्या दोन टोकांच्या भावसख्या आहेत.

याशिवाय बलराम, रेवती, अमात्य विपृथू, कौरवांकडील भीष्म, महात्मा विदुर, संजय, अर्जुनासह सर्वच पांडव, कुंतीआत्या, पांचालांकडील धृष्टद्युम्न अशा पांचाल, यादव, कौरव, विराट पांडव, मत्स्य, मद्र अशा शब्दश: सहस्रावधी स्त्री-पुरुषांनी केंद्रस्थानी मानलेलं 'वासुदेव' म्हणून वंदनीय ठरविलेलं 'श्रीकृष्ण' हे योगयोगेश्वर पूर्णरूप आजही तुम्हा-आम्हाला 'हृदयस्थ' वाटतं, ते का? विज्ञानानं कितीही झपाटा मारला तरी ज्ञान, विज्ञान व प्रज्ञान व्यापून दशांगुळं उरणारा हा 'श्री' उद्याही असाच मनामनांत सतेज राहणार तो कसा? तो 'युगंधर' च आहे, याचा इथं यथाशक्ती, यथामती वेध घेण्याचा हा विनम्र प्रयत्न आहे.

शेवटी गीतेच्या सार्थ शब्दांतच म्हणतो :

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।**

**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि।**

हे 'आचमन' घेण्यापूर्वी मलाच काय कुणालाही म्हणावंच लागेल, तेच म्हणून थांबतो-

।। श्रीकृष्णापर्णमस्तु।।

मे, २००३

**शिवाजी सावंत**

All rights reserved along with e-books & layout. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, without the prior written consent of the Publisher and the licence holder.
Please contact us at **Mehta Publishing House**, 1941, Madiwale Colony, Sadashiv Peth, Pune 411030.
& +91 020-24476924 / 24460313
Email: info@mehtapublishinghouse.com
production@mehtapublishinghouse.com
sales@mehtapublishinghouse.com
Website: www.mehtapublishinghouse.com

या पुस्तकातील लेखकाची मते, घटना, वर्णने ही त्या लेखकाची असून त्याच्याशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

**या पुस्तकाची ही ९वी आवृत्ती असून, श्रीमती मृणालिनी सावंत यांनी ती पुनर्संपादित केली आहे.**

# अनुक्रमणिका


श्रीकृष्ण

रुक्मिणी

दारुक

द्रौपदी

अर्जुन

सात्यकी

उद्धव

# श्रीकृष्ण

# १

# श्रीकृष्ण

मलाही आज बोललंच पाहिजे!! असं चमकू नका! 'शिष्टाई' करणारा, पट्टीचा संभाषणचतुर म्हणून तुम्ही मला चांगलंच जाणता. पण मी कसलीही 'शिष्टाई' आज करणार नाही. कसलंही चतुर समर्थन मी मुळीच देणार नाही. मग मी बोलणार आहे तरी का? कसं आणि कशासाठी?

माझी 'गीता' युगानुयुगं तुम्ही ऐकलीत. वर्षानुवर्षं माझी 'उद्धवगीता' अभ्यासलीत. माझ्या जीवनाची म्हणून एक 'कृष्णगीता' आहे. ती मला कुणालातरी सांगायची आहे. कुणालातरी का – सर्वांनाच कधीतरी सांगायचीय, हे मात्र कुणीच ध्यानी घेतलेलं नाही.

"तू नव्हतास – मी नव्हतो. असा काळ कधी झाला नाही. पुढे कधी होणार नाही, " असं मी माझ्या प्रिय सखा अर्जुनाला गीतेत म्हणालो! आज मी पुन्हा सांगतो, ते मी केवळ एकट्या अर्जुनाला नाही म्हणालो! 'जीव' म्हणून जगणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला व तेही सर्वकाळसाठी म्हणालो. तत्त्वरूपानं, विचाररूपानं प्रत्येक जिवात मी अंशरूपानं नांदतो आहे. तेही सर्वकाळासाठी! आजचा तुमचा व माझाही काळ 'विज्ञाना' चा आहे. नुसत्या ज्ञानाचा नाही, भौतिकाच्या विशेष ज्ञानाचा आहे. विज्ञान आज म्हणतंय 'काळ' अखंड आहे! त्याला आदिही नाही व अंतही नाही!

आणि मी तर गीतेत स्पष्ट व तेही केव्हाचंच म्हणालो, "मीच काळ आहे! स्पष्टच नाही काय? तुमच्याशी मनमोकळं बोलण्याचा मला जसा काल अधिकार होता; तसाच तो आजही आहे, उद्याही राहील. थोडा शांत विचार करून बघा – हे नक्कीच पटेल."

तर अखंड काळाबरोबर अविरतपणे भोवतीचं जड व चैतन्यमय जीवन सतत बदलत आहे! 'तरंगवाद' हाच त्याचा स्थायिभाव आहे. हा 'तरंगवाद' म्हणजे तरी काय? तर मानवांसह सर्व जीवसृष्टी आचार-विचार यांचं कधी-कधी अत्युच्च शिखर गाठते. तर कधी-कधी ती पाऽर रसातळापर्यंतही जाऊन पोहोचते... मात्र वजनरहित ऊर्जेनं व्यापलेलं हे चैतन्यमय जीवन अनंत आहे; असीम आहे. अखंड व चिरंतन आहे ते. वाढ व विकास हीच त्याची लक्षणं आहेत. म्हणूनच बदलत्या जीवनाबरोबर ते सर्वदूर समजून घेण्याची भाषाही आज बदलणार नाही का?

गीतेतील दहाव्या अध्यायात मी नानापरींनी, विविध दाखल्यांनी माझ्यातील 'श्रीकृष्ण' म्हणजे कोण, ते स्पष्ट मांडलं आहे. तो समजून घेण्याची भाषाही आज बदलणार नाही का? तर त्या बदललेल्या भाषेतच तुमच्याशी, आज मी बोलणार आहे.

पण नेमक्या कोणत्या नात्यानं आज मी हे तुमच्याशी बोलतो आहे? बालवयातच नाना नावांच्या, नानाविध रूपांच्या असुरांना, राक्षसांना, लीलया वधणारा ''लीलापुरुष'' म्हणून? अक्षम्य वाटावी अशी स्नानमग्न गोपींची वस्त्रं चोरणारा ''नटखट चोरटा''

म्हणून? प्रथम गोपांचा नि पुढे यादवांचा प्रमुख झालेला ''योद्धा'' म्हणून? ज्याच्या पित्याच्या घरी दह्या-दुधाचे डेरेच डेरे असताना त्यांची चोरी करणारा खटचाळ चोरटा म्हणून? ''अवतार'' या गोंडस उपाधीची झूल पांघरणारा किमयागार म्हणून? द्रौपदीला नेमक्या क्षणी लज्जारक्षणासाठी वस्त्रं पुरवणारा किमयागार म्हणून? की महाकाव्य महाभारताचा एकमेव कणा म्हणून? की अठरा अक्षौहिणी बलदंड योद्ध्यांचा रोमहर्षण, प्राणांतक, अनावश्यक समरखेळ मांडणारा लहरी खेळगडी म्हणून? त्याचा एकमेव नायक म्हणून मी हे बोलतोय?

यासाठीच आज हे मी स्पष्ट आणि मनमोकळेपणानं बोलताना माझा एक आक्षेप आहे. मला असं मानूनच तर सर्वांनी आजवर स्वत:पासून कितीतरी योजनं मला दूर- दूर ठेवलं! कटाक्षानं आणि चतुर कौशल्यानं! देव्हाऱ्यात केवळ पुजून चालवावा असा नुसता ‘देव’ करून ठेवलाय तुम्ही सर्वांनी माझा!

मी ''विष्णूचा अंश'' आहे, हे एका पायावर मान्य करायला तुम्ही आनंदान लगेच तयार होता. आजही आहात, उद्याही असाल. शेकडो वर्षं मी आवर्जून सांगत आलो – ‘मी अंशरूपानं तुम्हा प्रत्येकात नांदतो आहे.’ ते मात्र आकलून घ्यायला तुमची मुळीच तयारी नाही!

खरं सांगा, मी हे तुमच्याशी बोलतोय म्हणजे तुम्ही तुमच्या स्वत:शीच बोलत नाही काय? मला कृपा करून तुमच्यापासून दूर, देव्हाऱ्यातील ‘वासुदेव’ मानू नका. तुमच्या मनाच्या देव्हाऱ्यातील ‘अच्युत’ च तुमच्याशी बोलतोय असं माना.

फार-फार वर्षं झाली आपला संवाद होऊन. सुमारे पाच हजारांहूनही अधिक वर्षं! आता मनसोक्त मनमोकळं बोललं तर पाहिजेच. बोलायला मी तयार आहे आणि तुम्हीही ऐकायला उत्सुकच आहात.

माझा संपूर्ण जीवनपट थरारक घटनांनी कसा तुडुंब भरलेला आहे. फांदी-फांदीवर हिरवे, गुलाबी, कच्चे, पक्के, फळांचे घोसच घोस लहडलेले असावेत, अशा डेरेदार औदुंबर वृक्षासारखं होतं, माझं जीवन. अश्वत्थासारखं नव्हे, औदुंबरासारखंच! शब्दश: शेकडो-हजारो स्त्री-पुरुष व्यक्तिरेखा या वृक्षाभोवती फेर धरून गेल्या. किती फांद्या! त्यावर लहडलेले घटनांचे किती-किती अगणित घोस!

माझ्या जीवनगाथेची वाटचालही तशी सुखासुखी व सरळ झालेली नाही. अनेक प्रज्ञावंत ऋषिमुनींनी माझी ही जीवनगाथा स्वत:ला भावेल, रुचेल, तसलं अंगडं-टोपडं चढवून मनसोक्त सजवली, मढवली.

गेली सुमारे पाच हजार वर्षं अनेक पुटंच पुटं चढलीत माझ्या जीवनपटावर. मी आज ठरवलंय; माझ्या खऱ्या अस्तित्वावर चढलेली, भावुकतेनं नकळत चढविलेली ही सर्व-सर्व पुटं निधार्रानं शक्य तेवढी खरवडून काढायची. परखड भाषेत केवळ खंर तेच बोलायचं! खरं तेच बोलायचं; ही तर माझी जन्मजात खोडच आहे. त्यासाठी मुळाचा शोध घेणारे प्रश्नच प्रश्न प्रथम तुम्हाला व स्वत:लाही विचारायचे. मग पटतील अशी त्यांची तर्कशुद्ध निर्दोष उत्तरं शोधायची! माझी गीता म्हणजे तरी दुसरं-तिसरं काय आहे? कठीणांत कठीण प्रश्न आणि सोप्यात सोपी रसाळ उत्तरंच नाहीत काय ती?

हजारो वर्षं मी सर्वांच्याच नानाविध प्रश्नांना नाना प्रकारची केवळ उत्तरंच देत आलो. ती पटली म्हणून तर तुम्ही मला अभिजात, श्रेष्ठ तत्त्वज्ञ मानलंत. एक अतुल दार्शनिक मानलंत. ते ठीकही आहे. पण या तत्त्वज्ञाचा अगदी सहज कुणालाही न

कळेलसा तुम्ही चक्क अवतारी ईश्वर करून टाकलात! त्या तत्त्वज्ञपणाचा अधिकारी म्हणून मी आज एकच – केवळ एक प्रश्न विचारतो आहे, अगदी सर्वांसाठी. मिळेल काय मला याचं समर्पक असं उत्तर? आज तरी?

काय करून ठेवलंय गेल्या हजारो वर्षांत माझ्या जीवनचरित्राचं सर्वांनी माझ्या निस्सीम भक्तांनी तसंच कडव्या विरोधकांनीही. कुठून कुठूवर आणून ठेवलंय मला! भाबड्या भक्तांनी त्यांच्या सोईनं माझा 'देव' केला, तर विरोधकांनी 'कृष्ण कारस्थानी,', 'कपटी' अशी निवडक उपाधी मला देऊन हात झटकले. मला कुटिल कारस्थानी ठरविलं!

यासाठीच माझ्या जीवनाच्या स्वच्छ नीलवर्णी सरोवरावर हजारो वर्षं दाट दाटलेलं सर्व शेवाळं आज माझं मलाच निर्धारानं दूर करायचं आहे, केवळ माझ्याच आंतरिक समाधानासाठी. म्हणूनच तुम्ही पिढ्यानपिढ्या वाचलेलं, तोंडपाठ केलेलं, पारंपरिक पोथीनिष्ठ 'श्रीकृष्ण-चरित्र' मी मुळीच सांगणार नाही! आज या क्षणी माझं जसं घडलं, तसं चरित्र सांगितल्याविना मूकच राहणंही माझ्या हातात नाही. फार तर काय होईल? एखादी नगण्य घटना पूर्णतः दूर राहील. घटनांचा क्रमही कुठंतरी मागं-पुढं होईल. एखादा छोटासा संदर्भ समूळ निसटेलही. त्यामुळे खरोखरच फारसं काही बिघडत नाही.

आज या क्षणी मी पहुडलो आहे, तो सौराष्ट्रातील 'भालका तीर्था' वरील एका फांद्याच फांद्या असलेल्या, डेरेदार प्राचीन अश्वत्थ वृक्षाच्या तळी. का आलो मी इथं? माझ्या अत्यंत प्रिय मेघपुष्प, बलाहक, शैब्य आणि सुग्रीव या पांढऱ्याशुभ्र, पुष्ट चार घोड्यांचा खरारा आजवर मी स्वतःच करीत आलो होतो. तो माझा मला सर्वांत प्रिय असा नुसताच कर्मयोग नव्हता, तो सहज असा प्रेमयोगही होता. 'घोडा' या मला सर्वाधिक आवडणाऱ्या गतिश्रेष्ठ प्राण्यावरचा. त्यांच्या खराऱ्यासाठी लागणाऱ्या काटेरी रानवेळी या अरण्यात फिरून, निवडून मी नुकत्याच गोळा केल्या आहेत. त्यांची काटेरी पुरचुंडी माझ्या पुष्कराजमंडित, अंगठीधारी उजव्या मुठीत घट्ट धरलेली आहे. या पुष्कराजावर मस्तकावरच्या तळपत्या सूर्याची चिरतरुण किरणंच किरणं उतरलीत. माझ्या रक्तातील पेशीपेशींना या किरणांचा दाट चिरपरिचय आहे.

दिवस ग्रीष्माचे आहेत. या पर्णसंपन्न अश्वत्थाच्या पर्णांची निरामय स्वरसुंदर सळसळ अरण्यभर पसरलेली आहे. मला ती स्पष्ट ऐकूही येत आहे. या वृक्षाच्या बुंध्याशी सावलीत मी माझं मस्तक विसावत ठेवलं आहे. माझा शतकोत्तर – अचूकच सांगायचं, तर एकशे एकोणीस वर्षांचा उंच-निंच निळसर-सावळा देह आता इथं शांत, शांत विसावला आहे. किती अब्द, अब्द पाहिलं, अनुभवलं, घडवलं, परतवलं, रुजवलं माझ्या या नीलवर्णी देहानं! देहानं? छे! त्यातील 'श्री' म्हणून विश्वमान्य झालेल्या अमर तत्त्वानं! 'वासुदेव' म्हणून सर्वस्वीकृत झालेल्या अजर तत्त्वानं!

माझ्या कंठात पांढऱ्याशुभ्र फुलांची, मध्येच हिरव्याकंच पानांचे कलाश्रीमंत गुच्छ गुंफलेली टवटवीत 'वैजयंतीमाला' विसावलेली आहे. टपोऱ्या मोत्यांचे कौस्तुभमणीधारी कंठेच कंठे आणि कितीतरी सुवर्णी अलंकार छातीवर स्पंदून रुळताहेत. त्याखाली फार दिवसांनी आज हेतुतः मी अंगी धारण केलेलं सोनवर्खाचं लोहकवच आहे. माझ्या कमरेच्या निळ्या शेल्यात नेहमी बांधलेला, मी कित्येकदा प्राणदेठापासून फुंकलेला माझा प्रिय व सुलक्षणी पांढराशुभ्र 'पांचजन्य' शंखही आता भूमीवर निवांत विसावला आहे. दोन्ही दंडांत रुतलेली सुवर्णी बाहुभूषणं धरून उतरणाऱ्या घामाच्या उष्ण-उष्ण धारा माझ्या मलाच स्पष्ट जाणवताहेत. माझ्या झळझळीत पीतांबरावर अश्वत्थाची

पानं चुकवून उतरलेले सूर्यकिरणांचे काही चुकार कवडसे ऐसपैस पसरलेत. कटीभोवती लपटलेल्या नीलवर्णी तलम शेल्याला तर रानगवताची काही धीट पाती सहजच चिकटली आहेत. अर्धवट मुडपलेल्या उजव्या गुडघ्यावर आडवा विसावता सोडलेला माझा पीतांबरधारी डावा पाय मला स्पष्ट दिसतो आहे. त्याचा गुलाबी तळवाही! होय! माझ्या अथक नि उदंड भटकंती केलेल्या या चक्रवर्ती तळव्यातच 'जरा' नावाच्या व्याधानं नुकताच सोडलेला, खोलवर रुतलेला एक सूची बाणही मला स्पष्ट दिसतो आहे! या तळव्यातून टपकणाऱ्या व पीतांबरावरून खाली उतरलेल्या उष्ण-उष्ण रक्ताचा स्पर्शही माझा मला स्पष्ट-स्पष्ट जाणवतो आहे. जमिनीवर टेकलेल्या उजव्या पायाच्या टाचेशी दाटलेलं माझ्याच दुर्लभ, उष्ण रक्ताचं थारोळंही पसरलेलं मला स्पष्ट दिसतं आहे.

रक्त! खरचं रक्त म्हणजे असतं तरी काय? तो असतो चैतन्यानं अखंड काळाला साक्षी देऊन दिलेला संस्कारशील हुंकार! पिढ्यानपिढ्याच्या दीर्घ साधनेच्या संस्कारशील वाटचालीनं लाभलेला. माणूस सर्व सर्वकाही आपल्या बुद्धिकौशल्यानं निर्माण करू शकतो. करू शकत नाही निर्माण, रक्ताचा एक साधा थेंबही खरचं कसं होतं माझं हे रक्त! या क्षणी माझं मलाच जाणवत आहे की, फारच दुर्मीळ रंगसूत्रांच्या गुणांनी युक्त होतं ते. त्या रंगसूत्रांचा वाण आणि पोत नीट कळला. तरच कुणालाही कळली तर कळणार माझी ही 'जीवनगीता' .

या क्षणी माझ्या तळव्यातून आवेगानं स्त्रवणाऱ्या रक्तधारांनी माझा स्मृतिकोश – अगदी बालपणापासूनचा स्मृतिकोश फोडला आहे. स्मृतींच्याही धारा, रक्तधारांसारख्या आवेगी चैतन्यानं भरलेल्या. किती स्मृती, किती धारा! त्यातील पहिलीच उसळती, उफाळती रक्तधार मला स्पष्ट दिसते आहे ती, माझ्या मर्मबंधातल्या सुगंधी ठेव असलेल्या कुपीला जाऊन भिडलेली. थेट गोकुळाला भिडलेली!

गोकूळ!! कसं होतं हे माझं प्राणप्रिय गोकूळ? तशी व्रजभूमीत आणखीही सतरा-अठरा गोकुळं होती. त्यातील मार्श गोकूळ प्रमुख होतं, सर्व-सर्व प्रकारच्या प्रदूषणांपासून दूर. निसर्गदत्त, टवटवीत. इथं नुसतेच गोपगोपी स्त्री-पुरुष नव्हते राहत. आर्यावर्ताच्या ब्रह्मावर्त या गंगा-यमुनेच्या खोऱ्यातील ते एक नांदतं, छोटं ग्रामच होतं. आर्यावर्ताचा घेरही चांगला दंडकारण्यापासून गांधारापर्यंत पसरला होता त्या वेळी. गोकुळांत कृषिवलांपासून, सुवर्णकार, काष्ठकार, उपलेपक, रजक, धीवर, कुंभकार, लोहकार, चर्मकार अशा अठरापगड ज्ञातीही गुण्यागोविंदान नांदत होत्या. त्याही 'गोप' च मानल्या जात होत्या.

चांगल्या तीन–चार योजनांचा घेर होता, माझ्या प्राणप्रिय गोकुळाचा. त्याचाभोवती चंद्रकोरीसारख्या सत्त्वशील, जलमय यमुनेनं अर्धवर्तुळी फेर धरला होता. उभ्या गोकुळाला वेळूचं व मेसकाठ्यांचं, भक्कम संरक्षक कुंपण फिरलं होतं. वाघ, सिंह, कोल्हे, लांडगे, तरस या हिंस्त्र वनचरांपासून आम्हा गोपांच्या प्राणप्रिय गोधनाचं रक्षण करण्याची दक्षता होती ती. याशिवाय गोधनाच्या संरक्षणाचा अधिक भार होता, तो कुत्र्यांवर. मूळची नाना वाणांची रानकुत्री माझ्या कष्टाळू गोपांनी अपार कष्ट घेऊन माणसाळवून घेतली होती. त्यात लांबट अंगलटीची, कमरेत चिवळ अशी ताम्रवर्णाची, काळीशार तर काही काळी–बाळीही होती. दक्षिणेला कुंपणाबाहेर कितीतरी वाव लांबीचा खंदकासारखा एक चर होता. तो पूर्वजांनी कितीतरी वर्षांपूर्वीच खोदला तेव्हाच चुनखडीनं

आणि चिकणमातीनं लिंपून घेतला होता. त्यात गोधनाचं मूत्र, गोमय, गवतकाडी रोज सकाळी व संध्याकाळी नेमानं टाकलं जाई. या गोमयाच्या खंदकावरही पसरट लाकडी झाकणं होती. त्यांची उघडझाप करण्यासाठी त्यावर भक्कम लाकडी हातमुठी होत्या.

प्रचंड संरक्षक कुंपणाला उगवतीला एक व मावळतीला एक, अशी दोन भक्कम व उंचच उंच लाकडी महाद्वारं होती. किकर वृक्षाच्या टणक टिकाऊ लाकडांची तीन पुरुषी उंचीची होती ती. या महाद्वारांच्या दोन्ही वीतभर जाडीच्या व दोन वाव रुंदीच्या जोड फळ्यांवर आम्हा गोपांची गोकुळातील कुशल सुतार-गोपांनी खोदलेली आकर्षक मानचिन्हं होती. शेपटी फुलवलेल्या, नाकपुड्या विस्फारलेल्या, जबड्यातून लाळेची तार ओघळणाऱ्या, प्रतिस्पर्ध्याशी मस्तक भिडवायला उतावीळपणे उधळलेल्या, माजावरच्या दोन पुष्ट खोंडांची. या खोंडांची पुष्ट, मांसल वशिंडं उजवीकडं कलली होती. जमिनीपर्यंत टेकू बघणारी त्यांची चुणीदार पोळी त्यांचा माज खुलवीत होती. त्यांना बघताना वाटायचं, आता क्षणात पोळी वर खेचत डुरकून ते पूर्ण आसमंत कसा दणाणून सोडतील!

एकदम वरच्या बाजूला पूर्णाकृती चंद्रप्रतिमा खोदली होती. तिचा अर्धा भाग डाव्या द्वारावर व उरलेला अर्धा भाग उजव्या द्वारावर खोदून पूर्ण केला होता. आम्ही गोप 'अभिरभानू' म्हणजे 'चांद्रवंशीय-सोमवंशीय'. त्याचं हे प्रतीक होतं, वंशचिन्ह होतं, रोज संध्याकाळी द्वारपाल गोपांनी ही द्वारं मिटली की, पौर्णिमेची पूर्णाकृती चंद्रप्रतिमा आपोआप पूर्ण होई. उधळलेले दोन्ही खोंड एकमेकांना मस्तकं भिडवून आतील गोपांचं संरक्षण करण्यास सिद्ध होत. या दोन्ही महाद्वारांना खांबांसारखे गोल, शिसमाचे घोटीव व प्रचंड अडणे होतं. रात्रीच्या रहदारीसाठी छोटा दिंडी दरवाजा वापरला जाई. आज आत्ता या क्षणीही त्या भव्य महाद्वारांची मी कैकवेळा ऐकलेली 'करकर' मला स्पष्ट ऐकू येत आहे. पूर्वेच्या द्वाराच्या करकरीशी तर माझ्या कितीतरी स्मृती निगडित झाल्या आहेत!

रोज पूर्वेच्या महाद्वारातून गोकुळात शेकड्यांतच गणना होईल, असं आमचं गोधन चरणीसाठी हंबरत बाहेर पडे. त्यांनी उठविलेल्या चैतन्याच्या सलग हंबरांनी माझं प्राणप्रिय गोकूळ कणाकणांतून फुलून जागं होई. 'इडा' देवीचं नाव घेऊन नित्याच्या कर्मयोगाला जुंपून घेई. मावळतीचं महाद्वारं यमुनेच्या पात्राला जवळ होतं. संध्याकाळी ते चरून तृप्त झालेलं गोधन त्या द्वारातून यमुनेचं पाणी पोटभर रिचवून, वासरांच्या ओढीनं चौखुर उधळतच, शेपटी चाळवीत परते. त्या वेळी मावळतीच्या सूर्यकिरणांत उठलेले गोरजांचे थरच थर या मावळतीच्या महाद्वारावर हलके-हलके उतरत. द्वारपाल गोप ही महाद्वारं मग यमुनाजलानं पाषाणी कपच्यांनी, खरवडून दर दोन सप्ताहांनी स्वच्छ-स्वच्छ धुऊन काढीत.

फिरलेलभोवतीया संरक्षक मुख्य कुंपणाला लागूनच आतल्या बाजूला तशाच; पण छोट्या कुंपणांचे वेगवेगळे गौळगोठे. अशा दोन गोठ्यांमध्ये गोधनांच्या चाऱ्यांनी रचलेले, वाळवी लागू नये म्हणून अधांतरी ठेवलेले; चौकोनी उंच लाकडी मचाण होतं. रानगवताच्या छपरांनी आच्छादलेले होतं ते. प्रत्येक गोठ्यासमोर सुघड दगडांनी उभारलेले पाण्याचे चर होतं. ते सतत नितळ निळ्या यमुनाजलानं भरलेले असत. हे गौळगोठे वेगवेगळ्या अठराकुलीन गोपांचे; तसेच इतर अठरापगड जातींच्या गोधनांचेही होते. सांडांचे; तसेच लहानथोर वासरांचे गौळगोठे स्वतंत्र होतं. उगवतीच्या

महाद्वारालगत सर्वांत मोठा प्रशस्त गौळगोठा होता, तो माझ्या बाबांचा – नंदांचा, कितीतरी शेकड्यांनी गोधन होतं त्यात. माझे बाबा गोकुळातील सर्व गोपांचे 'मुखिया' होतं. सर्व जण त्यांना आदरानं 'नंदबाबा' च म्हणत. व्रजातील इतर गोकूळं आमच्या गोकुळाला – बाबांच्या नावानं 'नंदग्राम' म्हणून ओळखत.

या गोकुळात मध्यभागी वेगवेगळ्या गल्लीबोळांची वसाहत होती, सुरचित अशी. गल्ल्यांना एकमेकींस जोडणारे छोटेच; पण स्वच्छ आडवे–उभे पायरस्ते होतं. त्यांच्या दुबाजवांना सांडपाण्याचे चरही होतं. घरं साधीच – मातीची, स्वच्छ नि कौलारू होती, सर्वच गोपांची. त्यांच्या भित्ती कावेनं सारवलेल्या होत्या. त्यात चुनकळीनं चितारलेली जोडकासेच्या पुष्ट गाईंची, शेपट्या फुलवून हुंदडणाऱ्या वासरांची, हंबरणाऱ्या, फुसफुसणाऱ्या, पुष्ट सांडांची, डेरेदार वटवृक्षाखाली रवंथ करीत विसावलेल्या खिल्लारांची चित्रं होती. आम्ही गोप 'अभिरभानू' वंशाचे. वंशदेवता म्हणून 'इडा' देवीची नाना आविष्कारांतील चित्रं होती. 'गोप' मथुरेच्या यादवांचे मांडलिक होतं. यासाठी यादवांची होती, म्हणून ही 'इडा' आमचीही वंशदेवता होती. आद्यपुरुष अभिरभानूंपासून नंतर झालेल्या अनेक गोपराजांची चित्रंही जमतील तशी रेखाटली होती.

प्रत्येक घरात हटकून दही-लोण्यासाठी सात-आठ वाकांची शिंकाळी होतीच. ताक घुसळणीच्या रांजणाशेजारी दोरबद्ध, दातेरी उंच मथण्याही होत्या. ओसरीवर सत्तू, कुळीथ, सावा, ओदन, गोधुम अशा धान्यांच्या कणगींची मंडावळीही फिरली होती.

या वस्तीच्या बरोबर मध्यभागी माझ्या बाबांचा चांगला आठ खणी प्रशस्त चिरेबंद 'मुखियावाडा' होता. त्याच्या समोरच भरघेराचा चौक होता. त्याला 'गोपसभेचा चौक' म्हणत. कधी निमित्त घडलं, तर इथंच गोकुळातील 'गोपसभा' भरत होती. वाड्याच्या उजव्या हाताला काही अंतरावर घुमटीच्या आकाराचं एक छोटं पाषाणी शिवालयही होतं. त्याच्या गाभाऱ्यात गंडकी पाषाणाची शाळीग्रामी, वज्रलेपी शिवपिंडी होती. ती अभिषेक पात्रातून वर्षणाऱ्या संतत यमुनाजलधारेत अहोरात्र न्हाऊन निघे. त्याच्या दर्शनी चौकात शिववाहन नंदीची घोटीव, बैठी, पाठमोरी प्रतिमा होती. आम्ही गोप मूळपुरुष अभिरभानूंच्या पत्नीपासून – मूळमातेपासून 'शिवभक्त' होतो. वाड्याच्या डाव्या हाताला काही कासरे अंतरावर मल्लविद्येचा आखाडा होता. त्यात लाकडी, लोखंडी गदा, दगडी गुड, घोटीव मल्लखांब यांनी सुसज्ज अशी प्रशस्त व्यायामशाळाही होती.

असं हे गोकूळ होतं, व्रजभूमीच्या गालावरच्या लाडिक खळीसारखं! निसर्गाला पडलेल्या गोड पहाटस्वप्नासारखं! माझं पहाटस्वप्न मात्र अनेक लहानथोर रसरशीत स्वभावाच्या जिवंत स्त्री-पुरुषांनी कसं खच्चून भरलेलं होतं. ही सर्व लहानथोर माणसं उत्क्रांतीच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रारंभीच्या काळातील होती, म्हणूनच तर ती अगदीच प्राकृतिक होती. त्यांचे राग, लोभ, मद, मोह, मत्सर हे सारे विकारही त्यांच्या रक्तासारखेच दाट होते. नैसर्गिक होते. आणि होय; त्यांचं निर्भेळ, निकोप, निर्लेप प्रेमही तसंच घनदाट होतं! निसर्गसुंदर होतं. त्यांच्या बोलण्या-वागण्याला कसलेही आतले-बाहेरचे म्हणून वेगवेगळे कप्पेच नव्हते. त्यांचा स्थायिभाव एकच होता. प्रेमासाठी प्रेम हा! प्रेमयोग हा!

येथील प्रत्येक माणूस हा प्रेमाचा एक निकोप व रसवंत कंदच होता. भावमधानं शिगोशीग टिच्चून भरलेला. म्हणूनच गोकुळातील ही लहानथोर स्त्री-पुरुष माणसं मी

विसरू म्हटल्यानं कधी विसरूच शकत नाही. किती माणसं – किती भाव, किती स्वभाव, किती विभाव!

माझे बाबा – नंदबाबा – गोपांचे मुखिया. वैश्य जातीचे. भरगच्च शरीरयष्टीचे, निमगौर, गोलचर्येचे, ठेंगणे. माझी माता – यशोदामाता – सशक्त, बाबांहून किंचित उंच, गौर, चंद्रमुखी, सदा हसरी. माझे आठ काका – सुनंद, उपनंद, महानंद, नंदन, कुलनंदन, बंधुनंद, केलीनंद आणि प्राणनंद असे. दिसायला जवळ-जवळ सारेच नंदबाबांसारखेच. एकजात सगळेच पुढच्या-मागच्या वयाचे. आणि त्यांच्या आठ स्त्रीया म्हणजे माझ्या आठ काकू. त्यांना त्यांना पतीच्या नावानंच आम्ही सुनंदकाकू, नंदनकाकू, केलीनंदकाकू असे ओळखत व हाकारत असू. यातील प्रत्येक काका कशा ना कशाततरी निष्णात होता. कुणी गोधनाच्या ऋतुनुसार येणाऱ्या विकारांवर अचूक गुणकारी औषधी वनस्पती देई. कुणी बाबांच्या अनुपस्थितीत त्यांची सर्व कामं त्यांच्या इतक्याच कौशल्यानं पार पाडी. कुणी सप्तसुरांच्या दावणीला बांधून संगीताचे नाना राग सहज आळवी. कुणी उपनिषदांचा आधार घेतं सुंदर प्रवचनं देई. यातील केलीनंदकाका हे तर हुतुतू, हमामा, लगोरी, तळ्यात-मळ्यात, खो-खो, आटचापाटचा, सुरपारंब्या, जलतरण, मल्लविद्या अशा कितीतरी क्रीडाप्रकारांत पारंगत होते. म्हणूनच माझे ते सर्वांत प्रिय काका होते. माझी दुसरी माता होती – रोहिणीमाता, यशोदामातेहून थोडीशी उंच, गौर, सडसडीत. माझ्या ज्येष्ठ बंधूची – बलरामदादाची आई.

बलरामदादा! वयानं माझ्यापेक्षा थोडासाच मोठा. तांबूसगौर, बाळसेदार. दाट जावळाचा. पटकन संतापणारा, तसाच चटकन निवळणारा. आम्ही सावत्रबंधू होतो. यशोदामातेला आम्ही दोघंही आदरानं ‘थोरली’ म्हणत असू. साहजिकच रोहिणीमातेची आपसूकच ‘धाकली’ आई झाली होती!

आम्हा दोघा भावांना नंतर लाभलेली आणखी एक बहीण होती. थोरलीला माझ्यानंतर काही वर्षांनी झालेली – एकानंगा. आमच्या लडिवाळ कौतुकानं झालेली ‘एका.’ सर्वांचीच अत्यंत लाडकी एका!

या क्षणी मला सर्वाधिक डोळ्यांच्या समोर येत आहेत, ते माझे सर्वांत प्रिय वृद्ध आजोबा – नंदबाबांचे बाबा – चित्रसेन! चित्रसेन आजोबा होते, भरगच्च पांढऱ्याशुभ्र, भूछत्री मिश्यांचे. जाड भुवयाही पांढऱ्याशुभ्र झालेले. सदैव तांबूल खाणारे. तो रवंथ केल्यासारखा तोंडात सतत चघळत ठेवणारे. त्यांची घुंगुरवाली चंची बाळगणारे. थोर हाडापेराचे. मस्तकी पिळाचं, विटकरी वर्णाचं, गोपपागोटं गुंडाळणारे. कपाळी गोपीचंदनाचा ठसठशीत टिळा रेखणारे. अंगातील बाराबंदीवर घोंगडीचंच उपरणं दोन्ही खांदाभर वेढून पांघरणारे. कमरेला कावेत रंगविलेल्या करवंदी काठधारी धोतराचा गुडघ्यापर्यंत करकचून आवळलेला बळकट ‘गोपकाष्टा’ कसलेले. हातात वरखाली होणारं ठसठशीत कुलचिन्ह – चांदीचं कडं ल्यालेले. उजव्या कानपाळीत वरच्या बाजूला टोचलेलं, मोतीधारी लोंबतं सोनेरी कर्णभूषण असलेले. थकल्यानं नेहमी वाकलेले. हातात भक्कम, घुंगुरवाळ्या गवळकाठीचा आधार घेतच ‘इडा आईऽऽ’ म्हणत उठणारे.

या आजोबांनीच तर मला गोकुळात माझी ‘जीवनगीता’ कितीतरी ढंगांनी गोपभाषेत नीट समजावून दिली होती. कुठलाही माणूस जसा सावलीला सोडू शकत नाही; तसाच मी या चित्रसेन आजोबांना कधीच विसरू शकत नाही.

तसं माझं बालपण हे त्रिकुटाचं होतं. भावत्रिकोणाचं होतं. मी बलरामदादा – नंतर तर नुसता दादा आणि आम्ही चांगले पाच–सहा वर्षांचे चे झाल्यानंतर आम्हाला लाभलेली एकुलती एक लाडकी बहीण एकानंगा – आमची प्रिय एका.

आमचं हे त्रिकूट वाड्यात असताना, अधिक ते आजोबांच्या भोवतीच घुटमळत, गरगरत राही. बाबा, थोरली, धाकली, सर्व काका–काकू, चुलत भावंडं यांनी कसं गजबजून गेलेलं होतं, ते आमचं अभिरभानूवंशीय गोपकुटुंब. बाहेर गोकूळ नि वाड्यातही गोकूळच!

थोरली सांगत आली तसं सांगायचं, तर अगदी दूधपिता असल्यापासून मी अतिशय बाळसेदार होतो. सदा हसरा, अनावर, नटखट, खट्याळ होतो. किती बाळसेदार? तर थोरली, धाकली, गोकुळातील त्यांच्या सख्या, सर्व लहानथोर गोपी क्षणभर काही मला खाली ठेवीत नसत. मला क्षणभरही विसंबत नसत. एकदा तर थोरलीनं मथणीनं ताक घुसळीत असताना गंमतच केली. केली कसली? तिच्याकडून आपसूकच झाली ती. शेजारी धाकली आई रांजणाजवळ ताक घुसळत बसली होती. काहीतरी गुणगुणत होती. आम्ही दोघं – म्हणजे मी नि दादा रांजणाला धरूनच उभे होतो. ताकात लोणी केव्हा उभरून वर तरंगेल नि त्याचा गोळा पटकन मटकवता येईल, या लालचेनं. दोघंही नागडेच होतो! कमरेला केवळ चंदेरी कडदोरे काय ते फिरले होते. पायांत चांदीचे वाळे होते – दोघांच्याही.

थोरलीची एक खोड होती. ताक घुसळताना ती मध्येच डोळे मिटून स्वत:ला हरवून अगदी तन्मयतेनं लयीत गोपगीतं गुणगुणे. त्या दिवशी मी लोण्याच्या गोळ्याच्या वाट बघून–बघून अगदी कंटाळलो होतो. रांगत, लडखडत चालत तिच्या पाठीमागंच जाऊन उभा राहिलो. बऱ्याच वेळानं तिनं घुसळणं थांबवलं. रांजणात हात घालून गुणगुणतच लोण्याचा ताकनिथळता, थबथबता गोळा हलकेच तिनं बाहेर घेतला. मला ती आता रांजणामागे बघू लागली. मी दिसलो नाही तशी ती गोंधळली. 'इतक्यात कुठं गेला हा?' असं स्वत:शीच पुटपुटत दालनभर बघू लागली.

मी आधारासाठी तिचं नेसूचं वस्त्र धरून तिच्या मागंच तर उभा होतो! क्षणभर ती फिरेल, तसा मी आपोआपच गोल फिरलो. थोड्याच वेळात तिच्या लक्षात आलं की, मी तिच्या पदराआड – पाठीमागंच तर उभा आहे. मला बघताच लोणीभरल्या हातांनीच पटकन वर उचलून घेतं तिनं अगोदर माझे मटामट मुकेच मुके घेतले. अधिक ते माझ्या गालावरच्या खळीचे. मी घुसमटलो. टाहो फोडून रडू लागलो. माझ्या पसरलेल्या टाळ्यातच हातच्या ताज्या लोण्याचा गोळा चटकन भरला तिनं. तसा मी आपोआपच मुकाट झालो. माझं अवघं रडणं अवगुंठलं ते केवळ डोळ्यांत. हसतच तिनं त्या गोरसकक्षाच्या कोनाड्यात ठेवलेल्या गुच्छातील एक टवटवीत मोरपीस खेचलं. कितीतरी रंगच्छटांनी अंगभर तळपत होतं ते. निळ्या, जांभळ्या, हिरवट, सोनेरी. माझ्या दाट, कुरळ्या केशात तिनं ते मोरपीस झटकन माळूनही टाकलं. तेव्हापासून हे मोरपीस मला चिकटलं ते सदैवच. मोरपीसही माझ्या जीवनाचं पुढं अर्थपूर्ण प्रतीकच झालं. माझ्या बलरामदादाला मात्र ते काही आयुष्यात कधी; कधीच नाही मिळालं!!

हे सारं तो दूरवरून बघतच होता. धाकलीच्या रांजणाशेजारी घुटमळत होता. काय झालं कुणास ठाऊक; एकाएकी तो आमच्याच रोखानं यायला निघाला. तो थोरलीला येऊन भिडलाही. तिचं नेसूचं वस्त्र ओढत मला खाली उतरवून आपणाला वर घ्यावं

म्हणून खुणावत केवढा आक्रोश–आकांत मांडला त्यानं. रुसून हातपाय नुसते दणादण आपटू लागला. माझ्यामुळे थोरलीच्या काही ते ध्यानीच आलं नाही. त्यामुळे तर तो बिथरलाच. फुरंगटून थेट दालनाच्या मध्येच जाऊन बसला. वरचं छत उडून जाईल असा टाहो फोडून, सटासट हातपाय झाडत आक्रोशू लागला. मला पटकन खाली ठेवून थोरली व रांजणाजवळून धाकली दोघीही धावल्या. त्याला शांत करण्यासाठी त्यांनी नानापरी केल्या. तो काही आवरत नव्हता. दोघींनी धरलं तरी उसळी घेऊन हातपाय झाडत, टाचा आपटत नुसता फुसफुसत होता. आता तर त्याला धड श्वासही घेता येत नव्हता. शेवटी तर तो कक्षात मध्येच चक्क आडवा पडून निपचित पडला. आता मात्र मी एकेक पाऊल टाकत त्याच्याजवळ गेलो. तो डोळे मिटून निपचित पडला होता. बंधुप्रेमानं मी त्याची दाट केशावळ माझ्या हातांनी घुसळली. त्यानं डोळे उघडले. मला पाहिलं, पण प्रतिसाद काहीच नाही. आता मीही रुसलो. त्याला पाठमोरा होऊन चालू लागलो. तस त्यानं पाठोपाठ येऊन मला गाठलंच. आता तर चक्क तो हसत होता! केवढ्यातरी मोठ्यानं. मनमोकळं. मीही त्याच्या गळ्यात पडून खळीळ हसू लागलो. आम्हाला असं बघून खेचल्यासारख्या आमच्या दोन्ही आया धावत आल्या. त्यांनी पटापट उचलून मुके घेत–घेतच आम्हाला भुजेवर हेतलं. मी होतो – धाकलीच्या – रोहिणीमातेच्या भुजेवर, माझा दादा – बलरामदादा होता – थोरलीच्या – यशोदामातेच्या भुजेवर!

तिनं सांगितलेली एक आठवण तर सततच माझ्याबरोबर राहणार आहे. माझ्या छातीवरच्या जन्मजात केशमय वत्सचिन्हासारखी.

मी कळता झाल्यावर एकदा गाई चारून असाच संध्याकाळी परतलो. संगीत तर माझ्या जिवाचं मर्मस्थान होतं. सर्वांत प्रिय. त्या दिवशी समोर गोधनाचे तांडे हाकीत मी मुरलीवर संगीताची वेगळीच धून स्वत:ला विसरून घुमवीत होतो. आसावरी रागाची. गोधनाच्या खुरांलगत उधळलेल्या धुळींच्या ढगांत मी व माझे स्तोककृष्ण, श्रीदामा, दामन, वरुथप, रुद्रसेन, भद्रसेन व पेंद्या असे कितीतरी गोपमित्र एकमेकांना नीट दिसतही नव्हतो. मावळतीची किरणं पाठीवर घेतं गाईंच्या तांड्यांसह आम्ही सर्व पश्चिमेच्या महाद्वारातून गोकुळात शिरलो. गायी सवयीनं ज्या–त्या गौळगोठ्याकडे पांगल्या. मी, दादा व सेवकांनी आमचं गोधन दावणीला बांधलं. रात्रभर रवंथ व त्यांच्या क्षमतेनुसार चिंतन करण्यासाठी त्यांच्यासमोर चारा टाकला. मग वाड्याकडे परतलो. दादा धाकलीला भेटायला तिच्या कक्षाकडे गेला.

घंगाळातील पाणी पायांवर घेऊन मी नेहमीसारखा थोरलीच्या कक्षात आलो. खांद्यावरचं कांबळं खुंटालीला टांगलं. हातची घुंगुरवाली गवळकाठी दालनाच्या कोनाड्यात नीट ठेवली. हातची मुरली व शिदोरीच्या लोटक्याचं गठुडं कोनाड्यात ठेवलं. समोर उभ्या असलेल्या थोरलीच्या चरणांना नेहमीसारखं मस्तक भिडवून सांज–वंदन केलं. तिनं माझ्या खांद्यांना धरून मला पटकन वर उठविलं. क्षणभर माझ्या डोळ्यांत खोलवर डोळे रोवले. तिची चर्याच कितीतरी वेगळी दिसत होती आज. तिच्या नेत्रकडा स्पष्ट पाणथरलेल्या होत्या. मी तर दचकलोच. तिचे दोन्ही हात मायेनं हाती घेऊन लगबगीनं म्हणालो, “काय झालं थोरल्या आई? अशी काय दिसतेस तू आज? इथं असून दूऽर कुठंतरी रानात गेल्यासारखी?”

“आता मुरली तूच वाजवलीस ना?” तिनं विचारलं.

"हो." मी मान डोलावली.

"केवढं पिळवटून टाकलं रे, तुझ्या मुरलीच्या अनोळखी लयीनं! खंत वाटली रे, तुझ्यासाठी मनात काधी काळी डोकावून गेलेल्या एका दुष्ट शंकेची. तू जन्मलास त्या रात्रीची. अभिजित नक्षत्राची रात्र होती ती. श्रावणातल्या वद्य पक्षाच्या अष्टमीची. उभं विश्वच चैतन्यानं कोंदून मोहरून उठलं होतं, त्या घनघोर वादळी रात्री."

"दुष्ट शंका? कसली शंका?" मी तिचे हात गदागदा हलविले. 'बस' म्हणतच तिनं लगतच्या बैठकीवर मलाही बसतं केलं. म्हणाली, "तू जन्मलास त्या रात्री प्रसूतीच्या वेदनांनी मी मूर्च्छितच झाले होते. कितीतरी मोट्ठं गर्जतं, प्रलयंकर वादळ झालं होतं त्या रात्री. गोकुळातले कितीतरी प्रचंडपुराणे, गाठाळ, उंच वृक्ष, कडाडत धडाधड कोसळने होते, त्या रात्री. पहाटे–पहाटे कधीतरी मी यमुनेवरून येणाऱ्या गार सुगंधी श्रावणझुळकीबरोबर जागी झाले. तू कुशीतच तर होतास. नवजात, ताजा, टवटवीत. एकसारखा टाहो फोडणारा, भुकेजलेला. तुला पाजण्यासाठी जवळ घ्यावं म्हझणून मी तुला पहिलाच लपेटता स्पर्श केला. आणि त्या स्पर्शाबरोबरच मला ती दुष्ट शंका आली – अगदी आतून – सरसरून की, 'हे काही माझं मूल नव्हेऽऽ!' मी साशंक डोळ्यांनी तुडचाकडे नुसती बघतच राहिले. तू टाहो फोडून हातपाय झाडतच होतास. भुकेच्या आवेगानं तू माझ्या उघडचा स्तनापग्राला किती पटकन लुचलास! माझ्या पायाच्या नखांपासून डोकीच्या केशावळीपर्यंत त्या क्षणीच एक भाववीजच जशी काही चमकून गेली, सरसरून. पूर्वी कधीही न अनुभवलेली – सखोल मातृत्वाची!! माझी जाणीवच बदलली रे – शंकेची! तिची जागा घेतली वत्सल मातृत्वानं! तुझ्या ओठांच्या पहिल्याच स्पर्शाबरोबर! तू मूक ओठीं जसा काही मला सांगून गेलास – 'मी – मीच तर तुझा छकुला – तुझा पुत्र. तू तूच माझी माता.'

"माझ्या मनाच्या तळाशी पडून असलेली ती आठवण, ती शंका, तुझ्या मुरलीनं आज पुन्हा जागृत झाली! उसळून वर आली. कृष्णा, माझ्या सोन्या, मला क्षमा कर रे, कधी काळी आलेल्या त्या माझ्या शंकेसाठी!"

मी त्या वेळी नुसता हसलो होतो. केवळ हसलो. रानात एखाद्या आवडत्या गाईची कधी–कधी झुबकेदार शेपटी मी लाडानं तोंडावरून फिरवून घेतं असे, तसेच तिचे दोन्ही गुलाबी तळहात गालांवर हळुवार फिरवून घेताना म्हणालो, "वेडीच आहेस थोरल्ये! तुला क्षमा करायची योग्यता तरी आहे काय माझी?"

मी आत जायला निघालो तसं माझे हात आवेगानं दाबून ती म्हणाली, "यमुनेच्या पात्राकडे फारसा जात जाऊ नकोस कन्हैय्या!" का कुणास ठाऊक, पण यमुना माझं हरण करणार असंच तिला वाटत असावं.

ही झाली तिनं सांगितलेली आठवण फार पुढची. माझ्या बारशाची आठवणही तिनं मला अनेकदा स्वत:ला विसरून ऐकवली आहे. तिनं सांगितलेली ती आठवण मला आजही स्पष्ट आठवते.

तो दिवस होता भाद्रपदाच्या चतुर्थीचा. आज माझं नामकरण असल्यानं कालच सारं गोकूळ गोप–गोपींनी अंगपरिश्रम करून सुशोभित केलं होतं, कालच गौळगोठ्यांकडच्या गोपांनी कासे कसून गोधनाची व वासरा–सांडांची शिंगं नाना रंगांनी सुरेख रंगवून काढली होती. त्यांच्या गळ्यांत निरनिराळ्या माटांच्या नव्या, घुमऱ्या घंटांच्या माळा चढविल्या होत्या. सर्वच जनावरांच्या कपाळावर कुंकुमाच्या मुठी

उधळल्या होत्या. आंबवती व नाना फुलांनी गोकुळातील घरं, चौक, वाडे, शिवालयं, व्यायामशाळा, महाद्वारं शृंगारली होती. ठेवणीतील गोपवस्त्रं ल्यालेल्या स्त्री–पुरुष, बालक–बालिका घरांच्या सारवलेल्या अंगणांत पहाटेपासूनच येरझारत होते. मध्यभागी असलेल्या दवंडी चौथऱ्यावर नगारे, चौघडे व पिपाण्या, अगदी ब्राह्मीमुहूर्तापासून घुमत होत्या.

मुखियावाड्याचा अंत:पुरीचा कक्ष अनंत, चंपक, जास्वंदीच्या आणि कितीतरी रानफुलांच्या माळांनी शृंगारला होता. मध्यभागी वेलबुट्टीच्या शिसमी लाकूडकामाचा नक्षीदार, झुलता पाळणा दो बाजूंच्या उंच अडंग्यांवर टांगला होता. तोही फुलामाळांनी, मोत्यांच्या व नाना मण्यांच्या माळांनी शृंगारला होता. कक्षात विविधरंगी वस्त्रं ल्यायलेल्या गोपींचा अनावर उत्साही कलकलाट कसा नुसता कोंदला होता. तलम दुपट्ट्यात लपेटलेल्या, काजळतीट लावलेल्या, गेंदेदार सोनफुलांची कुंची धारण केलेल्या मला, थोरलीनं हळुवारपणे सजलेल्या पाळण्यात ठेवलं. राजपुरोहितांनी दिलेल्या सुमुहूर्तावर तिनं माझ्या कुंचीतल्या कानाजवळ 'कुऽऽश्नऽऽ' अशा माझ्या नावाचा हळुवार उच्चार करून 'कुर्रऽऽऽर' अशी कानकुर्री उठवली! उभ्या गोकुळात सारे जण एकमेकांना उरांत न मावणाऱ्या अमाप ओसंडत्या उत्साहानं वक्षभेट घेत सांगत होते, ''आपल्या नंदबाबाच्या नवसाच्या मुलानं नाव आहे, 'कुऽश्नऽऽ! किऽशऽन!!''

क्रुश्न – कृष्ण! आकर्षून घेणारा तो – आकर्षक कृष्ण! मोहून टाकणारा – मोहक तो कृष्ण! धाकल्या आईनं आपल्या मायाळू पाठीचा पाळण्याला हलकेच एक पाठझोका दिला.

गोकुळभर नाना वाघांच्या कल्लोळत्या लयींच लयी झडल्या. गोपगोपी धुंद होऊन चौका–चौकांत, अंगणात झिम्मा, टिपरी, फुगड्या खेळले. दंगले, स्वत:ला विसरले.

वाड्यावर गोपगोपींच्या झाडून साऱ्या अठरापगड लहानथोरांच्या पंक्तीमागून पंक्ती उठल्या. माझे बाबा तृप्त झाले होते. नवसानं व पहिल्यानंच पुत्र झाला म्हणून!

माझी आई कृतार्थ झाली होती, मला आपला मानून! माझी धाकली आई धन्य झाली होती, तिच्या पुत्राला – बलरामाला खेळायला बंधू, सवंगडी मिळाला म्हणून!

दुसरा प्रहर टळला आणि मुखियावाड्याच्या ओसरीवर महत्त्वाची बैठक बसली. यासाठी तर कालच गर्गमुनी मथुरेल गोकुळात आले होते. त्यांना कुणी पाठविलं होतं, कुणास ठाऊक! ते मथुरेतील शूरसेन राज्याच्या यादवांचे खरंतरं राजपुरोहित होते. मात्र आवर्जून आले होते, ते गोप अभिरभानू वंशाच्या – नंदपुत्राच्या नामकरणविधीसाठी. बाबा आणि ते रात्रभर गुप्त कक्षात – एकांतात बराच वेळ काहीतरी बोलत बसले होते.

या बैठकीत माझे मध्यमवयस्क आठही काका–काकू, त्यांची मुलं, सर्व गोपांचे आदरस्थान असलेले चित्रसेन आजोबा बसले होते. निवडक गोपांसह शेजारीच उजव्या हाताशी बसलेल्या नंदबाबांवर व आमचे गोकुळातील पुरोहित अभिरनंदावर आपली सत्त्वशांत, तप:शील दृष्टी गर्गमुनींनी एकदा फिरविली.

गर्गमुनी! सतेज, शांत चर्येचे. दंडातील भस्मावर, मस्तकीच्या जटाभारावर टपोऱ्या रुद्राक्षमाळा आवळलेले. यादवांचे कल्पक वास्तुशास्त्रज्ञ! त्यांच्या राजकुळाने भविष्यवेधी जातकशास्त्रज्ञ. ते डोळे मिटूनच बोलू लागले – मनाच्या अंतर्मनाच्या पार पलीकडे गेल्यासारखे. काहीतरी चित्रासारखं स्वच्छ, समोर बघत असल्यासारखे. त्यांचे सत्त्वभारित बोल जमल्या, उत्सुक गोपांच्या कानांच्या शिंपल्यांत खोलवर उतरू लागले

– "गोपराज चित्रसेन आणि नंदराज ऐका. समस्त गोपजनहो ऐका! तुमच्या या प्रिय व नवजात सुपुत्राचं, शास्त्र सांगतं ते – जातक ध्यानपूर्वक ऐका -

तुमचा हा गोपपुत्र नावाप्रमाणंच 'कृष्ण' होईल! सर्वांनाच मोहून, आकर्षून टाकील तो. देहा–मनाच्या दोन्हीही सौंदर्यांनी. यापूर्वी कुणीच केला नाही, असा एक नवाच योग निर्माण करील हा. 'प्रेमयोग' नावाचा! तुम्ही–आम्ही 'कोण' आहोत; याचा शोध घेण्यासाठी उभं जीवन व्यतीत करतो. त्यासाठी नानाविध कर्म करतो. तपस्या करतो. हा जन्मत:च जाणतो, तो 'कोण' आहे ते! तुम्ही रोज जेवढ्या स्पष्ट रूपात नाना रंगांच्या तुमच्या गाई बघता; तेवढंच स्वच्छ हा निखळ सत्य सर्वांगांनी बघू शकतो, नानाविध पैलूंचं! जशा तुम्ही वेगवेगळ्या रंगांच्या गाई दुरूनच ओळखता; तसंच हा समोर आलेला प्रत्येक माणूस त्रिकालाचा वेध घेऊन अलिप्तपणे अंतर्बाह्य पाहू शकतो.

"तुम्हा सर्वांनाच तो निकोप प्रेमाचा अविस्मरणीय असा लळा लावील. प्रेमयोगाची दिव्य दीक्षाच तो मूकपणे देईल. मात्र – मात्र तुमच्या या गोकुळात अधिक काळ तो राहणार नाही! त्याचा सदैवच हवाहवासा वाटणारा निकोप व प्रेमळ सहवास तुम्हाला अधिक काळ काही लाभणार नाही!"

गर्गमुनी मिटल्या डोळी क्षणभर शांत–शांत झाले; नि:श्वासले. भूर्जपत्रावर हे अलौकिक जातक लिहून घेणारा त्यांचा शिष्य त्यांच्याकडे बघतच राहिला. जमल्या गोपांनी कित्येक नि:श्वास सोडले.

अज्ञाताच्या दूरच्या टप्प्यावर पोहोचलेल्या ध्यानस्थित गर्गमुनींचे ठणठणीत जातकबोल पुन्हा उमटू लागले. गोपसभेच्या प्रशस्त कक्षाच्या दगडी भिंतीवरही ते रोमांच उठवू लागले.

"हा सुपुत्र न्यायाचा, धर्माचा पक्ष रक्षण्यासाठी जीवनभर सतत दक्ष कर्म करीत राहील. न्यायी असून अपार अन्याय सोसलेल्या एका विस्थापित व विक्रमी राजकुलाच्या पक्षाचा हा अटीतटीनं पाठपुरावा करेल. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठीच हा अखिल विश्वानं कधीच विसरू नये, असं 'न भूतो न भविष्यति' असं एक प्रचंड महायुद्धही खेळवील! अखिल मानवजातीनं निरंतर जपण्यासाठी व जोपासण्यासाठी अशी कितीतरी शाश्वत जीवनतत्वं या महायुद्धातून तावून–सुलाखून रत्नांसारखी उभरून येतील. त्यासाठी यानं केलेला हितोपदेश अखिल मानवगंगेला युगानुयुगं शिरी धारण करावा, असा मार्गदर्शक सिद्ध होईल. चिरंतन होईल तो.

"हा अंशरूपानं पुढंही पुन:पुन्हा अवतरेल. हा अनेक अन्यायी राजे व राज्ये निर्दाळून, निखंदून टाकील. आर्यावर्ताच्या जीवनगंगेचा ओघ अनंत काळासाठी अरोध प्रवाहित करेल. स्वत: मात्र कुठल्याच राजसिंहासनाचा अधिकारी असणार नाही हा. त्याचं हे कृत्य युगायुगांसाठी समस्त मानवांना मार्ग दाखवील. स्त्रीत्वाचा याला समजलेला सत्यार्थ हा प्रत्यक्ष आचरून दाखवील. भेटणाऱ्या प्रत्येक स्त्रीला हा, 'स्त्री एक शाश्वत निसर्गतत्त्व' म्हणून गौरवील.

"एका समर्थ राजकुलाचं स्थलांतर करून त्याचं पश्चिम सागरावर हा सुनियोजित पुनर्वसन करील. तेथे प्रस्थापित केलेल्या राजकुलातील लोक सत्य विसरून उद्दाम, उन्मत्त झालेले बघून हा त्यांचा तेवढ्याच निर्लेप, अलिप्तपणानं विनाशही करील! एरवी कुणालाही असाध्य असलेल्या चौदाही विद्या याच्या निवासात पाणी भरतील. ज्यातील एकएका कलेसाठी कलावंत अटीतटीचा आटापिटा जीवनभर करतात, तप:साधना

करतात त्या चौसष्ठही कलांचा हा परिपूर्ण अधिकारी असेल. चौदा विद्या याच्या पायांच्या दासी असतील. प्रत्यक्ष सामवेदासारखं संगीत तर याच्याभोवती सदैव सप्तसुरांत रुंजी घालत राहील. नव्हे हा म्हणजे साक्षात 'संगीत' असेल! हा युगानुयुगं आपल्या गुरूंच्या नावे, तसेच मातांच्या नावे ओळखला जाईल. खरोखर याला शिकवून गुरू व पालनपोषण करून माता अजरामर व धन्य होतील. सौंदर्याचे सर्व निकष ओलांडणारं, अलौकिक, पौरुषी सौंदर्य हा सहज अंगी मिरवील. त्या सौंदर्याला साजेल अशीच उर्जस्वल नि कर्णमधुर असेल याची स्वर्गीय वेणु–वाणी. प्रसंगी ती असह्य गगनभेदीही होईल – सौदामिनीसारखी. अशा सौंदर्यालाच शोभून दिसणाऱ्या एका अप्रतिम सुवर्णनगरीचं हा पश्चिम सागरकिनाऱ्यावर योग्य वेळी निर्माणही करील. तिथं आपल्या सुलक्षणी आठ स्त्रियांबबरोर, पुत्रपौत्रांसह, हा पिढ्यानपिढ्यांनी आदर्श ठेवावा, असं कुटुंबवत्सल व भावसमृद्ध अजोड जीवन जगेल.

"गोपजनहो! यानं केलेल्या कोणत्याही चमत्कारांनी दिपून जाऊन याला ओळखण्याची, पारखण्याची चूक कधीही करू नका! हा सदेह तुमच्यात नांदणार आहे, हाच सर्वांत मोठा चमत्कार आहे!! पंचभूतांतील 'जल' या तत्वाचा अधिकारी जलपुरुष आहे हा. म्हणूनच याचे भावविभाव अत्यंत तरल, सदैव प्रवाही व निर्माणशील असतील.

"जसं जल कधीच एका जागी स्थिर राहत नाही, जीवनांचं निर्माण व विकसन करीत प्रवाहित राहतं; तसाच हा जीवनभर जलपुरुष म्हणून कार्यशील राहील. अखंड भ्रमंती करील, चक्रवर्ती होईल. युगकर्ता होईल. युगधारक होईल.

"तो नुसताच सत्य जाणणारा जलपुरुष नाही, तर तो योगी आहे. पूर्ण योगयोगेश्वर आहे!!" ते शांत ठणठणीत लयीत बोलत होते. आता त्यांची योगमुद्रा पराकोटीची तेजवंत दिसू लागली.

आपल्या अद्‌भुत जातकाचा समारोप करताना मुनिवर्य गर्ग पूर्णत: देहातीत झाल्यासारखेच दिसू लागले. अपार तेजानं त्यांची चर्या आता कितीतरी उजळून गेली. सर्वांचे डोळे अचलपणे तिच्यावरच खिळले. त्या अपूर्व जातकाच्या भैरवीचे अमृतबोल जमल्या गोपांना धन्य–धन्य करू लागले.

"प्रिय गोपजनहो! आम्ही ऋषिजन निर्लेप ध्यानाच्या सामर्थावर 'ईश्वरा' चा वेध घेतो. तरीही 'ईश्वर' म्हणजे काय हे अद्याप आम्हांपैकी कुणालाही नीट सांगता येणार नाही पुढं सांगता येईल असंही वाटत नाही. ईश्वर, देव, अवतार या मनाला भरकटत, भुलवत नेणाऱ्या भ्रामक कल्पना आहेत. तो आहे की नाही, हे मलाही सांगता येणार नाही. मात्र तुमचा हा सुपुत्र नि:संशय पूर्ण योगयोगेश्वर आहे – सर्वार्थानं विभूतिपुरुष आहे. महान पूर्णपुरुष आहे. केवळ अतुल व अजोड. याचासारखा हाच आहे. तुमच्या देवत्वाच्या सर्व–सर्व कल्पना तुम्ही नि:शंकपणे याच्या पायी अर्पून मोकळं व्हावं. कारण हा पूर्णत: अनासक्त राहील. जसा याचा स्थायिभाव प्रेमयोग आहे; तसाच तो अनासक्ती व विसर्जनयोगही आहे. हा त्या–त्या क्षणी ते–ते कर्म निर्दोषपणे करूनही फलमुक्त राहील. त्यात कधीच गुरफटणार नाही. षडरिपुंच्या वासनांपासून कमलदलासारखा सदैव निर्लेपच राहील हा! म्हणूनच तर तो दैवी किमयागार वाटेल तुम्हाला.

'वासुदेव' या अत्युच्च उपाधीपर्यंत जाईल हा. शब्दश: लक्षावधींना हा जीवन म्हणजे काय, ते कसं जगावं, हे सहज, सोप्या भाषेत सांगून जाईल. स्वत: दैनंदिन जीवनातील

छोटया–छोटया घटनांतूनही प्रत्यक्ष तसं वागून दाखवील.

"नंदगोपांच्या या बंदिस्त वाड्यात यानं पहिलाच जन्महुंकार घेतलाय. मात्र हा 'वासुदेव' एका निर्जन घोर अरण्यात अश्वत्थ वृक्षाच्या दाट छायेत विमुक्त आभाळाखाली मुक्तपणे देहविसर्जन करील. अगदी साधेपणानं!! पूर्ण एकांती. इति शुभं भवतु!" डोळ्यांसमोर काहीतरी भव्य–दिव्य, तेजस्वी बघत असल्यासारखे मुनिवर गर्ग क्षणभर स्तब्ध झाले. भावरत झाले; हरवले. दोन्ही हात जोडून मस्तकाला भिडवीत मान झुकवून हळूच पुटपुटले – "कृष्णार्पणमस्तु!"

शांत चित्त झालेले गोप मनाशी 'क्रुश्न, कृष्ण' असा नाममंत्र जपतच, मतिगुंग होऊन एक–एक करत वाड्यातून बाहेर पडले, त्या दिवशी.

थोरलीचा 'कृष्ण–कन्हैया' म्हणजे मी, मात्र पाळण्यात शांत पहुडलो होतो!

लवकरच रांगत, दौडत, सांडलवंड करण्यारचे दिवसही संपले. दोन्ही आया व काकांचे त्यासाठी धपाटे घेण्याचे दिवस मागे पडले. मी आणि दादा आता कळते झालो. आठ–दहा वर्षांचे. काही दिवसांपूर्वी आम्हाला लाभलेली एकानंगा ही गोंडस, सुंदर बहीणही आता आमच्यासारखीच रांगून व चालून, सांडलवंड करून मोठी होऊ लागली. आणि माझ्या आयुष्यातील तो दिवस उजाडला. मला प्रत्यक्षात 'गोप' करणारा. गोपदीक्षेचा दिवस.

आज मला व दादाला गोधनाला चारण्यासाठी गोकुळबाहेर पसरलेल्या यमुनेकाठच्या घनदाट कुरणांत प्रत्यक्ष न्यायचं होतं, नंदबाबांनी प्रथेप्रमाणं या गोपदीक्षेसाठी शिवकर मुहूर्तही काढला होता. मधुरेच्या व्यापारपेठेतून आम्हा दोघांसाठी जरीकाठाची मऊ वस्त्रं आणली होती. किती आकर्षक होती ती! माझ्यासाठी होतं, पिवळंरंजन मऊ वस्त्रं. बलारामदादासाठी होतं, निळंशार सुंदर वस्त्रं. त्यांची ही निवड बरोबरच होती. माझ्या वर्णाला शोभेसंच मार्श वस्त्रं होतं आणि बलरामदादाच्या वर्णाला साजेसंच त्याचं वस्त्रं होतं, त्याचा कोकमी, तांबूस गौरवर्ण खुलविणारं निळंशार. कसा होता माझ्या वर्ण? माझ्या प्रिय मित्राच्या – लोहारपुत्र वरुथपाच्या पित्याच्या लोहारशाळेत एकदा गेलो असता, माझ्या वर्णाशी मिळती–जुळती रंगच्छटा एकदा प्रथमच अनायासं मला प्रत्यक्ष बघायला मिळाली.

वरुथपाच्या घामाघूम झालेल्या पित्यानं त्या दिवशी भात्यासमोरच्या रसरशीत फुललेल्या निखाऱ्यांत अंगभर तावतावून लालेलाल झालेली वृषभरथाची लोह–कांब सांडशीनं पकडून चपळाईनं ऐरणीवर घेतली. हातातील घणानं लागलीच सपासप तिच्यावर प्रहारांवर प्रहार उतरविले. तशा ठिणग्याच ठिणग्या चौफेर उधळल्या. कांबेची दोन्ही टोकं क्षणांत चपखल जुळली. आणि जवळच असलेल्या लाकडी जलकुंडातील पाण्याचा सपकारा त्या लालेलाल कांबीवर त्या लोहारगोपानं सपकन मारला. क्षणात 'चर्रऽऽ' अशा आवाजासह धावेच्या कडेला तांबसर, निरभ्र आभाळासारखी, नीलवर्णी – कडेला सोनेरी रंगच्छटा साकळत-साकळत जमा झाली. मी तेव्हा ती एकटक नुसती बघतच राहिलो. हा – हा असाच तर होता माझ्या देहाचा वर्ण! निळसर, तांबसर पिकू बघणाऱ्या पाडाच्या जामुनफळासारखा!

हे कितीही वर्णून सांगितलं, तरी मला माझी थोरली व धाकली आई सहजच म्हणत आली होती – श्याम. म्हणजे चक्क काळा! अचूकच सांगायचं तर 'काळासावळा'. 'श्याम' म्हणजे सावळाच तर होतो मी! भावओल्या श्रावणसंध्येसारखा! आणि आत्ताच व स्पष्टच सांगून ठेवतो, या सावळेपणाचा मला ऊरभर ठासून अभिमानही होता; आजही

आहे! मला तर 'श्याम' हे नाव मनापासून अतिप्रिय झालं होतं, दादाचं एक आपलं बरं होतं, त्याला सर्व जण गोरागोमटा म्हणत. चुकून कधी धाकली काय ती त्याला 'संकर्षण' म्हणे. प्रेमानं त्याचा 'संकू'ही करे. म्हणून मीही त्याला कधी-कधी 'संकूदादा'च म्हणे.

तर आज आमची गोपदीक्षा होती. मी व बलरामदादा गोपवेष धारण करून सिद्ध झालो. कसा होता आमचा हा गोपवेष? तर डुईला चित्रसेन आजोबांनी गुंडाळलेलं गोपपागोटं होतं, पिळे दिलेलं. विटकरी वर्णाचं. कमरेला आवळलेली, बाबांनी नुकतीच आणलेली निळी-पिवळी वस्त्रं होती; जरी काठाची, मऊ झुळझुळीत. आता समोर येणाऱ्या रानातील कर्मयोगाला बांधून घेण्यासाठी आम्ही सोईनं त्यांचे वर घट्ट गोपकाष्टेच कसले होते. आमच्या खांद्यावर गोकुळातल्याच मेंढयांच्या बाळलोकरीच्या घोंगडीच्या खोळी चढल्या.

आमच्या खांद्यावरच्या घोंगडीच्या खोळीत शिदोरीचं गठुडं होतं, त्यात चांगल्या सात-आठ दशम्यांच्या घडीत चवदार लसणीच्या चटणीची मूठ दाबून बसविलेली होती. तोंडाशी पळसाचं पान देऊन, वस्त्रानं तोंड आवळून बांधलेलं कवडीदार, घट्ट दह्याचं लोटकंही होतं. नुकतेच वड्यावरच्या गोपसेवकांनी रानातून उपटून आणलेले चार-सहा रानपलांडूंचे कंदही होते. त्यांच्या हिरव्याकंच पातींसह.

माझ्या घोंगडीच्या खोळीत आज मी पहाटेच एक धारदार छोटी कोयतीही ठेवली होती.

गोपदीक्षेचे विधी सुरू झाले. वाड्याचे गोपपुरोहित अभिरनंद नादमधुर संस्कृत मंत्र म्हणू लागले. भोवती रांगोळ्या रेखलेल्या वेलबुट्टीच्या चौरंगावर मी व दादा बसलो होतो. वाड्याचा हा कक्ष देवघराचा होता. शेवटी पुरोहित अभिरनंदांनी सोनेरी कुंभातील मंत्रित जल, आंब्याच्या पानांनी आमच्यावर शिंपडलं. आमच्या समोरच चित्रसेन आजोबा, नंदबाबा, दोन्ही आया उभ्या होत्या. आज हा 'देवकक्ष' आमच्या झाडून साऱ्या आठही काका-काकूंनी गच्च भरला होता. दीड-दोन वर्षांची एकानंगा इकडे-तिकडे लुडबुडत होती. सर्व विधी संपताच प्रथम थोरलीनं आणि मग धाकलीनं तेवत्या निरांजनांच्या ज्योतींनी आमचं औक्षण केलं. आमच्या तोंडात केशरसुंठमिश्रित खरवसाच्या मधुर वड्या सोडल्या. त्यांनी हातातील निरांजनं खाली ठेवल्यानंतर आमचे भरगच्च शरीरयष्टीचे नंदबाबा चौरंगासमोर आले. खांद्यावरील उपरण्यासारखी घोंगडी सावरत त्यांनीही मला व बलरामदादाला ओवाळलं. आपल्या छातीवरचं अभिरभानू वंशाचं प्रतीक असलेलं अष्टकोनी चंदेरी पदक हलकेच उतरवून त्यांनी ओंजळीत घेतलं. ते तसंच मस्तकाशी भिडवून डोळे मिटत ते काहीतरी पुटपुटले. दुसऱ्याच क्षणी ते माझ्या कंठात चढवून माझ्या कपाळाचं अवघ्राण करीत ते म्हणाले, "कृष्णा, आज तू विधियुक्त खरा गोप झालास! माझा वंशज झालास! माझ्या क्षमतेनुसार मी गोकुळातले लहानथोर गोप आजवर सांभाळले. आजपासून हे कर्तव्य तुझं आणि तुझ्या दादाचं आहे. गोप तर सांभाळाच, पण त्याहून कटाक्षानं या गोकुळातलं गोधनही सांभाळा."

मी शेजारी बसलेल्या बलरामदादाकडे बघितलं. पूर्वीच आम्हाला ओवाळलेल्या आजोबांनी त्याच्या कंठातही चढविलेलं असलंच पदक कुरवाळीत तो हसत होता. क्षणात आम्ही दोघं डोळ्यांनीच खूप काही बोलून गेलो.

चौरंगावरून उठून प्रथम आम्ही देव्हाऱ्यातील 'इडा' या आमच्या वैश्यकुळीच्या अभिरभानूंच्या कुलदेवीला साष्टांग दंडवत घातले. तसेच ते चित्रसेन आजोबा, नंदबाबा,

दोन्ही आयांना आणि पुरोहित अभिरनंदांना घातले. त्यांनी आमच्या कपाळांचं अवघ्राण केलं. सगळ्या काका-काकूंचे आम्ही चरणस्पर्श घेतले. देवकक्ष सोडून आम्ही गोकुळाच्या रानात जायला सिद्ध झालो.

ओसरीच्या कोनाड्यातून उचललेल्या, आमच्यापेक्षाही हातभर उंच, किणकिणत्या बारीक घुंगरांच्या, कलाकुसरींच्या दोन 'गवळकाठ्या' नानापरीनं आमचं संरक्षण करणार होत्या. आम्हाला त्या ठायी-ठायी उपयोगी पडणार होत्या.

वाड्याच्या पूर्व महाद्वारात आलेल्या दोन्ही आयांनी आमच्या हातांवर दळदार दह्याच्या कणीदार कवड्या सोडल्या. त्या ओठांआड करताना मी क्षणभर डोळे मिटले. त्या मधुर दह्याची जिभेवर रेंगळणारी अवीट गोडी आजही मला स्पष्ट जाणवते आहे. बाहेर जमलेल्या गोपमित्रांना आम्हाला गाठायचं होतं, म्हणून मी वळू लागलो आणि थांबलो. माझ्या पायाला मिठी होती – एका चिमुकल्या जिवाची. ती होती, दीड-दोन वर्षांची मला 'कुत्नदादा' म्हणणारी. सतत माझ्याभोवती घुटमळणारी माझी प्राणप्रिय भगिनी एकानंगा – एका. विधीच्या या गोंधळात तिच्याकडे कुणाचंच लक्ष नव्हतं. ती मात्र मला काही विसरली नव्हती. किती-किती गोड हसली, ती माझ्याकडं बघून! मला काही राहवलं नाही. मी तिला पटकन उचलून तिच्या गोबऱ्या गालाचा प्रथम आवेगी मुका घेतला. तिची दाट केशावळ घुसळून टाकली. तसंच तिला दादाकडे दिलं.

बाहेर वाड्यासमोर पटांगणात आमच्याच वयाचे चांगले पंधरा-वीस गोप सवंगडी जमले होते. आम्हाला बघताच ते खिदळले, "आला आमचा किस्ना- कान्होबा! कृष्ण-कन्हैया! बलरामदादा – बलीदादा!"

प्रथम त्या सर्वांशी आमची कडकडून गळाभेट झाली. लागलीच आमचा तांडा गौळगोठ्यांकडे वळला. बांधलेली गोधनं आम्ही दावणींतून मोकळी केली. काही वेळातच एकमेकींना अंग घासणारा, शिंग खटखटविणारा, हंबरणारा नाना रंगांचा एक प्रचंड चैतन्याचा तांडाच तांडा, त्यांच्या रूपानं निघाला. गोकुळाच्या उगवतीच्या महाद्वारातून तो तांडा बाहेर पडला. खांद्यावरच्या घोंगड्या सांभाळत, हातांतल्या किणकिणत्या गवळकाठ्या उंचावून नाचवत यमुनेच्या तीरावर चौफेर पसरलेल्या दाट कुरणांपर्यंत आम्ही त्यांना दबावून आणलं. आता शेकडो शेकडो गाई क्षणार्धात समजूतदारपणे आपोआप पांगल्या. त्यांच्या गळ्यांतील घंटा नाजूक लयीत किणकिणू लागल्या. मधूनच साळुंक्या, कोतवाल, परटीण, रानकिरवे, रानकाक बोचुरडे असे पक्षी त्यांच्या पाठीवर हळूहळू उतरू लागले. यमुनेच्या येणाऱ्या गार वाऱ्यांच्या झुळकींनी लुसलुशीत हिरव्या कुरणांवर लाटाच लाटा उठू लागल्या. त्यावर टपाटप उड्या घेणारे हिरवेगार टोळ दिसू लागले. गाईंच्या चरत्या, हलत्या पाठींवरचे कीटक, पक्षी वारण्यासाठी गोल लयीत शेपट्या नाचविणाऱ्या गोधनाच्या लाटाही डुलू लागल्या. त्यांच्या चरणीचा कर्मयोग घंटानादावर लयींत सुरू झाला. तसं मी व बलरामदादा सवंगड्यांसह हुंदडायला व मन मानेल तसं नाना खेळ खेळायला मुक्त झालो.

समोर इथून तिथवर पसरलेलं, यमुनेचं निळ्याशार पाण्याचं लखलखीत पात्र दिसू लागलं. मी गोधन, सगळे सवंगडी आणि होय बलरामदादालाही सोडून एकटाच कितीतरी आवेगानं यमुनेकडे धावत सुटलो. नकळतच खेचल्यासारखा. का कळत नव्हतं, पण यमुनेचं पहिलं दर्शन झाल्यापासूनच माझ्या काळजात ही अशी अनावर खळबळ माजत आली होती. मनात अनेकानेक प्रश्न उठत असत. कशी असेल पलीकडची मधुपुरी –

मथुरा? शूरसेन गणराज्यातील यादवांची राजनगरी? कोण असेल तिथला राजा? आजोबा आणि बाबांसह सारे किती-किती बोलतात त्या राजनगरीबद्दल! कानावर नेहमी नावं पडत असतात. उग्रसेन महाराज, महाराणी पद्मावती, सेनापती सात्यकी, अनाधृष्टी, मंत्री कंक, अक्रूर, सारथी दारुक, अमात्य विपृथू बंदिस्त वसुदेव आणि त्यांची असहाय स्त्री देवकी. देवी देवकी! त्या नुसत्या शब्दांबरोबरच माझं बाल गोपमन नाकळत्या वेदनेनं कसं ठणकत राही! प्रत्यक्ष पित्याला राज्यलोभासाठी कारागृहात कोंडणारा; उग्रसेनांचा कुपुत्र, निर्दय, निर्मम कंस! कसा असेल तो कंस? कसे असतील मथुरेतले अठराकुलीन यादव?

यमुनेच्या लपलपत्या अविरत लाटा येत होत्या. किनाऱ्यावरच्या वाळूच्या समुद्राला थंडावत मूकपणी मुरत होत्या. माझे शास्त्रवेत्ते प्राणनंदकाका नेहमी सांगत आले, ते खरंच होतं, ही 'यम' म्हणजे बंध नसलेली सागरासारखीच – जलमाता होती. यमुना – यमुना! मी प्रथम तिचं अर्धवर्तुळाकार मान फिरवून डोळाभर दर्शन घेतलं. तिचं चैतन्यमय, सतत हलतं, रुपडं मनात साठवून घेतलं. तिला वंदन करण्यासाठी माझे हात आपोआपच केव्हा जोडले गेले, नि मस्तकाला भिडले ते कळलंच नाही.

खांद्यावरची, शिदोरीचं गाठोडं असलेली काळीशार मऊ घोंगडी मी पायीच्या वाळूवर अलगद उतरविली. त्यावर डुईचं पागोटं हळुवार ठेवलं. घोंगडीशेजारी गवळकाठी टेकवली. आतून कडदोऱ्याला कसलेल्या लंगोटीवरचं पीतांबर हलकेच उतरवलं. तेही घोंगडीवरच हलकेच ठेवलं. समोरची यमुनामाता मला केव्हाची लाटांचे सहस्र हात करून सादवीत होती. नाना आकाराचे लहान-मोठे पक्षी तिच्यावर उभ्या-आडव्या मुक्त घिरट्या घेतं होते. वर निळंभोर अथांग आभाळ होतं. दूरवर तिलाच भिडलेलं. पायीची ओली वाळू मी धावतच पार केली. अनावर वेगानं, लंगोटीधारी असा मी यमुनामातेच्या कुशीत शिरलो. अंगावर कसा सर्रकनऽ काटा तरारला माझ्या!!

डुंबणीला पडलो. मनसोक्त. कधी सपासप हात मारीत सरळ समोर, तर कधी तसेच मागे हात फेकत चक्क उलटा असा मी कितीतरी वेळ यथेच्छ डुंबतच राहिलो. यमुनेच्या उबदार पाण्याचा वत्सल स्पर्श अंगांगांवर मुरवून घेऊ लागलो. माझ्या आजोबांचे, बाबांचे, थोरल्या व धाकल्या आईचे कितीतरी अमोल बोल मनात फिरत राहिले. त्यातल्या शास्त्रवेत्त्या प्राणनंदकाकांचा एक अमृतबोल तर ब्रह्मकमळाच्या अंकुरासारखा मनाच्या सरोवरात सरसरत उभारून येऊन डुलू लागला. कानामनात कसा घुमू लागला. तो होता, "बाळ कृष्णा, नीट ध्यानी ठेव. 'जल' या शब्दाचा खोलार्थ. 'जल' म्हणजे 'जायते यस्मात् च, लीयते यस्मिन इति जलः।' पुत्रा, जीव ज्यातून जन्म घेतो आणि ज्यात लय पावतो, ते पंचमहाभूत म्हणजे जल. सर्वांत बलशाली व महत्त्वाचं आहे, हे महाभूत. जल म्हणजे जीवनच.

माझ्या पाठोपाठ बलरामदादाच्या मागून येऊन त्याच्यासह सर्व सवंगडीही केव्हाचे येऊन यमुनेत डुंबणीला पडले होते. मला ते बराचवेळ समजलंही नव्हतं. पाण्यातूनच त्यांनी दिलेल्या, 'कृष्णाऽ किसनाऽ कन्हैय्याऽ गोपालाऽ' अशा हाकांनी मी भानावर आलो. त्यांना गाठलं. त्यांच्यावर पाण्याचे बोचणारे वेगवान सपकारेच सपकारे मारले. त्यांना घुसमटवून टाकत, हसत, खिदळत पुन्हा कितीतरी वेळ मनसोक्त डुंबलो. आता सूर्य माथ्यावर येत चालला. तसा मी प्रथम बाहेर पडलो. पाठोपाठ दादा व सर्व सवंगडीही बाहेर आले. साऱ्यांनी उन्हातच अंगं सुकविली. आपापले वेष चढविले, आणि

आम्ही एका मोठ्या कुरणाकाठच्या डेरेदार, पानागणिक टपोरे सुगंधी गेंद ओळंबलेल्या कदंब वृक्षाकडे सरकू लागलो. वाटेत हिरव्या- पिवळ्या रंगीत रेघांच्या वेळूंचं एक बेट लागलं. त्यातील एक लांबसर, एकदम कोवळीही नाही व जूनही नाही, अशी मध्यम बाळफोक मला आवडली. घोंगडीतील कोयतीनं छाटून मी ती बरोबर घेतली.

आमचा गोपतांडा त्या डेरेदार कदंबाखाली आला. त्या फुलांच्या मादक वासानं आणि त्यावर घोंगावणाऱ्या मधमाश्या, भृंग्यांच्या गुंजारवानं आसमंत कसा कोंदला होता. सर्वांनी आपापली शिदोरीची गठुडी अलगद बाहेर काढली. आपापली घोंगडी अंथरून त्यावर बसत सर्वांनी दादासह सुरेख मंडल धरलं. शेवटी माझी घोंगडी मधोमध अंथरण्यात आली. त्यावर रानकेळींची व पळसाची मोठी पानं पसरून त्यावर शिदोरीचा 'गोपाळकाला' श्रीदामन व भद्रसेन यांनी तयार केला. एकीकडे दशम्यांची चवड, जवळच चटणीचा मोठा गोळो, रानपलांडूंचे कितीतरी कंद, दुसरीकडे दह्यात कालविलेल्या गुरगुटचा ओदनाचा ढीग आणि सर्वांभोवती काळ्या, मातकट रंगांची मांडलेली दह्याची मंडलाकृती लोटकी. असा आमचा 'गोपभोग' सिद्ध झाला.

एव्हाना मी दूरवर कदंबाच्या बुंध्याला सोबत आणलेल्या रंगीत वेळूच्या फोकाची मान वाऽक वाकडी करून कोयतीनं ताऽसतासून नवी घाटदार सुरेख मुरली तयारही केली होती. पीतांबरावर पसरलेली सालपटं झटकली होती. सूर्य आता अगदी थेट मस्तकावरच आला. तसं इकडे नव्या मुरलीची सरावाची धून मी उठवायला आणि तिकडे माझ्या प्रिय गोप-सवंगड्यांनी मला हात उभारून सादवायला एकच गाठ पडली. ते मंडल धरूनच, हात उंचावून वेगवेगळ्या आवाजात ओरडत होते, "कृष्णाऽ किस्नाऽ चल. गोपाळकाला तयार झाला.

दादाशेजारी बसून सर्वांशी खोड्या-मस्करी करत आम्ही गोपाळकाला संपविला. स्तोककृष्णानं विचारलं, "कृष्णा, सांग तरी बघू एकदा, तुला मनापासून प्रिय वस्तू कोणकोणत्या आहेत?" मी त्याच्याकडे हसून बघत उत्तरलो, "स्तोका, फुलांत म्हणशील, तर मला प्राजक्ताचं फूल अधिक आवडतं. त्यातही शरदातील पहाटवाऱ्यात अंगावर दहिवर घेतलेलं प्राजक्ताचं पहाटफूल. केवढा अजोड सुगंध फेकतं नाही ते! त्याचा इवलासा केशरी देहदंड किती सुंदर दिसतो नाही! फळांत म्हणशील, तर मला आम्रफल अधिक भावतं. त्यातही पिकू घातलेलं शेंदरी वर्णाचं! पक्षयांत म्हणशील, तर – पहिल्याच मृगसरीचा नाद ऐकून डेरेदार पिसारा फुलवून थयथय नाचणारा, पिसाराश्रीमंत रंगवैभवी मयूर मला लोभावतो. रसांत तुझ्यासह आम्हा सर्व गोपांचा गोरस मला प्रिय आहेच. आणि अत्रात म्हणशील, तर मला काय आवडतं ते हा संकूदादाच सांगेल." संधी साधून मी प्रश्न हलकेच कौशल्यानं दादाकडं वळविला. तसं स्तोकाच्या पाठीवर भारदार थाप देत दादा मान मागे टाकून हसून म्हणाला, "वेड्या स्तोका, दह्यात कालविलेला, लवणाची चिमट सोडलेला गुरगुटचा, मऊ ओदन याला फार आवडतो!

सगळे सवंगडी यमुनेवर जाऊन पाणी पिऊन आले. कुणीतरी माझ्यासाठी येताना दोन लोटकी भरून आणली. कदंबाच्या बुंध्याखाली मी तयार केलेली नवी मुरली हाती घेत डोळे विस्फारून दादा म्हणाला, "कसं काय जमतंय तुला हे? हे नव्हे; सगळंच!" मी नुसताच हसलो. तसं तोच पुन्हा म्हणाला, "तुझं हे हसणं सर्वांहून वेगळं वाटतं. नेमकं कसं ते मात्र नाही सांगता येत! दरवेळी वेगळंच असतं तुझं हसणं. तू हसायला लागलास की, तुझ्या गुलाबी ओठांआडचे कुंदकळ्यांसारखे शुभ्र दात तळपायला लागतात. ते ऐकून मी

नुसताच हसलो.

माझी घोंगडी एका उंचशील पाषाणाला अंथरती टेकवून आता मी आडवा पहुडलो. त्यामुळे माझ्या मस्तकावर कदंबाच्या पानांतून येणारे चुकार-मुकार किरणही आपोआपच निवारले जाऊ लागले. मी मोठ्यानं म्हणालो, "स्तोका, वरुथपा, दामना आणि सर्व सवंगड्यांनो ऐका, माझं सर्वांत प्रिय वाद्य कोणतं ते!" डोळे मिटून मी तन्मयतेनं हातीच्या मुरलीच्या एकामागून एक अणीदार सुरावटी घुमवू लागलो. तसं भोवती पसरलेल्या लहानथोर आम्र, अंजन, खैर, जांभूळ, शिसम वृक्षांच्या सावलीत घोंगडी टाकून माझे सर्व सवंगडीही जागा मिळेल तसे निवांत विसावले. डोळे मिटून पडल्या-पडल्या माझा 'संगीतयोग' तन्मयतेनं ऐकू लागले. स्वत:ला विसरून. त्यांचा तो सर्वांत प्रिय, त्यांच्या अश्राप जिवाचा – त्यांनाच अज्ञात असा 'विश्रामयोग' होता!

सूर्य कलून तिसरा प्रहर सुरू झाला होता. एव्हाना यमुनेवरून येणाऱ्या प्रथम उष्ण-उष्ण जाणवणाऱ्या वायुलहरी आता कितीतरी थंडावल्या होत्या. त्यांचा शीतल स्पर्श जाणवताच माझी 'संगीतयोगा'ची समाधी भंगली, मी हळुवार डोळे उघडले. भोवतीचं दृश्य बघताच ताडकन उठून घोंगडीवर बसलो. कुरणात कुठं-कुठं दूर पांगलेल्या कितीतरी गाई आणि कुठं-कुठं विसावलेले माझे स्तोककृष्ण, वरुथप, गोपराम, श्रीदामन, भद्रसेन, सुदामा, पेंद्या असे झाडून सर्वच गोपजीव माझ्याभोवती दाटले होते! मी हसलो. घोंगडी झटकत उठलो. पुढच्या कामाला लागलो. मन मोकळं करणाऱ्या नानाविध खेळांच्या.

आता आम्ही सर्वच यमुनेकाठच्या वाळूच्या प्रशस्त पटांगणावर उतरलो. मला वाटलं तसे निवडून सवंगड्यांचे मी दोन समतोल चमू तयार केले. त्यांतील दोन सशक्त सवंगडी बघून त्यांना 'मुखिया' केलं. आणि सुदृढ आणि बांधेसूद अंगलटीमुळे त्यातील एक मुखिया तर बलरामदादाच झाला. दुसऱ्या चमूचा 'मुखिया' म्हणून सगळे मलाच आग्रह करू लागले. मी त्यांना नाना कारणं सांगून समजावलं. दुसरा 'मुखिया' केला स्तोककृष्णाला. तसं बलरामदादानं पटकन विचारलं, "मग तू करणार तरी काय धाकल्या?"

"मी? मी होणार पंच!" मी हसलो.

तसा सगळ्यांनीच संमतीचा कल्लोळ केला. "चालेल – चालेल आम्हाला आमचा पंच कन्हैय्या – कान्होबा. नक्कीच तो नि:पक्ष निवाडा-निर्णय देईल."

यमुनाकाठी आमचा हुतुतू रंग रंगला. हुतुतू हा खेळच इरेसरीचा होता. प्रतिस्पर्ध्याला असावध बघून अचूक टिपण्याचा. क्रीडांगणाच्या मर्यादेत खेळण्याचा. अखंड श्वास टिकवण्याचा. आम्हा गोपांच्याच काय कुणाच्याही जीवनाचं प्रतीकच नव्हता काय तो?

हुतुतूनंतर आट्यापाट्या झाल्या. लगोऱ्या झाल्या. हमामा झाला. एव्हाना सांजावत आलं होतं. कलकलणाऱ्या रानराव्यांचे, धनछड्यांचे, श्येन, सारस, चंडोल, क्रौंच अशा कितीतरी पक्षयांचे थवेच थवे चित्रविचित्र कलकलत कोटरांकडे परतू लागले होते. चरून तृप्त झालेलं आमचं गोधन यमुनेचं पाणी पोटभर रिचवून हंबरत परतलं होतं. मावळतीला सूर्याच्या तेजोमय, लाल गोळ्याचं तबक यमुनेच्या पात्राला येऊन अलगद भिडलं होतं.

एका अनामिक प्रेरणेनं मी ओरडलो, "आज माझी गोपदीक्षा झाली आहे. त्यासाठी तुम्हाला एक नवाच खेळ मी शिकवणार आहे. तुम्हाला नक्कीच आवडेल तो. मी सांगेन ते

काम मात्र प्रत्येकानं उरकायचं आहे – पटापट!"

"होय. सांग आम्हाला आम्ही काय केलं पाहिजे ते कृष्णा!" सर्वांनी एकदमच कल्लोळता प्रतिसाद दिला.

"मी आणि बलरामदादा इथं पलीकडेच थांबणार आहोत. तुमच्यातल्या वडजा, सुदामा, रुद्रसेन, भद्रसेन अशा काहींनी लोटक्यातून लागेल तेवढं यमुनेचं पाणी आणून द्यायचं आहे. काहींनी भोवतीच्या रानातून पांढरीशुभ्र ताजी फुलं आणि बेलाची ताजी पानं आणून द्यायची आहेत. काहींनी ताजं, धारोष्ण दूध लोटक्यांतून आणायचं आहे. बाकीचे आमच्या सोबत राहतील. चला आटपा! लागा लवकर कामाला."

सगळे पांगले. मी सांगितलेल्या आपापल्या कामाला लागले. मी आणि बलरामदादानं यमुनेकाठच्या वाळूच्या मैदानातील एक स्वच्छ, निकोप जागा निवडली. यमुनेकाठच्या मऊ, काळसर ओल्या वाळूला आम्ही भिडलो. सरासर हात चालवून, मोठे-मोठे निबर खडे वगळून बारीक मऊसूत वाळू एकवट करू लागलो. ती पाण्यात मळू लागलो. आम्ही जे काही घडवू ते रात्रभर टिकणार होतं. मी आणि बलरामदादानं सवंगड्यांच्या सोबतीनं हां-हां म्हणता तिथं एक, आमच्या कमरभर उंचीची, वाळूची घट्ट शिवपिंडच तयार केली! डौलदार बैठ्या नंदीसह. पिंडीची शाळुंका नगाऱ्याच्या आकाराची होती. तिचं निमुळतं टोक उत्तरेच्या रोखानं ठेवलं. किती रेखीव दिसू लागली, ही शिवप्रतिमा! लोटक्यातील पाण्यानं हात धुतले.

मावळतीला रेंगाळलेली सूर्यकोर साक्षीला ठेवली. मी दादाला प्रथम त्या पिंडीवर लोटक्यांतील ताज्या दुधाचा अभिषेक करायला सांगितला. त्यानं केला. पाठोपाठ मी व सगळ्या सवंगड्यांनीही तसाच केला. पुन्हा लोटक्यांतील पाण्यानं अभिषेक केला. मी सांगताच सर्व सवंगड्यांनी आणलेली पांढरीशुभ्र फुलं आणि बेलपानं पिंडीवर वाहिली. आम्ही सर्वांनीच डोळे मिटून तिला हात जोडले. सर्वांचेच ओठ शिवमय झाले – "शिवाकान्त शंभो, शशांकार्धमौले। महेशान शूलिन्, जटाजूटधारिन:। त्वमेको जगद्व्यापको विश्वरूप। प्रसीद प्रभो पूर्णरूप।।" सर्वांची शिवस्तुती एका लयीत झाली.

तिकडे मावळतीला सूर्यकोर पूर्ण डुंबली. तसं काही वेळानं सर्वप्रथम डोळे उघडून मी समोरच्या शिवप्रतिमेकडे बघितलं. तिच्या नुसत्या धूसर कडा आता दिसत होत्या. सवंगड्यांना मी म्हणालो, "दादा, गड्यांनो ही शिवप्रतिमा आम्ही अभिरभानू वंशाच्या गोपांनी पूर्वापार पिढ्यान्पिढ्या पूजली आहे. काय सांगते ती? तर यातील शाळुंका आहे स्त्रीचं प्रतीक! पिंड आहे पुरुषाचं प्रतीक! शिव म्हणजे शंकर. शंकर म्हणजे 'शं' करोति इति शंकर:! जो उद्विग्न मन शांत करतो, तो शंकर! या शांतीसाठीच आवश्यकता पडते, तेव्हा तो तांडवनृत्यही करतो. अन्यायाचा विलय करणारं असतं ते. शिव ही अनिष्टाच्या विलयाची देवता आहे." सारे ऐकतच राहिले. गर्गमुनींनी आपले गोपपुरोहित म्हणून गोकुळात मागे ठेवलेल्या अनुयायांचे – अभिरनंदांचे ऐकलेले बोलच मी बोललो होतो. स्वत: माझं मी काहीच बोललो नव्हतो.

तृप्त मनानं आम्ही पटापट घोंगड्या उचलल्या. धावत-पळत हातातल्या गवळकाठ्या नाचवीत पांगलेलं गोधन आम्ही एकवटून तांड्यात आणलं. गोकुळाच्या पश्चिम द्वाराकडे मी आणि दादा आता सवंगड्यांसह परतू लागलो. मी घोंगडीच्या खोळीतील मुरली काढली. नाना रागांच्या सुरावटी मनाच्या उर्मीनं चालता-चालता सहजच तन्मयतेनं आळवू लागलो. मुरलीची माझी फिरत वाढत गेली. तसं एका अत्युच्च

क्षणाला कुणीतरी धावत येऊन माझा हात पकडला. मुरली आपोआप थांबली. मी अर्धवट उघडलेले डोळे पूर्ण उघडले. ती एक गोपस्त्री होती. तरुण, सशक्त, गोरीपान, अरागस, माझ्यापेक्षा वयानं मोठी, उंच, कितीतरी रेखीव. अप्रतिम सुंदर. सवंगड्यांना मी कुतूहलानं विचारलं, "कोण ही?"

"ही रायाण गोपाची – स्त्री राधा! ही आपल्या मामाच्या गावातून – अरिष्टग्रामातून गोकुळात आली आहे. कुणीतरी उत्तर दिलं.

एव्हाना राधेनं, "किती सैरभैर करतोस रे, ही मुरली वाजवून कन्हैय्या!" म्हणत माझ्या गालांवरून हाताची बोटं फिरवून घेऊन आपल्या कानशीलावर कडाकड मोडत माझी इडापीडाही घेतली होती. कितीतरी वेळ हातची मुरली तशीच ठेवून मी स्तब्धच राहिलो – सवंगड्यांत नसल्यासारखा! तिच्या त्या पहिल्याच स्पर्शात माझ्या दोन्ही आयांच्या मायेचा वाण होता. माझ्या छोट्या भगिनीचा एकानंगेचा निरागसपणा होता. आणि असं कितीतरी होतं; जे शब्दांत काही मला पकडता आलं नाही. म्हणूनच ते सांगता तर कधीच येणार नाही!

माझ्या बलरामदादाकडं बघून मात्र ती नुसतीच हसली. त्याच्याशी ती तसं काहीच बोलली नाही! माझ्या खांद्यावर हात ठेवूनच ती गोकुळाच्या पश्चिम द्वाराच्या उताराकडे चालू लागली. आम्हा सर्वांसह. चालतानाच म्हणाली, "तुझी मुरली ऐकली की वाटतं कन्हैय्या, आपणसुद्धा मुरलीच व्हावं!"

ती मुरलीसह ज्या क्षणी मला येऊन भिडली, तेव्हाच मला कळून चुकलं होतं की, ही माझ्या देहाचाच एक अवयव आहे! नकळत मी माझा हात तिच्या उबदार, गुबगुबीत हातात दिला होता. तिनं तो अशा काही आवेगानं धरला होता की, तीच मला पुढे चालविणार होती! आज माझी गोपदीक्षा झाली होती. आणि नेमकी आजच मला ही भेटली होती. हीसुद्धा मला एक दीक्षाच देणार होती. सर्व नात्यांच्या पलीकडे जाऊन स्त्री म्हणजे नेमकं काय निसर्गतत्त्व आहे, ते कसलं निसर्गसत्य आहे याची!!

गोधन केव्हाच मावळतीचं द्वार पार करून गोकुळात शिरलं होतं. गोपसवंगडी व बलरामदादासह मीही गोकुळात शिरलो; राधेसह. एव्हाना तिचा हाती धरलेला ओलसर हात मी सोडला. माझे खांदे हळुवार थोपटून ती आपल्या वस्तीकडे निघून गेली. तिला पाठमोरी बघताना पठण-पाठणात कुशल माझ्या प्राणनंदकाकांनी कधीतरी सांगितलेला 'धा' या शब्दाचा अर्थ मनी उफाळून आला. 'धा' म्हणजे मोक्ष. मी खूप खटपट केली. पण 'रा' हा शब्द काही मला थारा देईना! जरासुद्धा जवळ घेईना! नीट समजेना. आम्ही गोधनाला दावण्या टाकल्या. घंगाळातील पाणी पायांवर घेतलं. दिंडी दरवाज्यातून मुखियावाड्यात आलो. अंगावरचा गोपवेष जागच्या जागी ठेवला.

आल्या-आल्या मी थोरलीला दोन गोष्टी हसत-हसत सांगितल्या. "आज आम्ही यमुनातीरी हीऽ भलीमोठी शिवप्रतिमा उठविली. ओल्या वाळूची. आणि आत्ताच मला राधाही भेटली. मधाळ आवाजाची! ती आपल्या गोकुळातीलच आहे."

थोरली नेहमीसारखीच प्रसन्न हसली. स्वयंपाकघराच्या कक्षात आमची जेवणाची तबकं मांडताना म्हणाली, "वेडाच आहेस तू कृष्णा! वाळूची पिंडी ती अशी किती काळ टिकणार? आणि तू म्हणतोस ती राधा – रायाण गोपाची स्त्री आहे. तुझ्या मुरलीवर भाळली तर काहीच नवल नाही. अरे, माझाही ठाव उडतो कधी-कधी ती ऐकताना! पण जपून राहा! तिचा पती रायाण फार तापट स्वभावाचा आहे हं!"

दोन्ही आयांनी मांडलेल्या जेवणाच्या तबकाजवळ आम्ही बसलो. चित्राहुती दिली. तबकात दशम्या, दही-दूध, चटणी होती. ताज्या खरवसाच्या वड्यांसह अपूपही होते. आजोबा, काकांचं भोजन केव्हाच झालं होतं. ते बाहेरच्या ओसरीवर नेहमीच्या बैठकीत बसले होते. आम्ही हात क्षाळून ओसरीत आलो. सर्व ज्येष्ठांना नमस्कार करून आम्ही दर्भी बैठकांवर बसलो. संगीतात निष्णात असलेल्या आमच्या महानंदकाकांनी गोपवाद्यांच्या थरकत्या लयींच्या साथीत काही गोपगीतं म्हटली. चित्रसेन आजोबांनी त्यांच्या काळच्या, पूर्वीच्या आमच्या अभिरभानू वंशाच्या पूर्वजांच्या काही थरारक विक्रमकथा सांगितल्या.

त्या ऐकण्यासाठी धाकली, थोरली व झाडून सर्व काकू बैठकीच्या ओसरीच्या कक्षाच्या द्वारामागे येऊन बसल्या. त्यांच्यामध्येच आपापल्या आयांसमोर, आमची आपापल्या घरी प्रार्थना करून आलेली चुलत भावंडं बसली होती. छोटी एका तुरुतुरु चालत येऊन सरळ माझ्या मांडीवरच बसली! मी प्राणनंदकाकांना मनात बराच वेळ रेंगाळणारा एक प्रश्न शेवटी विचारलाच, “प्राणकाका, संस्कृतात ‘रा’ म्हणजे काय?” ते शेजारीच बसले होते. माझ्या पाठीवर प्रेमानं थोपटत हसून म्हणाले, “कन्हैया, तू तर सर्वांना सर्व काही देतोस. आनंद तर नेहमीचाच, हे आज मिळण्याचं काय विचारतोस? अरे, ‘रा’ म्हणजे मिळो-लाभो-प्राप्त होवो!”

माझ्या मनात मुरलीची एक सुरावट सर्रकन फिरली. पूर्ण झाली. ‘रा’ म्हणजे लाभो. ‘धा’ म्हणजे मोक्ष. ‘राधा’ म्हणजे मोक्ष लाभो म्हणून तळमळणारा जीव! चांगल्या दोन घटिका परतल्या. गोकुळातल्या दवंडी चौथऱ्यावरच्या समयपालकानं लोहतबकावर घटिका निदर्शक ठणठणते टोल दिले. गोकुळातल्या घरट्या-घरट्यातले करंजेल तेलाचे पणतींसारखे, ठाणवईंसारखे दिवे मंदावले. तसं त्यांच्या कडवट धुराच्या वासानं घरट्या-घरट्यांतील वृद्ध दोन-तीनदा खोकून मग मात्र निद्राधीन झाले. अवघं गोकूळ पेंगू लागलं!

मुखियावाड्यातील आमच्या तत्पर पुरोहितांनी चढ्या सुरांत प्रणवाचा नाद घुमविला. ‘ओऽम्ऽऽ’ आणि हात जोडले. तसे आजोबांच्या मागून सर्वच लहानांनीही हात जोडून डोळे मिटले. मीही मांडीवरच्या छोट्या एकाचे हात ओंजळीत मिटते घेऊन डोळे मिटले. सर्वांचं बघून छोट्या एकानंही डोळे मिटले. मुखियावाड्यात बैठकीच्या कक्षात आम्हा अभिरभानू वंशजांची पूर्वापार चालत आलेली सामूहिक ईशस्तवना सुरू झाली —

> “ॐ ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यांजगत्।
> तेन त्यक्तेन भुञ्जिथा मा गृधः कस्यस्विद्धनम्।।”

‘हे जगत ईश्वराचं वास्तव्यस्थान आहे. या सृष्टीत जे-जे काही आहे, त्या सर्वांमध्ये परमात्मा वास करतो. म्हणून ईश्वर आपणास जे काही देईल त्याचाच उपभोग घे. इतर कोणाच्याही धनाची इच्छा करू नकोस.’

पाठोपाठ तोंडून सत्याचा वेध घेणारी ऋग्वेदातील अमर ऋचा फिरून गेली –

> “ॐ हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम्।
> तत्त्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये।।”

‘सुवर्णाप्रमाणं ज्योतिर्मय अशा पात्रानं आदित्यमंडळाच्या ठिकाणी असलेल्या ब्रह्माचं मुख झाकलेलं आहे. ब्रह्माची उपासना हाच ज्याचा धर्म आहे, अशा मला

ब्रह्माची उपलब्धी होण्याकरिता हे सूर्यदेवा, तू ते झाकण दूर सार व सत्याचं – ब्रह्माचं मला दर्शन घडव!!'

बाहेर गोकुळाच्या समयदर्शक लोहतबकावर घटिकेचे टोलांमागून टोल पडतच होते! गौळगोठ्यांत नानाविध घंटांचे नाद घुमतच होते.

शयनागारात शय्येला पाठ टेकताना आज माझ्या मनात एकच एक शब्द खोलवर रेंगाळून गेला. 'राऽधाऽ' – मोक्ष मिळो म्हणून तळमळणारा जीव!

दुसऱ्याच दिवशी अगदी ब्राह्मी मुहूर्तावर मला, दादाला आणि सर्व सवंगडी चुलत भावंडांना केलीनंदकाकांनी हलवून जागं केलं. मुखं प्रक्षाळून आम्ही प्रातर्विधी आवरले. धारोष्ण दुधाचे गडवे रिचवून आम्ही त्यांनी सांगितलं, तसं वाड्याच्या बैठकचौकात आलो. आम्हा सर्वांनाच त्यांनी काही सूचना केल्या. अधिक त्या मला आणि दादाला, हे नेहमीच असं होत आलं होतं, चित्रआजोबा, नंदबाबा, कुलपुरोहित अभिरनंद, दोन्ही आया, सर्व-सर्व काका, सगळ्या-सगळ्या काकू जे काही करायचं ते उजव्या हातानं, वरच्या मापानं केवळ आमच्यासाठीच सदैव करत आले होते. 'असं का?' मनात उठणाऱ्या या आणि अशा अनेक प्रश्नांच्या माऱ्यांनी मी कधी-कधी वैतागून जात असे.

बलरामदादा तांबूसगौर आहे, मीच तेवढा निळसर – चक्क काळसावळा का? मला एकट्यालाच अशी यमुनेची ओढ का? काय आहे संबंध या गोकुळाचा त्या मथुरेशी? मथुरेचे उग्रसेन महाराज हे कोण? त्यांना कैदेत कोंडणारा त्यांचा पुत्र कंस असा कसा झाला? आणि होय कारागारातल्या त्या वसुदेवांना-देवकीदेवीला मला एकसारखं प्रकर्षानं भेटावसं वाटतं, ते का? मथुरेला जाण्यासाठी माझं मन अनावर ओढ-झटचा घेतं ते का? अशा माझ्या प्रश्नांची कधीच उत्तरं मिळत नव्हती. काय नि कसला संबंध आहे माझा मथुरेशी? कालच मला भेटलेल्या राधेला माझी एवढी ओढ का? मला पडतात तसेच प्रश्न बलरामदादालाही पडतात का? याचं उत्तरही कुणी देणार नव्हतं. शेवटी स्वत:शीच हसून मीच त्यांची उत्तरं देत होतो. माझीच मला. आणि तीच खरी निघाली की, हसत होतो. माझ्याशीच मी!

आज केलीनंदकाकांनी अगदी ब्रह्मवेळेलाच आम्हा भावंडांचा कुमारतांडा वाड्याच्या दिंडीदरवाज्यातून बाहेर काढला. आजवर आम्ही गोकुळाच्या पूर्वद्वारातून गोधन बाहेर काढत होतो, तसंच! त्यांनी आम्हाला गोकुळाच्या थेट व्यायामशालेत आणलं. अजून गोकूळ जागं व्हायचं होतं. हवेत यमुनेच्या पात्रावरून उतरलेला सुगंधी, सुखद गारवा होता.

आम्ही व्यायामशाळेत आलो. तिच्या द्वारातच व्यायामानंतर धूळमाखली अंगं स्वच्छ धुण्यासाठी, यमुनाजलानं भरलेला, घडीव व पाषाणी प्रशस्त कुंड लागला. शाळेत चारी कोनाड्यांत छिद्रांत सेवकांनी खोचलेले करंजेलाचे पलिते ढणढणत होते. त्यांच्या पिवळसर उजेडात व्यायामशाळा कशी उजळून गेली होती. मध्ये भरघेराचा प्रशस्त, खोल व मंडलाकृती 'आखाडा' खोदला होता. त्यात पसरलेली लाल माती चमकत होती. तीही करंजेलाचे हात देऊन, घडा घडाभर ताकाचा सडा शिंपून अनेक गोपमल्लांनी फावड्यांनी चांगली मळून तयार केली होती. रोज ते फावड्यांनी ती मल्लमाती उलथीपालथी करत. त्याला ते 'आखाडा खोदणं' म्हणत. या आखाड्याभोवती चौबाजूंना लोहाच्या पाट्या ठेवलेल्या होत्या. त्या, बाबांनी कुठं-कुठं गोपसेवक धाडून यज्ञकुंडांतून

आणलेल्या पवित्र रक्षेनं भरलेल्या होत्या. आखाड्यात मल्लविद्येचे डाव-प्रतिडाव खेळून घामाघूम झालेल्या मल्लांची अंगं या रक्षेनं टिपून कोरडी केली जायची. ही रक्षा बाधक तर मुळीच नव्हती. उलट यज्ञकुंडांतील नाना निवडक समिधांची असल्यानं गुणकारी होती ती.

व्यायामशाळेत उगवतीला तोंड करून आम्हा अभिरभानू वंशाच्या कुलदेवीची 'इडा' देवीची, गंडकी पाषाणाची एक घोटीव मूर्ती इथंही मखरात होती. काकांनी सांगितलं तसं आम्ही सर्वांनीच तिला प्रथम प्रणिपात केले. काकांनाही प्रणिपात केले. सर्व जण व्यायामाला भिडलो. जोरदंडांचे घुमत्कार घुमू लागले. फिरती मृद्गलं, दशरंग फिरताना 'चकाचक' वाजणारे मल्लखांब, अवजड पाषाणी गुंड उचलून खाली फेकताना होणारे दणादणीचे नाद यांनी व्यायामशाला कशी कोंदून गेली. अंगं चटका बसावीत, अशी उष्ण होताच काकांनी मला व दादाला एकदमच मागून आखाड्यात ढकललं. स्वत: तेही उतरले. पाठोपाठ कितीतरी गोपसवंगडी उतरले. अनेक जोड्या लढू लागल्या. व्यायाम करताना कसलेले, कावेत रंगलेल्या गोपधोतराचे काष्टे आम्ही कमर आवळून पुन्हा नीट कसून घेतले. 'कक्षाबंधन' करून आम्ही सिद्ध झालो. आता दहा-बारा जोड्या दणादण शड्डू ठोकत आखाड्याच्या मल्ल मातीत अटीतटीनं कुदू लागल्या.

काकांनी माझ्या मानगुटीला हात घालून एक जोरदार दशरंगी हासडा दिला. तसं मी त्यांच्या थेट पायांशी कोलमडत मातीत धाडकन तोंडघशीच पडलो! काकांनी तसाच प्रहार देऊन दादालाही मातीत लोळविलं. आमच्या नाकातोंडात गेलेली माती तर्जनीनं आम्ही निपटली. काकाळत कसेबसे उभे राहिलो नाही तोच, माझ्या कानशिलाच्या जवळ केलीनंदकाकांनी दाणकन एक जोरदार थप्पड दिली! माझे डोळे त्याच्या दणक्यानं गपकन मिटले! त्यांच्यासमोर आभाळातले तारेच तारे क्षणार्धात ठिणग्यांसारखे चमकून गेले! भोवतीचं अवघं ब्रह्मांडच गरगर फिरून गेलं. हा अनुभव वेगला होता. कधीच न विसरता येणारा!

डावी-उजवी मान झटकून मी कसाबसा उभा राहिलो. तसं माझ्या पाठीशी येत काकांनी आपल्या दणकट पायाचा एक जबरदस्त तडाखा माझ्या पोटरीवर मारला. मी कळवळून मातीत गुडघेच टेकले! काही वेळानं काका जवळ आले. माझे खांदे प्रेमानं थोपटून मला वर घेत माझी कुरळी, दाट केशावळ घुसळत ते कितीतरी अपार मायेनं म्हणाले, "कान्होबा, यमुनेत तू आपणहून घुसून केव्हा पोहायला शिकलास कुणाला कळलंच नाही. तसं नाही चालत इथं! ही मल्लविद्या आहे. या मातीच्या नदीत पोहायचं, तर पोहणाऱ्याचं भय प्रथम चेपावं लागतं. काळीज घडावं लागतं. त्यासाठीच तुला हे नमनाचे कठोर दशरंगी प्रहार प्रथम दिले मी. असे प्रहार तुला रोजच खावे लागतील. जेव्हा-केव्हा तूच असा प्रहार प्रतिस्पर्ध्याला सहज देऊ शकशील, तेव्हाच तू खरा मल्ल म्हणून तयार होऊ शकशील – एक निष्णात मल्लयोद्धा होशील. विचार कर आणि मला एकदाच निर्णय सांग, आहे का तुझी तयारी?"

त्यांनी माझा हाती धरलेला हात कितीतरी प्रेमानं दाबला. मी हसलो. म्हणालो, "आहे तर तयारी माझी केलीकाका." शेजारीच उभ्या असलेल्या दादाच्या आणि माझ्या हातात पायतळीचीच माती त्यांनी ललकारीचं आव्हान म्हणून दिली. आम्ही थडाथड दंड थोपटून परस्परांना प्रतिस्पर्धी म्हणून समाहवान केलं.

आपले दंड थोपटून काकांनी आम्हाला डोळ्यांनीच खुणावलं. आम्हीही दंड थोपटले.

आता आम्ही एकमेकांचे बंधू नव्हतो. कुणाचेच कुणी नव्हतो! होतो केवळ मल्लयुद्धाचे प्रतिस्पर्धी! भोवतीच्या गोपसवंगड्यांनीही दंड थोपटले. आता व्यायामशाळा कानठळ्या बसविणाऱ्या शड्डूच शड्डूंच्या गर्जत्या नादांनी कशी दणाणून गेली. क्षणात अटीतटीनं एकमेकांना डोकी भिडवीत, दातओठ खात, मी व दादा निकरानं एकमेकांशी लढू लागलो. काका आम्हाला अभ्याकर्ष, कीलवज्रनिपात, अवरोध व बाहुकंटक असे मल्लविद्येचे बारकाव्यांसह कितीतरी किचकट डाव-प्रतिडाव, मध्येच थांबवून समजावून देऊ लागले.

आम्ही किती वेळ एकमेकांना भिडलो तेही कळलं नाही. घामाच्या धारांनी शेवटी दोघेही कसे अष्टांगी निथळून निघालो. आखाड्याकाठच्या पाट्यांतून कुणी-कुणी मूठमूठ पावक राख आणून आमच्या पाठीवर शिवरली. आधीच सावळा मी, पांढरट काळसर राखेच्या लेपानं, चक्कं काळरात्रीचं काळकुट्टं भूत दिसू लागलो! प्रत्यक्ष थोरल्या यशोदामातेनं मला असं या क्षणी पाहिलं असतं, तर ती भयानं चक्क किंचाळलीच असती!

दीड घटकेनंतर एक जोरदार दीर्घ दंड थोपटून केलीनंदकाकांनी व्यायाम संपल्याचं मूकपणेच घोषित केलं. दादा, माझी दमलेली चुलत भावंडं, गोपसवंगडी घामाघूम होत, आखाड्यातील मातीत कुठं-कुठं जागा मिळेल तिथं निपचित पहुडले. मीही आखाड्याच्या मधोमध पालथा आडवा झालो. माझ्या आणि दादाच्या घामेजल्या सर्वांगावर केलीनंदकाकांनी खोऱ्यानं आखाड्यातील स्नेहमात्रा दिलेली संस्कारित मऊसूत माती केव्हा पसरली ते कळलंच नाही. प्रावरणासारख्या तिच्या उबेतून लवकर बाहेर पडावं, असं वाटेचना. यमुनेत मनसोक्त डुंबताना तिनं मला पटवून दिलं होतं. 'जल' म्हणजे काय ते. डुंबतानाच एकटक सूर्याकडे बघितल्यानं मला कळलं होतं 'तेज' म्हणजे काय ते. आज या आखाड्यातील ही संस्कारित माती मला कानात सांगत होती; 'माती' म्हणजे – 'पृथ्वी' म्हणजे काय ते! अगदी मूकपणं!

आता गोकुळातील आमच्या दिवसांना जसे काही मोरपंखच फुटले. हां-हां म्हणता केवढातरी पिसारा झाला त्यांचा! प्रत्येक पंखावर वेगवेगळे डोळे. अशा अगणित डोळ्यांचे किती-किती अगणित पंख!

गोकुळात असं एकही घरं नव्हतं, जे आम्हाला ठाऊक नव्हतं! त्या प्रत्येक घरातील असा एकही गोरसकक्ष नव्हता, जिथं मी व बलरामदादाची निवडक सवंगड्यांसह चोरधाड पडली नव्हती. आमच्या मुखियावाड्यात ढीग सारं दही, दूध, लोणी असताना का शिरत होतो, आम्ही असे गुपचूप गोकुळाच्या घराघरांत? तर आम्हाला – किमान मला तर सगळंच गोकूळ एक भलंमोठं घरच वाटत होतं – माझंच! तसंच त्या सर्वांनाही वाटावं, अशी माझी प्रबळ इच्छा होती. इथलं एकही गोप स्त्री-पुरुष जोडपं मला अपरिचित नव्हतं. इथली गोपबालकं, बालिका मला-दादाला आमच्या चुलतभावंडांसारखी आणि आमच्या एकासारखी भावंडंच वाटत होती.

जसा पाणी, प्रकाश, माती, आकाश यांचा आमच्या रक्ताच्या थेंबाथेंबाशी दाट परिचय येत गेला, तसे आमच्या गोकुळाच्या संरक्षक कुंपणाच्या आतील व बाहेरील मनमुक्त क्रीडाप्रकार आता दिवसागणिक वाढतच चालले. त्यांना सीमा म्हणून कसली ती राहिलीच नाही. सांगायचं म्हणून ठरवलंच, तर त्यांचंच एक केवढंतरी रामायण होईल.

न संपणाऱ्या, विराट कांडांचं! त्यातील काही निवडक क्रीडाघटना मात्र, मीही कधी विसरू शकलेलो नाही. त्या सांगणं भागच आहे. शितावरून भाताची येते, तशी त्यावरून आमच्या खोडचा-क्रीडांची साग्र कल्पना यायला हरकत नाही.

कधी ग्रीष्मात चांदण्या रात्री अंगणात दोन खाटल्यांवर एखादं जोडपं वारंघशी झोपलेलं असे. त्यातील गोपाची लांब दाढी व गोपीच्या लांब वेणीची नागीण यांची मी व बलरामदादा हलक्या, अलवार हातांनी घट्ट गाठ गुंथत असू! चांगले चार-पाच सवंगडी आमच्या हातांपेक्षा अलवार खांद्यांनी एखाद्या पंचक-सप्तकात घोरणाऱ्या गोपाचं खाटलं अलगद उचलून ते थेट पश्चिमेच्या महाद्वाराजवळ निवांत नेऊन ठेवीत. आमच्या या उच्छादी पराक्रमामुले उभं गोकूळ कसं त्रस्त-त्रस्त झालं. रोज चढत्या क्रमानं तणतणत येणाऱ्या अविवाहित, तरुण, विवाहित, मध्यम वयस्क, वयस्क, प्रौढा गोपींचे जथेच्या जथे मुखियावाडचावर नेमानं लोटू लागले. कलकलत, एकदमच एकमेकींशी बडबडत त्या गाऱ्हाणी घालू लागल्या. अटीतटीनं सांगू लागल्या, “यशोदेऽ, रोहिणीऽ आम्ही गोकुळात राहावं की कसं? की वाट फुटेल तिकडे तोंड घेऊन जावं? तुम्ही आपल्या पोरांना आवरणार की नाही? उच्छाद-उच्छाद मांडलाय तुझ्या लाडानं शेफारलेल्या या माजुड्या कारट्यांनी.”

दोघी आया मग नाना आर्जवं करून, त्यांची समजूत घालून-घालून थकत. शेवटी ठेवणीतलं प्रभावी अस्त्रं उपसत. तडकून ऐकवत – “आता आम्हीच देतो कृष्ण-बलरामाला हाकलून गोकुळाबाहेर एकदाचं. कुठंतरी लांब दूरच्या गोकुळात! पाऽर कंटाळलोत आम्हीही त्यांच्या खट्याळ खोडचांना!”

ही हेमगर्भाची मात्रा मात्र सर्वच गोपींना अचूक लागू पडे. त्यांचा चढा सूर क्षणात खाली येई. त्या आपसात कुजबुजत, “तसंच काही नाही आमचं म्हणणं! पण पोरांच्या जातीनं मर्यादेत असावं एवढंच.”

मग दोन्ही आयांनी दिलेली दूध-ताकाची लोटकी रिचवून, दुसऱ्याच विषयांवर कलकलत त्या मुखभर हसत. ‘बलराम-किशन, श्याम-राम’ म्हणत बाहेर पडत! माजघरातील दाराआडून त्यांना बघताना आम्हाला त्या गोकुळातील उगवतीच्या महाद्वारातून बाहेर पडणाऱ्या गोधनाच्या तांडचासारख्याच वाटत – अश्राप, निरागस.

आता संरक्षण कुंपणाबाहेर तर मी व बलरामदादाच्या पायाचा ठसान्ठसा यमुनेकाठच्या वाळवंटातील कणाकणांवर उमटला. दूरवर पसरलेल्या कुरणा-कुरणांतील गवताच्या काडी-काडीचाही आम्हाला दाट परिचय झाला होता. वरच्या निळ्या आभाळाखाली व गोकुळाच्या यमुनाकाठ धरून पसरलेल्या परिसरात आम्ही खेळ म्हणून खेळलो तरी किती! त्याला सीमा नाही. अंत नाही. वर भिरभिरत्या पक्षयांच्या यमुनेच्या वाळवंटात पडलेल्या मायावी, धावत्या सावल्या पकडण्यासाठी मी व दादा धाव-धाव धावत आलो होतो. झाडावरील स्वैर उड्या मारणाऱ्या वानरांना दात विचकून वाकुल्या दाखवल्या होत्या. ग्रीष्मात चढ्या सुरांत ओरडणाऱ्या, झाडांच्या गचपणातून न दिसणाऱ्या कोकीळ नरांच्या आवाजाचं चढत्या सुरांत अनुसरण केलं होतं, ‘कुऽहूऽ! कुऽहूऽ!

आताशा मात्र आमच्या दृष्ट लागावी अशा गोकुळावर संकटामागून संकटं सतत कोसळू लागली. एकदा रानातून अचानक उगवल्यासारखा एक अक्राळ-विक्राळ रानगर्दभ आमच्या गोधनाच्या कुरणात उतरला. मजेत डुलणाऱ्या कुरणाच्या गवताच्या

अंगावरही काटा उठेल, असा केवढातरी गगनभेदी खिंकाळला! नाकपुड्या विस्फारून त्याला अंगावर धावत येताना बघून आमचं गोधन पार भेदरलं! बिचाऱ्या नाना रंगांच्या गाई भेदरल्यामुळे शेपट्या ताठ उभारून हंबरत चौखूर कशातरीच उधळल्या. आमचे गोपसवंगडीही खांद्यावरच्या घोंगड्या सावरत, घुंगुरकाठ्या नाचवत केवढ्यातरी पोटतिडकीनं भेदरून आम्हाला मोठ्यामोठ्यानं हाकारू लागले, "कृष्णाऽऽ बलीदादाऽऽ धावा, कन्हैय्याऽऽ, संकूदादाऽऽ लवकर-लवकर पळाऽऽ!"

मी व बलरामदादा होतो तिथून सुसाट धावत गेलो. आमच्या अंगचं सर्व सामर्थ्य आणि कौशल्य पणाला लावून त्या धुडाला एकदमच भिडलो. घटिकाभर झुंज घेऊन त्या विक्राळ रानगर्दभाला हां-हां म्हणता आम्ही निपचित करून टाकलं. मग जमलेले आनंदविभोर गोप आमच्या नावाचा जयजयकार उठवत आम्हाला खांद्यांवरूनच नाचवत, वाजत-गाजत गोकुळात घेऊन गेले.

आमच्या या पराक्रमाच्या वार्ता व्रजभूमीतील इतर सगळ्या गोकुळांत आपोआप पसरल्या. आनंदी झालेले भोवतीच्या गोकुळागोकुळातले गोपाळ अपार कौतुकानं आमच्या गोकुळात आता तांड्यांनी येऊ लागले. चित्रआजोबा, बाबा, सर्व काकांना आमच्याविषयी नाना प्रकारांनी विचारू लागले. त्यातील काही तर आम्हाला थेट चरणीच्या कुरणात येऊनही भेटू लागले. अशातच तिकडे दूर यमुनेच्या एका सखोल डोहात राहिलेला एक मोठा अजस्त्र सर्प गोपाल आणि गोधन यांना रोज सतावू लागल्याची वार्ता आम्हाला लागली. तो अजगरासारखा केवढातरी लांबलचक होता. त्याच्या नुसत्या फुसफुसत्या क्षणैक दर्शनानंही बघणारा हबकूनच जाई. कधी तो अजस्त्र सर्प दाट, अफाट कुरणात आश्रय घेई, तर कधी यमुनेच्या डोहात दडी मारे. त्याच्या मागावर राहून आम्ही दोघांनी प्रथम त्याच्या हालचाली नीट हेरून घेतल्या.

एके दिवशी अशा टेहळणीसाठी मी एकटाच डोहाकाठी गेलो होतो. टळटळीत भर दुपार होती. पाण्याबाहेर येऊन तो सर्प दाट कुरणात शिरला. कुरणात त्याला काहीतरी सावज मिळालं असावं. ते मटकावून, सुस्तावून तो कुरणातच रेंगाळला. ही संधी छान होती. मी कमरेच्या पीतांबरात बांधून ठेवलेल्या एका गुणी दगडाच्या दोन चिपा बाहेर काढल्या. एक चीप दुसरीवर घासून समोरच्या दाट वाळलेल्या कुरणातल्या तृणावर ठिणगी टाकली. हां-हां म्हणता कुरणाचा गगनगामी वणवा पेटला. टळटळीत उन्हात प्रचंड वणव्याच्या पिवळ्याधमक अग्निज्वाळा उसळल्या. तसं गोप पोराटोरांसह सगळं गोकूळ आरडाओरडा करत, यमुनेच्या डोहाकडे धावू लागलं. एव्हाना वणव्यात होरपळलेला तो भयानक सर्प चित्रविचित्र आळेपिळे देत, फूत्कारत, वळवळून होलपटत बाहेर आला. डोहाकाठी येऊन जिभल्या चटाचट वासत निष्प्राण होऊन पडला.

दूरवरून ऊर पिटत धावत येणाऱ्या थोरलीनं मला सुखरूप बघून आवेगानं प्रथम करकचून मिठीत घेतलं.

माझे पटापट मुके घेताना ती बडबडतच राहिली. "मरू दे तो सर्प! मेलाच आता. तू चल बघू वाड्याकडे अगोदर कान्हा!" माझ्या नेहमीच्या सवंगड्यांतील चौघांनी पटकन उचलून मला खांद्यावरच घेतलं!. बलरामदादासह ते सर्व वाजत-गाजत व नाचत-गर्जत गोकुळाकडे चालू लागले. कुणीतरी कंठनाळ फोडून उसळती किलकारी दिली, "गोपराज कृष्णाचाऽ विजय असो –" पुन्हा घोषणा दिली – "जयतु – जयतुऽ नंदनंदन कृष्णकन्हैया जयतु!"

आम्ही सर्वच गोकुळात असे आनंदी होतो. मात्र हा आनंद काही फार काळ टिकला नाही. आता गोकुळावर एक जोडसंकट कोसळलं, वन्य प्राण्यांचं आणि निसर्गाचं. आमच्या संरक्षक कुंपणाबाहेर कुरणात चरत्या गोधनावर. रानारानांतून उतरणारे बुभुक्षित वाघ, लांडगे आणि तरस फारच सतावू लागले. कधी-कधी संरक्षक कुंपणाभोवती फिरून जबडे वासून ल्हाऽ ल्हाऽ करू लागले. आमच्या शिकाऊ कुत्र्यांच्या भुंकून-भुंकून आकांत मांडणाऱ्या कठोर प्रतिकाराला भिईनासे झाले.

एखाद्या चुकार-मुकार वासराची गर्दन गपकन अचाकन पकडून त्याला रानाकडे फरफटत नेण्याचा उद्योग त्यातील एखादा वाघ मांडी. ते बघताच चपळ गोप धावत येऊन बाबांना वार्ता देत. मग माझे निर्भय नंदबाबा गोपकाष्टा कसून वाड्याच्या ओसरीच्या कोनाड्यातला बळकट काठीचा भाला तत्परतेनं उचलत. तो हाती पेलत कुणाचीही वाट न बघता सुसाट धावत सुटत. बाणासारखे. मग सर्व गोपही हातीचं काम तसंच टाकून त्यांच्यामागून धावत.

अचूक वेध घेऊन वीतभर पात्याचा हातीचा भाला फेकून बाबा धावत्या वाघाला टिपत. आकांती हंबरडणारं वासरू सोडायला भाग पाडत. त्या अर्धमेल्या घायाळ वासराला हातांच्या झुल्यांवरून अलगद वाड्यात आणून त्याच्या व्रणांवर गुणकारी वनस्पतींचा औषधी रस सोडत. त्याला अपार मायेनं थोपटत-कुरवाळत. हे सर्व समोर बघताना मला बाबांचा ऊरभर अभिमान वाटे.

त्यांचे हे संरक्षणाचे उपाय मात्र थिटे पडले. वाघांनी, लांडग्यांनी नि तरसांनी गोकुळाला त्रस्त-त्रस्त केलं. अशातच भोवतीच्या कुरणातील चाराही आता गोधनाला पुरेनासा झला. आता ही कुरणं वर्षभर तरी ‘ओस’ ठेवावी लागणार होती. होय. आमचं प्राणप्रिय गोकूळ सोडून आम्हाला दुसरी बसकण गाठायची होती. दुसरं गोकूळ वसविणं भाग होतं, नित्याचं वसलेलं काही काल त्यागायचं होतं. माझ्या जीवनातील प्राणप्रिय काहीतरी सोडण्याचा पहिला क्षण आला.

मुखियावाड्यात त्यासाठी बाबांच्या पुढाकारानं बैठक बसली. सर्व साधक-बाधक चर्चा झाली. गोपांनी गोकूळ सोडल्यानंतर मागे राहणाऱ्या माणसांची, धनाची, वाड्यांची व्यवस्था कशी करायची ते ठरलं. नव्या वसाहतीसाठी जाणत्यांनी सप्ताहभर चौफेर शोधक भटकून नवं गोकूळस्थान निवडलं. त्याला साजेसं योग्य नाव सर्वांनी मलाच विचारलं. या स्थानात सर्वत्र वनंच वनं दाटली होती. जसाकाही हा एक वनांचा चमूच होता. मी नाव दिलं – ‘वृंदावन!’ सर्वांनाच ते फार आवडलं. काही जाणत्या गोपांनी लागलीच पुढे होऊन वृंदावनाला लाकडी कुंपणही टाकलं. पुरोहितांनी काढून दिलेल्या शुभदिवशी गोकुळाच्या उगवतीच्या महाद्वारातून वृषभरथांचे तांडे बाहेर पडले. ते माठ, रांजण, मथण्या, उखळी, दावी, शिंकाळी, कुक्कुटांची डालगी, टिपऱ्या, लेझमी, वस्त्रांची बोचकी, पेटिका यांनी खचाखच भरलेले होते.

सर्वांत शेवटी आमचं मुखिया गोपकुल बाहेर पडलं. मी होतो सुमारे बारा वर्षांचा. दादा असेल माझ्यापेक्षा वर्षभरानं मोठा. माझा डावा हात थोरलीनं मायेनं धरला होता. दादाचा धाकलीनं. छोटी ‘एका’ मोठ्या काकूच्या कडेवर बसली होती. आमच्या मागून आजोबांना सावरत चालणारे नंदबाबा, त्यांना नेहमीच मदत करणारे सर्व काका, काकू, पुरोहित, चुलत भावंडं होती. अभिरभानू वंशाचा आमचा गोपमेळ चालला. नव्या वसाहतीकडे. नव्या गोपजीवनाकडं. गोकुळातून वृंदावनाकडं!!

वृंदावन! तसं प्रत्येकाच्या अंतःकरणात नसतं का एक भाववृंदावन? पण माझं हे वृंदावन अगदी आगळंवेगळं होतं. कसं होतं म्हणून सांगावं ते? छे! त्याच्यासारखं तेच! इथली घरं, मार्ग, आमचा वाडा, सगली गोकुळाचीच प्रतिकृती होती. आमचा मुखियावाडा केवल चौसोपी होता. तोही रानगवतानं आच्छादलेला. इथंही शिवालय होतं. व्यायामशाळा होती. वृंदावनाच्या मावळतीला लागून निरनिराळ्या वृक्षा-पक्षयांनी भरलेलं दाट 'मधुबन' होतं. प्रमुख असं. त्याला लागून आम्रवन, केतकवन, किकरवन, चंपकवन अशी अनेक उपवनं होती. इथल्या संरक्षक कुंपणापलीकडेही चौफेर चराऊ, दाट गवताळू कुरणं पसरली होती. त्यालगत यमुनेनं डौलदार अर्धचंद्राकृती घेर टाकला होता.

मध्य भागात ह्रत्कमळासारखं वृंदावन तर निसर्गसौंदर्याच्या कोंदणातला पाचूच होता. इथं चंपक, जामुन, औदुंबर, आम्र, साग, कदंबाच्या निळसर हिरव्या रंगाच्या, जाड पानांच्या वाटिकाच वाटिका पसरल्या होत्या. त्या भारद्वाज, चातक, चंडोल, मयूर, कोकीळ अशा कितीतरी पक्षयांच्या कलकलाटांनी कशा निनादून उठत. त्यात काही ठिकाणी झुळझुळ वाहणारे नितळ, स्फटिकशुभ्र पाणलोटांचे रानझरे होते. काही ठिकाणी रात्रंदिवस अविरत कोसळणारे लहान-मोठे धबधबे होते. त्या धबधब्यांच्या धसधसत्या आवेगी धारांखाली, मस्तकं तगती ठेवून मी व दादा जागीच तरंगायला शिकलो. या सरावानं पाण्याचा 'आवेग' म्हणजे काय, ते आम्हाला चांगलंच कळून चुकलं. वरचं आभाळ तर कसं मोरपिसाच्या अर्कानं ओतून काढलेलं निळं. निळंशार होतं!

वृंदावनाला लाभलेली सर्वांत सुंदर देणगी होती ती; उगवतीला पूर्वेला. तिथं संरक्षक कुंपणापलीकडच्या कुरणाला लागून एक प्रचंड वृक्ष होता. शेकडो गोल पसरलेल्या फांद्यांचा, हिरव्याकंच गच्च पानांनी आच्छादलेला. त्याचा सात-आठ गोपांनी हातच्या मिठचा घालून फेर घातला, तरी कवेत न मावणारा थोराड बुंधा गाठाळ होता.

आम्ही वृंदावनात येण्यापूर्वीपासूनच या वृक्षाला सर्व व्रजभूमीतले गोप 'भांडीरवृक्ष' म्हणून ओळखत. त्याची ख्याती अठरा गोकुळांत सर्वत्र पसरली होती. एखाद्या प्रशस्त महापुरुषासारखा किंवा वास्तुपुरुषासारखा दिसे व भासे, तो विशाल भांडीरवृक्ष. त्या वृक्षाच्या पलीकडे ज्याची उंचच उंच शिखरं आभाळात भिडली आहेत, असा उंच व आडवा पसरलेला भव्य पर्वत होता. व्रजभूमीतील सर्व गोकूळं त्याला 'इंद्रपर्वत' म्हणत. या पर्वताच्या सर्वांत उंच शिखरावर केवढचातरी दगडी मंदिरात उंचच उंच अशी इंद्राची काल्पनिक, भव्य अशी पाषाणी प्रतिमा उभी केली होती. तो आभाळाचा अधिकारी आहे, असं बिंबविण्यासाठी त्याच्या पायाशी दगडी, भव्य ढगांच्या आकृत्याही खोदल्या होत्या. त्या इंद्रपर्वतावर दरवर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी एक मोठा 'इंद्रोत्सव' होई. तेवढया सप्ताहासाठी काय तो हा पर्वत व्रजभूमीतील सामान्य गोपालांसाठी मुक्त राही. एरवी या कितीतरी योजनांच्या पर्वतालाही काटेरी कुंपणं होती. गोपांना या पर्वतावर मुळीच प्रवेश नव्हता. पर्वतावर कुठंतरी राहणाऱ्या इंद्राला तसं कुणीच कधी प्रत्यक्ष पाहिलं नव्हतं. तरीही त्याचा धाक मात्र मनोमन सर्व गोपांवर खोलवर बसला होता. पिढयान्‌पिढया रुजविलेल्या सखोल संस्कारांमुळे हे घडलं होतं.

वृंदावनात आलेल्या वर्षीचा पावसाळा सुरू होण्यापूर्वी इंद्रपर्वतावर साजरा होणाऱ्या इंद्रोत्सवाला जाण्यासाठी गोपसभा बसली. बराच वेळ ती चालली. बाबा, चित्रआजोबा, काका, वृंदावनातले काही जाणते गोप सर्व आपापल्या परीनं बोलले. सर्वांचा सूर एकच

होता. सजून-धजून इंद्रोत्सवाला कसं जायचं? इंद्राला ‘खंडणी’ म्हणून गोरसाचे, दह्या-तुपाचे शृंगारलेले किती रांजण घेऊन कसं निघायचं, हा. सर्वांचं शांतपणे ऐकून घेऊन सर्वांत शेवटी मी बोललो. सर्वच वडीलधाऱ्यांना निकरानं ठाम विरोध करण्याचा माझ्या जीवनातील हा पहिलाच कठोर प्रसंग होता! मी ठामपणानं म्हणालो, “यापुढे मुळीच जायचं नाही कुणीही इंद्रपर्वतावर! खंडणी-करभार तर कधीच द्यायचा नाही! कुणालाही! कोण हा इंद्र? कशासाठी मानायचा त्याचा हा धाक? नाही साजरा करायचा इथून पुढे कधीच हा इंद्रोत्सव! हा पर्वतच मी मुक्त करणार आहे, व्रजातील साऱ्या गोपांसाठी! जायचं असेल, तर तुम्ही सारे जा – माझ्याशिवाय – माझा शब्द मोडून!”

माझ्या शरीरातील रक्तकण उधळल्यासारखे धावू लागले. एका अदम्य आत्मविश्वासानं माझं मन कसं काठोकाठ भरून आलं. श्वास चढीला पडले. हा अनुभव फार वेगळा होता. मला खोल-खोल जाणवलं, बोलला तो या गोपालांचा कृष्ण नव्हताच – कुणीतरी वेगळाच होता तो! माझं हे रूप गोपमंडळानं यापूर्वी कधीच बघितलं नव्हतं. ते सर्वच अवाक झाले. बघतच राहिले. “हा कृष्ण म्हणतो ते मलाही पटतं. कुणाचा धाक मानून तसे आपण व्रजातील गोप कधीच सुखी, समाधानी होणार नाही.” माझ्या डोळ्यांतील थडथडत उतरणारे भाव जाणून घेण्याची पूर्ण शक्ती आता प्राप्त झालेला केवळ बलरामदादा तेवढाच मला पाठिंबा देत निर्धारानं बोलला.

“इंद्रोत्सव बंद करणार मी. इंद्रपर्वत मुक्त करायचाय मला. आहे मला सर्वांचा पाठिंबा?” मी कुणालाच कसलाही विचार करू न देता लागलीच प्रश्न घातला. आताशा मला बारकाव्यानं व चांगलं कळून चुकलं होतं की, फार विचार करू दिला की, माणसं अडचणींचे काल्पनिक फाटे हटकून फोडतात. दूरचे – परके तर फोडतातच; पण आपले – जवळचे, घरचेही फोडतात.

नंदबाबांनाही आताशा मी कसं नि काय बोलतो, हे पारखण्याची चांगलीच दृष्टी आली होती. ते वृंदावनाच्या गोपसभेचा अंतिम निर्णय ठासून घोषित करताना म्हणाले, “कृष्ण म्हणेल तसं आणि तसंच होईल! आतासाठीच नव्हे, सदैवच!

या निर्णयाच्या दुसऱ्याच दिवशी मात्र वृंदावनावर कायमचं लक्षात राहील, असं संकट कोसळलं. दिवस टळतीला लागला नाही तोच; अचानक निळ्याभोर आकाशात हत्तीच्या माटाचे अगडबंब, काळेशार ढगच ढग गर्जत, गरगरत फिरू लागले. अचानक विजांचा प्रचंड कडकडाट सुरू झाला. पाठोपाठ अगदी सोंडेच्या धारांनी आभाळ वेडावल्यागत कोसळू लागलं. रोंरावत्या प्रचंड, घनघोर वादळात भले थोराड, गाठाळ वृक्ष कडाकड कोलमडू लागले. ती संध्याकाळ धरून रात्रभर मुसळधारांचा पाऊस गर्जत, कोसळतच राहिला.

पुरं वृंदावन पाण्याखाली चाललं. तसं बाबांसह इरली घेतलेले, कांबळी पांघरलेले गोप, त्यांच्या स्त्रिया, बालकं, आपला पती रायाणसह राधा असे सर्वच एकमेकांना हाका देत, धीर देत झोपड्यांबाहेर पडले. भेदरलेला, हादरलेला गोपमेळ प्रचंड भांडीरवृक्षाखाली आश्रयला आला. सगळं वृंदावन भांडीरवृक्षाच्या पंखाखाली आश्रयाला आलं. विजा कडकडतच होत्या. मुसळधार धारा कोसळतच होत्या. रोंरावत्या वाऱ्यात झाडं वेडीवाकडी होत होती. काही तर होलपटून, उन्मळून कडाडत कोसळत होती. दोन दिवस सतत निसर्गाचं हे वायू व जल यांचं रौद्रभीषण तांडव चाललंच होतं. अशातच बलरामदादा म्हणाला, “कृष्णा, या घनघोर कल्लोळात सर्वांना

धीर येईल, तो केवळ तुझ्या मुरलीनंच!"

मी हसलो. माझ्या कांबळीच्या झोळीतील मुरली मागे वृंदावनातच राहिली होती. विसरली होती!

सर्वांनी दादाचा प्रस्ताव, "हो, हो, मुरलीच वाजव कसा कन्हैय्या!" असा कुडकुडत, दात थडथडवीत उचलून धरला. पण माझा निरुपाय होता. मुरलीच तर नव्हती माझ्याजवळ!

कुणालाच कळणार नाही, अशी माझी साथ देण्यासाठी एक स्त्री माझ्या जीवनात आली होती. माझी प्राणप्रिय सखी राधा. थरथरत, काकडत ती पुढे आली. तिनं तर माझ्याच घोंगडीची खोळ पांघरली होती. हातातील माझी मुरली पुढे करत ती अधिकारवाणीनं बोलली. "आता मात्र वाजवच तुझी स्वर्गीय मुरली कन्हैय्या! भेदरलेल्यांना धीर दे कसा!"

तिच्याकडे कितीतरी प्रेममय दृष्टीनं बघत दादाला व सर्व गोपांना एकदा निरखत मी पुन्हा हसलो. विजा लखलखतच होत्या. वारा रोंरावतच होता. पाऊस कोसळतच होता. हत्तीच्या सोंडधारांनी – मुसळधारांनी. नाभीच्या जीवदेठापासून मी मुरलीची पहिलीच केवढीतरी अनोळखी सुरावट फुंकली. भोवतीच्या कोसळत्या धारांत चिंब न्हाऊन ती हां-हां म्हणता वृंदावनाच्या, इंद्रपर्वताच्या आसमंतात सर्वत्र पसरली. गारठलेलं, भिजलेलं, प्राणभयानं थिजलेलं, प्रलयाच्या आशंकेनं भेदरलेलं, आमचं गोपकुटुंब आणि आबालवृद्ध गोप तरारले, सावरले. कुणीतरी कोसळत्या जलधारांच्याही अंगी काटा सरकेल, अशी कंठनाळ फोडून ललकारी दिली, "वृंदावनतारक, मुरलीधर, गोपालकृष्णऽऽ जयतु –" "जयतुऽऽऽ! जयतुऽऽऽ!!" सर्वांनीच त्याला प्रतिसाद दिला. ते ऐकत पाऊस सुमारला. वादळ उतरलं. रात्रीच्या प्रलयात इंद्र वाहून गेला की काय नकळे!

दुसऱ्याच दिवशी इंद्रपर्वताच्या भोवतीचं कुंपण उचकटून फेकायला वृंदावनातले गोप एकवटले. या कुंपणाचा पहिला खांब मुळासकट उपटून दूर फेकताना अंत:प्रेरणेनं मी घोषणा केली, "आजपासून हा पर्वत 'गोवर्धन' पर्वत झाला आहे! इथून पुढं त्यावर 'गोवर्धनोत्सव' साजरा होईल. आता व्रजातील अठरा गोकुळांच्या आमच्या गाई इथं मुक्त, मुक्त चरतील. आमची खिल्लारं वाढतील. वर्धन पावतील."

जमल्या गोपांनी एकमेकांच्या कानांशी लागत त्या पर्वताचं नाव पक्कं केलं – 'गोवर्धन! गोवर्धन-पर्वत!'

ग्रीष्माचा कडक ताव वृंदावनाची गर्द हिरवाई पोळून काढण्याचा यत्न करून थकला. तावून-तावून ग्रीष्म परतला. मृगसरींचा माग देणारे सजल श्यामल ढग वृंदावनाच्या निळ्याशार आभाळात आता गडगडू लागले. ठायी-ठायी पसरलेल्या वृंदावनात केका देत फुललेल्या पिसाऱ्यांचे मत्त मयूर 'तालनृत्य' करू लागले. इवल्या पंखांच्या वाळवींचं भिरंच भिरं आभाळात उठलं.

एके दिवशी मधुवनात माझ्या प्रिय सखीनं – राधेनं मला हाताला धरून सर्व सवंगड्यांतून जवळ-जवळ खेचतच बाजूला एका वृक्षाखाली आणलं. पानागणिक फुललेले टपोरे शेंदरी गेंद मिरवणारा आम्हा सर्वांचा आवडता डेरेदार कदंब होता तो. त्याच्या फुलल्या गेंदाचा धुंद गंध कसा सर्वत्र कोंदला होता.

राधेला मला काही भेटवस्तू द्यायची होती. आपल्या गोपवस्त्राच्या ओच्यात तिनं

ती अपूर्वाईनं लपवून आणली होती. एका पाषाणखंडावर मी बसलो. ती जमिनीवर उभी राहिली. म्हणाली, "मनमोहना, आज मी तुला एक अपूर्व भेट देणार आहे. त्यासाठी तर सर्वांतून इकडे बाजूला आणलंय मी तुला. नक्कीच आवडेल तुला माझी ही भेट मुकुंदा." तिनं ओच्यात जपून आणलेली भेट बाहेर घेऊन माझ्यासमोर धरली. इवल्या-इवल्या हिरव्याकंच पानांच्या रानवेलींचा एक मुकुट होता तो! त्यात तळहाताच्या आकाराचं तिरकस खोचलेलं, एक रंगवैभवी टपटपीत मोरपीस खुलून दिसत होतं. मी तो मोरपीसधारी मुकुट डोळे विस्फारून बघतच राहिलो. मग काही एक विचारानं राधिकेकडे हसून बघत मी तो मुकुट पटकन मस्तकी धारण केला.

तिचे डोळे कधी नव्हे असे पाणथरून लकाकले. क्षणातच दाट पापण्यांचे आपले मत्स्यनेत्र तिनं भावमुग्धतेनं मिटून घेतले. मिटल्या डोळी ती बराच काळ तशीच स्तब्ध राहिली. मुग्ध. मी तिच्या अलौकिक रूपाकडं भान हरपून एकटक बघतच राहिलो. मधुवनावर सांजवेळ धरून आली होती. आम्ही दोघंही सवंगड्यांसह पाठीवर गोरजाचे धूळलोट घेत, वृंदावनाकडं परतलो.

राधेनं आजच दिलेला मोरपीसधारी मुकुट स्वीकारून मी तिच्या साक्षीनं पूर्ण विचारपूर्वक तो मस्तकी धारण केला होता. का? ते मोरपीस होतं, एका निरामय शाश्वताचं अतिशय अनुरूप असं नाजूक प्रतीक. समस्त स्त्रीत्वाच्या निर्माणशील अशा परमपवित्र मंगल योनिद्वाराचं प्रतीक होतं ते! मी ते पूर्ण विचारांती जाणीवपूर्वक जीवनारंभी स्वच्छपणे मस्तकीच धारण केलं होतं! पुढे जीवनभर करणार होतो!

खरंच राधा माझी पहिलीच 'स्त्रीगुरू' होती. स्त्रीत्वाच्या सर्व भावविभावांची मला दीक्षा देणारी. कधी खूप बोलून, कधी शब्दही न बोलता मूक राहून ही दीक्षा दिली होती तिनं मला. वासनारहित, भावभरित, अतुल प्रेमयोगाची, मधुरा भक्तीची. माझी प्रियसखी, पहिली स्त्रीगुरू म्हणजे राधिकाच!

लवकरच कोजागिरी पौर्णिमेची चंदेरी रात्रही वृंदावनावर हलक्या पावलांनी उतरली. तबकाएवढा चांदणश्रीमंत चंद्र वृंदावनावर व पश्चिमेला असलेल्या मधुवनावर चंदेरी रस ओतत तळपू लागला. आम्हा चांद्रवंशीय अभिरभानू गोपांची पिढ्यान्पिढ्या चालत आलेली एक भावपूर्ण प्रथा होती. व्रजभूमीतल्या अठरा गोकुळांखेरीज संपूर्ण आर्यावर्तात ती इतरत्र कुठंच नव्हती. ती प्रथा अखंड चंद्ररस ओतणाऱ्या चंद्राला साक्ष ठेवून, स्वतःला विसरून स्त्री-पुरुषांनी मुक्त मनानं रात्रभर नृत्याचा 'रास' खेळण्याची!

ठरल्याप्रमाणं आज झाडून सारं वृंदावन मधुवनात एकवटलं. निळ्या, काषाय, केशरी, शुभ्र कमळांनी भरलेल्या नेहमीच्या नील सरोवराकाठी सारे एकवटले. आज पहिल्या प्रहरात सर्व गोपबालकं व वृद्ध जोडपी टिपऱ्या खेळत, गाणी म्हणत आनंदविभोर होऊन मनसोक्त नाचणार होती.

रासाचे वयोवृद्ध मानकरी होते – अर्थातच माझे चित्रसेन आजोबा. जमल्या गोपांच्या मंडलात ते आले. डुईचं ठेवणीतलं भलंमोठं पीळदार गोपपागोटं सावरत थरथरल्या मानेनं त्यांनी कडेधारी हातांनी शुभारंभाची कुंकुम-ओंजळ 'जै इडाऽई' म्हणत आभाळात उधळली. त्या ठोक्यावर गर्जत्या वाद्यांनी व पायांनी एकदमच मनमुक्त रासाची लय पकडली. रात्रभर न थांबण्यासाठी.

आता टिपऱ्या झडू लागल्या. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली मधुर गोपगीतं घुमू लागली. बालक-वृद्धांचा रासाचा पहिला जथा नाचनाचून थकला. मधुवनावर आता चंदेरी मध्यरात्र चढत चालली. चांदण्यात चढत्या लयीचे अगणित स्वरांकुर फुटले! सरोवराकाठी प्रचंड पाषाणी चुलवाणावर एक प्रशस्त काहील चढवली होती. तिच्यात केशर आणि मधुशर्करा मिश्रित गोरस काठोकाठ भरला होता. आभाळातल्या शुभ्र चांदण्याला लाजवीत तो केशरमंगल गोरस यमुनालहरींवर थरकू लागला.

मध्यरात्र झाली. चित्रसेन आजोबांनी हातची घुंगुरवाळी गवळकाठी उंच उभवून भुईवर आदळण्याचा संकेत करताच काहिलीतल्या गोरसाला लहानथोर गोपगोपी ‘जै इडामाऽय...’ गर्जत भिडल्या. मस्तकावरच्या चंद्राला साक्षी ठेवून गोपांनी लोटक्या-लोटक्यांनी गोरस आकंठ प्राशन केला. शेवटी आम्ही म्हणजे मी, बलरामदादा, दोन्ही आया, आजोबा, बाबा, सर्व काका-काकू आणि होय राधा आणि तिचा पती रायाण सर्वच गोरसाला भिडलो. आम्हीही गोरसाची लोटकीच लोटकी रिचवली. माथ्यावरचा कोजागिरीचा पूर्ण चंद्र आता किंचित ढळला.

रास खेळगड्यांचं मुख्य निवडक पथक आता रासमंडळात उतरलं. आमच्या प्रेमाची स्मृती सदैव राखण्याचा राधेनं आज कसलातरी निर्धारच केला होता जणू. आजही तिनं माझ्यासाठी एक अनमोल रत्न आपल्या ओच्यातून लपवून आणलं होतं! मी, बलरामदादा, आमचे गोप सवंगडी, चुलत भावंडं मंडलात उतरताच राधेनं माझे दोन्ही हात धरून मला सर्वांच्या मधोमध आणलं.

गौरवर्णी अन्‌ चंद्रमुखी हसरी राधा माझ्या हातांची ओंजळ आपल्या हातात घट्ट दाबून म्हणाली, ‘कन्हैय्याऽ, मी आज देणार आहे ती भेट माझी ‘प्राणभेट’ म्हणून स्वीकार. ती कधीच क्षणभरही दूर होऊ देऊ नकोस. ती याच रूपात तुझ्यासोबत सतत असली पाहिजे. करशील ना – ही एवढी माझी – या भाववेडीची – तुझ्या सखीची मागणी पूर्ण? दे वचन!” तिनं उजवा हातपंजा पुढे केला. उजवा हातपंजा तिच्या पसरल्या पंजावर ठेवून मी म्हणालो, “अवश्य, तुझी इच्छा मी अवश्य पुरी करीन. सांग काय आहे ती. दिलं वचन.”

तिनं ओच्यातून पांढऱ्याशुभ्र, ताज्या टवटवीत फुलांची, मध्येच हिरव्याकंच पानांची कुसर केलेली भरगच्च माला हातात घेतली. ती माझ्या कंठात चढविताना ती पुटपुटली, “ही माला – माझी ‘वैजयंतीमाला’ ही रोज अशाच नव्या ताज्या फुलांत अशीच गुंफून घेत जा!”

तिच्या डोळ्यांत तरळणारं कोजागिरीचं चांदणं माझ्या डोळ्यांतील चांदण्याशी एकरूप झालं. मी गळ्यातील भावरसरशीत माला वर उचलून एकदा वक्षभर खोलवर हुंगली. वक्ष काठोकाठ भरून घेतलं. चांगली गुडघाभर उतरलेली ती माला दुहाती कुरवाळली. आजोबांनी उधळली तशीच मीही कुंकुमाची ओंजळ आता आभाळात ‘जय इडामाताऽ’ गर्जत मुक्तपणे उधळली.

सर्वप्रथम मुख्य रासाचा प्रारंभ म्हणून मी शेल्यातील मुरली खेचून तिची सांकेतिक लय घुमविली. टिपऱ्याच टिपऱ्या झडू लागल्या. दुंदुभ्या घुमू लागल्या. उत्तररात्रीचा रासमग्न चंद्र जसजसा वरवर चढू लागला तसतसा मधुबनातील रास रंगू लागला.

नाचनाचून राधा थकली. तिच्या कपाळी घामाचे थेंब तरारले. आता आम्ही सर्वच मनमुक्त नाचू लागलो. आमचा देहभाव उधळल्या कुंकुम-मुठींबरोबर यमुनापार केव्हाच

गेला होता. मी आणि राधा – राधा आणि मी. मी आणि गोप-गोपी – गोप-गोपी आणि मी – पूर्णत: उन्मनी झालो होतो. राधा स्त्री नव्हती, मी पुरुष नव्हतो! राधा-कृष्ण ही दोन शरीरं उरलीच नव्हती. दोघांच्याही रूपाने एकच एक थरकती जीवज्योत रासमय झाली होती! एकरूप झाली होती!!

आम्हाला कल्पनाही नव्हती की, आता रासाचा आनंद घेत भोवताली बसून मंडल घेतलेले आबालवृद्ध दंग झाले होते. त्यांनीही डोळे मिटून एकाच लयीत टाळ्या पिटत एकच एक नादमय ठेका धरला होता. ‘राधा-कृष्ण, राधा-गोविंद, राधे-कृष्ण, राधे-गोविंद, राधे गोविंदऽऽ राधेऽऽ कृष्णऽऽ ‘ तो ऐकताना मला समाधान एकाच गोष्टीचं झालं – त्यांनी घोषात एका स्त्रीला – माझ्या सखीला अग्रमान दिला होता.

वृंदावनातले भावमंतरलेले दिवस हां-हां म्हणत सरले. तिकडं आमचं मूळ गोकूळ आता पुन्हा अंगभर कसं हिरवंगार झालं होतं. तसं बाबांनी मूळ गोकुळात परतण्याची दवंडी पिटवली. माझ्या आणि राधेच्या अनेक भावस्मृती ठायीठायी अंगी वागविणाऱ्या वृंदावनाचाही निरोप घेण्याचा समय आला. हे असं निरोप घेणं, जणूकाही जन्मत: माझ्या अंगवळणी पडलं होतं! वृंदावनाच्या या वास्तव्यात टवटवीत ताज्या निसर्गानं भरभरून मला दिलं. किंबहुना त्याहून काकणभर वरचढ मला दिलं, ते माझ्या सखी राधेनं!

राधेनं कधी घटकान्‌घटका सतत बोलून, कधी व्रतस्थ मौन राखून, कधी हाताच्या स्पर्शानं, तर कधी उदंड बोलक्या मूक डोळ्यांनीच जे-जे मला शिकवलं ते अजोड होतं. स्त्री ही विधात्याची निकोप प्रेमाची वासनारहित कसली संस्कारशील विधायक कलाकृती आहे, याची मूक गुरुदीक्षाच जशी काही मला तिनं दिली.

वृंदावनाचा निरोप म्हणजे राधाकृष्णाच्या तुलनाच करता येणार नाही, अशा विशुद्ध भावप्रेमाचा निरोप होता. आम्ही दोघांनी तो अंत:करण कठोर करून घेतला. तो घेताना मी राधेला म्हणालो, “आजपासून तू वृंदावनाची स्वामिनी झालीस. जिथं कुठं स्त्री-पुरुषांच्या मनी वासनारहित निकोप भाववृंदावन असेल, तिथं राधा असेलच असेल.” सर्व गोपमंडळांसह मी, राधा व दादा पुन्हा मूळ गोकुळात परतलो. हे ऐन तारुण्याच्या तोंडावरचे दिवस होते. तारुण्य! गगनाला गवसणी घालणाऱ्या अश्वांचा रथ हाकणारं! जमेल तितकी भूमी पायाखाली तुडवू बघण्याची इच्छा बाळगणारं, समुद्राचं उफाळणारं पाणी, बाहेरून येणारं वरकड पाणी प्रथम बाहेरच फेकून देतं; तसं ‘अशक्य’ हा शब्दच मनाबाहेर फेकणारं!

गोकूळ, वृंदावन आणि आता पुन्हा गोकूळ असा व्रजातील प्राणदायी वारा रिचवून आमची वक्षं आता निर्भय व बळकट झाली होती. केलीनंद, प्राणनंदकाकांच्या कठोर देखरेखीखाली घेतलेल्या काटेकोर व्यायामानं आमची शरीरं कसलेली, पीळदार बनली होती. धारोष्ण गोरस कुंभाकुंभांनी आकंठ रिचवून ती सतेज झाली होती. दादा तर आता माझ्याहून कितीतरी सशक्त, थोराड, मल्लच दिसू लागला होता! आमच्या ओठांवरून तारुण्यदर्शक चमकती लालसर लव उमटून फिरली.

अलीकडे माझे आजोबांना आणि बाबांना, दोन्ही आयांना आणि काका-काकूंना भंडावणारे प्रश्नच प्रश्न वाढले होते. मी त्या सर्वांना सतत विचारत होतो, “मथुरेच्या यादवराज उग्रसेन महाराजांना त्यांच्याच पुत्रानं – कंसानं असं कसं काय टाकलंय कैदेत? त्यानं कैदेत टाकलेल्या देवकीमातेला आणि वसुदेवमहाराजांना सोडविण्याचा

यत्न कुणी कसा काय नाही केला? यादवांची अठरा कुळं आणि त्यातील शेकडो-हजारो यादव काय करीत होते त्या वेळी? मला तर त्यांना भेटावं असं सतत का वाटतं? त्यांची मुक्तता करावी यासाठी मन उठाव का करतं?" माझ्या प्रश्नावलीपुढे चित्रआजोबा, बाबा व दोन्ही आया, सर्व काका-काकू निरुत्तर होत. माझ्याहून अनुभवी म्हणून दादाचे, आता गच्च भरलेले पिळदार दंड घट्ट पकडून मी त्याला कधी-कधी विचारी, "अरे, बलरामदादा – प्रिय संकूदादा, तू तरी मला सांग. एकसारखं मथुरेला जावंसं का वाटतं मला? कैदेतल्या वसुदेव, देवकींना एकदातरी भेटावं असं का होतं? तुला नाही का असं कधीच वाटत? का?" दादा माझ्या डोळ्यांत नुसता बघत राही. म्हणे, "ज्याचं उत्तर तुला सापडत नाही. ते मला कधीतरी देता येईल काय छोट्या?"

माझ्या एकाही प्रश्नाचं समाधानकारक उत्तर काही मला मिळत नव्हतं. दिवस-रात्रीचे आट्यापाट्याचे खेळगडी एकमेकांच्या हातावर टाळ्या देत पाट्या ओलांडत होते. कृष्ण या ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावरील गोपाच्या मनावरचं ओझं मणामणांनी नुसतं वाढत होतं.

अखेर तो दिवस गोकुळावर एकदाचा उजाडला! मी व बलरामदादा सवंगड्यांसह खिल्लारं घेऊन त्या दिवशी सायंकाळी नेहमीसारखे परतलो. मावळतीच्या महाद्वारात कधी नव्हे तो उभा ठाकलेला एक तुकतुकीत, काळ्याशार, पुष्ट पाच घोड्यांचा सुशोभित राजरथ दिसला. तो बघून मी व दादा चमकलोच. कारण रथात कुणीच नव्हतं. दादा धावतच गोकुळात शिरला. मी मात्र खेचल्यासारखा प्रथम घोड्यांच्या रथाजवळ गेलो. त्या सतेज काळ्याशार अश्वांच्या खुब्यांवर थाप मारून त्यांच्यातील चैतन्य पारखू लागलो. त्यांना डोळाभर निरखू लागलो. तेही खिंकाळत फुरफुरत प्रतिसाद देऊ लागले. मला ते प्राणी फार आवडले. थोड्याच वेळात बाबांसह दादा पुन्हा गोकुळाबाहेर आला. एरवी कितीही संकटं आली, तरी हसतमुख असणाऱ्या नंदबाबांची चर्या आज मात्र पार काळवंडलेली होती. चिंताग्रस्त दिसत होती. लगबगीनं ते म्हणाले, 'कृष्णा, असाच चल. याच पावली. तुला न्यायला मथुरेहून राजमंत्री आलेत. वाड्यात विश्राम घेताहेत ते."

आम्ही तिघंही लगबगीनं चाललो. सर्वांत पुढे मी होतो. आमच्या मुखियावाड्यात येताच एक राजवेषधारी मस्तकी मुकुट पेलणारा उंच व धिप्पाड, दाढीधारी पुरुष मला दिसला. आम्हाला दृष्टीस पडणारा जीवनातील पहिलावहिला यादव समोर उभा होता!

पुढे होऊन आदरानं त्याला नमस्कार करण्यासाठी मी झुकलो, तसं त्यांनी मला वरच्यावर उठविलं. पोटाशी आवेगानं भिडवलं. बाबांनी त्यांचा परिचय करून दिला, "हे कंस महाराजांचे मंत्री – अक्रूर! तुला न्यायला आलेत. आमंत्रण घेऊन – धनुर्यागाचं. या – या बलरामालाही आहे बोलावणं. " बाबांचे शब्द थरथरते तुटक होते. अक्रूर मात्र कितीतरी वेळ मला एकटक नुसतंच निरखत राहिले. थोड्या वेळानं भानावर येत म्हणाले, "कंस महाराजांची इच्छा आहे, तुमचा पराक्रम बघण्याची! तुम्हा दोघांना एकदा डोळाभर बघण्याची. त्यासाठी त्यांनी खास दूत म्हणून मला धाडलंय! तुम्हाला धनुर्यागाचं आमंत्रण देऊन!"

"प्रथम आपण मला हे सांगा अक्रूरकाका, हा एवढा भलामोठा राजरथ मथुरेहून यमुनापार करून तुम्ही गोकुळात आणलातच कसा?" मी नेमका प्रश्न त्यांच्या कानी घातला.

"एका प्रशस्त नौकेतून आमचा रथ आणि सारथी आला. दुसरीतून मी उतरलो तुझ्या गोकुळात – यमुनाकाठावर. अद्याप दोन्ही नौका यमुनेतच नांगरून पडल्या आहेत." अक्रूर दाढीभर मंद हसत उद्गारले! माझ्या खांद्यावर हात टाकूनच ते अंत:पुरी कक्षात प्रवेशले.

रात्रीचं भोजन उरकलं. आज आमच्या अभिरभानूंच्या ईशस्तवनात पाहुणे म्हणून आलेले अक्रूरही बसले.

त्यांच्या अचानक आगमनानं वाड्यातील प्रत्येक जण अस्वस्थ झाला होता. आपापल्या कक्षात ते नाना शंकांनी पछाडल्यानं शय्येवर तळमळू लागले. बाबांच्या शयनागारातील पलितेही बराच वेळ ढणढणत होते. मी आणि बलरामदादाही शेजारी–शेजारी उद्या मथुरेला जायचं, या विचारानं जागेच होतो. थोरली आणि धाकली, तर शय्येवर बसून होत्या. एकमेकींशी बोलताना मध्येच मुसमुसत होत्या.

आम्हाला वाटलं होतं, प्रवासानं शिणलेले अक्रूरकाका शांत झोपले असतील. पण तसं काही घडलं नव्हतं. मध्यरात्रीचे टोल पडले आणि कक्षातून हाती टेंभा घेतलेले अक्रूरकाका बाबांसमोर उभे ठाकले. "नंदराज, मला तुझ्याशी काही महत्त्वाचं बोलायचं आहे – एकांतात. तू एकटाच माझ्या विश्रामकक्षात ये. प्रथम आपण दोघं बोलू. मग तुझे दोन्ही पुत्रही तिथं लागतील मला! चल."

अचानक आलेलं आमंत्रण, कंसाची कानावर आलेली कुख्याती यांनी गोंधळलेले बाबा अधिक गोंधळून राजमंत्र्यांमागोमाग त्यांच्या कक्षात गेले.

अक्रूरकाकांनी प्रथम दार लावून घेतलं. मग आपल्या क्रूर कंसराजाचा, धनुर्यागाच्या निमित्तानं आखलेला कपटी बेत, दबक्या आवाजात बाबांच्या कानी घातला. "गोपराज नंददेवा, धनुर्याग हे फसवं, खोटं आमंत्रण आहे. मथुरेत राजवाड्यावर तुझ्या दोन्ही पुत्रांना कपटानं मारण्याचं कुटिल कारस्थान शिजतंय! तिथं मद्य पाजलेले प्रचंड हत्ती आणि तसलेच मल्ल तुझ्या पुत्रांवर अचानकच सोडले जाणार आहेत. त्यांना हत्तींच्या पायांखाली किंवा मल्लांच्या कातरीत कुचललं जाणार आहे. त्यांना आजच सावध केलं पाहिजे. जा, त्यांना घेऊन ये."

बाबा आमच्या कक्षात आले. भेदरलेल्या बाबांनी अर्धवट झोपलेल्या मला व दादाला उठविलं. आणून अक्रूरकाकांसमोर उभं केलं. त्यांनी माझ्या डोळ्यांत खोलवर डोळे रोवून बोलायला सुरुवात केली.

आम्ही पाहिलेला पहिलाच यादव केवढ्यातरी भारदस्त वाणीत बोलू लागला. त्यांचे शब्दन्शब्द ठिणग्यांसारखे उमटू लागले. मी कधीच घेतला नव्हता एवढ्या प्रचंड भावनिक कल्लोळाचा अनुभव त्या एकाच रात्री घेतला. माझ्या सगळ्याच प्रश्नांची धडाधड उत्तरं एकामागोमाग एक मला मिळत होती. पण ती केवढ्यातरी विचित्र सत्याला धरून होती! यादवांच्या राजसभेत मुरलेले अनुभवी अक्रूरकाका दबक्या स्वरांत बोलू लागले, "कृष्णा, बलरामा! मी सांगतोय ते नीट शांत मनानं ऐका. ऐकूनही निर्धारानं धैर्यशीलच राहा. उद्या तुमच्यावर धनुर्यागाच्या निमित्तानं होणार आहेत, ते प्राणघातक क्रूर आघात. तुम्ही यादवांचं आदरस्थान असलेल्या वसुदेवमहाराजांचे व देवकीदेवींचे पुत्र आहात! तुम्हाला यादव म्हणूनच हे आमंत्रण आहे. पण मित्र यादव म्हणून नव्हे, तर शत्रू यादव म्हणून!

"कृष्णा! पुत्रा, कंसानं प्रत्यक्ष आपल्या जन्मदात्या मात्यापित्यांनाही

राज्यलालसेनं कारागृहात कोंडून घातलंय. तुझ्या मातेच्या विवाहाच्या वेळी ऐकलेल्या एका आकाशवाणीनं हा भेदरला; बिथरला. तुझ्या माता-पित्यांनाही त्यानंच कारागृहात कोंडलं आहे. कृष्णा, पुत्रा, यानं तुझे सख्खे सहा नवजात, सहोदर बंधू वधलेत. शिळेवर आपटून! समस्त यादवांना लज्जेनं मान खाली घालायला लावेल अशा रीतीनं क्रूरपणे त्यांची जन्मतःच हत्या केली आहे. बलरामा, पुत्रा, तू एकटाच त्याच्या तावडीतून दैवयोगानं सुटला आहेस. कृष्ण तुझा बंधू आहे!!

"वसुदेवांचा मांडलिक असलेल्या या नंदराजानं त्यांच्याशी बोलणी करूनच तुम्हा दोघांनाही इथं ठेवून घेण्याचं कठीण दायित्व पत्करलं. तुमच्या जन्मापासून नंदराज चांगलं जाणतो, तुम्ही मूळचे कोण आहात ते!

"नंदराज, कर्तव्यकठोर मनानं उद्या त्यांना निरोप दे. आजवर अभिरभानू वंशाची सेवा केली, तशीच पुढे यदुवंशाची हे सेवा करतील, असा मला विश्वास आहे."

त्यांनी भावनावेगानं आम्हा दोघांनाही एकदमच जवळ घेतलं होतं, त्यांच्या आवेगी, पहिल्याच भेटीत मला कितीतरी अर्थ जाणवले. त्यांच्या शेवटच्या बोलांनी नंदबाबा चांगलेच सावरले. त्यांचा चरणस्पर्श घेऊन आम्ही त्यांचा निरोप घेतला.

इतर सारे त्या रात्री मुखियावाड्यात शांत निद्राधीन झाले होते. माझे जन्मदाते बाबा नंदबाबा नाहीत, तर वसुदेवबाबा आहेत. ते कितीतरी वर्षं मथुरेला कंसाच्या कारागारात आहेत. माझ्या सहा भावांची क्रूर हत्या माझ्या मातेसमोरच, प्रत्यक्ष चुलत मामा असलेल्या कंसानंच केली आहे. खरंतर कुठल्याही मामाला कुठलीही भाचरं प्राणप्रिय असतात. जीवनशास्त्राचा नैसर्गिक नियमच आहे तो. तरीही मामा असूनही कंस आमचा कर्दनकाळ का झाला? एक कारण होतं, त्यानं ऐकलेली – 'देवकीचा आठवा पुत्रच तुझा वध करेल!' ही मृत्युभय घालणारी कठोर आकाशवाणी. दुसरा होता केवल राज्यलोभ. त्यानं यादवांच्या राजा-राणीला प्रत्यक्ष आपल्या माता-पित्यांनाही यासाठीच कोंडून टाकलं आहे. यादवांची अठरा कुलं देशोधडीला धाडली आहेत. मीही एक यादवच आहे. वृष्णी-अंधक या कुलशाखेचा. मथुरेचा कपटी व अन्यायी राजा कंस माझा चुलत मामा आहे. मामा? हा कसला मामा? तो बलाढ्य आहे. बलांध आहे. आम्हाला मथुरेत पाचारण करून तो आम्हांवर प्राणघातक चाल करणार आहे. कशासाठी? का भय वाटतं आमचं त्याला? तर त्यानं ऐकलेल्या एका आकाशवाणीमुळं! त्याची पक्की खातरी आहे की, मी, देवकीचा आठवा पुत्र – त्याचा काळ ठरणार आहे. मीच त्याचा वध करणार आहे!

कसे असतील माझे वसुदेवबाबा? माता देवकी? यादवांचे महाराज उग्रसेन? त्यांची राणी पद्मावतीदेवी.

उद्याच तर मथुरेला जायचंय. तिथल्या धनुर्यागाच्या मंडपात कंस अचानक आमच्यावर मद्यधुंद हत्तीचे आणि मदोन्मत्त मल्लांचे प्राणघातक मारे सोडणार आहे. जायचं त्याला शरण? जायचं बळी? पूर्वी सहा गेले तसे? नाऽऽऽऽही! कधीच नाही!! मी या गोपांचा मुरलीधर – यादवांचा कृष्ण, निर्णयाचा अच्युत या कंसाचा काटा काढल्याखेरीज कधी – कधीच राहणार नाही. नक्कीच! कंस? कंस? बघू या तरी कसल्या करणीचं नाव आहे कंस – कसल्या विषाची वेल आहे ही?

'ॐ हिरण्मयेन पात्रेण! सत्यस्यापिहितम् मुखम्...' माझ्या सुप्त मनावर ऋग्वेदातील प्राणप्रेरक अर्थपूर्ण ईशस्तवना फिरून गेली. माझे श्वास क्षणात शांत,

स्थिर झाले. केवढातरी उदंड, अशरण आत्मविश्वास त्यात ठासून भरला होता. मी गाढ झोपी गेलो.

दुसरा दिवस उजाडला. माझ्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाचा दिवस होता हा! गोकूळ सोडण्याचा. कदाचित कायमचं!! मथुरेला जाण्याचा... कदाचित कायमचंच! माझ्या जीवनयात्रेत सर्वांत मोठं आणि महत्त्वाचं वळण होतं हे!

आज नेहमीसारखंच उठून मी आणि दादानं आन्हिकं आवरली. कशी कुणास ठाऊक 'मी आणि बलरामदादा मथूरेला जाणार – धनुर्यागासाठी' ही वार्ता हां-हां म्हणता गोकुळात रात्रीच पसरली होती. सारं गोकूळ आमच्या मुखियावाड्यावर भल्या सकाळीच झुंडी-तांड्यांनी लोटलं. एवढी माणसं जमली होती, तरी सारं कसं चिडीचूप होतं, सर्वांच्या चर्या पार उतरलेल्या. असेल तिथूनच ते डोळ्यांत प्राण आणून आम्हा दोघांचं मिळेल तेवढं निसटतं दर्शनही असोशीनं टिपत होते. मी उठल्या-उठल्या दादाला बजावलं होतं, 'व्याकूळ मुळीच व्हायचं नाही बलिदादा. लक्षात ठेव. ही नव्या जीवनाची सुरुवात आहे. मला तुझ्या छायेसारख्या सोबतीची नितांत आवश्यकता आहे."

बाबा, आजोबांनी सांगितलं तसं आम्ही देवकक्षातील इडादेवीसह अभिरभानूंच्या कुलदैवतांना दंडवत घातले. आमच्या अंगी नेहमीचेच वेष होते – पिवळ्यारंजन आणि निळया वस्त्रांचे. माझ्या मस्तकी मोरपीसधारी मुकुट होता. गळ्यात राधेनं दिलेली नवी, टपोरी, ताजी वैजयंतीमाला होती. आज मी नेहमीची कांबली उचलली नाही. केवळ तिच्या जवळ गेलो. तिला अलवार हातानं एकदा कुरवाळलं. तिच्यावर प्रेममय कटाक्ष टाकला. तसाच तो घुंगुरधारी गवळकाठीवरही टाकला. क्षणैक ती उचलून पायघडीवर ठकाठक आपटून मन भरून-भरून टाकणारा मधुरसा तिच्या इवल्या-इवल्या घंटांचा किणकिणाट कानभर ऐकला. पुन्हा ती गवळकाठी होती तशी हळुवार ठेवून दिली. घोंगडीच्या खोळीतील केवळ माझी प्रिय मुरली हळुवार उचलून शेल्यात खोचती घेतली.

उंच, थोराड दादा पुढे चालला. मी त्याच्या मागे झालो. नेहमी आमच्या हातावर दह्याच्या कवड्या सोडणारी थोरली व धाकली आज मात्र कुठंच दिसत नव्हत्या. आपल्या अंत:पुरी कक्षात दोघी रात्रभर अश्रू ढाळीत बसल्या होत्या. त्यांच्या चर्या ओढलेल्या नि डोळे सुजट दिसत होते. आम्हाला निरोप देण्यासाठी त्यांना बाहेर येववतच नव्हतं. नेहमी इकडं-तिकडं अडखळणारी छोटी एकाही कुठं दृष्टीस पडत नव्हती. कुणीतरी आमच्या हातावर दह्याच्या कवड्या सोडल्या. मग आम्हीच आपणहून मनं बांधून दोन्ही आयांच्या अंत:पुरी कक्षात शिरलो. केवढ्या बदलून गेल्या होत्या त्यांच्या चर्या एका रात्रीत! मला बघून थोरलीनं तर हृदयभेदक हंबरडाच फोडला,

"कृष्णाऽऽ, कन्हैयाऽ! नको की रे जाऊस तू मथुरेला, त्या कपटी राजाचं हे आमंत्रण खरं नाही रे! एकदा तू त्याच्या तडाख्यात सापडलास की, पुन्हा म्हणून काही कधीच नाही रे दिसणार तू मला!

"असा कसा रे, शेवटी यमुनेनं डाव साधला? तू जन्मलास तेव्हा माझा पुत्र नव्हेस, अशा आलेल्या शंकेसाठी का रे, ही घोर शिक्षा मला तू देतो आहेस? कन्हैयाऽ नको रे जाऊस, मला एकटीला अशी टाकून!"

माझ्या गळ्यात पडून ती हमसून-हमसून ढसढसली. एवढी हमसली की, पुढे तिला

श्वास कोंदल्यानं नीट हमसताही येईना! घनघोर वादळात भोवरवेल नुसतीच थरकापत राहावी, तशी शेवटी ती माझी प्राणप्रिय थोरली माता माझ्या गळ्यात पडून नुसतीच असहाय थरकापत राहिली. मी अत्यंत निर्धारी मनानं तिला, “थोरले, शांत हो! सावर स्वत:ला,” म्हणत नुसता थोपटत राहिलो. तिकडे दादाही धाकलीला असंच कसोशीनं शांतवत होता.

आम्ही दोघींचे चरणस्पर्श घेतले. दूर कोपऱ्यात भिंतीशी तोंड करून मुसमुसणाऱ्या पाठमोऱ्या एकाला थोपटून शांत करून मी तिला थोरलीच्या हाती सोपविली. कक्षाबाहेर सगळ्या काकू, आजोबा, बाबा आणि काका दाटले होते. आम्ही सर्व काका-काकूंच्या पाया पडलो. सारे हमसतच होते. जमलेल्या सर्व चुलत भावंडांना आम्ही प्रेमानं कुरवाळलं. डोळाभर सर्वांना एकदा डोळ्यांत भरून घेतलं.

शेवटी आमच्या थकलेल्या चित्रसेन आजोबांना जसे आम्ही साष्टांग दंडवत घातले, तसं एरवी शंभरावर गेलेलं हे वृद्ध गोकुळी कदंबाचं झाड अंगभर थरारलं! आजोबांनी आपल्या उजव्या हातातील चांदीचं कड खेचून ते माझ्या उजव्या मनगटात भरलं. काहीच न बोलता, मूकपणं. मला कडकडून बिलगतं घेतलं. माझ्या कपाळपट्टीवर आपल्या झुपकेदार मिश्यांचे ओठ ठेवून ते शेवटी भसाडल्या, घोगरट सुरात म्हणाले, “कृष्णाऽ, पुत्रा, माझ्या गर्गमुनींवर पूर्ण विश्वास आहे. तुला काहीच होणार नाऽही! मला खातरी आहे. तुझे केसही पांढरे होतील – अगदी माझ्यासारखेच! एकच मागणं आहे पुत्रा! कधी, कधीच विसरू नकोस या म्हाताऱ्याला!”

सर्वांत शेवटी नंदबाबांना दंडवत घालून आम्ही त्यांच्यासमोर निर्धारी मनानं आणि छातीनं उभे ठाकलो. मी आजवर कयास केला होता, तसेच निघाले या क्षणीही माझे प्राणप्रिय नंदबाबा! प्रथम त्यांनी आम्हा दोघांनाही दुहाती एकदमच आवेगानं घट्ट बिलगतं घेतलं. मग आमच्या मस्तकावर हात ठेवून मुखभर आशीर्वाद देत ते पाणझरत्या डोळ्यांनी म्हणाले, “पुत्रांनो! एकवेळ मला विसरलात तरी चालेल! पण इथल्या गोपगोपींना आणि तुम्हाला भरभरून गोरस देणाऱ्या तुमच्या गोधनाला कधी, कधीच विसरू नका! तुमच्या गोपकुळाची भेट म्हणून या प्रसंगी तुम्हा दोघांना मी दोन शस्त्रं देत आहे. ती जपा. तुम्ही जीवनात यशकीर्तच व्हाल. अभिरभानू आणि यदुवंशाचं दोहोंचं नाव कीर्तीकर कराल तुम्ही.” शेजारीच एक तबकधारी गोपसेवक उभा होता. त्याच्या तबकातील, एक कोटबंद खड्ग बाबांनी उचललं. क्षणैक आपल्या मस्तकी ते भिडवून ते माझ्या स्वाधीन करताना म्हणाले, “हे माझं “नंदक” खड्ग. कृष्णा, हे सांभाळ.” दुसऱ्या सेवकानं सांभाकळलेलं अंगभर उंचीचं, शिसमाचं, घोटीव, काळं कुळकुळीत मुसल दादाच्चा हाती देत ते म्हणाले, “हे गोपांचं मुसल यादवांचं रक्षण करो! 'सौनंद' नाव आहे याचं. बलरामा, हे तू सांभाळ.” आम्ही स्वीकारलेली शस्त्रं मस्तकी भिडवून तशीच सेवकाकडे दिली. ती तशीच अक्रूरकाकांच्या रथाकडे धाडण्यात आली.

गोपसभेच्या चौकात बैठकीवर बसलेले अक्रूरकाका आमची वाटच बघत होते. पुरा चौक भावव्याकूळ गोपगोपींनी कसा खचाखच टिच्चून भरलेला होता. त्यातील कित्येक तर अक्रूरकाकांच्याकडे तिरस्कारनं बघत आपसात पुटपुटले, “हा कसला अक्रूर? हा तर पूर्ण क्रूरकर्मा दिसतोय! क्रूरांत क्रूर!” वाड्याबाहेरही गोपच गोप दाटले होते. आम्ही सभेच्या चौकात आलो. पुढे अक्रूरकाका, मागे बलरामदादा व मी आणि पाठीमागे आमचं विरहव्याकूळ, अभिरभानूवंशीय सर्व गोपकुटुंब असे मुखियावाड्याबाहेर निघालो.

तसे चौफेर दबलेले, कोंदलेले, हुंदकेच हुंदके कानी पडू लागले.

आम्ही मुखियावाड्याच्या बाहेर आलो. मी मागे वळून अभिरभानूंच्या त्या पुरातन वास्तूचं डोळाभरून दर्शन घेतलं. त्याला दोन्ही हात जोडून ते कपाळाशी भिडवत नम्र वंदन केलं.

यमुनेकडे जायला वळलो. समोरच ती उभी होती! – माझी प्रिय गोपसखी राधा! राधा – मोक्षासाठी तळमळणारा जीव! तटस्थ मूर्तीसारखी उभी होती ती. मूर्तीलाच पाझर फुटावा, तसे तिचे डोळो क्षणात एकलग अविरत नुसते पाझरू लागले. ते मात्र आज हरवल्यासारखे निर्भाव वाटत होते. आणि होय, तिच्या पाठीमागे आज तिचा पतीही होता – रायाण. तोही हुंदकणारा, समूळ पिळवटलेला.

मी खेचल्यासारखा, मूर्तीसारख्या तटस्थ असलेल्या राधेसमोर उभा ठाकलो. छातीवरची वैजयंती किंचित उचलून तिला म्हणालो, "तुझी ही भावभेट विसरणार नाही मी – कधीच राधे! मीही तुला आज एक भावभेट देणार आहे. तू ती कधीच विसरू शकणार नाहीस! घे." म्हणत मी शेल्यातली अवध्या गोकुळाचा व वृंदावनाचा आसमंत निनादून सोडणारी माझी प्राणप्रिय मुरली खेचून तिच्यासमोर धरली. ती हाती घेऊन तशीच ओठांना टेकवताना आता मात्र ती उभ्या देही गदगदली! ती, 'कन्हैया, कन्हैया' म्हणत गुदमरून हमसत असतानाच रायाणाचे खांदे थोपटून मी झटकन पुढंच सरसावलोही. स्फुंदत आक्रोशत पायांवर पडणाऱ्या गोप-गोपींची कड्यांमागून कडी तोडत आम्ही अक्रूरकाकांच्या मागोमाग झपाट्यानं यमुनेकडे चाललो. आता मात्र सैरभैर झालेला लहानथोर गोप स्त्री-पुरुषांचा लोंढाच लोंढा "कृष्णाऽ, रामाऽ, कन्हैयाऽ, बलरामाऽ, गोपालाऽ, संकर्षणाऽ, नका रे जाऊ तुम्ही गोकूळ सोडून, आम्हाला त्यागून! आता गेलात की, पुन्हा म्हणून कधी, कधीच नाही दिसायचे आम्हाला तुम्ही! लाडक्यांनो, नका रे असे कठोर होऊ, कृष्णाऽ, बलरामाऽऽ नका – नका की रे जाऊ, " असं आक्रोशत आमच्या पाठीमागून फरफटत येऊ लागला.

गोकुळाला उलटा फेर टाकून आम्ही पश्चिम द्वाराबाहेर आलो. इथं अक्रूरकाकांचा सारथी अश्वदमन हा रथ घेऊन उभाच होता. त्यात प्रथम अक्रूरकाका चढले. मग दादा आणि सर्वांत शेवटी मी आरूढलो. सारथ्यानं आसूड ओढताच रथाचे काळेभोर, सावध घोडे पुढील टाचा उभारून खिंकाळत उधळले. चालला – दोन गोपांचा जीवनरथ यादवांच्या राजनगरीकडे – मथुरेकडे चालला.

मी मागे वळून पाहिलं. गोकुळाच्या पश्चिममेकडील प्रशस्त द्वारात मूर्च्छित पडणाऱ्या थोरलीला – यशोदामातेला – नंदबाबा स्वत:ला सावरत तिलाही सावरत होते. कितीतरी गोपगोपी धाय मोकलून आभाळात हात उडळून वक्ष पिटत आक्रोशत होते. त्यात माझे, आता कितीतरी थोराड झालेले भद्रसेन, रुद्रसेन, श्रीदामा, स्तोककृष्ण, दामन, पेंद्या, वरुथप असे झाडून सारे-सारे सवंगडी होते. माझे आठही काका-काकू, माझी चुलत भावंडं होती. ज्यांच्याशी माझी काहीना काही आठवण गुंफली होती, असे सर्व अठरापगड गोप स्त्री-पुरुष होते. आज सकाळपासूनच माझी मुरली ऐकायला न मिळाल्यानं सैरभैर झालेले कितीतरी गोधनातील अश्राप जीव कसेतरीच हंबरत त्यांच्याभोवती घुटमळताना मला स्पष्ट दिसत होते. तेही आज कधी नव्हे ते अश्रू ढाळत होते. रथ यमुनेकडे दिडक्या चालीनं धावतच होता. कितीतरी गोष्टी मागे टाकत! बघणाऱ्यालाच दिसू शकलं असतं की, वंशचिन्ह असलेले लाकडीद्वारावर खोदलेले

टक्करीच्या पवित्र्यातले पुष्ट खोंडही आज द्वार मिटताच एकमेकांच्या मानेवर मान टाकून अश्रू ढाळण्याच्याच तयारीत होते!

आता मात्र मी निर्धारानं पाठ फिरवली. गोकूळ मागे पडत चाललं. वृंदावन, मधुवन, गोवर्धन सर्वच तर त्याहून मागंच राहिलं होतं, आजोबा, बाबा, दोन्ही आया, चुलतभावंडांसह मुखियावाडा मागे पडला. गोधनासह गोपाल मागे राहिले. होय, माझ्यातला गोपांचा नायक मुरलीधर, श्याम, मोहन, गोविंद, दामोदर, गोपाळ, माधव, मिलिंद मागे राहिला. यादवांचा नायक 'कृष्ण' आता प्रत्यक्ष जीवनाच्या रासमंडळात उतरणार होता.

शूरसेन राज्याची राजनगरी असलेल्या मथूरेच्या भूमीवर अक्रूरकाकांना पुढे ठेवून दादासह मी पाय ठेवला! यमुनेच्या या किनाऱ्यावर हाती गेंदेदार, शेंदरी कदंब फुलांची ताजी, टवटवीत भरगच्च माला हाती घेऊन केवळ एकच एक यादव माझ्या स्वागतभेटीसाठी आला होता. माझ्याहून थोडा लहान वयाचा होता तो. मला बघताच पायीची वाळवंटी बाळू चराचर तुडवत तो खेचल्यासारखा आवेगानं धावतच पुढे आला. फुलत्या डोळ्यांनी माझ्या गळ्यात हातची कदंबमाला त्यानं चढवली. चक्क वाळूतच गुडघे टेकवून माझ्या पायांवर आपलं मस्तक नम्र भक्तिभावानं ठेवताना तो केवढातरी भावभर पुटपुटला, "दाऽदा, ओळखलंस काय रे, तुझ्या या छोटया भावाला?" मी त्याच्या दोन्ही दंडांना, धरून त्याला प्रेमभरानं वर घेतलं. मी त्याच्या प्रेमळ, नितळ डोळ्यांत खोलवर बघत असतानाच अक्रूरकाका उद्गारले, "कृष्णा, हा उद्धव! वसुदेवबंधू देवभाग आणि देवी कंसेचा पुत्र! याला चित्रकेतू आणि बृहद्बल असे आणखी दोन बंधूही आहेत. तुझा चुलत बंधू!" माझी आणि त्याची डोळाभेटीतच पूर्ण ओळख पटली होती. जन्मजन्मांतरीची! उत् धव म्हणजे पवित्र यज्ञाग्नी – सदैव वर-वर जाणारी जीवज्योत!

'उद्धवाऽ! उधोऽ!! प्रिय बंधो!!!' म्हणत मी त्याला वक्षाशी घट्ट-घट्ट बिलगतं घेतल. यापुढचं जीवन या उधोशी कधीच सांगता येणार नाही, अशा भावबंधांनी रमणार होतं! उद्धव तर माझ्या भावजीवनाचा 'भावविश्वस्त'च होणार होता. त्याला संगती घेऊन मी व दादा यमुनेची बाळू तुडवू लागलो. आमच्या प्रत्येक पावलावर अज्ञाताचं वाळवंट चरचरू लागलं!

धनुर्यागाच्या सजत्या प्राकारात आज पायीच जाण्याचा निर्णय मी केव्हाच घेतला होता. काही एक आडाखा बांधून-ठरवून! मध्येच एका निर्धारी विचारानं मी थांबलो. उद्धवाच्या खांद्यावर हलकेच हात चढवून तो थोपटत म्हणालो, "उद्धवा, तू माझं एक काम करशील? तुझ्याशिवाय अन्य कुणीच त्याला योग्य नाही. तू असाच नौकेतून गोकुळाला जा. माझ्यासाठी विरहव्याकूळ झालेल्या यशोदा व रोहिणीमातेची व सर्व गोपगोपिकांची समजूत घाल. मी केलं असतं, तसंच राधेचं नि एकेचं सांत्वन कर."

आनंदभरल्या चर्येनं आणि फुलत्या डोळ्यांनी उद्धवानं क्षणैक माझ्याकडे बघितलं. तो पटकन म्हणाला, "जशी तुझी इच्छा!"

मी त्याला खांदाभेट दिली. नौकेकडे जाताना मात्र त्याचे पाय काहीसे अडखळले. तो आनंदला होता, मी त्याच्यावर पहिल्याच भेटीत विश्वासानं महत्त्वाची कामगिरी सोपवली म्हणून. त्याचे पाय अडखळले होते, ते मात्र माझ्या चिंतेनं! नुकतंच तर मी

त्याच्या डोळ्यांत माझ्यावरचं नितळ, निरपेक्ष प्रेम स्वच्छ बघितलं होतं,

लवकरच यादवांची राजनगरी मधुपुरी – मथुरा दृष्टीच्या टप्प्यात आली. मथुरेतील मंदिरांची गोपुरं व राजवास्तूंचे आभाळात घुसलेले सुघड कळस दिसू लागले. सीमा पार करताच आम्हाला पहिलीच सामोरी आली ती फुलांची व्यापारपेठ. नाना रंगांच्या फुलांचे हार आणि उंचच उंच विविधरंगी पुष्पमालांनी सजलेली विकानंच विकानं दिसू लागली. पुष्पमालांवर घोंगावणाऱ्या मधमाश्या गुंजारव करीत इशंही निर्भयपणे मध शोधत होत्या. तो पुष्पानंद घेत आम्ही चाललो होतो. 'गुणक' नावाच्या फुल व्यापाऱ्यानं पुढे होत आम्हाला कितीतरी फुलमाळा व फुलं अर्पण केली.

जशी अक्रूरकाका आल्याची वार्ता गोकुळात पसरली होती. तशीच 'गोकुळचे कृष्ण-बलराम मथुरेत आलेत,' ही वार्ताही मथुरेत हां-हां म्हणता वादळी वाऱ्यासारखी पसरली. हातात खड्गं, भाले, परशु, मुसल, गदा अशी मिळतील ती शस्त्रं हाती पेललेले हजारो तरुण वीर यादव निघाले. त्यांना आवरणं आता अक्रूरकाकांना शक्यच नव्हतं. मी व दादा त्यांना मुळीच आवरणार नव्हतो, तसं आमचं रात्री गोकुळांतच ठरलं होतं!

हां-हां म्हणता भरतीच्या समुद्रासारखा गर्जत्या मथुराकर यादव वीरांचा लोंढाच लोंढा आमचा पाठीशी उभा ठाकला. वर्षानुवर्षं कंसाच्या अनिर्बंध अन्यायी वरवंटयाखाली निर्दयपणे रगडले गेलेले ते अश्राप जीव होते. काल एका रात्रीत मी जे अनुभवलं होतं, ते त्यांनी आयुष्यभर सोसलं होतं, त्यांचा गुदमरलेला संताप आज उफाळला होता. अनावर झाला होता. शेकडो, हजारो कोंदटलेले संतप्त यादव कंठनाळ फोडून गर्जू लागले, "कृष्ण, बलरामऽऽ जयतु-जयतु!"

आता आमची पहिलीच मथुरायात्रा गल्लीबोळ पार करून मथुरेच्या प्रशस्त राजमार्गावर आली. मी आणि दादानं मागे वळून बघितलं. दृष्टी ठरणार नाही, असे कुंकुमानं माखलेले निर्धारी, धुंद यादव वीरच वीर आमच्या मागून गर्जत पुढे सरकत होते; समुद्रासारखे! मस्तकं कुंकुमानं माखल्यामुळे त्यांच्या रूपानं रक्तवर्णी लाटाच लाटा, जशा काही वावटळीसारख्या पुढे सरकत होत्या. एव्हाना आम्ही दोघे तर कुंकुमात पुरते न्हाऊन निघालो होतो. आमचे देह – देह दिसत नव्हते. दिसत होते केवळ रक्तवर्णी दोन कुंकुमदंडच!

गोकूळ सोडतानाच माझा आणि दादाचा ऊर, एका निर्धारी आत्मविश्वासानं ठासून भरून गेला होता. या क्षणाला तर मागच्या गर्जत्या, धुंद हजारो यादवांचा कल्लोळ बघून तो गगनभेदी झाला होता. आम्हा दोघांचीही शरीरं मोरपिसांसारखी हलकी झाली होती. मनात ठासून भरली होती, ती केवळ निर्भयता! अदम्य, अशरण निर्धार!

आम्हाला तोंडावर ठेवून उफाळलेल्या यादवांचा सागर कंसाच्या अन्यायी केंद्राच्या गड्डयावर – राजवास्तूवर रोंरावत आदळला!! मी आणि दादा त्वेषानं धनुर्यागाच्या प्राकारात घुसलो. तोच 'महामात्र' नावाच्या माहुतानं अंकुशाची वर्मी टोच दिलेला, पहाटेपासून मैरेयक मद्याचे हंडे पाजून अनावर धुंद केलेला, एक केवढातरी धिप्पाड मदमत्त हत्ती आमच्या अंगावर चीत्कारत अचानकच चालून आला. 'कुवलयापीड'नाव होतं त्याचं. तो चिंऽऽ चिंऽऽ असा नुसताच प्रथम कितीतरी भेदक, भयानक चीत्कारला. आमच्यासह कसंतरी करून प्रयासानं आत घुसलेले यादव त्याचे गुंजेसारखे लालेलाल डोळे बघताच थरकले. भेदरून पांगले. मी आणि दादानं गळ्यातल्या कुंकुममंडित पुष्पमाला क्षणात दूर फेकल्या. माझ्या छातीवर राहिली, ती केवळ कुंकुममय वैजयंती!

आम्ही पीतांबराचे व नीलवस्त्राचे बळकट गोपकाष्टे कसून युद्धाचा पवित्रा केव्हा घेतला, तेच कुणालाही समजलं नाही. प्राकारात समोरच्या बाजूला दूरवर उंचशा सिंहासनावर मथुरेचा निर्दय, माजोर, अरेराव राजा कंस – आमचा मामा – बसलेला अस्पष्ट दिसत होता. त्याला घेरून राजमंडल आणि सभेचे मानकरी यादव होते. त्यात त्याचे न्यग्रोध, कंक, शंकु, सुहू, राष्ट्रपाल, सृष्टी, सुनामा आणि तुष्टिमान असे सख्खे आठ बंधू होते. तशाच अंत:पुरी कक्षात अस्ती आणि प्राप्ती या त्यांच्या महाराण्यांसमवेत कंसवती कंका, शुरभू, राष्ट्रपालिका आणि कंसा अशा त्याच्या भगिनीही बसल्या होत्या.

आम्ही हत्तीला पहिलीच चमकदार हूल दिली. तशा टाळ्याच टाळ्या पडल्या. क्षणात दादा त्या वळवळत्या प्रचंड धुडाच्या ताठ व आखूड शेपटाकडे गेला. मी चापल्यानं सोंडेकडे झालो. आमच्या रूपानं दोन विजेचे लोळच जसे काही त्या मद आणि उन्मत्त गजशक्तीला निकराच्या निर्धारानं भिडले. पुष्ट गर्दनीला झटके देऊन सोंड नाचविताना 'चिंऽऽ चिंऽऽ' असे प्राणभेदक अखंड चीत्कार तो गज अविरत काढू लागला. भोवतीचे सर्व थिजून नुसते बघतच राहिले.

आम्ही समोरच्या गजशक्तीचे दोन भाग जसे काही आपापत: नकळतच वाटून घेतले. मी हत्तीच्या सोंडेला चुकवून कितीतरी चपळाईनं त्याच्या पोटाखाली गेलो. दादानं शेपटीचाच दोर करून एका छलांगीतच त्याच्या पाठीवर क्षणात झेप घेतली. डोळ्यांच पातं लवायच्या आतच त्यानं त्या धुडाचं मदरसानं पाझरतं गंडस्थळ गाठलंही. हत्तीच्या चालनियंत्रक माहुतालाच तो भिडला. बलदंड दादानं त्याच्याशी झोंबी करून क्षणात त्याला अंकुशासह उचलून सरल खाली फेकून दिलं!

मी त्या धडाच्या पुढच्या पायांच्या फटीतून सुटून हत्तीच्या सोंडेसमोरच उभा ठाकू लागलो. त्याच्या धुंद, लालेलाल डोळ्यांत डोळे रोवून तो कशी हालचाल करणार, याचा अचूक माग घेऊ लागलो. त्याला चपळ हुली देऊ लागलो. आव्हान देत चेतवू लागलो. आता हत्तीवर आमचं पूर्ण नियंत्रण आलं. एव्हाना खाली उतरून दादानं जमिनीवर पडलेला अंकुश उचलला होता. भेदरलेला माहूत कुठंतरी दूर पळून गेल्यानं दिसेनासा झाला होता. पाठीमागून अंकुशाची सतत टोच हत्तीला देऊन गरगर फिरणारा चक्रवत दादा आणि पुढून त्याच्या सोंडेत न सापडता, हूल देत त्याला नुसताच गरगर फिरवणारा चक्री मी, असा गोल आवर्तांचा दृष्टी ठरणार नाही, असा गतिमान, थरारक खेळ घटकाभर चालला. हा तर मल्लविद्येतील 'अभ्याकर्ष' हा आमचा अत्यंत आवडता डाव होता. प्राणकाकांनी घोटळून घेतलेला.

आता हत्तीला कळेना, कुठं फिरावं, कुठं वळावं. गोल गरगर फिरल्यामुळं हत्तीला मैरेयक मद्य अधिकच भिनलं. मद्य आणि गिरक्या यांनी चक्रावलेला, भोवंडलेला हत्ती आस्ते-आस्ते भेलकांडला. कोसळला! भयानक फुसफुसू लागला. त्यामुले त्याच्या सोंडेशी पायबंदीवर घुळलोट उडू लागले. मी झटकन त्याच्या सोंडेशी होत, त्याचा हातभर लांबीचा शुभ्र, वक्र उजवा दात, 'जय इऽऽडा माऽता' गर्जत विजेसारखा एका झटक्यातच मुळातून निखळून काढला. तशी रक्ताची चिळकांडीच चिळकांडी फवारली. आजोबांनी भरलेलं माझ्या हातातील चंदेरी कडं, उडालेल्या गजरक्ताच्या चिळकांडीत अंगभर न्हाऊन निघालं, माझं कुंकुममय पीतांबर त्या गजरक्तात चिंब झालं. हातच्या दंतशस्त्राचेच टोकदार, तीक्ष्ण प्रहारच प्रहार मी त्याच्या स्त्रवणाऱ्या, मदोन्मत्त

गंडस्थळात सपासप उतरविले. दादानं एव्हाना त्याच्या शरीरावर अंकुशाची टोच नाही, अशी बोटभरही जागा ठेवली नव्हती. आम्ही दोघंही घाम आणि रक्तानं पुरेपूर निथळून निघालो होतो.

कंसानं घातलेल्या पहिल्या मारेकऱ्यानं मदोन्मत्त राजहत्तीनं – कुवलयापीडानं चारीही पाय ताणत, अविरत फुसफुसून एकदाचे प्राण सोडले! एक प्रचंड शक्तिकेंद्र निस्त्राण झालं. दबलेल्या, थिजलेल्या भोवतीच्या यादवांनी आता डुर्यांची पागोटी हवेत उडवत, अनावर टाळ्याच टाळ्यांचा अविरत गजर करत निर्भयतेनं उत्स्फूर्त घोषणा ठोकल्या 'कुवलयापीड पडला, कुवलयापीड पडला! साधुऽऽ साधुऽऽ; कृष्ण-बलराम जयतु! जयतु!!' त्या रोमहर्षक घोषणा ऐकून बाहेर थांबलेले आता अनावर झालेले यादव रेटारेटी करत, घोष देत राजवास्तूच्या भव्य महाद्वारातून पाणमुसांड्यासारखे थेट आत घुसले.

दूरवर राजवेदीजवळ मथुरेचा राजा कंस आता आसनावरून तडक उठून उभा राहिला. संतापानं तो नुसता अंगभर कसा थरथर कापत होता. त्याच्या जाड भुवया चमत्कारिक आक्रसून कशातरीच वक्र झाल्या होत्या. डोळे नुसते आगच आग ओकत होते. तो केवढ्यातरी मोठ्या भेदक राजगर्वानं कडाडला, ऽऽअमाऽऽत्य! धनुर्यागासाठी पाचारण करा त्या गावंढळ गवळटांना! घ्या मंडलात."

त्याच्या वेदीसमोरच किकराच्या खांबांना दोरखंडांनी आवळलेल्या कुंपणात लालमातीचा प्रशस्त आखाडा होता. त्यात मधोमधच एका वेलबुट्टीच्या तलम आस्तरणावर पुष्पमालांनी मंडित धनुष्य होतं.

कंसाचा अमात्य विमृथू आमच्याजवळ आला. तो आदेश देतच कडाडला, "चला, धनुर्विद्येचं कौशल्य दाखवा आता!" मी व बलरामदादा दंड थोपटतच आखाड्यात उतरलो.

दादा भोळा होता. जवळ जाऊन तो यागासाठी मांडलेलं धनुष्य खरोखरच निरसू लागला! मी मात्र त्याच्या शेजारी जाऊन चौफेर दृष्टी फिरवत सावधचित्त उभाच राहिलो. मला माहीत होतं, धनुर्याग ही फसवी चाल होती. इतक्यात कुठूनतरी दणादण दंड थोपटल्याचे आवाज उठलेच. पाठोपाठ कासा कसलेले दोन केवढेतरी धिप्पाड व पिळदार राजमल्ल आखाड्यात उतरलेही.

त्यातील एक होता चाणूर, दुसरा होता मुष्टिक! त्यांनी पुन्हा दणादण शड्डू ठोकले. 'मथुराधिपती अजिंक्य मल्लवीर कंस महाराऽऽज जयऽतु! जयऽऽतु!!' अशा दोन्ही हात ऊंचावून नाचतच आरोळ्या ठोकल्या. त्यांच्या नुसत्या दर्शनानंच सर्वत्र भेदक भयंका पसरली.

आता दादाही सावरला होता. त्यातील चाणुरानं मध्ये ठेवलेलं आस्तरण धनुष्यासह सरळ उचललं. माझ्याकडे कितीतरी तिरस्कारनं बघत, केवढंतरी विक्राळ हसत त्यानं ते आखाड्याबाहेर चक्क फेकूनही दिलं! आमच्या अंगावर मूठमूठ माती उधळत, चाणुर मला भिडला आणि मुष्टिक दादाला लगटला. योजनापूर्वक मंडपात पेरलेले न दिसतीलसे मांडलेले भव्य राजनगारे आता एकदमच धडधडू लागले. भयकातर कल्लोळच कल्लोळ कोंदला.

चाणुरानं कानशिलाजवळ दिलेल्या पहिल्याच तडाख्यात माझ्या डोळ्यांसमोर ठिणग्याच ठिणग्या उडाल्या! कानांत केलीनंदकाकांचा मल्लवेद, त्याच्या सर्व ऋचांसह

क्षणात फिरून गेला. शब्द घुमले, ‘असाच दशरंगी तडाखा तू प्रतिस्पर्ध्याला जेव्हा देशील, तेव्हाच तू खरा मल्लवीर होशील!’ क्षणार्धांतच फुलत्या निखाऱ्यांवरील लाह्यांसारखे माझे रक्तकण फुलून आले, उधळले!

आता मला समोरचा मल्लही मघाच्या हत्तीसारखाच दिसू लागला, एका क्षुल्लक ढिगासारखा! एका अपार तेजाचं वलय माझ्या अंगभर क्षणात फिरून गेलं, समोरच्या मल्लाला समजेना मी समोर आहे; पाठीशी की डाव्या हाताला! कानशिलावर थपडा देतोय की पाठीत गुद्दे घालतोय. एवढ्याशा पहारीनं केवढातरी पाषाण क्षणात उलटून लावावा; तसे कधी आकडीचे, कधी पछाडीचे, कधी छडी टांगेचे डाव टाकून मी त्याला झपाझप आदळत घायाळ-घायाळ करून टाकलं. शेवटी तो जमिनीवर पालथा पडला असताना त्याच्या पुष्ट मानेवर गुडघा ठेवून त्याचा खरपूस रगडा काढला. प्रतिस्पर्धी धापावला तसा मी ठेवणीतला बाहुकंटक बाहेर काढला. त्याचा प्राणांतिक चाप मी दातओठ खात त्याच्या कंठावर आवळला. जीभ बाहेर काढून डोळे गरगरा फिरवत, रक्त ओकओकून टाचा घासत चाण्ह सुटण्यासाठी प्राणांतिक धडपडू लागला. मी त्याला तशी संधी देणारच नव्हतो. हा मल्लविद्येतील प्राणघातक, अंतिम डावपेच होता – बाहुकंटक! बाहुकंटक म्हणजे प्रतिस्पर्ध्याच्या कंठाभोवती करकचून आवललेला प्रत्यक्ष मृत्यूचा काटेरी चापच!

तो धडपडेल तसा बाहुकंटकाचा चाप त्याच्या कंठाभोवती मी अधिकच घट्ट आवळतच चाललो. तसा टाचा घा-घासून कंसाचा धिप्पाड मल्ल चाणूर मान टाकून गतप्राण झाला. तिकडे दादानंही मुष्टिकाला तसाच प्राणदंड दिला होता.

हर्षोत्फुल्ल झालेले मथुराकर यादव, हवेत उत्तरीतं, पागोटी फेकत, ‘कृष्ण, बलराम, जयतुऽऽ जयतुऽऽ!’ असे अखंड गर्जत आखाड्यात घुसले, तसा राजवेदीजवळ संतापानं थयथयाट करणारा कंस केवढ्यातरी मोठ्यानं कडाडला. “बघता काय? अमात्यऽऽ सेनापतीऽऽ अनाधृष्टीऽ, तोशलकाला, कूटाला सोडा त्या गवळटांवर! शल, कौशलाला धाडा त्यांच्यावर.” त्याचा बंधू सुनामा त्याला धीर देत मध्येच म्हणाला, “मी घेतो समाचार त्या थोरल्या गवळ्याचा.”

क्षणातच एकीकडून तोशलक, कूट मला आणि दुसरीकडून सुनामा, शल, आणि कौशल, दादाला भिडण्यासाठी आखाड्यात उतरलेही! शस्त्रधारी सेवकांनी मथुराकरांना बाहेर हाकललं. दणादण शड्डू ठोकत आता मल्लांनी प्राकार कसा थरकावून सोडला. क्षणात ते आम्हाला भिडलेच. राजसेवकांनी चाणूर आणि मुष्टिक यांचे मृतदेह उचलून आखाड्याबाहेर केव्हाच नेले होते.

आम्हाला श्वास घ्यायलाही उसंत न देता, नव्या कसाचे पुन्हा दोन धिप्पाड शत्रुमल्ल एकदमच आम्हांवर कोसळले. मला तोशलक आणि कूट, दादाला सुनामा आणि शल, कौशल – एकदमच भिडले.

तोशलक व कूट या धिप्पाड मल्लांसमोर मी म्हणजे गोवर्धनाच्या जोडशिखरांसमोर एक नगण्य टेकडी होतो. दादाला भिडलेला सुनामा हा तर कंसाचा प्रिय राजमल्ल बंधूच होता. त्याला दुहाती जोड होती – शल, कौशलांची! आम्हा दोघांनाही मात्र समोरच्यांचं मोठेपण आणि संख्या कसली ती जाणवतच नव्हती! आम्ही मानवी देह नव्हतोच. झालो होतो गगनस्पर्शी चैतन्यज्योती!

आता तोशलक, कूटाशी माझं मस्तक आळीपाळीनं भिडलं. प्रथेची लाल माती

देताच त्यांच्या भरगच्च, पुष्ट मानांना माझ्या पंजाचा वज्रपिळा आलटून-पालटून पडू लागला. कितीतरी चपळाईनं अमाप गतीनं. दादाही तसाच त्या तिघांशी एकटाच निकरानं झुंजू लागला.

डोळ्यांत प्राण आणून आमच्या प्रत्येक बारीकसारीक हालचालींकडे एकटक बघत होता, तो एकमेव जीव. राजवेदीवरचा यादवांचा मदोन्मत्त राजा – माझा मामा – अरेराव कंस!

मी आणि दादा आता घामानं निथळलो तरी आमच्या चमकदार हालचालींत लवभरही त्रुटी आली नव्हती. घामाच्या निसरडेपणाचाही प्रतिस्पर्ध्यांना सटासट चकवून तोंडघशी पाडण्यासाठी आम्ही कुशल लाभ उठवू लागलो. एवढे मोठे धिप्पाड तोशलक व सुनामा आणि त्यांचे साथीदार हूलभरल्या चपळ चकव्यांमुळे मात्र धडाधड कोसळले. ते बघून आनंदाच्या उकळ्या फुटणारे यादव, 'घे त्या नराधमाला मांडाखाली, सोडू नको.' असे उत्स्फूर्तपणेच गर्जू लागले.

आमची ही अंतिम अटीतटीची झटापट चांगली घटकाभर घुमली. शेवटी मी तोशलक व कूटाला आणि दादानं सुनाम्याला व शल, कौशलाला मल्लवेदाची निर्वाणीची बाहुकंटाची मात्रा भिडवली! एक-एक करत पाचांनाही आम्ही निपटलं!

आता मात्र धनुर्यागाचा मंडप उडून जाईल अशा यादवांच्या कंठाकंठातून निघालेल्या विजयोन्मादाच्या गगनभेदी अखंड घोषणाच घोषणा तडतडू लागल्या, 'कृष्ण, राम जऽयऽतु, जऽयऽतु, राम, कृष्ण जऽऽयऽऽतु – जऽऽयऽऽतु.' कुणीतरी त्यात उत्तेजक घोषणा सोडून दिली, 'नराधम, अन्यायी कंसाचाऽऽ – धिक्कार असो! धिक्कार असो!'

एव्हाना आखाड्याच्या लक्कडकोटावरून मी तडक उडीच घेतली. शूरसेन राज्याचा सर्वाधिकारी राजा म्हणवून घेणाऱ्या बलदर्पी, मदोन्मत कंसाच्या थेट अन्यायी राजवेदीसमोरच ताठ उभा ठाकलो!!

राजवेदीसमोर थरथरत असलेल्या केवढ्यातरी उंच, धिप्पाड अशा माझ्या कंसमामाला माझे पापच्छेदक, खलदाहक, असत्यभेदक डोळे थेट भिडले! या डोळ्यांनी जाणलं; त्या डोळ्यांआड काय लपलं आहे ते! त्या डोळ्यांना समजून चुकलं; कसला क्षण अवतरलाय ते! तो थरथरत होता – आता मात्र संतापानं मुळीच नव्हे तर – प्राणभयानं! हा – हाच तो क्षण होता – अन्यायाला समूळ निखंदण्याचा! हा, हाच क्षण!! हाच तो क्षण होता – कोंदलेल्या, दबलेल्या असंख्य जिवांना मुक्त श्वास देण्याचा!

एक गगनदत्त आणि मलाच पूर्णत: अभिनव असा माझा जीवनघोष मलाच स्पष्ट ऐकू येऊ लागला, 'कृष्णाऽ! हो पुढं, सरसाव. तुझा जन्मच यासाठी झाला आहे. अन्यायाला पायांखाली चिरडण्यासाठी! गुदमरलेल्या न्यायाला खांद्यावर घेण्यासाठी. लक्षात ठेव, वाढ व विकास ही आणि हीच जीवनाची लक्षणं आहेत! उखडून टाक समूळ हा त्या जीवनगंगेच्या विकसनातील तुंबा!

'रक्ताची नाती मुळीच ध्यानी घेऊन चालणार नाही या क्षणी तुला. जिवाजिवांची आकाशनाती. त्यांच्याशी जन्मानं आलेलं कर्तव्य कधीच विसरून चालणार नाही तुला. तू कुणाचा भाचा नाहीस, कुणी तुझा मामा नाही, कंसाचा तर तू कुणी-कुणीच नाहीस! अधर्माचं निखंदन आणि सत्यधर्माचं उत्थान हे आणि हेच तुझं जीवितकार्य आहे!'

राजवेदीसमोर यदुवंशाचं, शूरसेन राज्याचं घोर असत्य – मूर्तिमंत धिप्पाड पाप

प्राणभयानं थरथरत उभं होतं.

प्रचंड आत्मविश्वासानं मन आणि अमोघ आकाशी सामर्थ्यानं भरलेला पाठकणा घेऊन मी समोरच्या राजवेदीवरच्या पायदंडया झपाझप मागे टाकल्या. एका झेपेत थेट कंसालाच भिडलो. डोळे कितीतरी मोठे विस्फारून तो माझ्याकडे भेदरून नुसता बघतच राहिला – गलितगात्र. निष्प्रभ. हतप्रभ. क्षणात त्याच्या हाताला मी एक वीजझटका देताच तो पायदंडयांवरून गडगडत समोरच्या वेलबुट्टीच्या पायबंदीवर उताणा कोसळला. त्याचा तो उन्मत्त सोनेरी मुकुट घरंगळत, ठणठणत कुठंतरीच फेकला गेला. त्याचे राठ, दाट केश अस्ताव्यस्त विसकटले.

माझ्या सहा नवजात बंधूंना मस्तकाहून उंच उचलून शिळेवर आपटणारे त्याचे निर्दय, निर्मम, बलशाली केशाळ बाहू आज असे निर्बल का झाले? कारण स्पष्ट होतं. बलशाली पापही जेव्हा मृत्युच्या दारात उभं राहतं तेव्हा ते असंच निर्बल होतं! आपोआपच नि:सत्त्व होतं ते!

राजवेदीवरच्या पायदंडीवरून पुन्हा विजेची झेप घेऊन मी त्याच्या उन्मत्त, पुष्ट वक्षावर आरूढ झालो. चित्यानं कुवलयापीडाच्या धन्याचं गंडस्थळ गाठलं! त्याचे दाट, राठ केश डाव्या मुठीत घट्ट पकडले. त्याची मदोन्मत्त मान वर उचलून मी ती पायदंडीवर साताठ वेळा थडाथड आदळली. पाठोपाठ उजव्या चंदेरी कडेधारी वज्रमुठीचा केवढातरी जोरदार भक्कम प्रहार त्याच्या उन्मत्त वक्षावर, "घे, यादवांच्या कुलघातक्या" म्हणत डोळे विस्फारीत उतरविला!

मग हीच क्रिया अखंड सुरू झाली. डाव्या मुठीत त्याचं गर्वोन्मत मस्तक, त्याची राठ केशावळ पकडत थडाथड आदलण्याची, पाठोपाठ कडेधारी उजव्या हाताच्या वज्रमुष्टीचे बळकट प्रहारांमागून प्रहार त्या गर्वोद्धत वक्षावर उतरविण्याची. प्रत्येक प्रहाराबरोबर माझ्या तोंडून आपोआपच बोल निघू लागले, "हा पहिल्या बंधूच्या वधाचा – जैऽ इडामाता – हा दुसऱ्याच्या – हा तिसऱ्याच्या – जै देवकीमाता – हा माझ्या मातेच्या निर्घृण छळवादाचा – हा पित्याच्या घनघोर अवमानाचा – हा तू यादवांची कुळं मथुरेलतून देशोधडीस धाडलीस त्याचा. जैऽ जैऽ इडामैय्या!" प्रहारांवर प्रहार – बळकट वज्रमुष्टीच्या प्रहारागणिक वर उफाळणारं अन्यायी रक्ताचं कारंजं! त्यात चिंब भिजणारं माझं पीतांबर! विदीर्ण, उद्ध्वस्त होणारं, उन्मत्त, असहाय वक्ष!

भोवतीचे विजयोन्मादानं वेडावून गेलेले अठरा कुलीन मथूराकर यादवच यादव 'हा पहिला, हा दुसरा' असं म्हणत, माझ्या जागी तेच जसे काही कंसाच्या उरावर बसलेत असे हवेतच आवेशी प्रहार करीत प्रोत्साहनपर लयीत गर्जू लागले! जसा मी नव्हेच – तेच मथुरेच्या अन्यायी राजाच्या उरावर बसून त्याचा वध करीत होते!

कंस थडाथड टाचा झाडून, तळमळत मला वक्षावरून दूर फेकण्याचा आटोकाट यत्न करीत होता. माझी जंघापकड घट्ट होत होती – मगरीसारखी! मुठीत आणि भुजेत अरोध अवर्णनीय महान सामर्थ्य उतरलं होतं. कपाळ घामानं डबडबलेला कंस जाड भुवया कशातरी वाकडया-तिकडया आक्रसत, रक्त ओकत, टाचा घासघासून गुरगुरत, कण्हत एकदाचा शांत झाला. मथुरेत गेली अनेक वर्षं रोंरावत गर्जणारं एक अन्यायी, क्रूर, भयाण राजवादळ शांत झालं.

प्रथम भेदरलेले, नंतर अनावर क्रोधानं माझ्याच रोखानं धावून येणारे कंक आणि न्यग्रोध असे त्याचे आठ बंधू, दादानं आडवं होत आपल्या अंगावर घेतले. खवळलेल्या

यादवांच्या साहाय्यानं त्यांनाही बंदिवान केलं.

कंस आणि त्याचे सल्लागार यांनी बुद्धिकौशल्यानं आखलेला धनुर्यागाचा, समारोह संपला होता. विजयानं आणि प्रेमानं उचंबळणाऱ्या यादवांनी आनंदातिरेकानं मला आणि दादाला उचलून खांद्यावरच घेतल. कंठ मोकळे सोडत, हातवारे करत त्यांनी गगनापार अनावर ललकाऱ्याच ललकाऱ्या घुमविल्या. "यादवराज कृष्ण-बलरामऽऽ जयतुऽऽऽऽ जयतुऽऽ" आनंदान गर्जत त्यांनी आम्हाला राजवेदीजवळ नेऊन उभं केलं. मी दोन्ही हात उंचावून यादवांना उद्देशून म्हणालो, "मथुरेच्या माझ्या प्रिय यादव बांधवहो! शांत व्हा!" गेले जवळ-जवळ तीन घटिका चाललेला घोषणा, आरोळ्यांचा घोषयज्ञ क्षणार्धात शांत झाला. या क्षणाला माझी मलाच तीव्रपणे सखोल जाणीव झाली की, आपल्या कंठात एक आकाशदत्त, प्रणवाचा अधिकार सांगणारा, अजोड स्वर सुप्तपणे पहुडला आहे! तो प्रकटताच शेकडो-हजारोंना क्षणातच स्तब्धपणे ऐकणंच भाग पडतं. मला माझा जीवनसूर गवसला!

राजवेदीजवळ दादाच्या उजव्या हाताशी राहून चौफेर दृष्टी फेकत मी संथपणे म्हणालो, "आजपासून मथुरा 'कंसमुक्त' झाली आहे. स्वतंत्र झाली आहे! निजतंत्र झाली आहे. शूरसेन राज्य मुक्त झालंय. तुम्हा सर्वांचं पाठबळ लाभलं, तर आणखी बरचसं काही मुक्त होणार आहे! तुम्हा सर्वांच्या आशीर्वादानं असाच माझ्या माता-पित्यांच्या वाड्यात जाऊन प्रथम त्यांना त्यांच्या वर्षानुवर्षांच्या बंदिवासातून मी मुक्त करणार आहे. कारागृहात जाऊन आपल्या उग्रसेन महाराजांची आणि पद्मावती महाराणींची सुटका करणार आहे.

"नगरजनहो! ठाम विश्वास बाळगा, मथुरेच्या या राजसिंहासनावर आपले उग्रसेन महाराजच पुन्हा आरूढ होतील – इथले अमात्य जे कोणी असतील, त्यांनी सत्वर माझ्यासमोर यावं."

माझ्या निर्धारी बोलांनी भोवतीच्या यादवांत कुजबुज माजली. सर्वांनी वाट करून देत एका मध्यमवयस्क, गोल चर्येच्या तरतरीत नाकाच्या, दाढीधारी, भरगच्च शरीरयष्टीच्या गव्हाळ यादवश्रेष्ठाला पुढे केलं.

हात जोडून भयानं थरथरतच ते माझ्यासमोर आले. कंसराजाला त्याच्या कारभारात सहकार्य केल्यामुळे मी प्राणदंडाचीच शिक्षा करणार, या आशंकेनं ते भयकातर झाले होते.

"नाव काय तुमचं?" मी त्यांना विचारलं.

"विऽऽऽऽ विपृथू!" ते भेदरत त्रोटक पुटपुटले.

"घाबरू नका अमात्य. मी तुम्हाला कसलीही शिक्षा करणार नाही. शांत असा. तुमचा कसलाच दोष नाही. तुम्ही केवळ आज्ञापालक आणि राज्यपोषक आहात. अमात्यानं सदैव असंच असायला हवं. या क्षणापासून नीट ध्यानी घ्या. इथलं कंसराज्य संपुष्टात आलं आहे. लवकरच उग्रसेन महाराजांचं, यादव नायकांचं, लोककल्याणी राज्य सुरू होईल. त्यासाठी त्यांच्या शास्त्रयुक्त राज्याभिषेकाची व्यवस्था करा."

भेदरलेले विपृथू माझ्या अकल्पित अभयाचं अवसान घेत सावरले. म्हणाले, "जशी यादवश्रेष्ठांची आज्ञा! आपण मला अभय देऊन जीवनदान केलंत, हे मी कधीच विसरणार नाही! आणखी काही आदेश असल्यास व्हावेत!"

"अमात्य, भयानं परिवारांसह परागंदा झालेल्या वृष्णी, अंधक, भोज, दाशार्ह, कुकुर, सात्वत अशा अठराही यादवकुलांतील पौर आणि जनपदजनांना सन्मानपूर्वक पुन्हा सत्वर मथुरेत पाचारण करा. त्यांचं पुनर्वसन करा. कंसानं बलात अपहरण केलेली त्यांची संपत्ती आणि भूक्षेत्रं काटेकोर सूची करून ज्याची त्याला परत करा!"

"जशी आर्याज्ञा." अमात्य उत्तरले.

"विपृथू, यापुढे मला तुमचं ठायीठायी खूपच सहकार्य लागणार आहे. आजच पुरोहितांना सांगून, आजच्या इथल्या 'धनुर्यागा'त वाया गेलेल्या 'बाणां'चं – तोशलक, मुष्टिक, सुनामा, कूट, चाणूर या सर्वांचं विधिपूर्वक दहन करा. आणि हो, त्यांच्या शेजारीच राजगज कुवलयापीडालाही सविध अग्निदाह द्या.

"यमुनेकाठी तर्पणासह कंसाचं राजविधिपूर्वक चंदनकाष्ठचितेत यथासांग दहन करा. 'मरणांतानि वैराणि' हे आपलं पुरातन ब्रीद आहे. इथल्या सेनापतीचं नाव मला सांगा. त्यांना सत्वर पाचारण करा."

"आज्ञा आर्यांची. यादव सेनापती आहेत अनाधृष्टी. ते आपले काकाच आहेत, " म्हणत अमात्यांनी अनाधृष्टींना हातसंकेतानं राजवेदीकडे बोलावून घेतलं.

पुष्ट, वृषस्कंधी, धिप्पाड, सावळे, उभट चर्येचे अंगी लोहकवच धारण केलेले, दाढीधारी, तरतरीत नाकाचे, निर्भय अनाधृष्टी समोर आले. मी त्यांना विचारलं, "काय म्हणावं तुम्हाला मी – अनाधृष्टीकाका की सेनापती?"

"सर्व यादव 'यादवश्रेष्ठ' असंच म्हणतात. आर्यांनीही तसंच म्हटलेलं आवडेल आम्हाला." सेनापती निर्भयपणे उत्तरले.

"काम मोठं आहे. धैर्याचं तसंच कौशल्याचंही, यादवश्रेष्ठ सेनापती! तुम्ही, कंसपत्नी – आमच्या मामी अस्तीदेवी व प्राप्तीदेवी यांना सशस्त्र अश्वसादांच्या सोबतीनं स्वत: त्यांच्या माहेरी मगध देशात, राजधानी गिरिव्रजाला सुखरूप पोहोचवून यायचं आहे! विधिकार्य उरकताच निघा. पतीनं निर्माण केलेल्या शत्रूंच्या गराड्यात त्या इथं सुरक्षित राहूच शकत नाहीत!"

आता मी क्षणभरही थांबू शकत नव्हतो. कंसाचा धनुर्याग म्हणजे – धनुर्यज्ञ संपला होता. माझा जीवनयज्ञ या क्षणापासूनच सुरू होत होता. त्यात कसलीही त्रुटी पडता कामा नव्हती!

"चल! आपल्या माता-पित्यांना मुक्त करून त्यांचं दर्शन घ्यायचं आहे, " म्हणत मी बलरामदादाचा हात प्रेमानं हाती घेतला. कंसाला निपटून धनुर्यागाच्या प्राकारातून आम्ही चाललो. आमच्या माता-पित्यांच्या राहत्या वाड्याकडे. आमच्या जन्मस्थानाकडे! मी आणि दादानं काहीच आज्ञा केली नाही, तरीही विपृथू, अनाधृष्टी-सात्यकी, अक्रूर, कृतवर्मा, देवभाग, विकद्रू, आहुक, प्रभंजन असे कितीतरी प्रमुख यादव आमच्या मागून आपोआपच चालू लागले.

ती वास्तू आली; जिथं माझा जन्म झाला होता! इथले सर्व पहारेकरी आणि सेवक, सेविका कंसाच्या पतनाची वार्ता ऐकताच केव्हाच कुठच्या कुठं पसार झाले होते! त्या भव्य वाड्यात आता चिटपाखरूही नव्हतं. ज्या कक्षात आमचे माता-पिता होते, तिथं आम्ही आलो. लोहद्वाराला भलं मोठं लोहटाळं लटकत होतं. लोखंडी गजाआड आमचे थकलेले, डोळ्यांतच प्राण एकवटलेले, व्याकूळ माता-पिता होते.

कुणातरी यादवानं पुढं होत गदेच्या एका प्रहारातच आमचं मर्मबंधाचं नातं कोंडणारं ते टाळं तोडलं! मधलं लाकूड, लोखंडाचं भव्य द्वार करकरत संपूर्ण उघडलं. कितीतरी दिवसांनी – वर्षांनी – छे, युगानंतर! मी व बलरामदादा तिला – आमच्या मातेला रुद्ध कंठांनी जाऊन भेटलो! दोघांनाही एकदमच कवेत बिलगतं घेत ती कितीतरी वेळ उभ्या देहीच नुसती गदगद हमसतच थरथरत राहिली! आमची माता – देवकीमाता. दाढीधारी वसुदेवबाबाही आम्हाला उरी भेटताना असेच हमसले. कारागृहाच्या त्या ओसरीनं इतकी माणसं आज पहिल्यानंच बघितली. जसं काही आज पहिल्यानं तेही मुक्त झालं!

आता वसुदेवबाबा, देवकीमाता यांच्यासह आम्ही पाठीशी निवडक यादवांचा मेळ घेत उग्रसेन महाराजांच्या मुक्ततेसाठी प्रमुख कारागृहाकडे निघालो.

जेव्हा आम्ही मथुरेच्या कारागृहात जाऊन यादवांच्या वृद्ध महाराज उग्रसेनांच्या व महाराणी पद्मावतीदेवींच्या पायातल्या लोखंडी शृंखला सैनिकांकरवी तोडल्या, तेव्हा ते वृद्ध जोडपं घळाघळा रडलं. अंधाऱ्या कोठडीत असल्यानं आम्हाला व सोबतच्या यादवांना कोनाड्यातील टेंभ्यांच्या अंधूक प्रकाशात त्यांचे अश्रू नीट दिसूनही आले नाहीत.

मथुराकर प्रजा निर्दयी, अत्याचारी, अरेराव राजा कंसाच्या जाचातून सुटल्यानं जेवढी संतोषली, त्याहून कित्येक वर्षं बंदिवान झाल्यामुळे न दिसलेल्या महाराज उग्रसेन व राजमाता पद्मावतीदेवी यांच्या दर्शनानं आनंदली.

माझ्या कृष्णगीता या जीवनकथेतील पहिलं पर्व संपल होतं – कंसपर्व!

अमात्य विपृथूंनी यादवांचे राजपुरोहित गर्गमुनींशी शास्त्रचर्चा करून शिवमुहूर्त काढला. मथुरेतील यादवांच्या प्रशस्त राजवास्तूत उग्रसेन महाराजांचा शास्त्रयुक्त राज्याभिषेक संपन्न झाला. त्यासाठी जमलेल्या सर्व यादवांनी आग्रह केल्यामुळे उग्रसेनांच्या मस्तकावर आता जलाभिषेकयुक्त, विविध संस्कारांनी पवित्र केलेला, तोच सुवर्णी मुकुट मी पुन्हा चढविला!

सिंहासनावर आरूढ होताच उग्रसेन महारांजानी यादवांच्या भरल्या सभेवर कृतज्ञतेची दृष्टी फिरवून घोषणा केली. म्हणाले "या सिंहासनावर बसण्याचा खरा अधिकार आहे, तो या वसुदेवांच्या पुत्राचा – कृष्णाचा! कसल्याही कारणासाठी त्यानं नकार दिला, तर त्याच्या ज्येष्ठ बंधूचा – बलरामाचा! मला कळत नाही, त्यानं या वृद्धावस्थेत माझ्यावर या शूरसेन राज्याचं मोठं दायित्व पुन्हा का सोपविलं आहे? मी त्याला मुखभर उदंड आशीर्वाद देतो. आता त्यानंच, शूरसेन राज्याच्या राजसभेत फार वर्षांनी एवढ्या संख्येनं प्रथमच एकवटलेल्या अठरा कुळांतील समस्त यादवांना आज योग्य ते मार्गदर्शन करावं."

मी उठून उभा राहिलो. प्रथम उपस्थित लहानथोर यादव डोळ्यांत नीट सामावून घेतले. त्यांच्या हृदयांशी माझ्या हृदयाची एक तार छेडत म्हणालो, "प्रिय यादवबांधवहो! तुम्हाला अनावर झालेला अन्यायी कंस यादवच होता! तरीही मला त्याला वधावं लागलं आहे, तो मामा असूनही! आता सर्वांत मोठं संकट या मथुरेवर कोसळणारं असेल ते कंसाच्या श्वशुराचं – मगधसम्राट जरासंधाचं. आपल्या जामाताच्या वधाची वार्ता ऐकून कधीही स्वस्थ बसणार नाही तो. प्रतिशोधाच्या अग्नीनं

लालेलाल झाला असेल तो एव्हाना!

"त्यानं गिरिव्रजाच्या कारागृहात ऐंशीवर राजे, संकल्पित 'शतराजशीर्ष मेधा' साठी नृपबली म्हणून कोंडले आहेत. भोवतीच्या कितीतरी निर्बल राजांना त्यानं कृतक मैत्रीच्या कवेत केव्हाच घेतलं आहे. कंस गेला हे लक्षात ठेवण्यापेक्षा – जरासंध चालून येणार हे तुम्ही कधीच विसरू नये, असं मला वाटतं! यासाठी उग्रसेन महाराजांचा अनुभव गाठीशी घेऊन तुम्ही सदैव संघटित सिद्ध असावं. त्यांच्या आज्ञेत असावं.

"आपल्या अठराही राजकुलांतील लहानथोर यादव ज्यांची आज्ञा मानतील, असे उग्रसेन महाराज हे एकमेव आदरणीय वृद्ध मला दिसताहेत. म्हणूनच मी त्यांच्यावर हे दायित्व सोपविलं आहे. उष्ण रक्ताने, तत्काळ शस्त्राला हात घालणारे, भडक माथ्याचे यादव एकत्र येणं कठीण. एकत्र नांदणं त्याहून कठीण. यासाठीच तुमचं नेतृत्व करण्याची विनंती मीच अनुभवी उग्रसेन महाराजांना तुमच्याच वतीनं करीत आहे. राजपुरोहित गर्गमुनी यांनी त्यांना आशीर्वाद द्यावा."

मी हसतच किंचित झुकून गर्गमुनींकडे बघितलं. राजपुरोहित उठले. उत्तरीय सावरत म्हणाले, "शूरसेन राज्याच्या समस्त यादवजनहो! मी तुमचा पुरोहित म्हणून महाराज उग्रसेन व महाराणींना मन:पूर्वक आशीर्वाद देऊन, त्याहून मन:पूर्वक सांगतो आहे –

"या वसुदेव पुत्राचं – कृष्णाचं, त्याच्या जन्मसमयी मी गोकुळात जातक घोषित केलं होतं, त्याचा पडताळा मला तरी स्पष्ट, स्पष्ट येतो आहे. यादवजनहो, जो काही शास्त्राभ्यास मी केला आहे, जी काही साधना, ध्यानधारणा निष्ठापूर्वक मी केली आहे, तिच्या कसावर एका अर्थपूर्ण उपाधीचा मी नम्रभावे आज प्रथमच उच्चार करतो आहे. विश्वास आहे – तुम्हालाही ही उपाधी यथार्थच वाटेल. वेदापासून उपनिषदांपर्यंत 'श्री' ही प्रणवसदृश एकाक्षरी, उपसर्गी उपाधी सर्वश्रेष्ठ मानली आहे. सर्वश्रेष्ठ नरोत्तमालाच ती योग्य समयीच प्रदान करणं सर्वथा उचित होय.

" 'श्री' म्हणजे सामर्थ्य, श्री म्हणजे सौंदर्य, श्री म्हणजे अगणित संपत्ती, श्री म्हणजे अशरण बुद्धी. असे 'श्री'चे अनेकानेक अर्थ आहेत. अमाप यश असाही एक अर्थ आहे. अनेकानेक सद्गुणांची अमाप यशदायी संपत्ती या वसुदेवपुत्र, यौवनश्रीमंत कृष्णाठायी एकवटलेली तुम्हा सर्वांना स्पष्ट दिसत नाही काय? मला तर ती स्पष्ट दिसते आहे.

"कंसवधानंतरच्या या यादवसमूहातील महत्त्वाच्या धार्मिक व राजकीय विधीच्या वेळी आपण सर्व गोकुळातल्या सर्वतारक कृष्णाला, आज अठरा यादवकुलांच्या साक्षीनं, मथुरेतील 'श्रीकृष्ण' म्हणून गौरवणार नाही काय?

"उद्याच माझ्या पौरोहित्याखाली याच राजवास्तूत मी कृष्णाचा सविध उपनयनविधी करणार आहे. तुमचे आद्य कुलपूर्वज महाराज यदूपासून तुम्हा यादवांना झालेला तथाकथित क्षत्रियत्वाच्या लोपाचा दोष मी संपूर्ण नष्ट करणार आहे. आवश्यक ते सर्व संस्कारविधी यथासांग संपन्न करून.

"हा कृष्ण उपनयनानंतर विधियुक्त क्षत्रिय होईल. कृष्णाचा 'श्रीकृष्ण' होईल! आहे मान्य तुम्हा सर्वांना?" गर्गमुनींची तीच धारदार दृष्टी सभागृहभर सरासर फिरली. त्यांना उत्तर देण्याऐवजी यौवनश्रीमंत यादवांची अठरा कुलं एका सुरात एकमुखी, उत्स्फूर्त गर्जली, 'यादवराज श्रीकृष्णऽऽऽऽ जयतु, जयतु!!'

दुसऱ्याच दिवशी गर्गमुनींच्या पौरोहित्याखाली सुमुहूर्तावर माझा उपनयनविधी

संपन्न झाला. त्यानिमित्त आठ दिवस मथुरानगर आनंदाच्या कारंजात कसं नुसतं न्हाऊन निघालं. मी कृष्णाचा सर्वमान्य 'श्रीकृष्ण' झालो! जनार्थानं एकदाचा 'क्षत्रिय' झालो! उपनयनविधी झाल्यानं द्विज झालो. पण खरोखरच मी केवळ क्षत्रिय वा द्विज होतो की त्याहून वेगळाच काही होतो?

तिकडे मगधांच्या राजधानी गिरिव्रजातही मगधसम्राट जरासंधाची राजसभा चांगल्या तीन घटकांच्या उलटसुलट चर्चेनंतर एका ठाम निर्णयावर आली होती. मथुरेवर सशस्त्र निर्णायक आक्रमण करण्याच्या!! यासाठी त्या सभेत करुष देशाचा राजा दंतवक्र, सौवीर देशाचा राजा शैब्य आणि होय; चेदी देशाचा राजा, दमघोषाचा पुत्र शिशुपाल व विदर्भाचे राजे भीष्मक आणि त्यांचा पुत्र रुक्मी यांनी जरासंधाला सर्वतोपरी साहाय्य करण्याच्या आपापल्या कुलदैवतांना साक्षी ठेवून गिरिव्रजात सामूहिक आणाभाका घेतल्या होत्या.

जरासंधाचे युद्धशास्त्रातील निपुण सेनापती होते हंस व डिंभक या नावाचे दोन निष्णात मल्ल. मगधांचं साम्राज्य महाबलाढ्य होतं. उभ्या आर्यावर्तभर त्यांचा शक्तिप्रभाव होता.

मथुरेतील आमच्या गुप्तहेरांनी वार्ता आणली, तसं हंस आणि डिंभक या सेनापतींना सामोरं ठेवून जरासंधाच्या विराट चतुरंग सेनेचं पहिलं आक्रमण लवकरच मथुरेवर रोंरावत येऊन कोसळलं!

शेकडो नौकांतून हे सशस्त्र सैन्य यमुनापार करण्यात आलं होतं, त्यांनी यमुनाच पार करू नये म्हणून आमच्या नौकादलानं बाणवर्षाव करीत शर्थीची जलझुंज दिली. तरीही बंध नसलेल्या यमुनेच्या पात्राला मिळेल तिथं पार करून शत्रुसैन्य हजारोंच्या, लाखोंच्या संख्येनं मथुरेभोवती एकवटलं.

सुदैवानं मथुरेला रुंद घेराचा, पाण्यानं तुडुंबलेला आणि नाना अडथळयांनी भरलेला खंदक होता. चारी सीमांची दिंडीद्वारांनी युक्त महाद्वारं, उलटच्या अणकुचीदार खिळ्यांनी अभेद्य केलेली होती. आमच्या यादवसेनेत अनाधृष्टी, सात्यकी, अवगाह, कृतवर्मा, पृथू, शतद्युम्न, कंक, शिनी, बभ्रू असे एकाहून एक रथी-महारथी होते. जरासंधानं मथुरेचा खंदक पार करण्याचे तसेच पूर्व, पश्चिमेची महाद्वारं प्रचंड मागधी हत्ती लोटून फोडण्याचे आटोकाट यत्न केले.

एक-दोन नव्हे, चांगले सत्तावीस दिवस हे निकराचं, घनघोर युद्ध चाललं. मागधांना कशातही यश आलं नाही. मथुरेच्या तटबंदीपार बाणांनी पेटते टेंभे टाकून, शतघ्नींतून पाषाणखंडांचा अविरत वर्षाव कर करून मागध थकले. संधी मिळेल तसं दिंडीद्वारातून त्यांच्यावर चढाया करून आमचे यादव सैनिकही श्रमले.

सत्ताविसाव्या दिवशी हाती शुभ्र पताका देऊन जरासंधानं आपला राजदूत मथुरेच्या पूर्वमहाद्वारासमोर सोडला. माझ्या आज्ञेनं त्याला आत घेण्यात आलं. आलेल्या राजदूताबरोबर संदेश होता. अतिशय धूर्त व फसवा. 'मल्ल सेनापती हंस आणि डिंभक यांच्यापैकी एकाशी, तुम्हापैकी कुणाही एका समबल यादव मल्लयोद्धयानं निर्णायक मल्लयुद्ध खेळावं! त्यातील विजय अंतिम मानू!' मल्लयुद्धातील विजयावर युद्धाचाही निर्णय ठरणार होता.

जरासंधाचा हा डाव मी ओळखला. त्याला मल्लयुद्धात पराभूत झालेल्या यादवाला

बधायचं होतं. मल्लयुद्धानंतरच्या उठणाऱ्या कोलाहलात महाद्वाराच्या दिंडीद्वारातून काही जीवत्यागी मागध सैनिक घुसवून त्यांच्याकरवी आतून महाद्वार उघडायचं होतं, एकदा का महाद्वार उघडलं की, विराट मागधांसमोर यादवांचा पाडच लागणार नव्हता.

राजदूताचा संदेश ऐकून मी दादाकडे नुसतं बघितलं. त्यानं उठून सरळ ते आव्हान स्वीकारल्याचं घोषित केलं. मी त्याच्याकडे बघून नुसताच हसलो. दूतानं तसा संदेश परत नेला.

आम्ही दादासोबत धाडायचे, शास्त्रपारंगत व निष्णात मल्ल निवडले. हे द्वंद्व मथुरेच्या महाद्वारासमोर खुल्या पटांगणात मोठ्या आखाड्यात ठरलं. दादानं डिंभकाशी मल्लयुद्ध खेळण्याचं स्वीकारलं.

ठरल्यावेळी मागध व यादवांच्या कल्लोळत्या वेढ्यात बलरामदादा आणि डिंभक एकमेकांना भिडले. बाहेरच्या मल्लयुद्धाची खडान्‌खडा वार्ता स्वत: विपृथूच मला देऊ लागले. मी स्वत: आत्ताच मगध सैनिकांच्या दृष्टीस पडणं योग्य नव्हतं.

'आता युद्ध होणार नाही. मागधांच्या आणि यादवांच्या वैमनस्याचा निकाल मल्लयुद्धानं परस्पर सुटणार,' अशीच हवा तटाबाहेर मी गुप्तचरांकरवी पसरून दिली. ती ऐकून, डिंभकाच्या यशावर पूर्ण विश्वास असलेला, सेनापती हंस गिरिव्रजाकडे परतण्यासाठी निवडक सैनिक घेऊन नौकारूढही झाला; एकटाच यमुना पार करू लागला.

इकडे आखाड्यात बलरामदादा आणि डिंभक एकमेकांवर दातओठ खात डाव-प्रतिडाव करून घामाघूम झाले होते. आज पहिल्यानं दूर राहून मल्लयुद्ध अंगी संचारलेला, बघता-बघता टरारून फुगलेला, लालेलाल दादा सर्वांना बघायला मिळाला. दृष्ट लागावी असा सुंदर दिसत होता तो. हे थरारक मल्लयुद्ध बघायला आखाड्याभोवती मागध व यादव सैनिकांनी कल्लोळतं कडं टाकलं. बलरामदादा डिंभकालाच काय; पण प्रत्यक्ष जरासंधालाही, प्रसंग आला तर वरचढच ठरला असता. घटिकाभरातच त्यानं डिंभकाला उंच उचलून दाणकन धरतीवर आदळला. लगेच त्याच्या कंठाभोवती आपल्या प्रिय बाहुकंटकाचा बिनतोड चाप चापल्यानं आवळलाही! सर्वच बघ्यांनी ते बघून 'आता डिंभक संपलाच' म्हणून डोळे विस्फारत श्वास रोधले.

सूचनेप्रमाणं विपृथूंनी मला ही वार्ता लागलीच दिली. मी त्यांना तसंच परतवून लावलं. दोन्ही सेनेत 'बलरामाच्या बाहुकंटकात डिंभक वधला गेला' अशी हूल पसरवण्याची सूचना केली! तीच वार्ता नौकेतून वेगानं पाठलाग करून हंसाच्या कानी पडेल, अशी व्यवस्था करण्याचीही त्यांना सूचना केली!

माझ्या सूचना घेऊन ते दिंडीद्वातून बाहेर पडले. थोड्याच वेळात, मी स्वतःच सात्यकी आणि अनाधृष्टी यांना डावं-उजवं घेतं दिंडीद्वाराबाहेर आलो. मला बघताच आमच्या यादवांत आणि मागधांत एक धावती लकेर स्पष्ट फिरून गेली, 'तो आलाऽ! तो आलाऽऽ! दूर व्हा! हटा!' आखाड्यातील मल्लयुद्ध आता उत्कट शिगेला पोहोचलं होतं. बलरामदादा काही डिंभकाला बाहुकंटकाचा प्राणांतिक चाप आवळल्याशिवाय सोडणार नव्हता.

मी झपाझप चालत आखाडा गाठला. ओणावून दादाच्या घामानं थबथबलेल्या पाठीवर त्याला थोपटलं. तसे त्याच्या ताम्रगौर चिंब पाठीवरून घामतुषार चौफेर उडाले. मी म्हणालो, "सोड त्याला. द्वंद्वयुद्धाचा शेवट जरी प्राणान्त असला, तरी विजेत्याचा अभय देण्याचा अधिकार हाही शेवट आहे, हे विसरू नकोस!"

अपार कष्टी होत, एव्हाना निखारालाल झालेल्या दादानं केवळ निरुपायानं माझ्याकडे बघत बाहुकंटकाचा चाप अखेर ढिला सोडला! तसा डिंभक प्राणांनिशी बचावला. चटकन धडपडत उठला. ते बघून मागध सैनिक आनंदान ओरडू लागले, "मगध सम्राट जरासंध महाराजऽऽ जयतु, जयतु!" ते ऐकताना मला हसू आलं.

तिकडे यमुनेच्या पात्रावर आपल्या प्राणप्रिय डिंभकाच्या वधाची असह्य कटू वार्ता ऐकून व्याकूळ झालेला हंस प्रथम नौकेत मटकन खालीच बसला. मग प्राणप्रिय मित्रासाठी आक्रोशत, ऊर पिटत त्यानं आपला देह थेट यमुनेच्या पात्रात झोकून दिला! डिंभकाच्या भेटीला जाण्यासाठी!

त्याच्या सोबतीच्या सैनिकांनी त्याला यमुनेत धुंडाळण्याचे आटोकाट प्रयत्न केले. मग तसंच परतून मगध सेनेत भेदक वार्ता आणली. 'सेनापती हंस यमुनेत बुडाले!' ती ऐकून मल्लयुद्धात घामाघूम होऊनही जिवानिशी सुटलेला डिंभक आता बिथरला! आपल्या प्राणप्रिय मित्राचा शोध घेण्यासाठी तत्परतेनं नौकेतून थेट यमुनेत शिरला. जिथं हंसानं आपला देह यमुनेत झोकून दिला होता, तिथंच डिंभकानंही आता त्याला शोधण्यासाठी आक्रोशत आपला देहही यमुनेत झोकून दिला! यमुना – अंत न लागणारी अशीच नदी होती! यम-ना!

मी यमुनेचा विचार करीत असताना तिच्यावरूनच मागधांच्या चतुरंगसेना, नौका-नौकांनी आल्या तशा परतत होत्या. दोन युद्धकुशल सेनापती हरवून. पूर्ण पराभूत होऊन! पुऱ्या सत्तावीस दिवसांनंतर!

मागधांच्या या पहिल्याच सत्तावीस दिवसांच्या जोरदार आक्रमक व चिवट युद्धात सर्वाधिक नुकसान झालं, ते आमच्या कृषिक्षेत्राचं. लाखो अश्वांची दलं, हजारो हत्तींची दलं आणि कितीतरी पदाती युद्धकालात आमच्या शेतीभातीत यथेच्छ धुमाकूळ घालून गेले. परिणाम एकच झाला. अगदी पोटरीला आलेली हातातोंडाची सर्व प्रकारची भरगच्च पिकं धुळीला मिळाली. धान्य-कोठारात कसातरी वर्षभर पुरेल एवढाच धान्यसाठा आता उरला होता. आता माझ्यासमोर अग्रक्रमाचा प्रश्न उभा ठाकला होता, तो अठरा कुलांतील लढूत श्रमलेल्या लक्षावधी यादवांना अन्नाभावी जगवावं कसं? त्यासाठी शेती तगवावी कशी हा!

माझ्या भराभर आशा सुटल्या. ज्या हातांनी गेले कित्येक दिवस अवजड शस्त्रास्त्रे पेलली होती, त्याच हातांनी शेतीची नांगर, पाभर, कुदळ, फावडं अशी अवजारं 'इडा' देवीचा जयजयकार करत उचलली. आमच्या अठरा राजकुलांतील सशक्त युवकांची पथकामागून पथकं यमुनेला भिडली. त्यांच्या श्रमसेनेच्या मुखावर होतो, प्रत्यक्ष आम्ही – खांद्यावर प्रचंड फाळाचा डौलदार 'संवर्तक' नावाचा किकरी नांगर घेतलेला बलरामदादा आणि हातात वृषभांसाठी प्रतोद घेतलेला मी!

महाराज यदूंचा व क्रोष्टूंचा गगनस्पर्शी जयजयकार चालला असताना मी हातातला प्रतोद खाली ठेवला. पीतांबराचा काचा करकचून कसला! दादानं नीलांबराचा कसला. यमुनेच्या ओलसर काठावर, शूरसेन राज्याच्या भूमीवर ओणवून शिव मुहूर्तावर 'जय इडा' म्हणून पहिली कुदळ उतरविली. माझ्या पाठोपाठ दादानंही खांद्यावरचा नांगर खाली ठेवून कुदळ उतरविली. पाठोपाठ शेकडो युवा यादवांच्या कुदळीच कुदळी यमुनेच्या काठाला भिडल्या. यमुनेच्या पाण्याचा एक प्रशस्त चर यादवांच्या कृषिक्षेत्रापर्यंत खोदण्याचा, पूर्वी कधीच न झालेला आमचा प्रवास सुरू झाला.

मध्यान्हीपर्यंत आम्ही कितीतरी वाव अंतर यमुनेला आमच्याकडे वळवून घेतलही. एका प्रचंड विधायक अभियानाला प्रारंभ झाला.

संध्याकाळपर्यंत आम्ही यमुनेचं जीवनदायी जलतत्त्व मधुरेच्या कृषिक्षेत्राला नेऊन थेट भिडवलं. यमुना यादवाळली वळली. 'श्री' म्हणजे अमाप संपत्ती हे सिद्ध करायला. यमना असलेली आमची प्रिय नदी आम्ही भविष्यासाठी आमच्यापुरती चराच्या बंधनात आणली.

दादानं आपला भलामोठा नांगर खांद्यावरून वाहून आणून एका चौफेर घेराच्या, प्रशस्त शेतात उतरविला. दोन डौलदार शिंगांच्या ढवळ्या, खिल्लार सांड जोडीच्या पुष्ट खांद्याशी तो जू बांधून जुंपला. मी हातातील प्रतोद त्या सांड जोडीतील एकाच्या खुब्यावर टेकून त्याला ठोसरलं. माझ्या जीवनगाथेतील पशू आणि प्रतोद यांच्या पर्वाचा प्रारंभ झाला! पाठोपाठ कितीतरी नांगरजोख्या शूरसेन भूमीत सांडांना कृषिवल यादवांनी दिलेल्या हाकऱ्याबरोबर जीवन उगविण्यासाठी, वाढवून ते मोट्ठं करण्यासाठी फिरू लागल्या.

त्या संध्याकाळी खांद्यावर भलाथोरला नांगर टाकलेला दादा व हाती प्रतोद घेतलेला मी, पाठीशी यादवांचे युवा जथे घेऊन मथुरेच्या पश्चिम द्वाराकडे परतलो. गोकुळातल्यासारखे – गोरजाचे धूळलोट पाठीवर घेत. मात्र आता गोपाल म्हणून नव्हे, तर कृषिवल यादव म्हणून! मी दादाला हसतच म्हणालो, "तुला आजपासून मी 'हलधर' म्हटलं तर रागावणार तर नाहीस ना ?"

"छे! अवश्य म्हण. तू जे-जे करशील आणि म्हणशील ते-ते मला मान्य आहे. सदैवच! आणि तुला पक्कं माहीत आहे की, मूळ स्वभावाप्रमाणं मी रागावलो तरी लगेच निवळतो." दादा उत्तरला. शूरसेन राज्याचे यादव आता कुठं स्थिरावले. तरीही मगधांची चार वर्षांत चार आक्रमणं कोसळली. मोठ्या निकरानं – शर्थीनं आम्ही ती परतविली. याच काळात दादाला दोन सख्खे बंधू लाभले. धाकलीला दोन पुत्र झाले. समारंभपूर्वक बारशी करून त्यांची नावं ठेवण्यात आली – गद व सारण अशी. गद सारणापेक्षा दोन वीर्षांनी मोठा होता. दादानंच त्याचं नाव ठेवलं होतं, गद असं – त्याच्या लाडक्या 'गदा' या शस्त्राला स्मरून.

आता गर्गमुनींनी राज्याराज्यांत धाडलेले सेवक आवश्यक ती माहिती घेऊन मथुरेत परतले. त्यातील पांचालराज द्रुपदांनी धाडलेली माहिती अत्यंत महत्त्वाची होती. द्रुपद वसुदेवबाबांचे जिव्हाळ्याचे स्नेही होते. आपल्या राज्याला अधूनमधून भेट देणाऱ्या अवंतीच्या कश्यप कुलोत्पत्र आचार्य सांदीपनींची त्यांनी कंठभर वाखाणणी केली होती.

सांदीपनी! वाराणसीचे कश्यपकुलोत्पन्न, आर्यावर्तभर ठिकठिकाणी आपले आश्रम सुस्थापित केलेले थोर ब्रह्मर्षी. वसुदेवबाबा, उग्रसेन महाराज आणि गर्गमुनी यांनी एकमुखानं विचारपूर्वक निवडलेले, माझे आणि बलरामदादाचे भावी आचार्य – गुरुदेव सांदीपनी.

कुठंतरी दूर दक्षिणेला अवंतीच्या अरण्यात त्यांचा 'अंकपाद' नावाचा आश्रम होता म्हणे. 'अंक' म्हणजे पोहोचणे. 'पाद' म्हणजे वंदनीय चरण. 'अंकपाद' म्हणजे वंदनीय आचार्यांच्या चरणापर्यंत पोहोचण्याचं स्थल! नाव तर अर्थपूर्ण होतं. ऐकताच आवडलं. आम्ही त्या नगराचं आणि आचार्यांचं नावही कधी ऐकलं नव्हतं! जेव्हा ते ऐकलं तेव्हा

त्यांना न बघताच – नुसतं नाव ऐकूनच, उद्धवाच्या पहिल्या भेटीतच वाटलं तसंच मला वाटून गेलं – शब्दांत न बांधता येणारं! मोठं नादसंपन्न नाव होतं, सांऽ दीऽ पऽ नीऽ!

मथुरेच्या राजमंडळानं, आमच्या कुटुंबप्रमुखांनी आणि गर्गमुनींनी शूरसेन राज्यासाठी निर्णय घेतला – बलराम, श्रीकृष्ण जीवनाच्या सर्वांगीण शिक्षणासाठी आता आचार्य सांदीपनींच्या अंकपाद आश्रमात जातील – अवंतीला. त्यांच्या सोबतीला जाईल यादवश्रेष्ठ देवभागपुत्र उद्धव. त्यांना तिथपर्यंत राजरथातून सुखरूप सोडून येईल राजसारथी दारुक! एके दिवशी माझ्या सूचनेप्रमाणं अमात्य विपृथूंनी धाडलेला सेवक दारुक माझ्यासमोर येऊन उभा ठाकला.

माझ्यासमोर येताच तो कितीतरी नम्रपणे हात जोडून नुसताच उभा राहिला. जवळ जाऊन त्याचे खांदे हाताच्या पकडीत घट्ट धरून, मी त्याच्या डोळ्यांत खोलवर डोकावून म्हणालो, “दारुका, मला घोडा हा प्राणी फार प्रिय आहे. त्याची वाऱ्याशी स्पर्धा मांडणारी धावगती माझी सर्वाधिक आवडती आहे. अशा चार–चार, सात–सात घोड्यांना लीलया आवरताना मी तुला अनेकदा पाहिलं आहे. म्हणूनच घोड्याइतकाच तूही मला प्रिय आहेस. आवडेल तुला माझी सेवा करणं ? – प्रसंग पडलाच तर जीवनभर ?” काहीही न बोलता झटकन वाकून दोन्ही गुडघे टेकत आपलं मस्तकंच त्यानं सरळ माझ्या चरणांवर ठेवलं. मी पटकन त्याला वर घेत, उद्धवासारखंच थेट वक्षाशी बिलगतं घेतलं.

गर्गमुनींनी अवंतीकडे प्रस्थान ठेवण्यासाठी सांगितलेला शुभ दिवस उजाडला. दारुकानं राजवास्तूच्या महाद्वारासमोर तांबूस, काळ्या, बदामी, काळाबाळ्या अशा चार वेगवेगळ्या रंगांच्या पुष्ट घोड्यांचा रथ आणून उभा केला. मी आणि दादानं, बाबा, देवकीमाता व रोहिणीमाता, गर्गमुनींसह सर्व राजमंडळाचे आशीर्वाद घेऊन निरोप घेतला. उद्धवानं आपल्या माता–पित्यांचा, भावंडांचा निरोप घेतला. आम्ही सर्व जण चाललो. मथुराकर यादवांचा निरोप घेऊन अवंतीकडे. सांदीपनींच्या ‘अंकपाद’ आश्रमाकडे. रथात आरूढ होताच मी दारुकाच्या कानाशी पुटपुटलो, “मित्रा, तुझे घोडे आवडले. त्यांचे वेगवेगळे वर्ण मात्र मुळीच नाही आवडले! माझा आश्रमयोग पूर्ण होताच मला माघारी न्यायला येशील तेव्हा मात्र वेगवेगळ्या राज्यातले, भर उंचीचे, दुधी वर्णाचे शुभ्र, एका शिणेचे, पुष्ट चार सुलक्षणी घोडे जोडलेला रथ आणायला विसरू नकोस! काय ? राहील लक्षात ? शुभ्र आणि चारच घोडे!”

गोकूळ, मथुरा सोडून दूरच्या पल्ल्याचा असा हा माझ्या जीवनातील पहिलाच प्रवास होता. दारुकाच्या रथासह, प्रशस्त नौकांतून कितीतरी नद्या ओलांडत आम्ही चाललो. प्रत्येक पंधरा–वीस योजनांवर बदलणारा इथल्या भूमीचा नयनहर निसर्ग मी डोळ्यांत असोशीनं साठवीत चाललो. कितीतरी पडाव आम्ही मागे टाकले. बरोबर आणलेल्या शिध्याचं भोजन सिद्ध करणं, वनातून निवडक फळं आणणं, माझ्यासाठी व दादासाठी एखाद्या डेरेदार अशोक, आम्रवृक्षाखाली आस्तरण अंथरणं ही कामं उद्धव व दारुक तत्परतेनं आणि केवढ्यातरी आत्मभावानं करीत होते. चांगल्या एका मासानंतर अवंतीचं अरण्य एकदाचं आलं. घनदाट, निबिड, नानाविध पशुपक्षयांनी, प्राण्यांनी भरलेलं. असंख्यात पशुपक्षयांच्या आवाजांनी कुदणारं.

कितीतरी लहानमोठ्या नद्या पार करून शेवटी आम्ही विख्यात क्षिप्रा नदीच्या काठी आलो. क्षिऽप्रा! क्षिप्रा म्हणजे अरोध – गतिमान. माझ्या मर्मबंधाची ठरलेली

आणखी एक ठेव! ती लांब–रुंद होती. स्फटिकधवल पाण्यानं भरलेली, प्रशस्त होती. पण यमुनेच्या मानानं कितीतरी लहान, अटकर. अवंतीच्या या अरण्याचं मी टिपलं ते एक खास वैशिष्टच होतं. क्षिप्रेला धरूनच लहान–मोठचा सरोवरांनी हे अरण्य भरलेलं होतं. निळ्या, काषाय, शुभ्र, रक्तवर्णी कमलफुलांच्या भरगच्च ताटव्यांनी ही सरोवरं सदैव खचाखच भरलेली असत. मोठी नयनहर व चित्ताकर्षक दिसत ती!

शेवटी एका भल्यामोठचा नौकेतून आम्ही रथासह क्षिप्रा ओलांडली. अवंती राज्यातील आणि आर्यावर्तातील विख्यात अशा आचार्य सांदीपनींच्या अंकपाद आश्रमाभोवतीचं भव्य लाकडी कुंपण एकदाचं आमच्या दृष्टीला पडलं. तसं मी दारुकाला रथ रोधायला सांगितलं. रथातील लहानथोर वस्तू आम्ही सर्वांनी भुईवर उतरवून घेतल्या. कडकडून आलिंगन देत मी दारुकाला निरोप दिला. तो तिथूनच परतला. आता आमच्या निवडक वस्तू खांद्या–पाठीवर घेत आम्ही तिघं पायीच – अनवाणी चालू लागलो. यादवांचं राजमंडळ, तिथले प्रासाद, कुलाचार, सगळं–सगळं वैभव क्षिप्रेकाठीच टाकून, केवळ आज्ञाधारक आश्रमकुमार म्हणून!

आता आम्ही तिघं आचार्यांच्या 'अंकपाद' आश्रमाच्या पूर्वेकडील कश्यप नावाच्या भक्कम लाकडी प्रवेशद्वारासमोर उभे ठाकलो. नुकतंच उजाडल्यामुळे अवघा आश्रमपरिसर सुवर्णी सूर्यकिरणांत कसा उजळून गेला होता. हे विश्वच वेगळं होतं – 'ज्ञानयोगा' चं – साधनापर्वाचं. आत प्रवेश करण्यापूर्वी आम्ही तिघांनीही त्या पवित्र परिसराच्या भूमीला हस्तस्पर्श करून तो कपाळाशी भिडवत भक्तिभावानं सादर वंदन केलं.

आमच्या स्वागतासाठी आचार्यांनी धाडलेले दोन आश्रमकुमार अगत्यानं सामोरे आले. आमची त्यांची वक्षभेट झाली. मी आश्रमाच्या परिसरावर उभ्या–उभ्याच दृष्टी फिरविली. हेही एक गोकुळच होतं तर – साधनागोकूळ, ज्ञानगोकूळ! संस्कारगोकूळ!!

इथंही केवढचातरी मोठचा परिसराला घेरून संरक्षक, भक्कम लाकडी कुंपण फिरलं होतं. आश्रमाच्या गोधनाचं हिंस्त्र पशूंपासून रक्षण करण्यासाठी. प्रारंभीच प्रमुख द्वाराच्या डाव्या–उजव्या हाताशी रक्षक कुत्र्यांची बंदिस्त कवाडं होती. आत चौफेर पर्णकुटचांच्या तिहेरी रांगाच रांगा दिसत होत्या! त्यामध्ये गोधनांचा चारा रचलेले लाकडी, अधांतरी मचाणही होते. कुंपणालगतची रांग आश्रमात सदैव गुरुसेवेसाठी असलेल्या जुन्या कर्मचारी आश्रमकुमारांसाठी होती. मधली रांग शिष्य आश्रमकुमारांसाठी होती. त्या रांगेतील कुटचा पूर्वेकडील कलिंग, अंग, वंग, मगध, कामरूप दक्षिणेकडील पांडच वनवासी, अश्मक, विदर्भ, कोसल, महारट्ट, पुंड्र, पश्चिमेकडील आनर्त, सौराष्ट्र, सौविर आणि उत्तरेकडील पंचनद, काश्मीर, कुरुजांगल, पांचाल, वत्स, चेदीपासून आलेल्या शंभरावर आश्रमकुमारांनी भरल्या होत्या. बाहेरची रांग, निरनिराळ्या विषयांतील निष्णात, उप–आचार्यांसाठी होती. शिष्यांवर सदैव दृष्टी राहावी, यासाठी त्यांना सर्वांमध्ये ठेवण्यात आलं होतं.

त्या सर्वांनी मधोमध येईल अशी एक उंचच उंच व केवढीतरी प्रशस्त 'आचार्य कुटी' उभी होती. तिच्या माथ्यावर वावभर लांबीची, तिकोनी शुभ्र आश्रमपताका फरफरत होती. मुख्य कुटीच्या डाव्या हाताला गवताळू छपराचा अनेक कोठारांचा लांबलचक कक्ष होता. हे आश्रमाचं 'भांडारगृह' होतं, ते नानाविध धान्यं वस्त्रं, शस्त्रं, वनौषधी, लाकूडफाटा व अनेक आश्रमउपयोगी वस्तूंनी भरलेलं होतं. उजव्या हाताला लांबच लांब

असे आश्रमीय गोधनाचे ‘गौळगोठे’ होते.

आचार्यांनी धाडलेल्या आश्रमकुमारांमागून आम्ही चाललो. मध्ये बलरामदादा, त्याच्या उजव्या हाताशी मी व डाव्याशी उद्धव. यादवांच्या अठरा कुलांतून या आचार्यांच्या आश्रमात असे येणारे आम्ही पहिलेच वृष्णी व अंधक यादवकुमार होतो. हा सुयोग घडवून आणणाऱ्या – कधीच न पाहिलेल्या – द्रुपदांचे मी मनोमन आभार मानले. कसे दिसत असतील आणि वागतील इथले आचार्य सांदीपनी आमच्याशी ?

आश्रमाचं हृदयच असलेल्या मधल्या आचार्यकुटीत आम्ही प्रवेशलो. तिच्या मध्यभागी एका मृगाजिनाच्या प्रशस्त, खाली दर्भाचं आवरण असलेल्या उंचशा आसनावर आचार्य बसले होते. या क्षणीही ध्यानस्थित होते ते. त्यांचा जपमालाधारी उजवा हात त्यांनी लाकडी अडंगीवर अधांतरी विसावता ठेवला होता.

आम्ही आचार्यांचं ते रूप बघत जागीच खिळलो. माझी दृष्टी त्यांच्या गौरवर्णी सतेज, चाफेकळी नासिकेवरच्या दोन भुवयांच्या मध्येच स्थिरावली. त्यापूर्वी तिनं टिपलं होतं की, केळीच्या गाभ्यासारख्या सतेज, तांबूस, गौरवर्णी कांतीचे, कृशसे, रुद्राक्षमाळांनी केशभार सावरलेले, कपाळी गोपीचंदनाचे आडवे पट्टे असलेले आचार्य, आजपर्यंत मी बघितलेल्या सर्व–सर्व पुरुषांत वेगळेच होते. किती–किती तेजवंत, सत्त्वशील, शांत दिसत होती त्यांची ध्यानमुद्रा! भुईतून नुकत्याच उगवलेल्या भुईचंपकाच्या कळ्यासारखी! समुद्रमंथनातून नुकत्याच वर आलेल्या लक्ष्मीच्या हातांतील उभट, धवल, घाटदार शंखासारखी! तशीच नितळ. तशीच पावन!

आजपर्यंत मी अनेकदा अनुभवलं होतं की, मला बघताच कैक जण खेचल्यासारखे माझ्या जवळ येतात. आज मात्र उलटं झालं. आचार्यांनी न बघताच मी त्यांच्याकडं खेचल्यासारखाच पुढं झालो! आपोआप. पद्मासनातील अस्पष्ट दिसणाऱ्या त्यांच्या उजव्या चरणाला मस्तक भिडवून मी साष्टांग दंडवत घातले. त्या स्पर्शानं डोळे न उघडताच ते स्पष्ट उद्गारले, “ये यादवकुमार श्रीकृष्णा, वृष्णी–अंधकांच्या युगतारका, केव्हापासून वाट बघतो आहे मी तुझी! तुझं स्वागत असो!” पाठोपाठ त्यांनी कमलदलांसारखे आपले नेत्र हळूहळू उघडले. माझी त्यांची पहिलीच दृष्टादृष्ट झाली. जन्मजन्मांतरीची ओळखखूण दोघांनाही पटली. मी हसलो. तेही हसून म्हणाले, “दंडवत पुरे! उठून बैस!”

पाठोपाठ बलरामदादा आणि उद्धवानंही त्यांना दंडवत घातले. आचार्यांच्या भोवती कितीतरी मृगाजिनांची आसनं होती. पण ती आता सर्व रिक्त होती. आम्ही त्यातील रिक्त आसनांवर सावरून बसलो.

आम्हाला आश्रमाचा दिनक्रम समजावून सांगताना आचार्य अत्यंत संथ लयीत बोलले. मला फार–फार जाणवलं, गोकूळ सोडताना मी राधेच्या स्वाधीन केलेल्या माझ्या मुरलीसारखाच तर त्यांचा आवाज होता – कितीतरी नादमधुर, आत्मीय, स्वर्गीय! ऐकतच राहावासा वाटणारा.

ते म्हणाले, “बलराम, श्रीकृष्णा, उद्धवा तुमची राजवस्त्रं उतरवून ती वेताच्या पेटिकांत नीट घड्या घालून आश्रमाच्या भांडारात ठेवा. तुमचे सुवर्णी मुकुट तिथल्या अधिकारी – उप–आचार्यांच्या स्वाधीन करा. तिथले प्रमुख देतील, ती आश्रमवस्त्रं अंगी धारण करा. लक्षात घ्या की, उद्यापासूनच तुमचं आश्रमजीवन सुरू होत आहे. जीवनयज्ञातील सर्वांत महत्त्वाचा असा ‘ब्रह्मचर्याश्रम’ आहे हा.

"माझ्या योजनेप्रमाणं तो चौसष्ट दिवस काटेकोर चालेल. जगाला तो तुटपुंजा वाटेल. मात्र तुम्ही एवढं जन्मजात श्रेयस घेऊन इथं आला आहात की, मला हा काळ सर्वथा पुरेसा वाटतो! इथं तुम्ही कुठल्याही राजकुलाचे कुमार नाहीत! यापूर्वीच तुमच्यासारखेच आणखीही शंभरावर आश्रमकुमार इथं शिक्षण घेताहेत. तुम्हीही तसेच सर्वांसारखे एक साधे आश्रमकुमार आहात – तुमची राजवास्तूतील राजकुलाची आचारसंहिता तुम्ही मनःपूर्वक या क्षणापासून क्षिप्रेत बुडवून ठेवावी. माझ्यासाठी तर तुम्ही केवळ एक आश्रमकुमार आहात. मला 'पुत्रवत' आहात."

मध्येच त्यांनी आपले डोळे मिटते घेतले. कसलीतरी अबोध तीव्र वेदना त्यांच्या चर्येवर तरळलेली मला स्पष्ट जाणवली.

ते पुढे म्हणाले, "इथं वेदांपासून वादांपर्यंत जीवनाच्या सर्वांगाचं शिक्षण तुम्हाला साग्रपणे दिलं जाईल. त्यासाठी माझ्या एवढ्याच ज्ञानक्षमतेचे, नानाविध महाजनपदांतून आपणहून आलेले, निष्णात असे अन्य आचार्यही प्रत्येक शाखेत आहेत. माझ्याएवढाच आदर त्यांनाही द्यायला कधीच चुकू नका. इथला दिनक्रम नीट समजावून घ्या. त्याचं काटेकोर पालन करा. या तुम्ही तिघंही."

मावळतीचा सूर्य संध्येच्या शीतल कक्षात अलगद शिरावा, तसे डोळे मिटून आचार्य सांदीपनी शांत झाले. आम्हापासून क्षणात कितीतरी योजनं दूर गेले असावेत ते. असावेत कसले? गेलेच!

ब्राह्मी मुहूर्तावर लवकर उठून गायत्री छंदातील 'सवितृ' मंत्राच्या पुरश्चरणापासून इथला दिनक्रम कसा सुरू होतो. त्यानंतर शांतवेळी प्रत्यक्ष आचार्य सर्वांना अमोल ज्ञानबोध कसा देतात, मग क्षमतेप्रमाणं प्रत्येकानं आश्रमाची श्रमकर्मं कशी करायची, ध्यानधारणा, भोजन, विश्रांतीनंतर शिकलेल्या विषयांचा पाठपुरावा करायचा. संध्याकाळी सर्वांसह सांध्यवंदना करायची. रात्री ईशस्तवना करायची. दिवसभर घेतलेल्या ज्ञानाचं चिंतन–मनन करीत निद्राधीन व्हायचं, इत्यादी दिनक्रम प्रमुख सूत्रधारकानं आम्हाला बारकाव्यानं समजावून सांगितला.

पहिल्याच रात्री आम्हाला दिलेल्या पर्णकुटीत दर्भाच्या आस्तरणावर झोपताना मला माझे गोकुळातले आजोबा, नंदबाबा, थोरली व धाकली, लाडकी एका, सर्व काका–काकू, गोप–गोपी, सर्व सवंगडी आणि होय, माझी मुरली सांभाळणारी राधा प्रकर्षानं आठवली! पाठोपाठ मथुरेतील देवकीमाता, बाबा, गर्गमुनी, उग्रसेन महाराज, सात्यकी, अनाधृष्टी, विपृथू, देवभागकाका आणि न बघितलेल्या मागधकर जरासंधाचीही आठवण झाली! मन तरी किती चमत्कारिक असतं! त्याला केव्हा आणि काय आठवेल सांगता येतं काय? मी स्वतःशीच हसलो. आचार्यांनी आजच सांगितलेलं किती लवकर विसरून चाललो होतो मी! गोकूळ–मथुरेच्या आठवणी काही काळासाठी मी निर्धारानं क्षणात क्षिप्रेत सोडून दिल्या! गाढ झोपी गेलो.

ब्राह्मी मुहूर्तावर काही आश्रमकुमारांनी एका पाठोपाठ एक लयीत शंख फुंकले. तसं पाठोपाठ गोठ्यांतून रवंथ करतच उठणाऱ्या गाईंच्या कंठांतले घंटानाद निनादले. नानाविध पक्षी संमिश्र कलकलू लागले. सांकेतिक लयींचे शंखनाद घुमू लागले. त्यांच्या मधुर नादांवर जागा झालेला आश्रम हलू लागला. आपापल्या कर्मयोगाला भिडला. कुट्याकुट्यांतून अग्निहोत्रांच्या कुंडांतून उसळलेले धुराचे लोट भेलकांडत आकाशात चढू लागले. नादमय, गंभीर, प्रातःस्तवन अस्पष्ट ऐकू येऊ लागलं – 'ॐ इशावास्यम्

इदम् सर्वम्... सिद्धनम्... सर्वेऽपि सुखिनः सन्तु मा... दुःखम् आप्नुवात!'

मी दर्भाच्या आस्तरणावरून उठलो. हातांची ओंजळ समोर धरून प्रथम करदर्शन केलं. पाय ठेवण्यापूर्वी भूमीची क्षमा मागत 'पादस्पर्शं क्षमस्व मे' असं म्हणून तिला वंदन केलं. अद्याप उजाडायचं होतं. आश्रमातील पर्णकुटयांच्या, वृक्षांच्या आकृत्या साकारायच्या होत्या. नदीकडे सरकलेली, मळलेली पांढरट पायवाट काय ती तेवढी अस्पष्ट दिसत होती. मी, दादा आणि उद्धव तिघंही एकमेळानं क्षिप्रेकडे चाललो. मुखं प्राक्षाळून क्षिप्रेच्या उबदार पाण्यात उतरलो. स्नानं आवरून परतलो.

आचार्यकुटीत जाऊन प्रथम आचार्यांचं आम्ही दुरूनच दर्शन केलं. ते केव्हाच जागे होऊन सर्व आन्हिकं आवरून एव्हाना ध्यानस्थच बसले होते. त्यांच्या शेजारी अग्निहोत्राचं कुंड धुरकटत होतं, गुरुपत्नी आत काही गृहकर्मात गढल्या होत्या. आम्ही त्यांचंही दुरूनच दर्शन घेतलं. नंतर गौळगोठयात जाऊन आम्ही गोदर्शन केलं. गोरसाच्या कक्षात जाऊन चांगला कुंभ–कुंभ धारोष्ण गोरस आस्वादला. ओठांवरच्या पांढरधारा पालथ्या मुठींनीच निरपल्या.

आता आचार्यांच्या 'ज्ञानबोधा' चा समय झाला. त्यासाठी शंखांची एक विशिष्ट दीर्घ लय आश्रमभर घुमली. तसा तिचा संकेत पकडून शिष्यकुटयांतून चमूचमूंनी शिष्य बाहेर पडले. आपापल्या काखेतील दर्भासनाच्या बैठकांच्या छोटया वळया सावरत आचार्यकुटी जवळ करू लागले. आश्रमाच्या अस्पष्ट आकृत्या आता सुस्पष्ट झाल्या. आल्हादक सकाळ अंकपाद आश्रमावर पसरली. आचार्यकुटीत खचाखच भरलेल्या आम्हा आश्रमकुमारांची मिटल्या डोळी परमशांततेत गुरुवंदना सुर झाली.

'ॐऽऽ गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात परब्रम्हा, तस्मै श्री गुरवे नमः।।' आता सर्वांचे डोळे आचार्य मुद्रेवर स्थिरावले. त्यांचे स्वर्गीय बोलीतील अमृतबोल ऐकण्यासाठी कानाकानांचे शिंपले उत्सुक झाले. एकाग्रपणे आसावले. आचार्य सांदीपनी सर्व शिष्यागणांवर प्रेमळ दृष्टी फिरवून प्रथम मंद, मधुर हसले. शारदीय पहाटेला मानस सरोवरावर नुकत्याच उमललेल्या ब्रह्मकमळाच्या कळ्यासारखं होतं ते हास्य! मग साधनास्नात, बासरीवत नादमधुर सुरात ते संथपणे बोलू लागले.

"प्रिय आश्रमकुमारहो! ज्यात तुम्ही प्रत्येकानं पारंगत झालं पाहिजे अशा विद्या आहेत चौदा. आज मी त्यांच्याविषयीच विस्तारानं बोलणार आहे. ध्यानशील होऊन ऐका." कुटीभर शांतताच शांतता पसरली.

"त्या विद्या अशा – ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद. या चार वेदांच्या चार स्वतंत्र आद्यविद्या मानल्या आहेत. 'विद' म्हणजे जाणणं. 'वेद' म्हणजे जे जाणलं ते सांगितलं. हे चारही वेद दूर गांधार देशात 'माल्यवत' पर्वतावर निर्माण झाले. अनेक अनाम, प्रज्ञावंत ऋषींनी ते उत्स्फूर्तपणे मौखिक कथन केले. पिढयान्पिढया कुठं व कधीच त्यांनी आपले नामनिर्देश केले नाहीत. म्हणून या चारी वेदांना 'अपौरुषेय' मानण्यात येतं. यातील पहिला ऋग्वेद. उषा व वरुण या देवतांच्या स्तुतिपर व विलक्षण लयबद्ध ऋचांनी तुडुंबला आहे हा. दूसरा यजुर्वेद. हा परमात्म्याला सर्वंकष समर्पणाच्या ऋचांनी साकारला आहे. त्याच्या शुक्ल यजुर्वेद व कृष्ण यजुर्वेद अशा दोन शाखा आहेत. तिसरा सामवेद. संगीताच्या सर्वंकष स्वरऋचांनी सुंदरला आहे हा. चौथा अथर्ववेद. हा शत्रूच्या विनाशाच्या व आपल्या संरक्षणाच्या प्रार्थनांच्या प्रभावी ऋचांत प्रकटला आहे. आपल्यावर येणारी संकटं टाळण्यासाठी आर्त, आत्मिक सादही त्यात आहे. वेद हे

खरं 'वाङ्मय' होय. ते 'वाचेतून' सहजस्फूर्त प्रकटलेलं जगातील पहिलं सलग, सुसंगत व संपन्न असं साहित्य आहे.

"या चार वेदांच्या चार विद्या आहेत. तशीच त्यांची सहा अंगं आहेत. त्यातील जे पहिलं अंगं आहे, त्याला शिक्षा म्हणतात. शिक्षा म्हणजे वेदांच्या शब्दांच्या निर्दोष, योग्य व कर्णमधुर उच्चारांचं शास्त्र होय. वेदांचं सर्व सामर्थ्य अचूक व स्पष्ट उच्चारांतच आहे. या उच्चारांचे म्हणजेच वाणीचे चार स्पष्ट प्रकार आहेत. परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी असे.

"वाणीचा वैखरी हा प्रकार सर्वांत गौण आहे. दैनंदिन व्यवहारात तो नित्य व नकळत योजला जातो. जीभ, ताळू, ओठ यांच्या साहाय्यानं केवल कंठातून सहज बाहेर येते, ती वाणी म्हणजे वैखरी. हिचा मनाशी, हृदयाशी, बुद्धीशी व आत्म्याशी काही संबंध असेलच असं नाही. रोज अशा मुखदेखल्या वैखरीचा सर्वच जण सर्रास उपयोग करतात.

"हृदयापासून विचारपूर्वक बाहेर पडते, ती दुसरी वाणी म्हणजे मध्यमा. तिसरी वाणी म्हणजे जिचा स्थायिभाव प्रेम व इतर भावभावना असतो, अशी 'नाभी' पासून निघालेली वाणी म्हणजे पश्यंती आणि जिवाच्या देठापासून म्हणजे मूलाधार केंद्रापासून जी प्रकटते – आत्मशक्तीतून, स्वाध्याय व साधनेतून जी आपोआप प्रसवते तिला परावाणी म्हणतात. सर्वश्रेष्ठ असते ही वाणी. ती कुणीही पटवावी लागत नाही. ती इतकी सशक्त व स्वयंभू असते की, सर्व जिवांना आपोआपच जाणवते ती! 'परा' म्हणजे दुसऱ्याची. परावाणी ही उच्चारणाऱ्याची नसतेच. दुसऱ्याच कुणाचीतरी – कशाचीतरी – अलौकिकच असते ती!"

भोवतीच्या भारावलेल्या कुमारमंडलावर दृष्टी फिरवत आचार्य क्षणैक थांबले. माझ्यावरच दृष्टी स्थिरावत म्हणाले, "श्रीकृष्णा! समजलं काय तुला ? तुला कुठली आवडेल यातील वाणी ?"

मी क्षणैक थांबलो. विचारपूर्वक उत्तरलो, "मला चारीही आवडतील! पण याहून एखादी पाचवी वाणी नाही का अस्तित्वात, आचार्य ?" मी हसतच प्रश्न केला.

"नाऽही, म्हणजे शास्त्रं एवढ्याच मानतात!" आचार्यही सहेतुकच कितीतरी गूढमधुर मंद हसले. मग आम्ही एकटक एकमेकांकडे बघतच राहिलो. सारे मात्र आमच्याकडेच बघत राहिले. आमच्या दृष्टी–दृष्टीमागे लपलेली नि:शब्द वाणी आचार्यांना समजली होती. मलाही समजली होती. ती होती परमात्म्याची वाणी. प्रेमाची वाणी – प्रेमवाणी. जिला लौकिक देहाचा कुठलाही अवयव सामावू शकत नव्हता. जिला आदीही नव्हता, अंतही नव्हता!

"वेदांच्या दुसऱ्या अंगाचं नाव आहे, 'छंद.' " आचार्य पुढे बोलू लागले, "गायनाचे स्वर, ताल व लय यांचं तत्त्वशुद्ध ज्ञान म्हणजे छंद!" आचार्य आता पुरते रंगून बोलत होते.

"भाषेच्या निर्दोष आकलनाचे नियम ज्यात आहेत, ते तिसरं अंग म्हणजे 'व्याकरण' होय.

"वेद सहजस्फूर्त आहेत. म्हणूनच त्यांच्या अर्थांनाही मर्यादा नाहीत. वेदांवर सोपं; पण अर्थपूर्ण निरूपण करणं, या चौथ्या अंगाला 'निरुक्त' म्हणतात.

"कालमापन, ग्रहगोल, नक्षत्रं आणि हस्तसामुद्रिक यांची चर्चा ज्यात आहे, त्या पाचव्या अंगाला 'ज्योतिष' म्हणतात.

"धार्मिक विधी व संस्कार यांचा ऊहापोह ज्यात आहे, ते सहावं अंग म्हणजे 'कल्प'. या अंगात अकल्पित अवडंबरं केव्हाही घुसू शकतात! शहाण्यानं सदैव त्यांच्यापासून सावधच असलं पाहिजे. अशा माजलेल्या अवडंबरांच्याच पुढे अंधश्रद्धा व्हायला समय लागत नाही! अशा अंधश्रद्धांना कठोरपणं, पुरुषार्थानं निखंदतो, तो युगपुरुष, योगयोगेश्वर सिद्ध होतो. 'अव' म्हणजे खाली. तारण्यासाठी खाली येतो तो अवतार! भोवतीच्या असंख्य अंधश्रद्धाधारकांना तारण्यासाठी खाली उतरतो, तो अवतारी युगपुरुष ठरतो. युगंधर सिद्ध होतो!" आचार्य अंमळ थांबलेच. एकटक माझ्याकडेच रोखून बघत म्हणाले, "काय श्रीकृष्णाऽ समजलं काय ?"

"अकल्पित धार्मिक अवडंबरांच्याच पुढे अंधश्रद्धा होतात, हे नीट समजलं. पण ते 'अवतारा' चं काय म्हणालात, ते मात्र काही नाही समजलं आचार्य!" मी चर्या चौकस, चौरस केली.

"समजलं नाऽही! ठीक आहे – समजेल. समजेल समयानुसार!" आम्ही दोघंही एकदमच खळाळ हसलो. तसं सर्वच आश्रमकुमार चक्रावून, गोंधळून आमच्याकडे बघतच राहिले. हसून डोळ्यांत तरळलेले पाणथेंब तर्जनीनं निरपून आचार्यांनी स्वतःला सावरलं. सर्वत्र दृष्टी फिरवत ते म्हणाले, "तर आश्रमकुमारहो! चार वेद व ही सहा अंगं धरून अशा दहा विद्या झाल्या."

आचार्यांच्या वाणीला आता स्वर्गीय तेज चढलं होतं.

"आता राहिल्या केवल चार विद्या – 'मीमांसा', 'तर्क', 'पुराणं' व 'धर्म' ही त्यांची सर्वमान्य नावं आहेत. मीमांसा म्हणजे चर्चेला घेतलेला विषय सर्व युक्त–अयुक्त विचारांनी उकलून दाखविणं. शक्य तेवढ्या सखोल विचारानं त्याची चिकित्सा करणं. त्याचं सर्वांगीण विश्लेषण करणं.

मीमांसा दोन प्रकारच्या असतात. एक पूर्व व दुसरी उत्तर मीमांसा. न्याय–अन्यायाची ज्यात चर्चा असते, त्या विद्येला तर्कविद्या म्हणतात.

"पुढची विद्या म्हणजे महापुराणं. ही आहेत अठरा. यातील पहिलं आहे 'ब्रह्म' व अखेरचं आहे 'ब्रह्मांडपुराण'. ब्रह्म, पद्म, विष्णू, शिव, भागवत, नारद, मार्कंडेय, अग्नी ही यातील प्रमुख महापुराणं आहेत. शिवपुराणाला 'वायुपुराण' असंही म्हणतात. यांसह भविष्य, ब्रह्मवैवर्त, लिंग, वराह, स्कंद, वामन, कूर्म, मत्स्य, गरुड, ब्रह्मांड अशी मिळून अठरा महापुराणं आहेत. वेगवेगळ्या जीवनविषयाला वाहिली आहेत ही पुराणं.

"मात्र पुराणांतील गहन अर्थाचा भाग थोडा व कर्मकांडांचं अवडंबरच अधिक. यामुळे ती लोकमानसापासून दूर राहिली आहेत.

"आता शेवटची विद्या ऐका. सर्वांत महत्त्वाची आहे ही विद्या. 'धर्म' हे तिचं नाव. या विद्येचा अर्थ नीट ध्यानपूर्वक समजून घ्या. तिच्यावर तुम्हीही चिंतन, मनन करा. जीवनाचे चार बळकट पुरुषार्थ ज्ञानवंतांनी मानले आहेत. चार भक्कम खांबच जसे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष ही त्यांची नावं आहेत. या धर्माचा स्पष्ट अर्थ आहे, 'धृ – धारयति इति धर्मः।' जिवाच्या पूर्ण विकासासाठी त्याची संस्कारशील निकोप धारणा करतो, तो 'धर्म' होय!!

"विसरू नका. अशा जीवनदायी सत्यधर्मासाठी जीवनात चारी पुरुषार्थांची नितांत आवश्यकता आहे. शुष्क कर्मकांड म्हणजे धर्म नव्हे! धर्मालाही कधी–कधी ग्लानी येऊ शकते. तो समूळ लडखडू शकतो. अधर्माचा प्रभाव वाढल्यानं अशा कोसळत्या धर्माला

निकरानं सावरावं लागत.

"क्षत्रियांचं तर ते आद्य कर्तव्यच आहे. ते पार पाडण्यासाठी मला वाटते, ती सर्वसंमत चौदा विद्यांशिवाय सर्वांत महत्त्वाची विद्या आत्ताच सांगून ठेवतो. ती म्हणजे 'युद्धविद्या' . 'शस्त्र' आणि 'अस्त्र' अशी तिची दोन प्रमुख अंगं आहेत. अस्त्रांत वरुण, वायू, अग्नी, पाशुपत, पर्जन्य, प्रस्वाप, नारायण व ब्रह्मास्त्र ही प्रमुख आहेत. त्यांचं मंत्रासह प्रक्षेपण व परस्पर निरोधन मी क्रमशः तुम्हाला शिकवीन. शस्त्रांत खड्ग, तोमर, गदा, भल्ल, भृशुंडी, मुसल, शतघ्नी, परिघ, अग्निकंकण, चक्र, शर–चाप इत्यादी प्रमुख आहेत. शर–चापालाच धनुर्विद्या म्हटलं आहे. काही जाणत्या भाष्यकारांनी तर अमोघ गती व अचूकता ध्यानी घेऊन या विद्येला वेदाचं स्थान दिलं आहे. लक्षात घ्या, 'धनुर्विद्या' हा पाचवा वेदच मानला आहे.

"या धनुर्वेदाची प्रमुख अंगं आहेत, चार. दीक्षा, संग्रह, सिद्धी आणि प्रत्यक्ष प्रयोग ही ती चार अंगं होत.

'दीक्षा' म्हणजे हाताळावयाच्या धनूला प्रथम समंत्र वंदन करणं. नंतर धनुष्य डाव्या हातात त्याच्या अचूक मध्य पकडून तोलून धरणं. प्रथम खालील टोक धरतीला टेकवून थोडंसं उभं उचलून हा मध्य काढावा लागतो. लागलीच उचललेलं खालील टोक पुन्हा धरतीला टेकवून डाव्या हातानंच वरील टोकाकडे जावं. त्याच हातानं धनुष्याला एका झटक्यात बाक द्यावा. उजव्या हातानं निमिषात त्याची प्रत्यंचा चढवावी. प्रत्यंचेचा एक–दोनदा टणत्कार काढून धनुष्य सुलक्षणी आहे की नाही, याची खातरी करून घ्यावी. लक्षयाकडे बघत पाठीवरच्या तूणीरातून स्पर्शानंच ओळखून हवा तो जिद्म, सूची, सुवर्णपंख, चंद्रमुखी, नाराच, बस्तिक बाण खेचून घ्यावा. या सर्व प्रकाराला 'दीक्षा' म्हणतात.

"'संग्रह' म्हणजे घेतलेला बाण मस्तकी लावून गुरुस्मरण करून, प्रक्षेपणाचा मंत्र डोळे मिटत स्वत:शीच उच्चारणं. बाण प्रत्यंचेवर चढविणं. त्याचं कानाकडील पुच्छ, धनुर्धर म्हणून एक डोळा मिटलेली आपली दृष्टी, लक्षयाचा मर्मवेध या सर्वांचा 'संग्रह' साधावा.

"'सिद्धी' म्हणजे यातील योगाचं अंग आहे. संग्रही स्थितीत वाहत्या हवेचा वेध घेत, पाहिजे तेवढ्या समतोल हवेनं वक्ष भरून घ्यावं. पवित्रा स्थिर व सिद्ध करावा. धनूचा योग सिद्ध होईल.

"'प्रयोग' म्हणजे शराचं प्रत्यक्ष प्रक्षेपण. निमिषात वेधलेल्या लक्षयावर बाण अचूक प्रक्षेपित करावा. भरलेलं वक्षही रितं करावं." त्यांच्या धीरगंभीर बोलांनी कुटीभर शांतताच शांतता पसरली.

"जशा चौदा विद्या आहेत, तशा जीवनाला सर्वांगसुंदर व परिपूर्ण करणाऱ्या कला आहेत, चौसष्ट! शक्यतो त्या सर्वच तुम्हाला अर्थांसह यथाक्रम विकलून दाखवीन मी. या कलांत सर्वश्रेष्ठ पहिली कला आहे, ती म्हणजे 'संगीत' . सा, रे, ग, म, प, ध, नि असे तिचे अमर सप्तसूर आहेत. खर्ज, पंचम, सप्तक अशा त्यांच्या गती आहेत. भूप, मल्हार, यमन, मालकंस, कानडा, आसावरी, भैरवी अशा कितीतरी विविध राग, उपरागांचा विशाल वटवृक्ष हे मूळ सप्तसूर समर्थपणे पेलून धरतात.

"संगीतच सर्वश्रेष्ठ ललितकला का? तर कुठल्याही मध्यस्थाशिवाय संगीत श्रोत्यांच्या थेट आत्म्यालाच भिडू शकतं. संगीताच्या एका आलापात सांगता येईल ते

महाकाव्याच्या एका पर्वातही नाही सांगता येणार. तरीही संगीत ही ‘विद्या’ मानलेली नाही; ती ‘कला’ च मानलेली आहे, हे विसरू नका.”

अत्यंत खोल व धारदार झालेली त्यांची अमृतवाणी आता ज्ञानाच्या अथांग आकाशातील तारकाच तारका खुडून उधळू लागली.

“चर्मचक्षूंना म्हणजे दृष्टीला दिसतं ते ‘विश्व’ . त्यापलीकडे अनंत आहे, ते ‘ब्रह्मांड’ . या असीम विश्वातील आपली धरती कितीतरी मूलभूत अशा महाभूतांच्या नियमांनी बद्ध आहे. यातील पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही पंचमहाभूतं प्रमुख आहेत.

“शांतपणे नीट ध्यानी घ्या, आकाश व अवकाश यांत स्पष्ट अंतर आहे! आकाश निळ्या वर्णात स्वच्छ दिसतं. अवकाश त्या पलीकडे आहे. अनंत, असीम आहे. कृष्णवर्णी – काळं आहे ते! काय बलरामा, समजलं?” त्यांनी मध्येच दादाला चाचपलं.

तो पटकन उत्तरला, “कृष्ण आहे ते–ते असीम आहे, अनंत आहे!” आचार्य आणि मी दोघंही दादाकडे बघून त्याच्या दुहेरी उत्तराला हसलो. तो मात्र अरागस, चौकस चर्या करून तसाच राहिला.

आचार्य पुढे बोलू लागले, “अवकाशावर चैतन्यमय प्रकाशरूपी प्राणतत्त्व प्रभाव टाकतं. मगच जड व चैतन्ययुक्त विश्व साकारू लागतं. हे विश्व क्रमश: विकसन पावतं आहे. त्या विकसनाचा एक परमोच्च बिंदू ठरलेला आहे. त्यानंतर मात्र पुन्हा हे विश्व संकोच पावणार आहे. त्यासाठी एक परमनीच बिंदू ठरलेला आहे. त्यानंतर अवकाशावर पुन्हा प्राणतत्त्वाचा प्रभाव, पुन्हा विकसन, पुन्हा संकोचन असं हे चक्र सतत कोटयवधी वर्षं चाललं आहे. चालणार आहे.

“हे जीवनसत्य कळण्यासाठी तुम्हाला आणखी एक जीवनसत्य शांतपणे नीट समजावून घेतलं पाहिजे. ते म्हणजे ‘काळ’ हे होय. दिवस, रात्र, मास, वर्ष, तप, युग यांनी आपण काळ मोजतो. बारा वर्षांचं एक तप होतं, हजार तपांचं एक युग होतं, ब्रह्माचा एक दिवस अशा एक हजार युगांचा असतो. अशा कितीतरी ब्रह्म दिवसांनी एक ‘कल्प’ साकारतो. थोडक्यात ‘कल्प’ म्हणजे चारशे बत्तीस दशलक्ष वर्षं होतात!”

सर्व शिष्यांना किचकट नि क्लिष्ट गणिताच्या कोडयात घालून, क्षणैक थांबून आचार्य स्वत:शीच मंद हसले. प्रश्न करून त्याचं उत्तरही देताना म्हणाले, “असा हा अनंत काळ कुणालातरी, कधीतरी मोजता येईल काय? नाही. म्हणूनच काळ हा अखंड आहे! त्याला आदी आणि अंतही नाही. त्याला धरून ‘जीवन’ हे असीम आहे, अनंत आहे, चिरंतन आहे. हे सत्य जाणणारा तो द्रष्टा होय. आणि स्पष्टपणे मी ‘काळ’ च आहे आणि जे–जे जीवन म्हणून आहे, तेही मीच आहे, असं म्हणणारा, ते भान अहोरात्र ठेवणारा, तर ‘परमद्रष्टा’ होय. कुणी सांगावं, तुमच्यातच असा एखादा परमद्रष्टा असूही शकेल!”

अचानक थांबून, खाडकन डोळे उघडून आचार्य ठणठणीतपणे म्हणाले, “काय श्रीकृष्णाऽ?”

माझ्याकडे बघून ते पुन्हा मंदपणे अर्थगर्भ हसले! मीही त्यांना प्रतिबिंब वाटावं असंच केवळ हसलो. बोललो मात्र काहीच नाही. सर्व आश्रमकुमार आम्हा दोघांकडे पुन्हा नुसतं बघतच राहिले.

विषय संपूर्ण पालटत आचार्य पुढे म्हणाले, “आपल्या आत्मशक्तीच्या सर्वांगीण विकासाला मोठी खीळ घालतो, तो ‘अहंकार’ . त्याचे नाना प्रकार आणि पैलू आहेत. सत्तेचा, सामर्थ्याचा, संपत्तीचा, सौंदर्याचा, कीर्तीचा कुठलाच अहंकार जिवाला कधीच

क्षणभरही पुढे जाऊ देत नाही.”

“बलरामा, सांगशील काय, सर्वांत घातक अहंकार कोणता तो?” आचार्यांनी दादाला अचानक पेचात टाकलं! तो पुन्हा पटकन उत्तरला, “ सामर्थ्याचा अहंकार आचार्य!”

“नाही बलरामा, ज्ञानाचा! आध्यात्मिक साक्षात्काराच्या ज्ञानाचा अहंकार हा सर्वांत घातक! फलभारांनी वाकलेला आम्रवृक्ष असावा तसा साक्षात्कारी ज्ञानवंत सदैव नम्र असावा. तसं झालं तर ज्ञानाच्या सुवर्णाला सत्याचा स्वर्गीय सुगंध प्राप्त होतो.

“लक्षात घ्या – जीव नेहमी तीन परिमाणांत वावरत असतो. लांबी, रूंदी, उंची किंवा खोली ही ती परिमाणं होत. अखंड काळाचं चौथं परिमाण ज्याला कळलं व ते ज्यानं नम्रपणे स्वीकारलं तोच ‘पुरुषोत्तम’ होय. दुसरीही काही परिमाणं आहेत. ती नंतर कधीतरी सांगेन. अर्पणमस्तु!” पहिले काही शब्द ओठांतच अर्धवट पुटपुटत आचार्य सांदीपनींनी हलके–हलके आपले डोळे मिटले. ते सहजसमाधीत गेले.

प्रथम मी, दादा आणि उद्धव असं त्रिकूट एकाच कुटीत राहत होतं. काही दिवसांतच आमच्या कुटीत आणखी एक स्नेही आश्रमकुमार आला. सौराष्ट्राचा सुदामा. आता त्रिकुटाची चौकडी झाली.

सुदामा किरकोळ अंगयष्टीचा, काटक, गौरवर्णी व अगदी साधासुधा, अश्राप, अरागस ब्रह्मकुमार होता. आजवरच्या विविध अनुभवानं माझी स्नेहाविषयी एक बळकट व सर्व तऱ्हेच्या उलटसुलट चाचण्या लावून बांधलेली पक्की धारणा तयार झाली होती. निखळ स्नेहाला तो कसा स्फुरतो, वाढतो व दृढ होतो, याची काही शब्दांत सांगता येतील अशी कारणं नसतात. ‘स्नेह’ म्हणजे जन्मजन्मांनी साधलेला जीवमेळ असतो. त्याचा उगम शोधायचा नसतो. अंत कल्पायचा नसतो. स्नेह केवळ अनुभवायचा असतो.

उत्स्फूर्त स्नेहभावाचं बोलणारा सुदामा मला आणि दादाला लवकरच प्राणप्रिय झाला. उद्धव तर आमचाच होता. आम्ही चौघे नव्हतोच. देहा–मनानं एकरूप झालेलं एक चौकोनी अस्तित्वच आमच्या रूपानं आचार्य सांदीपनींच्या अंकपाद आश्रमात सुखानं नादूं लागलं.

नेहमीच्या ज्ञानबोधाच्या सत्रात आचार्यांनी एकदा प्रथमच ललितकलांना स्पर्श केला. आसावलेल्या आणि उत्सुक अशा आम्हा सर्वांना त्यादिवशी अपार प्रेममय दृष्टीनं निरखून मग ते नादमधुर स्वरात शांतपणे म्हणाले, “मत्प्रिय आश्रमकुमारहो! संगीतानंतर दुसरी महत्त्वाची कला आहे, ती ‘आलेख’ ही. आलेख म्हणजे साहित्य आणि चित्रकला. ‘स’ अधिक ‘हित’ म्हणजे साहित्य! वाचकांचं कणभर तरी हित साधतं ते साहित्य. त्याचं नकळत कणभर तरी उन्नयन करतं ते सत्यार्थानं ‘साहित्य’! थेट वाचकांच्या हृदयालाच भिडतं ते. संगीतासारखीच आहे ही कला. मूलाधार केंद्रापासून म्हणजे जिवाच्या देठापासून जशी परावाणी स्त्रवते, तसं जाणिवेच्या देठापासून स्त्रवतं त्याला ‘अक्षर’ म्हणजे क्षय नाही असं साहित्य म्हणतात. ‘परासाहित्य’ म्हणतात. मी सांगितलेले सर्व वेद असे अक्षर साहित्याचे उत्कृष्ट नमुने आहेत. डोळ्यांवाटे हृदयाला भिडणाऱ्या चित्राचाही या आलेख कलेत समावेश आहे.

“संगीत काय, साहित्य काय, चित्र काय चौसष्ट कलांपैकी कुठल्याही कलेच्या निर्मितीला सशक्त असावं लागतं, ते कलावंताचं परास्पर्श झालेलं निकोप, निर्लेप, निरामय मन! असं निकोप मन, निकोप शरीरातच वास करू शकतं. यासाठी देह हे

विश्वदेवाचं देऊळ आहे, असं वेदकारांनी प्रारंभीच अर्थपूर्णपणे म्हटलं आहे. अशा निकोप देहसंपत्तीचं स्वर्गीय लेणं मानवाला देणारी योगासारखी दुसरी विधा नाही.

"मी तर 'योग' ही पंधरावी विद्याच मानतो." आचार्य मनी काहीतरी योजून थांबले. त्यांनी आपली शांत दृष्टी शिष्यगणांवर एकदा चौफेर फिरविली. मग ती माझ्यावरच अचल रोखून ते म्हणाले, काहीसे आज्ञा केल्यासारखे, "श्रीकृष्णा! तिथून ऊठ! तुझ्या दादासह व उद्धव, सुदाम्यासह हा असा माझ्या सरळ समोरच येऊन बैस!" क्षणांतच मी, दादा, उद्धव व सुदामा आज्ञाधारकपणे नम्रतेनं उठलो. तत्परतेनं त्यांच्यासमोरच येऊन बसलो. आता प्रत्यक्ष आचार्यांनीच डोळे मिटून घनगंभीर सुरांत गुरुवंदना साक्षात उभी केली. हा अनुभव सर्वांना प्रथमच येत होता. प्रत्यक्ष गुरूंच्या विमल मुखातून गुरुब्रह्माची सत्त्ववंदना सुरू झाली.

'ॐ गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णुऽ' माझ्या मनात एक विचार पटकन तरळून गेला – 'खरंच आचार्यांचे आचार्य कोण असावेत!...' आता पर्णकुटीतील छत्राची कशामुळेही असो गवतकाडीही तुटली तरी ऐकू येईल, अशी शांतताच शांतता पसरली. गुरुदेव सांदीपनी मला, दादा, उद्धव, सुदामा व सर्वांनाच 'योगवेद' ऐकवू लागले. नेहमीपेक्षा त्यांची वाणी खूपच वेगळी व तेजवंत झाली. परावाणीत लय पावली. तिला साक्षात देवी शारदेच्या वीणावाणीचा झंकार लाधला. पूर्णतः आत्मलीन होत त्यांनी नेत्र मिटते घेतले. त्यांच्या कंठातून शब्दस्रोत स्त्रवू लागला. हिमालयाच्या उत्तुंग शिखरातून हिमगंगेचा अरोध ओघच लयीत कोसळावा तसा. हा श्रवणानंद केवल अवर्णनीय होता. अविस्मरणीय होता तो.

"श्रीकृष्णाऽ, बलरामा, उद्धवा–सुदामा, सर्व शिष्यहो! आता मनःपूर्वक ऐका! ज्याला 'सांख्ययोग' म्हणतात तो! सर्वांत महत्त्वाचा आहे हा जीवनयोग.

"कुठल्याही जिवाच्या नाभीस्थानाजवळ आहे तो जिवाचा 'मूलकंद' होय. तेथून बहात्तर हजार नाड्या निघतात. त्या सर्व देहभर व्यवस्थेनं पसरलेल्या आहेत. प्रत्येक मानवी शरीरात सहा चक्रं आहेत. त्यातील कटिस्थानाखाली मूलाधार चक्रात 'कुंडलिनी' नावाची' शेंदरी, भगवती शक्ती सर्पाप्रमाणं वेढा घालून अधोमुख अशी ठाण मांडून बसलेली आहे. केव्हापासून ते कुणालाही नाही सांगता आलेलं!

"तिच्या वर दहा आणि खाली दहा अशा मुख्य नाड्या आहेत. दोन–दोन आडव्याही गेलेल्या नाड्या आहेत. अशा एकूण चोवीस प्रमुख व उप नाड्यांमध्ये रक्तरूपानं प्राणशक्ती अहोरात्र सदैव वाहत असते. सूर्यकिरणवत अरोध नांदत असते. यासाठी जीवन म्हणजे काय हे नीट कळण्यासाठी प्रत्येकाला प्रथम रक्त म्हणजे काय हेच नीट कळलं पाहिजे!

"रक्त म्हणजे जिवाचा संस्कारशील हुंकार! तो अहोरात्र वाहून नेणाऱ्या दहा प्रमुख नाड्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. इडा, पिंगला, सुषुम्ना, गांधारी, हास्तिजिव्हा अशा पाच व पुषा, यशस्विनी, अलंबुषा आणि कुहू शंखिनी अशा नावाच्या दुसऱ्यां पाच आहेत. या दहा नाड्यांतही इडा, पिंगला आणि सुषुम्ना या तीन अतिमहत्त्वाच्या सर्वांत प्रमुख नाड्या आहेत.

"शरीराच्या डाव्या भागातून वाहणाऱ्या अनेक नाड्यांचे फाटे घेऊन सतत कार्यरत असते, ती 'इडा' ही नाडी होय. शरीराच्या उजव्या भागातील अनेक रक्तशाखांना घेऊन कार्यरत असते, ती 'पिंगला' नाडी होय. या दोघींच्या मधून पाठकण्याच्या

मज्जारज्जूतून सतत कार्यरत असते, ती सर्वाधिक महत्त्वाची नाडी म्हणजे ‘सुषुम्ना’ होय. या सुषुम्नेतील सर्वांत खालच्या मूलाधारचक्रात उलटे तोंड करून ती कैवल्यदायी, दिव्य, भगवती शक्ती सर्पाकार बसली आहे. ती आहे ही जाणीवच प्रथम पूर्वपुण्याईनं फार थोड्यांना होते. तिला जागृत करण्याची इच्छा त्यातील काहींनाच होते. त्यातून यश तर मोजक्यांनाच मिळतं आणि तिला प्रबळ इच्छाशक्तीवर हवं तसं खेळवणं, हे तर ‘परमद्रष्ट्या’ अशा एखाद्या योगयोगश्वरालाच साधतं! ती भगवती कुंडलिनी जागृत होऊन सहा चक्रं भेदून मस्तकांतील ब्रह्मरंध्राला भिडू शकते. त्या कैवल्यद्वारातून प्रत्यक्ष असीम, तेजोमय, अनंत परमात्म्याशी संधान साधू शकते. परमात्मा म्हणजे असीम, स्थलकालातीत, निर्माणशील, भाररहित ऊर्जेचं भान!

“ही भगवती कुंडलिनी शक्ती जागृत करणाऱ्या नियमबद्ध शास्त्रालाच ‘सांख्ययोग’ म्हणतात. या योगाची आठ अंगं आहेत. यम, नियम, प्रत्याहार, आसन, प्राणायाम, ध्यान, धारणा आणि समाधी ही ती आठ अंगं आहेत. तशी ही आठही अंगं महत्त्वाची असली, तरी त्यातील प्राणायाम हे सर्वांत महत्त्वाचं अंग आहे. ‘प्राणायाम’ म्हणजे जिवाची प्राणशक्ती जो ‘श्वास’ त्याचंच केलेलं ‘शास्त्रशुद्ध नियमन’ होय.

“नीट ध्यानी धरा – श्वास हा तर सूर्यगतीशीच निगडित आहे! – सहसा दिवसा उजव्या नाकपुडीतून श्वसन चालू असतं. त्याला ‘सूर्यस्वर’ किंवा ‘सूर्यप्रवाह’ चालू आहे, असं म्हणतात. रात्री डाव्या नाकपुडीतून श्वसन चालू असतं, त्याला ‘चंद्रस्वर’ किंवा ‘चंद्रप्रवाह’ म्हणतात. श्वासावर नियंत्रण आणून काही योगी दिवसा व रात्री दोन्हीही नाकपुड्यांनी श्वसन चालू ठेवू शकतात. जे दिवसा चंद्रस्वर व रात्री सूर्यस्वर चालू ठेवू शकतात, असे योगी मात्र क्वचितच असतात. त्यात कोणताही ‘चमत्कार’ नसतो! हे सर्व देहशास्त्रयुक्त आहे. अखंड अभ्यासानं सहजसाध्य आहे.

“कुमारहो! असे कितीतरी महानुभाव आपल्या या ‘अंकपाद’ आश्रमात आहेत. तुम्ही क्षत्रियकुमार आहात; म्हणून ध्यानी ठेवावं. नाडीचा सूर्यप्रवाह चालू असताना शास्त्राभ्यास करणं, कठीण विद्यांचं पठण करणं, हे हितकर ठरतं. तसंच शत्रूच्या निर्दालनाचा निग्रह करणं, हाती शस्त्र धारण करणं, हत्ती, घोड्यावर स्वार होणं, इत्यादीही हितकर ठरतं.

“चंद्रप्रवाह सुरू असताना दान करणं, व्याधींची चिकित्सा करणं, मैत्रीसाठी संधी करणं, इत्यादी कर्मं हितकर ठरतात.

“‘सुषुम्ना’ नाडीवर नियमन असताना केवळ जगदीश्वराचं स्मरण व चिंतन करणं योग्य. जगाच्या कल्याणाची इच्छा करून, या वेळी युद्ध असलंच तर केवळ ‘परमेश चिंतन’ च योग्य ठरतं. ज्या योग्याची सुषुम्ना नाडी सूर्यस्वरात वाहत असेल, त्याला दिलेला कोणताही शाप व्यर्थ जातो. तो कधीच कार्यी लागत नाही.

“हा सांख्ययोग जगातील इतर कुठल्याही शास्त्रापेक्षा समजून घ्यायला कठीण आहे. आचरायला त्याहून अधिक कठीण! मात्र तो एकदा अंगवळणी पडला की, जीवात्मा सहजपणे भूत, वर्तमान, भविष्य अशा त्रिकालांत व पाताळ, धरा, स्वर्लोक अशा त्रिलोकांतही संचारू शकतो. वायू व प्रकाश यांहूनही अधिक गती त्याला प्राप्त होऊ शकते. या शास्त्राचा अभ्यास किंवा स्वाध्याय करताना कुठल्याही जीवात्म्याला काही ‘सिद्धी’ सहज प्राप्त होऊ शकतात. खऱ्या योग्यानं त्यांचा फारसा उपयोग मात्र कधीच करू नये. त्यामुळे अंती शक्तिक्षय होतो.

"जागृत कुंडलिनीच्या सामर्थ्यावर ब्रह्मरंध्राचा भेद करून जेव्हा जीवात्मा ब्रह्मांडसंचारी, अनंत व असीम परमात्म्याशी एकरूप होतो, तेव्हा त्याला 'समाधिस्थिती' असं म्हणतात. या समाधिस्थितीत लहानथोर कार्ये करणाऱ्याला 'योगेश्वर' म्हणतात.

"अशा समाधिस्थितीत कैवल्यरूप म्हणजे कृतार्थ होऊन जो जीवात्मा देह त्यागतो, तो मोक्षाप्रत जातो. अशा मोक्षाचीही कसलीच अपेक्षा न धरता प्रेमासाठी प्रेम, कर्मासाठी कर्म, असं जीवनभर वावरताना देठ सोडून फळानं वृक्ष त्यागावा तसा सहज तो देह त्यागतो, त्याला 'योगयोगेश्वर' म्हणतात!! त्यानं सहज उच्चारलेली जीवनतत्त्वं मानवजातीला युगानुयुगं मार्गदर्शक ठरतात. ती तत्त्वं युगायुगांची धारणा करतात म्हणूनच त्या तत्त्वांचा अधिकारी पुरुष 'युगंधर' ठरतो."

सांख्ययोगाची दुर्लभ माहिती सांगताना आपोआप डोळे मिटलेल्या आचार्यांनी आता हळूहळू डोळे सताड उघडून ते माझ्यावरच रोखले. कितीतरी वेळ ते माझ्याकडे तसेच एकटक, अचल, अबोल नुसते बघतच राहिले. पुन्हा आश्रमभर दृष्टी फिरवून म्हटलं तर सर्व आश्रमकुमारांना नाहीतर कुणालाच नाही, असं उद्देशून ते म्हणाले, "कुणी सांगावं, तुम्हा आश्रमकुमारांत असा परमद्रष्टा युगंधर 'योगयोगेश्वर' नाही म्हणून!" त्यांच्या अशा चकभूल करणाऱ्या विधानांचा मला आता चांगलाच परिचय झाला होता. हा असला क्लिष्ट विषयच टाळावा म्हणून मीच त्यांना प्रश्न केला. तोही नेहमीच्या पद्धतीनं हसतच, "आचार्य, आपण आतापर्यंत सांगितलं त्या 'तंदुल–कुसुमावली, 'उदकघात', 'धारणमातृका' आणि 'आकारज्ञान' या ललितकला आम्हाला थोड्या अधिक समजावून सांगितल्या तर बरं होईल!"

ते ऐकून आचार्य लहान मुलासारखे खळाळ हसले. मग म्हणाले, "ठीक आहे. ऐक! 'तंदुल–कुसुमावली' म्हणजे तांदूळ–फूल यांच्या साहाय्यानं सुरेख रांगोळी किंवा कलाकुसर काढणं. 'उदकघात' म्हणजे जलक्रीडा करणं किंवा पिचकारी मारणं. 'धारणमातृका' म्हणजे स्मरणशक्ती वाढवण्याची कला. 'आकारज्ञान' म्हणजे भूगर्भातील खाणींचं सखोल ज्ञान आणि आजची महत्त्वाची कला म्हणून ऐक. तुला तर ती ऐकावीच लागणार. श्रीकृष्णा, तिचं नाव आहे छलिकयोग!" सर्वांनाच गोंधळात टाकत, ते लहान बालकासारखं पुन्हा खळाळ–खळाळ हसले.

आचार्यांचे बोल ऐकत असताना नकळतच सर्व माना माझ्याकडे वळल्या. मीही त्यांना हसून उत्तर देताना सहज म्हणालो, "मला चांगली माहीत आहे ही कला! 'छलिकयोग' म्हणजे चाणाक्षपणा करणं, सद्हेतूनं छलकपट करणं! पण आपण मला संपाठ्य, मानसीकाव्यक्रिया, अक्षरमुष्टिकाकथन, अभिधानकोष आणि म्लेंच्छित कला–विकल्प या कलांविषयी काही सांगावं." मीही त्यांना चाणाक्षपणे तसंच दुसरीकडे नेलं!

"अगदी सोपं आहे ते. 'संपाठ्य' म्हणजे दुसऱ्याचं ऐकून ते जसंच्या तसंच म्हणणं. म्हणजे थोडक्यात दुसऱ्याचं अनुकरण करणं, प्रत बनविणं. 'मानसीकाव्यक्रिया' म्हणजे शीघ्रकवित्व, 'अक्षरमुष्टिकाकथन' म्हणजे करपल्लवी करून हाताच्या मूकपणे नुसत्या हालचाली करून संदेश देणं. 'अभिधानकोष' म्हणजे अमोघ वक्तृत्व, तसंच म्लेंच्छित कला–विकल्प म्हणजे विदेशी भाषा जाणणं."

आता संपूर्ण आचार्यकुटीतील आश्रमकुमारांचं ध्यान ललितकलांकडे वेधलं गेलं होतं. त्याचा लाभ उठवत मी आचार्यांना अधिक बोलतं करण्यासाठी हेतुत: विचारलं,

“गुरुदेव, ‘दुर्वाचयोग’, ‘वस्त्रगोपन’, ‘क्रियाविकल्प’ अशा कलांचा निर्देश आपल्या कालच्या बोलण्यात निसटता झाला. त्या आम्हा सर्वांना कळल्या तर बरं होईल.”

“ठीक, ठीक” म्हणत आचार्य पुन्हा स्वतःशीच हसले. त्यांनी त्याही कला विकलून दाखविल्या.

“श्रीकृष्णा, ‘दुर्वाचयोग’ म्हणजे कठीण शब्दांचा योग्य असा सोपा अर्थ लावणं. ‘वस्त्रगोपन’ म्हणजे फाटलेलं वस्त्र पुन्हा अचूक शिवणं, थोडक्यात आवश्यकता वाटल्यास ठिगळ लावणं! आणि तू विचारलीस ती ‘क्रियाविकल्प’ ही कला तर फार कौशल्याची आहे. एखाद्या वस्तूच्या क्रियेचा प्रभाव पालटणं, असा तिचा अर्थ आहे. म्हणजे पाण्यापासून शीतलता देण्याऐवजी उष्णता देणं, उलट अग्नीपासून उष्णतेऐवजी शीतलता निर्माण करणं!

“वाद्य, नृत्य, नाटय या कलांचा तर तुम्हा सर्वांना इथं येण्यापूर्वीच चांगला परिचय झालेला असणार. आता नाटयाबद्दल अधिक बोलतो. नाटय हे जीवनाला नुसता दर्पण दाखवतं. नाटयगृहात दर्शक पृथ्वीच्या गतीप्रमाणंच डावीकडून उजवीकडे आपली दृष्टी सहज फिरवतो. म्हणून नेपथ्यही उजवीकडे चढत्या क्रमानं आशयपूर्ण व आकर्षक मांडावं. यासाठी ‘नेपथ्य’ हीसुद्धा स्वतंत्र कला मानली आहे. रंगमंचाच्या डाव्या कोपऱ्यात नेहमीच पात्रांचे परिचय, विनोद व हलक्याफुलक्या घटना घडाव्यात. मध्यभागी नेहमी संघर्षमय महत्त्वाच्या घटना आणि समरप्रसंग यावेत. उजव्या कोपऱ्यात खोलवर कटकारस्थाने व मृत्युप्रसंग दाखविणं प्रभावी ठरतं.

“ ‘रत्नपरीक्षा’, ‘शयनरचना’, ‘देशभाषा ज्ञान’, ‘मालागुंफन’ आणि ‘द्यूत’ या कलाही तुम्हाला चांगल्याच माहिती असणार.”

“द्यूत ही कला आहे की काय आचार्य?” क्वचितच प्रश्न विचारणाऱ्या उद्धवानं मध्येच प्रश्न केला.

“होय, कपट न करता काही काळ मनोविनोदनासाठी केलेलं द्यूत खेळासारखंच रंजक मानलेलं आहे.” आता आचार्य एकापाठोपाठ एक ललितकलांचा अर्थ आमच्या कानी घालू लागले. कला कलेकलेनं रंगू लागल्या. “‘विशेषकच्छेद्य’ म्हणजे तिलक लावण्यासाठी साचे करणं, ‘पुष्पास्तरण’ म्हणजे फुलांची समतल शय्या तयार करणं, ‘दशन वसन नागराग’ म्हणजे दात, वस्त्र व शरीराची विविध अंगं कलापूर्ण ढंगानं सजविणं. ‘मणिभूमिकाकर्म’ म्हणजे ऋतुमानाप्रमाणं घर रंगवणं. ‘उदकवाद्य’ म्हणजे जलतरंग वाजवणं. ‘चित्रयोग’ म्हणजे वृद्धाला तरुण करणं. ‘केशशेखरापिऽयोजन’ म्हणजे मुकुट तयार करणं. ‘कर्णपत्रभंग’ म्हणजे पानाफुलांची कर्णफुलं तयार करणं. ‘गंधयुक्ती’ म्हणजे सुगंधी द्रव्यं तयार करणं. ‘भूषणयोजन’ म्हणजे अवयवांनुसार सुयोग्य अलंकार घालणं, ‘इंद्रजाल’ म्हणजे युद्धकलेतील चाणाक्षपणा. या इंद्रजालांचं श्रीकृष्णा, तुला अधिक स्पष्टीकरण आवश्यक आहे काय?” आचार्यांनी माझ्यावर डोळे रोखून विचारलं.

“मुळीच नाही. आचार्यांनी पुढे चलावं.” मी हसत उत्तरलो.

“‘कौचुभारयोग’ म्हणजे कुरूपाला सुरूप करणं.”

त्यांच्या मुखातून एक–एक ललितकलेचा अर्थ ऐकताना शिष्यांत मंद हास्याची अधूनमधून लाट फिरू लागली. जीवन किती विविध ढंगी आहे, हे त्यांना आकळत चाललं.

“कुमारहो! ‘भक्षयविकारक्रिया’ म्हणजे स्वयंपाक करणं होय. ‘पानकरस’ म्हणजे

औषधी काढे तयार करणं होय. ‘सूत्रकर्म’ म्हणजे वेलबुट्टी काढणं. ‘प्रतिमाला’ म्हणजे अंत्याक्षराची योग्यता ठरवणं. ‘सूचितरंग’ म्हणजे शिवणकाम करणं. ‘प्रहेलिका’ म्हणजे उखाणे घालणं. ‘पुस्तकवाचन’, ‘केशमार्जन’, ‘यंत्रमातृका’ म्हणजे यंत्र निर्माण करणं, याही कला मानल्या आहेत.”

“यंत्र या शब्दाचा नेमका अर्थ काय होईल आचार्य?” बलरामदादानं मध्येच प्रश्न केला. तो फारसा बोलत नसे, पण बोलला की मात्र नेमकं बोले. खिळवून ठेवणारं.

काही वेळ थांबून आचार्य शांतपणे उत्तरले, “यंत्र म्हणजे अंगभूत रचनेवर गती घेणारा आकारसमूह! तसं बघितलं तर तुम्ही आश्रमात आलात तो रथ हे एक यंत्रच होतं. विसरू नका, यंत्राचा पाया आहे चक्र!”

आमच्या आश्रमजीवनाचं ज्ञानचक्र असं चौसष्ट दिवस अविरत फिरलं! काय आणि किती शिकलो आम्ही या चौसष्ट दिवसांत? त्याला पार असा काही उरला नाही. नावांनाही अंत नाही असे कितीतरी विषय बारकाव्यांसह समूळ शिकलो आम्ही. चौसष्ट युगांच्या योग्यतेचे ठरले हे चौसष्ट दिवस! सर्व विद्या, चौसष्ट कला, वेद, उपनिषदं, मीमांसा, ब्राह्मण्यं, आरण्यकं पुराणं अशा झाडून साऱ्या विषयांत आम्ही पारंगत झालो. आणि तो दिवस प्रकटला. जो जीवनात मी कधीच विसरू शकलो नाही तो – गुरुदक्षिणेचा!

सर्वप्रथम आज आचार्य ब्राह्मी मुहूर्तापूर्वीच उठले. ते एकटेच क्षिप्रेत सुस्नात होऊन, सर्व आन्हिकं आवरून आपल्या कुटीत आले. शिष्यांच्या भावी जीवनाच्या वाटचालीला निरामय शुभेच्छा देण्यासाठी मृगाजिनावर ध्यानरत झाले. केव्हाच देहातीत होऊन बसले होते ते.

त्यांच्या पाठोपाठ निद्रेतून जागे होणारे आम्ही चौघेच होतो – त्यातही मी पहिला. आता बलरामदादा, उद्धव आणि सुदामाही जागे झाले होते. आमची चौकडी एकमेळानं निघाली. आश्रमाच्या भांडारगृहात ठेवलेल्या आमच्या वस्तूंच्या वेतपेटिका आम्ही प्रमुखांकडून आता परत स्वीकारल्या. आत्ता कुठे नेहमीच्या शंखध्वनीवर इतर पर्णकुटयांतील शिष्यगणांची हालचाल ऐकू येऊ लागली. अद्याप पूर्ण उजाडायचं होतं. झुंजूमुंजूमुळे अर्धवट दिसणाऱ्यां पांढरट पायवाटेनं आम्ही आमच्या नेहमीच्या डुंबणीच्या सरोवराकडे चाललो. का कुणास ठाऊक, सुदामा आज अगदी गप्प–गप्पसा होता. मी उद्धवाला विचारलं, “उधो बंधो, आचार्यांच्या शिकवणुकीतील तुझ्या हृदयाला अधिक काय भिडलं? अस्त्रविद्या, शस्त्रविद्या की चौसष्ट कला?”

“मला म्हणशील तर दादा, सर्वांत आवडलं ते अविस्मरणीय असं आचार्यांनी सांगितलेलं जीवनाचं सखोल तत्त्वज्ञान! वाटतं त्यांच्या चरणांवर गुरुदक्षिणा सादर करावी. इथून परत जाण्यापेक्षा जीवनभर या आश्रमातच गुरुऋणात त्यांच्या चरणांशी वास्तव्य करून त्यांच्या सेवेतच राहावं. जीवनच गुरुदक्षिणा म्हणून अर्पावं त्यांना.” उद्धव आता आमूलाग्र बदललला होता. जाता–जाताच मी हसत त्याचे खांदे थोपटले.

दादाला प्रश्न केला, “बलरामदादा, तुला काय भावलं आचार्यांच्या सान्निध्यात?” त्यानं वक्ष फुलवीत पटकन उत्तर दिलं, “मला आचार्यांची युद्धकलेची शिकवण सर्वांत अधिक स्पर्शून गेली. आपण केलीनंदकाकांकडून शिकलो, ती मल्लविद्या इथं मला अधिक खोलार्थानं समजली.”

हसून शेवटी मी सुदाम्याला प्रश्न केला, “मित्रा सुदामना, तुझ्यावर काय ठसलं. आचार्यांच्या शिकवणुकीतील?” त्याचं माझ्या प्रश्नाकडे मुळी लक्षच नव्हतं! तो कसल्यातरी वेगळ्याच तंद्रीत किंवा चिंतेत होता. जाता–जाताच त्याला गदागदा हलवून मी विचारलं, “अरे, लक्ष कुठं आहे तुझं सुदामा? तुला काय आवडलं गुरुदेवांच्या शिकवणुकीतील, असं विचारतोय मी?”

तसं चाचरत तो म्हणाला, “म – मला आवडली त्यांची आदर्श गृहस्थाश्रमाची शिकवण.”

एव्हाना आमची चौकडी एका प्रशस्त नील सरोवराच्या काठी आली होती. आम्ही हातांतील वेतपेटिका काठच्या दर्भकुरणात अलगद ठेवल्या. मानेवरची आश्रमवस्त्राची गाठ उचलून त्याचाच पोहणीसाठी कासा कसला. चौघंही सरोवरात उतरलो. पाणी आज नेहमीपेक्षा कितीतरी उबदार होतं! वडीलकीच्या अधिकारानं दादानं विचारलं, “आज क्षिप्रेकडे न जाता इकडे कसा काय वळविलास सर्वांचा पुढा तू? तुझी करणी नेहमी कोड्याची असते म्हणून विचारलं!”

“तिथं क्षिप्रेवर सर्वच शिष्यांची दाटी असणार आज दादा. आणि इथं सरोवरात आहेत, तशी कमलफुलंही नाहीत क्षिप्रेत. गुरुदेवांसाठी काही न्यावीत म्हणतो मी.” सरोवरात सपासप हात मारत मी हसून उत्तर दिलं.

आम्ही सहज पांगलो. डुंबणीला पडलो. घटिका परतली. दूरवर पूर्वेळा अवंतीच्या अरण्यातून सूर्यबिंब वर उठलं. अरण्य अंगभर उजळलं. जागतं झालं.

इकडे आश्रमात कुमारांचे जसजसे मनमेळ झाले तसतसे जुळून आलेले चमू आचार्यांना गुरुदक्षिणा अर्पून, आपापल्या रथातून परतूही लागले होते. आश्रमाच्या पूर्वेच्या ‘कश्यप’ नावाच्या मुखद्वारासमोर सजलेले अनेक राजरथ येऊन केव्हाचे रांगेनं तिष्ठत उभे ठाकले होते.

सूर्यबिंब पूर्ण वर आलं. सरोवराला मंडलं घेऊन दमलेले दादा, उद्धव आणि सुदामा काठच्या दर्भकुरणावर उतरलेले मला स्पष्ट दिसू लागले. पेटिकांतून आपआपली सर्व वस्त्रं काढून, धारण करून ते तिघंही माझी वाट बघत बाहेरच थांबले होते.

मी मनसोक्त डुंबत आणि नुसता डुंबतच राहिलो. हेतुत:! माझा या अवंतीच्या अरण्यात हा महत्त्वाचा अंतिम दिवस होता. मनी आचार्यांचा बोध फिरत होता. पाण्यावर हात फिरत होते. ‘जल म्हणजे – जायते यस्मात् च् लीयते यस्मिन् इति जल:’ ‘आकाश – आ म्हणजे पर्यंत, काश म्हणजे पोकळी. दृष्टी भिडेल तिथपर्यंत पसरलेली पोकळीच पोकळी. “पृथ्वी म्हणजे – पृथ म्हणजे विपुल आहे, ती पृथ्वी.’ मी माझ्या रक्ताच्या कणाकणांतून जलाचा अर्थ मुरवून घेताना आकाशातील सूर्याचं हिरण्यवर्णी तेजही डोळ्यांत शक्य तेवढं काठोकाठ साठवून घेत होतो. हा अनुभवच आगळा होता. माझ्यातला अनेकार्थी ‘श्री’ आचार्यांच्या दीक्षेनंतर मला समूळ सापडलाच, असं तीव्रपणे माझं मलाच जाणवत होतं.

आता तर सूर्य चांगला दोन हात वर आला. ‘श्रीकृष्णा, दादा, मित्रवरा बाहेर ये’ अशा काठच्या कुरणातून मारलेल्या आरोळ्या मला स्पष्ट ऐकू येऊ लागल्या. माझा जलतत्त्वाशी आवश्यक असलेला ‘स्नेहयोग’ ही पूर्ण झाला होता. सरोवराला शेवटचं डुंबतं मंडल घेताना मी हाती लागतील ती नीलवर्णी कमळं खुडून घेत चाललो. त्यात कमळकळ्या होत्या, अर्धविकसित पुष्पं होती. बाहेर पडलो तोच काखेत त्यांचा एक

भलामोठा, संमिश्र पेंढा घेऊनच. हातांतील एका कमळकळ्याच्या देठाची साल नखानं पाकळ्यांपर्यंत उकलून तिनंच घट्ट आवळलेला फुलांचा ओलेता गुच्छ मी सुदाम्याच्या हाती दिला.

एव्हाना दादा व उद्धवानं आपले राजवेष व सुदाम्यानं कानटोपी, पायघोळ अंगरखा आणि लाल काठाळीचं धोतर असा ब्रह्मवेष धारण केला होता. नेहमीसारखं दर्भकुरणावर उकिडवं बसून सूर्यकिरणांवर खरपूस अंग सुकवून मी उठलो. उद्धवानं माझी वेतपेटिका समोर आणून उघडली. आणि आचार्यांच्या कल्पक दूरदृष्टीनं मी थक्कच झालो. सर्वांत वरती होती, ती टपोऱ्या, ताज्या शुभ्र फुलांची गुंफलेली रसरशीत सुगंधी वैजयंतीमाला! तिच्या नुसत्या दर्शनाबरोबरच गोकुळातील माझ्या प्रिय सखी राधेच्या किती–किती मुद्राच मुद्रा फिरून गेल्या माझ्या डोळ्यांसमोर.

उद्धवानं हलकेच ती माला उचलली. माझ्या हाती दिली. मी ती एकदा मनसोक्त वक्षभर हुंगली. हिरव्या दर्भकुरणावर अलवार ठेवली. उद्धव हाती देईल तशा एक-एक वस्तू स्वीकारत मी माझा राजवेष धारण केला. कमरेला झळझळीत, मऊसूत सोनपीतांबर कसलं. त्याभोवती निळा शेला आवळला. बाहू व भुजभूषणं, टपोरे मोतीकंठे धारण केले. त्यातील एकात ठसठशीत 'कौस्तुभ' मणी होता. दादानं पुढे होत, सूर्यकिरणांत तळपणारा वेलबुट्टीच्या कुसरकामाचा, मोरपीसधारी, सुवर्णी मुकुट माझ्या दाट, काळ्या-कुरळ्या केशांवर घट्ट बसविला.

शेवटी उद्धवानंच दर्भावरची टवटवीत वैजयंतीमाला उचलून माझ्या कंठी चढविली. टपोरे, भावभरे, नितळ डोळे विस्फारलेला, तांबूस-गौरवर्णी, चंद्रचर्येचा माझा प्रिय उद्धव प्रथम अवाक होऊन दोन पावलं मागंच सरकला. एकटक माझ्याकडे नुसताच बघत राहिला. मग अमाप आनंदविभोर होऊन भराभर बोलला, "दादाऽ, अरे दादा! दृष्टी नाही स्थिरावत रे तुझ्या या रूपावर! वाटतं तुझ्या मुखमंडलावरून फाकणाऱ्या शतसूर्यांची आभा बघून आकाशीचा सूर्यही लाजत असेल या क्षणी! दृष्टच काढली पाहिजे तुझी. थांब!!" म्हणत सुदाम्याच्या हातातील गुच्छातीलच एक टपोरं नीलकमल त्यानं शब्दश: खेचून घेतलंही. आणि माझ्या मस्तकापासून पायापर्यंत तीनदा ते वरखाली घेत इडापिडा टाळत, त्यानं क्षणात माझी चक्क दृष्टही काढली! हातचं नीलकमलांचं निर्माल्य सरोवराच्या नील पाण्यात त्यानं तसंच फेकून दिलं. त्यामुळे दूरवर विरत जाणारे तरंगच तरंग उठले! त्याच्या त्या निरागस बंधुभावानं मला पटकन हसू फुटलं.

आम्ही चाललो आचार्य कुटीकडे. गुरुदक्षिणेसाठी! पुढे दादा आणि उद्धव. मागे-मागे मी आणि माझा प्राणप्रिय सुमित्र सुदामा. पुढच्या दोघांना मी हेतुत: तसं थोडं पुढंच जाऊ दिलं. रेंगाळत चालून सुदाम्याच्या खांद्यावर प्रेमानं हलकेच थोपटत त्याला चाचपून विचारलं, "पहाटेपासून बघतोय मी - तू आज असा उदास-उदास का प्रिय सुदामना? गप्प-गप्प का आहेस?" तो थांबला. म्हणाला, "मित्रा, मी फार पेचात आहे आज. माझ्या सौराष्ट्रातील दरिद्री माता-पित्यांकडून आचार्यांना देण्यासाठी कसलीही गुरुदक्षिणा नाही आलेली! तशी ती येऊही शकत नाही. काय देणार मी आज आचार्यांना गुरुदक्षिणा म्हणून?" चालता-चालता कुणीतरी बळानं रोखावं, तसा थांबलाच तो. अपार-अपार वेदनेनं त्याची प्राजक्तगौर चर्या क्षणातच काळवंडून आली.

"एवढंच? स्वस्थचित्त हो सुदामना! मी तुझ्या हाती हा जो नीलवर्णी कमलफुलांचा गुच्छ दिला आहे, तो उगाच नाही! यापूर्वी दिला होता का कधी तुला असा तो? माझं ऐक!

ही 'नीलवर्णी कमळं' च आचार्यांच्या पायांवर 'गुरुदक्षिणा' म्हणून श्रद्धेनं अर्पून मोकळा हो. नंतर आशीर्वाद माग तू त्यांचा. विश्वास ठेव. ते इतरांपेक्षा शुभदायी आशीर्वाद देतील तुला!"

सुदाम्यानं, थांबून माझ्याकडे पाहिलं. त्याच्या मनावरचं मळभ कुठच्या कुठं पसार झालं होतं.

जेव्हा आम्ही दोघं आचार्यांच्या पर्णकुटीसमोर आलो, तेव्हा सूर्य मस्तकावर येऊ लागला होता. इतर सर्व शिष्य गुरुदक्षिणेचा विधी पूर्ण करून साशीर्वाद आपापल्या देशोदेशी केव्हाच निघून गेलेले होते. आचार्यकुटी विलक्षण शांत-शांत होती.

आम्ही चौघेही आचार्यांसमोर आलो. मी संकेत करताच प्रथम दादा व उद्धव पुढे झाले. गुडघे टेकून आचार्यांच्या चरणांना हात व मस्तक भिडवून प्रथम दादा काही बोलणार तोच आचार्यच म्हणाले, डोळे मिटूनच - गाढ समाधीतून, "तू बलराम आहेस! यादवांचा ज्येष्ठ सुपुत्र!"

आचार्यांनी आपणाला डोळे मिटलेले असतानाही कसं ओळखलं म्हणून थक्क झालेला दादा ओणवून नम्रपणानं म्हणाला, "होय आचार्य, मी बलरामच! मथुरेहून माझे बाबा वसुदेव व महाराज उग्रसेनांनी पाठविलेल्या दुभत्या गाई आणि अश्वपथकं अलंकारांसहित गुरुदक्षिणा म्हणून मी कालच आश्रमाच्या भांडारात अर्पिली आहेत. मला जीवनयात्रेसाठी आशीर्वाद द्यावा आपण."

आचार्य किंचित हसल्यासारखे वाटले. दादाच्या मस्तकावर हात ठेवून, डोळे मिटूनच म्हणाले, "बलरामा, तुझं उभं जीवन यशदायीच होईल. ज्येष्ठ म्हणून सारं जग तुला नावाजेल. एकच कर. शक्य असल्यास कधीतरी तुला फसविणारा मनोवेग निर्धारानं आवरण्याचा यत्न कर! तथाऽस्तु!"

मग मी नेत्रसंकेत देताच उद्धव पुढे झाला. गुडघे टेकून आचार्यांच्या चरणाला मस्तक भिडवून तसाच थांबला.

डोळे मिटूनच आचार्य त्याचा स्पर्श अचूक पारखून म्हणाले, "तू उद्धव. मधुरेच्या देवभाग यादव आणि आर्या कंसेचा सुपुत्र."

"होय आचार्य, मी उद्धवच." टपोऱ्या, निरागस डोळ्यांचा, गोल, प्राजक्ती मुद्रेचा उद्धव भारावून नम्रपणानं म्हणाला, "आचार्य, मी आपल्यासह येथील सर्व आचार्यांना वस्त्रं, प्रावरणं व सर्वांसाठी धनधान्यांच्या गोणी आश्रमाच्या भांडारात भरल्या आहेत. उदार हृदयानं मला जीवितयात्रेसाठी शिवाशीर्वाद द्यावा."

आचार्यांचा हात कुबडीवरून स्पष्ट वर उठला. ते कितीतरी वेगळ्या आवाजात घनगंभीर वाणीत म्हणाले, "उद्धवा, तू सार्थ भक्त आहेस. एखाद्या योगयोगेश्वराला, परमद्रष्ट्याला प्रिय होण्याची क्षमता एकट्या तुझ्या ठायी आहे. अशा प्रिय व तत्त्वज्ञ योग्याचा सेवक होशील. आणि त्याचा विश्वस्त म्हणूनच जगाला तू प्रिय होशील. मनावर अवजड पाषाण ठेवूनच एक अत्यंत कटू धर्मकर्तव्य तुला उत्तरजीवनात करावं लागेल! होय तुलाच!! जा, माझे तुला शुभाशीर्वाद आहेत." वर उठविलेला हात त्यांनी थेट उद्धवाच्या मस्तकावरच ठेवला.

आता राहिलो आम्ही दोघेच. सुदामा आणि मी. शेवटी त्यालाही मी नेत्रसंकेत केला. पुढे होत सुदाम्यानं हातातील नीलकमलांचा गुच्छ आचार्यांच्या चरणांवर नम्रभावे ठेवला. त्यावरच आपलं मस्तक भिडवलं. क्षणभरात गुदमरून तो स्फुंदू लागला.

दारिद्र्याच्या हृदयभेदक असह्य सलानं.

समोर साक्षात गुरुब्रह्म होतं. त्रिकालज्ञानी! त्यांचे नेत्र अर्धवटच उघडले. समाधिरत अवस्थेतच, आचार्य शब्दांनीच सुदाम्याला सांत्वनाचं थोपटत म्हणाले, "तू सुदामन, अंगावरच्या हीन वस्त्रामुळे तुला 'कुचैल' असंही म्हणतात! मात्र लक्षात ठेव, तुझ्या निरामय प्रेमळ आत्म्याला लाभलेल्या पूर्वपुण्याईच्या अद्‌वितीय वसनांमुळे तू खरंतर 'सुचैल' आहेस! तुला लाभलेली स्वर्गीय स्नेहाची संपत्ती केवळ दुर्लभ आहे. त्यासाठीच तू जगत्‌विख्यात होशील. परमस्नेही म्हणून ती स्नेहसंपत्ती सदैव जप. माझे तुला उदंड कृपाशीर्वाद आहेत."

आता तर सूर्य आश्रमाच्या थेट मस्तकावरच तळपू लागला. मी पुढे सरसावलो. आचार्य सांदीपनींचा सर्वांत शेवटचा आश्रमशिष्य – यादवांचा श्रीकृष्ण म्हणून! पद्मासनातील अस्पष्ट दिसणाऱ्या आचार्यांच्या चरणांना थेट मस्तक भिडवून मी त्यांना सरळ अष्टांगी दंडवतच घातला! तसं डोळे न उघडताच तो स्पर्श अचूक पारखून आचार्य हसत-हसतच उद्‌गारले, "यादवराज श्रीकृष्ण! वृष्णी, अंधकांचं युगानुयुगांचं जीवनश्रेयस – श्रीकृष्ण! वसुदेव-देवकींचा आठवा पुत्र! गोकुळातील गोपांचा गोपाल, माझ्या अंकपाद आश्रमातील माझा परम शिष्योत्तम श्रीकृष्ण!" माझ्या स्पर्शाबरोबर त्यांचे ध्यानस्थ मत्स्यनेत्र पर्णकुटीच्या कवाडांसारखे आता आपोआपच, हळूहळू स्पष्ट होत सताड उघडले. तोवर हात जोडून मी त्यांच्यासमोर ओणवा, नम्र उभा राहिलो. त्यांनी माझ्या डोळयांत डोळे घालून सखोल बघितलं. ही दृष्टीच पाऽर वेगळी होती. मीही पूर्वी कधीच न अनुभवलेली! ते मंदसं हसले.

"आचार्य, सर्व-सर्व शिष्यांनी काही ना काही गुरुदक्षिणा आपल्या चरणांवर अर्पून आपले कृपाशीर्वाद घेतलेत. मला – मला मात्र आपण उदारहृदयी क्षमा करावी – क्षमा अशासाठी की, आपल्यासाठी योग्य गुरुदक्षिणा देण्यासाठी माझ्याकडे या क्षणी खरोखरच काहीही नाही!!" मी हसलो. नेहमीपेक्षा ते हास्य नक्कीच आगळं असावं. काही क्षण त्या हसण्याचा माग घेत साक्षात आचार्यांकडूनही तसंच हास्य निसटलं! पाठोपाठ आचार्यही नेहमीच्याच शांतपणे उद्‌गारले, "अरे, पुरे कर ही छलिकविद्या! इथं हवी आहे कुणाला गुरुदक्षिणा! योगयोगेश्वरा!!" ते नेहमीचं खळाळ बालकहास्य हसले. म्हणाले, "माझ्या आश्रमात तू आश्रमकुमार म्हणून इतके दिवस सदेह वास्तव्याला होतास. सांग, याहून दुसरी कुठलीही श्रेष्ठ गुरुदक्षिणा असू शकते काय या अशाश्वत जगात?" ते पुन्हा हसले. निरागस, नवजात बालकासारखं. तसं माझ्या मुखावरही त्या हास्याच्या प्रतिबिंबासारखं हास्य पसरलं.

माझ्या डोळ्यांना डोळे भिडवून त्यांनी नेत्रांनीच एका अबोध शक्तीचा पात माझ्यात केला. कितीतरी वेळ आम्ही उभयता भानरहित झालो. एकमेकांकडे नुसते बघतच राहिलो. गुरुदेव सांदीपनींच्या या दिव्य शक्तिपातापासून मी आशीर्वाद म्हणून काय-काय संपादन केलं, ते केवळ माझं मलाच ठाऊक!

ते उद्‌गारले, "जा. श्रीकृष्णा, माझ्या परमप्रिय शिष्योत्तमा – तुझे मार्ग सदैव शिवकर आणि शिवकरच होतील. यदुनंदना, एकच कर. माझा संदेश म्हणून तुझ्या पुढील जीवनात शक्य होईल, तेव्हा एकदा प्रयागक्षेत्री जा. आंगिरसांच्या आश्रमात असलेल्या ऋषिवर घोर आंगिरसांच्या चरणी जा. त्यांचीही ब्रह्मज्ञानाची दीक्षा अवश्य घे नंदनंदना!

“नावाप्रमाणेच ‘घोर’ तपस्येचे अधिकारी आहेत ते. अग्नीचे जन्मजात नैष्ठिक पूजक आहेत. आद्य आंगिरसांचे यथायोग्य उत्तराधिकारी आहेत आज ते. विसरू नकोस. अग्नीसारखाच स्वभाव आहे त्यांचा! मर्यादेत राहिलास, तर उबदार. उल्लंघन केलंस, तर तसाच दाहक! जा. काही काळच ते प्रयागक्षेत्री थांबतील. नंतर केव्हाही रैवतक पर्वताकडे सरकतील. त्यांना आताशा आकर्षून टाकणाऱ्या एका पंथाचा तीर्थंकर म्हणून प्रचार व प्रसार करण्यासाठी.

“तुझं त्याचं नेमकं नातं यथासमय समजेल तुला! जा श्रीकृष्णा, जा! त्यांना भेटीत माझे प्रणाम सांग. आणि माझी ही तुला देतोय ती भेट – वैजयंतीमालेसारखीच प्रेमानं स्वीकार व सदैव जप.” त्यांनी आज पहाटेपासूनच कमंडलूत घालून ठेवलेलं व अपार जपलेलं एक मंत्रभारित, काषायवर्णी, उत्फुल्ल कमलपुष्प माझ्या हाती प्रेमानं दिलं. मी ते भक्तिभावानं ओंजळीत स्वीकारून मस्तकी भिडवलं.

गृहकर्मात मग्न असलेल्या गुरुपत्नी फारशा कधी बाहेर येत नसत. आज या क्षणी मात्र त्या बाहेर आल्या होत्या. मी सर्वांसह त्यांना नम्र दंडवत घातले. त्या मुखभर आशीर्वाद देऊन तटस्थच उभ्या राहिल्या. मूर्तीसारख्या! त्यांच्या दोन्ही नेत्रांतून झरझरणाऱ्या पाणधारा त्यांच्या मौनी वेदनेचं कारण मला क्षणात सांगून गेल्या. मी त्यांना अभय देत निर्धारानं म्हणालो, “आश्रममाते, शंखासुरानं बलात पळवून नेलेल्या आपल्या सुपुत्राला – दत्ताला मुक्त करून मी आपल्या स्वाधीन करीन. माते, हे वचन आहे. आचार्यांना द्यायची ती गुरुदक्षिणा मी दिली आहे. त्यांनी तिला योग्य असे आशीर्वादही मला दिले आहेत. आपण दत्ताची मुक्तता हीच दक्षिणा मानावी. त्यासाठी मला जीवनसंघर्ष जिंकण्याचे आशीर्वाद द्यावेत.”

डोळ्यांतील पाणधारा अंशुकाच्या पदरानं निवारताना गुरुपत्नींच्या, आमच्या आश्रममातेच्या डोळ्यांतील भाव क्षणात पालटले. केवढ्यातरी भावभरल्या डोळ्यांनी माझ्या मस्तकावर हात ठेवला त्यांनी.

आचार्यांना, आश्रममातेला पाठ न दाखविता, काढत्या पायांनी मागे होत आम्ही आचार्यकुटीबाहेर पडलो.

सुदामा कुठेच दिसत नव्हता. वेताच्या पेटिका उचलून मी, दादा व उद्धव आश्रमाच्या प्रमुखद्वारात आलो. समोर दारुक उभाच होता. पुढे येत तो माझे पाय स्पर्शण्याची लगबग करू लागला. मी त्याला पुढं होत, तसंच अधांतरी वर उचलून दृढ आलिंगनात घेतलं. त्याची चर्या अपार उजळून निघाली. त्याच वेळी त्याला मी जीवनभरासाठी कानमंत्र दिला, “दारुका, यापुढे तू माझा केवळ सारथी वा सेवक कधीच असणार नाहीस. असशील माझ्याबरोबर सतत जीवनाच्या सर्व आघाड्यांवर साथ देणारा प्राणरक्षक सखा. आज तर तू नाहीस, मीच करणार आहे सारथ्य!”

त्याला पुढे ठेवून आम्ही तिघंही त्यानं आणलेल्या राजरथापर्यंत आलो. किती आकर्षक होता, दारुकानं अलंकृत करून आणलेला आजचा राजरथ! त्याचं कुसरकाम केलेलं, शुद्ध सुवर्णी छत सूर्यकिरणांत कसं झळझळून उठलं होतं, त्याच्या माथ्यावर, जरीकाठाची मऊ तिकोनी भगवी गरुडध्वजा उडत्या सुवर्णी गरुडपक्षयाच्या मानचिन्हासह अविरत फडफडत होती. छताची मागील बाजू मृग आणि व्याघ्रचर्मांनी आच्छादलेली होती. रथाच्या लयीवर मधुर किणकिणणाऱ्या अशा इवल्या-इवल्या सुवर्णी घंटा छताला धरून ओळंबत होत्या. बरीच माणसं व शस्त्रं सहज मावू शकतील

एवढा मोठा प्रशस्त होता, त्याचा मागील घेर. कटिभर उंचीच्या चार बळकट आरेदार चक्रांनी तो सुघड रथ अलवार समतोल तोलून धरला होता. किंकर वृक्षाच्या बळकट रंगीत लाकडाचं कुसरकाम केलेलं घोटीव लांबलचक जू होतं त्याला. पहिल्याच दृष्टिक्षेपात माझं चित्त आकर्षून घेतलेले चार हिमधवल, दूधरंगी – पांढरेशुभ्र, उंच, पुष्ट अश्व दारुकानं जोडले होते त्याला. ते सारख्या शेपट्या चाळवून कान टवकारीत होते.

त्यांना बघताच मी देहभान विसरून खेचल्यासारखा झपाझप चालत त्या चपळ प्राण्यांजवळ गेलो. कानांत आचार्यांचे शब्द केव्हाच फिरून गेले होते, 'वाऱ्याशी स्पर्धा करणारा अश्व हा प्राणी माणसाचा सर्वांत पहिला विश्वासू मित्र आहे. अश्व जेव्हा तीन पायांवरच उभा राहून चौथा अधांतरी लंगडा ठेवतो; तेव्हा तो धावणीला निरुपयोगी झालेला असतो. आपल्या स्वामीची स्पर्शांतील व शब्दांतील भाषा जी अश्वाला कळते, ती कधी-कधी माणसांनाही नाही कळत!'

स्वत:ला हरवून समोरच उभ्या असलेल्या माझ्या खांद्याएवढ्या त्या अश्व चौकडीतील एका प्राण्याच्या पुष्ट खुब्यावर मी प्रेमभरानं थाप दिली. त्यानं शेपटी फुलवून सर्रकन अंगभर भोवरा फिरविला. प्रेरक खिंकाळत कान टवकारले.

मी दारुकाला विचारलं, "कुठून हस्तगत केलास हा ज्ञातिवंत वाण?"

तो हसत उत्तरला, "त्यासाठी उभा पंचनद जनपद पालथा घातलाय मी आर्य. चंद्रभागा व इरावती या नद्यांच्या कुरणसंपन्न खोऱ्यातील आहे हा वाण. जसा धिप्पाड आहे, तसाच धावणीलाही वेगवान आहे. आज्ञाधारक तर फारच आहे."

"छान काम केलंस हे दारुका. या अश्वाला 'शैब्य' म्हणणं आवडेल मला! तुला कसं वाटतंय हे नाव?"

"तू ठेवलेल्या नावाला तो कसा काय नावं ठेवील, धाकट्या?" म्हणत बलरामदादानंही हसत-हसत त्या अश्वाच्या पाठीवर थाप मारली.

त्यालगतच्या अश्वाच्या तोंडाजवळ गेलो. त्याची भरगच्च आयाळ क्षणैक घुसळून टाकली. जसा उद्धवाच्या किंवा सुदाम्याच्या गळ्यात टाकत होतो, तसाच माझ्या हाताचा लपेटता वेढा त्या अश्वाच्याही पुष्ट, भरदार, लवचीक आणि स्नायुसंपन्न मानेच्या भोवती टाकला.

उद्धव नुसता तत्त्वांचा शुष्क काथ्याकूट करणारा बोलघेवडा नव्हता, चांगला योद्धाही होता. त्यानं मला सहज; पण अचूक छेडलं.

"या अश्वाला शोभेसं नाव सांग बघू आता तूच दादा." मी हसत त्याच्या ढालीसारख्या गोल व तांबूस-गौर, प्राजक्ती, सात्त्विक चर्येवर दृष्टी फिरवत म्हणालो, "उद्धवा, याच्या गळ्याभोवती मी सहज हात लपेटला, इथंच याचं नाव आपोआप सिद्ध नाही का झालं? अरे, हा तर आपल्या रथाचा सुग्रीव!"

"सुग्रीव! सुरेख मानेचा!" एवढंच म्हणून उद्धव एकदा माझ्या कंठातील वैजयंती व सुग्रीवाच्या आयाळसंपत्र, शुभ्र मानेकडे बघतच राहिला. म्हणाला, "दादा कळत नाही, तुझ्या नीलवर्णी देहावरची पांढरीशुभ्र वैजयंतीमाला अधिक शोभून दिसते आहे की या सुग्रीवाच्या भरगच्च मानेवरच्या शुभ्र आयाळीला लपेटलेला तुझा नीलवर्णी हात अधिक सुरेख दिसतो आहे!"

"हा उन्नत पुष्ट मानेचा, सावध अश्व विख्यात कांबोज जनपदातून आणला आहे मी स्वामी." दारुकानं नम्रपणे पुढची माहिती दिली.

आम्ही तिघंही पुढच्या अश्वाजवळ गेलो. तसा तो थोडासा फुरफुरला. अश्विनी संध्याकाळच्या पांढऱ्याशुभ्र ढगाच्या आकाराचा आणि पर्वतासारखा बळकट दिसत होता तो.

"हा अश्व दूर गांधार महाजनपदातून आणला आहे, यादवश्रेष्ठ. त्यासाठी मी त्या देशीच्या पुष्कलावती या राजनगराला गेलो होतो." दारुकानं मी न विचारताच माहिती पुरविली.

माझ्या नेहमीच्या खटचाळ स्वभावाप्रमाणं मी बलरामदादाला छेडलं, "दादा, तू सुचव बघू, या अश्वासाठी एखादं योग्य नाव."

बराच वेळ स्तब्ध राहून काहीच न सुचल्यानं तो हिरमुसून म्हणाला, "वाटलंच होतं मला, तू अजून कशी काय माझ्या खांद्यावर थाप मारली नाहीस ते! हे असलं बौद्धिकाचं काम कसं काय सांगितलंस मला तू? हवं तर सांग हा अश्व असाच उचलून थेट अलगद खांद्यावर घेऊन दाखवतो! नावबिव ठेवणं तुलाच जमतं!"

"होय खरंच. या अश्वाला योग्य नाव देणं कठीण आहे. तूच ते सांगू शकशील, " उद्धवानं त्याला जोड दिली.

"आपण याला 'बलाहक' म्हणू या. बलाहक म्हणजे शुभ्र, झेपावता बक पक्षी!" अंगलटीवरून मी ताडलं तो अश्व 'मागधी' होता. "सुंदर!" दारुकासह दोघंही आनंदानं चीत्कारले.

एव्हाना आम्ही रथाची दुसरी बाजू भक्कम सांभाळणाऱ्या चौथ्या व शेवटच्या अश्वाजवळ आलो होतो. तसे हे चारीही अश्व एकमेकांशी स्पर्धा करणारे पांढरेशुभ्रच होते. या अश्वाचा शुभ्रपणा थोडा अधिक होता. सूक्ष्मपणे बघणाऱ्यालाच तो जाणवला असता! हिमालयात कोसळणाऱ्या नदीतील हिमजलाच्या फेसासारखा होता त्याचा वर्ण. मी त्याच्या लांबट मुखड्यावर थोपटत दारुकाला विचारलं, "नक्कीच तू हा जीव हिमवंताच्या परिसरातून कुठूनतरी आणला असावास."

"होय आर्य. त्यासाठी दूर कामरूप जनपदात प्रागज्योतिषपुराला जावं लागलं मला." हसत दारुकानं माहिती दिली.

"याला 'मेघपुष्पा' शिवाय दुसऱ्या कुठल्या योग्य नावानं हाक मारणार आपण? हिमालयाला तटलेल्या पांढऱ्याशुभ्र ढगाचं फूलच नाही काय हे?"

"दारुका, माझे हे शैव्य, सुग्रीव, बलाहक, मेघपुष्प असे चारीही अनंताच्या फुलासारखे शुभ्रधवल अश्व मला प्राणप्रिय झालेत. आजपासून ते आर्यावर्ताच्या चारी दिशा पादाक्रांत करण्यासाठी चौखुर उधळतील – माझ्या संकेतानं नव्हे. आचार्य सांदीपनींच्या आशीर्वादांनी.

"आम्हा यादवांच्या विजिगीषु रक्ताचा वसा आहे पक्षीराज गरुडाचा. विशाल बळकट पंख फुलवून तो गगनवेध घेतो. त्याच पक्षीराज गरुडाचं स्मरण देणारी ध्वजा आहे या रथाची. आचार्य सांदीपनींचं या क्षणी मी नम्रभावे स्मरण करतो. तुम्हा जिवलग सुहृदांच्या साक्षीनं या राजरथाचं अधिकृत नाम घोषित करतो मी – 'गरुडध्वज!'" कसल्यातरी अनामिक आवेगानं मी डोळे मिटते घेतले. त्यांच्यासमोर सुंकारत नीलाकाशात आवेगानं झेपावणारे सुवर्णी गरुडपक्षीच पक्षी मला दिसले. दादा, उद्धव, दारुक कुणीतरी कळ दाबल्यासारखे एकच सुरात, एकाच मेळात चीत्कारले, "साधू! गरुडध्वज, गरुडध्वज! सुंदर, अजोड"

"तुम्ही आत बसा सारे." असं म्हणत रथनीडावरची सारथ्याची जागा मी एका झेपेतच घेतली. चारही अश्वांचे सोनेरी कलाबतूंनी मंडित बळकट आठही वेग हाती पेलले.

शेवटचं म्हणून माझ्या प्रिय अंकपाद आश्रमाचं डोळाभर दर्शन घ्यावं, यासाठी आश्रमपरिसरावर दृष्टी फिरविली; आणि येणारी एक बोटभर, पांढरीशुभ्र रेष बघून मी अंतर्यामी चरकलो. दूरवरून आश्रम कुंपणाच्या कडेकडेनं खांद्याला आपल्या प्रिय वस्तूंची झोळी टांगलेला, खालमानेचा सुदामा फरफटत्या जड पावलांनी रखडत येत होता.

त्याला आमच्याहून खूप दूर जायचं होतं, सौराष्ट्राला. मात्र त्याच्यासाठी कुठलंही प्रवासी साधन वा कुणी माणूसही आलं नव्हतं. मागे घेरात बसलेल्या उद्धवाला मी तत्काळ म्हणालो, "उधो, असाच पटकन आत जा आणि माझ्या परमस्नेही सुदाम्याला हाताशी वागवून घेऊन ये." उद्धवालाही सुदाम्याचं एकलेपण जाणवलं. तो पटकन उठलाच. उडी घेतच गरुडध्वजातून उतरला. प्रेमानं हाती धरून सुदाम्याला घेऊनच आला. आता दोघंही रथावर आरूढले.

आचार्य सांदीपनींच्या अंकपाद आश्रमाच्या भव्य कश्यप प्रवेशद्वारातून माझा रथ उधळला. मी वेगांना झटके देताच चार प्रामाणिक, आत-बाहेर शुभ्र जनावरांनी खिंकाळत झेप घेताच गरुडध्वज उधळला! माझा जीवनरथ कर्मयोगाच्या अखंड तीर्थयात्रेला निघाला. समोर जीवनाची अथांग क्षिप्रा नदी ठेवून!

माझा आणि दारुकाचा सारथ्ययोगावरील संवाद सुरू झाला, "दारुका, अश्वाला काय मानतोस तू?" मी विचारलं. तो पटकन उत्तरला, "मानवाचा एकनिष्ठ मित्र."

"तेवढंच नाही. मला अश्व, सूर्याच्या वेगवान किरणांसारखाच जाणवतो. तो एकनिष्ठ मित्र तर आहेच. त्याची एकनिष्ठा उबदार स्नेहाचीच असते." मी म्हणालो.

"धावत्या अश्वांचे कसले आवाज तुला ऐकू येतात दारुका?" परत विचारलं.

"लयीत धावणाऱ्या त्यांच्या खुरांचे, खिंकळण्याचे."

"बस्स – एवढेच? दारुका, सारथ्यकर्माच्या जाणकार योग्याला तर धावणीच्या वेळेची अश्वांच्या काळजाची धडघड आणि श्वासांची फुरफुरदेखील स्पष्ट ऐकू आली पाहिजे, नीट कळली पाहिजे! धावत्या अश्वाची काळजाची धडधड, आभाळीच्या सूर्याच्या अविरत लपलपीशी चिरंतन लयबद्ध असते! तुला हे कळलंच पाहिजे. लक्षात ठेव, अश्व हा सूर्यपुत्रच आहे." ते ऐकताच दारुक मूक व विचारगत झाला. मी त्याला त्याच्याच विचारांच्या सुरावर पुढे नेत म्हणालो, "सूर्याला 'मित्र' म्हणतात. कारण? तो सतत साथ देतो म्हणून. दारुका कधीच विसरू नकोस. अश्व हा 'सूर्यपुत्र' आहे. माणसाचा सर्वप्रथम व सर्वाधिक जवळचा नि सततचा प्राणिमित्र आहे तो. काय?"

"होय स्वामी, आलं लक्षात."

"अश्वाची निकोप प्रकृती कशी पारखशील तू दारुका?" मी त्याला सारथ्ययोगाच्या खोलात घेऊन चाललो.

"अश्वाच्या चारी पायांवर समतोल उभा राहण्याच्या डौलदार पवित्र्यावर." मार्गात येणारं वळण घेताना रथ कलला तसं काठाळीच्या आधारानं शरीर तोलत, घेऱ्यातील दारुक उत्तरला.

"तेवढ्यावरच परीक्षा पूर्ण होत नाही दारुका. त्यासाठी त्याच्या तोंडाजवळ कान नेत, त्याच्या श्वासाच्या फुरफुरीची लयही पारखावी लागते! घोडा डोळ्यांतून खूप-खूप

बोलतो. तो आपल्या शेपटीच्या अखंड चाळवाचाळवीतूनही आपलं नेमकं चैतन्य सांगत असतो. वाऱ्याच्या हलक्या झुळकीबरोबर घोडा अंगभर भोवऱ्याची वलयं उठवितो. त्या लाटा बघताच न दिसणारा वारा कुठून कुठं वाहतो आहे, याचा मागही खऱ्या निष्णात सारथ्याला अचूक आला पाहिजे दारुका!" मी घोड्याचे वेग वागवीत त्यांना 'शैब्याऽ बलाहकाऽ' अशा नावानं हाकारत दारुकाची सारथ्ययोगाची तयारी पारसू लागलो.

त्याला मी विचारलं, "अश्वांच्या अंगची बुद्धिमत्ता जाणतोस तू दारुका?"

"होय आर्य, अरण्यात वाट चुकलेल्या स्वारानं वेग सैल सोडून क्रियाशून्य केवळ बळकट मांड घेतली, तरी अश्व त्याला अचूक नित्याच्या अश्वशाळेत परत आणून सोडतो."

"बरोबर. आपल्या खुराला लोहमेख ठोकून घेणं धावणीच्या दृष्टीनं आवश्यक आहे, हे घोडा जाणतो. लोहमेखीच्या वेळी मूक लेटूनच संमती देतो. वाळवंटात डोळ्यांत वाळूचे कण जाऊ नयेत म्हणून ते मिटते घेतले, तरी स्वाराला अपेक्षित दिशेनंच घेऊन जातो तो. स्वाराच्या मांडातील हलका दबावही त्याला नेमका कळतो. तो धावणीत गुंतला असला तरी त्या दबावावर अचूक दिशा बदलतो. अश्वाची श्रवणेंद्रियं फार तीक्ष्ण व तत्पर असतात. तो वाऱ्याच्या हलक्या झुळकीचाही नाद अचूक हेरतो. अश्वाला आपल्या स्वामीची बोलभाषा व स्पर्शभाषाही चांगलीच समजते.

"दारुका, अश्व जमिनीवर बसून किंवा आडवा होऊन कधीच निद्रा घेतं नाही. खरंतर तो निद्रा अशी कधी घेतच नाही! उभ्याउभ्याच हलकी अशी डुलकी घेऊनच तो धावता विश्राम घेतो. अश्व हा प्राण्यातील 'या निशा सर्व भूतानाम्!' असा जन्मतःच वर लाभलेला 'योगीश्रेष्ठ प्राणिवर' आहे. जसा तू आहेस, हा उद्धव आहे, तसा यांतील प्रत्येक अश्व माझा सखाच आहे. या अश्वसख्यांची त्यांची म्हणून एक खास अशी 'अश्वगीता' आहे! ती योग्यवेळी मी तुला सांगेनच. कुणी सांगावं प्रसंगी मलाच निर्दोष सारथ्ययोगाचं प्रात्यक्षिक दाखवावं लागेलही! काय दारुका?" मी त्याच्या मनाचा अश्व कुठल्यातरी खोलवटात नेऊन तसाच अधांतरी सोडून दिला!

योजनांमागून योजनं मागे टाकत आम्ही चाललो. काही पडाव पडले. आणि अशा एका तिठ्यावर रथ आला की, जिथून समोर तो मथुरेला जाऊ शकत होता किंवा डावीकडे सौराष्ट्राला जाऊ शकत होता. काही पळ मी रथ थांबविला.

"आता तर मथुरा मोजक्याच पडावांच्या टप्प्यात आली." दादा मथुरेच्या रथमार्गाकडे बघत म्हणाला, "सरळ मथुरेला जाणार ना आपण?"

"नाही! आपण डावीकडे सौराष्ट्राला जाणार आहोत दादा. या सुदाम्याला किमान त्याच्या गावाजवळ सोडू. मगच मथुरेला परतू." मी निर्णय दिला आणि हातचे वेग झटकून रथाला गतीही दिली. सौराष्ट्राच्या दिशेनं. मागे वळून सहेतुक हसत सुदाम्याकडे पाहिलं. त्याची चर्या अपार उजळून निघाली होती.

पुन्हा काही पडाव पडले. शेवटी आमचा गरुडध्वज अशा ठिकाणी आला की, तिथून पुढे तो जाऊच शकत नव्हता. सुदाम्याचं गावही आता जवळ आलं होतं. तिकडे जाणारी परिचित पांढरी व नागमोडी पायवाट बघून तो म्हणाला, "मिलिंदा – मित्रवरा, थांबू या आता. मी जाईन पायी."

माझ्या आयुष्यातील तो क्षण आला – स्नेह्याचा निरोप घेण्याचा! हातचे वेग

रथनीडावर तसेच टाकून मी एका झेपेतच खाली उतरलो. सुदामाही मागून खाली उतरला. उद्धव, बलरामदादा, दारुक घेरातच थांबले.

सुदामा अगदी माझ्यासमोरच आला. खांद्यावरची ओघळती झोळी सावरत म्हणाला, “श्रीकृष्णाऽ मित्रा, या गरीब ब्रह्मपुत्राची आठवण ठेव. आपण आचार्यांच्या आश्रमात एकत्र शिकलो, हा पूर्वजन्मीचा ऋणबंध मानतो मी. मित्रवरा, एकच ऐक – ” त्याचा कंठ दाटून आला.

मी त्याचे दोन्ही खांदे घट्ट पकडून त्याच्या डोळ्यांत खोल बघत म्हणालो, “बोल मित्रवरा सुदामा! तुला मी कधीच विसरणार नाही. नि:संकोच मोकळं, मोकळं बोल.”

संकोची स्वभावाप्रमाणं तो थोडासा अडखळला. मग म्हणाला, “श्रीकृष्णा, आश्रमातले तुझ्या सहवासातले मंत्रभारले दिवस कसे गेले, ते समजलंच नाही. त्याची आठवण सदैव जागती राहावी म्हणून – म्हणून तू मला – तू मला तुझी एखादी वस्तु भेट म्हणून दे! स्नेहभेट दे. जीवनभर प्राणापलीकडे सांभाळीन मी ती.”

त्यानं मला कोड्यात टाकलं. मी हसून म्हणालो, “मित्रा, अरे वेडाबिडा आहेस की काय तू? गुरुदक्षिणेच्या दिवशी आचार्यांचा आशीर्वाद घेताना मी प्रत्यक्ष त्यांना म्हणालो, ते ऐकलं नाहीस का?

“मी त्यांना म्हणालो, ‘तुमच्या योग्य गुरुदक्षिणेसाठी माझ्याकडे काहीही नाही!’ तरीही मित्र म्हणून तू पुन्हा आज माझ्याकडे स्नेहभेट मागतोयस. काय देऊ तुला मी? मित्रा, तुला योग्य स्नेहभेट देण्यासारखं या क्षणी खरोखरच माझ्याकडे काहीही नाही!”

मी मस्तकी धारण केलेल्या मोरपीसधारी सुवर्णी मुकुटावरून सुदाम्याची दृष्टी फिरली. तो गोंधळला. त्याची दृष्टी माझ्या कंठातील कौस्तुभमणीधारी मोत्यांच्या माळेवर गेली. दंडातील व भुजेवरील सुवर्णभूषणांवरून खाली सरकली. सर्वांत शेवटी माझ्या पायांतील चंदनी खडावांवर दृष्टी जाताच मात्र त्याच्या डोळ्यांतील भाव सरासर पालटले! कितीतरी हर्षविभोर होऊन तळपून उठले त्याचे डोळे. काही एक पक्क्या निर्धारानं झटकन वाकून आपल्या हातांची घट्ट पकड माझ्या चंदनी खडावांना लपेटती घालत तो कितीतरी आवेगानं म्हणाला, “ही – हीच दे अमोल भेट मला तुझ्या मित्रप्रेमाची मित्रवरा! हीच योग्य आहे.” पाठोपाठ त्यानं आपलं मस्तकही थेट माझ्या खडावांना भिडवलं. एरवी नेहमीच हसणारा मी आता मात्र गंभीर झालो. माझे पाय खडावांतून अलगद मागे गेले. मला नकळतच. तसं माझ्या प्राणप्रिय सुदाम्यानं त्या खडावा पटकन आपल्या झोळीत टाकल्याही.

मी त्याला झटकन वर उठवून कडकडीत, दीर्घ आलिंगनात घेतलं. त्याची ओंजळ हळुवार थोपटून त्याचा निरोप घेतला. पायवाटेनं पुन:पुन्हा मागे वळून पाहणारी सुदाम्याची बोटभर पाठमोरी आकृती अस्पष्ट होऊन दिसेनाशी होईपर्यंत मी ती डोळ्यांत साठवून घेतं त्या तिठ्यावर स्नेहबद्ध तसाच थांबलो– कितीतरी वेळ!

मथुरेत आमचं प्रचंड उत्साहानं स्वागत झालं. उभं यादवनगर, गुढ्या–तोरणांनी, फुलमाळांनी सजलं होतं. दारादारात चित्रमय रांगोळ्या रेखून स्त्री-पुरुष नगरजनांनी आम्हाला ओवाळून फुलं उधळली. नगराच्या चौकाचौकात नगारे दुडदुडत होते. इकडून तिकडे उत्साहात चपळाईनं दौडणारे अश्वसाद व भल्लाईत मुठीमुठींनी साखर वाटीत होते. त्यातील एक तर अतिउत्साहानं गरुडध्वजाच्या रथनीडापर्यंत चढून माझ्याच

हातात साखरभरली मूठ सोडत 'उद्याच होईल नामकरण...' असं अस्पष्ट काहीसं न कळणारं धावतं पुटपुटत निघूनही गेला.

आम्ही मथुरेच्या प्रशस्त राजवास्तूसमोरच्या प्राकारी चौकात आलो. त्या चौकाच्या आघाडीला आज महाराज उग्रसेन, वसुदेवबाबा, थोरली असं राजमंडल दिसताच आम्ही तिघंही झपाझप पायऱ्या चढून त्यांच्याजवळ गेलो. मी, दादा व उद्धव तिघांनी प्रथम वसुदेवबाबांना वंदन केलं. मग उग्रसेन महाराजांना केलं. महाराज आता कितीतरी थकलेले दिसत होते. म्हणाले, "गदाधरा, तू नसताना मोठ्या निकरानं आम्ही जरासंधाची सात-आठ आक्रमणं परतविली आहेत. आता तूच आलास, चिंता मिटली." थोरलीला वंदन करताना मला प्रकर्षानं जाणवलं इथं धाकली – आमची रोहिणीमाता कुठंच दिसत नव्हती. मथुरेत आल्यापासून देवकीमातेलाच 'थोरली' म्हणण्याचा प्रघात पडला होता. अगदी आपोआप कुणीही न सांगता. मी थोरलीला विचारलंही, "धाकली नाही दिसत कुठं ती?" तसं मुखभर निर्मल आणि वत्सल हसत ती म्हणाली, "अरे ती कशी येईल इथं? ती प्रसूत झालीय नुकतीच! तुम्हाला बहीण मिळालीय! या बलरामासारखीच आहे दिसायला ती. तांबूसगौर, गुटगुटीत, बाळसेदार!"

"त्यासाठी उद्या सजायचं हे नगर तुमच्या स्वागतासाठीही आजच सजलंय." वसुदेवबाबा म्हणाले.

"उद्याच नामकरण विधी आहे तुमच्या भगिनीचा, श्रीकृष्णा." उग्रसेन महाराज म्हणाले. नगर कशासाठी सजलंय, याचा नेमका बोध आम्हाला आत्ता झाला. दुसऱ्या दिवशीच आमच्या नवजात भगिनीच्या नामकरणासाठी यादवांच्या स्त्री – पुरुषांच्या तसेच नगरजनांच्या झुंडी राजवास्तूवर लोटल्या. माझ्या वसुदेवबाबांनी वर्षानुवर्षं सोसलेल्या दुष्कर जीवनाचा परिपाकच त्यांच्या प्रेमानं प्रकटला होता. आज यदूंची ही राजवास्तू स्त्री-पुरुषांच्या, बाल–बालिकांच्या संमिश्र कलकलाटानं कितीतरी वर्षांनंतर प्रथमच गजबजून उठली.

माझा एकूणच मथुरेतला व शूरसेन राज्यातला गोतावळा हरळीच्या जाळीसारखा किती विशाल आहे, याचा शोध मला या निमित्तानं लागला. दादानंतरचे धाकलीचे गद व सारण असे माझे बंधू आता मोठे झाले होते. तिच्या पोटी जन्मलेल्या या पहिल्याच मुलीच्या बारशासाठी आवर्जून जमलेल्यांत माझे देवभाग, देवश्रवस, आनक, सृंजय, श्यामक, कंक, शमीक, अनाधृष्टी, गंडष, वत्सक आणि वृक असे सख्खे काका होते. त्यातील उद्धवाचे पिता म्हणून देवभागकाका माझ्या आणि दादाच्या अधिक सहवासात यापूर्वीच आले होते. राहिलेले यानंतर प्रसंगवशात येणार होते. कंसवधाच्या वेळी बंदिवान असलेल्या यांतील काहींना मी पहिल्या सप्ताहातच मुक्त केलं होतं. क्षमतेनुसार पुन्हा योग्य पदी नियुक्तही केलं होतं

यातील देवश्रवसकाकांची पत्नी होती कंसवती. कंसाची सख्खी बहीण होती ही. हे जोडपं अतिशय प्रेमळ होतं. त्यांना शत्रुघ्न, सुवीर व ईशुमान असे तीन पुत्र होते. त्यातील शत्रुघ्न हा मात्र लहानपणीच अरण्यात हरवला होता. हे एक मर्माचं शल्य होतं त्यांचं. आनककांना पुरुजित आणि सत्यजित असे दोन पुत्र होते. त्यांची पत्नी आमची काकू कंका हीसुद्धा कंसाची बहीणच होती. त्यांचे धनु व वज्र नावाचे पुत्र होते. यानंतरच्या श्यामक या माझ्या काकांचे पुत्र होते, हिरण्याक्ष व हरिकेश. त्यांची पत्नी होती शूरभूकाकू. हीसुद्धा कंसाची बहीणच होती. म्हणजे माझ्या सख्ख्या काकूंतील चार

प्रत्यक्ष कंसाच्या भगिनीच होत्या.

त्यानंतरच्या शमीककाकांना एकच पुत्र होता. प्रतिक्षत्र नावाचा. या काकूंचं नाव होतं, सौदामिनी. त्यानंतरचे काका होते कंक, वत्सक, वृक. क्रमश: त्यांच्या पत्नी होत्या कर्णिका, मित्रकेशी आणि दूर्वाक्षी या माझ्या काकू. त्यांना क्रमश: कृतधामन व जय, वृक तक्ष आणि पुष्कर असे पुत्र होते. यातील कंककाका कंसाच्या राज्यकारभारात मंत्री म्हणून सदैव लक्ष घालत असल्यामुळे चांगलेच अनुभवी होते.

अनाधृष्टीकाकांची पत्नी अश्मकी. त्यांना यशस्वी नावाचा एकच पुत्र होता. हे अनाधृष्टीकाका कितीतरी वर्षं यादवांचे पराक्रमी सेनापती म्हणून गाजले होते. गंडष हे एकमेव काका मात्र अपत्यहीन होते. मला सख्ख्या मावश्या होत्या सहा – सहदेवा, शांतिदेवा, श्रीदेवा, देवरक्षिता, वृकदेवा व उपदेवा. यांतील शांतिदेवा मावशीला काही अपत्य झालं नव्हतं. देवरक्षिता व उपदेवा या माझ्या मावश्या, माझ्या सावत्रमाताही होत्या. मला अनेक मावसभाऊ व सावत्रभाऊ होते. धाकलीची ही नवजात कन्या मात्र एकच भगिनी असल्यामुळे सर्वांची अत्यंत लाडकी होणार होती.

थोडक्यात मला गोकुळासारखाच अनेक काका, काकू व चुलत भावंडं यांचा गोतावळा इथंही होता.

साहजिकच ही नामावली ऐकून कुणाच्याही मनी प्रश्न उठेल की, महामंडलेश्वर वसुदेव हे आपले बंधू कैदेत असताना या सर्वांनी केलं तरी काय?

मलाही हा प्रश्न कितीतरी वेळा सतावून गेला होता. यातील आमचे देवभागकाका मात्र पूर्णत: सर्वांहून वेगळ्या स्वभावाचे व विचारांचे होते. सात्त्विक व अतीव प्रेमळ होते. ते प्रेमळ तर होतेच, पण यादवांचे हितैषी होते. त्यांचं प्रतिबिंबच पडलं होतं जसं काही त्यांच्या पुत्र उद्धवात.

या सर्व काकांतील कंक आणि आनक हे काका कंसाच्या राजमंडळात प्रत्यक्ष सेवेतच होते. देवभागकाका सोडून इतर सर्व काका कंसाच्या शिरजोरीला दबून गेले होते. आज पहिल्यानं ते सर्व एकत्र येत होते.

माझ्या थोरल्या आईकडून – देवकीमातेकडून मला सख्खे चार मामा होते. देववान, उपदेव, सुदेव व देवरक्षित या नावांचे. थोरलीला आणखी बहिणी होत्या. त्यातील उपदेवा व देवरक्षिता या माझ्या वसुदेवबाबांच्या पत्नी म्हणजे माझ्या सावत्र माताच होत्या. मला आणखीही दहा सापत्नमाता होत्या!

धाकलीच्या या सुलक्षणी मुलीच्या जन्मदिनी बाळंतविडे घेऊन अत्यंत महत्त्वाचे असे चार राजदूत देशोदेशीहून मथुरेला आले होते. त्यांची ओळख करून देताना वसुदेवबाबांनी खूप बारकावे आम्हाला सांगितले. कारण हे राजदूत त्यांच्या सख्ख्या बहिणींच्या – माझ्या आत्यांच्या राजधान्यांतून आले होते. त्यातील एक राजदूत होता चेदी देशाहून आलेला, माझी आत्या श्रुतश्रवा व तिचे पती दमघोष यांचेकडून आलेला. या माझ्या आत्या व आतोबांना माझ्या एवढाच एक पुत्र होता – शिशुपाल नावाचा! माझ्या गुप्तचरांनी आणलेल्या वार्तेनुसार हा पूर्णत: जरासंधाच्या कह्यात गेला होता. त्यानंही यादवांशी असलेलं वैर डोळ्यांसमोर ठेवून याला आपल्या सेनाविभागाचा चक्क सेनापतीच केलं होतं. एकूणच जीवनात हा मला खूप नडणार होता. दुसरा बाळंतविडा आला होता अवंती राज्यातून. माझी दुसरी आत्या राजाधिदेवी व तिचे पती

जयसेन यांच्याकडून. या दांपत्याला, आमच्याबरोबर आचार्यांच्या आश्रमात शिकलेले विंद, अनुविंद नावांचे पुत्र – माझे आतेबंधू होते. अवंतीच्या अंकपाद आश्रमजीवनात ते फारसे आमच्या सहवासात आले नव्हते.

तिसरा राजदूत आला होता करुष देशाहून. माझी आत्या श्रुतदेवा व आतोबा वृद्धशर्मन यांच्याकडून आलेला. त्यांना पुत्र होता – दंतवक्र!

यातील एक बाळंतविडा मात्र कुठल्याही राजदूताकडून आलेला नव्हता. तो आला होता, एका ऋषींकडून आणि तोही वनातून! म्हणूनच या ऋषींनी सांगितलेले सर्व बारकावे मी ध्यानपूर्वक ऐकले. नित्यासाठी ते मनात नोंदवून घेतले. तो आला होता, कुंतीदेवी या माझ्या आतेकडून. ती बिचारी जीवनाशी महाधैर्यानं लढा देत हस्तिनापूरची महाराणी असून गंधमादन वनात आपले पती पांडुराजांबरोबर म्हणजे माझ्या आतोबांसह पोहोचली होती. 'किदम' नावाच्या ऋषींच्या एका शापामुळे हे सारं घडलं होतं.

तिची जन्मापासूनची कथा सांगताना वसुदेवबाबांच्या डोळ्यांत तर अश्रूच तरळले. "आमच्या कुंतीला तिचे स्वतःचे तीन – युधिष्ठिर, भीम, अर्जुन नावाचे पुत्र आहेत. माद्री या सवतीचे नकुल व सहदेव या नावांचे जुळे पुत्रही तिनं आपलेच मानले आहेत. हे कौंतेय, माद्रेय असे पाचही पुत्र पांडू या पित्याच्या नावानं 'पांडव' म्हणून ओळखले जातात. श्रीकृष्णा, कंसाच्या कैदेत मी आणि तुझ्या मातेनं सोसलं ते काहीच नाही. एवढं कुंती या तुझ्या आतेनं जन्मापासून सोसलं आहे. जीवनात ती तुला कधी भेटलीच, तर तिचा सार्थ आदर कर. तुला शक्य होईल तो आधार दे तिला."

दूत म्हणून आलेल्या ऋषींसमोर बाबाही तिच्या आठवणीनं गदगदले होते.

धाकलीच्या मुलीच्या नामकरणाच्या मुहूर्ताच्या वेळी पुरोहितांनी तिला विचारलं, "नाव काय ठेवायचं?" तसं तिनं भरल्या दालनात केवळ माझ्याच रोखानं बघत जशी काय आज्ञाच केली, "सांग रे श्रीकृष्णा, तूच हिला शोभेसं एखादं नाव!"

मी धाकलीचा आग्रह शिरोधार्य मानून तत्काळ तडीला लावत म्हणालो, "मी आचार्यांच्या आश्रमातून परतलो ते बरंचसं 'भद्र' घेऊन. मथुरेत आलो तोच कळलं की, ते भद्र किती 'सुंदर' आहे ते! मी हिला 'सुभद्रा' म्हणणार!" मथुरेचे नगरजन साखर खात, टिपऱ्या मृदंगांवर नाचत, वसुदेवबाबांच्या पहिल्याच मुलीचं, माझ्या आणि बलरामदादाच्या भगिनीचं नाव एकमेकांना सांगत होते –'सुभद्रा!'

त्या दिवशी ईशस्तवना करून शय्येला पाठ टेकताना माझ्या मिटल्या, जागत्या डोळ्यांसमोर दोनच शब्द सारखे फिरत होते. कुंतीआत्या आणि तिचे सर्व पांडव!

माझं आणि दादाचं आद्यकर्तव्य होतं, गुरुपुत्र दत्ताची मुक्तता. अवंतीहून आल्यापासून हा एकच एक विचार माझा सदैव पाठपुरावा करीत आला होता.

अमात्य विपृथूंनी देशोदेशी धाडलेल्या गुप्तचरांनी वार्ता आणल्या होत्या. त्यात पश्चिमेकडच्या गुप्तचराला अचूक यश लाभलं होतं, दत्ताचं हरण करून अवंतीपासून कुठल्या कुठं पश्चिमसागर किनाऱ्यालगत रैवतक किंवा उज्जयंत पर्वताच्या जवळ नेण्यात आलं होतं. श्वेत सागरातील एका द्वीपावर राहणाऱ्या शंखासुर नावाच्या बलाढ्य असुराचं हे कुकर्म होतं. या पश्चिम सागरालाच त्याच्या फेसाळत्या लाटांमुळे किनारपट्टीचे लोक 'श्वेतसागर' म्हणत, पश्चिम किनारपट्टीवरचे भयभीत जन शंखासुराला 'पंचजन' अशा दुसऱ्या नावानंही ओळखीत होते.

मी उद्धवासह बलरामदादाला घेऊन एकदा यमुनातीरी आलो असताना दत्ताचा नाजूक विषय त्यांच्याजवळ काढला. शंखासुर कसल्याही अन्य प्रकारांनी दबणार नव्हता. तो एका सुरक्षित द्वीपावरच्या गुहेत, निवडक आसुरी सैन्य पदरी ठेवून निर्धास्त राहत होता. खूप चर्चा करून मी व दादानं पक्का निर्णय घेतला. शंखासुरावर सशस्त्र आक्रमण करण्याचा! प्रसंगी सागरातील द्वीपाला भिडण्यासाठी छोटचा–मोठचा नौका हत्तीवरून वाहून नेण्याचा निर्णय आम्ही केला.

यादवांच्या राजसभेत हा निर्णय उग्रसेन महाराजांच्या संमतीनं मी सर्वांच्या कानी घातला. या दूरच्या अभियानासाठी लढाऊ, काटक यादवयोद्धे निवडले. त्यात प्रमुख्यानं सात्यकी, उद्धव, कृतवर्मा, शैनेय, अवगाह असे होते.

ठरल्या दिवशी आमचं चतुरंगदल सैन्य वाजत-गाजत मधुरेच्या पश्चिम महाद्वारातून बाहेर पडलं. पडावांचे टप्पे टाकीत–टाकीत चांगल्या दोन मासांनंतर आमचं सैन्य पश्चिम सागराला येऊन भिडलं. माझ्या जीवनातील हे प्रथमच सागरदर्शन होतं.

सागर! प्रवाही अनंत जलकणांची अमोघ शक्ती लाटांत मर्यादित करणारं महासामर्थ्यशाली पंचतत्त्व! सदैव गर्जणाऱ्या त्या जलतत्त्वाला मी, दादा, उद्धवासह प्रथम नम्र वंदन केलं. आमच्या विराट चतुरंग सेनेचा पडाव सागरकिनारी पडला. जवळच उंचच उंच व कितीतरी लांब पसरलेला रैवतक पर्वत होता.

आमचे निष्णात गुप्तचर पश्चिम सागरात नौकांसह चौफेर पांगले. त्यांनी नौकांनी द्वीप पार करून संध्याकाळपर्यंत शंखासुराची गुहा अचूक शोधून काढली. गुहेत लपलेल्या शत्रूवर रात्री कसलंच युद्धतंत्र वापरता येणार नव्हतं. त्यासाठी पुळणीवर छोटचा राहुटचा उभवून समुद्राची गाज ऐकत आम्ही पडाव टाकला.

समुद्र! दिवसा लाटांवर अविरत खळखळणारा समुद्र. रात्री त्याच लाटांची लयमधुर, गूढरम्य गाज धरतो. जसा काही त्याचा प्राणमय श्वासच भासतो. त्यामुळे तो घनगंभीर वाटू लागतो. आज, मी रात्रीचा सागर किती नाना कळांत व आपल्याच एका सागरबोलीत बोलतो, हे अनुभवत होतो.

सागराच्या या पहिल्या अनुभवात मी त्याच्या प्रेमात पडलो. मला हा पश्चिम सागर खूप–खूप सादविणारा, आवाहक आणि म्हणून आवडणारा झाला – नकळतच!

दुसऱ्याच दिवशी आमचे लढाऊ यादव सैनिक शेकडो नौकांतून निळ्याशार सागरलाटा पार करीत कच्छच्या आखातातील शंखासुराच्या द्वीपावर उतरले. त्याच्या गुहेत किती असुरसेना होती, याचा कयास काही लागेना. आम्ही सशस्त्र सैनिकांच्या लाटांवर लाटा द्वीपावरच्या गुहेत लोट लागलो.

आमचे सैनिक लढून, दमून, भागून, शेवटी हताश होऊन परतू लागले. काही शत्रूंना निपटून आतच धराशायी पडू लागले. एक दिवस नाही, दोन नाही; चांगला सप्ताहभर हा असुरसंग्राम चालला होता. परिणामशून्य, अनिर्णायक.

हे असं किती दिवस चालणार? युद्धतंत्रातील काहीतरी 'इंद्रजाला' चं बुद्धिचातुर्य वापरल्याशिवाय शंखासुराचा हा तिढा काही निखळणार नव्हता! आचार्यांनी दिलेल्या सर्व उपदेशांचं मी स्मरण करून बघितलं. तोड काही सापडत नव्हती. आमचे सैनिक व्यर्थ किती पणाला लावायचे काहीच सुचत नव्हतं.

असाच मी नवव्या दिवशी पश्चिम सागरातून वर उठणाऱ्या सूर्यदेवांना अर्घ्य देत असताना एक केवढातरी मोठा मासा पाण्यातून वर उसळला. एक चंदेरी वीजच क्षणभर

जशी काही तळपली. क्षणातच लुप्तही झाली. मला जाणवलं. शंखासुर गुहेतून बाहेर आला पाहिजे. त्यासाठी आता गुहेत सैनिक घुसवून चालणार नाही. गुहेत धुराचे प्रचंड लोट घुसले, तर बिळातून सर्प बाहेर येतो, तसा तो बाहेर पडेल. झालं! आम्ही सर्व सैनिक प्रथम मागे घेतले.

द्वीपावर मिळेल त्या झाड झाडोऱ्यांची, माडा–ताडांच्या लाकडांची एक प्रचंड धुनी गुहेच्या तोंडावर पेटविली. ही मात्रा बरोबर लागू पडली! असुर सैनिकांचे तांडेच तांडे धुराच्या धसक्यानं ओरडत, धापावत, खोकत बाहेर पडले. पाठोपाठ केवढातरी बलाढ्य, धिप्पाड शंखासुर, गुंजलाल डोळे विस्फारून गर्जत वीतभर रुंद तळपत्या पात्याचं खड्ग पेलत बाहेर आला. त्याच्या डाव्या केशाळ हातात एक केवढातरी मोठा टपोरा आणि बाकदार वळणाचा पांढरा शुभ्र तळपता शंखही होता. दादानं त्याला ठरल्याप्रमाणं मल्लाच्या द्वंद्वाचं आव्हान दिलं. दोघांनीही शस्त्रं खाली ठेवली.

द्वीपावरच्या पुळणीच्या वाळूत दणादण शड्डू ठोकत दोघं एकमेकांना भिडले. त्यापूर्वी शंखासुरानं हातचा शंख एकदा आसमंत थरकावून टाकत केवढ्यातरी मोठ्यानं कसातरीच फुंकला.

शंखफुंकीचं म्हणून काही एक शास्त्रशुद्ध संगीत असतं. त्याला त्यातील ओ की ठो काहीसुद्धा माहीत नव्हतं! मग त्यानं हातचा शंख चक्क दूर फेकला. एव्हाना पुळणीवर जुंपलेल्या युद्धात अनेक असुर सैनिकांना यादवांनी यमसदनाला धाडलं होतं. मल्लविद्या ही दादासाठी आता कला किंवा विद्या राहिली नव्हती. तो त्याचा श्वासच झाला होता. घटकाभरातच यादवांच्या आणि शरण आलेल्या सैनिकांच्या कोंडाळ्यात दादानं शंखासुराला बाहुकंटकाच्या बळावर निपचित केलं. आमच्या सेनेनं उठविलेल्या रणघोषाची लाट सागरलाटांना भिडली. 'यादववीर, बलराम, श्रीकृष्ण जयतुऽऽ जयतु!'

मी पुढे होऊन शंखासुरानं कितीतरी वर्षं प्राणपणानं जपलेला आणि आता वाळूत कसातरीच फेकलेला त्याचा शुभ्र टपटपीत व सुलक्षणी शंख ओणावून हळुवारपणे उचलला.

शंखाच्या सर्व सुलक्षण कसोट्यांवर तंतोतंत उतरत होता तो! तो शंख नव्हताच, होतं एक अनमोल रत्नच! एक अजोड सत्य. दादा, उद्धव, दारुक, सात्यकी केव्हाच माझ्याभोवती कुतूहलानं गोळा झाले होते. मावळतीचा सूर्य पश्चिम सागराला भिडला होता.

सर्वांसह चालत मी पश्चिम सागराच्या गर्जत्या फेसाळत्या लाटांत गुडघाभर पाण्यात उतरलो. एका दुर्दम्य अनामिक आत्मविश्वासानं माझा ऊर काठोकाठ भरून आला. दादा, उद्धव, सात्यकी, विपृथू, दारुक सर्व मावळतीच्या सूर्याला सागरजलातच अर्घ्य देत होते. माझ्या डोळ्यांतील भाव पारखून प्रिय उद्धवानं प्रथम ओंजळभर सागरजल शंखावर सतत धारेनं सोडलं. मी केवढ्यातरी तन्मयतेनं स्वत:ला विसरून मस्तक आकाशगामी शक्य तेवढं उंच उठवून, मिटत्या डोळ्यांनी धमन्या फुगवीत तो दिव्य शंख प्राणपणानं फुंकला! तसं माझ्या रंध्ररंध्रावर क्षणांत रोमांच तरारून उठले. सागरातील नानाविध प्रकारचे मासे तो शंखनाद ऐकण्यासाठी वर उसळले. चंद्ररंगात तळपून पुन्हा क्षणात पाण्यात लुप्त झाले.

सत्याला पोषक व प्रेरक अशा त्या शंखाच्या ध्वनिलहरींनी वेडावलेले यादवसैनिक कंठनाळ फुलवून आनंदानं जयघोष देत नाचू लागले, 'यादवराज श्रीकृष्णाऽ जयतुऽ

जयतुऽऽ!' तो असत्याचा पाठलाग करून त्याचा नि:पात करणारा दिव्य शंख होता!! त्या शंखाच्या स्वरबद्ध ध्वनिलहरींचा विदारक नाद बंदिस्त असुरसैनिकांना असह्य झाला. स्वत:ला यादवांच्या दोरखंडांतून, प्राणभयानं सोडवून घेत निकरानं ते दूर पळू लागले! त्यांच्या पळपुटचा पायांखालची पश्चिम सागरावरची वाळू जशी चरचरत राहिली – 'तो आला आहे – तो आला आहे! त्यानं जिंकलं आहे! दुष्टांनो, दुरात्म्यांनो पऽ ळा!'

मी सात्यकीला आज्ञा केली, "सेनापती, असेच गुहेत जा आणि बंदिवान गुरुपुत्र दत्ताला प्रथम सन्मानपूर्वक मुक्त करून बाहेर घेऊन या."

'आज्ञा आर्य' म्हणत सात्यकी निवडक शस्त्रधारी सैनिक घेऊन गुहेत शिरला.

शंखासुराचं विधियुक्त दहन करण्याच्या आज्ञा मी केल्या. त्या ठिकाणाला 'शंखोद्धार' म्हणतच आमच्या सैनिकांनी नौका हाकारल्या. त्या द्वीपातून दूरवर सागरात जात दुसऱ्या द्वीपाला जोडणारा स्पष्ट भूभागही आम्हाला दिसला. निळ्याशार लाटांचा पश्चिम सागर आम्ही खाडीतून ओलांडला. माझं लक्ष त्या हवेशीर द्वीपानं पुरतंच आकर्षून घेतलं.

दत्ताला समवेत घेऊन निघालेल्या आमच्या सेनेचा पहिलाच पडाव रैवतक पर्वताच्या पायथ्याशी पडला. याला 'उज्जयंत'ही म्हणत. या पर्वतावर रैवत कुलोत्पत्र ककुद्यिन राजाचं राज्य होतं. पर्वत शिखरावरच त्याची रैवतनगर ही प्रशस्त राजनगरी होती. इथं थोडासा विश्राम घ्यायचा, अशी आमची योजना होती. इथला रहिवास वाढेल, याची काहीच कल्पना कुणालाही नव्हती. आमची मनं ओढ घेतं होती. अवंतीच्या आचार्य आश्रमाकडे जाण्यासाठी. दिल्या वचनाप्रमाणं दत्त या गुरुपुत्राला आश्रममातेच्या स्वाधीन करायचं होतं. त्यांचे मुखभर आशीर्वाद मस्तकी धारण करायचे होते. दुसऱ्याच दिवशी आमची सेना पहाटेची आन्हिकं उरकत असताना पर्वतावरून आलेला एक राजदूत माझ्यासमोर राजा ककुद्यिन यांचं भूर्जपत्र घेऊन उभा ठाकला. त्यांनी आम्हा सर्वांना राजनगरीला भेट देण्यासाठी सहर्ष व सगौरव पाचारण केलं होतं.

आमचा सेनापती सात्यकी याला दत्तासह पुढे जाऊन क्षिप्रेच्या काठावर थांबण्याची मी सूचना दिली. तसा तो पुढे निघून गेला. मी, बलरामदादा, उद्धव व विपृथू निवडक यादववीरांसह रैवतकाच्या राजदूतासमवेत तो उंचशील, घनदाट पर्वत चढू लागलो.

रैवतकांचा राजा ककुद्मिनानं आमचं मोठं स्वागत केलं. भोजनोत्तर मौल्यवान अलंकार व गाई, अश्व भेट दिले. आणि सर्वांत वडीलधारे म्हणून विपृथूंसमोर एक अनपेक्षित प्रस्ताव ठेवला... "यादवांच्या ज्येष्ठ सुपुत्रानं – बलरामानं माझी सुलक्षणी, विनयशील उपवर कन्या रेवती हिचं पत्नी म्हणून पाणिग्रहण करावं."

अमात्य अचानक समोर आलेल्या या प्रस्तावानं गोंधळलेच. त्यांना काय बोलावं ते सुचेना. "मी – मी हा निर्णय – कसा – कसा" अमात्य अडखळले. दादा माझ्याकडे बघून एकदा केवळ मंदपणे काय तो हसला! त्याचा अर्थच होता की, हा प्रस्ताव आता मीच मार्गी लावावा.

"रैवतकांनो, तुमचं हे अकृत्रिम प्रेम आम्हा यादवांना मान्य आहे. हा विवाह अवश्य होईल. आम्हाला भविष्यात तुमच्या सहकार्याची नितांत आवश्यकता आहे. मला वाटतं आमच्या भावी वहिनींना दादानं पत्नी म्हणून एकदा तरी बघावं! कसं?" मी निर्णय घोषित केला.

राजा ककुद्मिनांच्या डोळ्यांत लाख–लाख दिवे उजळले, त्यांनी भराभर आज्ञा द्यायला सुरुवात केली. काही वेळातच उंची राजवस्त्रं ल्यालेल्या रैवतक राजकन्या

रेवतीदेवी आमच्यासमोर सभागारात एखाद्या शिल्पासारख्या अधोमुख उभ्या ठाकल्या. माझ्या, उद्धवाच्या या भावी वहिनी होणार होत्या. आम्ही त्यांना नीट निरखलं, उंचशील, सशक्त आणि त्याला शोभाव्या अशा दादासारख्याच हसतमुख व कोकमवर्णी होत्या त्या.

मी आणि उद्धवानं पुढं होऊन त्यांना अपेक्षित नसलेलं वंदन करताच त्या गडबडल्या. झटकन मागे हटत म्हणाल्या, "हे काय भलतंच" क्षणात त्यांची चर्या स्त्रीसुलभ लज्जेमुळे कशी नुसती लालेलाल झाली.

"रेवतीवहिनी, आपलं नातं पक्कं झालं. मी नाही, दादानंच घेतलाय हा निर्णय." मी आदरानं म्हणालो.

आमचा सर्व यादव गोतावळा मागे मथुरेत होता. ही अडचण सोडविताना महाराज ककुद्मिन म्हणाले, आम्ही रैवतकांच्या पद्धतीनं इथं नुसतं 'रेवती' चं स्वयंवर उरकू. तुम्ही सविध मंगल विवाह नंतर मथुरेत संपन्न करावा.

त्यांनी प्रस्ताव ठेवला, तसं स्वयंवर आवरून निवडक सखींसह रेवतीवहिनींना सोबत घेऊनच आम्ही रैवतक पर्वत उतरलो. या पर्वताची वळणदार व लांबलचक आणि सिंहगर्जनांनी सतत दणाणून जाणारी उतरंड उतरताना मला सतत जाणवत राहिलं – 'या रैवतक पर्वताशीही माझा दृढ भावबंध जुळून येणार. पुन्हा मला इथं यावं लागणार. का ते मात्र आत्ताच सांगता येत नव्हतं! मलाच ते माहीत नव्हतं.'

आता अवंतीपर्यंत जायला इथले सैनिकही मदत करणार होते. त्यांच्यासह निघून आम्ही क्षिप्रेकाठी पडाव टाकलेल्या सात्यकीला गाठलं. नौकांतून क्षिप्रा पार करून दत्तासह मी, दादा, उद्धव अंकपाद आश्रमात आलो. दत्ताला आश्रममातेच्या स्वाधीन केलं. फार वर्षांच्या वियोगानंतर त्याला मिठीत घेताना कितीतरी वेळ ती माउली नुसती अंगभर गदगदली.

मला केव्हा एकदा सोबतचा आणलेला दुर्मीळ व सुलक्षणी शंख माझ्या आचार्यांना दाखवीन असं झालं होतं. आश्रमातील आता नवे आलेले शिष्य आचार्यकुटीत बाहेरूनच डोकावून मला, दादा व उद्धवाला पाहून आपसांत कुजबुजत परतत होते. रात्री भोजनोत्तर ईशस्तवनाच्या वेळी मी माझ्या मनातील एक सल आचार्यांच्या समोर ठेवला, "मागधांचं साम्राज्य बलाढ्य आहे. आमचं शूरसेन जनपद त्या मानानं कितीतरी छोटं, नगण्य आहे. कंसाच्या वधानं दुखावलेला त्याचा सासरा जरासंध मथुराकरांना सुखाची निद्रा काही घेऊ देत नाही. आजपर्यंत त्याची पंधरा–सोळा सशस्त्र आक्रमणं परतविलीत आम्ही! आपण यातून काहीतरी मार्ग सांगाल काय?"

माझा प्रश्न ऐकून ते हसले. अगदी लहान मुलासारखे. म्हणाले, "नुकतंच सागरदर्शन करून आला आहेस तू श्रीकृष्णा. तुला नाही वाटत त्याच्या सहवासात राहावं असं? ते असो. तू श्वेतसागराहून आणलेला तो सुलक्षणी शंख नाही दाखवणार काय मला?" त्यांनी जाणीवपूर्वक माझा प्रश्न व विषय कुठंतरीच वळविला व नुसतंच हसले. मीही ते जाणून तसाच हसलो.

कटीच्या निळ्या शेल्यात करकचून बांधलेला तो झळझळीत सुलक्षणी शंख हलकेच गाठ सोडून मी एकदा मस्तकाला लावला, मग आचार्यांच्या चरणाजवळ अलगद ठेवला. आश्रममाता पहाटवेळी प्राजक्ताखाली पडलेलं दहिवरभरलं फूल जेवढ्या अलवार हातांनी उचलेल, तसाच उचलला तो शंख आचार्यांनी! त्याच्या नुसत्या स्पर्शाबरोबर त्यांचे डोळे आपोआप हळूहळू मिटले.

आपल्या नादमधुर आवाजात ते म्हणाले, "श्रीकृष्णा, तुझ्या कंठातील वैजयंतीमालेला शोभेल असंच हे दुसरं अमोल रत्न आहे. 'पांचजन्य' या सार्थ नामाभिधानानं ते विख्यात होईल. तू गुरुदक्षिणा पूर्ण केलीस. तुला मी आज एक अशीच अमोल भेट देणार आहे. तुला धनुर्वेद शिकविला आहेच. त्याची कीर्ती वाढविणारी ठरेल ही भेट. तेही एक रत्नच मानावंस तू."

त्यांनी कुटीच्या आतल्या कक्षात उभ्या असलेल्या आश्रममातेकडे नुसतं पाहिलं. मधुमालतीच्या सुंदर पुष्पमालांनी मंडित असं बाकदार धनुष्य आणि बाणभरला भाता दत्ताच्या साहाय्यानं त्या माउलीनं, तोलून आचार्यांसमोर आणला. तत्परतेनं पुढे होत आचार्यांनी धनू पेलून धरलं. त्या वळणदार धनुष्याच्या प्रत्यंचेचा क्षणात एक भरीव टणत्कार उठविला. धनू पेललेले आचार्य हे दृश्य एरवी दुर्मीळच होतं. आचार्य काहीतरी अस्पष्ट पुटपुटले. ते म्हणाले, "ही माझी तुला भेट. 'अजितंजय' नाव आहे, या गुणवंत धनुष्याचं." उठून मस्तकी लावत आचार्यांचा प्रसाद म्हणून ती भेट मी नम्रपणे स्वीकारली. अजितंजयाच्या बळकट प्रत्यंचेचा कर्णीदार टणत्कार मीही उठवून पाहिला. कितीतरी वेळ त्याचा प्रभावी नाद कुटीभर भरून घुमतच राहिला. थोडावेळ खांद्यावर मी ती अपूर्व भेट वागविली. मग तिच्याकडे निमिष नेत्रांनी बघणाऱ्या बलरामदादाच्या हातात मी ते यशवंत धनुष्य दिलं. त्यानंही ते खांद्यावर तोलून–पेलून बघितलं. उद्धवानं एव्हाना भात्यातले बाण निरखले होते.

या आनंदाच्या क्षणी एखादा पंखसुंदर पक्षी सरोवरावर उतरावा तसा मजेदार विचार माझ्या मनात सरसरून उतरला. आचार्यांकडे एकटक बघत मी विनवणी केली, "गुरुदेव, एकदा, केवल एकदाच आपण हा शंख फुंकावा! आमच्या समक्ष. असुरांच्या सहवासात राहून त्याच्या पावित्र्याला आलेला अमंगलाचा दोष सदैवचा निवारावा. सर्वांगी पावन करावा, या पांचजन्याला."

आचार्य निरागस हसले. व्याघ्रचर्मावरचा पांचजन्य आपल्या निमुळत्या बोटांच्या ओंजळीत घेत उठले. पर्णकुटीच्या छताकडे मान उंचावून आमच्या पूजनीय आचार्य सांदीपनींनी मिटत्या डोळी हातचा दिव्य पांचजन्य शंख धमन्या फुगवीत उच्च स्वरात आवेगानं फुंकला. त्यांची गौरवर्णी चर्या क्षणात कशी लालावून आली.

मी बघतच राहिलो. मला निर्णय घेता येईना. आचार्यांची भरगच्च दाढी अधिक शुभ्र होती, त्यांचे लहान बालकासारखे हसणारे दात अधिक शुभ्र होते, की त्यांनी ओंजळीत धरलेला पांचजन्य शंख अधिक शुभ्र होता, की रोमांच अंगी उठवणारा तो अलौकिक शंखध्वनी अधिक शुभ्रधवल होता!

या वेळी जेव्हा आम्ही मथुरेत परतलो तेव्हा माझ्याकडे चार अमोल रत्नं होती. वैजयंतीमाला, पांचजन्य, अजितंजय आणि म्हटलं तर चौथं रत्न होत्या, आमच्या रेवतीवहिनी!

आम्ही मथुरेत परतलो. उग्रसेन महाराजांनी आम्हा सर्वांचं मथुरेच्या सीमेवर येऊन स्वागत केलं. मथुराकरांनी फुलं उधळून, जयघोष देत रेवतीवहिनींचा सहर्ष स्वीकार केला. उभं नगर त्यांच्या स्वागतासाठी गुढ्या–तोरणांनी सजलं होतं. माझ्या पांचजन्याचा हा शूरसेन राज्यात प्रथम प्रवेश होता. तो ध्यानी येऊन दादानं सीमेवरच माझ्या खांद्यावर प्रेमानं सहेतुक हात ठेवला. तो दाबत अचूक सूचना केली, "धाकट्या, पांचजन्य!" त्याच्याकडे व रेवतीवहिनींकडे बघत मी हसलो. सीमेवर आज गर्गमुनींसह अठरा

यादवकुळांतील झाडून सारे प्रमुख यादव लोटले होते. गद आणि सारण यांना आघाडीवर ठेवत नव्या पिढीचे यशस्वी, चित्रकेतू, बृहद्बल असेही कितीतरी त्यात होते.

मथुरेला चंद्राकृती घेर टाकून पसरलेल्या नाचऱ्या लहरींच्या यमुनेला मी डोळाभर एकदा बघून घेतलं. राजवास्तूत माझी वाट बघणाऱ्या वसुदेवबाबांचं व देवकीमातेचं स्मरण करून शूरसेन राज्याच्या सीमेवर मी हातचा ओंजळीत न मावणारा शुभ्रधवल टपोरा पांचजन्य शंख जीवदेठापासून प्रथम फुंकला.

हा शंख हाती आल्यापासून माझ्या चित्तवृत्तीच पार बदलून गेल्या होत्या. पूर्वीचा कृष्ण जसा काही लुप्तच झाला होता. मी जे-जे काही मनी योजलं होतं, योजणार होतो, त्याचा खोलार्थ त्या शुभ्रधवल शंखाच्या रोमहर्षक स्वर्गीय लहरींनी केव्हाच यमुनेच्या लहरींना बिलगून कथन केला होता.

वाजत-गाजत, प्रचंड स्वागतात आमचं मथुरेत आगमन झालं. पण मागधांच्या मदांध सम्राट जरासंधाला शूरसेन राज्यातील यादवांना समूळ उखडून काढल्याशिवाय मन:शांती कशी ती मिळणार नव्हती. मागधांच्या राजधानी गिरिव्रजात त्याच्या कन्या व कंसाच्या राण्या अस्ति व प्राप्ती त्याला क्षणभरही 'यादवांचा उच्छेद आणि प्रामुख्यानं श्रीकृष्णाचा लवकरात लवकर वध' याशिवाय दुसरा विचारच करू देत नव्हत्या.

शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या राजकीय सिद्धान्ताला धरून करुष देशाचा राजा दंतवक्र, चेदी देशाचा दमघोषपुत्र शिशुपाल यांच्याशी त्यानं राजकीय संधान बांधलं होतं. खरंतर ते दोघंही माझे आतेबंधूच होते. पण ते उगवत्या सूर्याला नमस्कार करत सामर्थ्यशाली सम्राट जरासंधाला शरण गेले होते. शिशुपाल, दंतवक्र, जरासंध या त्रिकुटानं विदर्भाचा एरवी दूरदृष्टीचा राजा भीष्मक यालाही आपल्या पक्षात ओढलं होतं, सौवीर देशीचा राजा शैब्य, काशिराज वत्स, विदेहराज, शाल्व, मद्रराज, त्रिगर्त, दरद अशा चौफेर मांडलिक राजांचं मोहोळ सम्राट जरासंधानं राजधानी गीरीव्रजात पाचारण केलं. यादवांना समूळ नष्ट करण्यासाठी आता सर्व शत्रुशक्ती एकवटल्या. एक सप्ताहही झाला नाही तोच, माझ्या पांचजन्यासमोर मागधांच्या प्रचंड आक्रमणाचं आव्हान पुन्हा उभं ठाकलंच.

हे जरासंधाचं सतरावं आक्रमण होतं. गोमती, शरयू, गंडकी, कौशिकी, अशा नद्या पार करून प्रचंड चतुरंगदल सैन्य गिरिव्रजात चौबाजुंनी एकवटलं. नौकानौकांनी यमुना पार करून गर्जत मथुरेला येऊन भिडलं. आजवर कोसळलेल्या सोळा लहानथोर आक्रमणांपेक्षा हे आक्रमण कितीतरी प्रचंड व निर्णायक होतं. प्रत्यक्ष जरासंधच मागधांच्या विराट सेनेचं सेनापत्य करायला यमुना पार करून आज मथुरेवर सशस्त्र उतरला होता. हजारो मोठ्या नौका यमुनेच्या विशाल पात्रात नांगरून पडल्या. मागध हे तसे युद्धसंमुख, शूर व लढवय्येच होते.

उग्रसेन महाराज व बाबा यांच्या नेतृत्वाखाली आम्हा यादवांचीही राजसभा भरली. या सभेत मी, दादा, सेनापती अनाधृष्टी, युयुधान तथा सात्यकी, उद्धव, अक्रूर, कृतवर्मन, सत्राजित, शिनी, माझे सर्व काका, मामा आणि अठरा यादवकुलांतील सर्व प्रमुख यादव योद्धे निर्धारानं एकवटले. या सर्वांत दादा, सात्यकी, कृतवर्मा, अनाधृष्टी यांचा एकच निर्णय होता. काहीही करून पराक्रमाची शर्थ गाजवून मागधांचं हेही आक्रमण शर्थीनं परतवून लावायचंच.

माझ्या तंत्राप्रमाणं मी गुप्तचरांकडून प्रथम सर्व सूक्ष्म व अचूक वार्ता उचलल्या. मला कळून चुकलं की, हे आक्रमण एकटचा मागधांचं किंवा जरासंधाचं नव्हतं. यादवांचं शत्रुत्व करणाऱ्या सगळ्या लहान–मोठचा शक्ती जरासंधाला पुढे करून एकवटल्या होत्या. ही लढाई कितीतरी असमतोल व दीर्घकालची होती.

विराट मागधांपुढे यादव म्हणजे हत्तीसमोर मूषकच ठरणार होते. तरीही राजसभेत मी उत्साही यादवांचा निर्धार मूकपणे ऐकून घेतला. प्रत्यक्ष अनुभव आल्याशिवाय संतप्त मस्तकाचे यादव कधीच सावध होणार नव्हते. सुधारणार नव्हते. मी सर्वांना मूकसंमती दिली. सभेतील एकमुखी ठरावाप्रमाणं यादव मागधांशी लढायला सिद्ध झाले.

यापूर्वीच्या अनुभवाप्रमाणे मथुरेच्या कोटाची चौबाजूंची सर्व महाद्वारं बंद झाली. बाहेर मागधांच्या विराट चतुरंग सेनेचा कोटाला गर्जता वेढा पडला. रणदुदुंभ्या कडाडल्या. नगारे निनादले, रणभेऱ्या फुंकल्या गेल्या. समाप्तीचा दिवस न सांगता येणाऱ्या एका दीर्घकालीन चिवट व घनघोर युद्धाला तोंड फुटलं.

आता संरक्षणाला बांधलेले युद्धसज्ज यादव, बाहेर तटात घुसायला आक्रमणसज्ज उतावीळ मागध असं चित्र उभं ठाकलं. मागध भृशुंडी, शतघ्नींतून प्रचंड पाषाणखंड आणि पेटते पलिते बाहेरून सतत मथुरेच्या तटात फेकू लागले. आतून यादवही त्याला तसंच उत्तर देऊ लागले. आठ–एक दिवस गेले. युद्धाचा निर्णय काही लागत नव्हता. मथुरेबाहेर शूरसेन राज्याची बहुतेक शेतीवाडी, हत्ती, उंट घोड्यांच्या पायांखाली नष्ट होऊ लागली.

जरासंधाचे शस्त्रसज्ज अश्वसाद गावोगावी फिरून शूरसेन राज्याच्या प्रजाजनांना सतावू लागले. कधी धरून आपल्या सेनेत कोंडून ठेवू लागले. धाकानं धनधान्य खंडणी वसूल करू लागले. दहा दिवसांनंतर मी महाराज उग्रसेनांना विचारांती एक दूरदृष्टीची सूचना केली. त्यांना एकांतात काही एक गुप्त असा निर्णय मी ऐकविला. यादवांची राजसभा तत्काळ बोलावण्याची सूचना केली. आजपर्यंत यादवांच्या युद्धापूर्वी आणि समाप्तीच्या वेळीच अशा राजसभा भरल्या होत्या. त्याही रात्रीच्या. कुणालाही कल्पना नसताना युद्धात मध्येच भरणारी ही पहिलीच अनपेक्षित राजसभा होती.

सभेला तोंड फोडताना वृद्ध महाराज उग्रसेन राजसभेतील ढणढणत्या टेंभ्यांकडे बघत म्हणाले, “आपण यादवांनी शस्त्रसज्ज आणि बलाढ्य मागधांच्या सततच्या आक्रमणांना निर्धारानं तोंड दिलं आहे. आज आपल्या राज्यात परिस्थितीचं अचूक मूल्यमापन करून योग्य निर्णय घेण्याची क्षमता लाभलेला श्रीकृष्ण हा एकमेव यादव रणनेता मला तरी दिसतो आहे. तुम्ही सर्वांनी त्याला अनुसरावं व तो म्हणेल ते पालन करावं, असं मला वाटतं. श्रीकृष्णाचं मत आहे हे युद्ध थांबवावं! मागध मान्य करत नसतील, तर यादवांनी एकांगी थांबवावं.”

“याचा अर्थ काय? सोळा वेळा निकरानं लढून आता आम्ही शरणागत पत्करावी की काय? ते शक्य नाही.” नेहमीच्या उत्साहानं सात्यकी उसळून म्हणाला. बलरामदादानं, अनाधृष्टीसह अनेक निधड्या यादवांनी त्याला उठून, “बरोबर आहे. आम्ही प्राणपणानं लढूच लढू, ” म्हणत पाठिंबा दिला. बऱ्याच वेळच्या उलटसुलट चर्चेनंतर, प्रश्नोत्तरांच्या गदारोळानंतर सभागृहात स्पष्ट दोन तट पडले. एक युद्ध नको म्हणणारा. दुसरा कुठल्याही हानीपोटी युद्ध निकरानं निर्धारी लढवू व जिंकूच म्हणणारा.

मी माझ्या आसनावर शांत बसून मूकपणंच सर्व नुसतं ऐकत राहिलो. या वेळी यादवांतील एक जन्मजात गुणधर्म मला प्रकर्षानं जाणवला. त्यांच्यात एकी असते तोवर ते वाटतात, वागतात, दिसतात आणि असतातही अत्यंत बलशाली, अजिंक्य. पण कुठलाही अहंकार दुखावला की, एकदा ते दुफळीनं बिथरले की, त्यांना सावरणं मी–मी म्हणणाऱ्यांना अशक्य होतं.

उग्रसेन महाराजांनी शांतपणे प्रारंभ केलेली युद्धपरिस्थितीची ही रात्रीची राजसभा अटीतटीच्या, उलटसुलट प्रचंड वाक्ताडनांनी अनावर ताणावर पडली. कोण कुणाशी काय बोलतो आहे, तेच काही कळेना. तरीही मी शांतच होतो! शांतच शांत.

शेवटी विकद्रू नावाचे सभागृहातील सर्वांत वृद्ध व ज्येष्ठ यादव आसनांवरून उठून उभे राहिले. त्यांची पांढरीशुभ्र भरगच्च दाढी मानेबरोबर थरथरली. दोन्ही हात उंचावून अधिकारवाणीत केवढ्यातरी मोठ्यानं ते कडाडले, "मुकाट्यानं शांत व्हा सारे! मी केशपिकल्या वयाच्या अधिकारानं जे सांगतो आहे, ते शांतपणे ऐका. आणि तसं नीट वागा."

म्हातारबुवा खाकरले, अंगभर थरथरले, बोलू लागले, "कशासाठी डोकीफोड करताहात ही? व्यर्थ आहे! कंसाचा सासरा असलेला जरासंध का बिथरला आहे, त्याचं मूळ कारण तरी तुम्हाला ठाऊक आहे का? ते कधीतरी नीट ध्यानी घेणार की नाही तुम्ही? तुम्हा यादवांशी त्याचं वैर असायचं तसं काहीच कारण नाही. श्रीकृष्ण हा एकमेवच या सर्वांचं मूळ कारण नाही काय? त्याच्यामुळे आपला वध होणार, या आशंकेनं कंसानं त्याच्यावर नानाविध प्राणघातक शत्रू सोडले. त्यातून चतुराईनं सुटून यानंच त्याचा वध केला. कंसाचा सासरा म्हणून जरासंधाला या सर्वांचा श्रीकृष्णावर सूड घ्यायचा आहे. त्यासाठीच जरासंध वारंवार मथुरेच्या यादवांवर ससैन्य कोसळतो आहे. एक नव्हे, दोन नव्हे चांगलं सोळा वेळा हे आक्रमण धडधडत आलं आहे. कुठवर मारणार तुम्ही आमचे तरुण यादव – मागधांच्या आक्रमणाखाली? सम्राट जरासंधाच्या अनावर संतापाखाली?

"संपूर्ण यादवांच्या हितासाठी मला यातून एकमेव उपाय दिसतो आहे. श्रीकृष्ण वयानं लहान आहे. तो न रागावता मी काय म्हणतो, ते नीट समजून घेईल, असा मला विश्वास वाटतो. मला स्पष्ट वाटतं आहे – यापुढे श्रीकृष्ण आणि बलराम यांनी मथुरेत क्षणभरही न थांबता कुठंतरी दूरदेशी अज्ञातात निघून जावं! त्यामुळे मागे राहिलेल्या मथुराकरांना शांतता व स्वास्थ्य लाभणार आहे. या सर्व पेचप्रसंगात हाच एकमेव तोडगा योग्य वाटत नाही काय?"

"काय, श्रीकृष्णा, काय आहे तुझं यावर स्पष्ट मत?" वृद्ध विकद्रू अंगभर थरथरत आणि माझ्याकडे रोखल्या डोळ्यांनी एकटक बघत तसेच उभे राहिले. एका वृद्ध यादवाच्या मर्मभेदी बोलांनी सर्व यादव थरारले. सर्वांना हे अगदी अनपेक्षित होतं.

मी शांतपणे उठलो. खचाखच भरलेल्या भरगच्च यादव सभेवर एक धावती दृष्टी फिरविली. गोकुळातल्या मुरलीशी, पश्चिम सागराच्या शंखाशी नातं सांगणारी माझी परावाणी स्फोटून उठली. "समस्त यादवहो! हे वंदनीय विकद्रूबाबा बोलले ते सार्थ नाही काय? कटू; तरीही कठोर सत्य आहे ते. वृद्धांचे बोल हे गुणकारी औषधींसारखेच नसतात काय? यादवांच्या सांप्रतच्या वेदनेचं अचूक निदान त्यांनी निर्भयपणे केलं आहे. जरासंधाला सर्वप्रथम बघायचा आहे, तो यादव श्रीकृष्णाचा रक्तथेंब! मी पुरता जाणून आहे की, माझ्या हातून ज्याच्या जामाताचा वध झाला आहे, तो शक्तिशाली जरासंध हाच माझा सर्वश्रेष्ठ, सर्वप्रथम शत्रू आहे! आज तो सामर्थ्याच्या अजिंक्य शिखरावर आरूढ झाला आहे. केवळ माझ्यासाठी अश्राप यादवांना आपल्या विराट सेनेच्या पायांखाली चिरडू बघत नाही काय? यापूर्वी सोळा वेळा त्यानं हे न थकता केलेलं आहे.

"विकद्रूबाबांचं म्हणणं यथार्थ नाही काय? एकासाठी अनेकांना ताप का? जर मी

यादव आहे, तर समस्त यादवांसाठी माझ्या व्यक्तिगत बऱ्या–वाईटाचा विचार मी सोडून द्यायला नको काय?

"या विकद्रूबाबांचे केश पिकले ते अनुभवाचे टक्के–टोणपे खाल्ल्यामुळेच. ऊनतापीच्या माऱ्यामुळे नव्हे! वयानं लहान म्हणून मी त्यांना नम्रपणे सांगू इच्छितो. 'त्यांनी दिली ती सूचना प्रत्यक्षात आणण्यासाठी मीच उग्रसेन महाराजांना आजच्या या सभेचा प्रस्ताव दिला होता.' अगदी याच शब्दांत स्पष्ट सांगून की, 'यादवांच्या वेदनेचं कारण ठरण्यापेक्षा मीच बलरामदादासह आजच्या आज मथुरा सोडून जाणार आहे!'

"मला माहीत आहे, यामुळे पुढच्या पिढ्या मला कुत्सितपणानं 'रणछोडदास' ही म्हणतील! ते गालबोट, जीवनातलं ते अपश्रेयही मी आनंदानं स्वीकारणार आहे! यादवांनी अकारण मरण्यापेक्षा एका यादवानं 'रणछोडदास' होणं मला पूर्ण विचारांती मान्य आहे!"

सभागृहभर मी दृष्टी फिरविली. मी मथुरा सोडून जाणार म्हणून कितीतरी सैरभैर झालेल्या व्याकूळ चर्या मला स्पष्ट दिसल्या. गोकूळ सोडताना गोपगोपिकांच्या चर्याही अशाच झाल्या होत्या.

महाराज उठले. म्हणाले, "यादवहो, श्रीकृष्णानं हा निर्णय मला पूर्वीच सांगून त्यानंच ही सभा भरविण्यास सांगितलं. मला वाटतं, श्रीकृष्ण तसा तुम्हा–आम्हांपैकी कुणालाही नीट समजून येण्यासारखा सोपा नाही! मला जेवढा कळला व जाणवला आहे तो स्मरून तुम्हा सर्वांसमोर मथुरेचा राजा म्हणून, घोषित करतो की, तुमची वा कुणाचीही इच्छा असो नसो, श्रीकृष्ण आता मथुरेत पळभरही थांबणार नाही! कुठंही थांबणं हा त्याचा स्वभावच नाही. जल आणि वायू कधी थांबलेत का? थांबतील का? आकाशकिरण कधी थांबलेत का? थांबतील का? तो कुठंही असला तरी त्याची मथुरेशी असलेली भावनाळ मी असेपर्यंत तरी अशीच अखंड व अक्षुण्ण जिवंत राहावी, एवढीच माझी त्याला हात जोडून प्रार्थना आहे."

यादवांची विशेष रात्रसभा संपली. मी आणि बलरामदादानं त्या रात्रीच उद्धवासह, विपृथूंना घेऊन निवडक यादव योद्ध्यांसह, भुयारी मार्गानं यमुनेचा किनारा गाठला. भव्य नौकांतून आम्ही मोजकेच यादव दक्षिण दिशेला चाललो.

हे करताना 'श्रीकृष्ण पळाला! मागधांना घाबरून श्रीकृष्ण मथुरा सोडून पळाला!' अशा वार्ता मागे मागधांच्या सैन्यतळावर गुप्तचरांकडून पसरावयाला आम्ही चुकलो नाही. या वार्ता ऐकून जरासंध आमच्या पाठलागावर पडल्याशिवाय कधीच राहणार नव्हता. त्याचा सैन्यतळ उठताच, आमचे निवडक यादवयोद्धे आम्हाला सशस्त्र आणि एकमेळानं येऊन पुन्हा दक्षिणेकडे ठरावीक ठिकाणी मिळणार होते. सांप्रत मथुरा आक्रमणमुक्त होणार होती!

आम्ही मोजक्या, निवडक यादवांनी मथुरा सोडली. पण दक्षिणेकडे झालं तरी जायचं कुठं हा प्रश्न होताच. त्याचा विचारही हा निर्णय घेण्यापूर्वी मी करून ठेवला होता. माझ्या गुप्तचरांनी आणलेल्या वार्तांनुसार दक्षिणेकडे आमच्या आप्त यादवांची आणखी चार राज्यं होती. ही राज्यं आमचे मूळपुरुष महाराज यदू, यांना नागकन्यांपासून झालेल्या चार पुत्रांनीच स्थापिली होती. त्यातील एक होतं नर्मदा तीरावर माहिष्मती इथं. माहिष्मतीचं राज्य हे मुचकुंदांनी दक्षिण ऋक्षवान पर्वताच्या शेजारी वसविलं होतं,

पुरिका नावाचं प्रसिद्ध शहरही या राज्यात होतं.

दुसरं महाबलीश्वरमच्या जवळचं पद्मावत राज्य होतं. यदुपुत्र पद्मवर्णानं सह्याद्रीच्या पठारावर, वेण्णा नदीच्या काठावर उभारलेलं. या राज्याच्या अंतर्गत, पंचगंगा नदीच्या तीरावर करवीर नावाचं वेदकालापासून प्रसिद्ध नगरही होतं. तेही नागवंशीय शृगाल नावाच्या मांडलिक राजाच्या आधिपत्याखाली पद्मावत राज्यातच होतं. सर्व करवीराला 'दक्षिणकाशी' म्हणत व मानत.

त्याच्या दक्षिणेला तिसरं यदुपुत्र सारसानं स्थापन केलेलं, 'क्रौंचपूर' हे राजनगर होतं. त्या नगराचा परिसर तांबड्या मातीचा व अन्नधान्यानं सुपीक होता. या राज्याला 'वनवासी' असं म्हणत.

चौथं राज्य होतं, यदुपुत्र हरितानं पश्चिम सागरकिनाऱ्यावर वसविलेलं. तिथले निष्णात कोळी समुद्रात डुब्या मारण्यात प्रवीण होते. अत्यंत कौशल्यानं ते सागराच्या उदरातील मोतीभरले शिंपले, प्रवाळ, शंख सागराबाहेर सहज आणू शकत होते.

या चारही राज्यांकडे अमात्य विपृथूंनी आमचे दूत संदेश देऊन पूर्वीच धाडले होते. माझ्या दृष्टीनं सर्वांत महत्त्वाची गुप्तचर वार्ता होती, ती म्हणजे पद्मावत राज्यात वेण्णा नदीच्या किनाऱ्यावर जमदग्निपुत्र साक्षात भगवान परशुराम आपल्या निवडक शिष्यगणांसह उतरले आहेत ही!

मी दादाशी विचारविनिमय करून निर्णय घेतला, तो प्रथम परशुरामांच्या दर्शनाला जाण्याचा. आम्हाला काहीच कल्पना नव्हती की, त्यासाठी किती नद्या आणि अरण्यं ओलांडावी लागणार होती. मथुरा सोडताना आम्ही हिरे, माणकं, मोती, रत्नं व सोनं अशी भरपूर संपत्ती सोबत लपवून घ्यायला विसरलो नव्हतो. मागे राहिलेल्या सेनापती सात्यकीला दक्षतेच्या अनेक सूचना दिल्या होत्या. जरासंधाचा सैन्यतळ उठताच निवडक व लढाऊ यादवयोद्धे घेऊन तो गोमंत पर्वत जवळ करणार होता व आम्हाला मिळणार होता.

या दक्षिण यात्रेत चांगल्या तीन मासांनंतर आमच्या समोर आलं, ते सर्वांत मोठं आव्हान दंडकारण्याचं! विंध्य, सातपुडा आणि परियात्र या पर्वतरांगांचं.

हे अरण्य पार करण्यासाठी केवळ एकच निरुंद मार्ग होता. 'दक्षिणापथ' नावाचा! त्याची चकवा देणारी सर्व वळणं, वाकणं ज्याला खडान्खडा माहीत आहेत, असा एक अनुभवी वनवासी मुखिया आम्ही बरोबर घेतला. दारुकानं अश्वपारखी दृष्टीनं निवडून विकत घेतलेले धिप्पाड व काटक अश्वच काय ते आमच्याबरोबर होते.

दक्षिणापथ! ही वाट किती निरुंद होती? तर कसाबसा एकच अश्वसाद अश्वांचे वेग हाती धरून काय ते त्याच्या मागूनच एक–एक पाऊल पुढे टाकू शकत होता, तेही आडव्या आलेल्या काटेरी रानवेली छाटून दूर सारत, तसू–तसूनं महत्प्रयासानं पुढे जाऊन!

"धाकट्या, या घनदाट अरण्यात रात्र होईल ते कसं काय जाणणार आहोत आपण? रात्री मुक्काम करायचा तो कसा? हा प्रवास चालणार तरी किती दिवस?" एरवी निर्धोक बोलणारा दादा शंकाच शंका उठवीत म्हणाला.

कधी–कधी दादाच्या खांद्यावर हात ठेवून मी त्याच्याशी अतीव प्रेमानं हसत बोलत असे. तसंच बोलताना मी म्हणालो, "दादा, हलधरा, चिंता करू नकोस. या दक्षिणापथावर रात्र कशी सुरू झाली, हे आता दिवसाही अस्पष्ट करकरणाऱ्या रातकिड्यांच्या स्पष्ट

वाढलेल्या दाट लयीवर समजून घ्यायचं आपण! पक्षयांचे आवाज मात्र त्या वेळी आपोआपच थांबलेले असतील नाही का? हिंस्त्र श्वापदांच्या डरकाळ्याही अधूनमधून पथ थरारून सोडतील रात्रीच्या.

"पडावासाठी हातातील परशूंनी काटेरी रानवेळी छाटून, स्वच्छता करून छोटचा–छोटचा राहुटचा उठवाव्या लागतील. त्याभोवती चकमकीनं ठिणग्या पाडून धुनीसाठी खणलेल्या चरात रात्रभर पेटत्या लाकडांच्या धुन्या तेवत ठेवाव्या लागतील. त्या अग्नीमुळे हिंस्त्र श्वापदंही जवळपास फिरकणार नाहीत. वणवा पेटू नये म्हणून ठिणग्यांवर मात्र लक्ष ठेवावं लागेल. निद्रेकरी व सशस्त्र पहारेकरी यांची पथकं आलटून–पालटून बदलून वस्ती रात्रभर कडक जागती ठेवावी लागेल.

"पहाटे राहुटचा आवरून, आगटचा माती लोटून, विझवून पुन्हा पुढे मार्गक्रमणा करावी लागेल. सोबत आणलेल्या शिध्याचा काटेकोर वापर करावा लागेल. एक मासानंतर निसर्गदेवतेचं हे अवाढव्य निबिड दंडकारण्य आपण सुखरूप पार करू शकू! डोळाभर सूर्यदर्शन घेऊ शकू. अरण्य पार करून मोकळ्या हवेत येताच प्रथम एक दिवस तर चुकल्या–चुकल्यासारखंच वाटेल सर्वांना. अचानक घडणाऱ्या सूर्यदर्शनामुळे!"

आमचा हा घनघोर प्रवास एकमेकांना साथ, आधार देत अथक निर्धारानं आम्ही पार केला. एक मासानंतर आम्ही अश्वांसह अरण्य ओलांडलं एकदाचं.

लगतच असलेल्या विदर्भ राज्याच्या सीमेवरून गोदावरी नदी पार केली. अश्मक राज्यात उतरलो. श्रीराम उतरला होता, तो कुंतल राज्यातील जनस्थान पर्वताचा, नासिकचा परिसर उजव्या हाताशी ठेवून आम्ही भीमा नदीही ओलांडली. पद्मवर्ण राजाच्या पद्मावत राज्याच्या सीमेवर आलो.

आता महाबलीश्वरमलगतचा वेण्णा नदीकाठच्या अरण्यातील परशुरामांचा 'भृगू आश्रम' जवळ आला होता. तसं भगवानांना आमच्या आगमनाची वार्ता देण्यासाठी मी एक अग्रदूत धाडला. एक दिवस सीमेवरच विश्रामासाठी वस्ती केली. मी आणि बलरामदादा पहाटे आमचा निवडक दीड–दोनशे यादवांसह भृगू परशुरामांन भेटायला निघालो.

प्रथम आम्ही कृष्णा व कोयना ह्यांच्या संगमावरचं करहाटक हे तीर्थक्षेत्र संगमात स्नान करून ओलांडलं. वेण्णा नदीच्या परिसरात आलो. परशुरामांनी धाडलेले त्यांचे दोन जटाधारी, भृगू परमशिष्य खांद्यावर दोन तळपते परशू पेलून स्वागतासाठी आम्हाला सामोरे आले. त्यांच्यासह मी आणि दादा आदरानं ज्येष्ठ आणि श्रेष्ठ भृगूंना भेटण्यासाठी निघालो. आम्ही भृगू आश्रमाच्या लाकडी, उंच प्रवेशद्वारापाशी आलो.

गेला दीड महिना मी मनाशी, कल्पनेनं चितारलेलं परशुरामांचं चित्र साफ पुसून टाकीत, साक्षात जमदग्निपुत्र प्रवेशद्वारात हसत हात पसरून उभे ठाकलेले आम्हाला दिसले! मला तर धक्काच बसला. जसा आचार्य सांदीपनींना बघताच ओढला गेलो, आपोआप खेचला गेलो होतो, तसाच या ज्येष्ठ भृगुवार्यांना बघताच ओढला गेलो. दादाला पाठीशी घेत झपाझप पुढे झालो. आश्रमाच्या प्रवेशद्वारातच मी त्यांना नम्रभावानं आदरपूर्वक साष्टांग दंडवत घातले. दादानंही घातले. मला झटकन उठवून गाढ आलिंगनात घेत भृगूंनी संथ लयीत आशीर्वाद दिला. "जयोऽस्तु यादवश्रेष्ठ!' तसाच दादालाही दिला. दादाअगोदर त्यांनी प्रथम मला आलिंगनात घेतलेलं मलाच जाणवलं.

गोकुळात असताना मला न कळणारी यमुनेची अस्वस्थ ओढ तिचं दर्शन घेताच शांत होत असे. मथुरा सोडल्यापासून मला लागलेली भृगुश्रेष्ठ परशुरामांची केवळ मलाच समजू शकणारी ओढ त्यांच्या प्रत्यक्ष दर्शनानंच शांत झाली.

शुभ्रधवल हिमकणांच्या वर्णाची भरगच्च दाट दाढी होती त्यांची. शुभ्रच उत्तरीय व अधरीय त्यांनी अंगी परिधान केलं होतं. मस्तकी रुद्राक्षमाळांत पीळदार बांधलेला तसाच जटाभार होता. कितीतरी वयस्क तरीही सतेज मुद्रेचे, प्रशांत नेत्रांचे भृगुश्रेष्ठ परशुराम शांतपणे हसले. म्हणाले "तुझ्या आगमनानं या भूमीचा उद्धार झाला आहे. मी जाणतो तू कोण आहेस ते! चल आश्रमात. प्रथम विश्रांती आणि फलाहार घे. मग बोलू." त्यांचे बोल पाषाणखंडावर आदळणाऱ्या परशूच्या ध्वनीसारखे कणीदार, ठणठणीत व प्रणवमधुर होते.

विश्रांतीनंतर भृगुवर्य परशुरामांनी अतिशय आस्थेनं आमच्या प्रवासाची खोदून विचारणा केली. मी त्यांना यादवांना डोकेदुखी ठरलेल्या जरासंधाच्या आक्रमणाचा सल यथासांग विशद करून सांगितला.

माझा दक्षिण यात्रेचा वृत्तान्त ऐकून, जरासंधाचा पेच समजून येताच ते विचारात पडले. काही क्षण डोळे मिटून घेत ते जसे आत्मलीनच झाले. मग म्हणाले, "यादवराज श्रीकृष्णा, मथुरा सोडण्याचा तू घेतलेला निर्णय अगदी योग्य आहे! इतरांना नि प्रत्यक्ष यादवांना पटेल, असं त्याचं कारणही तू घोषित केलं आहेस. मी जाणतो तू मथुरा का सोडलीस ते!

"मथुरेतच का कुठेच तू कधीच स्थिर राहणार नाहीस. तू आहेस चक्रवर्ती! सदैव फिरणारा. तुझ्या पायांचा स्पर्श होईल, ती–ती भूमी उद्धरणार आहे. यासाठी तू सतत चालतच राहणार, राहावास! जरासंध तुझा असशील तिथं शोध घेत येणारच। यासाठी माझा तुला संकेत आहे की, तू तुझ्या लोकांसह आता बळकट व सुरक्षित नैसर्गिक वृजन असलेल्या अशा 'गोमंत' पर्वतावर जावंस. तुझं यादवसैन्य तिथं तुला मिळताच जरासंधाचा यथासांग समाचार घ्यावास. तुझ्या गोमंताच्या विजयानंतर पुन्हा भेटीला ये. तुझ्यासाठी एक अमोल आणि अपूर्व अशी दिव्य भेट मी युगानुयुगं जपून ठेवली आहे! ती स्वहस्ते तुझ्या स्वाधीन करून मुक्त होईन मी एकदाचा! अन्य कुणालाच मी ती देऊ शकत नाही!"

एव्हाना आमच्या चर्चेत भाग न घेणारा; पण आचार्यांच्या प्रभावी दूरदृष्टीनं दिपून गेलेला बलरामदादा धाक चेपल्यानं, धैर्यानं म्हणाला, "भगवन्! लहान तोंडी मोठा घास घेतल्यासारखं होईल. क्षमा असावी. विचारावं की नको या संभ्रमात आहे मी. अनुज्ञा असेल तरच विचारावं म्हणतो." दोन्ही हात जोडून दादा भृगूंसमोर नम्र लवला. हे त्याचं रूप मला सर्वथा आगळंच होतं, असा नम्र तो प्रत्यक्ष आई–बाबांसमोरही मला कधी दिसला नव्हता.

"निःशंक विचार बलरामा." भृगूतेज हसतच शांतपणे उत्तरलं.

"भगवन्, नेहमी खांद्यावर पेलता असणारा आपला तळपता परशू आमच्या भेटीच्या वेळी आपल्या स्कंधावर कुठं दिसला नाही तो! काय आपल्या क्षत्रियांच्या दमनसत्राच्या प्रतिज्ञेत पालट झाला आहे? की काही म्हणतात त्याप्रमाणं आमच्या यदुमहाराजांपासून क्षत्रियत्वाचा लोप झाला आहे?" दादानं हलकेच खांद्यावरून उतरून ठेवलेल्या सोनेरी फाळाच्या नांगराकडे बघत भृगुश्रेष्ठ क्षणभर दाढीभर हसले. म्हणाले,

"मी नाही, तुझा बंधू श्रीकृष्णच देईल याचं तुला पटणारं समर्पक उत्तर!" त्यांनी अपार शांत दृष्टीनं सहेतुकपणे माझ्याकडे बघितलं, माझी आणि भृगुश्रेष्ठांची दृष्टिभेट होताच दोघंही हसलो.

भृगुश्रेष्ठांनी दिलं असतं तेच नेमकं उत्तर दादाला व आमच्या यादवांना उद्देशून मी पटकन दिलं. "भृगू व यादवजनहो! परशू हे एक प्रतीक आहे! बुद्धीतल्या तणांची स्वच्छता करणारं! भगवानांचं क्षत्रियांच्या ज्ञातीशी कधीच वैर नव्हतं! क्षत्रियत्वाच्या नावाखाली उद्धत व बलांध झालेल्या ज्या अविचारी शक्ती जीवनाच्या वाढ व विकास या मूलभूत लक्षणात खंड आणीत होत्या, त्या वृत्तींशी वैर होतं त्यांचं! आवश्यक ते कार्य पार पडताच त्यांनी हेतुपूर्वक आपल्या खांद्यावरून परशू उतरून ठेवला. त्याचं प्रतीक म्हणून त्यांच्या शिष्यांनी प्रथा म्हणून तो खांद्यावर धारण केला आहे. दादा, उद्या तूही तुझं कार्य होताच खांद्यावरचा नांगर असाच उतरून ठेवशील – तरीही तुझ्या नावाला तो सदैव चिकटूनच राहील. 'हलधर' म्हणूनच ओळखेल उद्याचं जग तुला.

"आपल्या क्षत्रियत्वासंबंधी म्हणशील, तर तेही जन्मावर कधीच नव्हे, तर अंगीच्या विक्रमावर अवलंबून आहे. मला वाटतं, भगवानांनी त्यासाठीच आपणाला सूचक आशीर्वाद दिले आहेत. मला द्यायची अमोल भेट त्यांनी त्यासाठीच राखून ठेवली असावी!"

"बरोबर! मला माहीत होतं, हा अचूकच बोलेल. श्रीकृष्ण–बलरामा, माझे तुम्हा दोघानाही उदंड आशीर्वाद आहेत. कृष्ण–रामा, जयतु, जयतु, जयऽऽतु!"

उजव्या हाताशी मला आणि डाव्या हाताशी दादाला बिलगतं घेत परशुरामांनी आम्हा दोघांचेही खांदे प्रेमानं थोपटले. त्यांच्या स्पर्शात कितीतरी आश्वासक ऊब होती. वेण्णेकाठच्या भृगू आश्रमात भगवानांचा दोन दिवस अगत्याचा पाहुणचार घेऊन आम्ही गोमंत पर्वताकडे निघालो.

गोमंत! आम्ही आजवर ओलांडलेल्या सर्व पर्वतांत अतिशय घनदाट अरण्याचा होता हा पर्वत. लांबच लांब पसरलेला. उंच व दुर्लंघ्य असा. याच्या पायथ्याशी उंच, दाट आणि जाड पानांची सागाच्या वृक्षांची घनदाट वनंच–वनं पसरली होती. त्यामागे क्रमश: उंच–उंच होत गेलेल्या या लांबलचक पर्वतावर जांभूळ, आम्र, ऐन, खैर, अंजन, शिसम, केंजळ, कांचन अशा कितीतरी वृक्षांची घनदाट व किर्र्रऽऽ रानं पसरली होती. पर्वताच्या शिखरावर तेवढा काही भाग पठारासारखा मोकळा होता. तोही दाट हरळी व तुरळक झाडोऱ्यानं व्यापला होता. या पठारावरून पश्चिमेला कदंब वंशाच्या गोमंतक राज्याचा भाग स्पष्ट दिसे.

मी आणि दादा पाठीशी आमचे निवडक यादव घेत; गोमंताच्या घनदाट अरण्यात शिरलो. संध्याकाळपर्यंत आम्ही पर्वताचं शिखर गाठलं. लागलीच परशू, कोयते, कुठारी चालवून आमच्या यादव पथकानं काही भक्कम पर्णकुटचा पठारावर उठविल्या. त्या दिवशी त्या उंचच–उंच पाषाणखंडावर चढून डोळ्यांवर हाताची झड घेत मी दूरवर अनंतात दिसणारी, पश्चिम सागराची दूरवरची रुपेरी पाणरेघ डोळाभर बघून घेतली. शेजारी असलेल्या दादाला म्हणालो, "मला कळत नाही. गोकुळात असताना मला नेहमी यमुनेची ओढ लागे. आणि जेव्हापासून शंखासुराच्या निमित्तानं हा पश्चिम समुद्र जसा एकदा बघितला आहे, तेव्हापासून याचीही तशीच अनावर ओढ का लागली आहे?"

एकदा समोरच्या पाणरेघेकडे आणि एकदा माझ्या डोळ्यांकडे बघत दादा म्हणाला,

"तुला पाणीदार समुद्राची ओढ लागते. आमच्यासारख्यांना मात्र तुझ्या पाणीदार डोळ्यांचीच ओढ लागते! कुठं राहिली असेल मथुरा आणि कुठं आहे हा गोमंत पर्वत? धाकटच्या, कुठच्या कुठं आलो आहोत आपण!"

मग कितीतरी वेळ आम्ही दोघंच त्या पाषाणखंडावर सुख–दु:खांच्या कितीतरी गोष्टी बोलत बसलो. माझी शोधक दृष्टी संपूर्ण गोमंत पर्वताच्या परिसरावर मावळतीच्या संधिप्रकाशात सरासर फिरत राहिली.

मी दादाला माझ्या गुप्तचरांकडून हस्तगत केलेली दक्षिण देशाची माहिती देऊ लागलो. पूर्वेकडे बोट करून म्हणालो, "हे समोर दिसतं आहे ते वनवासी राज्य. त्याच्या खाली दक्षिणेला दूरवर पांड्य आणि मलय अशी राज्यं आहेत. ही आर्यभूमी जिथं संपते तिथं 'कुमारी' नावाचं भूटोक आहे. उजवीकडचा पश्चिमसागर, पूर्वेचा पूर्वसागर याहून कितीतरी मोठा असा या दोहोंना शेवटी दक्षिणेला आडवा मिळणारा दक्षिणसागरही आहे."

पशुपक्षयांनी गजबजलेल्या, नयनरम्य अशा गोमंतावर आमचे दिवस कसे आनंदात चालले. मी आणि दादानं एका सप्ताहातच बघता येईल, तेवढा हा पर्वत मनमुक्त हिंडून फिरून बघितला. या पर्वताला उतरणीच्या दृष्टींनं कुठं–कुठं वाव आहे, त्या उतारवाटाही बघून घेतल्या. नीट ध्यानी ठेवल्या.

इथल्या रसपूर्ण विविध फळांनी, लोहयुक्त पाण्यानं आणि झुळझुळत्या, थंडगार पश्चिम वाऱ्यानं मी आणि दादा या पर्वताच्या गाढ प्रेमातच पडलो. आनंदानं तुडुंब भरलेले दिवस पर्वतावर केव्हा चढत व मावळत ते ध्यानीही येत नसे आमच्या.

आमच्या अग्रदूतांनी निरोप दिल्याप्रमाणं जसजशी दक्षिणेतून माहिष्मती, पद्मावत, वनवासी आणि हरित या आमच्या यादवराज्यांतून सशस्त्र लढाऊ चतुरंग सैन्यदलं गोमंत चढून येऊ लागली, तसतशी आमच्या आनंदात भर पडत चालली. त्याचा कळस, मागे निरोप ठेवल्याप्रमाणं जेव्हा महारथी, आजानुबाहू सेनापती सात्यकीही ससैन्य येऊन मिळाला तेव्हा झाला. आता गोमंत पर्वतावर झाडांच्या गचपणात जिथं जागा मिळेल, तिथं यादवसेनेच्या राहुटयाच राहुटया पडल्या. पायथ्याच्या सागवानी तळापासून शिखराच्या पठारी परिसरापर्यंत, रोज, सशस्त्र सेनादूत उभ्या गोमंतक पर्वताची खडान्‌खडा माहिती उचलून आम्हाला देऊ लागले. पर्वताला प्रचंड सैन्यशिबिराचं रूप आलं.

दंडकारण्य पार करताना, भृगुश्रेष्ठ परशुरामांन भेटताना आणि इथं आल्यापासून माझ्या मनाच्या वनात शंकेच्या अनेक रानकाक पक्षयांची करकर सतत ऐकू येऊ लागली, 'इथं नक्कीच काहीतरी घडणार! भविष्यकाळाच्या पिढयांसाठी सतत स्मरणात राहावं, असं काहीतरी नाटच इथं रंगणार!'

घडलंही तसंच! इथं येऊन आम्हाला एक मास लोटला नाही तोच, एक दिवस उगवतीच्या सूर्यबिंबाबरोबर पर्वताच्या पायथ्याकडून उठलेला दुंदुभी, रणहलग्या, रणढोल यांचा संमिश्र गर्जता कल्लोळच कल्लोळ गोमंताच्या घनदाट वनराईला भिडला. चढत्या सूर्याबरोबर तो रणकल्लोळ वाढतच चालला. इतकी रणवाद्यं कडाडत एकाच वेळी गर्जू लागली की, एरवी मनमुक्त कलकलणाऱ्या पक्षयांतील काही अधिक

मोठ्यानं कलकळत भेदरून उडून दूर कुठंतरीच निघून गेले. काही जागच्या जागी थिजून आपापल्या कोटरांत चिडिचूप झाले.

मी, दादा, सात्यकी, दक्षिण देशीच्या आम्हा यादवांचे सेनापती सारेच पठारावरच्या उंच प्रशस्त पाषणखंडावर चढलो. पर्वताच्या पायथ्याचा वेध घेत बघू लागलो. खाली हत्ती, घोडे, पदाती यांनी भरलेल्या मागध सेनेच्या लाटाच लाटा हेलावत होत्या. कलकळत होत्या. मागधांच्या त्रिकोनी, शेंदरी ध्वजांच्या रांगाच रांगा सर्वत्र पसरल्या होत्या. पाठीमागे चेदींच्या चंदेरी ध्वजांच्या पताका रांगेत दिसू लागल्या.

अर्थ स्पष्ट होता. प्रतिशोधानं तारतम्याची सीमा ओलांडली होती. जरासंधानं माझ्यासाठी मथुरेवर धाडलेलं सतरावं आक्रमण, शेपूट ताणत थेट दक्षिणेकडे घुसविलं होतं, 'जामात कंस' वधला म्हणून माझ्यावरचा त्याचा मनःक्षोभ दिवसागणिक वाढत आता पराकोटीला पोहोचला होता. चेदिराज शिशुपालासह तो माझ्या पाठलागावर पडला होता. इथं दूर दक्षिणदेशी येऊन थेट गोमंत पर्वताला भिडला होता. त्याच्याबरोबर कलिंगराज श्रुतायु, काश्मीरराज गोनर्द, किन्नरराज द्रुम, मालवराज सूर्याक्ष, वेणुदारी, छागली, सोमक आणि दरद असे राजेही होते. आपापल्या सेनेसह आलेले.

आता आमच्या पर्वतावर चित्ताचपळ हालचाली सुरू झाल्या होत्या. मी पाठोपाठ आज्ञा धाडून पायथ्याचे सागवानी वनांतील आमचे सैनिक तत्काळ प्रथम वर घेतले. पाठोपाठ सर्व सेनादलाची पर्वताच्या रचनेप्रमाणं विभागणी केली. संरक्षणाचा पक्का पवित्रा घेतला. जरासंधाच्या मागधांना संयम आणि शांतता जन्मातच कशी ती माहीत नव्हती. ते आले ते सागवानी वनात तडक घुसू बघू लागले. पवित्रा धरलेल्या आमच्या यादवसेनेनं निकराच्या प्रतिचढाया केल्या. त्यांना कापून काढलं. त्यामुळे नवीन घुसू बघणारे भयानं परतले. पळू लागले.

जरासंध आणि शिशुपाल रोज नव्या अवसानाचे सैनिक सागवानी दाट फळीत लोटू लागले. त्यातील कितीतरी वनामुळे लढायलाही वाव नसल्यामुले अकारण कोसळू लागले. गोमंत पर्वताच्या अर्ध्या उंचशील अंगावर पसरलेले आम्ही यादव होतो. पायथ्याच्या पठारावर पसरलेले जरासंध, शिशुपालाचे अगणित मागध, चेदी नि इतर सैनिक होते. मध्ये घनदाट सागवन. असा हा युद्धाचा देखावा एक तसूही शत्रूंना पर्वताच्या वनराईत शिरकाव न करू देता, तटस्थच राहिला.

अथक पाठलाग करून केव्हा एकदा मथुरेच्या यादवांच्या काळ्याला गाठतो, असं जरासंधाला झालेलं होतं. गदेच्या प्रहारांनी त्याचा केव्हा चेंदामेंदा करून टाकतो, अशी दातओठ खात स्वप्नं रचणारा मागधाधिपती जरासंध पायाला खीळ बसल्यासारखा झाला. कवचधारी जरासंध रोज आपल्या सेनापती शिबिरांतून चतुरंगदलात गरगर फिरत होता. पर्वताच्या पायथ्याशी येत होता. हतप्रभ होत, मान उंचावून, भुवयांवर हाताची झड घेत बारीक डोळ्यांनी शिखराकडे एकटक बघत होता. निरुपायानं अगतिक होऊन हाताखालच्या सेनाधिकाऱ्यांवर भयाण खेकसत, कडाडू लागला.

मला आणि बलरामदादाला गोमंत पर्वतातून बाहेर मोकळ्यावर खेचण्यासाठी त्यानं निर्णय घेतला. उभा गोमंत पर्वतच जाळावर घालण्याचा! त्यानं पायथ्याशी भिडविलेली आपली गज आणि अश्वपथकं आता एकाएकी पटापट मागे घेतली. हातात पेटते पलिते घेतलेली, शिरस्त्राणधारी, कवचधारी पदाती पथकं पर्वताच्या पायथ्यालगत पुढे

आणली. लागलीच मला कळून चुकलं की, तो आता कसली आग ओकणारी युद्धचाल खेळणार आहे.

माझ्या आणि दादाच्या तत्काळ सटासट आज्ञा सुटल्या. मिळेल त्या वाटेनं सर्वांनी पर्वत सोडून पायथ्याच्या पश्चिम पठारावर एकवटावं.

मागधांनी पेटते पलिते भिडविताच सागवानाच्या भुईवर पडलेल्या तबकांसारख्या वाळक्या अगणित सागपर्णांनी क्षणात कर्पुरासारखा धडाधड पेट घेतला. हां–हां म्हणता अग्नीच्या लवलवत्या, चटपटीत प्रचंड ज्वाळांनी गोमंताचा पुरा पायथा आपल्या लपेटीत येरगटून घेतला. वाऱ्याच्या जोरावर क्षणाक्षणाला लवलवत्या, भेलकांडत आकाशात झेपावणाऱ्या प्रचंड, पिवळ्या धमक अग्निलोळांनी हाहाकार माजविला.

एरवी नाना श्वापदांच्या गगनभेदी गर्जनांनी सारा गोमंत पर्वत कसा दणाणून, हादरून जाई. आता मात्र ती तरस, लांडगे, चित्ता, वाघा, सिंहासारखी विक्राळ, हिंस्त्र, अरण्यश्वापदं भेदरली. प्राणभयानं वीस–वीस हात आकांती उडचा घेत अग्नीबाहेर आक्रोशत पडण्यासाठी प्राणांतक धडपडू लागली. काही चपलाईनं निसटली. काही मध्येच ढेपाळून अग्नीत कोसळली. त्यांचा आयाळी, केशावळ व जळक्या मांसखंडांचा असह्य उग्र दर्प सर्वत्र पसरू लागला. ज्वाळांचे चटके बसताच धिप्पाड हत्तींचे कळपच्या कळप प्राणान्त चीत्कारू लागले. वळवळत्या सोंडाच सोंडा उभारून, प्राणभयानं कर्णकठोर चीत्कारू लागले. एकमेकांना ढकळत, डांगलत, आवेशानं धावू लागले. त्यातील काही निसटले. काही मध्येच कोसळले. होरपळले. असह्य तळमळत शांत झाले.

हरणं, ससे, चितळं, काळवीटं, रानडुक्करं, रानगवे, लांडगे, भेकरं, कोल्हे, यांची तर वाट फुटेल तिकडे आक्रोशत उडचा घेत, पांगापांग झाली. भेदरून उडचा घेताना एकमेकांना धडकूनच कित्येक पशू वनाग्रीत कोसळले! प्राणान्तानं ओरडणारे गरुड, कोकीळ, कपोत, क्रौंच, धनछडी, मयूर, ससाणे, रानरावे अशा पक्षयांतील कितीतरी नुसत्या झळांनीच पंखहीन झाल्यासारखे धडाधड कोसळले. बिळाबिळांतील नाग, अजगर, धामण, घोणस यांसारखे सर्प आणि घोरपड, सरडा, गणेश असे प्राणी वळवळत बाहेर पडले. कित्येक सुटले, कित्येक... अग्नीच्या भक्षयस्थानी मध्येच वळवळत पडले. करपून गेले. साग, ऐन, अंजन, कांचन, खैर, केंजळ, जांभळ, हिरड बेहड अशा उंचच–उंच वृक्षांचा उभ्या देही पेटून फुटताना प्रचंड संमिश्र कडकडाट होऊ लागला. जसजशी पर्वताची वनराई भव्य अग्निकुंडाचं भयाण दाहक रूप घेऊन रसरसू लागली, तसे जळत्या राखेचे उष्ण–उष्ण तुषार हवेच्या झोतांवर सर्वत्र विखरत चालले!

पेटत्या गोमंत पर्वताच्या झलीनं हबकलेले प्रत्यक्ष जरासंधाचे आघाडीचे मागध सैनिकही धगमार न साहवून अर्धा–एक योजन प्रथम भेदरून आपोआप मागे हटले! मागध तळांवर आपल्या राहुटचांत जरासंध आणि शिशुपाल यांनी तर आपल्या सेनापतींसह आनंदाच्या हर्षविभोर आरोळ्या ठोकल्या. मैरेयक मद्याचे कुंभच–कुंभ रिचवायला प्रारंभही केला! त्यांनी पक्का कयास केला होता, उपोषणासाठी लागणारे, चुलखंडात तापत्या राखेत रताळूंचे रानकंद होरपळून काढतात, तसे श्रीकृष्ण, बलराम गोमंताच्या या पेटत्या चुलखंडात पूर्ण देही होरपळून गेले असणार!!

इकडे झाडून सारे यादव सैनिक पश्चिमेच्या दुसऱ्या दिशेनं प्रथम सुरक्षित पर्वताबाहेर काढून मी आणि बलरामदादानं सर्वांत शेवटी पर्वत केव्हाच सोडलाही होता.

एकदा धनुष्यातून सोडलेला बाण जसा त्याच्या गतीनंच थांबायचा तेव्हा कधीतरी थांबतो. तसा आता हा गोमंत पर्वताचा पेटलेला अनावर वणवा त्याच्याच लयीनं कधीतरी आपोआप थांबणार होता. तो पेटविणं जरासंधाच्या हाती होतं. थांबविणं मात्र आता त्याच्या, माझ्या, दादाच्या वा कुणाच्याच हाती नव्हतं!

एकीकडून वनवासी राज्याचा आणि दुसरीकडून गोमंतक राज्याचा परिसर उजळणाऱ्या या वणव्याला साक्षी ठेवूनच आमच्या सैन्यानं दक्षिण देशीच्या सेनेशी प्रथम हातमिळवणी केली. मग या जोड यादवसेनेनं पर्वताला पुरता वळसा घातला. मद्यधुंद असावध जरासंधावर, शिशुपालावर... निकराच्या आक्रमी 'जै इडादेवी!' अशा रणघोषणा देत ही सेना अचानक कोसळली! मागध, चेदींनी उठून शस्त्रं सावरण्यापूर्वीच युद्धाला तोंड फुटलं. मोकळ्या पठारावर आलेल्या आमच्या सेनेनं रणवाद्यांच्या गजरात आवेगी चढाई करताच समोरचा अगोदरच वणव्याच्या धगीनं दिपून गेलेला मागधांचा सेनासागर थिजूनच गेला! भांबावला. त्यांना कसं नि कुठं धावावं तेच सुधरेना.

तसे मागध युद्धात निष्णात, धैर्यशील, पराक्रमी आणि आता तर संख्येनं आमच्यापेक्षा कितीतरी अधिक होते. तरीही आमच्या शूर सैनिकांना चेतावणी देत मी आणि दादा प्रथम हत्तीवरच्या अंबारीतून शत्रूंवर कोसळलो. दादाची प्रारंभीच गाठ पडली ती राजा दरदाशी. हां–हां म्हणता आपल्या संवर्तक नांगरानं आकडीसारखं धरून दादानं त्याला रथातून भुईवर दाणकन खाली खेचलंच. मग सौनंद मुसलाच्या एकाच भक्कम प्रहारानं जागीच वधलं.

मागधांच्या यापूर्वीच्या युद्धात असं कधी घडलं नव्हतं. पण आज घडलं. सम्राट असून, आर्यावर्तात पराक्रमी धाक असूनही जरासंध हटला! चक्क पाठ फिरवून पळू लागला!! तसं त्याचं चतुरंगदली सैन्यही काढता पाय घेऊन त्याच्या मागून पळू लागलं. आता मागधांच्या पाठलागावर आमचं चेतलेलं विजयी यादव सैन्य पडलं. हाती सौनंद मुसल पेललेला मी आणि संवर्तक नांगर सरसावलेला दादा रथातून त्याचं नेतृत्व करू लागलो. पुढे मागध, चेदी आणि पाठीमागे उत्तर–दक्षिणेचे यादव असा पाठलागाचा खेळ संध्याकाळपर्यंत चालला. शेवटी त्यांना वनवासी राज्याच्या सीमेबाहेर पिटाळून, मगच संध्याकाळ झाल्यामुळे आम्ही परतलो.

पुन्हा गोमंत पर्वताच्याच पायथ्याशी आलो. जिथं जरासंध, शिशुपालाचा पडला होता, तिथंच आमचाही तळ पडला. अद्यापि पर्वत पेटतच होता. दिवसासारख्या वाटणाऱ्या त्याच्या उजेडात आमच्या सैनिकांनी आता नव्या राहुटया ठोकल्या. रात्रीचं अन्न शिजवलं. गेले कित्येक दिवस लढून आणि आज पाठलाग करून थकलेले आमचे सैनिक राहुटया–राहुटयांत समोरच्या मोकळ्या पटांगणात विसावले.

दुसऱ्या दिवशी आमच्या विजयी सेनेनं पुन्हा भृगुश्रेष्ठ परशुरामांच्या शूर्पारक आश्रमाची वाट धरली. या आश्रमातील भृगूंना आमच्या जरासंधावरील विजयाची वार्ता आपोआप समजली होती. त्यांनी आमचं वाद्यांच्या गजरात सहर्ष, प्रचंड स्वागत केलं. आता मला ओढ लागली होती, ती परशुरामांच्या दिपविणाऱ्या तेजवंत आणि दूरदृष्टीच्या, भव्य मुद्रेच्या प्रत्यक्ष दर्शनाची. किती अचूकपणे त्यांनी मला गोमंताकडे जाण्याचा संकेत केला होता! त्यांची माझी भेटच झाली नसती तर? जरासंधानं आम्हाला मोकळ्या पठारावरच कुठंही गाठलं असतं तर? अद्यापि भृगुश्रेष्ठ वेण्णानदीच्या काठीच

होते.

शूर्पारकांचा पाहुणचार घेऊन मी व बलरामदादा आमच्या विजयी सेनेसह त्या आश्रमाकडे चाललो.

दंडकारण्याचा प्रवास करून आमच्या पाठोपाठ दक्षिण देशात उतरलेला आमचा सेनापती सात्यकी बरोबर होता. तो नुकत्याच मिळालेल्या जरासंध, शिशुपाल यांच्यावरील विजयामुळे अत्यंत प्रभावित झाला होता. पुन्हा चाललेल्या कोयना घाटीच्या प्रवासात तो, मी आणि दादा एकाच रथात होतो. आम्हाला मथुरा सोडून बरेच महिने झाले होते. तिकडील काहीच वार्ता मधल्या धामधुमीत समजू शकलेली नव्हती. ती एक–एक करून सात्यकीकडून मी काढून घेत होतो. काही गोष्ट तो स्वत:च निवेदन करून सांगत होता. म्हणाला, "मथुरेतील उग्रसेन महाराज आणि जवळ–जवळ सर्व प्रमुख यादव या सततच्या युद्धांना कंटाळले आहेत. तू आणि बलरामानं मथुरा सोडली तरी त्यांना भीती वाटते ती मागध पुन्हा येतील याची."

"सेनापती, आता जरासंध, त्याचे मित्र आणि मागध पुन्हा कधीच मथुरेवर चालून येणार नाहीत! मीही एक पक्का निर्णय मनाशी घेतला आहे. दक्षिण देशीच्या या भ्रमणानंतर पुन्हा मथुरेत गेलो की, यादवांच्या राजसभेत मी तो प्रकटपणे मांडणार आहे. ज्या स्थितीत आणि ज्या पद्धतीनं मी मथुरा सोडली आहे, तो सल माझ्यापेक्षा यादवांनाच अधिक जाणवतो आहे. मी ते जाणतो. तो काढून टाकला पाहिजे. योग्यवेळ येताच मी ते करणार आहे." सात्यकीला मी खांद्यावर हात ठेवीत धीर दिला.

आम्ही वेण्णा नदीकाठच्या भृगू आश्रमाजवळ आलो. मागच्या वेळी मी, दादा, विपृथू आणि मोजके यादव होतो. या वेळी आमच्याबरोबर दक्षिणेचं विजयी यादवसैन्यही होतं. या वेळी तर झाडून साऱ्या शिष्यगणांसह प्रत्यक्ष भृगुश्रेष्ठ परशुरामच आम्हाला सामोरे आले! आणि होय – त्यांच्या खांद्यावर वीतभर रुंदीचा परशूही या वेळी तळपत होता! मी, दादा, सात्यकी सर्वांनी त्या तेजस्वी व द्रष्टया योगपुरुषाला आश्रमाच्या महाद्वारात आदराचे दंडवत घातले.

त्यांच्या प्रशस्त आचार्यकुटीकडे चालताना माझ्या खांद्यावर हात ठेवून ते प्रेमानं म्हणाले, "जरासंधानं निसर्गानं शेकडो वर्षांची साधना करून समृद्ध केलेला गोमंतासारखा पर्वत वणव्यात जाळून टाकला म्हणून तू हळहळलास. ते योग्यही आहे. पण मला स्पष्ट दिसतं आहे. प्रत्यक्ष तुलाही असा निर्णय भविष्यात घ्यावा लागेल, याहून घोर वन जाळण्याचा! आणि तेही तुला मानवांच्या कल्याणासाठीच करावं लागेल." ज्येष्ठ भृगू पांढऱ्याशुभ्र दाट दाढीभर हसले.

आम्ही त्यांच्या आचार्यकुटीत आलो. फलाहार झाला. कुटीत मध्यभागीच एक अहोरात्र धगधगतं प्रशस्त यज्ञकुंड होतं, त्याच्या शेजारी एका चौरंगासारख्या लाकडी, उंच, व्याघ्राजिन अंथरलेल्या आसनावर भृगुश्रेष्ठ परशुराम बसले.

मी आणि दादा मध्ये यज्ञकुंड ठेवून भृगूंच्या समोरच मृगाजिनावर बसलो. आमच्या यादवसेनेतील सैनिक कुटीबाहेर आश्रमभर पसरले. जसा आचार्य सांदीपनी घनगंभीर नादमय सुरात आम्हाला अंकपाद आश्रमात बोध करीत, त्याच गुरुभावानं आमच्याशी बोलताना परशुराम म्हणाले, "रामा–श्रीकृष्णा, यापूर्वी आर्यावर्ताचं दक्षिणटोक असलेलं दंडकारण्य ओलांडून केवळ दशरथपुत्र श्रीराम, लक्ष्मणासह आला होता. आता तुम्ही

आलात. आणि तुमच्या भेटीचा मलाही योग लाभला.

“तुम्ही इथून भेटून गेल्यापासून मी विचार करतो आहे, काय हेतू असावा निसर्गाचा आणि परमेशाचा तुमच्या माझ्या भेटीमागं! तुमच्यापेक्षा वयाच्या अधिकारानं कितीतरी संवत्सरांचा मला अनुभव आहे. त्याला अनुसरून मी थोडक्यातच तुमचं मला स्पष्ट दिसणारं जीवितकार्य सांगतो आहे, ते नीट ऐका!

“दुर्बळांच्या अधिकारांचं व जीवन जगण्याच्या हक्कांचं संरक्षण करतं, ते खरं क्षत्रियत्व, तोच खरा पुरुषार्थ!

जीवन म्हणजे काय, अधिकार म्हणजे काय, त्यापेक्षा उत्तरदायित्व म्हणजे काय निसर्ग म्हणजे काय, हे ज्ञान सुलभ रीतीनं समजावून सांगतं, ते ब्रह्मत्व!

“मी जन्मानं ब्रह्मकुमार असलो, तरी कर्मानं क्षत्रियत्वाचं कर्तव्यनिष्ठ पालन केलं. सर्वांगीण जीवनाला अडसर ठरणारं, कुणालाही न मानणारं मदोन्मत्त क्षत्रियत्व निखंदून टाकलं. कुठल्याही राज्याच्या सिंहासनाचा लोभ न धरता, भृगूंचे आश्रम आर्यावर्तभर उठवून ज्ञानदानाचं ब्रह्मकर्म जीवनभर निष्ठेनं करीत आलो.

“थोडक्यात मला समजला तो जीवनाचा अर्थ सांगतो –

ज्ञान, विज्ञान, प्रज्ञान ही जीवनाची तीन प्रमुख अंगं आहेत. ज्ञान म्हणजे भोवतीच्या चराचर सृष्टीची सखोल माहिती.

“विज्ञान म्हणजे विशेष ज्ञान. सूक्ष्मातलं सूक्ष्म ज्ञान. ब्रह्मास्त्रासारख्या विद्येच्या प्राप्तीनं मी ते मिळवलं.

“प्रज्ञान म्हणजे स्वत:सह संपूर्ण जीवनाचं सखोल ज्ञान. आपल्यात आणि प्रत्येक सजीव–निर्जीव यांत वावरणाऱ्या चिरंतन चैतन्याचा अंतिम शोध घेतं ते प्रज्ञान.

“आता तुम्हाला मी जे सांगतो आहे, ते ज्ञानविज्ञानापलीकडच्या, प्रज्ञान क्षेत्रातलं आहे म्हणून महत्त्वाचं आहे.

रामा–श्रीकृष्णा, तुम्ही जन्मानं यदुकुलोत्पन्न असलात, तरी केवळ यादवांच्या अठरा कुलांचेच नाहीत! नुसत्या शूरसेन राज्याचेही नाहीत. दंडकारण्याला भिडून संपणाऱ्या केवळ आर्यावर्ताचेही नाहीत! तुम्ही सतत वाहणाऱ्या मानवी जीवनगंगेच्या घाटावरचे चिरंतन तेवणारे दीप आहात. तुम्हाला कुलाच्या, स्थलकालाच्या मर्यादा पडूच शकत नाहीत.

“काही एक निश्चित दृष्टी समोर ठेवून मी जीवनभर भटकलो आणि कार्य केलं. श्रीकृष्णा, त्याचा उत्तराधिकारी म्हणून नेत्रांतून तुझी खूण पटल्यामुळेच मी तुला आज एक अमोल व स्वर्गीय अशी भेट देणार आहे. तिचा अर्थ समजण्याची, योग्य वेळी तिचं प्रक्षेपण करण्याची आणि प्रसंगी ती विसर्जन करण्याची सर्व क्षमता मला तुझ्या ठायी दिसते. तूच यासाठी सर्वथा व एकमेव योग्य आहेस. तूच माझा उत्तराधिकारी आहेस.”

ज्येष्ठ भृगूंनी आपले नेत्र हळूहळू मिटले. योगमुद्रेतील त्यांची चर्या आता समोरच्या यज्ञकुंडातील प्रदीप्त अग्नीसारखी क्षणात रसरशीत तप्त दिसू लागली. माझ्या पांचजन्याशी नातं सांगणाऱ्या नादासारखे. मी पूर्वी कधीच न ऐकलेले, प्रक्षेपणापूर्वीचे मंत्रघोष त्यांच्या मुखातून बाणासारखे सटासट सुटू लागले. त्या मंत्रघोषांनी हां–हां म्हणता क्षणात भोवतीच्या सर्वांना मतिगुंग आणि दिङ्मूढ करून टाकलं. माझ्या स्मृतिपटलावर मात्र ते आपोआपच भराभर कोरले जाऊ लागले. माझ्या देहाचा कणन्कण रसरशीत आणि अननुभूत असा पुलकित झाला!

क्षणार्धात ती आचार्यकुटी कोंदून टाकणारे, घोंगावणारे विविध स्वरसंपन्न नाद प्रथम ऐकू आले. तो स्वरदंड क्षणाक्षणानं वाढतच चालला. म्हणता–म्हणता डोळे दीपविणाऱ्या शतकोटी सूर्यांच्या आभेला लाजविणाऱ्या तेज:पुंज प्रकाशानं कुटी कशी दिपून गेली.

ध्यानस्थ, शुभ्र दाढीजटाधारी, तेजस्वी, ज्येष्ठ भृगूंची उभविलेली उजवी तर्जनी क्षणैक स्थिर झाली. तिच्यावर एक बारा आऱ्यांचं, वज्रनाभीचं, कितीतरी गतीनं स्वत:भोवती सरासर फिरणारं तेजयंत्राचं सुलक्षणी चक्र क्षणात दिसू लागलं. पहाटवेळी मानस सरोवरावर ठेवलेल्या ब्रह्मकमळाच्या कळ्यासारखं ते दिसू लागलं. त्याच्या दिव्य तेजानं कुटीतल्या सर्वांचेच डोळे गपकन दिपूनच गेले. त्यांना तेजाशिवाय काहीच दिसेना! ते भयकातर होऊन लटलटत एकमेकांना धरून सावरण्यासाठी चाचपडू लागले. दादाही माझा हात घट्ट धरून एकाच ठिकाणी दृष्टी जखडल्यानं भांबावल्यासारखा झाला. होय! मला आणि मलाच काय ते, ते स्पष्ट दिसू शकत होतं. भृगूंच्या हातातील ते गरगरतं तेजचक्र! ते पेललेले भृगुश्रेष्ठ आणि कुटीचा कानाकोपराही स्पष्ट दिसू लागला. मला तो केवढातरी दीपविणारा तेज:पुंज प्रकाश, गोकुळातल्या रासक्रीडेच्या पौर्णिमेच्या चांदण्यासारखा शीतल शांत दिसू लागला. तसाच भासू लागला!

भृगूंनी नेत्रसंकेत केला तसा मी दादाजवळून उठून त्यांच्या शेजारी गेलो. भृगुवर्य राम माझ्या कानांत काही मंत्रघोष सोडत म्हणाले, “बघ प्रत्यक्षच या ‘सुदर्शन’ चक्राचा प्रभाव!” भृगूंनी हातातील तेजचक्र, डोळे मिटून प्रक्षेपण मंत्र पुटपुटत समोर प्रक्षेपित केलं. ते समोरची वेण्णा नदी क्षणात पार करीत थेट दूरवरच्या पर्वतरांगेला स्पर्शून कितीतरी वेगानं तसंच परत येऊन त्यांच्या तर्जनीवर स्थिरावलं. गरगर मिटती मंडलं घेत, प्रकटलं; तसंच सावकाश नाहीसंही झालं!

भृगुराम मिटल्या डोळ्यांनीच कमंडलूतील मंत्रभारित जल माझ्या तळहातावर सोडीत म्हणाले, “घे आचमन.” मी ते घेतलं. तसं ते पुढे म्हणाले, “यादवराज – वसुदेवपुत्र श्रीकृष्णा, माझ्याकडे अनेक वर्षं असलेल्या या ‘सुदर्शन’ नावाच्या तेजचक्राचा तू आजपासून अधिकारी झालास. अच्युता, याची जन्मकथा तू जाणतोसच! तिची स्मृती उजळण्यासाठी पुन्हा सांगतो.

“अनेक युगांपूर्वी प्रत्यक्ष शिवानं असुर त्रिपुराला म्हणजे त्याच्यातील जीवनविनाशी क्रूर शक्तींना जाळून काढण्यासाठी या सुलक्षणी सुदर्शन चक्राची निर्मिती केली. प्रत्यक्ष विष्णूनं...” काहीतरी बोलण्यापूर्वी भृगू थांबले. डोळे उघडून माझ्याकडे बघू लागले. मघा पेटत्या यज्ञकुंडासारखी दिसणारी त्यांची दृष्टी आता कितीतरी शांत–शांत झाली होती. त्यांच्या ओठकडा धरून दाढीत मिसळणारं गूढरम्य हास्य क्षणैक मला माझंच वाटलं! त्या विचारानं माझ्याही मुद्रेवर तशीच हास्यछटा पसरली.

भृगू पुन्हा डोळे मिटून घेत म्हणाले, “तर विष्णू म्हणजे काय? ते तुला कसं सांगू? तू सर्व–सर्व जाणतोस। तर हे सुदर्शन ‘आपल्या’ विष्णूनं शिवाकडून एक सहस्त्र कमलांचा भावार्पणविधी करून हस्तगत केलं. ते अग्नीला प्रदान केलं. अग्नीनं ते वरुणाला दिलं. वरुणाकडून माझ्याकडे आलं. जीवनात मी त्याचं कधीच प्रक्षेपण वा वापर केला नाही. मला आवश्यकता भासली नाही तशी. परशूवर निभावलं माझं सर्व जीवितकार्य!

“आजपासून तू या सुलक्षणी सुदर्शन चक्राचा संपूर्ण अधिकारी झाला आहेस. त्याची

तुला अनावर आवश्यकता जाणवेल त्याच वेळी प्रक्षेपण कर. सत्याचं, न्यायाचं व धर्माचं रक्षण करायचं आहे तुला. सावलीसारखी तुझी सोबत करून, या बलरामाला तुझं छत्र बनून राहायचं आहे.

"लक्षात घ्या, यादवपुत्रांनो! युगायुगानं धारण करावी अशी जीवनसत्यं; या बलरामाच्या खांद्यावरच्या नांगरानं या आर्यभूमीत नांगरून बीजरूपानं तुम्हाला पेरायची, वाढवायची आणि पोसायची आहेत. त्यांचं रक्षण या सुदर्शनानं करायचं आहे.

"माझं जीवितकार्य आता संपलं आहे. श्रीकृष्णा, माझ्या मते यापुढे या कार्याचा तूच एकमेव योग्य उत्तराधिकारी आहेस. मी इथून शूर्पारक आश्रमातील भृगुकुमारांना अंतिम हितोपदेश करून थेट हिमालयाची वाट धरणार आहे. वानप्रस्थाश्रमासाठी! समस्त भृगूंचा वयोवृद्ध अधिकारी म्हणून आणि – बरचसं काही म्हणून माझे तुम्हाला उदंड आशीर्वाद आहेत. जयतु श्रीकृष्णा, जयतु बलरामा!"

सुदर्शनाचे मंत्र स्वीकारल्यापासून माझ्या चित्तवृती पार बदलून गेल्या होत्या. आता बोलण्यापेक्षा ऐकणं बरं वाटत होतं! दृष्टी नेहमी दूरच्या टप्प्याची व काळाची झेप घेऊ बघत होती. समोरचा माणूस त्याच्या विचारांसह भूर्जपत्रासारखा खडान्खडा वाचण्याची अद्भुत शक्ती आपणाला प्राप्त झाली आहे, असं सतत वाटत होतं. प्रचंड वट किंवा अश्वत्थ वृक्षांची भुईतल्या सहस्त्रावधी मुळांपासून आभाळातल्या लक्षावधी पानांपर्यंतची सळसळ मला समजू शकत होती. ही शक्ती देहा–मनाच्या आणि काळाच्याही पलीकडची आहे, असं सतत प्रकर्षानं जाणवत होतं. दादा आणि सात्यकींच्या चर्चेत म्हटलं तर मी होतो, म्हटलं तर कशातच नव्हतो!

मी, दादा आणि सात्यकी आमच्या राहुटीत बसलो होतो. परतीच्या प्रवासाची, त्यात येणाऱ्या अडचणींची चर्चा करत होतो. बोलत होते दादा आणि सात्यकीच. त्यांच्या प्रश्ननांना दक्षिणतेल्या चारी राज्यांतले सेनापती अधूनमधून उत्तरं देत होते. मी केवळ ऐकत होतो. इतक्यात आमच्या सेनेचा गुप्तचर खात्याचा प्रमुख, एका धट्टयाकट्टया नगरजनाला घेऊन आत आला. त्यानं अभिवादन करून सांगितलं, "हा पद्मावत राज्यांतर्गत करवीर नगरीचा नगरजन आहे. काही अन्याय परिमार्जनाचं आपलं निवेदन आहे, असं म्हणतोय. न्याय मागतोय!"

मी त्या करवीरकराला आपादमस्तक न्याहाळलं. हात जोडूनच तो कळवळत म्हणाला, "श्रीकृष्ण महाराज, आम्ही पद्मावत राज्यात राहावं की वाट फुटेल तिकडे जावं तोंड घेऊन? इथला राजा शृगाल, नावासारखाच कोल्ह्याच्या वृत्तीचा हिंसक झालाय! मिळेल त्याची स्त्री, संपत्ती, धरती बलात भक्षण करतोय. अनेक दु:खग्रस्त नगरजन त्याच्या लालसेला आजवर बळी पडलेत. काही राज्य सोडून परागंदा झालेत. भाचा असून प्रत्यक्ष अन्यायी मामा कंसराजाला वधणारी आपली न्यायदानी कीर्ती ऐकून आहेत करवीरकर. आपल्याशिवाय त्याला शासन करणारं आम्हाला तरी दुसरं कुणीच दिसत नाही. काहीतरी करा, आमचे प्राण वाचवा या दुष्टापासून."

मी बैठकीतून उठून त्या करवीरकराच्या जवळ गेलो. मला त्याच्या 'महाराज' या संबोधनाची गंमत वाटली. तसा मी कुठल्याच सिंहासनावर बसलो नव्हतो. बसावसंही कधीच वाटत नव्हतं. माझा कसलाच राज्याभिषेक झाला नव्हता. तरीही तो मला 'महाराज' म्हणाला होता! मी त्याच्या खांद्यावर हात ठेवून थोपटलं, तसं त्यानं वाकून

आपलं मस्तक माझ्या चरणांवर ठेवलं. त्याच्या त्या स्पर्शाबरोबर माझ्या पायाच्या अंगठ्यापासून मस्तकापर्यंत तोच प्रणवनाद घुमून गेला, जो सुदर्शन प्रकटण्यापूर्वी घुमला होता! मी त्याला खांदे धरून उठविलं. धीर देत शांत केलं. सात्यकीला आज्ञा देत म्हणालो,' "सेनापती, आपल्या सेनेच्या परतीचा मार्ग करवीरावरून आखा!"

आता आमचं चतुरंगदल सैन्य सिद्ध झालं. करवीरच्या दिशेनं निघालं. पद्मावत राज्याच्या अंतर्गत मांडलिक असलेलं शृगालाचं करवीर राज्य अत्यंत छोटं होतं. पंचगंगा नदीच्या काठी वसलेलं होतं. मात्र मदोन्मत्त आणि उद्धत झालेला शृगाल स्वत:ला अजिंक्य व बलाढ्य सम्राटच मानत होता. पद्मवर्णाला तर तो मानतही नव्हता.

पंचगंगा नदीकिनारी त्याचा तांबड्या मातीचा भक्कम संरक्षक कोट होता. सात्यकीनं तो पार करण्यासाठी निरनिराळे उपाय माझ्यासमोर ठेवले. मी ते नुसते ऐकून घेतले. शृगालाच्या राजकोटाचा दरवाजा हत्तीपथक लोटून फोडायला लावला. दादा, मी, सात्यकी आणि निवडक यादव कोटात घुसलो. आमच्या यादवांची शृगालाच्या सैनिकांशी खड्गाची हातघाई जुंपली. मी शृगालाच्या वाड्यासमोरील पायदंड्यांच्या सर्वांत खालच्या पायदंडीजवळ उभा राहिलो. माझ्याजवळ खांद्याला केवळ अजितंजय धनुष्य, कमरेला पांचजन्य आणि गळ्यात वैजयंतीमाला होती. शृगाल हा मजबूत बांध्याचा धिप्पाड आणि सशस्त्र असा लढवय्या योद्धा होता. अगदी वरच्या पायदंडीवरून खांद्यावर करवीरी थाटाची प्रचंड, तळपती, गोल गरगरीत, लोहगदा पेलत तो गरजला, "मथुरेतून पळून आलेल्या वसुदेवाच्या पळपुटचा गवळटाऽ! गोमंताच्या पेटलेल्या वणव्याचा लाभ उठवीत तू सम्राट जरासंधाला पिटाळू शकलास. ही करवीर नगरी आहे. नंदाच्या गवळ्याऽ – अजिंक्य मल्लवीरांची नगरी आहे. मी – मीच इथला एकमेव सम्राट आहे. आलास तसा मुकाट्यानं चालता हो. नाहीतर ओरबाडून–फाडून खाईन मी तुला!"

मला त्याचे निखाऱ्यासारखे विखारी शब्द ऐकूच आले नाहीत. केव्हापासून मन:कुहरात घुमत असलेले, सुदर्शनाचे उच्चारपावन मंत्रबोल गतिमान होऊन आपोआप माझ्या मन व मस्तकभर गरगरा फिरू लागले. ओठांतून त्यांच्या मलाच जाणवाव्यात अशा अस्पष्ट अनावर तेजस्वी लडीच्या लडी बाहेर पडू लागल्या. अंगारांसारखे उधळलेले रसरशीत तेज:कण देहभर फिरू लागले. डोळे आपोआपच मिटले गेले. आता मी 'श्रीकृष्ण वसुदेव यादव' या नावाचा कुणीही नव्हतो. झालो होतो, केवळ रसरशीत तेजाचा एक स्तंभ! माझा उजवा हात हळूहळू वर झाला. आवळल्या मुठीच्या मेरुदंडासारख्या उजव्या तर्जनीवर शृगालाचा राजकोट कोंदून टाकणाऱ्या ध्वनिकल्लोळापाठोपाठ प्रचंड गतीनं गरगर फिरणारं बारा अऱ्यांचं, वज्रनाभीयुक्त, तेजवंत सुदर्शन प्रकट झालं!!

दृष्टी ठरणार नाही, असं ते गरगर फिरू लागलं. निर्देह झाल्यासारखी माझी तर्जनी लक्षयाचा वेध घेण्यासाठी आपोआप पुढे झुकली. सुदर्शनाचं पहिलं प्रक्षेपण झालं होतं! पंचगंगातीरी – करवीर राज्यात! निमिषात शृगालाच्या मुकुटधारी मस्तकाच्या मदोन्मत्त, पुष्ट कंठनाळाचा अचूक वेध घेऊन तेजचक्र क्षणात पुढे झेपावलं. त्याचं उन्मत्त धिप्पाड कवचधारी धड रक्तानं पायदंड्या रंगवीत धडाधड गडगडत कोसळलं. पाठोपाठ

रक्तलांछित गरगरीत मस्तकही थडाथड घरंगळत आलं.मझ्या मस्तकाचा चेंदामेंदा करून बघणारी त्याची लोहगदा खणखणत आदळत–आपटत खाली आली. माझ्या पायाशीच येऊन पडली. मानवी रक्तस्पर्श मला होताच चक्र गरगरत मागे फिरलं. पुन्हा तर्जनीबद्ध झालं. क्षणैक तसंच गरगरत राहिलं! त्यावर मानवी रक्ताचा टिपूसही नव्हता! उठलेला ध्वनिकल्लोळ हळूहळू थांबला. मिटती वलयं घेत–घेत चक्र हळूहळू लुप्तही झालं!

पंचगंगेच्या काठची, दक्षिण देशीची करवीर नगरी ‘शृगालमुक्त’ झाली. शृगालाच्या राणी पद्मावतीला एकच पुत्र होता – ‘शक्रदेव’ नावाचा. सागवानाच्या कातीव फळीसारखा, सुदृढ, तारुण्यात पदार्पण केलेला. तो लढून अंगावर अनेक जखमा घेत घायाळ झाला होता. आमच्या सैनिकांनी त्याला दोरखंडात आवळून राजबंदी म्हणून माझ्या आणि दादासमोर सादर केला. आम्हाला करवीरात काही राज्य स्थापन करायचं नव्हतं. कंस वधानंतर जे मी मथुरेत केलं होतं, काहीसं तसंच करायचं होतं. शृगालपुत्राला रीतसर ‘करवीराधिपती’ म्हणून नियुक्त करायचं होतं. पण तो तरणाबांड करवीरपुत्र आम्हा दोघांकडे कितीतरी तिरस्कारानं आणि त्वेषानं बघत होता. हे पाणी काही वेगळंच होतं. ते नीट वळतं करून जीवनदायी करणं योग्य होतं.

मी शृगालपुत्राजवळ जात स्वतःच्या हातांनी त्याच्या दंडाचे दोर सोडून त्याला बंधमुक्त केलं. अद्याप तो संतप्त डोळ्यांनी रोखून तिरस्कारानं बघतच होता. त्याच्या निर्भय डोळ्यांत डोळे रोखून त्याचे खांदे थोपटत मी म्हणालो, “शृगालपुत्रा, शक्रदेवा, पित्याचा जीवनदाहक आदर्श कधीच डोळ्यांसमोर ठेवू नकोस! उपयोगी पडणार नाही तो. हे करवीर राज्य आम्ही तुझ्याच स्वाधीन करतो आहोत. करवीरपुत्रा, प्रजेला स्वास्थ्य आणि आनंद देणारं कल्याणकारी राज्य इथं उभं कर. तुझ्या पित्याच्या स्मरणासाठीच करवीरचं ‘कोल्हापूर’ हे नाव घोषित कर.”

आता मात्र करवीरपुत्र पालटला. झटकन वाकून त्यानं माझ्या आणि दादाच्या पायांना मस्तक भिडवलं. त्याला वर घेत आम्ही वक्षभेट दिली. पंचगंगेच्या सुपीक किनाऱ्यावर पिकणाऱ्या, शिजलेल्या बारीक कळीदार दाण्यांच्या उष्ण सुवासिक ओदनाची चव त्या रात्री चाखली. करवीर हे तीर्थक्षेत्र होतं म्हणून पंचगंगेत स्नानही केलं. इथल्या पुष्ट महिषींचा दाट दुग्धरस कुंभाकुंभांनी रिचविला. सप्ताहानंतर आम्हाला निरोप देण्यासाठी शक्रदेवासह पंचगंगा नदीकिनारी आलेल्या नगरजनांनी कल्लोळत जयघोष दिला. ‘मथुराधिपती महाराज श्रीकृष्ण, बलराम – जयतुऽ जयतु!! करवीराधिपती शक्रदेव महाराज – जयतुऽ जयतुऽ!’ आमच्या विजयी यादवसेनेनं करवीर सोडलं.

पुन्हा कुंतल, अश्मक देश मागे टाकत अनेक पडावांनंतर आमचा तळ विदर्भाच्या सीमेवर पडला. वैदर्भियांची प्रसिद्ध नगरी कौंडिण्यपूर येथून काही योजनांवर जवळच होती. इथला राजा भीष्मक जरासंधाशी केव्हाच हातमिळवणी करून आमच्या विरोधात गेला होता. त्याचा पुत्र रुक्मी आमच्या सात्यकीसारखाच उतावीळ आणि शीघ्रकोपी होता. रुक्ममाली, रुक्मरथ, रुक्मबाहू व रुक्मकेश अशा चार बंधूंच्या फलीची त्याला बळकट साथ होती. नेमकं इथल्याच तळावर सात्यकीनं मला विचारलं, “भीष्मकाकडे दूत धाडून अनुज्ञा घ्यावी काय? इथं एक कितीतरी प्राचीन, भव्य, सुघड असं अंबिकेचं मंदिर आहे. दर्शन करता येईल देवीचं!”

"नाही – आत्ताच नाही. देवीचं दर्शन अवश्य घ्यायचं आहे – योग्यवेळी!" मी हसतच सात्यकीचा प्रस्ताव परतवला.

आता परतीच्या वाटेवर पुन्हा दंडकारण्य लागलं. चांगला मासभर खडतर प्रवास करून आम्ही दंडकारण्य पुन्हा एकदाचं ओलांडलं. अवंती राज्यातील' 'भोजपूर' नगराला आलो. हे आमच्या कुंतीआत्याच्या दत्तकपित्याचं, राजा कुंतिभोजांचं नगर होतं. इथं अगदी अनपेक्षितपणे आम्हाला गर्गमुनी भेटले. ते पश्चिम किनारपट्टीच्या अजितंजय नगराच्या यवनराजाला भेटून आले होते. मला त्या नगराचं नाव 'अजितंजय' व राजाचं नाव 'यवन' हे प्रकर्षानं जाणवलं. या नगराच्या नावाचं तर माझं धनुष्यच होतं आणि यवन हे दूरच्या गांधार, काब्रा नदीच्या प्रदेशातील लोकांना म्हटलं जाई. किती केलं तरी ते परकेच होते. मी गर्गमुनींना त्याबद्दल विचारलं,' तुमचा या यवनराजाशी संबंध काय?' त्यांनी चतुराईनं व अस्पष्ट उत्तर दिल्याचं मला जाणवलं. काही केलं तरी ते राजपुरोहित म्हणजे गुरुवत् होते. मी त्यांना अधिक खोदून काही विचारलं नाही.

एकामागून एक पडाव टाकत मथुरेच्या सीमेवर आम्ही आलो. या वेळी आमच्या स्वागताला उग्रसेन महाराज, वसुदेवबाबांसह अठरा कुलांतील निवडक यादवांसह आले होते.

तापदायक जरासंधाच्या आम्ही केलेल्या ससेहोलपटीची विजयवार्ता शूरसेन राज्यात केव्हाच पोहोचलेली होती. झाडून सारं मथुरानगर सीमेवर लोटलं होतं. उद्धवही सर्वांच्या पुढे बाबांशेजारी आपल्या बृहू आणि चित्रू या बंधूंच्यासह दिसत होता.

आम्ही रथातून उतरलो तसं राजस्त्रियांनी आमच्या मस्तकी कुंकुमतिलक रेखले. तेवत्या निरांजनांच्या तबकांनी आम्हाला ओवाळलं. नाना वाद्यांची गर्जती झडच–झड उठली. त्यात कुणाचे बोल कुणाला ऐकू येईनासे झाले. अशातच मला बघून आवेगानं पुढे आलेला उद्धव मला म्हणाला, "दादा, पूर्वी कधीच पाहिली नाही अशी अनुपम तेजवंत दिसत आहे तुझी मुद्रा आज! अभिमान वाटतो मला तू जरासंधाची खोड मोडल्यामुळे. पण – पण एका गोष्टीसाठी असंतुष्ट आहे मी तुझ्यावर!"

"कसल्या? चल बोलू." मी त्याच्यासह पुढे आलो. बाबा, उग्रसेन महाराज या सर्वांना आम्ही वंदन केलं. गेलं एक तप नाडलेले, पिडलेले यादव जरासंधाच्या गोमंतावरील पलायनामुळे हर्षविभोर झाले होते. ते साहजिकच होतं. कुंकुम उधळत, नाचत, वाजत–गाजत त्यांनी रथातून आमची प्रचंड गौरवयात्रा काढली. उद्धवाला रथात घेऊन मी विचारलं, "उधो, कशासाठी असंतुष्ट झाला होतास तू, बंधो?"

"तू अचानकच मथुरा सोडून निघून गेलास, मला न भेटता, बरोबर न घेता म्हणून."

"एवढंच! मला वाटलं, आणल्या–आणल्या पूर्वीची तिन्ही रत्नं लागलीच तुला, प्रिय बंधू म्हणून दाखविली होती. आज काय आणलंस असं विचारशील तू मला." मी उद्धवाला चकवा दिला. प्रश्नात गुंगविलं.

"तू सर्वांत मोलाचं न दिसणारं रत्न याही वेळी आणलं आहेस, हे केव्हाच ओळखलं आहे मी!"

"कशावरून?" मी त्याला चाचपलं! रथ मुंगीच्या गतीनं पुढे सरकतच होता. वाद्यांच्या गजरात एरवीचे लढाऊ यादव घोषणा देत नाचतच होते.

"तुझ्या मुद्रेवरून! यासाठी सीमेवरच मी तुला म्हणालो – आजची तुझी मुद्रा

केवळ अनुपमेय तेजप्रक्षेपी आहे. काय आणलंस? सांग ना दादा?"

माझ्या प्रिय उद्धवाच्या खांद्यावर हात ठेवून त्याच्या भावनितळ, तत्त्वज्ञ डोळ्यांत खोलवर बघत मी म्हणालो, "सृष्टीच्या या जीवनचक्राला निरामय सुगती देणारं रत्न आणलंय मी. ओळख बघू काय असावं ते?"

"सृष्टीच्या जीवनचक्राला? दादा तू तेजयंत्र सुदर्शनाचे स्वर्गीय मंत्र सविध घेऊन आला आहेस! सांग! कुठं भेटले तुला भगवान परशुराम ते?" मंद चालत्या रथातच अनावर आनंदानं मला कडकडून मिठीच भरली उद्धवानं. असा आनंदानं फुललेला मी पूर्वी त्याला कधीच पाहिला नव्हता. जसं मला नव्हे, त्यालाच सुदर्शनाचा लाभ झाला होता!

रात्री भोजनोत्तर बैठकीच्या कक्षात वसुदेवबाबांनी एक महत्त्वाचा वृत्तान्त कानी घातला. देवकीमाता जवळच होती. वृत्तान्त सांगताना बाबा कुठल्यातरी प्रिय व्यक्तीचा दूरवर वेध घेत असल्यासारखे चिंताग्रस्त दिसले. म्हणाले, "श्रीकृष्णा – पुत्रा, माझ्या श्रुतश्रवा, राजाधिदेवी, श्रुतदेवी अशा तिन्ही भगिनींची, तुझ्या तिन्ही आत्यांची अधूनमधून भेट होते. त्यांचं क्षेमकुशल समजतं मला. पण कळत नाही भगिनी कुंतीचे आणि माझे काय योग आहेत ते. माझी ही सर्वांत प्रिय भगिनी. मात्र बालपणापासून ती एकटी काय ती मला कायमची पारखी झाली आहे."

"बाबा, कुंतीआत्या तुमची फार लाडकी बहीण दिसते खरी!" मी मध्येच थांबलो. तसं बाबांची कड घेत थोरली तत्परतेनं म्हणाली, "काय म्हणायचं आहे नेमकं तुला?" मी हसत म्हणालो, "नाही तर काय थोरले? मी आणि दादा जन्मापासूनच कितीतरी वर्षं पारखे झालो नव्हतो का तुम्हाला? ते कसं काय विसरले बाबा?"

"ते जाऊ दे! श्रीकृष्णा, तुझी आत्या कुंतीदेवी खडतर दैवाला निकरानं तोंड देत आली आहे. पती पांडू महाराजांच्या मृत्यूनंतर नुकतीच ती हिमालयातील गंधमादन पर्वतातून हस्तिनापुरात परतली आहे. तिच्याबरोबर तिचे पाचही पुत्र आहेत. कळत नाही, कुंती त्यांचं संगोपन हस्तिनापुरात कसं करणार ते?"

मी जवळ जात त्यांचे दोन्ही हात प्रेमभरानं हातात घेतले. मध्येच पांढऱ्या बटा उमटलेल्या त्यांच्या भरगच्च दाढीवर दृष्टी फिरवत म्हणालो, "बाबा, तुमचा हा श्रीकृष्ण त्याच्या लाडक्या कुंतीआतेला कधीच अंतर देणार नाही. तिच्या पुत्रांना – पाचही पांडवांना, मी न पाहिलेल्या, तुमच्या बरोबरच मला प्रिय झालेल्या माझ्या आतेबंधूंना कधीच विसरणार नाही.

"मला प्राप्त झालेल्या अमोघ शक्तीला साक्ष ठेवून मी पुत्र म्हणून तुम्हाला वचन देतो की, आत्या कुंतीदेवी आणि तिच्या सर्व पांडवांना मी यथायोग्य न्याय देईन! त्यांची जीवनभर पाठराखण करीन."

"मला खातरी होती, तू हेच बोलशील. म्हणूनच कुंतीचा हा सल आज मी तुझ्यासमोर ठेवला." वसुदेव बाबा म्हणाले.

लागलीच एका दूताला पाठवून मी मंत्री अक्रूरांना पाचारण केलं. ते येताच ही महत्त्वाची कामगिरी त्यांच्या अनुभवी खांद्यावर टाकताना म्हणालो, "तुम्ही लागलीच कुरूंच्या राज्यात राजनगरी हस्तिनापूरला जायचं आहे, अक्रूरकाका. तिथं आमच्या कुंतीदेवीआतेची व तिच्या पाचही पांडवांची भेट घ्यायची आहे.

"जसं तुम्ही आम्हाला गोकुळात सावरलंत सचेत केलंत, तसंच तिलाही करायचं आहे.

पांडव लहान आहेत. महाराज धृतराष्ट्रांना त्यांना योग्य ती वागणूक देण्यास कौशल्यानं सांगायला विसरू नका. बारकाव्यानं पांडवांना पारखून त्यांचे स्वभाव, गुणविशेष तुमच्या गरुडीदृष्टीनं अचूक टिपायचे आहेत. लक्षात घ्या, भविष्यात माझा आणि त्यांचा दृढ ऋणबंध येऊ शकेल!"

"जशी आज्ञा यादववरांची, हस्तिनापुराहून आल्यावर सविस्तर निवेदन ठेवीन मी समोर." अक्रूर कामगिरी स्वीकारून निघून गेले.

त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघताना दूरवरच्या गंगेकाठच्या हस्तिनापूरच्या राजवास्तूचं स्पष्ट चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभं ठाकलं! तिथं अंध असून आपल्या शंभर पुत्रांच्या प्रमुखाला – दुर्योधनाला राज्याभिषेक झाल्याची गोड स्वप्नं महाराज धृतराष्ट्र बघत होते.

त्यांना कुटिल राजकीय डावपेच, मधाळ भाषेत सुचविण्याचं सत्कृत्य गांधार देशाहून आलेला, महाराणी गांधारीचा 'राजकुशल बंधू' शकुनी करीत होता! राजगुरू द्रोण, कृप राजकुमारांना अस्त्र–शस्त्र विद्या देण्यात गढले होते. मला न्यायी वृत्ती दिसत होती, ती एकट्या कुरूंच्या राजमंत्री महात्मा विदुरांची. अक्रूरांना त्यांचीही भेट घ्यायला मी सांगितलं होतं, दूर गंगातटी असलेल्या कुरुराज्याचा भार होता, तो एकट्या ज्येष्ठ कुरू भीष्मांवर. त्यांचा जीवनवृत्तान्त बाबांकडून वेळोवेळी ऐकताना माझ्या मनी त्यांच्याविषयी एक सहजसुंदर असा प्रेमभाव साकारला होता. अगदी उद्धवासारखाच होता तो.

आता कितीतरी समाधानी झालेल्या बाबांची चर्या उजळली. माझ्याजवळ येत, माझे दोन्ही हात अत्यंत प्रेमभरानं त्यांनी हाती घेतले. ते हळुवारपणे थोपटून माझे बाबा, आचार्य सांदीपनी आणि भगवन् परशुरामांची आठवण व्हावी, अशा नादमय शब्दांत म्हणाले, 'श्रीकृष्णाऽ, यादवांच्या अठरा कुलांतील प्रत्येक पराक्रमी योद्धयानं सदैव एकमेवच श्रेयस समोर ठेवलं आहे. सर्व यादवांना आणि सोळा महाजनपदांना ललामभूत होणाऱ्या 'वासुदेव' या सर्वश्रेष्ठ उपाधीची प्राप्ती करण्याचं!

"माझं वसुदेवाचा 'वासुदेव' होण्याचं स्वप्न कधीही साकार नाही झालं!

पुत्रा, माझं ते अपुरं स्वप्न तू करशील काय साकार? त्यासाठी लागणारे सर्व निवडक सद्गुण व सुलक्षणं तुझ्या ठायी एकवटलेली मला स्पष्ट दिसताहेत. करशील काय एवढी माझी ही अपूर्ण राहिलेली इच्छा पूर्ण?"

त्यांचा डोळ्यांना डोळे भिडवून एका अपार आणि अनाकलनीय आत्मविश्वासानं मी म्हणालो, "बाबा, मी अवश्य 'वासुदेव' होईन! त्यासाठी करावे लागतील, ते अपार परिश्रम करीन मी! त्यासाठी सर्वदूर अथक भ्रमंती करीन. सर्व माझ्याच देहाचे अवयव आहेत, असं जाणून भेदभावाच्या पलीकडे सर्वांना प्रेमच देईन. प्रेमयोगानं माणूसन्माणूस मिळवीन. त्यासाठी लागणारा ज्ञानाचा कणन्कण निष्ठेनं वेचीन. वासुदेवाला शोभेल अशा अलिप्त आणि विसर्जनाच्या भावनेनंच प्रत्येक कृत्य करीन मी. बंदिस्त कारावासात जन्म घेतला असला तरी जीवन सदैव मुक्त ठेवीन मी. तुमचा श्रीकृष्ण, 'वासुदेव' झालेला अवश्य बघाल तुम्ही!"

काही एक निर्धारानं मी माझ्या माता–पित्यांना वंदन केलं. त्या दिवशी माझ्या शयनागाराकडे जाताना माझ्या मनाच्या गाभाऱ्यात चक्र सुदर्शनाच्या स्वर्गीय मंत्रांची लय गुंजत राहिली. रात्री शय्येवर पडून माझ्या गुलाबी तळहातावरील शंख, मत्स्य,

ध्वज आणि स्वस्तिक, चक्र ही चिन्हं निरखताना, छातीवरच्या केशमय वत्सचिन्हावर हात फिरविताना एकच एक शब्द माझ्या अस्तित्वाला वेढून गरगरत राहिला, 'वासुदेव, वाऽ सुऽ देऽ व!'

दुसऱ्या दिवशीच यादवांच्या राजसभेत अमात्य विपृथूंनी महाराज उग्रसेनांना एक निवेदन सादर केलं. अत्यंत महत्त्वाचं होतं ते. महाराजांच्या लगत उजव्या हाताशी बसलेल्या बाबांकडे हातनिर्देश देत ते म्हणाले, "वसुदेवांना भेटण्यासाठी त्यांच्या भगिनी, चेदी महाराज दमघोषांच्या पत्नी श्रुतश्रवादेवी शुक्तिमती नगराहून मथुरेत आल्या आहेत. काही महत्त्वाच्या चर्चेसाठी चेदी राज्यातून त्या आल्या आहेत. त्यांना सादर करण्याची अनुज्ञा व्हावी."

मी आणि दादा ते ऐकून एकमेकांकडे बघत राहिलो. बाबांच्या भावंडांतील ज्येष्ठ भगिनी – आमची मोठी आत्या आज आम्हाला पहिल्यांदाच बघायला मिळणार होती.

मथुरेच्या स्वागतमंत्र्यांनी चेदींच्या महाराणींना – आमच्या आतेला सन्मानानं सभागृहात सादर केलं. उग्रसेन महाराजांना भेटवस्तू देऊन अभिवादन करीत चेदींच्या महाराणी श्रुतश्रवादेवी सभागृहातील यादवांना, त्यातल्या त्यात बाबांना उद्देशून म्हणाल्या, 'मथुरेची मी माहेरवाशीण आहे. माझा पुत्र शिशुपाल माझं आणि महाराजांचं ऐकण्याच्या पलीकडे गेला आहे. गिरिव्रजाच्या मगधसम्राट जरासंधाला मिळाला आहे. त्याच्यासह नुकताच त्यानं या श्रीकृष्णाचा पाठलाग केला. गोमंत पर्वतावर अकीर्तीचा पराभवही त्यानं पत्करला. कसाबसा प्राण वाचवीत परतला आहे तो. माझी यादवांना, वसुदेवदादाला आणि विशेषत: श्रीकृष्णाकडे मागणी आहे की, त्यांनी माझ्या अविचारी पुत्राचे सर्व अपराध क्षमा करून पदरी घ्यावेत."

महाराज उग्रसेनांना हे सर्व अनपेक्षित होतं. त्यांना काय उत्तर द्यावं तेच समजेना. ते वसुदेवबाबांकडे अपेक्षेनं नुसतंच बघू लागले. बाबा तर नात्याच्या गोत्यात अडकलेले मला स्पष्ट दिसू लागले. ही कोंडी लवकर फुटायला पाहिजे होती. मला उठणंच भाग होतं. आता एखादी गोष्ट समोरच्याला समजेल, असं पटवून देण्याचा मला सरावच झाला होता.

मी तत्काळ उठलो. सभागृहावर दृष्टी फिरवीत म्हणालो, "यादववीरहो, चेदींच्या महाराणींचं निवेदन माहेरवाशीण म्हणून यादवांनी मान्य केलंच पाहिजे. मी ते आनंदानं मान्य करतो! सर्वांच्या वतीनं मी वंदनीय आत्याबाईंना भरल्या यादवसभेत वचन देतो. त्यांच्या पुत्राचे – माझ्या आतेबंधू शिशुपालाचे चांगले शंभर अपराध मी मूक राहून सहन करीन. क्षम्य मानीन. एकशे एकावा अपराध मात्र त्याला कधीच करता येणार नाही! ती दक्षता मात्र त्यानं घ्यावी. नाहीतर त्याचे परिणाम त्याला भोगावे लागतील. आत्याबाईंनी या आश्वासनावर संतुष्ट असावं. चार दिवस यादवांचा पाहुणचार घेऊन मगच शुक्तिमतीला परतावं. महाराज दमघोषांना आम्हा सर्व यादवांचं सादर अभिवादन सांगावं."

आत्याबाई समाधानानं परतल्या. आताशा मला का कुणास ठाऊक; व्रजातील गोकुळाची ची प्रकर्षानं आठवण येऊ लागली. जवळ असूनही मला तिकडे जाणं मात्र शक्य नव्हतं. एकतर एकदा तिथं गेलो की, परतणं अवघड होतं. आणि दुसरं म्हणजे

गोकूल सोडल्यापासून माझ्यात झालेल्या आमूलाग्र पालटामुळे गोकूळवासी गोपगोपिका माझ्याजवळ पूर्वीच्या मोकळेपणानं कधीच येणार नव्हत्या. त्यांच्या मनाच्या कुपीतील 'गोपालकृष्णा' ला धक्का लावण्याचा माझ्यातील श्रीकृष्णाला कसलाही अधिकार नव्हता.

यासाठी मी, बलरामदादा, रेवतीवहिनी, बाबा व थोरली असे चर्चा करीत बसलो असताना दादाच्या प्रसन्न वृत्ती बघून मी विषय काढला. म्हणालो, “तू एकदा व्रजात जाऊन ये कसं दादा! नंदबाबा, तिथली थोरली आई, आपले बालपणीचे सर्व सवंगडी आणि गोपगोपींना भेटून ये. त्यांची विचारपूस करून कुशल घेऊन ये.”

“आणि एक कर. जाताना इथला यादवांचा राजवेष नको धारण करूस. व्रजाचा तो माझ्या प्रिय गोपांचा साधा वेषच अंगी चढवून, त्यांच्यासारखाच होऊन जा. तरच ते तुला ओळखतील. आपला मानतील. मनमोकळं बोलतील तुझ्याशी.

मी सूचना दिली तसं दादा व्रजात जाऊन सर्व व्रजवासियांचं कुशल घेऊन आला.

जरासंध आणि त्याच्या मागधांच्या आक्रमणाचं संकट निवारल्यानं सांप्रत मथुरा निर्घोर होती. दिवस आनंदात चालले होते. मी, दादा व उद्धवासह रथ घेऊन संध्याकाळी हटकून यमुनेवर फेरफटका टाकत असे. अशाच एका फेरीत दादानं मला कोड्यात टाकणारा प्रश्न केला, “धाकट्या, मला चांगलं विवाहाच्या साखळीत गुंतवलंस. तुझं स्वत:चं काय?”

“तुझ्यासारखं मला कुठल्याही राजाचं असं आमंत्रण आलेलं नाही दादा. आलं असतं, तर केला असता विचार मी. “मी त्याचा प्रश्न सहज परतवून लावला.

त्या दिवशी राजवास्तूवर परतताच अमात्य विपृथूंनी एक चमत्कारिक वार्ता आमच्या राजकुटुंबासमोर ठेवली. खालच्या मानेनं ते म्हणाले, “विदर्भाच्या भीष्मक तथा हिरण्यरोमन राजानं आपली कन्या रुक्मिणी हिचं स्वयंवर मांडलं आहे. मात्र त्याचं आपल्या शूरसेन राज्याच्या यादवांना निमंत्रण नाऽही!”

उग्रसेन महाराजांनी विपृथूंना विचारलं, “अमात्य, का नसावं आमंत्रण भीष्मकाचं यादवांना?”

“असा कसा जरासंधाच्या पूर्ण कह्यात गेलाय हा भीष्मक?” बाबांनी त्या प्रश्नाला पाठिंबा दिला.

अमात्य विपृथू उत्तर देताना चाचरले. म्हणाले, “तशी विदर्भकन्या लहान आहे! आणि कौंडिण्यपुराहून मथुरा खूप दूरही आहे. नसेल आलं त्यांच्या लक्षात आपलं राजकुल.”

“कसं शक्य आहे हे अमात्य? नुकतंच आम्ही त्यांच्या राज्याजवळून परतलोत; दक्षिणदेशीच्या करवीरकर शृगालाला वधून.” बलरामदादानं आपला विचार ठामपणे मांडला.

“मी सांगतो वैदर्भियांचं का आमंत्रण नाही यादवांना ते. आपले आद्यकुलपती यदुमहाराज हे शापित आहेत म्हणे! त्यांच्या पित्यापासून – ययातींपासून. शापामुळे हे घडलं आहे म्हणे. यादवांच्या क्षत्रियत्वाचा लोप झाला, असंच सर्व मानतात! वैदर्भीय समतोल प्रतिष्ठेचे मानत नाहीत आम्हा यादवांना.“ मी सर्वांचं ऐकून घेतल्यानंतर चर्चा मूळ रोखावर आणत शांतपणे म्हणालो. अमात्य चमकले.

"...म्हणून आणि म्हणूनच आमंत्रण नसतानाही या स्वयंवराला जायचंच, असं मी पक्कं ठरवलं आहे! दादाला इथं मथुरेच्या रक्षणासाठी मागे ठेवणार आहे मी. जरासंधाला मिळालेला राजा भीष्मक आणि त्याचा भृगुश्रेष्ठ परशुराम शिष्य रुक्मी. त्याचे बंधू रुक्ममाली, रुक्मकेश, रुक्मकेतू, रुक्मबाहू यांना साक्षी ठेवून विदर्भकन्या मथुरेत आणीन मी! प्रथम साम, दाम, दंड सर्व उपाय योजून, नाहीतर शेवटी क्षत्रियांना गौरवी असलेल्या हरणाचा मार्ग पत्करू बलाने." मी काही एक ठाम निर्धारानं बोललो. यादवांचं राजमंडळ ते ऐकून आता कुठं निवांत झालं. केवल दोघंच अचूक बोलले. उद्धव म्हणाला, "तुला शोभणारा निर्णय आहे हा तुझा." दादा म्हणाला, "निर्धोक जा. मी सांभाळीन मथुरा."

कार्तिकी पौर्णिमा तोंडावर ठेवून आमचं निवडक सैन्य मथुरेच्या सीमेतून बाहेर पडलं. पुन्हा एकदा दंडकारण्याच्या वाटेला लागलं. पूर्वी परशुरामांच्या भेटीच्या अनामिक ओढीनं मी हे निबिड अरण्य एकदा सहज ओलांडलं होतं. या वेळी ते पुन्हा ओलांडणार होतो. तसंच सहज, मी अद्याप न पाहिलेल्या विदर्भकन्येच्या प्राप्तीसाठी!

आमच्या या सेनेत अनाधृष्टी, सात्यकी, उद्धव, अवगाह, शिनी असे सर्व अठरा यादवकुलांतील निवडक योद्धे होते. या वेळी आम्ही मार्ग बदलून कुंतिभोज राज्यातील चर्मण्वती नदी ओलांडून निषाधांच्या राज्यातून चाललो. पुन्हा दंडकारण्याचा खडतर प्रवास केला. मासाभरानं आंध्रभृत्य राजांच्या विदर्भात उतरलो.

कौंडिण्यपूर आंध्रभृत्यांचं राजनगर. नगराच्या सीमेलगत भीष्मक राजाच्या राजकोटाबाहेर स्वयंवरासाठी आलेल्या अनेक निमंत्रित राजांची शिबिरं पडलेली होती. त्यात जरासंध, शिशुपाल, शाल्व असे राजे होते. तसेच उत्तर व पूर्वेकडील पांचाल, वत्स, मत्स्य, विदेह, कोसल, अंग, वंग, त्रिपुरा, उत्कल अशा देशींचे राजेही होते. या सर्व तळांतून एकमेकांच्या वार्ता उचलण्यासाठी गुप्तचर चपळ कारवाया करू लागले. सर्व शिबिरांमधून निरनिराळ्या राजांची नावं संभाव्य 'विदर्भजामात' म्हणून घेतली जात होती. एकाही गटात आम्हा शूरसेन यादवांचं नाव कुठंही चर्चेतसुद्धा येत नव्हतं. आलं तर जुन्या शापाचा हटकून निर्देश करून चटकन ते वरच्यावर उडवून लावलं जाई व चर्चा तत्परतेनं दुसरीकडे नेली जाई. स्वयंवर चार दिवसांवर येऊन ठेपलं, तसा त्याचा ताण वाढला. आम्हा यादवांना एकाच गोटातून आशादायक वार्ता हाताशी लागत होती. तो गोट होता, क्रथकैशिक राजाचा!

आम्हाला क्षत्रियत्वहीन मानून, खड्यासारखं वगळून स्वयंवरातून बाहेर काढलं जाणार, हे त्या राजाला मुळीच आवडलं नाही. त्यानं आपला अमात्य पाठवून आम्हाला त्याच्या नगरीकडे सगौरव पाचारण केलं. तिथं सात्यकी, अनाधृष्टींच्या समक्ष आपलं राज्य, क्रथकैशिकानं मला दिलं. राजपुरोहितांच्या हस्ते आपला मुकुट राजसभेत सर्वांसमक्ष माझ्या मस्तकावर चढविला.

एवढं लांब दंडकारण्य ओलांडून आल्यानंतर केवळ एका क्षुल्लक करणासाठी परतणं म्हणजे सोबतीच्या यादवांच्या पराक्रमाला नाकारणं होतं. म्हणून क्रथकैशिकाचं राज्य मी स्वीकारलं. जीवनात कधी नव्हे, ते मी एकदा सिंहासनारूढही झालो.

क्रथकैशिकाच्या आग्रही प्रेमभावानं मी रीतसर विधियुक्त राजा झालो. पुन्हा त्याचं व आमचं जोडसैन्य घेऊन कौंडिण्यपूरच्या सीमेवर परतलो.

आता खरंतर विदर्भकन्येच्या स्वयंवरात भाग घ्यायला आम्ही अधिकृतपणे पूर्ण पात्र झालो होतो. दुसऱ्या दिवशी होणाऱ्या स्वयंवराची वाट बघत शिबिरात थांबलो होतो.

हे स्वयंवर प्रत्यक्षात मात्र झालंच नाही! त्या रात्रीच जरासंध, शिशुपाल, शाल्व यांनी राजकटाची गुप्त चक्रं फिरविली. सर्व उपस्थित राजांची बैठक घेतली. जरासंध आणि शिशुपाल त्या बैठकीत त्वेषानं माझी अवहेलना करणारं लागट बोलले.

त्यांना बैठकीनंतर एकांगी असा भीष्मकपुत्र रुक्मीला संदेश धाडला की, 'कुणीतरी राजा केलेल्या पराभूत गवळी श्रीकृष्णाला या स्वयंवरात आमच्यासह एका पंक्तीत उभं केल्यास ते आम्हाला मान्य होणार नाही. श्रीकृष्ण क्षत्रिय नाऽही!! एक यःकश्चित क्षुद्र गवळी आहे! त्याला स्वयंवरात भाग घेण्याचा अधिकारच नाही. तो आमचा अवमान आहे!!'

राजा भीष्मक तथा हिरण्यरोमन या संदेशानं गडबडला. रुक्मीनं त्याला सूचना केली, "यादवांच्या श्रीकृष्णाला परत जायला सांगावं. जमलेल्या इतर राजांसाठी स्वयंवर मांडावं." भीष्मकाला असं करण्याला तो परोपरीनं समजावू लागला. तिथं वेळेवर जाऊन क्रथकैशिकानं आपलं म्हणणं मांडताच राजा भीष्मकाचं मन वळू लागलं. तो यादवांना स्वयंवरात मान्यता देण्यास सिद्ध झाला.

ही वार्ता कौंडिण्यपूरच्या कोटाबाहेरील जमलेल्या राजमंडलात पसरली. ते बिथरलेच. सर्वांत प्रथम तळ सोडून आपल्या मगध आणि चेदी राज्यांकडे तडक परतले, ते जरासंध आणि शिशुपाल. पाठोपाठ शाल्वासह एक–एक करता सर्व राजे रथ हाकारत निघूनही गेले.

शुकशुकाटलेल्या वैदर्भ भूमीत उरलो केवळ आम्ही. शूरसेन राज्याचे यादव आणि आमचा परमस्नेही क्रथकैशिक. त्या दिवशी आमच्या तळावरच्या शिबिरात क्रथकैशिकाशी कसं बोलावं, ते मला प्रथम समजेना. केवढ्या एककल्ली विचारांचे होते, आमचे आर्यावर्तातील देशोदेशींचे राजे! शेवटी निर्धारानं मी त्या परमसाहाय्यक स्नेही राजाला म्हणालो, "मित्रवर, आता तुमच्या राजनगरालाच परतू. आमच्या सैनिकांना थोडा विश्राम घेऊ द्या. मग परतू आम्ही मथुरेला. आजपासून तुम्ही आमचे जिवाभावाचे स्नेही झालात."

"काही दिवसांनी क्रथकैशिकाच्या राज्यात येताच मी प्रथम एकच केलं. माझ्या मस्तकावरील भार वाटणारा त्याचा राजमुकुट एक मुहूर्त बघून विधीपूर्वक परत त्याच्या मस्तकावर चढविला. राज्यासह परत केला. कितीतरी मोकळं–मोकळं वाटलं मला त्या वेळी. परतीच्या वाटेवर क्रथकैशिकानं राजउपहार म्हणून दिलेल्या अलंकृत रथातून परतताना मी शेजारच्या उद्धवाला म्हणालो "उधो, तुला सदैव फार अभिमान आणि कौतुक वाटतं नाही तुझ्या दादाचं. बघ त्याचा कसा केला पाणउतारा जरासंध, शाल्व आणि शिशुपाल या त्रिकुटानं!"

"काही म्हण दादा, तुझा क्रथकैशिकाला राज्य परत करण्याचा निर्णय तुलाच सुचणारा आणि शोभणारा आहे. हे एवढंही गालबोट तू तुझ्या विमल कीर्तीवर मागे ठेवलं नाहीस. अभिमान वाटतो मला तुझा." आमचा नेहमीचा चार शुभ्र घोड्यांचा गरुडध्वज रथ सात्यकी आणि अनाधृष्टी यांच्या मागे होता. पुढे क्रथकैशिकाच्या अलंकृत राजरथातून मी आणि उद्धव चाललो होतो.

या वेळी माझ्या अंतर्मनात दूरवर कुठंतरी अस्पष्ट असं गुंजन घुमत होतं,

सुदर्शनाच्या मंत्रांचं! जागत्या मनात मात्र दोनच नावं घोळत होती. त्या नावांच्या अधिकारी मुद्रा भोवतीच्या निसर्गरूपात मुरलेल्या स्पष्ट दिसत होत्या मला. एक क्रथकैशिकाची आणि दुसरी मी कधीच न पाहिलेल्या विदर्भकन्येची – रुक्मिणीची! खरोखरच कशी दिसत असेल आणि प्रत्यक्षात असेल – वैदर्भियांची रुक्मिणी?

आम्ही मथुरेला आलो आणि एका वेगळ्याच प्रकारचं वाढून ठेवलेलं तबक समोर आलं. मामा कंसाला वधताना मी केलेलं वक्तव्य, वेळोवेळी यादवांच्या राजसभेत त्यांना मार्गदर्शनपर केलेली वक्तव्यं, काही उपयोगी पडू नयेत, असा हा पेच होता. आमच्या अंत:पुरी कक्षात दादा आणि माझ्यासमोर उभे होते, प्रत्यक्ष आमचे वयस्क, राजपुरोहित गुरुवर्य गर्गमुनी! त्यांना कसं आणि काय विचारावं? हे नेमकं मलाही सुचत नव्हतं. प्रश्न येत होता त्यांच्या वयाचा, ज्ञानाचा आणि सर्व दृष्टींनं ज्येष्ठ अधिकाराचा.

गर्गमुनी, आमच्या सर्वप्रथम ठरावा अशा संभाव्य शत्रूचे साक्षात पिता होते! आणि हे कटु सत्य आता कुठं आमच्या निदर्शनाला येत होतं!

आम्हाला मथुरेतून समूळ उखडण्यात वारंवार अपयश घेतलेल्या जरासंधानं खूप बुद्धिकौशल्याचा डाव टाकला होता. त्यानं सौभदेशीच्या शाल्वाला हाताशी धरलं होतं. यादवांचा आणि अधिक तर माझा काटा काढण्यासाठी दूरदेशीच्या गांधार देशालगतच्या शत्रूला आर्यावर्तात पाचारण केलं होतं – कालयवनाला!

स्वत: शाल्वही साधा नव्हता. त्याच्या गाठीशी शेकडो योजनांचं अंतर आकाशमार्गी सहज कापणारं प्रचंड गतिमान अलौकिक असं यंत्र–विमान होतं. आपल्या देशीच्या गौरवासाठी त्या विमानाचं नावही त्यानं ‘सौभ’ च ठेवलं होतं, आनर्त व मरुस्थली यांच्या सीमांवर वसलेली, अर्बुदगिरीवर असलेली, शाल्वाची राजधानी होती – मार्तिकावती.

सौभ विमानातून आपल्या अमात्य व सेनापतीसह शाल्व गांधारदेशी जाऊन आला होता. त्यानं तेथील कालयवनाला आमच्यावरील आक्रमणासाठी पाचारण केलं होतं.

कालयवन काही काल गांधार देशांतर्गत आपल्या राज्यात राहत असे. काही काळ आपला पालकपिता यवनराज याच्यासह आर्यावर्तात दक्षिणदेशी अजितंजय नगरीत राहत असे. हा कालयवन आम्हा मथुरेच्या यादवांचे राजपुरोहित गर्गमुनी यांचाच तर पुत्र होता!!

कसं घडलं होतं, हे धक्का देणारं सर्व अघटित? तर अजितंजय नगरीच्या यवनराजानं गर्गमुनींच्या भ्रमंतीत एकदा त्याना गाठलं होतं. त्यांची मनोभावे सेवा करून त्यांना प्रसन्न केलं होतं. त्याला ‘पुत्रवान हो!’ असा आशीर्वाद गर्गमुनींनी दिला होता. त्या यवनराजाला अनेक स्त्रिया असूनही अपत्यप्राप्ती मात्र झाली नव्हती. होणार नव्हती. हे त्यानं गर्गमुनींच्या ध्यानी आणून देताच प्रथम ते गडबडले. मग दिल्या आशीर्वादाचा पाठपुरावा करीत अढळ विश्वासानं निर्धारानं म्हणाले “माझा शब्द कधीच असत्य ठरणार नाही. तुला पुत्र मिळेल. स्वत: नसलास तरी माझ्या पुत्राचा पालकपिता होशील तू!”

दिल्या शब्दप्रमाणं, मथुरेतच गोपाली या गोपस्त्रीपासून झालेला आपला पुत्र गर्गमुनींनी अजितंजय नगरीच्या यवनराजाकडे जन्मत:च धाडून दिला होता. तोच हा कालयवन!

जेवढ्या शांत विचारानं मुनींनी हे केलं होतं, तेवढ्याच शांतपणे त्यांनी ही कथा

आम्हाला निर्भयपणे सांगितली. कसं संतापणार त्यांच्यावर? आम्ही आमच्यासमोर आलेला त्यांच्या पुत्राचा – कालयवनाचा धर्मसंकटात टाकणारा तिढा त्यांच्यासमोर ठेवला. ते शांतपणे म्हणाले, “जेव्हा त्याला दत्तक म्हणून यवनाच्या हाती दिला, तेव्हाच तो त्याचा झाला! माझा त्याचा जन्मनाळेचा संबंध तुटला! यादवांचे प्रमुख म्हणून तुम्ही त्याच्यावर कोणतीही कठोर चाल घेण्यास मुक्त आहात. माझा त्यावर कोणताही निर्बंध असणार नाही! मी यादवांशी सदैव एकनिष्ठ होतो आणि राहीन!”

गर्गमुनी आमचा आदर्श होते. अत्यंत ज्ञानी होते. जातक व स्थापत्यशास्त्रातील पट्टीचे तज्ज्ञ होते – विशारद होते. यादवांच्या अठरा कुलांतील सर्व लहानथोरांना त्यांनी जीवनाचं सर्वांगीण ज्ञान अनेक वर्षं ओंजळी–ओंजळी भरून दिलं होतं, त्यांना दूषणावह काहीही बोलणं आम्हाला शक्य नव्हतं. त्यांना लागेलसं काही करणं त्याहून अशक्य होतं.

“वेळ आली तर कालयवनाला वधावं लागेल आम्हाला. आपणाला रुचायचं नाही ते मुनिवर.” बलरामदादा परखड निश्चयानं स्पष्टच म्हणाला.

मी त्याच्याकडे बघून हसलो. म्हणालो “चुकतोस तू दादा, तसं कधीच वाटणार नाही आचार्यांना!” मी काही एक अपेक्षेनं आचार्यांकडे बघितलं.

आता तेही हसले. म्हणाले, “बरोबर आहे श्रीकृष्णाचं! मला ओळखायला चुकलास तू बलरामा.” त्यांनी या प्रकरणातला आपला ठाम निर्णय स्पष्ट केला. तसे आम्ही येणाऱ्या सर्व कठोर परीक्षांना तोंड द्यायला सिद्ध झालो. जरासंधाला, सर्व यादवांसह मला व दादाला समूळ उखडून काढल्याशिवाय मन:शांती कशी ती मिळणार नव्हतीच. आता तर तो गोमंतांच्या पराभवानं पुरता बिथरला होता. दुखावला होता. त्याच्या गिरिव्रज नगरात पूर्वीच्या सर्व सहकाऱ्यांत त्यानं नव्या शाल्व व कालयवनाची भर घातली. मथुरेच्या प्रचंड संयुक्त आक्रमणाखाली पुन्हा बैठक भरली! तिला शिशुपाल, दंतवक्र हे माझे आतेबंधू, नव्यानं लाभलेले कालयवन आणि राजा भीष्मकही सहकार्य करणार होता.

पूर्वेकडून शिशुपाल आणि स्वत: जरासंध, पश्चिमेकडून शाल्व, दक्षिणेकडून भीष्मक अशा कातरीत त्यांना यादवांची मथुरा कापून काढायची होती. जरासंधाला त्याच्या नरमेधाच्या यज्ञात आडकाठी वाटत होती, ती यादवांची. केवल पंधराच राजे काय ते त्याच्या ‘शंभर कैदी राजांचा संकल्प’ पूर्ण करायला कमी होते.

आता बलाढ्य शत्रूंच्या सशस्त्र सेना मिळेल त्या वाटांनी गिरिव्रजात एकवटू लागल्याच्या वार्ता आल्या. मी ताबडतोब अमात्य विपृथू, उद्धव व दादाला घेऊन काकुद्मिन राजाचं रैवतक राज्य गाठलं. त्यांच्या सहकार्यानं निष्णात पाणडुबे बरोबर घेतले. एक सप्ताह आनर्त देशाचा प्रभास क्षेत्रापासून कुशस्थलीपर्यंतच्या समुद्राचं कसून परिनिरीक्षण केलं. शंखासुराला वधलेल्या द्वीपापर्यंतचा समुद्रकिनाऱ्याचा प्रदेश नौकांनी पार तसून्तसू पिंजून काढला.

सुदैवानं रैवतक पर्वताशेजारच्या कुशस्थलीजवळ एक निवांत आणि भोवतीचा विस्तीर्ण खडक पाण्यात उतरलेलं प्रशस्त द्वीप आम्हाला आढकळं. नाना प्रकारच्या वृक्षराजींनं वेढलेलं ते हिरवंगार द्वीप समुद्राच्या निळ्या कोंदणातील पाचूच्या खड्यानसारखं शोभत होतं. समुद्रातूनच शेपटाच्या आकाराचा वीस कोस भूपट्टा धरून

शंखासुराच्या द्वीपापर्यंत ते सलग भिडलं होतं. हे एक द्वीप नव्हतंच. डमरूच्या आकाराचा मधला जोड भूपट्टा धरून ही जोडद्वीपं होती. समुद्राच्या खाडीतून योजनभर अंतर पार पाडताच कुशस्थली या द्वीपावर सहज येणं शक्य होतं. हे ठिकाण समुद्रावर दृष्टी ठेवण्यासही योग्य होतं. पाठीमागच्या आनर्त, भृगुकच्छ, मरुस्थल, अवंती राज्यांशी भुमार्गे संपर्क ठेवण्यास ही द्वीपं सोयीची होती. त्यांच्यालगत उत्तरेकडे दूरवर शेकडो योजनं विराण अशी मरुभूमी पसरली होती. कच्छची मरुभूमी. म्हणजे दक्षिण, पश्चिम, उत्तर अशा तीन दिशांनी या द्वीपांवर कसलंही आक्रमण होणं शक्यच नव्हतं. तिकडे सर्वत्र पश्चिम सागर पसरला होता. चौथ्या केवल पूर्व दिशेला समुद्रीवाटेनं ही द्वीपं काय ती सौराष्ट्राच्या भूमीला संलग्न होती.

मी, दादा, उद्धव, सात्यकी व विपृथूंसह नौकेनं जाऊन ती दोन्ही द्वीपं चौफेर फिरून बारकाव्यानं बघितली. दोन्ही जोडद्वीपांचा परिसर चौअंगी प्रशस्त होता. जसं गोमंताच्या उंच शिखरावर पाषाणी खंडावर बसलो होतो, तसंच यातील कुशस्थली द्वीपाच्या मध्यभागी तिथल्या एका विशाल कातळखंडावर आम्ही बसलो. कोटयवधी वर्षं उन्हाचा व समुद्रपावसाचा मारा त्या कातळखंडानं पचविला होता. सूर्यकिरणांत तो शीसवर्णात असा काही तळपत होता की, त्याच्यावर दृष्टी ठरत नव्हती. कशी कुणास ठाऊक इथं बसल्या–बसल्या आपोआप आचार्य सांदीपनींनी शिकविलेल्या ध्यानाची माझी लय साधली – 'ॐ हिरण्मयेन पात्रेणऽ... सत्यधर्माय दृष्टये'

भोवतीचं द्वीप दादा, उद्धव, विपृथू यांपासून मी क्षणात अलग झालो. कितीतरी वेळ समुद्राच्या गर्जत्या गाजेशी एकरूप होऊन मूक संवाद साधला. सुदर्शनाचे मंत्र आणि गाज एकरूप झाली. मला जाणवलं हा अनाहत नाद मला चांगलाच पूर्वपरिचित आहे. त्याच्याशी माझं अखंड आणि अतूट असं नातं आहे. नव्हे तो माझाच नाद आहे! हा आणि मी दोन नाहीच मुळी! माझ्यातील सुदर्शनमंत्रांची लय व ही गाज एकच आहे.

आता तो अनाहत नाद मला गर्जून सांगू लागला, 'श्रीकृष्णाऽ! हीच आहे तुझी कर्मभूमी! 'उठव! वसुदेवपुत्रा श्रीकृष्णाऽ! या आर्यावर्तातील साक्षात झळझळीत असं पहिलं वैभवी सुवर्णनगर उठव! प्रचंड नौकांना ठाव देणारं आर्यावर्तातील हे पहिलंच बंदर उठव! इथंच चैतन्यानं सदैव गर्जत्या समुद्रकाठी! इथं आणि इथंच. ही – ही तुझी कर्मभूमी, तपोभूमी आणि सार्थकतेची कैवल्यभूमी आहे!

'यादवांचे थोर स्थापत्यशास्त्रज्ञ मुनिवर गर्ग यांच्या चमकदार बुद्धियोगाला यासाठी मार्गी लाव.

'ऊठ! वृष्णी अंधकांच्या वंशजा, वसुदेवाच्या सुपुत्रा, अच्युता असा दृढ आणि गगनस्पर्शी संकल्प कर की, जो समस्त विश्वाला सर्वकाळ स्मरत राहील! या कुशस्थली भूमीत यादवांसाठी सर्व–सर्व आक्रमणांपासून दूर असं प्रशस्त, बळकट, सुरचित, सुरक्षित, सुवर्णी असं राजनगर उठविण्याचा संकल्प आत्ताच कर!'

मी शांतपणे नेत्र उघडले. भारल्यासारखा आपोआप उभा ठाकलो. कटीच्या शेल्याजवल वस्त्रात घट्ट बांधलेला माझा 'पांचजन्य' सोडवून ओंजळीत घेतला. क्षणैक तो मस्तकी भिडविला आणि कंठधमन्या टपटपीत फुलवीत, ग्रीवा गगनभेदी उन्नत पेलून मी पंचप्राणानं संकल्पाचा माझा प्रिय सुलक्षणी दिव्य पांचजन्य शंख फुंकला! त्याचे रोमांचक स्वर पश्चिम सागराच्या गाजेत मिसळू लागले. ते ऐकण्यासाठीच जसे कितीतरी विशालकाय चंदेरी मत्स्य सागरजलावर उसळून, तळपून क्षणात दृष्टिआडही

झाले.

समयसूचक उद्धवानं झपाझप पुढे होत, पश्चिम सागरजलानं भरलेली ओंजळ तत्परतेनं आणली. त्यानं ती पांचजन्याच्या शुभ्रधवल तेजावरून कुशस्थलीच्या भूमीवर सोडली. त्यालाच माहीत असलेले भूपूजनाचे मंत्र धडाधड म्हटले. संकल्पाचा शंख फुंकणारा मी, पावनजल सोडणारा उद्धव! आम्ही सर्वांनी नम्रभावे हात जोडले. संकल्प सुटला होता. पश्चिम सागरकिनाऱ्यावर कुशस्थलीच्या भूमीत यादवांचं संरक्षक आणि प्रशस्त नांदतं सुवर्णी राजनगर उठविण्याचा! एका नव्या, समर्थ व कल्याणकारी महाजनपदाच्या निर्माणाचा!

दुसऱ्या दिवशी उद्धवानं सौराष्ट्रातून एक वेदसंपन्न वृद्ध पुरोहित शोधून आणला. त्याच्याकडून कुशस्थली द्वीपावर आम्ही मंत्रोच्चारात सविध भूपूजन केलं. नंतर आम्ही मथुरेकडे परतलो.

मी लवकरच मथुरेत यादवांची निर्णयाची राजसभा भरविली. ही मी, दादा, उद्धव, सात्यकी, अनाधृष्टी, अक्रूर, कृतवर्मा, अवगाह, शिनी, सत्राजित, देवभागकाका अशा सर्व प्रमुख यादवांच्या जीवनप्रवासातील मथुरेतील अखेरचीच सभा ठरणार होती. सभेला प्रमुख अतिथीपदाचा बहुमान मी सुचवला तसा उग्रसेन महाराज गर्गमुनींना देणार होते. या सभेनंतर सर्व यादव एकनिष्ठेनं कामी लागणार होते, ते नव्या नगरीच्या सर्वांगीण उत्थानासाठी. यापूर्वी कधीच नव्हती अशी खचाखच भरलेली ही यादवसभा गंभीर वातावरणात सुरू झाली.

सर्वांचं स्वागत करून मी म्हणालो, "प्रिय यादवहो! तुम्हा सर्वांसाठी एक आनंदवार्ता आहे. एका नव्या राजनगराचं निर्माण यादवांसाठी लवकरच होईल. त्यासाठी योग्य अशी सुलक्षणी भूमी दादा, उद्धवासह सर्व परीक्षा घेऊन मी निवडली आहे. तिचं पूजन करूनच मी परतलो आहे. ही भूमी दूर पश्चिम सागरकिनाऱ्यावर आनर्त राज्यातील रैवतक पर्वतराजीजवळ आहे. सौराष्ट्रात 'कुशस्थली' नावाची.

"हिचं नेत्रदीपक सुविहित निर्माण यादवांचे निष्णात स्थापत्यविशारद मुनिवर गर्ग करणार आहेत. मला विश्वास आहे, यादवांना शोभेल असंच नगर ते उठवतील. तुमच्यातील सर्व स्थापत्यकार, लोहकार, काष्ठकार, उपलेपक, ताम्रकार, सुवर्णकार अशा कारागिरांनी हे नगर निवडक कौशल्यानं उठवायचं आहे. त्यांना अमात्य विपृथूंनी पाचारण केलेले देशोदेशीचे निष्णात कारागीरही सहकार्य करतील. उद्याच वृषभरथांनी सर्वांनी तिकडे प्रस्थान ठेवायचं आहे. हे नगर समस्त यादवांचं आहे. यासाठी रात्रन्दिन त्यांना श्रमयोगाची साथ सर्व–सर्व नगरजनांनी द्यायची आहे.

"कितीही झालं तरी 'मथुरा' हे महाराज यदूंपासूनचं आपलं मूलस्थान आहे. ते संपूर्ण नाही त्यागता येणार. यासाठी महाराज उग्रसेन यांच्या इच्छेनुसारच, त्यांच्या निवडीचे सैनिक योद्धे घेऊन मथुरेतच काही काळ मागे थांबतील. इतर झाडून सारे लहानथोर स्त्री–पुरुष पश्चिम किनाऱ्याची वाट धरतील.

"मथुरेपासून आनर्त–सौराष्ट्रापर्यंत उद्यापासून यादवजनांची एक संतत रांग लागली पाहिजे. आहे सर्वांना मान्य?" मी उजव्या हाताची वळलेली मूठ आकाशात उंच उभवून यादवांच्या भरगच्च राजसभेला भावपूर्ण आवाहन घातलं.

"माऽन्य, अवश्य मान्य यादवश्रेष्ठ! उद्याच मथुरेबाहेर पडू आम्ही सारे. यादवनायक

श्रीकृष्ण महाराजऽ जयतु! जयतु!" राजसभेत असा एकही कंठ नव्हता, जो गर्जून प्रतिसाद देत उठला नाही.

काही दिवस गेले. आमच्या गर्गमुनींनी आणि देशोदेशीच्या राजपुरोहितांनी घोषित केलेली खग्रास सूर्यग्रहणाची वार्ता सर्वत्र पसरली. प्रथेप्रमाणं या सूर्यग्रहणाचा प्रदोष निवारायचा होता. ब्रह्मावर्तातील प्रमुख महाजनपदांचे राजे आणि त्यांची राजमंडळं तीर्थ कुरुक्षेत्रावर त्यासाठी एकवटणार होती. सन्नेथ सरोवराकाठी. सूर्यकुंडाजवळ. आम्ही यादवही जाणार होतो. त्यासाठी अग्रपथकं पाठवून शिबिराची व्यवस्थाही केली. आमच्या शूरसेन राज्याला तीन प्रबळ शत्रूंचं नाहीतरी खग्रास ग्रहणच पडू बघत होतं, कालयवन, शाल्व आणि जरासंध यांच्या विनाशी मेळाचं!

प्रस्थानाचा मुहूर्त काढला तसं आम्ही म्हणजे मी, दादा, उधो, दोन्ही सेनापती, अक्रूर, सत्राजित असे निवडक योद्धे निघालो कुरुक्षेत्राकडे. माझ्या चार शुभ्र घोड्यांच्या गरुडध्वज रथाचं सारथ्य या प्रवासात दादा व उधो करणार होते. का कुणास ठाऊक, या वेळी मला आतून प्रकर्षानं जाणवलं की, आपण काही सारथ्य तेवढं मुळीच करू नये! रथाच्या मागील घेरात बसून भोवतीचा नयनहर निसर्ग न्याहाळताना माझ्या मनी विचारांची चक्रंच चक्र फिरून गेली.

कुरुक्षेत्र! सरोवरांनी दाटलेलं, पवित्र धर्मक्षेत्र! आम्हा यादवांच्या, कुरूंच्या, मत्स्य, वत्स, चेदी, पांचाल, पंचनद, विराट, अशा कितीतरी क्षत्रियांच्या – कितीतरी पूर्वजांच्या पिढ्याच-पिढ्या इथं लोटत आल्या होत्या. अगदी न चुकता प्रत्येक सूर्यग्रहणाच्या वेळी. सन्नेथ सरोवराकाठी नानाविध दानं करून धन्य झाल्या होत्या.

असेच तर आम्हीही चाललो होतो. पण काही केल्या माझ्या मनाचं पाणकाक पाखरू देहाच्या फांदीवर क्षणभरही स्थिरावत नव्हतं. लाभल्यापासून सुदर्शनाचे पवित्र मंत्रबोल मी आजवर मनोमन ऐकत आलो होतो. या वेळी मात्र एकसारखी जाणवत होती, ती कर्कश घरघरत येणारी भरतीच्या वादळी समुद्राची गाज आणि टिटवी पक्षिणींचे कातरे बोल! का होत होतं हे असं? मी अनेकदा हाच प्रश्न स्वतःला विचारून बघितला. समाधानकारक उत्तर काही मिळत नव्हतं! शेवटी मी स्वतःशीच हसलो. प्रश्नाचं पीतांबरच झटकून टाकलं. ते बघून शेजारचा उद्धव बोलला, "दादा, कसला विचार करत होतास इतका वेळ?" तसं त्याला तर्जनीनं समोरचं सन्नेथ सरोवर दाखवीत मी म्हणालो, "उद्धवा, आलं आपलं इच्छित स्थळ. कुरुक्षेत्र! धर्मक्षेत्र! उतरू या."

सूर्यकुंडाची उत्तरदिशा धरून आम्हा यादवांच्या राहुट्या पडल्या. शिबिरं उठली. गर्गमुनींनी निर्देश दिला, तसं स्नान उरकून आम्ही सूर्यकुंडात उभे राहिलो. ग्रास पडणाऱ्या आकाशमणी सूर्यदेवाला अर्घ्यं दिली. कुंडाकाठच्या दानचौथऱ्यावर उभं राहून मी, दादा, उद्धव समोर येणाऱ्या प्रत्येक यात्रेकरूला दानं देऊ लागलो. संपूर्ण सरोवरकाठ धरून सर्वत्र अशीच दानसत्रं चालली होती. आम्ही सुलक्षणी पुष्ट गाई, उपयुक्त पाळीव प्राणी, शुद्ध मधाचे बुधले, दिव्य औषधी वनस्पतिरसांचे कुंभ, वस्त्रं, धनधान्यं, माणिक, मोती, वैदूर्य, पोवळी अशी रत्नं, सुवर्ण, चांदी, रुपं यांचे अलंकार मुनिवरांच्या साक्षीनं भरभरून दान करू लागलो. सूर्याच्या तेजबिंबाला ग्रासचा प्रारंभ झाला नि मी उभ्या देही थरथरलो. भोवतीचे आप्त, अमात्य, मुनिवर, सन्नेथकुंड आणि

होय कुरुक्षेत्रही पारऽर विसरलो मी. माझे डोळे आपोआपच मिटले गेले. मला क्षणभर भासच झाला. मी – मीच ग्रासला जातो आहे! मी रविरंशुमान! मग काहीच उरलं नाही. कणाकणानं मी फक्त ग्रासला आणि ग्रासलाच गेलो!!

काही पळांनी मला गदागदा हलवून प्रिय उद्धव डोळे विस्फारून माझ्याकडे कसंतरीच बघत म्हणाला, "किती भयाण काळाठिक्कर दिसत होतास काही काळापूर्वी ग्रासाच्या वेळी तू दादा! अरे, मला एकदा तरी सांग, तू नेमका आहेस तरी कोण?"

तसं मी त्याचं लक्ष दुसरीकडेच वेधत म्हणालो, "हे अक्रूरकाका काय म्हणतात ते तरी ऐकशील प्रथम?'' मग नुसतंच हसलो. काही न घडल्यासारखं. तसं समोरचे अक्रूरकाका नम्रपणे म्हणाले, "महाराज, आत्ताच मला कुरूंचे राजमंत्री विदुर भेटले. हस्तिनापुराहून आपल्या आत्या कुंतीदेवीही आल्या आहेत दानासाठी इथं. आपल्या पाची पुत्रांसह – पांडवांसह. त्यांचं दानादी धर्मकर्तव्य नुकतंच आवरलं. आपण इथं आल्याचं समजताच त्या इकडेच यायला निघाल्या आहेत – पुत्रांसह." तसं मी दादाला म्हणालो, "दादा, दानं सार्थकी लागली आपली! आत्याबाईंच्या पुत्रांसह शिवदर्शनाचा योग येतो आहे, तोही सूर्यग्रहणाच्या दिवशी – साक्षात सूर्यकुंडांच्या काठी – कुरुक्षेत्रावर. चला आपण त्यांच्या स्वागतासाठी थोडं सामोरं जाऊ." आता मात्र मी नेहमीसारखं हसलो. ते दोघंही मागून येताहेत की नाही, ते न बघताच आक्रूरांसह चालूही लागलो.

भोवतीचं हिरवंकंच दर्भकुरण काही वाव मागे टाकताच बाबांनी वेळोवेळी आठवणी सांगितलेल्या माझ्या आत्याबाई कुंतीदेवी समोरच दिसू लागल्या. गोल, चंद्रमुखी चर्येच्या, नितळ, सात्त्विक मुद्रेच्या, काहीशा स्थूल, अंगी मऊ शुभ्रधवल अंशुक ल्यालेल्या. मात्र रिक्त कपाळाच्या! धीमं, धीरोदात्त चालणाऱ्या. त्यांच्या उजव्या हाताशी त्यांचे दोन पुत्र होते. डाव्या हाताशी एकटाच धिप्पाड, भक्कम, बलदंड पुत्र होता. मागे राजहंसाच्या ऐटदार जोडीसारखे एका वयाचे, अंगलटीचे, उंचीचे दोन पुत्र होते. या पांडव राजकुटुंबामागे आमच्या विपृथूंच्याच वयाचे आणि तसेच सत्त्वशील दिसणारे कुरुमंत्री महात्मा विदुरही होते.

जसा सांदीपनींना, भृगू परशुरामांन बघताच मी आपोआप ओढला गेलो होतो, तसाच मी नकळतच खेचल्यासारखा दादा, उद्धवापासून पुढे झालो. त्या आत्याबाईंचं जे आणि जसं वर्णन मी बाबांच्या तोंडून ऐकलं होतं, त्यानं माझी दृष्टी जोडली गेली ती त्यांच्या अम्लान चरणांशीच. झपाझप पुढे होत मी त्यांना गाठलं. गुडघे भुईला टेकून मी माझं मोरपीस मुकुटधारी मस्तक त्यांच्या विमल चरणांशी भिडविलं. मला फार-फार जाणवलं की, हा चरणस्पर्श तर साक्षात गोकुळातल्या आणि मथुरेतल्या थोरलीच्या चरणस्पर्शासारखाच होता. क्षणैक आश्चर्य वाटलं, तो काही या आत्याबाई बाबांची सख्खी बहीण असूनही बाबांच्या चरणस्पर्शासारखा मात्र नव्हता. काही पळ माझा माथा त्या चरणांवर माझ्या नकळतच तसाच राहिला. वरून दोन अश्रुथेंब माझ्या गालांवर उतरले. सूर्यग्रहणाच्या वेळी थरारलो होतो, तसाच मी अंगभर थरारलो. पाठोपाठ कानांवर दोन शब्द पडले, भावकढांनी ओतप्रोत भरलेले, युगानुयुगं रोखलेले – "कृष्णाऽऽ! उठा – ऊठ!"

मी उठून क्षणैक आत्याबाईंच्या डोळ्यांना डोळे भिडविले. जन्मोजन्मीची हृदयखूण स्पर्शून गेली. हे डोळे वेगळेच होते. मी पूर्वी कधीही न बघितलेले. माझ्या दोन्ही आया,

काकू, बाबा, काका कुणासारखेच नव्हते ते! दुसऱ्याच क्षणी त्या मानिनी, सोशिक, माझ्या प्रिय आत्या कुंतीदेवींनी मला दृढ–दृढ आलिंगनात घेतलं. उभ्या देहीच भरून येऊन त्या कितीतरी वेळ गदगदू लागल्या.

काही पळांनी त्यांचा भावलोट आपोआप सुमार झाला. माझे खांदे घट्ट पकडून – त्यांनी आपल्या ज्येष्ठ पुत्रासमोरच माझा पुढा केला. आता मात्र स्वाभिमानी, अनुभवी क्षत्राणीसारख्या त्या ठणठणीत निर्धार वाणीत म्हणाल्या, “युधिष्ठिरा, हा तुझा मामेबंधू – माझ्या दादाचा – वसुदेव, देवकी वहिनींचा पुत्र. जगाचा श्रीकृष्ण, माझा नुसता कृष्ण!”

ते ऐकताच मी पुढंसा झालो. माझ्या ज्येष्ठ आतेबंधू युधिष्ठिराला वंदन करण्यासाठी त्यानं काही मला पुरतं वाकून दिलं नाही. तोही त्रोटक म्हणाला "नको – नको, असू दे, असू दे!”

एव्हाना दादा, उद्धवानं आत्याबाईंचा चरणाशीर्वाद घेतला होता. आत्याबाईंनी डाव्या हाताशी असलेल्या, धिप्पाड गौर पुत्राच्या भक्कम दंडाला धरून पुढे खेचलं. त्या म्हणाल्या, “हा माझा भीम! याला आवरायचं म्हणजे वादळी वाऱ्यालाच आवर घालणं आहे. माझं सोडून कधीकाळी ऐकलं, तर हा काय ते केवल तुझंच ऐकेल!” धिप्पाड भीमानं मातेच्या कृतीवरून तिचा मनोदय ओळखला. पाठीशी उभ्या असलेल्या दोन भावांना पुढे घेत, माझ्या पायांवर घालत तो म्हणाला, “यादवा, माझ्यापेक्षा यांनाच तुझ्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. हे माझे प्रिय बंधू नकुल आणि सहदेव.” मी त्या छोट्या दोघांना वर घेत त्यांच्याकडे पाहिलं. त्यातील नकुल तर खूपच सुंदर होता. तरतरीत नाकाचा, बांधीव यष्टीचा, कोकमगौर माझ्या उद्धवासारखा. अंतर एकच होतं, उद्धव अधिक सोज्ज्वळ जाणवला असता, तोही मलाच. भीमानं मला प्रेमानं गाढ आलिंगनात घेतलं. नुकतीच भूक शमलेल्या वनराज सिंहासारखी आता शांत–शांत दिसू लागली त्याची मुद्रा.

मी अपार कौतुकानं माझ्या या चारही आतेबंधूंच्या मुद्रा – पांडुपुत्रांच्या चर्या – एका दृष्टिक्षेपातच सर्व बारीक लक्षणांसह टिपल्या. आत–बाहेरच्या वास्तवासह मनी नोंदल्या. युधिष्ठिर उंचशील पसरट स्कंधांचा, उन्नत वक्षाचा. गौरवर्णीय, तरतरीत नाकाचा होता. तो शांत–शांत मुद्रेचा होता. त्याची पुष्ट मान मात्र स्कंधापासून बरीच वर होती. त्याच्या भुवया कानशिलांकडे अधिक सरकल्या होत्या. कानशिलंही उंच, रक्तिम मांसल पाळ्यांची व टपटपीत होती. माझ्यापेक्षा तो वयानं थोडासा, पण ज्येष्ठच असेल.

नेत्रकडा सदैव आरक्त असलेला भीमसेन शब्दश: पर्वतासारखा व वनराजासारखाच होता. वळलेल्या मुठीचा बळकट वज्रप्रहार त्याच्या वक्षावर केला असता, तर ‘ठण्ण’ असा ध्वनी स्पष्ट उमटावा, असंच त्याचं वक्ष पुष्ट होतं! लोहरसाचं, भरदार. त्याचे विपुल, दाट, कुरळे केश त्याच्या भक्कम स्कंधावर डौलात रुळत होते. त्याचा आवाज साधं बोलतानाही मृगाचे मेघ गुरगुरावेत तसा ऐकणाऱ्याला दडपून टाकणारा होता. तोही वयानं माझ्यापेक्षा ज्येष्ठ होता.

नकुल, सहदेव एकाच वयाचे, उंचीचे व अंगलटीचे होते. नर कपोतांच्या जोडीसारखे. दोघेही घोटीव यष्टीचे, तरतरीत दिसत होते. माझ्यापेक्षा थोडे कमी उंचीचे होते ते. भीमही तसाच; पण त्या दोघांच्याहून थोडासा उंच. मात्र माझ्यापेक्षा किंचित ठेंगना. या

पहिल्याच भेटीत मला फार प्रकर्षानं जाणवलं, त्यांच्यापैकी एकाच्याही मस्तकी मुकुट नव्हता. आज तर तीर्थक्षेत्री यायचं म्हणून त्यांनी कुरूंची ठेवणीतील पारंपरिक पीळदार पागोटीच धारण केली होती.

त्याच्या उंचीनुसार त्यांना क्रमशः पुन्हा न्याहाळताना मला प्रकर्षानं जाणवलं, 'त्यांच्यात माझ्या उंचीचा कुणीच कसा नाही?' जवळच कुरूंचे राजमंत्री महात्मा विदुर उभे होते. माझी त्यांची दृष्टिभेट होताच त्यांच्या डोळ्यांतून असंख्य तेजपाखरं उडाली. त्यांची गोल गौरवर्णी मुद्रा भावोत्कट झाली. ज्येष्ठ असून कुरूंचे राजमंत्री असून ते मला वंदन करण्यासाठी 'अच्युताऽ' असं अस्पष्ट पुटपुटत वाकू लागले. मी चपळाईनं त्यांना वर घेत बिलगलो. पुटपुटलो "कसे आहात?" माझ्या मनात आणखी एका सुहृदाची नोंद झाली. आत्याबाईंकडे वळत शेवटी मी महत्त्वाचा प्रश्न घातला, "तुझा पाचवा पुत्र नाही दिसत कुठं तो? मला हवा तो!"

"आत्ताच तर इथंच होता." आत्याबाई माझ्याकडे बघून नुसत्या हसतच राहिल्या. मला काहीच कळेना. आजवर मी जगाची मंडलं घेत आलो होतो. आत्याबाईंचं हसणं मात्र कोड्यात टाकणारं होतं, क्षणार्धात त्यांनी डोळे योग्यांसारखे भुवयांकडे वळविले. तसं मी समजून चुकलो. तो माझ्या मागंच उभा होता. मी हलकेच अर्ध मंडल घेतलं. माझे चरण केव्हा दिसतात म्हणून खोळंबलेल्या, समोरच्या तेजवंत कुरू योद्धयानं चपळाईच केली. नेत्रपातं लवायच्या आत डावा गुडघा जमिनीवर टेकवत त्यानं असं काही नेत्रदीपक वीरासन घेतलं की, मीही बघतच राहिलो. कुणीही बघतच राहावं असंच ते अजोड होतं. कसा दिसला तो मला त्या वीरासनात? तर मानससरोवरावर हलकेच शुभ्र पंख हेलावत उतरणाऱ्या डौलदार पक्षीराज राजहंसासारखा! मथुरेतील यादव राजवास्तुत कळसावर बसलेल्या डौलदार श्वेतकपोतासारखा! छे! तो अन्य कशाहीसारखा दिसतच नव्हता. तो दिसत होता, केवळ आणि केवळ त्याच्यासारखाच. आणि तेही त्याच्या विशिष्ट वीरासनामुळे.

मी त्याचे बळकट पुष्ट वृषस्कंध गच्च धरून त्याला प्रेमानं हलकेच वर घेतलं. त्याच्या डोळ्यांत डोळे सखोल रोवले! तसा तो क्षणैक हसला. आमची परस्परांना ओळख पटली. जन्मजन्मांतरीची!! तो माझ्याच उंचीचा होता. थेट माझ्यासारख्याच वर्णाचा. मत्स्यनेत्राचा, बाणाच्या अग्रासारख्या दरदरीत नाकाचा! माझ्या सुग्रीव अश्वासारखा भरीव मानेचा. हुबेहूब माझीच प्रतिकृती!! क्षणभर मला भास झाला आपण दर्पणात आपली समाकृती तर बघत नाही ना! दुसऱ्याच क्षणी त्याच्यामाझ्यातही एक सूक्ष्म फरक आहे, हे मला जाणवलं. मी स्वतःशीच हसलो. तोही तसाच हसला. माझ्या उजव्या हनुवटीजवळ जोडदात होता, याच्या तर डाव्या हनुवटीजवळ अगदी तस्साच जोडदात होता! पुढे होत आत्याबाईंनी आम्हा दोघांच्याही खांद्यावर हात ठेवून ते हलकेच दाबले. त्या काही बोलण्यापूर्वीच मी पटकन बोललो, "आते, हा तुझा अर्जुन! मिळेल ते ज्ञान अर्जन करणारा – मिळविणारा. सद्गुण हेच धन मानून ते प्राप्त करणारा – धनंजय. पार्थ. काय?" मी त्याच्या डोळ्यांना डोळे जोडत प्रश्न केला.

"जन्मतःच सर्व इंद्रियांवर विजय घेणारा तू हृषिकेश! तुला कशाला पाहिजे कुणाची ओळख? आणि मला म्हणशील, तर तुझी कशी ओळख पाहिजे हे प्रथम क्षणीच मी दाखवून दिलंय, तुझ्या चरणांशी एक लय पावणारं वीरासन घेत!" तो म्हणाला. दुसऱ्याच क्षणी मी समोरच्या घोटीव परमवीर नरोत्तमाला माझ्या दृढ नि गाढ–गाढ आलिंगनात

घेतलं. माझ्या प्रिय आतेचे पुन्हा काही त्रोटक शब्द माझ्या कानांवर तरळून गेले. "सारखेच दिसतात. कळतच नाही कोण, कोण आहेत! कळूही नयेत! असेच राहा – एकजीव – एकमन. औक्षवंत – विजयवंत व्हा!"

कुरुक्षेत्रावर सन्नेथ कुंडाकाठच्या शिबिरात शांत रात्र उतरली. मी कुंतीआतेकडून तिच्या तोंडूनच पराकाष्टेची सत्त्वपरीक्षा बघणारी तिची जीवनगाथा ध्यानपूर्वक ऐकली. भरीच्या तारुण्यातील तिचे चारही पुत्र थोड्या–थोड्या अंतरानी निद्राधीन झाले. रात्रभर ती नाना हर्षमर्षांच्या घटनांनी तुडुंब भरलेली थरारक बालपांडवगाथा सांगतच राहिली. मी ऐकतच राहिलो. मनी वारंवार उफाळणारे सुदर्शनाचे दिव्य मंत्र रोधून! साक्षी राहिला मध्येच मधुर हसणारा केवळ एकटा जागृत अर्जुन! गुडाकेश – निद्रेवर विजय मिळविलेला!

जसे निवडक यादव, माझ्या रथाचे चारही अश्व, मी ज्याच्या साक्षीनं संकल्प सोडला तो पश्चिम सागर, सारथी दारुक, स्नेही सुदामा, प्रिय उद्धव, नुकताच ग्रासला गेलेला आभाळीचा राणा सूर्यदेव हे सर्व मला माझे अवयवच वाटले होते, तसाच हाही होता – अर्जुन. गोकुळात मला एक सखी भेटली होती – राधा. उद्धव हा माझ्या अत्यंत प्रिय बंधू होता. हा मात्र त्या सर्वांहून वेगळा 'जीवनसखा' होता.

मी तर वृक्षच होतो. अश्वत्थ – चक्क उलटा! हा अर्जुन मात्र होता, त्याच उलटचा अश्वत्थाची चक्क सुलटी पडलेली सावली. मी आकृती होतो ती एका ऊर्जेची – तेजवंत जीवनज्योतीची. माझा हा तरणाबांड सखा अर्जुन होता, त्याच दिव्य ज्योतीची छाया! ज्योतीची कधी छाया असू शकते काय? होय – असू शकते! तीही तेज:पुंज! सावळा अर्जुन मला तेजवंत छायेसारखाच भावला! काही एका साध्यासाठी विसर्जनाच्या मनोभावानं धडपडणारा मी होतो. ही धडपड प्रेमयोगानंच साधणं शक्य होतं. त्यासाठी मजठायी नितांत एकनिष्ठ श्रद्धा असणारा पराक्रमी साधनपुरुष मला हवा होता. अर्जुनाच्या भेटीमुळे तो आज मला मिळाला होता.

कुंती आतेचा कुरूक्षेत्रावरून निरोप घेऊन आम्ही परतलो.

मथुरेत आलो आणि सेनापती सात्यकीनं भृगुकच्छच्या आश्रमातून आलेल्या एका शिष्याला माझ्या समोर सादर घातलं. त्यानं आणलेल्या वार्ता आम्हाला क्षणाचीही उसंत देणाऱ्या नव्हत्या. कालयवनाची अफाट सेना समुद्रमार्गे अनेक नौकांनी पश्चिम किनाऱ्यावर उतरली होती. तिला राजनगर गिरिव्रजाहून आलेली तितकीच मोठी जरासंधाची मागधसेना मिळाली होती. जवळच अर्बुदगिरीवर असलेल्या राजनगर मार्तिकावतीहून येऊन शाल्वही त्यांना ससैन्य मिळाला होता. कौंडिण्यपुराहून भीष्मक त्यांना मिळण्यासाठी ससैन्य निघाला होता. गर्जत्या पश्चिम सागराला धरून या त्रिकुटांच्या जोड सैन्याचा कलकलाटी अफाट सैन्यसागर पसरला होता. तिथून निघून चौअंगांनी मथुरेला घेरण्याच्या आणि चिरडण्याच्या, नामशेष करण्याच्या योजनेत होतं हे प्रचंड सैन्य.

भृगुकच्छच्या परशुरामांच्या अनुयायानंच या वार्ता तत्परतेनं आम्हाला धाडल्या होत्या. माझ्या अन् दादाच्या सैन्याज्ञा भराभर सुटू लागल्या. आता एक क्षणही दवडता येणार नव्हता. भेऱ्या, नगारे, दुंदुभ्या, तुताऱ्यांच्या संमिश्र नादांनी मथुरा कल्लोळून उठली. आमचे सोनेरी गरुडचिन्हांकित केशरी राजध्वज पेलणारे रथच रथ सज्ज झाले.

निघाले मथूरेच्या पश्चिम महाद्वारातून बाहेर पडून पश्चिम सागराच्या दिशेनं. तशी आम्हा यादवांची संख्या कोटीत होती. पण लढाऊ यादव मात्र काही लाखांतच होते. इतर अनेक अठरा पगड नित्यकर्मांत गुंतले होते. त्यातील कितीतरी नव्या राजनगराच्या उत्थानासाठी कुशस्थली द्वीपाकडे केव्हाच गेले होते.

आमच्या सैनिकी प्रवासात मी आणि दादानं झाडून साऱ्या यादवांना मथुरेबाहेर काढलं होतं. आमच्याबरोबर सत्राजित, कृतवर्मा, अक्रूर, शिनी, अवगाह, यशस्वी, चित्रकेतू, बृहत्बल, भंकार असे कितीतरी निष्णात योद्धे होते. पडावामागून पडाव टाकत आम्ही पश्चिम समुद्रकिनाऱ्यालगत मरुस्थलातील अर्बुदगिरीजवळ आलो. वार्ता होती, शत्रुसैन्य धौलपूरच्या जवळ पर्वताच्या पायथ्याशी तळ टोकून शिबिरं ठोकून आहे. धौलपूर जवळ येताच मी आमच्या शिबिरात सैन्य हालचालींचा प्रस्ताव दादासमोर ठेवला. आम्हाला शत्रुसैन्यावर एकमुखी चाल घेऊन कधीच यश येणं शक्य नव्हतं. तीन बलाढ्य शत्रूंचं एकवटलेलं सैन्य आमच्या तिप्पट होतं. एकीकडे पश्चिमसागर, दुसरीकडे शत्रुसेनासागर, मध्ये पसरलेली लांबच लांब विशाल मरुस्थली असं हे दृश्य होतं. मी दादाला आणि दोन्ही सेनापतींना समजावून सांगितलं की, आमच्या सेनेच्या तीन फळ्या करणं अटळ आणि हिताचं आहे. प्रत्यक्ष दादानं शाल्वाला अंगावर घेत अर्बुदगिरीकडे वळवावं. दोन्ही सेनापतींनी प्रचंड सैन्यफळी सोबत घेऊन जरासंधाला अंगावर घ्यावं. त्याच्याच मगध देशाकडे त्याला झुलवत न्यावं. मी निवडक सैन्य घेऊन दूरदेशीहून आलेल्या थेट कालयवनालाच भिडावं.

धौलपूर! चौफेर मरुभूमीनं घेरलेलं नगर. इथं मला कालयवनाला दाखवून द्यायचं होतं, तो यवन असला, तरी मी त्याचा साक्षात काल आहे. ठरल्याप्रमाणं दादानं शाल्वाला एका बाजूनं ससैन्य बाहेर काढलं. दुसऱ्या बाजूनं आमच्या शूर सेनापतीद्वयानं जरासंधाच्या मागधी सेनेला ललकारलं. धौलपूरच्या मरुमय तळावर एकटा पडला तो लांबून आलेला कालयवन! आता मी माझ्या सेनेसह रणवाद्यांच्या कल्लोळात थेट कालयवनाला भिडलो. हां-हां म्हणता माझ्या गरुडध्वजानं कालयवनाचा रथ गाठला. त्याच्याशी भृशुंडी, शतघ्नींचं प्रथम पाषणफेकीचं थरारक द्वैरथ युद्ध झडलं. दोन्हीकडच्या पाषाणफेकीमुळे भोवतीचे रथ आणि घोडेसुद्धा दिसेनासे झाले. पण लोहकवचामुळे आमचा रथ भक्कम होता. सारथी दारुक चारही घोडे आवरत त्याला भोवऱ्यासारखा कालयवनाच्या रथाभोवती गरगर फिरवत होता. दोन्ही रथातील पाषाणगुंडसाठे संपले. आता धनुर्युद्ध सुरू झालं. कालयवन तयारीचा योद्धा होता. त्याचा सारथीही कुशल असावा. आमच्या तूणीरातील बाण संपले, तसं भालाफेकीचं युद्ध सुरू झालं.

मी दारुकाला जसा कानमंत्र देत होतो, तसा तो आमचे चारी अश्व हाताळीत होता. वेगांच्या एकाच झटक्यात चारीही अश्व आघाडीचे पाय गपकन मुडपून एकदमच खाली बसत होते. वेगांच्या झटक्यावर जाया झाल्यासारखे कसेतरीच रखडत रथ ओढत होते. एकाएकी मी दारुकाला आज्ञा केली. माझ्या गरुडध्वज सेनेबाहेर काढण्याची! तसाच रखडत नेण्याची. त्यानं आमचा रखडता रथ सेनेबाहेर काढला. काही एक विचार मनोमन ठरवून मी माझ्या शेल्यात बांधलेला पांचजन्य ओठांना लावला. मान गगनगामी उंचावून शंखातून एक चमत्कारिक भयकातर नादललकारी उठविली. तिचा अर्थ होता, 'मागे हटा, फिरा, पळा!' माझ्या सेनापत्याखालील यादवसेनेला तो चांगला परिचितच होता. सैन्य

परतलं. माघार घेत सुसाट धावू लागलं.

कालयवनानं आपल्या यावनी भाषेत सारथ्याला चेतावणी दिली. त्यांचा पुष्ट, सात मातकट रंगाच्या अश्वांचा रथ माझ्या पाठलागावर घातला. हे मी योजलं तसंच घडत होतं. पुढे माझा गरुडध्वज रथ निष्णात सारथी दारुक धावडवीत राहिला. आम्ही प्राणभयानं जीव घेऊन युद्धातून पळ काढतो आहोत, हे बघून कालयवन पुरता चेकाळला. गांधारी मद्यानं अगोदरच लाल झालेले त्याचे डोळे माझ्यावरच्या त्वेषानं ओरडताना अधिक लालेलाल झाले. त्यानं आपला सारथी बखोट धरून उठविला आणि पाठीमागच्या घेरात घेतला. स्वत: रथनाडीवर बसून आपल्या धिप्पाड गांधारी अश्वांचे वेग आपल्या दोन्ही बळकट मुठीत पकडून झटकले. यावनी, अनाकलनीय भाषेत त्वेषानं तो काहीतरी ओरडला. माझ्या पाठलागावर पडला.

धौलपूरच्या युद्धभूमीवर दृश्य उभं ठाकलं – प्रत्यक्ष कालाच्या पाठलागावर पडलेला यवन असं! मी हसलो. एव्हाना रणांगणापासून दारुकानं कौशल्यानं यवनाला कितीतरी योजनं बाहेर घेतलं होतं.

आता या पलायनाच्या युद्धनाटयातील दुसरा टप्पा सुरू झाला होता. मी एक ठेवणीतला संकेत करताच दारुकानं त्याचा अर्थ अचूक पकडून हातांतील आठही वेगांना असा काही जोरदार झटका दिला नि त्याच क्षणी मुखातून असा काही चमत्कारिक संकेती अश्वनाद काढला की, माझे चारही सतेज अश्व जागीच थांबले. पुढील दोन्ही खूर उंचावून कर्कश खिंकाळले आणि क्षणात गुडघे टेकवून भुईवर लवले! जसा काही प्राणभयानं दौडणारा आमचा रथ कोसळलाच! निरुपयोगी झाला. दारुकानं चपळाई करून भुईवर झेप घेतली. क्षणात उजव्या हाताचा सुग्रीव अश्व तेवढा त्यानं बंध सोडून रथमुक्त केला. शेपटी झटकून कान टवकारत तो लवभरात उभा राहून फुरफुरला. मी चित्ताचपळाईनं पाठोपाठ भुईवर झेप घेतली. धावत जाऊन सुग्रीवाच्या पाठीवर मांड घेतली. त्याला जोरदार बळकट टाच भरली. ते सुलक्षणी श्वेत जनावर माझा संकेत अचूक उमगलं. दोन्ही पाय उंचावून पूर्वीपेक्षा कितीतरी जोरानं खिंकाळलं नि सुसाट उधळलं.

समोर होता वर्षानुवर्षं वाळूचे थर साचून तयार झालेला, खुरटया झाडाझुडपांनी वेढलेला सुमार उंचीचा धौल पर्वत. सुग्रीवाच्या धावत्या पांढऱ्या रेघेनं त्याची वाट धरली. कितीतरी अंतर धावून आल्यावर मी मागे पाहिलं. अद्याप सूडाग्नीनं पेटलेला कालयवन माझ्या पाठलागावरच होता. आता त्यानंही आपल्या रथाचा एक मातकट अश्व आपल्या रथातून सोडवून मांडाखाली घेतला होता. तो थांबायला तयार नव्हता. थांबणार नव्हता. मी पुन्हा हसलो. पुढे काल मागे यवन. मागे यवन पुढे काल. हा योग चांगलाच होता. आम्ही घामाघूम होत, धाव-धाव धावलो. धौल पर्वताच्या शिखरापर्यंत आलो. आता मला सुग्रीवालाही सोडायचं होतं! तसं सोडलं. पायीच चाललो. अंगावर पोळून काढणाऱ्या उन्हाचा रखरखाट, माथ्यावर तळपता सूर्य, वर पसरलेलं निळं अथांग आकाश, चौदिशांना पसरलेली उजाड–उजाड रणरणती मरुभूमी. समोर केवळ एका गुंफेचं, दीडएक पुरुषी उंचीचं, खुरटया झुडपांनी आच्छादलेलं मुख दिसलं. तसं मी स्वत:शीच पुटपुटलो, "हेच तर राजर्षींचं स्थल. इथंच तर घडणार या युद्धनाटयाचा शेवट." आमच्या कुलदेवी इडाचं स्मरण केलं. मी त्या वालुमय गुंफेत शिरलो. मला खातरी होती, कालयवन इथंही माझी पाठ सोडणार नव्हता. गुंफेतील मळसूत्री अंधारी

वळणं घेत राहिलो. बऱ्याच काळानंतर गुंफेचा चौफेर प्रशस्त आकाराचा मध्य आला. खरंतर मरुस्थलीच्या कित्येक ऋषिमुनींची ध्यानधारणेची ही सुरक्षित पावन गुंफा होती. छताच्या एक–दोन चुकार नैसर्गिक छिद्रांतून आत सूर्यकिरणं उतरल्यामुळे ती अस्पष्ट दिसत होती.

माझ्या शोधक नजरेला एका कोनाडयात अस्पष्ट आकृती दिसणारे एक राजर्षी पहुडले होते. युगानुयुगं. श्वासावर नियंत्रण करणारी योगसाधना साधल्यामुळेच त्यांना हे शक्य झालं होतं. त्यांच्या पहुडलेल्या देहाकृतीवर मुंग्यांनी गळयापर्यंत वारूळ उठविलं होतं. हे होते राजयोगी, राजर्षी मुचकुंद! आम्हा यादवांच्याच दक्षिणेकडील एका शाखेतील अधिकारी मूळपुरुष. काही एक विचारानं मी स्वत:शीच हसलो.

पुढे होत त्या राजर्षींच्या वारुळातून न दिसणाऱ्या चरणांना अपार आदरानं मस्तक भिडविलं. माझ्या कटीचा निळा शेला सोडवून हाती घेतला. त्यात बांधलेल्या पांचजन्याची गाठ उकलली. माझा तो गुणकर शंख मस्तकी भिडवून राजर्षींच्या पायाशी ठेवला. हातचा शेला झटकून त्यांचा योग भंग होणार नाही, अशा दक्षतेनं हलकेच राजर्षींच्या अंगावर अलगद पांघरला. पुन्हा त्यांना वंदन केलं आणि गुंफेच्या प्रशस्त चौकातील एका कोनाडयात अंग चोरून उभा राहिलो! चौसष्ट कलांपेक्षा वेगळी अशी ही अंगचोरीची कला गोकुळापासूनच माझ्या रक्तात भिनली होती! कुठं-कुठं ती मला उपयुक्त पडणार होती, सांगता येत नव्हतं.

कालाच्या पाठलागावर पडलेल्या यवनाची प्रतीक्षा करून काही काळ लोटला. नंतर प्रथम घुमणारे व दरडावणारे यावनी बोल कानावर पडले. त्याचा अर्थ होता, 'पळून-पळून पळणार कुठं मथुरेच्या गवळ्या? जाणार कुठं तू?' पाठोपाठ धापावणारे दीर्घ श्वास कानी आले. क्षणात मला एव्हापर्यंत न दिसलेला कालयवन गुंफेच्या मध्यभागी उभाच ठाकला. काळा रोम, धिप्पाड, लाल नेत्रांचा, उग्र चर्येचा. त्याही स्थितीत दुरून बघताना मला जाणवून गेलं. आमच्या रेखीव गर्गमुनींत आणि याच्यात कसलंच साम्य नाही.

क्रोधानं गरगर मान फिरविणाऱ्या, अखंड बडबडणाऱ्या त्या धिप्पाड यवनाला माझा निळा शेला दिसताच कशा नुसत्या आनंदाच्या उकळ्या फुटल्या. गुंफेचा मध्यचौक दणाणून टाकत तो केवढातरी डरकाळला, "झोपतोय! निर्लज्ज! गवळ्या – ऊठ, गवळटा उठतोस की नाही? सिद्ध हो द्वंद्वाला." असं केवढयातरी मोठयानं कडाडत प्रथम त्यानं निळ्या शेल्याखालील माझ्या पाठीत म्हणून सणसणीत एक लाथच घातली. ती लाथ भोवतीचं वारूळ फोडत, राजर्षी मुचकुंदांच्या छातीवर बसली! दीर्घ योगनिद्रेचा भंग झाल्यामुळे ते खाड्कन उठून उभेच राहिले! गुंफेतील प्रकाश वाढल्यासारखा झाला. पाठोपाठ पायाशी पडलेलं योगनिद्रेपूर्वी ठेवलेलं आपलं अग्निकंकण शस्त्र त्यांनी उचललं. मुचकुंद यादव होते. अग्निकंकणयुद्धात निष्णात होते. पवित्रा घेत ते कडाडले, "उन्मत्त यवना, माझ्या घोर योगनिद्रेचा भंग केलास. भोग त्याची फळं!"

क्षणात त्यांनी हातीचं अग्निकंकण अशा काही वीजेसारख्या चपळाईच्या गतीत फिरविलं की, प्रथम त्याचे तीक्ष्ण दात यवनाच्या मस्तकात घुसताच तो प्राणांतक किंकाळला. राजर्षींनी पाठोपाठ तसेच प्रहार त्याच्या उन्मत्त वक्षावर, दंडावर मिळेल तिथं उतरविले. यावनी रक्ताच्या चिळकांडयाच चिळकांडया प्रथमच त्या तपोभूमीवर उतरल्या. उभा कालयवन आडवा झाला! टाचा घासून अनाकलनीय यावनी भाषेत विव्हळत, तळमळत शेवटी शांत झाला. मी पुढे होत राजर्षींच्या चरणांवर मस्तक ठेवलं. तसं उठवून त्यांनी मला बिलगतं घेतलं. जशी काही यादवी रक्ताच्या अधिकारानं एक आज्ञाच केली, "तुझा तो जीवतारक पांचजन्य शंख तूच उचल. असाच या गुहेच्या मुखाशी जा आणि प्राणपणानं तो फुंक एकदा या मरुभूमीत श्रीकृष्णा. मीच तो तुझ्या

हाती दिला असता, पण यवनरक्तानं माझे हात लांछित झाले आहेत!"

मी भारल्यासारखा माझा पांचजन्य उचलला. पुन्हा गुहेच्या मुखाशी आलो. मान आकाशमार्गी उंचावून तीव्र आवेगानं तो सुलक्षणी शंख फुंकला. धौलगिरी, धौलपूर, अर्बुदगिरी, मरुस्थली धरून त्याचा प्रेरक स्वरनिनाद दूरवर आसमंतात घुमत राहिला! यवनाच्या पाठीवर काल पडून चुकला होता. आर्यावर्तावरचं एक आक्रमी परकीय वादळ शांत झालं होतं.

हाती आलेली कालयवनाची अगणित संपत्ती आम्ही तेथूनच जवळ असलेल्या कुशस्थली द्वीपाकडे धाडली. यांत प्रामुख्यानं गांधारी धिप्पाड अश्व होते. बरेचसे उष्ट्रही होते. विशेषत: आल्या-आल्या पश्चिम किनारीची राज्यं रगडून, लुटून यवनानं जमा केलेलं कितीतरी लगडींचं सुवर्ण होतं.

आचार्य सांदीपनी आणि मुनिवर्य गर्ग यांनी कुशस्थली द्वीपावरच्या राजनगराच्या निर्माणाचा, सविध भूमिपूजनाचा मुहूर्त काढला. तो होता मंदवासरीचा शनिवार. त्या दिवशी शुभकर असं रोहिणी नक्षत्रही होतं, मी, दादा आणि उद्धव, अमात्य, दोन्ही सेनापती व निवडक यादवांसह तिथं गेलो. वसुदेवबाबा व देवकीमाता यांनीही वेळेवर कुशस्थली द्वीप गाठलं. मुहूर्तावर आईबाबांच्या शिवहस्ते भूमिपूजनाचा विधी संपन्न केला.

आता रीतसर नव्या राजनगराच्या प्रचंड उत्थानकार्याचा प्रारंभ झाला. गर्गमुनींनी असुरांच्या निष्णात मय नावाच्या स्थापत्य विशारदाला त्यासाठी पाचारण केलं. तसंच कुरुजांगल प्रदेशातून विख्यात विश्वकर्मा या रचनाकारालाही पाचारण केलं. दोघांनी देशोदेशीच्या असंख्य तज्ज्ञांच्या सहकार्यानं द्वीपकिनाऱ्यावर एका कक्षात चिकणमातीचा कच्चा आराखडा तयार केला. मी आणि दादानं जाऊन तो प्रत्यक्ष बारकाव्यानं पाहिला. त्यांची कल्पकता थक्क करणारी होती. आराखडा बघून मयाच्या खांद्यावर हात चढवीत मी त्याचा स्थापत्ययोग चाचपला. म्हणालो, "इथं कुशस्थलीवर राजवास्तू आणि राजनगर उठवायचं आहे. पलीकडच्या जोडद्वीपावर – राणीकक्ष उभारावयाचा आहे. आराखड्यातील सर्व बारकावे मी बघितले आहेत. छानच आहेत ते. त्रुटी म्हणून कसली ती कणभरही नाही. प्रत्यक्ष बघणार आहे, ते मात्र राजनगरातील माझं निवासस्थान. तिथं मला हव्या तशा सोपानानं जोडलेला माझा प्रशस्त विश्रामकक्ष तू कसा उठवितोस ते. वरच्या खंडातील विश्राम कक्षाकडे जाणाऱ्या माझ्या मनातील 'कृष्णसोपाना'ची एक कल्पना आहे. या सर्व रचनेत ती अत्यंत महत्त्वाची आहे."

"आज्ञा व्हावी महाराज. मी माझं स्थापत्य कौशल्य पणाला लावून स्वामींना हवा तसा 'कृष्णसोपान' उठवून दाखवीन. हार मुळीच घेणार नाही." मय आपल्या अंगच्या कलाभिमानानं ताठपणे; पण नम्रतेनं म्हणाला. तो आणि गर्गमुनी ऐकत राहिले. मी त्यांना माझ्या निवासातून वरच्या खंडातील कक्षाकडे जाणाऱ्या सोपानाची सविस्तर कल्पना दिली. म्हणालो, "मला हा सोपान प्रामुख्यानं निवडक जुन्या कृष्णशिसम – लाकडांच्या रुंद पसरट फोकांचाच हवा. त्या लाकडी पायदंड्यांवर सुवर्णवर्खाचे जाड ताम्रपत्रे ठोकायचे आहेत. प्रारंभी या सोपानाच्या पायदंड्या असतील केवळ पंचवीस. यादवांच्या अठरा कुलांच्या स्मरणासाठी म्हणून अठरा. माझ्या दोन्ही पित्यांच्या व दोन्ही मातांच्या म्हणून चार असतील. दादा व रेवतीवहिनी यांच्यासाठी दोन असतील.

राहिली ती आचार्य सांदीपनींसाठी म्हणून असेल. प्रारंभी केवळ अशा पंचवीसच पायदंडयांचा हा कृष्णसोपान असेल.”

“केवळ पंचवीस? आर्यांच्या जीवनाचा इथंच तर प्रारंभ आहे. कितीतरी व्यक्ती अजून भेटायच्या आहेत त्यांना. त्यांचं काय?” गर्गमुनींनी नेमक्या प्रश्नावर बोट ठेवलं.

तसं हसून त्यांच्याकडे बघताना मी म्हणालो, “त्यासाठी प्रारंभीच दोन पायदंडयांमध्ये पुरेसं अंतर ठेवणार आहेत. त्या मधल्या अंतरात समयानुसार वाढीव पायदंडया चढवायच्या आहेत. शिवाय वरचा खंडही समयानुसार हवा तेवढा उंच उचलून घ्यायचा आहे. ते काम कदाचित आपणालाच करावं लागेल मुनिवर!” मग कितीतरी वेळ मी गर्ग, विश्वकर्मा आणि मय यांना माझ्या मनीची ‘कृष्णसोपाना’ची बारकाव्यानं नीट कल्पना दिली. त्या दोघांच्याही डोळ्यांत जागं झालेलं प्रश्नचिन्हं मी नीट वाचलं. ते जसं काही विचारतच होते? की, एवढया प्रचंड जोडद्वीपाच्या भव्य प्रकल्पातील राजवास्तू नाही, राजसभा नाही, राणीकक्ष नाही, देवालयं, व्यायामशाळा नाही, मग केवळ या सोपानातच रस घेऊन एवढं लक्ष का घालावं यादवश्रेष्ठांनी? कुतूहलानं त्यांनी अधिक काही विचारण्यापूर्वीच मी सहज त्यांना माझ्या नेहमीच्या पद्धतीनं दुसऱ्याच विषयाकडे दूरवर नेत म्हणालो, “मी आणि दादा आजपासून मथुरा ते कुशस्थली अशा सतत चकरा टाकू. लागेल ते साहित्य वेळेवर पोहोचतं करू. होऊ द्या प्रारंभ आपल्या वास्तुयोगाचा!”

आता ब्रह्मावर्तातील आमच्या राजदूतांनी निवडून पाठविलेले लोहकार, काष्ठकार, ताम्रकार, उपलेपक, सुवर्णकार असे शेकडो, हजारोंनी शिल्पकार, कारागीर द्वीप कुशस्थलीवर एकवटले. कुश नावाच्या गवताच्या दाट कुरणांनी या द्वीपाची बरीच जागा व्यापली होती. सर्वप्रथम ही दाट कुरणंच त्यांना स्वच्छ करावी लागली. पाठोपाठ खाऽड, खाऽड, कऽर्र, कऽर्र, चर्रऽ चर्रऽ असे कार्यमग्न विविध शाळांतून अहारोत्र उठणारे ध्वनिनाद पश्चिम किनाऱ्याच्या सागरगाजेत मिसळू लागले. काष्ठकारांच्या शाळेत प्रचंड उंचीचे साग, शिसम, कटहल, ऐन, खैर, किंकर असे वृक्ष धिप्पाड काष्ठकारांच्या हातांतील प्रचंड करवत दात्यांवर चिरले जाऊ लागले. पिवळ्याधमक, काजळकाळ्या, श्वेतवलयांकित काष्ठफाका एकीवर एक चवडीनं रचल्या जाऊ लागल्या. काळ्याशार मुंगळ्या त्यांवर तुरतुरत फिरू लागल्या. ठिकठिकाणी उठलेल्या प्रचंड चुलवाणांवर धगधगत्या भट्टया रटरटू लागल्या. त्यावर ताम्र, लोह, शिस आणि सुवर्ण यांचे रस लोखंडी भट्टयांत वितळू लागले. भेलकांडते प्रचंड, उष्ण, धूरलोट आभाळात झेपावू लागले. कधी कुलदेवता ‘इडा’ या चांद्रदेवीचा, कधी कुलपुरुष यदू, क्रोष्टूंच्या नावांचा जयकार उठू लागला. त्या गजरात तप्त रसरशीत रस घडीव उभट साच्यांत प्रचंड सांडशींच्या आधारे ओतले जाऊ लागले. योग्य काळानंतर हाती आलेले रसरशीत लोह, ताम्र, सुवर्णपत्रे थोराड सांडशांत घट्ट धरून निवण्यासाठी ते पाषाणखंडांना टेकवून ठेवले जाऊ लागले. त्यांच्या झळांनी लोहकार घामाघूम होऊ लागले. त्यांच्या घामधारांनी कुशस्थली भूमी भिजून चिंब होऊ लागली. तिला यादवांच्या श्रमयोगाचं पावन अर्घ्य शेकडो हातांनी, पळापळांनी दिलं जाऊ लागलं. तांबडया वर्णाचे जांभे दगड छत्र्यांनी लहान-मोठया आकारात घडविण्यात पाषाणकार गढून गेले. चुनकळी मळणारी दगडी चक्रं फिरविण्यात ललकाऱ्या देणारे चुणारी स्वतःला विसरले. सुबक तरते काष्ठपूल उठविताना काष्ठकार दंगून गेले.

ऋतू आले. थांबले, रमले, परतून गेले. आमच्या यादवांच्या राजनगरीचं प्रचंड निर्माण कार्य अनेक संवत्सर चाललं. या काळात कामाचा ताण पडताच मयानं त्याचे निष्णात साथीदार ताराक्ष, कमलाक्ष व विद्युन्माली यांनाही सहकार्यासाठी पाचारण केलं. त्यांनाही हे निर्माणकार्य अनावर वाटताच, दुंदुभी, मायावीन, अजकर्ण व काळीक हे मयाचे तज्ज्ञ पुत्रही साह्याला धावले. या सर्वांवर या काळात मी आणि दादानं लक्ष दिलं. प्रत्येक वेळी वेगवेगळे तज्ज्ञ यादव सोबत घेऊन कच्छ, सौराष्ट्राकडे अनेक चकरा टाकल्या आणि मी अपेक्षिला होता, तो निरोप घेऊन आचार्य गर्ग, आणि मय यांचा विशेष अग्रदूत एके दिवशी आमच्या समोर मथुरेत उभा ठाकला. निरोप होता, 'राजनगराचं निर्माण कार्य संपूर्ण सिद्ध झालं आहे! महाराजांनी आपल्या राज्याभिषेकाचा मुहूर्त काढावा. यावं, एकदा ज्येष्ठ यादवांसह हे निर्माणकार्य दृष्टिखाली घालावं. यातही काही त्रुटी असल्यास त्यांच्या पूर्ततेचे आदेश द्यावेत. कसली म्हणता कसलीच त्रुटी नाही. कृष्णदेवांना अपेक्षित 'कृष्णसोपान' बघताना तर सर्वांच्या पाठीवर पसंतीची थाप पडेल, असा आमचा विश्वास आहे. आपली अनुभवी मार्गदर्शकदृष्टी ठेवण्यासाठी विशारद त्वष्टटही आला आहे.'

दारुकानं हाकारलेल्या माझ्या गरुडध्वज रथातून दादा, उद्धवासह एके दिवशी मथूरेच्या पश्चिमद्वारातून मी बाहेर पडलो. मागे दोन्ही सेनापतींचे रथही होते. त्यामागे सोबत निवडक यादव अश्वदलं होती. आता मथुरा ते कुशस्थली हा मार्ग आम्हाला पूर्ण परिचित झाला होता. मध्ये येणाऱ्या नद्या, अरण्यं ओलांडत पडावांमागून पडाव टाकत आम्ही पश्चिम सागरकिनाऱ्यावर आलो.

समोरच्या कुशस्थली द्वीपाकडे बघितलं. विश्वासच बसत नव्हता. इथून तिथवर पसरलेली, सूर्यकिरणात कशी झमझम तळपणारी सुवर्णी तटबंदी प्रथम दर्शनातच डोळे दिपवून गेली. तिचं पाण्यात पडणारं लांबट, पिवळसर डुचमळणारं प्रतिबिंब क्षणभर काही स्थिरावत नव्हतं. लाटांवर थुई-थुई नाचत होतं ते. इथून एक भूपट्टा समुद्रात घुसल्यानं उजव्या हातीचं जोडद्वीप मात्र दिसत नव्हतं. गर्गमुनींनी पाठविलेल्या भव्य नौकांतून खाडी पार करून आम्ही सर्व राजनगर कुशस्थली द्वीपावर आलो. काही अंतर चालल्यावर समोर आलं, ते पूर्वेचं प्रचंड उंचच उंच सुवर्णी प्रमुख महाद्वार. चांगलं पाच पुरुष उंच होतं ते. किकराच्या भक्कम लाकडांनी बनविलेलं. सुवर्णवर्खी ताम्रपत्र्याचे जाड थर ठोकून ते कुसरदार जडविलं होतं. उन्हात तळपणारी त्याची झळझळ उघडचा डोळ्यांना काही सोसवत नव्हती. आपले सुवर्णी पंख विस्फारून आकाशात झेपावू बघणारा त्यावरचा डौलदार भव्य गरुडपक्षी लक्ष वेधून घेत होता. तो बाकदार तीक्ष्ण सुवर्णी नख्यांचा होता. आम्हा यादवांचं प्रेरक ध्वजचिन्ह होतं ते. ते बघणाऱ्याला द्वारातच धाकानं थोपविणारं होतं. त्यानं आपल्या मस्तकावर पूर्ण विकसित चंद्राची सुवर्ण प्रतिकृती लीलया पेलली होती. आम्हा सोमवंशी यादवांचं ते वंशचिन्ह होतं. उजव्या बाजूच्या द्वारावरच्या अर्धचंद्राजवळ लहानसर सुवर्णी तारका अरुंधती तळपत होती. हे वंशचिन्ह सोडून उरलेली महाद्वाराची जागा यादववीर हाताळत आलेल्या खड्ग, चक्र, गदा, त्रिशूल, मुसल, भृशुंडी, अग्निकंकण, शरचाप अशा शस्त्रांच्या सुवर्णी आकृतींनी व्यापली होती. गज, अश्व, वृषभ अशा प्राण्यांच्या चित्रांनी खोदली होती. आणि होय एक जोडकासेची निर्भय, शांत, सत्त्वशील पुष्ट गाय व तिच्याकडे तशाच शांतपणे बघणारा वनराज सिंहही दिसत होता.

आमचं निरीक्षण झाल्यावर असंख्य यादव द्वारपालांनी ते भव्य पूर्वद्वार उघडलं. समुद्रगाजेत मिसळलेली त्याची नादमय करकर मी नित्यासाठी टिपली. नकळतच मी माझ्या कर्मभूमीला वंदन म्हणून भुईला उजवा हात टेकविला. तो वक्ष व मस्तकी नेला. दादानंही नमस्कार केला. मय, विश्वकर्मा, गर्गांमागून त्या द्वाराच्या मळसूत्री सोपानानं शिरोभागी गेलो. इथं सुवर्णी तटबंदीतच नेत्राकारात खोदलेलं उजवं गवाक्ष मुनिवर गर्गांनी उघडलं. डावं गवाक्ष मयानं खोललं. त्याची माहिती देताना दोघंही क्रमशः म्हणाले, “आपल्या राजनगराला असलंच तर काही आक्रमणाचं भय केवळ या पूर्व दिशेकडूनच आहे. इतर तीन दिशांना तर जलसंपन्न पश्चिम सागरच आहे, संरक्षणार्थ पसरलेला. दक्षता म्हणून या पूर्व दिशेची टेहळणी करण्यासाठी हे दोन डोळेच आहेत या राजनगराचे. इथून दहा योजन घेराचा सागर व भूमीचा आसमंत एकाच दृष्टिक्षेपात येतो.” ते ऐकताना मी मयाची त्याच्या कल्पकतेसाठी पाठ थोपटली आणि त्याला चक्रावून टाकणारा दुसराच विचार दिला. म्हणालो, “याच्याबरोबर उलट दिशेला पश्चिम महाद्वारही असणारच. तिकडून सागरावर दृष्टी ठेवण्यासाठी योग्य जागा निवडली पाहिजे. द्वीपावर नव्हे, सागरातच एखादा भक्कम पाषाण शोधून.”

“मी नाही समजलो स्वामीन्. सागरात? स्तंभ?”

“तो कशासाठी धाकटया?” दादाचं कुतूहलही जागं झालं.

“दादा, आम्हा यादवांचं हे केवळ नवं राजनगर असणार नाही. तू विसरला असशील, पण मी नाही विसरलो. कालयवन आला तो याच समुद्रमार्गानं. हे नगर नवं जलसेनादल निर्माण करून रक्षावं लागेल. सागराच्या पार पश्चिमेलाही काही जनपदं आहेत. त्यांच्याशी संपर्क साधण्यासाठी हे नगर बंदर म्हणून नांदतं करावं लागेल! इथं समुद्रमार्गे येणाऱ्या नौकांना या बंदराचा माग देण्यासाठी एक प्रकाशस्तंभ उठवावा लागेल. त्या स्तंभावर सूर्यास्तानंतर रात्रभर करंजेलाचा पुरुषभर उंचीचा जळता टेंभा सतत तेवत ठेवण्याची दक्षता घ्यावी लागेल. दिवसा तर त्याचा सुवर्णी कळस दूरवरूनही सूर्यकिरणांत तळपताना दिसेल.”

माझं ते बोलणं ऐकून सोबतचे दादा, उद्धव, गर्गमुनी, विश्वकर्मा मय सगळेच कुठंतरी खोलवरच्या विचारात डुंबले गेले. मीही एका विचारात गढून गेलो. या पूर्वेच्या महाद्वाराचं शोभेलसं नाव काय घोषित करावं, इथल्या पहिल्या राजसभेत?

मी डाव्या हाताच्या सुवर्णी कळसावर केशरी पताका मिरविणाऱ्या भव्य मंदिराकडे समाधानानं बघितलं. ते आम्हा यादवांच्या कुलदेवता इडादेवीचं सुवर्णमंदिर होतं. मथुरेत असलेल्या पाषाणी मंदिरापेक्षा कितीतरी भव्य. सर्वांसह मी, उद्धव व दादा त्या मंदिरात गेलो. गर्भगृहातील शस्त्रधारी दशभुजा देवी इडा बाहेरच्या चौकातूनही स्पष्ट दिसत होती. अद्याप मंदिराची सविध प्रतिष्ठापना झालेली नव्हती. त्यामुळे मान म्हणून सर्वांनी बाहेरून उभ्यानंच देवीला हात जोडले. आतल्या सुंदर कोरीव कामाचे स्तंभ व कमानी बघत तिला प्रदक्षिणा घातली. पुजाऱ्यानं दिलेल तीर्थ ओठांआड केल.

नंतर प्रशस्त गोशाळेकडे बघत गर्गांना प्रश्न केला, “आणखी किती महाद्वारं आहेत या नगराला महर्षी?” गर्ग उत्तरले, “अशी आणखी तीन दिशाना तीन प्रमुख महाद्वारं आहेत, आर्य. प्रत्येक महाद्वारांत उपद्वारंही आहेत. शिवाय द्वीपाची रचना ध्यानी घेऊन ठिकठिकाणी आणखीही छोटी-छोटी द्वारं ठेवली आहेत." इथंसुद्धा गोशाला सुरचित बांधलेल्या पाहून समाधानानं मी मुनिवर, मय, त्वष्ट्ट, विश्वकर्मा आणि भोवतीच्या

कारागीर प्रमुखांना विचारलं, “गौळगोठे उठविलेत हे छानच झालं, पण गोधनाच्या चराईचं काय?” तसं आमच्या मेळातील एक गोपयादवप्रमुख कितीतरी उत्साहानं म्हणाला, “त्यासाठी तटबंदीच्या खंदकाबाहेर चराऊ कुरणं आहेत महाराज. तीही कमी पडली तर नौकांतून आम्ही आमचं गोधन सौराष्ट्राच्या भूमीवर उतरवू शकतो.” मला त्याचं कौतुक वाटलं.

“खंदक कसा काय पार करणार रोज हे गोधन?” मी विचारलं. “त्यासाठी चांगले रुंद तरते लाकडी पूल उठविलेत आम्ही.” एक कुशल काष्ठकार गोपयादवप्रमुखानं पुढे होत माहिती दिली.

मी समाधानानं हसलो. दादाकडे बघत डोळे मिचकावून तटदलपतींना दुसरा प्रश्न केला, “पाण्याचे खंदक काय याच तरत्या पुलावरून कुण्या शत्रूलाही सहज पार करता येतील असेच असतील!”

मुळीच नाही. तसं आलंच शत्रुसैन्य चालून, तर हे तरते पूल काढून घेण्याची व्यवस्था आहे. त्यामुळे या द्वीपाचा संपर्कच तुटतो जगाशी! शिवाय खाऱ्या पाण्यानं तुडुंब भरलेला हा खोल नि रुंद खंदक सुरक्षित आहे. त्यात ठायी-ठायी काटेरी जलवेलींची जाळी पसरलेली आहे. तसंच समुद्रातून पिटाळून आणलेल्या विशालकाय विक्राळ सुसरी, मगरी खंदक आणि समुद्र यांच्यात लोहजाळ्या टाकून कोंडल्या आहेत. त्या पुन्हा समुद्रात परतूच शकत नाहीत! लोहजाळ्यांतून येणारे लहान मासे मटकावून खंदकातूनच सदैव फिरत असतात त्या. शिवाय यज्ञात उरलेले पुरोडाश आणि शिल्पकारांच्या भोजनातून राहिलेलं उच्छिष्ट त्यांच्यासाठी खंदकातच सोडलं जात. या विशालकाय मगरी, सुसरी आमच्या खऱ्या खंदक रक्षकच आहेत.” तटदलपतींनी वक्ष फुगवत माहिती दिली.

आता आमच्या समवेत सर्व प्रकारचे दलपती, कारागीरप्रमुख, निष्णात शिल्पकार, अनेक शस्त्रधारी सैनिक चालू लागले होते. आम्ही दक्षिणेकडील महाद्वारात आलो. या द्वाराच्या समुद्रकिनाऱ्यावरचे काळे कुळकुळीत पाषाण पांढऱ्याशुभ्र समुद्रफेसात अंगभर न्हाऊन निघताना फारच नयनहर दिसत होते. कितीतरी वेळा मी सर्वांसह तो समुद्रफेनवर्षाव बघतच राहिलो.

तेथून आम्ही पश्चिमेच्या महाद्वाराकडे चाललो. या द्वीपावर समुद्रवाऱ्यामुळे गजकाय ढगांतून मुसळधारांनी पर्जन्य कोसळणार होता, तो या पश्चिम दिशेकडूनच. इथं येताच समोर सागरात दूरवर दिसणाऱ्या एका कातळखंडाचा शिरोभाग तर्जनीनं अमात्यांना दाखवून मी सर्वांना म्हणालो, “त्या, त्याच पाषाणावर उभा राहील इथल्या बंदराचा प्रकाशस्तंभ.” भोवतीचे सर्व त्या विचारात गढलेले असताना दादानं नेमका प्रश्न घातला, “या पश्चिम द्वारावर समुद्राच्या प्रचंड पर्जन्याची धो-धो मारठोक होईल त्याचं काय धाकटया?”

मी दादाकडे बघत हसलो. अमात्य विपृथूंच्या खांद्यावर हात ठेवून उत्तरद्वाराकडे चालताना म्हणालो, “अमात्य, कुशतृणांचे उन्हात अंगभर तापून सुकलेले ढीगच्या ढीग पसरलेत द्वीपावर इतस्ततः! त्यांच्या भरगच्च झडचा बांधून घ्या. या पश्चिम द्वारावरच्या सुवर्णी गरुडाचे पंख त्या गवतझडच्यांनी वेळीच झाकून घ्या.” आता अखेरचं उत्तरद्वारही आलं होतं. ते द्वारच राणीकक्षाच्या द्वीपाला समुद्रातून जोडणार होतं. त्या द्वारातून समोरच्या सागरी आखाताकडे बघत मी कितीतरी वेळ आत्मलीन झालो. मी दादाला

म्हणालो, “समोरच्या दिशेनं दूरवर कुठंतरी उत्तरेकडे, कुरुक्षेत्राच्याही पलीकडे उंच-उंच गगनगामी हिमपर्वत आहे – हिमवान. योगीश्रेष्ठ शिवाचं निवासस्थान त्या पर्वतातच आहे – कैलास!”

“धाकट्या, तुला आठवतंय – बालपणी आपण यमुनेकाठी वाळूची शिवपिंडी हातांनीच सिद्ध केली होती ते?”

“आठवतंय तर. त्या शिवपिंडीवर आपण दोघांनी गोपसवंगड्यांसोबत दुग्ध अभिषेकाची लोटकीच लोटकी धारांनी अर्पिली होती.” सर्वांसमवेत चालता चालताच मी क्षणैक थांबलो. माझ्या अपेक्षेप्रमाणं इथं सुवर्णी, कळससंपन्न शिवालय होतंच. त्याच्या तळपत्या कळसाकडे बघताना माझं वक्ष एका मजेदार विचारानं भरून आलं. गोकुळात अभिरभानूंचं म्हणून आमचं दैवत होतं, शिव. मथुरेत आमची यादवांची कुलदेवता बाबांकडून समजली ती यज्ञीय इडादेवी इथंही होती. कल्पक गर्गमुनींनी या दोन्हींचीही या नगरात स्थापना केली होती. माझ्या मनाच्या पश्चिम द्वारावर कसल्यातरी अबोध पर्जन्याच्या धाराच धारा कोसळू लागल्या. शुभ्रधवल, अनावर. कुठंही सुदर्शनाचं मंत्रगुंजनही तरळून गेल. सोबतीच्या दादा, उद्धव, अमात्य गर्गमुनी, विश्वकर्मा, मय आणि अनेक दलप्रमुख, शिल्पकार, शस्त्रधारी सैनिक, यांनाही थोपवून मी धडाधड बोलतच गेलो, “पूर्वेच्या प्रमुख टेहळणी महाद्वाराचं नाव असेल ‘शुद्धाक्ष’ दक्षिणेच्या समुद्रफेसात न्हाणाऱ्या खडकांची साक्ष देणारं असेल, ते महाद्वार ‘पुष्पदंत’. सागर पर्जन्याची असह्य मार हसत सोसणारं असेल, ते पश्चिम महाद्वार ‘ऐंद्र’ नावाचं. शिवसाक्षी असलेल्या या उत्तर महाद्वाराचं नाव असेल ‘भल्लात.’”

मी बोलत राहिलो, “यादवगण हो! या द्वीपाचा मध्यभाग धरून राजवास्तूंच्या घेरात असलेली कळससंपन्न राजसभेची वास्तू समोर तळपताना दिसत आहे. अशी राजसभेची वास्तु अखिल आर्यावर्तात कुठल्याही महाजनपदात नाही. मी या राजसभेचं नाव योग्यवेळी घोषित करणार आहे – सुधर्मा! सर्व अर्थांनी नावाप्रमाणेच असेल ती. सर्व सुंदरांच आणि निखळ धर्माचं संरक्षण करणारी – सुधर्मा!! अद्याप मला आपल्या या राजनगरासाठी सुयोग्य नाव मात्र सुचलेलं नाही! लवकरच तेही सुचेल. राजसभेत योग्यवेळी घोषित करीन मी ते. चला तिकडेच निघू.”

उत्तरद्वारासमोरून जाणाऱ्या राजमार्गानं आम्ही राजसभेकडे पायीच चाललो. मार्गात ठिकठिकाणी पाणतुषारांच जलनृत्य करणारी कारंजी भेटली. कुठं डाव्या हाताला, तर कुठं उजव्या हाताला, वेगवेगळ्या डेरेदार वृक्षराजींची सुबक लावण केलेली होती. त्यांच्या मागे उंच जोत्यांच्या नानाविध वस्तूंच्या सलग, सुयोजित बाजारपेठा होत्या. त्यामागे कुंपणरक्षित उद्यानंही दिसली. अशा दोन उद्यानांमधल्या रिक्त जागेत कुठं शस्त्रागारं होती, कुठं कोशागारं, कुठं अश्वशाला, कुठं उष्ट्र, गजशाला होत्या. ते सर्व न्याहाळताना मी मयाला विचारलं, “इथल्या यादवांच्या व्यायामाच्या सरावाचं काय?”

तसं दादानंही त्याच्या आवडीचा प्रश्न केला, “इथल्या मल्लशाळा कुठं आहेत? गज झुंजीची क्रीडांगणं कुठं आहेत? यादव सैनिकांच्या अश्वस्पर्धेची क्रीडांगणं कुठं आहेत?”

तसं त्याचं समाधान करत गर्गमुनी उत्तरले, “त्यांची व्यवस्था दोन राजमार्गांमधल्या प्रशस्त मोकळ्या जागेत ठायी-ठायी केलेली आहे. एक क्रीडांगण तर सांडांच्या जोड्यांच्या लढतीसाठीही राखीव ठेवलं आहे.”

“दूर पश्चिमेकडे तर एक कुंपण कुक्कुटांच्या झोंबीसाठीही राखलं आहे.” एक उत्साही लोहकार यादव माहिती देत मध्येच म्हणाला. आम्ही राजसभेच्या पूर्वाभिमुख द्वाराशी आलो. समोर मंडलाकृती वर चढत गेलेल्या काही सुवर्णी पायदंड्या होत्या. माझ्या कर्मभूमीतील कर्मवास्तूत आता जीवनभरचा माझा कर्मयोग रंगणार होता, तो इथंच. मी यादवांच्या त्या नव्या महाजनपदाच्या राजसभेच्या प्रथम सुवर्णी पायदंडीला दोन्ही हातांची बोटं टेकवली. ती वक्षाला व मस्तकाला भिडविली. दोन्ही हात जोडून भावमय नमस्कार केला. पुढे झालो. राजसभेच्या प्रशस्त मंडलाकृती रचनेकडे बघताना मीही क्षणैक दिपून गेलो; स्तब्धच झालो. सगळीकडे सारं कसं झळझळीत होतं. सुवर्णमय, दीप्तिमान. समोरच्या पश्चिम दिशेला तेच आमचं डौलदार राजचिन्ह दिसत होतं. सुवर्णी झळझळीत पूर्ण चंद्र लीलया मस्तकी पेललेल्या, पंख विस्फारलेल्या, विशाल सुवर्णी गरुडाचं उड्डाणाच्या पावित्र्यात असलेलं.

त्याच्या वक्र नख्यांना मस्तकांची टोकं भिडावीत, अशी दोन कितीतरी उंचावरची सर्वोच्च भव्य सुवर्णी सिंहासन होती. ती होती महाराज आणि महाराणींची. माझ्या आई-बाबांची! ती प्रशस्त, सुवर्णी, दोन्ही हातबैठकीच्या ठायी जबडे पसरलेल्या मृगेंद्राच्या आकृतींची होती. या दोन्ही सिंहासनाचा असा एकही कोपरा नव्हता की, ज्याच्यावर सुबक कोरीव वेलबुट्टी व राजचिन्हं कोरलेली नव्हती. या दोन्ही सिंहासनाच्या चरणासनांजवळ येतील अशी आणखी दोन थोडी कमी उंचीची, कमी विस्ताराची आसनं होती. ती होती युवराज-युवराज्ञींची. माझ्या प्रिय दादा-वहिनींची. त्याखाली थोडंसं उजव्या हाताशी हातबैठक नसलेलं, मृगाजिन अंथरलेलं आसन होतं, केवळ लाकडी पाठीचं. हे होतं राजआचार्य सांदीपनींचं आसन. असलंच एक डाव्या हाताशी आसन होतं ते गर्गमुनींचं – राजपुरोहितांचं. त्यांच्या थोडं खाली उजव्या हाताशी पाच व डाव्या हाताशी पाच असं दहा मंत्रिगणांच्या आसनांचं मंडल होतं, त्याच्या मध्यभागी थोडंसं उंचावर इतरांहून थोड्या मोठ्या आकाराचं आसन होतं, ते अमात्यांचं – विपृथूंचं होतं, त्याच्या उजव्या हाताशी यादवांचा दर्शनसुंदर, सुवर्णी रत्नजडित राजदंड ठेवण्याची उंच पाषाणी खोबण होती. राजदंडाच्या खालील टोकाला भिडणारी दुहातींची आसनं होती. पंचांगदल सेनेचे आमचे सेनाधिकारी दोन सेनापती यांची. सात्यकांचे पुत्र व शिनींचे पौत्र युयुधान तथा सात्यकी व अनाधृष्टी यांची. त्याखाली दुबाजूला अर्धमंडलाकृती लांबच लांब अशी आसनांची दीर्घ रांग होती. ती होती दूत, गुप्तचर, प्रमुख दलपती, कोशागार प्रमुख, शस्त्रागार प्रमुख, अश्वप्रमुख, गज व उष्ट्रदल प्रमुख, गोधन प्रमुख, दानप्रमुख अशी कितीतरी.

म्हटल तर महाराज वसुदेवबाबांच्या आसनाशी व म्हटलं तर युवराज बलरामदादांच्या आसनाशी समांतर अशी उजव्या बाजूशी, सर्व आसनांपासून पूर्णत: दूर, उंच, अलिप्त जाणवणारी अशी दोनच आसनं होती. कसलंही कोरीवकाम नसलेली, सुवर्णाचीच पण साधी. होय त्यातील उजव्या हातीचं आसन होतं माझं आणि त्याच्या डाव्या हातीचं माझ्या भविष्यात होणाऱ्या धर्मपत्नीचं! आता ते रिक्त होतं.

राजमंडळाच्या या आसनांची उतरंड बघणाऱ्याच्या मनात यादवांच्या ‘सुधर्मा’ राजसभेचा आदरयुक्त धाक निर्माण करणारी होती. या राजमंडळीत आसनांसमोर एक केवढातरी प्रशस्त चौक होता. तो होता स्त्री-पुरुष नगरजनांचा, अभ्यागतांचा, महाराजांकडे न्याय मागू बघणाऱ्यांचा, हीच तर खरी ‘सुधर्मा’ राजसभा होती. त्यांतही

पुरुषांसाठी वेगळे व स्त्रियांसाठी वेगळे कक्ष होते. राजसिंहासनाला समांतर डावे-उजवे सौध-कक्ष होते. ते होते इतर राजस्त्रियांचे कक्ष. त्यांना लागूनच इतर अतिथी स्त्रियांचे कक्ष होते.

तात्पर्यात सुंदराचं व धर्माचं संरक्षण करण्यासाठी सुयोग्य अशीच ही आमची भव्य राजसभा होती – सुधर्मा.

यांतील प्रत्येक आसनांची रांग मी दादा, उद्धवासह सावकाश फिरून पाहिली. या मंडलाकृती राजसभेत मय, विश्वकर्मा, गर्गांनी ठिकठिकाणी सशस्त्र उपरक्षकांचे चौथरेही ठेवले होते. पूर्वद्वाराशी उजव्या हाताला केवढंतरी मोठं गोलाकार असं एक समयतबक टांगलं होतं, त्याच्या शेजारीच एका खोबणीत प्रहरटोल द्यायचा लांबट हातोडा होता. दोन्ही मूळचे लोहाचे, आता सुवर्णी वर्ख दिलेले – सुवर्णीच झालेले. मी सर्वांसह इथं आलो. कुतूहल म्हणून खोबणीतला हातोडा उचलला. समोरच्या सागरलाटांकडे बघत त्याचा एक जोरदार प्रहार टांगल्या समयतबकावर उतरविला. ठऽण्णऽऽऽ!’ प्रहरनाद उठला. ‘काळ’ अंग झडझडून जागरला त्याच्या सावध स्वरलहरी दूरवर सागरगाजेला गाठण्यासाठी धावत गेल्या.

समाधानी प्रसन्न मनानं आम्ही सुधर्मा सभेतून बाहेर पडलो. भोवतीच्या महाराज, युवराज, राजगुरू, अमात्य, सेनापती अशा सर्वांच्या सुरचित वास्तू बघून शेवटी आलो माझ्या राजवास्तूत.

मला अपार कुतूहल व अमाप उत्सुकता होती ती मय, गर्गांनी उठविलेल्या इथल्या ‘कृष्णसोपाना’ची. या वास्तूत प्रवेशताच समोर दिसला तो सुवर्णी पायदंडचांचा झळझळीत मला हवा होता तसा लांब, केवढातरी प्रशस्त ‘श्रीकृष्णसोपान’. जवळ जात त्याच्या सर्वांत खालच्या सुवर्णी पायदंडीला खेटून मी उभा राहिलो. त्याच्या डाव्या हातीचा कठडा घट्ट पकडला. माझी दृष्टी पहिल्या पायदंडीपासून क्रमशः वर चढत गेली. अखेरच्या पंचविसाव्या पायदंडीला जाऊन भिडली. स्थिरावली. मी नकळतच जीवनाच्या खोलार्थात उतरलो.

‘किती! किती उंच चढावयाचा आहे, अद्याप जीवनाचा सोपान मला! किती-किती भेटावयाचे आहेत स्त्री-पुरुषांचे प्रकार या वळणा-वळणावर! किती-किती मागे पडली अशी वळणं! माझं प्राणप्रिय गोकूळ, तिथले बाबा, आई. काकू, आजोबा, सवंगडी, गोप-गोपी, एका आणि राधा. गोकूळ? छे – बालपण. माझ्याच का, प्रत्येकाच्याच जीवनाला नसतं का एक गोकूळ, त्याच्या-त्याच्या बालपणाचं?

आम्ही तो सुवर्णी सोपान चढून गेलो. वरचा विश्राम व शयनकक्ष डोळ्यांखाली घालून पुन्हा उतरलो. ती निवासी राजवास्तू. सर्व लहान-मोठे कक्ष, ओवऱ्या फिरून बघितल्या. त्या वास्तूबाहेर पडताना मयाच्या हातात समाधानानं मोतीकंठा देत म्हणालो, “मय महोदय, कुशस्थली पाहिली. पसंत पडली. तीळमात्रही यात कसलीही त्रुटी नाही. विशेष राजसभेत तुमचा यथासमय उचित गौरव करीनच. आता उदईक शेजारच्या शंखोद्धार जोडद्वीपावर जाऊन तेथील राणीकक्ष बघायचा आहे."

“आमचा त्या दिवशीचा निवास कुशस्थलीवरच झाला. दुसऱ्या दिवशी नेहमीच्या ब्राह्मी मुहूर्तावर उठून आम्ही आन्हिकं आवरली. सागरजलात कमरभर उभं राहून आम्ही तिघांनी आकाशमणी सूर्यदेवाला अर्घ्यं दिली. दोन्ही द्वीपं जोडणाऱ्या भूपट्टयावरून न जाता नौकांनी शंखोद्धार द्वीपावर आलो. इथंही कुशलस्थलीसारखी खंदक व तटबंदी

होती. याचा घेर मात्र लहान होता. राणीकक्षाच्या या द्वीपालाही चार महाद्वारं होती, पण ती कुशस्थलीच्या महाद्वाराएवढी प्रशस्त नव्हती. इथंही अनेक प्रकारच्या शाला उठल्या होत्या. गोधनांच्या गोशाला व त्यांच्यासाठी रक्षित चराऊ कुरणं होती. पश्चिम पुळणीच्या तटबंदीजवळ निसर्गत:च असणाऱ्या पाषाणांना बैठकांचे आकार दिले होते. या द्वीपाच्या मध्यभागीही चौथऱ्यावरच्या ध्वजस्तंभावर यादवांची गरुडध्वजा फडफडत होती.

विशेषत: या द्वीपावरची रथशाला मात्र प्रशस्त होती. दोन्ही द्वीपांना जोडणारा भूमार्ग निरुंद होता. अर्ध्या योजनाचा. या मार्गाची लांबी होती, पंचवीस-तीस योजनं. या मार्गात रथ आणि अश्व यांनीच या द्वीपांना एकमेकांशी संपर्क साधणं शक्य होतं. जलातून साधायचं म्हटलं तर नौका, तरफा अशा उदक वाहनांनीच ते शक्य होतं, दोन्ही मार्गांचा वापर सुरूही झाला होता. राणीकक्षातील प्रमुख वास्तू आठ होत्या. समोरासमोर चार अशा. त्या फिरून बघताना मी नेहमीच्या खोचकपणे मुनिवर गर्गांना विचारलं, "या वास्तू नेमक्या आठच का?" ते काही काळ थांबले. मग पांढऱ्याशुभ्र दाढीभर सौम्यसं हसत म्हणाले, "यादवराज महाराजांची येणारी धर्मपत्नी जरी एक असली, तरी तिच्या कीर्तीचा सुगंध नक्कीच आठही दिशांना पसरेल! या आठ वास्तु म्हणजे त्याचं प्रतीक आहेत!" मी चक्रावून त्यांच्याकडे बघतच राहिलो.

बलरामदादाचा राणीकक्षही आम्ही फिरून बघितला. ती रात्र याच द्वीपावर रहिवास करून होतो. दुसऱ्या दिवशी आम्ही तेथूनच परस्पर मथुरेला परतलो.

आता वसुदेवबाबांच्या राज्याभिषेकाची आमंत्रणं आर्यावर्ताच्या देशोदेशी सुटली. गोकुळातले माझे नंदबाबा, यशोदामाता, एकानंगा, राधा व सर्वांना पाचारण करण्यासाठी मी पुन्हा उद्धवालाच पाठविलं. मात्र तो भावगंधित नकार व काही भेटवस्तू घेऊन परतला. यशोदामातेनं असं म्हणत नकार दिला होता की, "एवढ्या वर्षांनंतर तुला बघितल्यावर आम्हाला गोकुळाकडे परतावसंच वाटणार नाही. तू मथुरा सोडली आहेस, तसं काही आम्ही गोकूळ कायमचं नाही सोडू शकत. तूच ये तुझ्या सोईनुसार एकदा गोकुळाला. तोवर आम्ही आमच्या मनाच्या कुपीतल्या गोपाळकृष्णाला रोजच भेटत राहू!" मथुरेत मात्र झाडून साऱ्या मथुराकर यादवांनी मथुरा सोडली. अगदी मोजकेच मागे राहिले. राज्याभिषेकाची सर्व सूत्रं आचार्य काश्यप सांदीपनींनी हाती घेतली. सुवर्णी महाद्वारं आणि राजवास्तू, तटबंदी यांनी झळझळणारं कुशस्थली द्वीप नानाविध फुलमाळांनी सुगंधित झालं. आंबवतीच्या तोरण, कमानींनी नटलं. प्रथम आई-बाबांच्या हस्ते जमलेल्या देशोदेशींच्या ऋषिमुनींच्या समक्ष सांदीपनी व गर्गांनी राजवास्तूचं पुण्याहवाचन व स्वस्तिवाचन केलं. मंदिरा मंदिरात दैवतांची सविध प्रतिष्ठापना झाली. त्यासाठी तबकं भरभरून दानं वाटण्यात आली. मग वाद्यांच्या गजरात राज्याभिषेकाच्या विधींना प्रारंभ झाला. काशी, प्रयाग, अहिच्छत्र, कुरुक्षेत्र, पंचनद, हृषिकेश अशा कितीतरी क्षेत्रांहून आलेल्या तपसंपन्न ऋषिमुनींच्या मंत्रघोषात नेमक्या सूर्योदयाच्या मुहूर्तावर अभिषेकविधींना प्रारंभ झाला. आजवर माझ्या खूप-खूप सोशिक माता-पित्यांनी अनेकदा आपल्या नेत्रजलाचा अविरत अभिषेक भूमीवर केला होता. आज विधीपूर्वीची उपोषणं केल्यामुले दोघेही थोडे कृश झाले होते. मात्र वसुदेवबाबा व देवकीमाता दोघांच्याही चर्या आज अनुपम, अपार, अजोड तेजानं तळपत होत्या. शांत-

शांत कृतार्थतेचं अव्यक्त समाधान त्यांच्या वत्सल नेत्रांतून मूकपणे ओसंडत होतं,

सूर्योदय झाला. त्याच्या पहिल्याच किरणांनी यादवश्रेष्ठ वसुदेव महाराज व महाराज्ञी देवकीदेवी यांचा वाकून चरणस्पर्श घेतला. तसे शेकडो ऋषिमुनींच्या विमल कंठांतून देववाणीतील वेद मंत्रघोषांचा अविरत कल्लोळ उठला. पंचप्रमुख पुरोहितांनी आर्यावर्ताच्या गंगा, सिंधू, यमुना, नर्मदा, कावेरी अशा पावन नद्यांच्या जलांचा सुवर्णकुंभांतून आई-बाबांच्या मस्तकी अभिषेक केला. पाठोपाठ दुग्ध, मधु, सुवर्णजल, कमलजल, चंदनजल अशा पंचपवित्र जलांचा अभिषेक केला. आर्यभूमीच्या तिन्ही अंगांना संरक्षक कडं टाकलेल्या तिन्ही सागरजलांचा अभिषेक झाला. पुन्हा समाप्तीचा सप्तसरिता जलांचा सांगता जलाभिषेक झाला. बाबा-आईंनी झळझळीत राजवस्त्रं व अलंकार परिधान केले.

माझ्या प्रिय बलरामदादाला युवराज म्हणून व रेवती वहिनींना युवराज्ञी म्हणून असेच अभिषेक विधी झाले. त्या दोघांनीही झळझळीत राजवस्त्रं आणि अलंकार परिधान केले. मीही उद्धव व सर्व चुलत, मामे भावंडांसह अभ्यंग स्नान व इतर आवश्यक ते विधी केले. नित्याचं सोनपीतांबर कसलं. त्यावर निळ्या शेल्यात माझा प्रिय पांचजन्य होताच. मस्तकी मोरपीसधारी मुकुट घेतला. कंठी कौस्तुभमणीधारी मौक्तिक मालेवर वैजयंतीमाला चढवायला विसरलो नाही. वक्षावर सोनवर्खी लोहकवच धारण केलं. खांद्यावर अजितंजय शरचाप घेतला. कमरेला नंदक खड्ग आवळलं. हाती कौमोदकी गदा घेतली. उद्धवानं एक उत्फुल्ल काषाय कमल माझ्या हाती दिलं.

सांदीपनी आणि गर्गांनी काढलेला मुहूर्त अगदी तोंडावर आला, तसं बाबांच्या राजवास्तूतून आम्ही सुधर्मा राजसभेकडे चाललो. सर्वांत पुढं होते, सुवर्णी राजदंड उजव्या हाती पेललेले अमात्य विपृथू. त्यांच्या मागं होते आचार्य सांदीपनी, गर्ग व अनेक ऋषिमुनी. त्यांच्या पाठीशी यादवी पागोटं परिधान केलेले बाबा व राजअंशुकाचा पदर पेललेली आमची थोरली देवकीमाता. त्यांच्या पाठीशी होते, आमच्या धाकल्या रोहिणी मातेसह युवराज, युवराज्ञी – बलरामदादा, रेवतीवहिनी तेही तशाच वेषांत. त्यांना पाठबळ देत मी चाललो होतो. माझ्या उजव्या हाताशी उद्धव, त्याचे बंधू चित्रकेतू, बृहद्बल आणि कितीतरी चुलतबंधू, मामेबंधू, मावसबंधू होते. माझ्या डाव्या हाताशी होते सात्यकी, अनाधृष्टी, अक्रूर सत्राजित, विकद्रू असे राजमंडळातील कितीतरी प्रमुख.

सुधर्मा सभेच्या पूर्व द्वारातून आमचं राजमंडल आत प्रवेशलं, तसं चौघडे, नगारे, दुंदुभी, तुताऱ्या, रणहलग्या, ढोल, मृदुंग यांचा एकत्र संमिश्र वाद्यकल्लोळ उठला. पाठोपाठ माझ्या प्राणप्रिय आई-बाबांवर वेडावलेल्या हजारो, लाखो, दुहातींच्या यादवांनी रानफुलांचा, उद्यानफुलांचा, सुवर्णफुलांचा, प्राजक्तफुलांचा ओंजळी ओंजळीनं वर्षाव केला. रक्तवर्णीय आस्तरणाच्या पायघड्या तुडवत-तुडवत आमचं सर्व राजमंडळ पूर्वेच्या राजवेदीपर्यंत पोहोचलं. पंचपुरोहितांनी मार्गदर्शन केलं. तसं माझ्या बाबांनी उजवं पाऊल हलकेच चरणासनावर सिंहासनाला पदस्पर्श होणार नाही याची दक्षता घेत ठेवलं. सावध आकर्षक राजबैठक घेतली. पाठोपाठ देवकीमातेनंही त्यांचं अनुकरण करीत तशीच बैठक घेतली. तसं उभ्या सुधर्मा राजसभेचा कानाकोपरा अविरत झडणाऱ्या टाळ्यांच्या कडकडाटांनी दुमदुमून गेला.

राज्याभिषेकाचा मुहूर्त आता अगदी काही पळांवर आला, तसं पंचपुरोहित प्रमुखानं पुढे होत, वसुदेवबाबांच्या मस्तकीचं पीळदार यादवी पागोटं उतरवलं. शेजारी उभ्या असलेल्या तबकधाऱ्याच्या तबकात ठेवलं. आता प्रमुख अभिषेक सुरू झाला. पंचपुरोहितांच्या मुखांतून स्वच्छ उच्चारांत अखंड मंत्रघोष सुरू झाला. त्यांच्या पूर्वजांनी मुखोद्गत केलेल्या वेदांतील राजधर्माचं यथासांग गुणगान करणाऱ्या ऋचा धबधब्यांसारख्या अखंड स्त्रवू लागल्या.

चारही द्वारांजवळ सुवर्णी घंगाळात शिवमुहूर्ताची घटिकापात्रं ठेवली होती. राज्यारोहणाच्या मुहूर्ताचा अचूक क्षण पकडत ती प्रचंड सुवर्णी घंगाळजलात 'डुब्ब' करत एकाच क्षणी डुबली. तंस चारी द्वारावरच्या समय तबकांवर प्रचंड ताकदीचे हातोडी प्रहार समयपालांनी एकाच वेळी उतरविले. त्यांचा एकरूप झालेला एकच संमिश्र प्रचंड नाद निनादला – 'ठऽऽणऽऽणणऽऽ.' तिकडे राजवेदीजवळ त्याच क्षणाला पंचपुरोहितांनी दश हातांनी राजकिरीट उचलला. यादवांचा परपंरागत विशेष कुसर कोरलेला मंडलाकृती पार्श्ववलय असलेला तो सुवर्णी भव्य राजकिरीट हलकेच माझ्या बाबांच्या कृष्णधवल केशधारी मस्तकी चढविला. पाठोपाठ त्यांनीच लहानसर आकाराचा, स्त्री चर्येला शोभेल असा महाराज्ञींचा अटकर, सुवर्णी राजकिरीट माझ्या थोरलीच्या – देवकीमातेच्या मस्तकी चढविला. ते बघताच माझ्या नेत्रकडांवर एरवी कधीही न दिसलेले दोन यादवाश्रू झरझरत एकवटले.

पाठोपाठ असेच अभिषेक झाले. युवराज-युवराज्ञींचे. तदनंतर राजपुरोहितांनी अमात्य म्हणून विपृथूंचं नाव घोषित केलं. पाठोपाठ खोबणीत बसविलेला यादवांचं कुलभूषण असलेला हिरे, रत्नजडित उंच, सुवर्णी राजदंड विधिपूर्वक त्यांच्या हाती दिला.

आता पुरोहितांचं धर्मकार्य संपलं. ते आपापल्या स्थानावर आरूढ झाले. आता राजसभा अमात्यांच्या राज्याधिकारात आली. त्यांनी हातचा राजदंड उंच उठविताच संपूर्ण राजसभा उत्थान देण्यासाठी उठली. दंड खाली येताच पुन्हा यंत्रवत बसली. वयस्क, अनुभवी, उंचशील अमात्य विपृथू आपल्या खणखणीत अधिकारवाणीत धीरगंभीर बोलले, "यादवजनहो! आमंत्रित अभ्यागत सुहृद जनहो! आता यादव कुलप्रमुख श्रीकृष्णांच्या हस्ते द्वारका राजनगरीचं सुंदर निर्माण करणाऱ्या स्थापत्यविशारद मय, त्यांचे सहकारी विश्वकर्मा, गर्ग त्वष्ट या सर्वांचाच गौरव करण्यात येईल."

मी हसलो. राजमंडळात बसलेल्या उद्धवाकडे बघितलं. प्रिय दादा, वहिनींना, थोरली, बाबांना, सौधात बसलेली धाकली यांना मनोमनच वंदन केल. उठलो, घोषित केलेल्या स्थापत्यविशारदांना उंची मानवस्त्रं आणि अलंकारतबकं देऊन प्रथम गौरव केला आणि बोलू लागलो, "माझ्या समस्त प्रिय यादव स्त्री-पुरुषजनहो! अतिथींना आम्ही देवच मानतो. यासाठी यादवांच्या अभ्यागत अतिथी जनहो, माझ्या खूप सोसलेल्या, पराकाष्टेच्या अवमानित प्रिय यादवबंधूंची आज स्वतंत्र राजनगरी व वास्तू उभी राहिली याचा मला परमानंद होत आहे. हे त्यांनी युगानुयुगं उराशी बाळगलेलं एक दिव्य स्वप्न होतं. सागरदेवतेच्या आशीर्वादानं, अठरा कुलांतील कोटयवधी यादव बंधूंच्या अतिशय अथक, कुशल कर्मयोगाच्या परिश्रमांतून हे राजनगर उभारलं गेलंय. मला त्याचं स्वागत करताना वक्षात मावत नाही असा व शब्दांत पकडता येत नाही असा, आनंद झालाय.

“प्रथमत: या नगराच्या चारी महाद्वारांची नावं मी अधिकृतपणे घोषित करतो. पूर्वेकडचं आहे ते ‘शुद्धाक्ष’, पश्चिमेकडचं आहे ते ‘ऐंद्र’, दक्षिणेकडचं आहे ते ‘पुष्पदंत’ आणि उत्तरेकडील द्वाराला आपण ‘भल्लात’ म्हणणार आहोत. आम्हा यादवांच्या या राजनगराचं मला सुचतंय ते सुयोग्य नाव आहे द्वारावती – द्वारिका – द्वारका!!

“प्रिय भ्राते यादवजनहो! आर्यावर्तात असलेल्या सोळा महाजनपदांपैकी प्रमुख प्रतिनिधी आज इथं आलेत, काही आलेले नाहीत. मला माहीत आहे, जे आलेत ते महाराज वसुदेवांसाठी. आम्हा यादवांसाठी अमोल उपहार घेऊन त्याहून मौलिक सदिच्छांसह आलेत. आम्हा द्वारकाकरांना भविष्यात सर्वांशीच प्रेमानं आणि मनमोकळं या सागरकिनारी नांदायचं आहे. माझा पूर्ण विश्वास आहे तो, ‘प्रेम’ या एकाच विश्वसत्यावर.

“सर्वांच्या साक्षीनं, वसुदेव महाराजांच्या अनुज्ञेनं मी या राजनगराचं नाव घोषित केलं आहे. मला अपेक्षित आहे आर्यावर्त आमच्या या द्वारकेला सतरावं महाजनपद म्हणून अवश्य मान्यता देईल. या नगरात सर्वांच स्वागत होईल.”

एव्हाना सुवर्णी द्वारकेतील पहिल्याच राज्याभिषेकाचा साक्षीदार आकाशमणी सूर्यदेव मावळतीला आला होता. रैवतक, काशी, कोसल, कुरू, अवंती, अश्मक, पांचाल, विदेह, सिंधु-सौवीर, शिबी-उशीनर, दार्व-अभिसार कांबोज, गांधार अशा महाजनपदांकडून आलेल्या राजदूतांनी आपापले उपहार महाराज वसुदेवांना अर्पण केले. जरासंधाच्या मागधांकडून, शिशुपालाच्या चेदींकडून, तसंच शाल्व, दंतवक्र आणि विशेष म्हणजे राजा भीष्मकाच्या कौंडिण्यपुराहून काहीही आलेलं नव्हतं. दक्षिणेकडच्या वनवासी, कौंचपूर, पद्मावत, महिष्पती, पुरिका, रत्नद्वीप, हरीत या आमच्याच यादव राजांचे उपहार विशेष होते. त्यात सुवर्ण, चांदी, रत्नं, हिरे, माणकं, वैदूर्य विपुल होतं. नीलमणी, ताम्र, लोह, शीस असे धातू व मधाचे आणि मद्याचे बुधले होते. तसेच वनौषधींच्या कल्पाचे बंदिस्त कुंभही होते. निरनिराळे कोशागार प्रमुख सालंकृत गज, सजलेले अश्व-उष्ट्र, सुलक्षणी-जोडकासेच्या गाई, पुष्ट अनावर सांड, चपळ अशी विविध जातीची तेजवंत शिकारी व रक्षक कुत्री अशा चराचर संपत्तीची प्रतवारी लावण्यात गढून गेले. ओदन, सत्तू, वरी, गोधून, नागली अशी धान्य कोठारांत सुरक्षित करण्यात आली. जरीबतूचे व मऊ रेशमी वस्त्रांचे ठाण वस्त्रागारात प्रतवारीने रचण्यात आले. कोटचवधी यादवांच्या द्वारका या महाजनपदाचं मंत्रिमंडळ दहा सशक्त, यादव पेलून धरणार होते. त्यात उद्धवाचे पिता वयस्क, अनुभवी सात्त्विक प्रेमळ व जाणते देवभाग होते. देवश्रवस व विकद्रू या राजनीतीकुशल ज्येष्ठांचं सर्वांनी मार्गदर्शन लाभणार होतं, यात हार्दिकाचे पुत्र महारथी कृतवर्मा तथा हार्दिक्य होते. आहुक व सत्यक होते. महापराक्रमी सत्राजित आणि सत्यवान होते. अमात्य विपृथूंचे वृद्ध व कुशल पिता चित्रक, तसेच अक्रूर होते.

त्या दिवशी सायंकाळी उद्धवाला संगती घेऊन मी पश्चिमेचं ऐंद्रद्वार पार केलं. सागरपुळणीवर आलो. दारुक व रथ मागेच राहिला. पश्चिम सागराला भिडलेल्या समोरच्या अथांग आकाशात तांबसर गुलाबी ढगांची लांबच लांब रांग पसरली होती. मी ती स्वत:ला हरवून एकटक बघतच राहिलो. तसं उद्धव म्हणाला, “एवढं काय बघतोस स्वत:ला हरवून त्या रंगीत आकाशाकडे दादा?” त्याच्याकडे हसून बघताना मी उत्तरलो, “तुझ्याच वर्णाचं आहे आज आभाळ म्हणून!”

तोही काही कमी नव्हता. म्हणाला, “आमच्यासारखे वेडे त्या ढगांमागे असलेल्या शाश्वत निळाईला निरखण्यासाठी सदैव आसुसलेले असतात!”

तो कुठं चाललाय हे मी ओळखलं. मलाही त्याला दूर आडवळणात न्यायचं होतं. मी समोरच्या कोळी यादवप्रमुखाला हाकारलं. तो आपल्या सोबत्यांसह सागरातून नुकत्याच आणलेल्या मत्स्यांच्या वेतटोकऱ्या होड्यांतून किनाऱ्यावर उतरवण्यात गढला होता. हात जोडून नम्रपणे पुढे होत तो म्हणाला, “आज्ञा महाराज.” मी हसत त्याला म्हणालो, “तुम्ही चार-पाच जण होड्या घेऊन पुन्हा आत परताल? जलडुब्या घ्याल? पोटात मोती वागवणारे बरेच शिंपले बाहेर घेऊन एकत्र कराल?”

“जशी इच्छा यादवराज.” त्यानं कसलीही अडचण उभी केली नाही. एव्हाना त्यांच्याभोवती जमलेले सर्वच कोळीयादवही मला अतिशय प्रेमानं वंदन करून त्यांच्याबरोबर जायला हिरिरीनं तयारही झाले. चांगल्या दहा-पंधरा होड्या पुन्हा समुद्रात घुसल्या.

त्या धाडसी यादवपथकानं सूर्य पूर्ण डुंबायच्या आत कितीतरी शिंपले गोळा करून, स्वच्छ धुऊन वेतटोकऱ्यांतून माझ्यासमोर रांगेत मांडले. मी ते राजवास्तूकडे नेण्याची त्यांना सूचना केली. उद्धवासह परतलो.

परतताना उद्धवानं नेमका प्रश्न मला घातलाच. म्हणाला, “दादा, वसुदेवबाबांचा आजचा राज्याभिषेक तर दृष्ट लागावी असा झाला. काही म्हटल्या काही खटकलं नाही कुणालाही. केवळ मीच तुला विचारतोय. तुझ्या डाव्या हातीचं रिक्त आसन कधी भरणार तू? कोण आहेत आमच्या त्या – आम्ही न पाहिलेल्या भाग्यवंत आदरणीय वहिनी?”

लवकरच सुवर्णी द्वारकेतील आम्हा यादवांचं महाजनपद नांदतं झालं. सैनिक, गोपसेवक, शिल्पकार, नागरिक यादव दोन्ही द्वीपांवर आता सहज ये-जा करू लागले. मंदिरामंदिरात उठणारे घंटानाद समुद्रगाजेत मिसळू लागले. माझा अधिक तो रहिवास राजसभेच्या लगत असलेल्या वास्तुत होता. इथल्या सुवर्णी सोपानावरच्या विश्रामकक्षात मी राहू लागलो. सेवेत होता प्रिय उद्धव. एके दिवशी तो व अमात्य एका मध्यमवयस्क, कृश व दाढीधारी ब्राह्मणाला घेऊन माझ्या विश्रामकक्षात आले. तो ब्राह्मण दूरचा, कष्टकर प्रवास करून आल्याचं स्पष्ट दिसत होतं. त्याच्या अंगावरची मूळची नेटकी वस्त्रं जागजागी फाटली होती. मलीनही झाली होती. त्याचा मूळचा गौरवर्ण उन्हातान्हातून व पायीच प्रवास केल्यामुळे रापून, काळवंडून गेला होता. माझ्यासमोर येताच त्यानं अष्टांगी दंडवत घातला. मी त्याला खांदे धरून प्रथम उठता केलं. थोपटून अभय दिलं. खांद्यावरच्या उपरण्यात काळजीपूर्वक जपून ठेवलेली एक मऊ रेशमी वस्त्राची कसलीतरी थैली त्यानं माझ्या हातात दिली. पाठोपाठ त्रोटक म्हणाला, “महाराज श्रीकृष्णदेव, आमच्या राजकन्येचं अमोलं प्राणरक्षण आता केवळ आपल्याच हाती आहे. त्यांचं अनिच्छेनं स्वयंवर मांडलं आहे, त्यांच्या बंधू-पित्यानं. अगदी तोंडावर आलं आहे ते. आपण स्वत: तत्काळ ससैन्य निघावं. गाठावं आमचं विदर्भातलं कौंडिण्यपूर.”

कौंडिण्यपूर! ते नाव ऐकताच माझ्या हृदयाकाशात कितीतरी श्वेतवर्णी राजहंस फडफडून उठले. मी कधीच न पाहिलेली आंध्रभृत्य राजा भीष्मक व त्याची महाराणी शुद्धमती यांची कन्या रुक्मिणी माझ्या डोळ्यांसमोर तरळू लागली. काही एक शब्दांत न

पकडता येणारं कितीतरी कांडांचं भावरामायण माझ्या डोळ्यांसमोर क्षणात फडफडून गेलं. त्या फडफडीत कौंडिण्यपूर हे नगरनाम आणि रुक्मिणी हे नगरकन्येचं नाम मिसळलं. ही दोन्ही नावं ऐकताच माझ्या अंतर्मनात खोलवर रुजलेल्या सुदर्शनाचे पावन बोलही क्षणैक आपोआपच झंकारून गेले.

"नाव काय तुमचं?" मी त्या सत्शील सेवकाला विचारलं.

"मी 'सुशील' नावाचा ब्राह्मण. राजकन्या रुक्मिणीदेवी यांच्या नित्य धर्मकर्मातील पुरोहित." तो उत्तरला.

मी त्याला आसनावर बसतं केलं. माझ्या यादव सेवकानं त्याच्यासमोर फलाहार नि दुधाचा सुवर्णी चषक ठेवला. माझ्यासमोर काही भक्षण करायला तो संस्कारशील दूत कचरू लागला. मी पुन्हा खांदे थोपटून धीर देताच त्यानं फलाहार व दूध घेतलं. आता तो कितीतरी तरतरीत झाला. मी त्यांच्या राजकन्येच्या स्वयंवराची सर्व बारकाव्यानं माहिती घेतली. अमात्यांना दक्षता घेण्याची सूचना देऊन त्याला विश्रामासाठी त्यांच्या स्वाधीन केलं.

समरांगणावर यादवांना व मला नि दादाला पराभूत करणं आजवर शक्य न झाल्यामुले मागधांचा जरासंध तिढ्यात शिरला होता. कौंडिण्यपुराहून भीष्मकपुत्र रुक्मीला आपल्या राजनगर गिरिव्रजात पाचारण केलं होतं त्यानं. तिथं राजसभेत त्याला सुवर्णी मुठीचं कोटबंद खड्‌ग व प्रशस्त ढाल आणि भरजरी राजवस्त्रं प्रदान करून त्याचा राजसत्कार केला होता.

रुक्मी! माझी माहिती होती, तसा वर्णानं आमच्या उद्धवासारखा ताम्रवर्णी. स्वभावानं मात्र उतावीळ, शीघ्रकोपी दादासारखा – सात्यकीसारखा. तसाच पराक्रमीही. आपल्या भगिनीसारखाच सुंदर. त्याला आणखीही त्याच्यासारखेच चार बंधूही होते. रुक्मरथ, रुक्मबाहु, रुक्मकेश आणि रुक्ममाली या नावांचे. पिता भीष्मक तथा हिरण्यरोमन आता वृद्धत्वाकडे झुकू लागल्यानं तिथली सत्ता ज्येष्ठ पुत्र रुक्मीच्या शब्दांवरच चालत होती.

अशा रुक्मीला हाताशी धरून जरासंध आता माझ्यावर भावनिक कुरघोडी करणार होता. माझा आतेबंधूच असलेल्या शिशुपालाच्या शुक्तिमती राजधानीकडे त्यानं रुक्मीला धाडलं होतं, रुक्मीनं आपल्या भगिनीचं – रुक्मिणीचं पाणिग्रहण शिशुपालानं करावं, असा प्रस्ताव त्याच्यासमोर ठेवला होता. शिशुपालानं तो आनंदानं स्वीकारला होता. दोघांनी मिळून राजा भीष्मकाला विवाह मुहूर्तही काढायला भाग पाडलं होतं. ही सर्व सूत्रं राजधानी गिरिव्रजात बसून मगध सम्राट जरासंधानं दूरदेशीहून चातुर्यानं हलविली होती. त्याला भीष्मकांना पुत्रांसह उपकृत करून पुरतं आपल्या गोटात खेचायचं होतं. शिशुपालाचा गळ टाकून. यात विदर्भकन्या रुक्मिणीच्या इच्छेचा, मताचा त्यांच्या मते कुठं आणि कसलाही सुतराम प्रश्नच येत नव्हता! कारण ती एक स्त्री होती.

सुशीलनं हाती दिलेलं भूर्जपत्र मी एकांती वाचू लागलो. ते भूर्जपत्र नव्हतंच. होता मला न बघताच मनोमन मला वरलेल्या एका मनस्वी क्षत्राणी स्त्रीच्या हृदयाचा निर्वाणीचा आकांत. तिनं स्वहस्ते मयुरपिसाच्या लेखणीनं मुक्तपणे लिहिलं होतं.

'श्रुत्वा गुणान्भुवनसुंदर शृण्वतां ते।
निर्विश्य कर्णविवरैर्हरतोऽङ्गतापम्।
रुपं दृशां दृशिमतामखिलार्थलाभं।

त्वय्यच्चुताविशती चित्रमपत्रमं मे।।'

ती लिहीत होती, 'त्रिभवुनसुंदरा – श्रीकृष्णा, तुझे गुण जे ऐकतात त्यांच्या अंगचे त्रिविधताप क्षणार्धात नाहीसे होतात. त्यांचे जन्म कृतार्थ होतात, ज्यांनी तुझं रूप नयनांत साठविलेलं असतं. तुझी ही कीर्ती ऐकून मी लज्जारहित मनानं तुझ्याच चरणांचा ध्यास घेतलेला आहे. मी तरी याला काय करू सांग? जनाची आणि मनाची लज्जा तुझ्याच चरणाशी त्यागून हे पत्र मी तुला लिहीत आहे.'

तिचा हा पत्रारंभच माझ्या मनाची न तोडता येणारी पकड घेऊन गेला. ती याचत होती निखळ, निरपेक्ष प्रेम. मी तरी आजवर याहून वेगळं काय केलं होतं! यापुढे करणार होतो? निखळ, निरपेक्ष 'प्रेमयोग', हेच तर माझ्या जीवनाचं सार नव्हतं काय?

कुतूहलानं स्वत:ला विसरून मी ते पत्र पुढे वाचू लागलो. 'मधुसूदना, तुझं शील, कुळ, वय, तेज, धन, विद्या, रूप, सामर्थ्य, वाणी ही सर्वच केवळ अतुलनीय आहेत. तेव्हा नावासारख्या त्रिभुवनमोहन असलेल्या तुझ्या चरणी विवाहयोग्य झालेल्या माझ्यासारखीनं आपलं जीवनप्राजक्त समर्पित केलं, तर त्यात आश्चर्य ते काय!' तिनं माझ्या नावातील कृष्ण व श्रीकृष्ण दोन्हीही अचूक शब्दांत पकडले होते. तिच्या बुद्धिकुशलतेवर दाद म्हणून मी स्वत:शीच हसलो. वाचू लागलो, 'हे प्राणमोहना, काय हवं ते म्हण मला तू. तुला मी मनोमन वरलं आहे. त्यासाठी या वेळी जे आवश्यक व इष्ट असेल, ते वेळीच करताना यत्किंचितही हयगय करू नकोस!' तिच्या पत्रातील भावलालित्यानं चकित होऊन मी पुढे वाचू लागलो, 'तू मृगेंद्र आहेस. लक्षावधी यादवांचा वनराज आहेस. पण आपला वाटा चपळाईनं घेऊन जाण्यात तू यत्किंचितही अनमान केलास, तर त्याच्यावर शिशुपालरूपी कोल्हा केव्हाही तुटून पडणार आहे! मग त्याची लज्जा कोणाला राहील! कावळ्यांनी गरुडाचा वाटा पळवावा तसंच ते होणार नाही काय?"

कुठल्याही क्षत्रियाचा स्वाभिमान डिवचावा अशाच प्रभावी शब्दांचं भावपूर्ण योजन कौशल्यानं केलं होत तिनं. आता तिच्या सुंदरपणाबरोबर मला जाणवून गेलं ते तिचं तडफदार बौद्धिक सौंदर्य! वाचणाऱ्याला क्षणभर काही ती इकडे-तिकडे विचार करायला संधीच देऊ बघत नव्हती. ते जाणूनही मी स्वत:शीच हसलो. ती लिहीत होती, 'तुला पत्र पाठविण्याचं माझं हे केवढं औद्धत्य आहे, असंही तू म्हणशील. पण ते काय वाटेल ते का असेना, तुझ्यासाठी मी कुल, शील, सर्वस्वाचा त्याग करायला सिद्ध झाले आहे.'

आतापर्यंतच्या पत्रात असलेली बौद्धिक चमक तिनं पुढच्या मजकुरात शिगेला नेली होती. एखाद्या किशोराला त्यानं हुतुतू व सूरपारंब्यासारखा खेळ कसा खेळावा हे त्याच्या गुरूनं हात धरून शिकवावं तसाच हा भाव होता!! 'स्त्रियांतील चतुरा' ही तिच्या ठायी सर्व गुणांसह नांदत होती तर! ती लिहीत होती, 'तू विवाह समारंभात प्रवेश केल्यावर तिथं विघ्नं उपस्थित होईल, अशी तुला कदाचित शंका येईल, पण त्याविषयी तू नि:शंक राहा. विवाहाच्या आदल्या दिवशी सीमेवरच्या अंबिकेच्या दर्शनासाठी वधूनं सीमेवर जावं, अशी आमच्या भोजकुळाची प्रथा आहे. ज्या वेळी मी अंबिकेचं दर्शन घेण्यासाठी माझ्या सख्यांसहित तिथं येईन त्या वेळी तू रथ घेऊन तिथं उभा राहा! मी दर्शन करून मंदिराबाहेर येताच सर्वप्रथम मला रथात घालून हरण करून घेऊन जा!! मी मनोमन तुला वरल्यामुळे परस्त्री अपहरणाचा दोषही तुला लागणार नाही! तशी शंका घेण्याचंही तुला काहीच कारण नाही!' तिनं स्पष्ट सुचविलेल्या उपायानं तर माझ्या

गालावर खळीच खुलली! आता पत्राचा शेवट तिनं कसा केला असावा म्हणून मी पराकोटीच्या उत्सुक कुतूहलानं वाचू लागलो.

'कमलनयनाऽ ऋषिकेशा, एवढं करूनही माझी ही विनंती तू मान्य न करण्याचं ठरविलंस तर? तर हा वज्रलेखच समज की, मनमोहना, मधुसूदना तुझं स्मरण करीतच मी प्राणत्याग करीन. म्हणजे या नाही, तर पुढील जन्मी तरी तू माझाच प्राणसखा होशील. हे श्रीहरी-श्रीधरा-श्रीकृष्णा! प्राणाच्या ज्योती तेववून मी केवळ तुझीच वाट पाहत आहे. विसरू नकोस. एका क्षणाचाही विलंब केलास तरी आनंदकंदा, मुकुंदा, गोविंदा माझ्यासाठी जगबुडी आहे!! असशील तसा तत्काळ नीघ!'

माझ्या सोनकिरीटातील रंगदेखण्या मोरपिसाकडे बघत स्वत:ला हरवलेल्या उद्धवाला मी म्हणालो, "उधो, यादवांच्या राजसभेतील माझ्या डाव्या हातीचं आसन कुणाचं असं तू नेहमी विचारतोस. मानकरीण ही आहे. रुक्मिणी – तुझी वहिनी!" हातीचं भूर्जपत्र माझा भावविश्वस्त असलेल्या प्रिय बंधू उद्धवाकडे मी तसंच दिलं. त्यानंही ते मन:पूर्वक वाचलं.

"जा उधो, कामाला लाग. पत्रलेखक, राजदूत, अश्वदलपती यांना सत्वर पाठवून दे. उपहाराची काही तबकंही कोषागार प्रमुखाला सिद्ध ठेवायला सांग. दारुकाला गरुडध्वजाचे नित्याचे चारही शुभ्र अश्व पाठीवर झुली बांधून बरोबर घ्यायला सांग. रथ-गरुडध्वज इथंच राहील. अश्व मोकळेच धावतील आमच्याबरोबर. मी आजच संध्याकाळी सुशील ब्राह्मणासह कौंडिण्यपुराकडे निघणार आहे. दादाला माझ्या पाठोपाठ त्याच्या सेनेसह येण्यास सांग. तूही ये त्याच्याबरोबर." मी त्याला कार्यी लावलं.

हर्षविभोर झालेला उद्धव अनावर आवेगानं तरातर निघूनही गेला. काही काळातच समोर आलेल्या पत्रलेखकाकडून आमच्या दक्षिण देशीच्या चारही यादव राजांना सत्वर कौंडिण्यपूर परस्पर जवळ करण्यासाठी मी पत्रं सांगितली. ती थैलीबंद करून राजदूतांकरवी धाडली. सादर झालेल्या अश्वदलपतीला धावणी घेणारे निवडक अश्व आणि लढाऊ धट्टेकट्टे यादव सिद्ध ठेवायला आज्ञा दिली. दोन वेळच्या दंडकारण्याच्या प्रवासाच्या अनुभवानं खूप काही शिकलो होतो आम्ही. द्वारका ते कौंडिण्यपूर हा प्रवास तसा लांबचा होता. मध्ये येणाऱ्या दंडकारण्यातल्या दक्षिणापथावरचा झाड-झाडोरा साफ करणं भाग होतं. त्यासाठी आता आम्ही यादवांची परशूधारी स्वतंत्र शिकाऊ पथकंच पथकं तयार केली होती. त्यांना पाठोपाठ साथ देणारी जी पथकं सिद्ध केली होती, ती हव्या त्या आकाराच्या राहुटचा उभविणारी होती. अल्पावकाशात ती पुन्हा पसारा आवरणार होती. सर्वांना सज्जतेच्या आज्ञा सुटल्या.

भराभर चक्रं फिरली. महाराणी झाली तरी जिला सवयीनं मी आणि दादा थोरलीच म्हणत आलो होतो, त्या देवकीमातेच्या हातून निरोपाच्या दहीकवडचा व आशीर्वाद घेतले. एव्हाना आम्ही कौंडिण्यपुराकडे चाललोत ही वार्ता राजमंडळभर पसरली होती. सर्व यादवांना एकच माहीत होतं. श्रीकृष्ण महाराज आंध्रभृत्य राजकन्या रुक्मिणीदेवी यांच्या स्वयंवरासाठी निघाले आहेत. या वेळी दोन सप्ताहांतच आम्ही त्वरेनं दंडकारण्य पार पाडलं. लागलीच भीष्मक राजाला आमच्या आगमनाचा अग्रदूत पाठविला. त्यानं आमच्या स्वागतासाठी कौंडिण्यपूरच्या सीमेवर आपल्या रुक्मवर्मा या अमात्याला पाठविला. त्यांनी मला खांदाभेट देऊन नानापरीनं सैन्यासह नगरात येण्याचा आग्रह

केला. मी तो नाना कारणं सांगून थोपविला. आमचा तळ सीमेवरच पडला. विवाहविधी दुसऱ्याच दिवशी आंध्रभृत्यांच्या राजसभागृहात संपन्न होणार होता. त्यासाठी दक्षिणेकडचे असंख्य राजे लोटले होते. उत्तरेहून जरासंध, शाल्व व दंतवक्र एकमेकांना साथ देत आले होते. नियोजित नवरदेव असलेल्या शिशुपालानं तर केव्हाच कौंडिण्यपूर गाठलं होतं! जरासंधाच्या आग्रहानं, धाकामुळं आणखीही कित्येक नृप ससैन्य आले होते. नगरात तर मुंगी शिरायलाही वाव नव्हता. नगराच्या दक्षिणेकडून आलेले आमचे आप्त चारही यादवराजे माझ्या पूर्वसूचनेनुसार नगराच्या दक्षिणे सीमेवरच तळ देऊन उतरले होते. मी रुक्मवर्मा अमात्यांकडून आलेल्यांची सूक्ष्म माहिती माझ्या विशिष्ट कृष्ण-पद्धतीनं हळुवार काढून घेतली.

युवराज रुक्मीनं संभाव्य मेहुणा शिशुपालाचं ऐकून 'गवळी' म्हणून याही वेळी आम्हा यादवांना निमंत्रण काही धाडलं नव्हतं. तरीही आम्ही आलोत, या सत्यानं तो सावध झाला होता. आमच्या तळावर त्यानं 'सेवक' म्हणून धाडलेले खरंतर होते त्याचे 'गुप्तचर'. आता आम्हाला त्यांच्या हालचालींवर 'प्रतिगुप्तचर' नेमूनच पुढची पावलं टाकावी लागणार होती. तशी व्यवस्था मी केली.

कौंडिण्यपूरच्या दक्षिण सीमेवर उतरलेल्या क्रथकैशिक राजाकडून मी त्यांचा सालंकृत राजरथ मागवून घेतला. त्याला कृष्णकाळ्या वर्णाचे तुकतुकीत व पुष्ट असे चार अश्व जोडायला ते विसरले नाहीत. तशी माझी त्यांना सूचनाच होती.

आमच्या तळावर काळ्या अश्वांचा सुवर्णी रथ आला आहे, ही वार्ता माझ्या अपेक्षेप्रमाणं रुक्मीला रात्रीच समजली. त्यानं आपल्या गुप्तचर प्रमुखाला बोलावून सूचना केली, "काळ्याच्या काळ्या अश्वांच्या कृष्णरथावर दक्ष लक्ष ठेवा! तो केव्हाही आणि काहीही काळंबेरं केल्याशिवाय कधीच राहणार नाही!"

आल्याआल्याच मी सुशील ब्राह्मणाला कानमंत्र देऊन विदर्भकन्येकडे एकांत-भेटीसाठी धाडलं. तिला निरोप दिला – "मी आलो आहे. चिंता करू नकोस. निर्भय राहा!"

राजकन्येच्या विवाहाचा मंगलदिन कौंडिण्यनगरीवर उजाडला. त्यांची राजवास्तू मंगलवाद्यांनी निनादून उठली. उंची राजवस्त्रं पांघरलेले स्त्री-पुरुष विवाहवेदीजवळ एकवटले. भव्य विवाहवेदीजवळ आपल्या चेदींच्या पीळदार जरीकाठी पागोटचावर भरघोस मोत्यांच्या डुलत्या मुंडावळ्या बांधलेला शिशुपाल उभा राहिला. आपल्या वैवाहिक जीवनाची सुखमंडलं त्यांच्या डोळ्यांभोवती तरळत होती. पाठीशी त्याची माता होती. 'श्रुतश्रवा' आणि त्याचे पिता माझे आतोबा 'दमघोष' . शिशुपालाचा करवला म्हणून जरासंधाचा पुत्र सहदेव उभा होता. रुक्मी आणि त्याचे चारही बंधू झळझळीत राजवेषांत मस्तकीचे सुवर्णी मुकुट मिरवत फिरत होते! प्रथम स्वयंवरकांक्षिणी रुक्मिणी सशस्त्र बंधूंच्या धाकात शिशुपालाच्या गळ्यात 'स्वेच्छे'ची वरमाला चढवणार होती. रुक्मी तर माणसांच्या लोटात मंडपातून चक्क हाकलून देण्यासाठी शोधत होता, तो मलाच. हा घाट त्या सर्वांनी पूर्वीच सुनियोजित आखला होता. स्वयंवर व विवाहवेळा जवळ आली तशा इकडे उत्तर सीमेवर माझ्या चपळ हालचाली सुरू झाल्या. प्रथमतः माझे उपहाराची तबकं घेतलेले यादव सैनिक मी पथकापथकांनी असे कौंडिण्यपूरच्या राजवास्तूकडे एका मागोमाग एक धाडायला सुरुवात केली. ते अखेरपर्यंत जाणार होते, पण स्वयंवर व विवाह मंडपात मात्र मुळीच शिरणार नव्हते! तेथूनच पांगून पुन्हा आमच्या मूळ उत्तर तळावर परतणार होते.

मागे ठेवलेल्या मोजक्याच सैनिकांनी क्रथकैशिकाच्या रथाचे काळे अश्व सोडून त्यांच्या जागी आता आम्ही बरोबर आणलेले माझ्या गरुडध्वज रथाचे चारही शुभ्रधवल अश्व जोडले! ध्वजदंडावर गरुडध्वजा चढविली.

आजवरच्या माझ्या जीवनप्रवासातील सर्वांत रोमांचक क्षण समोर उभा ठाकला. माझ्या युगानुयुगं गाजणाऱ्या विवाहाचा! दारुकानं चार शुभ्र अश्वांचा, ध्वजदंडावर सुवर्णी गरुडांकित केशरी ध्वजा मिरविणारा यादवरथ माझ्या शिबिरासमोर आणला. वेग पायांशी ठेवून तो रथनीडावरून खाली उतरला. तरातर चालत येऊन त्यानं मला व माझ्या डाव्या हाताशी असलेल्या उद्धवाला वंदन केलं. मी त्याला चाचपलं, “सर्व सिद्ध? काही त्रुटी?”

“नाही आर्य – यादवश्रेष्ठ, सर्व सिद्ध! पाठच्या घेरात बाण-तूणीर. शार्ङ्ग, अजितंजय चाप, चक्र, अग्निकंकण, कौमुदी गदा, सौनंद मुसल, कोटबंद नंदक खड्ग सर्व-सर्व सिद्ध आहे.” तो सेवानिष्ठेनं उत्तर देत प्रसन्न-प्रसन्न हसला.

“तुम्ही दोघंही इथंच थांबा. हा आलोच मी आंध्रभृत्यांच्या अंबिकेचं साग्र दर्शन करून तिचे आशीर्वाद सोबत घेऊनच!” म्हणत मी एका झेपेतच रथनीड गाठलाही. कटीला आवळलेल्या निळ्या शेल्यात बांधलेला माझा प्राणप्रिय पांचजन्य गाठीतून सोडवून ओंजळीत घेतला. क्षणैक मस्तकी भिडविला. कौंडिण्यपूरच्या वैदर्भी सीमेवर ग्रीवा गगनगामी उचलून, धमन्या रक्त टपटपीत करीत फुंकला. माझं मलाच जाणवलं की, यापूर्वी मी तो असा प्राणत्वेषानं कधीच फुंकला नव्हता! माझ्या प्राणप्रिय चारही अश्वमित्रांचे वेग हाती तोलले. आई-बाबांचं, पूर्वजांचं, आचार्य सांदीपनींचं महाराज पुरुरवांपासून शूरांपर्यंत सर्वांचं स्मरण करून नाभीच्या परावाणीतून चौघाही अश्वांना नावानिशी सादवलं, “मेघा, शैब्या, बला, सुग्रीवा, चला, झ्यॉ!” ते ऐकताच, तसंच नाभीच्या परावाणीतून खिंकाळता प्रतिसाद देत समोरचं अश्वचैतन्य उधळलं. निघालो – मी एकटाच! अदम्य-अदम्य आत्मविश्वासानं वक्ष काठोकाठ भरलेला.

हां-हां म्हणता माझ्या गरुडध्वज रथानं अनेक वेडीवाकडे वळणं मागे टाकली. मी तो घनदाट गिरिगंगेच्या पायथ्याशी विसावलेल्या सुघड अंबिका मंदिरासमोर आणलाही. पुढा फिरवून समोरच दूर एका सोनचंपकाच्या झाडाखाली बाजूला उभा केला. मंदिराचे सेवक, पुजारी चक्रावून बघतच राहिले. पुढे होऊन पायदंड्या झपाझप पार करत मी आतला दर्शनी चौकही ओलांडला. समोरच्या गर्भगृहात गेलो. प्रसन्न अंबिकेच्या पवित्र चरणांवर घामेजलेलं मस्तक ठेवलं. संथ, शांत प्रदक्षिणा घेऊन आता सावरलेल्या पुजाऱ्यासमोर तीर्थप्रसादासाठी डाव्या हाताच्या वर ठेवलेला उजवा हातपंजा पसरला. अद्याप तो चक्रावलेला होता. माझ्या सोनकिरीटातील मोरपंखाकडे व कंठातील शुभ्र, धवल वैजयंतीमालेकडे विस्फारल्या नेत्री बघतच राहिला. गोंधळलेल्या स्थितीतच त्यानं दिलेला तीर्थप्रसाद मी ओठांआड केला. हसून वक्षावरील एक मोतीकंठा उतरवून त्याच्या ओंजळीत हळूवार ठेवत त्याला विचारलं, “तुम्ही नाही गेलात ते स्वयंवरासाठी नगरात?”

“वधू राजकन्या आता देवीच्या दर्शनासाठी येईल इथं, तिला आशीर्वाद देऊन मग राजदक्षिणेसाठी मीही जाईन नगरात.” हसतच पुजारी उत्तरला.

कंठ्याकडे बघत मी पुटपुटलो, “माझी तुम्हाला हीच दक्षिणा!”

सगळं नगर तिकडे स्वयंवरासाठी मंडपात लोटलं होतं, इकडे मंदिरात आता तर

मोजकीच माणसं होती. मी ते माझ्या जीवनाचा मर्मबंधाची स्मृती ठरणारं मंदिर बाहेरूनही भोवताल फिरून पाहिलं. पुन्हा पायदंड्या उतरून माझ्या गरुडध्वज रथात आलो. घेरातील बैठकीवर निवांत बसलो. विचारांत गढलो. काही पळातच प्रथम कितीतरी अश्वांच्या दौडत्या टापांचे खडखडाट लयीत कानांवर पडले. ते वाढत चालले. पाठापोठ कितीतरी वाद्यांचा प्रचंड संमिश्र कल्लोळ मागून येऊन त्यात मिसळला. मी सावध झालो. उठलो. काही क्षणांतच सशस्त्र अश्वसादांनी मंदिराला घेर टाकला. ते वधू राजकन्येचं संरक्षक अश्वदल होतं. मागोमाग प्रथम पायी चालणारे कितीतरी भगवी व शुभ्र वस्त्र धारण केलेले दाढी-जटाधारी ऋषिमुनी खडावा खटखटवीत प्रवेशले. ते वेदमंत्र गर्जत, मध्येच शंख फुंकत होते. पायदंड्या चढत ते सरळ मंदिरात प्रवेशले. मागून वधूच्या सेवेतील सेविकांचा तांडा आला. त्यांच्या हातींच्या तबकांत देवीला अर्पायचे पुष्पाहार, अलंकार, वस्त्रं व पूजेची सर्व साधनं असे विविध उपहार होते. त्यांच्या मागोमाग वधूच्या आप्त स्त्रियांचं विविध रंगी, मऊ वसनांत सजलेलं राजमंडळ मोठमोठ्या रथांतून उतरलं. त्यांच्या मागे भव्य सालंकृत रथ होते; वधूच्या पाचही बंधूंचे. सर्वांत शेवटी होता, वधू राजकन्येचा – रुक्मिणीचा सालंकृत सजलेला भव्य सर्वांत उंच राजरथ.

तबकधारी दासींना पुढे ठेवत राजस्त्रियांचं मंडळ मंदिरात कलकलत प्रवेशलं. पाचही राजपुत्र आपापल्या अश्वांचे वेग रक्षकांच्या हाती फेकून सेनापती व निवडक शस्त्रधारींसह मंदिराच्या पायदंड्या चढू लागले. मंदिरात गेले. दृष्टिआड झाले. महाराज व महाराणी काही विधींसाठी मागंच राहिले होते. सर्वांत शेवटी सजलेल्या भव्य रथातून सजलेली वधुकन्या आळत्याची कुसर फिरलेली, पैंजणधारी पावलं जमिनीवर ठेवत उतरली.

तिच्या पावलांचं अस्पष्ट दुरून दर्शन होताच माझ्या हृदयात एक अरोध भावतरंग उठला. माझ्या हात आपोआपच शेल्यातील पांचजन्याकडे गेला. क्षणात तो टपोरा शुभ्र शंख ओठांवर ठेवून मी तो नाभीकमळापासून असा काही प्राणपणानं फुंकला की –

तिनं त्याचा अनोखा स्वरनाद ऐकला मात्र, ती सैरभैरच झाली! जागीच थबकली. चर्येवरची ओढणी क्षणात मागे फेकून तिनं माझ्या गरुडध्वज रथाकडे एकटक बघितलं. पूर्ण उमललेल्या चंद्रविकसी कमळासारखी दिसत होती तिची चर्या! उत्फुल्ल. यौवनरसरशीत. माझ्या रथाच्या ध्वजदंडावरचा सुवर्णी गरुडध्वज बघताच तिची चर्या कशी आनंदोर्मींनं फुलून आली. दुसऱ्याच क्षणी हसतच तिनं पुन्हा ओढणी ओढून घेतली. आता तिची निर्भय, निर्धारी पावलं संथ पडू लागली – अंबिकेच्या मंदिराकडे.

माझं काम झालं होतं. तिला नेमका संकेत मिळाला होता!

समोरच्या अंबिकेच्या मंदिरात काही क्षणांतच देवताविधी सुरू झाले. असंख्य घंटानाद आसमंतात दुमदुमले. त्यात ऋषींचे शंखनाद मिसळले. जवळ-जवळ घटिकाभर आतले सर्व विधी मंत्रघोषात संपन्न झाले. वधुकन्येनं करस्पर्श दिलेली दानांची तबकं प्रथम बाहेर आली. एका पाठोपाठ एक वाटली जाऊ लागली. अंबिकेनं नववधू राजकन्या रुक्मिणीला प्रसन्न होऊन मन:पूत आशीर्वाद दिला. मला तर तो पूर्वीच मिळाला होता – तथाऽस्तु!

आता दाढीधारी भगव्या व शुभ्रवस्त्रांचा ऋषिमुनींचा मेळ सर्वप्रथम मंदिराबाहेर पडला. कुणाच्याही ध्यानी आलं नाही की, ही दर्शनयात्रा ज्या क्रमानं मंदिरात

प्रवेशली तशी परतली मात्र नाही! मी सुशील ब्राह्मणाला जशा सूचना दिल्या होत्या तसं त्यानं माझं काम अचूक केलं होतं. सगळे क्रम उलथे-पालथे करत ऋषींच्या मागोमाग बाहेर पडली, ती साक्षात सजलेली वधुकन्याच! पाठीशी मोजक्याच दासींचा जथा घेऊन. तिचे भिरभिरते डोळे शोधत होते एकच खूण. 'सुवर्णी गरुडध्वज.' एव्हाना मी माझा शस्त्रसज्ज गरुडध्वज रथ फिरविला होता. थेट मंदिराच्या पायदंड्यांशीच आणून उभा केला होता.

ती आली! उन्हात उजळलेली अंबिका मंदिराची एक-एक श्वेत पायदंडी धिमेपणे उतरत, चालत्या संगमरवरी शिल्पासारखी! शरदातल्या प्राजक्तगंधित टवटवीत पहाटेसारखी! आषाढाच्या प्रारंभी सावळ्या मेघमालेत तळपून उमटणाऱ्या वीज रेघेसारखी. माझ्या रथाच्या घेरासमोर येताच ओढणी तिनं मागे फेकून दिली. माझी तिची पहिलीच दृष्टादृष्ट झाली!! काही पळं गती विसरून स्थिरावले. एकमेकांशी उदंड-उदंड बोलून गेले. मूक वाणीतच. याही स्थितीत मनी आलेल्या एका मजेदार विचारानं मी स्वत:शीच हसलो, 'वैखरी, मध्यमा, पश्यंती आणि परा यांच्या पलीकडे अशीही एक वाणी असते, गुरुदेव सांदीपनी – मूकवाणी – प्रेमवाणी!' दुसऱ्याच क्षणी तिचे काळेभोर, टपोरे तेजस्वी, तरीही अरागस डोळे माझ्या मस्तकीच्या मोरपंखाला भिडले! त्याच्या हव्या हव्याशा नितळ आवाहक रंगच्छटांत जसे खिळूनच पडले! क्षणात तिची चर्या अबोध लज्जेमुळे आरक्त, रसरशीत झाली. क्षणमात्रच तिची दृष्टी माझ्या दृष्टीला भिडली. जन्मजन्मांतरीची खूण दोघांनाही पटली. अनुपम राजलज्जा क्षणात तिची चर्या व्यापून गेली. मग मात्र तिचे निमुळते मत्स्यनेत्र माझ्या वक्षावरच्या वैजयंतीमालेवर फिरून पटकन चरणांना भिडले, यापूर्वी भेटलेल्या मोजक्याच स्त्री-पुरुष व्यक्ती मला माझ्या शरीराचा अवयव वाटल्या होत्या. तशीच हीही वाटली. होय; ही सर्वांत महत्त्वाचा धडधडणारा अवयव तर होती – हृदय नावाचा!

समोरची तांबूसगौर, बांधेसूद, उंच, देखणी क्षत्राणी मला नेत्रभर बघताच देहभर थरारून ठरली. तिच्या नेत्रकडांवर आजवर रोधलेले अश्रू एकसरीनं टपटप घरंगळू लागले. आवेगानं पुढे होत तिनं माझ्या सुवर्णपट्टचांकित राजचढावांना आपलं सतेज, श्रांत मस्तक भिडवलं. ती आवेगानं पुटपुटली, "अच्युता, माधवा किती, किती रे वाट बघायची तुझी! दूऽर दूऽर घेऊन चल आता मला – कधीच न परतण्यासाठी – क्षणही न थांबता." तिचा कोकमवर्णी हात माझ्या पुष्ट बळकट निळसर हाती घेऊन क्षणातच मी तिला रथाच्या घेरात अलगद खेचली. पाठोपाठ घेरातून खाली उतरलो. एका झेपेतच रथनीड गाठला. माझ्या रथाच्या चारही अश्वांना अमोघ धावणीचा संकेत देत वेगांचा झटका दिला, "मेघाऽ, बलाऽ, शैब्याऽ, सुग्रीवाऽ झ्याऽ झ्याऽ!" पुढचे खूर उंचच उंच उंचावून चारही अश्व समजूतदारपणे एकदमच केवढ्यातरी मोठ्यानं भेदक खिंकाळले. दुसऱ्याच क्षणी अमोघ धावणी घेतं उधळलेही! तसं बाहेर आलेल्या ऋषींच्या मेळातील कित्येकांनी फुलांच्या ओंजळी उधळल्या. आशीर्वादांसाठी जपमालाधारी हात उंचावले. कित्येकांनी गगनभेदी शंखनाद उठवले. त्या सर्वांनी माझ्या रथाची 'गरुडध्वजा' अचूक व केव्हाच पारखली होती! माझा यादवरथ प्राणप्रिय रुक्मिणीचं क्षत्रियसंमत बलात हरण करून अंबिकेच्या साक्षीनं आंध्रभृत्यांच्या नाकावर अश्वटापा आपटीत उधळला.

मी रुक्मिणीचं क्षत्रियांना गौरवास्पद असलेल्या, मान्य असलेल्या पद्धतीप्रमाणं रीतसर 'हरण' केलं होतं! तिच्या इच्छेप्रमाणं!

रथ कौंडिण्यपूरच्या उत्तर सीमेवर आणला. उद्धव, दारुक माझी वाटच बघत होते. नुकताच द्वारकेहून ससैन्य आलेला बलरामदादा आपल्या तळावर विश्राम घेतं होता. मी खाली उतरलो. आता दारुकानं रथावरची आपली जागा घेतली. मी उद्धवासह घेरात चढलो. आम्ही दंडकारण्याच्या रोखानं निघालो. दादा मागंच राहणार होता. मंडपातील अनेकांचा त्यांना मध्येच थोपवून, अंगावर घेत समाचार घेणार होता. माझ्याबरोबर होतं आमचं व दक्षिणेच्या यादवांचं प्रचंड, जोड अश्वसैन्य.

तिकडे कौंडिण्यपुरात हल्लकल्लोळ माजला! अनावर संतप्त झालेला युवराज रुक्मी स्वस्थ बसणार नव्हता. चपळाईची धावणी करून आम्ही रथासह दंडकारण्याचा दक्षिणापथाच्या मुखावर आलो. इथं प्रश्न आला रथाचा. तो सोबत घेऊन काही दंडकारण्य पार करता येणार नव्हतं. आता तो रथ क्रथकैशिकालाही देता येणार नव्हता. दारुक, उद्धव त्याचाच विचार करत होते. मी त्यांना तोड सुचविली. या पथावरच्या वनवासी जमातीच्या राजाला तो रथ देऊन टाकावा. त्याच्याकडून मध व बराच काळ टिकणारी रानफळं आणि दिव्य वनौषधी घ्याव्यात! तसंच आता यादवसेनेत एकमेव स्त्री असलेल्या रुक्मिणीसाठी एक बंदिस्त डोली आणि काही आदिवासी सेविकाही घ्याव्यात तिच्या सोबतीसाठी. आमच्या मागून पाठलागावर येणाऱ्या रुक्मीला शक्य तेवढं रोधण्याची अटही त्याला घालावी.

माझ्या दलप्रमुखानं वनवासी राजाची भेट घेऊन हे साधलं. चपळाईचे धावते पडाव टाकत आम्ही दंडकारण्य पार केलं. शस्त्रधारी सैनिकांच्या बंदिस्त डोलीत बसविलेल्या विदर्भकन्येला घेऊन आमचं शिस्तबद्ध अश्वसैन्य अवंतीजवळ आलं. आता द्वारकेहून स्वागतासाठी आलेले राजरथ व मोजकी गजदळं इथं आम्हाला मिळाली. आचार्य सांदीपनी आता परिवारासह द्वारकेत होते. त्यांच्यां उत्तराधिकाऱ्यांनी सांभाळलेला अंकपाद आश्रम मात्र याच परिसरात होता. क्षिप्रेकाठी. आता तर तो अधिक कार्यरत झाला होता. भरभराटला होता. कौतुकानं ही माहिती उद्धवानं आपल्या वहिनींना सांगितली! तसं रुक्मिणीनं माझ्यासमोर आग्रहच धरला, ‘आचार्यांचा आश्रम एकदा तरी बघण्याचा!’ माझा निरुपाय झाला. उद्धवासह मी तिला शस्त्रधारी सैनिकांचं संरक्षण देऊन, आश्रमासाठी काही भेटवस्तू देऊन तिकडे धाडलं.

अवंतीच्या सीमेवर क्षिप्रेकाठीच रुक्मिणी व उद्धव परत येण्याची आम्ही तळावर प्रतीक्षा करीत थांबलो होतो. त्यांना परतायला दोन दिवस लागले. आश्रमानं त्यांचं प्रचंड स्वागत करून आग्रहानं त्यांना एक दिवस ठेवून घेतलं होतं. दुसऱ्या दिवशी माध्यान्हीला ते परतले तसं द्वारकेकडे पुढे जाण्यासाठी आमच्या तळावर चपळ हालचाली सुरू झाल्या. सेनेची बांधाबांध चालू असतानाच अवंतीच्या दक्षिणेकडून प्रथम प्रचंड रणवाद्यांचा कल्लोळता नाद कानी आला. पाठोपाठ दौडत्या अश्वटापांनी आमचा तळ अचानक घेरूनही टाकला. तो होता रुक्मी! काटेफडाच्या लालबुंद बोंडासारखी चर्या झालेला! भगिनीच्या अचानक झालेल्या हरणामुळे संतापानं नखशिखांत पेटून उठलेला.

आपला दमदार पुष्ट अश्व कष्टांनी कसातरी रोधत तो थेट माझ्या रथाशेजारीच येऊन उतरला. क्षणार्धात अधरीयाचा काचा कसून तयारही झाला. अश्वाच्या पाठीवरच्या कातडी खोबणीत रोवलेली प्रचंड गदा त्यानं आवेगानं क्षणात बाहेर खेचली. आपल्या पुष्ट खांद्यावर ती टाकली. माझ्यावर सरळ चालून येताना, जाड भुवया वर चढवीत डोळे

विस्फारून तो केवढ्यातरी मोठ्यानं कडाडला, "पळपुट्याऽ गवळटा! आम्हा – भोजांची कुलशोभा असणाऱ्या माझ्या प्रिय भगिनीला – या रुक्मिणीला सर्वांच्या समक्ष हरण करणाऱ्या चोरट्या, नीचा, मी तुला स्पष्ट-स्पष्ट द्वंद्वाचं आव्हान देतो आहे. दोन्हीकडच्या सैनिकांचा रक्तपात इथं होऊ नये, असं वाटत असेल, अंगी सामर्थ्य असेल, तर स्वीकार हे आव्हान. जायचंच असेल घेऊन आमच्या कुलकन्येला, तर माझा मृतदेह तुडवूनच जावं लागेल तुला. नाहीतर या द्वंद्वात तुला मी वधेनच वधेन! तिला माघारी परत घेऊन जाईन कौंडिण्यपूरला. आम्ही निवडलेल्या शिशुपालाच्या कंठात वरमाला चढविण्यासाठी. प्रतिज्ञाच केली आहे मी नगर सोडताना की, हे केलं नाही, तर कौंडिण्यपुरात पुन्हा पाऊलच टाकणार नाही अशी! पळपुट्याऽ सामर्थ्य असेल तर उतर खाली." त्यानं खांद्यावरची प्रचंड गदा गोल गरगर फिरवीत 'जय अंबिके' गर्जत आव्हानाची चेतक, ढंगदार युद्धधुंद मंडलंसुद्धा घेतली.

आता मला द्वंद्वाचं आव्हान स्वीकारणं भागच होतं, क्षत्रिय म्हणून मी एक प्रथा मानली होती – वधूच्या हरणाची. तशीच हीसुद्धा मान्य करणं आता भाग होतं – द्वंद्वाची. मीही क्षणात पीतांबराचा कासा कसला. दंड थोपटले. केलीनंदकाकांचं स्मरण केलं.

रथाच्या घेरातील माझी प्रचंड 'कौमुदी' गदा उचलून आमचा यादवी रणघोष 'जैऽ इडादेवीऽऽ' घुमवीत मी रथाबाहेर झेप घेतली. रुक्मिणीनं मला रोधण्यासाठी पकडलेलं माझं उत्तरीय तिच्या हातीच मागे राहिलं. मी गदेची ढंगदार आव्हानी मंडलं धरली.

अवंतीच्या सीमेवरच्या कुरणात क्षणातच आमच्या गदा, द्वंद्वासाठी एकमेकींना टक्करल्या. कणखर, घणसर टणत्कार उठले आणि ठिणग्याच ठिणग्या उडाल्या. एक भयंकर प्राणांतक द्वंद्व जुंपलं. दोन्हीकडचे सैनिक श्वास रोधून, आ वासत बघे प्रेक्षक झाले. रुक्मीच्या पायांच्या हालचालींवरून तो कोणता पवित्रा घेऊन कोणत्या दिशेनं वर्मी प्रहार करणार हे मी अचूक ताडत होतो. त्याप्रमाणं मी गदा आडवी टाकत होतो. त्याच्या छातीचे, मांडाचे हलणारे स्नायू टिपून प्रहार प्राणघातक असेल तर चक्क चुकवत होतो. दोघंही घामाघूम झालो. जागजागी बसलेल्या गदेच्या तडाख्यांनी अंगभर रक्तधारांत कसे न्हाऊन निघालो. दोघांच्याही गदांच्या हातमुठी भक्कम प्रहारामुळे वक्र झाल्या. तसं गदायुद्ध आपोआप थांबलं. रथातील रुक्मिणीकडे एकदा तिरस्कारानं बघून रुक्मीनं हातची गदा भुईवर फेकली. मीही माझी फेकली. क्षणार्धात तळहात रुंदीच्या पात्याचं, तळपदार खड्ग कमरेच्या कोटबंदातून त्यानं दातओठ खात उपसलं. आता हे खड्ग-युद्धाचं आव्हान होतं तर! माझ्या हाती तर काहीच नव्हतं. चपळाईनं मी माझ्या रथाकडे झेप घेतली. तत्पर दारुकानं फेकलेलं नंदक खड्ग चापल्यानं वरच्यावर झेललं.

आमची खड्गांची चपळ खणाखणी आता सुरू झाली. एकमेकांवर कधी हवेतून मानेच्या दिशेनं, तर कधी खालून पोटरीच्या दिशेनं सपासप चमकदार, खड्ग प्रहार आम्ही करू बघू लागलो. ते तटवू लागलो. आम्ही दोघंही जागजागीच्या वारांनी घायाळ, रक्तस्नात झालो. ग्रीष्मतल्या पळस वृक्षांसारखे लालेलाल भेसूर दिसू लागलो.

शेवटी रुक्मीच्या खड्गाचा मध्य धरून मी असा काही भक्कम प्रहार उतरविला की, ते दोन भागात खाडकन खंडितच झालं. आता मात्र तो सटपटला. त्याला पूर्ण माहीत होतं, द्वंद्वाचा निकाल काय असतो ते! माझे प्रहार कसेतरी अर्धवट खड्गानं रोखत तो आमच्या रथाच्या दिशेनं एक-एक पवित्रा मागे हटू लागला. मग दोन्ही सेनेंसमोर

उन्मत्त तिरस्कारानं माझी हिणकस शब्दांत घनघोर निर्भत्सना करणारी त्याची उद्धत जीभ प्राणभयानं आता टाळ्याला चिकटली! घामानं डवरलेली त्याची लालबुंद चर्या मरणभयाच्या काळढगांनी क्षणात झाकोळून आली!

त्याच्यावर प्राणांतक अंतिम प्रहार करून त्याचं मस्तक धडावेगळं करण्यासाठी मी हातचं खड्ग आता कठोर निर्धारानं उंच उचललं, पण ते मला काही केल्या खाली घेताच येईना!! रथातील रुक्मिणीनं त्याचं पातं आपल्या मुठीत प्राणांती आवेगानं वरच्यावर घट्ट पकडून ठेवलं होतं! तिथून रक्तधारही सुरू झाली होती. ती काहीच बोलली नाही, तिचे डोळेच मात्र केवढंतरी बोलून गेले, 'स्वामी, माझ्या बंधूला वधून का तुम्ही मला यादवांची कुलवधू म्हणून द्वारकेला नेणार आहात? हा चुकलाय. त्याला अभय न देण्याची चूक तुम्हीही करणार आहात का?' तिच्या दृष्टीतील भावआर्जवी सखोल करुणा मला खोलवर कुठंतरी स्पर्शून गेली. माझा निर्धार डळमळला!

मी खड्ग हळूहळू खाली घेतलं. रुक्मिणीची ती करुणार्द्र भावदृष्टी मी पुढे जीवनभर कधीच विसरू शकलो नाही. शांतपणे रथात येत पीतांबराच्या शेवानं मस्तकीचा घाम टिपत दारुकाला म्हणालो, "हिच्या हातीच्या घावावर प्रथम औषधी रस सोड. रथ क्षिप्रेकाठी घे. स्वच्छ स्नान करून मगच द्वारकेला निघायचं आहे." एव्हाना कौंडिण्यपुरातील युद्धात अंगावर आलेल्या सर्वांचा पराजय करून परतलेला बलरामदादा आम्हाला सेनेसह मिळाला. माझ्याकडून अभय घेतलेला पराभूत रुक्मी अवंतीच्या सीमेवरून चडफडत परतला. आमच्या द्वंद्वाच्या स्थानाला अवंतीकरांनी सहर्ष नाव दिलं – 'गोपालपूर!'

आम्ही सर्व रुक्मिणीसह कुशस्थली किनाऱ्यावर आलो. द्वारकेत अग्रदूत धाडले. सगळं राजनगर द्वारका एका दिवसात सजून उठलं. दिवल्यांची रोषणाई तेवू लागली. फुलमालांच्या कमानी उभारल्या गेल्या. विपृथूंनी बाबा, थोरली आई, धाकली आई आणि यादवांचा प्रचंड जनलोट यांसह आमचं स्वागत केलं.

गर्गमुनी व सांदीपनी यांनी लवकरच विवाहाचा शिवमुहूर्त शोधून काढला. त्या मुहूर्तावर माझा विदर्भकन्या, भोजवंशीय रुक्मिणीशी थाटामाटात, अठरा कुलांतील सर्व यादवांच्या साक्षीनं विवाह संपन्न झाला.

बाबांच्या राज्याभिषेकानंतर द्वारकेतील सर्वांच्या दीर्घकाल लक्षात राहील, असा हा सोहळ ठरला. या वेळीही असंख्य मित्र महाजनपदांकडून भरघोस उपहार आले. द्वारकेची कोषागारं आणि भांडारं त्यांनी तुडुंब भरली. रुक्मिणी आम्हा यादवांची त्यामुळे शब्दश: लक्ष्मी ठरली.

काही दिवस परतले. अद्याप जोडद्वीपावरचं राणीकक्ष नांदतं व्हायचं होतं. त्यामुळे रुक्मिणी आपल्या सेविका, सख्यांसह माझ्याच सुवर्णसोपानाच्या राजगृहात राहू लागली. तो झळझळीत सोपान प्रथम माझ्यासह चढताना तिनं मध्येच थबकून विचारलंही होतं, "केवढ्या म्हणायच्या या पायदंड्या तरी! कशासाठी?"

ती जशी अनुपम सुंदर होती, तशीच अजोड बुद्धिमानही होती. मला ते केव्हाच – तिच्या पहिल्याच दृष्टिभेटीत कळून चुकलं होतं. तिला पटेलसं उत्तर देणं भाग होतं. मी हसत म्हणालो, "जीवन हाही एक सोपानच आहे, आर्ये! आपण तो न थांबता, न थकता चढतच असतो. त्याचं प्रतीकच आहे असं समज हे. गंगा-यमुनेसारख्या नद्यांवर विश्रामाचे घाट असतात तशाच मान हव्या तर या असंख्य पायदंड्या."

ती काहीच बोलली नव्हती त्या वेळी.

आज तर तिला एक आवडेलशी सुंदर भेट देऊन चकित करायचं होतं. सोपान चढून मी विश्रामकक्षाच्या दर्शनी भागात आलो. मी सांगितलं तसं सेवकांनी पूर्वीच आणून ठेवलेल्या वेताच्या टोकऱ्या एका बाजूला रांगेनं मांडून ठेवल्या होत्या. त्यांच्यावर बेताचीच गोलाकार झाकणं होती. मला बघताच अग्रसेविका आत पळाली. अंत:पुरात रुक्मिणीला संकेत देण्यासाठी. मी सुवर्णी बैठकीवर बसलो. रुक्मिणीची प्रतीक्षा करीत.

क्षणातच प्रथम अतिशय मंजूळ व कान दिले तरच ऐकू यावा असा मंजूळ नाद ऐकू आला – सोन पैजणांचा. पाठोपाठ द्वारकेच्या समुद्रवाऱ्यावर स्वार झालेला चंदनी उटण्याचा प्रेरक सुगंधही दरवळला. दुसऱ्याच क्षणी अंत:पुरी कक्षाच्या झिरमिरीत पडद्यातून एक गोरापान पाय प्रथम बाहेर आला – क्षणैक थबकला. इवल्या-इवल्या सोनघंटिकांचं सुवर्णी पैंजण धारण करणारा होता तो! दर्शनातच पिकल्या आम्रफळाची आठवण देणारा, शेंदरगौर, गुबगुबीत, सतेज होता तो! त्याला बघितलं; मात्र मग एकटक स्वत:ला हरवून तसाच बघत राहिलो. आजची त्याची 'नव्हाळी' काही आगळीच होती!

क्षणात आपला भृंगवर्णी, विपुल मुक्त सडक केशसंभार शुभ्रवस्त्रानं, मान वाकडी करत एकाग्रपणे उदविणारी रुक्मिणी माझ्यासमोर उभी ठाकलीही. केवढीतरी वेगळी आणि विलक्षण सुंदर नि सतेज दिसत होती ती आज! एखाद्या संगमरवरी मूर्तीसारखी! मी खटचाळपणे तिला म्हणालोही "एरवी तर तू सुंदर आहेसच. आज मात्र वेगळीच सुंदर दिसते आहेस. तुझ्या चर्येहून तुझे अनावृत नव्हाळीचे पाय अधिक सुंदर दिसताहेत." तसं मात्र ती नुसतंच लाज लाजली.

ती खरंच विलक्षण बुद्धिमान होती. माझा खटचाळपणा अचूक जाणून टिचकीनं उडवून लावत ती म्हणाली, "पुरे झाला श्रींचा चावटपणा! आता भेट काय आणलीय ती तेवढी दाखवावी प्रथम."

मी हसतच टोकऱ्यांजवळ गेलो. एकीवरचं झाकण बाजूला केलं. आत टपोरे मोतीच मोती शिगोशीग भरले होते. माझ्या कोळी यादवांनी शिंपल्यांतून टोकरून काढले होते ते. प्रसन्न मनानं वाकून त्यातील ओंजळभर मोती मी उचलले. हलक्या पावलांनी रुक्मिणीजवळ आलो. तिच्या हातांच्या ओंजळीत माझी ओंजळ रिती करताना म्हणालो, "तू मूळचीच सौंदर्यखणी आहेस. माझ्या या भेटीचे अलंकार जडवून तेही धारण कर. अधिक सुंदर दिसशील. मग सुवर्णाला मलयचंदनाचा सुगंधही येईल!"

तिचे गाल क्षणांत केवढेतरी आरक्त झाले. ती ओंजळीतील मोत्यांकडे काही क्षण एकटक नुसती बघतच राहिली. मग स्वत:शी बोलल्यासारखंच मान डोलावून म्हणाली, "नाही, आमच्यापेक्षा आपल्याच ओंजळीत हे मोती अधिक शोभून व सुंदर दिसतात आर्यश्रेष्ठ!" तिनं आपली ओंजळ माझ्या ओंजळीत पुन्हा रिक्तही केली. आणि ती असं काही लाजून तिरकं बघत लाघवी हसली की, मी गोंधळलोच. ओंजळीतील मोत्यांकडे निसटतं बघून तिला विचारलं, "मी नाही समजलो तुझ्या म्हणण्याचा मथितार्थ. अगं! माझ्या हाती प्रतोद किंवा खड्ग दिसेल शोभून! फार तर पांचजन्य शंख म्हण – पण मोती कसे काय?" तशी ती आपल्या दाट, लांबट पापण्या फडफडवून कितीतरी अरागसपणे हसली. मधाळ शब्दांत म्हणाली, "जरा नीट पारखावं स्वामींनी हातांतल्या

मोत्यांना. आपल्या हातांत असताना ते आकाशवर्णी निळसर रंगच्छटा परावर्तित करताना दिसत नाहीत काय? आमच्या ओंजळीत असताना ते दुष्ट तांबूसगौर छटाच परतवून गेलेत. आता सावळा नीलवर्ण आकाशासारखा असतो, तो इतर सर्वच रंगच्छटांना आपल्यात सामावून घेणारा असतो, हे काय सांगायला पाहिजे आर्यांना!”

हे असं होतं तर! यावर मी काही बोलणार तोच ती गर्रकन वळली आणि हातानं पडदा बाजूला टाकत दृष्टिआडही झाली. तिनं निघून जाण्याची अशी घाई का केली होती? तर तिच्या नव्हाळीच्या पायांकडे बघताच ती ऋतुस्नात आहे, हे मला कळल्याचं एव्हाना तिनंही ताडलं होतं!! गृहस्थाश्रमाचा प्रारंभ झाला होता.

रुक्मिणीच्या आगमनानं माझ्या जीवनातील रंगीविरंगी ‘संसारपर्व’ सुरू झालं होतं, कारागिरांनी प्रतीक असलेल्या सुवर्णी जीवन-सोपानावर एक अधिकाची व महत्त्वाची पायदंडी बसवून टाकली होती. पाचव्या क्रमांकाची. दोन्ही माता व दोन्ही पित्यांच्या पायदंड्यांनंतरचा उचित मान मिळालेली. माझ्याच सूचनेप्रमाणं! रुक्मिणीच्या नावाची.

रुक्मिणीच्या आगमनानं माझी ‘भावद्वारका’ नाना भावगंधांनी, रंगच्छटांनी कशी अंगभर खुलून गेली – ‘ऋतुस्नात’ झाल्याप्रमाणं! तिच्यावर एक आगळीच ‘नव्हाळी’ चढली!!



# रुक्मिणी

# २

# रुक्मिणी

स्त्रीचं जीवन म्हणजे निर्माणाची प्रचंड शक्ती असलेलं एक सुप्त केंद्र असतं! एकदा का या केंद्राचा तिला शोध लागला की, मग मात्र ती जीवनात मागे म्हणून काही वळून बघत नाही. मी पूर्वाश्रमीची – भोजवंशीयांची विदर्भकन्या – रुक्मिणी. रुक्मीदादा आणि श्रींच्या द्वंद्वातच ती अवंतीच्या सीमेवर मागे पडली. इथं द्वारकेत पश्चिम सागराच्या सतत कानी पडणाऱ्या समुद्रगाजेला साक्ष ठेवून क्षणाक्षणाच्या सत्त्वपरीक्षेला तोंड देत तयार झाली, ती यादवांची रुक्मिणी. द्वारकेची रुक्मिणी. उभ्या आर्यावर्ताची रुक्मिणी.

आता हेच बघा ना, साऱ्या विश्वाला वंदनीय असलेल्या माझ्या पतीला मी किती सहजपणे नुसतं 'श्री' म्हणून गेले! तसं मी त्यांना एरवी 'स्वामी', 'आर्य', 'यादवश्रेष्ठ', 'यादवराज', असंच संबोधत असे. पण एकांतात आणि मर्मबंधाचं बोलताना माझ्या तोंडून नकळतच 'श्री' हे संबोधन निसटून जाई.

आज मी श्रींशी एकरूप झालेल्या माझ्याही जीवनगाथेला उलगडून दाखविणार आहे. अडचण एकच आहे. द्वारकेला घेर टाकून असलेल्या सागरासारखंच त्यांचं जीवन. त्याच्या अविरत लाटांसारख्याच माझ्या मनीच्या त्यांच्या अनंत स्मृती. स्मृतींच्याही अगणित लाटा. एक उठून सरते न सरते, तोच दुसरी उभी! कुठली म्हणून चिमटीत पकडायची? कुठल्या नेमक्या शब्दांत?

या स्मृतींच्या लाटा आठवतील तशा सांगताना माझी कशी तारांबळ उडते आहे. जसं जमेल तसं, आठवेल त्या क्रमानं मी हे मन:पूर्वक सांगणार आहे. सुचेल त्या शब्दांत. कारण मला पूर्णत: अनुभवानं पक्कं माहीत आहे की, स्मृतींचे कानेकोपरे झटकून, झाडून मी कितीही सांगितलं; तरीही श्रींचं जीवन व कार्य दशांगुळं शिल्लक उरणारच आहे! मग कशाला करायचा यत्न आणि अट्टहास सगळंच सांगण्याचा.

नुकतीच मी द्वारकेच्या शुद्धाक्ष या पूर्वेच्या महाद्वारातून जीवनातील एक परमकर्तव्य करून परतले आहे. द्वारकेच्या प्रथम स्नुषेचं – माझा व श्रींचा प्रथम पुत्र प्रद्युम्नाचं – सर्व ज्येष्ठ यादवांच्या लाडक्या पदोचं त्याची नवपरिणिता पत्नी रुक्मवती हिच्यासह औक्षण व स्वागत करून मी परतले आहे.

आमचा ज्येष्ठ पुत्र प्रद्युम्न साक्षात मदनाचाच अवतार. अतिसुंदर, पीळदार. धिप्पाड. रुक्मवती तर माझी भाचीच. आमच्या रुक्मीदादाची कन्या व आता तर सून झाली आहे. हा सर्व मेळ जमवून आणला तो अर्थातच श्रींनी.

आजवर मी एकांगीच ऐकत आले की, मीच काय ती एकटी परमसौंदर्यवती आहे म्हणून. पण यादवांच्या या प्रथम स्नुषेला – रुक्मवतीला बघताना माझा पाऽर

भ्रमनिरास झाला. नावासारखीच आहे ती – रुक्मवती – सोन्याची लडच!

पूर्वेच्या शुद्धाक्ष द्वारात रुक्मवतीला व प्रद्युम्नाला सोबत घेऊन आलेले श्री सेनेसह उभे ठाकले, तेव्हा मी त्या तिघांकडे भान हरपून नुसती बघतच राहिले. किती आकर्षक दिसत होतं, ते यादवकुळाचं त्रिदळी बिल्वदल.

तसं कौंडिण्यपुरात माझं आणि रुक्मीदादाचं कधीच काही पटलं नाही. आम्ही सहा भावंडं! दादापेक्षा धाकटे रुक्मरथ, रुक्मबाहू, रुक्मकेश, रुक्ममाली. सर्वांत धाकटी मी. दादाशिवाय बाकीचे चौघंही माझं ऐकत. एकुलती व लहान भगिनी म्हणूनही असेल कदाचित. रुक्मीदादा मात्र स्वभावाचाच ताठर, अहंमन्य. खरंतर गर्विष्ठच. हे सर्वच बंधू नावासारखे तप्त सुवर्णवर्णी, सुंदर होते. अगदी भीष्मक तातांसारखे. तातांना त्यांच्या रसरशीत ताम्रवर्णामुळे त्यांच्या मातेनं, म्हणजे आमच्या आजीनं कौतुकानं 'हिरण्यरोमन' म्हटलं. त्यांचं तेही नाव पुढे रूढ झालं.

आम्हा सर्व भावंडांना एकुलते एकच काका होते. आकृतिकाका. ते एका दुर्मीळ विद्येत पारंगत होते. गारुडविद्येत. कसल्याही विषारी सापानं दंश केलेल्या रुग्णाचं विष त्यांच्या मंत्रोच्चारांच्या उपचारानं पटकन उतरे.

द्वारकेत आल्यापासून मी एकदाही कौंडिण्यपुराला परत गेले नाही, पण कधीमधी आकृतिकाकांची आठवण होताच मात्र, एक मजेदार विचार माझ्या मनात हटकून सळसळून जाई. माझ्या श्रींनाही एक अतर्क्य 'गारूडविद्या' अवगत होती. पाय रोवून हट्टानं एखाद्या विरोध करणाऱ्याला श्री आपल्या मिठ्ठास वाणीनं केव्हा आपलासा करीत ते त्यालाच कळतही नसे! म्हणून तर एकेकाळी जीवघेणं द्वंद्वयुद्ध खेळलेल्या श्रींनाच दादानं आपली रुक्मवती नावाची लाडकी कन्या सून म्हणून दिली होती. हा सारा प्रभाव श्रींच्या मिठ्ठास वाणीच्या गारूडविद्येचाच होता.

माझ्या तातांचा, दादाचा व त्यांच्यामुळे इतर भावंडांचा माझ्या श्रींशी झालेल्या विवाहास विरोध होता. माझी माता शुद्धमतीदेवी मात्र माझ्या पाठीशी ठाम उभी होती. नावासारखीच अरागस, शुद्ध विचारांची, सत्त्वशील होती ती. विलक्षण प्रेम होतं तिचं माझ्यावर. तिनं सदैव मला धीरच दिला. तसं तर तिनंही आपल्या जामातांना – यादवराज श्रीकृष्णांना आमच्या विवाहापूर्वी कधीही डोळाभर नीट पाहिलंही नव्हतं. मात्र तिच्या कन्येची पसंती तीच तिनं आपलीही पसंती मानली.

शुद्धमतीमाता सोडली, तर अनेकांच्या मनी उठलेल्या प्रश्नाला की, 'हिनं न बघता– देखताच, श्रीकृष्ण हा आपला पती निवडलाच कसा?' कधीच उत्तर मिळालं नाही.

हेच तर रहस्य होतं! एकदा मोकळेपणी सगळं सांगायचं म्हटलं, तर आज ते सगळं सांगणचं भाग आहे. तसं श्रींना मी विवाहापूर्वी कधीच बघितलं नव्हतं. ऐकली होती ती केवळ त्यांची उदंड, दिगंत, निष्कलंक कीर्ती. त्यातही अधिक ती रुक्मीदादाच्या तोंडून बाहेर पडणारी त्यांची अपकीर्तीच! मग जीवनमोलाचा हा निर्णय मी घेतला तरी नेमका कोणत्या क्षणी? कसा? तर दादा व तात यांनी योजलेल्या पहिल्या स्वयंवरात श्रींना 'ते क्षत्रिय नाहीत; गवळी आहेत' म्हटलं. रुक्मीदादानं माझ्या समक्ष धुसफुसता थयथयाट करत नकार दिला तेव्हा. त्या वेळी तो एकसारखा शिरा ताणून ओरडत राहिला, "आम्ही सात्वत कुलातले आद्यपुरुष महाभोज यांचे वंशज आहोत. क्षत्रिय आहोत. ययातीपुत्र यदुपासून कृष्णाचा क्षत्रियत्वलोप झाला आहे! तो आहे एक य:कश्चित गवळी! प्राण गेला तरी रुक्मिणी नाही द्यायची एका गवळ्याला. द्यायची ती क्षत्रियकुलोत्पन्न

चेदिराज शिशुपालालाच!"

तो विसरत होता की, त्याची भगिनी क्षत्राणीच आहे. विवाह तिचा होता – त्याचा नव्हे. त्याच क्षणाला मी मनोमन पक्का निर्णय घेऊनही टाकला की, विवाह करायचा तो या गवळ्याशीच – श्रींशीच!

कधीही न बघितलेल्या द्वारकेत आले, तेव्हा मी तशी भांबावलेलीच होते. सोबतीला माहेरचं कुणीच नव्हतं. सुवर्णी द्वारकेची ख्याती तर सर्वत्र दुमदुमत पसरलेली. तसेच इथले विख्यात तडक स्वभावाचे यादव. या नगरीच्या प्रथम दर्शनानं तर मी दिपूनच गेले. प्रश्न पडला, 'कसं व्हायचं माझं इथं?' मग प्रश्नांमागून प्रश्नच उठत गेले. 'इथल्या ज्येष्ठ यादव कुलस्त्रिया कसं करतील माझं स्वागत?', 'कसं घेतील मला आपल्यात सामावून?' पण हे सारे प्रश्न उठले तसे आपोआप सहजच विरून गेले. सागरलाटांसारखं, द्वारकेच्या नगरजनांनी प्रथम भेटीतच केलेलं माझं हर्षोत्फुल्ल अभूतपूर्व स्वागत मी आजही विसरू शकत नाही. इथं ज्येष्ठ स्त्रियांत प्रमुख होत्या माझ्या सासूबाई – महाराणी देवकीदेवी व रोहिणीदेवी आणि ज्येष्ठ जाऊ युवराज्ञी रेवतीदेवी. ज्येष्ठ सासूबाईंनी तर पहिल्या भेटीत मला गाढ मिठीतच घेतलं. "ये, " मलाच ऐकू येईल असं कानात अस्फुट हाकारलं – "माझ्या 'मुली' रुक्मिणी ये. वाटच बघतेय तुझी मी."

तेव्हापासून श्रींच्या माता देवकीदेवी माझ्यासाठी सदैव थोरल्या माताच झाल्या. युवराज्ञी रेवतीदेवींनाही मी पहिल्याच भेटीत सहज म्हणून गेले, 'ताई.' त्यांनीही तेवढ्याच सहजपणे 'धाकटी' म्हणत मला कुशीत घेतलं. मग आपोआपच रोहिणीमाता माझ्यासाठीही 'धाकल्या माता'च झाल्या. गुरू सांदीपनींच्या पत्नींना मी 'गुरुमाता' म्हणू लागले.

विवाहानंतरचं पहिलं वर्ष तर हां–हां म्हणता उडून गेलं. समुद्रवाऱ्यासारखं. मागे ठेवून गेलं रंगीबेरंगी अनेक आठवणी. काही खारटसुद्धा!

प्रद्युम्नाच्या जन्माच्या वेळची आठवण तर एवढी खारट आहे की, त्या आठवणीनंही समुद्रजलानं चूळ भरल्यासारखं वाटतं! अगदी आजही.

तेव्हा मी राणीकक्षाच्या द्वीपावर राहत होते. माझ्या प्रशस्त सुवर्णी वाड्यात. तो पोटात असतानाच मी आणि श्रींनी एकांतात ठरविलं होतं, याचं नाव 'प्रद्युम्न'च ठेवायचं. पुत्रच होणार आणि तोही मदनासारखा अनुपम, सुंदर. असा माझ्यापेक्षा श्रींनाच ठाम विश्वास होता!

प्रद्युम्नाच्यावेळी मला लागलेले डोहाळेही फारच चमत्कारिक होते. मला एकसारखं वाटे, ही सततची समुद्रगाज ऐकत राहण्यापेक्षा दूर–दूर कुठेतरी निबिड अरण्यात जाऊन राहावं! एकांती, निवांत. तो कल्पनेतला एकांतही काही मला धडपणे मिळत नसे. लगेच गर्भभारित मन मोठमोठ्यानं वाजणारी वाद्ये ऐकायला आसावून जाई. अचानक चमत्कारिक ढगळ असुरी वेष अंगावर धारण करावेत असंच वाटे.

या वेळचं माझं डोहाळजेवण मात्र अठरा कुलांतील यादवांनी, त्यांच्या सर्व स्त्रियांनी कणभरही त्रुटी न ठेवता अविस्मरणीय असंच घातलं. अठरापगड यादवांच्या दोन्ही द्वीपांवर किती पंगती उठल्या याचा सुमार नव्हता. ते योग्यच होतं. सुवर्णी

द्वारकेच्या नव्या महाजनपदाचा नवा अंकुर येणार होता. तसं बलरामदादांना – त्यांना मीही आपापत: भावजी ऐवजी 'दादा'च म्हणत गेले. विशेष म्हणजे त्यांनाही ते मुळीच खटकलं नाही. त्यांना दोन सशक्त पुत्र होतेच – निशठ आणि उल्मुक नावांचे. ते सर्वांना आणि त्याहून अधिक श्रींना फार प्रिय होते. श्रींचा असा हा मात्र प्रथम पुत्र असणार होता. श्रींपेक्षा दादांनाच त्याचं जास्त कौतुक होतं. एवढा मोठा गदायोद्धा – बघणाऱ्याला धाकच वाटावा असा धिप्पाड यादव, पण स्वत:चं युवराजपण विसरून माझी भेट घ्यायला राणीवशाच्या द्वीपावर येई. आपलं सर्व यादवी रांगडेपण विसरून या गर्भारपणात काय–काय दक्षता घेतली पाहिजे, हे बारकाव्यानं दादा मला समजावून सांगत. अगदी थोरल्या मातेसारखं. आणि हटकून मध्येच म्हणत, "त्या धाकट्याला काऽहीही कळत नाही! मी त्याला चांगला ओळखतो! तो राजसभा, ऋषिमुनींच्या भेटीगाठी, युद्धांच्या इंद्रजाली चाली, हालचाली, राजकारण यातच सदैव दंग असतो. तू आपली मुळीच त्याच्यावर विसंबून नको राहूस. काय लागेल ते नि:संकोच सांगत जा हिला – रेवतीला!"

का कुणास ठाऊक; त्यांचं बोलणं ऐकताना मला अंमळ हसूच येई. निकरानं नि कौशल्यानं मी ते रोधून धरे. युवराजांना मी म्हणे, "मीही चांगलीच ओळखते त्यांना. तुमच्यासारखीच. काहीही हवं नकोसं झालं की, ताईंना कशाला, तुम्हालाच सांगेन की मी – नि:संकोचपणानं दादा!" तसं 'ठीक–ठीक' म्हणत मान मागे टाकून आपलं भरदार वक्ष गदगदवीत ते असं काही अरागस खळाळ हसत की, उभं द्वीप थरकून जावं.

तो प्रद्युम्नाच्या जन्माचा दिवस आणि होय, तो सप्ताहच मी विसरू म्हटल्यानं आजही विसरू शकत नाही. प्रद्युम्नाचा जन्म झाला ऐन मध्यरात्री. माझ्या सूतिकाकक्षाच्या बाहेर तर झाडून सारे निवडक ज्येष्ठ आणि तरुण यादव कुतूहलानं दाटले होते. श्रींच्या प्रथम पुत्राची त्यांना अचूक जन्मवेळ उचलायची होती. वेगवेगळया सुवर्णी जलसंपन्न घंगाळांत त्यासाठी वेगवेगळी सुवर्णी घटिकापात्रं सोडली होती. निष्णात पुरोहित आणि जातकतज्ज्ञ गर्गमुनींच्या दृष्टीखाली दक्षतेनं बसले होते.

समयपालांनी ऐन मध्यरात्रीच्या ठोक्याला समयतबकांवर सशक्त टोल दिले. त्यांचा अचूक एकच समयबोल उठला, 'ठण्णऽ!' गर्जत्या समुद्रगाजेत तो विरला. घंगाळांतील घटिकापात्रं त्याचवेळी डुबली. त्याचवेळी सूतिकाकक्षात नव्या यादवानं माझ्या कुशीत प्रणवाचा हुंकार दिला. 'टचॅंऽऽ हा!'

द्वीप द्वारकेवर ऐन मध्यरात्री टळटळीत दिवस उजाडला. द्वारकेच्या कोटावर, चारी महाद्वारांच्या, असंख्य उपद्वारांवर अशी वितभर जागा उरली नाही, जिथं करंजतेलाची तेवती दिवली चढली नाही. आनंदोत्फुल्ल यादवांच्या गटागटांनी इडादेवीचा जयकार करीत टिपऱ्या, झिम्मा, लेझिम यांचे खेळ वाद्यांच्या गजरात मांडले. महाराज, राजमाता, दादा, ताई यांनी मुठीमुठींनी सुवर्णमुद्रा दान केल्या.

सोएर पडलेल्या बाळंतिणीच्या कक्षात बाळ यादवाचं दर्शन घ्यायला श्री किंवा प्रमुख स्त्री-पुरुष कुणीही येऊ शकत नव्हतं. तशी प्रथाच होती. सर्वांना तो दहा दिवसांनंतरच काय तो नीट बघायला मिळणार होता. दाट कुरळ्या कृष्णवर्णी जावळाचा, रसरशीत रक्तवर्णाचा, गुटगुटीत, समुद्रवाऱ्याच्या लहानशा झुळकीवरही गुब्बार गालावर पटकन खळी खिलविणारा! झोपेशिवाय अन्य वेळी समुद्रलाटांसारखे अविरत

धडाधड हातपाय झाडणारा. अग्निलोळासारखा. खरोखरच किती सार्थ शोभून दिसणार होतं त्याचं आम्ही ठेवणार होतो ते नाव 'प्रद्युम्न' हे! 'प्रद्युम्न' म्हणजे तेजवंत सूर्य!!

बाळाची पाचवी आली. गेले पाच दिवस यादवांची राजनगरी द्वारका अहोरात्र अखंड आनंदात कशी डुंबून निघाली होती. पाचवीची रात्र उतरली. उद्या बाळजन्माचा सहावा दिवस होता. 'त्रिकालसंचारी सटवाई' आपल्या गुप्त पावलांनी येऊन उद्या बाळ यादवाच्या ललाटी त्याचं भाकित रेखून जाणार होती. केवल तिलाच माहीत असलेलं!

सहावा दिवस उजाडला. उजाडला कसला काळरात्र घेऊनच आला तो! बाळाच्या सालंकृत पाळण्याकडून माझी सुईण वेत्रा, "मऽहाऽराऽणीऽऽ घात झाला! बाळ यादवराजे पाळण्यात कुठं दिसतच नाहीत. वाचवा – मला वाचवा!" असं पिळवटून ओरडत, आक्रोशत वक्ष पिटत माझ्या मंचकाजवळ आली.

तिच्या थरारक आक्रोशानं मी दचकूनच जागी झाले. गेले पाच दिवस निद्रा नसल्यानं मी तिच्यावर ओरडले, "काय झालं वेत्रे? आभाळ फाटलं की काय ती एवढी ओरडतेस?"

"फाटलंच देवीऽ बाळयादव कुठं दिसतच नाहीत पाळण्यात! आता कसं म्हणून होणार माझं युवराजांसमोर?" युवराज बलरामदादांच्या भयानं ती अंगभर थरथर कापू लागली. अंगावर वज्राघात झाल्यासारखी मी दुलई झटकून पाळण्याकडे झेपावले. वेड्यासारखी मी पाळण्यातली त्याची पांघरुणं उलथी-पालथी केली. बाळ नव्हता! कुठंच नव्हता. वीज – वीजच कोसळली जशी काही माझ्या सर्वांगावर. श्रींच्या पहिल्या अंकुराचं – सुकुमार बाळाचं एवढ्या कडेकोट पहाऱ्यातूनही अपहरण झालं होतं!!

"माते अंबिकेऽऽ! इडेऽऽ!" असा टाहो फोडत, धाडकन कोसळून मी मुर्च्छितच झाले. हां-हां म्हणता ही हृदयभेदी कटू वार्ता यादवांच्या राजमंडळात आणि उभ्या द्वारकेत वाऱ्यासारखी पसरली. पाच दिवस आनंदविभोर असलेलं राजनगर क्षणात खाडकन काळवंडून गेलं. कधी नव्हे तो; सुधर्मा राजसभेवरच्या ध्वजदंडावरील भव्य गरुडध्वजा आज सकाळीच अर्ध्यावर खाली घेण्यात आली. यादवांच्या झुंडीच्या झुंडी राणीकक्षाच्या द्वीपावर माझ्या सांत्वनासाठी लोटू लागल्या. अमात्य, दोन्ही सेनापती त्यांना परस्पर निवारू लागले.

दादांसह श्री अंतःपुरात मला भेटायला आले. मस्तकी सुंठेचा लेप माखलेली मी मंचकावर झोपून होते. निस्राण. अद्यापही माझं बधिर मस्तक ठणकतच होतं. माझ्या शेजारी मंचकावर बसत श्रींनी आपला हात अतीव प्रेमानं माझ्या मस्तकावर ठेवला. त्या दिव्य, प्रेमळ स्पर्शातच केवढंतरी अभय व आश्वासन होतं. मी नेत्र उघडले तसं स्पर्शापेक्षा कितीतरी मृदू स्वरात मुखभर हसून श्री म्हणाले, "धीर धर रुक्मिणी. त्याला काऽहीही झालेलं नाही, होणारही नाही! योग्य समयी तो परतेल. धीर धर."

श्रींच्या मुखातून आलेल्या त्या अमृतबोलांवर मी दृढ विश्वास ठेवला, स्वतःला निकरानं सावरलं. या काळात दादांचे निशठा व उल्मुक हे लाघवी आणि बोलके पुत्र माझ्या अधिक जवळ आले. त्यांच्या माझ्याभोवती आसपास नुसत्या वावरण्यामुळे मला खूप सांत्वना मिळाली. त्यांना माझ्या कक्षात सदैव पाठविण्याची कल्पनाही श्रींचीच. हळूहळू प्रथम पुत्राच्या अपहरणाचं दुःख मी बाजूला सारलं. द्वारकाकरांनीही तेच केलं. अशा कुठल्याही वेदनेवर काळ हीच औषधी मात्रा असते हे खरं.

वरवर तरी द्वारकाकर अपहरित बाळयादवाला विसरून गेले. मी नव्हते विसरू शकत. काहीही झालं तरी मी माता होते त्याची. तो प्रथम पुत्र होता माझा. त्याला मनभर हृदयाशी बिलगतं घेणं, नीट पाजणंही झालं नव्हतं. त्याच्या जन्मदात्या श्रींनी तर त्याला एकदाही डोळाभर नीट बघितलंही नव्हतं! मी सतत विचार करीत राही. कुणी केलं असावं त्याचं अपहरण? कशासाठी? विचार करकरून मस्तकीचे टाके उसवणीला येत. मग थकून शांत होऊन मी मंचकावर नुसतीच पडून राही. तरीही बाळाचा विचार भुंग्यासारखा माझा पाठपुरावा करीतच राही. मन पोखरत राही.

तसे यादव हार खाणारे कधीच नव्हते. मगधसम्राट जरासंधाशी सतरा वेळा शौर्या-धैर्यानं लढून ते इथं द्वारकेत आले होते. शून्यातून अपार परिश्रमांनी त्यांनी ही रम्य नगरी उठवली होती. हरवल्या बाळाचा कसून शोध घेण्यासाठी यादवांनी कमर कसली. निष्णात गुप्तचर नाना वेष पालटून चौफेर सुटले.

बाळाच्या शोधाच्या सत्रात अगदी अनवधानानं कुणाच्या ध्यानी आलं नाही, ते राज्य म्हणजे यादवांचं शूरसेन. हे आमचंच मूळचं राज्य.

बाळाच्या अपहरणानंतर सहा महिन्यांतच द्वारकेत एक अघटित घडलं. त्याचं असं झालं. सुधर्मा राजसभेतील दशसदस्यीय राजमंडळात सत्राजित नावाचे एक प्रतिष्ठित ज्येष्ठ यादव मंत्री होते. त्यांच्या पत्नीचं नाव होतं वीरवती. सत्राजितांना एक जुळा बंधू होता. प्रसेन नावाचा. दिसायला अगदी त्यांच्यासारखाच. स्वभावानं करारी. दोन्ही बंधूंचा राजमंडळात फारच दबदबा होता. त्याला कारणही तसंच होतं. सत्राजित नैष्ठिक सूर्यभक्त होते. त्यांच्या भव्य वास्तूत नेहमी धार्मिक अधिष्ठानं चालत.

या कडक सूर्यभक्तीनं सत्राजितांना 'स्यमंतक' नावाचं एक बहुमोल मणिरत्न प्राप्त झालं होतं. परिसासारखे अमोल गुण त्या मण्यात होते. त्याचं वास्तव्य जिथं असेल तिथं सुबत्ता व आरोग्य आपोआपच नांदत राही. सविध पूजा बांधून जेवढ्या भाराचा लोहतुकडा त्याला स्पर्शून ठेवण्यात येई, तो मंत्रघोषात सुवर्णाचा होई. या सुवर्णाच्या बळावर सत्राजित मोठे धनवान झाले होते. त्यांची सर्व अपत्यं लाडात वाढली होती. सशक्त नि सुंदर होती. त्यातही ज्येष्ठ कन्या सत्यभामा ही तर अधिक लाडात वाढलेली. अप्रतिम सौंदर्यवती व विलक्षण हट्टी होती. तिच्या सौंदर्याची ख्याती द्वारका, सौराष्ट्र, आनर्तात तर पसरली होतीच, पण दूरवर मध्य देशातही गेली होती.

ती ऐकून मूळच्या शूरसेन राज्यातील हृदिकांचा पुत्र शतधन्वा नावाचा भोजवंशीय यादव राजा द्वारकेत येऊन तिला मागणी घालूनही गेला होता. तो द्वारकेतील प्रमुख यादव व मंत्री कृतवर्मा यांचा बंधू होता. सत्राजितांनी 'कन्या अजून उपवर झाली नाही, झाल्यावर बघू,' असं मोघम सांगून त्याला परतविलं होतं. तो संभाव्य होकारच मानून शतधन्वा सत्यभामेच्या आशेवर निघून गेला होता.

श्रींना यातील काही म्हटल्या काहीही माहीत नव्हतं. असण्याचं कारणही नव्हतं. त्यांच्या मनी सदैव शूरसेन राज्याचे व मथुरेचे विचार असत. इकडे द्वारका श्री व दादांच्या पराक्रमावर भरभराटत चालली होती. शुक्ल पक्षातील चंद्रासारखं तिचं वैभव दिवसागणिक वाढतच चाललं होतं. तिकडे मथुरेत उरल्या-सुरल्या यादवांना घेऊन महाराज उग्रसेन राज्यकारभार बघत होते. सततच्या लढायांमुळे त्यांच्या कोषागाराची

स्थिती हवी तेवढी समर्थ नव्हती. त्याला हातभार लावणं आवश्यक होतं.

काही एक पक्का विचार मनी बांधून एके दिवशी श्री, उद्धवभावजींच्यासह अमात्य विपृथूंना घेऊन सत्राजितांच्या वाड्यात गेले. आगतस्वागत, फलाहार, दूध झाल्यानंतर बैठकीच्या कक्षात श्रींनी सत्राजितांसमोर प्रस्ताव ठेवला. "ज्येष्ठ काका, माझी आपणाला एक नम्र विनंती आहे. आपण सर्व यादव मूळचे मथुरेचे. ते एक स्थान वृद्ध महाराज उग्रसेन शर्थीनं राखताहेत. वार्ता आहेत, त्यांच्या कोषागाराची दु:स्थिती आहे. आपण सर्वांनी ती सावरली पाहिजे. यास्तव एक प्रस्ताव घेऊन मी आलो आहे."

"बोला द्वारकाधीश! कसला प्रस्ताव?" नाही म्हटलं तरी सत्राजितांच्या मनी आपल्या लाडक्या सत्यभामेला ही दुसरी मागणी तर नाही ना, अशी शंका येऊन गेली.

"मी म्हणतो, आपल्याकडील बहुमोल स्यमंतक मणिरत्न समंत्र आपण सुधर्मा राजसभेत माझ्या स्वाधीन करावं! मी ते उद्धव व गर्गमुनींसह मथुरेला उग्रसेन महाराजांकडे धाडीन." श्रींनी नेहमीच्या पद्धतीनं हसत अलिप्त मनानं प्रस्ताव ठेवला.

तो ऐकून सत्राजित गडबडलेच. आपल्या व्यवस्थापकाकडे बघत म्हणाले, "हे काय भलतंच मागणं? आमच्या जागी तुम्ही असता तरी हे मान्य केलं नसतं, द्वारकाधीश. क्षमा करा, हे अशक्य आहे!"

ते धडधडीत व अवमानकारक उत्तर ऐकताना 'ठीक आहे. जशी ज्येष्ठांची इच्छा!' असं उत्तर देतानाही श्री निर्लेप हसले. उद्धवभावजी मात्र एका ज्येष्ठ आप्तांकडून आपल्या दादांना मिळालेला हा नकाराचा आहेर ऐकताना खोलवर कुठंतरी दुखावले होते. सर्वच त्या कक्षाबाहेर निमूटपणे यायला निघाले. कुणीच काही बोलत नव्हतं. अशातच आपल्या अश्वपालाशी तणतणत एक चपलांग स्त्री त्या वास्तूत शिरली. नुकतीच अश्वारोहणाची दीक्षा घेऊन ती परतली होती. विपृथू, उद्धवभावजी व निवडक यादवांच्या मेळात आपल्याच वास्तूत प्रत्यक्ष श्रींना बघताच मात्र ती चपापली. स्त्रीसुलभ संकोचानं सावरत मुकाट आत निघून गेली. स्यमंतक मण्याच्या अद्भुत नाट्याला प्रारंभ झाला!

काही दिवस गेले. राजनगरी द्वारका आपल्या नित्य व्यवहारात गढली होती. अशातच एक दिवस सत्राजितबंधू प्रसेन यानं आपली मृगयेची रथदलं व अश्वसाद बाहेर काढले. यादवांच्या प्रथेप्रमाणं तो वाजत-गाजत मृगयेला निघाला. त्यांची मृगयापथकं शुद्धाक्ष द्वारातून बाहेर पडून नौकांतून आनर्तात उतरली. कधी नव्हे ती प्रसेनाला आजच बुद्धी झाली होती, नक्षीदार सोनसाखळ्या जडवलेला कौस्तुभासारखा शोभून दिसणारा स्यमंतक मणी कंठात धारण करण्याची! त्याची मृगयापथकं ऋक्षवान पर्वताच्या घनदाट अरण्यात शिरली. जशी रैवतकावर होती, तशीच या पर्वतात वनराज सिंहांची मोठी दाट वस्ती होती. प्रसेन घोड्यावरून भाला पेलत एका सुळेदार, मत्त रानडुक्कराच्या पाठलागावर पडला. मृगयेत दंगला. त्याला भान राहिलं नाही.

अचानक एक आयाळधारी प्रचंड सिंहाचं डरकाळणारं, अजस्त्र धूड दाट झाडीतून त्याच्यावर कोसळलं. दोघांची थरारक झोंबाझोंबी त्या एकांती अरण्यात जुंपली. हिंस्त्र वनराज सिंहासमोर, धिप्पाड व शूर असला तरी मानवाचा काय पाड लागणार? सिंहानं प्रथम गुरगुरत नंतर अक्राळविक्राळ गर्जत त्या यादववीराचा देह घटिकेतच छिन्नविच्छिन्न, रक्तबंबाळ केला. सत्राजितांना प्राणप्रिय असलेलं स्यमंतक

मणिरत्न ऋक्षवानाच्या अरण्यातील रक्तथारोळ्यात गवतात एकाकी पडलं. संध्यासमय जवळ आला होता. त्या अरण्यातील निषाधराज जांबवान आपल्या भिल्ल सोबत्यांसह आपल्या वस्तीच्या गुहेकडे परतत होता. त्यानं मार्गात प्रसेनाचा निस्त्राण छिन्नविच्छिन्न देह पाहिला. पण कोणीही त्याला 'द्वारकेचा यादववीर' म्हणून काही ओळखू शकलं नाही. एका निषाधानं सुवर्णसाखळ्यांत जडवलेला स्यमंतक मणी रानझऱ्यात स्वच्छ धुऊन आपल्या स्वामीच्या – जांबवानाच्या स्वाधीन केला. सर्वांनी अरण्यातच चिता रचून प्रसेनाला अग्निदाह दिला.

सप्ताह लोटले तरी प्रसेन काही परतला नाही. आता सत्राजित प्रथम चिंताग्रस्त; आणि शेवटी शंकाग्रस्त झाले. त्यांच्या वाड्यावर सेवकांत, कारभाऱ्यात कुजबुज सुरू झाली.

प्रसेनाचा घातपात द्वारकाधीश श्रीकृष्णांनीच केला आहे! त्यांना हवा असलेला स्यमंतक मणीही त्यांनी गुपचूप पळवला आहे!

सत्राजितांनी तर वसुदेव महाराजांकडे विशेष सुधर्मा राजसभा बोलविण्याची चक्क आग्रही मागणी घातली. ठरल्या दिवशी ठरल्या वेळी राजसभा भरली. महाराज वसुदेवांसमोर संतप्त सत्राजितांनी कडकडीत व कठोर शब्दांत श्रींवर सरळ आक्षेपच घेतला. ते कडाडले – "महाराज, तो द्वारकाधीश व आपला पुत्र आहे म्हणून आपण या अपराध्याला क्षमा करणार काय? माझ्या प्रिय बंधू प्रसेनाची अरण्यात एकांती गाठून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. त्याच्याजवळ असलेला सुलक्षणी, तेजस्वी स्यमंतक मणी धूर्तपणे लुबाडण्यात आला आहे. यादवांच्या कल्याणाची धुरा आपल्याच स्कंधावर असल्याचा टेंभा मिरविणाऱ्या आपल्या कनिष्ठ पुत्रानं – श्रीकृष्णानंच हे घोर चौर्यकर्म केलं आहे! एका यादवाच्या हत्येसह!! माझ्या बंधूचा तो वधिक आहे! याचा योग्य तो निवाडा राजसभेनं निःपक्ष न्याय्य मनानं करावा. माझं स्यमंतक मणिरत्न मला परत करावं. अपराध्याला कठोर शासन व्हावं!"

त्या संतप्त आक्षेपाच्या घणाघाती आघातांनी उभी सुधर्मा राजसभा थरारली. ज्येष्ठत्वाच्या, मंत्रिपदाच्या आणि अपार ऐश्वर्याच्या बळावर म्हणूनच सत्राजित भर सभेत श्रींवर हा असा कठोर आक्षेप घेऊ धजले. यादवसभेत क्षणात कुजबुज माजली. क्षणागणिक ती वाढत चालली. खड्गाच्या मुठीला हात घालत, नेत्रांतून अंगार फेकणारे सेनापती सात्यकी सत्राजितांकडे तिरस्कारानं बघून प्रथम उठले. युवराज दादांची भक्कम मूठ गदादंडावर आवळली गेली.

"हे असत्य आहे. यःकश्चित मणिधारकानं यादवांच्या कंठातील मणी असलेल्या श्रीकृष्णांवरचा हा आक्षेप तत्काळ क्षमायाचनेसह मागे घ्यावा. अन्यथा परिणामाला सिद्ध व्हावं. धिक्कार! धिक्कार!" कोण-कोण, कुठून-कुठून बोललं, ते समजलंही नाही.

आता उभ्या राजसभेची दृष्टी आमच्या आसनांवरच खिळली. मी तर कधीच न पाहिलेला समोरचा राजसभेचा देखावा पाहून हादरलेच. मनी शंकांचा, प्रश्नांचा कल्लोळ उठला. मी हादरलेय हे जाणूनही माझ्याकडे नेहमीच्याच चतुरपणानं हसून बघत श्री अतीव शांतपणे उठलेच. त्यांची ऐकतच राहावी अशी नादमय, अमोघ, वेणुवाणी लयीत स्त्रवू लागली –

"यादव वीरहो! शांत व्हा – शांतच राहा. सुधर्मा राजसभेचे ज्येष्ठ मंत्री, आदरणीय

सत्राजितकाका यांचं मी प्रथम हार्दिक अभिनंदन करतो!” या पूर्णत: अनपेक्षित व चमत्कारिक प्रारंभानंच सभा क्षणात चिडिचूप झाली. एकाग्रतेनं ते दुर्मीळ श्रीबोल ऐकू लागली. श्रींच्या गारूडवाणीनं यादवांची सुधर्मा राजसभा पुन्हा एकदा मंत्रभारित झाली.

“अभिनंदन अशासाठी की, आज सत्राजितकाकांनी सर्व यादवांना राजनीतीचा एक निर्भय व नवा पायंडा घालून दिला आहे. कसला? तर न्यायाच्या प्राप्तीसाठी कुणाचीही पत्रास न ठेवता, घडलेला अन्याय भर सभेतही निर्भयपणे स्पष्टपणे बोलून दाखवण्याचा! माझे गुरुवर्य आचार्य सांदीपनी यांची मला हीच शिकवण आहे. माझ्या सुदैवानं ते आज राजसभेत उपस्थितही आहेत.

“मी महाराज व राजमाता यांच्या प्रतिज्ञेवर आचार्य सांदीपनींच्या साक्षीनं सांगतो, असलं काही कुकर्म मी केलेलं नाही. कधीच करणार नाही. कसल्याही सुलक्षणी आणि तेजस्वी मणिरत्नाचा मला यत्किंचितही मोह नाही. असायचं कारणही नाही!” श्रींनी हेतुत: वक्षावरील कौस्तुभमणी क्षणैक कुरवाळला.

“योग्य... वास्तव... साधु...” असे यादवांचे प्रतिसादात्मक बोल उठले. श्रींनी हात उठविताच सर्व जण पुन्हा शांत झाले. श्रींची अमृतधारा पुन्हा स्त्रवू लागली –

“यादव वीरहो! महाराज यदु आणि क्रोष्टरू यांचं स्मरण करून, कुलदेवी इडाची प्रतिज्ञा घेऊन मी घोषित करतो की, ज्येष्ठ यादव सत्राजितांचा, त्यांना प्राणप्रिय असलेला स्यमंतक मणी मी असेल तिथून शोधून आणीन. याच भरल्या सभागृहात मी तो त्यांच्या स्वाधीन करीन. मग तो पाताळात गेला असला, तरीही!

“या गुणवंत मण्याच्या निमित्तानं मी माझ्या सर्वच यादवांना निक्षून सांगेन की, मणी, सुवर्ण, धन ही केवळ साधनं आहेत. जीवनाचं ते कधीच साध्य होऊ शकत नाही. ते साध्य आहे केवळ प्रेम! कुठल्याही धनयोगापेक्षा तो योग मोठा आहे – प्रेमयोग!!

“माझी इच्छा नव्हती, पण माझ्यावर भर राजसभेत आक्षेप घेण्यात आला आहे. म्हणून सुधर्मा सभेला माहीत नसलेलं एक सत्य मला या वेळी प्रकट केलंच पाहिजे.

“मी ज्येष्ठ यादव सत्राजितकाकांकडे स्यमंतक मणिरत्नाची मागणी अवश्य केली होती, पण ती माझ्यासाठी मुळीच नव्हे. आपल्या मागे राहिलेल्या मथुराकर यादवांची दु:स्थिती सावरण्यासाठी. त्या मागणीच्या अपसमजापोटीच त्यांच्याकडून माझ्यावर हा आक्षेप घेण्यात आला आहे. या स्यमंतक मण्यामुळे मला काय मिळणार आहे की, मी त्याची चोरी करावी?”

“काहीच नाही. क्षमा मागा सत्राजित, क्षमा मागा!” पुन्हा उतावीळ यादव अनावरपणानं गर्जत उसळले. तसं हातनिर्देशानं पुन्हा त्यांना शांतवीत श्रींनी समस्त यादवांना गोंधळात टाकणारं एक विचारमंडल, तेच लाघवी हास्य मुद्रेवर खुलवीत घेतलं.

ते म्हणाले, “तसंही काही नाही यादव सुहृदांनो! माझ्या खूपच मोठा लाभ होणार आहे, या स्यमंतक मणिरत्नामुळे! प्रत्यक्ष या ज्येष्ठ यादवांना – सत्राजितांनाही तो आता माहीत नाही. योग्य वेळी कळेल.”

आता सुधर्मा राजसभा अमात्यांनी विसर्जनाचा राजदंडी ठोका देताच विसर्जन पावली.

सत्राजितांना भर सभेत दिलेलं वचन पूर्ण करणं भागच होतं. श्रींच्या भराभर आज्ञा सुटल्या. दुसऱ्याच दिवशी ते महारथी सात्यकी व अनाधृष्टी ह्या दोन्ही सेनापतींसह

ऋक्षवान पर्वताच्या अरण्यात उतरले. सोबतीला निवडक मृगयाकुशल व लढाऊ यादव सैनिक होते. त्या अरण्याची खडान्‌खडा माहिती असलेले वनवासी गुप्तचरही बरोबर होते. मला पूर्ण विश्वास होता की, श्री आता स्यमंतक मणिरत्न हस्तगत केल्याशिवाय काही द्वारकेत मुळी परतणारच नाहीत.

श्रींची स्वारी ऋक्षवान पर्वताकडे प्रस्थान ठेवून एक सप्ताह उलटला. ते ऋक्षवानात पोहोचलेत, गुप्तचर अरण्यभर पांगलेत, प्रसेनाचा कसून शोध सुरू आहे. अशा वार्ता एकापाठोपाठ एक द्वारकेत येऊ लागल्या. दुसरा सप्ताह संपायला आला असताना शेवटी ती आनंदवार्ता द्वारकेत येऊन थडकली. यशाशिवाय काहीच स्वीकारण्याची तयारी नसलेले श्री यशस्वी होऊन परतताहेत. प्रतिष्ठेचं सुलक्षणी स्यमंतक मणिरत्न घेऊन.

श्रींच्या स्वागतासाठी महाराजबाबा, थोरली माता, दादा, ताई, मंत्रिगण आणि उभं द्वारकानगर शुद्धाक्षावर लोटलं. त्यात सत्राजितही होते. मी द्वीपद्वारकेहून त्यासाठी माझ्या सेवक-सेविकांसह मूळ द्वारकेत उपस्थित झाले.

प्रथम द्वारकाधीश स्यमंतक मणिरत्न घेऊन येताहेत, असं सांगणारी रक्षक अग्रपथकं नौकांतून शुद्धाक्ष महाद्वारावर थडकली. तसा जमलेल्या लाखो यादवांनी हर्षविभोर जयनाद घुमविला – “विजयी यादवाग्रणी श्रीकृष्णमहाराऽज जयतु... जयतु” पाठोपाठ एका प्रचंड नौकेतून हत्तीच्या सुवर्णी अंबारीत बसलेल्या निवडक व्यक्ती शुद्धाक्ष महाद्वारात उतरल्या.

सप्त सुवासिनींसह पुढे होत मी प्रथम शिजल्या ओदनमुठीची इडापिडा घेत श्रींवरून त्या ओवाळून दूर फेकून दिल्या. किती तेजस्वी, विजयोत्फुल्ल दिसत होती त्यांची मुद्रा! मी सुवर्णी कुंभातील जल त्यांच्या मिटल्या पापण्यांवर उलटचा अंगुलींनी फिरविलं. स्यमंतक मण्याच्या चौर्यकर्माचा आलेला आळ माझ्या वीर पतीनं शौर्यानं परतवून लावला होता. केवढा-केवढा अभिमान वाटला मला श्रींचा!

त्यांच्या मुद्रेवर मात्र आता मला चांगलीच परिचित झालेली तीच मिश्कील खळीयुक्त, खटचाळ हास्यच्छटा माझ्याकडे बघताना तरळून गेली. नक्कीच तिच्यामागे काहीतरी गोम असणार! मी आपोआपच सावध झाले.

तसं पाठीशी असलेल्या एका सावळ्या सशक्त स्त्रीच्या दंडाला धरून तिला त्यांनी पुढंसं घेतलं. सहज म्हणाले, “हे आणखी एक स्त्रीरत्न आलं आहे स्यमंतकाबरोबर ऋक्षवान पर्वतातून. मी नाही, स्यमंतकानंच आणलेलं आहे हे. हे आलं नसतं, तर स्यमंतकही येऊ शकला नसता!” श्री नेहमीसारखं कोडचाचं जाळ फेकत म्हणाले.

मी समोरच्या अधोमुखी, बावरलेल्या यौवन-मुसमुशीत स्त्रीकडे बघितलं. ती रेखीव, बांधेसूद होती. सावळी, विपुलकेशा होती. तिच्या अंगावरच्या वेषावरून मी तत्काळ ताडलं की, ती एक वन्य स्त्री होती – एक आदिवासी यौवना होती. द्वारकेच्या अंगावर येणाऱ्या वैभवशाली दर्शनानं ती मनोमन बावरून गेली होती. दाट पापण्या फडफडवीत ती भेदरलेल्या पक्षिणीसारखी टुकुटुकु माझ्याकडे नुसतीच बघत राहिली.

“केवळ तुझ्या विश्वासावर गांधर्व विवाहानं पत्नी म्हणून, तुझी सोबतीण म्हणून आणलं आहे मी हिला रुक्मिणी! ‘जांबवती’ नाव आहे हिचं. ऋक्षवानातील निषाधराज जांबवानांची कन्या आहे ही!”

श्री बोलून गेले... अगदी सहज... नेहमीसारखं. माझी स्थिती मात्र प्रथमपुत्र हरवला त्या क्षणासारखी झाली! उभं शुद्धाक्ष महाद्वार भोवती गरगर फिरल्याचा क्षणैक

भास झाला. मात्र तो क्षणैकच. दुसऱ्याच क्षणी मी सावरले. “ये जांबवती, माझ्या छोट्या भगिनी, मला कडकडून गळा भेट एकदाची!” मी समोरच्या आदिवासी सौंदर्याला अभय देताना हात पसरले. ती आसुसल्यासारखी एकदम माझ्या गळ्यात पडली. हमसत पुटपुटली, “मला काही समजत नाही इथलं. सांभाळून घ्या मला ताई.” तसं मी तिला थोपटत शांत केलं.

श्रींनी तिच्या पित्याची – सोबत आलेल्या जांबवानांची सर्वांना ओळख करून दिली.

मी जांबवतीला मिठीत घेताच द्वारकाकर यादवांनी तिला श्रींची द्वितीय राणी म्हणून स्वीकारली होती. श्रींनी टाकलेला सुटकेचा नि:श्वास तर मी त्याच क्षणी टिपला होता.

जमलेल्या लाखो उत्साही यादवांच्या, “यादवराज्ञी जांबवतीदेवीऽ... जयतु... जयतु!” या स्वागत घोषातच जांबवतीनं शुभपदांनी द्वारकेत प्रवेश केला.

हे अतर्क्य घडलं तरी कसं होतं? तर ऋक्षवानात श्रींनी स्यमंतक निषाधराज जांबवानाच्या हाती पडल्याचा शोध लावला होता. त्याच्या गुहेत त्यानं तो सुरक्षित लपवून ठेवला होता. यादव सैन्यानं त्या गुहेला घेर टाकला. सेनापती सात्यकी आणि अनाधृष्टी यांनी रानवेलींचे भुजबंध घालून निषाधराज जांबवानाला श्रींसमोर अपराधी म्हणून सादर केलं. त्याच्याकडे असलेल्या स्यमंतक मण्याची मागणी श्रींनी घालताच तो बिथरला. म्हणाला, “ते रत्न माझ्याकडे आहे. पण प्राण गेला तरी मी ते तसं देणार नाही. मला एक अभय पाहिजे.”

“कसलं अभय?” त्या निडर निषाधराजाचं उत्तरही श्रींना मनोमन आवडलं. जांबवानानं त्यांना आपल्या निषाधी प्रथेचा रानखोडा घातला. तो म्हणाला, “माझं एकुलतं एक कन्यारत्न आहे. जांबवती. ते तुमच्या या यादव म्होरक्यानं बायको म्हणून पत्करावं! तरच लपवलेलं ते स्यमंतक मणिरत्न मी बाहेर काढीन. नाही तर प्राण गेला तरी नाही!”

कसला विचार करून कुणास ठाऊक, श्रींनी ती चमत्कारिक अट स्वीकारली होती! एका चांद्रवंशीय क्षत्रिय नरश्रेष्ठानं एका आदिवासी वनकन्येचा पत्नी म्हणून सादर स्वीकार केला होता. या आर्यावर्त देशी यापूर्वी असं कधीच घडलं नव्हतं. केवळ ‘श्री’ च असं काही करू धजले होते.

स्त्रीमनाचं – त्यातही राज्ञीमनाचं – जांबवतीला मिठी भरताना माझं मलाच आश्चर्य वाटलं. तिच्या मिठीतच माझ्या मनात एक चमत्कारिक विचार तरळून गेला. कौंडिण्यपुरात माझ्या स्वयंवरासाठी जमलेल्या, श्रींना गवळी म्हणून हिणविणाऱ्या, ‘सम्राट’ म्हणविणाऱ्या जरासंधासह एकातरी क्षत्रिय पुरुषोत्तमाचं असं करण्याचं धैर्य झालं असतं का? त्यातील एकानं तरी स्वीकारली असती का, एक आदिवासी स्त्री आपली पत्नी म्हणून?

जांबवतीच्या शुभकर अरण्यपावलांनी मी कधीच कल्पना केली नसती, अशी एक-एक गोष्ट माझ्या जीवनात आपोआप येऊ लागली. ती रानझऱ्यासारखी निरभ्र, निष्कपट मनाची होती. यादवांचं राजमंडळ त्यांच्या रासक्रीडेपासून मृगया, खेळ, उत्सव, सण, स्वयंवर, त्यांच्या प्रथा, त्यांचे वेष, अलंकार, आदरातिथ्याचे प्रघात, शिष्टाचार – तिला काही म्हटल्या काही माहीत नव्हतं. तरीही रानसाळुंकी पक्षिणीनं सत्तूचे दाणे टपाटप

टिपावेत, तशी ती मी सांगेन तसं यादवांचं राजजीवन नैसर्गिक चातुर्यानं पटापट उचलत चालली. आता माझी घटकान्घटका तिला याची दीक्षा देण्यात रमू लागल्या. रमू अशासाठी लागल्या की, बोलताना नकळतच तीही मला अरण्याचे दुर्मीळ बारकावे सांगे. ते सांगताना ती आपली माता ऋक्षराज्ञी व्याघ्रीचा अत्यंत आदरानं निर्देश करी. मग मीच कुतूहलानं तिला नाना प्रश्न विचारी. तीही मला अरण्यातले नाना पक्षी, प्राणी, वनस्पती यांची भरभरून माहिती देई. ती ऐकताना माझी मीच कधी-कधी हसत राही. अशा विचारानं की, मी कसली दीक्षा देणार हिला? हीच तर मला अरण्यदीक्षा देऊन माझी गुरूच होत चाललीय.

मला हसताना बघून मध्येच थांबत ती म्हणे, “ताई, तुमचं हसणं मला फाऽर फाऽर आवडतं!” तिच्या या बोलण्याबरोबर माझ्या मनी श्रींची आठवण हटकून झरझरून उभरून येई. मी तिला म्हणे, “जांबे, माझं कसलं हसणं? तू तुझ्या पतिदेवांना एकदा हसताना बारकाव्यानं बघ. कितीतरी अगणित छटा तुला दिसतील त्यात!”

मग श्रींच्या नुसत्या नावानं आम्ही दोघीही लहान मुलींसारख्या कितीतरी वेळ खळाळ हसतच राहू.

आता स्यमंतक हाती येताच श्रींनी अमात्य विपृथूंना सांगून विशेष सुधर्मा राजसभा बोलावली.

अमात्यांनी राजसभेचं प्रयोजन सांगताना निवेदन केलं –“द्वारका जनपदाच्या वीर यादव हो, आपल्या प्रत्येकाचा ऊर सार्थ अभिमानानं भरून यावा, असा विक्रम द्वारकाधीश श्रीकृष्णांनी केला आहे. आपल्या सुलक्षणी, तेजस्वी स्यमंतक मणिरत्नाचं अपहरण केल्याचा सर्वथा अनृत आरोप ज्येष्ठ यादव सत्राजितांनी त्यांच्यावर केला होता. तोही याच भर राजसभेत.

नाना घटितांनंतर तो मणी ज्या निषाधराज जांबवानाकडे होता, त्याच्याशी युद्ध करून यादवश्रेष्ठ श्रीकृष्णांनी तो द्वारकेत सुखरूप परत आणला आहे. त्यांच्या विक्रमावर जांबवान प्रसन्न झाले. निषाधराजांनी आपली कन्या जांबवतीदेवी त्यांना पत्नी म्हणून अर्पण केली आहे. प्रथम आपण सर्वांनी त्यांचा रुक्मिणीदेवींनंतर श्रीकृष्णपत्नी म्हणून सादर स्वीकार करावा.” उंच रत्नजडित राजदंडाचा सभागृहाला सावध करणारा ठोका अमात्यांनी दिला.

तसं “राणी जांबवतीदेवीऽ जयतु! निषाधराज जांबवान महाराजऽ जयतु!ऽ जयतु!ऽ जयतु! श्रीकृष्ण महाराज जयतु! महाराणी रुक्मिणीदेवीऽ जयतु!” असा संमतीचा घोषच घोष सर्वांनी केला. समस्त यादवांना आता सवयच पडली होती, मला महाराणीच म्हणण्याची. तशा थोरल्या माता सिंहासनावर असतानाही माझ्या नावाचा त्यांनी ‘महाराणी’ म्हणून जयकार दिला होता. यावर श्रींची पत्नी म्हणून शोभेल, असा बुद्धिकौशल्याचा तोडगा आता मलाच काढणं भाग होतं, मी बसल्या आसनावरच मनोमन ठरवून टाकलं की, थोरल्या मातांना आपणच आता आजपासून ‘थोरल्या महाराणी’ म्हणायला सुरवात करायची! यामुळे मी आपोआपच ‘महाराणी’ होणार होते. ‘धाकल्या महाराणी’ म्हणून –‘रोहिणीमाता’ होत्याच!

“आणलेलं स्यमंतक मणिरत्न द्वारकाधीश याच सुधर्मा राजसभेला साक्षी ठेवून ज्येष्ठ यादव सत्राजितांच्या ते स्वाधीन करणार आहेत.” अमात्य म्हणाले.

श्री आसनावरून उठले. त्यांच्या हाती मणिरत्न ठेवलेली नक्षीदार शिसम पेटिका होती. सत्राजित मंत्रिगणांच्या मंडळातून थरथरतच श्रींजवळ आले. नेहमीचं मंद, चतुर हसत श्रींनी हातची मणिपेटिका त्यांच्याकडे सुपूर्द करून विनयानं त्यांना नमस्कार करताच टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटी गजरात, “देवी इडेचा विजय असो. महाराज वसुदेव, महाराणी देवकीदेवींचा त्रिवार-त्रिवार विजय असो!” या घोषांनी सुधर्मा निनादून गेली.

याच सभागृहात श्रींवर केलेल्या अविचारी आरोपाचं स्मरण झाल्यानं सत्राजित आता अपार-अपार खंतावले होते. खजील झाले होते. पेटिका हाती धरून थरथरत्या वृद्ध बोलात ते म्हणाले, “ज्येष्ठ असलो, वृद्ध असलो तरी श्रीकृष्णानं मला सुधर्मा सभेच्या साक्षीनं क्षमा करावी! माझ्याजवळ माझ्या हृदयभाव स्पष्ट करण्यासाठी पुरेसे व योग्य शब्दच नाहीत. केवळ एकच कृती करणं मला शक्य आहे. पिता म्हणून. आज या क्षणी मी माझी उपवर सुंदर कन्या सत्यभामा श्रीकृष्णाला त्याची पत्नी म्हणून अर्पण करीत आहे!! तिचा त्यानं स्यमंतकासह उदार मनानं आपली तिसरी राणी म्हणून स्वीकार करावा!”

“मान्य... मान्य... द्वारकाधीश महाराज श्रीकृष्ण स्वमंतकासह हा दुसरा उपहारही मान्य करा. तुम्ही त्यासाठी सर्वथा योग्यच आहात.” नित्य रणोत्सुक असलेले यादव एकमुखी सततचा गजर करू लागले. या वेळी श्री शेजारीच बसलेल्या माझ्याकडे एकटक नुसतंच बघत राहिले. किती प्रश्न लपले होते त्या बघण्यात! ते मूकपणंच जसं काही विचारत होते, ‘काय करावं मी? तुझं मत काय? स्वीकारावीत दोन्ही रत्नं? भद्रे, आहे तुझी संमती?’ मी लवत्या पापणीनं व मानेनं त्यांना मूक होकारच भरला. तरीही काही क्षण ते माझ्याकडे बघतच राहिले. काहीतरी अमान्य असल्यासारखी त्यांची मान डुलली. मग मात्र ते शांतपणे उठले. टाळ्यांच्या कडकडाटानं आणि जयनादांनी सुधर्मा सभा निनादून कोंदली गेली.

श्री अत्यंत धिम्या, निर्धारी बोलांत बोलले, “यादवजनहो, भ्रमात राहू नका! मी दोन्ही नाही केवळ एकाच रत्नाचा – स्त्रीरत्नाचा स्वीकार करतो आहे. स्यमंतक मण्याचा कसलाही लोभ मला कधीही नव्हता. असणारही नाही. मी तो ज्येष्ठ यादवांना – सत्राजितकाकांना विनम्र भावानं, तेच त्याचे योग्य अधिकारी आहेत, हे जाणून सुधर्मा सभेच्या साक्षीनंच त्यांना परत करत आहे! हे मणिरत्न त्यांनी स्वीकारावं. त्याच्या धनबळावर आपली सूर्याराधना अखंड चालू ठेवावी. द्वारकेत आरोग्य व स्वास्थ्य राहील, असं यापुढे या मणिरत्नाचं नैष्ठिक संगोपन करावं.” सत्राजितांनी हाती दिलेली पेटिका श्रींनी पुन्हा त्यांच्या स्वाधीन केली. त्यांनी माझ्या होकाराला अर्धवट मान डोलावून अर्धा नकार का दिला होता, याचा उलगडा आता कुठं झाला.

स्यमंतक मणिरत्न नाट्याचा दुसरा अंक माझ्या जीवनात ही दुसरी सवत आणि श्रींच्या जीवनात तिसरी पत्नी आणून संपत होता.

जांबवतीला मी सहज आपलीशी करू शकले. सत्यभामेला तशी करणं महाकठीण होतं. काही झालं तरी ती एक यादव कन्या होती. धनवान पित्याच्या घरी लाडात वाढल्यानं शिष्ट, अहंमन्य क्षत्राणी होती. खरोखरच ती अप्रतिम सुंदर होती. तशीच धाडसीही. त्यामुळेच तर ती अहंमन्य झाली होती. विशेष म्हणजे आपला हा अहंकार

तिच्या कधी नीटसा ध्यानीच येत नसे! माझं सर्वांत अवघड कार्य होतं, ते इथंच. कुणाचं म्हणून काही ती शांतपणे ऐकूनच घेत नसे – कधी-कधी श्रींचंही! का कुणास ठाऊक, पण माझ्यासमोर मात्र ती नमूनच असे.

श्रींना हे प्रकरण एकूणच जड जाणार, हे मला केव्हाच कळून चुकलं. शक्य होईल तेवढं आपणच हे पुढाकार घेऊन सुमार केलं पाहिजे, हेही ध्यानी आलं. मला हे यादवांची महाराणी म्हणून करणंच भाग होतं, विश्वासही होता, ती माझ्यासमोर उणं-अधिक काहीच बोलणार नाही याचा.

राणीकक्षाच्या जोडद्वीपावरच्या तीन वास्तू आता आम्हा तिघींमुळे भरल्या होत्या. सेवक-सेविकांच्या वर्दळीमुळे त्या आता नांदत्या झाल्या होत्या. आता आताशा माझ्या पूर्ण लक्षात येऊन चुकलं होतं की, भोवतीच्या पाच वास्तू अद्याप रिकाम्या आहेत. माझ्या दोघी सोबतिणींच्या काही अद्याप ते ध्यानी आलं नव्हतं. हेही पुढाकार घेऊन समय येताच वेळोवेळी दोघींच्याही गळी मलाच उतरवावं लागणार होतं.

वास्तुशास्त्रज्ञ गर्गमुनींनी मला प्रथम वंदनाच्या वेळीच सूचक संकेत आशीर्वादांसह दिला होता. "यादव कुलाच्या ज्येष्ठ महाराणी, शुभं भवतु. अष्टपुत्र सौभाग्यवती भव हा तर तुमचा अधिकारच आहे. 'अष्ट वास्तुपालिका भव' हा माझा विशेष आशीर्वाद आहे."

त्यांनी भविष्यातल्या पूर्ण धोरणानं या द्वीपातील राणीकक्षाच्या आठ वास्तू उभारल्या होत्या! त्यांचं एक सुरचित संकुलच उठविलं होतं. समोरासमोर चार–चार वास्तू आणि मधोमध भर घेराची उंच 'श्रीवास्तू!' यातल्या कुठल्याही वास्तूतून समोरासमोरच्या गवाक्षांतून समुद्रदर्शन होई. श्री शक्यतो वस्तीला या द्वीपावरच येत. कधी-कधी मूळ द्वारकेतही थांबत. समुद्र पार करून द्वारकेबाहेर गेले की, मग मात्र महिनोन्महिने त्यांचं दर्शन काही घडत नसे. मग प्रतीक्षा आणि अविरत समुद्रगाज हेच जीवन होऊन जाई.

श्रींची दोन्ही द्वीपांवरील दिनचर्या नेमस्त होती. ब्राह्मी मुहूर्ताच्या अगोदरच घटिकाभर निष्णात संगीत जाणणारे चारणगण रुद्रवीणांच्या नादमधुर स्वरात चारी वेदांतील ऋचा व स्तवनं म्हणत. नेमक्या ब्राह्मी मुहूर्तावर श्री उठत. आपल्या भावओल्या मत्स्यनेत्रांनी प्रथम करदर्शन करीत. गुलाबी तळहातावरील सुतासारख्या रक्तमय रेषांची चिन्हं निरखीत. ध्यज, चक्र, पद्म, मत्स्य, यव, स्वस्तिक अशी राजचिन्हं पारखताना स्मितहास्याच्या नाना तरल छटा त्यांच्या मुद्रेवर क्षणात तरळून जात. मग भूमीकडे बघत तिला उद्देशून अंगभूत नम्रभावे म्हणत, 'पादस्पर्श क्षमस्व मे।' मग सुवर्णी पात्रातील गोड पाण्याची बोटं ते नेत्रांवर फिरवून घेत. मंचकावर बसल्या-बसल्याच पद्मासन जमवून मिटल्या नेत्री परमात्म्याचं काही काळ ध्यान करत. याच वेळी सुदर्शनाच्या दिव्य मंत्राचं ते मनोमन स्मरण करत. अशा वेळी कधीतरी मलाच त्यांचं दुर्लभ दर्शन होई. किती तेज:पुंज दिसे त्यांची ध्यानमग्न नेत्रमिटली मुद्रा! मग हिरडा, बेहडा यांच्या कडुनिंबपत्रमिश्रित चूर्णानं अगोदरच स्फटिकधवल असलेल्या दंतपंक्ती घासत. वाळामिश्रित गंधित जलानं मुख प्रक्षाळत. काही काळ श्वसनावर नियंत्रण साधणारे आसनांचे व्यायाम घेत. या वेळी त्यांच्या विश्वासाचे निवडक सेवक-सेविका त्यांच्या सेवेत असत.

त्यांचा स्नानविधी हा एक समारोहच असे. प्रशस्त सुवर्णी घंगाळात आनर्तातल्या

विविध नद्यांचं उष्ण, समशीतोष्ण व शीतल जल भरलेलं असे. निरनिराळ्या लहान-मोठ्या सुवर्णी तसराळ्यांत विविध सुवासिक उटणी असत. गोवर्धनाच्या खाणीतून आणलेली, चाळलेली, ताक करंजेलात मळलेली पोषक लाल मृत्तिका असे. ग्रीवा, वक्ष, टाचा चांगल्या घासून निघण्यासाठी गंडकीतून आणलेल्या काळ्याकुळकुळीत पाषाणचिपा असत. उटणी, मृत्तिका यांचा लेप झाल्यानंतर वाळामिश्रित जलानं ते न्हात. त्याच ओल्या अंगावर काठेवाडी गायीच्या धारोष्ण दुधाचा सुवर्णजलमिश्रित अभिषेक ते घेत. शेवटी सुगंधी, शीतल जलाचा सुवर्ण कुंभातून अभिषेकच सेवक-सेविका सौराष्ट्रातील लोकगीतांच्या गजरात त्यांच्यावर करत.

त्यांच्या या स्नानसेवेतील सेवक-सेविकांना मी आपसात कुजबुजताना कितीतरी वेळा ऐकलं आहे की, 'श्रीकृष्ण महाराज जलाभिषेक मस्तकी घेताना सोमनाथाच्या मंदिर गाभाऱ्यातील शिवपिंडीसारखेच दिसतात!'

श्रींना असं सुस्नात होऊन राजवेष धारण करून, वक्षावर शुभ्र ताजी टवटवीत गंधित वैजयंतीमाला व मस्तकी धारण केलेला मोरपिसधारी सुवर्णमुकुट असं बघताना मला कित्येकदा ते पश्चिम सागरातून वर उठणाऱ्या आभामय सूर्यदेवासारखेच वाटत आले.

नेहमीच्या स्नानानंतर ते प्रथम माता-पित्यांसह सर्व ज्येष्ठांचं दर्शन घेत. संध्या करून धारोष्ण दुधाचा कुंभ आकंठ प्राशत. पुरोहितांच्या मंत्रघोषांत होमाला हवन देत. मग आपल्या साधनकक्षातून दिसणाऱ्या उगवतीच्या सूर्याचं पूजन करत. दर्भाच्या आसनावर बसून एकाग्रतेनं, नम्रभावे सवितृ मंत्रांचं नादमय गायत्री छंदात पुरश्चरण करत. नंतर देव व पूर्वज यांना तसेच कुलाच्या ऋषींना समंत्रक तर्पण दिलं जाई. मग नानाविध वस्तूंचं दानसत्र सुरू होई. त्या वेळी प्रथम मी एकटीच श्रींशेजारी दानं देत बसे. पुढे माझ्या आपोआपच लक्षात आलं की, आपल्या दोन्ही सोबतिणींना यात सहभागी करून घेतलं पाहिजे. त्यांचीही दोन सुवर्णी आसनं या सत्राच्या वेळी मांडण्यात येऊ लागली. नंतर श्री सुधर्मा सभेचा शस्त्रधारी असा राजवेष परिधान करत. अशा वेळी कधी ते खांद्यावर अजितंजय धनुष्य पेलत. पाठीशी ठासून बाण भरलेला तूणीर असे. कधी ते हाती घोटीव काळंशार, उंचशीळ, शिसमी सौनंद मुसळ घेत. कधी खांद्यावर सुवर्णलेप दिलेली गोल, डौलदार कौमोदकी लोह गदा असे. कधी नुसतंच कवचधारी नंदक खड्ग कमरेला आवळून ते जात. त्यांना अशा विविध शस्त्रधारी रूपात बघणं, हा माझा छंद व परमानंद होता.

सुधर्मा सभेकडे जाण्यापूर्वी प्रशस्त सुवर्णी परातीत ठेवलेल्या कढीव तुपाच्या दर्पणात आम्ही दोघं मुखदर्शन करत असू. बाहेरच्या बैठककक्षातील आसनांवर बसून पौरजन, सेवकजन, सैनिक, दलाधिकारी यांचं दुखलं-खुपलं ऐकत असू. कुणाकुणाच्या कसकशा मागण्या असतील, तसतशी पूर्तता करत असू.

या पौरजन भेटीत मला श्रींचा एक प्रमुख व ठळक गुणविशेष प्रकर्षानं जाणवत राहिला – तो म्हणजे अपार प्रेमाचा. निरपेक्ष स्नेहाचा.

अशी सकाळची आन्हिकं आणि विधी आवरून ते मूळ द्वारकेला सुधर्मा सभेकडे जायला निघत. मी काही त्यांच्याबरोबर नेहमीच नसे. विशेष सभा असली की मात्र जावंच लागे. त्यांच्या सोबतीला हटकून बलरामदादा, उद्धवभावजी, सेनापती सात्यकी किंवा अनाधृष्टी व अमात्य विपृथू नेहमीच असत. कधी-कधी या राजमंडळातील एखादी

व्यक्ती कारणवशात दिसत नसे. त्या जागी कुणी अपरिचितच अभ्यागत असे. कधी-कधी निकटचे झालेले असितदेवल, याज्ञवल्क्य, कात्यायन, गृत्समद, याज, उपयाज यांपैकी कोणीतरी ऋषिमुनी असत. गायक, नर्तक, वादक, शिल्पकार असा एखादा कलावंत असे. द्वारका जनपदाचे आर्यावर्ताच्या चारी दिशांत कुशल व चतुर गुप्तचरप्रमुख अशा वेळी मध्येच श्रींच्या कानाशी लागत. असेल ती अत्यंत महत्त्वाची गुप्त वार्ता अत्यंत थोडक्यात अचूक त्यांच्या कानी घालत. त्यांच्या आज्ञा व सूचना सावधपणे उचलत.

त्यांच्या प्रिय सारथी दारुकानं त्यांना वंदन करून रथ गरुडध्वजात आरूढ होण्याची विनंती केली की, दारुकाला पुरतं वाकून चरणस्पर्शाची संधीच न देता ते त्याचे दोन्ही हात उबदार स्नेहानं आपल्या गुलाबी ओंजळीत घेत. त्याला दृढ आलिंगन देत. मग रथाच्या मेघपुष्प, बलाहक, सुग्रीव आणि शैब्य या चारही शुभ्रधवल अश्वांना त्यांच्या नावाप्रमाणं सादवीत.

एखाद्याच्या उन्नत, पुष्ट खुब्यावर भरजोर थाप देत. खिंकाळत अंगभर भोवरा फुलवीत कान टवकारून त्यानं तत्पर प्रतिसाद दिला की, श्रींची स्वत:शीच बोलल्यासारखी ‘अश्वगीता’ सुरू होई. ती ऐकत असताना मात्र ती मूक, अश्राप जनावरं कान टवकारून तरारून उठल्यानं मला वेगळीच जाणवत. आपल्या वास्तूच्या गवाक्षातून मी ते विलोभनीय, देवदुर्लभ दृश्य एकटक अनेकवेळा डोळाभर पाहिलं आहे. पाढंऱ्याशुभ्र अश्वाच्या पुष्ट खुब्यावरील श्रींचा स्नायुमय नीलवर्णी पुष्ट बाहू दृष्टी खिळवूनच ठेवी.

रथारूढ झालेल्या श्रींनी हात उंचावून संकेत करताच दारुक गरुडध्वजाच्या वेगांना झटकून अश्वांना प्रोत्साहक ललकारी देई. आता संध्याकाळपर्यंत राणीकक्षाचं द्वीप सुनंसुनं होणार म्हणून जाणवणाऱ्या; पण व्यक्त न करता येणाऱ्या उदासीनतेनं मन कसं भरून जाई. दिवसभर यादवराज मूळ द्वारकेत सुधर्मा राजसभेच्या कामकाजात मग्न असत.

संध्यासमयी नानाविध समुद्रपक्षी कलकलत कोटरांकडे परतू लागत. सूर्यतेज मावळतीला आलेलं असे. दिवसभर नानाविध आवाजांनी वेढलेली गाज आता अधिकाधिक स्पष्ट होत जाई. श्रीरथ आमच्या द्वीपाकडे परते. दारुक तो अश्वशालेत सोडी. कधी-कधी श्रींसमोर राजनीतीची बिकट समस्या आलेली असे. अशा वेळी एखाद्या धीवर-यादवाला लहानशी नौका ते समुद्रात लोटायला सांगत. या वेळी त्यांच्याबरोबर बलरामदादा, विपृथू, सात्यकी, अनाधृष्टी, कृतवर्मा अशी त्या-त्या समस्येशी संबंधित महत्त्वाची निवडक व्यक्ती असे. उद्धवभावजी मात्र कुठल्याही वेळी न चुकता हटकून असतच असत. अशा वेळी त्या नौकेवर, दूरवरूनही दिसू शकेल, अशी पांढरीस्वच्छ त्रिकोनी पताका चढलेली असे. नौका पश्चिम सागरात लोटण्यापूर्वी धीवरानं उठवलेली समुद्रगाजेसारखीच, पण स्पष्ट ऐकू येणारी शंखध्वनीची लयही द्वीपभर निनादून जाई. तिचा स्पष्ट संकेत असे की, ‘द्वारकाधीश आता राजनीतीच्या महत्त्वाच्या गुप्त चर्चेत आहेत!’

एरवी सायंसमयी त्यांचे असिचर्या, अश्वचर्या, गजचर्या, रथचर्या, धनुर्वेद यासंबंधी व्यायाम होत. सूर्यडुबीबरोबर ते दर्भासनावर पुन्हा सायंसंध्येसाठी बसत. मग इडादेवीचं स्मरण करून यादवांची पूर्वापार चालत आलेली ईशस्तवना सुरू होई. नंतर त्यांचं रात्रीचं

भोजन होई. त्यांना दह्यादुधातले पदार्थ फार आवडत. अपूप, गुरगुटचा ओदन, सत्तूचे रोट, चटणी ते चवीनं खात. दादा, सात्यकी यांनी आनर्त-सौराष्ट्रात उतरून केलेल्या मृगयेची चवही त्यांनी चाखलेली असे. भोजन कसलंही असो, ते इतरांच्या तबकांकडे स्वत: लक्ष देऊन निवडक चवदार पदार्थ इतरांना भरपेट वाढायला सांगत. स्वारी स्वत: मात्र एक कणही प्रमाणाबाहेर सेवत नसे!

भोजनोत्तर ते कुटंबातील स्त्री-पुरुष प्रमुखांशी सुखदु:खाचं संभाषण करीत. आचार्य पुरोहितांशी वेदवेदान्त, शास्त्र-पुराणं, नृत्य-संगीत अशा प्रसंगानुसार चर्चेत आलेल्या विषयांवर सांगोपांग विचारविमर्श करीत. बाबा, थोरली, धाकली माता, बलरामदादा, ताई, उद्धवभावजी यांच्याशी दुसऱ्या दिवशी येणाऱ्या धार्मिक व कौटुंबिक विधींची चर्चा करीत.

द्वीपद्वारकेच्या प्रमुख चौकातील समयपालक तबकावर द्वितीय प्रहर सुरू झाल्याचे टोल घुमवी. तसे श्री असतील तिथं भोवतीच्यांना लोभस हसत, हात जोडून सूचना देत, ‘आजच्या दिनाचा कर्मयोग संपला आहे. आता मी तुमचा नव्हे.’ त्यांच्या हसण्यात असा काही गोडवा असे की, पुढे एकही शब्द त्यांना उच्चारावाच लागत नसे. आपल्या शयनकक्षाकडे परतणाऱ्या श्रींच्या मुद्रेवर दिवसभर घडून गेलेल्या सुखदु:खाच्या क्षणांची पुसटतीही छटा नसे. मला तरी ते संध्यासमयी सागरजलात डुबतीला चाललेल्या सूर्यदेवांसारखेच भासत.

जनपद द्वारकेला आता संपूर्ण आर्यावर्त देश एक वैभवी, समर्थ राजकेंद्र म्हणून मानू लागला. रेवतीताईंसह आम्ही तिघीही आमच्या सेवक-सेविकांसह द्वीपद्वारकेत आनंदानं राहू लागलो. थोरली व धाकली माता मात्र वयामुळे मूळ द्वारकेतच राहत होत्या. आता मूळ द्वारकेसह द्वीपद्वारकेचा डंकाही आपोआपच सर्वत्र पसरला होता. या द्वीपाला तर सर्व जण ‘महाराणी रुक्मिणीचं द्वीप’ असं म्हणू लागले होते. इथं सर्व सुखसोयी आमच्यासाठी हात जोडून उभ्या होत्या. मला मात्र त्यांच्यापेक्षा श्रींचं नित्य दर्शन हेच परमसुख होतं, नव्यानं आलेल्या जांबवती, भामा या भगिनी सोबतिणींचा सहवास आश्वासक होता. नाही म्हणायला हरवलेल्या पुत्राची आठवण टिटवीसारखी मनी मध्येच कर्कशून जाई. ‘श्री म्हणालेत त्याला काहीही झालेलं नाही. त्यावर माझा दृढविश्वास होता. योग्य समयी तो परतेल.’ मग आता कुठं असेल? केवढा झाला असेल? असे प्रश्नच प्रश्न माझा पाठपुरावा करत. मनातलं हे शल्य मी नव्यानं आलेल्या दोघीही सोबतिणींना मात्र कधीच बोलून दाखविलं नाही.

रेवतीताई वयात फारसं अंतर नसलेल्या त्यांच्या दोन्ही पुत्रांसह – निशठ व उल्मुकासह अधूनमधून माझ्या वास्तूवर येत. त्या नेहमी आपल्या रैवतक राज्याबद्दलच व अधिक ते रैवतक पर्वताबद्दल भरभरून बोलत. त्या अतिशय बोलक्या, भाबड्या व सुस्वभावी होत्या. आपल्या गद आणि सारण भावजींचं खूप कौतुक करीत त्या.

एकदा बोलताना गप्पांच्या ओघात ताईंनी एका महत्त्वाच्या गोष्टीचा निर्देश केला. त्यांचे पिता महाराज ककुद्मिन मध्य देशीच्या प्रयागहून अधूनमधून येणाऱ्या एका ऋषींचं फार आगत-स्वागत करत. रैवतक पर्वतावर त्यांनी त्या ऋषींसाठी एक सुसज्ज आश्रमच उभारून दिला होता. ते ऋषी म्हणजे पूर्वाश्रमीचे एक यादव वंशजच होते

म्हणे! शूरसेन राज्यातील मथुरेकडचे! श्री आणि दादा यांच्याशी त्यांचा निकटचा आप्तसंबंध होता म्हणे! ककुद्मिन महाराजांशिवाय तो कुणालाच फारसा माहीत नव्हता. यादवांच्या या सर्वसंग परित्याग केलेल्या पुरुषानं हिमालयात जाऊन आंगिरस ऋषींची निष्ठापूर्वक सेवा करून त्यांची दीक्षा घेतली होती. मूळ क्षत्रिय असलेले हे यादवश्रेष्ठ त्या दीक्षेमुळे आंगिरस झाले होते. 'घोर आंगिरस' या नावानं ते प्रयागच्या परिसरात विख्यात होते.

आम्हा सर्व स्त्रीमंडळात किशोर असलेल्या सुभद्रेचं ताईंना व मलाही फार कौतुक होतं. ती होतीच तशी गुणवान. तिचे गुण पारखूनच प्रत्यक्ष श्रींनीच तिंच नाव सुचविलं होतं –'सुभद्रा.' त्यांना तर ती अतिशय प्रिय होती. तिचा मनोभाव ते नेहमीच बारकाव्यानं जपत. तिला कधी-कधी आवर्जून गोकुळातल्या लाडक्या दुसऱ्या बहिणीच्या – एकानंगेच्या गोष्टी सांगत. आग्रहानं म्हणत, 'सुभद्रे, एकदा दादाला घेऊन व्रजात गोकुळी जा. एकानंगेला भेट एकदा. मनभर बोल तिच्याशी. येताना तिला संगती घेऊनच ये.' ते ऐकून भाबडी सुभद्रा प्रथम होकाराची नुसती मान डोलवी. श्रींकडून हाच आग्रह सुभद्रेला दोन-तीन वेळा होताना ऐकून एकदा मात्र मी मध्येच म्हणाले, "त्यासाठी दादाच कशाला हवेत सुभद्रेसोबत? श्रींनीच जावं तिला घेऊन गोकुळात आणि आपल्या साऱ्या-साऱ्या प्रिय माणसांना भेटावं एकदा. आपणच आणावं आपल्या प्रिय भगिनीला – एकानंगेला द्वारकेत."

माझा रोख राधेकडे आहे हे अचूक ताडून श्री हसून म्हणत, "मी कसला जातोय आता व्रजात? केवढा व्याप पडला आहे, या नव्या जनपदाचा – द्वारकेचा – इथं!" ते तसे गंभीर असे कधीच होत नसत. पण गोकुळाचा विषय निसटता जरी निघाला तरी त्यांच्या चर्येवर एक हरवलेपणाची सूक्ष्म लहर रेंगाळून जाई. मला ती पटकन जाणवे. मात्र अशावेळी मला श्रींना बघताना प्रबळपणे वाटून जाई – आपणही एकदा यमुनेकाठचं श्रींचं प्रिय गोकूळ डोळाभर बघून यावं. तिथल्या श्रीसखी राधिकेला भेटावं. श्रींचं बालपणी पालन-पोषण करणाऱ्या नंदबाबा व यशोदामातेला एकदातरी डोळाभर बघावं. त्यांची चरणधूली मस्तकी घ्यावी.

श्रींना चांगल्या चार आत्या होत्या. राजाधिदेवी, श्रुतश्रवा, श्रुतदेवी व कुंतीदेवी अशा. यातील कुंतीआत्याकडे थोरल्या महाराजांचा, श्रींचा अधिक ओढा होता. त्यांचा होता म्हणून दादांचाही होता. त्याला कारणही तसंच होतं. कुंतीआत्या त्यांच्या बालपणापासूनच अघटितांना व अनेक आपदांना आणि संकटांना धैर्यानं तोंड देत आल्या होत्या. मी तर या चारही आत्यांपैकी एकीलाही अद्याप कधीच पाहिलेलं नव्हतं.

अशातच आनंदमयी द्वारका समूळ हादरवून टाकणारी, एक असह्य कटुवार्ता पश्चिम सागर पार करत येऊन द्वारकेत थडकली. 'वारणावताच्या अरण्यात राजमाता कुंतीदेवी आपल्या पाचही पांडवांसह अग्नीच्या भक्षयस्थानी पडल्या. जळून ठिक्कर झालेले, ओळखू न येणारे माता-पुत्रांचे सहाही मृतदेह ते उतरले होते, त्या दग्ध गृहात सापडलेत. ते हस्तिनापुरी आणण्याच्या स्थितीतही नसल्याने वारणावतावरच त्यांचं दहन करण्यात आलं आहे. त्यांच्या एकनिष्ठ सेवकाचा – पुरोचनाचा मृतदेहही त्या गृहातच सापडला आहे. त्याचाही अंत्यविधी तिथंच करण्यात आला आहे. सांप्रत महाराज धृतराष्ट्र, युवराज दुर्योधनाच्या पुढाकारानं पाडवांना तिलांजली व तर्पण देण्याचा विधी गंगेकाठी

करणार आहेत.’

या वार्तेनं यादवांचा वैभवी गरुडध्वज ध्वजदंडावर निम्म्यानं खाली घेतला. सुतकव्याकूळ सुधर्मा राजसभा भरली. कुणी कुणाशीच काहीही बोलण्याच्या मन:स्थितीतच नव्हतं. थोरले महाराज वसुदेवबाबा आपल्या प्रिय भगिनीच्या दु:खद वार्तेमुळे आज राजसभेत आलेच नव्हते. राजमाताही आल्या नव्हत्या. दोघेही मूळं द्वारकेत आपल्या राजनिवासात शोकव्याकूळ, सुन्न बसले होते. त्यांची समजूत काढूनच आज श्री, दादांसह सभागृहात आले होते. युवराज्ञी ताई आपल्या सासू-सासऱ्यांच्या सेवेत मागंच राहिल्या होत्या. मीही त्याच विचारात होते. पण श्रींनी ‘चल’ म्हणताच त्यांच्यासह रथात बसून आले होते. येतानाच ते मला कुजबुजत्या सुरात; पण ठामपणे म्हणाले होते, "रुक्मिणी, मला नाही वाटत या वार्तेत काही तथ्य असेल! हा दुर्योधन-शकुनींचा महाराज धृतराष्ट्रांना पुढे घालून रचलेला काहीतरी कुटिल व असफल राजकीय डावपेच असावा. छे:! गदावीर भीमाला सदेह जाळणाऱ्या अग्निज्वाला मला दिसूच शकत नाहीत.”

ते ऐकत असताना त्या बिकट स्थितीतही श्रींना कुरूंच्या राजनगर हस्तिनापुराची केवढी खडान्‌खडा माहिती आहे, याचंच मला आश्चर्य वाटलं.

कुरूंच्या आप्त असलेल्या यादवांच्या सुन्न सुधर्मा राजसभेत अमात्य विपृथूंनी राजदंड उंचावून मोजकाच निवेदनप्रस्ताव मांडला – "आपल्या वसुदेव महाराजांच्या भगिनी, राजमाता कुंतीदेवी यांचं, त्यांच्या पाचही पुत्रांसह वारणावताच्या अरण्यात अग्नीच्या भक्षयस्थानी पडून अपघाती, दु:खद निधन झाले आहे. ही राजसभा त्यासाठी शोकसुतकात गेली आहे. समस्त यादवांच्या वतीनं मृतांना तिलांजली देण्यासाठी युवराज बलराम आणि द्वारकाधीश श्रीकृष्ण हस्तिनापुरास जातील. या क्षणीच सुधर्मा विसर्जित झाली आहे.”

भरली तशी राजसभा काही पळांतच विसर्जित झाली. दादा आणि श्रींनी दारुकासह हस्तिनापुराकडे प्रस्थान ठेवलं.

एक सप्ताह परतला. मी श्रींनी रथात कानी घातलेल्या शंकेचाच विचार करीत राहिले. ‘पांडव आणि त्यांच्या मातेच्या या वार्तेत काही तथ्य नाही.’ ते असं का म्हणाले असावेत? आणि त्यांना यात तथ्य नाही असा विश्वासच आहे, तर समस्त द्वारकाकर यादवांना त्यांनी याबाबत अंधारात का ठेवावं? काही कळत नव्हतं.

हस्तिनापुरात कौरव-पांडवांच्या भव्य वासंतिक स्पर्धा गुरू द्रोणांनी भरविल्याची अत्यंत आशादायी वार्ता नुकतीच येऊन गेली होती. या स्पर्धांत विजिगीषु, नवतरुण कौरव-पांडवांनी नेत्रदीपक विक्रम करून हस्तिनापुराच्या नेत्रांचं पारणं फेडलं होतं. स्पर्धेच्या अजिंक्य-वीरपदाची गौरवमाला अर्जुनाच्या कंठात गुरू द्रोणांनी चढवली. तेव्हा अचानक आखड्यात उतरलेल्या एका तेजस्वी तरुणानं अर्जुनाला सरळ द्वंद्वाचं आव्हान देत थोपविलं. तो होता सूतपुत्र कर्ण. ‘एका सूतपुत्रात आणि क्षत्रियात निर्णायक द्वंद्व कसं होणार?’ असा प्रश्न द्रोणांचे मेहुणे कृपाचार्य यांनी उठविला. त्या क्षणी दुर्योधनानं पुढे होत कर्णाला अंगराजपद प्रदान केलं आणि कौरव-पांडव हा साधा समास व्हायचा, तो द्वंद्वसमास सुरू झाला होता.

पाठोपाठ ही धक्कादायक वार्ता आली होती. वारणावतावर कुंतीदेवी आपल्या

पुत्रांसह दग्ध झाल्याची. दादा, उद्धवभावजींसह श्री हस्तिनापुरी मृत पांडवांना त्यांच्या मातेसह तिलांजली देण्याचं धर्मकर्तव्य निभावण्यासाठी निघून गेले. तशी हस्तिनापुराला श्रींची ही पहिलीच भेट होती. या भेटीत काय-काय घडू शकेल, याचा विचार करण्यातच माझा सप्ताह निघून गेला. आलेल्या वार्तेनं आणि पाठोपाठ श्री निघून गेल्यानं एका रितेपणानं मन व्यापून गेलं होतं. मी मूळ द्वारकेत जाऊन थोरले महाराज व देवकीमाता यांचं सांत्वन करून परतले. हे खरं होतं की, मी मनापासून काही सांगितलं की, ते दोघंही वडीलधारे असूनही ऐकत. खूप आदर व मान ठेवत ते माझा. काही काळातच मला ते जन्मदात्या माता-पित्यांसारखेच झाले होते. द्वारकेत मी माहेरी असल्यासारखीच होते, त्याच्या अनेक कारणांपैकी हे एक प्रमुख कारण होतं. त्याचबरोबर माझ्या या वृद्ध सासू–सासऱ्यांनी सोसलेल्या अपार संकटांतून त्यांच्याकडे आलेलं एक सुजाण माणूसपारखेपण हे कारणही होतं. माझ्याएवढी नव्हे, पण वनकन्या जांबवती त्यांच्याजवळ मनानं केव्हाच पोहोचली होती. भामेला मात्र ते काही अद्याप जमलेलं नव्हतं! त्याचंच आश्चर्य वाटून मी स्वत:शीच म्हणे, 'कसं होणार या आमच्या भगिनी भामेचं?'

एके दिवशी तर आक्रोशता हंबरडा फोडत, दुहाती वक्ष पिटत भामा अशी काही माझ्या कक्षात शिरली की, मी तर हादरलेच. मन तरी केवढं शंकेखोर असतं! क्षणैक उभा देह बधिर करून टाकणारी प्राणभेदक शंका उठली. काळजात धस्स झालं. 'दूरदेशी हस्तिनापुरी गेलेल्या माझ्या श्रींनाच काही झालं की काय?' भामा काय बोलतेय ते प्रथम नीट कळलंच नाही मला. ती अथक आक्रोशत होती, "रुक्मिणीताई, यादवांच्या महाराणीऽ घात झाला. आता काय करू?"

मी तिच्या दोन्ही भुजा गच्च पकडून तिला दरडावलंच, "भाऽमेऽ शांत हो. काय झालं नीट सांग." तसं ती वरचा श्वास वर, खालचा खाली अशी क्षणैक नुसतीच उमसली. मग एक-एक शब्द करीत तिचं स्त्री-हृदय पिळवटणारं कटू सत्य बाहेर पडलं. "काय सांगू ताईऽ, दुष्टानं माझ्या निद्राधीन पित्याची क्रूरपणे हत्या केली. आमचं स्यमंतक मणिरत्न चोरून तो नीच निघून गेलाय. सैनिक, सेनापतींच्या हातावर तुरी देऊन. न्यायचाच होता तर स्यमंतक तेवढा न्यायचा होता, अधमानं. माझ्या प्राणप्रिय सत्राजितबाबांचे प्राण का घेतले त्या नीचानं... यादव असून!"

तो एक-एक शब्द ऐकताना माझीही चमत्कारिक अवस्था झाली. श्री सुखरूप आहेत यासाठी नि:श्वास सोडतानाच, सत्राजितांची हत्या झालीय, हे कटू सत्य स्वीकारताना भामेसाठी माझाही श्वास कोंदटला. महाराणी म्हणून तीव्रपणे पटकन एकच जाणवून गेलं की, आमच्या या नव्या जनपदात निद्रित यादवाची घोर हत्या – असं अघोर कृत्य कधीच घडलं नव्हतं. नकळतच हां-हां म्हणता माझ्यातील महाराणी खाडकन जागृत झाली. पुन्हा भामेच्या भुजा घट्ट पकडून तिला गदागदा हलवत मी विचारलं, "कुणी केलं हे दुष्कृत्य? केव्हा?" माझ्या गळ्यात पडून मला घट्ट-घट्ट बिलगत ती म्हणाली – एक-एक शब्द उच्चारत, "श... त... ध... न्व्या... नं! काल रात्री!"

ते कटू सत्य ऐकून मी तर सुन्न झाले. यादवांच्या लहानथोर विक्रमांचा मला वक्षभर अभिमान होता. जरासंधाच्या सतरा आक्रमणांना त्यांनी अपार धैर्यानं तोंड दिल्याचा सार्थ अभिमान होता. या कार्यात अनेक यादववीर धारातीर्थीही पडले होते. तेही श्रींसाठी – श्रींमुळेच. कुठला का असेना – कोणीतरी यादव हे असंही नीच कृत्य करू शकतो – चौर्यकर्म आणि हत्या एकदमच! हा धक्का माझ्यासाठी पहिलाच होता. श्रीपत्नी म्हणून

यादवांची महाराणी म्हणून – मला तो सखोल जाणवला

भामेचं सांत्वन करण्यासाठी मला एरवी सहज दाद देणारी बुद्धी साथ देईना. मी भामेला अपार मायेनं नुसतीच थोपटत सत्राजित माझेच जन्मदाते पिता असल्यासारखी स्वत:ला हरवून म्हणत राहिले, "उगी... उगीऽ शांत हो! आपल्या बाबांना शोभेल अशी धैर्यशील, यादवकन्येसारखी वाग. शांतच राहा. श्रींना द्वारकेत परतू दे. विश्वास ठेव, ते नक्कीच लावतील त्या अधम अपराध्याचा छडा. करतील त्याचं कठोर शासन."

"नाहीऽ ताई, माझ्या सर्वांगाचा कसा तीळपापड झालाय. मी थांबूच शकत नाही. विपृथूंना संगती द्या. मी अशीच हस्तिनापूर गाठणार! त्यांना घेऊनच द्वारकेत परतणार!" भावावेग निर्धारानं रोधत भामा म्हणाली. मीच काय कोणीही आता तिला थांबवू शकत नव्हतं.

विपृथूंना आज्ञा करून मी तिच्या सोबतीला धाडलं. रथ आणि प्रवासाचं सामान घेऊन सारथ्यासह, काही संरक्षकांच्या पथकांतून ती निघूनही गेली. तिनं सोबतीला एकच सारथी घेतला. प्रसंगी त्याला विश्राम देण्यासाठी तीच रथाचं सारथ्य करणार होती. सत्राजितांच्या और्ध्वदेहिकाचे विधीही तिनं हक्कानं माझ्यावरच सोपविले.

आम्हा यादवांच्या राजमंडळावर कोसळलेल्या या आकस्मिक संकटानं मात्र एक घडलं. भामेत कसली कठोर निर्धारी क्षत्राणी आहे, हे मला कळून चुकलं. माझ्यातही एक निर्णयक्षम महाराणी आहे, याचा शोध मलाच लागला!

काही दिवस लोटले आणि निग्रही भामा म्हटल्याप्रमाणं श्रींसह द्वारकेला परतली. अग्रदूतानं श्री, दादा भावजींसह परतताहेत ही सूचना देताच, मी त्यांच्या स्वागतासाठी शुद्धाक्ष महाद्वारात उपस्थित झाले. गरुडध्वजातून सर्वांसह उतरणाऱ्या यादवराजांना सामोरी गेले. द्वारकेत नुकत्याच घडलेल्या घटनांमुळे तसं बोलता तर काहीच येणार नव्हतं. त्यांना डोळाभर बघताच मला हायसं वाटलं. पहिल्याच दृष्टिभेटीत ते असं काही हसले की, त्याचा गूढार्थ उपस्थितांत मीच काय ती जाणू शकत होते. तो होता – कुंतीआत्या पुत्रांसह सकुशल आहेत हा!

सुधर्मा राजसभेकडे जाताना अनुभवी व धिप्पाड अनाधृष्टींच्या खांद्यावर हात चढवून त्यांनी विचारलं, "सेनापती, सत्राजितकाकांचे सर्व विधी यथाप्रथा झाले ना? एक करा. मी अद्याप हस्तिनापुरातच आहे, अशा वार्ता कटाक्षानं सर्वत्र पसरवा! चार दिवसांत शतधन्वा सांप्रत कुठं आहे, याचा वृत्तान्त मला खडान्खडा मिळायला पाहिजे. त्याचे बंधू हार्दिक्य-कृतवर्मन यांना सत्वर भेटीस धाडा – तसेच अक्रूरकाकांनाही." ते ऐकताना मलाही आश्चर्य वाटलं की, ते दोघेच श्रींच्या स्वागतासाठी नेहमीप्रमाणं आज काही शुद्धाक्षावर आले नव्हते. श्रींनी ते अचूक टिपलं होतं. याचा अर्थ स्पष्ट होता. त्या दोघांच्या ठायी काही पाणी मुरत होतं. आणि दुसरा अर्थ तेवढाच स्पष्ट होता की, श्री द्वारकेबाहेर कुठंही गेले तरी त्यांना द्वारकेतील मागील वार्ता खडान्खडा मिळत होत्या. द्वारकेच्या सिंहासनावर बसले नसले, तरी खरोखरच 'द्वारकाधीश' होते ते.

आता सत्राजितांच्या मारेकऱ्याच्या शोधकार्याचा द्वारकेत झपाटा सुरू झाला. एखाद्या सत्याचा पाठपुरावा करायचा म्हटलं की, श्रींची चौफेर जाळं टाकण्याची एरवी कुणालाच न सुचू शकणारी अशी एक विशेष 'श्रीनीती' होती.

मारेकऱ्याच्या शोधकार्याचा पहिला आरा फिरला, श्रींनी एकांती आपल्या कक्षात

पहिल्यानं बोलावून घेतलेल्या कृतवर्मन यांच्याकडे स्यमंतक मण्याची विचारणा केली. कृतवर्मन शतधन्व्याचे सख्खे बंधूच होते. दोघेही ज्येष्ठ यादव हृदीकांचे पुत्र होते. ते द्वारकेतच मंत्रिपदावर सन्मानानं वावरणारे सन्माननीय यादव होते. शतधन्वा चळवळ्या होता. दूरदेशी शूरसेन राज्यात राहत होता. पात्रता नसताना वीर व सौंदर्यखणी सत्यभामेची त्यानं अभिलाषा धरली होती. तिची मागणी तिच्या पित्याकडे घातली होती. सत्राजितांनी ती कौशल्यानं टाळली होती. श्रींना यातलं काही म्हणजे काहीच माहीत नव्हतं. स्यमंतक मण्याच्या निमित्तानं सत्यभामा त्यांच्या गळ्यात पडली होती. भारावलेल्या सत्राजितांनी तिला सुधर्मा सभेत वचनपूर्वक श्रींना अर्पण केली होती. यामुळे खोलवर दुखावलेल्या शतधन्व्यानं त्यांच्या निर्घृण हत्येचं काळंकुट्ट कृत्य केलं होतं.

कृतवर्मन श्रींच्या भेटीस येण्यापूर्वी घडल्या घटनांचा काय परिणाम होणार हे जाणून चुकले होते. त्यांनी आपणाला माहीत असेल ते सत्य श्रींसमोर सादर करण्याचं मनोमन ठरवूनच, त्यांच्या कक्षात प्रवेश केला. श्रींनी त्यांचं फलाहार व केशरमिश्रित दुधानं अगत्यपूर्वक स्वागत केलं. इकडच्या-तिकडच्या गप्पा होताच मूळ देठाला हात घातला. विचारलं, “कृतवर्मा, आपले महाराज आणि सुधर्मा सभा स्वमंतकाचं शोधकार्य तुमच्यावरच सोपविण्याची शक्यता आहे! काय करणार तुम्ही?” श्रींच्या समोरच्याला थांगही लागणार नाही, अशा गोंधळविणाऱ्या राजनीतीमुळे कृतवर्मा हादरलेच. पटकन म्हणाले, “मला माहीत आहे स्यमंतक सांप्रत कुणाकडे आहे तो! माझ्या बंधूनं शतधन्व्यानं मूर्खासारखी अविचारानं सत्राजितांची हत्या केली आहे. सध्या तो काशीराजाच्या आश्रयाला तिकडे गेला आहे. माझ्या समक्षच त्यानं स्यमंतक मणिरत्न सुरक्षेसाठी अक्रूरांच्या स्वाधीन केलं आहे! आपण त्यांनाच पाचारण करून अधिक सत्याची परीक्षा करावी.”

सत्राजितांच्या हत्येच्या प्रकरणात सत्याकडे जाणारा सुतासारखा धागा श्रींच्या हाती गवसला. आता शोधचक्राचा दुसरा आरा फिरणार होता. स्यमंतक सुरक्षेसाठी अक्रूरांच्या हाती गेला आहे, हे धक्का देणारं अनपेक्षित सत्य होतं. त्याहून धक्का देणारं सत्याचं दुसरंच टोक पुढे आलं. कृतवर्मन यांना श्रींना भेटीस पाचारण केलंय, ही वार्ता नुसती कानी पडताच, स्यमंतक हाताशी असलेले वंदनीय ज्येष्ठ अक्रूरकाका त्या मणिरत्नासह द्वारकेतून अचानक परागंदा झाले होते!

हे स्यमंतक मणिरत्न आता किती समस्या उभ्या करून किती जणांच्या पाठीचे मणके ढिले करणार होतं, कळत नव्हतं.

आता सात्यकी श्रींच्या राखीव मंडलातील एक विश्वासू महारथी झाले होते. ते आणि अनाधृष्टी यांच्यात सेनेच्या उत्तरदायित्वाची जशी अलिखित विभागणीच झाली होती. दोघांनीही ती तशी स्वेच्छेनं पत्करली होती. अनाधृष्टी जनपद द्वारका राज्याची दोन्ही द्वीपांवरची सुरक्षा सांभाळत. जनपदाच्याभोवती सौराष्ट्र, भृगुकच्छ, आनर्तापर्यंत पसरलेल्या सीमा डोळ्यांत तेल घालून सांभाळत. सात्यकी श्रींबरोबर द्वारका व राज्याबाहेर आर्यावर्तभर सोबतीला असत. बाहेरच्या सेनेच्या हालचाली त्यांच्या विमर्शानुसारच होत.

शतधन्व्याचा ठावठिकाणा कळताच सात्यकी व निवडक चतुरंगदल सेनेसह श्रींनी पुन्हा द्वारका सोडली. सोबतीला नेहमीसारखे बलरामदादा होतेच. त्यामुळे या

अभियानाची तशी काहीच चिंता मला वाटली नाही.

सैन्य निघून गेलं आणि पाठोपाठ त्यांच्या मार्गक्रमणाच्या वार्ता एका पाठोपाठ एक अशा द्वारकेत येत राहिल्या. नर्मदा नदीच्या तीरानं पुढे सरकत अवंती राज्यातील महिष्मती नगरी श्रीसेनेनं पार केली आहे. श्री आपल्या यादवांसह वेत्रवती नदी पार करून चेदींच्या राज्यात उतरले आहेत. आत्याबाई श्रुतश्रवादेवींचं ते राज्य असलं, तरी शिशुपालाचं कडवं वागणं स्मरून श्रींनी चेदींच्या राजनगर शुक्तिमतीला बाजूला ठेवून पुढे मार्गक्रमणा केली आहे. शेवटी अपेक्षित वार्ताही आली. काशीराज्याच्या सीमेवर श्रींनी दादांसह शतधन्व्याला गाठून युद्धात त्याला वधलं आहे. तो काशीराज सुबाहूचं साहाय्य घेऊन वाराणसीहून सीमेवर आला होता. युद्धानंतर पळ काढणाऱ्या काशीराजाचा पाठलाग करत श्रीकृष्ण महाराज थेट वाराणसीत घुसले. बलरामदादा व सात्यकी सीमेवर मागंच राहिले. काशीराजानं पराभव होताच शरणागती पत्करली. खंडणी म्हणून उदंड संपत्ती यादवश्रेष्ठांसमोर अर्पण केली. काशीराजाचा निरोप घेऊन श्री पुन्हा यादवसेनेत परतले. इथं मात्र घडू नये ते नाटच, पुन्हा स्यमंतक मण्याच्याच निमित्तानं घडलं.

तसं एरवी धनसंपत्ती याबद्दल बलरामदादांना कधीच रस नव्हता. द्वारकेच्या कोशागाराकडे ते कधी फिरकतही नसत. मात्र त्या उपद्व्यापी स्यमंतक मण्यानं त्यांच्या यादववीर मनात त्या मणिरत्नाविषयी अनावर कुतूहल निर्माण झालं होतं. श्री समोर येताच ते नेहमीच्या पद्धतीनं हसत म्हणाले, “धाकट्या, अरे आम्हाला एकदा बघू द्या तरी, ते स्यमंतक मणिरत्न! त्याचा पाठलाग करत द्वारकेपासून किती दूरवर आलोत आपण! आता मार्गातील सर्व अडथळेही दूर झालेत! पिता हरवलेली आमची सत्यभामा मणिदर्शन होताच थोडी तरी सावरेल. दाखव बघू ते रत्न!”

श्री खांदे उडवून हसतच म्हणाले, “माझ्याकडे कुठं आहे ते? ते तर आहे, अक्रूरकाकांच्याकडे. प्रथम त्यांना शोधावं लागेल. ते हस्तगत करावं लागेल. मगच त्याचं दर्शन होईल, तुला आणि मलाही!”

तसा बलरामदादांचा श्रींविषयी कधीच अपसमज होत नसे. काशीराज्याच्या सीमेवर सैन्यतळावर मात्र कुयोगानं तो प्रथमच झाला. ते पुन:पुन्हा आवर्जून म्हणू लागले, “केवळ एकदाच मला ते मणिरत्न नुसतं दाखव. मला त्याची कसलीही अभिलाषा नाही.” श्री त्यांना सतत समजावू लागले की, “ते मणिरत्न या क्षणी खरोखरच माझ्याकडे नाही.” हां-हां म्हणता दादा बिथरलेच! तडकाफडकी म्हणाले, “तुला ज्येष्ठ बंधूपेक्षा य:कश्चित मणी मोलाचा वाटतो, तर बस त्यालाच घेऊन! हा मी चाललो वाट फुटले तिकडे!! मला तुझं तोंडही बघायचं नाही यापुढं!” आणि बोलल्याप्रमाणं खांद्यावर गदा टाकून तणतणत बलरामदादा शिबिराबाहेर पडलेही. त्यांच्यामागून त्यांचे मोजके अनुयायी यादवगणही निघून गेले. गंगा नदी पार करून शरयू नदी ओलांडत ते गंडकी नदीच्या काठी गेले. मिथिला नगरीतील थेट जनकपुरीला जाऊन पोहोचले.

स्यमंतक मण्यानं काहीही संबंध नसताना श्रींना एक जबरदस्त भावतडाखा दिला! प्राणप्रिय ज्येष्ठ बंधूच्या अपसमजाचा व काळीज कुरतडणाऱ्या त्यांच्या वियोगाचा!

शतधन्व्याला शासन करून विजयी श्री द्वारकेत परतले. मात्र या वेळी त्यांच्यासोबत बलरामदादा नव्हते. अपसमजाचं मूळ ठरलेला स्यमंतकही नव्हता. राजनगरातील यादवांना या दोन्ही गोष्टी तीव्रपणे जाणवल्या. यादवांचं स्वत:वर नसेल

एवढं प्रेम श्रींवर होतं. त्यांचंही सर्वांवर तसंच निरपेक्ष प्रेम होतं. मला मात्र दादा संतापून रुसून गेलेत, हे पटेचना. काही केल्या पचविता येईना. युवराज्ञी रेवतीताईंच्या तत्पर भेटीला गेल्याशिवाय मला राहवलं नाही. त्यांनी मात्र माझं समाधान केलं. मनावरचं मणामणाचं ओझं क्षणात हलकं केलं. त्या उलट मलाच समजावीत म्हणाल्या, "उगाच चिंतेत पडली आहेस तू रुक्मिणी. युवराज कुठंही जाणार नाहीत. लवकरच परततील ते. श्रीकृष्ण भावजींशिवाय त्यांना चैनच पडणार नाही."

श्रींच्या चक्रवर्ती जीवनाला स्थैर्य म्हणून मानवतच नसावं. तो योगच नव्हता त्यांचा. म्हणूनच माझ्या समक्ष अमात्य विपृथूंनी त्यांच्यासमोर एक वार्ता ठेवली. फारच विचार करायला लावणारी होती ती. आर्यावर्ताच्या पूर्वेकडील कामरूप राज्यातून आलेलं एका स्त्रियांचं पथक त्यांना भेटलं होतं. त्या पथकानं कामरूप स्त्रियांची आणि भोवतालच्या स्त्रीजीवनाची दारुण कथा यादवांच्या अमात्यांसमोर ठेवली. त्या राज्याच्या राजनगर प्राग्ज्योतिषपुरात स्त्रियांचं, त्यातूनही सुंदर व सशक्त स्त्रियांचं जीवनच धोक्यात आलं होतं. एक नव्हे, दोन नव्हे, चांगल्या सोळा सहस्त्र कामरूपी सुंदर स्त्रिया तेथील राजानं – नरकासुर उपाख्य भौमासुरानं बलानं आपल्या कारागृहात कोंडल्या होत्या. आपल्या इच्छेनुसार उपभोगासाठी – वासनापूर्तीसाठी. नित्यशः त्यात नवी भरच पडत होती.

'या अश्राप सहस्त्रावधी नारींना या विराट आर्यावर्तात कुणी वाली आहे की नाही? त्या दुर्बल स्त्रियांच्या जगण्याच्या हक्काचं संरक्षण करणारा कुणी वीर पुरुषोत्तम आहे की नाही?' असे काळीजवेधी प्रश्न विचारून ते पथक श्रींच्या भेटीची मागणी घालून त्यांच्या भेटीच्या प्रतीक्षेत थांबलं होतं.

ही तर नवीच समस्या होती. नाजूक आणि कौशल्यानं हाताळण्याची. त्यासाठी उभा आर्यावर्त देश आडवा–पालथा घालून हजारो योजनांवरच्या कामरूप देशाला जाऊन भिडण्याची. मला मात्र मनोमन पूर्ण विश्वास होता, श्री हेही आव्हान नक्कीच स्वीकारणार. तसंच झालं. पहाटे ब्राह्मी मुहूर्तावर ध्यानस्थित असताना, सुदर्शनाचे दिव्य मंत्र स्मरताना जशी आगळीच तेजःपुंज, उजळलेली त्यांची मुद्रा होई, क्षणभरात तशीच झाली. ते अमात्यांना निर्णयात्मक एकच वाक्य बोलले. मी जाईन कामरूप राज्यात – प्राग्ज्योतिषपूरला – माझ्या भगिनींच्या मुक्ततेसाठी!

त्यांच्या सूचनेवर अमात्यांनी तातडीची सुधर्मा राजसभा बोलावली. त्या सभेत श्री एकटेच बोलले. त्यांच्या दृष्टीनं स्त्रीत्व म्हणजे काय ते सार्थपणे पटवून देणारं त्यांचं ते एक अत्युत्तम अजोड भाषण होतं. मी ते विसरूच शकत नाही. ते म्हणाले, "मत्प्रिय यादववीरहो, पुरुषार्थ केवढाही गगनभेदी असो, तो निर्माण होतो स्त्रीच्या कुशीतूनच! स्त्रीत्वाचा आदर व सन्मान राखू शकत नाही, तो पुरुषार्थ व्यर्थ आहे. यासाठीच स्त्रीत्व निर्दयपणे चिरडणाऱ्या नरकासुरावर द्वारकेच्या चतुरंग यादव सेनेसह चालून जाण्याचा मी निर्णय केला आहे. विश्वास आहे, सर्वांना तो मान्य होईल."

'यादवराज श्रीकृष्ण महाराज कामरूप देशीच्या निर्दयी, मदांध नरकासुरावर ससैन्य चालून जाणार' असा डंका द्वारकाभर पिटण्यात आला. राज्याच्या सौराष्ट्र, भृगुकच्छ, आनर्त या प्रदेशांतून नवयुवा, निधडे तरुण यादवसेनेत नव्यानं भरती करण्यात येऊ लागले. त्यांना शस्त्र व अस्त्रकुशल करण्यासाठी तज्ज्ञ उपसेनापतींची, दलप्रमुखांची शिबिरं जनपदभर नव्यानं सुरू करण्यात आली. अगोदरच्याच लक्षावधी युद्धसंमुख

यादवांची सेना दिवसागणिक फुगू लागली. द्वारकेचे निष्णात गुप्तचर प्राग्ज्योतिषपुरापर्यंतच्या मार्गात येणाऱ्या अवंती, चेदी, दक्षिण कोसल, मगध, विदेह-वज्जी अशा राज्यभर पांगले. एकमेकांशी सावध, तप्तर व गुप्त संपर्क राखत ते शत्रुसामर्थ्याच्या अचूक वार्ता उचलू लागले. पटापट द्वारकेकडे धाडू लागले.

जशी द्वारकानिर्माणाच्या वेळी झाली होती, तशीच अठरापगड यादव कारागिरांची अहोरात्र धांदल उडाली. हे अभियान प्रचंड व्यापाचं, आव्हानाचं आणि युद्धकुशल असलेल्या यादवांची सत्त्वपरीक्षा बघणारं होतं. तसा द्वारका जनपदाचा कामरूपाशी काहीही संबंध नव्हता. ही एका त्रिकालाबाधित सत्य तत्त्वासाठी – जिथं असेल तिथल्या कुचंबलेल्या स्त्रीत्वाच्या रक्षणासाठी द्यायच्या लढाईची तयारी होती. तिच्यात कसलीही उणीव राहून चालणार नव्हती. श्री दोन्ही सेनापती, उद्धवभावजी, शिनी, कृतवर्मा, अवगाह, आहुक, सत्यक, चित्रक, देवभाग, देवश्रवस अशा सोबत्यांसह पायाला चक्र लागल्यासारखे राज्यभर फिरू लागले. चतुरंग सेनेची काटेकोर, जय्यत तयारी करून घेण्यात गढले.

आचार्य सांदीपनी, गर्गमुनी यांनी नरकासुरावरच्या अभियानाचा शिवकर मुहूर्त काढला. सर्वत्र एकच चर्चा होती. या विराट सेनेत युवराज बलराम असायला हवे होते. मलाही पहिल्यांदा तसंच वाटलं. पण श्री एकांती भेटून गेले आणि माझ्या सर्व शंका मिटल्या. मला पूर्ण विश्वास होता की, या चढाईत श्री यशश्री घेऊनच परततील. त्यांच्यावर माझ्याएवढंच प्रेम करणाऱ्या दोन व्यक्तींची मात्र तत्पर प्रतिक्रिया वेगळीच आली. ती अनेक्षित होती, तशीच धक्कादायकही. श्रींबरोबर जाण्याचा हट्ट दोघांनी धरला होता. उद्धवभावजी आणि सत्यभामेनं!

उद्धवभावजी शूर असले, यादव असले, तरी त्यांचा पिंड लढाईचा नव्हता. उलट ते युद्ध टाळून सामोपचार साधावा, असेच विचार नेहमी निर्भयपणे मांडीत. दुसऱ्या कुणाच्याही तोंडून ते आले असते, तर प्रमुख यादवांसह श्रींनीसुद्धा ते हसण्यावारीच नेले असते; पण उद्धवभावजींचं मात्र श्रींसह सर्वच निमूट ऐकत. त्यांचं व्यक्तिमत्त्वच सर्व यादवांहून आगळं-वेगळं होतं. मूळ यादव असून संन्यास पत्करलेल्या घोर आंगिरसांकडे झुकणारं होतं. म्हणून तर त्यांना द्वारकेत आचार्य सांदीपनींसारखा मान व आदर होता.

असे उद्धवभावजी या स्वारीत आपणहून आग्रह धरून श्रींसोबत जायला निघाले होते. सर्वांनाच त्याचं आश्चर्य वाटलं होतं. मला नाही. दादा सोबत नाहीत याची उणीव भरून काढण्यासाठीच ते जात आहेत, हे मी जाणलं होतं, मला आश्चर्य वाटलं होतं, ते भामेचं. आश्चर्याबरोबरच थोडा हेवाही! भामा श्रींबरोबर जाणार हे ऐकून नाही म्हटलं तरी माझी प्रतिक्रिया आलीच. मलाही त्यांच्याबरोबर जावंसं तीव्रपणे वाटलं. द्वारकेची महाराणी म्हणून माझा तर तो अधिकारच होता. तशी इच्छा मी श्रींसमोर एकांती बोलूनही दाखवली. ते समजूत काढण्यात आणि न पटणारं सहज पटवून देण्यात माझ्यापेक्षा कुशल होते. ते नित्याचं मोहून टाकणारं हसू मुद्रेवर खुलवीत म्हणाले, “महाराणी, सत्यभामा येत आहे, ती तुझ्याहून मला प्रिय झाली म्हणून मुळीच नव्हे. ती सारथ्यकर्मात कुशल आहे. मी शतधन्व्याला शासन दिलं, हे तिला ‘उपकार’ वाटतात. त्याचं ऋण ती क्षत्राणी म्हणून माझी युद्धसेवा करून फेडणार आहे! तुला येतं का सारथ्यकर्म? येत असेल तर तूही चल. तुला वाटतं का माझं कुठलंही कृत्य ‘उपकार’

म्हणून? असेल तर तूही चल. तू आहेस का, अशी 'तिच्यासारखी' ऋणी क्षत्राणी?"

आता ते असेच प्रश्नांचे असुडांवर असूड ओढत जाणार, मला फरफटत नेणार हे पारखून मी मध्येच त्यांना थोपवीत म्हटलं, "पुरे-पुरे! मला नाही व्हायचं तिच्यासारखी क्षत्राणी! आपण उभयता सुखेनैव जा! सुखरूप परत या म्हणजे झालं!"

ठरल्या मुहूर्तावर थोरले महाराज, दोन्ही माता, आचार्य आणि ज्येष्ठांचे आशीर्वाद घेऊन श्री माझ्या भेटीसाठी आले. मी व जांबवतीनं त्यांचं उद्धवभावजी व भामेसह औक्षण केलं. हसतमुखानं त्यांना निरोप दिला. डंके, रणदुंदुभ्या, रणभेरी, तुताऱ्या यांचा गजर उठला. श्री, उद्धवभावजी, भामा यांना मुखावर ठेवून सात्यकींसह यादवांचं प्रचंड चतुरंग सैन्यदल सिद्ध झालं. शुद्धाक्ष महाद्वारातून बाहेर पडलं. प्रशस्त नौकानी द्वीपखाडी ओलांडून किनाऱ्यावरच्या राज्यातील अगोदरच पडाव टाकलेल्या सेनेला मिळालं. योजनाबद्ध पद्धतीनं गजदलं, अश्वदलं, पदाती यांची पथकं सुवर्णकिनारीचा भव्य भगवा गरुडध्वज फडकावीत क्रमश: निघाली. द्वारकेहून – आनर्तातून कामरूपाकडे – प्राग्ज्योतिषपुराकडे.

आता चार मास तरी, येतील त्या वार्ता नुसत्या ऐकणं, हाच माझ्यासाठी उद्योग राहिला. दोन्ही सेनापती नसल्यामुळे, बलरामदादाही नसल्यामुळे, निवडक महारथी, योद्धे श्रींसोबत गेल्यामुळे नकळतच माझ्यावरचा भार महाराणी म्हणून वाढला. वृद्ध महाराज आणि देवकीमाता यांना जनपदाचं कामकाज बघण्यासाठी साहाय्य करणं भाग होतं. म्हणून राणीकक्षाचं द्वीप जांबवतीच्या स्वाधीन करून मी मूळ द्वारकेत आले. माझ्यासाठी महाराणी म्हणून इथंही असलेल्या वास्तूत राहू लागले. रेवतीताई, रोहिणीमाता यांच्यासह सुधर्मा सभेच्या कामकाजावर दक्ष लक्ष ठेवू लागले. श्रींनी प्रस्थान ठेवून पंधरवडा लोटला नाही तोच सात्यकींनी धाडलेला एक महारथी जनपदाच्या स्त्रीमंडळासाठी एक पाहुणी घेऊन शुद्धाक्षावर थडकला. ती होती अवंती राज्याची राजकन्या मित्रविंदा – अवंती नरेश महाराज जयसेन व श्रींची आत्या राजाधिदेवी यांची कन्या. राजपुत्र विंद व अनुविंद यांची भगिनी.

मार्गात लागलेल्या अवंती राज्यात प्रचंड श्रीसैन्य प्रवेशलं. नेमक्या याचवेळी अवंती नरेशांनी आपल्या या सुकुमार राजकन्येचं स्वयंवर मांडलं होतं. त्यांना वाटलं द्वारकाधीश स्वयंवरासाठीच आलेत! राजपुत्र विंद-अनुविंदांनी श्रींना राजदूताकरवी अवमानास्पद निरोप धाडला, 'तुम्ही या स्वयंवरात भाग घेऊ शकत नाही. तुमच्या क्षत्रियत्वाचा लोप झाला आहे! यासाठीच तुम्हाला या स्वयंवराचं निमंत्रण धाडलेलं नाही.' अवंतीच्या महाराणी राजाधिदेवी श्रींची आत्या होती. हा पीळ घरचा होता. त्यातून यादव कधी बाहेर पडणार होते की नाही देव जाणे!

कितीही उलटं असलं, तरी सुलटं करून घेण्याची कृष्णनीतीची राजकीय हातोटी श्रींना जन्मत:च लाभलेली होती. त्यांनी विंद-अनुविंदांना उलटा निरोप धाडला –'आम्ही स्वयंवरासाठी मुळीच आलो नाही. चाललोत नरकासुरावर कामरूपाकडे. त्यापूर्वी ज्येष्ठ म्हणून या अभियानासाठी आतोबा-आत्याबाईंचे आशीर्वाद घेणं आवश्यक आहे. कर्तव्याचं आहे. त्यासाठी श्री अवंतीच्या राजनगरात येणार आहेत.'

चांगली निरुत्तर करणारी चपराक बसल्यामुळे विंद-अनुविंदांना श्रींना वाजत-गाजत राजनगरात नेणं भागच पडलं. गवळ्याला स्वयंवरातील प्रवेश नाकारणं शक्य होतं. आशीर्वाद कसे काय नाकारणार होते ते!

श्रींनी मोठ्या अभियानाची सर्व निवडक यंत्रणा अवंतीच्या राजनगराकडे वळवली! ऐन वेळी योजनाबद्ध पद्धतीनं स्वयंवर-मंडपात निवडक योद्धयांसह प्रवेश घेतला. जयसेनांचे आमंत्रित सर्व उपस्थित राजे दिङ्मूढ होऊन बघत असतानाच मित्रविंदेचं बलात हरण करून तिला रथात घातलं! खवळलेल्या विंद–अनुविंदांना कसलेल्या सात्यकी आणि अनाधृष्टींनी अंगावर घेतलं. लढण्यात गुंतवून ठेवलं. श्रींनी अंवतीकन्या मित्रविंदेला तशीच थेट विश्वासू महारथ्यांसह शस्त्रधारी पथकांतून द्वारकेला धाडलं होतं. भामेला कसलाही थांगपत्ता न लागू देता! हा सर्व वृत्तान्त त्या महारथ्यानंच मला सांगितला. मी मित्रविंदा या माझ्या तिसऱ्या सोबतिणीचंही हसत स्वागत केलं.

मी स्वत: मित्रविंदेला सोबत घेऊन पुन्हा द्वीप-द्वारकेत आले. अष्टवास्तूंपैकी एक तिच्या स्वाधीन केली. तिला आवडतील ते सेवक-सेविका घेण्याची मोकळीक दिली. मित्रविंदा, जांबवती आणि भामा यांच्यामधला स्त्रीस्वभावाचा प्रकार होता. ती मूळची यादव रक्ताची असल्यामुळे भामेसारखीच अभिमानी होती. मात्र हिचा अभिमान तिच्याएवढा अंगावर येणारा नव्हता! जांबवतीसारखी ती चतुर, चौकस होती; पण हिच्या चौकसपणाला मात्र तिच्यासारखी निरागसपणाची झालर नव्हती. आता तीही मी व जांबवतीसारखी श्रींच्या आगमनाची वाट बघू लागली. तसं मी ताडलं, हिनं श्रींना मनोमन पत्करलं आहे, वरलं आहे. आता लवकरच हिचाही माहेरच्या अवंती राज्याचा ओढा आपोआप कमी होईल.

शेवटी दोन मासांनी जिची प्राण कंठाशी आणून आम्ही वाट बघत होतो, ती वार्ता द्वारकेच्या विजयी शुद्धाक्ष महाद्वारावर येऊन थडकली. कंसवधानंतर जेवढं शूरसेन राज्य थरारून उठलं नव्हतं, तेवढा या वार्तेनं उभा आर्यावर्त थरारून उठला.

'द्वारकाधीश श्रीकृष्ण महाराजांनी कामरूपाधिपती नरकासुराचा प्राग्ज्योतिषपूरच्या समरभूमीवर युद्धात वध केला!' त्यासाठी यादवश्रेष्ठ श्रीकृष्णांना नरकासुराच्या चार राज्यपालांशी व मुर नावाच्या सेनापतीशी घनघोर युद्ध खेळावं लागलं. हा विजय म्हणजे श्रींच्या युद्धकौशल्याचा कळस होता. असुरांनी सेनापती मुर याच्या नेतृत्वाखाली राजनगर प्राग्ज्योतिषपूरला दाट कुरणात सहा हजार शस्त्रयुक्त गुप्त पाशांचं भक्कम संरक्षक जाळं पेरलं होतं. स्वतः मुर, त्याचे पुत्र ताम्र, अंतरिक्ष, श्रवण, विभावसू, वसू व अरुण यांच्यासह त्या जाळ्याचं रक्षण करायला अस्त्रशस्त्रांनिशी सिद्ध ठाकला होता. त्याच्या कुशल युद्धरचनेतील हे पहिलंच कडं भेदायला बिकट होतं. त्यासाठी शस्त्रं पेलून धैर्यशील यादव पुढे सरकताच पायीच्या अदृश्य कळांवर पाय पडून पाशांत गुंतलेले कुरणांतील अदृश्य भाले आपोआप मुक्त होत होते. वेगानं येऊन सैनिकांवर आदळत होते. ते कुठून येताहेत हेच सैनिकांना कळत नव्हतं. वर्मी आघातानं, न लढताच यादव सैनिक इडा देवीच्या नावाचा टाहो फोडत पटापट कुरणात कोसळत होते. या कड्याच्या पाठीमागे उंचच उंच पहाड होते. त्यात हयग्रीव आणि निशुंभ हे नरकासुराचे सशस्त्र राज्यपाल सेनेसह आडोसा धरून बसले होते. ही दुसरी फळी होती. त्यांच्या मागे मणिपर्वतात विरुपाक्ष व पंचजन हे आणखी दोघे राज्यपाल तसेच लपून अंतिम निकराचं तोंड द्यायला ससैन्य सिद्ध होते. ही तिसरी फळी होती.

एकूणच पहिल्या फळीवर असुर सेनापती मुर याच्याशी लढणं आवश्यक होतं.

त्याला परास्त करणं, त्याच्या कुटिल सेनारचनेमुळे आणि मायावी पाशयुद्धामुळे कठीणच होतं.

पहिला सप्ताहभर वीर यादव सैनिक मायावी पाशकडे तोडण्यासाठी निकरानं लढले. कित्येक त्या डोंगरी प्रदेशात धारातीर्थी पडले. एवढे धैर्याचे सात्यकी, अनाधृष्टी, शिनी, अवगाह पण हताश झाले. किंकर्तव्य झाले. सेनेच्या शिबिरात सर्वच माना खाली घालून श्रींसमोर सचिंत बसले. कितीतरी वेळ उलटसुलट चढाईची चर्चा झडून गेली होती. चर्चेत भामाही होती. उद्धवभावजी स्वभावानुसार प्रथम इथंही काही बोलले नव्हते. शेवटी मात्र निर्धारानं म्हणाले, “दादा, हे मीच बोलायला पाहिजे असं नाही. तुला सर्व-सर्व काही कळतंय. तू का निर्णय घेत नाहीस हेच मला कळत नाही. असुर मुर तुझ्याशी मायावी युद्ध खेळतो आहे. अदृश्य पाशांमुळे रोज यादव सैनिक प्राण गमावताहेत. तुझ्या दिव्य सुदर्शनाचं प्रक्षेपण तू का करत नाहीस या वेळी?”

शिबिरातील सर्वच श्रींकडे केवढ्यातरी आशेनं एकटक बघू लागले. हसून उद्धवभावजींकडे बघत श्रींनी बसल्या जागी नेत्र मिटले, त्यांची चर्या अपार तेजानं सूर्यफुलासारखी उमलून आली. सुदर्शनाच्या दुर्मीळ दिव्य मंत्रांचं त्यांनी स्मरण केलं होतं. क्षणार्धात उपस्थितांच भान हरपणारी स्वर्गीय वाद्यलय शिबिरात घुमू लागली. श्री आसनावरून डोळे मिटूनच आपसूक तडक उभे ठाकले. त्यांचा उजवा हात उत्थान घेत आपोआप हळूहळू उंचावत गेला. क्षणात त्यांच्या तर्जनीवर बारा आऱ्यांचं, वज्रनाभीचं गरगर फिरणारं दीप्तिमान तेजयंत्र प्रकटलं. त्याच्या अपार तेजानं सगळ्यांचेच डोळे दिपून गेले. चढत्या मंत्रघोषातच श्रींनी तेजयंत्राचं प्रक्षेपण केलं. ते थरारक संगीताच्या लयीसह घोंगावत निघालं. मायावी शस्त्रपाशांचं जाळं भेदण्यासाठी. सर्व जण बघतच राहिले. ते तेजयंत्र दाट गवताळ कुरणात लपविलेले हजारो मायावी पाश तोडत चाललं. त्याच्यावर गदा पेलून, दातओठ खात धावून आलेल्या सेनापती मुर आणि त्याच्या सहाही पुत्रांचा शिरच्छेद करून फेकलं तसं परतलं. श्रींच्या तर्जनीवर येऊन स्थिरावलं. आवरती मंडलं घेत, प्रकटलं तसंच लुप्तही झालं. श्रींची ही चर्या उपस्थितातले सर्वच कधीही विसरू शकणार नव्हते. उद्धवभावजी आणि भामा तर नाहीच नाही.

हा वृत्तान्त ऐकताना मला सर्वाधिक पटून चुकलं ते भामेचं महत्त्व व मोल. ती खरोखरच पुण्यशील व भाग्यवान श्रीपत्नी होती. जिनं त्यांना सुदर्शनधारी दिव्य रूपात प्रथम पाहिलं होतं. मी त्यांना केवळ द्वंद्व खेळताना पाहिलं होतं.

प्राग्ज्योतिषपुराहून आलेल्या दूतानं तेथील जो इतिवृत्तान्त सादर केला, त्यानं मी थरारूनच उठले. यादवांची महाराणी म्हणून, श्रींची पत्नी म्हणून, यापूर्वी कधी नव्हता, एवढा मला श्रींचा अभिमान वाटला. स्त्री म्हणून तर तो माझं मन भरून उतू जाणारा होता.

असुर सेनापती मुराचा अडसर निपटला. श्रींनी सात्यकी, अनाधृष्टी या महारथ्यांसह यादवसेनेला प्रोत्साहन दिलं. त्यांनी भक्कम धडकांनी नरकासुराच्या पुढच्या दोन्ही संरक्षक फळ्या मोडून काढल्या. दुसऱ्या फळीतील संरक्षक राज्यपाल हयग्रीव व निशुंभ यांना कंठस्नान घातलं. मणिपर्वतावरील ओदका इथं तिसऱ्या संरक्षक फळीतील राज्यपाल पंचजन व विरुपाक्ष यांनी निकराचा उग्र विरोध केला. श्रींनी त्यांनाही वधून तो मोडून काढला. हे चारही राज्यपाल आणि सेनापती मुर नरकासुराचे

प्रमुख हस्तक होते. त्यांनीच तर आर्यावर्ताच्या पूर्वेकडील कामरूप आणि शेजारच्या मणिपूर, त्रिपुरा, वंग, अंग या जनपदांतील हजारो क्षत्रिय कुलस्त्रिया बलात हरण करून प्राग्ज्योतिषपुराच्या कारागृहात कोंडल्या होत्या. या कोंडलेल्या स्त्रियांची संख्या सोळा सहस्त्रांपर्यंत गेली होती. त्याच्या राज्याच्या पूर्वापार चालत आलेल्या कारगृहाची क्षमता होती, पाच हजार बंदिवानांची. ते भरताच त्याच्या क्रूर सेनापती मुरानं कारागृहाबाहेरच्या मोकळ्या पटांगणालाच, आश्रमांना किंवा गोकुळांना असतात तशी केवढीतरी भक्कम लाकडी कुंपणे टाकली होती. सशस्त्र सैनिकांच्या पावला – पावलांवर त्याभोवती चौक्या आवळून ती प्रवेशबंद केली होती. प्रवेशदुर्गम केली होती. दहाएक हजार क्षत्रिय राजस्त्रिया त्या पटांगणात कुंपणाआड उघड्यावरच अश्राप गायींसारख्या कोंडल्या होत्या. पाच–सहा हजार कारागृहात होत्या. हे कारागृह नव्हतंच. हा बंदिवान स्त्रियांचा कुंपणाआडचा प्रचंड गोठाच होता! दुधासाठी गायींचीही जपणूक करावी लागते. तेही भाग्य या माणूस म्हणून जन्मलेल्या अभागी स्त्रियांना नव्हतं. सोळा सहस्त्र गायींनाही एकत्र बांधणारा एवढा मोठा प्रचंड गौळगोठा आर्यावर्ताच्या कुठल्याही गोकुळातसुद्धा नव्हता.

प्राग्ज्योतिषपुरातील हे प्रचंड कारागृह हा आर्यावर्तावरचा एक कलंक होता. हे कारागृह नव्हतंच. ही अंधारात सहस्त्रावधी स्त्रिया कोंडलेली, अन्यायाचं निर्बंधकेंद्र झालेली नरकपुरी होती! मूळ भौमासुराला या नरकपुरीमुळेच आपोआप नरकासुर हे कुनाम मिळालं होतं. ते नामच समूळ पुसून टाकणं, हा एकमेव उपाय होता. श्रीचं तर ते जीवितकार्य होतं.

तिन्ही संरक्षक फळ्या मोडून काढताच यादवसेनेत अनावर युद्धज्वर संचारला. इडादेवीच्या नावाचा गगनभेदी अखंड रणघोष उठवीत हजारो, लाखो रणोत्सुक यादव प्राग्ज्योतिषपुराच्या सीमेत घुसले. श्रींचा भगवी पताका मिरविणारा गरुडध्वज रथ चारही पांढऱ्याशुभ्र अश्वांना चेतना देत, प्रत्यक्ष भामेनं नरकासुराच्या रथाला आणून भिडवला. दारुक तिच्या शेजारीच उभा होता. भामेनं आज अंगावर लोहत्राण आणि रणवेष धारण केला होता. ती स्त्री वाटतच नव्हती. जशी एक यादव योद्धाच दिसत होती! श्रीचं आणि नरकासुराचं, घनघोर युद्ध जुंपलं. सीमेच्या समरांगणावर असुर सैनिक व यादव सैनिक एकमेकांना अटीतटीनं भिडले.

ही आर्यावर्ताच्या अन्यायी पूर्वेची न्यायरक्षक पश्चिमेशी निकराची लढाई होती. तिचा लवकर निर्णय लागणार नव्हता. प्रथम भृशुंडींनी रथातूनच पाषाणफेकीचं युद्ध जुंपलं. मग श्री आणि नरकासुर यांचं बाणफेकीचं घनघोर धनुर्युद्ध झालं. दिवस प्रहारांनी चढतच राहिला. दोघेही योद्धे समर्थ असल्यानं हटत नव्हते. शेवटी दोघेही निर्णायक द्वंद्वासाठी आपापल्या रथातून खाली उतरले. अंगावर रोमांची अंकुर उठविणाऱ्या त्यांच्या टणत्कारी गदायुद्धाला प्रारंभ झाला. पीतांबराचा कासा कसलेले, कौमोदकी गदा लीलया पेललेले श्री डौलदार मंडल घेत, 'जय इडादेवीऽ!' गर्जत नरकासुराला भिडले. प्रहार करताना ते झेपावत्या बहिरी ससाण्यागत निर्भय दिसू लागले. त्यांच्या पायाखाली येणारं कामरूपातील जाड पात्याचं तृण उद्‌ध्वस्त होऊ लागलं. त्यातील काही पाती उभयतांच्या जखमांतून ठिबकणाऱ्या रक्तथेंबांत न्हाऊन गेली. भामा आणि दारुक रथातूनच समोरचा रोमांचक संग्राम खिळल्या देही, खिळल्या डोळ्या-मनानं बघतच राहिले.

एव्हाना सांजावत आलं होतं. मैनाकपर्वतातील शुभ्र, लांब पंखांचे हिमपक्षी आपापल्या घरट्यांकडे परतू लागले होते. दूरवरच्या पर्वतशिखरांना भिडलेलं सूर्यबिंब मावळतीला आलं होतं. ही श्रींची नित्याची सवितृ स्मरणाची वेळा होती. क्षणैक हातातील प्रचंड गदा तोलत, मंडल घेण्याच्या मिषानं फिरत श्रींनी डोळाभर प्रथम सूर्यदर्शन केलं. दुसऱ्याच क्षणाला पाय रोवून पवित्रा घेत त्यांनी आजवर जगाला हूल भरणाऱ्या नरकासुराला अशी हूल दिली की, त्याला समोरचा गवळी दिसेनासा झाला. तो त्याच्या पाठीमागे केव्हा गेला तेच त्याला कळलं नाही. असंख्य अपकृत्यं पाठीशी घालणाऱ्या त्याच्या धिप्पाड असुरी पाठीवर एक भक्कम गदाप्रहार आदळताच तो समोर तोंडघशी पडला. क्षणभर त्याच्या मिटल्या डोळ्यांसमोर अनेक सूर्य तळपून गेले. विव्हळत तो उताणा झाला. आणि त्या दिवशीच्या कामरूपी मावळत्या सूर्यदेवाला साक्षी ठेवून श्रींनी त्याचं अन्यायी वक्ष छिन्नविछिन्न करणारा निर्णायक पहिला बळकट गदाप्रहार उतरला. मग प्रहारांमागून प्रहार नरकासुराच्या उन्मत्त, अन्यायी, निर्मम वक्षावर उतरतच गेले!

आसुरी रक्ताची कारंजीच कारंजी उडाली. त्यात जाड पात्याचं कामरूपी तृण अंगभर न्हाऊन निघालं, तो दिवस होता, आश्विन वद्य चतुर्दशीचा!

विजयी श्री, सात्यकी, अनाधृष्टींना डावं-उजवं आणि उद्धवभावजी, भामेला पाठीशी घेत निघाले. बरोबर निवडक विजयी यादववीरांची हर्षोत्फुल्ल, रणघोष देणारी पथकं निघाली. ते सर्व जण नरकासुराच्या कारागृहासमोर आले. इथले सशस्त्र पहारेकरी केव्हाच लुप्त झाले होते. भक्कम कुंपणाआड कोंडलेल्या स्त्रियांचा कलकलाट तेवढा अस्पष्ट ऐकू येत होता. श्रींना हसून बघताच पुढे होत, सात्यकींनी त्या बळकट कुंपणाच्या लाकडी दरवाज्यावर पहिला गदाप्रहार उतरविला. पाठोपाठ विजयी सैनिकांनी मिळेल त्या हत्यारानं तो फोडून, तोडून, मोडून काढला. त्यासाठी झालेल्या खडखडाटानं मात्र आतील स्त्रियांचा कलकलाट कुणीतरी कंठनाळावर अंगठ्याची कळ दाबावी तसा चिडिचूप झाला होता. आतील भेदरलेल्या स्त्रियांना वाटलं होतं, नित्यासारखी केसाळ नरकासुराला आघाडीवर ठेवत, मुर आणि त्याच्या राज्यपाल सोबत्यांची ही आसुरी धाडच आली आहे.

यादवमंडळात समोर उभ्या ठाकलेल्या अपार तेजवंत श्रींना साक्षात समोर बघताच त्या पाऽर गोंधळल्या. ते जाणून श्रींनी काहीही न बोलता आपला नीलवर्णी, स्नायुमय पुष्ट बाहू अभयासाठी उंचावला. सोबतच्या उद्धवभावजींकडे नुसतं बघितलं. ते तत्परतेनं पुढे झाले. दोन्ही हात उंचावून मग तेच बोलले, “माझ्या प्रिय कामरूपी भगिनींनो! अशा भेदरून आमच्याकडे मुळीच बघू नका. तुमच्यावर वर्षानुवर्षं अत्याचार करणाऱ्या नरकासुराचा आज वध झाला आहे! माझ्या या प्रिय दादानंच तो केला आहे. हे आहेत द्वारकाधीश यादवनायक श्रीकृष्ण महाराज! त्यांच्या अनुज्ञेनंच तुम्हा सर्वांना अभय देत मी घोषित करतो, तुम्ही आजपासून हवं तिकडे जायला मुक्त आहात!”

नरकासुराचा वध झालाय, हे सत्य पचवून घ्यायलासुद्धा त्यांना काही वेळ लागला. आपण मुक्त आहोत, हा विचारही त्यांना काही वेळ कळलाच नाही!

इतरांची मनं जाणण्यात तत्पर असलेल्या मनकवड्या उद्धवभावजींनी ते ताडलं. ते पुन्हा चढ्या स्वरात त्या सर्वांना सत्य पटवून देताना म्हणाले, “तुम्ही खरोखरच मुक्त आहात! बंदिवान नव्हे! कुठंही जायला तुम्ही मोकळ्या आहात. नरकासुर मारला गेला

आहे.” आता मात्र तो स्त्री-सागर सजग झाला. त्यातील काही उद्ध्वस्त दाराकडे आणि श्रींकडे हातवारे करत, प्रथम कुजबुजत, नंतर एकमेकींना पटवत काहीतरी बोलल्या. अस्पष्ट शब्द उमटले ‘मुक्त… मोकळ्या… वाट फुटेल तिकडे जायला!’ त्यातील सर्वांत तरुण अशी एक धाडसी स्त्री पुढे झाली. तिनं हात उंचावून मुक्तिघोष दिला… ‘द्वारकाधीश श्रीकृष्ण महाराजऽ… जयतु!’ त्या हजारो स्त्रीकंठांतून तिला प्रतिसाद मिळाला… ‘जयतु… जयतु!’ काही क्षणांतच बंदिवान जीवन असह्य झालेल्या त्या स्त्रिया एकमेकींना अंग घासत धावतच उद्ध्वस्त दरवाज्यातून तांड्यातांड्यानी, आनंदानं कलकलत बाहेर पडल्या. तत्पर सेनापतींनी राजकारागृहात कोंडलेल्या स्त्रियाही मुक्त केल्या.

दोन्ही कारागृहांतून स्त्रीमुक्तीचं कार्य मार्गी लावून श्री राजमंडळासह प्राग्ज्योतिषपूरच्या राजवास्तूसमोरच्या चौकात आले. इथं त्यांना पदाती पथकप्रमुखानं एक तरुण राजकीय बंदिवान सादर केला. तो होता नरकासुरपुत्र भगदत्त! घडून गेलेल्या आकस्मिक घटनांनी तो समूळ भेदरलेला होता. श्रींनी त्याची माहिती नेहमीच्या पद्धतीनं पूर्वीच काढून ठेवली होती. पित्याच्या व त्याच्या अधिकाऱ्यांच्या दमनसत्रात भगदत्त कुठंच नव्हता. तो जन्मतःच पापभीरू होता. मात्र आता काही झालं तरी प्राणदंडाचं कठोर शासन मिळणार म्हणून मनोमन हादरला होता. श्रींनी त्याच्याबाबत उद्धवभावजींशी चर्चा केली. मग पुढे होत बंदिवान भगदत्ताच्या खांद्यावर त्यांनी नुसता प्रेमळ हात ठेवला. तसं वाकून त्यानं श्रीचरण धरले. त्याला थोपटून तसंच वर घेत श्रींनी आपल्या विशाल हृदयाशी बिलगतं घेतलं. म्हणाले, “भगदत्ता, भय टाकून दे. हे राज्य तुलाच सांभाळायचं आहे. पित्याच्या मार्गानं नव्हे! तुझ्या स्वतःच्या मार्गानं. तुझ्या पित्याला ब्रह्मपुत्रेकाठी तूच सविध अग्रिदाह दे.” श्रींनी तिथंच सेनाधिकाऱ्यांना आज्ञा दिल्या. “असुरांना सुतकाचं बंधन नसल्यामुळे उद्याच नगराच्या मुख्य चौकात या असुर राजाचा – भगदत्ताचा राज्याभिषेक आयोजित करा. त्याच्या मस्तकी मी स्वतः असुरांचा राजकिरीट ठेवणार आहे! असुर नगरजनांच्या साक्षीनं. तसा डंका नगरभर फिरवा.”

त्या रात्री लोहितगंगेच्या काठी उठविलेल्या प्रशस्त शिबिरात श्री, उद्धवभावजी, भामा यांच्यासह भोजनोत्तर चर्चेत व विश्रामात होते. आत करंजेलाचे टेंभे मंद ढणढणत होते. बाहेर सशस्त्र पहारेकरी फिरत होते. उद्धवभावजी म्हणाले, “दादा, तू स्वभावाप्रमाणं सहज विसरशील. पण आजचा भाग्यशील दिवस मी मात्र कधीच विसरणार नाही.”

इतक्यात प्रथम सात-आठ स्त्रियांची कुजबुज ऐकू आली. पाठोपाठ त्यांना रोधणारे यादव पहारेकऱ्यांचे दरडावणीचे बोल ऐकू आले. तसं श्रींनी आपल्या बंधूकडे नुसतं बघितलं. त्याचा संकेत पकडून बंधू शिबिराबाहेर गेले. काही वेळात पाठीशी सात-आठ स्त्रियांचं पथक घेऊन पुन्हा परतले. म्हणाले, “यांचं काहीतरी म्हणणं आहे. मी ते ऐकलंय. त्यांची समस्या कठीणच आहे. त्यांच्याकडूनच ती ऐकावी दादानी.”

मद्या धैर्यानं पुढे झालेली तीच सर्वांत तरुण स्त्री म्हणाली, “महाराज, आम्ही सर्व जणी आपल्या कधीही न फेडता येणाऱ्या ऋणात आहोत. आम्हाला कल्पनेतही नसलेला मुक्तीचा प्रकाश आपण दिला आहे. आम्हाला कुठंही जाण्याची मोकळीक उदार हृदयानं आपण दिली आहे. पण… पण…” ती अडखळली. कसं बोलावं तेच तिला कलेना.

"पण काय? न अडखळता निर्धारानं बोल. घाबरू नको." श्रींनी तिला धीर दिला.

तसं आवंढा गिळून, अवसान घेत ती म्हणाली, "आमच्यातल्या काही इथल्या – या नगरातल्याच – प्राग्ज्योतिषपुरातल्याच आहेत. आपण मुक्ती देताच त्या मोठ्या आनंदानं धावत आपपल्या घरी गेल्या. पण..." ती पुन्हा थांबली.

"पण काय? बोल..." श्रींच्या कपाळी कधी न दिसणारी एक सूक्ष्म आठी उमटली.

"पण महाराज, त्यांच्या घरची रक्ताचीच माणसं त्यांचा पतित – भ्रष्ट, कलंकित म्हणून स्वीकार करायला मुळीच तयार नाहीत! आपण मुक्ती दिलीत – पण घरच्यांनी आश्रय दिला नाही. समाजानं नाकारलं, तर आम्ही जायचं तरी कुठं? असुरांच्या कारागृहात परतायचं म्हटलं, तर तोही आता नष्ट झालाय. असुराला आपणच वधलंय. आम्ही जावं तरी कुठं? कोणत्या तोंडानं? काय म्हणून?" ती होती त्वष्टा राजाची षोडशवर्षीय कन्या – कशेरू. ती मान खाली घालून तीव्र वेदनेनं स्फुंदू लागली.

श्रींनी कधी नव्हे, ते हात पाठीशी गुंफत शिबिरात एकच फेर घेतला. स्वतःशीच ते काहीतरी पुटपुटले. मग नेहमीसारखं तेच मधुर हास्य मुखावर खुलवीत आपल्या बंधूला म्हणाले, "उधो, या सर्व स्त्रियांना उद्या नगराच्या प्रमुख चौकात, राज्याभिषेकाच्या वेळी उपस्थित ठेव. त्यांचाही न्याय करू. तुला वाटते ती समस्या – समस्या नाहीच मुळी. तिचीही उकल माझ्या पद्धतीनंच होईल. यांना त्यांच्या मेळात सोडून ये."

दुसऱ्या दिवशी प्राग्ज्योतिषपुराचा प्रमुख राजचौक कामरूपच्या स्त्री-पुरुष नगरजनांनी कसा तुडुंब भरला. इतका की, मुंगी शिरायलाही वाव न मिळावा. चौकात मधोमध प्रशस्त अशी चौकोनी उंच मंडपाखाली राज्याभिषेक वेदी उठली होती. वेदीवर राज्याभिषेकाला आवश्यक सर्व वस्तू व्यवस्थित मांडल्या होत्या. नव्या तरुण राजाच्या स्वगतासाठी लोक आज झुंडींनी लोटले होते. मुहूर्तापूर्वी घटिकाभर पहाडी वाद्यांनी अवघा परिसर निनादून टाकला. उद्धवभावजींच्या सूचनेनुसार सोळा सहस्त्र कामरूपी स्त्रियाही आल्या होत्या. जमल्या प्रचंड समुदायाला सशस्त्र यादव सैनिकानी मंडल घातलं होतं. भगदत्ताच्या राज्याभिषेकाचा मुहूर्त जवळ आला. तसं आपल्या सालंकृत गरुडध्वज रथातून भगदत्तासह श्री चौकात प्रवेशले. त्यांच्या स्वागतासाठी कामरूपी पहाडी वाद्यांचा गजर उठताच माजलेला कुजबुजाट शांत झाला. आघाडीला भगदत्ताला उजवं ठेवून, कामरूपी स्त्री-पुरुष नगरजनांना अत्यंत नम्रभावे वंदन करीत अंथरल्या पायघड्यांवरून श्री चालू लागले. त्यांच्या मागून उद्धवभावजी, दोन्ही सेनापती, भामा होती. वेदीकडे चालणाऱ्या त्या राजमंडळावर जमलेले नगरजन दुहाती फुलांच्या ओंजळी उधळू लागले.

भगदत्ताला सोबत घेऊन श्री सर्वांसह वेदीवर चढले. तसा स्वागती टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

पुरोहितांनी धीरगंभीर उच्चारात मंत्रपठण सुरू केल. भगदत्ताच्या मस्तकी मंत्रभारित जलाचा पहिला कुंभ पडताच तो अंतर्बाह्य पावन झाला. त्याच्या असुरकुलात हे भाग्य काही त्याच्या पित्यासह कुणालाही लाभलं नव्हतं. त्यांची प्रथाच होती घातपातानं राज्य बळकावण्याची.

अभिषेकस्नान आवरताच वेदीवरच भगदत्तानं दोन सैनिकांनी धरलेल्या पटलाआड जाऊन त्याचा पारंपरिक असुरी राजवेष धारण केला. तो बराचसा पर्वतीय होता. कटीच्या तलम वस्त्रावर प्रथा म्हणून त्यानं मृगचर्म आवळलं होतं. कंठात मोत्यांबरोबरच

मोठमोठ्या रंगीबेरंगी अरण्यमण्यांच्या माळा घातल्या होत्या. वक्षावर असुरकुलाचं मानचिन्ह असलेल्या डरकाळत्या व्याघ्रमुखाचं ताम्रपदक चढविलं.

वेदीच्या मधोमध मांडलेल्या सर्वांत उंच अशा राजआसनाजवळ पुरोहितांनी भगदत्ताला आणलं. वेदीच्या चारी कोपऱ्यावर ठेवलेल्या ताम्रघंगाळांत मृत्तिकेची घटिकापात्रं डुबतीला येत चालली. ज्या प्रमुख पुरोहिताच्या हातीच्या तबकात असुरांचा पारंपरिक किरीट होता, त्यानं श्रींच्या आसनासमोर येऊन, कमरेत लवून त्यांना विनंती केली. तसे श्री उठले. पुष्पमालांनी मंडित मधोमधच्या उंच राजआसनाजवळ आले. तबकातील किरीटाला हस्तस्पर्श करण्यापूर्वी त्यांनी कटीच्या शेल्यात सराईतपणे बांधलेला पांचजन्य आपल्या सडक बोटांच्या विमल ओंजळीत घेतला. पुष्ट ग्रीवा गगनगामी उठवली. त्यांनी त्या स्वरयंत्राची धमन्या टपटपीत फुगवून अशी काही स्वर्गीय शंखलय उठवली की, मंत्र म्हणणारे असुर पुरोहित, पर्वतीय वाजंत्री कळ दाबल्यासारखे जिथल्या तिथं थांबले. स्त्री-पुरुषांचा जमलेला जनमेळ आपोआपच वेदीकडे सरकला. घटिकापात्रं डुबत असतानाच श्रींनी कामरूपी राजकिरीट भगदत्ताच्या मस्तकी चढविला. पुष्पमुठी वेदीवर उधळत लाखो कंठ निनादून उठले – 'द्वारकाधीश भगवान श्रीकृष्ण महाराजऽऽ जयतुऽ! जयतुऽ!! कामरूपाधिपती भगदत्त महाराजऽ – जयतु – जयतु!'

भगदत्त सर्वांसमक्ष श्रींच्या चरणांजवळ वीरासनात बसला. मस्तकीचा किरीट उतरवून त्यानं तो त्यांच्या चरणांशेजारी नम्रभावानं ठेवला आणि आपलं भारावलेलं मस्तक कृतज्ञ भावानं श्रींच्या चरणांवर ठेवलं.

प्रेमयोग हाच जीवनयोग मानणाऱ्या श्रींनी एका हातानं किरीट उचलत दुसऱ्या हातानं त्यालाही वर उठतं केलं. हातचा किरीट पुन्हा त्याच्या मस्तकी ठेवून त्याला दृढ आलिंगनात घेतलं.

भगदत्ताच्या अमात्यानं पुढे होत, दोन्ही हात उंचावून जमलेल्या स्त्री-पुरुषांना शांतविलं. ते म्हणाले, "आता भगवान श्रीकृष्ण महाराज आमच्या नव्या महाराजांना आशीर्वाद देतील. त्यांच्याविषयी – विशेषत: त्यांच्या मधुर वाणीविषयी आम्ही बरंच काही नुसतं ऐकून आहोत. या शुभ क्षणी ती आम्हालाही प्रत्यक्ष ऐकायला मिळावी. ती ऐकवून त्यांनी आम्हाला पावन व कृतकृत्य करावं."

मांडलेल्या राजआसनाच्या उजव्या हातबैठकीत खोदलेल्या सुवर्णी सिंहाच्या मस्तकावर श्रींचा डावा हात सहज चढला. ते उठले. आपल्या वीणामधुर वाणीत बोलू लागले. "कामरूप जनपदाच्या स्त्री-पुरुष बंधू-भगिनींनो!! आजपासून या असुरश्रेष्ठ भगदत्ताला तुमचा नूतन राजा म्हणून मी घोषित करतो आहे! त्याच्या पित्यानं कसं अनाचारी निर्दय राज्य केलं, हे अनुभवानं तुम्ही चांगलंच जाणता. माझा विश्वास आहे, तो पूर्णत: चुकीचा मार्ग तुमचा हा नवा राजा कधीच हाताळणार नाही. या कामरूप राज्यातील उंचच-उंच पर्वतांचा आदर्श तो सदैव डोळ्यांसमोर ठेवेल. वाढ आणि विकास हीच जीवनाची लक्षणं आहेत हे जाणून, आपल्या प्रजेला तो अपत्यवत सांभाळील. त्याच्या पाठीशी माझे आशीर्वाद सदैव असतील. प्रसंगी माझ्या द्वारका जनपदाचं सामर्थ्यही असेल.

"पौरजनहो! भगदत्ताला मी पुत्रवत मानतो. त्याच्या पित्यानं – नरकासुरानं माणुसकीला काळिमा फासणारं जे पापकृत्य केलं आहे, ते निस्तरण्याचं उत्तरदायित्त्वही

त्यासाठीच या क्षणापासून मी विचारपूर्वक आनंदानं स्वीकारतो आहे. नरकासुरानं बलाने कारागृहात कोंडलेल्या अगणित अत्याचारांना बळी घातलेल्या या सहस्त्रावधी आर्यस्त्रिया मी आणि माझ्या यादवांनी मुक्त केल्या. मला समजलं, त्यांचा पुन्हा स्वीकार करायला, अंधप्रथेनं ग्रासलेला कठोर समाज तयार नाही. त्यांना तो भ्रष्ट, पतित व कलंकित मानतो. यात त्या स्त्रियांची काय चूक आहे? काहीही नाही. यास्तव मी, द्वारकेच्या वसुदेव महाराजांचा पुत्र वृष्णि-अंधक कुलोत्पन्न श्रीकृष्ण त्या सर्वांना या क्षणी प्रकट अभय घोषित करतो आहे!

"माझ्या प्रिय बंधू उद्धवानं रात्रभर जागून कामरूप अमात्य व सैनिकांच्या मदतीनं एकच धागा आणि त्यात गुंतलेला एकच 'कृष्णमणी' अशी सहस्त्रावधी मंगलसूत्रं सिद्ध केली आहेत. या सर्व स्त्रियांचा पत्नी म्हणून स्वीकार केल्याचं अभय देऊन, मी त्या मंगलसूत्रांच्या तबकांना स्पर्श करीन. बंधू उद्धव सैनिकांच्या मदतीनं त्यातील एक-एक तुम्हाला देईल. ते कंठी धारण करून या समस्त आर्यावर्तात कुठंही नि कुणालाही तुम्ही उन्नत मानेनं निर्भयपणे सांगावं की, मी द्वारकाधीश श्रीकृष्ण महाराजांची पत्नी आहे!

"आजपासूनच तुम्ही द्वारकेच्या झाल्या आहात. तिथं सासर म्हणून नव्हे, माहेर म्हणून तुम्ही मुक्त मनानं वावरावं. जसं लक्षावधी यादवांचं केलं, तसंच तुमचंही पुनर्वसन मी द्वारकेत करतो आहे. खरोखरच तुम्ही आज आणि या क्षणापासून मुक्तच झाला आहात!!"

आता कामरूपी स्त्रियांनी भरलेल्या प्रचंड नौका खाडी पार करून द्वारकेच्या शुद्धाक्ष द्वारावर थडकू लागल्या. त्यांच्याबरोबर आलेल्या संरक्षकदल-प्रमुखानं मला हा इत्थंभूत वृत्तान्त सांगितला होता. माझ्यावरच्या ज्या विश्वासानं श्रींनी या स्त्रियांना धाडलं होतं, तो महाराणी म्हणून – त्यांची पत्नी म्हणून मीही स्वीकारून सिद्ध केला. यापूर्वी तिघींचं भगिनी म्हणून मी स्वागत केलंच होतं. आता या सहस्त्रावधी स्त्रियांचं त्याच भावानं स्वागत केलं. श्रींनी निरोप धाडला होता, तसं त्यांच्या पुनर्वसनाला जुंपून घेतलं.

आता मी प्रतीक्षा करत होते, श्रींच्या प्रत्यक्ष दर्शनाची. भामेच्या वार्ता ऐकून तर तिला केव्हा एकदाचं भेटेन व कानभर श्रीविक्रम ऐकेन असंच मला झालं होतं! पण आलेल्या दलप्रमुखानं कानी घातली ती वार्ता आणखी एक मास तरी त्यांची प्रतीक्षा करायला लावणारी होती. श्री भामेसह नग्नजित राजाच्या कोसल देशात उतरले होते. तेथून ते परस्पर हिमवानात जाणार होते. फार दिवस मनी असलेली अमरनाथाच्या गुंफेतील स्वयंभू हिमलिंगाचं दर्शन करण्याची इच्छा ते पूर्ण करणार होते. ते हिमलिंगाच्या दर्शनाला जाणार हे समजू शकत होतं. मात्र कोसल राज्यात का उतरावेत कळत नव्हतं. आलेल्या दलप्रमुखाला त्यासाठी मी खोदखोदून विचारलं. त्यालाही काहीच कारण माहीत नव्हतं.

अमरनाथाच्या स्वयंभू शिवलिंगासंबंधी मी खूप–खूप ऐकून होते. एकदा तरी आपण त्याचं दर्शन करावं, ही तीव्र इच्छा माझ्याही मनी अनेकदा उठली होती. आता ते दर्शन पत्नी म्हणून मला सत्यभामेच्याच डोळ्यांनी काय ते करायला मिळणार होतं. त्यासाठी तर मी तिची उत्कंठेनं वाट बघत होते. पंधरवडा लोटला आणि कोसल जनपदातील श्रींच्या विक्रमाची वार्ता द्वारकेत येऊन धडकली. या राज्यात काही ते उगाच उतरले नव्हते. नग्नजिताने प्राग्ज्योतिषपुरात विशेष राजदूत पाठवून त्यांच्या द्वारकाधीशपदाला डिवचलं होतं. त्याचा निरोप होता, ‘सोळा सहस्त्र कैदी स्त्रिया वरणं, त्यातही त्यांना मुक्त करून मग वरणं सोपं आहे. कोसलांची राजकन्या स्वयंवराचा पण पूर्ण करून जिंकणं आव्हानाचं आहे. माझ्या देशीच्या पुष्ट सात वृषभांना सर्व पौरजनांसमक्ष वेसण घालून त्यांना वृषभरथाला जोडणाऱ्या वीर क्षत्रियासाठी मी पण मांडला आहे. तो पूर्ण करण्याची शक्यता वाटत असल्यास गंडकी नदीकाठी असलेल्या कोसलांच्या राजनगरी श्रावस्तीला यावं!’

तो संदेश ऐकून श्री थांबणं शक्यच नव्हतं. त्यांनी कोसलांच्या दूताबरोबर आपला एक विशेष दूत धाडून कोसलराज नग्नजिताला निरोप दिला होता –‘माजलेले पुष्ट वृषभसांड वेसण घालून कह्यात ठेवण्याची सवय मला लहानपणापासूनच आहे. मी हाडारक्ताचा गोप–गवळी आहे. गोपांना वृषभाचं काय भय? द्वारकाधीश झाल्यापासून पौरजनातील माजलेल्या कित्येक नरवृषभांनाही वेसण घातली आहे! त्या अर्थानंही मी गोपच आहे!’

धाडल्या निरोपाप्रमाणं वंगदेश डाव्या हाताशी ठेवून श्री कौशिकी नदी पार करीत सेनेसह कोसलांच्या जनपदात उतरले. मगध देश शेजारीच होता. श्रींचं तिथल्या जरासंधाच्या सैनिकी हालचालींवर सावध लक्ष होतं.जाताना ते मगध देश कौशल्यानं टाळून त्याच्या दक्षिण सीमेकडून गेले होते. परतताना पुन्हा तो देश टाळून उत्तर सीमेकडून निघाले. कोसलांची श्रीरामकालीन राजनगरी होती, शरयूकाठी अयोध्या. आता ती पूर्वेकडे सरकून गंडकीकाठी श्रावस्ती झाली होती. गंडकीलाच ‘सद्नीरा’ असंही म्हणत. नावाप्रमाणंच ती धवल जलवाहिनी होती.

श्री कोसलकन्या सत्येच्या स्वयंवराच्या पण पूर्ततेसाठी येताहेत, ही वार्ता पणासाठी आखलेल्या खुल्या क्रीडांगणात पोहोचली. जमलेले कोसल स्त्री–पुरुष नगरजन एकाएकी धावू लागले. झुंडींनी ते खेचल्यासारखे श्रीदर्शनासाठी गरुडध्वज रथाकडे धावले.

कोसलकरांच्या गर्जत्या मेळातूनच श्रींनी गरुडध्वजातून पणाच्या क्रीडांगणावर

प्रवेश केला. रथाच्या घेरात भामा, उद्धवभावजी होतेच. समोर संरक्षित लाकडी रिंगणात डुरकते, पुष्ट, सात सांड बघताच वीरश्री संचारलेले श्री रथातून उतरले. रिंगणात मधोमध उंच चक्रांचा पुष्पमालामंडित भक्कम वृषभरथ होता. त्याच्या रंगीत रथनीडावर भगव्या दोरखंडांच्या सोनेरी कलाबतूची वेलबुट्टी फिरलेल्या दहा–वीस वेसणी टाकलेल्या होत्या. जू टेकलेल्या मोकळ्या रथाभोवती दिसेल त्याला धडक द्यायला उतावीळ सात वशिंडपुष्ट कोसली सांड डुरकत इतस्तत: मत्तपणे फिरत होते. क्षणातच श्रींनी पीतांबराचा काचा कसला. सगळे स्तिमित होऊन बघत असतानाच वाद्यांच्या गजरात ते संरक्षित पटांगणात 'जय इडा' गर्जत उतरले. सातही वृषभांना भिडले. मग अंगावर धावून येणाऱ्या सात पांढऱ्याशुभ्र, तांबसर, काळ्याबाळ्या, आडव्या–तिडव्या रेघा व त्यांना चपळाईनं चुकविणारी एकमेव नीलवर्णी अरोध रेखा यांचं तुंबळ युद्ध एवढंच दिसत राहिलं. कोसलकरांना मथुरेत दादा व श्री यांनी कंसाच्या धिप्पाड कुवलय हत्तीला कसा नमविला असेल, याचा छोटासा प्रत्यय समोरच बघायला मिळाला. समोरची चपळ, नितळ, नीलरेखा एक– एक वृषभाला गतिमान चकवे देऊन क्लान्त केव्हा करते, काहीच कळत नव्हतं. रथनीडावरची वेसण उचलून ती त्याच्या अगोदरच पाडलेल्या, तार ओघळणाऱ्या, फुसफुसत्या नासिकाच्छिद्रात केव्हा भरते, तेच कळत नव्हतं.

हां–हां म्हणता घटिकाभरात श्रींनी सातही कोसली, पुष्ट वृषभांना वेसणी चढविल्या. शेजारच्या वृषभरथाला त्यांना जुंपलं. क्रीडांगणाला एक भरधाव फेर घातला. तसं पणाच्या क्रीडांगणभर टाळ्यांच्या कडकडत्या पर्जन्यात ओजस्वी, प्रोत्साहक घोषणा दुमदुमल्या. 'गोकुळच्या गोपराज श्रीकृष्णाचाऽऽ... विजय असो... नरेशातील नरवृषभ द्वारकाधीश श्रीकृष्ण महाराजऽऽ...जयतु...जयतु...!! कोसलजामात यादवश्रेष्ठ श्रीकृष्णदेवऽ जयतु...जयतु!!'

एव्हाना श्रमलेल्या, क्लान्त, कोसली वृषभांच्या तोंडांतून ओघळलेला फेस आणि लाळधारा भुईवर अवतरल्या होत्या. धापावत्या, भेदरलेल्या त्या वृषभांकडे गेली घटकाभर अनिमिष बघणाऱ्या गरुडध्वज रथाच्या चार हिमधवल अश्वांपैकी कुणीतरी एक शेपटी चाळवत खिंकाळला. याच वेळी कोसलकन्या 'सत्या' हिनं शुभ्र पुष्पमाला द्वारकेच्या गोपाच्या कंठी चढविली होती. सदनीरा नदी किनाऱ्यावर घडलेल्या सत्कृत्याच्या नाटचाला साक्षी राहून आता संथ वाहत होती.

स्पष्टच होतं, आता कुण्यातरी दलप्रमुखांसोबत येणाऱ्या श्रींच्या पंचम पत्नीचं स्वागत करण्याचं कर्तव्य माझ्याकडेच येणार होतं! मी तशी मनाची तयारी केली. कशी दिसत असेल, वागेल आणि रुचेल द्वारकेत ही हिमवानाच्या पायथ्याची क्षत्राणी – सत्या? असे विचार सतत मनी उठू लागले.

यात काही दिवस गेले. एके दिवशी एकाएकी शुद्धाक्ष महाद्वारावरच्या स्वागताच्या वाद्यकक्षात मला परिचित भेरी, तुताऱ्या, नगारे यांच्या पाठोपाठ कितीतरी बासऱ्यांची विशिष्ट लय उठली. ही लय केवळ राणीवशातील श्रींच्या पत्निमंडळासाठी होती. तिथल्या प्रमुखाला सूचना देऊन मीच ती चटकन ओळखू यावी, यासाठी त्यात विपुल बासरीवादकांची आता हेतुत: योजना करवून घेतली होती.

आज तर ही लय क्षणभरही न थांबता अविरत आणि चढ्या स्वरात ऐकू येऊ लागली मी ताडलं– सत्या आली आहे.

राणीवशाच्या द्वीपातून जांबवती व मित्रविंदेसह मी दोन दिवसांपूर्वीच मूळ द्वारकेत आले होते. त्या दोघी माझ्या इथल्या वास्तूत माझ्यासहच राहिल्या होत्या. त्यांना घेऊन मी अपार कुतूहलानं सत्येच्या स्वागतासाठी शुद्धाक्षावर आले. यादव स्त्री–पुरुष आणि कामरूपी स्त्रियांच्या प्रचंड मेळाव्यात प्रत्यक्ष सत्यभामा सत्येला रथातून उतरवून घेत असताना पाहून माझ्या आश्चर्याला पारावारच राहिला नाही. सत्या तर येणारच होती. पण भामा कशी काय तिच्याबरोबर? ती तर अमरनाथाला जाणार होती!

सगळे प्रश्न क्षणात झटकून मी दोघींचं स्वागत केलं. भामा तर बघताच माझ्या गळ्यात पडली. सत्या आम्हा दोघींकडे बघतच राहिली. मला तर भामेला किती आणि काय–काय विचारू असं झालं होतं.

मूळ द्वारकेतील माझ्या महाराणी वास्तूत येताच निवांतपणे भामेनं आपण अमरनाथाकडे श्रीबरोबर न जाता का परतलो, याचं कारण सांगितलं. कोसल देशापासून हिमवानाच्या उंचच उंच शिखरावर अमरनाथाची गुंफा आहे. हा सगळा प्रवास प्रथम हिमालयाच्या पायथ्याकडेकडेने होता. कधी बर्फाळ प्रदेशातून, तर कधी धरतीवरच्या घनदाट अरण्यातून जावं लागणार होतं. हा पहिला टप्पा पूर्ण करताच हिमवंताच्या उभ्या चढणीचा दुसरा टप्पा लागतो. तो हिमघाटाच्या अवघड वळणा– वाकणांनी भरला आहे. ‘सेनेसह जग जिंकता येईल – हिमवंत नाही!’ प्रथम हे कारण सांगून मग स्त्रीला हा प्रवास खडतर म्हणून कसा झेपणार नाही, हे श्रींनी भामेला पटविलं होतं. ते ऐकताना तिला मध्येच थांबवून डिवचत मी प्रश्न घातला, “त्यांनी खूप पटविलं असेल – तू तुझा नेहमीचा हट्टाग्रही बाणा सोडून नेमकं हेच तेवढं कसं काय पटवून घेतलंस त्यांचं?”

तीही काही कमी नव्हती. म्हणाली, “महाराणी मी खूप आटापिटा केला, पडतील ते श्रम, कष्ट न कुरकुरता झेलेन; पण मला अमरनाथला यायचंच आहे! बरोबर घेऊन चला. पण काय सांगू तुला ताई, त्यांनी माझ्यासमोर अधिक काहीच न बोलता नित्याचं‘कृष्णजाळं’ टाकलं! म्हणाले, ‘भामे, तुझी इच्छाच दिसत नाही मी हिमलिंगदर्शन करावं अशी! मी तिकडे जायचा विचारच रहित करून टाकतो झालं! पण... पण एक वाटतं...’ त्यांनी विचार रहित केलाय म्हणताच मी गोंधळले. तरीही निर्धारानं विचारलं, ‘पण वाटतं म्हणता ते काय?’

“तसं त्यांनी माझ्या मतापासून मला माघार घ्यायला लावणारं सबळ कारण नेहमीसारखं लाघवी हसत पुढे केलं. काय सांगितलं असेल त्यांनी असं वाटतंय तुम्हाला?” तिनं विचारलं. मीही विचारात पडले. खरंच भामेला निरुत्तर करणारी, हट्ट सोडायला भाग पाडणारी कसली बौद्धिक खेळी खेळले असतील श्री? काही वेळानं चुटकी वाजवून स्वत:शीच बोलल्यासारखं मी म्हणाले, “मी सांगते तुला भामे, ते म्हणाले असतील, हेच मी रुक्मिणीला सांगितलं असतं, तर तिनं पटकन मानलं असतं! एवढे आढेवेढे कधीच घेतले नसते. माझंच चुकलं, तू रुक्मिणी नाहीस हे कळायला हवं होतं मला!”

ते ऐकून भामेनं आपले काजळ भरलेले विशाल नेत्र आश्चर्यानं केवढेतरी विस्फारले. माझ्या दोन्ही भुजा गच्च पकडून ती आश्चर्यानं किंचाळत म्हणाली, “अगं रुक्मिणीताई, अगदी हेच म्हणाले ते. आणि तेही याच शब्दांत! अक्षराचंही अंतर नाही तुम्हा दोघांच्या शब्दांत! तू कसं काय अचूक ताडलंस हे?” मी नुसतीच हसले!

मग मी तिच्याशी ती द्वारकेतून निघाल्यापासून परतेपर्यंतच्या नाना घटनांवर

मनसोक्त बोलत राहिले. हे बोलणं चालू असतानाच मला अंतरंगात खोलवर जाणवून गेलं की, श्रींना यादवांत सर्वांत प्राणप्रिय आहेत ते केवळ उद्धवभावजी! त्यांनी भामेलासुद्धा वगळून त्यांनाच अमरनाथाकडे समवेत नेलं होतं तर!

सत्या द्वारकेत आल्यापासून थोड्याच दिवसांत ज्येष्ठ सेनापती अनाधृष्टी, यादवांच्या जवळ–जवळ सर्व प्रचंड सेनेसह परतले. भगदत्तानं दिलेले वीस सहस्त्र हत्ती, चाळीस सहस्त्र हत्तिणी, अठरा सहस्त्र अश्व आणि अठरा सहस्त्र दुभत्या गाई हा प्रचंड पशुमेळ यांनी सुखरूप एवढ्या लांबवर आणला होता. आता तर द्वारका पूर्वीचे लक्षावधी यादव स्त्री–पुरुष, सहस्त्रावधी कामरूपी स्त्रिया आणि नित्योपयोगी हजारो पशू यांनी कशी तुडुंब गजबजून गेली! अमात्य आणि सुधर्म राजमंडळातील प्रमुखांना या सर्वांची व्यवस्था लावण्यासाठी दिवस पुरेनासे झाले. भगदत्तानं उपहार म्हणून खंडीनं दिलेलं सुवर्ण, नानाविध रत्नं आणि कामरूपी शैलीचे पर्वतीय अलंकार द्वारकेच्या धनागारात जमा झाले.

हे सगळं जसं काही तिच्या पायाबरोबरच आलं आहे, असं मानणारे श्रद्धाळू यादव सत्येला फार मानू लागले. ती आम्हा स्त्रीमंडळात बघता–बघता रुळून गेली. तिचं एक वैशिष्ट्य होतं.ती नृत्यात विलक्षण पारंगत होती. राजकन्या असूनही या अवघड कलेच्या सरावात आळसानं तिनं कधी एक दिवसही खंड केला नव्हता.

एक मास लोटला. शरयू, गोमती अशा नद्या पार करत श्री गंगाकिनाऱ्यानं पांचालांच्या सीमेवर आले. नौकांनी त्यांनी सर्व यादवसेना कांपिल्यनगर या पांचलांच्या राजनगराकडे धाडली. हिमवानाच्या थंड प्रदेशात तगू शकतील, असे काटक यादव योद्धे स्वत: निवडून सोबत ठेवून घेतले. सेनापती सात्यकी पांचालराज द्रुपदांच्या साहाय्यानं सेना यमुनापार करून, कुंतिभोज राज्यातून सौराष्ट्राकडे धाडण्याची व्यवस्था करणार होते. स्वत: श्रीसेवेत परतणार होते. ठरल्याप्रमाणं महारथी सात्यकी निघून गेले.

ज्या कुरुराज्याचा श्रींच्या बोलण्यात सतत संदर्भ येई त्याच्या सीमाही या प्रवासात लागणार होत्या. पण पांडव नसलेल्या त्या राज्याच्या हस्तिनापूर राजनगराकडे श्री काही वळणार नव्हते. उलट अंधराज धृतराष्ट्रांच्या सीमेवरून आपण चाललोत याची वार्ताही त्यांना लागू नये, अशी दक्षता त्यांनी घेतली. बरोबर विराट यादवसेना नसल्यामुळे त्यांना ही गुप्तता राखणं सोयीचं झालं. मार्गात गंधमादन पर्वताकडे जाणारा हिमालयाचा वळणटप्पा लागला. तिथल्या मुक्कामात श्री उंचशील हिमपर्वताच्या शिखराकडे बघत उद्धवभावजींना म्हणाले, "उद्धवा, शक्य असतं, तर या वेळीच तुझ्यासह गंधमादनावर गेलो असतो. का कुणास ठाऊक, या पर्वताशी दृढ ऋणबंध आहे, असं इथल्या वास्तव्यात प्रकर्षानं जाणवतं आहे. या पर्वताच्या अलकनंदा नदीच्या काठी अयोध्याभूषण श्रीरामाचं काही काळ वास्तव्य झालं आहे. विशेष म्हणजे कुंतीआतेच्या सर्व पांडवांचा जन्म याच पर्वतावर झाला आहे."

दोघेही बंधू कुरुराज्याच्या सीमेवरून गंगा पार करून तिच्या किनाऱ्यानंच निवडक यादवांसह क्षेत्र हरिद्वारवर पोहोचले. इथं सात्यकींच्या प्रतीक्षेत ठरल्याप्रमाणं मोठा पडाव पडला. सेनापती यादवसेना द्वारकेच्या मार्गी लावून निवडक रथ्यांसह हरिद्वारात श्रींच्या पथकाला येऊन मिळाले.

आता अमरनाथाच्या गुंफेतील हिमलिंगाच्या दर्शनाची ओढ लागलेले श्री, सरस्वती नदी ओलांडून मत्तमयूर राज्यात उतरले. लगतच्या पंचनंद राज्याच्या सीमेवर आले.

विपाशा, शतद्रू, इरावती, चंद्रभागा अशा नद्यांकाठच्या वाहीक, केकेय, मद्र अशा राज्यांतून चालले, शेवटी गोनर्दांच्या काश्मीर राज्यात उतरून हिमवंताच्या उभ्या चढणीच्या पायथ्याशी आले.

उभ्या हिमालयाचा शेकडो योजनांचा आडवा प्रवास त्यांनी निर्विघ्न पार पाडला. शेवटी अमरनाथाच्या गुंफेचा बिकट प्रवास सुरू झाला.

पहिल्या काही नागमोडी वळणांवर काटक म्हणून सोबती घेतलेले यादव योद्धे एक–एक करत गळाले. दुसऱ्या टप्प्याच्या पडावात एके दिवशी राहुटीबाहेर आलेल्या श्रींना सर्वत्र हिमच हिम पसरलेल्या पूर्वक्षितिजावरचं सूर्यदर्शन घेताना कसल्यातरी मोहविणाऱ्या मोहक सुगंधांचा एक भपकारा एकदम आला! दीर्घ श्वसनानं वक्षभर तो भरून घेतं डोळे मिटलेल्या श्रींनी तो कसला असावा, याचा अचूक उच्चार केला. त्या निर्जन हिमवेष्टित प्रदेशात ते म्हणाले, "उधो, बंधो, जवळच्याच सरोवरात कुठेतरी नुकतीच ब्रह्मकमळं उमललेली आहेत! सात्यकीसह जाऊन तू काही ब्रह्मकमळकळे व काही फुलं आणलीस, तर होणारं शिवदर्शन सविध व साग्र होईल. ती सामान्य पुष्पं नव्हेत. जाताना मुद्रेवर लपेटून घेण्यासाठी एक वस्त्र घेऊन जा. या ब्रह्मकमळांच्या मादक सुगंधात एवढं सामर्थ्य आहे की, ते खुडण्यासाठी कुणालाही जवळ येऊ देत नाही! तीव्र गंधानं मूर्च्छित करतं! असं फुललेलं ब्रह्मकमळ खुडून ते स्वयंभू हिमलिंगाला शिवस्तोत्रासह अर्पण करणं, हा तर शिवभक्तीचा दुर्मीळ योग आहे. ही फुललेली पुष्पं कमीत कमी एक मास तरी टिकून राहतात. आपला सुगंध अखंड देत राहतात. निसर्गानंच प्रदान केलं आहे हे सामर्थ्य या दुर्मीळ हिमपुष्पांना!"

या हिमप्रवासात अद्याप तगलेले दोन यादववीर सोबत घेऊन उद्धवभावजी त्या सुगंधाच्या रोखानं सरोवराकडे निघाले. सर्वांनी नासिका वस्त्रपट्टयांनी घट्ट झाकून घेतल्या होत्या. तरीही त्या हिमपुष्पाचा दर्प त्यांना येतच होता. तसं इतर कोणासाठीही उद्धवभावजींनी हे साहस केलं नसतं. पण आपल्या प्रिय दादांसमोर त्यांची काही मात्रा चालत नव्हती. दादांच्या तोंडून आलेला शब्द त्यांना ब्रह्मवाक्यासारखा प्रमाण होता. ब्रह्मकमळ्यांची त्यापुढे कथाच काय? संध्याकाळपर्यंत काही फुललेली, काही अर्धोन्मीलित दहा–बारा ब्रह्मकमळं वस्त्रात लपेटून उद्धवभावजी परतले.

आपल्या राहुटीतून जवळ–जवळ येणारा ब्रह्मकमळाचा सुगंध हेरून श्री राहुटीच्या दारातच, दोन्ही हात कटीवर ठेवून थांबले होते. भावजींना यशश्री घेऊन परतलेलं बघून पुढे होत हसत म्हणाले, "उद्धवा, माझं मन सांगतंय, या शिवप्रवासात शेवटच्या टप्प्यात एकटा तूच काय तो माझ्यासोबत तग धरून असशील!"राहुटीत विश्रांती घेतं पहुडलेल्या सात्यकींना हा संवाद ऐकू येणं शक्य नव्हतं.

शेवटी श्री म्हणाले तसंच झालं. निकरानं तगलेले यादवांचे दोन–तीन योद्धे व महारथी, आजानुबाहू सेनापती सात्यकीही अमरनाथाच्या शिवप्रवासाच्या शेवटच्या टप्प्यात गळाले! हे दोघेच बंधू चालले.भावजींच्या काखेत ओलेत्या वस्त्राच्छादित कमलफुलांचा पेंढा असल्यानं बर्फाळ चढाईची अवघड वळणं घेताना त्यांना कष्ट पडू लागले. तसं थांबवून त्यांच्या स्कंधावर प्रेमळपणे हळुवार थोपटत श्रींनी तो सुगंधी पेंढा हळुवारपणे आपल्याजवळ घेतला. उजवा हात उद्धवभावजींसमोर पसरत म्हणाले, "याचा आधार घे. आणि माझ्या पाठोपाठ निर्भय चालत राहा."

त्यांच्या हातात हसत आपला हात देताना उद्धवभावजी म्हणाले, "आता नक्कीच

माझंही शिवदर्शन होईल. हा हात सुदर्शनधारी आहे – त्याला माझं कसलं ओझं!"

शेवटी सत्त्वपरीक्षा बघणारी हिमवानाची अखेरीची वेडीवाकडी वळणं पार करत दोघेही बंधू अमरनाथाच्या गुंफेतील पुरुषभर उंचीच्या स्वयंभू हिमलिंगासमोर एकदाचे उभे ठाकले. उद्धवभावजींनी केवढातरी मोठा नि:श्वास टाकला. स्फटिकधवल, ओलसर, निथळत्या स्वयंभू शिवाचं दर्शन होताच श्रींनी आपल्या नीलवर्णी हस्तकमलांनी ती ब्रह्मकमळं वस्त्रांतून मोकळी केली व एक–एक करीत हिमलिंगावर चढविली. काही बंधूंना चढवायला लावली. ते स्वत:शीच बोलले, "दादा असता, तर ही कमळं भुजंगमालेसारखी शिवकंठात चढवता!" श्रींचे पाणीदार, दीर्घ, मत्स्यनेत्र आपोआपच मिटले गेले. निळसर दीर्घ बोटांची ओंजळ जोडली गेली. गुलाबी कमलदली ओठांतून अस्पष्ट शिवस्तुती त्या निरामय स्वर्गीय एकांतात स्त्रवू लागली. प्रत्यक्ष शिव ती कान देऊन श्रवू लागला –'पशूनां पति पापनाशं... शिवाकांत शंभो शशांकार्धमौले। महेशान शूलिन् जटाजूटधारीन्। त्वमेको जगद्व्यापको विश्वरूप, प्रसीद प्रभो पूर्णरूप।।'

अत्युच्च हिमवानात निर्जन गुंफेत शिवासमोर हात जोडलेले द्वारकाधीश कितीतरी वेळ तसेच ध्यानरत राहिले. उद्धवभावजींनीही त्याचं अनुकरण केलं. पण एकदा हिमलिंग डोळाभर बघितल्यानंतर आपले दादा त्याच्यासमोर कसे दिसतात, हे रोखून बघताना ते भानच हरपले. शिवलिंगाकडे केलेला पुढा वळवून त्यांनी आपल्या दादांकडेच केला होता आणि तेही तसेच ध्यानरत झाले होते.

यथासांग डोळाभर शिवदर्शन करून दोघेही बंधू परतीच्या वाटेला लागले. येताना उतरण असल्यामुळे भावजी पुढे होते. श्री मागे. परतीच्या पहिल्याच वळणावर श्री म्हणाले, "धावू नकोस उद्धवा! मलाही हात दे. बरोबर घे! मला सांग – अमरनाथाचं स्वयंभू शिवलिंग तुला कसं वाटलं? काय मागितलंस तू शिवाकडे?"

ते ऐकताच मात्र पुढे गेलेले उद्धवभावजी थांबले. आपल्या दादाकडे एकटक रोखून बघत म्हणाले, "मी हिमजलानं पाझरणारं ते टवटवीत पुरुषभर उंचीचं हिमलिंग बघताना हरखून गेलो. पण जेव्हा माझ्या लक्षात आलं की, ते ओलसर, शुभ्र हिमलिंग तू समोर उभा असल्यामुळे धूसर नीलवर्णी शाल पांघरल्यासारखं दिसू लागलं, तेव्हा क्षणैक मला वाटलं, शिवानं आकाशचं पांघरलंय! मग मात्र मी पुढा करून तुझ्याकडेच बघत राहिलो. तुझी शिवस्तुती ऐकताना माझे डोळे आपोआप मिटले गेले. त्याच्यासमोर मला एकच दृश्य दिसत राहिलं. निळ्याशार आभाळात पांढऱ्याशुभ्र बर्फाचा उंचशील शिखरमाथा घुसला आहे. तो त्यात लय पावला आहे. दोघेही एकच आहेत!! या दृश्यामुले शिवाकडे काही मागायचं आहे किंवा तुला सांगायचं आहे, हेही मी पार विसरूनच गेलो!!"

दोघेही बंधू परतीच्या वाटेवर तळा–तळावरून मागे थांबलेले यादव सोबती घेऊन द्वारकेला यायला निघाले. त्यांच्या आगमनाच्या सलग वार्ता शुद्धाक्षावर येऊन थडकत राहिल्या. आणि उभं द्वारकानगर व जनपद त्यांच्या स्वागतासाठी मोहरून उठलं.

शेवटी ही गाजलेली नरकासुरवधयात्रा यशश्रीसह पूर्ण करून उद्धवभावजींसह श्री द्वारकेच्या शुद्धाक्ष महाद्वारात विजयी मुद्रेनं उभे ठाकले. पाठीशी उपहारात मिळालेल्या सैनिकांची नियंत्रित प्रचंड सेना होती. मी तर केव्हाची श्रींची प्रतीक्षा करत मूळ द्वारकेत थांबले होते. माझ्या चौघीही भगिनी – जांबवती, सत्यभामा, मित्रविंदा व सत्या राणीवशाच्या द्वीपतून येऊन मला मिळाल्या होत्या. आम्ही पंच श्रीपत्नींनी तेजाळत्या दीपांच्या पंचारतींनी, वाद्यांच्या प्रचंड गजरात श्री आणि भावजींना ओवाळलं. उभी

द्वारकानगरी घराघरांवर गुढ्या चढवून, राजमार्गाच्या चौकाचौकात तोरण बांधून, कुंकुमाच्या मुठीच मुठी उधळताना मोहरून गेली होती. कामरूपी आणि यादव स्त्रिया एकमेकींच्या हातात हात गुंफून दारादारांत आपणच रेखलेल्या रांगोळ्या उधळून टाकत झिम्मा–फुगड्यांत रंगल्या होत्या. द्वारकेभोवतीचा तट तेवत्या असंख्यात दिवल्यांनी अधिक तेजोमय केला होता. आज पूर्व महाद्वारावर थोरले महाराज, दोन्ही माता, युवराज्ञी, अमात्य, सुधर्मा सभेतील सर्व मंत्रिगण, सेनापती अनाधृष्टी लाखो यादव ऊरओसंडत्या अमाप उत्साहानं लोटले होते. यातही मला सभोवारच्या दृष्टिक्षेपातच प्रकर्षानं जाणवून गेलं. उपस्थितात नव्हते काय ते आमचे बलरामदादा आणि मंत्री अक्रूरकाका!

नरकासुरवधामुले श्रींच्या कीर्तीचा डंका आता संपूर्ण आर्यावर्तभर दुमदुमत होता. पूर्वेच्या कामरूप राज्यातील ही वार्ता मिथिलेतही केव्हाच पोहोचली होती. जनक नगरात जाऊन बसलेल्या रुष्ट बलरामदादांपर्यंत ती पोहोचलीच होती. श्री प्राग्ज्योतिषपुराहून लागलीच कोसलांच्या राज्यात उतरले होते. तेही मिथिलेचं राज्य लगतच असल्यानं सत्येच्या स्वयंवरात बलरामदादाही नक्की भेटतील या हेतूनं. मात्र तसं काहीही घडलं नव्हतं. दादा फार पिळाचे होते.

मला श्रींना दादांशिवाय आणि उद्धवभावजींशिवाय बघणं नकोच वाटे. अलीकडे हे यादवांचं त्रिदळी बिल्वदल त्यातील उजव्या हातीचं दळ नसल्यासारखं ओकं–ओकं भासत राही. सदैव खटकत राही. मी पाऽर उदासून जाई.

यासाठी मूळ द्वारकेतच माझ्या भोजनोत्तरच्या विश्रामकक्षात मनी पक्कं ठरवून मी हा विषय श्रींसमोर एकदा पटावर घेतला. म्हणाले “श्रींनी अमरनाथाच्या गुंफेतील शिवलिंगाचं उद्धवभावजींसह दर्शन घेतल. वाटलं होतं आम्हाला, नाही, निदान भामेच्या डोळ्यांनी तरी श्रींसमवेत मला म्हणजेच भामेला तरी शिवदर्शन होईल. तिथं हिमपिंडीवर कुणी भक्तानं वाहिलेलं बिल्वदल असेलच. मला मात्र आज त्या बिल्वदलातील दक्षिण हातीचं दळ नसल्यामुळे काहीतरी चुकल्या–चुकल्यासारखं वाटतं आहे. त्यासाठी श्रींजवळ एक मागणं आहे.”

“थांब रुक्मिणी, ते मागणं घालण्यापूर्वी माझं थोडं ऐक. मी आजच अमात्य विपृथू व उद्धवाला चित्रकेतू व बृहद्बल यांच्यासह द्वारकेबाहेर विशेष कार्यपूर्तीसाठी धाडलं आहे.” ते म्हणाले.

“श्रींची अशी कामं तर कधीच संपणार नाहीत. त्याचबरोबर भोवतीच्यांना सतत कामाला लावण्याची खोडही जाणून आहे मी. मी द्वारकेची महाराणी नावापुरती. इथं झाले, आहे केवल एक स्वागतिका. श्रींच्या विशेष माणसांचं स्वागत करणारी! पण या सर्वांच्या स्वागताचा वाटला नाही; तो आनंद आता वाटेल एकाच व्यक्तीच्या स्वागतात.” मी म्हणाले.

“ऐका तरी महाराणी. अमात्य विपृथू गेलेत मिथिला जनपदाकडे. जनकपूरला. सर्व बुद्धिकौशल्य पणाला लावून, समजूत घालून, ते बलरामदादाला सोबत घेऊनच येणार आहेत. त्यांना हे अवघड कार्य सहज शक्य व्हावं म्हणून एक अल्पशी युक्ती लढविली आहे. आता महाराणींएवढी आमची काही बुद्धिकुशलता श्रेष्ठ नाही! त्यांनीच सांगावं, अमात्यांसोबत आम्ही एक वस्तू पाठविली आहे, ती कोणती असावी? एक छोटासा निरोपही धाडला आहे, तो काय असावा?” त्यांनी हसत सहज आपल कृष्णजाळं पसरविलं.

मी गोंधळलेच. काही पळं विचार करून म्हणाले, “श्रींनी अमात्यांबरोबर युवराजांची आवडती गदा पाठविली असेल. निरोप धाडला असेल, ही गदा तुझ्याशिवाय सुनी दिसते. सुधर्मा सभेतील युवराजांचं सिंहासन ओकंबोरकं दिसतं. दोन्हींचा मान राखण्यासाठी अमात्यांसमवेत निघून यावं.”

ते हससे.म्हणाले, “एवढं बुद्धिबळ कुठं आलंय आमच्याजवळ? मी अमात्यांबरोबर धाडलंय ते एका बंद पेटिकेतून माझं प्रिय साधं मोरपीस! निरोप दिलाय, तू गेल्यापासून हे असंच मी पेटिकेत घालून ठेवलं आहे. तू येऊन ते किरीटात चढविलंस, तरच अवघ्या यादवांना पुन्हा ते तसं दिसेल. नाहीतर हा द्वारकाधीशाचा सुवर्णी राजकिरीट असाच राहील – मयूरपंखविहीन – ओकाबोका. अंकपाद आश्रमातले दिवस स्मरावेत आणि या मयूरपंखासह निघून यावं!!”

मला आत्ता कुठं ध्यानी आलं की, दादा गेल्यापासून खरंच श्रींनी मोरपीसधारी मुकुट धारण केलाच नव्हता. मी त्यांच्या बुद्धिबळाच्या खेळानं चक्रावून त्यांच्याकडे बघतच राहिले. आता मात्र सावध होऊन मी प्रश्न कला, “मग उद्धवभावजींना धाडलंय त्यांच्या बंधूंसह ते कुठं? आणि कशासाठी? मला वाटलं होतं, त्यांचंच नाव या कामासाठी सर्वाधिक योग्य म्हणून सुचवावं. ते बरं झालं असतं.”

“चुकतेस तू. उद्धवाला दादानं समोर बघितलं असतं, तर एकाच वाक्यात त्याला उडवून लावलं असतं की, तू तर धाकटयाहून धाकटा. ही पेटिका घेऊन आलास तसा परत चालता हो. त्याला काय झालं होतं यायला? म्हणून तर या कामासाठी यादवांचे वयस्क अमात्य विपृथू यांची मी निवड केली आहे. त्यांच्याद्वारा दादातील युवराजाला हे आवाहन आहे. ते तो कधीच नाकारू शकणार नाही. ‘धाकटा’ म्हणून माझाही हट्ट आचार्यांच्या अंकपाद आश्रमाचं स्मरण देत त्याच्यासमोर ठेवला आहे. बघू या, काय मोठेपण घेतो तो ते. नाहीतर मलाच जाणं भाग आहे जनकपुरात!”

“मग धाडलंय तरी कुठं उद्धवभावजींना? आणि कशासाठी?” आता मात्र मी खरंच चक्रावले होते. ते मात्र काहीच न झाल्यासारखं नेहमीचं लाघवी हसत म्हणाले, “उद्धव गेलाय काशीराज्यात. स्यमंतक मणिरत्न जवळ असलेल्या अक्रूरकाकांची समजूत घालायला. त्यांना तो आपल्या मधाळ वाणीत पटवून देणार आहे, की तो मणी स्वत: त्यांनी सुधर्मा सभेत सर्वांना केवल एकदा दाखवून तो द्वारकाधीशांकडे नाही, याचा समस्तांना विश्वास पटवून द्यावा. मग हवं असल्यास पुन्हा काशीराज्यात परतावं.दादांचा आग्रह आहे. त्यांनी उर्वरित जीवित द्वारकेतच व्यतीत करावं. या क्षुल्लक मणिरत्नासाठी पुन्हा काशीराज्यात येण्याची दादांवर पाळी येऊ नये!”

मी तो राजनीतीचा वक्र तर्जनीनं घृत बाहेर काढण्याचा कुशल डाव ऐकून थक्क झाले. तरीही चिकाटी धरत शेवटचा प्रश्न मी केलाच, “मग चित्रकेतू व बृहद्बल या त्यांच्या बंधूंना उद्धवभावजींसमवेत कशासाठी धाडलंय श्रींनी? की त्यातही काही स्यमंतक मण्यासाठी उद्धवभावजींवरच दृष्टी ठेवण्याचा द्वारकाधीशांचा हेतू आहे?”

“पुन्हा चुकलीस महाराणी! अक्रूरकाका स्यमंतक मणिरत्न उद्धवाकडे कधीच देणार नाहीत. मला तर त्याची कधीच अपेक्षा नव्हती. उद्धवाला मी इतरांहून अधिक जाणतो. तो योद्धा कमी आहे, तत्त्वज्ञ अधिक आहे. त्याहून अधिक आतबाहेर स्पष्ट स्फटिकविचारांचा तो माझा परमभक्त आहे. म्हणूनच त्याच्या संरक्षणाची दक्षता मीच घेतली पाहिजे. उद्धवाचे बंधू त्याच्याहून ज्येष्ठ आहेत. कुशल महारथी आहेत. मी त्यांना

सांगायचं ते सांगितलं आहे.”

त्यांचा एक–एक शब्द ऐकताना मला वाटलं, समोर द्वारकाधीश श्री नाहीतच. आहे एक शब्दांचं नीलवर्णी ब्रह्मकमळ! आपणही नासिकेवर वस्त्रपट्टी घेण्याची पाळी येईपर्यंत इथं थांबूच नये कसं! त्या विचारासरशी मी त्या वेळी पटकन विश्रामकक्षाबाहेर निघूनही गेले होते.

द्वारकेतील हे दिवस खरंतर मोरपंखीच होते. माझे एकटीचे नव्हे.आम्हा पाचही श्रीपत्नींचे. तसेच द्वारका जनपदातील सर्वच स्त्री–पुरुषांचे.

आम्ही पाचही जणी पाच दिशांतून द्वारकेत आलो होतो. प्रत्येकीचा स्वभाव–मनोभाव अर्थातच वेगवेगळा होता. हाताची पाच बोटं तरी कुठं असतात एकसारखी? तरीही त्यांचीच एक बळकट मूठ नाही का होत? त्या मुठीची कळ माझ्याकडे आहे, हे मी चांगलं जाणून होते. त्या चौघीही मला महाराणी म्हणून खूप आदर देत. मी त्यांना महाराणी तर आहेच, पण त्या सर्वांहून ज्येष्ठ आहे याची तसं स्पष्ट न बोलता, वागण्यातून जाणीव करून देई. तीही अगदी नकळत. त्यासाठी एकदा तर मी इतर तिघींच्या समक्ष भामेला धक्का देईल असा उपाय योजला. तिच्या तांबूसगौर पायांवर शृंगारसेविकेकडून किचकट आकाराची आळत्याची कुसर रेखून घेणं तिला फार आवडे.

आम्ही पाचही जणी एकत्र असताना एकदा हा आळत्याच्या कुसरीचा प्रयोग चालला होता. तिची यातील पारंगत सेविका त्या कामात आमच्यासह भोवतीचं जगच विसरली होती. श्रींशी एकांतात बोलताना मी अनेकदा त्यांच्या तोंडून ऐकलं होतं “स्वत:ला विसरून साधलेला कोणताही कर्मयोग ही ईश्वराची पूजाच असते! कर्म कधीच हलकं, मोठं नसत. ते तस बघणाऱ्याच्या हलक्या, मोठ्या दृष्टीमुळे दिसतं.”

भामेच्या त्या सेविकेला तसं दंग बघून मला तीव्रपणे वाटून गेलं, माझ्या या भगिनींना मी महाराणी, त्यांची ज्येष्ठ भगिनी, याहूनही कुणी वेगळीच आहे, हे दाखवून देण्याचा हाच योग्य क्षण आहे. त्या सेविकेला मी हेतुत: विचारलं, “कशी गं रेखतेस एवढी किचकट आळत्याची कुसर? मला जमेल का गं तुझ्यासारखी?”

माझ्या रोख तिच्या काहीच ध्यानी आला नाही. ती म्हणाली, “न जमायला काय झालं महाराणी? बघा तरी यत्न करून!”

मी तिची सूचना पटकन उचलून धरत पुढे झाले. तिला दूर करून सत्यभामेचा तांबूसगौर पाय मी हाती घेतला. चक्क माझ्या मांडीवर तो हलकेच टेकता ठेवला. एका हाती ओल्या आळत्याचा वाडगा धरून दुसऱ्या हातीच्या सोनवर्खी सरशीनं, मान वाकडी करून एकाग्रपणे मी कुसर रेखू लागले!

त्या चौघीही आ वासून बघतच राहिल्या. मी मनाजोगती कुसर रेखतच राहिले. ती पुरी करून हातची सरशी पुन्हा वाडग्यात ठेवून तो खाली ठेवला. एक–दोनदा मान वाकडी करून भामेच्या पायावर मी रेखलेली आळत्याची रांगोळी नीट जमली की नाही, याचा वेध घेतला. त्या चौघीही डोळे विस्फारून जवळ–जवळ किंचाळल्याच, “अय्याऽ, छाऽनच, की! सुरेऽख! महाराणींची ही कला काही माहीतच नव्हती कुणालाही.”

माझं काम झाल होतं. त्या चौघींच्याही मनांवर माझ्या विषयीची कधीही न पुसली जाणारी भावकुसर रेखून झाली होती! मी श्रींसारखंच कुठलंच काम हलकं न मानणारी, श्रींना शोभणारी त्यांची योग्य ज्येष्ठ पत्नी आहे, हे चौघींनाही कळून चुकलं होतं! त्याविषयी मी काहीही न बोलता!

एक मास लोटला आणि श्रींनी कार्यपूर्तीसाठी धाडलेले अमात्य विपृथू आणि उद्धवभावजी यशश्री घेऊन शुद्धाक्षावर परतताहेत; त्यांच्यासह युवराज बलरामदादा आणि मंत्री अक्रूरकाकाही परतताहेत, अशी वार्ता अग्रदूतानं आणली. सरत्या पावसातही द्वारका पुन्हा मोहरून उठली. द्वारकेचा हा आनंद काही वेगळाच होता.

मी तर दोन कारणांसाठी आनंदून गेले होते. त्यातील प्रमुख म्हणजे श्रींचा सशक्त आधार असलेले आमचे प्रिय, बलदंड दादा रोष त्यागून पुन्हा द्वारकेत येताहेत, हे होतं, दुसरं होतं, श्रींवरील स्यमंतकाच्या चोरीचा आळ निपटणार हे. भामेशिवाय आम्हा चौघींना ते रत्न कधीच बघायला मिळालं नव्हतं. तशी इच्छाच कधी झाली नव्हती. नाटचामागून नाटचं घडवीत गेलेलं स्यमंतक मणिरत्नही आता आम्हाला प्रत्यक्ष बघायला मिळणार होतं, याच वेळी माझ्या मनी एक कुतूहलही दाटलं होतं की, बराच काळ द्वारकेतून बाहेर गेलेलं हे रत्न आता द्वारकेतच आणि कुणाकडे ठेवण्याचा निर्णय श्री घेतील?

उद्धवभावजी, त्यांचे दोघेही ज्येष्ठ बंधू, बलरामदादा आणि अक्रूरकाका यांचं द्वारकाकर यादवांनी शोभेसं प्रचंड स्वागत केलं. शुद्धाक्ष महाद्वारात माता–पित्यांच्या साक्षीनं, दादांचा चरणस्पर्श घेण्यासाठी झुकणाऱ्या श्रींना दादांनी तसं काही करू न देताच आवेगानं एकदम दृढ आलिंगनातच घेतलं. राम श्रींना मिळताच भावोत्कट झालेल्या सहस्त्रावधी यादवांनी अनावर हर्षघोष केला –‘बलराऽम–श्रीकृष्णऽऽ जयतु जयतु!’ माझ्या मनीचं यादवी त्रिदळी बिल्वदल आत्ता कुठं पूर्ण झालं होतं. मी पूर्ण समाधानी झाले होते.

दुसऱ्याच दिवशी दादा, काकांच्या स्वागताप्रीत्यर्थ प्रचंड सुधर्मा राजसभा भरली. मी श्रींशेजारच्या नेहमीच्या आसनावर बसले. माझ्या चौघीही भगिनी राज्ञिमंडळाच्या विशेष कक्षात बसल्या होत्या. मुख्य आसनावर बसलेल्या वसुदेवबाबा व देवकीमातेच्या आणि विशेष कक्षातील रोहिणीमातेच्या चर्येवरून आपल्या दोघाही पुत्रांना बऱ्याच दिवसांनंतर एकत्र बघून वात्सल्यानंद कसा ओसंडत होता. युवराज रुसून गेल्यापासून रेवतीताईही निग्रहानं सभागृहात कधी आल्याच नव्हत्या. तशा त्याही पिळाच्याच होत्या. एव्हापर्यंत त्या आपल्या पतीवरच रुसल्या होत्या! आज त्यांची दोन्ही आसनं भरलेली बघून उत्साही यादव आपापसात कुजबुजत होते! प्रसन्न मुद्रेचे आचार्य सांदीपनी आणि प्रज्ञाशील तळपत्या चर्येचे मुनिवर गर्ग आपापल्या स्थानावर विराजमान झाले होते. दोन्ही सेनापती, प्रमुख नऊ मंत्रिगण आणि त्याखालच्या रांगेत बसलेले विविध दलप्रमुख, गुप्तचरप्रमुख; तसेच अमाप उत्साहानं खचाखच भरलेले तरुण, मध्यमवयस्क आणि वयस्क यादववीरांचा संमिश्र कोलाहल अमात्यांनी राजदंड ऊंचावून पायालगत आदळताच चिडिचाप थांबला.

अमात्यांनी द्वारका जनपदाच्या विशेष सभेच्या प्रयोजनाला तोंड फोड़लं, “सुधर्मा सभेच्या मानकरी यादवजनहो! आजची विशेष सभा दोन विशेष ज्येष्ठ यादवांच्या जनपदातील पुनरागमनाच्या आनंदाप्रीत्यर्थ पाचारण केली आहे. हे जनपद युवराज बलराम आणि मंत्री अक्रूर यांचं सहर्ष स्वागत करीत आहे. या राजसभेत प्रथमच आलेल्या द्वारकाधीश पत्नी सत्यभामादेवी, जांबवतीदेवी, मित्रविंदादेवी व सत्यादेवी यांना द्वारकेतील समस्त पौरजन यादवांच्या वतीनं मी सादर वंदन करतो. द्वारकाधीशांच्या विशेष सूचनेनुसार घोषित करतो की, त्यांनी प्राग्ज्योतिषपुरात

प्रकटपणे अभय देऊन वरलेल्या सोळा सहस्त्र कामरूपी स्त्रीजनांना या जनपदातील लहानथोर पौरजन तसाच मान व आदर देतील. कुणी चुकूनही त्यांचा कधीच अनादर करणार नाहीत. तसं निदर्शनास आल्यास ती संबंधित कामरूपी स्त्री इथं राजनगरातच सन्मानानं राहील. मात्र त्या–त्या संबंधित अपराधी यादवाला त्याच क्षणी द्वीप सोडावं लागेल! आणि अशा एकदा द्वीपातून हाकललेल्या यादवाला पुनश्च म्हणून शुद्धाक्षातून वा कुठल्याही द्वारातून राजनगरात प्रवेश काही करता येणार नाही! यादववीर युवराज बलराम या दीर्घ कालच्या मनोमीलनानंतर द्वारकाधीशांना काही एक भेट देऊ इच्छितात. ती त्यांनी द्यावी अशी मी त्यांना विनंती करतो." सभागृहात दादा आता श्रींना कसली भेट देणार याचं कुतूहल दाटलं.

दादा आपल्या आसनावरून उठले. हातची शिसमी लाकडाची कलाकुसरीची पेटिका सांभाळत थेट आमच्याच आसनासमोर आले. धिप्पाड दादांनी हळुवार हातांनी पेटिका उघडली. त्याहून अलवार हातानं आतील टवटवीत, विविध रंग अंगभर उधळणारं तळहाताएवढं, टपटपीत मोरपीस पेटिकेबाहेर घेतलं. त्यांचे टपोरे, भाबडे नेत्र डबडबून आलेले मला स्पष्ट दिसून येत होते. आपल्या पुष्ट व पीळदार हातातलं ते मोरपीस उंच उंचावून अर्धवर्तुळी फेर घेत आपल्या समस्त यादव बंधूंना ते डोळाभर दाखविलं. ओणवं होत, दादांनी ते श्रींच्या तळपत्या सुवर्णमुकुटाच्या घडीव खोबणीत बसविलं. तसं छतभेदक टाळ्याच टाळ्यांच्या गजरात श्रीही आसनावरून उठले. तसे श्रींचे नेत्र विलक्षण पाणीदार होते. त्यात पाणी मात्र क्वचितच तरळे. आपल्या प्रिय दादाकडे बघताना आज श्रीनेत्र पाणथरले! दादांचा आशीर्वाद घेण्यासाठी ते झुकणार तोच दादांनी त्यांचे वृषस्कंध घट्ट पकडून त्यांना दृढ आलिंगनात घेतलं. श्रींचे खांदे अपार मायेनं थोपटले. तसा यादव सभेनं अविरत टाळ्यांचा व अनावर हर्षघोषांचा कल्लोळच कल्लोळ उठविला – 'जयतु! जयतु!' आपल्या प्रिय बंधूंच्या सोनकिरीटावर आशीर्वादाचा हात फिरवून काहीही न बोलता दादा आपल्या आसनाकडे परतले. बोलणं हा त्यांचा स्वभावच नव्हता.

आजच्या सभेच्या अत्यंत महत्त्वाच्या विषयाला अमात्यांनी राजदंडी ठोका देऊन हात घातला. पूर्वी मंत्रिगणांच्या मंडळात बसणारे अक्रूरकाका आज समोरच्या अभ्यागताच्या चौकातील बैठकीवर एक सामान्य अभ्यागत यादव म्हणून अवघडून बसले होते. त्याला कारणही तेच होते. स्यमंतक मणिरत्नाची पेटिका घेऊनच ते आज सुधर्मा सभेत आले होते. प्रत्यक्ष मामा कंसाला राजवेदीवरून खाली खेचताना त्यांनी मथुरेत श्रींना पाहिलं होतं, आज श्री काय निवाडा देतील, यानं ते तसे मनोमन पार भेदरलेले होते.

अमात्य विपृथू त्यांच्याकडे हातनिर्देश करीत म्हणाले, "द्वारकाधीशांच्या आज्ञेनं मी पूर्वीच्या मंत्रिगणांतील एक ज्येष्ठ मंत्री अक्रूर यांचंही स्वागत करतो. एका क्षुल्लक मणिरत्नासाठी घडू नये ते घडलंय. सहस्त्रावधी यादवांच्या कंठातील कौस्तुभमणी असलेले आमचे वंदनीय द्वारकाधीश व त्यांचे ज्येष्ठ बंधू युवराज बलराम यांच्यात अपसमजानं मतांतराची दरी पडली. अक्रूरांनी आपल्या कक्षातूनच ते मणिरत्न समस्त यादव सभेला एकदा दाखवावं. त्यामुळे सर्वांना विश्वास वाटेल की, ते श्रीकृष्णमहाराजांजवळ कधीच नव्हतं." आज्ञेप्रमाणं अक्रूरकाका उठले. आपल्या रांगेतूनच त्यांनी झमाझम तळपणारं ते तेजस्वी मणिरत्न अर्धवर्तुळी फेर घेत सभेला

एकदा दाखवलं. मग श्रींजवळ येत हातची शिसम पेटिका त्यांनी त्यांच्या चरणांजवळ ठेवली. श्रींना वंदन करून ते पुन्हा आपल्या आसनावर जाऊन बसले. अमात्य पुढे बोलू लागले, “आता द्वारकाधीश स्यमंतकविषयी देतील तो निर्णय या सुधर्मा सभेला सदैव मान्य आहे. “विपृथूंनी नित्याचा राजदंडी ठोका दिला. हजारो मानकरी यादवांची सुधर्मा राजसभा उत्कट उत्कंठेनं चिडिचूप झाली. दूरवरची पश्चिम समुद्राची गाज काय ती तेवढी सतत ऐकू येत राहिली.

उठण्यापूर्वी श्रींनी माझ्यावर एक कटाक्ष टाकला. केवढया आत्मतेजानं तळपत होते त्यांचे पाणीदार, काळेशार मत्स्यनेत्र! ते किंचित हसले. दुसऱ्याच क्षणी शिसम पेटिका दोन्ही हाती लीलया खेळवीत ते उठले. सभागृहावर आपली गरुडदृष्टी सहज फिरवीत श्रींची वेणुवाणी स्त्रवू लागली –

“माझ्या समस्त प्रिय यादवजनहो! आजचा दिवस माझ्यापेक्षा तुम्हा सर्वांच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. याच सभागृहात माझ्या दिवंगत श्वशुरांनी – ज्येष्ठ यादव सत्राजितांनी मजवर स्यमंतक मण्याच्या चौर्याचा निंद्य आक्षेप घेतला होता. याच महाविक्रमी रत्नमण्यानं माझ्या प्राणप्रिय ज्येष्ठ बंधूंच्या मनातही माझ्याविषयी विकल्प निर्माण केला!

“आज या दोन्हीही गोष्टी दूर झाल्या आहेत. स्यमंतक रत्नमण्याचा मला कधीच मोह नव्हता. याच काय; तशा कुठल्याही रत्नाचा कधीच असणार नाही. संपत्ती हे जीवनचक्र चालविण्याचं एक साधन आहे. केवळ तेच साध्य कधीच होऊ शकत नाही. तसं झालं की, भल्याभल्यांना कल्पनाही करता येणार नाही अशा आपत्ती कोसळतात. समाजात अकल्पित अपराध वाढतात.

“मानवाची खरी संपत्ती आहे बुद्धिमत्ता! सुसंस्कारांनी पैलू पाडलेली निकोप बुद्धिमत्ता हेच खरं रत्न, तीच कणभर का होईना जीवन पुढे नेते. त्याचा विकास करते.

“या स्यमंतकानं आपल्या नव्या जनपदात अनेक वादळं निर्माण केली. माझ्या प्राणप्रिय ज्येष्ठ बंधूंचा अपसमजातून मतभेद झाला होता. तो दूर करावा यासाठीच या स्यमंतक मणिरत्नामागे मी इतका हात धुऊन लागलो. यांचा अपसमज दूर झाला की, सर्वांचाच आपोआप दूर होणार होता. ज्येष्ठांचे अपसमज हे कठोर शापाहून हानीकारक ठरतात. आता ते समूळ दूर झालेत. त्याचा मला आनंद आहे.

“या क्षणीच तुमचा द्वारकाधीश म्हणून मला स्पष्ट केलं पाहिजे की, ज्येष्ठ यादव अक्रूरकाका व कृतवर्मन यांच्या या स्वमंतकासाठी झालेल्या स्वार्थी हालचाली मला मुळीच आवडलेल्या नाहीत. त्यांनी शतधन्व्यासारख्या एका दूरस्थ यादवाला भरीस घालून, कट रचून, सत्राजितांसारख्या द्वारकेला अत्यंत मार्गदर्शक ठरणाऱ्या मंत्रिगणांतील दुसऱ्या एका ज्येष्ठ व अनुभवी यादवश्रेष्ठाचा त्याच्याकरवी वध करविला. उभयतांना कठोर चेतावणी आहे की, असा अक्षम्य अपराध पुनश्च घडता कामा नये!

“अक्रूरकाका तर हा मणी हातात पडताच असे विचित्र का वागले, काही कळत नाही. मला गोकुळातून कंसभेटीसाठी मथुरेत आणताना आदल्या रात्री त्यांनीच सावध केलं होतं, ते त्यांचं सौहार्द मी कधीच विसरलो नाही. विसरणारही नाही. त्या वेळी मला सावध करणारे ते यादवमंत्री या वेळी स्वत:च असे असावध का वागावेत? स्पष्ट आहे – संपत्तीचा लोभ! यासाठी या वेळीच स्पष्टपणे सर्वांना सांगण भाग आहे. लोभावर हे नवं

जनपद कधीच तगणार नाही. अमर्याद लोभामुळे, ते कितीही वैभवाला चढलं तरी डुबेल! ते तगेल केवळ अमर्याद त्यागावर. असीम कर्तव्यपूर्ततेवर.

"ती संधी पुन्हा ज्येष्ठ यादव अक्रूरकाकांना द्यावी, म्हणून मी त्यांना, त्यांच्या कक्षातून उठून त्यांनी पुनश्च मंत्रिगणांच्या मंडळात येऊन बसावं, अशी सर्वांच्या वतीनं विनंती करीत आहे. मंत्रिगणातील दहा जणांपैकी त्यांचं आसन ते गेल्यापासून मी याच दिवसासाठी हेतुत: रिक्त ठेवलं आहे. त्याचा त्यांनी पुनश्च स्वीकार करावा आणि हे स्यमंतक मणिरत्नही स्वीकारावं! इत:पर यादवांत या रत्नासाठी कसलीही दरी पडू नये, म्हणून विश्वस्त या नात्यानं त्यांनीच ते सांभाळावं. काशीराज्यात स्यमंतकातून लाभलेल्या संपत्तीचं दान करून त्यांना मिळालेली 'दानपती' ही गौरवशाली उपाधी अखंड राखावी. स्यमंतकाच्या वास्तव्यानं आणि दानानं द्वारकेचं आरोग्य निरामय राहणार आहे, हे त्यांनी कधीच विसरू नये. या सर्वांमुळे त्यांचंही आरोग्य तसंच निकोप राहणार आहे." श्रींनी सेवकाकरवी हातची पेटिका अक्रूरकाकांकडे धाडली.

भारावलेले, दाढीधारी अक्रूरकाका टाळ्यांच्या कडकडाटात उठले. धिमी पावलं टाकीत मंत्रिकक्षातील आपल्या रिक्त आसनावर पुनश्च जाऊन बसले.

आता आपल्या प्रिय दादाकडे बघत श्रींनी सभेचं समापन केलं. म्हणाले, "तुम्हा सर्वांच्या युवराजांविषयी व माझ्या ज्येष्ठ बंधूविषयी मला काय वाटतं, ते सांगायला माझ्याजवळ योग्य असे शब्दच नाहीत. दादा माझ्या निरोपाचा आदर राखून द्वारकेत परत आलेच नसते तर?..."

राजसभेचा कानोसा घेण्यासाठी श्री जाणीवपूर्वक क्षणैक थांबले. त्या प्रश्नामुळे यादवांत अस्वथ कुजबुज व खळखळ माजली. ती वाढत चालली आहे हे बघून, आपला नीलवर्णी पीळदार उजवा बाहू उंचावून त्यांनी निर्णायक श्रीशब्दांचं सुदर्शन फेकलं. "दादा परत आलेच नसते तर – तर त्यांच्या युवराजी आसनावर त्यांच्या पादुका ठेवून आम्ही द्वारकेचा राज्यभार सांभाळला असता! आम्ही चांद्रवंशातले असलो, तरी सूर्यवंशातले श्रीराम आणि भरत कधीच विसरू शकत नाही!"

त्या दिवशी सुधर्मा राजसभेहून परतताना दूरवरून ऐकू येणाऱ्या समुद्रगाजेत मिसळलेला एकच एक विचार माझ्या मनी रुतून बसला. बर झालं, मला केव्हाच कळलं आहे ते सत्य की, श्रींचं हृदय पश्चिम सागरासारखं विशाल नि अथांग आहे, हे सर्व यादवांनाही आज कळून चुकलं आहे.

या वर्षा ऋतूत यादवांची राजनगरी द्वारका जलधारांच्या आकाशवर्षावात कशी अंगभर न्हाऊन निघाली. पश्चिम सागराच्या उसळत्या, अरोध, अविरत लाटा पश्चिमेच्या थेट ऐंद्र महाद्वारावर गर्जत थडकू लागल्या. ते द्वार आता चार मास बाहेरून तृणझडचा लावून बंदच ठेवण्यात येणार होतं. आता बंदर द्वारकेत येणाऱ्या नौका, होडचा पूर्णत: थांबल्या होत्या. समुद्रात दूरवरच्या पाषाणी 'क्रोष्टू स्तंभा' वर वर्षभर तेवत असणारा करंजतेलाचा भलामोठा टेंभा प्रज्वलित करणं, जलसेनापतींनी आज्ञा देऊन थांबविलं होतं, तो क्रोष्टू नावाचा पाषाणी दीपस्तंभही अर्धा अधिक फेसाळत्या लाटांत आता सतत न्हाऊन निघू लागला. मत्स्यमृगयेसाठी सागराचा अंतर्वेध घेणारे कोळीयादव आपापल्या निवासांतच थांबू लागले.

वर्षा ऋतू हटताच कडक थंडीच्या शरदानं द्वारकेला कवेत घेतलं. समुद्रपृष्ठावरून

उठलेल्या धुक्याच्या ढगांनी द्वारकेच्या चारही महाद्वारांना दाट घेर टाकला. आता दोन-तीन मास तरी त्या धुक्यातून कधीमधी दिसणाऱ्या सूर्यदेवांच्या दर्शनावरच काय ते समाधान मानावं लागणार होतं.

माझं दुसरं डोहाळजेवणही समस्त यादव आप्तांनी पहिलंच समजून पूर्वीच्याच जिव्हाळ्यानं शोभेल असं घातलं. माझ्या प्रथम पुत्राचं अपहरण होऊन बराच काळ लोटला होता. त्याचा सल माझ्यापेखा आप्त यादवांनाच अधिक जाणवत होता. त्यामुळे तर या सोहळ्यात त्यांनी कसलीच त्रुटी म्हणून ठेवली नाही. श्रींनी या वेळी होणाऱ्या पुत्राचं नाव 'चारूदेष्ण' ठेवायचं हे मला सांगितलं. ते ऐकून मी विचारलं "चारू म्हणजे काय?" ते नेहमीचं हसत म्हणाले, "चारू म्हणजे सुंदर."

"आणि कन्या झाली तर?" मी त्यांच्यासारखंच आडवळण घेत विचारलं?.

ते म्हणाले, "नाही, पुत्रच होईल. नावही चारूदेष्णच!"

मी मात्र विचारांत गढून गेले की, कन्या झाली तर काय नाव ठेवावं तिचं?

श्रींच्या ओठांतून अनृत शब्द कधी बाहेर पडला नाही. मला एव्हाना अनुभवानं पटून चुकलं होतं की, त्यांच्या तोंडून झोपेतही एखादा शब्द अनवधानानं बाहेर पडला, तर तोच आपला जन्म सार्थक करण्यासाठी धडपडेल!

मला पुत्रच झाला. त्याचं नाव ठेवण्यात आलं चारूदेष्ण. चारूदेष्ण नावाप्रमाणंच सुंदर होता. त्यानं माझ्या प्रथम पुत्राच्या अपहरणाच्या सर्वांच्या वेदना दूर केल्या. वसुदेवबाबा आणि दोन्ही माता, आचार्य व पुरोहितांसह येऊन त्याला आशीर्वाद देऊन गेले. त्याला बघायला कौतुकानं दादा आपले बंधू गद, सारण व रोहिताश्व आणि पुत्र निशठ, उल्मुक व विपुल यांच्यासह राणीवशाच्या द्वीपावर येऊन गेले. रेवतीताईही सुभद्रेसह येऊन गेल्या. आता वयात आलेली सुभद्रा अतिशय सुंदर दिसू लागली होती. चारूदेष्णाच्या आगमनापाठोपाठ द्वारकेवर वसंत ऋतू उतरला. राजनगरीच्या चौकाचौकांतील नानाविध वृक्ष रंगीबेरंगी फुलांनी कसे डवरून आले. डेरेदार आम्रवृक्षांना इवल्या–इवल्या चुटकुल्या कैऱ्या पडल्या. कुठून–कुठून येणाऱ्या लांबट, शुभ्र पंखांच्या, शेपटांच्या पक्षयांच्या कलकलाटानं राजनगर द्वारका गजबजून जाऊ लागलं. त्यातच कोकीळ नरांचे टिपेचे सप्तकांतले प्रणयाराधनी सूर निनादू लागले. वसंतातल्या चढत्या सूर्याला साक्षी ठेवून यादवांचा वंशवृक्षही डवरून आला

माझ्या पाठोपाठच भामेला पुत्र झाला. मातेसारखाच उजळ, सूर्यासारखा झळझळीत. त्याचं नाव ठेवण्यात आलं 'भानू' . पंधरवड्यातच जांबवतीचीही कूस उजवली. ती भामेअगोदर श्रीपत्नी म्हणून आली होती, पण माता नंतर झाली. तसे जांबवती व श्री सावळेच. दोघांचा हा पुत्र मात्र गोरा–गोमटा उपजला. पुत्र होता तरी तो कन्येसारखाच दिसू–भासू लागला. जांबवतीच्या पित्याचं दैवत होतं, शंकर. त्याच्या वन्य रूपाला त्याचे वन्यजन 'सांब' म्हणत. जांबवतीच्या या पुत्राचं नावही त्याचं स्मरण म्हणून 'सांब' ठेवण्यात आलं. लवकरच अवंतिकन्या मित्रविंदेलाही पुत्र झाला. त्याचं नाव 'वृक' ठेवण्यात आलं. सरत्या वसंतात सत्याच्या कौसल वेळीलाही फल धरलं. सत्येलाही पुत्रच झाला. त्याचं नाव 'वीर' ठेवण्यात आलं.

आम्ही पाचही माता आपापल्या नवागत पुत्रांच्या उसाभरीत दंग असतानाच एक महत्त्वाची वार्ता सुधर्मा राजसभेत येऊन पोहोचली. 'पांचाल देशीच्या एकचक्रा नगरी जवळच्या वेत्रवनातील कुख्यात 'बकासुर' नावाच्या खादाड व विक्राळ राक्षसाचा

कोण्या एका तशाच धिप्पाड ब्रह्मपुत्रानं निर्धारानं वध केला होता.' हे सांगताना आमच्या दारुकानं टिपलेला एक बारकावाही मला सांगितला. तो म्हणाला, "ती वार्ता ऐकताच श्रींची चर्या केवढीतरी उजळून निघाली होती. त्यांनी गुप्तचर प्रमुखाला बोलावून घेऊन वेत्रवनाकडे एक निष्णात गुप्तचरांची जोडगोळी तातडीनं धाडायला सांगितलं होतं." वार्ता ऐकताना श्रींची चर्या उजळली याचं मला काहीच वाटलं नाही. असुर, दानव, बर्बर, राक्षस, म्लेंच्छ यांचा तापदायी उच्छाद कमी होणं, हे त्यांना प्रियच होतं, मात्र त्यांनी या वार्तेसाठी एवढ्या दूरवर तातडीनं गुप्तचर का पाठवावेत, ते मला कळलं नाही. त्यांच्या अशा कित्येक हालचाली होत्या, ज्या त्यांच्या ज्येष्ठ बंधूंना – दादांना, दोन्ही मातांना, बाबांना, प्रथम पत्नी असून मला कधीच कळून येत नसत. इतरांची गोष्टच वेगळी.

आता दादा व श्रींच्यामुळे द्वारका जनपदाला सर्व क्षत्रियमंडळात मानाचं स्थान प्राप्त झालं होतं. त्यामुळेच आणि पांचालांचे, आचार्य सांदीपनींशी व श्रींशी चांगले पूर्वसंबंध असल्यामुळे एक लक्षणीय आमंत्रण यादवांच्या सुधर्मा राजसभेत येऊन थडकलं. ते होतं पांचालकन्या द्रुपदकन्या याज्ञसेना तथा द्रौपदीच्या स्वयंवराचं!

मी या याज्ञसेनेबद्दल , तिच्या यज्ञीय बंधू धृष्टद्युम्नांबद्दल खूपसं ऐकलं होतं. दोघांनाही द्रुपदराज व त्यांची पत्नी सौत्रामणी यांना प्रत्यक्ष यज्ञदेवानं होमकुंडातून प्रकटून अर्पण केलं होतं म्हणे! त्यांना शिखंडी नावाचा यज्ञापूर्वीचा एक पुत्रही होता व नंतरचे सुमित्र, प्रियदर्शन, चित्रकेतू, ध्वजकेतू, सुकेतू, वीरकेतु, सुरथ आणि शत्रुंजय असे अष्टपुत्र होते. द्रौपदीच्या सावळ्या, सुगंधी सौंदर्याचा व विपुल केशसंभाराचा डंका आर्यावर्तात सर्वत्र दुमदुमत होता.

यादवांची पांचाल राजकन्येच्या स्वयंवराला ससैन्य जाण्याची तयारी सुरू झाली. यमुनापार असलेला पांचाल देश मोठा होता. त्याचे उत्तर पांचाल व दक्षिण पांचाल असे कारभाराच्या सोयीसाठी दोन भागच पडले होते. उत्तर पांचालांची राजनगरी होती अहिच्छत्र. या देशाच्या सीमा उत्तरेकडे ब्रह्मावर्तात शिरून थेट कुरूंच्या हस्तिनापूर राज्याच्या सीमेला भिडल्या होत्या. दक्षिण पांचालांचं राजनगर होतं, कांपिल्यनगर. तिथंच हे द्रौपदी–स्वयंवर मांडण्यात येणार होतं. या स्वयंवरामुळे उभ्या आर्यावर्ताच्या भवितव्याला आमूलाग्र कलाटणी मिळणार होती. त्यात भाग घेणाऱ्या मध्य देशीच्या अनेक राजांना हे माहीत नव्हतं. सौंदर्यखणी, सुगंधी द्रौपदीची अभिलाषा मात्र जमणाऱ्या प्रत्येक नरपुंगवाच्या मनी सरसरून उठली होती. यादव तर अशा स्त्रीच्या प्राप्तीसाठी सर्वस्व पणाला लावून उतरले नसते तरच नवल! कांपिल्यनगराकडे जाण्यासाठी बलरामदादा, दोन्ही सेनापती, उद्धवभावजी, कित्येक यादववीर आणि होय, प्रत्यक्ष श्री यांची धांदल उडालेली होती. अशातच द्वारकेला आनंदातिरेकानं समूळ घुसळून काढणारी, कुणालाही कसलीही अपेक्षा किंवा कल्पना नसणारी घटना घडली.

माझा कित्येक वर्षं अपहरित झालेला प्रथम पुत्र द्वारकेच्या द्वारावर अचानक येऊन उभा ठाकला! त्याच्या सोबत अनेक असुरवीर होते. तो आला होता, यादवांच्याच मूळ शूरसेन राज्यातून. गोवर्धन पर्वताच्या घनदाट अरण्यातून. कसल्यातरी वैमनस्याचं कारण मनी जागवून शंबरासुरानं कित्येक वर्षांपूर्वी माझ्या नवजात पुत्राचं त्याच्या जन्माच्या सहाव्या दिवशीच अपहरण केलं होतं. शंबरासुर व त्याची पत्नी मायावती

यांनी आपले असुरी संस्कार त्याच्यावर रुजवीत डोळ्यांत तेल घालून संगोपन केलं होतं. त्याला यादवकुलाची चुकूनही आठवण होणार नाही, याची कडेकोट दक्षता त्यांनी घेतली होती.

पण त्यांच्या या खटाटोपाचा काहीही उपयोग झाला नव्हता. ज्या क्षणी त्याला कळलं की, तो द्वारकेचा यादव असून प्रत्यक्ष श्रींचा अंकुर आहे, त्या क्षणी त्याच्यातील यादवरक्त उफाळून आलंच! शंबराशी घनघोर युद्ध करून, त्याला वधूनच तो आला होता. मायावतीचा त्याग करून, मिळतील ते एकनिष्ठ असुर सोबत घेऊन त्यानं थेट द्वारका गाठली होती. त्यासाठी त्यानं तसा एक असुर अग्रदूत द्वारकेत पुढे धाडला होता.

माझा हा पुत्र जन्मत:च आकर्षक होता. प्रत्यक्ष मदनाचा अवतार. गोवर्धनाच्या मोकळ्या अरण्यात वाढल्यामुळे तर तो दृष्ट लागावी असाच ताडमाड व अप्रतिम सुंदर दिसत होता. प्रत्यक्ष श्रींनी दादांसह जाऊन शुद्धाक्षावर त्याचं स्वागत केलं. त्याचे बळकट वृषस्कंध घट्ट पकडून त्याच्या नीलवर्णी डोळ्यांत खोलवर बघून त्याला पक्कं पारखून दृढ आलिंगनात घेतलं. मी आणि माझ्या चारही भगिनी, वसुदेवबाबा व दोन्ही माता त्यांच्या शेजारीच उभ्या होतो. जेव्हा माझा प्रथमपुत्र एवढ्या वर्षीनंतर मला वंदन करायला वाकला, तेव्हा मी पार गोंधळून गेले. खरंच वाटेना की, तो माझाच पुत्र आहे. त्यानं सावधपणानं अग्रदूत धाडला नसता, श्रींनी त्याला वक्षाशी बिलगता घेतला नसता, तर खरोखरच मी माता असूनही त्याला स्वीकारताना गोंधळले असते.

मी माझ्या गाढ मिठीत त्याला घेतलं. तपाच्या दाटल्या अश्रूंना आपोआप वाट मोकळी झाली. त्याच वेळी श्रींचे दूरदृष्टीचे धोरणी बोल माझ्या कानांवर पडले, “प्रथम माता होणं कठीण आहे. त्यातही सुमाता होणं प्रेमयोगाएवढं कठीण आहे! रुक्मिणी, याच्या मनावरील असुरी संस्कार पुसून टाकण्याचा घोर कर्मयोग आजपासून तुझ्या मागे लागला! जसं जांबवतीला तू यादवांची कुलस्त्री करून घेतलंस, तसंच तिच्याच साहाय्यानं याचं यादव महारथ्यात परिवर्तन करून घे.”

आलेल्या प्रथम पुत्राचा जनपदाच्या राजपुरोहितांनी रीतसर नामकरण विधी केला. सर्वांच्या साक्षीनं आम्ही पूर्वी योजलं होतं, तसं त्याचं नाव ‘प्रद्युम्न’ च ठेवण्यात आलं. शंबरासुरानं त्याचं नाव चक्क ‘शांबर’ असं पाडलं होतं! त्या विधीचं सुग्रास भोजन घेऊन तृप्त झालेले यादव चतुरंग सेनेसह कांपिल्यनगराकडे निघाले–पांचालीच्या स्वयंवराला.

पूर्वीच नियोजित झालेल्या यादवमंडळात आता भर पडली ती तरुण, सुंदर प्रद्युम्नाची. श्रींनी त्याला आवर्जून बरोबर घेतलं होतं. उद्देश होता त्याला स्वयंवराची क्षत्रियांची प्रथा यथासांग प्रत्यक्ष बघायला मिळावी हा. त्यामुळे द्वारकेतील यादवमंडळात आणि भोवतीच्या नरेशांत मात्र आवई उठली की, “द्वारकाधीश आपल्या प्रथमपुत्र प्रद्युम्नासाठीच कांपिल्यनगराला चालले आहेत.” जाताना मात्र त्यांनी मला स्पष्ट सांगितलं की, “पांचालांचं आमंत्रण आहे यादवप्रमुख द्वारकाधीशाला! कुणी सांगावं या स्वयंवरात पण पूर्ण करण्यासाठी मलाही उतरावं लागेल! पणही विचित्रच आहे. पुऱ्या धनुर्वेदाची परीक्षा घेणारा.”

ते ऐकून मी म्हणाले, “माझी तयारीच आहे, पांचालकन्येचंही पाचवी भगिनी म्हणून स्वागत करायला! प्रत्यक्ष श्रींनाही कठीण वाटतो, असा हा धुनर्विद्येचा पण आहे तरी कसला?” श्रींच्या तोंडून अशक्य आणि कठीण हे शब्द सहसा कधीच बाहेर पडत नसत. अनेकवेळा अनेकांनी कठीण व अवघड म्हटलेल्या गोष्टी त्यांनी सहज चुटकीसरशा व

सुबकपणे हातावेगळ्या केलेल्या मी प्रत्यक्ष अनुभवल्या होत्या. माझं कुतूहल जागं झालं.

पांचालीचा स्वयंवर मंडपच समोर असल्यासारखं श्रींनी द्रुपद, धृष्टद्युम्नांनी मांडलेल्या स्वयंवरातील पण माझ्यासमोर साक्षात चित्रवत उभा होता. माझ्याजवळ येत ते विशिष्ट कृष्णशैलीत, उजव्या हाताची तर्जनी मंडलाकार फिरवीत म्हणाले, "मंडपाच्या मधोमध पांचालांनी गंडकी पाषाणांचा एक प्रशस्त सुघड गोलाकार जलकुंड उठविला आहे. त्यात सप्त पवित्र नद्यांचं जल काठोकाठ भरलं आहे. जलकुंडाच्या मधोमध पोहोचेल असा पूर्व–पश्चिम जाणारा चिंचोळा मार्ग आहे. त्याच्या तोंडाशी गोलाकार अशी धनुर्योद्ध्याची बैठक आहे. बैठकीलगत पांचालांच्या पूजेतील प्रशस्त, पुष्पमालामंडित शिवधनुष्याची खोबण आहे. जवळच तूणीरांची बैठक आहे. तिथं सूची बाणांनी भरलेले अनेक तूणीर असतील. त्यातील केवळ पाचच बाणांचं प्रक्षेपण करून छताशी बसविलेल्या, गरगर फिरणाऱ्या मत्स्ययंत्रातील मत्स्याच्या फिरत्या नेत्राचा अचूक लक्षयभेद धनुर्वीरानं घ्यायचा आहे. केवळ पाच बाणांतच!" त्यांच्या अंगुलीबरोबर मी दृष्टी फिरवत राहिले. त्यांनी हळूच अंगुली छताकडे नेली, तशी त्यांचे शब्द ऐकत सहजच वर छताकडे मी भाबडेपणी बघत राहिले. कल्पनेनंच गरगर फिरत्या मत्स्याचा फिरता नेत्र विस्फारल्या डोळ्यांनी शोधू लागले. नकळतच मी पुटपुटले, "कठीणच आहे हा पण पूर्ण करणं. इथं फिरता मत्स्या नीट पकडता येत नाही, तर त्याचा नेमका नेत्र कसा पकडायचा? तोही पाचांतील एका बाणानं!"

तशी दुसऱ्या हातानं माझी मान खाली वाकवीत श्री अंगभूत खट्याळपणानं त्याच फिरत्या अंगुलीनं जलकुंडातील फिरत्या प्रतिबिंबाचा निर्देश करत म्हणाले, "नेत्रभेदच करायचा तोही पाचांतल्या एकाच बाणानं, सरळ फिरत्या मत्स्याकडे वर बघून नव्हे; तर त्याच्या जलकुंडातील गरगर फिरत्या प्रतिबिंबाकडे – खाली बघून, मान खाली नेत्रभेद वर, असं जोडकौशल्य दाखवून!!"

माझा गोंधळ खट्याळ हसत बघून श्री पुढे म्हणाले, "सध्या तरी हे कौशल्य हस्तिनापुरातील एकाच वीराठायी आहे. सूतपुत्र कर्णाठायी. गुरू द्रोणांनी आयोजिलेल्या वासंतिक स्पर्धेत कर्णानं अर्जुनानं केलेले सर्व विक्रम पूर्ण करून, शेवटी त्याला द्वंद्वाचं आव्हानही दिलं होतं.

"खरं म्हणशील तर हा पण पूर्ण करण्याची योग्यता अर्जुनातच होती. पण... पण..." कसल्यातरी किचकट समस्येचा गुंतावळा उकलताना चुकूनच पडतात तशा आठ्या त्यांच्या भव्य, नितळ कपाळावर क्षणैक तरळल्या. मग 'येतो' म्हणून त्यांनी माझा निरोपच घेतला. ते यादवमंडळासह कांपिल्यनगराला निघून गेले. माझ्या मनी मात्र त्यांनी एक प्रश्न तसाच तरळता सोडून दिला होता. मत्स्याचा नेत्रभेद करण्याची क्षमता असलेल्या दोघा धनुर्वीरांचा त्यांनी निर्देश केला होता. पहिला म्हणून आपला निर्देश काही त्यांनी केला नव्हता. मला मात्र पक्का विश्वास होता की, कितीही अवघड असला, तरी हा पण श्रीच जिंकणार! राणीद्वीपावरच्या वास्तुसंकुलातील सहावी जागा पांचलकन्येचीच होणार!

खरंतर मी भाववेडी, भाबडी – ते स्वत: कितीही म्हणत असले बुद्धिमान महाराणी, तरीही भाबडीच. विचार करीत राहिले. प्रत्यक्ष कशी दिसत असेल पांचालांची सुगंधी यज्ञकन्या द्रौपदी? श्रींच्या हिमवंताच्या यात्रावर्णनातील सुगंधी ब्रह्मकमळं ऐकलीच

होती. हीसुद्धा सुगंधी आहे म्हणे! कसं असेल हे सुगंधी स्त्री– कमळ? फार मानिनी आहे म्हणे ही धृष्टद्युम्नाची भगिनी – याज्ञसेना – श्यामा! कशी वागेल ती माझ्याशी? भामेसारखी? की जांबवतीसारखी? या चौघींच्याही माहेरचं मनुष्यबळ होईल, एवढं हिच्या एकटीच्याच माहेरचं पांचालांचं संख्याबळ आहे. इतर चौघी माझ्या मागून आल्या. मला महाराणीचा मनापासून मान देत तशाच वागल्या. ही वागेल तशी? की होईल वरचढ?

कुणी सांगावं, पुढे हां–हां म्हणता हीच होईल कदाचित कोटयवधी यादवांची महाराणी! सौंदर्यखणी तर आहेच म्हणे. घोटीव, दीर्घकेशा, विपुलकेशा! या सर्वांत भर भुईचंपकासारखी सुगंधी, यज्ञजा–क्षत्राणी! यज्ञजा म्हणूनच ती बुद्धिमानही असणार. माझ्याहूनही असेल ती बुद्धिमान? श्री वर्णानं नीळसर–सावळे – ती श्यामा – दोघंही बुद्धिवंत – जमलंच म्हणायचं!!

एक मास लोटला. द्वारकाधीश, दादा, उद्धवभावजींसह द्वारकेला परतले. गेले तसेच सर्व जण परतले होते. सोबत मी कयास केला होता, तशी पांचालकन्या द्रौपदी काही आली नव्हती. होता तिच्या पित्यानं यादवांना दिलेला भरघोस उपहार. हे असं घडलं कसं? माझं कुतूहल अपार चाळवलं. पडताळा घ्यावा म्हणून मी श्रींना त्यांच्या कक्षात एकांती गाठलं.

मी समोर दिसताच लगबगीनं पुढे येत अपार आनंदानं माझ्या दोन्ही भुजा घट्ट–घट्ट पकडत ते म्हणाले, “रुक्मिणी, यादवांच्या महाराणी, पांडव जिवंत आहेत! शांत, सत्त्वशील मुद्रेचा युधिष्ठिर, त्याचा अजोड बलदंड मल्लयोद्धा बंधू भीम, स्वयंवराचा पण जिंकणारा अजिंक्य धनुर्धर अर्जुन, आपल्या प्रद्युम्नासारखा दिसणारा नकुल, दारुकाची आठवण देणारा अश्वतज्ज्ञ सहदेव... सर्व–सर्व पांडव जिवंत आहेत. कांपिल्यनगरात एका कुंभकाराच्या घरी मी कुंतीआत्यासह द्रौपदीला व त्यांना भेटूनच आलो आहे. महाराणी, अर्जुन जिवंत आहे. माझ्या मनीचे कित्येक संकल्प पूर्ण होणार आहेत.

“प्रिय रुक्मिणी, शांतपणे व नीट लक्षात ठेव, या स्वयंवरामुळे माझ्या आयुष्यातल्या एका नव्या पर्वाला आता प्रारंभ झाला आहे. कांपिल्यनगरात काय घडलं, त्याचे सर्व बारकावे तुझा लाडका उद्धवभावजी तुला सांगेलच.”

त्याच दिवशी रात्री मला वंदन करण्यासाठी आलेल्या उद्धवभावजींनी द्रौपदी स्वयंवराचा सर्व साग्र वृत्तान्त माझ्यासमोर नम्र आदरभावानं चित्रवत खडान्खडा ठेवला. त्यातील जे त्यांना जाणवले, नेमके तेच बारकावे मलाही जाणवले. त्यांनी सांगितलं,

“स्वयंवरात पण पूर्तीसाठी जमलेल्यांत दुर्योधन आपल्या दुःशासन, दुर्मर्ष, दुःसह अशा बंधूंसह आला होता. त्याच्या वतीनं पण पूर्ण करण्यासाठी अंगराज कर्ण बंधू शोण व पुत्र सुदामनासह आला होता. गांधारनरेश शकुनी, त्याचे अकरा बंधू, मगधाधिपती जरासंध, शिशुपाल, दंतवक्र आणि स्वतःला प्रतिवासुदेव म्हणविणारा पौंड्रक, चेकितान, भगदत्त, अंशुमान, शंख आणि मद्रराज शल्य, रुक्मानंद, भूरी, भूरिश्रवा, सुदक्षिण, दृढधन्वा, सुषेण, शिबी आणि सैंधवराज जयद्रथ, बाल्हिक, चित्रांगद आले होते, तसेच आम्ही यादव, दादा, बलरामदादा, दोन्ही सेनापती, अक्रूर, अमात्य आणि

प्रद्युम्नही होतो. जवळ-जवळ शंभर एक नरेश या स्वयंवराला कांपिल्यनगरात लोटले होते

"पांचालांच्या वतीनं युवराज धृष्टद्युम्नानं सर्व नरेशांचं त्यांच्या अमात्य सेनापती व निवडक सेनेसह स्वागत केलं. आपल्या भगिनीच्या सौंदर्याचं व गुणवत्तेचं रसाळ वर्णन करून, स्वयंवराचं प्रयोजन सांगितलं. बिकट पणाचे आवश्यक ते बारकावे व नियम सांगितले. पांचालांच्या कुलदेवीचं व यज्ञीय देवतेचं स्मरण करून पुरोहितांनी दिलेल्या शिवमुहूर्तावर मत्स्ययंत्र सुरू करण्यात आलं. पाठोपाठ अनेक पांचाल सैनिकांनी तोललेलं शिवधनुष्य आणण्यात आलं. गरगरत्या मत्स्याबरोबर आर्यावर्तातील कित्येक विक्रमी नरेशांचं भाग्य शब्दश: गरगर फिरू लागलं!!

"मत्स्याबरोबर जलकुंडाच्या शांत जलाशयात प्रतिबिंबही गरगरू लागलं. कित्येक नरेश धृष्टद्युम्नाचं आव्हान स्वीकारत वक्ष ताणत पुढे सरसावले. पांचालांचं अवजड शिवधनुष्य उचलण्यात काही, तर काही उचलून प्रत्यंच्या लावण्यात ढेपाळले. कित्येक केव्हाच कोलमडले. प्रहरभर गेला. मद्रराज शल्य आणि जयद्रथसुद्धा अपयशी झाले. मंडपात कुजबुज सुरू झाली. तिच्यातून 'मगधाधिपती सम्राट... जऽराऽसंऽध!' असे बोल ऐकू येऊ लागले. तसा धिप्पाड, कसलेल्या अंगलटीचा मगधसम्राट जरासंध आसनावरून उठला. मंडपातील त्याच्या चेदी व मागधी मानकऱ्यांनी टाळ्यांचा वारंवार कडकडाट उठवीत संतत हर्षघोषनाद सुरू केला –'मगधाधिपती अजिंक्य सम्राट जरासंध महाराऽज... जयतु... जयतु! गिरिव्रज नरेश, अजिंक्य मल्लयोद्धा, श्रेष्ठ धनुर्धर, सम्राट महाराज जरासंधाचा विजय असो!' काही उतावळ्या मगधकरांनी त्यातच हर्षघोष घुसडून दिला –'मगध महाराज्ञीऽ याज्ञसेनादेवीऽ जयतु... जयतु!'

"मगध सम्राटानं उठल्या-उठल्या प्रथमच अत्यंत तिरस्काराचा कटाक्ष टाकला असेल, तर तो एकटच्या द्वारकाधीश दादांवर जशी काही धृष्टद्युमनाची नव्हेच – द्वारकाधीश श्रीकृष्णाची भगिनीच तो वरायला आला होता! आणि मूकपणंच सांगू इच्छित होता - मथुरेहून पळ काढणाऱ्या पळपुटचा, भेकड, गवळ्या ही द्रौपदीही तुझ्या समक्ष स्कंधावर टाकून घेऊन जातो गिरिव्रजाला! पेटत्या गोमंत पर्वतातून निसटलास. या स्वयंवरानंतर तुलाही दोरखंडात जखडून घेऊनच जाणार आहे मी गिरिव्रजात!

"फुलत्या वक्षाचा गर्वोद्धत जरासंध दणादण पाय आपटत चिंचोळ्या मार्गानं शिवधनुष्यापर्यंत पोहोचला. त्यानं शिवधनुष्याजवळ वीरासन घेत धनुष्याचा मध्य पकडून ते अवजड शिवधनुष्य उचललं. यापूर्वी हे कुणालाच शक्य झालं नव्हतं. त्यामुळे भानरहित झालेल्या मागधांनी अनावर हर्षघोषांनी तो पांचालमंडप कसा निनादून टाकला. 'जयतु... जयतु!' जरासंधानं वीरासनात बसूनच तूणीरांतील एक बाण खेचून मस्तकाला भिडवला. मागधांच्या कुलदेवीचं स्मरण करून तो प्रत्यंचेवर चढविणार तोच तोल जाऊन जरासंध बैठकीवरून धाडकन कोसळला. जरासंध याज्ञसेनेचा स्वयंवर-पण जिंकणार म्हणून डोळ्यांत प्राण आणून गरगरत्या मत्स्याकडे बघणारे प्रेक्षकगण, अवजड शिवधनुष्याखाली टाचा झाडणाऱ्या सम्राट जरासंधाकडे हताश होऊन बघू लागले. ऐंशीवर राजे आपल्या कारागृहात कोंडणारा तो अरेराव सत्तासम्राट अवजड शिवधनुष्यानं कोंडून टाकला. जरासंध टाचा घासत मरणार असा निकराचा क्षण आला.

"याच वेळी नेमका अंगराज कर्ण उठून उभा राहिला. तसं दादानं माझ्या शेजारी बसलेल्या आपल्या प्रद्युम्नाकडे हसून पाहिलं. किती साम्य होतं त्या दोघांत!

दुर्योधनाकडे हसून बघत धिम्या चालीनं कर्ण शिवधनुष्यापाशी आला. त्यानं वीरासन घातलं. मोठ्या कौशल्यानं त्यानं आपल्या नेहमीच्या विजयधनुष्यासारखं शिवधनुष्य उचललं. जरासंध मुक्त झाला. घरंगळलेला मागधी मुकुट मस्तकी धारण करून घेत आपल्या आसनावर जाऊन चरफडत, मुकाट बसला. कर्णानं शिवधनुष्य उचलताच त्याच्या नावाच्या जयजयकारानं 'अंगराज कर्णऽ जयतु जयतु!' मंडप निनादला. मीही एकटक त्याच्याकडे पाहू लागलो. तो आपल्या प्रद्युम्नासारखाच अप्रतिम सुंदर दिसत होता.

"त्यानं लीलया हातचा बाण प्रत्यंचेवर चढविला. कपोतासारखी मान डौलदार करून तो कुंडातील गरगरता मत्स्यनेत्र धुंडाळू लागला. स्वयंवरमंडप श्वास रोधून त्याच्या लक्षयवेधाची प्रतीक्षा करू लागले. इतक्यात हाती शुभ्र कमलांची वरमाला घेतलेल्या नतमस्तक द्रौपदीनं प्रथमच मान उंचावली. तिचे घणाघाती निर्धारी क्षत्राणीबोल मंडप थरकावीत विद्युल्लतेसारखे तडतड घुमून उठले, 'थांबाऽऽ! तुम्ही नाही या पणात भाग घेऊ शकत! मी कुठल्याही सूताची पत्नी वा स्नुषा होणार नाही. कधीच नाही!'

"कर्णाच्या पीळदार हातातील सरसावलेलं शिवधनुष्य क्षणैक थरथरलं. त्याचा वीरासनी पवित्रा क्षणात भंगला. प्रत्यंचेवर चढविलेला सूची बाण अचानकच सुटला. कशीतरी वेडीवाकडी वळणं घेत येऊन दादाच्या पायाच्या अंगठ्यात घुसला. तरीही हसतच दादानं तो उपसून हाती घेतला. ग्रीवा आकाशमार्गी उठवून कर्ण खदखदा हसला. द्रौपदीच्या बोलापाठोपाठ हे हास्यही मंडपातील नरेशांना भेदरवून गेलं. दुसऱ्याच क्षणी हातचं शिवधनुष्य आवेगानी पायाशी फेकत तो आला तसा परत जाऊन दुर्योधनाशेजारच्या आसनावर बसला.

"याज्ञसेना पांचालीनं पुनश्च संस्कारवशात मान खाली घातली. बोलणारी याज्ञसेना द्रौपदी आणि ऐकणारा सूर्यभक्त कर्ण, यांमुळे मंडपातील नरेश आता गोठल्यासारखे झाले. आपसात कुजबुजू लागले. मत्स्ययंत्र आर्यावर्तातील समस्त क्षत्रिय पौरुषत्वाला वाकुल्या दाखवत तसंच गरगर फिरत राहिलं. आता मंडप पराकोटीच्या ताणावर पडला. तसा यज्ञपुत्र धृष्टद्युम्न पुन्हा उठला. जमल्या नरेशांवर गरगर दृष्टी फिरवत कडाडला, 'काय माझी यज्ञदत्त भगिनी वरण्याचं सामर्थ्य आर्यावर्ताच्या एकाही नरेश नरोत्तमात नाही? काय इथला समस्त धनुर्वेद आज विक्रमशून्य झाला? काय सौंदर्यवती, गुणवती, पांचालांच्या प्रिय कन्या द्रौपदीला जीवनात योग्य जोडीदार मिळणारच नाही? कशासाठी जमले आहेत हे एवढे नरेश? कुंभमेळ्यासाठी की रथस्पर्धेसाठी? या एका य:कश्चित मत्स्ययंत्रासमोर शरणागत घेण्यासाठी? धिक्कार – धिक्कार असो, आर्यावर्ताच्या गगनभेदी पुरुषार्थाचा टेंभा मिरविणाऱ्या इथल्या क्षत्रियत्वाचा! धिक्कार असो, सूर्य-चांद्र कुलाचे उत्तराधिकारी म्हणविणाऱ्यांचा!' ते धृष्टद्युम्नाचे बोल नव्हतेच. धडधडीत पेटलेल्या यज्ञकुंडाच्या ठिणग्या होत्या त्या.

"आता मात्र माझ्या डाव्या हाताशी बसलेला माझ्या प्रिय दादा - यादवांचा द्वारकाधीश श्रीकृष्ण उठून ताठ उभाच राहिला!

"तो उठला मात्र, यादवांसह जमल्या नरेशांबरोबर आलेले कित्येक आमंत्रित कंठमणी फुलवून भानरहित होत गर्जले, 'यादवनायक, शारंगधर, द्वारकाधीश श्रीकृष्ण महाराऽज जयतुऽ जयतु!'

"त्याचा जयकार ऐकून जरासंधासह पांचालराज द्रुपद, महाराणी सौत्रामणी यांसह उपस्थित सर्वांचे नेत्र त्याच्या एकट्याच्या अप्रतिम लावण्यमय मूर्तीवर खिळले. इतकंच काय आतापर्यंत नतमस्तक असलेल्या उपवर पांचालकन्या याज्ञसेना द्रौपदीनंही तिला नकळतच मान वर उठवून दादाला डोळाभर पाहिल्याचं तर मी स्पष्ट बघितलं.

"आता तर स्वयंवर मंडपाचं छत पराकोटीच्या जयनादांनी उडून जाणार असंच मला वाटलं. इतक्यात जमलेल्या नरेशांतून मार्ग काढत एक उंचशील, अत्यंत तेजस्वी ब्रह्मकुमार गर्वोन्नत मानेनं, वक्ष फुलवीत जलकुंडाजवळ येऊन उभा ठाकला. तो कोण, कुठला, त्याचं नाव काय, मंडपात कुणालाही काहीही माहीत नव्हतं. पण तो अशा चपळाईनं आणि आत्मविश्वसानं आला होता की, मंडपातील माजलेला सर्व कलकलाट क्षणात शांत झाला. मी त्या ब्राह्मणवेषधारी तरुणाला नीट पारखून पाहिलं. क्षणैक मला भास झाला, दादाच तर जलकुंडाजवळ ब्रह्मवेष धारण करून उभा नाही ना? कसं शक्य आहे? आता मीही त्याच्याकडे एकटक बघू लागलो. त्याच धिम्या चालीनं, पूर्ण आत्मविश्वासानं तो पुढे सरसावला. जलकुंडाच्या मध्यभागी असलेल्या धनुर्वीराच्या बैठकीजवळ गेला. मंडपातील सर्व उपस्थितांची दृष्टी त्यानं बलात खेचून घेतली होती.

"त्यानं डौलदार, नेत्रदीपक वीरासनाचा पवित्रा घेतला मात्र, मंडपात टाळ्याच टाळ्यांचा पर्जन्य कोसळला. मी तर टाळ्या पिटत ताडकन उठून उभाच राहिलो. पाठोपाठ माझ्या कानांवर दादाचे परिचित दबके शब्दबोल पडले, 'उधो, बंधो, तेच हे वीरासन आहे! मी कुरुक्षेत्रावर सूर्यकुंडाकाठी बघितलेलं – सूर्यग्रहणाच्या दिवशी! उधो, हा दुसरा-तिसरा कुणीही नाही. पांडुपुत्र कौंतेय अर्जुनच आहे!!' मी दादाकडे आश्चर्यानं बघतच राहिलो. आता तर तोच स्वत: हर्षभरानं स्वत:ला विसरून हलक्या लयबद्ध टाळ्या पिटत होता! असं तर मी त्याला कधी-कधीच पाहिलं नव्हतं.

"इतक्यात शिवधनुष्य पेलून, प्रत्यंचेवर बाण चढवून, भगव्या वस्त्रातील ब्रह्मकुमारानं जलाशयात गरगरतं प्रतिबिंब पाहिलं. मत्स्यनेत्राचा पहिल्याच सूची बाणात हां-हां म्हणता अचूक नेत्रभेद साधलाही होता! मत्स्ययंत्र बंद पडलं होतं. अघटित असंख्य घटनांचं चक्रयंत्र त्या क्षणापासूनच सुरू झालं. पुढे होत, पांचालकन्या द्रौपदीनं आपल्या हातातील शुभ्र कमलांची उंच वरमाला ब्रह्मकुमाराच्या कंठी हसत-लाजत चढविली. त्याच क्षणी माझे खांदे थोपटत दादा अस्पष्ट पुटपुटला, 'ही तिसरी! गोकुळातील पहिली, द्वारकेतील दुसरी, कांपिल्यनगरातील ही तिसरी!' हे ऐकताना मी गोंधललो. न राहवून त्याला विचारलंच, 'कोण तिसरी?'

"तसं तो अत्यंत लाघवी हसला. म्हणाला, 'तिसरी भगिनी! गोकुळात एकानंगा राहिली, द्वारकेत सुभद्रा आहे, ही तिसरी कांपिल्यनगराची याज्ञसेना!'

"हे असलं तोच एकटा काय ते बोलू जाणे; करू जाणे. क्षणापूर्वी स्वयंवरात भाग घेण्यासाठी उतरलेला माझा दादा क्षणात समोरच्या उपवर, सुगंधी, सौंदर्यखणी क्षत्राणीला भगिनी मानून मोकळा झाला होता.

"ज्या क्षणी द्रौपदीनं ब्रह्मकुमाराच्या कंठी माला चढविली त्याच क्षणी मंडपातील क्षत्रिय बिथरले. जरासंध कडकडला, 'आमच्या समक्ष हा य:कश्चित ब्राह्मण एका क्षत्राणीला, पांचालकन्येला घेऊन जाणार?'

' "आम्ही ते कदापीही सहन करणार नाही.' अनेक नरेशांनी त्याला पाठबळ दिलं. धनुष्य, गदा, खड्ग अशी अस्त्रं पेलली गेली. स्वयंवर मंडपाचं क्षणात समरांगणात

रूपांतर झालं! ब्रह्मकुमाराचं संरक्षण करण्यासाठी प्रथम दुसरा एक पीळदार शरीरयष्टीचा धिप्पाड तरुण जलकुंडाजवळ आला. त्याला बघताच दादा म्हणाला, 'उद्धवा, हा तर वायुपुत्र महाबली भीमसेन आहे!' त्याच्या पाठोपाठ आलेल्या तिघाही तरुणांना दादानं अचूक ओळखलं. ते युधिष्ठिर आणि नकुल–सहदेव होते. ते सर्व पांडुपुत्र होते. पांडव होते.

"धिप्पाड गर्जत्या भीमानं युधिष्ठिर, नकुल–सहदेवांच्या सोबतीनं जरासंधासह शस्त्र पेलून अर्जुनावर कोसळणारे बरेचसे नरेश आपल्या अंगावर घेतले. अर्जुनानं पणासाठी मांडलेलं शिवधनुष्य ताणून कर्ण, दुर्योधन, कर्णबंधू शोण आणि पुत्र सुदामन यांच्याशी धनुर्युद्ध मांडलं. अवाक झालेली द्रौपदी, बंधू धृष्टद्युम्नाशेजारी आश्रयाला गेली. पांचालराज द्रुपद दोन्ही हात उद्धरून अनावर झालेल्या आमंत्रितांना रोधण्याचा निष्फळ प्रयत्न करू लागले. धृष्टद्युम्न एका हाती आमंत्रित क्षत्रियांना आवरू बघत होता. दुसऱ्या हातानं त्यानं आपली भगिनी द्रौपदी गदारोळात सापडू नये, म्हणून तिचा दंड घट्ट धरून ठेवला होता

"मला आश्चर्य वाटलं. दादा मात्र पराकोटीचा शांत होता. मंडपात माजलेल्या कोलाहलातून मला नीट ऐकू यावं म्हणून माझ्या कानाशी मुख नेत त्यानं आज्ञा केली. 'उद्धवा, हे स्वयंवरयुद्ध पांडवच जिंकतील! ते संपताच द्रौपदी आपल्या पतीमागून मंडपाबाहेर जाईल. त्या दोघांचा पाठपुरावा कर. पांडव आणि आत्या कुंतीदेवी कुठं उतरलेत, त्याचा नेमका छडा लाव.'

"त्यानं म्हटलं तसंच झालं. चाललेल्या युद्धात अर्जुनाच्या एका कंठभेदी चांद्रमुख बाणानं तरुण कर्णपुत्र सुदामन विद्ध होऊन कोसळला. तसं कर्णानं हातचं धनुष्य फेकून त्याला गाठलं. कर्णपुत्र सुदामन अर्जुनाच्या बाणानं गतप्राण झाला होता!

"इकडं चारही बंधू पाठीशी घेत अर्जुन द्रुपदराज आणि महाराणी सौत्रामणी यांना वंदन करून मंडपाबाहेर जायला निघाला. पणपूर्तीमुळे त्याची धर्मपत्नी झालेली द्रौपदी माता–पिता व बंधू यांनी हातनिर्देश करताच खालच्या मानेनं त्याच्या पाठीमागून चालू लागली. अर्जुनाचे चारही बंधू त्या दोघांमागून निघाले. अपार क्षात्रतेजानं रसरसलेला तरुण अर्जुन मी टक लावून पाहिला. काय सांगायचं वहिनी, दादात आणि त्याच्यात केवढं साम्य आहे! दोघांचे वर्ण, अंगलट, उंची अगदीच सारखी आहे. मला विश्वास आहे, त्या दोघांना पाठमोरं बघताना प्रत्यक्ष तुम्हीसुद्धा नीट ओळखणार नाही! पारखून बघताना मला जाणवलं की, दादा त्याच्यापेक्षा किंचित तसूभर उंच असला तर असेल. असणारच!

"मीही दादाच्या आज्ञेप्रमाणं त्या पांडव बंधूंचा पाठपुरावा करत मंडपाबाहेर पडलो. ते सर्व कांपिल्यनगराच्या सीमेवरील एका कुंभकाराच्या घरी उतरले होते. वारणावत सोडताच ब्राह्मणवेष धारण केल्यामुळे आणि एकत्र कधीच न फिरण्याची दक्षता घेतल्यामुळे इतके दिवस त्यांना कुणीच ओळखलं नव्हतं. त्यांना जिवंत बघून, विक्रमी बघून, पाच सलग पर्वतशिखरांसारखं एकत्र बघून, दादासारखा मलाही अपार आनंद झाला होता.

"ते पांडुपुत्र मातेसह कुठं उतरलेत, याची परतत्या पावली दादाला मी वार्ता दिली. तसा क्षणही न दवडता तो बलरामदादा व माझ्यासहच आपल्या वंदनीय आतेला – कुंतीदेवींना भेटण्यासाठी निघाला."

ज्या भावभरल्या मुद्रेनं उद्धवभावजी हा सारा वृत्तान्त सांगत राहिले, त्यामुळे मला भास झाला की, मीही श्री, दादा व भावजींसह कांपिल्यनगरातच आहे. त्या मंडपातच आहे. आता हे एवढं सर्व जिच्यामुळे घडलं, ती द्रौपदी प्रत्यक्षात कशी दिसत असेल, बोलत असेल, असं अनावर कुतूहल माझ्या मनीही आपोआप जागं झालं. त्याहून अधिक श्रींची व तिची पहिली भेट कशी घडली असेल, याचं चित्र मनोमन रेखूनही मला ते समाधानकारक काही वाटलं नाही. मधाळ बोलीच्या उद्धवभावजींना मी लहान मुलीच्या कुतूहलानं विचारलंही, “मग प्रत्यक्ष कसे भेटले ते दोघं? काहीतरी सांगा ना.” उद्धवभावजी आपल्या प्रिय दादांची पत्नी म्हणून, वहिनी म्हणून, यादवांची महाराणी म्हणून मला मनापासून खूप मानत. त्यामुळेच असेल, नित्याचा धीरगंभीर स्वभाव विसरून कधीमधी ते माझीही खट्याळपणे मंडलं घेत. कमी थट्टेखोर नव्हते ते! दोन्ही हातांनी मला शांतवीत ते म्हणाले, “ सांगतोऽ सांगतोऽ धीर धरा. दादाला समोर बघून पांडवमाता आत्याबाई आश्चर्यचकित झाल्या. त्याला नीट वंदन न करू देता एकदम गाढ आलिंगनात घेऊन त्या म्हणाल्या, ‘आत्ता स्मरण झालं तुला आमचं? हस्तिनापुरात जाऊन आमच्यासाठी तिलांजलीही देऊन आलास म्हणे! कसला आशीर्वाद देऊ तुला या विक्रमासाठी?' आत्याबाईंनी प्रथमदर्शनातच दादाला असं कठोर धारेवर धरलं. एरवी कुणालाच न मानणारा दादा आपल्या दोन्ही कानांची पाळी चिमटीत पकडून कुंतीआतेला मात्र म्हणाला, ‘चुकलं आत्याबाई! क्षमा असावी. पण मी ऐकलेलं धर्मशास्त्र म्हणतं, जिवंत असलेल्यांसाठी तिलांजली दिली, तर ते दीर्घजीवी व यशवंत होतात! शिवाय ते राजकारणही होतं. तुम्हाला तिलांजली दिल्यामुळेच तुम्ही सुखरूप राहणार होता.’ दादानं क्षमाही आपल्या पद्धतीनंच मागितली होती. मग मात्र आत्याबाईंनी दादाला, बलरामदादाला व मला मुखभर आशीर्वाद दिले.

“दादाच्या दर्शनानं आनंदविभोर झालेल्या आत्याबाई, मग मात्र चुटपुट लागल्यासारख्या म्हणाल्या, ‘श्रीकृष्णा, आत्ता नुकतीच एक मोठी चूक करून बसले आहे रे मी! हिला घेऊन अर्जुन नेहमीसारखा परतला. म्हणाला, ‘फार मोठी भिक्षा आणली आहे आज माते!”

“त्याच्या आवाजातील हुरूप आणि उत्साह ताडून मला वाटलं तो नेहमीसारखीच काहीतरी खाद्यपदार्थांची भिक्षा – पण आज विपुलशी घेऊन आला असावा.

मी आतूनच म्हणाले, ‘मोठी असेल भिक्षा, तर घ्या सर्व भावंडांनी वाटून!’

माझ्या आज्ञाधारक अर्जुनानं आणि त्याच्या बंधूंनी माझी इच्छा हाच निर्णय मानला आहे. पांचालांच्या या कन्येचं – द्रौपदीचं पत्नी म्हणून त्यांनी विभाजन केलं आहे. मला सारखं वाटतं आहे, यात माझंच काहीतरी चुकलंय. चुटपुट लागली आहे. एक स्त्री असून मी हिच्यावर नकळत का होईना, काही अन्याय तर केलेला नाही ना? तू आर्यावर्तभर फिरतोस. अनेकांच्या बिकट प्रश्नांचे चुटकीसरशी निवाडे करतोस. मला सांग, मी चुकले की बरोबर आहे! सांग, माझ्या या अर्जुनाच्या ठायी तूच आहेस, असं समजून, विचारपूर्वक सत्य काय ते सांग.’

“आत्येला वाटलं भाचा गोंधळेल, अडखळेल. पण नाही. दादा पटकन म्हणाला, ‘अर्जुनानं घेतलेला निर्णय योग्य आहे! त्याच्याशिवाय तुझ्या या चारही पुत्रांत हिच्यासाठी अभिलाषा निर्माण झाली आहे. तूही ‘भिक्षा वाटून घ्या’ म्हणालीस हे अजाणतेपणी मुळीच नाहीस! तू या पाचही जणांच्या सुखदु:खाशी एवढी बांधली गेली

आहेस की, सत्यच तुझ्या मातृमुखातून दूरदृष्टीनं आपापत: नकळत बाहेर पडलं आहे.

"आता तूच मला एक विचारपूर्वक उत्तर दे पांडवमाते की, प्रत्यक्ष तुझ्या ज्येष्ठ पुत्राच्या – या युधिष्ठिराच्या ठायी तूच उभी आहेस, अशी कल्पना करून सत्य ते सांग – काय तुला वाटली नसती या पांचालीची अभिलाषा?'

"आता गोंधळून तारांबळ उडण्याची पाळी आली ती अनुभवी व जाणत्या आत्याबाईंवर. आपल्या सर्वच पुत्रांना सावरून त्या नेहमीच वात्सल्याच्या कवेत घेत आल्या होत्या. जीवनभर खूप काही सोसलेली ती अशरण क्षत्राणी निर्भयपणे म्हणाली, 'वाटलीच असती मलाही हिची अभिलाषा! अर्जुनानं आणि या चौघांनीही घेतलेला निर्णय योग्य आहे!'

"आता कसं बोललीस आत्याबाई! हेच तर मला म्हणायचं होतं. हे पाचही बंधू भरल्या भक्कम मुठीसारखे एक मनानं, एकमेळानं राहिले; तरच आपला आवाज उठवू शकतील. आपलं म्हणणं इतरांना ऐकवू, पटवू शकतील. आपले न्याय्य हक्क कळिकाळाच्या दाढेतूनही खेचून प्रस्थापित करतील ते.

"या पाचांत मतभेदाची प्रथम फूट नंतर दरी पडण्याची शक्यता होती, ती या अजोड, अतुल लावण्यवती द्रौपदीमुळेच. तेच तू टाळलं आहेस! भिक्षा वाइन घेण्याची ही दीक्षा देणं तुलाच सुचू जाणे! मी मात्र विचार करतो आहे, या पांचालकन्या याज्ञसेना द्रौपदीचा.'

"असं म्हणून एव्हाना स्वत:ला विसरून दादाकडेच एकटक बघणाऱ्या द्रौपदीलाच त्यानं थेट प्रश्न घातला, पहिल्याच भेटीत तिच्यासमोर उभं ठाकून. तिला तो ऐकताना क्षणभर वाटलं असेल की, प्रत्यक्ष पिता द्रुपदराजाच समोर उभा आहे. त्यानं विचारलं, 'द्रौपदी सांग, या पाचांचा तू पती म्हणून केलेला स्वीकार तुला खरोखरच मन:पूर्वक मान्य आहे का? असल्यास तुझा त्यामागचा अचूक विचार काय?'

"आता पाचही पांडव त्यांच्या कुंतीमातेसह औत्सुक्यानं काय उत्तर येणार म्हणून ऐकू लागले. त्यांच्याहून बलरामदादाच्या चर्येवर दाटलेलं कुतूहल मी टिपलं. खरं सांगायचं तर वहिनी, मी तर कानच टवकारले.

"पांचालकन्या याज्ञसेना दादाच्या सुवर्णमुकुटातील रंगतळपत्या मोरपिसाकडे एकटक दृष्टी रोवून उत्तरली. तिचा आवाज प्रथमच ऐकताना मला वाटलं, तो दूरवरून कुठूनतरी गगनमंडलातून सूर्यकेंद्राच्या यज्ञकुंडातून येत असावा. विलक्षण कणीदार, धारदार; तरीही मधुर होता तो. निर्धारी. ऐकतच राहावा असा. दादाचा आवाज आहे तसाच. मात्र दादाच्या आवाजात तो एक वेणूचा मधाळपणा आहे. त्याची मात्रा यात काहीशी कमी! खरं सांगू वाहिनी, तो ऐकताना सगळ्यांत प्रथम मला स्मरण झालं, ते तुमचा आवाजाचं! तुमचा आवाज या दोहोंच्या मधला आहे, हे मला त्या वेळी प्रथमच जाणवलं!

"द्रौपदीनं तिला साजेसंच उत्तर दिलं, 'हृषिकेशा, हे पाचही बंधू मला पती म्हणून मन:पूर्वक मान्य आहेत. माधवा, तू जाणतोस की, हे वर वर दिसायला पाच आहेत. यांचं अस्तित्व आतून एकच आहे. मीही ते तसंच मानते. जगासाठी ते पाच असले, तरी माझ्यासाठी ते एकच आहेत.

"अच्युता, तुझ्याविषयी मी खूप-खूप ऐकून आहे. आज तुझं प्रत्यक्ष दर्शन झालं हे मी सर्वांहून सुभाग्याचं मानते. आता मीच तुला विचारते – तू काय मानतोस मला?'

"आता आम्ही सगळेच दादाकडे तो काय उत्तर देणार या उत्कंठेनं एकटक बघू लागलो. क्षणभरही वाया न दवडता तो म्हणाला, 'सखी – माझी प्रिय सखी! जग तुला माझी भगिनी मानेल. ती तर माझी सुभद्रा आहेच. पण तू मात्र सखीच!'

"द्रौपदीनंही होकारार्थी मान डोलावली. मोरपीसावरील दृष्टी काढून ती दादाच्या पायांवर जोडत ती कर्णीदार बोलीत म्हणाली, 'मग ह्या प्रिय सखीला साजेसा आशीर्वाद दे.' क्षणातच तिनं आळत्याची कुसर फिरलेले आपले लांबसडक बोटांचे हात दादांच्या पायांना भिडविले.

"मी-मी म्हणविणाऱ्या, मती गुंगविणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरं तो आजवर पटकन देत आला होता. आपल्या प्रिय सखीला आशीर्वाद देताना मात्र त्याचे पाणीदार मत्स्यनेत्र आस्ते-आस्ते मिटले गेले. त्या उजव्या हाताच्या तर्जनीवर त्यानं यंत्र सुदर्शन अनेकदा पेललं होतं, तो हात तिला आशीर्वाद देण्यास्तव उद्धरला गेला. त्याचे धीरोदात्त शांत शब्द पांडवांना ऐकू आले. त्यानं तिला आशीर्वाद दिला, 'पाच पतींची पत्नी असूनसुद्धा पातिव्रत्याच्या अत्युच्च शिखरावर पोहोचशील तू! युगानुयुगं तुझं नाव प्रातःस्मरणीय राहील. मृगाचा पर्जन्य कोसळून जाताच असीम आकाश पुन्हा निरभ्र व्हावं, तसं पाचही पतींच्या सेवेत तुझं कौमार्य निरभ्र राहील. बिल्वपत्रामुळे शिवपिंडी शोभून दिसावी, मोरपंखामुळे माझ्या किरीट शोभून दिसावा, तशीच या पांडुपुत्रांची पंचकडी केवळ तुझ्यामुळे शोभून दिसेल. लाभलेली सासू – सासू नव्हे माताच आहे, याचाही तुला योग्य समयी प्रत्यय येईल. तुम्ही सातही जण अमर, अजर, अक्षयच व्हाल.'' '

श्रीसह सर्व यादवमंडळ द्रौपदी-स्वयंवरानंतर द्वारकेला परतलं.जाताना ते मला म्हणाले होते, "या स्वयंवरानंतर माझ्या जीवनातील एका नव्या पर्वाला प्रारंभ होत आहे." भावजींनी सांगितलेला वृत्तान्त ऐकताना मलाही ते पटून गेलं.

काही दिवस गेले आणि श्रींना पंचनद प्रदेशात जावं लागलं. पांचालराज द्रुपदाकडून प्रेरणा घेऊन की काय नकळे, पंचनदातील पश्चिम मद्रदेशीच्या राजा बृहत्सेनानं आपल्या कन्येचं स्वयंवर मांडलं. तिचं नाव होतं 'लक्ष्मणा'. पण तोच होता – द्रौपदीच्या स्वयंवरासारखा जलातील प्रतिबिंबाचा वेध घेऊन छतातील मत्स्याचा नेत्रभेद करण्याचा. वाहीक आणि मद्र देश लगतच होते. या स्वयंवराचं आमंत्रणही द्वारकेत येऊन थडकलं. ब्रह्मावर्त, कुरुजांगल आणि मध्यदेश यांना लागून असलेला पंचनद राजकीयदृष्ट्या फार महत्त्वाचा होता. वसुदेवबाबांची एक भगिनी श्रुतकीर्तिदेवी याच प्रदेशात केकयाधिपती महाराज धृष्टकेतू यांना दिलेली होती. मद्रांचं राजनगर होतं, शाकलनगर. केकेयांची राजनगरी होती गिर्जक. ही वसली होती इरावती नदीकिनारी. शाकलनगरी वसली होती चंद्रभागा नदीकिनारी. श्रींच्या गरुडध्वज रथातील त्यांचा आवडता अश्व शैब्य याच प्रदेशातील चंद्रभागा, इरावती नद्यांच्या खोऱ्यातून दारुकानं शोधून, निवडून आणला होता. वाहीक, केकेय मद्र हा पंचनदाचा प्रदेश संग्रामशील अशरण, लढाऊ योद्धयांचा म्हणून विख्यात होता. नुकतीच द्रौपदी स्वयंवरामुळे कुरू आणि पांचालांत वैमनस्याची ठिणगी पडली होती. मत्स्यदेशीच्या बृहत्सेन राजाच्या कन्या लक्ष्मणेच्या स्वयंवराचं आमंत्रण येताच यादवांची सुधर्मा सभा भरली. सभेत प्रथम बलरामदादा, अमात्य विपृथू आणि दोन्ही सेनापतींपैकी

अनाधृष्टींचं मत पडलं की, या स्वयंवरामुळे काही वैमनस्य उद्‌भवणार असेल, तर पंचनदासारखा लढवय्या प्रदेश दुखावणं द्वारकेसारख्या नव्या जनपदाच्या दृष्टीनं योग्य नाही. त्यासाठी या स्वयंवराला न जाणं योग्य.

काही यादव योद्धयांचं मत त्याच्या उलट पडलं. त्यात मंत्रिगणातील काही ज्येष्ठ यादव होते. सात्यकी, कृतवर्मा, अवगाह, शिनी यांचा त्याला पाठिंबा होता. लक्ष्मणेच्या स्वयंवराचं आमत्रंण, या विषयाला धरून दोन तट पडताच आचार्य सांदीपनी आणि राजपुरोहित गर्गमुनी यांनी वसुदेवांना अंतिम राजाज्ञा द्यायची विनंती केली. असे आता जीवनातील अनेकानेक सत्त्वपरीक्षा बघणारे प्रसंग पाहून, अनुभवून, पचवून, परिपक्व व प्रगल्भ झालेले वसुदेव महाराज निर्णायक राजाज्ञा देत म्हणाले,

"मला वाटतं तुमचा नायक म्हणून द्वारकाधीशानं मद्राधिपती बृहत्सेनांच्या या आमंत्रणाचा आदर करावा. माझा पुत्र म्हणून श्रीकृष्णानं याच प्रदेशात असलेल्या गिर्जक नगरातील माझ्या भगिनीला — श्रुतकीर्तीला एकदा भेटून यावं. प्रत्यक्ष नाही, तरी पुत्राच्या नेत्रानं भगिनीला भेटल्याचं समाधान मला लाभेल. त्याच्याकडून तिचा क्षेमसमाचारही कळेल.

श्री उठले. या वेळी ते फारच थोडं बोलले. म्हणाले, "माझ्या प्रिय यादववीरहो! महाराजांची आज्ञा शिरसावंद्य मानून मी अवश्य शाकलनगराला जाणार आहे. बलरामदादांसह तुम्ही सर्वांनी कसलाही विक्षेप मनी न ठेवता माझ्यासह अवश्य यावं. मी जाणार आहे तो पंचनदातील संग्रामशील योद्धे डोळयांसमोर ठेवून, एका दूरदृष्टीच्या कार्यासाठी. महाराजांच्या प्रिय भगिनीचा श्रुतकीर्तीआतेचा क्षेमसमाचारही मी त्यांच्या चरणी आल्यानंतर अर्पण करीन." सुधर्मा सभेच्या यादवांनी सामूहिक पाठिंबा म्हणून एकमुखानं त्यांचा जयकार केला –'वसुदेवपुत्र द्वारकाधीश, समस्त यादवनायक श्रीकृष्ण महाराऽज जयतु – जयतु!'

सर्व तयारीनिशी यादवांचं वीरमंडळ पंचनदाकडे निघालं. या यात्रेत श्रींबरोबर दादा, उद्धवभावजी, दोन्ही सेनापती, कृतवर्मा, इंषुमान, भंकार, देववत असे योद्धे होते . नियंत्रित चतुरंगदल सेना होती. विशेष म्हणजे या यात्रेत श्रींनी अमात्य विपृथूंना समवेत घेतलं होतं. त्यांचा कारभार तरुण प्रद्युम्नावर सोपवून त्याला वेळोवेळी आचार्य व राजपुरोहित यांच्यासह माझा आणि वसुदेवबाबांसह सर्व वडीलधाऱ्यांचा परामर्श घेऊन तो निष्ठापूर्वक पाळण्याची सूचना दिली होती.

ते सर्वांचा निरोप घेऊन शुद्धाक्ष महाद्वाराल बाहेर पडले. श्रींनी प्रचंड नौकांसह मूळ द्वारकेची खाडी पार केली.

रैवतक पर्वताचा पायथा धरून पडावांमागून पडाव टाकत ते अर्बुद पर्वताच्या पायथ्याशी आले. ही मत्स्य जनपदाची सीमा होती. जवळच काही योजनांवर त्यांची राजनगरी विराटनगर होतं. इथला राजा होता, मत्स्यनायक विराट. आजपर्यंत दक्षिण देशीच्या करवीर, गोमंतापासून पूर्वेच्या कामरूपातील प्राग्ज्योतिषपूर ते हिमालयापर्यंतच्या श्रींनी चक्रवर्ती यात्रा केल्या होत्या. ते कांपिल्यनगरालाही जाऊन आले होते. मार्गातील अनेक राजांनी त्यांना भरगच्च उपहार धाडून त्यांचं हर्षोत्फुल्ल स्वागत केलं होतं. श्रींच्या निरपेक्ष प्रेमाची सर्वांनीच अपेक्षा धरली होती.

मत्स्य जनपदाच्या सीमेत मात्र उलटं घडलं. श्रींनी उद्धवभावजींकरवी अमात्यांना आपल्या शिबिरात पाचारण करून त्यांना आज्ञा केली, "उद्धवा, अमात्यांसह उपहारांची

दोन भरगच्च तबकं घेऊन विराटनगरीत जा. एक तबक मत्स्यराज विराटांना देऊन, नंतर दुसरं तबक अमात्यांच्या करवी त्यांचे सेनापती कीचक यांना भेट दे. विराटांसमोर तूच बोल, तू सांग – द्वारकाधीश श्रीकृष्ण महाराजांचा मी बंधू – उद्धव. मी नाही, तेच आलेत असं समजून या उपहाराचा स्वीकार करावा. द्वारकेच्या यादवांशी मत्स्यांचे स्नेहसंबंध सदैव दृढ राखावेत.”

अमात्यांना त्यांनी सूचना दिली, “सेनापती कीचकांना त्यांचं तबक तुम्ही भेट म्हणून द्यावं. त्यांच्याशी तुम्हीच बोलावं. बोलण्यात यादवांच्या चतुरंग सेनेतील गज, अश्व, उष्ट्र, पदाती यांचा संख्येसह निर्देश करून या समस्त यादवसेनेकडून हा उपहार आहे, असं सांगायला विसरू नये!”

दोघंही आपापली कामं यशस्वी करून परतले. यादवसेना यमुनानदी दोन वेळा पार करून सरस्वती नदीकिनारी आली. कुरुक्षेत्राच्या पवित्र भूमीतून वाहणारी ही नदी तशीच पावन होती. तिच्या स्फटिकधवल पवित्र पात्रात तिघाही बंधूंनी स्नानं केली. दानं वाटली. वीर यादवांची प्रचंड सेना आता मत्तमयूर जनपदात उतरली. तिथं दीर्घ प्रवासानंतरची दोन-तीन दिवसांची विश्रांतीची वस्ती झाली. शेवटी विपाशा नदी पार करून श्रींसह विजिगीषु, अशरण यादवसेना वाहीक जनपदात उतरली. हा पंचनद महाजनपदाचा प्रारंभ होता. इथं श्रींच्या चपळ, सेनाधुरंधरी हालचालींना प्रारंभ झाला. त्यांनी अंबष्ठ, त्रिगर्त, औदुंबर, कुलिंद, मद्र आणि केकेय अशा जनपदांच्या राजनगरांना स्नेहबंधाची भूर्जपत्रं आणि मौलिक उपहारांची भरगच्च तबकं देऊन वेगवेगळे कुशल राजदूत धाडले. बृहत्सेनाच्या शाकलनगराकडे सर्वांत कुशल गुप्तचर गेला. केकेयराज धृष्टकेतु याच्याकडे प्रत्यक्ष अमात्य विपृथू गेले. त्यांनी उपहारात श्रींची आत्या श्रुतकीर्तीदेवी आणि आतोबा धृष्टकेतू यांना वसुदेवबाबा व देवकीमाता यांच्या नावेच आवर्जून तबकं दिली. केकेयांना निरोप द्यायला ते विसरले नाहीत की, ‘भेटीसाठी द्वारकाधीश समक्षच येतील.’

शाकलनगराहून परतलेल्या अग्रदूतानं खडान्‌खडा वार्ता श्रींसमोर ठेवली –‘मद्रकन्या लक्ष्मणेच्या स्वयंवराची जय्यत तयारी झाली आहे. या पणात भाग घेण्यासाठी मगधराज जरासंध, अंबष्ठराजासह येणार आहे. आपल्या चार बंधूंसह धनुर्धर अर्जुनही येणार आहे!’

ते ऐकून श्री नेहमीचं मिश्कील हसते. उद्धवभावजींना खटयाळपणे म्हणाले, “त्याच्यावर पणात उतरण्याची वेळच येणार नाही! मीच सर्वप्रथम या पणात उतरेन. कोसळलंच माझ्या वक्षावर मद्रधनुष्य, तर तोच पुढे सरसावून ते उद्धरेल! मला त्यातून मुक्त करेल!”

उद्धवभावजी एवढे मनकवडे होते की, त्यांनी सेनेच्या त्या पडावावरूनच मला दूत धाडला की, ‘प्रात:स्मरणीय, वंदनीय सौ. वहिनी, तुमची आणखी एक भगिनी म्हणून मद्रकन्या लक्ष्मणादेवी येत आहेत. त्यांच्याही स्वागताला तयार असा!’

स्वयंवराच्या ठरल्या दिवशी चंद्रभागानदीच्या किनारी वसलेल्या शाकलनगरीत स्वयंवर सोहळा संपन्न झाला. त्या स्वयंवराला द्रौपदी-स्वयंवरात जमलेले जवळ-जवळ सर्वच राजे आले होते. अर्जुनही आपल्या बंधूंसह आला होता. पंचनदातील अंबष्ठ, त्रिगर्त, औदुंबर असे नवे राजेही आले होते. यात प्रमुख होते जरासंध, चेकितान, पौंड्रक, जयद्रथ, दंतवक्र, भगदत्त, भूरिश्रवा असे. कुरूंच्या हस्तिनापुरातून कुणीच

आलं नव्हतं.त्याचं कारण कळत नव्हतं. वास्तविक हस्तिनापूरचे कुरू, त्यातही दुर्योधन व त्यांचे बंधू, शकुनी आणि त्यांचे बंधू तर अशा आव्हानात्मक आमंत्रणाचा कधीच अव्हेर करत नसत. हस्तिनापूरचा राज्यभार राजा म्हणून अंध धृतराष्ट्र सांभाळत होते. ज्येष्ठ कौरव दुर्योधन पराकोटीचा उद्धट, अहंमन्य आणि कुटिल महत्त्वाकांक्षी होता. राज्य व अधिकारलोभी असल्यानं कुणालाच मानत नव्हता. प्रत्यक्ष जन्मदात्री राजमाता, पतीसाठी अंधत्व स्वीकारणारी मानिनी गांधारीदेवी यांचे ममतेचे व हिताचे संकेत ऐकून न ऐकल्यासारखे करीत होता. शेवटचा कुरू असलेले महाविक्रमी, त्यागी, सत्प्रवृत्त पितामह भीष्म यांचंही काही ऐकत नव्हता. तपस्वी, सात्त्विक व कर्तव्यदक्ष महात्मा विदुर यांना दाद देत नव्हता. साक्षात धनुर्वेद असलेले गुरुदेव द्रोणाचार्य, ज्येष्ठ कुलगुरू कृपाचार्य तर त्याच्या खिजगणतीतही नव्हते. सर्वांचेच वेळोवेळी केलेले सावधानतेचे संकेत व सद्वृत्तीचे उपदेश, माजल्या सांडाच्या वृत्तीनं तो सरळ फेकून देत होता. तो राजनीती, युद्धनीती, न्यायवृत्ती, कौटुंबिक समस्या या सर्वांतच अंतिम निर्णायक म्हणून शब्द मानत होता, मामा शकुनी याचा.

शकुनीनं दुर्योधन हा कुरुकुलाचा धगधगता अंगार असा मुठीत धरला होता की, तसा तो कुणालाच दिसू नये. केव्हाही, कुठंही मूठ उघडून तो खोलता यावा. त्याच्या असह्य धगीनं आसमंत जळून राख झाल्यावर तो पुन्हा मुठीत धरता यावा! त्यासाठी पराकोटीच्या कुटिल शकुनीनं हा निखारा तळहातात घेण्यापूर्वी हातावर कुणालाच न दिसणारं कमावलेलं वृषभचर्म कौशल्यानं ओढलं होतं. ते होतं 'मामा-भाचा' या गुंतागुंतीच्या कोमल नात्याचं!

ठरल्या मुहूर्तावर स्वयंवरासाठी उपस्थित राजांचं स्वागत करून बृहत्सेनानं कारागिरांना मत्स्ययंत्र सुरू करण्याची आज्ञा केली. मद्रकन्या लक्ष्मणा हाती वरमाला घेऊन सविनय माता-पित्यांशेजारी उभी राहिली. या स्वयंवरात श्रींनी कुणालाही कसलाही विक्षेप उभा करण्याची संधी दिलीच नाही.

शाकलनगरातील मद्रांच्या राजवास्तूत स्वयंवरासाठी उभारलेला मंडप आमंत्रितांनी खचाखच भरून गेला. मंडपात सर्वप्रथमच पणपूर्तीसाठी श्री जलकुंडाकडे जायला निघाले. तशी उपस्थितांच्या व यादवांच्या अविरत टाळ्यांनी आणि जयजयकारांनी शेजारून वाहणारी चंद्रभागाही थरारून गेली.

श्रींनी लीलया मद्रधनुष्य उद्धरलं. कपोताच्या डौलदार मानेसारखं जलकुंडाच्या काठी अत्यंत नेत्रदीपक वीरासन घेतलं. प्रत्यंचा ताणून सूची बाण चढविला. हा पहिलाच बाण होता. जमलेल्या शेकडो, हजारो पंचनदकारांचे नेत्र त्या बाणाचं अग्र आणि छतातील गरगर फिरत्या मत्स्याचा नेत्र असे वरखाली हिंदोळू लागले. श्वास रोधून सर्व उपस्थित अचूक मत्स्यभेदाचा वेध टिपण्यासाठी उत्कंठेनं थांबले. आणि काय झालं कुणास ठाऊक, उद्धरलेलं मद्रधनुष्य श्रींनी तसंच पुन्हा हलकेच खाली घेतलं! तसे मंडपभर रोधलेले नि:श्वास सुटले. उपस्थितांत कुजबुज माजली. आपल्या बंधूच्या मेळात बसलेला धनुर्धर धनंजय तर वज्राघात व्हावा, तसा उठून उभाच राहिला. मद्रराज बृहत्सेन चिंताक्रांत चर्येनं चार पावलं पुढे सरकले. आपण वधूकन्या आहोत हे विसरून, लक्ष्मणेनं मान उठवून दृष्टी मत्स्ययंत्र आणि श्रींसह धनुष्यावर प्रश्नार्थी फिरवली.

एकटे उद्धवभावजी मात्र श्रींच्या वेलबुट्टीच्या तेजस्वी सुवर्णमुकुटातील

तळहाताएवढ्या उंच मोरपिसाकडे बघतच राहिले. श्रींनी त्या स्थितीतही हसून मंडपातील केवळ दोघांकडेच बघितलं. प्रथम उद्धवभावजींकडे आणि मग अर्जुनाकडे. मग नित्याचं मंद हसले. उद्धवभावजी अर्जुनाप्रमाणंच उभे राहिले होते. श्रींनी दोघांनाही नेत्रानंच संकेत केला, 'शांतपणे खाली बसण्याचा.' दोघंही तो संकेत अचूक उचलून आज्ञाधारकपणे खाली बसले.

श्रींनी मद्रधनुष्य हलकेच खाली ठेवलं. आपल्या मस्तकीचा सुवर्णी किरीट तसाच खाली उतरवला. क्षणैक मांडीवर टेकवला. त्याच्या खोबणीतील त्यांचं प्रिय मोरपीस खोबणीतून हळुवार बाहेर घेतलं. हलकेच ते जलकुंडाच्या काठावर अलगद ठेवून दिलं. पुन्हा मस्तकी मुकुट धारण केला. पुन्हा मद्रधनुष्य पूर्वीसारखंच लीलया उद्धरलं. पुन्हा तसंच डौलदार वीरासन घातलं. टंकार काढून प्रत्यंचा ताणून त्यांनी सूची बाण केव्हा चढवला, वक्ष श्वासानं केव्हा भरून घेतलं सूची बाणाचं प्रक्षेपण केव्हा केलं, मत्स्यनेत्रभेद अचूक केव्हा व कसा साधला, हे कुणालाच काहीही कळलं नाही!!

मत्स्ययंत्र थांबलं तेव्हा अविरत टाळ्याच टाळ्यांचा नुसता कडकडाट झाला. पाठोपाठ एकच एक जयनाद, 'आर्यावर्तातील सर्वश्रेष्ठ अजिंक्य धनुर्धर, शारंगधर, द्वारकाधीश, मद्रकन्या लक्ष्मणापती श्रीकृष्ण महाराजऽ! जयतु... जयतु!' असा दुमदुमला. आणि हवेत उत्तरीय आणि हात उडवीत असंख्य मद्रदेशवासी जलकुंडाकडे अभिनंदनासाठी धावले.

बृहत्सेन महाराजांनी पाठीवर हात ठेवून सावरत आणलेल्या लक्ष्मणेनं जलकुंडाकाठीच श्रींच्या कंठात शुभ्र स्वयंवरमाला चढविली. आवेगानं पुढे धावलेल्या उद्धवभावजींनी आपल्या प्रिय दादाला प्रथम कडकडून मिठी भरली. मग जलकुंडाच्या काठावरचा मयूरपंख हलकेच उचलून उत्तरीयानं तो एकदा हळुवार पुसून पुन्हा आपल्या दादांच्या किरीटाच्या खोबणीत बसविला. अर्जुनानंही बंधूंसह श्रींना गाठलं. श्री ज्येष्ठ पांडव युधिष्ठिराला वंदन करण्यासाठी झुकले मात्र, युधिष्ठिरनं त्यांना तसं करू दिलं नाही. एवढ्यात जन्मतःच विनम्र असलेला अर्जुन श्रींची पायधूळ मस्तकी घेऊन मोकळाही झाला होता. श्रींनी त्या कोलाहलातही कुंतीआत्या, सखी द्रौपदीसह सर्वांची आस्थेनं विचारणा केली. ते सर्व हस्तिनापुराकडे जायला निघाले होते. श्रींनी त्यांना शाकलनगराच्या सीमेवरच्या आपल्या शिबिरात भेटण्याची सूचना दिली.

उद्धवभावजी लक्ष्मणा-स्वयंवराचा हा वृत्तान्त तसाच बारकाव्यांसह सांगून गेले. माझं वेडं मन मात्र श्रींनी मध्येच उतरवून ठेवलेल्या त्या मोरपंखाच्या कोड्यात नाही म्हटलं तरी अडकून घोटाळत राहिलं! मी उद्धवभावजींना त्या वेळी न राहवून थांबवून विचारलंही होतं, "हे सगळं-सगळं ठीक आहे. पण श्रींनी सरसावलेलं धनुष्य खाली ठेवून आपल्या मुकुटातील मोरपीस प्रथम काढून बाजूला ठेवलं, त्याचं कारण काय?"

तसं उद्धवभावजी हसत-हसतच माझंच मंडल घेताना म्हणाले, "कळलं नाही का ते तुम्हाला वहिनी! फुका झालात तुम्ही दादाच्या प्रिय पत्नी! म्हणे यादवांच्या महाराणी! आता तुमचं स्थान आलेल्या इतर वहिनींतून एकीला निवडून दिलं पाहिजे!"

तसं त्यांच्याकडे कृतक कोपानं बघत मी म्हणाले, "खट्याळपणा श्रींना शोभतो, तुम्हाला नाही उद्धवभावजी! आता मुकाट सांगता की मी जाऊ निघून?" एव्हाना उद्धवभावजींनी माझ्या जीवनात कायमचं हरवलेल्या माझ्या बंधूंचं स्थान केव्हाच घेतलं होतं.

मी ऐकवलं तसं मात्र आपणच जलकुंडासाठी वीरासन घेऊन, श्रींनी आयत्या क्षणी मोरपीस का उतरविलं त्याचं आविर्भावासह प्रात्यक्षिकच त्यांनी दाखविलं. ते म्हणाले, "मंडपात हे कुणालाच कळलं नाही की, गरगर फिरत्या जलकुंडातील मत्स्यनेत्राचा अचूक वेध घेणं, त्या मोरपिसामुळेच दादाला शक्य होत नव्हतं! मत्स्यंत्राच्या बिंबावर चंद्रभागेच्या शीतल वायुलहरींवर हिंदोळणाऱ्या त्या मोरपिसाचं प्रतिबिंबही एकसारखं हिंदोळत फडफडत नेत्रवेधाच्या आड येत होतं! त्याची एकाग्रता ते एवढंसं मोरपीस भंगवीत होतं! म्हणून त्यानं ते प्रथम उतरविलं."

ते ऐकताना मी सोडलेल्या दीर्घ नि: श्वासाबरोबरचं नकळत सुटलेलं माझं बोलणं की, "एक साधं मोरपीससुद्धा श्रींना अडवून गेलं नाही!"

तत्परतेनं माझं बोलणं सुधारत भावजी म्हणाले, "मोरपीसच वहिनी, पण ते साधं नव्हे! दादाच्या किरीटातील आहे ते!"

शाकलनगरात मद्रांच्या जामातांचं सेनेसह एक सप्ताह वास्तव्य झालं. महाराज बृहत्सेनांचा सर्वांना यथेच्छ पंचनदी पाहुणचार झाला.

स्वयंवर मंडपात ज्येष्ठ पांडव युधिष्ठिराला सांगितल्याप्रमाणं श्री निघाले. आत्याबाई कुंतीदेवींच्या भेटीसाठी शाकलनगराच्या सीमेवरील पांडवांच्या शिबिरात आले. सोबत बलरामदादा, भावजी, दोन्ही सेनापती, अमात्य, इंषुमान, भंकार, देववत असे यादववीर होते.

आत्याबाई कुंतीदेवी आपली नूतन स्नुषा द्रौपदीसह श्रींच्या स्वागतासाठी सामोऱ्या आल्या. पाठीशी वीर पांडवांचं पंचक होतंच. श्रींनी आत्याबाईंच्या क्षेमकुशलाची विचारणा करून त्यांची चरणधूळ मस्तकी घेतली. श्रींना कांपिल्यनगरानंतर प्रथमच भेटलेल्या द्रौपदीनं त्यांची चरणधूळ मस्तकी घेतली. तेव्हा तिला श्री आवर्जून म्हणाले, "द्रौपदी, तुला मी 'प्रिय सखी' म्हटलं व मानलं आहे. तू माझ्या प्रत्येक भेटीत हे कुलाचार पालण्याची मुळीच आवश्यकता नाही. तू नेहमीच माझ्याशी मनमोकळं बोलावं, वागावं अगदी सुभद्रेसारखं."

मद्रांच्या चंद्रभागेच्या तीरावरच्या त्या शिबिरात मग पांडव, पांडवमाता, सखी यांच्याशी श्रींची विशेष बैठक झाली. त्या बैठकीचा प्रमुख विषय होता, तो हस्तिनापूरच्या कुरुराज्यातील पांडवांच्या न्याय्य अधिकाराचा!

हस्तिनापूरचं राज्य वंशपरंपरेनं सम्राट पांडूंचं होतं. किंदम नावाच्या ऋषींनी दिलेल्या एका शापामुळे सम्राट पांडूंना मध्येच राज्य सोडून वनात जावं लागलं होतं. त्यांचे ज्येष्ठ बंधू धृतराष्ट्र जन्मतःच अंध असल्यानं कुरूंच्या राजमंडळानं त्यांना सिंहासनावर आरूढ होण्यास पूर्वी अपात्र ठरविलं होतं.

सम्राट पांडू वनात गेले. राजमंडळाला अंध धृतराष्ट्रांना हस्तिनापूरचं राज्य विश्वस्त म्हणून सांभाळण्याची विनंती करण्याशिवाय पर्याय राहिला नव्हता. निरिच्छ, सत्यप्रतिज्ञ आजन्म ब्रह्मचारी पितामह भीष्म, हेच खरेतर कुरुकुलाचे शेवटचे अधिकारी पुरुष होते. त्यांना प्रमुख मंत्री विदुरांच्या परामर्शानुसार अंध धृतराष्ट्रांच्याच हाती हस्तिनपूरची राजसत्ता सोपवावी लागली होती.

शंभर पुत्रांतील ज्येष्ठ दुर्योधन, त्याची छायाच असलेले दुःशासन, दुर्मर्ष तसेच त्याचे अनेक बंधू, कुटिल कारस्थानी मामा शकुनी, त्याला तशीच साथ देणारे, त्याचा शब्द

झेलणारे त्याचेही अकरा बंधू एकत्र आले होते. मंत्री कणक, वासंतिक स्पर्धेच्या निमित्तानं अंगराजपदानंतर नित्यासाठी दुर्योधनाच्या स्नेहात गेलेला विक्रमी कर्ण यांना नियतीनंच एकत्र आणलं होतं. त्यांच्या बळावर अंध धृतराष्ट्राला अशक्य स्वप्न साकार झालेली बघणारे शतविध नेत्र फुटले होते. अंध धृतराष्ट्राचं मानस त्यामुळ अत्यंत गुंतागुंतीचं व क्लिष्ट झालं होतं. महाविक्रमी भीष्म व महात्मा विदुर हस्तिनापुरात हळूहळू एकाकी पडत चालले होते.

हस्तिनापूरच्या या वास्तवाची खडान्‌खडा माहिती श्रींनी चाणाक्ष गुप्तचरांकडून वेळोवेळी उचलली होती. परिस्थितीचे चटके खात आलेल्या सत्त्वशील, विक्रमी व गुणवंत पांडवांना त्यांचे न्याय्य अधिकार प्राप्त करून देणं, ही सोपी गोष्ट नव्हती. त्याचं भान मनी जागतं ठेवून श्रींची एक-एक पावलं सावधपणे पडू लागली. बसल्या बैठकीला तोंड फोडत ते म्हणाले, “केकयाधिपती धृष्टकेतू महाराज माझे आतोबा आहेत. त्यांनी मला सेनेसह राजधानी गिर्जकाकडे येण्याचं आग्रहाचं आमंत्रण धाडलं आहे. त्यानुसार मी जाणार आहे.

“युधिष्ठिरा, तुम्ही पांडवही त्यांचे भाचेच आहात. मात्र तुम्ही इथं आला आहात याची केकयांना काहीही कल्पना नाही. कांपिल्यनगरातील स्वयंवराची वार्ता मात्र त्यांना कळलेलीच असणार. तुम्हाला तुमच्या हस्तिनापुरातील अधिकाराची जपणूक मिळेल त्या लहानथोर सामर्थ्याला पाठीशी घेऊनच करावी लागेल. माझा प्रस्ताव आहे, आमंत्रण नसलं तरीही तुम्ही माझ्यासह मावशी व केकय राज यांच्या दर्शनासाठी व आशीर्वादासाठी केकयांच्या गिर्जक राजनगराकडे चलावं!”

मग त्या बैठकीत उलटसुलट विचारांचा रात्रभर ऊहापोह झाला. पांडव आपली माता कुंतीदेवी हिच्या शब्दाबाहेर कधीच जात नसत. त्यांनी बैठकीची समाप्ती एकाच वाक्यात केली, “श्रीकृष्ण सांगेल तसेच माझे पुत्र व त्यांची पत्नी वागेल. उदईक आम्ही यादवांसह गिर्जकाकडे निघू.”

मद्रांचा निरोप घेताना श्रींनी उद्धवभावजींना गोंधळात टाकणारी एक आज्ञा केली. “उद्धवा, तुझ्या सवयीप्रमाणं तुझा विशेष दूत इथूनच द्वारकेला जाऊ दे. तुझ्या प्रिय वहिनीला अग्रवार्ता दे की, तुमचे आणखी दोन अतिथी येताहेत! त्यांच्या स्वागताची तयारी ठेवा.” भावजी त्यांचा मान राखत म्हणाले, “होय. आजच धाडतो तसा अग्रदूत.”

मद्रांनी आपल्या नव्या जामातांना पशुपक्षी, धान्यगोणी, वस्त्र-अलंकार आणि त्यांच्या राज्यातच मिळणारे विशाल पृष्ठाचे पांढरेशुभ्र, तपकिरी, काळे असे शेकडो सालंकृत अश्व भेट दिले होतं. त्यांच्यासह लक्ष्मणेच्या आगमनाची वार्ता देणारा दूत द्वारकेत धाडला.

त्याप्रमाणे यथासमय दोन अतिथी द्वारकेत आलेसुद्धा. पण ते आम्ही कल्पना केली तसे श्री आणि मद्रकन्या लक्ष्मणा असे नव्हते, तर श्रींशिवाय आणखी दोन विशेष अतिथी असे होते! लक्ष्मणेचे पायठसे उचलत केकयकन्या ‘भद्रा’ ही श्रीपत्नी म्हणून द्वारकेत आली होती!

पांडवांसह गिर्जकात पोहोचताच आत्याबाई श्रुतकीर्तीदेवी तर आनंदानं उचंबळून आल्या. त्यांनी अपेक्षा केली होती, केवळ यादवांकडील भाच्यांच्या दर्शनाची. त्यांना सामोरे आले, कुरूकडील भाचे पांडवसुद्धा. त्यांनी आपल्या बहिणीचं कुंतीदेवीचं सर्वांसह स्वागत केलं. आपल्या प्रिय भाच्याला – श्रींना एकांती घेऊन पटेल अशा यादवी

ठेक्यात समजावलं की, “श्रीकृष्णा, तुमचं द्वारकेचं जनपद नवं. आमचं पंचनदातलं माणूसबळ मोठं, इथं शेजारच्या प्रत्येक राज्याशी आमचे रक्ताचे दृढ संबंध आहेत. द्वारकेशी तसेच ते जुळले गेले, तर आपोआपच उभा पंचनद द्वारकेच्या पाठिंब्यात येईल.”

आत्याबाईंचा तो सगळा घरगुती राजनीतीचा चक्रव्यूह श्रींनी शांतपणे हसत ऐकला. समजून न समजल्याचा आविर्भाव चर्येवर आणला. त्यांचं लक्ष सोबत आलेल्या त्यांच्या कुरुभाच्यांकडे – पांडवांकडे सहज ओढत श्रींनी प्रिय आत्याबाईंना विचारलं, “खरं आहे तू म्हणतेस ते. धृष्टकेतू महाराजांपेक्षा तू खरी राजकुशल! या सगळ्यांसाठी मी काय करावं, अशी तुझी इच्छा आणि आज्ञा आहे, तेवढं सांग. मी ते करतो. तूही माझ्यासाठी एक करावं.”त्यांनी बोलणं अर्धवट सोडलं.

तशा केकेयांच्या त्या धोरणी महाराणी पुढे होत श्रींचा खांदा थोपटून म्हणाल्या, “तू केकेयांचा जामातच हो कसा श्रीकृष्णा! आपोआपच सगळ्या पंचनदाचाही होशील! आमची कन्या भद्रा तुला द्यावी म्हणते मी. तुझा विचार काय ते स्पष्ट सांग. इतरांसारखा कसलाही राजकारणी तिढा काढू नकोस माझ्यासमोर!”

तसे आपल्या ज्येष्ठ प्रिय आतेचे दोन्ही हात श्रींनी प्रेमानं आपल्या हाती घेतले. श्रींनी तिला ज्येष्ठपणाचा आदर देत काढायचा तो राजकीय तिढा काढलाच. तिलाही न कळणारा! म्हणाले, “तुझी इच्छा ही तुझ्यापेक्षा लहान म्हणून मला आज्ञाच आहे आत्ये! तू म्हणतेस तसंच होईल. मी होईन केकेयांचा जामात. आत्ता कुठं माझ्या ध्यानी येतंय, आम्ही पंचनदात उतरणार हे कळताच तू तातडीनं द्वारकेला वसुदेवबाबांच्या भेटीला विशेष दूत का पाठविला होतास ते! त्यांनी मला तुझी भेट घेऊनच ये, असं का सांगितलं होतं ते! चला, म्हणजे तुझी इच्छा, त्यांची आज्ञा आणि यादवांच्या द्वारका गणराज्याचं कल्याण यामुळे होईल. मी तर काय नेहमीच निमित्तमात्र असतो! आत्ताही होईन.”

आत्याबाई श्रुतकीर्तिदेवी संतुष्ट झाल्याचा क्षण अचूक पकडून श्रींनी मनचा राजकीय तिढा हळुवार त्यांच्यासमोर उघड केला. म्हणाले, “केकेय महाराणी, आपण या जामातासाठी एकच करावं.माझ्यासोबत माझे हे आतेबंधू तुमचे भाचे पांडव आले आहेत. त्यांना माझ्या ठायीच मानून ते साद घालतील तेव्हा या उभ्या पंचनदाचा प्रतिसाद त्यांच्या पाठीशी उभा करावा म्हणजे झालं! कराल एवढं?”

आत्याबाईंनी तर सर्वांसमक्ष आपल्या प्रिय भाच्याला कानशिलांवर इडापिडा घेऊन आपली बोटं पंचनदी ठेक्यात मायेनं कडाकड मोडली. त्या म्हणाल्या, “तू म्हणतोस तसंच होईल रे सुपुत्रा!” त्यांनी राजनगराच्या भोवती वाहणाऱ्या इरावती नदीकिनारीच्या भव्य मंडपात उभारून आपली कन्या भद्रा हिचा विवाह मोठ्या धूमधडाक्यात संपन्न केला.

श्रींची ही सप्तम पत्नी होती – भद्रा.

लक्ष्मणा आणि भद्रा या दोन्ही पंचनदकन्या सेनापती अनाधृष्टी व यादवसेनेसह द्वारकेत एकदमच आल्या. द्वारकाकरांनी त्यांचं यथासांग स्वागत केलं. गर्गमुनींनी मूळ द्वारकेतील श्रींच्या राजवास्तूतील श्रीसोपान कुशल काष्ठकार आणि उपलेपक जोडून वाढवून घेतला. माझ्यानंतर आलेल्या सहाही श्रीपत्नींच्या नावांच्या सुवर्णी पायदंड्या तशाच आणखी काही त्यात वाढविण्यातही आल्या. आता हा श्रीसोपान पूर्वीपेक्षा कितीतरी उंच, रुंद व भव्य दिसू लागला. झळझळीत सुवर्णी पायदंड्यांमुळे दीप्तिमान दिसू लागला.

जसजसे दिवस जात होतं तसतसं माझ्यावरचं ‘महाराणी’ म्हणून दायित्व वाढू लागलं. एव्हाना मी प्रिय जांबवतीच्या मदतीनं माझ्या प्रद्युम्नाचं एका संस्कारशील महारथ्यात रूपांतर करून घेतलं होतं, माझ्या सहाही भगिनींचं त्याच्यावर विलक्षण प्रेम होतं.धिप्पाड आणि अतीव सुंदर असला, तरी तोही त्या सर्वांशी आदरानं वागे. श्री द्वारकेत नाहीत, याची जाणीव तो कुणालाच भासू देत नसे. निशठ, उल्मुक आणि विपुल हे तर सतत त्याच्या मागे–पुढे असत. श्रींची वंशवेल ही द्वारकेच्या आरोग्यदायी सागरी वातावरणात भरभरून वाढत चालली. फोफावत चालली.

आता श्रींच्या जीवनगंगेतील पांडवपर्वाला खरा प्रारंभ झाला होता. त्यांनी लक्षणा आणि भद्रा यांना मत्स्यांच्या विराटनगराहून परस्पर द्वारकेला धाडलं होते.स्वतः श्री, बलरामदादा उद्धवभावजी, विपृथू, सात्यकी यांच्यासह कुंतीमाता व पांडव आणि द्रौपदी यांना सोबत घेऊन निवडक यादवसेनेसह हस्तिनापुराकडे सरकले होते. घनदाट खांडववनाजवळून यमुना पार करत त्यांनी पुर्वेकडचं, गंगेकाठचं हस्तिनापूर गाठलं होतं.कुरुराज्याच्या सीमेवरून अमात्य विपृथू व उद्धवभावजी यांच्या करवी महाराज धृतराष्ट्रांना उपहारासह मौल्यवान उपहारतबकं धाडली. उद्धवभावजींना सावध कानमंत्र दिला होता की, त्यांनी परतताना, महामंत्री विदुर, पितामह भीष्म, अमात्य वृषवर्मा यांना एकांती भेटावं. पांडव जिवंत असून सदेह हस्तिनापुरात येताहेत याबद्दलची त्यांची व हस्तिनापूरकर पौरजनांची नेमकी काय प्रतिक्रिया आहे, हे कौशल्यानं काढून घ्यावं. पांडवपिता सम्राट पांडूंना नगरजन पूर्ण विसरलेत की त्यांना अद्याप त्यांचं स्मरण आहे, हेही पारखून बघावं. पांडवमाता कुंतीदेवींबद्दल त्यांचं नेमकं काय मत आहे, हे तर काटेकोर जाणून घ्यावं. तसंच महाराज धृतराष्ट्र, ज्येष्ठ कौरव दुर्योधन, मामा शकुनी, त्या दोघांचे सर्व बंधु, कणक, गुरू द्रोण, द्रोणपुत्र अश्वत्थामा, आचार्य कृप, प्रमुख सारथी संजय, अंगराज कर्ण यांची भेटही घ्यावी

श्रींच्या इच्छेप्रमाणं अमात्य आणि भावजी आपापली राजकर्मं सकुशल पार पाडून परतले. त्या कित्येक दिवसांनंतरच्या महत्त्वाच्या भेटीत पांडव स्त्रिया कुंतीदेवी व द्रौपदी महाराणी गांधारीदेवींच्या कक्षात थांबणार होत्या. गांधारीदेवी ह्या स्वभावतःच सत्यप्रिय आणि निग्रही होत्या. त्यांचं कुंतीदेवी आणि पांडवांवर प्रथमपासूनचं निकोप प्रेम आजही तसंच होतं, त्या सर्वांना भेटण्यासाठी त्या आतुर होत्या. त्यांच्या उदरी दुर्योधन उपजावा, त्याच्या इतर बंधूंनी त्याला आपला आदर्श मानावा, हा कुरुकुलाचा दुर्योग होता.

पांडव येताहेत ही वार्ता ऐकताच कुरूंच्या राजकुलात गुंतागुंतीचे मतभेद निर्माण झाले होते. सर्वांत क्लिष्ट झालं होतं, ते महाराज धृतराष्ट्रांचं अंतरंग! कुरूंच्या त्या अंध महाराजात स्पष्ट दोन धृतराष्ट्र निर्माण झाले होतं. त्यातील पहिला होता, कर्तव्यदक्षतेचं वरवर बोलकं ढोंग पांघरणारा महाराज धृतराष्ट्र आणि दुसरा होता, सुप्त मनात पुत्रप्रेमापोटी छुपे, कुटिल राजकीय डावपेच सतत आखणारा स्वार्थी पिता. मनाच्या चक्षूंनी आपल्या प्रथमपुत्राला – दुर्योधनाला आपल्या राजसिंहासनावर आरूढ झालेलं बघणारा, नैसर्गिक अपत्यप्रेमानं घेरलेला पिता. त्या पित्याला दुर्योधनानंतरचा पुत्र दुःशासन हा कुरूंचा सेनापती झाल्याचं स्वप्न पडत होते. राजपरामर्श देणारा उपयुक्त कणकाला प्रसंगी महामंत्री विदुराला दूर सारून महामंत्री पदावर बसवायचा होता. सुप्त मनाच्या या गोड स्वप्नात महाराज धृतराष्ट्र वरवर प्रकट

बोलताना मात्र बंधू पांडूंच्या विक्रमाचं, पांडवांच्या, कुंतीदेवीच्या, द्रौपदीच्या स्वभावाचं, सद्गुणाचं रसभरित गुणगान करीत होता. पाचही पांडवांना पाच-पंचवीस तरी खोटचा गुणवत्तेची विशेषणं लावल्याशिवाय तो साधं कधी बोलतंच नव्हता. आपल्या अंधत्वाचं, लटक्या असहायतेचं कारण पुढे करून, जन्मजात दुष्प्रवृत्त दुर्योधनाला पितृत्वाचं राजकवच पांघरायला विसरत नव्हता. शेवटचे कुरू असलेल्या महाविक्रमी ज्येष्ठ पितामहांना लटका आदर दाखवण्याचं टाळत नव्हता. एकांतात मात्र शकुनीशी आणि त्याचंच प्रतिबिंब वाटावा असा कणक यांच्याशी अहोरात्र अंध डोळ्यांनी; पण जागत्या कुटिल बुद्धीनं राजकीय षडयंत्राचे किचकट फास विणायला विसरत नव्हता. कुरूच्या राजवास्तूत सर्वांना पंचेंद्रियं होती. त्याला एक सहावं इंद्रिय लाभं होतं – राजतृष्णेचं! त्यापोटी आपला कनिष्ठ बंधू पांडू हस्तिनापूरचं राज्य सांभाळण्यासाठी ‘विश्वस्त’ म्हणून आपल्या स्वाधीन करून गेला आहे, या सत्याचं भानच तो संपूर्ण विसरला होता. आपण ज्येष्ठ होतो, केवळ अंधत्वामुळे आपणाला राज्याधिकारास मुकावं लागलं. अन्यायच होता तो माझ्यावर! आता सम्राट पांडू दिवंगत झाला आहे, मी वृद्ध झालो आहे. माझा ज्येष्ठ पुत्र दर्योधन हाच माझ्या ज्येष्ठत्वामुळे हस्तिनापूरचा प्रथम युवराज व नंतर राजा होण्यास अधिकारी आहे, असं त्याचं निग्रही म्हणणं आणि मत होतं. ते तो संधी व वेळ मिळेल तेव्हा-तेव्हा महामंत्री विदुर व पितामह भीष्म यांच्या गळी, आडवळणानं उतरवू बघत होता. ते मनस्वी राजपुरुष काही त्याला दाद देत नव्हते.

त्यांचं म्हणणं होते, कौरव-पांडवांत प्रथम जन्मलेला आहे युधिष्ठिर. त्याचा पिता सम्राट पांडू यानं हस्तिनापूर सांभाळण्यासाठी धृतराष्ट्राच्या तात्पुरतं स्वाधीन केलं आहे. आता ते सज्ञानी व ज्येष्ठ पांडुपुत्र युधिष्ठिराला, राजधर्माचं कर्तव्य म्हणून धृतराष्ट्रानं सन्मानपूर्वक परत केलं पाहिजे. युवराज्याभिषेक युधिष्ठिरालाच झाला पाहिजे. धृतराष्ट्रानंतर हस्तिनापूरच्या राजसिंहासनावर राजा म्हणून युधिष्ठिरालाच अभिषेक झाला पाहिजे. ते न्याय्य आहे. धर्माला धरून आहे.

हस्तिनापूरच्या राज्याच्या अधिकारावरून कुरूच्या राजमंडळात असे दोन स्पष्ट वैचारिक तट पडत चालले.एक पांडवांचा पाठीराखा आणि दुसरा कौरवांचा पाठपुरावा करणारा. हस्तिनापूर हे काही मगधांसारखं एकाधिकारी राज्य नव्हतं. या गणराज्यातील पौरजनांचा गट होता, तो तिसरा. तोच सर्वांत महत्त्वाचा होता. नगरजन एकमुखानं आणि मतानं अद्यापही सम्राट पांडूचं स्मरण करत होते. त्यांच्या गुणी पुत्रांचं – पांडवांचं, राजमाता कुंतीदेवींचं, पांडवपत्नी द्रौपदीचं स्वागत करायला आणि दर्शन घ्यायला ते आतुरले होते.

द्वारकाधीश यादवनायक श्रीकृष्ण महाराज पांडवांना घेऊन येताहेत, ही वार्ता नगरभर पसरली. उभं हस्तिनापूर चैतन्यानं कसं सळसळून उठलं. सहस्त्रावधी स्त्री-पुरुषांनी कुंकुममुठी आणि पुष्पओंजळी उधळून श्रींसह पांडवांचं प्रचंड हर्षोत्फुल्ल स्वागत केलं.

तसे श्री यापूर्वीही एकदा हस्तिनापुरात गेले होते. मात्र ते पांडवांना तर्पणांजली वाहण्यासाठी, एका दुःखद प्रसंगी. आज ते, दादा, उद्धवभावजी, अमात्य आणि निवडक यादववीर यांच्यासह हस्तिनापुरात प्रवेशत होते, ते वेगळ्याच वातावरणात. आता त्यांच्या सोबत पाच पर्वतशिखरांसारखे प्रत्यक्ष पाच पांडवच होते.

पितामह भीष्म, महात्मा विदुर, अमात्य वृषवर्मा, मंत्री संजय यांच्यासह अलोट

गर्दीत पश्चिम महाद्वारावर लोटलेल्या कुरू स्त्री–पुरुषांनी यादव–पांडव वीरांचं स्वागत केलं होते. स्वागतासाठी आलेल्या या मंडळात मात्र महाराज धृतराष्ट्र, त्यांचे पुत्र, मामा शकुनी, कणक कुणीच आलं नव्हतं. विदुर आले होते, ते पांडव व श्रीप्रेमापोटी! समस्त हस्तिनापूर राज्याचा खरंतर एकच प्रतिनिधी तिथं उपस्थित होता. राजाज्ञा घेऊन आलेले अमात्य वृषवर्मा!

श्रींनी गरुडध्वज रथातून हस्तिनापूरच्या भूमीवर पाय ठेवले. त्यांना सामोरे आले ते महाविक्रमी, उंच, धिप्पाड, रुंद वक्षावर भरगच्च शुभ्र थरथरती दाढी रुळणारे पितामह भीष्म. श्री त्यांना बघताच वंदन करण्यासाठी वाकू लागले, तोच डोळे पाणथरलेल्या भीष्मांनी त्यांना आपले पीळदार महाबाहू विस्तारत "वाऽसुऽदेवाऽ, किती दिवसांनी ही भेट! तुझ्या चरणांनी तरी या कुरूंच्या राजनगर हस्तिनापुरात सुखशांती येवो! सर्वांना तूच आता योग्य मार्गदर्शन कर अच्युता! मी थकलो, " म्हणत दृढालिंगनात घेतलं.

साक्षात गंगापुत्र, परशुरामशिष्य, रक्ताधिकारानं अंतिम एकमेव कुरू असलेल्या पितामहांच्या मुखातून श्रींना 'वासुदेवा' असं संबोधन ऐकताच, ते प्रथम जाणवलं ते उद्धवभावजींना! त्यांनी सरसावून पुढे होत पितामहांची चरणधूळ मस्तकी घेत म्हटलं, "मी याच क्षणाची वाट बघत होतो पितामह. आज तो क्षण आला. आम्हा यादवांसाठी परमश्रेष्ठ 'वासुदेव' या मौलिक उपाधीचा आपल्या तोंडून त्याच्यासाठी उच्चार झाला. आम्ही धन्य झालो!"

मग अंत:प्रेरणेनेच कधी नव्हे ते सात्त्विक, गौर, गोल चर्येच्या उद्धवभावजींनी आपली पीळदार मूठ अवकाशात उंचावून प्रेरणाघोष उठविला. सर्वच उपस्थितांनी हस्तिनापूरच्या पावन भूमीवर त्याला प्रतिसाद दिला – 'यादवश्रेष्ठ, द्वारकाधीश, वसुदेवपुत्र 'वासुदेव' महाराऽज... जयतु... जयतु!! कुरुश्रेष्ठ, गंगापुत्र पितामऽह भीऽष्म – जयतु... जयतु!' याच जयनादाच्या घोषात मग हस्तिनापूरकरांनी उधळलेल्या पुष्पवर्षावांत भीष्म, विदुर, संजय व पांडवांसह श्री कुरूंच्या राजवास्तूकडे पायीच चालले. तसं मोजकं बोलणाऱ्या बलरामदादांनी पुष्पपाकळ्या अंगावर झेलत श्रींना हसत ऐकविलं, "धाकल्या, हे फारच मोठं कार्य झालं. तुला प्रत्यक्ष पितामहांनी 'वासुदेव' संबोधलं. याचा सर्वाधिक आनंद होईल तो वसुदेवबाबांना व आपल्या दोन्ही मातांना. तू झालास वासुदेव – मी कोण?"

"मी वासुदेव वा कोणीही झालो तरी माझ्या दादा, तुझ्या बंधुप्रेमाचं 'छत्र' माझ्यावर सततच राहो. आता मात्र माझ्यापासून दूर कधीच आणि कुठंही सळसळत पळून जाऊ नकोस!" श्रींनी दादांना भावगुंथा घातला.

"मी जाईन खूप दूर पळून, पण तू बरा मला तसा सोडशील! गोकुळातलं तुझं 'मोहन' नाव मागे पडलं असलं, आता वासुदेव असलास, तरीही सर्वांना आकर्षून घेण्याची तुझी कला अजूनही तशीच आहे, हे मी चांगला जाणून आहे." दादा म्हणाले.

"मला 'वासुदेव' उपाधी मिळली. तू मला काय मिळालं म्हणून विचारतोस, त्याचं उत्तर मी द्वारकेत रेवतीवहिनींकडे देईन. मला स्मरण कर."

"तुला – जगाच्या वासुदेवाला – वडीलकीच्या नात्यानं मी काहीही ऐकवू शकतो. तिथं रेवतीजवळ मात्र माझी काही मात्रा चालत नाही!" असं म्हणून हस्तिनापूरच्या राजमार्गावरही मान मागे टाकून खांद्यावरची गदा गदागदा हलवत दादा खळाळ हसले.

यादव आणि पांडवांचं राजमंडळ महामंत्री विदुरांच्या निवासी उतरलं. श्रींनी अमात्य विपृथूंकरवी महाराज धृतराष्ट्रांना क्षेमकुशल विचारून निरोप धाडला – 'पांडुपुत्र मातेसह आपल्या राज्याच्या न्याय्य मागणीसाठी आले आहेत. कुरूंची राजसभा बोलावून त्यांचं म्हणणं ऐकून घ्यावं. दीर्घकाल टिकेल, असं कोणतंही वितुष्ट कुरूंच्या रक्तनात्यात न ठेवता योग्य निवाडा करावा.'

महाराजांनी आपल्या अमात्य वृषवर्मांकरवी परतीचा संदेश दिला. तोही राजकीय

चातुर्यानं भरलेला होता. त्यात श्रींना पितामहांसारखं 'वासुदेव' संबोधून, वसुदेवबाबा व देवकीमाता आणि यादवांचं राजमंडळ यांचं क्षेमकुशल विचारलं होतं. स्वागतासाठी आपण हस्तिनापूरच्या पश्चिम महाद्वारावर केवळ 'अंधत्वामुळे' आलो नाही, असं कारण दिलं होतं. आपल्या जागी अमात्य वृषवर्मा धाडल्याचं चतुर समर्थन केलं होतं. दुर्योधन, शकुनीचा निर्देशच नव्हता. उदईक कुरूंच्या राज्यसभेत पुतणे नव्हे, पुत्रच मानलेल्या पांडवांच्या अधिकाराचा योग्य न्यायनिवाडा करू, असं मानभावी आश्वासन होतं. श्रींनी तो संदेश हसत ऐकला होता.

त्या रात्री हस्तिनापूरच्या प्राचीन आभाळानं दोन गोटांतील दोन भिन्नभिन्न चर्चा निर्लेप, स्थितप्रज्ञ कानामनानं ऐकल्या. त्यातील एक गोट होता, प्रत्यक्ष हस्तिनापुराधिपती महाराज धृतराष्ट्र यांचा. त्यांच्या परामर्श कक्षातील करंजतेलाच्या ढणढणत्या टेंभ्यात ही राजकीय चर्चा चांगली मध्यरात्रीपर्यंत चालली होती. उपस्थित होते शकुनी आणि त्याचे निवडक बंधू, कणक आणि त्याचे सेवक, दुर्योधन आणि त्यांचे शंभरातले दुःशासनासह निवडकच दहा बंधू. अमात्य वृषवर्मा, कुरूंच्या राज्याशी महत्त्वाचं दायित्व असलेले पितामह भीष्म यात नव्हते. महामंत्री विदुरांकडे श्री आणि पांडव उतरल्यामुळे तेही नव्हते. दुर्योधनाचा परम स्नेही असूनही 'सूतपुत्र' असल्यामुळे विश्वासार्ह नसलेला अंगराज कर्णही नव्हता. त्याच कारणासाठी संजयही नव्हते.

मध्यरात्री एकदाचा या राजकीय खलाचा निष्कर्ष निघाला. पांडवांना त्यांचा राज्यभाग म्हणून खांडवप्रस्थाचा आणि खांडववनाचा घनदाट अरण्याचा हिंस्त्र पशूंनी भरलेला, ओसाड प्रदेश स्वीकारायला भाग पाडण्याचा. राजनगर हस्तिनापुराशी त्यांचा कसलाही संबंधच येणार नाही, अशी काटेकोर दक्षता घेण्याचा.

राजनीतीत शकुनीला तोडीस तोड असलेल्या कणकांनी ती कल्पना उचलून धरली. ते म्हणाले, "खांडववन एवढं घनदाट आहे की, त्याच्या भूमीपर्यंत सूर्यकिरण पोहोचविणं हेच एक मोठं महायुद्ध ठरेल! पांडव ते खेळताना हिंस्त्र श्वापदांच्या भक्षयस्थानी पडतील. त्यातूनही तगलेच तर खांडववनातील नाग, असुर, दानव, निषाध, व्याध, बर्बर, अशा वन्य जमाती त्यांचा परस्पर निकाल लावतील."

इकडे विदुरांच्या निवासी श्रींच्या नेतृत्वाखाली बसलेल्या बैठकीत हस्तिनापूर राज्याचा पांडवांचा राज्यभाग हाच विषय चर्चेचा होता. त्यात महामंत्री विदुर, बलरामदादा, उद्धवभावजी, सात्यकी, अमात्य विपृथू असे प्रमुख होते. आणि विशेष म्हणजे पांडवमाता कुंतीदेवीही पाच पुत्रांसह होत्या. नव्हती एकटी द्रौपदी. ती विदुरपत्नी पारसवीसह अंतःपुरी कक्षात कौटुंबिक चर्चेत होती. चर्चेतील अमात्य विपृथू हस्तिनापूर राज्यातून वाहणाऱ्या गंगेचीच सीमा धरून पूर्वेकडे कौरव आणि पश्चिमेकडे पांडव अशा राज्यभागाच्या मागणीचा आग्रह धरीत होते. यादव सेनापती सात्यकी त्यांना पांचालांचं आप्तराज्य पूर्वेकडे असल्यामुळे पूर्वेकडे पांडव व पश्चिमेकडे कौरव अशी विभागणी सुचवू बघत होते. बैठकीत श्री असल्यामुळे पाचही पांडव काहीच बोलत नव्हते. ते आलटून–पालटून श्रींकडे नुसतं बघत होते. केवल श्रवणभक्ती करीत होते.

शेवटी मध्यरात्रीच्या ठोक्यावर उजव्या हाताशी बसलेल्या अर्जुनाच्या खांद्यावर हळुवार थोपटत, बैठकीतून उठताना ते म्हणाले, "तुम्ही चर्चा करत आहात, कयास बांधता आहात तसं उद्या कुरूंच्या राजसभेत काहीही घडणार नाऽही! जो काही अंतिम निवाडा करायचा असेल, तो शेवटचे ज्येष्ठ कुरू पितामह भीष्मच करतील. मी त्यांच्या

प्रस्तावाला संमती देणार आहे. देऊ काय? तुम्हा सर्व बंधूंचं मत काय? विचारपूर्वक सांगा." श्रींनी ज्येष्ठ पांडव युधिष्ठिरावर आपले मत्स्यनेत्र रोखले.

"तू म्हणशील तसं वासुदेवा. पण कुंतीमातेचं यात काय मत आहे ते विचारावं, असं मला वाटतं." युधिष्ठिरानं त्याला साजेसा प्रतिसाद दिला.

"तिच्या मताची तुम्ही कुणीच चिंता करू नये. ती मी म्हणेन त्यालाच होकार देईल. काय आत्याबाई, तुमचा निर्णय काय?" श्रींनी आत्याबाईंना स्पष्टच विचारलं. त्याही अर्जुनासारख्या श्रींच्या किरीटातल्या मोरपिसाकडे बघून हसतच म्हणाल्या, "तू म्हणशील आणि करशील तसं आणि तसंच होईल वासुदेवा!"

"तुम्हा सर्व बंधूंचा निर्णय सांग युधिष्ठिरा, " श्रींनी मूळ विषय काही सोडला नाही. तसं 'आमच्या वतीनं बोलण्याचा प्रारंभ करतानाच तू वाहती गंगा सीमा धरून विभागणी मागावी' भीमानं नेहमीच्या निडर बोलीत मध्येच मत मांडलं.

श्रींनी अर्जुनाकडे बघितलं. त्यानं काहीही न बोलता वाकून श्रीचरणांची धूळ मस्तकी घेतली. पांडवांची श्री नेतृत्वाखालील विदुरनिवासाच्या परामर्श कक्षातील पहिलीच राजबैठक संपली होती. निर्णय श्रींवर सोपवून.

दुसऱ्या दिवशी हस्तिनापुरात कुरूंची राजसभा भरली. आजचा प्रमुख विषय होता हस्तिनापूर राज्याचं कौरव–पांडवांत रीतसर विभाजन हा. पांडवांसह श्री हस्तिनापुरात आलेत. ते राजसभागृहात उपस्थित राहणार, ही वार्ता वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली होती. त्यामुळे हस्तिनापूरकर स्त्री–पुरुष झुंडीझुंडींनी अलोट गर्दीत कुरूंच्या सभागृहात एकवटले. सद्गुणी पांडवांचं व त्यांच्या धैर्यशील मातेचं श्रींसह प्रत्यक्ष दर्शन घ्यायला ते सर्व उत्सुक झाले होते. फार वर्षांनी कुरुंचं सभागृह आज खचाखच भरलं होतं.

अमात्य वृषवर्मांनी प्रथेचा राजदंडी ठेका देताच शांतताच शांतता पसरली. सभेच्या कामकाजाला सुरुवात झाली. सिंहासनावर बसलेल्या महाराज धृतराष्ट्र व महाराणी गांधारीदेवी यांच्या वतीनं महामंत्री विदुरांनी प्रथम श्रींसह पांडवांचं, त्यांच्या मातेचं व मग सर्वांचं स्वागत केलं. सभेचं प्रयोजन मोजक्या शब्दांत सांगितलं. त्यात आपल्या प्रिय बंधू पांडूंच्या विक्रमाचं सर्वांना तीव्र व चित्रवत स्मरण करून दिलं. हस्तिनापूर राज्यासमोर उभ्या ठाकलेल्या बिकट समस्येची जाण सर्वांना करून दिली. शेवटी ते म्हणाले, "कुरू राज्याचे एकमेव व ज्येष्ठ अधिकारी असलेल्या पितामह भीष्मांनी यावरचा अंतिम व योग्य निर्णय सभागृहाला सांगावा. तो सर्वांनी शिरसावंद्यच मानावा, " विदुरांनी अनुभवी महामंत्र्याचं दायित्व पार पाडलं.

सभागृहात आज सिंहासनाच्या उजव्या हातीच्या बैठकांवर सर्वप्रथम पितामह भीष्म, दुर्योधन, अंगराज कर्ण, दु:शासन व त्याचे पाच बंधू, मामा शकुनी व त्यांचे निवडक दोन बंधू, कणक, कर्णबंधू शोण, नंतर उरलेले कौरव, शकुनीबंधू व वेगवेगळे विभागप्रमुख बसले होते.

मुख्य सिंहासनाच्या डाव्या हाताला आचार्य कृप, गुरुवर्य द्रोण, महामंत्री विदुर, मंत्री संजय, अमात्य वृषवर्मा असे राजमंडळाचे अधिकारी पुरुष बसले होते. त्यानंतरच्या आसनांवर प्रथम बलरामदादा, मग श्री व उद्धवभावजी, युधिष्ठिर, भीम, अर्जुन असे सर्व पांडव बसले होते. त्यांच्यानंतर सात्यकी, विपृथू असे यादववीर बसले होते. त्यानंतर पांडवांना पाठबळ देण्यासाठी आलेले पांचालांचे अमात्य व सेनापती बसले होते. पांडवमाता कुंतीदेवी व पांडवपत्नी द्रौपदी राजस्त्रियांच्या राखीव कक्षात इतर

कुरुस्त्रियांसमवेत बसल्या होत्या.

साक्षात धनुर्वेद बोलावा तसे संपूर्ण सभागृहात ज्येष्ठ असलेले पितामह बोलले. हिमगंगेसारखी त्यांची वाणी आतबाहेर शुभ्र, सत्त्वशील, ओघवती व भारदस्त होती. कुरूंच्या हिताचं तपन्तपं चिंतन केल्यामुळे ती समुद्रगाजेसारखी धीरगंभीर झाली होती. ऐकणाऱ्याला आत्मलक्षी होऊन विचार करायला भाग पाडणारी होती. दृढ वाणीत ते म्हणाले, "कुरूंच्या या प्राचीन राजसभेत आज प्रथमच यादवश्रेष्ठ वसुदेवपुत्र वासुदेव, द्वारकाधीश–श्रीकृष्ण, ज्येष्ठ बंधू बलराम व कनिष्ठ बंधू उद्धवासह उपस्थित आहे. मला हा आम्हा सर्व चांद्रवंशीय कुरूंचा गौरवी भाग्यक्षणच वाटतो. मी त्यांचं सहर्ष स्वागत करतो.

"मागच्या हस्तिनापूरभेटीत तो काही राजसभेत आला नव्हता. त्या वेळी त्यानं माझे आशीर्वादही मागितले होते. मी ते जाणीवपूर्वक दिलेले नव्हते. कालही दिलेले नाहीत. मी त्याच्यापेक्षा वयानं ज्येष्ठ आहे, हे सत्य आहे. पण केवळ वयाची ज्येष्ठता म्हणजे जीवनाची श्रेष्ठता कधीच नसते! इतर कुठल्याही अधिकारानं मी तसा त्याच्याहून मुळीच ज्येष्ठ नाही.

"मी त्याला काय मानतो, हे तो दूरदेशी द्वारकेत राहूनही मनोमन चांगलंच जाणतो. म्हणून त्याचंच स्मरण करून, तळहातावरच्या फोडासारखं जपलेल्या या हस्तिनापूर राज्याबद्दल या महत्त्वाच्या जीवनवकणावर मी काही मनःपूर्वक बोलणार आहे. सर्वांनी ते शांतपणे ऐकावं.

"सर्वप्रथम खूप सोसलेले पांडव जिवंत आहेत, याचा मला परमानंद झालाय. त्यांच्या तर्पणविधीमुळे आलेले सर्व दोष मी विधियुक्त निवारून टाकणार आहे. या क्षणी त्यांचा पिता सम्राट पांडू याच्या असंख्यात सुखद स्मृतींनी माझा मनःकोष काठोकाठ भरून आला आहे. विक्रमी, दिग्विजयी सम्राट पांडूनं कुरूंची कीर्ती दिगंतात पोहोचविली. आपल्या दिवंगत पित्याच्या राजनगरात आज पांडव आपल्या मातेसह पुन्हा परतलेत. मी त्यांचं मनःपूर्वक आशीर्वादानं स्वागत करतो.

"सर्व पांडवांनी आणि सर्व कौरवांनी दृढ मनानं एकत्र यावं. तसं झालं तर ऐंशीएक क्षत्रियांना कारागृहात कोंडणाऱ्या, सम्राट म्हणविणाऱ्या सत्ताउन्मत्त जरासंधाला यादवश्रेष्ठ श्रीकृष्णाच्या सहकार्यानं व मार्गदर्शनानं कुरू योग्य धडा शिकवू शकतील. युधिष्ठिराचं संयमी नेतृत्व मानलं, श्रीकृष्णाचा त्रिकाल उपयुक्त परामर्श व त्याच्या द्वारका जनपदाचा सहयोग घेतला, तर माझे ते एकशे पाच कुरूच स्वतःच गौरवी सम्राटपदाला पोहोचतील, यात मला कसलाच संदेह वाटत नाही.

"या राज्याच्या अभिषिक्त राजा पांडूचे पराक्रमी पुत्र आता परत आले आहेत. ज्येष्ठ पांडव युधिष्ठिर आपल्या अभिषिक्त पित्याचा न्याय्या उत्तराधिकारी आहे. पांडूच्या पश्चात राज्यभार सांभाळण्यासाठी विश्वस्त म्हणून स्वाधीन केलेलं हस्तिनापूरचं हे राज्य राजा धृतराष्ट्रानं सन्मानपूर्वक आता युधिष्ठिराच्या हाती परत सोपवावं.

"उर्वरित सर्व पांडवांनी व सर्व कौरवांनी 'कुरू' म्हणून त्याच्या नेतृत्वाखाली हस्तिनापूर राज्याची कीर्तिपताका अखंड फडफडती ठेवावी. शेवटचा ज्येष्ठ कुरू म्हणून माझा हा अंतिम व निष्पक्ष निर्णय आहे. राजा म्हणून युधिष्ठिरानं ज्येष्ठ कौरव दुर्योधनाची प्रमुख सेनापतीपदी नियुक्ती करून उभयतांनी विक्रमाचे नवे मानदंड

भविष्यात स्थापित करावेत.”
न्याय व सत्यप्रिय पितामह भीष्मांचा तो स्पष्ट निर्णय ऐकून उभी कुरुसभा चिडिचूप झाली! त्यांनी कसला म्हणून संदेहच मागे ठेवला नव्हता. त्यांचा निर्णय निर्विवाद ऐकताच सिंहासनावरचे महाराज धृतराष्ट्र अवाकच झाले. सिंहासनाच्या दुहातीच्या सिंहमुद्रा मुठीत करकचून आवळत क्षणैक जागीच असह्य तळमळले. स्वत:शी बोलल्यासारखे अफुट पुटपुटले – ‘म्हणजे – मी – या – या सिंहासनावरून खाली – खाली उतरावं?’ त्यांची तळमळ बघून त्यांचे अफुट उद्‌गार ऐकून ज्येष्ठ कौरव दुर्योधन मात्र आपल्या आसनावरून ताडकन उठूनच उभा राहिला. गदेच्या ठणकारत्या बोलीसारखा म्हणाला, “महाराजांच्या आजवरच्या सिंहासनाच्या सेवेचा पितामहांना विसर पडलेला दिसतो. ते जिवंत आहेत तोपर्यंत युवराजपदाचा प्रश्नच येत नाही. तसं अघोषित युवराजपद कौरवांकडे – त्यांच्यातील ज्येष्ठाकडे – म्हणजे माझ्याकडे केव्हापासून आहेच. पांडवांनी फार तर आपला राज्यभाग मागावा. महाराज द्यायला तयार असतील, तर ते देतील तो पांडवांनी निमूट स्वीकारावा.”
आपल्या भाच्याची पाठपुरवणी सदैव डोळ्यांत तेल घालून करणारा सुबलपुत्र शकुनी मध्येच उभा राहिला. नेहमीच्या छद्‌मी, बोचऱ्या, कुटिल भाषेत म्हणाला, “पितामह महाराजांना आज अप्रत्यक्ष वानप्रस्थाचाच सल्ला देत आहेत! खरंतर त्यांच्या प्रिय पांडवांचाच जन्म वनात झाला आहे. वनं त्यांनाच प्राणप्रिय आहेत. म्हणून माझा कुरुमंडळाला उचित परामर्श आहे की, द्यायचाच झाला पांडवांना हस्तिनापूर राज्याचा राज्यभाग, तर तो खांडववनाचाच द्यावा! जोपर्यंत विश्वस्त महाराज जिवंत आहेत तोपर्यंत नव्या राजा–युवराजाचा प्रश्नच येत नाही!”
“शकुनी, इथं कुणीही तुझा परामर्श विचारलेला नाही. द्यायचा असेल तो निर्णय राजा धृतराष्ट्रानं द्यावा.” पितामहांनी शकुनीला थोपविण्याचा निर्वाणीचा यत्न केला. आता सभागृहात कुजबुज सुरू झाली. कितीतरी वेळ ती खदखदली. उठून ठणकावत ती कुजबुज बंद करत दुर्योधन म्हणाला, “पांडवांचा कुरूंच्या या सिंहासनाशी कसलाही संबंध पोहोचत नाही! ते कौंतेय असतील, माद्रेय असतील. पण आमच्या काका पांडूंचे पुत्र ‘पांडव’ मुळीच नाहीत! आमचे काका महाराज पांडूंनी हस्तिनापूर का सोडलं होतं, ते समस्त पौरजन जाणतात. पितामहांनी पांडवांचा एवढा कैवार घेऊ नये. पांडवांसाठी राज्याचा पूर्ण किंवा अर्धा भाग मुळीच मागू नये. ही कुरुसभा देईल, तो राज्यभाग पांडवांनी निमूट स्वीकारावा.”
श्रींच्या आता पुरतं लक्षात आलं की, दुर्योधन पांडवांच्या नियोग पद्धतीच्या जन्मासंबंधी कुठल्या गूढ अरण्यात चालला आहे ते. आजपर्यंत त्यांनी मथुरेच्या शूरसेन राज्याचा, करवीर राज्याचा, प्राग्ज्योतिषपूरचा अशा कित्येक राज्यांचा निवाडा सुयोग्य रीतीनं केला होता. कुरूंच्या राज्याचा हा तिढा मात्र तसा अवघडच होता. दुर्योधन पांडवजन्माचं अकांडतांडव करून त्यांना पूज्य पित्याच्या पांडूच्या न्याय्य राज्यभागापासून समूळ वंचित करणार अशी लक्षणे दिसू लागली. तसं काही एका निर्धारानं आता मात्र श्री आपल्या आसनावरून उठले. तशी कुरुसभा क्षणैक चिडिचाप स्तब्धच झाली. सर्व सभासदांना ‘श्रीवाणी’ म्हणजे काय सामर्थ्य आहे, हे ऐकून पूर्ण माहीत होतं. शकुनी, दुर्योधनासह सारे कौरव मनोमन धास्तावले. त्यांना वाटून गेलं की, आपलं वाक्चातुर्य आणि भाषणगारूड यांनी श्री आता महाराज धृतराष्ट्रांना हां–हां

म्हणता गुंडाळणार! पण घडलं भलतंच. अत्यंत शांत व संथ वाणीत श्री म्हणाले, “प्रिय कुरुजनहो! मला पितामहांचे हस्तिनापूर राज्याबाबतचे निर्दोष विचार पटले. मात्र ते म्हणतात तसं घडेलच, असं नाही. दुर्योधनाचं वक्तव्य ऐकताना मला कळून चुकलं आहे की, कौरव व पांडव ही दिवस–रात्रीसारखी कधीच एकत्र न येणारी शक्यता आहे.

“मामा शकुनींनी पांडवांतील गुणवत्ता अचूक जाणली आहे. त्यांना वनं फारच प्रिय आहेत, हे सत्य आहे. मलाही तशी ती प्रियच आहेत. माझा पांडवांच्या अशरण कर्तृत्वावर दृढ विश्वास आहे. कुरू महाराज धृतराष्ट्र, सर्व कौरव, मामा शकुनी, त्यांचे सर्व बंधू आणि थोर पितामह भीष्मांसह सर्व उपस्थित सभासदांना पांडवांच्या वतीनं अधिकारी म्हणून मी घोषित करतो की, आपल्या पित्याचा राज्यभाग म्हणून महाराज धृतराष्ट्र उदार मनानं देत असलेला खांडववनाचा भाग पांडवांना मान्य आहे!”

श्रींच्या पांडवांनाही अनपेक्षित असलेल्या निर्णयावर पितामह भीष्मांसह कुरुसभा चकित झाली. त्या खचाखच भरलेल्या सभागारात एकच व्यक्ती अशी होती की, जी मुळीच चपापली नाही – अस्थिर झाली नाही. तीही होती एक स्त्री! आमच्या आत्याबाई पांडवमाता कुंतीदेवी! आदल्या रात्रीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणं पांडवांनी आपले सर्वाधिकार श्रींना दिले होते. तरीही भीमसेन कुरकुरलाच. त्याच्या सांत्वनासाठी पांडवांत थोडी कुजबुज माजली. ती वाढू न देण्यासाठी कुरूंचे राजकुशल अमात्य वृषवर्मा हातचा राजदंड उचलून त्याचा बळकट ठोका देत म्हणाले, “पांडवश्रेष्ठ युधिष्ठिर, खांडववनाचा राज्यभाग मान्य आहे तुम्हाला? पश्चात कसलीही कुरकुर चालणार नाही.”

श्रींच्या मानेच्या संकेतानं युधिष्ठिरानं शांत उभा राहत, “कुरूंचे महाराज देत असलेल्या माझ्या पित्याचा अधिकाराचा राज्यभाग – मला मान्य आहे! पितामहांना आणि माझे पूज्य पिता सम्राट पांडू व वंदनीय महाराज, महाराणी यांच्यासह महाराज हस्तींपासून सर्व स्वर्गीय कुरू नृपश्रेष्ठांना, कुंतीमातेसह बंधुवर्य श्रीकृष्ण–बलरामांना वंदन करून मी खांडववनाचा नम्रपणानं स्वीकार करीत आहे.” अशा शब्दांत सभागृहाला त्यानं आपला निर्णय घोषित केला. अत्यंत सालसपणे तो पुढे म्हणाला, “आम्हाला सर्वांनी केवळ कोटीमोलाचे आशीर्वाद द्यावेत. हस्तिनापूरकरांनी विश्वास ठेवावा – सम्राट पांडू महाराजांचं स्मरण करून द्वारकाधिपती वासुदेव श्रीकृष्णाच्या व कुंतीमातेच्या आशीर्वादानं आम्ही खांडववनात मंगल उभवू. नवं राज्य नांदतं करून दाखवू.”

‘साधुऽ साधु, स्वर्गीय सम्राट पांडू महाराऽज – जयतुऽ जयतुऽ! द्वारकाधिपती श्रीकृष्ण महाराऽज – जयतुऽ जयतुऽ! ज्येष्ठ पांडव युधिष्ठिरऽ जयतुऽ जयतुऽ!’ कुरूंची ही सभा नक्कीच अटीतटीवर पडणार असा कित्येकांचा ठाम कयास होता. मात्र महत्त्वाची ही सभा श्रींनी सर्वांनाच धक्का देत पांडवांच्या वतीनं खांडववन स्वीकारून सुभगपणे संपविली होती. हस्तिनापूरच्या कुरूंच्या या विशेष सभेचा वृत्तान्त उद्धवभावजींनी आपल्या रसाळ वाणीत माझ्यासमोर खडान्खडा उभा केला.

हस्तिनापूरच्या या भेटीत आपले परमभक्त महात्मा विदुर व मंत्री संजय यांच्याकडे एक–दोन दिवस वास्तव्य करून श्रींनी त्यांचा पाहुणचार सहर्ष स्वीकारला. विदुरांकडील एका भोजनासाठी पितामह हस्तिनापूर नगराबाहेर सीमेवरच्या त्यांच्या निवासीही आले. महात्मा विदुर – महाराज धृतराष्ट्र व सम्राट पांडू यांचे बंधू असले तरी दासीपुत्र होते.

साध्या राहणीचे व निरिच्छ होते. कुरूंच्या राजमंडळातील मंत्री असूनही ते पत्नी पारसवी व कुटुंबासह हस्तिनापूरच्या निर्जन सीमेवरच्या एका साध्या निवासात राहत असत. कुरूंचे मंत्री म्हणून, महात्मा म्हणून ते हस्तिनापूर आणि भोवतीच्या राज्यात जेवढे विख्यात होते, त्याहून अधिक 'श्रींचे परमभक्त' म्हणून सर्वत्र ख्यात होते. त्यांची व श्रींची प्रथम भेट कुठं झाली, ते मात्र कुणालाच माहीत नव्हतं; मलाही. मात्र जसं उद्धवभावजींना, दारुकाला, अर्जुनाला श्रींनी पहिल्याच भेटीत वक्षाशी बिलगतं घेत दृढ आलिंगनात घेतलं होतं. तसंच या विदुरांनाही घेतलं होतं.

हस्तिनापुरातील धृतराष्ट्रांचे विशेष मंत्री संजयही असेच श्रीभक्त होते. धृतराष्ट्रांच्या खास सारथी–पथकाचे ते प्रमुख होते. तेही प्रेमळ स्वभावाचे व चतुरस्र होते. कौंडिण्यपूरच्या माझ्या आकृतिकाकांकडे जशी दुर्मीळ गारूडविद्या होती, तशी या कुरुमंत्री संजयांकडेही एक दुर्मीळ विद्या होती. 'दूरदर्शविद्या!' बसल्या जागी डोळे मिटून ते ध्यानस्थित होत. त्यांच्या समाधिमग्न जागत्या डोळ्यांसमोर, ते मनात आणतील त्या शेकडो योजनांवरच्या घटनांचं व स्थलांचं चित्र जसंच्या तसं उभं राही! अंतश्चक्षूंसमोर दिसणारं दृश्य ते इतरांसमोर खडान्‌खडा उभं करू शकत होते.

हस्तिनापुरानंतर श्री पांडवांसह त्यांना राज्यभाग म्हणून मिळालेल्या खांडववनात त्याची पाहणी करण्यासाठी उतरले. इथं छोटंसं एक ग्राम होतं – 'इंद्रप्रस्थ' नावाचं. त्याच्या सीमेवर श्रींनी पांडवांना एक प्रशस्त बळकट पर्णकुटी बांधून दिली. हस्तिनापूर सोडतानाच विदुर, संजय यांच्या मदतीनं काही उपलेपक, काष्ठकार, लोहकार, स्थापत्यविशारद हळूहळू पांडवांना मिळतील याची व्यवस्थाही श्रींनीच केली होती. विख्यात स्थापत्यशास्त्रज्ञ मयासुर, त्याचे साहायक ताराक्ष, कमलाक्ष, विद्युन्माली यांना व त्वष्ट्र या अजोड स्थापत्यविशारदाला तातडीचे विशेष दूत धाडून खांडववनात सत्वर उपस्थित होण्याचे आदेश दिले होते. त्यांच्या गाठीशी द्वारकानिर्माणाचा पुर्वानुभव होताच.

खांडववनाच्या घनदाट राईतून वाहणाऱ्या यमुनानदीवर या काळात श्री नित्याचं स्नान व अर्घ्यदान या विधींसाठी जात असत. अशाच एका सुप्रभाती ते उद्धवभावजी व मोजकेच यादव यांच्यासह संथ वाहणाऱ्या यमुनातीरावरच्या पाषाणी घाटावर आले. वेळ दिवसफुटीची होती. श्रींना समोर यमुनापात्रात एक स्त्री दिसली. पाठमोरी, कमरभर पाण्यात ती डोळे मिटून शांत उभी होती. शिल्पासारखी! काळाभोर दाट केशसंभार तिनं पांढऱ्याशुभ्र कुंदफुलांच्या मालेनं करकचून आवळून डुईवरच संभाळून घेतला होता. अंगावर पांढरं अंशुक आणि तशीच कंचुकी होती. तिचं अर्घ्यदान, नमन, वंदन झालं होतं. आता ती डोळे मिटून ध्यानस्थ होती. तिच्या पाण्याबाहेरच्या केतकगौर, कमनीय कायेचं प्रतिबिंब यमुनाजलावर हलकेच हिंदकळत होतं. तिला बघताच श्री जागीच खिळून थांबले. सोबतच्या उद्धवभावजींना म्हणाले, "उधो – बंधो, ही कोण जलकन्या आहे? नीट माहिती तरी घे तिची!"

भावजी हसले. त्या अरण्यातही कुरूंनी बांधलेल्या पाषाणी घाटाच्या पायदंड्या हलकेच एक–एक उतरत यमुनेपर्यंत गेले. समोरच्या जलकन्येचा ध्यानभंग करण्याचं जिवावर येऊन संस्कारशील भावजी तिथंच थांबले. एवढ्यात कुठूनतरी लांबच लांब पंखांचा एक रानमयूर कर्कश केकारव करत आला. सोनरी, निळ्या, हिरव्या डोळ्यांचे लांबच लांब पंख फडफडवीत यमुनाकाठी अलगद उतरला. केकारला. चुरुचुरु पाणी पिऊ लागला. त्याच्या पंखांच्या फडफडाटानं जलकन्या ध्यानजागृत झाली. यमुना थरारली.

अर्घ्याची शेवटची ओंजळ सूर्यदेवांना देऊन मयुराकडे हसून बघत ती जलकन्या बाहेर पडली. काठाच्या पायदंडीवरचा मातीचा भरलेला जलकुंभ कटीवर घेऊन चालू लागली. तिच्या ओलेत्या पायांची सुकुमार पद्मकमळं घाटाच्या पाषाणांवर रांगेत उमटत चालली. तसं उद्धवभावजी पुढे झाले. नम्र अभिवादन करत तिला संस्कारशील यादवबोलीत म्हणाले, "क्षमा असावी देवी. आपण कोण? कुठल्या? रोजच इथं येता का? हे ध्यान आणि पूजन कुणाचं करता?"

प्रथम ती खांडववनातील जलकन्या क्षणैक दचकलीच. मग उद्धवभावजींची सत्त्वशाली चर्या व नम्र आविर्भाव बघून हसत म्हणाली, "मी कालिंदी. या खांडववनात राहते. कळतंय तेव्हापासून द्वारकेच्या कृष्णाची वाट बघतेय! त्याचंच ध्यान धरते! पूजन करते! जीवनच वाहिलंय मी त्याला! तुम्ही कोण?"

"मी – उद्धव. तुम्ही ज्याचं ध्यान धरता, पूजन करता तो माझा ज्येष्ठ बंधू – द्वारकेचा श्रीकृष्णच समक्ष इथं आला आहे! तो बघा!" भावजींनी पाषाणी घाटाच्या अगदी वरच्या पायदंडीवर असलेल्या श्रींकडे बोट केलं. जलकन्येची आणि जलपुरुषाची दृष्टिभेट झाली! श्री एक–एक करत पाषाणी पायदंड्या उतरले. कालिंदी आपल्या तपस्येच्या बळावर एक–एक करत जीवनाच्या पायदंड्या चढून वर आली!

पक्षीराज मयूर केकारव करत दूर उडून गेला. जाताना मोरपंखी भावकथा रेखून गेला!

श्रींच्या हस्तिनापूर भेटीनंतर मला शुद्धाक्ष महाद्वारावर जाऊन माझ्या सातव्या नि शेवटच्या भगिनीचं स्वागत करावं लागलं! तिला कवेत घेऊन थोपटताना मी नि:श्वास सोडले. कालिंदी आठवी श्रीपत्नी होती. श्रींनी तिच्याशी यमुनाकाठीच गांधर्व विवाह संपन्न केला होता. आम्हा सातही जणींहून ती वेगळीच होती. गर्गमुनींनी राणीवशाच्या बेटावर उठविलेला शेवटचा राणीकक्ष तिच्या आगमनानं आता भरला होता. ती होती क्षत्रियकन्या; पण दिसे, भासे, बोले ब्रह्मकन्येसारखी. आम्हा सात जणींत ती सहज एकरूप होऊन गेली.

आता द्वारकेचं नांदतं गोकूळ झालं होतं! पांडवांची भेट झाल्यापासून विशेषत: अर्जुनाशी मनमेळ झाल्यापासून मी हेरलं होतं की, श्रींच्या चित्तवृत्तीत फारच अंतर पडलं होतं, ते सदैव हसतमुखच दिसत. त्यांचं प्रत्येक कर्म उत्साहानं कसं शिगोशीग भरलेलं असे. उद्यानात सुगंधी वायू सहज संचारत असावा, तसे ते आम्हा आठही जणींच्या कक्षांत संचारत असत. इतर सात जणींना वाटत होतं की नाही, मला माहीत नाही; पण मला मात्र ते कुठल्याही कक्षात असले, तरी माझ्यात कक्षात असल्यासारखे सतत वाटत होते.

आता तर श्रींच्या बोलण्यात असा एकही क्षण जात नव्हता ज्यात पांडवांचा काही ना काही संदर्भ येत नव्हता. त्यांचं काही ना काही गुणगान होत नव्हतं. आत्याबाई कुंतीदेवींबद्दल तर ते भरभरून अपार आदरानं बोलत. भोजनोत्तर गप्पांच्या बैठकीत वसुदेवबाबा आणि थोरल्या आई असल्या की, त्यांची कळी फारच फुले. आत्याबाईंनी जीवनभर खूप सोसलं आणि त्याचा सल बाबांच्या मनी रुतलेला आहे, याची त्यांना फार जाण होती. त्यामुळेच कुंतीआत्यांचा तृतीय पुत्र अर्जुन कसा सर्वगुणसंपत्र आहे, ते श्री आपल्या मधाळ शैलीत नानाप्रकारे अथक सांगत. ओघात म्हणत, "तो अगदी थेट माझ्यासारखाच दिसतो; बोलतो; वागतो. पराक्रमात तर माझ्यापेक्षा कांकणभर सरसच

आहे तो. त्याचं नावच आहे अर्जुन! मिळेल ते ज्ञान अर्जन करणारा म्हणजे साठविणारा. त्याला नि मला एकत्र बघताना अनेक जण फसतात."

बोलताना श्री नकळतच त्याचा कधी धनंजय, कधी पार्थ, कधी कौंतेय, कधी गुडाकेश असा निर्देश करत. त्यांच्या तोंडून हे अर्जुनाख्यान ऐकताना मी भानच हरपून जाई. कधी–कधी श्रीच मला अर्जुनासारखे भासू लागत! स्वत:ला चिमटा काढून मी भानावर येई. मनी एक तीव्र उबळ येई, श्रींच्या या प्रिय धनंजयाला आता एकदातरी अवश्यच भेटलं पाहिजे.

अर्जुनाविषयी होतं त्याहून एक मात्राभर अधिक स्थान श्रींच्या मनात सखी द्रौपदीबद्दल होतं. ते तर सगळ्या बारकाव्यांसह केवळ मलाच काय ते माहीत होतं. तशी गोकुळातील राधा श्रींची सखीच होती. ही द्रौपदीही सखीच होती. मात्र दोन्ही सख्यांतही एक सूक्ष्म भेद होता. तोही मलाच काय तो माहीत होता. राधिका सूर्यग्रहणापूर्वीच्या बिंबिकेसारखी होती – दुग्धधवल. द्रौपदी सूर्यग्रहणानंतरच्या बिंबिकेसारखी होती – दहीधवल! राधा मोहक होती, भुईचंपकाच्या कळ्यासारखी सुगंधी. द्रौपदी होती ब्रह्मकमळाच्या मादक कळ्यासारखी. राधा होती मृगवर्षावानंतर आभाळभर इथून–तिथून चमकून जाणाऱ्या नि:शब्द विद्युल्लतेसारखी. द्रौपदी होती, भरीच्या मृगवर्षावात उभं आभाळ दणाणून सोडणाऱ्या कडाडत्या कडक सौदामिनीसारखी. दोघीही श्रींना सारख्याच प्रिय सख्या होत्या.

इतर पांडवांबद्दल श्री मोजक्याच शब्दांत, पण अचूक बोलत. म्हणत, "युधिष्ठिर अगदी सुयोग्य असा ज्येष्ठ पांडव आहे. इतर चारही पांडव गर्जत्या फेसाळत्या सागरांसारखे आहेत. युधिष्ठिराचा एकमेव संयत, विशाल मनाचा किनारा चौघांनाही घेऊन शांत उभा आहे. युधिष्ठिराला इतर सर्व पांडव फारच मानतात. भीमसेन म्हणजे तर प्रचंड सामर्थ्याचा प्रलयी महासागरच आहे. तो वरून गप्प, शांत असल्यासारखा दिसतो; पण आत सतत खदखदत असतो. विशालकाय देहाला साजेल अशीच त्याची भूक आणि निद्रा आहे. नकुल, सहदेव जुळे बंधू असले तरी दोघांच्या स्वभावात साम्य नाही. नकुल फारच सुंदर आहे, आपल्या प्रद्युम्नासारखा. नकुल, प्रद्युम्न यांच्यासारखा दिसतो आपला उद्धवही. मात्र स्वभावत: तो त्या दोघांपेक्षाही कितीतरी वेगळा आहे. आभाळात मस्तक खुपसून स्वस्थ झालेल्या उंचशील हिमशिखरासारखा! सहदेव अजोड असा अश्वपारखी आहे. अश्वासारखाच तरतरीत आणि सावध आहे.

"पांडव आहेत हाताच्या पाच बोटांसारखे. वेगवेगळ्या आकारांची, वेगवेगळ्या गुणांची सतत कार्यरत पाच बोटं. द्रौपदी या पाचही बोटांना एकत्र आणणारी आदिशक्तीसारखी दुर्मीळ स्त्री आहे. या सर्वांचा मेळ जमवून जी एक अरोधशक्ती तयार होते, ती म्हणजे कुंतीमाता!"

श्रींच्या मनाचे नानाविध धागे पांडवांच्या मनांशी गुंतले, तसं श्री चारित्रातील आगळ्याच पर्वाला आता प्रारंभ झाला. ते पर्व होतं – पांडवपर्व. आता श्रींनी एकमेव ध्यास घेतला होता, पांडवांचं वैभवशाली, नांदतं राजनगर इंद्रप्रस्थ उठविण्याचा. त्यांना अशा विधायक, निर्माणशील कर्मयोगाचा विलक्षण आनंद होता. आता द्वारकेत राहूनच ते इंद्रप्रस्थाच्या निर्माणावर लक्ष देऊ लागले.

श्रीसोपानावरच्या विश्रामकक्षात त्यांच्या मय आणि त्याचे साथीदार ताराक्ष,

कमलाक्ष, विद्युन्माली व मयपुत्र मायाविन, दुदुंभी, अजकर्ण व कालिक तसेच विश्वकर्मा, त्वष्ट्ट, गर्गमुनी यांच्यासह देशोदेशींच्या निष्णात व कुशल स्थापत्यविशारदांच्या अहोरात्र बैठका बसू लागल्या. द्वारकेचा अनुभव सर्वांच्या गाठीशी होताच. यादवांच्या गुप्तचर खात्याचे काटक अश्वसाद चौफेर पांगले. मिळेल त्या राज्यातून कुशल कारागीर उचलून इंद्रप्रस्थाच्या वाटेला लावू लागले. यादवांच्या अठरा कारखान्यांतील निष्णात कारागीर एका प्रचंड निर्माणावर पडले. नानाविध कारखान्यांतील अहोरात्र निर्माणाच्या आवाजांनी द्वारका पुन्हा निनादून उठली. तयार झालेल्या साग, शिसम, कटहलाच्या सुघड फळ्या, हप्ता–हप्ता चुन्याच्या घाणीच्या फेरे देऊन मळलेल्या चुनकळींच्या गोण्या, लोह, ताम्राचे घोटीव स्तंभ, राजवास्तू व मंदिरांचे ओतीव, सुवर्णी, रुपेरी कळस प्रचंड वृषभरथांत, हत्तीदलाच्या पृष्ठांवरून चढवून द्वारकेसह खांडववनाच्या वाटेला लावण्यात येऊ लागले. द्वारका ते खांडववन अशी वृषभरथांची, उष्ट्ररथांची, हत्तीदलाची ये–जा करणारी संतत रांगच रांग दिसू लागली.

अशातच खांडववनातून युधिष्ठिराचा संदेश घेऊन अश्वसाद द्वारकेत येऊन थडकला. पांडव खांडववनातील घनदाट अरण्य हटविण्यासाठी प्रयत्नांची शर्थ–शर्थ करीत होते. मात्र म्हणावं तसं यश काही त्यांना त्यात येत नव्हतं. ज्या गतीनं हे काम चाललं होतं, त्या गतीनं खांडववन स्वच्छ करण्यासाठी पुरतं एक तप लागणार होतं. काय करावं म्हणून हतबल झालेल्या त्या बंधूंच्या पंचकडीनं श्रीचं स्मरण केलं होतं. आता खांडववनाकडे पुन्हा जाणं श्रींना भाग होतं. पांडव हा श्रींचा आता नित्य जीवनातील श्वासच झाला होता. भावनिक मर्मबंधाचा भाग झाला होता. तसे श्री दंडकारण्यासाठी विशेष तयार केलेली काटक यादवांची कष्टाळू पथकं घेऊन खांडववनाकडे निघून गेले. या वेळी त्यांनी बलरामदादा, उद्धवभावजी यांपैकी कुणालाही संगती घेतलं नाही. घेतली ती तरुण प्रद्युम्न व त्याची युवा पथकं. अनुभवी सात्यकीही बरोबर होते. त्यांचं हे इंद्रप्रस्थनिर्मितीचं कार्य बराच काळ चाललं.

या काळात बरेच ऋतू आले–परतले. तिकडे यमुनाकाठी पांडवांचं राजनगर ‘इंद्रप्रस्थ’ उभरत होतं. इकडे द्वारकेत श्रींचा यादववंश फुलत होता. माझ्या पोटी आता श्रींची एकमेव कन्या चारुमती व पाठोपाठचे पुत्र चारुदेव, सुदेष्ण उपजले. चारुमती नावासारखीच अतिशय लावण्यवती व तेव्हा यादवकुळातील एकमेव श्रीकन्या असल्यानं श्रींसह सर्वांचीच अत्यंत लाडकी झाली होती. ती जास्वंदवर्णाची, गुब्बार गालाची आणि दाट कुरळ्या, कृष्णकेशांची होती. अपार कुतूहलानं ती उचलून घेणाऱ्या प्रत्येकाकडे टुकूटुकू बघत राही. प्रद्युम्नाची तर सर्वाधिक लाडकी भगिनी होती ती. माझी सुकुमार कन्या चारू माझ्या कक्षात फारशी दिसतच नसे. तिला माझ्या सातही भगिनींपैकी कुणी ना कुणी आपल्या वास्तूत उचलून नेलेलं असे. सत्या, भामा, कालिंदी जिकडे असेल, त्या वास्तूत तिचं दिवसभर खाणं, भरवणं परस्परच उरके. आपल्या भुजेवर घेऊन तिचा नाकशेंडा चिमटीत ओढत श्री कौतुकानं म्हणत, “आमच्या गोकुळातील एकेसारखीच आहेस की गं तू!”

सत्यभामेचीही कूस या काळात सुभानु, स्वर्भानु, प्रभानु अशा तीन श्रीपुत्रांना जन्म देऊन धन्य झाली होती. हे तीनही भामापुत्र मातेसारखे रसरशीत व भानू म्हणजे सूर्यासारखे तेजस्वी उपजले.

पंचनदकन्या भद्रा व लक्ष्मणा यांच्या राजवास्तूही पुत्रांच्या कलकलाटानं धन्य

झाल्या. भद्रेला संग्रामजित, बृहत्सेन व शूर असे तीन श्रीपुत्र प्राप्त झाले. 'शूर' हे त्यातील एकाचं नाव तर त्याच्या पणजोबांच्या वसुदेवबाबांचे पिता शूरसेन यांच्या नावावरूनच ठेवण्यात आलं. लक्ष्मणेला या काळात प्रघोष, गात्रवत व उर्ध्वग असे तीन श्रीपुत्र झाले. उर्ध्वग हे नाव उद्धवभावजींनीच ठेवलं. अरण्यकन्या जांबवतीलाही या काळात एक कन्या झाली. मात्र ती सुमित्र व पुरुजित या पुत्रांनंतर उपजली. तिचे पिता ऋक्षराज जांबवान हे परम शिवभक्त असल्यामुळे तिच्या प्रथम पुत्राचं नाव जसं सांब ठेवण्यात आलं होतं, तसं या कन्येचं गिरिजा ठेवण्यात आलं. कोसल देशीच्या नग्नजित राजांची कन्या सत्या हिला सर्व जण 'नाग्नजिती' असंही म्हणत. तिलाही य काळात तीन श्रीपुत्रांची प्राप्ती झाली. त्यांची नावं वीर, चंद्र, अश्वसेन अशी ठेवण्यात आली. द्वारकेनजीकच्या अवंती राज्यातील विंद व अनुविंद या बंधूंची भगिनी मित्रविंदा ही श्रींच्या तीन पुत्रांची अधिकारी माता झाली. प्रत्येक बाळंतपणात ती लगतच्या आपल्या अवंती राज्यात जाऊन आली. तिच्या तीनही पुत्रांची नावं अवतीकरांनीच ठेवली. वृक, हर्ष आणि अनिल अशी. खांडववनकन्या कालिंदीला या काळात झालेल्या तीनही पुत्रांची नावं तिनं स्वत: सांगितली तशीच ठेवण्यात आली. ती होती – श्रुत, पूर्णमास आणि दर्श अशी. तिचे हे तीनही पुत्र सुंदर, गुटगुटीत व मुख्यत: शांत व केतकगौर वर्णाचे होते.

या अर्ध्या तपातील द्वारकेच्या दोनही द्वीपांचं रूप होतं, चैत्रीपुनवेच्या चंद्रासारखं. श्री वृंदावनातल्या विशाल भांडीरवृक्षाचा बोलण्यात कधी–कधी निर्देश करीत. या काळातही द्वारका त्या वृक्षासारखीच लहानथोर यादव कुटुंबीयांच्या कलकलाटानं अहोरात्र फुलून जाई. या नांदत्या द्वारका महाजनपदाच्या दोन्ही द्वीपांवर सतत देशोदेशींचे ऋषी, मुनिवर, योगी व तापस येत. श्री व दादा, वसुदेवबाबा आणि थोरल्या व धाकट्या आई यांच्या साक्षीनं भरल्या सुधर्मा सभेत त्यांचा उचित असा गौरव करीत. त्यातीलही अनेकांना आदरानं द्वारकेतच ठेवून घेतलं जाई. असा द्वारकेचा डंका आता कसा सर्वदूर दुमदुमत होता.

अशातच एकदा माझे पुरोहित सुशील यांनी समोर उभं राहून नम्रपणे एक वार्ता माझ्यासमोर ठेवली. म्हणाले, "शुद्धाक्षावर कुणी एक सौराष्ट्रातील ब्राह्मण आला आहे. कृश आहे. दूरवरून आल्यामुळे दमला–भागला आहे. द्वारकाधीशांचीच भेट घ्यायचीय अशी आर्जवं करतो आहे. काय करायचं?"

द्वारकेची महाराणी म्हणून अशा वार्तांची आता मला सवयच झाली होती. मी पुरोहितांना म्हणाले, "त्यांना अभ्यागताच्या कक्षात ठेवून घ्या. काही हवं नको त्या आतिथ्याची नीट व्यवस्था बघा त्यांची. त्यांना सांगा – श्री द्वारकेत परतले की, भेट होईल त्यांची." सुशील वाकून वंदन करून आज्ञेच्या पूर्ततेसाठी निघून गेले.

काही दिवसांतच श्रींच्या आगमनाच्या अग्रवार्ता द्वारकेत येऊन थडकल्या. खांडववनातील पांडवांच्या राजनगर उभारणीचं महत्कार्य नीट पूर्ण करूनच श्री परतले होते. या वेळी मात्र ते कधी नव्हे, ते रात्रीचे नौकांतून द्वारकेत प्रवेशले. ते आले तेव्हा उभं राजनगर द्वारका निद्रिस्त होतं, श्रींनी त्यासाठीच अमात्यांना व शुद्धाक्षावर असलेल्या सर्व मंत्रिगणांना स्वागताचा कुठलाही उपचार न करता शांतता राखण्याची आज्ञा दिली होती. प्रत्यक्ष मलाही कळलं नाही की, श्री रात्री द्वारकेत केव्हा आलेत! त्यांच्या या आगमनानं मात्र मला त्यांच्या ठायीच्या एका आगळ्याच पैलूचं दर्शन

झालं. श्री 'निद्रा' मग ती माणसांची असो वा प्राणिमात्रांची – फार मोलाची मानत होते. ती भंगू नये म्हणून कटाक्षानं जपत होते. झोपेला ते 'निद्रायोग'च म्हणत. तिच्यावर त्यांचं नियंत्रण होतं. त्यांच्या प्रिय शिष्य अर्जुनाचंही होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळीच सर्व आन्हिकं आवरून श्रींसह मी नित्याच्या दानसत्राला बसले. माझ्या समवेत माझ्या सप्तभगिनी आपापल्या आसनांवर बसल्या होत्या. आग्रह धरून या सत्राच्या वेळी त्याही हव्यात, हे मी श्रींकडून केव्हाच करवून घेतलं होतं. त्यांनीही हसून त्याला संमतीच दिली होती.

खांडववनातील पांडवांच्या राजनगराचं काम मनासारखं मार्गी लागल्यामुळे श्री प्रसन्न दिसत होते. दानसत्राच्या सुवर्णी आसनावर बसताच सर्वप्रथम माझ्याकडे बघून ते राजस हसत म्हणाले, "रुक्मिणी, पांडवांचं राजनगर सुंदरच पूर्ण झालंय. प्रद्युम्नाच्या युवा यादव पथकांनी अग्नीच्या साहाय्यानं घनदाट खांडववन जवळ–जवळ स्वच्छ केलंय. हे इंद्रप्रस्थ द्वारकेहून काकणभर सरसच उठेल."

"खांडववन स्वच्छ करताना मला व अर्जुनाला वनराज वरुणाशी घनघोर युद्ध करावं लागलंय. 'आमचं वसतिस्थान असलेलं हे वन तुम्हा कुरु–यादवांना मुळीच जाळू देणार नाही' असं म्हणत वनराज वरुण आपल्या सेनेसह संतापानं आमच्यावर चालून आला. कितीतरी दिवस आमचं हे अटीतटीचं युद्ध चाललं. शेवटी त्याला पराभव पत्करावा लागला. अर्जुनाचा पराक्रम मान्य करून, प्रसन्न होऊन त्यानं आपलं अक्षय भात्याचं 'गांडीव' नावाचं सुलक्षणी धनुष्य व 'नंदिघोष' नावाचा सुघड रथ त्याला प्रदान केला आहे." विषय पांडवांचा असल्यामुळे श्रींना तो आवडीचा असणार हे मी ताडलंच होतं. ते आता खांडववन व वरुणयुद्ध यावर भरभरून बोलणार हे माहीत असूनही, मला ते ऐकण्याची उत्सुकता असूनही महाराणीचं कर्तव्य म्हणून मी काही बोलू बघत होते.

श्री मात्र माझ्याशी व म्हटलं तर आपल्या सातही पत्नींशी खांडववनाबद्दल भरभरून बोलत दानं करू लागले. वेताच्या टोकरीतील मोत्यांची एक ओंजळ श्री उचलत असताना मी त्यांना हलकेच म्हणाले, "कुणी ब्राह्मण आला आहे! श्रींच्या भेटीची आर्जवी मागणी करतो आहे. अभ्यागतकक्षात तिष्ठला आहे." तसं चमकून माझ्याकडे बघत त्यांनी विचारलं, "कोण? कुठून आला आहे म्हणालीस?"

"ब्राह्मण – सौराष्ट्रातून." माझे ते उद्गार ऐकले मात्र श्रींची मोहनमुद्रा सरासर फुलून आली. त्यांचे मत्स्यनेत्र लखलखले, ओंजळीतले मोती पुन्हा टोकरीत तसेच सोडत ते पुटपुटले, "तोच – माझ्या प्रिय सुदामा!" गुलाबी ओठांआडचा जोडदात, प्रसन्न व नितळ हसताना तळपून उठला.

'हा आलोच मी महाराणी! तुम्ही दानसत्र आवरून घ्या', असं म्हणत ते आमच्यातून अभ्यागतकक्षाच्या दिशेनं क्षणात चालूही लागले. नेहमीप्रमाणं शेजारी उभे असलेले उद्धवभावजी त्यांच्या पाठीशी झाले.

आमचं दानसत्र अवरोध तसंच पुढे चालू राहिलं. ते समाप्तीला आलं असताना श्री आणि उद्धवभावजी दुबाजूंना उजवा हात हळुवार धरून एका कृश ब्राह्मणाला सांभाळून वागवीत कक्षात आणताना दिसले. तो अगदीच फाटक्या अंगलटीचा होता. काठेवाडी बाराबंदीचा अंगरखा, पाय अर्धवट उघडे टाकणारं लाल काठी धोतर, दोन्ही कान झाकणारी कानटोपी, कपाळावर दोन्ही भुवयांत आणि उंच गालफडांवर रेखलेले गोपीचंदनाचे टिळे, हातात बिल्वाची, वळलेली वक्र काठी, कमरेपर्यंत उतरलेली

स्कंधावरची मळकट पडशी, अनवाणी असा त्याचा 'अवतार' होता. खरोखरच यादवांच्या राजनगरी सुवर्णी द्वारकेच्या दानसत्राच्या कक्षात हे ध्यान कसं दिसत होतं? तर सुवर्णी अंगठीतील टपोऱ्या पुष्कराज खड्यावर बसलेल्या काळ्याकभिन्न मक्षिकेसारखं! आम्ही साऱ्या जणी अवाक होऊन श्री व उद्धवभावजींचा खांडववन दहनाच्या पार्श्वभूमीवरचा तो विचित्र विक्रम आ वासून बघतच राहिलो.

दोघा बंधूंनी सांभाळून आणत आपल्या काठेवाडी मित्राला श्रींच्या सुवर्णी आसनावरच आणून बसविलं. त्यामुळे तर तो सौराष्ट्रकर ब्राह्मण आता पुरता गोंधळलेला दिसत होता. नेत्र विस्फारून सभोवार नुसतं टकमक बघत होता.

श्रींनी आपल्या प्रिय काठेवाडीकर मित्राला आपल्या सुवर्णी सिंहासनावर बसवताच सुशील पुरोहितांना आज्ञा केली, "पुरोहित. पूजनविधीचं आपलं नित्याचं सुवर्णी तबक घेऊन या. त्यात प्राजक्ताची फुलंही आणा." पुरोहितांनी धावपळ करून द्वारकाधीशांच्या आज्ञेची पूर्तता केली. पूजासामग्रीचं, आत लहान–मोठी सुवर्णी ताम्हणं असलेलं भव्य सुवर्णी तबक ब्राह्मण बसलेल्या आसनासमोरच्या छोट्या सुवर्णी चरणासनाजवळ सादर झालं. आता तर कक्षात मंत्रिमंडळातले सर्व मंत्रिगण, दोन्ही सेनापती, कित्येक दलप्रमुख व यादवयोद्धे येऊन दाटले. आपल्या गद, सारण या बंधूंसह पाठीशी रेवतीवहिनींना ठेवून शठ, उल्मुक आणि विपुल असे सर्व पुत्र घेऊन बलरामदादाही कक्षात प्रवेशले. पाठोपाठ सुपुत्र दत्त व गुरुमातेसह आचार्य सांदीपनी आले. सर्वांत शेवटी आम्हा सर्वांच आदरणीय, साक्षात वसुदेवबाबा आणि थोरल्या व धाकल्या आयांना येताना पाहुन खचाखच दाटी केलेल्या यादवांनी आपसूकच त्यांना मार्ग मोकळा करून दिला.

श्रींचं भोवती कोण–कोण जमलं आहे, त्यांचं काय–काय चाललं आहे, या कशा म्हणता कशाकडेही लक्षच नव्हतं. ते आपल्या 'स्नेहयोगा' च्या कर्मात स्वतःला हरवून कसे गढून गेले होते. ब्राह्मणासमोरच्या चरणासनावर एक सुवर्णी तबक ठेवून आपल्या परमप्रिय मित्राला श्रींनी त्याचे धूळमाखले पाय त्या सुवर्णी तबकात ठेवण्याची विनंती केली. द्वारकेच्या देवकक्षात कुठून–कुठून आणून ठेवलेल्या सप्तनद्यांच्या पवित्र जलातील नेमका गंगाजलांचा सुवर्णी कुंभ श्रींनी मागवून घेतला होता. त्यातील गंगाजल आपल्या प्रिय मित्राच्या पायांवर अभिषेक धारेसारखं सोडलं. आपल्या उत्तरीयानं ते अलवार पुसले. त्यावर चंदनतिलक दिला. हळद–कुंकू वाहून प्राजक्ताची ओंजळभर फुलं वाहिली. देवपूजेच्या मोठ्या तबकातील श्वेतकमळांची माला उचलून घेतली. ती आपल्या प्रिय मित्राच्या कंठात चढवून त्याच्याकडे अशा काही स्नेहार्द्र दृष्टीनं पाहिलं की, तो काळीजदेठातून भरूनच आला. डोळे डबडबल्यानं त्याला समोरचे श्री दिसेनातसे झाले. त्याच्या कृश स्कंधांना धरीत वर उठवीत श्रींनी त्याला आवेगी दृढालिंगनात घेतलं. त्याच्या वक्षावरची माला श्रींच्या वक्षावरच्या वैजयंतीमालेला बिलगली. दोन्ही मित्रहृदयं एकमेकांना मिळाली. मूकपणंच स्नेहयोगाची पर्वं आणि कांडं रचून गेली. प्रेमयोगाच्या ऋचाच ऋचा साकारून आल्या. शेवटी श्रींनी पूजा तबकातील प्रसादाचा सुवर्णी वाडगा उचलून त्यातील केशरसुंठमिश्रित खरवसाचा मधुर तुकडा आपल्या प्रिय मित्राच्या मुखात स्वहस्ते ठेवला.

मुखात रेंगाळणाऱ्या प्रसादाच्या अवीट मधुर चवीबरोबर मित्राच्या नेत्रांतूनही अविरत आत्मरस पाझरू लागला.

"दानसत्राचा उभा कक्ष आता पुरता हेलावला होता. पश्चिम वाऱ्याच्या तीव्र झोक्यावर आभाळीचे दाटले काळे ढग कुठच्या कुठं पसार व्हावे, तसंच झालं. श्रींच्या परमप्रिय मित्राचं प्रथमदर्शन होताच माझ्या मनी उठतलेले त्याच्याविषयीचे घृणेचे विचार कुठल्या कुठं पसार झाले होते. त्याची लज्जा वाटायलासुद्धा आता मनाचा कोपरा रिक्त नव्हता.

आपल्या मित्राला आलिंगनातून सोडताच आत्ता कुठं भानावर येत श्रींनी सर्वप्रथम पाहिलं ते माझ्याकडे. त्यांच्या नेत्रांची अबोल भाषा आता मला पुरती–पुरती अवगत झाली होती. मी झटकन पुढे झाले. सुदामभावजींना आसनावर बसवून त्यांनी चरणासनावराच्या तबकात पाय सोडण्याची विनंती केली. मीही माझ्या दूरदेशीच्या या हृदयश्रीमंत भावजींची श्रींनी केली तशीच पाद्यपूजा केली. माझ्यापाठोपाठ अर्थातच सातही श्रीपत्नी वयाच्या ज्येष्ठतेनुसार पुढे आल्या. त्यांनीही भावजींचं पाद्यपूजन केलं. तसं श्रींनी आपल्या मित्राला पुन्हा आसनावर बसवून प्रेमभरानं विचारलं, "मित्रा सुदामना, मघापासून बघतो आहे तू बोलत तर काहीच नाहीस, एकसारखा तुझा डावा हात खांद्यावरच्या पडशीकडे जातो आहे. सांग एवढं आहे काय त्या पडशीत?"

"दुसरं काय असणार?" असं पुटपुटत सुदामभावजींनी भरल्या अंत:करणानं आपल्या पडशीत हात घातला. जमलेल्या सर्व यादव स्त्री–पुरुषांची उत्कंठा वाढीला गेली. सर्वांचे नेत्र त्यांच्या पडशीवरच जखडले होते. सुदामभावजींनी पडशीतून क्षणात दोन चंदनी खडावा बाहेर घेतल्या. त्रैलोक्याचं राज्यच हाती असल्यासारखं त्यांच्याकडे भावभरल्या नेत्रानं पाहिलं. क्षणातच हातीच्या चंदनी खडावा त्यांनी प्रेमादरानं आपल्या मस्तकीच्या गोपीचंदनी तिलकाला भिडविल्या.

श्री आणि भावजी आचार्य सांदीपनींचे अंकपाद आश्रमातील शिष्य होते, हे ऐकून मला माहीत होतं. मला वाटलं, त्या पादुका आचार्यांच्याच असाव्यात! आचार्य तर आता कक्षात प्रत्यक्षच उपस्थित होते. सुदामभावजी एवढे भावमुग्ध झाले होते की, त्यांनी अद्याप त्यांना पाहिलंच नव्हतं. मी आवेगानं पुढे झाले, तसं माझ्याकडे अपार आनंदानं बघत त्यांनी हातीच्या पादुका माझ्या हाती दिल्या. मी त्या आचार्यांच्या म्हणून मस्तकी लावल्या! पुन्हा तशाच त्या त्यांच्या हाती ठेवल्या. श्री हा खेळ आता खटयाळ हसत नुसते बघत होते. एवढ्यात सुदामनभावजींचं लक्ष आचार्य पतिपत्नींकडे गेलं, तसं खेचल्यासारखे ते आचार्यांकडे गेले. त्यांनी आपलं मस्तक आचार्य सांदीपनींच्या चरणांवर टेकलं. तसं क्षणभर त्यांचे कृश खांदे थोपटून आचार्यांनी आशीर्वादासाठी त्यांच्या मस्तकावर हात ठेवला. भावजींनी गुरुपत्नींचंही दर्शन घेतलं.

आता दोघाही मित्रांनी आचार्यांच्या हातांना आदतनं धरून त्यांना सन्मानपूर्वक आणून दानसत्राच्या सुवर्णी आसनावर बसविलं. त्यांच्या पाठोपाठ चालणाऱ्या गुरुपत्नी माझ्या आसनावर बसल्या. त्यांचे दोन्ही परमशिष्य आचार्यांच्या चरणांशी समोरासमोर बसले. इतक्यात बलरामदादा रेवतीवहिनींसह पुढे येऊन आचार्य पतिपत्नींना वंदन करून श्रींशेजारी बसले. मला बघताच रेवतीताई माझ्याकडे आल्या. एव्हाना वसुदेवबाबा आणि दोन्ही आयांना अमात्य विपृथूंनी दानसत्राच्या आसनाजवळ आणलं. तिघांनाही माझ्या भगिनींच्या रिक्त आसनांवर बसविलं. त्यांना बघताच दादा व श्री त्यांना वंदन करण्यासाठी उठू लागले. तसं वसुदेवबाबांनी हातनिर्देश देत दोघांनाही जागीच बसण्याची

आज्ञा केली. तिचा आदर राखत दोघेही जागीच बसले. आता सर्वांचेच नेत्र खिळले ते एकट्या आचार्यांवर. आचार्यांनी डोळे मिटते घेतले होते. ते केव्हाच भावसमाधिस्त झाले होते. अद्याप सुदामभावजींचा डावा हात पडशीकडे जातच होता.

आचार्यांच्या मुद्रेवरच दृष्टी खिळलेले श्री दोन्ही हात जोडून त्यांना परमानंदानं म्हणाले, "या क्षणी काही मौलिक कानी पडावं, अशी विनंती आहे आचार्य."

ते ऐकून सांदीपनींच्या शुभ्र दाढी-मिश्या क्षणैक थरारल्या. द्वारकाद्वीपाच्या समुद्राची गाज स्पष्ट ऐकू यावी, अशी शांतताच शांतता पसरली.

हसून आचार्य सांदीपनी मिटल्या डोळीच म्हणाले, "सांगतो, श्रीकृष्णा सांगतो. प्रथम सुदामनला एक उपचार आटोपू दे. श्रीस्नेही सुदामा, तुझ्या पडशीतून आणलेली स्नेहभेट न लाजता नि:संकोचपणे आपल्या मित्राला सर्वांसमक्ष देऊन टाक."

आता तर यादव मंडळात पराकोटीची उत्सुकता पसरली. सर्वांचे नेत्र पुन्हा सुदाम्याच्या पडशीवर खिळले. सुदाम्याचा उजवा हात दोन वेळा पडशीत गेला. तसाच रिक्त बाहेर आला. मग मात्र गुरुब्रह्म पुन्हा म्हणाले, "सुदामना, गरिबी हा दोष नाही – मनाची गरिबी मात्र अवश्य दोष आहे. देऊन टाक सर्वांसमक्ष तुझी स्नेहभेट!"

आता निर्धारानं सुदामभावजींनी पडशीतून एक मळकट फडक्याची पुरचुंडी बाहेर काढली. थरथरत्या हातांनी ती द्वारकाधीशांच्या गुलाबी तळहातावर ठेवली.

श्रींनी हळुवार हातानी ती पुरचुंडी सोडवली. ते होते साधे सुके पोहे!! 'मित्राला भेट द्यायची आहे, काहीतरी दे' असं पतीनं म्हटल्यावर भावजींच्या पत्नीनं, घाईत बांधून दिलेली ती साधी भावभेट होती.

ओंजळीतल्या सुक्या पोह्यांकडे पुष्कराज खड्यासारखे तेजस्वी श्रीनेत्र आनंदविभोर होऊन बघू लागले. हातीच्या पोह्यांतील दोन दाणे उचलून श्रींनी ते प्रथम आचार्यांच्या चरणांवर सोडले. दुसरे दोन मिटक्या मारत अपार प्रेमभावानं ओठांआड केले. हातीच्या फडक्यासह माझ्यासमोर धरले. मीही दोन दाणे तोंडात टाकले. अपूर्व होती त्याची गोडी. आता श्रींनी उठून तो 'स्नेहप्रसाद' प्रथम वसुदेवबाबांना, दोन आयांना, दादा, रेवतीताईंना माझ्या सर्व सातही भगिनींना प्रेमभावानं दिला.

श्रींनी पुन्हा आचार्यांना विनंती केली, "आता सर्वांना आपल्या दिव्य उपदेशामृताचा प्रसाद द्यावा आचार्य."

आचार्य सांदीपनी मोजकंच; पण अविस्मरणीय बोलले. म्हणाले, "द्वारकाकर यादव स्त्री-पुरुष जनहो! आजचा दिवस आपल्या द्वारकेच्या जीवनातील सोन्याचा दिवस आहे. श्रीकृष्ण आणि सुदामा हे दोन्ही परमस्नेही माझे परमशिष्य आहेत. त्यांना मी केव्हाच सांगितलं आहे, आज तुम्हाला म्हणून ते पुन्हा सांगतो – अहंकार; मग तो सत्ता, संपत्ती, सौंदर्य, सामर्थ्य, ज्ञान कशाचाही असो, मानवी जिवाची हानी करतो. सामर्थ्य, सत्ता, संपत्ती यांचा अहंकार केव्हाही वाईटच. मात्र या सर्वांहून ज्ञानाचा – आध्यात्मिक ज्ञानाचा अहंकार अधिक वाईट.

"श्रीकृष्ण-सुदामा या माझ्या दोन्हीही शिष्यांचा मला सार्थ अभिमान वाटतो. जीवनाचा अर्थच आहे स्नेह! तोच तुम्ही जीवनभर जपावा व वाटावा. आत्ताच सुदाम्यानं आणलेल्या व श्रीकृष्णानं वाटलेल्या स्नेहभेटीसारखा!... इति अर्पणम् अस्तु!"

सप्ताहभर द्वारकेत राहून मित्राशी मनसोक्त बोलून सुदामभावजी गावाकडे निघून

गेले. पाठोपाठ श्रींनी अमात्य विपृथूंना आपल्या परामर्श कक्षात बोलावून घेतलं. बराच वेळ ते त्यांना कसल्यातरी सूचना देत असावेत. मी जेव्हा तिथं गेले तेव्हा श्रींचे एवढेच निसटते बोल कानी आले की, '...सर्व पूर्तता होताच डंका पिटवून त्या नगरीला 'सुदामपुरी' असं नाव द्या. द्वारका जनपदाच्या नावानं तसं घोषित करा.' मी ताडलं इंद्रप्रस्थासारखं हे सुदामभावजींच्या नगराचं आता नव्यानं निर्माण होत आहे.

असाच एकदा शुद्धाक्षावर विशेष अतिथी आगमनाचा डंका झडझडून उठला. मी मूळ द्वारकेतच होते. माझ्या सातही भगिनी आता क्वचितच व प्रसंगवशात द्वारकेत येत. त्या आपापल्या संसारात रमल्या होत्या. मला मात्र महाराणी असल्यामुळे वारंवार यावं लागे. डंका ऐकून व प्रत्यक्ष वार्ता मिळाल्यानं श्री आपल्या कक्षातून बाहेर पडलेले मला दिसले. मागे–पुढे सशस्त्र यादवसैनिकांचा मेळ घेऊन ते आलेल्या विशेष अतिथीच्या स्वागतासाठी मला धावता निरोप ठेवून शुद्धाक्षाकडे निघूनही गेले. जाता–जाता त्यांनी अमात्य, दोन्ही सेनापती व सर्व दलप्रमुखांना काही सूचनाही दिल्या. मी विचार करत राहिले. एवढं असं कोण विशेष आलंय द्वारकेत आज, की द्वारकाधीश स्वतःच चाललेत त्यांच्या स्वागतासाठी?

जेव्हा मी रेवतीताईंसह शुद्धाक्षावर पोहोचले, तेव्हा तर अधिकच थक्क झाले. तिथं सर्वच कुणाच्यातरी नौकेची प्रतीक्षा करत तिष्ठत होते. त्यात बलरामदादा, उद्धवभावजी, अमात्य विपृथू, दोन्ही सेनापती, ज्येष्ठ महाराज, दोन्ही माता, गर्गमुनी आणि होय श्रींचे आचार्य सांदीपनीही उपस्थित होते. विशेष म्हणजे त्यांच्या पत्नी श्रींच्या आश्रममाता, कधी नव्हे त्या आपल्या पुत्र दत्तासह आज तिथं आल्या होत्या.

घटकाभराच्या प्रतीक्षेनंतर द्वारकेच्या नौदलप्रमुखांनी एक फुलमालांनी सजलेली व ध्वजपताकांनी मंडित अशी भव्य नौका शुद्धाक्षाच्या तटबंदीला हळुवार आणून भिडविली. तिच्यातून एक शुभ्र दाढी–जटाधारी, धवल कौपिन धारण केलेला उंचशील वयस्क तेजस्वी पुरुष द्वारकेच्या भूमीवर उतरला. ओठ झाकतील असं शुभ्र पट्टीसारखं वस्त्र दोन्ही कानशिलांवर गाठी वळून त्यानं मागे मानेवर आवळून घट्ट बांधलं होतं. त्याचे पाय जनपद द्वारकाभूमीला लागताच श्री आपले परमपूज्य आचार्य सांदीपनींच्या समवेत तत्परतेनं पुढे झाले. दोन्ही आचार्य एकमेरकांना वक्ष भिडवीत कडकडून भेटले. तसा स्वागतकक्षातला नानाविध संमिश्र वाद्यांचा कल्लोळ गर्जून उठला. असंख्यात द्वारकाकर स्त्री–पुरुष बघत असताना श्रींनी दोन्ही गुडघे टेकवून आपलं विमल मस्तक घोर आंगिरसांच्या आर्यावर्तभर फिरणाऱ्या विमल चरणांवर ठेवलं. त्या मस्तकाचा स्पर्श होतो न होतो तोच, घोर आंगिरसांनी झटकन वाकून – "हे काय हृषिकेशा!" म्हणत श्रींना खांदे धरून पटकन उठवून घेत आपल्या वक्षाशी कडकडून बिलगतं घेतलं!.

ते घोर आंगिरस ऋषिवर होते. मी त्यांच्याबद्दल आचार्य सांदीपनींकडून आजवर खूप व कितीदातरी ऐकलं होत. मला आचार्य सांदीपनींकडून कळली ती या थोर ऋषिवरांची एकूणच जीवनगाथा केवळ थक्क करणारी होती.

ते मूळचे आमच्या सूरसेन राज्यातील मथुरेचे यादवच होते. श्रींचे दूरचे आप्तच होते. तारुण्यात घरदार व कुटुंब सोडून संन्यासी होऊन हिमालयात गेले होते. विख्यात आंगिरस ऋषींच्या चरणांशी लीन झाले होते. त्यांचं शिष्यत्व पत्करून त्यांनी घोर तपस्या केली होती. मूळ आंगिरसांनी त्यांना कठोर परीक्षांवर पारखून आपल्या ऋषिकुलाच्या आश्रमांचा उत्तराधिकारी केलं होतं, त्यांच्यानंतर आंगिरस कुलाच्या

विविध आश्रमशाखा त्यांनी आर्यावर्तात ठिकठिकाणी उठविल्या होत्या. यांची प्रमुख शाखा प्रयागजवळ होती. हिमालयात काही व आर्यावर्तात इतरत्र अनेक शाखा पसरल्या होत्या. आताशा हे पूर्वी होऊन गेलेल्या तत्त्वज्ञ ऋषभनाथांच्या अहिंसा, अपरिग्रह, सर्वसंगत्याग अशा विचारांकडे वळले होते. त्यांनी भगवी वस्त्रं त्यागून शुभ्र वस्त्रं स्वीकारली होती. शिष्यगण त्यांना 'घोर आंगिरस', 'अरिष्टनेमी' अशा दोन्ही नावांनी ओळखत होते.

या घोर आंगिरसांची द्वारकेत सालंकृत सुवर्णरिथातून वाजत–गाजत गौरवयात्रा काढण्यात आली. द्वारकाकर स्त्री–पुरुष नगरजनांनी फुलं उधळत, जयघोष करत त्यांचं प्रचंड स्वागत केलं. हे ऋषिवर्य चांगले एक महिना द्वारकेत राहिले. श्रींनी आपल्या सोपानालगतच्या कक्षातच त्यांची वास्तव्याची व्यवस्था केली. स्वत: श्री, उद्धवभावजी, मी, रेवतीताई, सुभद्रा, दादा त्यांच्या सेवेत राहत असू. द्वीपावरील माझ्या सप्त भगिनीही मूळ द्वारकेत येऊन त्यांचं दर्शन व आशीर्वाद घेऊन गेल्या. ऋषिवर्यांची व श्रींची रोजच घटकान्घटका श्री–कक्षात चर्चा चाले. ऋषिवर्य थोर ब्रह्मज्ञानी होते. मग काय विचारता? श्री त्यांना अनेक विषयांतील नाना प्रश्न विचारून भंडावून सोडत. त्यांच्या या चर्चेची माहिती उद्धवभावजींकडून नेहमीच मला खडान्खडा कळे.

काही वेळा नीतिशास्त्रावर, काही वेळा राजनीतीवर, काही वेळा युद्धनीतीवर ऋषिवर्य आंगिरसांना निवडक प्रश्न श्री विचारीत. त्यांची उत्तरं तन्मय एकाग्रपणे ऐकत. कुठल्याही शास्त्राची चर्चा असो, श्री त्यांना ब्रह्मज्ञानाच्या घनदाट अरण्यात हटकून नेत.

घोर आंगिरसांच्या द्वारकेतील वास्तव्याच्या काळात श्रींनी राज्यकारभारात कसलं म्हणून लक्ष घातलं नाही, की ते द्वीप द्वारका सोडून बाहेर कुठं भ्रमणालाही गेले नाहीत. आपल्या सर्व स्त्रियांना व पुत्रांना मूळ द्वारकेत बोलावून त्यांनी सर्वांनाच ऋषिवर्यांचं प्रथम दर्शन घ्यायला लावलं. नंतर ते अधूनमधून ऋषिवर्यांसह द्वीप द्वारकेत येत. कधी भामेकडे, कधी जांबवतीकडे, कधी मित्रविंदेकडे; तर कधी भद्रेकडे अशी त्यांची झाडून साऱ्या श्रीपत्नींच्या कक्षात आदरभोजनं झाली. काही भोजनं बलरामदादांच्या कक्षात झाली. ती व्यवस्था रेवतीताई व सुभद्रेनं पाहिली. श्रींचे पुत्र ऋषिवर्यांना नाना प्रश्न विचारत. तेही त्यांच्यासारखेच लहान होत; सर्वांची उत्तरं न कंटाळता हसतच देत. एकदा माझ्या चारूनं तर त्यांना असा एक प्रश्न केला की, एवढे ते ब्रह्मज्ञ; पण निरुत्तर झाले. तिनं त्यांना विचारलं, "महाराज, आपण आम्हा यादवांपैकीच एक, मग सांगा बघू जरासंधानं तुमचे आश्रम सतरा वेळा उद्ध्वस्त केले, तर काय शिक्षा कराल तुम्ही त्याला?"

त्या अनपेक्षित प्रश्नाला त्यांच्याकडे काहीच उत्तर नसल्यानं ते मूक राहिले. तसं चारूच त्यांचं उत्तर देत म्हणाली, "अगदी सोपं आहे, त्याला चक्क वधून टाकायचं!"

त्यांचा तो संवाद ऐकत राहिलेले श्री मात्र त्या उत्तरानं बरेच गंभीर झाले होते त्या वेळी. ऋषिवर्य आंगिरसांच्या द्वारकेतील एक मासाच्या वास्तव्यात रेवतीताईंचे पिता रैवतकांचे राजे ककुद्मिन केवळ ऋषिवर्यांचं दर्शन घेण्यासाठी दोन-तीन वेळा द्वारकेत येऊन गेले. त्यांच्याशी तर हे ऋषिवर्य, घटकान्घटका बोलत बसत. त्यांना सेविकांकडून अधूनमधून दूध व फलाहार देताना माझ्या कानांवर त्यांची चर्चा येई. ती फार वेधक व अर्थपूर्ण असे.

राजे ककुद्मिन अश्वमेधयज्ञ, दिग्विजय, युद्धशास्त्र यांवरच समरसून बोलत. क्षत्रियांना पराक्रम हाच मोक्ष असतो, हे आग्रहानं मांडीत. मुनिवर्य घोर आंगिरस मात्र त्यांचं शांतपणे ऐकून घेत. मग हळूहळू आपल्या मधाळ शब्दांत त्यांना अहिंसा, अपरिग्रह, सर्वसंगत्याग व शांतता हीच कशी मोक्षतत्त्वं आहेत, ते सांगत. शेवटी ककुद्मिन त्यांना एकदा रैवतकांच्या राज्यात पायधूळ झाडण्याची आग्रहानं नम्र विनंती करीत.

"बघू केव्हा योग येतो ते, पण रैवतकावर एकदा येणार हे नक्की." असं म्हणून शुभ्र दाढीभर हसत मुनिवर्य त्यांना निरोप देत.

त्यांच्या चर्चेनं श्री प्रभावित होत. त्यांचं शिष्यत्व पत्करण्यासाठीच तर श्रींनी त्यांना द्वारकेत आग्रहानं पाचारण केलं होतं. तसा विषयही त्यांनी आचार्य सांदीपनी व गर्गमुनी यांच्या समक्ष ऋषिवर्यांसमोर एकदा काढला. श्री दोन्ही हात जोडून ऋषिवर्यांना अत्यंत नम्रपणे म्हणाले, "भगवन्, आयुष्याचा अर्धा अधिक भाग क्षत्रियत्वाची सर्व कर्मं निष्ठापूर्वक पार पाडण्यात गेला. आता वाटलं प्राप्त झालेलं दिव्य सुदर्शन योग्य चरणांवर अर्पावं. त्या चरणांशी बसून जीवनाचा अंतिम शाश्वतार्थ शोधावा. आपण मला आपलं शिष्यत्व प्रदान करून कृपावंत व्हावं, ही नम्र प्रार्थना."

तसं एखाद्या लहान मुलासारखं खळाळ हसत घोर आंगिरस म्हणाले, "जीवनाचा अंतिम शाश्वतार्थ? अच्युता, तोही तुला? आणि मी सांगणार? अद्याप तुझी गोकुळातील खटयाळ, खोडकर वृत्ती गेलेली दिसत नाही! तू म्हणशील तर तुझं गुरुपद पत्करीन! तेही शाश्वत कीर्तीसाठी – पण आत्ता नव्हे – पुढे कधीतरी – योग्यवेळी."

द्वारकेतील समस्त यादवांना आपल्यातील एक यादवच नैष्ठिक तपस्येच्या बळावर कुठली उंची गाठू शकतो, हे समक्षच बघायला मिळावं म्हणून आचार्य घोर आंगिरसांचा सुधर्मा सभेत भरगच्च वैभवशाली असा गौरव व सत्कार श्रींनी करविला.

आचार्य घोर आंगिरसांच्या भरगच्च भरलेल्या सुधर्मा सभेतील गौरव समारोहात श्रींनी त्यांना वसुदेवबाबांकरवी पांढरीशुभ्र तलम वस्त्रं व पांढऱ्याशुभ्र अनंत पुष्पांची त्यांच्या उंचीइतकी भव्य पुष्पमाला अर्पण केली आणि बलरामदादांकरवी युवराज म्हणून त्यांच्या चौफेर पसरलेल्या आश्रमांसाठी दुभत्या गायी, धान्यगोणी आणि आश्रमांसाठी रक्षक सशस्त्र सैनिक व चपळ श्वानपथकं घोषित केली. विशेष म्हणजे आचार्य घोर आंगिरसांचं शिष्यत्व पत्करण्याची आपली मनस्वी इच्छा श्रींनी यादवांच्या भरल्या सभागारातही स्पष्ट बोलून दाखविली.

तसे माझे श्री संभाषणचतुर होतेच. त्या कलेत त्यांच्याशी कुणीच स्पर्धा करू शकत नव्हतं. सुधर्मा राजसभेतील त्यांचं प्रत्येक प्रसंगीचं वक्तव्य माझ्या मनात शिल्पासारखं सदैव कोरलं गेलं होतं. तरीही आचार्य घोर आंगिरसांचा हा गौरव करताना ते जे काही बोलले त्याला तोडच नव्हती.

ते बोलले त्याचं सार होतं – 'दिवस आणि रात्र ही जशी निसर्गाची शाश्वत रूपं आहेत तशीच 'विक्रम' आणि 'वैराग्य' ही जीवनाची शाश्वत तत्त्वं आहेत. यादवबंधूंनो, तुमच्यासारखंच हाती शस्त्र धरून पूर्वाश्रमीचे यादव असलेल्या आचार्य घोर आंगिरसांनी विक्रम केला होता. आज त्या विक्रमावरच वैराग्याची शुभ्रधवल शांत वस्त्रं लेवून ते तुमच्या माझ्या भेटीसाठी द्वारकेत आले आहेत. मी प्रकटपणे इच्छा व्यक्त करतो की, त्यांनी आपलं शिष्यत्व मला प्रदान करून उपकृत व धन्य करावं.'

एवढ्या समतोल वृत्तीचे, जीवनापार पोहोचलेले आचार्य आंगिरस; पण तेही श्रींच्या नम्रभावानं गहिवरून गेले. उत्तर देताना आपल्या आचार्यपदाची शुभ्रधवल वसनं फेकून देत तेही मोकळ्या-ढाकळ्या यादवी भाषेत म्हणाले, "प्रिय यादवबांधवहो! मी तुमचाच आहे. तुमचा अनंत जन्मींचा पुण्यसंचय आहे म्हणून तुम्हाला श्रीकृष्णा हा अलौकिक, त्याच्यासारखा तोच; असा मार्गदर्शक लाभला आहे. तुम्हाला माझ्या मन:पूर्वक अनुभवाचा संकेत आहे की, त्याच्या शब्दाबाहेर चुकून कधीही जाऊ नका. ते तुम्हाला कधीच लाभणार नाही.

"तो तुम्हा सर्वांसमक्ष 'शिष्य करून घ्या' अशी मला गळ घालतो आहे. त्याच्याच कृपाप्रसादानं मी स्पष्टपणे सांगतो आहे की, मी त्याच्याहून वयस्क आहे; पण त्याला शिष्यत्व प्रदान करण्याचा अधिकार अद्याप मला लाभलेला नाही. जेव्हा केव्हा वेळ येईल, तेव्हा त्याच्याच इच्छेनं ते कार्य मी अवश्य करीन."

श्रींसह सर्वांना चटका लावून आचार्य आंगिरस द्वारकेचा निरोप घेऊन उत्तरेकडे निघून गेले. त्यांनी तडक माथ्याच्या व विचारांच्या यादवांना आपल्या वर्तणुकीनं एकूण जीवनाचा नव्यानं विचारच करायला लावला होता. लक्षावधींना त्यांनी श्रींकडे बघण्याची एक नवीच दृष्टी दिली होती. मुनिवर्य जाऊन एक मास लोटला, तरी त्यांची चर्चा द्वारकेत मागे रेंगाळतच राहिली.

अशातच जसा मुनिवर्यांच्या स्वागतासाठी उठला होता, तसा विशेष वाद्यांचा डंका शुद्धाक्षावर पुन्हा उठला. क्षणैक द्वारकाकरांना वाटलं श्रींच्या मोहक प्रेमयोगानं भारलेले मुनिवर्य घोर आंगिरसच पुन्हा द्वारकेकडे परतले की काय? पण तसं नव्हतं. ज्याची मी, रेवतीताई, वसुदेवबाबा, थोरली नि धाकली केवळ कीर्तीच ऐकून होतो, तो पांडवश्रेष्ठ धनंजय - अर्जुनच धौम्य मुनींसह आज पहिल्यानं द्वारकेत प्रवेशत होता. नुकतंच लाभलेलं अजिंक्य गांडीव धनुष्य आपल्या वृषस्कंधावर पेलून एका भव्य नौकेतून तो द्वारकेत प्रवेशला होता. जसं आंगिरसांच्या भेटीसाठी श्री तत्परतेनं कुणाचीही वाट न बघता राजवास्तुबाहेर निघून गेले होते, तसेच आताही निघाले होते. पण ती संधीच श्रींना न देता पार्थच त्यांच्या पायांशी 'साधनानं संकल्पाकडे यावं' तसा त्वरेनं येऊन सादर झाला होता. मी लगबगीनं त्याला बघण्यासाठी श्रींच्या सोपानावरील कक्षाकडे सेविकांसह आले. त्याला श्रीचरणांशी वीरासनात बघताना मीही चक्क गोंधळून गेले. क्षणभर मलाही वाटलं, श्रीच वीरासनात बसलेत!

त्या दोघांना क्षणातच एकमेकांच्या आलिंगनात बघत असताना मलाही निर्णय करता येईना; त्यातील श्री कोण आहेत आणि अर्जुन कोण आहे!

मात्र मला बघताच श्रींचं आलिंगन तोडून तो माझ्याकडे चरणस्पर्शासाठी त्वरेनं झपाझप चालत येऊ लागला. मात्र त्या क्षणीच ती दोघांनाही अचूक पारखण्याची एक दुर्मीळ कळ आपल्याला लाभली, या आनंदानं निर्धास्त होते.

भरदार वक्षाचा उंचशील अर्जुन माझ्याकडेच येत होता, कसा? तर आपली सुडौल शरीरयष्टी योद्धयासारखी बळकट पायांवर तोलून धरीत. माझे श्रीही योद्धाच होते. शार्ङ्गधनुष्य पेलणारे धनुर्धर होते. कौमोदकी गदा फिरवणारे गदावीर होते. नंदक खड्ग चालवणारे खड्गवीर होते. सुदर्शन फेकणारे चक्रधर होते. पण त्यांना मी असं शरीर तोलून चालताना कधीही पाहिलंच नव्हतं. ते केव्हाही चालत ते वायूच्या झुळकीसारखं –

सहज! बासरीच्या लकेरीसारखं – तरल!

हां-हां म्हणता पांडवश्रेष्ठ धनंजय – पार्थ माझ्यासमोरच आला आणि गुडघे टेकून माझ्या चरणांवर मस्तक ठेवताना म्हणाला, “आपण कशाला आलात श्रीसोपान चढून? मीच येणार होतो आपल्याकडे.”तसं मी मुखभर हसले. त्याला वाटलं, मी त्याच्या नम्रभावानं प्रसन्न होऊन हसते आहे. मात्र त्याला बोलताना ऐकून मला श्रींचा व त्याचा आवाज पारखण्याचीही आणखी एक दुर्मीळ कळ मिळाली, याचं ते हसू होतं. आमच्या या अर्जुनाचा आवाज होता पाषाणावर टक्करणाऱ्या बाणासारखा कणीदार, ठणठणीत. माझ्या श्रींचा आवाज होता मुरलीसारखा मोहक, मधुर. केव्हाही आणि कितीही ऐकला तरी कधीच पुरेसा न वाटणारा!! याच्या नि श्रींच्या आवाजात तर कितीतरी अंतर होतं.

पांडुपुत्र अर्जुन द्वारकेत आला होता, तो त्याचा ज्येष्ठ बंधू युधिष्ठिराच्या राज्याभिषेकाचं समस्त यादवांना यथाप्रथा आमंत्रण घेऊन. सुधर्मासभेत वसुदेवबाबा आणि थोरलीच्या समोर धौम्य मुनींसह रीतसर सादर होऊन हातची भूर्जपत्राची निमंत्रणवळी त्यानं यादवांच्या महाराज, महाराज्ञींच्या चरणाजवळ ठेवली. एरवी ठणठणीत बोलणारा अर्जुन आमंत्रण देताना नम्रतेनं म्हणाला, “महाराज आपण उभयतांनी युवराज-युवाराज्ञींसह श्रीकृष्णदादा, रुक्मिणीवहिनी यांना उद्धवमहाराजांसह सर्व बंधूवर्यांना घेऊन माझे ज्येष्ठ बंधू वंदनीय युधिष्ठिरदादा यांच्या इंद्रप्रस्थातील राज्यारोहण समारंभासाठी अवश्य-अवश्य इंद्रप्रस्थात यावं.”

त्याचा विनय बघून भारावून गेलेल्या वसुदेवबाबांनी त्याला सिंहासनावरून उठून पुढे होत वक्षाशी बिलगतं घेतलं. विचारलं, “पुत्र पार्था, तुझी माता, आमची भगिनी कुंतीदेवी कशी आहे?”

अर्जुन नुसताच धनुर्धर नव्हता, बुद्धिमानही होता. म्हणाला, “ते समक्ष बघण्यासाठी तरी इंद्रप्रस्थात पायधूळ झाडावी आपण उभयतांनी. ती क्षेम आहे.”

पांडुपुत्र अर्जुनाचं जसंच्या तसं श्रींसारखं दिसणं, वागणं, बोलणं यानं सुधर्मा सभेतील यादवांचं राजमंडळ, मंत्रिगण, सर्व दलप्रमुख आणि खचाखच भरलेले यादव स्त्री-पुरुष भारावून गेले. दिपून गेले. त्यांनी त्याच्या नावाचा अविरत जयघोष उठविला. त्या जयघोषांच्या लहरींवर थरथरणाऱ्या तलम आडपडद्यांआडच्या राजस्त्रियांच्या कक्षात बसलेली एक यादव स्त्री नुसतीच भारून गेली नव्हती, ती तर दिपूनच गेली होती. मधल्या झिरमिरीत पडद्याआडूनही तिला सभागारातील उंचशील पांडुपुत्र स्पष्ट दिसला. भावला, पटला. तिनं त्याला मनोमन त्या क्षणीच वरूनही टाकलं! ती होती श्रींची भगिनी, बलरामदादांची लाडकी सख्खी भगिनी सुभद्रा. माझी प्रिय भद्रा.

अर्जुन एक सप्ताहभर द्वारकेत राहिला. या काळात द्वारकेच्या शाङ्ग चौकातील द्वारकाकरांनी त्याची गांडीव धनुष्यावर सिद्ध केलेली थक्क करणारी अनेक नेत्रदीपक प्रात्यक्षिकं समक्ष डोळाभर पाहिली. त्या वेळी तर माझ्या जवळ बसलेल्या सुभद्रेचा गांडीवधारी धनुर्वीराला मिळणारा प्रतिसाद बघूनही मी मनोमन हसले होते. बिचाऱ्या सुभद्रेला भानच नव्हतं की, आपण स्त्रीप्रेक्षक कक्षात आहोत. स्त्री-कक्षातील सर्व जणींची अर्जुनानं गांडीवातून फेकलेल्या बाणावरची दृष्टी उचलताच, त्या बाणापेक्षाही गतीनं चीत्कारणाऱ्या सुभद्रेकडेच जात होती. आमची सुभद्रा स्फटिकासारखी स्वच्छ

मनाची, सौंदर्यखणी व सर्वांनाच प्रिय होती. बलरामदादांच्या मनी तिच्याबाबत नेमकं काय होतं, याचा शोध मात्र अद्याप कुणीही घेतलेला नव्हता.

आता द्वारकेत ज्येष्ठ पांडव युधिष्ठिराच्या राज्याभिषेकाला जाण्याची घाईगर्दी उडाली. वसुदेवबाबा थोरली आणि धाकलीसह द्वारकेतच राहणार होते. त्यांचासह राजनगर द्वारकेच्या रक्षणासाठी माझा विक्रमी, सौंदर्यवान पुत्र प्रद्युम्न राहणार होता.

सर्वांत शेवटी बलरामदादा, श्री, उद्धवभावजी, विपृथु, सेनापती सात्यकी व अनाधृष्टी यांचे रथ निघणार होते. नित्यासारखे मी, भामा, श्री व उद्धवभावजी आमच्या गरुडध्वजातून जाणार होतो. रथ दारुकच वागविणार होता. आजवर श्रींनी कसलीही सूचना न देताच दारुकानं गरुडध्वज अप्रतिम सालंकृत केला होता. तो एका भव्य नौकेत चढवून त्यात बसूनच तो सर्वांची प्रतीक्षा करीत होता.

प्रस्थानाच्या ठरल्या वेळी प्रत्यक्ष वसुदेवबाबा थोरली आणि धाकली व प्रद्युम्न शुद्धाक्षावर आले.

सर्वांचा निरोप घेऊन आम्ही इंद्रप्रस्थाकडे निघालो.

मरुस्थल व दशार्णाच्या राज्यात काही पडाव पडले. अर्बुद पर्वताजवळच्या मत्स्यांच्या राज्यातील विराटनगराच्या सीमेवर एक पडाव पडला. सर्वांना वाटलं तो लवकर हलेल. श्रींच्या आज्ञेनं तो दोन दिवस लांबला. विराटनगरीत श्री दादा व उद्धवभावजींसह उपहार तबकं घेऊन राजा विराटांच्या भेटीस गेले. कुणाच्याही लक्षात ते आलं नसलं, तरी बलरामदादांच्या मात्र ते पटकन ध्यानी आलं. त्यांनी आपल्या प्रिय बंधूला नित्यासारखी कोपरखळी मारत विचारलं, “काय द्वारकाधीशा, आता विराटांचाही जामात होण्याचा विचार आहे की काय?” तसं नेहमीचं लाघवी हसून त्यांना उत्तर देताना श्री म्हणाले, “ आता विवाह आहे, तो केवळ कर्तव्यपूर्ततेशी. कुणी सांगावं यादवांचा नसला तरी पुढं-मागं पांडवांचा रक्तसंबंध या विराटांशी जुळणार नाही म्हणून? दादा रुळलेल्या पायवटेवरूनच सर्व चालत असतात. नवी शोधणारे थोडेच असतात.” विराटनगरीत श्रींचं यथायोग्य स्वागत झालं. मला या भेटीत विराटपत्नी महाराणी सुदेष्णा ही नवी मैत्रीण मिळाली. आमचा शेवटचा पडाव इंद्रप्रस्थ राज्यातील यमुना नदीकिनारी पडला. इथं आम्ही एका सुरम्य सायंकाळी पोहोचलो. दुसऱ्या दिवशी भल्या ब्राह्मी मुहूर्तावर बलरामदादा माझ्या आणि भामेच्या शिबिरात आले. सचिंत सुरात म्हणाले, “रुक्मिणी, धाकला आणि उद्धव कुठं दिसत नाहीत ते. बराच वेळ झाला. कुठं गेले हे?”

तसं हसून मी त्यांना म्हणाले, “काऽही चिंता करू नका. दादा, ते इथंच कुठंतरी, कुणालातरी सूचना देण्याच्या कर्मात गुंतले असणार.” तसे मोकळ्या स्वभावाचे दादा हसून म्हणाले, ““तशी कुणाचीच आणि कशाचीही मी कधीच चिंता करीत नाही, पण याची केल्याशिवाय राहवतच नाही. ज्येष्ठ आहे ना मी!”

त्यांच्या उद्गारांत माझं आणि भामेचं हसणं विरून गेलं.

थोड्या वेळातच एक धापावता यादवदूत आमच्या शिबिरात आला. म्हणाला, “महाराणी, कालिंदीदेवी पुढच्या शिबिरातून श्रींच्या दर्शनासाठी मागे परतल्या आहेत, पण त्या इथल्या शिबिरात पोहोचलेल्या नाहीत. बराच शोध घेतला. त्या मध्येच कुठे गेल्या काही कळत नाही!”

आता मात्र माझी आणि भामेचीही मुद्रा चिंताग्रस्त झाली. चारी दिशांना शोधपथकं धाडून मुख्यत: कालिंदीचा शोध सुरू झाला. कुणाच्याही ध्यानीमनी यमुनेच्या घाटावर शोध घ्यावा, असं काही आलं नाही. घटका झाली. सुंदर सकाळ आमच्या तळावर पसरली. कशी कुणास ठाऊक; काही इंद्रप्रस्थकरांना द्वारकाधीश यमुनेकाठी आलेत याची चाहूल लागली. माणसांची गर्दी क्षणाक्षणानं वाढू लागली. आता श्री, भावजी व कालिंदी यांचा शोध घेणं, तसं कठीणच झालं. इतक्यात काही इंद्रप्रस्थकरांनी घेरलेले श्री व उद्धवभावजीच साध्या नेसूत येताना आम्हाला दिसले. आमचे जीव भांड्यात पडले. त्यांच्या मागून शुभ्र वस्त्रात कालिंदीही येताना पाहून तर चिंताच मिटली. ते सारे यमुनेच्या घाटाच्या दिशेकडूनच येत होते.

नंतर चौकशीत कळलं की, यमुनेच्या किनारी पडाव पडताच श्रींनी उद्धवभावजींना रात्री बोलावून घेऊन एक विशेष कल्पना मांडली होती. केवळ दोघांनीच उद्या ब्राह्मी मुहूर्तावर यमुनेत मनसोक्त डुंबायला जायची! या आपल्या योजनेत त्यांनी ठरवून दादाला घेतलं नव्हतं. कारण ते आले असते, तर गुपचूप डुंबण्याचा प्रकट जलविहार झाला असता. कालिंदी पुढच्या तळावरून मागे परतली होती, तीही श्रींच्या सोबतीनं तिनं कधीतरी बोललेला एक नवस श्रींसह पूर्ण करण्यासाठी. ते पुण्य तिनं कौशल्यानं साधलं होतं. माझ्या सातही भगिनींत कालिंदी जांबवतीसारखी बुद्धिमान होती.

जेव्हा नौकांतून गरुडध्वजासह इंद्रप्रस्थात प्रवेश करण्यासाठी मी, श्री, दादा, भावजी व भामेसह त्या पावनभूमीवर पाय ठेवला तेव्हा थक्कच झालो. इंद्रप्रस्थाच्या ‘कुरू’ नावाच्या पश्चिम महाद्वारावर पांडवप्रिय नगरजनांची नुसती गर्दीच गर्दी लोटली होती. साक्षात राजमाता कुंतीदेवी, द्रौपदीसह पाचही पांडव, त्यांचे पुरोहित धौम्य, पांचालराज द्रुपद, महाराणी सौत्रामणी, युवराज धृष्टद्युम्न, दोन्ही सैन्यांचे सेनापती, अमात्य आणि ऋषिवर याज, उपयाज, असितदेवल अनेक शिष्यगणांसह श्रींच्या स्वागताला उपस्थित होते. सर्वांवर श्रींनी आपली गरुडदृष्टी क्षणात फिरविली. उपस्थितांत हस्तिनापूर राज्यातला एकही कौरव मात्र नव्हता.

श्रींच्या स्वागतासाठी इंद्रप्रस्थकर वाद्यवृंदानं नानाविध वाद्यांचा टिपेचा हलकल्लोळ उठविला. कंठी पुष्पमाला चढवून उपचाराचे नमस्कारविधी झाले. हर्षोत्फुल्ल इंद्रप्रस्थकरांनी श्री, दादा, भावजी, दारुक यांच्यावर कुंकुममुठी आणि पुष्पओंजळी उधळल्या.

इंद्रप्रस्थकरांच्या अविरत जयघोषांत यादवांचा गरुडध्वज व पांडवांचा नंदिघोष एका पाठोपाठ एक असे मंदगतीने चालू लागले. स्वागतयात्रा सुरू झाली.

मी केवळ थक्क-थक्क होऊन दुहाती बघत राहिले. जशी काही पश्चिम सागराच्या घेरातील सुंदर द्वारकाच कुणीतरी अलगद उचलून आणून इथं यमुनेकाठी मांडली होती.

इंद्रप्रस्थ! पांडवांची राजनगरी! अशरण पौरुषानं उठविलेलं अजोड शिल्प! सुरचित उंच-उंच टोलेजंग वास्तू. कलाकुसरीच्या सुघड कळसांची प्रशस्त मंदिरं, विविध युद्धप्रकारांनी सिद्ध केलेली आटपाट क्रीडांगणं, मध्येच उठलेल्या अश्व, उष्ट्र यांच्या नांदत्या शाला, नरअज, कुकुट यांच्या झुंजीचे कुंपणबद्ध आखाडे. चौमार्ग जोडणारे भव्य चौक. त्या चौकांतील वेगवेगळ्या वेशांतील वीर योद्धयांचे विविध पवित्र्यांतले घोटीव लोहपुतळे. डेरेदार लतावेष्टित वृक्षांनी, पक्षयांच्या कलकलाटांनी गजबजलेली उद्यानमंडलं. त्यातून दूरवरही दिसणारे स्फटिकधवल निर्झर. असं हे राजनगर, मी

अनिमिष नेत्रांनी बघतच चालले. मला हे राजनगर द्वारकेहूनही कंकणभर सरसच वाटलं.

यात केवळ एकच वाण होती – इथं द्वारकेसारखी अविरत गर्जणारी समुद्रगाज काय ती ऐकू येत नव्हती. त्यामुळे इंद्रप्रस्थ तसं मला शांतशांतच वाटलं. श्रींच्या ओठांतून आलेला प्रत्येक शब्द मी वेदमंत्रासारखा सत्यच मानला होता. या नगराच्या निर्माणाच्या वेळी ते अनेकदा म्हणाले होते, 'तू बघशील रुक्मिणी, हे इंद्रप्रस्थ यावच्चंद्रदिवाकरौ कीर्तिवंत राहील! या ना त्या कारणानं शाश्वत गाजत राहील. पांडवांचं हे राजनगर अजर, अमरच होईल.'

युधिष्ठिराचा हा सविध राज्याभिषेक सोहळा चांगला सप्ताहभर चालला. या काळात पांडवांनी उठविलेल्या अनेक कक्षांच्या राजवास्तूत नानाविध देशींचे राजे उतरले होते. संपूर्ण यमुना नदीचं विशाल पात्र त्यांनी आणलेल्या व जागजागी नांगरून टाकलेल्या नौकांनी कसं भरून गेलं होतं. त्यांच्या शिडांवर वेगवेगळ्या वर्णांचे व राजचिन्हांचे ध्वज डौलात फडफडत होते. देशोदेशींहून आलेल्या वेदविशारद ऋषिमुनींच्या मंत्रघोषात इंद्रप्रस्थाची राजवेदी सतत निनादत होती.

प्रारंभीच्या उपचाराचे सर्व अभिषेकविधी पूर्ण झाले. त्यासाठी आवश्यक उपवास केल्यामुळे महारथी युधिष्ठिर व द्रौपदी थोडे कृश दिसू लागले, पण त्यांच्या चर्येवर फाकलेली अपार समाधानाची तेजरेखा काही आगळीच होती. तसं आल्या-आल्या द्रौपदीशी माझी भेट व बोलणं झालं होतं, पण, ते मला हवं तेवढं मनसोक्त नव्हतं. या वेळी ते शक्यही नव्हतं. तिच्या पहिल्या भेटीतच मला तीव्रपणे जाणवलं की, सावळी असली तरी ती खरोखरच अप्रतिम सुंदर होती. रेखाबद्ध, सुडौल अवयवांची होती. विपुलकेशा, सुगंधी, कणीदार, निग्रही आवाजाची, पाणीदार, काळ्याशार, टपोऱ्या नेत्रांची होती. आणि होय, पट्टीच्या पुरुषार्थाला आव्हान घालू शकणारी प्रमाणबद्धच होती ती.

ज्येष्ठ पांडुपुत्र महारथी युधिष्ठिर इंद्रप्रस्थातील भव्य सुवर्णी राजसिंहासनावर सुमुहूर्त धरून आरूढ होण्याचा दिवस उजाडला. मंत्रघोषात नियोजित राजा-राणी – युधिष्ठिर-द्रौपदीनं अभ्यंगस्नानं आवरली. दृष्टी ठरणार नाही असे उंची राजवेष आणि सुवर्णी अलंकार लेवून सर्व जण सज्ज झाले. पंचकडीतील ते वीर बंधू श्रींच्या आणि माझ्या दर्शनासाठी व आशीर्वादांसाठी एक मेळानंच आमच्या कक्षात आले. आज अर्जुन तर असा दिसत होता की, त्याला दृष्टच लागावी.

आमचे आशीर्वाद घेऊन ते सर्व बंधू आमच्याशी हास्यविनोदात रमले असतानाच इंद्रप्रस्थाचे सेनापती जवळ-जवळ धावतच आले. त्यांनी युधिष्ठिर, अर्जुनापेक्षा श्रींना वंदन करून त्यांच्यासमोरच एक महत्त्वाचा वृत्तान्त ठेवला. ते म्हणाले, "वंदनीय द्वारकाधीश, हस्तिनापुराहून पितामह भीष्म, ज्येष्ठ पांडुपुत्रांना आशीर्वाद देण्यासाठी इंद्रप्रस्थात आलेत. समवेत महात्मा विदुर आणि मंत्री संजयही आहेत."

ते ऐकून सेनापतींचं वृत्त अधिक पडताळून घेत श्रींनी विचारणा केली, "आणि कोण-कोण आलंय?"

"आणि पितामहांची निवडक सेना. इतर कुणीही नाही."

ते ऐकून नेहमीसारखं लाघवी हसत श्री उद्गारले, "चला सेनापती, पितामहांच्या स्वागताला जाऊ."

त्याप्रमाणं उद्धवभावजींसह ते उत्तरेकडे 'शूरसेन' नावाचा महाद्वाराकडे

यमुनाकिनारी निघूनही गेले.

हे एक बरं झालं होतं. राजा होणाऱ्या युधिष्ठिराला पितामहांचा तरी आशीर्वाद मिळणार होता.

ठरलेल्या शुभमुहूर्तावर इंद्रप्रस्थाच्या 'हरिकृपा' नावाच्या राजसभेत राज्याभिषेक झाला. देशोदेशींच्या ऋषिवरांच्या मंत्रघोषात वेलबुट्टीचा सुवर्णी राजमुकुट अभिषेकप्रमुख पांडवाचार्य धौम्य ऋषींनी युधिष्ठिराच्या मस्तकावर, कुरूंचं पिळदार पागोटं हटवून चढविला. लहान तिकोनी आकाराचा तसलाच कसदार राज्ञी-किरीट महाराणी द्रौपदीच्या मस्तकी चढविला. तसा नानाविध राजवाद्यांचा हलकल्लोळ 'हरिकृपा' राजसभेत निनादून उठला. उपस्थित प्रमुख राजांनी, इंद्रप्रस्थकर स्त्री-पुरुषांनी आनंदून आपल्या राजा-राणीवर फुलांच्या व कुंकुमाच्या ओंजळी उधळल्या. 'इंद्रप्रस्थाधिपती पांडवकुलभूषण पांडुपुत्र महारथी, महाराज युधिष्टिरऽ' असा राजघोष उठला. तसं हजारो कंठातून उठलेल्या 'जयतु... जयतु...!!' या प्रतिसादानं यमुनेच्या चंचल जललहरीही थरारून उठल्या.

अखंड दिवसभर उभं इंद्रप्रस्थ हर्षोत्फुल्ल होऊन चौकाचौकांत नाचण्यात, गाण्यात, नानाविध क्रीडा खेळण्यात दंग झालं. त्या दिवशी संध्याकाळी पांडवांचं राजनगर इंद्रप्रस्थ बघून परतलेली आमची सुभद्रा मला वेगळीच वाटली. तिच्या चर्येवरून जसे काही शेकडो कपोत पक्षी उडू बघत होते. मी तिला खोदून-खोदून विचारलं, "सुभद्रे, काही बघायचं-पारखायचं बाकी तरी ठेवलं नाहीस ना इंद्रप्रस्थात?" तशी चतुर सुभद्रा उत्तरली, "सगळं इंद्रप्रस्थ बघितलं सुश्री. काही-काही शिल्लक ठेवलं नाही."

स्पष्टच होतं, ती नंदिघोषातून इंद्रप्रस्थाचं पर्यटन करून परतली होती! मी हलकेच तिची पाठ थोपटत म्हणाले, "राज्याभिषेक न होताच राजयोग असतो एकेकीच्या भाग्यात." तेव्हा ती किती-किती गोड हसली.

युधिष्ठिराचा आर्यावर्तभर गाजलेला राज्याभिषेक उरकला. आमंत्रित परतू लागले. महाराणी द्रौपदी सर्वांचा निरोप घेण्यात कितीही व्यग्र असली तरी काही ना काही कारण काढून श्रींना वारंवार भेटत होती. त्यांना लहान मुलीसारखे नानाविध प्रश्न विचारीत होती.

त्या दोघांचं घटकान्‌घटका खळाळ बोलणं ऐकणं, हाच एक अवर्णनीय आनंद होता. दोघांच्या बोलण्यातून एक गोष्ट मला पटकन जाणवून गेली. द्रौपदी श्रींना एकेरी आणि मोकळ्या-ढाकळ्या ढंगातच बोलत होती. श्रींच्याबाबत ते वडीलधऱ्यांनाच काय ते शक्य होतं. चुकूनसुद्धा कधी मला त्यांच्याशी असं बोलता आलं नसतं. द्वारकेतील माझ्या इतर भगिनींचा तर प्रश्नच नव्हता.

अर्जुन व श्री यांच्याबाबत जसा मी द्वारकेतच निर्णय करून टाकला होता तसाच राधिका आणि द्रौपदी या दोघींबाबत आता इथं इंद्रप्रस्थात करून टाकला होता. मला कधीच न भेटलेली राधा श्रींच्या मनातील एक आदर्श ग्राम व कष्टकरी स्त्रीचं सुखस्वप्न होतं. द्रौपदी हे अशा आदर्श राजस्त्रीचं सुखस्वप्न होतं.

द्रौपदी माझ्या फार मान व आदर राखी. याचाच लाभ घेऊन इंद्रप्रस्थ सोडण्यापूर्वी आताशा मी द्रौपदीला भेटे ती सतत आमच्या सौंदर्यखणी; पण अल्लड सुभद्रेसह. श्रींची भगिनी म्हणून तर द्रौपदीला तिचं कोण कौतुक होतं! अल्लड सुभद्रेला कुणी वडीलधारी स्त्री काहीही कारणामुळे थोडी जरी कठोर बोलली, तरी द्रौपदी पटकन

सुभद्रेची बाजू घेऊन तिला जागीच गप्प्प करी. ते बघताना मला हसू येई. द्रौपदीला मी म्हणे, “पांडवांच्या महाराज्ञी, या यादवकन्येचं गुणगान नको करू तू. अगं, डोंगर हे दुरूनच साजरे असतात. आताच मी आमंत्रण देते, द्वारकेत ये कशी एकदा तुझ्या धनुर्धरासह! तुला कळतील हिचे गुणधर्म!”

द्वारकेला परतण्यापूर्वी साहजिकच श्रींच्या पांडवमहाराज युधिष्ठिर व राजमाता कुंतीदेवींशी गाठीभेटी व बैठकी वाढल्या. अशा एका बैठकीत श्रींनी कुंतीदेवी व सर्व पांडवांसमोर एक प्रस्ताव ठेवला. अगदी सहज व सर्वांना पटणारा. श्री म्हणाले, “आता इंद्रप्रस्थ राज्याच्या कीर्तीचा डंका समस्त आर्यावर्तभर दुमदुमेल. तुम्ही सर्व वीर बंधूबंधूंनो! आर्यावर्ताची एक-एक दिशा निवडून इंद्रप्रस्थ राज्याची नामपताका दिग्विजयानं सर्वत्र फडकवावी.

“गणराज्याच्या राजाचा नुसता वैभवशाली अभिषेक होऊन चालत नाही. त्यानं धारण केलेल्या सिंहासनाचा आदर चौदिशांतून राखला जावा लागतो. त्याचा एकच मार्ग आहे. गगनवेधी विक्रम! यासाठी यादवांच्या स्नेहातील या इंद्रप्रस्थ राज्याच्या साहाय्यासाठी चतुरंगसेना, गज, अश्व, शस्त्रं अशी सामग्री व धनसंपत्ती द्वारका तुमच्या पाठीशी सदैव उभी करील.

“आता सर्वाधिक महत्त्वाचं आहे ते तुमच्या नवथर गणराज्याचं संरक्षण! त्यासाठीच मी एक दूरदृष्टीचा प्रस्ताव ठेवतो आहे. तुम्ही सर्वच बंधू विक्रमी आहात, यात मला कसलीही शंका नाही. तरीही आज ना उद्या इंद्रप्रस्थाच्या संरक्षणाचं दायित्व अधिक ते दोघांच्याच स्कंधावर पडणार आहे. अर्जुनाच्या व महाबली भीमाच्या.

“यासाठी अगोदरच गदा व मल्लविद्येत पारंगत असलेल्या भीमसेनाला या विद्यांत अतुल निष्णात होण्यासाठी तुम्ही या विद्यांतील, शेवटचा शब्द असलेल्या आमच्या बलरामदादांच्या हाताखाली शिष्य म्हणून दीक्षापूर्वक शिक्षण घेण्यासाठी आत्ताच पाठवावं.”

यावर महाराज युधिष्ठिरांनी बैठकीतल्या राजमाता कुंतीदेवींकडे निर्णयाच्या अपेक्षेनं पाहिलं. त्यांनी होकाराची मान डोलावताच महाराजांनी द्वारकाधीशांना शब्द दिला – “श्रीकृष्णाच्या इच्छेप्रमाणं भीमसेन द्वारकेला जाईल. तो गदा व मल्लविद्येचं शिक्षण पूर्ण करून परतताच आम्ही दिग्विजयासाठी इंद्रप्रस्थाबाहेर पडू. बलरामदादांनी माझ्या बंधूला शिक्षण द्यावं. तसंच श्रीकृष्णानं आत्ताच आम्हाला दिग्विजयासाठी आशीर्वादही द्यावेत.”

ठरल्याप्रमाणं इंद्रप्रस्थात सर्वांचे निरोप घेऊन दादा, श्री व उद्धवभावजींसह आम्ही द्वारकेकडे परतलो. या वेळी दादांच्या रथात महाबली भीमसेनही होता. द्वारकेत अग्रवार्ता गेल्यामुळे शुद्धाक्षावर अलोट गर्दी लोटली. पांडुपुत्र अर्जुनाला बघण्यासाठी पूर्वी लोटली होती, त्याहून कितीतरी द्वारकाकर यादव भीमसेनाला प्रत्यक्ष पाहण्यासाठी आले होते.

शरीरसामर्थ्याला तोड नाही म्हणून आजवर मी आमच्या बलरामदादांकडे आदरानं पाहत आले होते. त्यांच्या रथात बसलेल्या धिप्पाड पांडुपुत्र भीमसेनला बघताना मात्र मला जाणवलं की, श्रींना जशी अर्जुन ही छाया असू शकते, तसाच भीमसेनही दादांची छायाच ठरेल! त्या दोघांना एकत्र बघणं म्हणजे कैलास व मैनाक पर्वतांना एकाच दृष्टिक्षेपात टिपणं होतं. भीमसेनच्या धिप्पाड, पीळदार, तोरंजवर्णी शरीरयष्टीचं दर्शन

होताच अगोदरच उतावळ्या असलेल्या यादवांनी त्याच्यावर वेडावून फुलं उधळली.

गुरुदेव घोर आंगिरस द्वारकेत आल्यानंतर द्वारकाभर एक चैतन्याची लाट उठली होती – त्यागाची, विद्वतपूजेची. अर्जुन आल्यानंर द्वारकाभर लाट उठली होती – धनुर्योगाची, श्रींची सदेह सावली बघितल्याची. भीमसेन आल्यानंतर द्वारकाभर लाट उठली ती मल्लयोगाची – खणाणत्या गदायोगाची – बलरामदादांची सदेह सावली बघायला मिळाल्याच्या अभूतपूर्व आनंदाची.

आता उभ्या द्वारकेला जसं काही एका मल्लविद्येच्या विराट आखाडयाचं आणि गदाविद्येच्या विशाल रणक्षेत्राचं रूप आलं. भोवतीच्या आनर्त, सौराष्ट्र, सौवीर, भृगुकच्छ अशा गणराज्यांतून द्वारकेत वस्तीला आलेले पट्टीचे धिप्पाड मल्ल फिरताना दिसू लागले. वेगवेगळ्या माटाच्या गदा ओतणारे कुशल लोहकार द्वारकेत प्रवेशले.

तिकडे इंद्रप्रस्थात युधिष्ठिराच्या राज्याभिषेकानंतर समस्त पांडवपरिवार सुस्थित झाला होता. पाचही पांडवांनी कुंतीमाता व द्रौपदीसह एका गुप्त बैठकीत कुटुंबाची वर्तणूक संहिता ठरवून घेतली होती. तिच्या एका नियमानुसार द्रौपदीचे तिच्या प्रत्येक पतीशी एकांताचे दिवस ठरलेले होते. त्या काळात अन्य चार बंधूंपैकी कोणीही एकांत कक्षात प्रवेश करू शकत नव्हता. युधिष्ठिर व द्रौपदी अशा एकांतात असताना एका ब्राह्मणाच्या गाईंचं हरण चाललं होतं. त्यांचं रक्षण करण्यासाठी, अर्जुनाला गांडीव धनुष्याची आवश्यकता होती. रात्री एकांत कक्षात ठेवलेलं ते धनुष्य घेण्यासाठी निरुपायानं अर्जुन एकांत कक्षात प्रवेशला. नियमाप्रमाणं त्याला एक वर्षाच्या तीर्थयात्रेच्या शिक्षेला सामोरं जावं लागलं. अर्जुन तीर्थयात्री म्हणून इंद्रप्रस्थाबाहेर पडल्याची वार्ता द्वारकेत आली. तसे श्री प्रथम काहीसे गंभीर झाले. मग नेहमीचं लाघवी हसत मला म्हणाले, “आता मात्र वर्षातच अर्जुनाची भेट होईल.”

बलरामदादा भीमसेनला दोन्ही विद्यांचा सराव देण्यासाठी व्यायामशाळांत दंगले. इतके दंगले की त्यांना वसुदेवबाबा, थोरल्या व धाकल्या महाराणी यांचीही प्रभातवंदन व सायंवंदन यांशिवाय भेट घेणंही जमेना. इतकंच काय रेवतीताईंची व त्यांची गाठ तर दोन वेळच्या भोजनाशिवाय घडेना. श्रीही आताशा सुधर्मा सभेत सेनापती सात्यकी आणि अनाधृष्टी यांच्याशी सदैव चर्चा करू लागले. उद्धवभावजींनी माझ्या कानी घातलं त्याप्रमाणं चर्चा होती, ती केवल गिरिव्रजाच्या मगधसम्राट जरासंधाबाबतची. दोघाही बंधूंचं वयात आलेल्या भगिनी सुभद्रेकडे काही लक्षच नव्हतं. दोघांनाही ती अद्याप लहान व अल्लडच वाटत होती. ती उपवर झाली आहे. तिला सुयोग्य असा नरश्रेष्ठ वर – जीवनसाथी वेळीच देणं आवश्यक आहे, हे तत्काळ लक्षात आणून देण्याचं दायित्व आता माझ्यावरच पडलं. मला सुभद्रा माझ्या चारुमतीसारखीच वाटे. म्हणून तर ते मी निग्रहानं मनावरच घेतलं. त्यासाठी मुहूर्त निवडला गुरुपौर्णिमेचा. आग्रहानं राजवास्तूत पाचारण केलं, ते गुरुपत्नी व गुरुपुत्र दत्तासह आचार्य सांदीपनींना, दादा व श्री दोघाही बंधूंना भीमसेनसह राणीवशाच्या द्वीपावर भोजनासाठी उद्धवभावजींकडून एकत्र आणलं.

त्या दिवशी वसुदेवबाबा, थोरल्या व धाकल्या महाराणी, रेवतीताई असं यादवांचं सर्वच राजकुटुंब एकत्र येईल, अशी महाराणी म्हणून मी व्यवस्थाही केली. दादांच्या गडगडत्या हास्यात आणि श्रींच्या नर्म विनोदांत सर्वांची सुग्रास भोजनं झाली. शेवटी तांबूलसेवनाचा विधी झाला. या वेळी मात्र मी कौशल्यानं आचार्य व त्यांच्या कुटुंबाला

मूळ द्वारकेत पोहोचविण्याच्या निमित्तानं दारुकाला गरुडध्वज सिद्ध करायला सांगितलं. आचार्यांच्या सोबत भीमसेनाला, गुरुपत्नींसोबत सुभद्रेला जायला सांगितलं. तिला एकाकी वाटू नये म्हणून भगिनी कालिंदी आणि जांबवती यांनाही पाठविण्याची दक्षता मी घेतली. आता तांबूलसेवनाचा कक्ष मला हवा तसा झाला. तसं सर्व राजकुटुंबासमोर मी 'सुभद्रेच्या विवाहा' चा विषय काढला. अगोदरच कानगोष्ट केल्याप्रमाणं रेवतीताईंनी तो उचलून धरला. मला हे असे यादव स्त्री–पुरुष कुटुंबीय क्वचितच एकत्र सापडत. आज ती संधी आली होती. तिचा पुरेपूर लाभ घ्यायचा मी ठरवलं. म्हणाले, "वसुदेवबाबा, दोन्ही राजमाता, दादा, युवराज्ञी इथं असताना मी बोललंच पाहिजे असं नाही. पण राहवत नाही म्हणून पुरती वाट बघून नंतरच बोलते आहे. क्षमा करावी.

"तुम्ही सर्व ज्येष्ठ, विक्रमी, ज्ञानी आहात. कामरूप देशातील सहस्रावधी स्त्रियांचं द्वारकेत पुनर्वसन केलंत. घरचं काय? आपली सुभद्रा उपवर झाली आहे. तिच्या स्वयंवराचं काय? तुम्हाला कुणालातरी तिच्याकडे लक्ष द्यायला कधीतरी वेळ मिळणार आहे काय?"

माझं आवाहन ऐकून वसुदेवबाबा लगेच म्हणाले, "रुक्मिणी म्हणते ते योग्य आहे. मात्र आम्ही थकलोय. वृद्ध झालोय. आता हे कार्य मनावर घेऊन युवराज बलरामानं मार्गी लावावं. सुभद्रेसाठी सुयोग्य वर निवडावा. त्यासाठी श्रीकृष्णानं त्याला योग्य ते साहाय्य करावं. श्रीकृष्ण करेल ते तिच्या कल्याणाचंच असेल. आम्ही त्याला आशीर्वाद देऊ."

बाबांचे आज्ञेचे बोल ऐकून एव्हाना गडगडत हसणारे बलरामदादा गंभीर झाले. निग्रहानं म्हणाले, "सुभद्रा आमची अत्यंत लाडकी भगिनी आहे. वसुदेवबाबांनी तिच्या विवाहाची मुळीच चिंता करू नये. तिच्यासाठी सुयोग्य वर मी कधीच निवडून ठेवला आहे! मला खातरी आहे, रुक्मिणीलाही तो आवडेल. योग्य वाटेल आणि तिला आवडल्यानंतर आमच्या या धाकल्याचा प्रश्नच नाही! काय श्रीकृष्णा?"

भाबड्या स्वभावाप्रमाणं दादांनी वराचं नाव न सांगता भरल्या बैठकीत श्रींना प्रश्न घालून कोड्यातच टाकलं. पण ते कसले गुरू! एवढंसुद्धा न ढळता त्यांनी हसूनच प्रतिप्रश्न केला, "वराचं नाव न सांगताच पसंती विचारतोहेस दादा? उजाडलं नसतानाच सूर्य किती माथ्यावर आला आहे, याचं उत्तर रेवतीवहिनींना तरी देता येईल काय?"

आता त्यांचा प्रिय 'धाकला' अशाच प्रश्नांचा भडिमार करून सांदीत पकडणार म्हणून सावध झालेले दादा लगबगीनं म्हणाले – उखणा घातल्यासारखे, "वर कुरुकुलातीलच आहे. पराक्रमी आहे. तूच सांग धाकल्या, कोण असावा?" त्यांनी पुन्हा प्रश्नच केला.

"कुरुकुलातील? विक्रमी? दुसरा कोण असणार? पांडवांपैकीच कुणीतरी असेल." उद्धवभावजी मध्येच म्हणाले.

"तू बोललास उद्धवा, म्हणजे तुझ्या तोंडून श्रीकृष्णच बोलला असं मानतो मी. सुभद्रेसाठी मी निवडलेला वर कुरुकुलातीलच आहे, पण पांडवांपैकी नसून कौरवांपैकी आहे. युवराज आहे. उद्या तो हस्तिनापूरचा अभिषिक्त सम्राट होणार आहे. सुभद्रेसाठी मी निवडलेला वर आहे, हस्तिनापुराधिपती महाराज धृतराष्ट्रपुत्र युवराज दुऽर्योऽधऽन!!"

दादांची निवड ऐकून यादवांच्या राजकुटुंबाची बैठक स्तब्धच झाली. अनपेक्षित नाव ऐकून सर्व दिपून गेलेत, या अपसमजानं दादा सलग बोलतच राहिले – “दुर्योधन माझा गदाविद्येचा शिष्य आहे. मिथिलेत येऊन ही विद्या त्यानं निष्ठापूर्वक नम्र भावानं माझ्या उचित सेवेसह ग्रहण केली आहे. माझ्या मते, गदाविद्येतील मला काही समजत असेलच तर – दुर्योधनाला या विद्येत संपूर्ण आर्यावर्तात तोड नाही. हस्तिनापुराशी यादवांचे रक्तसंबंध आल्यामुळे आपलं द्वारका गणराज्य अधिक सामर्थ्यशाली होणार आहे. मला पूर्ण विश्वास आहे, माझा पट्टशिष्य दुर्योधन कधीच माझ्या शब्दाबाहेर जाणार नाही. यासाठीच माझ्या प्रिय भगिनीला सुयोग्य वर म्हणून मी दुर्योधनाचीच निवड केली आहे. काय श्रीकृष्णा? तुझं या वराबाबत काय मत आहे, ते सर्वांना स्पष्ट–स्पष्ट या बैठकीतच सांगून टाक. मागाहून घोळ नको. तुला तसा पश्चात घोळ घालण्याची सवय आहे, म्हणून विचारतोय. आम्ही मल्लवीर. लाल मातीतले, साल–ढाळ मोकळ्या मनाचे, तू राजनीतीतला मल्लवीर – पुरता आतल्या गाठीचा!”

दादांच्या रोखठोक प्रश्नानं कुटुंबाची बैठकच थरारली. स्तब्ध झाली. श्री आता काय उत्तर देणार म्हणून सारेच त्यांच्याकडे एकटक बघू लागले. एकटे श्रीच जरासुद्धा न ढळता हसतच म्हणाले, “दादा, तू आपल्या प्रिय भगिनीसाठी केलेल्या वराची निवड चूक कशी काय असेल? किती केलं तरी तू ज्येष्ठ – युवराज, तुझी निवड श्रेष्ठच असणार. तुझा शब्द कसा खाली पडणार? कुरुवीर युवराज दुर्योधन गदाविद्येतील अंतिम शब्द आहे. त्याला आर्यावर्तात तोड नाही, असं मीही ऐकून आहे. पण स्वयंवर आहे, ते सुभद्रेचं. तुझं किंवा माझं नव्हे! ‘स्वयंवरा’ चा अर्थ लक्षात घेऊन तिला एकदा तरी विचारायला नको काय; की, ती स्वत: वरणार आहे तो वर कोणता आहे? तो तू म्हणतोस तसा कौरवांचा युवराज दुर्योधनच असेल, तर प्रश्नच मिटला. उद्याच धूमधडाक्यानं विवाह करू आपल्या प्रिय सुभद्रेचा. कसं?”

श्रींच्या या बिनतोड उपायाला सर्वांनीच, ‘बरोबर आहे, श्रीकृष्ण म्हणतो ते बरोबर आहे –’ असा एकदमच प्रतिसाद दिला. मी सुटकेचा नि:श्वास टाकला. एका समाधानानं की, नेमक्या आजच्या भोजनानंतर मी बुद्धिकौशल्यानं अचूकपणे भीमसेनला व सुभद्रेला बाहेर काढलं होतं.

मी कसली वेडी! एवढी दक्षता मी घेतली होती, तरीही सुभद्रेच्या विवाहाची वार्ता हां–हां म्हणता द्वारकाभर पसरलीच. चौकाचौकांत उत्सुक यादवांची दबक्या आवाजात ‘वर दुर्योधन – सुभद्रापती दुर्योधन! –’ अशी चर्चाही सुरू झाली. कशी कुणास ठाऊक, ती सुभद्रेच्याही कानावर पडली. तीही यादवकन्याच. तशीच तरातर चालत माझ्या कक्षात आली नि म्हणाली, “सुश्री, काय ऐकते हे मी? मला तुम्ही सर्व जण त्या उद्धट, अरेराव अंधपुत्राच्या गळ्यात मारणार की काय? एवढी का मी जड झालीय यादवांना? मी निक्षून सांगते सुश्री, माझ्या दोन्हीही दादांना ठाम सांगा, कौरवांची स्नुषा म्हणून मी कधीच हस्तिनापुरात जाणार नाही! तशी वेळच आली तर पश्चिम सागराच्या उदरात जाईन!” कितीही केलं तरी ती यादवकुलोत्पत्रच होती. तडकू, हट्टी, बलरामदादांपेक्षाही.

मी इंद्रप्रस्थात ओळखलं होतं की, तिचं मन धनुर्धर धनंजयात पूर्ण अडकलं आहे. तरीही वेड पांघरून मी म्हणाले, “असं काय करतेस वेड्यासारखं सुभद्रे? तू उद्या

हस्तिनापूरची महाराणी होणार, म्हणजे केवढ्या वैभवाची, सत्तासंपत्तीची अधिकारी होणार हे समजतंय का तुला?”

तशी एरवी ती माझ्याशी आदरानंच बोले, पण तिच्या वर्माला मी डिवचताच तिच्यातील यादवीण जागी झाली. कधी नव्हे ते माझ्यावर डोळे रोखत ती म्हणाली, “मग तुम्ही का नाही स्वीकारलंत चेदींचं महाराणीपद? कशाला बांधलीत एका गवळ्याशी जन्मगाठ?” ती भावावेगात काहीतरीच बोलून गेली आणि आपल्या प्रिय छोट्या दादाला ‘गवळी’ म्हणाल्याचं तिलाच जाणवून गेलं, क्षणातच ती ओंजळीत तोंड खुपसून हमसताना लालेलालही झाली.

मी मायेनं तिच्याजवळ जात, तिला बिलगतं घेऊन थोपटताना म्हणाले, “भद्रे, उगी हो. शांत हो. तुझ्या मनासारखंच होईल. एकच कर, दादांनी विचारलं तर त्यांना एवढंच सांग की, माझ्या छोट्या दादांना पसंत असेल त्याच्याशीच मी विवाह करेन. यापुढे मुळुमुळु रडत मुळीच न बसता श्रींच्या सदैव सहवासात राहा. ते सांगतील ते लक्षपूर्वक ऐकत जा. ते काटेकोर पार पाडत जा. तुझी मनीषा पूर्णच होणार आहे.” आता मात्र ती मला कडकडून बिलगून अनावर हमसताना कसंतरी एवढंच बोलून गेली, “क्षमा – क्षमा करा मला सुश्री. तुम्हाला – तुम्हाला मी काहीतरीच बोलून गेले. कुणालातरी उद्धट म्हणताना – म्हणताना – मीच तशी कशी काय झालेऽऽ!”

मग मी तिला काही न बोलता माझ्या चारूला थोपटावं तसं थोपटत, स्पर्शातून कितीतरी वेळ शांतवीत राहिले. काही वेळानं तिचा भावनावेग सुमार होताच केवळ एवढंच म्हणाले, “भद्रे, श्री मला आवडलेले या आर्यावर्तातले सर्वश्रेष्ठ गवळीच आहेत. त्यांच्या अजोड विचारांच्या ज्या निसटत्या गोरसधारा माझ्या कानांवर पडल्या; त्यांपैकीच काही मी आत्ता तुला ऐकविल्या. त्या अलौकिक गवळ्याकडे अशा विचारांच्या किती कासंड्या तुडुंब भरल्या आहेत, ते मलाही माहीत नाही! मला त्यांची पत्नी म्हणून यासाठी त्यांचा जागृती–निद्रेतही वक्षभर अभिमान आहे. तू तर त्यांच्या रक्ताची भगिनी. तुला मी काय सांगणार?”

आता मात्र माझ्या स्कंधावर मान टाकून सुभद्रा अविरत अश्रू ढाळत राहिली. मी तिला तिच्या रोहिणीमातेसारखी थोपटतच राहिले.

आता द्वारकेत समस्त यादवांची रूप व गुणसंपन्न कन्या चि.सौ.कां. सुभद्रा हिच्या विवाहाचं नाट्य चढत्या क्रमानं रंगू लागलं.

लवकरच भीमसेनाचं शिक्षण पूर्ण झालं. निरोपासाठी यादवांनी त्याचा सुधर्मा सभेत प्रचंड सत्कार केला. खचाखच भरल्या सभागृहात पीळदार धिप्पाड शरीरयष्टीच्या भीमसेनाचा सत्कार केला. त्याच्या भरगच्च कंठात श्रींनी स्वहस्ते रसरशीत काषाय कमलांची पुरुषभर उंचीची गौरवमाला चढविली. दादांनी आपल्या गदेसारखीच ओतवून घेतलेली, एक प्रचंड गदा शक्तिभारित करवून घेतली होती. हजारो यादवांच्या अखंड टाळ्यांच्या गजरात दादांनी ती तळपती गदा भीमसेनच्या गजस्कंधावर चढवून त्याला कडकडून दीर्घ आलिंगन दिलं. तसे कधीच सभेत न बोलणारे दादा आज मात्र न राहवून श्रींना संकेत करून उठले. आवर्जून बोलले. म्हणाले, “पांडुपुत्र भीमसेन आजपासून माझा दीक्षांत मल्ल व गदविद्येचा शिष्य झाला आहे. तसा माझा प्रथम शिष्य आहे कुरुश्रेष्ठ, धृतराष्ट्रपुत्र युवराज दुर्योधन. या दोघांच्या या विद्यांतील नैपुण्याला तोडच

नाही. तरीही प्रथमशिष्य म्हणून मला दुर्योधन तसूभर अधिक प्रिय आहे, हे खरंच. लवकरच मी आम्हा यादवांचा ऋणबंध हस्तिनापुराशी घडवून आणणार आहे. दुर्योधन आणि भीमसेन यांचं पाठबळ द्वारकेच्या गणराज्याच्या पाठीशी सदैव राहील, याचा मला विश्वास आहे. मी भीमसेनाला वीर म्हणून त्याच्या जीवनक्रमात मनभर शुभाशीर्वाद देत आहे, पांडपुत्र भीमसेन, शुभं भवतु, जयतु!"

या वेळी श्री काही बोलणार नव्हते; पण जमलेल्या हजारो यादवांची दृष्टी त्यांच्यावरच खिळली. प्रथम कुजबुज माजली. मग स्पष्ट घोषांत मागणी सुरू झाली – "द्वारकाधीश, उठा, बोला. आमच्या प्रिय भीमसेनला शुभेच्छा द्या!" तसं माझ्याकडे व शेजारी बसलेल्या उद्धवभावजींकडे हसून बघत श्री उठले. त्यांनी आपला उजवा आजानुबाहू उंच उठवून तर्जनी उभवताच सभागार चिडिचाप झालं. जोडदात तळपला, गुलाबी विमल ओठ हसले. शब्दांच्या मोजक्याच; पण अर्थपूर्ण लखलखीत तारका सुधर्मा सभेत उधळल्या – "प्रिय यादव बांधवहो, आमचे प्रिय गदा व मल्लविद्या वीर बलरामदादा असताना, द्वारकेला कधी काळी भीमसेनच्या मदतीची आवश्यकता पडेल, असं मला वाटत नाही. उलट पडलीच तर आवश्यकता दादांच्या विक्रमाची नवथर इंद्रप्रस्थ राज्याला पडेल. दादांचं प्रथमशिष्य म्हणून व त्यांच्यासारख्याच युवराज असलेल्या दुर्योधनावरचं प्रेम मी समजू शकतो. या क्षणी मी एवढंच सांगू इच्छितो की, बलवीर भीमसेनच्या अशरण सामर्थ्याची सदैव आवश्यकताच पडणार आहे – पण फाऽर फाऽर वेगळ्या कारणासाठी! त्यासाठीच मी इंद्रप्रस्थाशी काही एक दूरचा ऋणबंध योजून आहे. भीमसेन आजही आमचा आप्त आहे. आतेबंधू आहे. लवकरच याहुन अधिक जवळचा आप्त होईल. त्यासाठीच मी त्याला अंत:करणपूर्वक शुभेच्छा देतो आहे. जयतु भीमसेन. शुभं भवतु!"

द्वारकेतील यादवांचा निरोप घेऊन भीमसेन इंद्रप्रस्थाला निघून गेले.

हस्तिनापूरच्या समर्थ कुरू राज्याशी रक्तसंबंध दृढ करावेत या निर्णयाला आता बलरामदादा आले होते. श्रींनी सरळ, आडवळणानं 'सुभद्रेची पसंती विचारावी' अशी वारंवार केलेली सूचना त्यांनी दृष्टिआड टाकली होती. सुभद्रेचा कुरुयुवराज दुर्योधनाशी वाङ्‌निश्चय करण्यासाठी त्यांनी अमात्य विपृथू व आपला विश्वासू बंधू गद यांना हस्तिनापूरला धाडलंही होतं. किती केलं तरी श्री धाकल्या पातीचे होते. दादा युवराज होते. माझे श्री केवढेतरी बुद्धिचतुर होते. मात्र या घरच्याच पेचप्रसंगानं कोंडीत सापडल्यासारखे झाले होते. मला त्यांची ही कोंडी पटकन जाणवली. आता लवकरात लवकर हालचाली करून सर्वप्रथम दुर्योधन–सुभद्रा विवाह थांबविणं आवश्यक होते. नाहीतर आमची सुलक्षणी व प्रिय भद्रा दुर्योधन आणि त्याचे नव्याण्णव बंधू यांच्या तडाख्यात वादळवेळीसारखी कोलमडणार होती.

आताशा सुभद्रेच्या संबंधानं दबक्या आवाजात श्री बोलत ते केवल माझ्याशीच. कितीही झालं तरी ही बुद्धिझुंज होती – गदवीर युवराजांशी. रेवतीताई साहजिकच पत्नी म्हणून त्यांना जोड देणार होत्या. काय करावं? काही सुचत नसलेले श्री एकदा मला म्हणाले, "तो धनुर्धर धनंजय आर्यावर्तभर तीर्थयात्रेसाठी कुठं भटकतो आहे काही पत्ता लागत नाही. पट्टीचे गुप्तचर चहू दिशांना फिरून आले."

मी तरी त्यांना काय सुचविणार होते? न राहवून म्हणाले, "श्री नेहमी

मन:शांतीसाठी तीर्थ प्रभास क्षेत्रावर जातात. तसं एकदा जाऊन यावं. दानं, तीर्थस्नान यानं मन शांत होईल. मग काहीतरी सुचेल.”

माझी ती सूचना ऐकून श्री कितीतरी प्रसन्न हसले. म्हणाले, “केवढी मनकवडी आहेस तू रुक्मिणी! माझ्या मनीही प्रभासाचाच विचार घोळत होता.”

श्रींच्या आज्ञा सुटल्या. तीर्थक्षेत्री जाण्याची सिद्धता झाली. तसं आपल्या दादांची भेट घेऊन त्यांनाही आग्रह करीत श्री म्हणाले, “ज्येष्ठा, तूही प्रभासक्षेत्री चल. राजकुलात सुभद्रेचं कार्य काढलं आहेस. काही दानं-स्नानं करू.”

त्यांचे खांदे थोपटत दादा मायेनं म्हणाले, “माझ्या वतीनं तूच ही सर्व धर्मकृत्यं कर. मला इथून हलता येणार नाही. युवराज दुर्योधन वाङ्निश्चय विधीसाठी केव्हाही द्वारकेत येईल.”

तसे श्री काही निवडक यादववीर घेऊन एकटेच प्रभास क्षेत्राकडे निघून गेले. मी कयास केला होता की, आता पंधरा दिवस तरी ते दिसणार नाहीत. पण घडलं अनपेक्षितच. ते गेल्या-गेल्या तसेच लागलीच परत आले होते. पूर्ण मन:शांती घेऊन! आल्या-आल्या मला अंत:पुरी कक्षात एकांती भेटून ते म्हणाले, “रुक्मिणी, प्रभासावर पार्थ भेटला! सगळेच प्रश्न आता सोपे झाले. तो संन्याशाच्या भगव्या वेषात आहे. दाढी वाढल्यामुळे तसा सहजी ओळखू येत नाही. मी त्याला लागलीच वेरावळजवळच्या सोमनाथाच्या शिवालयात यायची सूचना दिली आहे. उद्याच उद्धव सोमनाथावर जाईल. येताना समस्त द्वारकाकरांसाठी आनंदवार्ता आणेल की, सोमनाथाच्या शिवालयात हिमवनाच्या गुहेत तप:साधना केलेले कुणी एक ‘शिवयोगी’ तापस आले आहेत. त्या मंदिराची शिवयोग्याची वाण त्यांनी भरून काढली आहे. उद्धवच हे बोलतोय म्हटल्यावर द्वारकाकर त्यावर डोळे मिटून विश्वास ठेवतील. शिवयोग्याच्या दर्शनासाठी स्त्री-पुरुषांच्या रांगा सोमनाथाकडे लागतील. तूही एकदा सुभद्रेसह त्याचं दर्शन घेऊन येशील! कसं?”

आता सुभ्रदेच्या मंगल कार्याचं नाटच प्रभास, सोमनाथ, द्वारका, रैवतक असा प्रदेश धरून रंगणार होतं. या नाटचाची प्रमुख रंगभूमी होती, रैवतक पर्वत व तेथील रैवतकांच्या पर्वतीय कुलदेवीचं मंदिर ही.

आता मी जीवनात कधीही अनुभवलं नव्हतं, असं श्रींचं दुर्मीळ दर्शन मला घडू लागलं. अन्यायी अरेरावांना कठोर शासन देणारे ते शूर तर होतेच. घेतल्या निर्णयाची तत्पर कार्यवाही करणारे कुशल शासक होते. मोठमोठ्या ऋषिमुनींशी तत्त्वचर्चा करणारे बुद्धिमान तत्त्वज्ञ होते. लहानथोर द्वारकाकरांवर मनस्वी प्रेम करणारे प्रेमयोगी होते. ते काय नव्हते? शूर सेनापती, संगीताचे मर्मज्ञ, गदा, खड्ग, शरचाप यांचे कुशल योद्धे, सुधर्मा सभेत सर्वच श्रोत्यांना जागीच खिळूवन ठेवणारे, भान हरपायला लावणारे प्रभावी वक्ते होते. सर्व कलांचे व विद्यांचे समर्थ अधिकारी होते. आताशा मात्र ते आपल्या कौटुंबिक, नाजूक प्रश्नांच्या संदर्भात निष्णात नटालाही मागे टाकणारे कुशल अभिनेते झाले होते, याचा मला पावलोपावली प्रत्यय येऊ लागला. तसतशी मीसुद्धा थक्क होत चालले.

एकीकडं युवराज बलरामदादा आमच्या भेटीसाठी कक्षात आले की, त्यांचं मुखभर हसून स्वागत करत. ‘तू सुभद्रेला दुर्योधनाच्या पदरात बांधताना फार मोठी, कधीही न भरून येणारी चूक करतो आहेस,’ असं त्यांना ते कधीच स्पष्टपणे बोलत नसत. तसं ते

बोलले असते, तर बालपणापासून आदर राखलेल्या एका सर्वमान्य ज्येष्ठ बंधुत्वाला धक्का पोहोचणार होता. ते तर त्यांना मुळीच होऊ द्यायचं नव्हतं. सुभद्रा मनोमन धनुर्वीर अर्जुनात प्रेमधाग्यांनी गुंतलेय, हे तर त्यांनी केव्हाच जाणलं होतं. तिची जीवनकळी तर कुस्करू द्यायची नव्हती. भगिनी सुभद्रेला सुयोग्य वर एकमेव अर्जुन; हे तर त्यांनी मनोमन केव्हाच पक्कं केलं होतं.

श्रींनी ठरविल्याप्रमाणं मी सुभद्रेसह सोमनाथाच्या शिवालयात जाऊन आले. मी शिवाचं दर्शन घेतलं. सुभद्रेनं शिवासह शिवयोग्याचं दर्शन घेतलं. त्या दोघांना निवांत बोलता यावं, म्हणून मी मंदिराबाहेर पश्चिम सागराची गाज ऐकत थांबले. त्या वेळी मला प्रकर्षानं स्मरण झालं, ते मी कौंडिण्यपूराहून फार वर्षांपूर्वी धाडलेल्या अटीतटीच्या पत्राचं. सुभद्रा आज तशाच वळणावर उभी होती. मला मात्र पूर्ण विश्वास होता, सुभद्रा अर्जुनाची पत्नी होणार.

रेवतीताईंच्या आग्रहामुळे व यादवांच्या प्रथेप्रमाणं नववधू होणारी सुभद्रा रैवतक पर्वतावर जाणार होती. तिथल्या पर्वतीय देवीचं दर्शन घेऊन भावी जीवनासाठी देवीचे आशीर्वाद मागणार होती. हीच वेळ अर्जुनानं तिचं अचूक हरण करण्यासाठी साधायची होती. यात सर्वांत मोठा अडथळा होता तो रैवतकराज काकुद्मिन यांचा. त्या पर्वतावरचे आयाळधारी प्रचंड गर्जते सिंहही आपल्या रैवतक मृगयापथकांनी पेरलेल्या जाळ्यात जिवंत अचूक पकडण्यात ककुद्मिन विख्यात होते. त्यांच्या सेनामंडलातून कौपिनधारक अर्जुन निसटणं शक्यच नव्हतं. मुख्य म्हणजे यादवकन्या सुभद्रेचं हरण करण्यासाठी आवश्यक तो शस्त्रसज्ज रथ पर्वताच्या पायथ्याशी ठेवायला संन्यासी अर्जुनाकडे तोही नव्हता. या थरारक उद्योगासाठी आवश्यक ती शस्त्रधारी संरक्षक पथकं त्याच्याजवळ नव्हती. शिवाय रैवतक पर्वत ते इंद्रप्रस्थ हा रथप्रवासही दूर पल्ल्याचा होता.

श्रींचं एक खासेपण होतं. ते कुठल्याही अभियानात प्रथम प्रतिकूल म्हणून काय-काय आडवं येईल, याचाच विचार करीत. त्यावर आपल्या दिव्य प्रतिभेतून अचूक मार्ग वेळीच शोधून काढत.

'सुभद्रा हरण' हा अर्जुनाच्या विचारकक्षेत न येऊ शकणारा मार्ग त्यांनीच सुचवला होता! अर्जुनाच्या सर्व शंकांचं हसतच निवारणही केलं होतं.

हस्तिनापुराहून युवराज दुर्योधन वाङ्‌निश्चयासाठी द्वारकेला यायला निघालेत, अशी वार्ता येऊन थडकली. त्यांच्या समवेत कुरूंचा चतुरंगसेनेचा प्रचंड सेनातांडा आहे, ही वार्ता बलरामदादा व श्री यांच्या बैठकीतच गुप्तचरानं सादर केली. तशा युवराजांच्या शुद्धाक्षासह तिन्ही महाद्वारांच्या सजावटीच्या आज्ञा सुटल्या. सात्यकी, अनाधृष्टी यांना तर दादा क्षणभरही उसंत द्यायला तयार नव्हते. श्री त्यांच्या आज्ञेतील बारीकसारीक तपशिलांकडे दोन्ही सेनापतींचं काटेकोर लक्ष वेधीत होते. स्वागताच्या तयारीच्या सर्व-सर्व सूचना देऊन बलरामदादा संध्याकाळी थकून आसनावर बसले असताना सेवकांना आपल्या सागरदर्शनाची तयारी करावी, असं म्हणतच श्रींनी आपल्या मनातील एक विचारपिल्लू बाहेर काढलं. ते दिसायला गोंडस तर होतंच, पण असायलाही परिणामकारक होतं.

दादांसमोर येऊन त्यांना आदरपूर्वक नमस्कार करून श्री म्हणाले, "बलरामदादा, कधी–कधी आपल्या हातून मोठ्या गोष्टीच राहून जातात. अगदी सहज सुचाव्यात व

वापराव्यात अशाच त्या असतात. एकदा वेळ टळून गेली की, त्या वेळीच केल्या नाहीत याची हुरहुर लागते, चुटपुट राहते.”

तसं दिवसभर थकले भागलेले बलरामदादा हसतच म्हणाले, “असं उखाण्यात काय बोलतोस धाकटया? काय असेल ते साफ-साफ मनमोकळं सांगून टाक. आमच्या युवराज दुर्योधनाच्या स्वागताच्या तयारीत तुला काही कमतरता वाटते का?”

“माझी एक नम्र सूचना आहे. तुम्हाला ती पटते का बघा ज्येष्ठ. तशी कमतरता काहीच नाही. साक्षात तुम्ही द्वारकेचे युवराज असताना काय कमी पडणार? तरीही मला वाटतं सामर्थ्यशाली कुरू युवराज दुर्योधनाच्या स्वागतासाठी तुमचे सासरे, रैवतकांचे प्रमुख महाराज काकुद्मिन यांना आजच ससैन्य द्वारकेत पाचारण करावं! आपण दोघे व ते स्वागतासाठी सामोरे आलेले बघून युवराज दुर्योधन परम संतुष्ट होईल. मला वाटतं सुवर्णाला सुगंध लपेटेल!”

ते ऐकताच बसलेले शांत, क्लान्त दादा आसनावरून ताडकन उठले. म्हणाले, “बरोबर आहे तुझं. हे असलं काही ध्यानातच येत नाही आमच्या. आजच सात्यकीला धाडतो निरोपासह रैवतकाकडे.”

तसं कितीतरी लाघवी हसत श्री म्हणाले, “त्याच्याकडून माझे काकुद्मिन महाराजांना साष्टांग प्रणिपातही धाडा.” श्री समुद्रस्नानाला निघून गेले.

दुसऱ्या दिवशी युवराजांच्या कक्षातून रैवतक महाराजांसाठी उपहारांची तबकं घेतलेले सेनापती सात्यकी बाहेर पडलेत याची खातरी होताच, श्रींनीही आपले दोन दिशांचे खास दूत सोडले. त्यातील एक पथक रैवतक व इंद्रप्रस्थ या अर्जुन–सुभद्रा यांच्या रथदौडीतील लागणाऱ्या राज्यांकडे निघालं. ते आनर्त, दशार्ण, मत्स्य अशा राज्यांतील राजांना भेटून त्यांना द्वारकाधीशांची उपहार-तबकं भेट देऊन त्यांच्या कानी खास निरोप घालणार होतं. तो निरोप होता, ‘रथावर कपिध्वज असलेला आमचा आतेबंधू पांडुपुत्र पार्थ आमच्या भगिनीसह इंद्रप्रस्थाकडे आपल्या राज्यातून जात आहे. त्याला सर्व प्रकारचं हार्दिक साहाय्य करून, द्वारकेशी असलेला आपला स्नेहसंबंध वृद्धिंगत करावा.’

दुसरं पथक होतं श्रींच्या सर्वांत विश्वासू बंधूंचं – उद्धवभावजींचं. ते जाणार होतं प्रत्यक्ष सोमनाथच्या शिवालयात. एक सालंकृत शस्त्रसज्ज रथ घेऊन. त्याच्या ध्वजदंडावरही अर्जुनाचा कपिध्वज फडफडणार होता. रथात राजपुत्रासाठी शस्त्र व राजवेषही होता.

एवढं सगळं इत्थंभूत श्रींनी माझ्या कानी घातलं. मी ते सुभद्रेला माझ्या कक्षात पाचारण करून नीट समजावून सांगितलं. दरम्यानच्या काळात सुभद्रा कितीतरी बदलली होती. तिच्या चर्येवरून निर्धारी तेज कसं ओसंडत होतं. तिला समोर बघताना, मी श्रींबरोबर रथात बसले तेव्हा अशीच दिसले असेन का? असंही मला वाटून गेलं! श्रींनी एवढं सगळं जुळवून आणलं होतं, तरीही क्षणाक्षणाला माझी धाकधूक वाढतच होती. एकाच भयानं – नंतर हे समजताच एकदा श्रींना पारखे झालेले बलरामदादा पुन्हा तसे होतील का? एकदा श्रींच्या किरीटात सर्व साक्षीनं बसलेलं बंधुभावाचं मोरपीस पुन्हा निखळून तर पडणार नाही ना?

आता श्रींच्या या अभियानात शक्य तितकं खारीच्या वाटयाचं साहाय्य देणं माझं कर्तव्यच होतं. त्यासाठी मी रेवतीताईंच्या वास्तूकडे काही ना काही कारणं सांगूल फेऱ्या

टाकू लागले. त्यांच्या ते लक्षात येऊन त्या म्हणाल्याही, “किती गं बाई रुक्मिणी तुझं हे सुभद्रेवरचं प्रेम!”

आमंत्रणाप्रमाणं महाराज ककुद्मिन ससैन्य द्वारकेत येऊन उपस्थित झाले. उद्धवभावजीही सोमनाथाच्या शिवालयातील आपलं शिवकार्य करून परतले.

आता नाटयचा चरम परीक्षेचा अंक सुरू झाला. युवराज दुर्योधन लवकरच शुद्धाक्षावर येताहेत, अशी वार्ता आली. सुभद्राही आपल्या सेविका व रक्षक पथकांसह रेवतीताईंच्यासह रैवतकाकडे मार्गस्थ झाली. सोमनाथाच्या शिवालयातील शिवयोग्याने सर्व शिवभक्तांना आशीर्वाद देऊन अंगची भगवी वस्त्रं उतरविली. त्याचा वर्षभराच्या तीर्थयात्रेचा अवधीही संपला होता. या काळात तो तीर्थयात्रेत असूनही त्यानं नागकन्या उलूपीशी उत्तरेत गंगेकाठी गांधर्व विवाह केला होता. उलूपी ही नागराज कौरव्याची कन्या असून बालविधवा होती. तिचा सासरा ऐरावत याने या गांधर्व विवाहाला संमती दिली होती. तसंच मणिपूरचा राजा चित्रवाहन याची कन्या चित्रांगदा हिच्याशीही अर्जुनाचा विवाह झाला होता. विशेष म्हणजे अर्जुनानं उद्धवभावजींकरवी हे सर्व बारकावे माझ्यापर्यंत पोहोचविले होते. एक विनंतीही तो करायला विसरला नव्हता की, हे सर्व असंच सुभद्रेच्या कानी घालून अद्यापही ती या विवाहाला तयार आहे काय, याची कटाक्षानं विचारणा करून घ्यावी. मी ते वेळीच केलंही होतं.

मी हे सर्व असंच एकांती सुभद्रेच्या कानी घातलं. ते ऐकून ती काही क्षण अबोल झाली. विचारात पडली. तसं मी तिला सावध करीत म्हणाले, “अगं किती केलं तरी अर्जुन हा तुझ्या श्रीदादांचा आतेबंधूच आहे. त्याहूनही अधिक पट्ट-पट्टशिष्य आहे. तो गुरूशिवाय अधिक दुसरं–तिसरं काय करणार? भाग्य मान की, याच्या पूर्वीच्या त्याला तीनच पत्नी आहेत. माझ्यासारखं...”

तसं पटकन मान उंचावून मौन तोडत ती म्हणाली, “सुश्री, तुमचा पायाचीही योग्यता नाही माझी. जीवनभर मी तुम्हालाच आदर्श मानत आले आहे. काही झालं तरी मी पांडुपुत्राशीच विवाह करीन.” तिनं कसला म्हणून किंतुच मागे ठेवला नव्हता. असा पक्का निर्धार बोलूनच ती रैवतकाकडे निघून गेली होती.

रैवतकाचं पर्वतीय देवीचं मंदिर पायथ्याशीच होतं. ठरल्या मुहूर्तावर सुभद्रा देवदर्शनासाठी पर्वतमाथ्यावरून रेवतीताई, स्त्री-सेविका व संरक्षक पथकासह खाली उतरली. इथंही मंदिराच्या प्रवेशद्वारात ऋषिमुनी व पुरोहित-ब्राह्मण दाटले होते. सुभद्रा रेवतीताईंसह मंदिरात प्रवेशताच अर्जुनानं आपला कपिध्वजाचा रथ मंदिर आवारात आणून उभा केला. सुभद्रा देवदर्शन करून ताईंसह बाहेर येऊ लागली. इतक्यात श्रींनी ठरविल्याप्रमाणं ककुद्मिन महाराजांचा जयघोष करीत पुरोहित ब्राह्मणांनी रेवतीबाईंना दक्षिणेसाठी घेर टाकला! ही संधी साधून अर्जुनानं आपल्या रथातून मान उंचावून देवदत्त शंख फुंकला. सुभद्रा त्या शंखध्वनीची खूण पकडत कपिध्वजावर दृष्टी जोडत रथाकडे तरातर चालत आली. अर्जुनानंही रथनीड सोडून खाली झेपावत तिला सामोरं येऊन हातजोड देत प्रेमळ अलवारपणे रथात घेतलं. क्षणभरही न थांबता अश्वांना धावणीचा संकेत दिला. तसं चार पांढरेशुभ्र अश्व कुरूंचा धनुर्धर आणि यादवांची कुलकन्या घेऊन रैवतकाच्या पायथ्याहून इंद्रप्रस्थाकडं चौखूर धावू लागले.

श्रींनी योजना आखली होती, तसं निर्विघ्न ‘सुभद्राहरण’ पार पडलं होतं. या यशस्वी अभियानाची वार्ता द्वारकेत येऊन थडकताच मी सुटकेचा नि:श्वास सोडला. द्वारकेच्या यादवांत मात्र हाहाकार उडाला. तरीही शांतपणे श्री आपल्या भगिनीच्या शुभमंगलानिमित्त सुवर्णालंकारदान व गोदान करण्यासाठी दानचौथऱ्यावर चढले. द्वीपद्वारका जवळ करण्यासाठी सौराष्ट्रापर्यंत आलेला कुरुयुवराज दुर्योधन अनावर संतप्त झाला. गुरू असलेल्या दादांना मात्र तो काहीही कठोर संदेश पाठवू शकत नव्हता. म्हणून ‘आम्ही हस्तिनापुराकडे परतत आहोत,’ एवढंच कळवून तो चरफडत ससैन्य परतला होता. द्वारकेला येणं, सुधर्मा सभेत यादवांचा सत्कार स्वीकारणं, हे सध्या तरी त्याच्या भाग्यात नव्हतं. यादवकन्या सुभद्रा तर दूरच राहिली!

अनावर क्रोधसंतप्त झालेले बलरामदादा येऊन थेट दानचौथऱ्याला भिडले. डोळे विस्फारत नेहमीच्या क्रोधतप्त शब्दांत गरजले, “धाकट्या, हे काय नाटक आहे? तू स्वत:ला कोण समजतोस?” क्रोधानं थरथरत असल्यामुळे त्यांच्याकडून पुढे बोलवेचना. तसं शांतपणे नेहमीचं लाघवी हसून प्रथम महाराज ककुद्मिन यांचा व नंतर दादांचा चरणस्पर्श घेत सर्वांनाच चक्रावून टाकणारी ठेवणीची मात्रा श्रींनी बाहेर काढलीच. ते हसतच महाराज ककुद्मिन यांच्याकडे बघत म्हणाले, “वंदनीय महाराज, आपण आम्हा यादवांच्या या युवराजांना नीट समजावून सांगावं की, सुभद्रेला हवा तो वर तिनं स्वेच्छेनं निवडला आहे. धनुर्धर धनंजयानं तिचं क्षत्रियांना अभिमानाचं असणारं रीतसर हरण केलं आहे. यात माझा कसलाही हात नाही – माझ्याकडे कसलाही दोष नाही. तरीही युवराज म्हणून त्यांनी मला कसलीही शिक्षा देण्यापूर्वी मी स्वत:च द्वारका सोडणार आहे! पूर्वी ते जसे मला त्यागून मिथिलेला गेले होते, तसंच मी त्यांच्यासह द्वारका त्यागून इंद्रप्रस्थाकडे प्रयाण करणार आहे. सदासाठी! यापुढे कसल्माही समस्येवरचा परामर्श त्यांनी सासरे म्हणून आपल्याकडूनच घ्यावा!”

या गुणकारी मात्रेनं बलरामदादांचा राजसंताप तत्काल खाली आला. ते समूळ हादरलेच. वृद्ध महाराज ककुद्मिन यांनी पुढे होत श्रींच्या खांद्यावर थोपटून म्हटलं, “द्वारकाधीशा, आपल्या युवराज बंधूंना परामर्श देण्याचा सर्वस्वी अधिकार तुमचा आहे. सुभद्रेची निवड आम्हा रैवतकांना मान्य आहे. मी आजच परतेन. तिथूनच नवदांपत्याला उपहारही पाठवीन. विश्वास आहे. यामुळे तुम्हा बंधूत पुन्हा मतभेद पडणार नाही.” त्यांनी आपल्या बंधूशी कसं वागलं पाहिजे, याचा मूक वस्तूपाठच दादांना दिला. ते काहीच न बोलता ‘सुभद्राहरण’ स्वीकारून मूकपणेच आपल्या कक्षाकडे निघून गेले.

इंद्रप्रस्थाच्या सीमेवर आता आमच्या सुभद्रेचं स्वागत होणार होतं. माझा पूर्ण विश्वास होता की, आपल्या ठायीच्या सुप्त स्त्रीशक्तीचा शोध लागलेली सुभद्राही पांडवांत मानाचं स्थान पटकावणार होती.



# दारुक

## ३

# दारुक

मी दारुक! एक सारथी! स्वामींच्या गरुडध्वज रथाचा. त्यांची माझी पहिली भेट झाली मथुरेत – कंसवधानंतर. आजही मला तो क्षण स्पष्ट आठवतो. अगदी कालच घडून गेल्यासारखा.

मी कसला सारथी? स्वामी खरे सारथी होते. ते तर नेहमीच म्हणत – प्रत्येक माणसाबरोबर नेहमीच एक रथ दौडत असतो – विचारांचा. अगदी झोपेतही. स्वामींनी जीवनभर हजारो, लाखो यादवांच्या विचाररथांचं सारथ्य तर केलंच, पण जिथे–जिथे ते गेले, तिथल्या शत्रुपक्षांच्या लक्षावधींचंही विचारसारथ्य त्यांनी केलं. माझं भाग्य एकच की, असंख्यांचं विचारसारथ्य करणाऱ्या युगंधरांच्या रथाचं सारथ्य मी केलं. तेही एक–दोन दिवसांसाठी नव्हे. त्यांची भेट झाल्यापासून त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत!

स्वामींच्या गरुडध्वजासारखाच त्यांचा जीवनरथही होता. त्यांना गतिमानता अत्यंत प्रिय होती. त्यांचा एक विचार तर सदैव ऐकल्यामुळे मला तोंडपाठच झाला आहे. ते म्हणत – 'लक्षात ठेवा, वाढ व विकास हीच जीवनाची लक्षणं आहेत.' एकदा तर न राहवून मी त्यांना विचारलंही की, 'वाढ म्हणजेच विकास नाही काय?' तसं नेहमीचं लाघवी हसून ते म्हणाले, 'दारुका, वाढ म्हणजे आकाराची – बाहेरची – शरीराची वृद्धी. 'विकास' म्हणजे संस्कारांनी घडविलेली मनाची वृद्धी.' त्यांच्या या जीवनतत्त्वाचा मी पुरेपूर अनुभव घेतला. त्यांच्या भेटीपासून माझ्यात मलाच जाणवावा असा आमूलाग्र बदल झाला.

कुठल्याही गोष्टीचा मुळापासून शोध घेण्याची एक दीक्षा मला स्वामींनी काही न बोलताच दिली. म्हणून तर यादवांच्या शूरसेन राज्यात सारथिसेवेला येण्यापूर्वी आम्ही सारथी मुळचे कुठले याचा शक्य तेवढा शोध मी घेतला. त्याचे धागे मगधातील गंगेकाठच्या प्रदेशापर्यंत पोहोचत होते. स्वामींनी मला जी 'अश्वगीता' शिकविली, ती तर मी कधीच विसरू शकलो नाही.

'घोडा हा सर्वाधिक गतीनं धावणारा प्राणी आहे' असं मी म्हटलं की, हसतच स्वामी माझी चूक सुधारताना म्हणत, 'बंधो दारुक, घोड्यापेक्षा गतिमान आहे ते माणसाचं मन. त्याला वळण लावून वागविणं, हेच खरं सारथ्य. विसरू नकोस. घोड्यांनाही मन असतं! ते डोळे, कान, शेपटीची सळसळ यांतून आपले विचारच बोलत असतात. ते जाणून घेणं हे खरं सारथ्य.'

माझी पत्नी – हयमती – जीवनभर मला सावलीसारखी साथ देणारी. माझ्या दारुकी, हयकेतू, हयग्रीव व दारुकाक्ष या पुत्रांची प्रेमळ माता. आमचा ज्येष्ठ पुत्र दारुकी स्वामींचा प्रथम पुत्र प्रद्युम्नापेक्षा थोडा वडीलधारा होता. तो पुढे त्याच्याच रथाचा सारथीही झाला. आम्हाला एकच कन्या होती. दारुका नावाची. तीही स्वामींच्या

चारुमतीची जिवलग मैत्रीण झाली.

स्वामींच्या विचारांमुळे व प्रेमळ वागणुकीमुळे सर्व जण त्यांच्याकडे आपोआपच ओढले जात. 'द्वारका' हे नव्यानं स्थापन केलेलं जनपद सर्वमान्य व्हावं, ही त्यांची धडपड होती. त्यासाठी ते आपल्या गरुडध्वजातून सिंधू–आर्यावर्तभर चौफेर अथक फिरले. या भ्रमंतीत त्यांची सारथ्यसेवा करण्याचा मला सुयोग लाभला. या सेवेमुळे द्वारकाधीश श्रीकृष्ण महाराज आतबाहेर किती निकोप, निर्मळ आहेत, याचं सर्वांगीण दर्शन मला घडलं. रोजच्या भ्रमंतीसाठी समुद्रकाठी रथातून फिरणं, दोन महाजनपदांतील राजधान्या गाठताना एका लयीत अंतर तोडणं आणि प्रत्यक्ष समरांगणावर शत्रूंच्या शस्त्राघातांत सारथ्य करणं, यात जसं अंतर आहे, तसं कुटुंबवत्सल स्वामी, सामाजिक आर्य, युद्धभूमीवरचे यादवश्रेष्ठ आणि ऋषिमुनींच्या सहवासात तत्त्वचिंतनात लीन झालेले सांदीपनी शिष्य अशा कितीतरी त्यांच्या विविध जीवनच्छटा आहेत.

कुंभातून ओतल्यासारखा धो–धो सरळ कोसळणारा मुसळधार, वायुलहरींवर हिंदळत उतरणारा रिमझिमता, मध्येच थांबणारा, पुन्हा कोसळणारा, उन्ह–पावसाचा खेळ खेळणारा श्रावणी, अशा पर्जन्याच्या असंख्य लयी असतात. अगदी तसंच आमच्या द्वारकाधीश श्रीकृष्ण महाराजांचं जीवन होतं.

हाती कथनाचे सर्व वेग घेऊन हा रथ मी धावडवू बघणार आहे. जमेल का ते मला? यत्न तर करायलाच हवा. माझ्या सारथी डोळ्यांत त्या युगंधर यादवांची मूर्ती मी कशी काय पकडणार? केवढी गगनव्यापी आहे ही मूर्ती! माझ्या सारथी जीवनाच्या गवाक्षातून जमेल तेवढ्या त्या गगनपुरुषाचं दर्शन मी घेणार आहे. तेच तुमच्यासमोर मांडणार आहे. ते दर्शन म्हणजे पूर्ण स्वामी नव्हेत. मी सांगतो आहे ते म्हणजे पूर्ण द्वारकाधीश नव्हेत. त्यांनीच आपल्या प्रिय पत्नी रुक्मिणीदेवी व सत्यभामादेवी यांना एकदा आपल्या सुवर्णतुलेच्या मिषानं पटवून दिलं होतं की, 'भावभक्तीनं अर्पण केलेलं तुलसीपत्रही माझी तुला करू शकतं.' माझं हे कथन म्हणजे त्या तुलसीपत्रासारखंच आहे.

इतर सातही राण्यांहून रुक्मिणीदेवींचा स्वभाव व वागणं वेगळं होतं. त्यांचं दर्शन होताच माझ्या डोळ्यांसमोर सर्वप्रथम उभी राही, ती स्वामींचीच मूर्ती. त्या स्वामींची जशी काही सावलीच होत्या. स्वामींचा जसा जीवनाचा महामंत्र होता – 'प्रेमयोग!' तसाच त्यांची अर्धांगिनी म्हणून रुक्मिणीदेवींचा जीवनमंत्र होता – 'प्रेमयोग' हाच.

अलीकडच्या काळात राणीवशाचं द्वीप स्वामींच्या पुत्र–पुत्रींच्या कलकलाटानं कसं गजबजून गेलं होतं! त्यांच्या आठही राण्यांना एव्हाना दहा–दहा पुत्र झाले होते. बाल यादवांची संख्या ऐंशीवर गेली होती. चारुमतीला काही सापत्न भगिनीही मिळाल्या होत्या.

कुरुक्षेत्रावर सूर्यग्रहणाच्या दिवशी पांडव व त्यांची माता कुंतीदेवी यांची पहिली भेट झाल्यापासून माझ्या स्वामींच्या वागण्यात फार मोठं अंतर आलं होतं. आपल्या अठराकुलीन यादवांपेक्षा ते पांडवांना फार–फार जपत आले होते. त्यातीलच एक महत्त्वाचा टप्पा म्हणून नुकतेच आम्ही द्वारकेहून उपप्लाव्याला गेलो होतो. तेथून स्वामींना गरुडध्वजात घेऊन मी व सेनापती सात्यकी निवडक योद्धयांसह कुरूंच्या हस्तिनापुरात पोहोचलो होतो. या वेळी हस्तिनापूरकरांनी आमचं जे स्वागत केलं, ते मी कधीच विसरू शकणार नाही. स्वामींची ही भेट फार मोलाची होती. कौरव–पांडवांत पराकोटीच्या ताणावर पडलेल्या राज्यभागाच्या यक्षप्रश्नावरून युद्धाकडे सरकू

शकणारा हा क्षण होता. स्वामींची ही हस्तिनापूरची राजशिष्टाईची भेट होती. त्यांना कुरूंच्या सभागृहापर्यंत मी कसंतरी पोहोचविलं. मुंग्यांसारख्या दाटलेल्या हस्तिनापूरकरांचा त्यांना जसा काही वेढाच पडला होता. केवळ कुरू, यादवच नव्हे, तर समस्त आर्यावर्तातील महाजनपदांचं या शिष्टाईतून काय निघतं, या परिणामाकडे उत्सुक लक्ष लागलं होतं.

मी स्वामींना कुरूंच्या सभागृहापर्यंत पोहोचवून, सेनापती सात्यकी व शस्त्रसज्ज योद्धयांच्या अभेद्य मंडलात येऊन बाहेरच थांबलो. सभागृहात त्या दिवशी काय झालं मला समजू शकलं नाही. मात्र घटिकाभरानं पितामह भीष्म, महामंत्री विदुर, मंत्री संजय, महारथी कर्ण, अमात्य वृषवर्मा अशा कुरुश्रेष्ठांच्या सोबतीनं बाहेर पडलेले माझे स्वामी द्वारकाधीश श्रीकृष्ण महाराज यांची चर्या कितीतरी वेगळीच दिसत होती. ती कसलातरी कठोर व अवघड निर्णय घेऊन निर्धारी झाली होती. नेहमी ते वाऱ्याच्या झुळकीसारखे सहज चालत. आज ते मल्लवीर भीमासारखे शरीर तोलून धरत, प्रत्येक पाऊल जसं काही धरतीत रोवूनच चालत आले. मी गरुडध्वज त्यांच्या समीप नेला. स्वामींनी सेनापती सात्यकींना मागील रथात बसण्याचा संकेत केला. कुणालाही कसलीही अपेक्षा नसताना रथात बसलेल्या स्वामींनी आपला डावा हात बाहेर काढून एकटच्या अंगराज कर्णासमोर धरला. त्यांना म्हटलं, “ये महाबाहो! मला तुझ्याशी काही बोलायंच आहे.” महारथी कर्णही कसलेच आढेवेढे न घेता गरुडध्वजारूढ झाले. तसं स्वामी मला आज्ञा देत म्हणाले, “दारुका, रथ सीमेबाहेर घे. आता मात्र कुठेच थांबू नकोस.”

तसं मी माझ्या चारही अश्वमित्रांना त्यांची नावं घेत धावणीचा संकेत केला. रथ उधळला. आमच्या मागून सात्यकी व इतर योद्धयांचे रथ निघाले. मी केव्हाच ताडलं की, स्वामींना अंगराज कर्णाशी काही विशेष बोलायचं आहे. त्यांना एकांत हवा आहे. हा क्षण माझ्या आयुष्यातील एक चिरस्मरणीय क्षण होता. आम्हा सूतांपैकी असून अंगराजपदाला पोहोचलेल्या दानवीर, ब्रह्मास्त्रधारी महारथ्याला स्वामींसोबत वाहून नेण्याचं भाग्य मला मिळालं होतं.

त्या दोघा वीर पुरुषांना हस्तिनापूरच्या सीमेबाहेर एका डेरेदार वटवृक्षाखाली सोडलं. मी दूरवर एका उंचच उंच खदिर वृक्षाच्या छायेत येऊन गरुडध्वजासह थांबलो.

काही कालांतरानं ते दोघेही वीर पुरुष परतले. गरुडध्वजाजवळ आले. स्वामींनी माझ्याकडे बघत आज्ञा केली, “दारुका, अंगराजांना राजनगरात सभागृहापावेतो पोहोचवून ये.” तसं आता स्वामींचा हात आपल्या हातात घेत क्षणैक दाबून तो दानवीर म्हणाला, “नको माधवा, मी जाईन पायीच.” वळून तो पाठमोरा झाला आणि चालूही लागला.

स्वत:शीच बोलल्यासारखे माझे स्वामी पुटपुटले, “आता मात्र खरोखरच महायुद्ध अटळ आहे! चल दारुका.”

स्वामी कर्णभेटीहून आल्यापासून मी विचार करतो आहे. कसकशी फिरत गेली ही वळणं – कुरू, पांडव आणि यादवांमधली! स्वामींसह मी अनेक वेळा ओलांडलेल्या गंगा–यमुनांच्या विशाल पात्रांतून केवढं– केवढं पाणी वाहून गेलं होतं!

या वळणांतील सर्वांत महत्त्वाचं होतं, ते स्वत:ला सम्राट म्हणवून घेणाऱ्या मगधाधिपती ‘जरासंधाचा वध’, हे वळण.

जेव्हा इंद्रप्रस्थात पांडव सुस्थिर झाले, तेव्हाची गोष्ट सांगतो आहे मी. पांडवश्रेष्ठ युधिष्ठिरांच्या मनी राजसूय यज्ञाचा संकल्प असताना घडलेली. आपणाला राजसूय यज्ञ करावयाच आहे, ही गोष्ट पांडवश्रेष्ठानं आमच्या स्वामींच्या कानी घातली. एव्हाना वीर पांडव आर्यावर्ताच्या चारी दिशांना दिग्विजय करून परतले होते. त्यांनी दुभत्या गायी, अगणित संपत्ती, गज, अश्व, उष्ट्र अशा जनावरांचे तांडे, ठिकठिकाणच्या जनपदांनी भेट दिलेले सेवक सैनिक व सेविका इंद्रप्रस्थात आणल्या होत्या. वीर भीमसेन आणि धनुर्धर धनंजय यांचे दिग्विजय अनेक रोमहर्षक युद्धांनी गाजले होते. सर्व पांडवांच्या विजयाच्या वार्ता आम्ही स्वामींसमवेत द्वारकेत ऐकल्या होत्या. इंद्रप्रस्थ आता भरभराटलेलं, गजबजलेलं राजनगर झालं होतं. तसंच पांडवांच्या वंशवृद्धीच्या वार्तांनीही द्वारका आनंदविभोर होऊन उठली होती. त्यात युधिष्ठिरपुत्र प्रतिविंध्य, भीमसेनपुत्र सुतसोम, अर्जुनपुत्र श्रुतकीर्ती, नकुलपुत्र शतानीक व सहदेवपुत्र श्रुतवर्मन असे होते. काही दिवसांनंतर जन्मलेल्या अर्जुनपुत्राच्या वार्तेनं तर द्वारका अत्युच्च आनंदानं मोहरून उठली होती. तो होता, सुभद्रादेवी व धनुर्धर अर्जुन यांचा पुत्र. स्वामींच्या आज्ञेवरून सुभद्रादेवींना मीच या पहिल्या प्रसूतीच्या माहेरपणासाठी द्वारकेत घेऊन आलो होतो. पांडवांच्या आणि यादवांच्या दृढ रक्तसंबंधांचा हा पहिलाच अंकुर होता. स्वामी व बलरामदादा यांना त्याचं मुखदर्शन करताना 'मामा' म्हणून झालेला आनंद अपार होता. माझ्या स्वामींनीच अत्यंत कौतुकानं त्याचं नाव ठेवलं होतं – अभिमन्यू! इंद्रप्रस्थाचा वचक पाचही वीरांनी आर्यावर्तभर पसरविला होता.

इंद्रप्रस्थाहून आल्यापासून माझे स्वामी सुधर्मा राजसभेत फारसे गेले नव्हते. ते आपल्या रथातून उद्धवमहाराजांसमवेत अधिक ते पश्चिमेच्या ऐंद्र महाद्वाराजवळ जात. तिथल्या पाषाणी बैठकीवर बसून आपल्या बंधूंशी घटकान्‌घटका पांडवांचीच चर्चा करीत. या चर्चेत राजसूय यज्ञ व त्यात येणारा – स्वत:ला अजिंक्य म्हणविणाऱ्या – मगधसम्राट जरासंधाचा अडसर याविषयी चर्चा चाले.

उद्धवमहाराजांसमवेत घटकान्घटका चर्चा करूनही स्वामींच्या मनीचा जरासंधाचा अडसर काही निखळत नव्हता. ते अस्वस्थ–अस्वस्थ झाले होते. अशाच एका चर्चेच्या वेळची संध्याकाळची गोष्ट. पश्चिम सागरातून सूर्यदेवाला संध्याकाळचं अर्घ्यदान करून स्वामी उद्धवमहाराजांसह परतत होते. मी त्यांच्यासाठी आणलेल्या रथात बसलो होतो. इतक्यात कुठूनसा एक वयस्क ब्राह्मण त्यांच्या सामोरा आला. दोघांना हात जोडून आदरानं उभा राहिला. स्वामी त्याला काहीतरी सायंदान द्यावं म्हणून विचारात पडले. झटकन त्यांनी कंठातील मौक्तिकमाला हाती घेतली. उद्धवमहाराजांनी पायी बिलगणाऱ्या समुद्रलाटांतील जल त्यावर सोडलं. तसं समोरचा ब्राह्मण लगबगीनं म्हणाला, "मी दानासाठी नाही आलो द्वारकाधीश, आपल्या दर्शनासाठी आलो. सोबत उद्धवमहाराजांना पाहून धन्य झालो. निरपेक्ष व विक्रमी क्षात्र दर्शनाची ही धन्यता ब्राह्मण झाल्याशिवाय नाही ध्यानी यायची." असं म्हणून कृतार्थ झालेल्या त्या ब्राह्मणानं पुळणीच्या वाळूवर दोघांनाही सरळ साष्टांग दंडवत घातले. दोघांनीही त्याला प्रेमानं उठवून मार्गस्थ केलं. मी बारीक निरखलं. स्वामी कसल्यातरी खोलवरच्या विचारांत गेले होते. काही क्षणानंतर आपल्या बंधूचे खांदे प्रेमाने हसून थोपटत स्वत:शीच बोलल्यासारखे पुटपुटले, "उधो, बंधो, जरासंधाचा पेच सुटला एकदा!" मग ते दोघं बोलत राहिले. मी रथ धावडत राहिलो.

दुसऱ्याच दिवशी स्वामी उद्धवमहाराजांसमवेत नौकेतून गरुडध्वजानं द्वारकाखाडी ओलांडून अनर्तात उरतले. मी सोबत होतोच. तशीच निवडक यादववीरांची शस्त्रधारी पथकं होती. आम्ही दशार्ण, मत्स्य असे पडाव टाकत पांडवांच्या इंद्रप्रस्थाच्या सीमेवर आलो. अग्रवार्ता गेल्यामुळे सीमेवर युधिष्ठिरांसमवेत चारही बंधू, राजमाता कुंतीदेवी आणि महाराणी द्रौपदीदेवी, छोटे सर्व पांडवपुत्र अमात्य व सेनापतींसह स्वागताला सामोऱ्या आल्या. वाद्यांच्य गजरात व फुलओंजळी व कुंकुममुठींच्या उधळणीत गरुडध्वजातूनच आम्ही इंद्रप्रस्थात प्रवेश केला. पांडवांच्या राजवास्तूत आलो. पांडवांचे राजपुरोहित धौम्य स्वामींच्या भेटीला आले. त्यांच्या कानाशी कुजबुजत स्वामी म्हणाले, "मुनिवर धौम्य, भीमसेन आणि अर्जुनाला एक–दोन दिवसांत सत्वर ब्राह्मणाची नित्यकर्मं सर्व बारकाव्यांसह प्रात्यक्षिक करवून नीट समजावून द्या. कसलीही त्रुटी राहता कामा नये." समवेतच असलेल्या मला व कुणालाही ते कसल्या योजनेत आहेत, काहीही कळलं नाही.

इंद्रप्रस्थात पांडवांच्या राजवास्तूत आमचा सप्ताहभर निवास झाला. या वास्तव्यात पांडवांच्या अमात्यांकडून समजलं ते अतर्क्य होतं. स्वामींनी मगधसम्राट जरासंधाच्या निःपातासाठी आखलेल्या अभियानाच्या पहिल्या टप्प्यात आम्ही केवळ चौघेच होतो. मल्लवीर भीमसेन, धनुर्धर अर्जुन, प्रत्यक्ष द्वारकाधीश आणि या तिघांचा सारथी म्हणून मी – दारुक.

ती योजना ऐकून मी तर चक्रावूनच गेलो. केवळ चौघांनीच जरासंधाच्या सैन्यसज्ज राजनगरी गिरिव्रजात जाणं म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूच्या दाढेत आपणहून प्रवेशणं होतं. जरासंधानं राजांचा शतशीर्ष यज्ञ करण्यासाठी भोवतीच्या वंग, विदेह, उत्कल, कामरूप, मणिपूर अशा राज्यांतील शहाऐंशी राजे बलात बंदिवान करून कोंडले होते. हस्तिनापूर, इंद्रप्रस्थ, द्वारका येथील पट्टीचे गुप्तचर मगधांची वार्ता उचलण्यासाठी त्या राज्यात जात होते. मात्र परतत काही नव्हते. राजनगर गिरिव्रज तर सात डोंगररांगांच्या कड्यात वसलं होतं. तिथपर्यंत कोणीच पोहोचू शकत नव्हतं.

जरासंधाच्या या अभियानाची गुप्त आखणी इंद्रप्रस्थात झाली. त्यात सर्व पांडव, राजमाता कुंतीदेवी, महाराणी, पांडवांचे सेनापती व अमात्य आणि सामान्यातला सामान्य असा मी एक होतो. स्वामींनीच ही योजना आखली होती. तिचा रोख होता पांडवांतील दोनच योद्धे समवेत घेऊन गिरिव्रजाला जाण्याचा. प्रवासात प्रत्येक पडावावर मागे राहणारे कुशल गुप्तचर पेरायचे होते. मागधांच्या सीमेत प्रवेशताना तिन्ही योद्धे राजवेष सोडून ब्राह्मणवेष धारण करणारे होते!! मगधसम्राट जरासंधाच्याच आमंत्रणावरून शतशीर्ष यज्ञासाठी पाचारण केलेले काशीचे अधिकृत पुरोहित म्हणूनच ते गिरिव्रजात प्रवेशणार होते. मी मागध सारथ्याचा वेष करून, शक्य असेल तेवढं त्यांना राजवास्तूपर्यंत आत नेऊन सोडणार होतो. आजवर गुप्तचरांना जी माहिती कधीच मिळाली नाही, ती हे तिघे वीर योद्धे कौशल्यानं उचलणार होते. सर्व कार्य पूर्ण होताच मागधांच्या अश्वशालेतच वास्तव्य केलेल्या मला संकेत मिळणार होता. मग एके दिवशी मागधांच्या राजपुरोहितांसमोर उभा ठाकून मी निरोप देणार होतो – "काशीच्या मूळ आश्रमात एक महत्त्वाचा विधी असल्यामुळे आलेल्या तिन्ही काशीकर पुरोहितांना काही काळासाठी परत पाठवावं." आले तसे ते तिन्ही योद्धे गिरिव्रजाबाहेर पडणार होते. मग पांडवांचं इंद्रप्रस्थ, द्वारका आणि त्यांची मित्र गणराज्यं एकत्र येणार होती.

जरासंधानं कोंडलेल्या राजांच्या पौरजनांना, त्या राजांच्या मुक्तीचं आवाहन करून त्यांचंही साहाय्य घेणार होती. मगधांवर अटीतटीचा निर्वाणीचा आघात करणार होती. हा अभियानाचा दुसरा टप्पा होता. कोंडलेल्या शहाऐंशी राजांची मुक्तता हा प्रमुख उद्देश होता. त्यासाठी जरासंधाचा नि:पातही अनिवार्य होता.

मला व तिघा वीरांना इंद्रप्रस्थकरांनी निरोप दिला. आम्ही यमुना नदी ओलांडून पांचालांच्या राज्यात उतरलो. आमचा मोठा पडाव इथे पडला. सप्ताहभर पांचालांचा पाहुणचार घेऊन आम्ही गंगा, गोमती, शरयू अशा नद्या ओलांडून मिथिला नगरीत आलो. मागधांच्या सीमेत प्रवेशण्यापूर्वीचा हा आमचा शेवटचा पडाव होता. इथंही आम्ही पंधरवडाभर राहिलो. काही पिढ्यांपूर्वीच्या श्रीरामांचे श्वशुर जनक यांची ही नगरी. आमचे बलरामदादाही इथं काही काळ वास्तव्य करून गेले होते. मात्र जनकांचा वंशज असलेल्या विदेहांचा राजा जरासंधानं बंदिवान केला होता. बालवयाच्या राजकुमाराला गादीवर बसवून, विदेहांचे सेनापती व अमात्य राज्यभार हाकत होते.

शेवटी आम्ही मागधांच्या सीमेवर आलो. पूर्वनियोजित योजनेप्रमाणे मी मागधी सारथ्याचा वेष धारण केला. जुजबी मागधी भाषा आम्ही मिथिलेतच हस्तगत केली होती. माझे स्वामी, पांडुपुत्र पार्थ, बलवीर भीमसेन यांनी अंगावर काशी देशीच्या ब्राह्मण पुरोहितांचे वेष चढविले. छातीवर स्पष्ट दिसतील अशी पीळदार यज्ञोपवीतं घेतली. डुईचा केशसंभार उतरून शेंडीसह घेरा राखलेले, मिश्या सफाचाट केलेले, कपाळ गोपीचंदनाच्या पट्ट्यांनी चर्चिलेले तिघंही वीर आता कितीतरी वेगळेच दिसू लागले. इंद्रप्रस्थातील कुण्याही नगरजनानं अर्जुन, भीमसेनांना या वेषात पाहून मुळीच ओळखलं नसतं. इतकंच काय; माझ्या स्वामींनाही द्वारकेतील कुठल्याही स्त्री-पुरुषानं मुळीच ओळखलं नसतं. दोघेही समोर आसताना मीच घोटाळत होतो. मला स्वामी कुठले व अर्जुन कुठला हेच काही वेळा कळेनासं होई. ते कळावं म्हणून मीच एक कळ शोधून काढली. मिथिलाकरांनी एक पाच घोड्यांचा छोटासा रथ आमच्या सेवेत दिला होता. त्याच्या मागील घेरात भीमसेनाची प्रशस्त गदा, अर्जुनाचा गांडीव हा चाप, स्वामींचं अजितंजय व शार्ङ्ग धनुष्य व नंदक खड्ग एका जाड अस्तरणाखाली झाकून ठेवायला आम्ही विसरलो नव्हतो. विशेष म्हणजे या ब्राह्मण वेषातही कंठातील वैजयंतीमाला घालायला माझे स्वामी चुकले नव्हते. कुणालाही कसलीही शंका येऊ नये म्हणून, अर्जुनाच्या कंठातही त्यांनी अगदी तशीच माला चढवायला लावली होती. मात्र ती वैजयंती नव्हती. कसं ओळखायचं आता दोघांना? त्यासाठी सारथ्य, करताना मी घोड्यांना उद्देशून मध्येच 'मेघपुष्पा, बलाहका' अशी लटकीच साद घालून मागच्या घेरात दृष्टी टाके. ती नावं ऐकताच ज्यांच्या मुद्रेवर हास्य उमटेल, तेच माझे स्वामी; ही मला खूणगाठ पटे!

गिरिव्रजापर्यंत मध्ये लागणारे कितीतरी मागधी चौकीपहारे आम्ही चौरंगी नाट्य खेळत कौशल्यानं पार केले. या प्रवासात कसं वागायचं, याची संहिता इंद्रप्रस्थात स्वामींनीच ठरवली होती.

गिरिव्रज हे सात डोंगररांगांच्या नैसर्गिक तटात वसलेलं मागधांचं अजिंक्य राजनगर होतं. वैभवगिरी, विपुलगिरी, रत्नगिरी, छटागिरी, शैलगिरी, उदयगिरी व सोनगिरी – असे हे गिरी होते. त्यातील विपुलगिरीलाच चित्तगिरीही म्हणत. या सातही

गिरितटांवर जागजागी मागधी सशस्त्र सैनिकांच्या चौक्या होत्या. त्यातील पूर्व तटातील महाद्वाराला 'चित्तगिरी' म्हणत. उत्तरला 'शैलगिरी' व दक्षिणेला 'उदयगिरी' ही महाद्वारं होती. पश्चिमेला होतं, ते 'सोनगिरी' महाद्वार. गिरिव्रजाला फेर धरून पानकण नावाची नदी वाहत होती. 'गोरथगिरी' नावानं ओळखल्या जाणाऱ्या डोंगररांगांच्या पश्चिमेचं कडं पार करून आम्ही गिरिव्रजाच्या प्रशस्त सोनगिरी महाद्वारात आलो. द्वारकेचं शुद्धाक्ष महाद्वारं होतं याहून पुरुषभर हे उंचच उंच. त्यावर अर्ध्या उंचीपर्यंतच्या भागात अणकुचीदार भक्कम लोहखिळे होते. त्यामुळे शे-दोनशे धिप्पाड सैनिकांनाही किकराच्या लाकडी खांबांनी शक्तिशाली धडका देऊनही ते उघडणं शक्य नव्हतं. प्रचंड हत्तींना लोहखिळ्यांवर धडक घालणं शक्य नव्हतं. वरच्या अर्ध्या लाकडी भागावर मागधांनी शक्तिप्रेरक मानलेल्या वनराज सिंह, वराह, रानमहिष यांच्या अंगावर धावून येणाऱ्या मुद्रा खोदल्या होत्या.

हे मागधी महाद्वार ओलांडताच आमच्या चपळ हालचाली सुरू झाल्या. तिघंही वीर रथातून खाली उतरले. महाद्वारालगतचा उंच सोपान चढून कितीतरी मोठे डंके मांडलेल्या उंच डंकाकक्षात पोहोचले. त्यांनी अचानक पिटलेल्या डंक्यांचे नाद गिरिव्रजभर दुमदुमून उठले. त्यातील एक डंका केवढ्यातरी मोठ्यानं दुमदुमला. तो गिरिव्रजालाच नव्हे, तर माथ्यावरच्या मागधी आभाळालाही जसा काही गर्जून सांगत होता – 'मी आलो आहे! मी आलो आहे!' तो डंका पिटत होता, वायुपुत्र भीमसेन!

भेदरलेले कितीतरी मागध नगरजन आणि कुतूहलानं माना उंचावणारे सैनिक डंकाकक्षाच्या पायथ्याशी जमा झाले. एकमेकांत कलकलू लागले. त्यांना समजेना, डंकाकक्षाचा सोपान कसा चढावा? कारण बलवीर भीमसेनानं तो सोपान चढताना ठरल्या योजनेप्रमाणं मागे राहून एक भक्कम पाषाणशिला लावून तो बंद केला होता. सैनिकांतील कुणीतरी याची वार्ता जरासंधाच्या चार दिशांचे म्हणून असलेल्या चार धिप्पाड सेनापतींना दिली. ते वीतभर रुंदीच्या पात्यांची जाड नग्न खड्ग खांद्यावर पेलत डंकाकक्षाच्या पायथ्याजवळ आले. मागधसम्राट जरासंध आपल्या राजवास्तूच्या अंत:पुरी कक्षात मागधी मद्य ढोसून तांबारलेल्या नेत्रांनी नर्तिकानृत्य बघण्यात दंग झाला होता. कधीच न ऐकलेला थरकविणारा डंकानाद ऐकताना त्याच्या हातातील मद्याचा प्याला निसटून खाली पडला. त्यानं डोळे विस्फारूनच आज्ञा केली, "कोण पिटतंय असा चमत्कारिक डंका? घेऊन या त्याला." ही सम्राटांची आशा सेनापतींपर्यंत पोहोचली. एव्हाना चारही सेनापतींनी शे-शंभर सैनिक जोडून डंकाकक्षाचा अडसर झालेली सोपानावरची शिला महत्प्रयासानं हटविली.

जरासंधाचे चारही सेनापती घोटाळ्यात पडले होते. 'शतशीर्ष यज्ञासाठी काशीहून आलेत' म्हणणाऱ्या ब्राह्मण पुरोहितांनी डंकाकक्षावर चढून डंके का पिटावेत? त्यांनी तिघाही ब्राह्मणांना धक्के देत काही वेळातच आपल्या सम्राटांसमोर उभं केलं. एव्हाना सम्राटाचं मद्य कितीतरी उतरलं होतं. त्यानं दरडावून धिप्पाड असलेल्या वायुपुत्रावर डोळे रोखून करडं विचारलं, "कोण तुम्ही? इथं कशासाठी आलात?"

उत्तर मात्र भीमसेनाऐवजी माझ्या स्वामींनी दिलं – चाचरत – घाबरत – "महाराज, आम्ही तीर्थक्षेत्र काशीहून आलोत. आपल्या शतशीर्ष यज्ञाची वार्ता ऐकून. तिघेही चारी वेदपाठक आहोत. यज्ञीय सर्व विधी बारकाव्यांसह जाणतो. कृपा झाली, तर महाराजांचा यज्ञविधी यथासांग सविध पार पाडू. देतील ती दक्षिणा आनंदानं स्वीकारून महाराजांना,

त्यांच्या परिवाराला आशीर्वाद देऊन काशीला परतू.”

“मग त्यासाठी आमच्या राजपुरोहितांना भेटण्याऐवजी, डंके कशाला पिटलेत तुम्ही?”

“महाराज, आपल्या अजिंक्य कीर्ती-डंक्यांची नांदी आम्ही काशीत ऐकली आहे.” अर्जुन मध्येच म्हणाला.

“शिवाय कंसमहाराजांच्या मथुरेतील अनेक धर्मविधींना उपस्थित राहण्याचा सुयोगही आम्हाला लाभला आहे. कसलेही राजसोपस्कार करण्यात विलंब लागू नये, म्हणून माझ्या या बंधूनं डंका पिटून आम्ही आल्याची अग्रवार्ता थेट आपल्या चरणांशी ठेवली आहे. प्रमाद झालाच आहे. सम्राटांच्या विशाल व अजिंक्य अधिकारात क्षमा करावी. धर्मज्ञ असूनही आमची क्षमायाचनेची ही पहिलीच वेळ आहे. प्रत्यक्ष सम्राटांनी ब्रह्मवरांना क्षमा केली नाही, तर ते रुद्रकोपाला कारण ठरेल.” स्वामींनी आपल्या लपेटणाऱ्या वेणुवाणीत हात जोडून, अजिंक्य साम्राटाभोवती पहिलं शब्दजाळं टाकलं.

कुलदेव रुद्र, यज्ञ असे शब्द ऐकून मगधसम्राट जरासंधाची उरलीसुरली मद्यनशाही पार उडून गेली. आपल्या सेनापतींकडे कस्पटासमान बघत जरासंध कडाडला, “कसला विक्रम केलात तुम्ही या निरपराध ब्राह्मणांना बंदिवान करून? या जागी यज्ञासाठी बळी पडलेल्या चौदा बळी द्यायच्या राजांची संख्या भरून काढण्यासाठी कुठल्याही देशीचे तीन राजे आमच्यासमोर उभे केले असतेत तर? तर तुमचा योग्य गौरव केला असता आम्ही. घेऊन जा यांना. दूर देशाहून – काशीहून आलेत. अतिथिशालेत त्यांची व्यवस्था लावा. जा.”

आता माझे स्वामी द्वारकाधीश, वायुपुत्र भीमसेन आणि धनुर्धर अर्जुन यांची पुरोहित म्हणून रीतसर अतिथिगृहात सोय झाली. आमच्या अभियानाच्या कार्यवाहीला सुरळीत प्रारंभ झाला. भीमसेन आणि अर्जुन मागधांच्या चतुरंग सेनेत यज्ञाच्या निमित्तानंच दलप्रमुखांना भेटून मागध सेनेची अचूक वार्ता उचलू लागले. माझे स्वामी आपल्या मिठ्ठास वाणीनं ऐकणाऱ्यांना गुंगवून टाकीत सम्राटाच्या राजवास्तूत अरोध फिरू लागले. त्यांचे सर्वलक्षी डोळे मूकपणेच मागधांच्या सामर्थ्याची बलस्थानं हेरू लागले. तिघांकडून उचललेल्या वार्ता सारथ्यांच्या खास अतिथिगृहातील माझ्याकडे पोहोचू लागल्या. मी त्या मिथिला, कांपिल्यनगर, कुंतिभोजपूर अशा मार्गे पेरलेल्या गुप्तचरांमार्फत सात्यकी, अनाधृष्टी यांना पाठवू लागलो. चांगला सप्ताह उलटला. मध्यंतरी स्वामी जरासंधपुत्र सहदेवाच्या निकट सहवासात गेले होते. मागधांच्या मंत्रिमंडळातील सर्व प्रमुख मंत्रिगण त्यांच्या परिचयाचे झाले होते. सहज बोलताना चारही वेदांतील, उपनिषदांतील संस्कृत दाखले धडाधड देणारे स्वामी सर्वांना आदरणीय झाले होते. सकाली अर्जुनाशी, दुपारी भोजनानंतर भीमसेनाशी व सायंकाळी संध्यावंदनाच्या वेळी स्वामींशी माझी गाठभेट होई. त्या वेळी आम्ही दबक्या आवाजात सौराष्ट्रीत बोलत असू. एकमेकांना घडलेला इतिवृत्तान्त देत असू.

एके दिवशी सकाळी आम्हा तिघांना स्वामी द्वारकाधीशांनी अंतिम निर्णय सांगितला. इथलं कार्य आटोपलं आहे. आता लवकरच गिरिव्रज सोडायचं आहे. अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याला प्रारंभ करायचा आहे. इथून प्रथम भीमसेन आणि पार्थ बाहेर पडतील. पाठोपाठ दुसऱ्याच दिवशी मी व दारुक इथून बाहेर पडणार आहोत. निश्चित केव्हा निघायचं ते लवकरच सांगेन. मिथिलेत पुन्हा एकत्र भेटायचं आहे. फार

दिवसानंतर स्वामी नेहमीचं लाघवी हसले. त्याचा अर्थच होता, हे अभियान आता निर्विघ्न पार पडत आलं आहे.

नेहमीच्या या नियोजित भेटीनंतर मागधांच्या अश्वशालेतून आम्ही पांगलो. माझ्या तरी मनावरचं गेल्या कित्येक दिवसांतलं मणामणांचं ओझं स्वामींचं हास्य बघूनच दूर झालं होतं. नव्या उत्साहानं आता चांगले परिचित झालेल्या मागध पौरजनांचा मी तात्पुरता म्हणून निरोपही घेतला. त्यांना सांगितलं, "आमच्या काशीच्या मूळ आश्रमात असाच एक मोठा यज्ञ आमचे गुरू करणार आहेत. तो उरकून पंधरवड्यातच आम्ही परतणार आहोत."

पण... पण... मी आयुष्यात कधीच विसरू शकलो नाही, अशी संध्याकाळ त्या दिवशी गिरिव्रजाच्या डोंगररांगांवर उतरली. पुरोहित म्हणून आलेले तिन्ही काशीकर गुप्तपणे दलप्रमुखांना भेटताहेत, चतुरंगदल सेनेत फिरताहेत म्हणून सम्राट जरासंधाला आम्हा चौघांचीही काहीएक शंका आली. तसा तो आपल्या अमात्यांसह, चारही सेनापतींसमवेत दणादण पाय आपटत स्वतः मागधांच्या अतिथिगृहात आला.

अतिथिगृहाच्या प्रवेशद्वारातून आत येताच तो कडाडला, "कुठं आहे तो मथूरेचा पळपुटा गवळट? गोमंतावर धोका देणारा कपटी? कसला यज्ञ करण्यासाठी आलाय तो इथं? माझ्या शतशीर्ष यज्ञाचा प्रारंभ मी त्याचंच मस्तक छाटून करणार आहे. आजवर त्याचा पिच्छा पुरवत मी मथुरा, गोमंतापर्यंत धापावलो. आता अनायासे तो माझ्या मुठीतच आपणहून आला आहे. सेनापती सामोरं घाला त्याला माझ्या – त्याच्या सोबत्यांसह." एका सेनापतीनं आतल्या कक्षात जाऊन तीनही काशीकर पुरोहितांना खेचूनच बाहेर आणलं.

प्रथम अर्जुनासमोर उभा राहून मगधसम्राट कडाडला – "सत्य बोल. तू कोण आहेस काशीकर की इंद्रप्रस्थकर?"

न डगमगता धनुर्धर अर्जुन उत्तरला, "मी काशीकर पुरोहित आहे. सम्राटांच्या यज्ञविधीसाठी गुरूंच्या आज्ञेनं आलो आहे."

तसं पुढे सरसावून अर्जुनाचा उजवा बाहू पकडून त्याच्या उजव्या हाताचा अंगठा व तर्जनी अर्जुनासमोर नाचवीत सम्राट गर्जला, "तुझ्या हाताला हे घट्ट कसले? यज्ञात दर्भाच्या जुड्या अर्पून पडलेत काय ते? खोटारड्या, स्वतःला धनुर्धर म्हणवून घेणारा इंद्रप्रस्थाच्या युधिष्ठिराचा तू नगण्य बंधू अर्जुन आहेस." तिरस्कारानं अर्जुनाचा हात खाली फेकत त्याच्या वक्षावरील यज्ञोपवीत घट्ट धरून त्याला गदागदा हलवीत सम्राट तडतडला, "बोल, इंद्रप्रस्थाच्या पोरकट धनुर्धरा, आहेस तयार या सम्राटाशी प्राणांत द्वंद्वयुद्ध खेळायला?"

"अवश्य! पण गुरूची आज्ञा झाली, तर." धीरोदात्त अर्जुन त्यानं चुरगळलेलं यज्ञोपवीत पुन्हा नीट करत शांतपणे उत्तरला.

भीमसेनासमोर तसंच उभा राहून त्याच्या उघड्या, उजव्या खांद्यावरच्या गदा पेलून-पेलून उमटलेल्या डागावर बोट ठेवत जरासंध गर्जला, "तुझ्या खांद्यावर हा काळा डाग कसला? यज्ञासाठी समिधांच्या पाट्या वाहून तो उठलाय काय? कुणाला बनवतोस इंद्रप्रस्थाच्या खादाड भीमा? आहेस तयार द्वंद्वयुद्धासाठी?" भीमसेनानं कंठाभोवती लपेटलेलं उपरणं खेचून त्यानं विचारलं.

संतापानं भीमसेनानं समोरच्या सम्राटाच्या मानेलाच हात घातला. त्याला भूक जशी

आवरत नसे, तसाच संतापही. नेहमीसारखं हसतच भीमसेनाचा हात मागे घेत द्वारकाधीश सम्राटाला म्हणाले, "स्वत: राजा असून निरपराध शहाऐंशी राजांना बळी देण्यासाठी बंदिवान करणाऱ्या महापराक्रमी वीरा! आर्यावर्तात जाईल तिथं अजिंक्य म्हणून डंका पिटणाऱ्या अहंमन्या, तुझा खरा अपराधी मी आहे. वसुदेवपुत्र – यादवांचा श्रीकृष्ण. मलाही तू असंच द्वंद्वयुद्धाचं आव्हान देणार काय?"

माझ्या स्वामींनी त्याचं उत्तर अपेक्षित धरूनच त्याला प्रश्न टाकला होता. तो अर्जुनाला आव्हान देत त्याच्याशी बोलत असतानाच चपळाईनं भीमसेनाला एक कुजबुजता कानमंत्रही दिला, 'वैजयंतीवरून हात फिरविताच तू त्याला आव्हानानं अंगावर घे!'

स्वामींचा वध करण्यासाठी सतरा वेळं मथुरेवर चालून गेलेला तो अरेराव सम्राट उन्मत्तपणानं म्हणाला, "माझ्या जामाताचा वध करणाऱ्या नराधम गवळटा, तुला आज मी सोडणारच नाही! तुला काय, तुम्हा तिघांनाही आता गिरिव्रजाबाहेरची वाट दिसणार नाही. गवळ्यांच्या कपटी, काळ्या नायका, होय – माझं तुला निर्णायक द्वंद्वयुद्धाचं आव्हानच आहे. तुला वधल्याशिवाय माझ्या पितरांना मुक्ती मिळणार नाही." त्यानं माझ्या स्वामींसमोर चक्क दंडच थोपटले. आम्ही मागधांच्या राज्यात आल्यापासून हा तर निर्वाणीचा क्षण समोर उभा ठाकला. तसं या क्षणीही हसून स्वामी म्हणाले, "सम्राट एकाच वेळी आम्हा तिघांशी द्वंद्व खेळणार आहेत की काय? द्वंद्वाचा प्राथमिक नियमही सम्राटांना माहीत नाही, असं म्हणावं की काय?"

जरासंध जरासाच गोंधळला. तरीही कडकडत त्यानं विचारलं, "कसला नियम गवळ्या?"

"एका वेळी एकाशीच प्राणांतक युद्ध खेळलं जाऊ शकतं हा! माझी तयारी आहे आपल्याशी द्वंद्वयुद्ध खेळायची!" हसतच स्वामींनी आपल्या कंठातली वैजयंतीमाला कुरवाळली. एव्हाना फुसफुसत याच क्षणाची प्रतीक्षा करणारा भीमसेन पुढे झाला आणि केवढ्यातरी मोठ्यानं कडाडला, "हा कसला अजिंक्य मल्लवीर आणि सम्राट? तुला पळपुटा म्हणणारा हाच मोठा पळपुटा आहे – गोमंतावर यानं दुसरं काय केलं? मी कुंतीपुत्र भीमसेन याला निर्णायक द्वंद्वयुद्धाचं आव्हान देतो आहे. असेल तो सम्राट आणि असेल त्याचं सामर्थ्य, तर त्यानं हे स्वीकारावं! नसेल, तर आपला पराजय मान्य करावा."

'जैऽऽऽ जै इडादेवीऽऽ माता कुंती – भवानीदेवीऽऽ' दातओठ खात भीमसेनानं फुसफुसत आपले भरगच्च लोहदंड थोपटले.

मागधांच्या जरासंधाला डोळ्यांत डोळे घालून आजवर समक्षच असं ललकारणारं आव्हान कुणीही दिलेलं नव्हतं. अनावर क्रोधानं नाकपुड्या विस्फारत प्रतिआव्हानाचा दंड थोपटून जरासंध गर्जला, "घेतलं तुझं हे आव्हान इंद्रप्रस्थाच्या खादाडा!" एव्हाना कंठाभोवतीचं उपरणं भीमसेनानं फेकूनही दिलं. कटीच्या लाल किनारी धोतीचा काचा कसून कक्षाबंधन करून तो सिद्धही झाला. त्याच्या भरगच्च मांड्यांचे स्नायू आकुंचन-विस्तरण करीत लकलकले. दोघेही मल्लवीर प्रथम चढाईपूर्वीचा पवित्रा घेण्यासाठी दोन-चार पावले मागेही हटले. आता ते दोघेही डुरकणाऱ्या पुष्ट सांडांसारखे दिसू लागले.

स्वामींनी जरासंधावर फेकलेलं जाळं अचूक आवळलं होतं. भीमसेनाचं डिवचणारं द्वंद्वयुद्धाचं आव्हान स्वीकारून तो मोकळा झाला होता. आता पुढे काय घडेल कुणालाच सांगता येणार नव्हतं. कपाळावर घामबिंदू तरारलेले ते दोघेही मल्ल अतिथिशाळेचाच

आखाडा करून टाकणार होते. दोघेही केव्हाच भोवताल विसरले होते. दंड-मांड्या थोपटत ते एकमेकांना अथक ललकारू लागले.

क्षणांत पुढे होऊन दोघांच्या मध्येच ताठ व पाय रोखून उभं राहत हसतच द्वारकाधीश दोघांना म्हणाले, "तुम्ही दोघेही खंदे मल्लवीर आहात. द्वंद्वाचा अर्थ दोघेही जाणता. द्वंद्व म्हणजे स्पष्ट विजय किंवा मरण. रोजच्या सरावासारखं ते खेळलं जाऊ शकत नाही.

"त्यासाठी रीतसर मल्लयुद्धाचा शास्त्रसंमत आखाडा गिरिव्रजाच्या राजवास्तुसमोर सिद्ध करावा लागेल. या ऐतिहासिक द्वंद्वयुद्धाचा निष्पक्ष निर्णय देण्यासाठी तज्ज्ञ पंच नेमावे लागतील. त्यासाठी उदयीक सकाळ पावेतो तुम्हा दोघांनाही थांबावं लागेल. तुमच्या इच्छेचा इथं प्रश्न नाही. द्वंद्वयुद्धाचे हे अटळ नियम आहेत."

एवढा अरेराव मगधसम्राट; पण तो माझ्या स्वामींचे बिनतोड उद्गार ऐकताना काहीसा शांत झाला. भीमसेन तर त्यांचा अनुयायीच होता. दोघांनीही हा निवाडा मूकपणेच मान्य केला. वायुपुत्र भीमसेन आणि मगधसम्राट जरासंध यांचं निर्णायक द्वंद्वयुद्ध ठरलं. ही वार्ता वायूच्याच गतीनं नुसत्या गिरिव्रजात नव्हे, तर भोवतीच्या मगधसाम्राज्यात चौफेर सर्वत्र पसरत चालली.

दिवस प्रहरांनी चढू लागला आणि या रोमांचक, श्वासरोधक, ऐतिहासिक द्वंद्वयुद्धाचे साक्षीदार होण्यासाठी मगधकर स्त्री-पुरुषांचा जनसागर गिरिव्रजातल्या राजवास्तूमोरील आखाड्याभोवती एकवटला. संमिश्र आवाजांचा प्रचंड कलकलाट माजला. आखाड्याभोवती ज्या आसनावर माझे स्वामी अर्जुनाशेजारी बसले होते, तिकडे काही नगरजन अंगुलिनिर्देश करून दुरूनच 'श्रीकृष्णमहाराज' कोण, ते दाखवीत होते. जसे मथुराकर कंसाच्या अन्यायाला कंटाळले होते, तसेच हे मगधकर जरासंधाच्या निर्दय, निर्मम राजवटीला उबगलेले होते. आखाड्याभोवती राजमंडळाच्या कक्षात कंसपत्नी अस्ती आणि प्राप्ती आपल्या निवडक सेविकांसह बसल्या होत्या. तरुण वयाचा, भारदस्त शरीरयष्टीचा, पित्याच्या अन्यायी राजवरवंट्याला धैर्यानं स्पष्ट विरोध करणारा राजपुत्र सहदेवही बसला होता. त्याच्या विरोधामुळेच पित्याच्या राज्यात तो दुर्लक्षित झाला होता. जरासंधाच्या विराट सेनेचे दलप्रमुख जमलेल्या जनसागरात ठिकठिकाणी खड्ग, गदा, मुसल अशा शस्त्रांसह फिरत होते. ते संख्येनं एवढे असूनही जमलेल्या जनसागराचा कलकलाट क्षणभरही रोधू शकत नव्हते. आजचा दिवसच गिरींनी वेढलेल्या या राजनगरात चिरस्मरणीय ठरणार होता.

आपल्या राजमंडळासमोरच पश्चिमेकडे पुढा करून अजिंक्य सम्राट, अजोड मल्लवीर, बृहद्रथपुत्र जरासंध उभा होता. कसलेल्या केवल विटकरी लंगोट्यावर तो कक्षाबंधनात उभा होता. त्याच्या पोटरी, मांडी, दंड, भरदार वक्ष यांचे पीळदार स्नायू करंजेलाचं मर्दन केल्यामुळे झमझम तळपत होते. सर्पाच्या वेटोळ्यासारखे जागीच डौलदार फिरत होते. त्यानं काही बैठका हलकेच घेऊन अंग गरम केलं. तसं पाण्यातील ढेकूळ फुलत जावं, तसे त्याच्या उभ्या देहाचे स्नायू फुगत चालले. सम्राटाचं हे दर्शन सर्वांना दुर्मीळ होतं. आपल्या कुलदेवीचा जयकार उठवीत, डरकाळ्या देत हात उंचावून तो जागीच काही क्षण थयथय नाचला. भीमाला खाऊ की गिळू, अशा क्रोधानं पेटलेले त्याचे विस्फारलेले भोकरडोळे नुसती आगच आग ओकत होते. त्याचं धिप्पाड, आक्रमक दर्शन प्रचंड भयावह होतं.

माझ्यासमोर थोड्याशा उंच लाकडी बैठकीवर द्वारकाधीश बसले होते. त्यांच्या डाव्या

हाताशी धनुर्धर धनंजय बसला होता. दोघेही अद्याप ब्राह्मणवेषातच होते. तरीही साध्या वेषातील त्यांच्या अपार आत्मविश्वासी, तेज:पुंज मुद्रा असंख्यांचं लक्ष वेधून घेत होत्या. दोघांच्या मागे मी उभा होतो. सर्वांच्या सारखीच माझ्या मनात द्वंद्वाचा निर्णय काय लागणार याची अपार उत्कंठा होती.

आम्ही भीमसेनांना समोर ठेवून आखाड्याच्या पश्चिमेला होतो. आमची तोंडं पूर्वेला होती. आम्हाला आमचा 'मल्लवीर' भीमसेनही असा कधीच बघायला मिळाला नव्हता. पिकल्या लिंबासारखा त्याचा वर्ण करंजेलाची मात्रा दिल्यामुळे दृष्टी ठरणार नाही, असा झमझम तळपत होता. पोटरी, मांड्या, दंड, वक्ष यांचे त्याचे पीळदार स्नायू त्याच्या साध्या खाकरण्याबरोबरही जागजागी गचागच आकसून पुन्हा विलग होत होते.

त्यानंही आपला लोहकांबेचा मल्लदेह उष्ण करून घेण्यासाठी काही चटक्या बैठका मारल्या. हां-हां म्हणता त्याचं शरीर टराटर फुगू लागलं. एरवीपेक्षा तो दुप्पट दिसू लागला. झेपावत भीमसेन एवढा प्रचंड देह घेऊन आखाड्याच्या दोरखंडावरून सहज छलांग घेतच आत उतरला. दोन्ही हात वर करून कधी डाव्या एकाच पावलावर उभा देह तोलून, थयथय नाचून चार एक पावलं पुढे जात तो मध्येच थांबू लागला. चौफेर फिरून मगधकरांना नम्र अभिवादन करू लागला. त्याचा विनय बघून चोहोबारजूंनी टाळ्यांचा पाऊसच पाऊस पडला. क्षणभर थांबून पुन्हा उजव्या एकाच पावलावर आपला विशाल देह सावरून चार पावलं तसाच तो पुढे गेला. असं त्यानं आखाड्याचं सगळं मंडल पूर्ण करून पुन्हा पहिली जागा घेतली.

अंगी सम्राटपदाचा टेच असलेला जरासंध दोन्ही हात वर करून आपलंही आखाड्याचं मंडल घेऊन पहिल्या जागी उभा ठाकला.

भीमसेनानं 'जयऽ माता कुंती जयऽ भवानीदेवीऽ' असा गगनभेदी घोष करत समोरच्या जरासंधाला ललकारत आपल्या लोहदंडावर दणदणीत शड्डू ठोकला. त्याच्या उठलेल्या कडाडत्या ठपकारानं कित्येक बघ्या मगधकरांच्या अंगावर काटाच काटा तरारून आला.

समोरून जरासंधानंही तसाच प्रतिआव्हानाचा शड्डू ठोकला.

प्रमुख पंच पुरोहितांनी दोघाही मल्लवीरांच्या हातात ललकारीची माती दिली. क्षणात ते बाजूला हटले. पुन्हा दोन्ही बाजूंनी दंड-मांड्याचे दणाणते शड्डूच शड्डू उठले. दोन्ही मल्ल योद्ध्यांची भोपळ्यासारखी गोल गरगरीत मस्तकं एकमेकांना भिडली. परस्परांचं सामर्थ्य ताडण्यासाठी दोघांनीही एकमेकांच्या पुष्ट ग्रीवांवर हातपंजांचे बळकट प्रहार केले. एका अशरण चिवटपणानं थरारक, रोमहर्षक द्वंद्वयुद्धाला प्रारंभ झाला. डोळ्याडोळ्यांत प्राण एकवटून असंख्य जीव एका घनघोर द्वंद्वयुद्धाचे साक्षीदार झाले.

हा दिवस होता, कार्तिक शुद्ध प्रतिपदेचा. गिरिव्रजावर दाटून आलेलं दाट धुकं निवळून आता पार नाहीसं झालं होतं. माझ्या मनात अद्याप एकच प्रश्न अधूनमधून उठत होता – भीमसेनाचं आव्हान स्वीकारण्यामागे जरासंधाचा काय राजकीय आडाखा असावा? त्यानं आग्रह धरून अर्जुन किंवा माझ्या स्वामींना यासाठी निवडलं नव्हतं. त्याची पक्की खातरी होती, भीमसेन हेच उरलेल्या दोघांचं पहिलं बळकट संरक्षक कवच आहे. स्वत:च्या मल्लविद्येवर त्याचा प्रचंड विश्वास होता. त्या बलावर भीमसेनाचं संरक्षक कवच फोडून काढताच त्याला राहिलेल्या दोघांना बंदिवान करायचं होतं. मग

इंद्रप्रस्थाला आणि द्वारकेला विशेष दूत पाठवून निरुत्तर करणारा निरोप धाडायचा होता. ‘तुम्हाला तुमचा काळा गवळी आणि त्याचा तसाच शिष्य जिवंत पाहिजे असेल, तर तुमच्या दोन्ही राजांनी – युधिष्ठिर, वसुदेवांनी – प्रत्यक्ष गिरिव्रजात यावं.’ ते दोघेही अभिषिक्त महाराज होते. त्याच्या यज्ञात बली चढवायला योग्य होते! हा निरोप ऐकून स्वामी व अर्जुनाच्या प्रेमापोटी इंद्रप्रस्थाचे महाराज युधिष्ठिर आणि आमचे महाराज वसुदेवबाबा यांना समक्ष गिरिव्रजात यावंच लागलं असतं. ते येताच त्यांना बलींची संख्या पूर्ण करण्यासाठी बंदिवान राजांच्या कारागृहात तो कोंडून टाकणार होता.

दिवस पूर्ण मस्तकावर आला. मागधी डंक्यांचा प्रथम हलकल्लोळ उठला. चपळाईनं पंच प्रथम दूर होताच दोन निष्णात मल्लवीर योद्ध्यांची गर्जत्या वनराज सिंहासारखी थरारक पंजेफाड सुरू झाली. मध्येच दणादण शड्डू ठोकत एकमेकांच्या पुष्ट मानांना भक्कम हातवेढे टाकत, हिसडे देत ते लढू लागले. अभ्याकर्ष आणि आकडी या खडाखडीच्या डावपेचातच त्यांचा पहिला संपूर्ण दिवस गेला. सांजवात आल्यानं कलकलणाऱ्या विविध पक्षयांचे थवे कोटरांकडे परतू लागले. तबकाएवढं लालभडक सूर्यबिंब गिरिव्रजाच्या पश्चिमेच्या डोंगरशिखराला येऊन भिडलं, तसं प्रमुख पंचांनी आकाशाकडे तोंड करत एक भलामोठा शंख फुंकला. तो दिवस समाप्तीचा संकेत होता. दोन्हीही मल्लवीर दोन-तीन वेळा तो शंखनाद ऐकून मग कुठं भानावर आले! एकमेकांपासून विलग झाले.

दुसऱ्या दिवशी दिवसफुटीबरोबर डंका, रणवाद्ये, रणशिंगे, हलग्या, भेऱ्या, दुदुंभ्या यांच्या संश्रिम कडकडाटात मल्लयुद्धाला पुन्हा प्रारंभ झाला. आदल्या दिवसाची वार्ता मगध राज्यात चहूकडे पसरल्यामुळे कालच्यापेक्षा आज प्रेक्षक स्त्री-पुरुषांची संख्या वाढली होती. त्यांचा अनावर कलकलाट मात्र दोघा मल्लवीरांची मस्तकं एकमेकांना भिडताच चिडिचाप झाला. आता दोघांनीही एकमेकांच्या सामर्थ्याची नीट कल्पना येऊन चुकली होती. कालचे डावपेच ते सावधपणे आज टाळत होते. अवरोध, रजकपृष्ठ अशा नव्याच डावपेचांचा अवलंब करत होते. दातओठ खात, डरकाळ्या फोडत एकमेकांना नाना प्रकारे भिडत होते. आता प्रेक्षकांतही भीमसमर्थक व सम्राट जरासंधसमर्थक असे दोन तट आपोआपच तयार झाले होते. ते आपापल्या मल्लवीराला प्रेरणा-प्रोत्साहन देण्यासाठी आलटून-पालटून नाना प्रकारे अरोध कल्लोळत होते. मी, धनंजय, द्वारकाधीश, अखाड्यातील पंच, उपपंच, राजमंडळातील स्त्री कक्षातील कंसपत्नी, अस्ती, प्राप्ती, पुरुषकुलातील राजपुत्र सहदेव, अमात्य, मागध मंत्रिगण, जमलेले सर्व स्त्री-पुरुष प्रेक्षक, सर्वांचीच दृष्टी दोघांवरच अचल स्थिरावली होती. अखाड्यातील भान हरपलेल्या पांडव मल्लवीर वायुपुत्र भीमसेनावर आणि तोडीस तोड झुंजणाऱ्या मगध सम्राट जरासंधावर. याही दिवसाची संध्याकाळ गिरिव्रजातील राजवास्तूसमोरच्या आखाड्यावर उतरली. मल्लयुद्धाचा निर्णय काही झाला नाही.

एक नव्हे, दोन नव्हे सतत तेरा दिवस हा संघर्ष अथक चालला होता. महापुरातील शोण नदीचं पाणी क्षणाक्षणानं वाढत जावं, तशी दररोज प्रेक्षकांची संख्या फुगत चालली. त्यामुळे आखाड्याभोवतीचा परिसर तर भरलाच; पण त्याबाहेरील प्राकारही खचाखच भरला. पहाटेपासून चाललेला नानाविध वाद्यांचा संमिश्र स्वरकल्लोळ मल्लवीरांची मस्तकं एकमेकांना भिडताच ठरल्यासारखा सवयीमुळेच बंद झाला. मला एकाच गोष्टीचं आश्चर्य वाटत होतं की, गेले तेरा दिवस भीमसेन- जरासंध एकमेकांशी अटीतटीचं

मल्लयुद्ध खेळले होते. तरीही ते अजिबात थकले- शिणलेले दिसत नव्हते. त्यांच्या निथळत्या देहावर घामशोषक रक्षेच्या ओंजळी टाकून-टाकून पाचही पंच मात्र आता थकलेले दिसत होते.

तेरावा दिवसही निर्णयाशिवाय गिरिव्रजाच्या डोंगराआड मावळला. आता तर राजनगराच्या घराघरांत एकच एक चर्चा चालू होती – निर्णयाशिवाय रेंगाळलेल्या मल्लयुद्धाची. कोण जिंकणार याची. रोज रात्री मला आमच्या अतिथिगृहात कुणाला कधीच बघायला न मिळणारं दुर्मीळ दृश्य दिसत होतं, प्रत्येक दिवशी भीमसेनाच्या मल्लयुद्धात कुठं-कुठं उणिवा राहिल्या, हे द्वारकाधीश त्याला प्रात्यक्षिक करून पटवून देत होते. भीमसेनही आपले विशाल नेत्र विस्फारून ते ऐकताना म्हणत होता, "श्रीकृष्णा, तुझं हे सांगणं अगदी थेट माझ्या गुरुदेव बलरामांसारखं आहे. तुला तर मल्लयुद्ध खेळताना मी कधी पाहिलं नाही. कुठं शिकलास हे सर्व?" तसं हसून स्वामी म्हणत, "ते जाणून घेण्यासाठी तुला गोकुळात जावं लागेल. माझ्या केलीनंदकाकांना भेटावं लागेल." या वेळी भीमसेनाच्या तळपायांना तेल चोळीत बसलेला अर्जुन दोघांचं बोलणं ध्यानपूर्वक ऐकून घेई. अर्धा-एक घंटा थंड पाण्यानं स्नान केलेला, अंगावरचा राख-मातीचा थर दगडी कपचीनं खरवडून काढलेला श्रांत भीमसेन, डोळ मिटते घेऊन आस्तरणावर चक्क घोरू लागलेला असे! त्याच्या एका बाजूला द्वारकाधीश व दुसऱ्या बाजूला मी त्याच्या दंड-मांड्या, वक्षाचं मर्दन करीत असू. त्यासरशी भीमसेनांची घोरण्याची लय कितीतरी वाढलेली असे. मध्यरात्रीच्या वेळी द्वारकाधीश त्याला गदागदा हलवून उठविण्याचा यत्न करीत. तो नुसताच कूस पालटून त्यांना दाद काही देत नसे. मग स्वामी मला एका वस्त्रात बांधून खुंटाळीला टांगलेला पांचजन्य शंख आणायला सांगत. माझ्याकडे डोळे मिचकावून बघत हसतच तो शंख एकदाच आकाशगामी बघत जोरदारपणे फुंकत. त्यासरशी एवढा घोरणारा भीमसेन एकदम ताडकन उठून बसे! आपल्या देहावर दृष्टी फिरवत साक्षात द्वारकाधीशांनी, आपल्या मामेबंधूंनी आपल्या देहाचं मर्दन केलंय हे ध्यानी येताच लहान बालकासारखा वरमून म्हणे, "श्रीकृष्णा, पुन्हा जर का तू माझ्या देहाचं मर्दन केलंस, तर मी हे द्वंद्व खेळणारच नाही. चक्क पराजय स्वीकारून मोकळा होईन."

स्वामी भीमसेनांना म्हणत, "ते तुला चालेल भीमसेना. मला नाही चालणार! तुझ्या हस्ते भरपूर काही करवून घ्यायचं आहे मला. शिवाय तुम्हा सर्व बंधूंची प्रिय पत्नी द्रौपदी माझी भगिनी आहे – सखी आहे. तिला तरी ते चालेल का?"

भीमसेन 'नाही' अशा अर्थाची मानी डोलवी. तसं माझे स्वामी स्वत: तयार केलेल्या थंडगार, मधुर पौष्टिक थंडाईची कासंडी भीमसेनासमोर धरत. ती हाती घेऊन नरडीची टपटपीत घाटी गटागट वर-खाली करत भीमसेन ती रिचवून टाकी. मग मान मागे टाकून खळाळून हसे. भीमसेनाला कासंडी रिचवू दिल्यावर द्वारकाधीश खोचकपणे म्हणत, "बाकी तू तुझ्या गुरुदेवांकडून मान मागे टाकून खळाळत हसण्याची कलाही बरी शिकला आहेस भीमसेना!" गिरिव्रजाच्या या अभियानात मला स्वामींच्या ठायीच्या दोन-तीन गुणांचं नव्यानं दर्शन झालं. ते केवढ्यातरी कठीण प्रसंगात आपली निर्धारी वृत्ती व तजेलदार विनोदबुद्धी काही हरवू देत नव्हते. जीवनभर कर्म करणं – तेही निरपेक्ष – हेच माझे स्वामी मानत आले होते.

एव्हाना मगध राज्यासह उत्तर आर्यावर्तात गाजलेल्या थरारक मल्लद्वंद्वाचा चौदावा

दिवस उजाडला.

उगवतीच्या तळपत्या सूर्याला साक्षी ठेवून शड्डू आव्हानांच्या दणदणाटात द्वंद्वाला प्रारंभ झाला. गंडस्थळातून मदरस पाझरणाऱ्या मत्त रानगजांसारखे भीमसेन-जरासंध डरकालत एकमेकांना भिडले. भोवती लक्षावधी प्रेक्षकांची गर्दी होती; तरीही शांतता पसरली. आज तर दोघांनीही विशेष ठेवणीतील पूर्वी न वापरलेले डावपेच बाहेर काढले.

दोघांचंही शरीरसामर्थ्य तर अजोडच होतं, आता त्यांची बौद्धिक चपळाईही दिसू लागली. भीमसेनानं कीलवज्रनिपात हा डावपेच बाहेर काढला की, एवढा धिप्पाड जरासंध तत्पर चपळाईनं त्याला अवरोध डावानं तत्पर उत्तर देऊ लागला. जरासंधानं भीमसेनाच्या छातीखाली आपली विशाल पाठ भिडवून त्याला रजकपुष्ठावर धुण्याच्या पिळ्यासारखं आदळण्यासाठी घेतलं की, भीमसेन चपळाईनं रानवेलीनं खदिर वृक्षाच्या खोडाला सर्पतिढा घालावा तसं त्याच्या पायाला लपेटता वेढा घालून त्याला हताश करू लागला. जमलेले लाखो प्रेक्षक त्यांच्या हातापायांची निसटतीसुद्धा हालचाल डोळ्यांत प्राण आणून निरखू लागले. आपला केवढातरी प्रचंड घोटीव देह चपळाईनं वाकवीत भीमसेनानं एखाद्या डावाची सरशी घेतली की, भीमसेनसमर्थक लाटेसारखे उभे राहत गर्जू लागले, 'पांडुपुत्र अजिंक्य मल्लवीर भीमसेऽऽन जयतु... जयतु! बलरामशिष्य – अजिंक्य मल्लयोद्धा भीमसेऽन साधुऽ... साधुऽऽ' जरासंधानं पेचात टाकणारा एखादा डाव फेकला की, त्याचे समर्थक मागधी पागोटी हवेत उडवत ओरडू लागले, 'अजिंक्य मल्लवीर मगधसम्राट महाराज जरासंधऽ जयतु... जयतु।'

चढत्या घटिकेबरोबर, प्रहराबरोबर मल्लयुद्धातील ईर्ष्या चढत चालली. आता प्रेक्षकांत चर्चा सुरू झाली, 'हे द्वंद्व कधी संपणार तरी आहे की नाही?' आता माथ्यावरचा सूर्य ढळून तिसऱ्या प्रहराकडे कलला होता. दोन्ही मल्लांच्या अंगावर रक्षाओंजळी टाक टाकून थकलेले पाचही पंच आखाड्यात जागा मिळेल तिथं उकिडवे बसले होते.

मागधी अमात्य युवराज सहदेवाच्या कानी लागत सूचना देऊन गेले, 'राजमंडळाचे राखीव मल्ल आता एक-एक करत आखाड्यात उतरवावे. भीमसेनाला घेरून थेट बंदिवान करावं. नाहीतर मथुरेत कंसमहाराजांचं झालं; तसंच इथेही काहीतरी विपरीत होण्याची शक्यता आहे!' मागधी मंत्रिगणांनी त्यांची सूचना लावून धरत उद्गार काढले, 'अमात्यांची सूचना योग्य आहे. सत्वर राखीव मल्ल आखाड्यात उतरवावेत.' आता सूर्य पार कलतीला आला. आखाडाभर भोवतीच्या अशोक, किंशुक, पुन्नाग, ताल, तमाल, अश्वत्थ अशा वृक्षांच्या लांब, दाट सावल्या पसरल्या. माझ्यासमोर बसलेल्या द्वारकाधीशांनी मगधांच्या राजमंडळात चाललेली चलबिचल पटकन टिपली. ते आसनावरून उठून उभे राहिले. कंठाभोवतीच्या उत्तरीयावर रुळणारी वैजयंतीमाला त्यांनी क्षणैक हळुवार कुरवाळली. गेले चौदा दिवस इतर कुणाकडे ढुंकूनही न बघता, मिळेल त्या पळभरात भीमसेन एकट्या द्वारकाधीशांकडे काय ते बघत आला होता. त्यांना वैजयंतीमाला कुरवाळताना बघून भीमसेन काय उमगायचं ते उमगला. आपल्या सर्व चपळ हालचाली देहावर वज्राघात झाल्यासारखा त्यानं एकाएकी थांबविल्या. ठरल्या संकेताप्रमाणं जरासंधाला अंगावर घेतलं. जरासंधाचा भ्रम झाला की, भीमसेन थकला आहे, श्रांत झाला आहे. त्यानं चपळाई करून भीमसेनाच्या घामानं थबथबत्या छातीला आपली विशाल पाठ भिडविली आणि भीमसेनाचा प्रचंड देह रजकपुष्ठ डावावर पाठीवरून घुण्याच्या पिळ्यासारखा सरळ समोरच्या मातीत दाणकन आदळला. तसा मी

ताडकन उभाच राहिलो. भोवतीचं उभं प्रेक्षागारही विजेचा चटका बसावा तसं उठून उभं ठाकलं. त्यातील काही जण 'चकऽ चकऽ' करीत चक्क हळहळले, काही जण मागधी पागोटी हवेत उडवीत हर्षोन्मादानं थयथय नाचत गर्जले, 'मगधसम्राट अजिंक्य मल्लवीर जराऽऽसंध महाऽराऽज सदैव जयतुऽ.. जयतुऽऽ... जयतुऽऽऽ!' अर्जुन तर केव्हाच उठून उभा राहिला होता. आपला प्राणप्रिय बंधू संकटात सापडलेला बघून तो त्वेषानं आखाड्यात घुसू लागला. स्वामींनी त्याला दंडाला धरून निकरानं आवरलं. एव्हाना मल्ल जरासंध निपचित पडलेल्या भीमसेनाच्या पायाशी आला. त्याचे दोन्ही पाय आपल्या बळकट बाहूत घेऊन दातओठ खात ते परस्पर विरोधी ताणू लागला. तसं प्राण कंठाशी आल्यासारखा अनावर संतापानं अर्जुन स्पष्ट ओरडला, "श्रीकृष्णाऽ! सोड मला. तो माझ्या प्रिय बंधूला उभा चिरणार!" तसं अर्जुनाकडे डोळे रोखून बघत द्वारकाधीश अत्यंत संथपणे म्हणाले, "धनंजया! काय होतंय ते नुसतं बघ. या ऐतिहासिक द्वंद्वयुद्धाचा तू केवळ साथीदार हो! मलाही तसंच होणं भाग आहे. हटायला आणि हरायला भीमसेन काही जरासंध नाही!"

आपलं सर्व सामर्थ्य दोन्ही मांड्यांत एकवट अवरोधलेला भीमसेन जरासंधाला तसूभरही काही ताणता आला नाही. तसा क्षणैक गोंधळलेला जरासंध कपाळावरचा घाम निरपण्यासाठी थांबला, असावध झाला. याच नेमक्या क्षणाला भीमसेनानं मत्स्यासारखी चपळाई केली. आपल्या दोन्ही पायांचा क्षणात त्याला कैचीसारखा तिढा घातला. असा एक वीजझटका दिला की, जरासंध समोर तोंडघशी मातीत कोसळला. याच नेमक्या क्षणाची वाट बघणाऱ्या द्वारकाधीशांनी कटीच्या वस्त्रातील पांचजन्य बाहेर घेऊन मागधी आभाळाकडे ग्रीवा उंच उचलून तो शिवकर पांचजन्य कंठाच्या धमन्या तटतटीत फुगवून प्राणपणानं फुंकला! शंखाचा संकेत पकडत पालथ्या पडलेल्या जरासंधाच्या कंठाभोवती भीमसेनानं आपला निर्णायक प्राणांतक बाहुकंटकाचा पाश आवळला होता! आपल्या लोहदंडातील शक्ती क्षणाक्षणाला चढत्या भाजणीनं बाहुकंटकात पेरून भीमसेन बाहुकंटकाचा निर्णायक पाश आवळत चालला. तसा धिप्पाड जरासंध काहीही न बोलता डोळे गरगर फिरवून आखाड्यातल्या मातीत टाचा घासू लागला. पांचजन्य पुन:पुन्हा घुमतच राहिला! जमल्या लाखो प्रेक्षकांना काहीही कळलं नाही की, मागधांचा अजिंक्य सम्राट जरासंध टाचा घासत गतप्राण होऊन केव्हा पडला!

त्याच्या निष्प्राण कंठावरचा बाहुकंटकाचा पाश सोडवून भीमसेन वीजलोळासारखा ताडकन उभा राहिला. तसे चोहोबाजूंनी अनावर घोषच घोष उठले – 'पांडुपुत्र अजिंक्य मल्लयोद्धा भीमसेऽऽन जयतु... जयतु!!! जयऽऽ जयऽऽ कुंतीपुत्र भीमसेऽन!'

तिकडे आखाड्यात एका पायावर थयथय नाचत भीमसेन गर्जतच होता. 'गुरुदेव बलराऽमऽ जयतु! जयतु! माता कुंती–इडा–भवानीचा विजय असो!' आम्ही तिघेही खेचल्यासारखे भीमसेनाकडे धावू लागलो. गिरिव्रजाच्या डोंगरशिखरांवरून मावळतीचा सूर्य मावळला. तो दिवस होता, कार्तिक शुद्ध चतुर्दशीचा!!

जरासंधाचा पाडाव होताच माझ्या स्वामींची चर्या, कधी नव्हे अशी अपार उजळून निघाली. ते आता काय–काय निर्णय घेतील इकडे सर्वांचीच दृष्टी लागली. कंसश्वशुर जरासंध आप्तच असल्यामुळे एक राजप्रथा पाळणं भागच होतं. त्याचा रीतसर उत्तराधिकारी घोषित केल्याखेरीज त्याच्या शवाला अग्निसंस्कार देता येत नव्हता.

यासाठी स्वामींनी भेदरलेल्या जरासंधपुत्राला सहदेवाला धीर देऊन त्याच्याच अमात्यांकरवी पाचारण केलं. त्याला मल्लयुद्धाच्या आखाड्यातच मागधांचा उत्तराधिकारी म्हणून घोषित केलं. त्याला हितोपदेश देताना स्वामी म्हणाले, "सहदेवा, आमचा मागधांच्या जनपदाशी कसलाच वैरभाव नाही. आहे व राहील तो कुणाच्याही अन्यायी व अत्याचारी वृत्तीशी.

"लवकरच माझे आतेबंधू – इंद्रप्रस्थाचे पांडव, राजसूय यज्ञ संपन्न करतील. त्यांना मागधांच्या सम्राज्याला शोभेल असा सेवक, उपयुक्त पशू, संपत्ती, धनधान्य यांचा उपहार आमच्या समवेतच तू धाडायचा आहेस. आत्मभावानं त्या यज्ञाला उपस्थितही राहायचं आहे. कुणी सांगावं, पांडवांशी तुझे रक्तसंबंधही येतील. भविष्यात तुझं चतुरंग शक्तिसामर्थ्य त्यांच्या पाठीशी उभं करण्याचाही प्रसंग येईल."

स्वत:ला पित्यासारखंच कठोर शासन होईल, असं सहदेवाला वाटलं होतं. त्याऐवजी पूर्ण अभय व जीवनोपयोगी मार्गदर्शन ऐकून तो पित्याचं दु:ख विसरून भावभारित झाला. माझ्या स्वामींचे चरण धरत संमिश्र भावनांनी क्षणैक स्फुंदला. विशालहृदयी स्वामींनी त्याला हळुवार वर घेत आपल्या आलिंगनात घेतलं. 'चला' असा मला व अर्जुनाला संकेत देत, सहदेवाचा हात हाती धरूनच स्वामी चालू लागले. तिकडे वेडावल्या मगधकरांनी भीमसेनाला कुंकुमात न्हाऊ घालून खांद्यावर नाचविण्याचा जल्लोष चालविला होता. त्याला स्वामींनी हातसंकेत करताच सर्वांचं प्रेमकडं तोडून तो स्वामींच्या जवळ आला. एका मगध सेनापतीनं आपली प्रचंड गदा भारावल्या मनानं त्यांच्या पुष्ट खांद्यावर ठेवली. तसं बंधुवर्य अर्जुनानं मल्लवीराला कडकडून मिठी मारली. मगध–अमात्य काही सेवकांच्या साहाय्यानं जरासंधचा निष्प्राण देह उचलून बाजूला झाले. भीमसेनानं स्वामींच्या चरणांजवळ गदा ठेवली. मग तो स्वामींपेक्षा वयस्क असूनही साष्टांग दंडवत घालण्यासाठी वाकू बघत असतानाच स्वामींनी त्याला थोपवून अपार गौरवानं कडकडून आलिंगनात घेतलं. तसा स्वामींचा नीलदेह भीमाच्या अंगावरील कुंकुमानं माखून गेला. संध्यासमयीच्या शरदातल्या आरक्त नीलाकाशासारखा दिसू लागला. ते दुर्मीळ दृश्य बघून वेडावलेल्या मगधकरांनी घोषच घोष उठविला – 'कुंतीपुत्र भीमार्जुऽऽन जयतु – जयतु. देवकीपुत्र श्रीकृष्ण महाराऽऽज – जयतुऽ जयतु!'

दोन्ही पांडव, मागधांचे सेनापती आणि मंत्रिगण व खेचल्यासारखे चालणारे कितीतरी भाववेडे मगधकर यांच्या मेळातून स्वामी चालले. मीही गर्वोन्नत वक्षानं त्यांच्यासोबत चाललो. आर्यावर्तातील प्रथमच घडणाऱ्या एका ऐतिहासिक प्रसंगाचा साक्षीदार म्हणून.

आमचा कलकलता तांडा मगधांच्या कडेकोट बंदिस्त कारागृहासमोर आला. कारागृहावरचं भलंमोठं कुलूप बघून सर्वच थबकले. तसं स्वामींनी गदावीर भीमसेनाकडे नुसतं सहेतुक बघितलं. त्यानं त्यांच्या दृष्टीतील आशय अचूक उचलला. पुढे होत खांद्यावरच्या प्रचंड गदेचा एकच बळकट प्रहार त्या कुलपावर उतरविला. वर्षानुवर्षं कोंडलेले नरेश मुक्त झाले.

आपण मुक्त झालो यावर विश्वासच न बसणारे ते सर्व बंदिवानाच्या मागधी वेषातील नरेश, तरातर चालत येणाऱ्या मुक्तिदात्याकडे बघतच राहिले. सर्व जण कारागृहातील

चौकात आपोआप एकवटले. त्यातील कित्येकांनी भरल्या कृतज्ञ नेत्रांनी, माझ्या स्वामींच्या विमल चरणांना हात लावून तिथली धूळही मस्तकी घेतली होती. त्यांतील एक–दोन फारच वृद्ध राजे हात जोडून अत्याग्रहानं विनवताना स्वामींना म्हणाले, "द्वारकाधीश वासुदेवा, आम्ही तुझी सूर्यमंडल भेदणारी कीर्ती ऐकून होतो. आज तुझं प्रत्यक्ष दर्शनच झालं. नेत्र कृतार्थ झाले. आमचे कानही कृतार्थ करण्याची कृपा कर." स्वामींनी हात उंचावून संकेत करताच ते सर्व राजे आज पहिल्यानंच एका पाषाणी चौथऱ्यासमोर चक्क भुईवर मांडी घालून बसले. माझे स्वामी धिमं चालत पाषाणचौथऱ्यावर चढले, त्यांची प्रेमसागर असलेली दृष्टी क्षणैक सर्वांवर फिरली. त्यांची मुद्रा क्षणभरातच अपार तेजवंत दिसू लागली. केवळ त्यांच्याच कंठात शोभून दिसणारी त्यांची वेणुवाणी मागधांच्या कारागृहातील भिंतींच्या पाषाणांवरही रोमांच उठवीत स्त्रवू लागली –

"आर्यावर्तातील विविध जनपदांचे अधिकारी असलेल्या प्रिय नरेश हो! निरपराध बंदिवानाचं जीवन किती दुष्कर असतं, हे तुम्ही अनुभवलंय. विक्रम कोंडून पडणं कसं असह्य होतं, हे भोगलंय. सत्ता ही दुधारी शस्त्रासारखी असते. ती विधायकाचं व विनाशकाचंही कार्य करू शकते. आपण अमर्याद सत्ताधीश झालो या भ्रमानं मगधसम्राटानं तुम्हाला बंदिवान केलं. तुमची संख्या शतकाची होताच, तो शतशीर्ष यज्ञ करून त्याच्या वेदीवर तुम्हा सर्वांचा निर्घृण बळी देणार होता!" आर्यांच्या या नुसत्या उद्गारामुळेही बसलेल्या नरेशांत अस्वस्थ खसफस माजली. ती वाढू न देता स्वामी लगेच म्हणाले, "हा कसला यज्ञ? खरोखरच तो यशस्वी झाला असता तर? मी जाणतो, तुम्ही कुणीच मरणाला घाबरणारे नाही. पण तुमच्याविना तुमच्या प्रजाजनांचं मागे काय झालं असतं? जिथे–जिथे जीवन तुंबून असेल, तिथे–तिथे धावून जाणं हे माझं कर्तव्य आहे. तुंबलेलं जीवन प्रवाही करणं, हेच माझं जीवितकार्य आहे. आजपासून तुम्ही मुक्त झाला आहात. या विक्रमाचं सर्व श्रेय आहे, ते आमच्या मल्लवीर भीमसेनाला."

कुठल्याही अडचणीची बारीकसारीक उकल करणं, हा तर माझ्या स्वामींचा गुणधर्मच होता. शेजारीच उभ्या असलेल्या सहदेवाकडे बघत ते म्हणाले, "हे मगधाधिपती सहदेव महाराज तुम्हा प्रत्येकाला धनधान्य व शस्त्रांनी सज्ज असा सारथ्यासह एक–एक रथ देतील. तुम्ही आपापल्या जनपदात जाताच, भीमसेनाच्या इंद्रप्रस्थ राज्याकडे तुम्हाला शोभेल असा उपहार पाठवालच. तुमच्या मुक्तीच्या निमित्तानं जनपद इंद्रप्रस्थाशी जुळलेला स्नेह सदैव स्मरणात ठेवून, प्रसंगी त्यांच्या हाकेला तत्पर 'ओ' द्याल. मी तुम्हा सर्वांनाच जीवनाच्या वाटचालीसाठी माझ्या द्वारका राज्याच्या शुभेच्छा देतो. शिवं भवतु." आम्हा सर्वांनाच ते बोलतच राहावेत असं वाटत असतानाच ते थांबले.

दुसऱ्या दिवशी मगधांच्या सीमेवर सहदेव महाराजांसह जाऊन वेगवेगळ्या दिशांना जाणाऱ्या रथारूढ राजांना स्वामींनी सन्मानपूर्वक निरोप दिला. सर्व शहाऐंशी राजे मार्गस्थ झाले.

माझ्या स्वामींचं मागधासंबंधीचं अभियान यशस्वीपणे पार पडलं. सप्ताहभर आम्ही गिरिव्रजात राहिलो. मग सीमेवर सहदेव महाराजांसमवेत निरोपासाठी लोटलेल्या असंख्यात मागध स्त्री–पुरुषांच्या साक्षीनं आम्ही गिरिव्रज सोडलं. आमच्या रथाच्या

मागे मागधांच्या उपहाराच्या वृषभरथांची रांग होती. आलो तेव्हा स्वामी व दोन्ही पांडव ब्राह्मणवेषात होते. आता त्यांच्या अंगावर भरजरी राजवेष होते. मी होतो, द्वारकेच्या सारथी वेषात!

जरासंधाच्या वधानं आमच्या द्वारका व पांडवांच्या इंद्रप्रस्थाच्या कीर्तीचा डंका आर्यावर्तभर कसा दुमदुमून उठला. पांडवांच्या राजसूय यज्ञातील मोठा अडसर दूर झाला. इंद्रप्रस्थात पांडवांचा सप्ताहभर पाहुणचार घेऊन स्वामींसह मी द्वारकेत परतलो. येताना लागलेल्या सर्व राज्यांत जरासंधाच्या वधामुळे सुटकेचा निःश्वास टाकलेल्या राजांनी आणि त्यांच्या प्रजाजनांनी स्वामींचं प्रचंड जयघोषानं स्वागत केलं होतं. मात्र या वेळी द्वारकेत झालेल्या स्वामींच्या स्वागताला तोड नव्हती. कंसवधापेक्षाही जरासंधवध हा विक्रम महत्त्वाचा होता, मोठा होता. त्यामुळेच या वेळी स्वामींच्या स्वागतासाठी शुद्धाक्ष महाद्वारावर प्रत्यक्ष वसुदेवमहाराज दोन्ही राजमातांसह उपस्थित झाले. रुक्मिणीदेवींसह स्वामींच्या सातही राण्या आल्मा होत्या. दोन्ही सेनापती आणि मंत्रिगण यांना पाठीशी घेत तरणाबांड, स्वरूपवान प्रद्युम्न माझा पुत्र दारुकीसह ओंजळीत प्राजक्तफुलं घेऊन उभा होता. स्वामींच्या आठही राण्यांचे ऐंशीवर पुत्र एकमेळानं त्यांच्या पाठीशी उभे होते. प्रमुख महाद्वार शुद्धाक्ष आणि पुष्पदंत, ऐंद्र, भल्लात अशा चारही सुवर्णी महाद्वारांवर गरुड चिन्हांच्या सुवर्णकाठाच्या भव्य पताका फडफडत होत्या. जागजागी विविध फुलांच्या भरगच्च कमानी उठल्या होत्या. ठेवणीतली वस्त्रं ल्यालेले द्वारकाकर स्त्री–पुरुष अविरत आनंदानं कलकलत होते. ओंजळीत सुवर्णतारांनी मंडित श्रीफल घेतलेले युवराज बलरामदादा स्वामींना सामोरे आले. समोर आपलं राजमंडळ बघताच तरातर चालत जाऊन स्वामींनी प्रथम वसुदेवमहाराज, देवकीमाता, रोहिणीमाता, आचार्य सांदीपनी, गुरुमाता अशा सर्व ज्येष्ठांची चरणधूळ मस्तकी घेतली. तळपत्या डोळ्यांनी दादांच्या हातांतील श्रीफल स्वीकारून त्यांना वंदन करण्यासाठी स्वामी वाकू लागले. त्यांना तसं न करू देता एकदम वक्षाशी दृढ बिलगतं घेत दादा पुटपुटले, “धनुर्यागाच्या वेळी कंसवधासाठी मथुरेत मला सोबत घेऊन गेलास. या वेळी मात्र मला टाळलंस! धाकटचा, तरीही विजय माझाच आहे. शेवटी माझ्या शिष्य भीमसेनानंच जरासंधाला वधलंय!”

तसं दादाच्या भरगच्च दृढ मिठीतून सुटताना स्वामी खटचाळ हसत त्यांना म्हणाले, “जरासंधाला वधलं ते तुमच्या शिष्य भीमसेनानं हे जेवढं खरं आहे, तेवढंच हेही सत्य आहे की, तो आमच्या सुभद्रापती अर्जुनाचा ज्येष्ठ बंधू आहे!” या बिनतोड उत्तरामुळे दोघेही बंधू खळाळ हसले आणि एकमेकांना पुन्हा बिलगले. स्वामींच्या व दादांच्या या पुटपुटत्या संवादातील बारकावे जवळच असल्यानं मला कळले. इतर कुणालाच ते ऐकू न गेल्यामुळे समजले नाहीत.

रेवतीदेवींनी जेवढ्या हसतमुखानं स्वामींचं औक्षण केलं, त्याहून कितीतरी तळपत्या डोळ्यांनी रुक्मिणीदेवींनी ते केलं.

त्या दिवशी स्वामी व बलरामदादा बसलेल्या माझ्या गरुडध्वज रथाची वेडावलेल्या द्वारकाकरांनी विजयघोषांत कुंकुममुठी व फुलओंजळी उधळीत दिवसभर हर्षभरित गौरवयात्रा काढली.

चांगला अखंड सप्ताहभर विजयोल्लास द्वारकेत चालला. एके दिवशी पांडवपुरोहित

धौम्य ऋषींचा एक पट्टाशिष्य पांडवांच्या अमात्यांसह राजसूय यज्ञाचं आमंत्रण घेऊन द्वारकेत उतरला. हा यज्ञ होता, इंद्रप्रस्थात. इक्षुमती आणि यमुना यांच्या संगमावर. पण धांदल उडाडली ती द्वारकेत – पश्चिम सागराच्या किनाऱ्यावर.

राजसूय यज्ञासाठी द्वारकेतून स्वामी आणि रुक्मिणीदेवी यांच्यासह निवडक स्त्री–पुरुष जाणार होते. बलरामदादा रेवतीदेवींसह यात होतेच. उद्धवमहाराज, अमात्य विपृथू, मंत्री अक्रूर, युवा पिढीतील सांब, ब्रह्मगार्ग्य आणि माझा पुत्र दारुकीही यात होता.

आम्हाला निरोप देण्यासाठी हजारो नगरजन शुद्धाक्ष द्वारावर लोटले. या वेळी आम्ही प्रवासाचा मार्ग धरला तो मध्य देशातून. आमचा पहिला पडाव आनर्तात पडला. दुसरा भृगुकच्छात. सुमारे एक मासानंतर आम्ही अवंती राज्यात आलो. हे राज्य मित्रविंदादेवींचं होतं. त्यांचे बंधू विंद व अनुविंद श्रींची चौदिशांना गाजत असलेली कीर्ती ऐकून स्वभावानं आता काहीसे निवळले होते. ते स्वामींच्या स्वागतासाठी अवंती राज्याच्या सीमेवर आले. अवंतीतून आम्ही चर्मण्वती नदी पार करून कुंतिभोज राज्यात उतरलो. त्या राज्याच्या राजवास्तूत आलो. इथंच आत्याबाई कुंतीदेवींनी बालपणी वास्तव्य केलं होतं. शीघ्रकोपी व लहरी मुनिवर दुर्वासांची त्यांनी ज्या राजवास्तूत अशाच एका विशेष यज्ञासाठी सेवा केली होती, त्या वास्तूत आलो. स्वामींनी रुक्मिणीदेवींना ती संपूर्ण वास्तू व दुर्वासांच्या यज्ञाची पर्णकुटी स्वत: दाखविली. या राज्यात दोन दिवस पडाव टाकून आम्ही पांचालांच्या अहिच्छत्र नगरात उतरलो. तिथं काही पडाव टाकून यमुनेच्या काठाकाठानं प्रवास करत इंद्रप्रस्थाच्या पूर्वेच्या सीमेवर आलो. नेहमीसारखे आम्ही या वेळी त्यांच्या पश्चिम सीमेकडून आलो नव्हतो.

महाराज युधिष्ठिरांना द्वारकाधीशांच्या रुक्मिणीदेवींसह पूर्व सीमेवरच्या आगमनाची अग्रवार्ता गेली. तसे पाचही पांडव बंधू स्वागतासाठी सीमेवर आले. त्यांच्यासोबत राजमाता कुंतीदेवी, महाराणी द्रौपदीदेवी आणि आमच्या सुभद्रादेवींसह नागकन्या उलूपीदेवी व मणिपूरकन्या चित्रांगदादेवीही आल्या होत्या.

राजनगर इंद्रप्रस्थानं आमचं अभूतपूर्व स्वागत केलं. संपूर्ण इंद्रप्रस्थाचे राजमार्ग आणि चौक कुठून–कुठून आलेल्या आमंत्रितांनी कसे खचाखच भरले होते. पाचही पांडव बंधूंनी दशदिशांना केलेल्या दिग्विजयामुळे त्यांच्या कीर्तीचा डंका आर्यावर्तभर निनादत होता. त्यांच्या राजपुरोहित धौम्य ऋषींनी तर हिमवनात जाऊन ठिकठिकाणच्या आश्रमातील ऋषिमुनींना इंद्रप्रस्थात पाचारण केलं होतं, इक्षुमती आणि यमुना यांच्या संगमावर राजसूय यज्ञासाठी भव्य मंडप उभारण्यात आला होता. त्यासाठी द्वारकेच्या निर्माणात राबलेले विश्वकर्मा, त्वष्ट्ट, मयासुर हे स्थापत्यविशारद, त्यांच्या हाताखाली त्यांचे ताराक्ष, कमलाक्ष व विद्युन्माली हे साहाय्यक झटले होते. ‘इंद्रप्रस्थ’ नावासारखंच इंद्राच्या स्वर्गीय राजनगराला मागे टाकणारं दिसत होतं.

महाराज युधिष्ठिरांनी आम्हाला राजवास्तूत नेण्यापूर्वी, थेट यज्ञमंडपात आणलं. योजनभर घेराच्या या प्रशस्त मंडपाची उभारणी अनेक स्तंभांवर कौशल्यानं केली होती. चौबाजूंनी मधोमध येईल असं भव्य यज्ञकुंड सिद्ध केलं होतं. त्याच्याभोवती कुशल कारागिरांनी कुरुकुलातील महत्त्वाचे नरेश आणि प्रसंग सुबक रांगोळीत रेखले होते. पूर्वेच्या दिशेला कुरूंची वंशचिन्ह असलेली पौर्णिमेची पूर्णविकसित चांद्रप्रतिमा तळपत होती. यज्ञकुंडातून उठणाऱ्या समिधांच्या ज्वाला आकाशमार्गी अरोध जाव्यात म्हणून यज्ञकुंडाएवढाच वरचा चौफेर भाग छतविरहित ठेवला होता. यज्ञकुंडाच्या

चौअंगाला विविध समिधा अर्पण करणाऱ्या आमंत्रित ज्ञानवंत ऋषींच्या दर्भासनी बैठकी उठविल्या होत्या. पूर्व दिशेला सर्व उर्वरित ऋषिमुनींची अशाच दर्भबैठका टाकून बसण्याची व्यवस्था केली होती. पश्चिमेला पांडवांच्या राजमंडळची, त्यांच्या आप्तगणांची बसण्याची राजआसनं मांडली होती. त्या सर्वांच्या पुढे कितीतरी उंच व प्रशस्त अशी दोन सुवर्णी आसनं होती. ती होती, माझे स्वामी व रुक्मिणीदेवी यांची. त्यांच्या डाव्या हाताला म्हणजे यज्ञकुंडाच्या उत्तर दिशेला सर्व आमंत्रित नरेशांची सुवर्णी सिंहासनं मांडलेली होती. यज्ञकुंडाच्या दक्षिण दिशेला सर्व प्रतिष्ठित स्त्री–पुरुष नगरजनांची, आमंत्रित विदुषींची बैठकीची व्यवस्था केली होती. मंडपाच्या पूर्व दिशेलाच दोन नद्यांचा पावन संगम होता.

माझ्या स्वामींनी आपल्या शोधक दृष्टीखाली सर्व यज्ञमंडप घातला. महाराज युधिष्ठिरांना ते म्हणाले, “पांडवश्रेष्ठा, तुमचा यज्ञ आर्यावर्तात यापूर्वी कधीच न झालेल्या कीर्तीचा ठरणार आहे! तुम्ही कसली म्हणून त्रुटी ठेवलेली नाही.”

“ही सर्व भगवान द्वारकाधीशांच्या कृपेची किमया आहे. आम्हा सर्व बंधूंवर असाच कृपालोभ भगवानांनी सदैव ठेवावा.” इंद्रप्रस्थनरेश झाल्यापासून ज्येष्ठ पांडव युधिष्ठिर यांचं माझ्या स्वामींशी बोलणं बरचसं बदललं होतं.

आम्ही राजवास्तूसमोर आलो. इथं पूर्वी बराचसा मोकळा असलेला केवळ मध्यभागी थुयथुयती कारंजी उडणारा चौक आता कुठंच दिसत नव्हता. त्या जागी उठली होती, नाना चमत्कारांची नेत्रदीपक मयसभा! तिच्या प्रमुख द्वाराशी हात जोडून उभ्या असलेल्या कल्पक मयासुरानं स्वामी, रुक्मिणीदेवी, सर्व पांडव, त्यांच्या राजस्त्रिया व मी यांना ती मयसभा फिरून चमत्कारांची माहिती देत दाखविली.

नदी यमुना ही स्वामींच्या मर्मबंधाची ठेव होती. संध्याकाळी ते नित्याचं अर्घ्य देण्यासाठी यमुनेच्या एका सुघड घाटाच्या पायदंडया उतरू लागले. मी बरोबर होतोच. शिवाय उद्धवमहाराज, धौम्यऋषी, गर्गमुनी अशी निवडक मंडळीही होती. स्वामी यमुनेच्या पात्रात उतरले. त्यांच्या मागून उद्धवमहाराजही पात्रात उतरले.

उभयंतांनी सवितृ मंत्राचं पुरश्चरण करीत संध्येच्या सूर्यदेवाला अर्घ्यं दिली. पात्रात उतरलेल्या ऋषिमुनींनीही दिली. सर्व जण तृप्त मनानं बाहेर पडत असतानाच कुठूनतरी एक लांबलचक पंखांचा मयूरपक्षी आला आणि कडेच्या कदंब वृक्षावर फडफडत उतरला. सर्वांचंच लक्ष वेधलं जाईल असा केकारला. तसं स्वामी व उद्धवमहाराज एकमेकांकडे बघत केवढंतरी मधुर हसले. मला वाटलं स्वामी आपल्या सुवर्णमुकुटात नेहमी मोरपीस धारण करत आले होते. त्याच्या स्मृतीनंच ते हसले असावेत. खरं काय ते त्या उभयतांनाच माहीत!

उभय बंधू राजवस्त्रं ठेवलेल्या तबकांजवळ आले. त्यांच्या ओलेत्या पायांचे ठसे घाटाच्या पाषाणावर रांगेनं उमटत आले. स्वामींना राजवेष धारण करण्याची सेवा द्यावी म्हणून मी लगबगीनं सर्व पायदंडया उतरून त्यांना गाठलं. तस ते नेहमीचं लोभस हसत मला म्हणाले, “दारुका, कालिंदीदेवीचं माहेर इथलंच आहे. तिकडे एकदा जायचं आहे. ध्यानी असू दे.”

सांजसंध्येचा विधी आटोपून स्वामी एका महत्त्वाच्या भेटीसाठी निघाले. सोबत होते, केवल उद्धवमहाराज. बलरामदादा आपल्या शिष्य भीमसेनासह अद्याप आलेल्या नरेशांच्या व्यवस्थेत मंडपाकडेच गुंतले होते. वार्ता होती, ती दूर यमुनातीरावर

उठविलेल्या विशेष पर्णकुटीसंकुलात महर्षी व्यास आपल्या शिष्यगणांसह उतरल्याची! युधिष्ठिर महाराजांच्या राज्याभिषेकानंतरची कितीतरी वर्षांनी त्यांची ही इंद्रप्रस्थ भेट होती. विशेष म्हणजे राजसूय यज्ञाचं महत्त्व जाणून पांडवपुरोहित धौम्य ऋषींनी त्यांना अत्याग्रहानं सपत्निक पाचारण केलं होतं. महर्षिपत्नी माता घृताचीदेवीही आल्या होत्या.

मी आमचा गरुडध्वज महर्षींच्या पर्णकुटी संकुलाबरोबर आणून उभा केला. त्या संकुलातील सर्वांत उंच प्रमुख पर्णकुटीच्या दारात साक्षात महर्षी व्यास सपत्निक स्वामींच्या स्वागतासाठी उभे होते.

महर्षींनी उभय बंधूंना प्रेमानं त्यांचे हात हाती घेऊन पर्णकुटीत नेलं. मधोमध असलेल्या दर्भाच्या उच्चासनावर महर्षी बसले. त्यांच्या डाव्या हाताशी; पण भुईवरच एका बैठकीवर गुरुपत्नी बसल्या. दोघांच्या समोर हात जोडलेले, भरजरी राजवेषातले, अनुपम सुंदर आमचे उभय यादवबंधूही महर्षींनी हातसंकेत दिल्यानंतर दर्भाच्या बैठकींवर बसले. महर्षींचा शिष्यगण भोवती जागा मिळेल तिथं, हात जोडून उभाच राहिला. मीही त्यातच उभा राहिलो.

सर्वप्रथम महर्षींनी स्वामींना वसुदेवमहाराज आणि देवकी–रोहिणीमाता यांचं क्षेमकुशल विचारलं. मग बराच वेळ तिघांची राजधर्म, न्याय–अन्याय, सत्यासत्य, स्त्रीत्वाचा योग्य आदर अशा कितीतरी विविध विषयांवर चर्चा झाली. या चर्चेत महर्षिपत्नींनीही भाग घेतला. भेटीचा समारोप करताना महर्षी व्यास म्हणाले, "यदुनंदन श्रीकृष्णा, पांडवांचा हा राजसूय यज्ञ कितीतरी दृष्टींनी संस्मरणीय ठरणार. या यज्ञाच्या अग्रपूजेचा सन्मान कुणाला द्यावा, अशी विचारणा पांडवश्रेष्ठानं माझ्याकडे केली. तुझ्याशिवाय अन्य यासाठी कोण योग्य आहे? मला विश्वास आहे, तुझ्या अग्रपूजेनं आणि कृपेनं पांडवांचा हा राजसूय यज्ञ निर्विघ्न आणि यथासांग पार पडेल. आलीच एखादी अडचण, तर तू ती निवारशील!" महर्षी व्यास मन:पूर्वक हसले. अगदी आचार्य सांदीपनींचं स्मरण व्हावं असं.

राजसूय यज्ञाचा दिवस उजाडला. यमुनातीर धरून पसरलेला भव्य यज्ञमंडप सूर्यकिरणांत कसा उजळून निघाला. यमुनातीर धरून देशोदेशींहून आलेल्या राजांच्या सैनिकांची शिबिरं पडली होती. ठिकठिकाणी कुठून–कुठून आलेल्या ऋषिमुनिवरांची पर्णकुटी–संकुलं उठली होती. हस्तिनापुराहून आलेल्या सैन्यशिबिरात त्यांची ध्वजा फडफडत होती. हस्तिनापुराहून युवराज दुर्योधन आणि त्याचे निवडक बंधू, अंगराज कर्ण, बंधू शोण आणि त्याचे सेनापती व अमात्य, मामा शकुनी आणि त्याचे निवडक बंधू, राजसचिव कणक आले होते. पितामह भीष्म आणि महात्मा विदुर कुरुअमात्य वृषवर्मासह आले होते. जागजागी वेगवेगळ्या राजांची शिबिरं पडली होती. त्यात पांचाल नरेश द्रुपद व धृष्टद्युम्न होते. मत्स्य, वत्स, अयोध्या, कोसल, विदेह, अवंती, शूरसेन, सिंधू, सौवीर, कांबोज, काश्मीर, कौशिक, कामरूप, किरात, कुंतिभोज, अश्मक, आनर्त या जनपदांतील शिबिरांत ते–ते राजे व राजपुत्र ससैन्य उतरले होते

माझे स्वामी रुक्मिणीदेवींसह पांडवांच्या राजवास्तूत उतरले होते. आज आपणाला अग्रपूजेची नानाविध कर्मं करावी लागणार, याची दोघांनाही पूर्व कल्पना होती. त्यामुळे सविध स्नानांसह त्यांचं निर्जली उपोषण होतं.

कुरूंच्या शिबिरांतून सकाळची आन्हिकं आटोपलेले पितामह भीष्म आणि महात्मा विदुर येऊन स्वामींना भेटून गेले. पांचालराज द्रुपद आणि धृष्टद्युम्नही भेटून गेले. विशेष म्हणजे जरासंधापासून धडा घेतलेले कौंडिण्यपूरचे युवराज रुक्मी आपल्या बंधूंसह आले होते. सुदामपुरीहून स्वामींचे परमस्नेही सुदामा सपत्निक आले होते.

पांडवांच्या राजवास्तूसमोरील मयानं उठविलेल्या मयसभेची वार्ता शिबिरा–शिबिरांत पोहोचल्यामुळे राजवास्तूकडे बघ्यांची अलोट गर्दी लोटत होती. मयासुरानं उठविलेले एकाहून एक दृष्टी व श्रुतिभ्रमाचे चमत्कार पाहून प्रेक्षक आश्चर्यानं थक्क होत होते. संपूर्ण इंद्रप्रस्थात पहाटेपासूनच नानाविध मंगल वाद्यांचा अविरत घोष चालला होता. तिकडे यज्ञमंडपात तशीच वाद्यं झडत होती. पांडवपुरोहित धौम्य ऋषींची यज्ञव्यवस्था बघताना तारांबळ उडाली होती. ते आपल्या सेवक शिष्यगणांना मंडपभर फिरताना नानाविध आज्ञा देत होते. भव्य यज्ञकुंडाभोवती औदुंबर, बिल्व, वट, चंपक, चंदन, पिप्पल, आम्र अशा कितीतरी सत्त्ववृक्षांच्या प्रमाणशीर छाटलेल्या व ठरावीक संख्येत बांधलेल्या समिधांचे पेढे रचले होते. विविध धान्यांची, फुलांची, यज्ञविधीच्या साहित्याची, विविध मृत्तिकांची सुवर्णतबकं रांगेनं मांडली होती. ताम्र, सुवर्ण, रुपं यांचे कढीव तूप भरलेले कुंभ मांडण्यात आले होते. त्यांचं हवन आसमंत विशुद्ध ठेवणार होतं, राजसूय यज्ञाची कशी जय्यत तयारी झाली होती.

दुपार कलतीला लागली असताना एका विशेष घटनेची वार्ता स्वामींच्या कक्षात आली. मयसभा बघण्यासाठी कुतूहलानं राजवास्तूत अंगराज कर्णासह आलेल्या कुरुयुवराज दुर्योधनाची फजिती झाली होती. तो नेत्रभ्रमानं पायघडी समजून चक्क एका जलकुंडात सर्वांसमक्ष कोसळला होता! कर्णानं त्याला सावरून कुंडाबाहेर घेतलं होतं. हे घडत असताना पांडवपत्नी द्रौपदीदेवी दुर्योधनाला उद्देशून सौधावरून काहीतरी लागट बोलल्या होत्या. ते नंतर समजताच दुर्योधन संतापून उठला होता.

उपोषण केलं, तरीही आज स्वामींची चर्या अपार तेजानं झळकत होती. मी आणि उद्धवमहाराजांनी कौस्तुभमणीयुक्त मोतीकंठे, सुवर्णी कुसदार भुजभूषणं, सुवर्णकाठी केशरी उत्तरीय, तसाच निळा शेला असा एक–एक करत राजवेष स्वामींच्या अंगी चढविला. उद्धवमहाराजांनी त्यांच्या मस्तकी मोरपीसधारी सुवर्णी मुकुट चढविल्यावर सर्वांत शेवटी स्वामींनी स्वहस्ते तबकातील पांढरीशुभ्र सुगंधी वैजयंतीमाला उचलून कंठी धारण केली. त्यांच्या चर्येवरून आणि नेत्रांतून अपार–अपार तेज कसं ओसंडत होतं, ते नुसतं क्षात्रतेज होतं काय? मुळीच नाही. त्याहून कितीतरी आगळंच ते तेज होतं, त्यांच्या सडक बोटांच्या विमल चरणांत सोनेरी वेलबुट्टीची बाकदार पदभूषणं चढविताना उद्धवमहाराज म्हणाले, “दादा, तुझ्या रूपावर दृष्टीच ठरत नाही. खरोखरच तुझी दृष्टच काढली पाहिजे.”

आम्ही अंत:पुरी कक्षातून बाहेर आलो. बाहेर पाचही पांडव प्रतीक्षेत होते. स्त्रियांच्या कक्षातून सेविकांनी वेढलेल्या, अबोली वर्णाचं अंशुक धारण केलेल्या रुक्मिणीदेवीही आल्या. त्याही केवढ्यातरी तेजस्वी दिसत होत्या. यादवांचे युवराज म्हणून रेवतीदेवींसह बलरामदादा रथारूढ झाले.

त्यांच्यामागे युधिष्ठिराशिवाय चारही पांडव आपल्या एकाच राजरथात आरूढ झाले. त्यांच्या पाठीमागे कुंतीदेवी, द्रौपदी आणि सर्व पांडवस्त्रिया होत्या. सर्वांत अग्रभागी

आमच्या गरुडध्वज रथात मी रथनीडावर बसलो. मागील घेरात स्वामी – श्रीकृष्णमहाराज, रुक्मिणीदेवी व बंधू परम सौजन्यमूर्ती उद्धवमहाराज आरूढ झाले.

यज्ञासाठी तिकडं यज्ञमंडप सिद्ध झाला होता. उत्तरेला अग्रभागी महर्षी व्यासांचं भव्यासन होतं. त्यामागे आमंत्रित नरेश बसले होते. पूर्वेला ठिकठिकाणच्या आश्रमांतून आलेले ऋषी व त्यांचे शिष्यगण बसलेले होते. दक्षिणेला ज्यांच्यामागे महत्त्वाचे स्त्री–पुरुष नगरजन व निवडक विदुषी, ज्यांत अग्रभागी एका उच्चासनावर बसलेल्या महर्षी व्यासपत्नी माता घृताचीदेवी बसल्या होत्या. पश्चिमेला प्रमुख पांडव, यादव, पांचाल आदी राजकुलांचं स्त्रीमंडळ बसलं होतं. असा आता मंडप खचाखच भरला होता.

मी स्वामींचा चार धवल वर्णाच्या घोड्यांचा गरुडध्वज रथ राजसूय यज्ञाच्या पूर्वेकडील प्रमुख प्रवेशद्वाराच्या समोर आणला. धौम्य ऋषी हात जोडून स्वामींना सामोरे आले. धौम्य ऋषींचा उजवा हात आपल्या हाती घेत, मंद–मंद हसत स्वामी रथातून खाली उतरले. धौम्य ऋषींच्या पाठीशी मंद हसणारे साक्षात महर्षी व्यास उभे होते. स्वामींनी नम्रभावे दोघांचीही चरणधूली मस्तकी घेतली. शांत, धीरगंभीर पावलं टाकीत, सर्वांना नम्र वंदन करीत ते यज्ञमंडपाकडे चालू लागले. तशी मंगल वाद्यांची झडच झड उठली. अंजनीच्या नीलवर्णी फुलासारखं त्यांचं निळं शरीर मावळतीच्या सौम्य किरणांत कसं झळाळत होतं! त्यांच्या उजव्या हाताशी बलरामदादा, त्यांचे बंधू गद, सारण, रोहिताश्व असे व उद्धवमहाराज चालले, डाव्या हाताशी रेवतीदेवी व रुक्मिणीदेवींच्या लगत मीच होतो. आमच्या मागून शिष्यगणांसह मुनिवर धौम्य व महर्षी व्यास, चारही पांडव, यादवसेनापती सात्यकी, ब्रह्मगार्ग्य, अक्रूरांसह सुधर्मा सभेचे सर्व मंत्रिगण, प्रद्युम्न, सांब, माझा पुत्र दारुकी, वृद्ध अनाधृष्टी, अनाधृष्टीपुत्र यशस्वी असे कितीतरी प्रमुख यादव चालले.

आम्ही यज्ञमंडपात प्रवेश करताच, युधिष्ठिरांसह तत्परतेनं सामोरं आलेल्या पितामह भीष्मांनी स्वामींना गाढ–गाढ आलिंगन दिलं. पांडवांच्या दोन्ही पिढ्यांच्या सुवासिनींनी एकीमागून एक येत माझ्या स्वामींच्या व रुक्मिणीदेवींच्या चरणांवर जलाचे कुंभ रिते केले. द्रौपदीदेवी व पांडवस्त्रियांनी दोघांचंही औक्षण केलं. कुरूंच्या वतीनं संजय व महात्मा विदुरांनी उभयतांच्या कंठात श्वेतकमलांच्या भरगच्च माला घातल्या. दोघांनीही वाकून राजमातेची चरणधूली विनयानं मस्तकी घेतली. मंडपातील यच्चयावत सर्व जण आता आदरानं आपोआप उठून उभे राहिले. बसले होते, केवल दोघंच. चेदिराज शिशुपाल आणि कौरवश्रेष्ठ दुर्योधन!

आम्ही यज्ञवेदीजवळ येताच पांडवांचे महाराज युधिष्ठिर स्वामींचा उजवा हात प्रेमानं आपल्या हाती घेत, रुक्मिणीदेवींसह यज्ञवेदीच्या भव्य सुवर्णी सिंहासनाकडे नेऊ लागले. पांडव अमात्यांनी बलरामदादा व रेवतीदेवींना त्यांच्या विशेष युवराजी सुवर्णी आसनांवर बसविलं. पांडवमेळातून स्वामींना बघताच चपळाईनं पुढे आलेला धनुर्धर धनंजय त्यांच्या डाव्या हाताशी आदरानं केव्हा उभा राहिला, मला कळलंच नाही. त्याच्या अनावृत पुष्ट वृषस्कंधावर स्वामींनी आपला डावा हात कितीतरी प्रेमभरानं सहजच टाकला. दोघंही एकमेकांकडे बघून मन:पूर्वक सौम्यसं हसले. त्या दोघांच्या नीलवर्णामुळे स्वामी क्षणैक दर्पणात तर बघून हसत नाहीत ना, असा मी संभ्रमित झालो. या वेळी मला कळून चुकलं की, दोघांच्या चालीत एक बारीकसं अंतर होतं, माझे स्वामी सहज चालले होते. अर्जुनाच्या चालीत शरीर तोलण्यासाठी निर्माण झालेलं

योद्ध्याचं भान होतं.

महाराज युधिष्ठिरांनी यज्ञकुंडानजीकच्या भव्य सुवर्णी सिंहासनवर स्वामींना आणि रुक्मिणीदेवींना परमादरानं बसविलं. मी उभयतांच्या आसनांमागे उभाच राहिलो. स्वामी बसताच मंडपातील यच्चयावत सर्व जण आसनस्थ झाले. आता ऋषिमुनींनी आपापल्या व्याघ्रचर्मांवर पद्मासनं घातली. सर्वांच्या अग्रभागी स्वतंत्र मांडलेल्या एका उच्चासनावर महर्षी व्यास बसले होते – सर्वांत असून कशातही नसलेले.

युधिष्ठिर महाराज यज्ञकुंडाजवळ उभे राहून बोलू लागले, "परमादरणीय महर्षी व्यासदेव, माता रुक्मिणीदेवी, भगवान वासुदेव श्रीकृष्ण, पूजनीय उद्धवदेव, वंदनीय पितामह व यादवयुवराज बलराम, मातृतुल्य रेवतीदेवी, गुरुदेव द्रोण व कृपाचार्य, कुरुयुवराज दुर्योधन व मामा शकुनी, अंगराज कर्ण. चेदिराज शिशुपाल, मद्रराज मामा शल्य, पूजनीय ऋषिगण आणि आमंत्रित नरेश आणि स्त्री–पुरुष नगरजनहो! मी माझ्या चारही भ्रात्यांच्या वतीनं आपणा सर्वांच्या इंद्रप्रस्थातील आगमनाचं सानंद, सहर्ष स्वागत करतो. आम्ही हा 'राजसूय यज्ञ' आमच्या राज्याच्या समृद्धीसाठी आणि शांततेसाठी मांडला आहे. आमच्या सुदैवानं या महत्त्वपूर्ण विधीसाठी आज यज्ञवेत्ता म्हणून, भगवान श्रीकृष्ण इथं सपत्निक उपस्थित आहेत. यज्ञविधीत कसलाही भाग न घेणारे महर्षी व्यासदेव, केवल आम्हाला आशीर्वाद देण्यासाठी माता घृताचीदेवींसह सपत्निक आले आहेत. आम्ही सर्वांनी स्वागत केलंच आहे. इंद्रप्रस्थाचा अभिषिक्त राजा म्हणून आजच्या शुभमुहूर्तावर यज्ञवेत्त्या दांपत्याचे मी अग्रपूजा म्हणून चरण क्षाळणार आहे. यज्ञवेत्त्याच्या शुभहस्ते या यज्ञातील पहिली पवित्र बिल्वसमिधा आपणा सर्वांच्या साक्षीनं, यज्ञकुंडात अर्पण करणार आहे. माझा विश्वास आणि दृढ श्रद्धा आहे की, आपल्या सर्वांच्या कृपाप्रसादानं आमच्या इंद्रप्रस्थ राज्याचं परमकल्याण होईल."

अग्निहोत्री ऋषींनी प्रणवाच्या मंत्राचा घोषच घोष उठविला. धगधगीत अंगारांची एक थाळी यज्ञकुंडात अग्निहोत्र म्हणून ओतण्यात आली.

पांडवश्रेष्ठ महाराज युधिष्ठिरांनी आपल्या अमात्यांकडे एक सहेतुक कटाक्ष टाकला. त्यांनी तयारच ठेवलेला, आर्यावर्तातील विविध नद्यांचं मंत्रित जल भरलेला एक सुवर्णकुंभ आणि एक सुवर्णाचं प्रशस्त तबक आणविलं. युधिष्ठिरांनी ते तबक आसनस्थ स्वामींच्या चरणांजवळ स्वहस्ते ठेवलं. द्वारकाधीश भगवान वासुदेवांचे विमल चरण स्वहस्ते हळुवार उचलून त्या तबकात ठेवले. श्रद्धेनं सुवर्णकलशातील जल पांडवश्रेष्ठ युधिष्ठिर त्यांवर एकधारेनं ओतू लागले. भोवतीच्या ऋषिमुनींनी मंत्रांचा घोषच घोष उठविला

यज्ञकुंडाजवळच्या ब्रह्मवृंदाचा मंद व एका लयीतील मंत्रघोष चालूच होता. यज्ञवेत्त्यांचे चरण क्षाळून होताच इंद्रप्रस्थमहाराज पांडवश्रेष्ठ युधिष्ठिरांनी ते चरणधूलीचे जलथेंब तीर्थाच्या आचमनासारखे श्रद्धेनं प्राशन केले. आपल्या मऊसूत धाग्याच्या उंची उत्तरीयानं, भक्तीनं स्वामींचे ओले नीलवर्णी चरण हळुवार पुसले. रुक्मिणीदेवींचीही पाद्यपूजा केली.

आता चढत्या मंत्रघोषांत स्वामी आसनावरून उठले. रुक्मिणीदेवी त्यांच्या पाठीशी झाल्या. दोघंही शांत चालीनं यज्ञकुंडाजवळ गेले. स्वामींनी आपली सत्त्वशील दृष्टी एकदा यज्ञमंडपभर फिरविली. दुसऱ्याच क्षणी वाकून हसतच बिल्वज वृक्षाच्या काष्ठांची

एक छोटी समिधामोळी उचलली. रुक्मिणीदेवींनी त्यांना समिधा उचललेल्या हाताला आपला हातस्पर्श जोडला. काहीतरी पुटपुटत ओणावून ती समिधामोळी स्वामी यज्ञकुंडात अर्पण करणार तोच –

– तोच नरेशांच्या बैठकीत बसलेला चेदिराज शिशुपाल आपल्या आसनावरून एकाएकी ताडकन उठला. तो स्वामींचा आतेबंधूच होता. आपल्या हातातील प्रचंड गदा एका झटक्यातच उचलून त्यानं ती खांद्यावर घेतली. तीव्र विरोधाच्या, कणखर आवाजात तो कडाडला, "थांऽब!"

सर्वांनी आश्चर्यानं भेदरून त्याच्याकडे पाहिलं. आपली पुष्ट मान त्यानं एकदा मंडपभर गरगर फिरविली. शेवटी दृष्टी आमंत्रक महाराज युधिष्ठिरांवर रोखली. नाकपुड्या विस्फारत कितीतरी क्रोधानं तो कडाडला, "कुरूंच्या श्रेष्ठ कुलात जन्मलेल्या युधिष्ठिरा, एका य:कश्चित गवळटाच्या पोराला या महान यज्ञाचा 'यज्ञवेत्ता' तू कसा काय केलं आहेस?" "युधिष्ठिरा तू इथं या आर्यावर्तातल्या समस्त शूर क्षत्रियांची, आज आमंत्रण देऊन घोर कुचेष्टा मांडली आहेस की काय?"

बलरामदादा, भीमार्जुन व सात्यकी क्रोधानं आपली गदा, चाप व खड्ग सावरीत आसनांवरून ताडकन उठलेच होते.

हातातील बिल्वजाची मोळी परत समिधांच्या ढिगांत तशीच फेकत स्वामींनी त्या सर्वांना केवळ हाताच्या संकेतानंच सावरलं.

आपणाला कुणाचा विरोध होत नाही, याचा अमळ वेध घेतलेला शिशुपाल आपलं आसन सोडून तरातर चालत यज्ञवेदीजवळ आला. अधिकच त्वेषानं अद्वातद्वा बोलू लागला, "या गवळ्यापेक्षा सूर्यप्रतापी अनेक वीर मंडपात असताना, त्यांना डावलताना तू कोणता विचार केला आहेस? इथं हे पितामह भीष्म, युवराज दुर्योधन, मद्रराज शल्य, सिंधुराज जयद्रथ, सुबलपुत्र शकुनी, मत्स्यराज विराट, पांचालश्रेष्ठ द्रुपद यांसारखे महाप्रतापी वीर असताना, तू या रणछोड पळपुटचा गवळटाचे चरण सर्वांसमक्ष कसे काय धुतलेस?"

शिशुपालानं आपला निर्देश केलेला ऐकताच पितामह भीष्म आसनावरून उठले. भानरहित झालेल्या विवेकशून्य शिशुपालाला सावरण्यासाठी म्हणाले, "दमघोषपुत्रा, चेदींच्या युवराजा, खूप झालं. शांत हो. खाली बैस!"

आपणाला सेनापती करणाऱ्या मगधसम्राट जरासंधाच्या वधाचं शल्य आणि रुक्मिणीदेवींशी ठरलेला विवाह मोडल्याची बोच मनी खोलवर रुतलेला शिशुपाल कुणाचंच ऐकण्याच्या स्थितीत नव्हता. पितामहांचे अनुभवी व सावध करणारे बोल त्यानं वरच्यावर फेकून दिले. उलट त्यांनाच उर्मट दटावीत तो म्हणाला, "तुम्ही वृद्ध झालात गंगापुत्र. तुम्हीच खाली बसा." अवमानित, हताश झालेले पितामह भीष्म खाली बसले. तसा शिशुपाल दावं सुटलेल्या सांडासारखा अनावर झाला. महाराज युधिष्ठिर व स्वामी यांच्याकडे आलटून–पालटून बघताना पुन्हा कडाडला, "मंडपात ब्रह्मतेजानं तळपणारे पैल, धौम्य, याज–उपयाज, द्रोण, कृप, विदुर आणि अश्वत्थामा यांसारखे पूजनीय विद्वान तुला दिसले नाहीत काय? त्यांच्याऐवजी एका काळ्या गवळ्याची अग्रपूजा करून कुरूंच्या धवल कीर्तीला काळिमा फासताना तुला काहीच कसं वाटलं नाही कुंतीपुत्रा? याच्या केवळ काळ्या-निळ्या वर्णानंच तू भारावून गेला असशील, तर त्याहीपेक्षा आकर्षक आणि आश्चर्यकारक सुवर्णवर्णाचं झळझळणारं अभेद्य कवच धारण

करणारा, कुंडलधारी, वीरश्रेष्ठ दानवीर अंगराज कर्ण तुला दिसलाच नाही काय?"

शिशुपाल आपणाला कुणाचातरी विरोध होतो काय, यासाठी क्षणैक थांबला.

ज्यांचा त्यानं निर्देश केला होता, ते अंगराज कर्णही उठून उभे राहत त्याला सावरताना म्हणाले "चेदिराज, भान सुटतंय तुझं. सावर. शांत हो." त्यांनाही फेकून देत शिशुपाल गरजला, "तुझ्यासारख्या सूताचं ऐकायला, मी काही याच्यासारखा गवळी नाही! तूच सावर. बैस."

आता संतापानं भानरहित झालेल्या शिशुपालाची रक्तवर्णी जीभ अरोध बडबडत चालली "युधिष्ठिरा, मंडपातील यच्चयावत सर्व ज्येष्ठ आणि श्रेष्ठांना तू कसा काय विसरलास ? एका यःकश्चित गवळ्याला तू आज एवढ्या महान यज्ञाचा यज्ञवेत्ता कसं काय केलंस?" उत्तरेच्या कक्षात बसलेले क्रोधानं संतप्त झालेले पितामह भीष्म, विदुर, संजय, अंगराज, आमच्या कक्षात बसलेले बलरामदादा, सात्यकी, उद्धवदेव, भीम, अर्जुन आणि सहदेव–नकुल ताडकन आसनावरून उठले होते. पण.... स्वामींनी आम्हा सर्वांनाच केवळ दृष्टीच्या धाकातच खाली बसविलं! आज पहिल्यानं मला जाणवून गेलं, त्यांच्या दृष्टीचा धाक म्हणजे काय असतं ते!

तिकडे भानरहित झालेला शिशुपाल जिभेला येईल ते मूढासारखं अद्वातद्वा बरळतच चालला. मद्यापेक्षाही प्रतिशोधाची धुंदी अधिक प्रभावी असते. त्याला हातवारे करीत यज्ञकुंडाभोवती फिरताना पाहून व त्याचे प्रलाप ऐकून कुणालाही हे पटलं असतं. जरासंधाचा गोमंत पर्वतापर्यंत गेलेला सेनापती म्हणून आणि रुक्मिणीदेवींचा विवाहपूर्व अयशस्वी वर म्हणून कौंडिण्यपुराहून अवमानित, काळं तोंड घेऊन परतलेला प्रतिस्पर्धी म्हणून स्वामींचा प्रतिशोध त्याला ध्यायचाच होता. त्यासाठीच तो मनाला येईल तसं अश्लाघ्य बोलत होता.

अतिशय अर्वाच्य, अशोभनीय भाषेत, सुचतील ते अपशब्द तो वापरू लागला. स्वामींची कधी कोणी केली नसेल आणि कोणी ऐकलीही नसेल, अशी प्रकट अवहेलना करू लागला – "आपल्या मामाची हत्या करणाऱ्या कुलघातक्या, मगधसम्राट जरासंधाच्या पौरुषाला पाठ दाखविणाऱ्या पळपुटचा भेकडा, क्षत्रियांनी आणि ऋषिमुनींनी मांडलेल्या या पवित्र यज्ञासाठी मथुरेच्या गौळणीवाड्यातून हवीचं दूध कावडींनी आणून देऊन त्याचं रीतसर दाम मोजून घेऊन चालता का नाही झालास? यज्ञवेत्त्याच्या त्या पवित्र सिंहासनावर तू बसलासच कसा? एका उच्चकुलस्थ क्षत्रियाकडून स्वतःचे अमंगल पाय धुऊन घेताना तुला एवढीसुद्धा लज्जा कशी काय रे वाटली नाही?"

त्याच्या प्रत्येक शब्दाबरोबर माझ्या स्वामींची मान हळूहळू भुजंगफण्यासारखी ताठर होऊ लागली. डावा हात कटीवर ठेवून शिशुपालाला वेळीच सावध करण्यासाठी ते निर्वाणीच्या वाणीत निक्षून शांतपणे म्हणाले, "शिशुपाल, तुझे नव्याण्णव अपराध या क्षणापर्यंत मी सहन केले आहेत. तुझ्या मातेला – माझ्या आतेला, तुझे शंभर अपराध मी सहन करीन असं वचन दिलं आहे. यापुढे प्रत्येक क्षण तुला जीवनमरणाची सीमारेषा खेचून जवळ आणीत आहे! सावध हो आणि संयम कर!"

"फुसकं तत्वज्ञान सांगणाऱ्या भेकडा, पुरुषार्थ हाच जर क्षत्रियांचा धर्म असतो आणि तू खरा क्षत्रिय असशील, तर असा या यज्ञमंडपाच्या मध्यभागी येऊन या चेदीराजाशी द्वंद्व खेळ कसा! पळपुटचा गवळ्या, नाहीतर या पवित्र मंडपातून तोंड

काळं करून चालता हो!!" हातातली गदा दूर फेकून सरळ त्यानं माझ्या स्वामींवर दृष्टी रोखून चक्क आपले दंडच थोपटले!

मला समोरच्या भावनारहित झालेल्या अशिष्ट आणि गर्वोद्धत क्षत्रियाला ओरडून सांगावंसं वाटलं की, 'शिशुपाला, संपलास तू!'

एकाएकी पूर्वी कधीच न ऐकलेल्या सहस्त्र वाद्यांच्या कर्कश आवाजांनी यज्ञमंडप डळमळू लागला. तो आवाज कुठून येत होता, हे कुणालाही कळेना. माझी दृष्टी कुणीतरी खेचल्यासारखी स्वामींच्याच मुखमंडलावर स्थिर झाली. उंचशील नीलदेठावर सहस्त्र पाकळ्यांचं काषायकमल असावं, तसा त्यांचा उभा देह दिसू लागला. क्षणापूर्वी नीलकमलासारखं दिसणारं त्यांचं मुख रक्तवर्णी दिसू लागलं! त्यांचे गुलाबी ओठ कसलेतरी दिव्य मंत्र पुटपुटू लागले. त्यातून बाहेर पडणारे, मी कधीच न ऐकलेले अनाकलनीय मंत्रबोल क्षणाक्षणाला वाढत चालले. संपूर्ण मंडप त्यांनी व्यापून टाकला. त्यांचा उजवा हात हळूहळू वर उद्धरला गेला. हां–हां म्हणता त्या हाताच्या तर्जनीवर तेजाची वलयंच वलयं फेकणारं, गरगर फिरणारं, बारा आऱ्यांचं, वज्रनाभीचं, दातेरी, तेजस्वी प्रकाशचक्र दिसू लागलं. सहस्त्रावधी वाद्यांच्या संमिश्र कलकलाटातही भेदणारा धारदार कर्णिमय ध्वनी, स्वामींच्या विमल मुखातून बाहेर पडला. मेघांच्या गडगडाटालाही लाजवील असा होता तो. मंडपातील यच्चयावत आमंत्रितांच्या कानांतून सरळ हृदयातच घुसला तो. एव्हाना काहीतरी अतर्क्य घडणार, म्हणून उभा मंडप उठून उभा राहिला होता. सर्वांच्याच कानी गगनमंडलातून आल्यासारखे स्वामिबोल पडले – "शिशुपाल, शंभर अपराध संपले तुझे! यापुढे – यापुढे एकशे दोनवा अपराध तुला करताच येणार नाही. ती संधी आता तुला कधीच मिळणार नाही!! ॐ हिरण्मयेन पात्रेणऽऽऽ...."

स्वामींचे मिटलेले दीर्घनेत्र उघडले गेले. एक क्षणभरच त्यांनी शिशुपालाच्या कंठाचा वेध घेतला. दुसऱ्या क्षणी हातातील प्रचंड गतीनं फिरणारं, तेजोवलयं फेकणारं ते मंत्रभारित सुदर्शनचक्र शिशुपालाच्या रोखानं प्रक्षेपिलं!

आता उभ्या मंडपाला चांगलं भान आलं होतं की, द्वारकाधीश, भगवान वासुदेवांनी क्वचितच करावयाचा सुदर्शनचक्रप्रयोग केला आहे. भेदरलेले कित्येक आमंत्रित, 'पळा...वाचवा... सुदर्शन आलं.... सुदर्शन' म्हणत भांबावून दोन्ही हात उंचावून ओरडतच इतस्तत: धावू लागले. आजपर्यंत मी स्वामींना गरुडध्वज रथाच्या घेरात पाठीशी घेऊन आर्यावर्तभर उभा–आडवा फिरलो होतो. त्यांचा सहवास मला काही नवीन नव्हता. पण – पण त्यांचं आजचं हे रूप मलाही परिचित वाटेना. आकाशात तळपणारा सूर्यदेव आपणाला सोबतच आल्यासारखा वाटतो, पण त्याच्या तेजोबिंबाकडे बघताना स्पष्ट कल्पना येते की, आपल्यापासून तो कितीतरी योजनं दूर आहे. या क्षणी स्वामी मला 'कोटी सूर्य समप्रभ' दिसले. त्यांच्या मुखमंडलावरील तेजावर दृष्टी ठरत नव्हती. आकाशस्वामी सूर्यदेवांसारखे ते कितीतरी योजनं दूर आहेत, हे पटलं. दुसऱ्याच क्षणी दोन्ही हात उंचावून जागीच मी त्यांना साष्टांग दंडवत घातले. मनोमन म्हणालो, "क्षमा करा प्रभू, या दासाला पदरी घ्या. आपला सखा होण्याची माझी खरोखरच पात्रता नाही. रक्ष, रक्ष प्रभो वासुदेवा." मी जीवदेठापासून त्यांना प्रार्थिलं. ते जवळ येऊन नेहमीसारखं मला थोपटून उठवीत आहेत, असा भास झाला – आणि खरोखरंच मी उठून उभा राहिलो. सुदर्शननाटयाचा एक साक्षीदार प्रेक्षक झालो.

मघापासून उन्मत्तपणे मनसोक्त बडबडणारा शिशुपाल आता मात्र थरथर कापू लागला होता. अनावर संतापानं लालेलाल झालेली त्याची मुद्रा आता मात्र प्राणभयानं काळीठिक्कर पडली होती. सर्व यज्ञमंडपभर कसा हाहाकार उडाला होता. सगळीकडे असह्य दीप्तिमान प्रकाशच प्रकाश दाटला होता. 'सूँऽऽ' असा दीर्घ आवाज काढीत तेजचक्र शिशुपालाच्या दिशेनं पुढे सरकू लागलं.

प्राणाच्या भयानं शिशुपाल आता लटलट कापत त्या देदीप्यमान तेजाला आपले केसाळ बाहू आडवे घालत वारण्याचा यत्न करू लागला. चक्राचा तेजमारा चुकविण्यासाठी मंडपातील राजांच्या आसनामागे लपण्याचा प्रयत्न करू लागला. क्षणापूर्वी माझ्या प्राणप्रिय स्वामींना पळपुटा म्हणणारा तो चेदींचा नायक आता स्वतःच पळू लागला. शिशुपाल ज्या-ज्या राजांच्या आसनामागे लपण्याचा प्रयत्न करीत होता, ते-ते सर्व नरेश चक्राच्या दाहक तेजापासून स्वतःचं रक्षण करण्यासाठी जिवाच्या आकांतानं इतस्ततः धावू लागले. एकही नरेश त्या तेजचक्रापुढे क्षणभरही थांबू शकत नव्हता. भेदरलेला, डोळे गरगर फिरविणारा शिशुपाल चपळाईनं एका आसनामागून दुसऱ्या आसनामागे लपण्याचा व्यर्थ, व्यर्थ यत्न करू लागला. दृष्टी पडताच नागसर्पाला लवभरही मोकळं न सोडता चपळ गरुडराज त्याला गाठतो, तसं सुदर्शन अनावर कर्कश निनादत त्याचा आसनामागून आसन असं पिच्छा पुरवू लागलं.

प्राणभयानं समूळ भांबावलेला शिशुपाल आता भ्रमिष्टासारखा हवा तसा मंडपभर धावू लागला.

मंडपात आपणाला तेजचक्रापासून वाचविणारं कुणीच नाही याची खातरी होताच, घोड्यासारखं सुसाट धावत त्यानं मंडपाचं पूर्व प्रवेशद्वार गाठलं. बाहेर पडून प्राणाच्या आकांतानं तो धावू लागला. त्याच्या भयकातर मुद्रेवरील प्रत्येक भाव, मानव मृत्यूला किती घाबरतो, हे विविध छटांनी दाखवू लागला. कधी मार्गात लागणाऱ्या पाषाणखंडामागे, तर कधी विशाल वृक्षाच्या खोडामागे आश्रयासाठी लपण्याचा तो व्यर्थ प्रयत्न करू लागला. सुदर्शन काही त्याचा पाठपुरावा केल्याशिवाय क्षणभरही थांबायला तयार नव्हतं. त्याची कर्कश शीळ क्षणाक्षणाला वाढतच चालली होती. मंडपातील कितीतरी स्त्री-पुरुष एव्हाना इंद्रप्रस्थातील आपल्या सुरक्षित शिबिरात पोहोचले होते. जे धैर्यशील थांबले होते, ते स्तंभित होऊन शिशुपाल आणि सुदर्शन यांचा जीवनमरणाचा लपंडाव डोळ्यांत प्राण एकवटून बघतच राहिले. मी मात्र मध्येच यज्ञवेदीजवळ उभ्या असलेल्या स्वामींच्या मुखमंडलाकडे बघत होतो. अद्याप त्यांचे नेत्र मिटलेलेच होते. ध्यानस्थ असल्यासारखे.

आता पुरता गलितगात्र झालेला शिशुपाल आश्रयाचे सर्व-सर्व मार्ग खुंटल्यामुळे शेवटी सरळ समोरच्या इक्षुमती नदीच्या पात्रात घुसला. शीळ घुमवीत गरगरणाऱ्या चक्राचा मारा चुकविण्यासाठी तो क्षणाक्षणाला इक्षुमतीच्या सखोल पाण्यात उतरू लागला. कंठापर्यंत पाणी येताच मात्र तो निरुपायानं थांबला. निर्धारानं त्यानं आपले डोळे मिटून घेतले. मरणाच्या सत्याला तोंड देण्यासाठी तो सिद्ध झाला. त्याचा कंठनाळ भेदून क्षणातच चक्र इक्षुमतीच्या पात्रात शिरलं. शिशुपालाचं मस्तक बघता-बघता इक्षुमतीच्या उफाळणाऱ्या लाटांतून वाहत अदृश्य झालं. शिशुपालाचं जीवन संपलं! मागे राहिले त्यानं माझ्या स्वामींना उद्देशून काढलेले अक्षम्य, अनुदार उद्गार! मी मंडपातील राजमंडळाच्या बैठककक्षाकडे दृष्टी टाकली. स्वामींच्या प्रिय पत्नी

रुक्मिणीदेवी! एवढं नाटच घडलं, तरी त्या आपल्या आसनावरून मुळीच हलल्या नव्हत्या. माझ्या मनी विचार येऊन गेला की, समोरचं हे भयनाटच बघून काय वाटलं असेल त्यांना? मला पटून चुकलं की, स्वामींना शोभणाऱ्याच होत्या त्या. कुरूंच्या राजमंडळी कक्षात असेच न हलता आसनावर बसले होते, एकटे पितामह भीष्म. आता ते महात्मा विदुरांशी काहीतरी बोलत होते.

मी यज्ञवेदीकडे पाहिलं. तिथं माझे नेहमीचे स्वामी उभे होते – हसणारे. त्यांच्या मुद्रेवरचं हे हास्य मी यापूर्वी कधी, कधीच पाहिलं नव्हतं. चक्र लुप्त झाल्याची खातरी झालेले देशोदेशींचे नरेश लगबगीनं पुन्हा मंडपात येऊन धडाधड स्वामींच्या चरणांवर लोळण घेऊ लागले. आता यज्ञप्रमुख धौम्य ऋषींनी शिष्यगणांच्या साहाय्यानं त्यांना निकरानं आवरलं. मुनिवर धौम्य एवढ्या परिश्रमानं सिद्ध केलेल्या राजसूय यज्ञाचं काय होणार, म्हणून सचिंत झाले होते. त्यांना जवळ पाचारण करून स्वामींनी त्यांचीही सोडवणूक केली. म्हणाले, “मुनिवर, दुसरा योग्य मुहूर्त पाहून लवकरच यज्ञाची पुन्हा आखणी करा.” पाचही पांडवांनी त्यांच्या प्रिय मधुसूदनाभोवती आदरानं केव्हाच मंडल धरलं होतं. स्वामींच्या उजव्या हाताशी त्यांचे प्रिय उद्धवमहाराज केव्हा येऊन उभे ठाकले होते, कुणालाच कळलं नाही. मी खेचल्यासारखा यज्ञवेदीजवळ स्वामींपाशी गेलो.

एवढी माणसं स्वामींभोवती एकवटली होती, पण कुणाच्याही तोंडून ब्र काही फुटत नव्हता. सारे अवाक झाले होते. ती असह्य शांतता फोडत एकटे उद्धवमहाराज म्हणाले, “वहिनी अद्याप शांतपणे आसनावरच बसून आहेत. बोलवू त्यांना?”

तसं नेहमीचं लोभस हसून आपल्या बंधूंचे खांदे थोपटत स्वामी म्हणाले, “नको. उधो, तूच घेऊन जा तुझ्या वहिनींना पांडवांसह राजवास्तूत. मी दारुकाला घेऊन दुसरीकडे चाललोय!”

“जशी इच्छा दादांची.” उद्धवमहाराज नम्रपणे म्हणाले. मी क्षणैक कोड्यात पडलो. ‘राजवास्तूकडे नाही – मग मला घेऊन स्वामी जाणार तरी आहेत कुठं?’ माझ्या मनीची ती शंका जाणलेले स्वामी दुसऱ्याच क्षणी माझाही खांदा थोपटत म्हणाले, “दारुका, चल गरुडध्वजाकडे.”

त्यांना कसलाही प्रश्न न विचारता मी बोलून गेलो, “आज्ञा आर्य.” सर्वांच्या मंडलातून आम्ही पूर्वेच्या महाद्वारातून मंडपाबाहेर आलो. मी एका डेरेदार वटवृक्षाच्या सावलीत माझे चारही अश्व बांधले होते. त्यांच्या समोर चारा टाकला होता. त्यांना सोडून, थोपटून गरुडध्वजाजवळ आणलं. स्वामी एकटेच रथारूढ झाले. मी रथनीड घेतला. सर्वांचा निरोप घेतलेल्या माझ्या प्रिय स्वामींसह निघालो. यमुनेच्या तीरानं काही अंतर आम्ही चालून आलो नाही, तो त्यांनीच प्रश्न केला, “दारुका, नेहमीसारखं कुठं जायचं ते नाही विचारलंस तू?”

कळसूत्री बाहुलीसारखं मी घोडे आवरत म्हणालो, “कुठं जायचं आपण स्वामी?” रथ थांबवून मी त्यांच्याकडे पाहिलं. ते हसतच होते. मला ते हास्य बालपणीच्या पुत्र दारुकीसारखं वाटलं. अगोदरच मी गोंधळलो होतो. मला अधिक गोंधळात टाकत ते खटयाळपणे म्हणाले, “दारुका, प्रश्न विचारण्यासाठी रथ थांबविण्याची तुला आवश्यकता होती का?” मी पुन्हा गोंधळलो. ते म्हणत होते, ते तर खरंच होतं.

“चल दारुका, आपण कालिंदीदेवीच्या माहेरी चाललो आहोत! त्या घरी नातवंडांचं

क्षेमकुशल पोहोचवायला!" स्वामी हसतच म्हणाले.

मी थक्क–थक्क झालो. क्षणापूर्वी सुदर्शनाचं प्रक्षेपण करणारे माझे आभाळाएवढे स्वामी, कालिंदीदेवींच्या माता–पित्यांना – आपल्या श्वशुरांना त्यांच्या नातवंडांचं क्षेम कानी घालायला स्वत: चालले होते.

स्वामींच्या आज्ञेप्रमाणं दुसऱ्या शुभमुहूर्तावर पांडवांचा राजसूय यज्ञ निर्विघ्न संपन्न झाला. या यज्ञामुळे आणि शिशुपालवधामुळे जमलेल्या देशोदेशींच्या नरेशांच्या तोंडून पूर्वीच पसरलेली पांडवांची व इंद्रप्रस्थाची कीर्ती कितीतरी वृद्धिंगत झाली. आमचं जनपद द्वारका तर आर्यावर्तातील इतर जनपदांच्या आघाडीला आलं.

काही दिवस इंद्रप्रस्थात पांडवांचा अगत्याचा प्रेमाचा पाहुणचार घेऊन स्वामी सर्व यादवांसह द्वारकेत परतले. आल्या–आल्या त्यांना एक धक्कादायक वार्ता ऐकावी लागली. मार्तिकावतीच्या राजा शाल्वानं आम्ही इंद्रप्रस्थात असतानाच द्वारकेवर ससैन्य आक्रमण केलं होतं! आमच्या वीर प्रद्युम्नानं आपल्या बंधूंच्या साहाय्यानं सत्तावीस दिवस त्याच्याशी निकराचं युद्ध करून ते परतवून लावलं होतं. निर्माणापासून प्रत्यक्ष द्वारकेवर झालेलं आक्रमण असं हे पहिलंच होतं. स्वामी त्यामुळे अंतर्यामी खोलवर दुखावले गेले. तरीही, नित्यक्रमात मात्र ते तसं कुणालाही दाखवत नव्हते. त्यांनी आपले कुशल स्थापत्यविशारद गर्ग यांना आपल्या कक्षात पाचारण केलं. त्यांना महत्त्वाची आज्ञा सर्व बारकाव्यांसह देताना ते म्हणाले, "मुनिवर गर्ग, माझ्या कक्षाकडे जाणारा माझा प्रिय सोपान काही पायदंडयांची भर घालून आता वाढवायचा आहे. त्यात प्रमुख्यानं आत्याबाई कुंतीदेवींसह प्रिय सखी द्रौपदी व पाचही पांडवांच्यासाठी अशा क्रमानं पायदंडया घ्या. त्यांच्याखालीच येईल अशी न विसरता एक पायदंडी घ्या. माझा एकनिष्ठ सेवक व प्रिय सखा सारथी दारुकाच्या नावाची!"

हा वृत्तान्त जेव्हा मला उद्धवमहाराजांच्या तोंडून ऐकायला मिळाला, तेव्हा माझं मन स्वामींविषयी अपार कृतज्ञभावानं तुडुंब भरून आलं. ते मला काय मानतात, हे मथुरेत एकदा स्वमुखे त्यांनीच सांगितलं होतं. आता तर त्याच्यावर श्रीकृष्णमुद्रा उमटली.

मूळ द्वारकेतील स्वामींच्या विश्रामकक्षाकडे जाणारा श्रीसोपान आता कितीतरी भव्य दिसू लागला. नानाविध सुवर्णी पायदंडयांनी मंडित असल्यामुळे येणाऱ्या–जाणाऱ्याचं तो सहजच लक्ष वेधून घेऊ लागला. या सोपानावर वरून खाली उतरणाऱ्या प्रारंभीच्या पायदंडया होत्या त्या स्वामींच्या यादवकुलातील स्वामींशी अतूट भावबंधानं जखडलेल्या प्रमुखांच्या नावाच्या. त्यातील वरून खाली उतरणारी पहिलीच पायदंडी होती, राजमाता देवकीदेवींच्या नावाची. दुसरी होती, महाराज वसुदेवबाबांच्या नावाची. तिसरी होती, गोकुळातल्या यशोदामातेची. चवथी होती, नंदबाबांची. चुलतबंधू असूनही पाचवी पायदंडी होती, ती उद्धवमहाराजांच्या नावाची. त्यानंतरची पायदंडी होती, गोकुळातील श्रीसखी राधेच्या नावाची. त्यानंतर रोहिणीमाता, बलरामदादा, रेवतीवहिनी असा क्रम होता.

अनेक यादवांना मागे टाकून एव्हाना पांडव स्वामींच्या कितीतरी निकट आले होते. प्रमुख यादवांनंतर पायदंडयात वर्णी होती, ती पाचही पांडवांची – राजमाता कुंतीदेवी व पांडवमहाराणी द्रौपदीदेवी यांच्यासह. मात्र या पांडव पायदंडयांमध्ये कोण कुठल्या क्रमांकावर आहे, हे स्वामीच काय ते जाणत होते. या श्रीसोपानात मला स्थान मिळावं,

हे माझं अहोभाग्यच होतं.

शाल्वाचं द्वारकेवरील ससैन्य आक्रमण ही गोष्ट दृष्टिआड करण्यासाठी मुळीच नव्हती. त्यानं या आक्रमणात वापरलेल्या सैन्यसामर्थ्याचा, शस्त्रसामग्रीचा प्रथम अचूक छडा लावणं भाग होतं. त्यासाठी युवा यादवनेता प्रद्युम्नाला स्वामी केव्हाही आपल्या कक्षात बोलावून घेत. नाना तऱ्हेचे प्रश्न त्याला विचारून त्यांनी शाल्वाच्या सामर्थ्याचा मनोमन वेध घेतला. मिळालेल्या माहितीतून सर्वांनाच विचारात टाकणारा एकच निष्कर्ष निघत होता तो हा की, शाल्वाचं खरं बळ होतं त्याच्याकडे असलेल्या 'सौभ' नावाच्या विमानात. त्या यंत्रवाहनाच्या जोरावर तो आर्यावर्तात कुठंही संचार करू शकत होता. पूर्वी याच यंत्राच्या साहाय्यानं त्यानं विदेशातून कालयवनाला आर्यावर्तात पाचारण केलं होतं. शाल्वाला शासन करायचं, तर त्याचं 'सौभ' नष्ट करणं अटळ होतं. तो तर मरुस्थलीतील अर्बुद पर्वतावरील मार्तिकावती या राजनगरात सैन्यासह सुरक्षित होता.

अमात्य विपृथूंना सांगून आर्यश्रेष्ठ द्वारकाधीशांनी यादवांची सुधर्मा राजसभा पाचारण केली.

या वेळी सुधर्मा सभेत अमात्यांनी सभेचं केवळ प्रयोजन सांगितलं. ते दोन कारणांचं होतं. सौभधारक शाल्वाचं वेळीच निवारण करणं आणि कुरूंच्या आमंत्रणाप्रमाणं विष्णुयाग यज्ञासाठी उपहार घेऊन हस्तिनापूरला कुणी जायचं, हे ठरविणं. ते सांगून होताच, हातच्या राजदंडाचा प्रथेचा ठोका देऊन ते थांबले.

नेहमीसारखी कसलीही कुजबुज चळवळ्या यादवांत माजली नाही. सर्व जण एकट्या स्वामींकडे किंतीतरी अपेक्षेनं दृष्टी रोवून बघतच राहिले. ती अंगावर येणारी शांतता असह्य होत चालली. तसं उद्धवमहाराज स्वामींना म्हणाले, "दादा, अधिक अंत पाहू नकोस सर्वांचा." तसे स्वामी त्यांच्याकडे बघून आत्मीय प्रेमानं हसले. एक कटाक्ष रुक्मिणीदेवींवर टाकून ते उभे राहिले. सर्व सभासद यादवांना उद्देशून नम्रपणे म्हणाले –

"सर्वांची आज्ञा असेल, तर मीच जाईन सौभपती शाल्वाच्या भेटीला! त्यामुळेच मला हस्तिनापूरला कुरूंच्या विष्णुयाग यज्ञासाठी जाता येणार नाही. तिकडे अमात्य व सेनापती सात्यकींनी निवडक योद्ध्यांसह अवश्य जावं. जाण्यापूर्वी माझी एकांती भेट घ्यावी."

नेहमीसारखं प्रदीर्घ न बोलता गाठीशी एवढे विक्रम असलेले स्वामी हात जोडून यादव सभासदांकडे नम्रपणे 'आज्ञा' मागू लागले. तेव्हा संपूर्ण सुधर्मा राजसभा हेलावून गेली. भारावलेले यादव योद्धे प्रतिसाद देत एकमुखी म्हणाले, "आज्ञा आपण करायची द्वारकाधीश, आम्हा सर्वांना!"

लक्षावधी यादवांची चतुरंगदल सेना एका सप्ताहातच उभी ठाकली. सुरू झालं 'सौभपती शाल्व अभियान!' एकाच वेळी देवकीदेवी, रोहिणीदेवी आणि माता रुक्मिणीदेवी यांच्या हातून कणीदार दह्याच्या कवड्या आपल्या गुलाबी तळहातावर घेऊन स्वामींनी त्या ओठांआड केल्या.

नेहमीसारखं द्वारकेच्या युद्धसंमुख यादव योद्ध्यांचं चतुरंगसेनादल प्रचंड नौकांतून खाडी पार करून सौराष्ट्राच्या किनाऱ्यावर उतरलं. या अभियानात स्वामींनी बलरामदादा, सात्यकी, कृतवर्मन्, उद्धवमहाराज, शिनी, अवगाह असे नेहमीचेच

यादववीर सोबत घेतले. विशेष म्हणजे अद्याप इंद्रप्रस्थातच असलेल्या मायावी, थोर स्थापत्यविशारद मयासुराला पाचारण करून घेतलं. द्वारकेपासून अर्बुद पर्वतापर्यंत निष्णात गुप्तचर निघण्यापूर्वी पेरून ठेवले. त्यांच्याकडून चौदिशांना वार्ता पाठविण्याची व्यवस्था केली की, द्वारकाधीश कामरूपाधिपती भगदत्त यांच्या आग्रही आमंत्रणावरून पूर्वेकडे प्राग्ज्योतिषपूरला गेलेत! सोबत सर्व निवडक यादवयोद्धे आहेत. जनपद द्वारकेचं संरक्षण प्रद्युम्न करताहेत – त्यांचे सापत्न बंधू भानू सांब, वीर संग्रामजित प्रघोष, श्रुत आणि वृक यांच्या साहाय्याला आहेत.

ही त्यांची शाल्वाला दिलेली हूल होती. त्यासाठी कामरूपाच्या भगदत्ताला त्यानं कसकशा हालचाली कराव्यात, याच्याही बारीकसारीक पूर्वसूचना स्वामींनी खास गुप्तचरांकडून पाठविल्या होत्या. त्याप्रमाणं तो द्वारकाधीशांच्या स्वागताची कामरूपात जय्यत तयारी चालली आहे, असा आभास निर्माण करणार होता. या तयारीच्या वार्ता शेजारच्या मणिपूर, त्रिपुरा, अंग, वंग, उत्कल, विदेह आणि मगध जनपदांत पोहोचविण्याची स्वामींच्या सूचनेनुसार व्यवस्थाही करणार होता.

प्रत्यक्षात स्वामींसमोर होता, तो आर्यावर्ताच्या पार पश्चिमेच्या मत्स्य जनपदातील अर्बुद पर्वतात पोहोचायला कठीण, असा मार्तिकावती नगरातील शाल्व. तिकडेसुद्धा स्वामी ससैन्य प्रत्यक्ष जाणार होते का? मुळीच नाही. आपल्या आप्तगणांच्या अवंती आणि कुंतिभोज या मध्यप्रदेशातील जनपदांचा ते कुशलतेनं उपयोग करणार होते. अवंतीतील मित्रविंदादेवींच्या आप्तगणांना आणि कुंतिभोज नगरातील आत्याबाई कुंतीदेवींच्या आप्तांना, आपल्या आगमनाची वार्ता गुप्त ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या होत्या. आमच्या सैन्याचा शेवटचा पडाव पडला, तो मध्य देशीच्या कुंतिभोज नगरात. इथं सोबत आणलेल्या मयासुराला स्वामींनी एकदा सामोरं घेतलं. त्यानंच शाल्वाला फार पूर्वी मार्तिकावती नगरीत जाऊन आपल्या कल्पक बुद्धीनं सौभ विमान सिद्ध करून दिलं होतं. त्याची गत काय आहे, घरघर किती लांबून ऐकू येते, ते जमिनीवर उतरतं कसं, याची खडान्‌खडा माहिती त्याच्याकडून वदवून घेतली.

तिकडे अर्बुद पर्वतातील मार्तिकावती नगरात शाल्वाच्या गुप्तचरांनी निवडक वार्ता त्याच्यासमोर ठेवल्या होत्या. “द्वारकेचा श्रीकृष्ण ससैन्य व निवडक योद्ध्यांसह कामरूप जनपदात गेला आहे. त्याच्या स्वागताची उत्कल, वंग, त्रिपुरा अशा राज्यांनी भव्य तयारीही केली आहे. द्वारकेत वृद्ध वसुदेवासह एकटा प्रद्युम्न आहे. सांबासह मोजके बंधू व यादवसैनिक आहेत. हाच समय आहे त्याच्यावर पुन्हा आक्रमण करून, अलीकडे नको तिथं डोकं वर काढणाऱ्या द्वारका जनपदाचा नक्षा उतरविण्याचा. पूर्वीच्या आक्रमणातील सत्तावीस दिवसांच्या आघातांनी द्वारका खिळखिळी झाली आहे. आपले काही सैनिक सौवीर देशातून समुद्रमार्गेही द्वारकेत उतरविता येतील!”

घनदाट अर्बुद पर्वत उतरून ससैन्य शाल्व सेनापती क्षेमधूर्तीसह द्वारकेकडे मार्गस्थ झाल्याच्या वार्ता आल्या. तशी कुंतिभोज नगरात पडाव टाकून राहिलेली आमची चतुरंगसेना हलली. बलरामदादा, सात्यकी, कृतवर्मन्, शिनी, अवनाह यांनी चपळाईनं मधलं दशार्णांचं राज्य ओलांडून अर्बुद पर्वताला घेर टाकला. आता शाल्वाचे मार्तिकावती नगराकडे परतण्याचे मार्ग बंद झाले. मी, स्वामी व उद्धवमहाराजांसह निवडक यादवयोद्धे घेऊन सौवीर जनपदात उतरलो. हे अर्बुदपर्वताचं पार पश्चिमेचं टोक होतं. स्वामींनी जसं द्वारकेला सुविहित बंदराचं रूप दिलं होतं, समुद्रात कोष्टू नावाचा

दीपस्तंभ उभा केला होता, तसंच सौविरांनी त्यांच्या पश्चिम सीमेवर एक बंदर उठविलं होतं. त्यांनीही तिथं एक दीपस्तंभ उभा केला. मी स्वामींसह उद्धवमहाराजांना घेऊन माझा गरुडध्वज रथ सौविरांच्या त्या बंदराकडे हाकारू लागलो. पाठीमागून मोजकेच शस्त्रसज्ज अश्वसाद यादव धावून आले. आता स्वामी ना द्वारकेत होते, ना प्राग्ज्योतिषपुरात, ना अर्बुदाभोवती टाकलेल्या घेरात. कुणालाच पत्ता लागत नव्हता द्वारकाधीश श्रीकृष्णमहाराज नेमके आहेत तरी कुठं? सौविरांच्या बंदरावर पोहोचताच स्वामींनी दक्षतापूर्वक एकच रणनीती वापरली. या बंदरातून जलमार्गानं द्वीप–द्वारका जवळ होतं. सौविरांच्यातीलच काही कुशल धीवर निवडून त्यांनी द्वारकेत घुसू बघणाऱ्या शाल्वाची निद्रा उडविणारी वार्ता त्यानं शुद्धाक्ष महाद्वार ओलांडण्यापूर्वीच त्याच्या कानी पडेल, अशी व्यवस्था केली. ती वार्ता होती, यादवांच्या प्रचंड सेनेनं मार्तिकावती नगराचा पाडाव करण्यासाठी संपूर्ण अर्बुद पर्वताला घेर टाकल्याची!

आता द्वारकेपर्यंत पोहोचलेला शाल्व आपल्या राजनगराचं रक्षण करण्यासाठी लागलीच परतणार होता. आपलं चतुरंगदल सैन्य भूमार्गानं परत पाठविणार होता. स्वत: सौभ विमानानं सौविरांच्या बंदरात उतरणार होता. तेथून आमच्या यादवसेनेच्या घेराचा, त्याच्या सामर्थ्याचा वेध घेऊन आपल्या पुढील हालचाली आखणार होता. हे स्वामींनी दूरदृष्टीच्या विचारानं अपेक्षित केलं होतं, तसंच क्रमश: घडणार होतं.

मी, उद्धवमहाराज आणि निवडलेले सशस्त्र अश्वसाद स्वामींच्या पाठीशी सौविरांच्या बंदरावर द्वारकेच्या रोखानं दक्षिणेकडे तोंड करून उभे राहिलो. चांगल्या दोन घटिका आम्ही प्रतीक्षेत होतो. आता माथ्यावरचा सौविरांचा सूर्य पश्चिम सागराच्या दिशेनं कलू लागला होता. स्वामी मध्येच भुवयांवर डाव्या हाताचं छत्र घेऊन पश्चिम सागरात दक्षिणेच्या रोखानं मध्येच दूरवर अस्वस्थ एकटक बघत होते. आता सौविरांच्या धीवरांच्या उंच शिडांच्या नौका परतताना दिसत होत्या. स्वामींचं दूरवर समुद्रात बघणं, त्यांना अपेक्षित काहीच न घडता चुटपुटत बंदराच्या ओल्या पुळणीवर फेऱ्या घालणं काही थांबत नव्हतं. मी आणि उद्धवमहाराज अस्वस्थ होऊन त्यांच्याबरोबर ओढल्यासारखे फेऱ्या घालत होतो. आजच्यासारखं अस्वस्थ झालेलं मी त्यांना कधीच पाहिलं नव्हतं. वक्षावरचं निळं उत्तरीय घट्ट–घट्ट पकडून मध्येच थांबत ते स्वत:शीच पुटपुटत होते. “हे – हे चमत्कारिक घडत आहे. विमानाची घरघर नाही – माधवा... मिलिंदा... मधुसूदना... अशा प्राण पिळवटून फोडलेल्या हाकाच ऐकू येताहेत! कुणाच्या?”

आता सांजावत आलं होतं. लांब पंख व शेपटाचे समुद्रपक्षी थव्याथव्यांनी कलकलत परतताना दिसू लागले.

इतक्यात कसलीतरी घरघर ऐकू आली. अशी घरघर पूर्वी आम्ही कुणीच कधी ऐकली नव्हती. क्षणाक्षणाला ती वाढतच चालली. दूरवरच्या पश्चिमसागराच्या दक्षिण टोकाकडून गरुड पक्षासारखी एक आकृती आभाळातून आमच्या रोखानं हळूहळू पुढे सरकत होती. ती जसजशी जवळ येत होती, तसतशी घरघर वाढतच चालली. आम्ही सर्व अवाक होऊन त्या गरुडपक्षाकृती आकृतीकडे एकटक बघतच राहिलो. आमचं सर्वांचं त्यामुळे स्वामींवरील लक्ष सुटलं. हे काय आहे स्वामी? असं स्वामींना विचारावं म्हणून मी त्यांच्याकडे बघितलं. आणि मग बघतच राहिलो. उद्धवमहाराजांची आणि सोबतीच्या सर्व

यादवसैनिकांची स्थिती माझ्यासारखीच झाली होती. पश्चिम सागराच्या किनाऱ्यावर स्वामी आम्हा कुणातच नसल्यासारखे दिसू लागले. आपले मत्स्यनेत्र पूर्णत: मिटून घेतलेले, उंचशील, ध्यानस्थ वाटणारे स्वामी काहीतरी पुटपुटत होते. क्षणापूर्वी ऐकलेली घरघर काहीच नव्हे, अशी अनेकानेक रणवाद्यांची भेदरवून टाकणारी लय ऐकू येऊ लागली. स्वामींची मुद्रा कोकमासारखी रक्तवर्णी झाली होती. एरवी निळसर, श्यामवर्णी, काळेच दिसणारे स्वामी आता मात्र निळसर, लाल, सुवर्णी वर्णाचे व पराकोटीचे तेज:पुंज दिसू लागले. त्यांच्या एरवी गुलाबी दिसणाऱ्या, पण आता रक्तवर्णी झालेल्या ओठांतून अस्फुट मंत्रबोल कानी पडू लागले. उंचशील स्वामींचा उजवा आजानुबाहू वर उद्धरला गेला. क्षणातच त्यांच्या उजव्या तर्जनीवर तेजाची असंख्य वलयंच वलयं फेकणारं, प्रचंड गतिमान गरगर फिरणारं, बारा आऱ्यांचं वज्रनाभीचं दर्शनसुंदर तेजयंत्र प्रकटलं!

त्या तेजानं आमचे डोळे दिपून गेले. समोरचा पश्चिम सागर त्या तेजानं कसा झळाळून उठला! तेजयंत्राबरोबर उठणाऱ्या कर्कश आणि प्राणभेदक आवाजामुळे सागराची गाज आणि काही क्षणांपूर्वीची ती विचित्र घरघर ऐकू येईनाशी झाली. पश्चिम सागरकिनाऱ्यावर साम्राज्य पसरलं ते यंत्राच्या तेजाचं आणि असंख्यात रणवाद्यांच्या एकमेकांत मिसळलेल्या कल्लोळाचं. स्वामींचा उद्धरलेला उजवा हात किंचितसा पुढे झुकला. तेजयंत्र सुदर्शनाचं प्रक्षेपण झालं होतं. रोरावणारं, प्रचंड गतिमान सुदर्शनचक्र आभाळातल्या त्या जवळ आलेल्या गरुड पक्षाच्या आकृतीच्या रोखानं झेपावलं. काही क्षणातच जाऊन त्या गरुडाकृतीला धडकलं. कानठळ्या बसणाऱ्या एका प्रचंड स्फोटाचा प्राणभेदक आवाज उमटला. दुसऱ्याच क्षणी पंख आणि देहाच्या ठिकऱ्याठिकऱ्या झालेला तो गरुड पक्षी पश्चिमसागराच्या फेसाळत्या लाटांत कोसळला. ते होतं, सौभ विमान! आत होता, सौभपती शाल्व!! एव्हाना आम्ही सर्व जण सागर पुळणीवर मटकन खालीच बसलो होतो. काही दिसत नव्हतं. आवाजानं आणि तेजानं मती कशी सुन्न झाली होती! अस्पष्ट दिसलं ते एवढंच की, पुढे झेपावलेलं तेजयंत्र तसंच मागे आलं होतं. नेहमीसारखं स्वामींच्या उंचशील देहाकृतीच्या तर्जनीवर आलं नव्हतं! स्वामींनी वळून ज्या दिशेला तर्जनी रोखली होती, तिकडे रोरावत निघून गेलं होतं. त्या दिशेला होतं, कुरूंचं हस्तिनापूर!! एव्हाना पश्चिम सागराला भिडलेला तबकाएवढा रसरशीत सौविरी सूर्य जलाआड डुंबत चालला. पश्चिमसागराच्या लाटांवर हेलावत हिंदकाळणारे सौभ विमानाचे अवशेष रात्रभर कणाकणानं दक्षिणेला वाहत जाणार होते, ते पहाटेला द्वारकाकर आणि वीर प्रद्युम्न यांना एक आनंदवार्ता देणार होते – 'शिशुपाल आणि जरासंध यांच्याशी हातमिळवणी करून परकीय कालयवनाला आर्यावर्तात पाचारण करणारा कृतघ्न, राष्ट्रद्रोही शाल्व संपला आहे.' कितीतरी मन:पूर्वक आदरभावानं मी माझ्या स्वामींकडे बघितलं आणि पुन्हा थक्क–थक्क झालो. एवढं सुदर्शन तेजयंत्र प्रक्षेपून शाल्वासह दूरवरच्या विमानाच्या ठिकऱ्या–ठिकऱ्या उडवणारे स्वामी विचित्रच दिसत होते. त्यांच्या वक्षावरचं सुवर्णकाठी निळं उत्तरीय काही त्यांना आवरता आलं नव्हतं. समुद्रवाऱ्यावर सुदर्शनाच्या पाठोपाठ तेही उडून चाललं होतं – हस्तिनापूरच्याच दिशेनं!!

यादवांना गौरवास्पद असलेल्या 'वासुदेव' या उपाधीला माझे स्वामी केव्हाच

पोहोचले होते. प्रत्यक्ष पितामह भीष्मांनी अंतःप्रेरणेनं त्यांना तसं म्हटलं होतं. आमच्या जनपद द्वारकेतील सर्व यादव, इंद्रप्रस्थातील कुंतीदेवींसह सर्व पांडव, पांडवस्त्रिया पौरवजनही त्यांना तसंच मानत होते. इंद्रप्रस्थातील पांडवांचा वंशवेलही आता विस्तारला होता. प्रत्येक पांडवाला द्रौपदीदेवींशिवाय कुणाला एक, कुणाला दोन, तर कुणाला तीन स्त्रिया जीवनसाथी म्हणून लाभल्या होत्या. महाराज युधिष्ठिर यांच्या दुसऱ्या पत्नीचं नाव होतं, पौरवीदेवी. त्यांना देवक नावाचा पुत्र होता. द्रौपदीदेवींच्या पोटी जन्मलेला त्यांचा पुत्र प्रतिविंध्य हा पांडवाच्या दुसऱ्या पिढीतील सर्वांत ज्येष्ठ पुत्र होता. इंद्रप्रस्थाचा उद्याचा तो युवराज होता.

दुसऱ्या क्रमांकाचे पांडवश्रेष्ठ मल्ल व गदावीर भीमसेन यांना द्रौपदीदेवी यांच्या पोटी झालेल्या पुत्राचं नाव होतं, सुतसोम. तो अंगापिंडानं पित्यासारखा सशक्त होता. विशेष म्हणजे स्वामींनी जसा आदिवासी राजा जांबवानकन्या जांबवतीदेवींशी केला होता, तसाच विवाह भीमसेनानी राक्षसकन्या हिडिंबेशी केला होता. मात्र हिडिंबादेवी माहेरी वनातच राहत होत्या. त्यांच्या पुत्राचं नाव होतं, घटोत्कच. हा सर्व भीमसेन–पुत्रांत अतिशय बलवान व जन्मतःच काही दुर्मीळ युद्धगुण घेऊन जन्मला होता. शिशुपालवधानंतर चेदींचा इंद्रप्रस्थाशी भावसंबंध राहावा, अशी स्वामींची इच्छा होती. चेदींनी पांडवांच्या व द्वारकेच्या विरोधात राहणं, त्यांना योग्य वाटत नव्हतं. यासाठी त्यांनी शिशुपालभगिनी कालीदेवीचा पत्नी म्हणून भीमसेनांना स्वीकार करायला लावला होता. त्या माहेरी शुक्तिमतीलाच राहत. त्यांच्या पुत्राचं नाव होतं, सर्वगत.

स्वामींना सर्वांत प्रिय पांडव होता धनुर्धर अर्जुन. मला, उद्धवमहाराजांना म्हणत तसंच त्यालाही ते 'सखा' म्हणत. स्वामीप्रिय पराक्रमी पार्थाला द्रौपदी व सुभद्रादेवी यांच्याशिवाय नागकन्या उलूपीदेवी व मणिपूरच्या चित्रांगदादेवी अशा दोन पत्नी होत्या. पांडवांचा नागांशी आलेला हा दुर्मीळ रक्तसंबंध होता. तसाच पेचप्रसंग भविष्यात आला असता, तर नागांचं सेनासामर्थ्य यामुळे पांडवांच्या पाठीशी उभं राहणार होतं. उलूपीदेवींच्या पुत्राचं नाव होतं, इरावान आणि चित्रांगदादेवींच्या पुत्राचं नाव होतं, बभ्रुवाहन.

चौथा पांडव होता नकुल. त्याला शिशुपालाची कन्या करेणुमती हिचा द्वितीय पत्नी म्हणून स्वीकार करायला स्वामींनीच सांगितलं होतं, या दांपत्याला पुत्र होता निरमित्र. शिशुपालाची भगिनी भीमसेनाला दिल्यामुळे व त्याचीच कन्या भीमसेनबंधू नकुलाला दिल्यामुळे ते दोघेही पांडव आता एकमेकांचे श्वशुर व जामात झाले होते! हा सगळा भावनिक खेळ व मेळ स्वामींच्याच अप्रतिम बुद्धिवैभवाचा होता.

शेवटचा पांडव होता सहदेव. तो निष्णात अश्वपारखी होता. अश्वाच्या धावणीसारख्याच सावध मनाचा होता. स्वामींनंतर माझ्याशी अश्व, रथ, अश्वांची व्यवस्था या विषयांवर तोच काय ते बारकाव्यानं घटकान्‌घटका बोले. पांडवांतील दोघांशी मी अधिक जवळच्या भावधाग्यांनी बांधला गेलो होतो. स्वामींना उद्धवमहाराजांएवढेच प्रिय असलेल्या अर्जुनाशी. दुसरा होता सहदेव. त्याला माझ्यासारखेच अश्व प्रिय होते. मी होतो सारथी. तो होता समर्थ अश्वप्रिय पांडव. तरीही आमच्या चर्चेत हे अंतर कधीच जाणवत नसे. या पाचव्या पांडवाला द्रौपदीदेवींशिवाय त्याचे मामा मद्रराज शल्य यांची कन्या विजयादेवी ही दुसरी पत्नी होती. त्यांचा पुत्र होता सुहोत्र. सहदेवाच्या तिसऱ्या पत्नीचं नाव होतं, भानुमतीदेवी. त्या मूळ यादवांच्या कुलातील

असल्यामुळे पांडवांचा या नात्यातूनही यादवांशी दृढ नातेसंबंध आला होता. अद्याप तरी या दांपत्याला पुत्रप्राप्ती झाली नव्हती.

द्वारकेत जसा स्वामी व बलरामदादा यांचा वंश विस्तारला होता, तसाच इंद्रप्रस्थात पांडवांचाही. ही दोन्ही राजशक्तींची स्थानं आता परस्परांत गुंतलेल्या नातेसंबंधांमुले दृढपणे जवळ आली होती. बाहेरच्या दुष्ट वैरशक्तींनी कितीही यत्न केला, तरी आता या दोन जनपदांतील भावसख्य कधीच तुटणार नव्हतं.

ज्याच्यासाठी माझ्या स्वामींनी जीवनभर प्रयत्नांचा आटापिटा केला होता, ते द्वारका जनपद आता स्थिरावलं होतं, आर्यावर्तभर 'श्रीकृष्णाची द्वारका' म्हणूनच नावारूपाला आलं होतं. कोटयवधी युद्धसंमुख यादवांच्या वास्तव्यानं गजबजलेलं, एकएका अहंमन्य अरेरावांना आपल्या बुद्धिकौशल्याचे थक्क करणारे नमुने दाखवून ज्यांनी निपटलं होतं, त्या भगवान वासुदेवांच्या द्वारकेला आता कोण ललकारणार होतं?

पण माझा आणि असंख्य यादवांचा याबद्दल भ्रमनिरास झाला. अशाच एका घटनाचक्र फिरवायला उत्सुक असलेल्या दिवशी दूर आर्यावर्तातील पूर्व देशातून एक राजदूत आला. त्यानं द्वारकेसाठी आणला होता, एक उद्धत संदेश! द्वारकेला आणि तिचे प्रमुख असलेल्या द्वारकाधीशांना सरळ सरळच ललकारणारा. राजदूत होता पूर्वेच्या पुंड्र राज्यातला. राजदूतानं यादवांच्या भरल्या राजसभेत आपल्या स्वामी पौंड्रकांचा संदेश माझ्या स्वामींना सांगितला. अत्यंत उद्धत आणि उर्मट भाषेत, त्याला जसा आदेश होता, तसं तो म्हणाला, "माझे स्वामी पुंड्राधिपती आर्यावर्तातील एकमेव खरे वासुदेव पौंड्रक महाराजांचा संदेश आहे की – "

द्वारकेत सुधर्मा सभेत आजपर्यंत हे असं कधीच कोणीही राजदूत वागला नव्हता. त्याच्या कृतीमुळे अवाक झालेले सभेतील सर्व यादव प्रथम कान टवकारून नुसतं ऐकतच राहिले.

"संदेश आहे की, 'माझ्या देहावरील राजवेषासारखाच राजवेष परिधान केल्यामुळे – माझ्यासारखीच कंठात वैजयंतीमाला धारण केल्यामुळे, मुकुटात मोरपीस मढविल्यामुळे कुठलाही; अद्याप अंगाला गाईच्या मलमूत्राचा उग्र दर्प येणारा गवळट कधीही वासुदेव होऊ शकत नाही! माझं अनुकरण करीत वासुदेव म्हणविणाऱ्या आर्यावर्तातील कुठल्याही क्षत्रियानं माझ्याशी – एकमेव खऱ्या वासुदेवाशी – निर्णायक प्राणांत युद्ध करावं! द्वारकाधीश आणि वासुदेव म्हणवून घेणाऱ्या यादवांच्या चेटक्याला माझं हे स्पष्ट–स्पष्ट आव्हान आहे.'" तो राजदूत एकनिष्ठ होता. निर्भय होता. आपल्या स्वामींचा राजसंदेश खडान्खडा त्याच भाषेत सभागृहाच्या कानी त्यानं घातला. दुसऱ्याच क्षणी मात्र 'हाकला त्याला – बंदिवान करा त्याला – कंठस्नान घाला!' असा प्रचंड गदारोळ यादवांत उठला. आरडाओरडा करणाऱ्या असंख्य संतप्त यादवांच्या डोळ्यांतून संतापाच्या ठिणग्याच ठिणग्या बरसू लागल्या. निर्माणापासून सुधर्मा सभेत जे कधीच घडलं नव्हतं, ते रणकंदनच आता घडणार होतं.

नेहमी स्वामी संथपणे उभे राहत. या वेळी मात्र राजदूताच्या अवमानकारक, उर्मट बोलांनी नव्हे, तर अनावर संतप्त यादवांना आपणच या क्षणी रोधू शकतो, हा पूर्ण विश्वास असलेले स्वामी ताडकन उठले. आपला आजानुबाहू कितीतरी उंच उंचावून कडाडले, "थांबा! शस्त्रं खाली घ्या. आपापल्या आसनांवर मुकाट बसा!" कधीच नव्हे एवढा धाक त्या दरडावणीत होता. त्यांच्या तोंडून अशी काही दटावणी मी कधीच ऐकली

नव्हती. काहीतरी अघटित घडणार. स्वामी आपले मत्स्यनेत्र मिटून, राजदूताची उद्धत जिव्हा ज्या कंठावर उभी आहे, त्यावर दर्शनसुंदर तेजयंत्र चालवून राजदूताला धडा देणार. आमची राजसभा कधी नव्हे ते पहिल्यानं रक्तलांछित होणार, म्हणून भेदरून मी स्वामींकडे नुसता बघतच राहिलो. पण – पण –

"यादवहो! या सेवक राजदूताचा काहीच दोष नाही! माझ्या दारुकासारखा, तुमच्यातील प्रत्येक यादवासारखा तो त्याच्या स्वामींचा एकनिष्ठ व राजनिष्ठ सेवक आहे. शांत व्हा. "माझ्या या मित्र राजदूताकडून तुम्ही सर्वांनी एक कधीही विसरला जाऊ नये असा अनमोल धडा घ्यावा!! स्वामीनिष्ठेचा."

दुसऱ्याच क्षणी सर्वांना थक्क करून टाकणारी आज्ञा अमात्यांना सुटली – "विपृथू, या राजनिष्ठाबरोबर पुंड्राधिपती खऱ्या वासुदेवमहाराजांना यादवांकडून उपहार म्हणून देण्यासाठी माझ्या वेषाचं एक तबक सत्वर सादर करा! त्यावर एक रसरशीत टपोरं मोरपीस ठेवायला विसरू नका!"

'जशी आर्याज्ञा' म्हणत यादव अमात्य जायला निघाले. त्यांच्या कानावर त्यांच्या आर्यांची आणखी एक आज्ञा पडली, "या राजनिष्ठ पुंड्रकर दूतासाठीही एक उंची राजवस्त्रं उपहारतबक घेऊन या! त्यानं आपल्या स्वामींची आज्ञा, प्राण पणाला लावून शब्दशः पाळली आहे. मी त्याच्या स्वामींची भेट अवश्य घेईन."

काही वेळातच नक्षीदार वस्त्रांच्या आच्छादनांनी झाकलेली दोन तबकं सुधर्मा सभेत महाराज वसुदेव आणि महाराणी देवकीदेवी यांच्यासमोर सादर झाली. दोघांनीही त्यांना प्रथेचा म्हणून हस्तस्पर्श दिला. युवराजांनंतर स्वामींनीही हस्तस्पर्श केला. आपल्याला कंठस्नान मिळण्याऐवजी मानवस्त्रं मिळताहेत, तीही सर्वांचे स्वामी शोभणाऱ्या विभूतीच्या हातून! आपण मात्र राजनिष्ठेच्या नावाखाली त्यांना हवं ते अद्वातद्वा बोललो. या तीव्र जाणिवेनं राजदूताच्या नेत्रांतून टपाटप आत्मरस पाझरला. सभेच्या पायघड्यांत विरून गेला.

आता पौंड्रक वासुदेव अभियानानं राजनगरी द्वारका पुन्हा झडझडून उठली. नानाविध कामांना लागली. आर्यावर्ताचा पश्चिम भाग शाल्वाला वधून स्वामींनी निर्भय केला होता. आता त्यांची दृष्टी वळली होती, ती पूर्व आर्यावर्ताकडे. स्वतःला वासुदेव म्हणवून घेणाऱ्या या पौंड्रकाचा पुंड्र देश पूर्व सागरालगत कौशिकी व गंगा यांच्या संगमकिनारी होता. त्याच्या राज्याला लागून करुष आणि वंग देश होते. पौंड्रकानं खूप विचार करून दूरदृष्टीनं आपला राजदूत द्वारकेत धाडला होता. वरवर त्यानं असं भासवलं होतं की, आपण एकटेच वासुदेव म्हणून द्वारकाधीशांना डिवचणारं आव्हान देतो आहोत. आतून मात्र त्यानं करुष देशाचे दंतवक्र व विदूरथ आणि लगतच्या वंगाधिपतीशी गुप्त बैठक घेऊन राजकीय संधान बांधलं होतं. या खोटारड्या प्रतिवासुदेवाचं आव्हान, हे त्याच्या एकट्या व छोट्या पुंड्र राज्याचं नव्हतं. ते तीन राज्यांच्या प्रबळ संघटनेचं आव्हान होतं, त्याला कल्पना नव्हती की, आपल्या बुद्धिकौशल्यानं होत्याचं नव्हतं करणाऱ्या द्वारकाधीशांशी आपली गाठ आहे.

पुंड्रांचा राजदूत टप्पे आणि पडाव टाकत पूर्वेकडील आपल्या जनपद पुंड्रात पोहोचण्यापूर्वीच स्वामींचे निष्णात गुप्तचर प्राग्ज्योतिषपूरच्या भगदत्तांना भिडले होते. त्यांच्या पुंड्र, करुष आणि वंग या तिन्ही राज्यांच्या उचललेल्या बारीकसारीक वार्ता

द्वारकेत थडकू लागल्या. स्वत:ला वासुदेव मानणारा पौंड्रक स्वामींच्या विरोधात जाणं समजू शकत होतं, पण त्यांचे दोन आतेबंधू वैरभावाच्या काटेरी अरण्यात का शिरावेत, तेच मला उमगत नव्हतं. त्यांनी पौंड्रक वासुदेवाच्या पंखाखाली जाणं का मान्य करावं, कळत नव्हतं मला, इतर अनेकांना व सर्व यादवांना जे कळत नव्हतं, ते स्वामींना सहज कळत होतं.

या प्रतिवासुदेव अभियानात आर्यश्रेष्ठांनी कटाक्षानं मागे ठेवले, ते दोन्हीही सेनापती. सोबत घेतले ते नव्या पिढीचे सर्व तरुण यादववीर. प्रामुख्यानं हे अभियान स्वामींनी विचारपूर्वक दुसऱ्या पिढीच्या वीरत्वाला आकार देण्यासाठी आखलं होतं.

स्वामींच्या या पूर्वदेशीच्या अभियानाची पार्श्वभूमी थोडी गुंतागुंतीची होती. यातील दंतवक्र व विदूरथ हे स्वामींचे आतेबंधू करुष देशाचे होते. त्यातील ज्येष्ठ दंतवक्र करुष देशाचा अधिपती होता. त्याचा बंधू विदूरथ करुष देशाबाहेरची सैन्यसूत्रं सांभाळत होता. रुक्मिणीदेवींच्या पहिल्या अयशस्वी स्वयंवरातून स्वामींवर क्रोधित होऊन परतलेल्या नरेशांपैकी हाही एक होता. जरासंध, शाल्व आणि शिशुपाल या त्रिकुटानं स्वामींना समूळ उद्ध्वस्त करण्यासाठी रचलेल्या षडयंत्रात याचाही हात होता. त्याचा मावसबंधू असलेल्या शिशुपालाच्या वतीनं तो पूर्वीच जरासंधाला मिळाला होता. जरासंध वधला गेल्यानंतर साहजिकच तो स्वामींवर संतप्त झाला होता.

आपल्या शस्त्रसज्ज तरुण पुत्रांच्या मेळातून स्वामी, बलरामदादा व उद्धवमहाराज यांच्यासह द्वारकाखाडी उतरलो. सुसज्ज चतुरंगदल सेनेनं अगोदरच पूर्व दिशेकडे प्रस्थान ठेवलं होतं. यादवांच्या निष्णात व कुशल गुप्तचर पथकांतील अनेक अनुभवी व तत्पर गुप्तचर पूर्व देशातील पुंड्र जनपदाभोवतीच्या राज्यांत पांगले होते. त्यांत उत्कल, मगध, अंग, कामरूप, मणिपूर अशी गणराज्यं होती. त्यांतील बलाढ्य मगध राज्य जरासंधपुत्र सहदेवामुळे व कामरूप राज्य भगदत्तामुळे आता आमचं मित्र गणराज्य झालं होतं. मणिपूर राज्य अर्जुनपत्नी चित्रांगदादेवींचं असल्यामुळे तेही मित्रराज्य होतं. या अभियानाची यशस्वी सांगता होईपर्यंत उत्कलांचाच काय तो स्नेह संपादून ठेवायला पाहिजे होता. अमात्य विपृथूंकरवी स्वामींनी कलिंग व उत्कलांची राजनगरी भुवनेश्वरला मानवस्त्रं आणि भेटवस्तू पाठवून ते साधलं होतं.

भृगुकच्छ पार करून आमचा पहिलाच पडाव पडला होता आनर्तातील नर्मदा नदीच्या किनारी. ज्या मार्गानं आम्ही निघालो होतो, त्या मार्गात आता लागणार होता तो लांबलचक व घनदाट अरण्याचा उभा पारियात्र पर्वत. दंडकारण्याचा पश्चिमेकडचा अर्धाअधिक भाग यानंच व्यापला होता. त्याला वगळून नर्मदा किनाऱ्या–किनाऱ्यानीच पडाव टाकीत, आम्ही पूर्वेकडे चाललो. काही दिवसांनी आम्ही विंध्य पर्वतातील माहिष्मती नगरीत आलो.

माहिष्मतीच्या पौरवजनांनी बलरामदादा, स्वामी आणि उद्धवमहाराज यांचं आनंदानं स्वागत केलं. आमच्या विशेष पथकानं या सुंदर नगरीत एक सप्ताहाचा विश्राम घेतला. दक्षिण कोसल राज्यातील शोण नदी पार करून आम्ही मागधांच्या राज्यातील दामोदर नदीपर्यंत आलो. इथं आता मगधाधिपती असलेल्या सहदेवांनी बलरामदादा, स्वामी व उद्धवमहाराज या तिघा बंधूंचं अत्यंत अगत्यानं स्वागत केलं. पुढे गेलेल्या आमच्या यादवसेनेला त्यांनी धान्यगोणी, जनावरांचा चारा, औषधी वनस्पती दिल्या होत्याच; शिवाय आमच्यासाठी प्रचंड दामोदर नदी पार करण्यासाठी सुसज्ज व प्रशस्त नौकाही

दिल्या. त्यांच्या साहाय्यानं आमच्या विशेष पथकानं रथ व हत्तींसह दामोदर नदी ओलांडली. मागधांच्या प्रशस्त नौका आम्ही दामोदर नदीच्या पात्राबाहेर भुईवर घेतल्या. त्या हत्तींच्या पाठीवर चढवून उजवीकडे उत्कलांना व डावीकडे अंगराज कर्णांचा अंग देश ठेवून आम्ही गंगाकिनारी आलो. वंगदेशाजवळ पूर्व सागराला मिळताना ती अनेक मुखांची झाली होती. वंगातून वाहताना कितीतरी रुंद झालेलं गंगापात्र सागरासारखंच विशाल दिसत होतं. गंगेच्या या दर्शनाबरोबर स्वामींना द्वारकेतील आपल्या सतत गाज उठविणाऱ्या पश्चिम सागराचं तीव्र स्मरण झालं. इथंही काही पडाव आपोआपच पडले.

शेवटी आम्ही पुंड्रांच्या सीमेवरच्या आमच्या प्रचंड सेनेला मिळालो. एव्हाना पुंड्रांचा अधिपती त्याच्या राजदूतानं समोर ठेवलेल्या भेटीतील वृत्तान्तानं पूर्ण अपसमजात गेला होता. त्याला त्याच्या गुप्तचरांकडून मिळणाऱ्या वार्तांमुळे वाटलं होतं की, द्वारकेचा स्वतःला 'वासुदेव' म्हणवून घेणारा खोटा गवळी आपला मांडलिक म्हणून भेटीला आला आहे! सीमेवरची अफाट सेना बघून मात्र त्याची झोपच उडाली. साहाय्याला आलेले दंतवक्र, विदूरथ आपल्या करुष देशाच्या रक्षणासाठी निघून जाताच तो पार हडबडला. तरीही प्रतिवासुदेवाचं चंद्रबळ आणून त्यानं आपल्या अमात्याकरवी संदेश धाडलाच. संदेश होता, 'भेटीस येताना मस्तकीचा किरीट उतरवून मगच यावे. खऱ्या वासुदेवांच्या मांडलिकांना मोरपीसधारी किरीट धारण करण्याचा अधिकार नाही. आपल्या दूताकडून राहिलेली प्रथेची उपहारतबकंही विलंब झाला असला तरी पाठवावीत!'

आता हे पहिल्यानं बलरामदादांच्या सहनशक्तीबाहेर गेलं होतं. ते पौंड्रकाच्या अमात्यावर कडाडलेच, "सांग तुझ्या वासुदेवाला. भेट म्हणून साक्षात आम्ही दोघंच समक्ष येतो आहोत!"

ही भेट कौशिकीकिनारी युद्धानंच घडली. विशेष म्हणजे हत्तीवरच्या अंबारीत बसून आलेला पौंड्रक वासुदेव चक्क आमच्या स्वामींसारखा वेष अंगी धारण करून आला होता. अंबारीतून उतरून त्यानं स्वामींना खड्गयुद्धाचं आव्हान दिलं. त्याच्या सेनापतीनं बलरामदादांना अंगावर घेतलं. हाती नंदक खड्ग पेललेले, कुलदेवी इडेचा रणघोष उठविणारे स्वामी आपल्यासारख्याच वेषातील पौंड्रकाला भिडताना मजेदार दिसत होते. त्यांचं युद्ध बघणं, हाही एक सर्वथा वेगळाच अनुभव होता. पौंड्रकाच्या हातातील खड्ग स्वामींच्या नंदकाचे आघात सोसताना भंगलं. मुठीत राहिलेल्या खड्गाच्या भुंडचा शेष भागाकडे तिरस्कारानं एकदा बघत, त्यानं ते फेकून दिलं. हाती प्रचंड घेराची गदा पेलली. तसं चपळाईनं गरुडध्वजाच्या शस्त्रघेरातील त्याहून प्रचंड स्वामींची कौमोदकी गदा मी त्यांच्या हाती दिली. प्रचंड गदाप्रहारांचे ठणठणाट उमटून कौशिकीच्या जललहरींत मिसळू लागले. कौशिकी नदीच्या पात्राला एक देवदुर्लभ दृश्य बघायला मिळत होतं. क्षणात दूर जाणारी तळहाताएवढी दोन टपटपीत मोरपिसं क्षणात एकमेकांजवळ येत होती. लागलीच त्वेषानं एकमेकांपासून दूर जात होती. पूर्व देशीच्या पुंड्र सीमेवरचा सूर्य मावळतीला आला. त्याच्या साक्षीनं स्वामींनी त्यांना वासुदेव म्हणून ललकारणाऱ्या पौंड्रकाचं वक्ष विदीर्ण केलं. कौशिकीकिनारी तो निष्प्राण उताणा पडला. तसं तिकडे बलरामदादांनी त्याच्या सेनापतीला केव्हाच निपटलं होतं. स्वामी शांत पावली प्रतिवासुदेवाच्या जवळ गेले. बाजूला पडलेल्या त्याच्या मुकुटातील मोरपीस त्यांनी

वाकून हलकेच हाती घेतलं. कमरेच्या शेल्याच्या शेवानं त्यावर पडलेल्या प्रतिवासुदेवाच्या रक्ताचे ताजे थेंब हलक्या हातानं पुसून काढले. आपल्या हातचं मोरपीस माझ्या हातावर ठेवत ते म्हणाले, "हे कौशिकीच्या पात्रात विसर्जित कर दारुका! कसाही असला तरी माझ्या वासुदेवपदाला 'प्रति' हा शब्द जोडून, मला माझ्या वासुदेवपदाचं सतत स्मरण देणारा वीर होता तो! या भारतवर्षातील मस्तकीच्या सुवर्णमुकुटात मोरपीस मिरविणारा माझ्यानंतरचा एकमेव नरेश होता तो."

'आज्ञा आर्यश्रेष्ठांची' म्हणून स्वामींच्या आज घडलेल्या नव्याच दर्शनाचा विचार करत मी कौशिकीकडे चालू लागलो. परतलो तेव्हा पश्चिमेचा पौंड्रकी सूर्य अर्धा डुंबला होता. कौशिकीच्या पात्रात सांजअर्घ्य देणाऱ्या, आर्यावर्तातील जीवनसत्याचं प्राणपणानं रक्षण करणाऱ्या, त्यासाठी असत्याचं कठोर निर्दालन करणाऱ्या खऱ्याखुऱ्या वासुदेवाचं दर्शन घेऊन तो भरून पावला होता. तृप्त नेत्रांनीच त्यादिवशी तो मावळला.

आता पाळी होती, रुक्मिणीदेवींच्या पहिल्या स्वयंवरात कौंडिण्यपूरच्या सीमेवर जरासंधानं भरविलेल्या बैठकीत बसलेल्या करुषराज दंतवक्राची! परकीय कालयवनाला आमंत्रण धाडून पाचारण करणाऱ्या शाल्वाच्या षड्यंत्रातील भागीदार विदूरथाची!

या दोघाही आतेबंधूंचा सर्वांत मोठा अक्षम्य अपराध कोणता असेल, तर त्यांनी मगधसम्राट जरासंधाच्या शतशीर्ष यज्ञासाठी लागणारे अनेक नरेश स्वहस्ते बंदिवान करून गिरिव्रजाकडे धाडलं होते. शिशुपालानं शंभरच अपराध केले होते. या उभय बंधूंनी तर त्याहून अधिक केले होते.

यादवांची विजयी सेना बलरामदादा व स्वामींचा जयघोष करीत करुष देशाच्या सीमेत घुसली. करुषांच्या सीमेवरून स्वामींनी दंतवक्राला संदेश धाडला – 'गोकुळच्या नंद–यशोदांचे गोपपुत्र बलराम-श्रीकृष्ण करुषमहाराजांच्या आणि त्यांच्या बंधू विदूरथांच्या भेटीसाठी आलेत! मागधांचे सांप्रतचे सहदेव महाराज द्वारकाधीशांचे परमस्नेही असल्यामुळे ते काही आता करुष राज्यात येणार नाहीत. शक्यता आहे, गांधार देशीच्या कालयवनाचा पुत्र साहाय्यास येण्याची. आपण त्या दूरस्थास अवश्य पाचारण करावे!'

या संदेशाचा अर्थच होता, द्वारकेच्या गवळ्याशी आता लढायला सिद्ध व्हावं. दंतवक्रानं तो अचूक जाणला. आपली शस्त्रसज्ज सेना घेऊन बंधू विदूरथासह तो संग्रामसंमुख होऊन रणवाद्यांच्या घोषातच सीमेपाशी आला.

स्वामींच्या आजवरच्या संपूर्ण जीवनक्रमात हा पहिलाच प्रसंग होता. रक्तनात्याच्या प्रत्यक्ष दोघा आतेबंधूंशी साक्षात समरांगणावर भेटण्याचा. माझ्या मागे धावत्या गरुडध्वजाच्या घेरात दृढ उभे ठाकलेल्या स्वामींनी शेल्यातील पांचजन्य काढून आपल्या गुलाबी ओंजळीत नेऊन गगनमार्गी आपली नीलवर्णी ग्रीवा उंच उंचावून तो प्राणपणानं फुंकला. त्या प्रेरक नादानं हजारो, लाखो शस्त्रसज्ज यादववीर 'इडामाता जयतु' असा गगनभेदी रणघोष देत करुषांवर तुटून पडले. हाही संग्राम बराच समय चालला. सांध्यसमयाला स्वामींनी प्रथम दंतवक्राचा शार्ङ्ग धनुष्यातून एकापाठोपाठ पाच अचूक बाण फेकून वक्षभेद केला.

तिकडं करुषांच्या सेनापतीला व अनेक करुषवीरांना बलरामदादांनी सौनंद मुसल व संवर्तक नांगराच्या प्राणभेदक प्रहारांनी यमसदनाला धाडलं.

आपला बंधू करुषराज दंतवक्र पडला, ही वार्ता ऐकताच विदूरथ संतप्त झाला. 'तो

चेटक्या गवळी मला दाखवा’ असं कडाडत, रथ धावडवीत स्वामींच्या गरुडध्वजासमोर आला. या युद्धात स्वामींचे अमोघ शरचापकौशल्य मी व अनेक यादव योद्धयानी डोळाभर बघितलं. ते काही नुसते मल्लविद्येतील बाहुकंटक या निकराच्या डावपेचाचे अधिकारी नव्हते. तेजयंत्राचं प्रक्षेपण करणारे, भोवतीच्या दर्शकांना गोंधळात टाकणारे नुसते सुदर्शनाचे अधिकारी नव्हते, तर ते एक निष्णात धनुर्वीरही होते. इंद्रप्रस्थाच्या धनंजयासारखे हस्तिनापूरच्या अंगराज कर्णासारखे. ते हाती खेळण्यासारखी शार्ङ्ग, अजितंजय अशी धनुष्य नेत्रपातं लवायच्या आत हाताळीत होते. तूणीरातले बाण ओझरत्या स्पर्शाबरोबर अचूक पारखून विदूरथावर फेकत होते. प्रथम त्यांनी रथसज्ज विदूरथाला बाणांच्या पंजरात मुळीच हलता येणार नाही, असा जखडून टाकला. क्षणार्धात शरांच्या पंजरासह विदूररथाला रथविहीन करीत धरतीवर कोसळविला. तो नावाप्रमाणं विख्यात रथी होता. आता मात्र विरथ झाला. त्याला क्षणाचीही उसंत न देता, एका चंद्रमुख बाणानं त्याचं मस्तक धडावेगळ केलं.

दंतवक्र आणि विदूरथ यांचा पाडाव होताच, आता पूर्वदेशही मुक्त झाला होता. कामरूप देशाचा नरकासुर, मगधांचा जरासंध, पुंड्रांचा पौंड्रक वासुदेव व करुषांचे दंतवक्र, विदूरथ अशी आर्यावर्ताची संपूर्ण पूर्व दिशा आता बंधमुक्त झाली होती.

त्या दिवशीचा आमचा सेनापडाव करुषांच्या सीमेवरच पडला. दुसऱ्या दिवशी स्नान, आन्हिकं दानविधी आटोपून स्वामी, बलरामदादा व उद्धवमहाराज यांच्यासह करुषांच्या राजनगरात प्रवेशले. त्यांनी अग्रदूत धाडून आतोबा वृद्धशर्मन व आत्याबाई श्रुतदेवी यांची भेट मागितली होती. सर्वांनाच वाटत होतं, ते वृद्ध राजदांपत्य ही भेट नाकारणार. घडलं मात्र उलटंच. त्यांचा उलट संदेश आला, ‘अवश्य भेटीस यावं. संकोच करू नये. बरंच काही बोलायचं आहे.’

त्याप्रमाणं उजव्या डाव्या हाताशी बलरामदादा, उद्धवमहाराज, पाठीशी मी व अनेक यादववीर घेऊन स्वामी त्यांच्या दर्शनास गेले.

आत्याबाई दृष्टिक्षेपात येताच, झपाझप चालत आमच्यापासून कितीतरी पुढे निघून जात त्यांनी प्रथम महाराज वृद्धशर्मनांच्या व तसंच आत्याबाई श्रुतदेवींच्या चरणांवर आपला नितळ, नीलवर्णी माथा टेकविला. थरथरत्या हातांनी वृद्ध आत्याबाई श्रुतदेवी यांनी आपल्या प्रथमच भेटणाऱ्या भाच्याला वर उठविलं. त्यांच्या डोळ्यातून झरझरणारी आसवं आपल्या गुलाबी तळहातांनी पुसत स्वामी आपल्या भावभऱ्या वेणुवाणीत म्हणाले, “आत्याबाई, मी आणि दादा तुमचे पुत्र दंतवक्र–विदूरथच आहोत. ” ते ऐकताना एव्हानापर्यंत गप्प बसलेले वृद्ध वृद्धशर्मन थरथरत्या; पण टोकदार शब्दांत म्हणाले, “हे बोलायला ठीक आहे. तुम्हीच दोघे वधले गेले असतात, तर तुमच्या माता–पित्यांचं अशा शब्दांनी कधीतरी सांत्वन झालं असतं का?”

“मी आपलं उभयतांचं सांत्वन करण्यासाठी मुळीच आलेलो नाही. माझं भांडण आहे, ते राज्य हाकणाऱ्या निष्ठुर शासकांशी. त्यांनी ठेवलेल्या एकांगी दृष्टीशी. अन्याय – मग तो कुणीही, कुणावरही, कशासाठीही केलेला असो, तो वाईटच. पण – पण – अनेक पूर्वजांनी रक्त सिंचून उठविलेल्या राजसिंहासनावरच्या शासकानंच केलेला अन्याय हा सर्वाधिक वाईट. मी माझ्या आतेबंधूंना वधण्यात कसलाही अपराध केलेला नाही. तरीही आशीर्वादाऐवजी मला शाप द्यायचा असेल, तर तो द्यावा. तोही आनंदानं स्वीकारण्यासाठी मी आलो आहे!”

एवढे उन्हाळे–पावसाळे झेललेलं ते वृद्ध दांपत्य हात जोडून, ओणावून समोर उभे राहिलेल्या स्वामींचे विचार ऐकून प्राणदेठापासून हेलावून गेलं. वृद्धशर्मन महाराजांनी तर स्वामींचे दंड घट्ट पकडून क्षणैक त्यांच्या डोळ्यांत रोखून पाहिलं. तिथं त्यांना कसली खूण पटली कुणास ठाऊक? तो वृद्ध करुषश्रेष्ठ म्हणाला, “वसुदेवपुत्रा श्रीकृष्णा, आम्हाला आमच्या पुत्रांचा शोक अवश्य आहे, पण यात तुझा कसलाही व्यक्तिगत मानावमानाचा प्रश्न नाही, हे पटलं. माझ्या पुत्रांना मी वेळोवेळी सांगत आलो, ‘एकदा द्वारकेला जाऊन या. बलराम–श्रीकृष्णांना भेटून या.’ पण दोघेही अहंपणापोटी कधीच द्वारकेला तुमच्याकडे गेले नाहीत. गेले ते गिरिव्रजात जरासंधाच्या पंखाखाली!”

आत्याबाई त्यांना जोड देत म्हणाल्या, “आम्हा दोघांना मात्र अनेक वेळा द्वारकेला यावंसं वाटलं. तुझं दर्शन घ्यावं, तुझं वैभव डोळाभर बघावं. वसुदेवदादा, देवकी व रोहिणीवहिनी यांना एकदा तरी भेटावं. पण तुझी द्वारका पडली दूर पश्चिम समुद्रकाठावर. आम्ही राहिलो या पूर्वदेशात.” त्यांचे डोळे पाणावले.

“वासुदेवा, आमचं मनोगत ताडून तूच आलास भेटीसाठी. बरं वाटलं. वसुदेवमहाराजांना आणि दोन्ही महाराणींना आमचे प्रणाम सांगा.”

हा प्रसंग समोर बघत असताना मी स्वामींबाबतच्या अनेकानेक उलटसुलट विचारांच्या कोंडाळ्यात अडकलो. त्या रात्री करुषांच्या राजवास्तूत भोजनानंतर विश्राम घेताना रात्रभर मी स्वामींच्याच विचारांनी तळमळलो. काही केल्या निद्रा काही आली नाही.

दुसऱ्या दिवशी करुषांचा निरोप घेतलेली आमची यादवसेना उत्कलांच्या गणराज्याच्या रोखानं चालली. अग्रभागी गरुडध्वजाच्या चारही शुभ्र घोड्यांचे वेग हाती पेलून मी स्वामींकडे बघितलं. म्हणालो, “निघायचं स्वामी?” तसं ते केवढंतरी निखळ हसले. नील गालावरची खळी फुलली. रात्री त्यांनी करुषांच्या राजवास्तूत शांतपणे, पण सावध निद्रायोग साधला असावा. मला बघताच मात्र ते किती प्रेमानं म्हणाले, “दारुका, तू मागे रथघेरात ये. रात्रभर निद्रा झालेली नाही तुझी. आता पहिल्याच पडावावर नेत्रांत थंडगार गोरसाचे चार थेंब सोडून घे. चांगली निद्रा येईल तुला. ये. मी घेतो रथनीड!”

स्वामींची इच्छा म्हणजे आज्ञाच होती. मी धावता गरुडध्वज थांबविला. मुकाट रथनीड सोडून पाठच्या घेरात आलो. स्वामींनी आमच्या मेघपुष्प, बलाहक, सुग्रीव आणि शैब्य या चारही शुभ्रधवल अश्वमित्रांचे आठ वेग हाती घेतले. मागच्या घेरात मी त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणावरच विचार करत राहिलो – माझ्या नेत्रांच्या नुसत्या निसटत्या लाल कडा दृष्टीस पडताच त्यांनी अचूक ताडलं होतं की, रात्रभर मी निद्रेपासून वंचित होतो.

दंतवक्र–विदूरथ यांच्या वधाच्या वार्ता उत्कल गणराज्यात पोहोचल्या होत्या. त्यांनी तिघाही विजयी यादवबंधूंचं आनंदोत्सुक स्वागत केलं. स्वामी मात्र उत्कलांच्या कुठल्याही नगरात थांबायला तयार नव्हते. त्यांचा मनात ओढ होती, ती आर्यावर्ताच्या पूर्वसागराच्या दर्शनाची.

आमच्या विजयी यादवसेनेच्या स्वागताला आलेल्या उत्कलराज, त्याचा सेनापती व सेनेसह स्वामी पूर्व सागरतीरावर आले. इथं पूर्वसागरकिनारी आमच्या सेनेचा चांगला

पंधरवडाभर पडाव पडला. जेव्हा आम्ही पूर्वसागरकिनारा सोडून दंडपाणीच्या काशीराज्याकडे जायला निघालो, तेव्हा तर उत्कलकरांचा अलोट जनमेळा द्वारकाधीशांना त्यांच्या बंधूंसह निरोप देण्यासाठी लोटला होता. वाकून वंदन करणाऱ्या उत्कलराजाला स्वामींनी दंडाला धरून उठतं केलं. पंधरवडाभर झालेल्या स्वामींच्या दर्शनानं भारावून गेलेला तो राजा कमरेत किंचित वाकून नम्रपणे म्हणाला, “द्वारकाधीश, युवराज बलभद्र, उद्धवदेव आपल्या स्वर्गीय भेटीचं स्मरण हे छोटंसं पूर सैदव ठेवील. आजपासून या नाव नसलेल्या छोटचा पुराला आपल्या स्मरणासाठी आम्ही ‘जगन्नाथपुरी’ म्हणू. खरोखरच आपण जगन्नायक आहात. दरवर्षी या तिथीला आपल्या स्मरणासाठी अशीच रथयात्रा निघेल!” ते ऐकून नेहमीसारखं लाघवी हसत स्वामी म्हणाले, “उत्कलराज, माझ्या या बलाभद्रदादाचं स्मरण तुम्ही सदैव ठेवावं. त्यात मीही आलो. माझं म्हणून वेगळं स्मरण करण्याची काहीही आवश्यकता नाही.”

भावभऱ्या उत्कलांचा आम्ही निरोप घेतला. स्वामी सर्वांत अग्रभागी असलेल्या माझ्या गरुडध्वजात आरूढ झाले. बलरामदादा आणि उद्धवमहाराजांचे रथ पाठीशी होते. त्यांच्या मागे प्रद्युम्न, सांब, प्रघोष असे स्वामीपुत्र व सेनापती यांचं रथदल होतं. स्वामींच्या दर्शनानं भरून व भारून गेलेल्या उत्कल व यादवांच्या जोडसैन्यानं केवढातरी मोठा गगनभेदी नामघोष उठविला – ‘जगन्नायक द्वारकाधीशऽऽ जयतु... जयतु! जगन्नाथबंधू बलभद्रमहाराऽऽज जयतु!’

आम्ही काशीराज्याच्या सीमेवर आलो. इथं काशीराज दंडपाणी आमच्या स्वागताला ससैन्य सामोरे आले. त्यांच्या सोबतीनं मध्ये कुठेच न थांबता स्वामी थेट वाराणीसतल्या गंगाकिनारीच्या काशीविश्वेश्वराच्या सुघड मंदिरात आले. केवळ निवांत शिवदर्शनासाठी. मला या मंदिरात आपल्या बंधूंसह प्रवेशणाऱ्या स्वामींच्या पावलांत तीच ओढ दिसली, जी पूर्वसागराकडे जाताना होती.

मंदिराच्या गर्भागारातील प्रशस्त सुवर्णी अभिषेकपात्रातून संतत अभिषेकधारेखाली निथळून निघालेलं, वज्रलेपी शिवलिंग होतं. त्याचं दर्शन होताच स्वामी आणि बलरामदादा यांनी एकमेकांकडे हसतच पाहिलं. पुढे ते बोलले त्यातला शब्दही कुणाला कळला नाही. कुणालाच कळणं शक्य नव्हतं. स्वामींचे ते शब्द होते – “दादा, चल कुडाकर्कट बाजूला सारून मऊ–मऊ वाळू एकत्र कर. मित्रांनो! तुमच्यातले काही जण अरण्यात जा. पांढरीशुभ्र फुलं आणि बिल्वदलं घेऊन या. काही जण लोटकी घेऊन जा. यमुनाजलानं ती भरून आणा. गाईच्या आचळांना जोजवून काही जण लोटक्यातून ताजं दूध घेऊन या. जा – पळा. कामाला लागा!”

लागलीच स्वामी उद्धवमहाराजांना म्हणाले, “प्रिय बंधो उधो, तू कितीही मनात आणलंस, तरी इथं काशीराज्यात काही तुला ब्रह्मकमळं मिळणार नाहीत!” तेही तत्परतेनं उत्तरले, “आता ब्रह्मकमळांची आवश्यकताही नाही. दादा, मला पुरतं कळून चुकलं आहे, तू स्वतःच एक ब्रह्मकमळ आहेस. नवनव्या युगंधरी विचारांचा सुगंध दशदिशांत प्रक्षेपित करणारं!”

तिकडे काशीराज दंडपाणीच्या विश्वेश्वर मंदिरातील पुरोहितांनी शिवपिंडीच्या षोडश उपचारांच्या अभिषेकाची जय्यत सिद्धता केली होती. तिघेही बंधू वज्रलेपी शिवपिंडीच्या शाळुंकेलगत पूजेसाठी आस्तरणावर बसले.

काशीकर पुरोहितांच्या मंत्रघोषांत सविध शिवपिंडीपूजन झालं. तिघाही बंधूनी

एक–एक करीत तिन्ही दिशांनी बिल्वपत्रं वाहून शिवपिंड पुरती आच्छादून टाकली. आता जलाभिषेक होऊ लागला, तो बिल्वपत्रांवर.

तिघाही बंधूंचे नेत्र मिटते घेऊन शिवस्तवना आरंभिली.

"शिवाकांत शंभो शशांकार्ध मौले
महेशान शूलिन् जटाजूटधारिन्
त्वमेको जगद्व्यापको विश्वरूप
प्रसीद प्रभो पूर्णरूप।।"

आमचं पूर्वदेशीचं अभियान शब्दश: यशस्वी व 'शिवमय' झालं. काशीराज दंडपाणींचा निरोप घेऊन आम्ही द्वारकेकडे परतलो.

या वेळीही स्वामींचं द्वारकेत प्रचंड स्वागत झालं असलं, तरी त्यात कसलीतरी त्रुटी होती. स्वामींना ती एका लक्षणीय गोष्टीमुळे जाणवली. त्यांना जाणवली, म्हणून मला व उद्धवमहाराजांनाही जाणवली. ती जाणवली नाही, ती एकटच्या आमच्या बलभद्रदादांना. त्यांचा तो स्वभावच नव्हता.

अशी काय त्रुटी होती, स्वामींच्या आजच्या द्वारकेतील स्वागतात? तर वृद्ध असले तरी सदृढ अंगकाठीचे, भरगच्च दाढीधारी, महाराज वसुदेव काही नेहमीसारखे हसत शुद्धाक्षावर आले नव्हते. स्वामींना त्यांची अनुपस्थिती पटकन जाणवली. त्यांनी अमात्य विपृथूंना बाजूला घेऊन विचारलंही, "महाराज दिसत नाहीत कुठं ते, अमात्य? त्यांचं स्वास्थ्य?"

अमात्य पटकन उत्तरले, "तसं महाराजांचं शारीरिक कुशलमंगल आहे. पण – पण..."

"पण काय?" स्वामींच्या सूर्यफुलासारख्या गोल नीलवर्णी मुखमंडलावर चिंतेची छटा कधीच दाटून येत नसे. त्यांच्या भव्य, वैष्णवी गंधचर्चित कपाळावर आठी कधीच उमटत नसे. आज मात्र ती उमटलेली मी स्पष्ट पाहिली. ती पाहून मीही चिंतेत पडलो. उद्धवमहाराजही अस्वस्थ झाले.

"द्वारकाधीशांनी थोडा विश्राम घ्यावा. नंतर चरणी ठेवीन सर्व वृत्तान्त." अमात्य तत्परतेनं म्हणाले.

भोजन व वामकुक्षीनंतर स्वामींनी मलाच अमात्य विपृथूंना पाचारण करण्यासाठी धाडलं. त्याप्रमाणं अमात्यांना घेऊन मी स्वामींच्या विश्रामकक्षात आलो. त्यांना अमात्यांशी नक्कीच काहीतरी विशेष व गुप्त बोलायचं असावं.या धारणेनं स्वामींना आदरपूर्वक वंदन करून मी म्हणालो, "मी येतो स्वामी."

तसं माझ्याजळल येत हसून माझ्या खांद्यावर हात ठेवीत ते म्हणाले, "दारुका, केवढा मनकवडा आहेस तू! म्हणूनच मी तुला सखा मानतो. तू इथून निघून जाण्याची काहीच आवश्यकता नाही. असलीच, तर आवश्यकता तू थांबण्याचीच असेल! थांब तू!" ते असं काही हसले की, मला वाटलं मीच हसतो आहे. त्यांच्याकडे नव्हे दर्पणातच बघतो आहे!

स्वामींनी काही विचारायच्या आतच अमात्य विपृथूंनी हस्तिनापुरात घडलेल्या, आम्हांपैकी कुणालाच कल्पनाही करता न येणाऱ्या मानवी स्वभावाच्या अतर्क्य नाटचाचा एक-एक पापुद्रा अत्यंत संयमानं स्वामींसमोर ठेवला. ते म्हणाले, "द्वारकाधीश, हस्तिनापुरात घडू नये ते घडलं आहे. चरणी कसं ठेवावं, याच पेचात आहे.

आपण व आम्ही अठराकुलीन यादव समरांगणात दोन-पाच, शेकडो वीर पतन पावले, तरी क्षणैक हेलावून पुन्हा सावरू शकतो. पडलेला आघात समजू शकतो, पण एखादं गणराज्य समूळच उखडलं जातं, तेव्हा मती गुंग होते. किंकर्तव्य होते."

ते ऐकून अमात्यांच्याही जवळ जात त्यांच्याही खांद्यावर हात ठेवून, थोपटून, शांतपणे स्वामी म्हणाले, "अमात्य विपृथू, तुम्ही अनुभवी आहात, वयस्क आहात. हस्तिनापूरच्या पितामह भीष्मांना तुम्ही अनेक वेळा समक्ष पाहिलं आहे. त्यांनी कितीतरी वेळा डुबू घातलेलं हस्तिनापूर परम धैर्यानं वाचविलं आहे. द्वारकाकरांसाठी तुम्ही पितामहांसारखेच आहात. अगदी नि:संकोच सांगा, काय घडलं हस्तिनापुरात?"

अभय मिळाल्यामुळे धीर आलेले अमात्य विपृथू द्वारकाधीशांसमोर नम्रपणे दोन्ही हात जोडून, एकापेक्षा एक अतर्क्य वृत्त समोर ठेवू लागले. अद्याप तसे ते चाचपडतच होते. म्हणाले, "हस्तिनापुराहून कुरुमहाराज धृतराष्ट्रांकडून पांडवांना इंद्रप्रस्थात 'विष्णुयाग यज्ञासाठी यावं' असं आमंत्रण गेलं होतं."

काही दिवसांपूर्वी राजसूय यज्ञाच्या वेळी इंद्रप्रस्थात घडलेलं सर्व अकल्पित डोळयांसमोर आल्यामुळे 'यज्ञ' म्हणताच कान टवकारून मी ऐकू लागलो. अमात्य पुढे म्हणाले, "आमंत्रणाप्रमाणं पांडवमहाराज युधिष्ठिर आपल्या भीमार्जुन व नकुल-सहदेव या बंधूंसह निवडक सैनिकांना घेऊन हस्तिनापूरला गेले. सोबत महाराणी द्रौपदीदेवी होत्या. राजमाता कुंतीदेवीही समवेत होत्या. पण... पण... कुरूंचं हे आमंत्रण केवळ विष्णुयाग यज्ञाचं नव्हतं. युवराज दुर्योधन, त्यांचा अहंकार फुंकर घालून फुलविणारे शकुनीमामा, कणक यांचा या आमंत्रणामागे कुटिल षड्यंत्री राजनीतीचा डाव होता. अंगराज कर्णालाही या षड्यंत्रात सहभागी करण्याचा त्यांनी अटोकाट प्रयत्न केला होता."

"कसला डाव अमात्य? तो यशस्वी झाला का? अंगराज असून, दुर्योधनाचा परममित्र असून, कर्ण कसा काय या डावात सहभागी झाला नाही? कसलाही संकोच न ठेवता, सर्व-सर्व घडलं तसं सांगा विपृथू." स्वामींनी पुन्हा अमात्यांना अभयाचा धीर दिला.

अमात्य बोलू लागले, "महाराज युधिष्ठिरांना युवराज दुर्योधनानं यज्ञयागापूर्वीच द्यूत खेळण्याचं आव्हानपूर्वक आमंत्रण दिलं. राजसभागृहासारख्याच असलेल्या द्यूतसभेत पाचारण केलं. त्यांना द्यूत प्राणप्रिय आहे हे जाणूनच, हे कुटिल आमंत्रण धाडण्यात आलं होतं, पांडवश्रेष्ठांनी ते त्यांच्या व आर्यावर्ताच्या दुर्दैवानं स्वीकारलं.प्रकृतीचं वा अन्य कुठलंही कारण सांगून त्यांनी ते टाळायला हवं होतं."

"त्या ज्येष्ठ पांडवाला मी नेहमीच त्याच्यातील द्यूताची आवड या वैगुण्याबद्दल संकेत व समज देत आलो. हसून त्यानं ते नेहमीच उडवून लावलं. एकच समर्थन देऊन की, द्यूत हा राजांना शोभणारा व गौरवाचा एक क्रीडाप्रकार आहे." स्वामी म्हणाले. ते नेहमीच ज्येष्ठ असलेल्या पांडवश्रेष्ठ युधिष्ठिरांना एकेरी संबोधत. त्याचं कारणही पांडवश्रेष्ठच होते. माझ्या स्वामींनी त्यांना 'अहो-जाहो' म्हटलेलं आवडत नसे. त्यांच्यामुळे स्वामींहून ज्येष्ठ असलेल्या भीमसेनांनाही ते आवडत नसे. अर्जुनासह इतर पांडव तर स्वामींहून वयानं लहानच होते.

स्वामी आमच्याकडे रोखून बघत म्हणाले, "मी सांगतो तुम्हाला अमात्य, युधिष्ठिर नक्कीच हस्तिनापुरात द्यूत खेळला असणार. राजवास्तूत खेळली जाणारी क्रीडा म्हणून

कुरूंच्या गोटात तर राजईर्ष्येनं खेळला असणार. आणि हेही सांगतो, निष्णात द्यूतपटू असलेल्या पांडवद्वेष्टच्या शकुनीनं त्याच्यातील राजअहंकार फुलविला असणार! शकुनी माणूसपारखी आहे. कुटिल डावपेच खेळणारा आहे. दुर्योधन, त्याचे नव्याण्णव बंधू, कणक व अनेक प्रमुख कुरू मानतात, तसा तो राजनीतिकुशल मुळीच नाही. अंगराज कर्ण त्यांच्या या डावपेचापासून अलिप्त राहिला असेल, तर मला आश्चर्य वाटणार नाही. त्याची कथाच वेगळी आहे." मला कधीतरी उद्धवमहाराजांनी सांगितलेल्या अंगराज, पितामह व द्वारकाधीश यांच्यातील जलत्रिकोणाचा विचार हे ऐकताना स्पर्शून गेला. एक गोष्ट मात्र मी पटकन टिपली. ते कौरवमामा शकुनीला कुटिल अवश्य मानत होते, पण राजनीतिज्ञ मुळीच नाही.

"मग काय झाला निर्णय शेवटी या द्यूतस्पर्धेचा अमात्य? कुठला गडगंज लाभ उठविला युधिष्ठिरानं या द्यूतातून?" उत्सुक स्वामींनी पुन्हा अमात्यांना वृत्तान्तावर घेतलं.

"लाभ? मुळीच नाही स्वामी. उलट झाली ती प्रचंड हानी. तीही क्षत्रियांना मरणाहूनही घोर अवमानकारक वाटावी अशी! युधिष्ठिर द्यूताच्या व्यसनात इतके गुरफटले की, त्यांना ते खेळताना कसलंही भान राहिलं नाही. प्रथम कोषागारातील संपत्ती, नंतर सेनादलाचे गज, अश्व, उष्ट्र असे प्राणी ते हरले. पुढचा फासा मनासारखा पडेल, झालेली हानी भरून निघेल या वेडया आशेनं वेडयासारखे खेळतच राहिले. सर्व प्राण्यांचा पण हरताच त्यांनी द्यूताच्या डावावर दलप्रमुखांसह शस्त्रधारी चतुरंगदलाच्या सेना क्रमशः लावल्या. तोही हरताच त्याच्या व आपल्या द्वारकेच्या प्रजाजनांनी उठविलेलं वैभवी संपूर्ण इंद्रप्रस्थ गणराज्य पणाला लावलं."

"काय? इंद्रप्रस्थ राज्य?" आता मात्र न राहवून मी मध्येच बोललो. पाठीशी हात बांधून अस्वस्थ फेऱ्या घेणारे स्वामी कसल्यातरी विचारात पडले होते. मध्येच थांबून त्यांनी अमात्यांना पुन्हा बोलतं केलं, "तो इंद्रप्रस्थ राज्य गमावल्यावरच शांत झाला असेल!" स्वामींची वाढलेली अस्वस्थता स्पष्ट-स्पष्ट जाणवत होती.

"नाहीऽ!" अमात्य पुढचा एकूणएक कटू वृत्तान्त, कर्तव्य म्हणून झालं तरी स्वामींच्या कानावर कसा घालावा, या विचारानं धास्तावले. गोंधळले.

"सांगा अमात्य, राज्य हरल्यानंतर उरलं तरी काय होतं त्याच्याकडे पणाला लावायला? काय केलं त्यानं?"

"त्यांनी हट्टाला पेटून हार काही मानली नाही. नकुल-सहदेवांसह भीमार्जुनांसारखे युद्धकुशल, अशरण सहोदर सर्व बंधू एक-एक करत पणाला लावले."

"काऽय? माझा प्राणप्रिय सखा अर्जुनही?" अस्वस्थ फेऱ्या घेणारे स्वामी एकाच जागी थांबले. अमात्यांकडे अवाक बघतच राहिले.

"होय द्वारकाधीश. मलाही हे सर्व समक्ष बघताना असह्य झालं. पण ते कटू सत्य घडलंय. हे सर्व पणही युधिष्ठिर हरले.

"कुणालाच काही सुचत नव्हतं. असा द्यूतपटाजवळ प्रचंड तणाव पडला. एकही फासा युधिष्ठिरांच्या बोलीप्रमाणे का पडत नाही, कुठल्याच पांडवाला समजेना. असं का व्हावं? एकजात सर्वच फासे त्यांच्या कसे काय उलटे पडत होते? चुकून एकही मनासारखं पडत नव्हतं. हे कसलं गारूड होत? तर द्यूताचे फासे शकुनी आणि दुर्योधन या कुटिल जोडीनं, मृत जरासंधाच्या अस्थी गिरिव्रजातून गुप्तपणे आणवून त्यापासून तयार करवून

घेतले होते. त्याची कल्पना त्या दोघांशिवाय द्यूतगृहात कुणालाही नव्हती. यासाठीच तर त्या दोघांनी द्यूताचे सर्व फासे पडेपर्यंत कौशल्यानं कर्णाला द्यूतसभेबाहेर ठेवलं होतं.फासे पडताना तो असता द्यूतसभेत, तर प्रत्येक दान कौरवांना उलटं पडलं असतं. कारण कर्णानं तर जरासंधाला द्वंद्वयुद्धात एकदा अभय व जीवदान दिलं होतं, "कर्ण' या नावाचा जरासंधाच्या अस्थींवर प्रचंड भयप्रभाव होता. पांडवांना उलटं दान पडत होतं, त्याचं कारणही भीमाचा आरडाओरडा हे होतं.प्रत्येक दानाला भीमसेन बोलताच, जरासंधाच्या अस्थींचे फासे भयानं चमत्कारिक थरथरत. पांडवांनी मागितलेलं दान नेमकं उलटं पडे. ते पाचही बंधू मग जरासंधाच्या अस्थींच्या फाशांकडे डोळे विस्फारून हताशपणे बघत राहत. क्षणाक्षणाला सामर्थ्यशाली भीमसेनांना ते असह्य होत होतं." अमात्य सांगत राहिले. माझ्या डोळयांसमोर कुरूंच्या द्यूतकक्षातील चित्रच स्पष्ट उभं ठाकलं.

"प्रत्येक फासा भाचा दुर्योधनाच्या मनासारखा पडताना पाहून, सुबलराज शकुनी निखाऱ्यावरच्या लाह्या फुटाव्यात; तसा आनंदानं फुलून उठला. आपण द्यूतसभेत आहोत, इथं कुरूंच्या प्राचीन सिंहासनावर महाराज धृतराष्ट्र बसले आहेत, शेजारी महाराणी गांधारीदेवीही आहेत, एका उच्यासनावर पितामह भीष्म बसलेत, त्यांच्यालगत द्रोण, कृप, विदुर, संजय आहेत याचं कसलं-कसलंही भान शकुनी- दुःशासनांना राहिलं नव्हतं. मला एका गोष्टींचं आश्चर्य वाटलं, द्यूतगृहात कुठंही अंगराज कर्ण नव्हते. का व कसे कळत नव्हतं.

"शेवटी... शेवटी... आर्यावर्तातील सर्व प्रमुख गणराज्यांच्या नरेशांच्या साक्षीनं झालेला आपला राज्याभिषेकही युधिष्ठिर विसरले. अभिषिक्त राजावर अधिकार असतो तो प्रजाननांना हे सत्यही त्यांच्या ध्यानी राहिलं नाही. त्यांनी चक्क स्वतःला पणाला लावलं!" खाली मान घालून अमात्य म्हणाले.

"काऽय द्यूत खेळताना स्वतःलाच पणाला लावलं? तेही पांडवश्रेष्ठ युधिष्ठिर महाराजांनी?" मी न राहवून विचारलं. माझ्या माहितीप्रमाणं सर्व आर्यावर्तात आजपर्यंत कुणीही स्वतःला असं द्यूतात पणाला लावलं नव्हतं.

"होऽय. पांडवश्रेष्ठ युधिष्ठिर महाराजांनी द्यूतवेडात चक्क स्वतःला पणाला लावलं आणि दुर्दैव म्हणजे, तो पणही ते हरले."

ते कटू व कठोर सत्य ऐकताना मी समूळ हादरलो. माझे स्वामी द्वारकाधीश मात्र शांतच होते. त्यांना तसं शांत बघून मला आश्चर्य वाटलं.

शांत धिम्या पावली स्वामी अमात्यांजवळ पुन्हा गेले. अमात्य स्वामींना परमावधीचं शांत बघून गोंधळले होते. त्यांच्या भेदरलेल्या डोळयांत डोळे रोवून स्वामींनी त्यांना विचारलं. त्याच परमावधीच्या शांतपणानं, "पुढे काय झालं अमात्य? निःसंकोच सांगा. सत्य नेहमीच उगवत्या सूर्यासारखं स्वीकारायचं असतं. असेल तसं. बोला."

एखादं महान थरारक युद्धच समोर बघत असल्यासारखे अमात्य अवकाशाच्या पोकळीत एकटक बघत राहिले. मी व स्वामी शेजारी आहोत, हेही ते विसरले. द्यूतसभेतील पुढच्या घटनांचं दृश्य चित्रासारखं समोर उभं करताना म्हणाले, "युधिष्ठिर स्वतःला पणात हरले. तसं क्षणाचाही विलंब न लावता आनंदाची उसळी घेत सर्वप्रथम शकुनी ओरडला, 'पांडवांचा राजा बंधूंसह आज कुरूंचा दास झाला. बोल दासा, अद्याप खेळणार का द्यूत?'

"त्यानं 'दास' म्हणताच असह्य लज्जेनं मान खाली घातलेले पांडवश्रेष्ठ म्हणाले,

'खेळलो असतो, पण आहे काय आता माझ्याजवळ पणाला लावायला?'

"तसा आनंदानं उठून उभा राहत दुर्योधन कडाडला, 'त्या दासाला आता द्यूतपट आवरायला सांगा मामा. आपल्या बंधूंसह स्वत:ला द्यूतात हरलाय तो. दास झालाय कुरूंचा - बांधवांसह. आहे काय त्याच्याकडे आता?'

"तसं सर्व संकेत गुंडाळून ठेवत शकुनी आपल्या भाच्याच्या कानाशी लागला. काहीतरी कुजबुजला. तसं आनंदानं डोळे विस्फारलेला दुर्योधन म्हणाला, 'दासा, नाही म्हणायला आणखी एक वस्तू आहे तुझ्याकडे! लावतोस तिला पणाला?'

"तसं मान वर करून पांडवश्रेष्ठान विचारलं, 'कोणती?'

"भोवतीच्या बघ्यांचा कानांवर अंगारासारखे बोल पडले, 'तुझी पत्नी–इंद्रप्रस्थाची महाराणी द्रौपदी!!' तसं 'नाहीऽ' म्हणत केवढ्यातरी त्वेषानं भीमसेन उसळला. बंधू सहदेवाकडे बघत म्हणाला, 'हा नक्कीच द्रौपदीही पणाला लावून खेळणार. मला नाही हे सहन होत. सहदेवा, थोडा अग्नी आण. द्यूत खेळणारे या ज्येष्ठाचे हातच जाळून टाकतो.' भीमसेन खांद्यावरची गदा उगारत दुर्योधनाऐवजी युधिष्ठिराकडेच धावला. अर्जुनानं मोठ्या निकरानं त्याला सावरला. 'या पणात आम्ही हरलो, तर एव्हाना जिंकलेलं सर्व-सर्व परत करू. मी आणि माझे बंधू तुझे दास होऊ. तू करशील ती आज्ञा झेलू.'

"दुर्योधननानं शकुनीच्या साथीनं, पांडवश्रेष्ठातील द्यूतवेडा व्यसनी पुन्हा फुलवून घेतला.

"हे असं काही ऐकायची कुणालाच सवय नसल्यामुळे द्यूतसभेतील यच्चयावत सर्व जण उठून उभे राहिले होते. बसले होते दोघेच – अंध महाराज धृतराष्ट्र आणि त्यांच्यासाठी अंधत्व पत्करलेल्या कुरूंच्या महाराणी गांधारीदेवी. द्यूतसभेत माजलेल्या कलकलाटानं त्यांना काय चाललंय तेच कळत नव्हतं."

द्रौपदीदेवींचं नाव ऐकताच, मी अवाकच झालो. तरीही स्वामी शांतच दिसत होते. म्हणाले, "विपृथू, तुम्ही यादवांचे अमात्य आहात. नुसते राज्यभार बघणारे अमात्यच नव्हे, तर प्रसंगी समरांगणात उतरणारे ज्येष्ठ योद्धे आहात. तुम्ही कुरूंच्या द्यूतगृहात घडलं ते बघताना जसे डळमळलात, तसे मुळीच डळमळू नका. सांगा, घडत आलेल्या द्यूतघटनांप्रमाणं युधिष्ठिरानं आपण हरल्यानंतर पत्नीवर अधिकार नसताना द्रौपदीला पणाला लावली. माझ्या भगिनीला – प्रिय सखीलाही तो हरवून बसला. पुढे काय झालं?"

"आज्ञा स्वामी' म्हणत अमात्य पुढे बोलू लागले, "पांडवश्रेष्ठांनी शेवटचा पण लावला, तेव्हा शकुनीनं त्या पणाचा फासा फेकला. नेमके तेव्हाच सर्व द्यूतसभेचं लक्ष वेधून घेतं अंगराज कर्ण प्रवेशले. पांडवश्रेष्ठ शेवटचा पणही हरताच आनंदानं ओरडत भानरहित झालेल्या दुर्योधनानं डरकाळी फोडली, 'दासीऽऽ पांडवांची पत्नी द्रौपदी कुरूंची दासी झाली. दासी! सुगंधी दासी!!' तो गदगदता घोष ऐकून वेडावलेल्या दुर्योधनबंधूंनी उत्तरीयं उडवीत एकच कल्लोळ केला, 'दासीऽऽ दासीऽऽ"'

मी स्वामींच्याकडे – त्यांच्यावर याची काय प्रतिक्रिया झाली म्हणून कितीतरी उत्सुकतेनं बघू लागलो. आताही ते शांतच होते! आम्हा दोघांतही नसल्यासारखे – छताकडे एकटक बघणारे!

ते ऐकताहेत की नाही इकडे ध्यान नसलेले अमात्य, कुरूंच्या द्यूतसभेत

असल्यासारखेच बोलत राहिले –

"यानंतरच्या प्रत्येक क्षण अंगावर शहारा आणणारा होता. दुर्योधन-शकुनींनी आता संपूर्ण द्यूतगृह अधिकारात घेतलं.

आता आपण द्रौपदीदेवींचे स्वामीच झालो, या भ्रमानं वेडावलेल्या दुर्योधनानं आपल्या सेवक आणि द्यूतव्यवस्थापक प्रातिकाम्याला आज्ञा केली, 'जा प्रातिकाम्या, कुरूंच्या त्या दासीला सेवेसाठी सादर कर. सत्वरात सत्वर.' सेवक प्रतिकामा निघून गेला. भांबावलेली उभी द्यूतसभा तो गेला त्या दिशेकडे नुसती बघतच राहिली. तो खरोखरच इंद्रप्रस्थाच्या महाराणींना दासी म्हणून आणणार की काय, या शंकेनं संभ्रमित झाली."

"मग खरोखरच आणलं की काय त्यांना दासी म्हणून त्या सेवकानं?" न राहवून मीच अमात्यांना विचारलं. स्वामी शांतच होते.

"नाही. तो सेवक प्रतिकामा एकटाच परतला. खाली मान घालून आपल्या स्वामी दुर्योधनाला म्हणाला, 'स्वामी, त्या द्यूतगृहात येऊ शकत नाहीत. त्या... त्या एकवस्त्रा आहेत – रज:स्वला आहेत.'

"तशी त्या सेवकाची कठोर निर्भत्सना करून दुर्योधन आपला बंधू दु:शासन याला म्हणाला, 'हे कार्य सेवकांना झेपणारं नाही. माझ्या प्रिय बंधो. वीर दु:शासना, तूच जा अंत:पुरात आणि ती दासी असेल तशी घेऊन ये तिला द्यूतसभेत. नाही म्हणत असेल – विरोध करत असेल, तर बलात ओढून फरफटत आण तिला!'

"आज्ञा ज्येष्ठा' म्हणत धिप्पाड दु:शासन अंत:पुरात गेला. काही क्षणांतच उभं द्यूतगृह थरारून जावं तसा आक्रोश अंत:पुराच्या रोखानं उठला. 'सोऽड मला. नीचा सोड मला. तुलाही माता, भगिनी आहेत याचं स्मरण कर.'

"पांडवांची कुलस्त्री आक्रोशत असताना, निकरानं ओरडत असताना दु:शासनानं फरफटतच तिला द्यूतगृहात आणली.

आता काय होणार? म्हणून ताडकन उभी राहिलेली द्यूतसभा दु:शासनाकडे बघू लागली."

'काय होणार?' म्हणून मीही अमात्यांकडं बघतच राहिलो. माझी मती सुन्न झाली होती. हे असलं कधी, कधीच ऐकलं नव्हतं मी. आपल्या प्रिय सखीचा घनघोर अपमान झाल्याचा तो वृत्तान्त ऐकत असताना माझे स्वामी अनावर संतप्त झाले असतील, म्हणून मी त्यांच्याकडे बघितलं. मला धक्काच बसला. डोळे मिटून ते अद्याप शांतच होते!

मिटल्या डोळ्यांसमोर ते काय बघताहेत, काही–काही कळत नव्हतं.

अमात्य सांगतच राहिले. "पांडवपत्नी द्रौपदीदेवी द्यूतसभेतल्या आस्तरणावरून फरफटत आणण्यात आली.

"केश विसकटलेल्या, आक्रोशणाऱ्या पांडवपत्नी द्रौपदीदेवींनी महाराज धृतराष्ट्रांसमोर हात पसरून न्याययाचना केली, 'महाराऽज, आपण कुरुकुलश्रेष्ठ आहात. माझे वंदनीय श्वशुर आहात. सांगा या द्यूतवेड्यांना, माझे पती स्वत:ला पणात हरले असताना त्यांना पत्नी म्हणून मला पणाला लावण्याचा काहीतरी अधिकार आहे काय? ते दास झाले तेव्हाच त्यांचं पतित्व संपुष्टात आलं नाही काय?'

"कुरुमहाराज धृतराष्ट्र निरुत्तर होऊन आसनावरच तळमळले. आतल्या आत नसलेले डोळे फिरवल्यामुळे त्यांच्या नेत्रकडांतून पाझरणारं पाणी उत्तरीयानं त्यांनीच

टिपलं. ते अश्रू नव्हते! एव्हाना राजसूय यज्ञाच्या वेळी मयसभेत झालेला आपला अवमान स्मरून दुर्योधनानं दु:शासनाला चक्क आज्ञा दिली, 'दु:शासना, कुरूंच्या या दासीला या भरल्या द्यूतगृहात सर्वांसमक्ष विवस्त्र कर! पांडवांच्या दुर्बल कमरेला लटकलेलं हे सुगंधी खड्ग म्यानाबाहेर घे. कळू दे तिला की, अंध पित्याचे पुत्रही अंधच नसतात. तर तिचे डोळस पतीही पाहू शकत नाहीत, ते पाहण्याची इच्छा करतात, पाहू शकतात! दु:शासना, तिला विवस्त्र करून या माझ्या मांडीवर बसव.' दुर्योधनानं अधरीय बाजूला करत आपली उघडी मांड थोपटली. हे मात्र असह्य झालेला भीमसेन उठून कडाडला, 'दुर्योधना, उन्मत्तपणानं जी मांड तू उघडी करून भरल्या सभागृहात दाखवली आहेस, ती मांडच माझ्या गदेच्या एकाच प्रहारात चेंदूनमेंदून टाकीन. कळसुत्री बाहुल्यासारखं तुझ्या आशा पाळत माझ्या प्रिय पत्नीच्या देहाला भिडलेल्या या नीच दु:शासनाचा अमंगळ हात, समय येताच समूळ उखडून गगनात फेकून देईन! याच्या रक्तानंच माझ्या प्रिय पत्नीचे – द्रौपदीचे मुक्त केश सावरीन!' भीमसेन नुसता गरजला नाही. खांद्यावरची गदा पेलत त्या दोघांच्या रोखानं धावलाही. पण 'मागे फिर भीमा!' अशी ज्येष्ठ बंधूंची आज्ञा ऐकून अनावर धुसफुसत जागीच बसला.

"भडकलेला वणवा हिरवळीकडे सरकतो, तसा दु:शासन द्रौपदीदेवींकडे सरकला. त्यानं सरळ त्यांच्या अंशुकाच्या निरीला हात घातला! खवळलेल्या नागिणीसारखं परतून देवींनी त्याच्या भक्कम हाताचा कडकडून चावा घेतला. तसं दु:शासनानं कळवळत दोन्ही हात झिडकारले. तशा त्याच्या हातातून सुटलेल्या द्रौपदीदेवी आकाशातून वीज सुटते तशा सुटून कडाडत निघाल्या. सभागृहात गरगर फिरू लागल्या. आता दु:शासन त्यांच्या वस्त्राला हात घालण्यासाठी फरफटत त्यांच्यामागे धावू लागला. त्या मुक्तकेशा, वक्ष पिटणाऱ्या, आक्रोशत्या देवींनी द्यूतगहातील सर्व–सर्व प्रमुख योद्धयांकडे हात पसरून याचना केली. कोण नव्हतं त्यात? महाराज धृतराष्ट्र, महाराणी गांधारीदेवी, पितामह भीष्म, गुरुवर्य द्रोण, कृप, विदुर, संजय सर्व–सर्व प्रमुख योद्धे होते. देवी हात पसरून याचना करताना ऐकणाऱ्याचे प्राण भेदून जावेत अशा शब्दांत किंचाळत होत्या. 'महाराऽऽज, पितामहऽऽ, गुरुदेऽव माझी लज्जा राखा. मी दासी म्हणून कुरूंची द्यूतसभा झाडायला तयार आहे. सर्वांची राजवस्त्रं धुवायला तयार आहे. कुरूंच्या राजस्त्रियांचे केश सावरायला तयार आहे. पण माझी विवस्त्र करून अशी घोर विटंबना मांडू नका.'

"देवींनी ऊर्णनाभ, चित्रचाप, दृढवर्मन, निषांगिन, महाबाहू, विशालाक्ष, चित्रवर्मन, सोमकीर्ती, पद्मनाभन सर्वा–सर्वांसमोर हात पसरून लज्जा रक्षणाची याचना केली. कुणीही त्यांना प्रतिसाद देऊ शकलं नाही. दुसऱ्याच क्षणी त्या अंगराज कर्णांच्या आसनासमोर गेल्या. तसं तेही ताडकन उठून उभे राहिले. का कळत नव्हतं, पण त्यांनी अंगराजाकडे तशी याचना मात्र केली नाही! सर्व सभागृहाला व आपल्या पतींना निवडक शब्दांनी धाय मोकलून दूषणं देत देवी द्यूतगृहाभर धावतच फिरल्या. थकल्या. मध्येच गाठणाऱ्या दु:शासनाच्या हाती निरी येणार नाही, असे शरीराला नागिणीसारखे विळखे देत पुन्हा उठून धावू लागल्या. पिळवटून धावतच कडाडू लागल्या, 'सांगा, या कुरूंच्या प्राचीन द्यूतगृहात सिंहाच्या छातीचा सत्यप्रिय एक तरी वीरपुरुष उरला आहे काय? महाराज ययाती, यदू, पुरू, हस्ती, अजमीढ, संवरण, जन्हु, कुरू यांचे वंशज आहोत, याची एकाला तरी आज जाणीव उरली आहे काय? महाराणी तपती, नलिनी, भूमिनी, सुदक्षिणा,

वीरजा, देवयानी, गंगा आणि सत्यवती यांचे तुम्ही वंशज आहात, याचं भान कुणालातरी आज उरलं आहे काय? ज्या सभेत वृद्ध नाहीत ती सभा नव्हे. ज्या वृद्धांत न्याय–अन्यायाची चीड व चाड नाही, ते वृद्ध नव्हेत.

"सांगा, स्त्रियांचं शील म्हणजे एखाद्या द्यूताच्या पटात गुंडाळता यावी, अशी नरद असते काय? केव्हाही हाती घेऊन फेकावी, अशी फाशांची कवडी असते काय? स्त्रीची विटंबना करणारा हा समाज वा राज्य, विनाशाच्या गर्तेतच गेल्याशिवाय राहील काय? तुम्हा प्रत्येकाचा जन्म एका स्त्रीच्या वत्सल कुशीतच झाला आहे, याची जाणीव तरी तुम्हाला आज उरली आहे काय? सांगा, आपल्या मातेच्या स्तन्याचे ओठावरचे तुषार ज्याला अजूनही स्मरतात, असा एक तरी सुपुत्र आज द्यूतसभेत उरला आहे, की नाही?'

"क्षणभर सगळीकडे शांतताच पसरली. दुःशासनाची कुलस्त्रीच्या निरीला घातलेली मूठही क्षणभर ढिली पडली.

संपूर्ण द्यूतसभेतील एकच कुरुवीर निर्धारानं हात उंचावीत उभा ठाकला. आपल्यापेक्षा ज्येष्ठ असलेल्या दुःशासनाला निकराच्या अधिकारवाणीनं म्हणाला, 'दुःशासना, पांचालीच्या शरीराला स्पर्शही करू नकोस. सभासदहो! लक्षात ठेवा, महाराणी तपती ते सत्यवती अशा मातृतुल्य राजस्त्रियांनी भूषविलेली सभा आहे ही. इथं राजस्त्रीवर अन्याय करणं, म्हणजे प्रत्यक्ष मंदिरात आराध्य देवतेची मूर्ती पायाखाली तुडविण्यासारखं आहे.

"कनिष्ठ असूनही मी वृद्ध म्हणविणाऱ्या सर्व ज्येष्ठांना स्पष्ट विचारतो की, समरांगणात तळपणारी त्यांची खड्गं आज गंजली आहेत काय? पितामह, महाराज, महात्मा विदुर, आचार्य द्रोण–कृप, इथले तपस्वी, ब्रह्मज्ञ, ऋषिजन अंगावर वीज पडल्यासारखे आज प्रेतवत गप्प का बसले आहेत?

"मी धृतराष्ट्रपुत्र विकर्ण सांगतो, 'एका पतिव्रतेचे आक्रोश आणि किंकाळ्या रौद्रभैरवाचं तांडवसंगीत घेऊन येतील. तिच्या डोळ्यांतून वाहणारे जळजळीत अश्रू महापुरातल्या गंगेचं रूप घेऊन रोरावत धावतील. त्या वेळी तुम्ही बसलात, त्या आसनांपैकी एकही आसन टिकणार नाही. पतिव्रतेवर अन्याय म्हणजे पावित्र्यावर अन्याय! तिची विटंबना म्हणजे पुरुषार्थाचा अंत.'

"त्या उद्गारांनी मात्र सभासदांत कुजबुज माजली. आत्तापर्यंत वेडावल्या आवेगानं कुलस्त्रीच्या निरीला हात घालणारा विमूढ दुःशासनही क्षणैक डळमळला.

नेमक्या त्याच क्षणी अंगराज कर्ण उठून उभे राहिले. म्हणाले, 'विकर्णाऽऽ तू मूर्ख आहेस. सभागृहात पितामह, महाराज, महात्मा, असे ज्येष्ठ उपस्थित असताना ते काहीच बोललेले नाहीत. आपल्या एकट्याच्याच स्कंधावर धर्माची धुरा पडल्याच्या आवेशात तू व्यर्थ कंठाच्या धमन्या ताणतो आहेस.

"पतिव्रता? ही कसली पतिव्रता? पतिव्रता म्हणून तू जिचा वारंवार कंठरवानं उद्घोष करतो आहेस, ती पतिव्रता मुळीच नाही!

एकाच देही पाच पतींशी रमणारी, ती केवळ एक विलासिनी आहे! कलंकिनी आहे! वारांगना आहे!! कुलटा आहे!! वेश्या आहे!!! अशा स्त्रीला पाचापेक्षा एकशे पाच पतीच पसंत असतात! दासीला वस्त्र पांघरण्याइतकी तरी लज्जा असते, विनय असतो. कुलटेला तो कधीच नसतो. ती सवस्त्र सभागृहात आली काय आणि विवस्त्र आली काय, सारखीच आहे!

“विकर्ण, जे माहीत नाही त्यांत तोंड खुपसू नकोस, खाली बैस! दु:शासन, आजपर्यंत पांडवांच्या असमर्थ कमरेला लटकलेलं हे सावळं, सुगंधी खड्ग वस्त्रांच्या मान्यातून बाहेर खेच. पणात हरलेल्या या दासीला विवस्त्र कर!’

“एका दिग्विजयी दानवीराचे हे कठोर शब्द ऐकताना मात्र सर्व जण स्तब्धच झाले. डळमळलेला दु:शासन अवसान घेतं सरसावला. कुलस्त्री द्रौपदीदेवींच्या अंशुकाला हात घालून त्यानं त्यांचा पदर बळानं खेचला! तसा उरावरच्या कंचुकीवर हात घेऊन पांडवांच्या कुलस्त्रीनं सर्वांनाच थिजवून टाकणारा प्राणदेठापासूनचा हंबरडा फोडला, ‘मिलिंदा, माधवाऽ, मधुसूदनाऽऽ धाव! गोपाला, घननीळा, अच्युताऽ, केशवाऽऽ, श्रीकृष्णाऽऽ धाव! धरती होऊन दुभंगून या अभागी पांचालीला आता पोटात घे! यज्ञकुंडातला अग्नी हो आणि या याज्ञसेनेला त्यात दग्ध करून तिच्या जीवनयज्ञाच्या सांगतेची भगभगीत रक्षा करून या अंध अधमांच्या कपाळाला फास. माझ्या या असहाय अश्रूंच्या महापुरात या कामुकांची मदांध मस्तकं प्राण जाईपर्यंत घुसमटवून टाक! माझ्या या उष्ण श्वासांनी कुरुकुलाच्या माजलेल्या अरण्यात लपलेल्या या विषारी भुजंगांना होरपळून टाक! आजच सूर्याचा महादीप फुंकून या कौरवाच्या काळ्या दासीला या अंधकारात पुरून टाक! नाही तर धाऽऽव! आकाशाच्या निळ्या छतावरून, पाताळाच्या पोकळीतून, दाही दिशांतून धाव! धावऽऽ! धावऽऽऽ!!!”’

“आणि... आणि कुरूंच्या त्या द्यूतसभेच्या छतातून कुणीच कधीही न ऐकलेले वाद्यलोळ आणि मंत्रघोष ऐकू येऊ लागले. पाठोपाठ तेजाच्या असह्य वलयांनी द्यूतसभा व्यापली. दुसऱ्याच क्षणी तिथं पाहवणारा नाही अशा तेजाचं प्रचंड गतिमान असं गरगरतं वलय दिसू लागलं. त्यातून प्रथम आपल्या या उत्तरीयासारखं काहीतरी त्या कुलस्त्रीच्या अंशुकाला येऊन भिडलेलं मी पाहिलं. दुसऱ्याच क्षणी त्या तेजानं डोळ्यांवर भोवळ आली, म्हणून मी माझ्या आसनावर डोळे मिटत कोसळलो. पुढे काय झालं काहीही कळलं नाही.” हे सांगतानाही अंगावर येणारे तेजझोत वारण्यासाठी हातात घेतात तशी ओंजळ अमात्यांनी मुखावर घेतली. तसं पुढे होत त्यांची पाठ थोपटून ओंजळीतून त्यांचं मुख मोकळं करीत स्वामी म्हणाले, “अमात्य विपृथू, शांत व्हा! आता मात्र पुढचं काहीच सांगू नका. मी समजलो काय समजायचं ते!”

एक गोष्ट मात्र माझ्या ध्यानी आली. हस्तिनापुरात कुरूंच्या द्यूतसभेत घडलेल्या द्यूतप्रसंगापासून स्वामी केवळ हस्तिनापूरचाच विचार करू लागले. कधी नव्हते, असे ते उदास–उदास दिसू लागले. उद्धवमहाराजांना सोबत घेऊन अनेकदा पश्चिमेच्या ऐंद्र महाद्वाराकडे जाऊ लागले. तिथल्या पाषाणी बैठकांवर बसून उसळत्या लाटांची अविरत गाज ऐकू लागले. कसल्यातरी दूरवरच्या विचारात गढल्यासारखे दिसू लागले. बोलले, तर मध्येच एखादं वाक्य उद्धवमहाराजांशी बोलू लागले. त्या दोघांच्या समवेत सदैव मीच काय तो असे. आता स्वामींच्या सहवासात मी इतका निकट गेलो होतो की, गर्जत्या पश्चिम सागरासारखंच त्यांचं अंतरंग आहे, हे मला चांगलं कळून चुकलं होतं. त्या सागरावर उठणाऱ्या अगणित विचारलाटा स्वामींशी काहीही न बोलताही मला आपोआपच जाणवू लागल्या होत्या.

हस्तिनापुरात द्यूतसभेत घडलेल्या पहिल्या द्यूतप्रसंगातून एवढे विचारवंत असूनही पांडवश्रेष्ठ युधिष्ठिर काहीही धडा शिकले नव्हते! दुर्योधनानं दिलेल्या द्यूताच्या दुसऱ्या

आमंत्रणाचाही त्यांनी स्वीकार केला होता!! पहिल्या द्यूतानंतर आठ दिवसांतच हस्तिनापुरातच ते दुसरं अनुद्यूत दुर्योधन–शकुनींशी खेळले होते.

या अनुद्यूतात ते पुन्हा हरले होते. हरल्या पणाप्रमाणं पांडवांनी आणि यादवांनी उभारलेलं इंद्रप्रस्थाचं राज्य गमावून बसले होते. या अनुद्यूतातील शेवटच्या पणाप्रमाणं एकतर दुर्योधनासह कौरव बारा वर्षं वनवास व एक वर्षं अज्ञातवासात जाणार होते. नाहीतर पांडवांना वनात जावं लागणार होतं.युधिष्ठिर या अनुद्यूतातील शेवटचा हा निर्वाणीचा पणही हरले.

द्वारकेत वार्ता येऊन थडकली की, युधिष्ठिरांसह सर्व पांडव द्रौपदीदेवींना समवेत घेऊन काम्यकवनाकडे निघून गेले – वनवासासाठी! ती ऐकून माझं मन अपार उदास–उदास झालं.

इंद्रप्रस्थाचे अधिकारी असलेले पांडव कौरवांच्या हस्तिनापुरातून वनाकडे चालले. त्यांचे दिग्विजयी पिता पांडू यांच्याविषयी अद्याप आदरभाव असल्यामुळे अनेक हस्तिनापूरकर स्त्री–पुरुष त्यांना निरोप देण्यासाठी सीमेपर्यंत आले होते. पाचही पांडवांनी राजवेष उतरवून ठेवून साधी शुभ्र वस्त्रं धारण केली होती. द्रौपदीदेवीही तशाच साध्या अंशुकात होत्या. निरोपासाठी आलेल्यांत त्यांचे बंधू धृष्टद्युम्नही होते. ते पांडवांचे सर्व पुत्र – आपले भाचे आता आपल्या पांचालदेशी नेणार होते. मागे राहणार होता, तो आमचा सुभद्रादेवी पुत्र अभिमन्यू. कारण इंद्रप्रस्थ हरल्यामुळे स्वामींच्या आत्या कुंतीदेवी आता हस्तिनापुरात महामंत्री विदुरांकडे राहणार होत्या. त्या काही वनात जाणार नव्हत्या.

युधिष्ठिर एवढं होऊनही पुन्हा द्यूत खेळल्यामुळे स्वामी मनोमन दुखावले होते. त्याहून अधिक ते सर्व पांडवांना व त्यांची प्रिय भगिनी द्रौपदीदेवींना घेऊन न भेटताच काम्यकवनात परस्पर गेल्याचं कळल्यामुळे, अधिक दुखावले होते. तरीही आपल्या कर्तव्याला ते कधी चुकले नव्हते, चुकणार नव्हते. मला व उद्धवमहाराजांना समवेत घेऊन ते इंद्रप्रस्थात आले. आल्या प्रसंगाला कसं तोंड दिलं पाहिजे, याची त्यांनी सुभद्रादेवींना अतिशय प्रेमळ व जिव्हाळ्याच्या भाषेत जाणीव दिली. बालवयाच्या भाच्याला अभिमन्यूला समवेत घेऊन, ते भगिनी सुभद्रादेवींसह द्वारकेत आले. इंद्रप्रस्थाच्या या भेटीत मला एक गोष्ट प्रकर्षानं जाणवली. पूर्वी इंद्रप्रस्थाच्या चौकाचौकांत पांडवांचे गणवेष घातलेले शस्त्रधारी सैनिक दिसले होते. त्याच जागी हस्तिनापूरच्या कुरू राज्याचे गणवेष घातलेले शस्त्रधारी कौरव सैनिक उभे होते. अर्थ स्वच्छ होता. शकुनी–दुर्योधनांनी माझ्या स्वामींच्या साक्षीनं, महाराज धृतराष्ट्रांनी उदार मनानं दिलेलं खांडववनाचं राज्य परत घेतलं होतं. तेही वनाऐवजी सुरचित इंद्रप्रस्थ राजनगरीच्या रूपात.

वैभवशाली राजनगरी इंद्रप्रस्थाची पार वाताहत झाली होती. पांडवांचं सुसंस्कृत राजकुल चौदिशांना पांगलं होतं. काम्यकवनात सर्व पांडवांसह पत्नी द्रौपदीदेवी, हस्तिनापुरात पांडवमाता कुंतीदेवी आणि द्वारकेत सुभद्रादेवी–अभिमन्यू, मणिपूरदेशी अर्जुनपत्नी, चित्रांगदादेवींसह पुत्र बभ्रूवाहन, गंगेकाठी आपल्या माहेरी पुत्र इरावानासह उलूपीदेवी, वनात भीमपत्नी हिडिंबादेवींसह पुत्र घटोत्कच.

पांडवांना समोर ठेवून माझ्या स्वामींनी बघितलेली कितीतरी स्वप्नं पुसली गेली होती. आता प्रथम आवश्यकता होती, ती काम्यकवनात जाण्याची. पांडवांचं हरवलेलं

धैर्य पुन्हा बांधण्याची. द्रौपदीदेवींचं सांत्वन करण्याची. तसं स्वामींच्या आज्ञेप्रमाणं मीच त्यांना गरुडध्वजातून घेऊन काम्यकवनात जाऊन आलो. सोबत बलरामदादा आणि सेनापती सात्यकीही होते. त्या वनात मी घोड्यांची व रथांची देखरेख यांत गुंतल्यामुळे पांडवांच्या या भेटीत नेमकी काय चर्चा झाली, ते मला कळलं नाही. दोन दिवस वनात राहून स्वामी परतले.

आताशा द्वारकाधीशांनी सुधर्मा राजसभेत व राणीवशाच्या द्वीपावर जाणं जसं काही सोडूनच दिलं होतं. उद्धवमहाराजांना घेऊन ते पश्चिम सागरकिनाऱ्यावर घटकान्‌घटका बसत किंवा त्यांच्यासह द्वीपखाडी ओलांडून माझ्या रथातून सोमनाथाच्या शिवालयात असत. नित्याच्या प्रभात व सायंवंदनासाठीच काय ते स्वामी वसुदेवमहाराज, देवकी व रोहिणीमाता यांना आणि बलरामदादा व रेवतीदेवींना भेटत. सेनापती सात्यकी, अनाधृष्टी व विविध दलप्रमुख केवढातरी व्याप वाढलेल्या यादवसेनेच्या काही समस्या घेऊन आले, तर त्यांचं नुसतं ऐकत. काहीच न बोलता माझ्याकरवीच हाताच्या संकेतानं त्यांना बलरामदादाकडे घेऊन जायला सांगत.

बोललेच तर मात्र भरभरून बोलत, ते पाचारण करून घेतलेल्या आपल्या पुत्रांशी. त्यात प्रद्युम्न, सांब, प्रघोष असे एका वयाचे पुत्रसंच असत. त्यांच्या भेटीच्या वेळाही विविध असत. विषय तर नाना प्रकारचे असत. यांतील काही पुत्र अतिशय बुद्धिवान होते. ते काही प्रश्न विचारून द्वारकाधीशांकडून त्यांचं निरसन करून घेत. काही नुसतेच वीर होते. ते युद्ध तंत्रांची अधिक बारकाव्यानं माहिती घेत. काही जन्मतःच विनयी व अबोल होते. ते नुसतीच श्रवणभक्ती करत. आपल्या पुत्रांच्या मेळात मात्र स्वामी अनेकवेळा मनमुक्त हसत. आपल्या अत्यंत प्रिय कन्या चारुमतीला – चारूला गरुडध्वजात घेऊन उत्तरेच्या भल्लात महाद्वाराकडे जात, त्या वेळी मीही त्यांच्याबरोबर नसे. स्वतः तेच सारथ्य करत. कधी–कधी चारुमतीही ते करी. तिला ही दीक्षा स्वामींनीच दिली होती.

आता पांडव वनात जाऊन सहा महिन्यांचा काळ लोटला आहे. कित्येक द्वारकाकर तर त्यांना विसरूनच गेले होते. मी, माझे स्वामी, बलरामदादा, उद्धवमहाराज आणि वसुदेवमहाराज त्यांना विसरूच शकत नव्हतो. अलीकडे स्वामींचं आचार्य सांदीपनींशी बोलणं, चर्चा करणं वाढलं होतं. स्वामींच्या चर्येत दिवसागणिक पडणारं अंतर मला तीव्रपणे जाणवू लागलं. त्यांना द्वारकाधीश म्हणून राज्यकारभाराची कुठलीही गोष्ट मनापासून नकोशी झाली. एरवी प्रत्येक गोष्टीत निखळ प्रेमयोगाच्या भावनेनं सोत्साह भाग घेणारे स्वामी, आताशा अबोल वियोगयोगाकडे प्रकर्षानं झुकू लागले. आचार्य सांदीपनी आणि त्यांच्या चर्चेतील क्षेत्र प्रयाग, घोर आंगिरस, आश्रम असे शब्द आताशा वरचेवर ऐकू येऊ लागले.

आणि अखेर तो दिवस उजाडला. त्यादिवशी पश्चिम ऐंद्र महाद्वारातून आम्ही सागरकिनाऱ्यावर गेलो. सर्वांनी सायंअर्घ्यदान दिलं. परतताना मात्र स्वामींनी मला मागच्या रथघेरात उद्धवमहाराजांशेजारी बसायला सांगून गरुडध्वजाचे वेग आपल्या हाती घेतले. सांजसमय असल्यामुळे पश्चिम सागराच्या आभाळात इथून तिथवर केशरी, गुलाबी रंगाच्या ढगांची किनार उमटली होती. मंद समुद्रवारा त्यांच्या अंगावरचं उत्तरीय एका जागी स्थिर राहू देत नव्हता. त्याची फडफड आवरत रथाच्या मेघपुष्प, बलाहक अशा चारही घोड्यांना नाववार प्रेरणा देत ते धीरगंभीरपणे म्हणाले, "बंधो

दारुक आणि उद्धवा, राजवास्तूत जाताच मला तुमच्याशी काही बोलायचं आहे. ध्यानी असू द्या, केवळ तुमच्याशीच बोलायचं आहे. सोबत अन्य कुणीही नसावं."

राजवास्तूत येताच त्यांनी आपला ठाम निर्णय आमच्या कानी घातला. अत्यंत शांतपणे; पण निर्धारी बोलांत ते म्हणाले, "प्रिय बंधो उधो व दारुक, मी विचारपूर्वक एक ठाम निर्णय घेतलाय. पूर्वी मथुरा सोडलीच होती. आता द्वारकाही सोडणार आहे. कायमची. दूर उत्तरदेशी एका आश्रमात जाणार आहे. परमेशाच्या निवांत चिंतनासाठी. माझ्यासमवेत यायचं का, हा निर्णय तुम्हीच घ्यायचा आहे. बलरामदादा आणि मी गोकुळापासून एकत्र राहिलो. आता मात्र त्यालाही मी बरोबर घेणार नाही. एकदा त्यानं मला त्यागलं होतं– क्रोधानं. आता मीच त्याला त्यागणार आहे. पण मनी त्याच्या ज्येष्ठपणाचा आदर व प्रेमभाव ठेवूनच – निरुपायानं. तो अभिषिक्त युवराज असल्यामुळे माझ्यापेक्षा द्वारकाराज्याचा त्याच्यावर अधिक अधिकार आहे. तो द्वारकेच्या सेवेसाठी व रक्षणासाठी इथेच राहील. तुम्हीही राहिलात तरी 'सखा' म्हणून तुमच्यासाठी माझ्या मनी असलेला प्रेमभाव रतीभरही कमी होणार नाही."

आम्ही दोघंही त्यांच्याकडे नुसतं बघतच राहिलो. ते काय बोलताहेत, तेच क्षणभर आम्हाला नीट कळलं नाही. आमचं नि:शब्द बघतच राहणं त्यांनाच जाणवलं. लहान बालकासारखं निर्भेळ हसत ते म्हणाले, "सख्यांनो, एवढा साधा निर्णय तुम्हाला घेता येत नाही? मी एवढे निर्णय जीवनभर कसे घेतले असतील? पुन्हा सांगतो, तुम्ही घ्याल तो निर्णय मी आनंदानं स्वीकारीन."

"दादा, तुला सोडून राहण्याची मी कल्पनाच करू शकत नाही. श्वास कधी देहाला सोडून राहिला आहे काय? काय पारखलंस मग मला तू? मी तुझ्या समवेतच येणार. तू सखा मानलास, न मानलास तरीही." उद्धवमहाराज कसलाही पर्याय न ठेवता तत्काळ निर्धारानं म्हणाले.

"मी तर तुमची सावलीच आहे स्वामी. ती कशी काय दूर राहू शकेल? जिथं द्वारकाधीश तिथं दारुक." मीही माझ्या निर्धार नि:संदिग्ध शब्दांत माझ्या स्वामींसमोर ठेवला.

आम्हा दोघांचीही निर्णयात्मक, नि:संदिग्ध उत्तरं त्यांना स्पष्ट मिळाली. तसं आम्हा दोघांच्याही डोळ्यांत एकदा खोलवर बघून जवळ येत त्यांनी आपले आजानुबाहू आमच्या खांद्यांवर ठेवले. ते हलकेच थोपटत हसून ते म्हणाले, "ध्यानी ठेवा, आपण कुठं जाणार हे कुणाला म्हणजे कुणालाही समजता कामा नये. उद्धवाचा प्रश्न नाही. तो अविवाहित आहे. पण दारुका, तुझ्या पत्नीलाही यातील शब्दही समजता कामा नये! तसं झालं, तर मी तुम्हा दोघांनाही इथंच ठेवून एकटाच तिसरीकडे निघून जाईन. कदाचित उद्धवा, आपण दर्शन घेतलेल्या अमरनाथासारख्या अनेक पावन स्थलांना अंगावर हसत पेलणाऱ्या हिमालयाकडे!"

"उद्धवमहाराजांचा विश्वास आपणच बोलून दाखविला स्वामी. मी माझ्या पत्नीची आणि त्याहून अधिक आपली शपथ घेऊन सांगतो की, तिलासुद्धा काहीही बोलणार नाही."

"मग लागा तयारीला. जा." स्वामींनी आम्हा दोघांनाही निरोप दिले.

त्यांच्या कक्षातून बाहेर पडताना मी उद्धवमहाराजांना म्हणालो, "आता माझ्या ध्यानी येतंय की, कुठल्याच राजसिंहासनावर स्वामी कधीच का बसले नाहीत ते!"

माझ्याकडे बघून अगदी स्वामींसारखं हसत उद्धवमहाराज म्हणाले, "दारुका, त्यात काहीच विशेष नाही. त्यानं आताच तुला पत्नीलाही काही बोलू नकोस असं सांगितलं, याचा अर्थच तो रुक्मिणीवहिनींसह आपल्या सातही राण्यांना काहीही बोलणार नाहीत, हे स्पष्टच नाही काय? पण रुक्मिणीवहिनींनाही न सांगता मी कसं जावं, हेच मला कळेनासं झालं आहे! तरीही मी जाणार. त्यानं सांगितलं तसं. कुणालाही काहीही न बोलता."

आमच्या तिघांचीही द्वारका सोडून जाण्याची सर्व–सर्व तयारी झाली. आम्ही नित्याचा गरुडध्वज काय तो बरोबर घेणार होतो. त्याच्या घेरात प्रवासासाठी लागणारा सर्व शिधा, स्वयंपाकाची भांडी, काही वस्त्रं असं जुजबी साहित्य भरलं. शस्त्र असं कोणतंही सोबत घेऊ नये, अशी स्वामींचीच कडक आज्ञा होती.

आम्ही निघण्यापूर्वी सप्ताहभर आचार्य सांदीपनींना पुढे घालून सर्वांची मानसिक तयारी करवून घेतली की, 'आपला प्रिय शिष्य द्वारकाधीश एका दुर्लभ विद्येच्या प्राप्तीसाठी माझ्याच संकेतानुसार एकटाच दूर दक्षिणदेशी जाणार आहे. वाटल्यास एक–दोन यादव तो संगती घेईल. अन्य कुणालाच सोबत आणू नये, अशी त्याच्या होऊ घातलेल्या नव्या गुरूंचीच आज्ञा आहे. त्यामुळे युवराज असलेले बलरामही त्याच्यासोबत जाणार नाहीत. मी गर्गमुनींच्या साहाय्यानं त्याच्या जाण्यासाठी योग्य मुहूर्त शोधतो आहे.'

अशी सर्व सिद्धता होताच स्वामी द्वारका सोडून निघाले. केवळ आम्हा दोघा सख्यांसह! त्यांना निरोप देण्यासाठी शुद्धाक्षावर लोटलेल्या सर्वांतून त्यांनी दोनच पुरुषांना हाताच्या संकेतानं नौकेत चढविलेल्या आपल्या गरुडध्वजावर बोलावून घेतलं. ते भाग्यवान पुरुष होते, अमात्य विपृथू आणि आचार्य सांदीपनी.

आम्ही द्वीपाची खाडी ओलांडून सौराष्ट्राच्या किनाऱ्यावर आलो, तसं प्रथम अमात्यांना निरोप देताना स्वामी त्यांना एका बाजूला घेऊन म्हणाले, "अमात्य, जिकडे मी चाललो आहे, तिकडून परत येईनच असं नाही! सर्वांतून बाहेर काढून मी तुम्हाला एवढ्याचसाठी सोबत आणलं आहे की, माझा हा संदेश माझ्या सर्व पत्नींना, पुत्रांना, वसुदेवबाबांना, दोन्ही मातांना, युवराज व रेवतीवहिनींना, त्यांच्या पुत्रांना, भगिनी सुभद्रेला, तिच्या अभिमन्यूला आणि सर्व पौरजनांना सोसवेल व मानवेल अशा भाषेत तुम्हीच नंतर हळूहळू समजावून सांगायचा आहे. आज नव्हे, चांगल्या पंधरवड्यानंतर. आम्ही पूर्वी न पाहिलेल्या दक्षिणदेशीच्या कृष्णा, कावेरी नद्यांकाठच्या एखाद्या आश्रमात जाणार आहोत. तिकडे आमचा शोध घेण्यासाठी येण्याची खटपट कधीच करू नका. त्यात यश येणार नाही." आज पहिल्यानंच अमात्य विपृथूंनाही त्यांनी वक्ष भिडवत आलिंगन दिलं, तसे ते गोंधळात पडले. स्वामींनी आचार्य सांदीपनींच्या चरणावर मस्तक ठेवलं. अत्यंत प्रेमभावानं वर उठवून घेतलेल्या आचार्यांनी त्यांना झटकन दीर्घ आलिंगनातच घेतलं. स्वामी आता आचार्यांपेक्षा कितीतरी उंच दिसत होते. गुरूंसमोर दोन्ही हात जोडून नम्र भावात स्वामी म्हणाले, "आपण अंकपाद आश्रमात सांगितलेल्या त्याच गुरूंच्या चरणाशी जात आहोत. आचार्य, आपल्या शिकवणीनुसार इथपर्यंत जमलं तेवढं करीत आलो. काही चुकलंमाकलं असेल, तर उदारहृदयी मला क्षमा करावी." त्यांनी आचार्यांनाही निरोप दिला.

मी गरुडध्वजाचा रथनीड घेतला. त्याच्या घेरात मी जीवनभर परमादरणीय मानलेले दोन यादवश्रेष्ठ होते. द्वारकाधीश आणि उद्धवमहाराज. नेहमीसारखा आज आमच्याबरोबर सेनादलाचा कसलाच डौल नव्हता. आम्ही तिघेच आणि मस्तकावर विमुक्त निळंभोर आभाळ आणि रथचक्राखाली मागे पडणारी पावन आर्यभूमी!

आमचा पहिलाच पडाव पडला, तो नागेश्वर या शिवतीर्थाजवळ. इथपर्यंतच्या प्रवासात एक गोष्ट प्रकर्षानं आमच्या ध्यानात येऊन चुकली. स्वामींच्या व उद्धवमहाराजांच्या राजवेषामुळे माझ्या सारथिवेषामुळे व सालंकृत रथामुळे मार्गात भेटणारे स्त्री–पुरुष आम्हाला पटकन ओळखताहेत. रथ थांबविण्यासाठी हात पसरून रथामागे धावताहेत. हे थांबवणं आवश्यक होतं. नागेश्वर हे आर्यावर्तातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक होतं. इथल्या शिवालयात येताच स्वामींनी आपल्या मनीची योजना मला ऐकविली. ते म्हणाले, “दारुका, इथं आपण सर्वच राजवेष उतरवून आश्रमवासियांचे साधे वेष परिधान केले पाहिजेत. राजवेष शिवालयाच्या पुजाऱ्याकडून मुकुटांसह द्वारकेत बलरामदादांकडे पाठविले पाहिजेत. सालंकृत गरुडध्वजालाही साधं रूप दिलं पाहिजे. नाहीतरी हा प्रवास लवकर पूर्णच होणार नाही. शिवाय आपण कुठं आणि कसकसे गेलो आहोत, ते क्रमशः तसतसं मागे द्वारकेत कळत जाणार.”

नागेश्वराच्या शिवालयात आम्ही अंगीचे राजवेष उतरवून आश्रमवासियांचे साधे वेष परिधान केले. गरुडध्वजावरची सर्व राजचिन्हं उतरवून घेतली. रथाची विख्यात गरुडांकित ध्वजाही उतरविली. त्या जागी साधी भगवी पताका चढविली. आमच्या चारही अश्वांच्या अंगावरच्या उंची झुली उतरवून ठेवल्या. सुवर्णकाठाळीचे त्यांचे वेगही बदलले. आता रथाचा आणि आमचाही कायापालट झाला.

नागेश्वरच्या शिवालयातच आम्हाला पत्ता लागला की, आम्ही असाच प्रवास केला, तर आम्हाला अपेक्षित त्या उत्तरदेशीच्या प्रयागक्षेत्रापर्यंत विनाविक्षेप सुखरूप पोहोचणार होतो. निघताना आम्ही पुन्हा भक्तिभावानं मंदिराच्या गर्भगारातील प्रशस्त शिवपिंडीला पांढऱ्याशुभ्र फुलांची ओंजळ व बिल्वपत्रं वाहिली. हात जोडून तिघांनीही डोळे मिटले. आमच्या मनी आपोआपच शिवस्तुती निनादून उठली – ‘शिवाकांत शंभो शशांकार्ध मौले। महेशान शूलिन् जटाजूटधारिन्!...’ आता पुढील मार्गात विश्वातील सर्व ‘शिव’ आमची सोबत करणार होते.

स्तवतीर्थ, माही नदी पार करून मालव राज्यातून आम्ही अवंतीत आलो. स्वामींच्या विंद, अनुविंद या दोन आतेबंधूंचं हे राज्य. या प्रवासात मात्र आम्हाला कुणालाच आमच्या आगमनाचा पुसटताही माग द्यायचा नव्हता. त्यासाठी आम्ही मार्गात लागणाऱ्या विविध राज्यांच्या सीमांवरील विष्णुमंदिरं, शिवालयं यांच्या धर्मशाळांत उतरण्याचा निर्णय घेतला होता. या प्रवासात स्वामी व त्यांचे बंधू अंगच्या कटिवस्त्रांचे काचे कसून, मी रानातून आणलेल्या काटेरी रानवेळींनी रथाच्या चारही शुभ्रधवल अश्वांचे खरारे करीत. ते करताना दोघेही स्वतःला विसरलेले असत. या वेळी ते नानाविध विषयांवरही बोलत असत. तसं राजसूय यज्ञात आमंत्रितांची उष्टी पात्रं उचलताना मी दोघांना पाहिलं होतंच. आता चारही अश्वांना चंदीचारा देताना, इतकंच नव्हे; तर प्रसंगी त्यांची निःसंकोचपणे लीद सावरतानाही मी प्रत्यक्षच बघत होतो. प्रवासात अरण्यं, पठारं लागली की, दोघेही बंधू एकमेकांशी जीवनावश्यक चौअंगानं बोलत. मलाही त्यात

सहभागी करून घेत. एखादं नगर लागलं, त्या राज्यातील पौरजन दिसू लागले की मात्र, दोघेही कटाक्षानं मौनव्रत धारण करीत. मग बोलण्याची, पुढील प्रवासातील सर्व माहिती काढण्याची पाळी येई ती माझ्यावर.

निषादांच्या राज्यातील विदिशा, दशार्णांच्या राज्यातील पद्मावती, पुलिंदांच्या राज्यातील सागर अशी नगरं पार करत आम्ही कर्णवती नदी ओलांडली. या नदीला हे नाव अंगराज कर्णांमुळे पडलं होतं. आमचा एक पडाव श्रीराम, लक्ष्मण व सीता यांनी वास्तव्य केलेल्या चित्रकूट पर्वताच्या पायथ्याशीही पडला. शेवटी पंपापूर ओलांडून आम्ही श्रीक्षेत्र प्रयागावर आलो.

हा आर्यावर्तातील तीन महानद्यांचा पावन संगम होता. कुरूंच्या हस्तिनापुरातून वाहणारी गंगा, पांडवांच्या इंद्रप्रस्थ राज्यातून वाहत आलेली, माझ्या स्वामींचं रमणीय बालपण अंगावर झेललेली यमुना आणि तिसरी अदृश्य सरस्वती.

आम्ही प्रयागतीर्थाच्या प्रसिद्ध संगमघाटावर आलो. मी रथ, घाटाच्या वरच्या बाजूला, एका डेरेदार आम्रवृक्षाच्या छायेत सोडला. अश्वांना चाराचंदी दिली. संगमघाटाची एक–एक पायदंडी आम्ही उतरू लागलो. तसं मला प्रकर्षानं स्मरण झालं, ते द्वारकेच्या श्रीसोपानाचं. आता तर तो असाच प्रशस्त झाला होता.

आम्ही तिघेही कोरडी वस्त्रं काठावरच्या पायदंडीवर ठेवून केवळ कटीच्या वस्त्रांवर त्रिवेणी संगमात उतरलो. आपली धारदार निळी नासिका मुठीत धरून 'हर गंगेऽऽ' म्हणत उघडचाबंब स्वामींनी पाण्यात एक डुबकी घेतली. पाठोपाठ मी आणि उद्धवमहाराजांनीही घेतली. समोरच उभे असलेले गंगायमुनाजलात निथळून निघणारे, सूर्यकिरणांत उजळून गेलेले माझे स्वामी मी डोळाभर बघतच राहिलो. एवढा प्रवास झाला होता, तरी त्याची पुसटतीही रेषा त्यांच्या तेजवंत मुखमंडलावर नव्हती. ते सोमनाथच्या शिवालयातील अभिषेकजलाखाली गर्भागारात निथळून निघणाऱ्या शिवपिंडीसारखं सतेज दिसत होतं.

स्वामींनी त्रिवेणीजलाची अर्घ्यदानासाठी ओंजळ घेतली. आम्हीही उचलली. स्वामींच्या तोंडून स्पष्ट बोल उठले – 'ओम भूर्भुवः स्वः... प्रचोदयात्... आम्ही उभयतांनी त्यांचं अनुसरण केलं. एवढ्यातच आम्हाला काहीही कल्पना नसताना माझे स्वामी 'जय इडादेवीऽऽ!' गर्जत समोरच्या त्रिवेणीपात्रात झेपावले. आम्ही दोघेही जागीच त्यांच्याकडे अचंब्यानं बघत तसेच उभे राहिलो.

चांगलं घटकाभर त्रिवेणी संगमात यथेच्छ डुंबून स्वामी किनाऱ्यावर आले. अत्यंत आदरानं कोरडी वस्त्रं हाती धरून मी त्यांच्यासमोर उभा ठाकलो. एका मजेदार विचारानं स्वतःशीच हसलो. स्वामी नित्यासारखे मुकुटधारी वेषात असते तर! त्यांनी आश्रमवासी म्हणूनही नित्याचा वेष आश्रमातही धारण केला, तर काय बिघडणार आहे एवढं? ते तर मला जीवनभर संन्यासीच वाटत आले होते.

संगमघाटापासून जवळच असलेल्या आचार्य घोर आंगिरसांच्या आश्रमाच्या लाकडी पूर्व–महाद्वारासमोर मी गरुडध्वज आणला. रथघेरातून उतरणाऱ्या उद्धवमहाराजांनी मला सूचन दिलं, "दारुका, आश्रमात जा. आचार्यांना आम्ही आल्याची वार्ता दे."

'आज्ञा महाराज!' म्हणत मी आश्रमात चाललो. स्वामींच्या आचार्य सांदीपनींच्या अवंती राज्यातील अंकपाद आश्रमाला भेट देण्याचा योग मला आला होता. तशीच – अगदी तशीच रचना होती या आंगिरस आश्रमाची. अंकपाद आश्रमापेक्षा इथं पटकन

दृष्टीत भरावी, अशी एकच गोष्ट होती. ती म्हणजे, आचार्यकुटीसमोरील अहोरात्र प्रज्वलित राहणारं प्रशस्त चौकोनी यज्ञकुंड. अखंड अग्निपूजा हेच या आंगिरस ऋषिकुलाचं शेकडो वर्षं चालत आलेलं व्रत होतं. अगदी पावसाळ्यातसुद्धा या यज्ञकुंडाभोवती चौफेर गवताच्या झडद्या लावून, उंच गवताळू छत उभारून हे अग्निकुंड धगधगतं ठेवण्यात येई.

माझ्यासमवेतच प्रमुख शिष्यगणांच्या मेळातून दोन्ही हात पसरलेले आचार्य घोर आंगिरस स्वामी व उद्धवमहाराजांना सामोरे आले. एक गोष्ट माझ्या पटकन ध्यानी आली की, सर्व शिष्यगणांच्या अंगी भगवी वस्त्रं होती; पण एकटद्या आचार्यांच्या अंगी मात्र पांढरीस्वच्छ वस्त्रं होती. एका पांढऱ्यास्वच्छ वस्त्रपट्टीनं त्यांनी ओठ झाकून घेतले होते. ती पट्टी दोन बंधांनी कानांमागे बांधली होती. तीही एकटद्या आचार्यांच्याच. त्या वस्त्रपट्टीमुळे आचार्यांचं मुख व बरीचशी भरगच्च दाढी सहज झाकली गेली होती. त्या सर्वांच्याच मस्तकावरील केशात मागील बाजूला मध्ये एक व भोवती चार अशा पाच शिखा–शेंडद्या स्पष्ट दिसत होत्या. या पाच शिखा व यज्ञकुंड हे आंगिरस–आश्रमाचं प्राचीन वैशिष्टद्य होतं. मानवी देह हा पंचमहाभूतांच्या अनाकलनीय मिश्रणानं साकारतो, त्याचं प्रतीक म्हणून या पाच शिखा सर्व आंगिरस धारण करत. सर्व आर्यावर्तात ते या पाच शिखा व त्यांचं अग्निप्रेम यामुळे ओळखू येत. अग्नीच्या सतत सान्निध्यात राहिल्यामुळे यातील बहुतेकांचे वर्ण रापलेले व तेजस्वी गौर दिसत. भृगूंच्या शिष्यांत असते, तशी यांच्याही नेत्रांत निर्भयतेची एक तळपती झाक दिसे.

आचार्य समोर उभे ठाकताच दोन्ही बंधूंनी पटकन भुईवर गुडघे टेकले. उजव्या बाजूनं माझ्या स्वामींनी व डाव्या हातानं उद्धवमहाराजांनी आपली मस्तकं आचार्यचरणांवर ठेवली. लागलीच दोन्ही बंधूंना हलकेच उठवून आचार्यांनी एकदमच वक्षाशी बिलगतं घेतलं.

“प्रवास कसा झाला तुमचा? अग्रवार्ता न देताच हे असं अचानक आलात – खरंच वाटलं नाही!” आचार्यांचा आवाज कणीदार व ठणठणीत होता.

मी गेल्यागेल्याच त्यांचं दर्शन व आशीर्वाद घेतले होते. मला बघताच त्यांनी ओळखलं होतं. पूर्वीच्या त्यांच्या द्वारकाभेटीत त्यांना रथसेवा देण्याचा योग मला आला होता. मी त्यांना ‘स्वामी व बंधुवर्य आलेत’ अशी वार्ता दिली. तसं त्यांनी शिष्यगणांनी भरलेली कुटी, हितोपदेश अर्धवटच थांबवून सोडली होती.

मी ऐकलं होतं, तसं हे आचार्य पूर्वीचे मथुरेतील एक यादव होते. मथुरेत त्यांचा वाङ्निश्चयही झाला होता. पण विवाहापूर्वीच विरक्त होऊन ते थेट हिमालयात गेले होते. आंगिरस या ऋषिकुलातील त्या वेळच्या प्रमुख आंगिरसांना भेटले होते. या आंगिरसकुलाच्या आद्य जनकानं फार पूर्वी ऋग्वेदातल्या काही ऋचा उत्स्फूर्त उच्चारल्या होत्या. नंतरच्या अथर्ववेदातील पाच कल्पांपैकी एक तर त्यांच्या नावेच ‘आंगिरस कल्प’ म्हणून चालत आला होता. तेव्हापासून हे आंगिरस ऋषिकुल ऋषींतील ‘वज्रकुल’ म्हणून मानलं गेलं होतं. त्यांचा प्रमुख आश्रम हिमालयात होता. प्रयागसारख्या आर्यावर्तभर अनेक आश्रमशाखा होत्या. स्वामींच्या कुलातील प्रसिद्ध पूर्वज ययातीमहाराज या आंगिरसकुलाच्या सहवासात येऊन गेले होते. त्यांनीही काही वेदऋचा उच्चारल्या होत्या.

यादवकुलाचा व आंगिरसांच्या वज्रकुलाचा हा फार वर्षांनी भेटयोग घडत होता.

या मूळच्या यादवश्रेष्ठांनी आंगिरस ऋषींनी रीतसर दीक्षा घेतली होती. घोर तपस्या व साधना करून आपल्या गुरूंचा कृपाप्रसाद मिळविला होता. गुरूंनीच त्यांच्या घोर तपस्येवर प्रसन्न होऊन 'घोर आंगिरस' असं उपनाम दिलं होतं. आपल्यानंतर आंगिरसांचं प्रमुख ऋषिपद दिलं होतं. दूर हिमालयात राहून आंगिरसांचं वज्रकुल वाढविता येत नाही, हे ध्यानी आल्यामुळेच त्यांनी स्वत: प्रयागच्या त्रिवेणीसंगमावर आश्रमशाखा सुरू केली होती. अद्याप त्यांच्या मनात हिमालयातील मुख्य शाखेपेक्षाही केवढीतरी भव्य शाखा तीही कैलास पर्वतासमीप सुरू करण्याची तीव्र इच्छा होती.

प्रयागच्या या घोर आंगिरस आश्रमात येताच आमचा नवाच दिनक्रम सुरू झाला. अशा आश्रमजीवनाची माझे स्वामी व उद्धवमहाराज यांना त्यांचे पूर्वीचे गुरुवर्य आचार्य सांदीपनींच्या अंकपाद आश्रमापासून सवय होती. मला मात्र हे सगळंच नवीन होतं. पण मला त्यांचं काहीही भय वाटत नव्हतं. पहाडासारखे उभय यादवबंधू माझं काही चुकलं–सवरलं तर सावरायला समर्थ होते.

आमचं आश्रमजीवन सुरू झालं. पहिल्या दिवशी आमचा सर्व यथासांग दीक्षाविधी झाल्यावर आचार्यांनी शिष्यगणांनी खचाखच दाटलेल्या विविध गणराज्यांतील शिष्यांना आमचा परिचय करून दिला. अतिशय मोजक्या शब्दांत ते म्हणाले, "हा द्वारकेच्या वसुदेवमहाराजांचा पुत्र श्रीकृष्ण – हा त्यांचा बंधू उद्धव आणि हा त्याचा सखा दारुक!"

त्यांचा परिचय संपला नाही तोच, शिष्यगणांत प्रचंड खळबळ माजली. आमच्या कानांवर स्पष्ट–स्पष्ट धावते शब्द पडू लागले –"कायऽ श्रीकृष्ण? कंस – शृगाल – कालयवन – नरकासुर – शतधन्वा – शिशुपाल – शाल्व – पौंड्रक वासुदेव – दंतवक्र – विदूरथ यांचा अंतक? तेजयंत्र सुदर्शनाचा धारक? आचार्य सांदीपनीशिष्य, सुवर्णी द्वारकेचा अधिपती? आपण – आपण स्वप्नात तर नाही ना?"

ती खळबळ क्षणाक्षणाला वाढतच चालली. आचार्यांनी दोन्ही हात उठवून 'शांतता – एकदम शांतता' असा कडक ठणठणीत शब्दांत सूचनासंकेत दिला. तसा मी खाली बसलो. पर्णकुटीत शांतताच शांतता पसरली.

आपल्या शिष्यगणांचा मनोभाव ओळखून आचार्यांनी त्यांची सांत्वना करताना सांगितलं, "शिष्यगणहो, तो आता द्वारकेचा श्रीकृष्ण नाही! तुम्हा सर्वांचा आजपासूनच आश्रमबंधू झाला आहे. तुम्ही आजवर शिकलात त्या सर्व प्रकारच्या योगांपेक्षा आर्यावर्तात त्यानं प्रारंभ केलेला नवाच योग आहे – प्रेमयोग! तुम्हाला त्याचा इथून पुढे वाढता प्रत्यय येत जाईल. प्रथम तो इथं का आला आहे, हे आपण जाणून घेऊ या. तुमच्यासारखाच मीही त्यासाठी उत्सुक आहे. कारण – कारण तुमच्यासारखा अविवाहित ब्रह्मचर्याश्रमाचा साधक म्हणून तो इथं आलेला नाही. तो विवाहित, कुटुंबवत्सल व पिता, पुत्र, पती, बंधू, अनेकांचा मार्गदर्शक अशा नात्यांनी बांधला गेलेला आहे. तरीही मी त्याला दीक्षापूर्वक शिष्यत्व दिलं आहे. त्याला दिलं आहे म्हणून त्याच्या इच्छेनंच त्याच्या दोन सख्यांनाही दिलं आहे. कारण – कारण मी त्याला पूर्वी वचन दिलं होतं की, योग्य समयी मी तुझं गुरुपद पत्करीन. तो समय त्याच्या आगमनाबरोबर माझ्या दृष्टीनं आज आला आहे. तुम्हा सर्वांच्या साक्षीनं मी त्याला विचारतो, 'सांग श्रीकृष्णा, तुला या वयात तुझ्यासमीप तुझे प्रिय आचार्य सांदीपनी असतानाही एवढ्या दूरवर माझ्याकडे यावंसं का वाटलं? नेमकं काय कारण झालं यासाठी? गोकुळात बासरी वाजविणारा तू,

गोपगोपींचं दहीदूध चोरून फस्त करणारा तू, गोपालांचा रास पौर्णिमेच्या चंद्राला साक्षी ठेवून गोपगोपींसह मनसोक्त खेळणारा तू, यमुनेत यथेच्छ डुंबणारा तू, जीवन चौअंगांनी भरभरून भोगणारा तू असा विरक्त कसा काय झालास?" '

मी आचार्य घोर आंगिरसांच्याकडे कितीतरी भारावल्या दृष्टीनं बघू लागलो. इथं येईपर्यंत माझ्या मनी अनेक वेळा उठलेले सर्व–सर्व प्रश्न आणि तेही प्रत्यक्ष द्वारकाधीशांना त्यांनी आज प्रकटपणे विचारले होते. ते आचार्यांच्या प्रश्नांना आता काय उत्तर देतात म्हणून मी पराकोटीचा उत्सुक झालो.

प्रथम माझे स्वामी दर्भासनावरून उठू लागले. त्यांचा विनय सुटला नव्हता. आचार्यांना त्याची आवश्यकता वाटली नाही. लगेच हातसंकेत करीत ते म्हणाले, "बसूनच बोल अच्युता." ते ऐकताना आचार्यांकडे कितीतरी भावपूर्ण प्रेमळ दृष्टीनं बघत ते हसले. निळसर भरीव गालावर नेहमीचीच अवखळ खळी खुलली. मी स्वत:ला हरवून त्यांच्याकडे एकटक नुसता बघत अमृताशी स्पर्धा करणारे त्यांचे शरीबोल तन्मयतेनं ऐकू लागलो. कुटीतील यच्चयावत शिष्यगणांची हीच स्थिती झाली होती. प्रश्न विचारणारे प्रत्यक्ष आचार्यही स्वत:चं ज्येष्ठपण विसरून तसेच ऐकू लागले. काही अंतरावरून वाहणाऱ्या गंगा–यमुनांच्या मंथर जललहरींची मधुर खळखळ ऐकू यावी तसे स्वामीबोल स्त्रवले –

"वंदनीय आचार्य आणि समस्त आश्रमबांधवहो। मी इथं का आलो, असा प्रश्न आचार्यांना व तुम्हा सर्वांना पडला आहे. माझा प्रिय बंधू उद्धव व सखा दारुक यांनाही तो पडला असेल. माझ्या द्वारकानगरीतील सर्वांनाच तो पडला असेल. त्यासाठी संपूर्ण आर्यावर्तातील ब्रह्मविद्येचे घोर अधिकारी असलेल्या या आचार्यांच्या साक्षीनं माझं निवेदन मी देतो आहे. तेही नम्र भावानं." "थांबणं हा माझा स्वभावच नाही. मी गोकुळातून मथुरेत आलो. मथुरेतून द्वारकेत आलो. द्वारकेतून संपूर्ण आर्यावर्तभर फिरलो. जे आणि जेवढं शक्य आहे तेवढं केलं.

"हस्तिनापूरच्या कुरुकुलाच्या अधिकारी पांडवांना इंद्रप्रस्थात सुप्रस्थापित केलं. एक नव्हे दोन नव्हे शब्दश: हजारो लाखो स्त्री–पुरुष मला भेटले. त्यांच्याशी जमेल तेवढ्या प्रेमभावानं समरस झालो.

"सुवर्णी व वैभवी द्वारकेत नाही एवढा रस इंद्रप्रस्थात घेतला. भेटलेल्या अनेकानेक पुरुषांतून पाचही पांडवबंधू निवडले, ते केवळ आतेबंधू आहेत म्हणून मुळीच नव्हे. तर ते दुर्मीळ गुणांनी युक्त गुणवंत आहेत म्हणून.

"पण – पण – मी एकाच गोष्टीनं, पुरता खंतावलो आहे. गर्जत्या सागराच्या पाठीवरही सुवर्णनगरी उठविता येईल. घनदाट अरण्यातही प्रशस्त राजनगरी उभारता येईल. समस्त जीवन रोधून धरणारे अन्यायाचे गड्डे निर्धारानं निखंदून काढता येतील. पण – पण हे सर्व–सर्व करायचं ते कशासाठी? आपणाला अधिकात अधिक जवळच्या माणसाचंही मन कळत नाही. ते कितीही यत्न करून का घडविता येत नाही, यासाठी मी अपार खंतावलो आहे.

"युधिष्ठिरासारखा परिस्थितीचे असह्य चटके खाल्लेला सत्यप्रिय, सत्यशील ज्येष्ठ पांडव विक्रमाची सुवर्णसंधी समोर असतानाही मनानं भटकतो! का? कसा? शून्यातून सर्व उभारता येतं. मूळ शून्याकारच असलेल्या मनाला संस्कारशील घडवायचं ते कसं? किंबहुना मी घडवितो हा अहंकार केवढा व्यर्थ असतो!

"पांडवांच्या दुर्लभ गुणवत्ता लक्षात घेऊन या संपूर्ण आर्यावर्ताचं काही एक चित्र मी डोळ्यांसमोर धरलं होतं. इंद्रप्रस्थाकडून द्वारकेपेक्षाही केवढ्यातरी गगनउंच अपेक्षा मी मनी धरल्या होत्या.

"युधिष्ठिरासारखा अभिषिक्त व प्रजेला बांधलेला राजा द्यूताच्या व्यसनात भरकटू शकतो. राज्य व बंधूंसह सप्तपदी फिरलेल्या पत्नीला पणाला लावू शकतो. हस्तिनापूरच्या राजकुलाचे वंशज सूडाच्या हट्टाला पेटून रज:स्वला कुलस्त्रीला फरफटत द्यूतसभेत आणू शकतात. तिच्या नेसत्या वस्त्राच्या निरीला सर्व वंदनीय ज्येष्ठांसमोर हात घालू शकतात. एकनिष्ठ सूर्यभक्त असून, प्रसंगी जिच्या लज्जारक्षणासाठी अंगावरचं कवच उतरवून ते पांघरावं, असा महारथी कर्ण तिला सर्वांसमक्ष विवस्त्र करण्याची इच्छा बोलून दाखवतो. हे मनामनांचे कुणालाही कधीच चिमटीत न धरता येऊ शकणारे किती अगणित आविष्कार!

"एकदा हरलेलं सर्वनाशी द्यूत, मला प्रिय बंधूंतील ज्येष्ठ अभिषिक्त राजा पुन्हा तिथंच तसंलच द्यूत खेळू शकतो. जीवनातील सर्व–सर्व श्रेयस गमावू शकतो. वनवास आणि अज्ञातवास पत्करतो. माझ्यासारख्या जिवाभावाच्या आप्ताला न भेटताच वनात जाऊ शकतो, तेही मला प्राणप्रिय असलेल्या सर्वश्रेष्ठ गुणवंत सखा अर्जुनासह! तोही मला वडील बंधूंच्या मूर्खपणाचं कसं समर्थन द्यावं, हे न कळल्यानं भेटल्याशिवाय वनात निघून जातो. जिच्यामुळे हे सर्व अशोभनीय अतर्क्य लज्जाकांड घडलं, ती मी भगिनी मानलेली प्रिय सखी पांडवपत्नी द्रौपदीही मला भेटल्याशिवाय निघून जाते.

"हे सगळं घडतं, ते मनाच्या विविध विभ्रमांनी. माणसाचं मन घडल्याशिवाय माणूस घडतच नाही. या कठोर जीवनाच्या कठोर अनुभवानं मला इथं आणलं आहे. कुठलीही स्वप्नं रचणं व्यर्थ आहे. माणसांची मनं घडविता येणं अशक्य आहे.

"मी आचार्य सांदीपनींच्या आश्रमात ध्यानयोग, सांख्ययोग, ज्ञानयोग अशा कितीतरी योगांची निष्ठापूर्ण साधना केली. 'प्रेमयोग' हे तर माझ्या जीवनाचं मी सारसर्वस्व मानलं. हे सर्व–सर्व व्यर्थ आहे; अशा खंतेनं मन भरून आल्यामुळे, सर्वांना पाठ फिरवून मी या आचार्यांच्या चरणांशी आलो आहे. मनाच्या संपूर्ण शांततेसाठी. त्यांनीच आता मला योग्य तो योग समजावून सांगावा."

संपूर्ण कुटीभर अत्यंत बोचक शांतताच पसरली. आता सर्वांचे डोळे जडले ते एव्हापर्यंत समोरच्या उच्चासनावर डोळे मिटून बसलेल्या आचार्य घोर आंगिरसांवर.

क्षणाचाही विलंब न लावता आचार्य उद्गारले, "यालाच म्हणतात 'विषादयोग'! आकाशाच्या पलीकडे जसं कधीच न दिसणारं, अंत न लागणारं काळंभोर अवकाश आहे, तसाच अंत न लागणारा हा मनाचा विषादयोग! तो म्हणजे संपूर्ण ब्रह्मांड नव्हे. तो म्हणजे संपूर्ण प्रकाश नव्हे. श्रीकृष्णा, मला चांगलं माहीत आहे की, तू हा 'विषादयोग' म्हणजे काय, ते चांगलंच जाणतोस. तू स्वत: तर त्याहून पलीकडेच आहेस. मी सांगतो, तू इथं नेमकं का आलास ते!!"

शिष्यगणांसह आम्ही स्तब्ध व थक्क होऊन कान टवकारले.

"तू इथं आला आहेस, ते भोवतीच्या सर्वांना व युगानुयुगांच्या पिढ्यांना मनाचा विषाद म्हणजे काय असतो, ते स्वत:च्या उदाहरणावरून पटवून देण्यासाठी. रात्रीचा अनुभव घेतला, तरच दिवसाचं मोल ध्यानी येतं. अंधाराचा अनुभव घेतला, तरच प्रकाशाचं मूल्य कळतं. विषाद म्हणजे काय, विक्रम म्हणजे काय, अंधकार म्हणजे काय,

प्रकाश म्हणजे काय हे सर्व–सर्व तू चांगलंच जाणतोस मधुसूदना! तुला प्रत्यक्ष पितामह भीष्मांनी ‘वासुदेव’ म्हटलं आहे. मी सांगतो, जीव ज्याच्या शोधात असतो, तो प्रकाश म्हणजे प्रत्यक्ष तूच – भगवान वासुदेवा!” स्वत: आचार्यच – ‘अर्पणमस्तु –’ असं अस्पष्ट पुटपुटत ध्यानरत झाले. आमचा आंगिरस आश्रमातील पहिला दिवस संपला होता. या पहिल्याच दिवशी माझ्या स्वामींनी प्रयागक्षेत्रीचा घोर आंगिरस आश्रम आपलासा करून टाकला.

प्रयाग आश्रमातले आमचे दिवस एकाहून एक संस्मरणीय होत चालले. आम्हा तिघांनाही हस्तिनापूरची, इंद्रप्रस्थाची आणि विशेषत: द्वारकेची रोज आठवण येई. पण कटाक्षानं आम्हापैकी कोणीही चर्चेत तसा निर्देश करीत नसे. आश्रम संगमापासून थोड्या अंतरावर; पण गंगाकिनारी होता. यमुना दुसऱ्या बाजूनं येऊन संगमात गंगेला मिळाली होती. तशी ही थोडीफार दूरच होती. तरीही स्नानासाठी दोघा बंधूंची पावलं आपोआपच वळत ती यमुनेकडे. मीही त्यांच्यामागून यमुनेकडे जाई. एकदा मात्र धैर्य करून मी म्हणालो, “स्वामी, कधी–कधी गंगेलाही आपल्या दर्शनाची संधी दिली तर?” तसं माझ्याकडे हसून बघत द्वारकाधीश म्हणाले, “दारुका, तुझ्या तोंडूनच ही इच्छा व्यक्त व्हावी म्हणून मी उद्धवाला स्नानासाठी यमुनेवर नेत होतो. तुझे पूर्वज गंगेकाठचे. तुला कधीतरी स्नानासाठी गंगेकडे जावंसं वाटणार, हे माहीत होतं. आता मात्र उद्यापासून आपण न चुकता स्नानासाठी त्रिवेणी संगमावरच जायचं! तिथं गंगायमुना प्रश्नच येणार नाही. यत्न केलास, तर तुला तिथली अदृश्य सरस्वतीही दिसेल!”

आता आमच्या मस्तकीच्या पाचही शिखा चांगल्याच वाढल्या होत्या. प्रत्येक शिखेच्या अग्राला घट्ट गाठ दिलेली असे. डुईच्या इतर केशभाराचा श्मश्रू केलेला. पाठीमागच्या पळसपानाएवढ्या गोलाकारात चार दिशांना राखलेल्या चार – त्या सर्वांच्या मध्ये इतरांहून थोडीशी लांब अशी ब्रह्मरंध्राच्या ठायीची एक – पाचही शिखांच्या अग्रांना दिलेल्या गाठी – असं आमचं मजेदार मस्तकसौंदर्य होतं. पहिल्या दिवशी तर आम्ही एकमेकांकडे असं बघताना मनमुराद हसलो होतो. आश्रमप्रमुख आमचा कल्लोळ ऐकून कुटीत येताच चिडिचूप झालो होतो. कितीही केलं, तरी आम्ही घोर आंगिरसांचे घोर परीक्षेला दीक्षेनं बांधलेले शिष्य होतो. पुढे पुढे तर या पंचशिखांचा आम्हाला चांगलाच सराव झाला.

आमचा आश्रमातील सगळ्या शिष्यगणांशी परिचय झाला. इथल्या आमच्या वास्तव्याला नानारंगी आणि डोळेदार मोरपंख फुटले. मी तर आयुष्यात कधीच नव्हे अशी शब्दचर्चा ऐकून धन्य झालो.

प्रमुख आचार्यकुटीचा प्रवचनकक्ष नाना देशींहून आलेल्या शिष्यगणांनी तुडुंब भरून जाई. मग आतल्या कक्षातून दुहाती दोन आश्रमप्रमुख असलेले आचार्य प्रवेशत. तसे सगळे कुजबुजत गप्पा मारणारे आश्रमशिष्य एकदम शांत होत. पटकन उठून त्यांना आदराचं अभिवादन देत. जिथून सर्व प्रवचनकक्ष दिसू शकेल अशा ठिकाणच्या उंच दर्भासनावर आचार्य उभे राहत. आश्रमप्रमुख पटकन त्यांच्या दोन्ही बाजूला उभे राहत. शंखप्रमुख प्रार्थनासंकेताचा दीर्घ शंखनाद उठवीत. तसे सर्व शिष्य हात जोडून डोळे मिटत. शंखप्रमुखही हात जोडीत. आचार्य व आश्रमप्रमुखांनीही हात जोडून डोळे मिटलेले असत. सर्वांचीच सामूहिक इशस्तवना सुरू होई –

"ॐ ईशावास्यमिदं सर्वम्
यत्किंच जगत्यां जगत्
तेन त्यक्तेन भुञ्जीथा:
मा गृध: कस्वस्विद्धनम्।।"

या लयीत थोडा अवसर सर्वांकडून अचूक सोडला जाई. मग एका सुरातच गुरुवंदना सुरू होई –

"ॐ गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु
गुरुर्देवो महेश्वर:
गुरु:साक्षात् परब्रह्म
तस्मै श्री गुरवे नम:।।"

आचार्य आसनस्थ झाले की, मग सर्व शिष्य आपापल्या दर्भाच्या बैठकीवर बसत. इथंही सर्वांच्या अग्रभागी आचार्यांनी आम्हाला बसायला सांगितलं होतं, सर्व शिष्यगणांवर कृपाशीर्वादाचा एक प्रेमळ कटाक्ष आचार्य फिरवीत. पुन्हा काही क्षण डोळे मिटत. प्रवचनाचा विषय मनाशी पक्का करूनच डोळे उघडत. विषयाचं नाव ऐकायलाही सर्वच शिष्य आतुरलेले असत. आचार्य चौफेर पुन्हा दृष्टी फिरवून हसत प्रवचनाचा विषय प्रकट करीत – 'सांख्ययोग!'

ऋषिवाणी, 'सहृद शिष्यांनो' म्हणत गंगौघासारखी स्त्रवू लागे. मग आमची श्रवणसमाधीच लागे. "जीवनातील सुखदु:खं ही देहाची व मनाची कारक आहेत. आत्मा त्यापलीकडे आहे. ज्याला त्याच्या अस्तित्वाचं भान आलं, तो कधीच कुठल्याही गोष्टीचं दु:ख करीत नाही – विषाद मानत नाही. तसाच देहामनाचा आनंदही मानत नाही. तो केवळ आत्मानंदात व्यस्त असतो. डुंबत असतो."

आता सर्व शिष्य सावधचित्त होऊन ऐकू लागले. एखाद्या तलम वस्त्राचं ठाण अलगद उलगडत जावं, तशी गुरुवाणी एक–एक जीवनसत्य उलगडत चालली. अस्थिर बुद्धीचं वर्णन करून आचार्यांनी सुस्थिर बुद्धीची आवश्यकता व महत्त्व सांगितलं, "आत्मानुभूती घ्यायला तर कठीणच. त्याहून ती आल्यानंतर नीट जाणून घ्यायला तेवढीच कठीण. त्यासाठी सुखदु:खं समान मानणाऱ्या स्थितप्रज्ञाची आवश्यकता असते." आचार्य 'स्थितप्रज्ञ' शब्द नुसता उच्चारून थांबले नाहीत. त्याची एकएक लक्षणं रोजच्या व्यवहारातील उदाहरणं देऊन स्पष्ट करू लागले.

हा 'सांख्ययोग' महत्त्वाचा होता. नंतर कितीतरी दिवस आचार्य या एकाच विषयावर बोलले. शिष्यांनी अधूनमधून आपल्या शंकाही विचारल्या. आचार्यांची गुरुवाणी खरी रंगली ती कर्मयोगाचं निरूपण करताना – कर्म म्हणजे काय? त्याचं स्वरूप काय? हे त्यांनी सुंदररीत्या विशद केलं. कर्म जिवाला कधीच सुटलेलं नाही – अगदी निद्रेतही – हे त्यांनी छान स्पष्ट केलं.

मला प्रकर्षानं जाणवलं की, या कर्मयोगावर बोलताना स्वामींनी आचार्यांना कितीतरी उलटसुलट प्रश्न विचारले. उद्धवमहाराजांनीही वेळोवेळी या चर्चेत भाग घेतला. कर्म, अकर्म, विकर्म या सर्व शब्दांचा, त्यांच्या व्याख्यांचा तिघांच्याही चर्चेत शब्दश: कीस पडला. प्रबळ प्रकृती माणसाकडून विविध कर्मं करवून घेते. त्या प्रकृतीला इंद्रियनिग्रह करून अधीन ठेवावं लागतं. मनुष्याला त्याच्या इच्छेविरुद्ध

पाप करायला लावतो, तो काम. संयमानं त्याला अधीन ठेवलं, तर त्याचाच 'कामदेव' होतो. कर्मयोगाच्या या सर्वांत रंगलेल्या चर्चेचं सार निघालं ते 'निष्काम कर्म हे सर्वश्रेष्ठ आहे' असं. त्यातही असं निष्काम कर्म स्वधर्मासाठी करत असताना मरण आलं तरी सोन्याला सुगंध येतो, असं.

असं स्वधर्मासाठी निष्काम कर्म करणाऱ्याचा लोकसंग्रह आपोआपच वाढतो. तो त्याच्या आयुष्यात विभूती बनतो. पिढ्यान्‌पिढ्यांसाठी भविष्यातही युगंधरी दीपस्तंभ ठरतो! या कर्मयोगाची ज्या दिवशी समाप्ती झाली, तेव्हा शेवटच्या या दीपस्तंभाच्या निर्देशाला धरून आचार्यांनी माझ्या स्वामींना प्रश्न केला, "काय श्रीकृष्णा, तुझं काय मत आहे याविषयी?"

"शक्य आहे!" एवढंच उत्तर स्वामींनी त्यांच्या प्रश्नाला दिलं.

आता आचार्यांचा बोध अधिक सखोल होत चालला. आम्हाला नेहमी होई तशी हस्तिनापूर, इंद्रप्रस्थ, द्वारकेची आठवण आता होईनाशी झाली. त्याला कारणही आचार्यांचा उपदेश हेच होतं. आमचं हस्तिनापूर, इंद्रप्रस्थ आणि द्वारका या आश्रमातच सामावलं होतं. आश्रमाला मधूनच एखादा तीर्थक्षेत्र प्रयागाला आलेला हिमालयातील ज्ञानवंत ऋषी भेट देई. आचार्य त्याचा अधिकार, ज्ञानसाधना, गुरुकुल यांचा सविस्तर परिचय करून देत. आलेल्या अतिथी ऋषीला सन्मान देण्यासाठी ज्ञान–विज्ञानयोग, संन्यासयोग, ध्यानयोग अशा विविध आणि महत्त्वाच्या विषयांवर निरूपण करायला सांगत. त्यांच्यासमोर स्वत:ला लहानपण घेत त्यांना अनेक बारीकसारीक प्रश्न विचारत. ते प्रश्न करीत – 'संन्यास श्रेष्ठ का कर्मयोग श्रेष्ठ?' त्यांच्या चर्चेत उद्धवमहाराजही उत्साहानं भाग घेत. त्यांचं अटीतटीनं प्रतिपादन असे की, संन्यासयोगच श्रेष्ठ. आलेला अतिथी त्याच मताचा पाठपुरावा करी. तसं आचार्य आंगिरस हेतुत: कर्मयोगाची श्रेष्ठता मांडून चर्चा रंगवीत. शिष्यगण मात्र संभ्रमित होई. त्याला 'संन्यासयोग श्रेष्ठ की कर्मयोग' याचा निर्णय करता येत नसे. माझे स्वामी ही चर्चा मध्येच खट्याळ हसत नुसतेच ऐकत राहत. शेवटी आचार्य घोर त्यांनाच विचारत, "श्रीकृष्णा, तू काहीच बोलत नाहीस कसा? तुझ्या मते काय श्रेष्ठ?" तेव्हा हसतच स्वामी उत्तर देत, "नुसता संन्यासाचा संकल्प सोडला, तरी कर्मयोगी नित्यसंन्यासीच होतो. आणि कर्माशिवाय संन्यासही सिद्ध होत नाही. म्हणून तत्त्वत: दोन्हीही एकच आहेत!"

ते उत्तर ऐकून घटकाभर चाललेली चर्चा योग्य विचारावर समाप्त झाली, असे समाधान शिष्यगणांना मिळे, त्यात आचार्य घोरही सहभागी झालेले असत.

नित्यकर्म म्हणून आम्ही सरपण, समिधा व रानफळं आणण्यासाठी तिघंही मिळूनच अरण्यात जात असे. द्वारकेच्या सुधर्मा राजसभेत सुवर्णी आसनावर बसणारे माझे स्वामी खांद्यावरची सरपणाची मोळी भुईवर उतरवून घामेजल्या कपाळानं पाषाणखंडावर बसत. पीतांबराऐवजी त्यांच्या अंगावर भगवी कौपिन असे. मला कधी–कधी माझ्या प्रिय पत्नी हयमतीची व तरुण दारुकी आणि त्याचे बंधू यांची द्वारकेच्या निवासासह तीव्र आठवण होई. मात्र मी गप्पच बसे. कारण स्वामी आपल्या आठपैकी एकाही पत्नीची, ऐंशींपैकी एकाही पुत्राची आणि चारूचीसुद्धा आठवण कधी काढत नसत. उद्धवमहाराज तर अविवाहितच होते. पण आपल्या दादांनी काढली नाही, म्हणून ते कधीही आपल्या

माता–पित्यांची व बंधूंची आठवण काढत नसत. त्या दोघांनीही न उच्यारलेला विषय मी कसा काढावा, या विचारानं मी स्तब्धच राही. विशेषत: अश्वांच्या खराऱ्यासाठी लागणाऱ्या रानवेळी व रथचक्रासाठी लागणारी किकर वृक्षाची टणक लाकडे आणण्यासाठी द्वारकेत असताना मी खाडी उतरून अनार्ताच्या अरण्यात जाई. त्यामुळे इथं अरण्यात आलो की, मला रथाची व घोड्यांची आठवण होई. आमचा गरुडध्वज व मेघपुष्प, बलाहक, शैब्य व सुग्रीव हे चारही पांढरेशुभ्र अश्व आम्ही आश्रमदीक्षा घेताच आश्रमाच्या भांडारात भरणा झाले होते.

आम्हाला हितोपदेश देताना आता आचार्यच रंगत चालले. 'ध्यानयोग' या महत्त्वाच्या विषयावर बोलताना त्यांनी एक सुंदरच विचार व्यक्त केला. ते म्हणाले, "मनुष्यानं आपला उद्धार आपणच केला पाहिजे. माणसानं स्वत:ला कधीही खचू देऊ नये. कारण खऱ्या अर्थानं आपणच आपले बंधू असतो किंवा शत्रू असतो." तसंच विभूतीयोग हा महत्त्वाचा विषय उकलून दाखवतानाही ते रंगले. अगदी सोप्यात सोप्या शब्दांत म्हणाले, "माणसाला भोवतीचं जग कळणं जेवढं महत्त्वाचं आहे, तेवढंच त्याला 'मी कोण आहे', हे कळणं महत्त्वाचं आहे. एकदा 'मी कोण आहे' हे नीट कळलं की, जीवन सुलभ झालं." मध्येच त्यांनी माझ्या स्वामींना प्रश्न केला, "सांग श्रीकृष्णा, तुला कळलंय काय तू कोण आहेस ते?"

क्षणाचाही विलंब न लावता स्वामी हसत उत्तरले, "वाऽसुऽदेऽव! सर्व जण तसं म्हणतात व मानतात म्हणून!" माझे चपळ स्वामी आचार्यांच्याही चिमटीत न सापडता नामानिराळे झाले.

आश्रमातील दिवस रंगत चालले. आम्हा सर्वच शिष्यांना गुरुबोधाच्या संकेताचा शंखध्वनी केव्हा होतोय, आपण त्यांचे अमृतबोल ऐकायला गुरुकुटीकडे केव्हा जातोय, असं होऊन जाई. आम्हाला इथं येऊन एक मास लोटला होता. ब्रह्मविद्येचा आचार्यबोध दिवसेंदिवस विस्तृत व अधिकाधिक सखोल होत चालला होता. भक्तियोग या महत्त्वाच्या विषयावर बोलताना तर आचार्य देहभान हरपून गेले. म्हणाले, "परमेश्वराच्या निस्सीम भक्ताला प्रश्न पडतो की, सगुण उपासना श्रेष्ठ की निर्गुण? त्याचं उत्तर एकच – दोन्हीही श्रेष्ठ. निर्गुण उपासना सुलभपणे परमेश्वराजवळ नेते. निष्काम बुद्धीनं केलेली सगुणाची उपासनाही निर्गुण उपासनेच्या उंचीला पोहोचते. तीही परमेश्वराजवळच नेते." असे विचार मांडताना आचार्य दुपारच्या भोजनाचा समयही विसरून गेलेले असत. शिष्यगणांचं पोट तर ऐकलेल्या अजोड विचारांनीच भरून गेलेलं असे.

आम्हाला आंगिरस आश्रमात येऊन दीड मास लोटला. आमच्या मस्तकीच्या पंचशिखा आता कितीतरी वाढल्या होत्या. त्या शीखांच्या मुळाशी असलेल्या आमच्या बुद्धीतही अपार वाढ झाली होती. आश्रमाशी आम्ही आता पूर्णत: एकरूप झालो होतो. सर्व शिष्यगण, ब्रह्मविद्येत आम्हाला न्हाऊन काढणारे वंदनीय आचार्य, त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विषयांचं चौफेर ज्ञान आम्हाला देणारे उपआचार्य, आश्रमाचे विविध भांडारांचे प्रमुख, गाई, कुत्री, अश्व अशी जनावरं या सर्वांचंच जसं काही एक कुटुंबच झालं होतं.

'पुरुषोत्तमयोगा' वर भाष्य करताना आचार्य म्हणाले, "आपल्या पत्नीपुत्रांत राहून

रोजचे व्यवहार करणं, म्हणजेच संसार करणं नव्हे. संसार शब्दाचा अर्थ आहे, डोळ्यांसमोर दिसणारं सर्व जग किंवा दृश्य सृष्टी. जसा संसारवृक्ष असतो, तसाच ब्रह्मवृक्षही असतो. मात्र त्याच्या फांद्या खाली व मुळे वर दिसतात म्हणून तो ध्यानी येत नाही! त्यासाठी लागते आंतरदृष्टी! ज्याच्या ध्यानी तो आला, त्याला 'पुरुषोत्तम' म्हणतात. ज्यानं पत्नीपुत्रांच्या पलीकडे जाऊन जीवितकार्य केलं, त्याचा योगयोगेश्वर पुरुषोत्तम होतो!" या वेळी आचार्यांनी हसतच उद्धवमहाराजांना प्रश्न केला, "सांग उद्धवा! असा पुरुषोत्तम तू पाहिला आहेस काय?" त्यांनीही पटकन उत्तर दिलं, "होय! पण त्याचं नाव मला नाही सांगता येणार. आपणच सांगितल्याप्रमाणं सत्य केवळ जाणायचं असतं, अनुभवायचं असतं. त्याच्यावर भाष्य किंवा चर्चा नाही करता येत" .त्यांनीही चपखल उत्तर दिलं. तेही आचार्यांच्या प्रश्नचिमटीत काही सापडले नाहीत.

ज्ञान व विज्ञानयोगावर बोलताना तर आचार्य घोर आंगिरसांची दाढीधारी, मुखावर वस्त्रपट्टी घेतलेली मुद्रा कितीतरी तळपून उठली होती. डोळ्यांतूनच तिचं तेज व्यक्त होत होतं. ते सहज म्हणाले, "ज्ञान म्हणजे एखाद्या विषयाची माहिती. अज्ञान म्हणजे एखाद्या विषयातील अजाणपणा. विज्ञान म्हणजे एखाद्या विषयातील विशेष ज्ञान. तुम्ही सर्व या आश्रमात घेत आहात, ते ब्रह्मविद्येचं कसलं ज्ञान आहे?" आचार्यांनी शिष्यांना प्रश्न घातला. एक–एक करत जवळ–जवळ सर्व शिष्यांनी त्या प्रश्नाचं उत्तर दिलं 'ते विज्ञान आहे गुरुदेव' असं. मीही तेच उत्तर दिलं.

सर्वांत शेवटी आचार्यांनी माझ्या स्वामीकंडे बघून विचारलं, "श्रीकृष्णा, या आश्रमात तू घेतलेलं ज्ञान हे नुसतं ज्ञान आहे की विज्ञान आहे? तुझं काय मत?" एव्हाना सर्वांनाच आपल्या नावाप्रमाणे आकर्षून प्रिय झालेले माझे स्वामी हसतच उत्तरले, "याचं अचूक उत्तर माझा प्रिय सखा – बंधू उद्धवच आपणाला देईल गुरुदेव. तो देईल तेच माझंही उत्तर मानावं आचार्यांनी."

आपल्या प्रिय दादांची इच्छा शिरसावंद्य मानून उद्धवमहाराजांनी आचार्यांना नम्रपणे त्यांच्या प्रश्नाचं उत्तर दिलं, "आपण गेल्या दोन मासांहून अधिक आम्हा सर्व शिष्यांना दिलेलं ज्ञान, हे नुसतं ज्ञान नाही. ते विशेष म्हणजे नुसतं विज्ञानही नाही. ते आहे प्रज्ञान!! आहार, निद्रा, भय, मैथुन या चार प्रमुख सहजप्रवृत्तींचं मूळ कारण जाणणारं ज्ञान. त्यापलीकडे सर्व ब्रह्मांड व्यापून राहिलेल्या भाररहित उर्जेचं ज्ञान! तिच्या अविरत तरंगवादाचं ज्ञान! हेच प्रज्ञान गुरुदेव!"

त्यांचा उत्तराची फोड करीत आता मात्र स्वामीच बोलले, "प्रज्ञान म्हणजे विशेषाहून विशेष ज्ञान. सखोलाहून सखोल शान. ज्याची तुलना कशाशीही होऊ शकत नाही, ते अतुलनीय निखळ ज्ञान! ते ज्या–त्या जिवानं प्रत्यक्ष अनुभवायचं असतं."

"आम्हाला ब्रह्मविद्येचं हे प्रज्ञान ओंजळी भरभरून आपण दिल्यामुळे आम्ही भरून पावलो आहोत. एकदा मी आपणाला गुरुदीक्षा देण्याची विनंती केली होती. ती आपण दिलीत. अमोल ब्रह्मविद्येची दीक्षाही दिलीत. आता एकच इच्छा आहे. आपल्या चरणांशीच माझे प्रिय सखे उद्धव व दारुकासह ठाव द्यावा. आता कुठंही जाण्याची कसलीही इच्छा नाही!"

त्या दिवशी सर्व आश्रम कसा हेलावून गेला. आचार्य घोर आंगिरसही हेलावले. 'बघू काय करायचं ते' एवढंच म्हणून आपल्या प्रिय शिष्याकडे बघत राहिले. त्या दिवशी आम्ही सर्वच एका वेगळ्याच वातावरणात गुरुकुटीबाहेर पडलो. स्वामींनी निर्धारानं

आश्रमातच कायम वास्तव्य करण्याचं स्पष्ट बोलून दाखविल्यामुळे, त्याच विचारात गढलो. आता पुढं–मागं कधीतरी आचार्य घोर अंगिरस या आश्रमाची सूत्रं माझ्या स्वामींच्या हाती सोपवून हिमालयाकडे जाणार, हे नक्की. आचार्यांच्या रूपानं एक यादव ब्रह्मविद्येचा थोर अधिकारी झालाच होता. तो विवाहवेदीवर चढण्यापूर्वीच संन्यासमार्गी झाला होता. दुसरा यादव – माझे स्वामी – आठ राण्या, पुत्र–पुत्री व लाखो सैनिक, सेवक यांच्या गुंतवळ्यातून कायमचे संन्यासमार्गी होणार होते. पूर्वीचे त्यांचे एक आप्त, आचार्य घोर आंगिरसपदाला पोहोचले होते. माझे स्वामी त्यांच्या बुद्धीच्या बळावरच सहज 'अतिघोर आंगिरसपदा' ला नक्कीच पोहोचणार होते. आम्ही दोघेही सावलीसारखे त्यांचे पायठसे वेचत, ते जातील तिकडे जाणार होतो.

आम्हाला या आश्रमात येऊन त्रेसष्ट दिवस पूर्ण झाले होते. हा चौसष्टावा दिवस होता. स्वामी व उद्धवमहाराज यांच्या चर्चेत मी अनेकदा ऐकलं होतं की, एवढेच म्हणजे चौसष्टच दिवस हे दोघे बंधू अवंतीच्या अरण्यातील आचार्य सांदीपनींच्या 'अंकपाद' आश्रमात राहिले होते. माझ्या स्वामींना अनेक जण 'चक्रवर्ती' म्हणत आले होते. सर्वार्थानं ते तसे चक्रवर्ती होतेही. एकाजागी जखडून पडणं, हा त्यांचा जीवनधर्म नव्हताच. खरोखरच ते जलपुरुष होते. नित्यप्रवाही.

मी स्वामींचं यापुढचं आश्रमातील जीवन कसं असेल, याच विचारांत गढून गेलो. आमच्या प्रयागक्षेत्रीच्या गंगेकाठच्या आश्रमावर शांत–शांत सांज उतरली. पश्चिमेकडे असलेल्या मैनाक पर्वताच्या रोखानं परतणारे धिप्पाड गरुडपक्षी चीत्कारत जाताना दिसले. मी नुकताच स्वामींसह गंगेतून मावळतीच्या सूर्याला सांजअर्घ्य देऊन आमच्या कुटीत परतलो होतो. तिघेही आपापल्या बैठका अंथरून सांजवंदना करायच्या तयारीत होतो. इतक्यात आश्रमाच्या पश्चिम द्वारावर कसलीतरी गडबड माजलेली ऐकू आली. अस्पष्ट बोल कानांवर येत होते – 'काय – श्रीकृष्णदेवांचे बंधू? गदावीर बलरामदादा? प्रत्यक्ष संकर्षण बलराम? द्वारकेचे अमात्य?' ते ऐकताच मात्र मी बैठकीवरून ताडकन उठलोच. धावतच आश्रमाच्या पश्चिम द्वाराकडे चाललो. इथल्या लाकडी महाद्वारात उभं होतं, साक्षात बंधुप्रेम! रथातून उतरलेले धिप्पाड बलरामदादा अमात्य विपृथूंसह आश्रमाच्या पश्चिम महाद्वारात उभे होते. त्यांच्या खांद्यावरची विशाल गदा मावळतीच्या सूर्यकिरणांत तळपत होती. मला बघतच ते केवढ्यातरी मोठ्यानं ओरडले, "दारुका, पाताळात लपला असतात तरी शोधून काढलं असतं तुम्हाला – या द्वारकेच्या युवराजानं, कुठं आहे तो धाकटा?" मान मागे टाकत ते गदागदा हसले. त्यांच्या खांद्यावरची गदा वरखाली हिंदकळली. आपल्या दोन्ही बंधूंचा शोध शेवटी लागला, याचा अपार आनंद काही ते रोखू शकले नाहीत. त्यांचं दर्शन नेहमीच उत्साहवर्धक वाटत आलं होतं. आज तर मला ते विशेषच वाटलं. पुढे जाऊन मी त्यांची चरणधूली घेतली. आपल्या प्रिय बंधूला बघण्यासाठी उतावीळ झालेले गदावीर बलराम, मलाच बंधू मानून प्रथम कडकडून भेटले. म्हणाले, "चल घेऊन मला त्या धाकट्याकडे. त्याला द्वारकेकडे घेऊन जायलाच आलो आहे मी इथं. चला अमात्य."

मी दादा, अमात्यांसह आमच्या पर्णकुटीत आलो. कुटीत स्वामी आणि त्यांचे बंधू होते. प्रवासानं शिणलेल्या दादा, अमात्यांसमोर मी सकाळी अरण्यभर फिरून आणलेली फळं ठेवली. त्यांचा स्वाद घेऊन तरतरीत झालेले बलरामदादा स्वामींना म्हणाले, "तुला द्वारकेत परत घेऊन जायला आलोय मी. असा कसा काय पारखा झालास आम्हाला तू या

उद्धवासह धाकट्या? तिनं बिचारीनं– रुक्मिणीनं केवढा आकांत मांडलाय तुझ्यामागं! बाबा आणि दोन्ही माता यांनी तर तुझ्या नावाचा घोषच चालवलाय रात्रंदिवस. मुकाट माझ्याबरोबर चल आता या उद्धवासह." आस्तरणावर बसल्या–बसल्याच दादांनी आपल्या अचानक येण्याचं प्रयोजनही स्पष्ट केलं. हात जोडून शेजारीच उभे राहिलेले अमात्यही कळवळून म्हणाले, "आता सर्वांचा याहून अधिक अंत पाहू नये स्वामी. उद्धवदेवांसह द्वारकेकडे चलावं."

द्वारकेचे बलवीर युवराज आणि अमात्य डोळ्यांत प्राण एकवटून स्वामींकडे बघू लागले. ते मात्र अपार शांतच होते. बांधीव निर्धारानं म्हणाले, "दादा, हे आता शक्य नाही. मी इथं विचारपूर्वक आलो आहे. आता इथंच राहीन. येत असतील, तर या उद्धव–दारुकांना घेऊन जा परत."

काही कुचंबलेले क्षण तसेच निघून गेले. पटकन उद्धवमहाराज म्हणाले, "बलीदादा जिथं माझा दादा असेल तिथंच मी. या दारुकाला घेऊन जा तू. अवंतीला आचार्य सांदीपनींच्या अंकपाद आश्रमात आपण तिघेही एकत्रच राहिलो. मी तुलाच म्हटलं असतं, तूही इथंच थांब म्हणून; पण अभिषिक्त युवराज म्हणून द्वारकेचं दायित्व आहे तुझ्यावर."

दोघेही बंधू बलरामदादांच्या प्रचंड गदाप्रहारासमोर एकट्या मला बळी देऊ बघत होते! मी कसं काय ते ऐकून घेणार होतो! मीही पटकन म्हणालो, "माझ्या स्वामींची सावलीच मानतो मी स्वत:ला युवराज. त्यांच्याशिवाय मी कधीही आणि कुठंच गेलो नाही. जाणारही नाही!"

एरवी बुद्धीची कसरत आणि राजकारण हा काही बलरामदादांचा प्रांत नव्हता. तरीही ते विचारमग्न झाले. क्षणातच काहीएक निर्णय घेऊन म्हणाले, "आपण असं करू या, आचार्य घोर आंगिरसांचंच मत विचारू याविषयी. तुला मान्य आहे धाकट्या?" दादांनी खुंटा हलवून बळकट केला.

"अवश्य. त्यांचं मत कसलं विचारतोस? ते आम्हाला माहीतच आहे. केवळ आम्हीच त्यांच्या प्रेमात पडलो नाही, तर तेही आमच्यात गुंतलेत. मला विश्वास आहे, ते काय म्हणतील याचा. आम्ही त्यांचे शिष्य आहोत. त्यांची आज्ञा शिरसावंद्य राहील."

भोजन व थोडा विश्राम होताच, युवराज आम्हा तिघांनाही घेऊन अमात्यांसह गुरुकुटीकडे चालले. कुटीसमोरील अहोरात्र धगधगत्या यज्ञकुंडात समिधा वाहत आचार्य बसले होते. तिथंच आम्ही गेलो. सर्वांनी त्यांना आदरानं वंदन केलं. त्यांनी प्रथम युवराजांकडे वसुदेवबाबा आणि दोन्ही माता, आचार्य सांदीपनी व गुरुपत्नी व गुरुपुत्र यांच्या क्षेमकुशलाची विचारणा केली. मग प्रेमानं बलरामदादांना विचारलं, "अचानक येणं केलंत युवराज? दोन्ही बंधूंचा वियोग असह्य झाला की काय?" गुरुदेव हसले.

"आपण सर्वज्ञ आहात. येण्याचा मनोभाव शब्दांतच कशाला सांगू?" बलरामदादांचं आजचं रूप ते आल्यापासूनच मला वेगळंच जाणवलं होतं. आपल्या प्रिय बंधूंना घेऊन जाण्याच्या पक्क्या निर्धारानंच ते आले होते. त्यांनी अमात्यांकडे नुसतं बघितलं.

"द्वारकाधीशांशिवाय द्वारका म्हणजे सूर्याशिवाय आभाळ आहे, गुरुदेव. युवराज आल्यापासून कळवळून आग्रह करताहेत त्यांना द्वारकेला परत चलण्याचा. पण त्यांनी 'नाही' म्हणत इथंच राहण्याचा पक्का निर्णय घोषित केला आहे. आणि त्यांचा निर्णय

म्हणजे पाषाणखंडावरची रेघ, हे आपण जाणताच." अमात्य व्यथित होऊन म्हणाले.

"ते खरंही आहे यादवांचे अमात्य. निर्धार म्हणजे माझा प्रिय शिष्य श्रीकृष्ण. तो नसता, तर भरली द्वारका सोडून तो माझ्या आश्रमात आलाच नसता. त्याच्या इच्छेपुढे कुणाचंच काही चालत नाही!" गुरुदेवांनी शिष्याची भलावण केली.

काही क्षण पुन्हा कुचंबले. आम्ही सर्व जण एकटचा युवराजांकडे ते काय करणार आता म्हणून बघतच राहिलो.

युवराज बलरामदादांनी या क्षणी आपलं जे दर्शन घडविलं, ते पुढे जीवनभर आम्ही कधीच विसरू शकलो नाही.

आपल्या मस्तकीचा सोनेरी राजमुकुट स्वहस्तेच उतरवून त्यांनी गुरुचरणांजवळ चक्क भुईवर ठेवला! आचार्यांसमोर कमरेत वाकून दोन्ही हात जोडून ते म्हणाले, "गुरुदेव, दोन्हीही धाकटचा बंधूंवर वडीलधारी दृष्टी ठेवणं, हे माझं जन्मजात कर्तव्य आहे. हे दोघे द्वारकेत यायला तयार नसतील, तर मलाही आश्रमवस्त्रं देऊन दीक्षित करून आपला शिष्य म्हणून स्वीकारावं. या अमात्यांच्या हस्ते यादवांच्या युवराजपदाचा अभिषेकानं माझ्या मस्तकी चढलेला हा मुकुट, द्वारकेला परत पाठवावा. मला विश्वास आहे, द्वारकेचे महाराज वसुदेवबाबा व दोन्ही राजमाता – देवकी व रोहिणी आपला निर्णय आनंदानं स्वीकारतील."

आचार्य घोर आंगिरसांच्या हातून कुलप्रतीक असलेल्या यज्ञकुंडात नुसत्या एकामागून एक चढत्या मात्रेनं विविध समिधा पडू लागल्या. त्यांच्या अंतरंगाचं यज्ञकुंड कसलातरी निर्णय घेताना धगधगून आलं. यज्ञाग्नी सरसरून भडकला. पुन्हा काही क्षण निःशब्द कूचंबले. मग अतिप्राचीन काळी वेद निर्माण करणाऱ्या प्रज्ञावंत ऋषींनी उत्स्फूर्तपणे एक–एक वेदऋचा म्हटली असेल, तसे ते एक–एक शब्द म्हणाले –" युवराज बलभद्राऽऽ, शिष्य म्हणून तुझा स्वीकार मी करू शकत नाहीऽ! तू एका गणराज्याचा, ऋषिमुनींनी अभिषेक केलेला अभिषिक्त युवराज आहेस. तूच तुझ्या बंधूंसाठी इथं राहण्याचा निर्णय घेतलास, तर दोनच गोष्टी अटळपणे घडतील."

"कुठल्या गुरुदेव?" हात जोडून नम्रपणे बलरामदादांनी विचारलं. पराकोटीच्या उत्सुकतेनं सर्वच आचार्यांकडे बघू लागले.

वाढत्या मात्रांच्या समिधा वाहत आचार्य उत्तरले, "तुम्हा सर्व बंधूंचा ठावठिकाणा कळल्यावर द्वारकेचे वृद्ध महाराज वसुदेवच दोन्ही राजमातांसह इथं येतील! एक नवं गणराज्य नरेशहीन होईल. याला कारण घडल्यामुळे, मलाच हा आश्रम सोडावा लागेल. हा नवा आश्रमही आचार्यहीन होईल. प्राप्त स्थितीत एकच निर्णय घेणं मला भाग आहे – श्रीकृष्णाला उद्धव, दारुकासह द्वारकेला परत जाण्याची आज्ञा करणं हा! ज्या ब्रह्मविद्येसाठी तो इथं आला आहे, त्याचं माप त्याच्या पदरी घालण्याचं जन्मदत्त कर्तव्य मी पूर्ण केलं आहे. मी दिलेल्या आत्मविद्येला पुढील जीवनात जीवनविद्या करणं, हे त्याचं कर्तव्य आहे. मला विश्वास आहे, त्याला याची पूर्ण जाण आहे व त्याची तेवढी क्षमताही आहे. आंगिरसांच्या वज्रकुलाचं प्रतीक असलेल्या यज्ञकुंडातील अग्नीला साक्षी ठेवून मी आज्ञा करतो की, द्वारकाधीश श्रीकृष्णानं आपला बंधू उद्धव व सखा दारुक यांसह आता द्वारकेला परत जावं! शिष्य हो, शिवास्ते सन्तु पन्थाना:!!"

'आज्ञा' हा शब्द कानी पडताच आम्ही तिघंही झटक्यात कमरेत वाकलो. हात जोडून नम्रपणे आचार्यांना वंदन करताना एकाच वेळी म्हणालो, "जशी इच्छा गुरुदेवांची!"

ते ऐकून परमसंतुष्ट झालेल्या आचार्यांनी द्वारकेच्या युवराजांचा मुकुट हाती घेतला. ते उठले. बलभद्रदादांजवळ जात त्यांनी तो युवराजांच्या मस्तकी पुन्हा चढविला. त्यांनाही ते आशीर्वादपर म्हणाले, "शुभं भवतु!"

आचार्य घोर आंगिरसांचे कृपाशीर्वाद घेऊन शेवटी आम्ही मस्तकीच्या पंचशिखा उतरविल्या. सर्व गुरुबंधूंचा निरोप घेऊन आम्ही प्रयागआश्रम सोडला. आश्रमवस्त्रं पुन्हा भांडारात भरणा केली. दादांनी आणलेली वस्त्रं व अलंकार पुन्हा अंगी धारण केले. कसं कुणास ठाऊक; पण द्वारकेच्या अलंकार भांडारातील स्वामींचा नित्याचा मोरपीसधारी मुकुट आणायला मात्र दादा विसरले. कल्पनेतही त्या मुकुटाशिवाय स्वामींना बघण्याची दादांना सवय नव्हती, त्यामुले ते घडलं असावं किंवा इकडे येण्याच्या उतावळ्या घाईत त्यांच्या स्वभावाप्रमाणं हे घडलं असावं. त्यामुळे परतीचा आमचा प्रवास पुन्हा आपोआपच सोयीचा झाला. आम्ही अश्वांसह सर्व गरुडध्वज रथ पुन्हा सालंकृत केला. मात्र त्याच्या ध्वजदंडावर गरुडध्वजाऐवजी साधीच भगवी ध्वजा ठेवली. ही सूचना स्वामींचीच होती. त्यामुले अंगी राजवेष असला, तरी मुकुटविहीन स्वामी व रथावरची भगवी ध्वजा बघून मार्गात भेटणारे कित्येक स्वामीभक्त दुरूनच नमस्कार करीत. ते आपसात हातवारे करीत कसलातरी वाद घालताना दिसत. स्वामींच्या मानवी स्वभावाच्या कयासाप्रमाणंच हे घडत होतं. ते कसला वाद घालताहेत, हे मला कळून येई. कानांवर धावते शब्द पडत, 'तो द्वारकेचा रथ नाही. रथावर गरुडध्वजा नाही.' दुसरा म्हणे, 'मी प्रतिज्ञेवर सांगतो. मस्तकावर मोरपीसधारी मुकुट नाही. ते द्वारकाधीश नव्हेत!' या सर्वांमुळे दादांनी सोबत आणलेल्या मोजक्याच सैनिकांसह आमचा परतीचा प्रवास सुकर झाला.

तीन सप्ताहानंतर आम्ही द्वारका द्वीपाच्या खाडीजवळ आलो. दादांनी द्वारकेत अग्रवार्ता धाडल्यामुले मी कधीच बघितलं नव्हतं, ते दृश्य बघायला मिळालं. आपले प्राणप्रिय द्वारकाधीश परत येताहेत, ही वार्ता कानी पडताच, द्वारकाकर स्त्री–पुरुष होड्या, नौका, तराफा मिळेल ते जलवाहन पाण्यात लोटत होते. स्वामीभेटीच्या अनावर ओढीनं ते नेहमीसारखे शुद्धाक्ष महाद्वारावर थांबायला तयारच नव्हते. खाडीचं जल मागे टाकून, आपलं जीवन प्रवाही करणाऱ्या जलपुरुषाच्या दर्शनासाठी ते जथ्याजथ्यांनी गरुडध्वजाकडे येत होते. पश्चिमसागराचं दर्शन होताच स्वामींनी मला झेपावत्या, पंख पसरलेल्या सुवर्णी गरुडचिन्हांकित ध्वजा रथाच्या ध्वजदंडावर पुन्हा चढविण्यास सांगितलं होतं.

फुलल्या प्राजक्त वृक्षाखाली टवटवीत फुलांचा सडा पडावा तसे कलकलणारे, अपार आनंदी द्वारकाकर स्री–पुरुष हां–हां म्हणता गरुडध्वजाभोवती एकवटले. ते भरल्या नेत्रांनी आणि रुद्ध कंठांनी द्वारकाधीशांच्या चरणावर लोळण घेऊ लागले. 'पुन्हा कधीच आम्हाला सोडून जाऊ नका द्वारकाधीश –' असा त्यांचा आर्जव समुद्रगाजेत मुरू लागला.

स्वामी एकापाठोपाठ एक द्वारकाकराला वाकून वर उठवू लागले. थोपटून म्हणू लागले, "नाही – कधीच जाणार नाही! क्षमा करा मला – तुम्हाला न भेटता गेलो."

आज तर शुद्धाक्ष महाद्वार दिवस असूनही करंजतेलाच्या तेवत्या दिवल्यांनी उजळून निघालं होतं. द्वारकेच्या सोनेरी पूर्वतटाचं सागरलाटांत पडणारं प्रतिबिंब आनंदान सतत डुचमळत होतं. स्वामी, बलरामदादा व उद्धवमहाराज तिघेही नौकेतून उतरून पायीच

शुद्धाक्षाकडे चालले. मी त्यांच्या पाठीशी झालो. मागून दोन्हीही सेनापती, प्रमुख मंत्रिगण असा यादवमेळा चालला. आंबवती व पुष्पतोरणांनी सजलेल्या शुद्धाक्ष महाद्वारात स्वामींचा सगळा भावमेळ डोळ्यांत प्राण आणून एकवटला होता. कोण नव्हतं त्यात? झाडून सर्व होते. वसुदेवबाबा, दोन्ही राजमाता, गुरुपत्नी व पुत्र दत्तासह आचार्य सांदीपनी, मुनिवर गर्ग, रेवतीदेवी, स्वामीपत्नी रुक्मिणीदेवींसह त्यांच्या सातही भगिनी, किशोर अभिमन्यूसह सुभद्रादेवी, प्रद्युम्नासह त्याचे एकोणऐंशी बंधू, पुत्रांसह उद्धवमहाराजांच्या माता कंसादेवी, माझा पुत्र दारुकी व त्याच्या बंधूसह पत्नी हयमती, दादांचे गद, सारण असे सर्व बंधू, त्यांचे निशठ, उल्मुक असे सर्व पुत्र – सर्व-सर्व भावद्वारका माझ्या स्वामींच्या स्वागतासाठी शुद्धाक्षावर एकवटली होती.

आपल्या वृद्ध पित्यांना – वसुदेवबाबांना बघताच पितृप्रेमानं भरून आलेले माझे संस्कारसंपत्र स्वामी, आमच्यातून फुटून झपाझप चालत एकटेच पुढे गेले. त्यांनी आपल्या वृद्ध पित्यासमोर गुडघे भुईवर टेकून, आपलं नितल निळं, विशाल भाल त्यांच्या चरणावर ठेवलं. काही क्षण निःशब्द झाले. पितापुत्रांची ती अपूर्व भेट जमलेला जनमेळा भावपूर्ण नेत्रांनी नुसता बघतच राहिला.

विरक्त होऊन पाठमोऱ्या झालेल्या चक्रवर्ती, दिग्विजयी, सुदर्शनधारी प्रिय पुत्राला त्याच्या वृद्ध पित्यानं उठवून आवेगानं दृढ–दृढ आलिंगनात घेतलं.

जमलेल्या यादवमेळातील कुणा एका भाववेड्या यादवानं कंठाच्या धमन्या फुलवून हर्षघोष दिला, ‘घोर आंगिरसशिष्य, वसुदेवपुत्र भगवान वासुदेव श्रीकृष्णऽऽ!” जमलेल्या यच्चयावत सर्व मुखांतून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, ‘जयतु!जयतु!!’

दुसऱ्या दिवशी चिरस्मरणीय सुधर्मा राजसभा भरली. आता घोर आंगिरसशिष्य झालेल्या माझ्या गुरुबंधूंचं त्या दिवशी घडलेलं दर्शन माझ्या अंतरंगावर शिल्पासारखं कोरलेलं आहे.

अमात्य विपृथूंनी यादवांना सुवर्णी रत्नजडित राजदंड उंचावून खचाखच तुडुंब भरलेल्या राजसभेला बैठकीचं प्रयोजन सांगितलं–

“आपली ही एवढी भव्य सुवर्णाची राजनगरी द्वारका ज्यांनी आपल्या बुद्धिकौशल्यानं, परिश्रमांनी उभी केली त्यांनीच ती कुणालाही न सांगता, कुणाचीही भेट न घेता क्षणात त्यागली. दूरदेशी ते ऋषिवर घोर आंगिरसांच्या चरणी प्रयागाश्रमात निघून गेले. आमच्या गणराज्याच्या वीर योद्धयांनी, कुशल गुप्तचरांनी त्यांचा शोध घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला. कुठंच त्यांचा मागमूस कुणालाही लागला नाही. आम्ही सर्वच हताश-हताश झालो होतो. कुणालाच काय करावं, ते सुचत नव्हतं.

“शेवटी युवराज बलरामांना त्यांचा अचूक ठावठिकाणा लागला. तो कसा, ते आजही मला ककलेलं नाही. त्यांनीच सभागृहाला आज ते विशद करावं.

घोर आंगिरसशिष्य, वसुदेवपुत्र, भगवान वासुदेव यांचं द्वारकाकर स्त्री-पुरुषांच्या वतीनं मी अंतःकरणपूर्वक सहर्ष स्वागत करतो.

“कधी नव्हे ते आज रुक्मिणीदेवी, उद्धवदेव व राजसारथी दारुक यांच्या मेळात द्वारकाधीश मुकुटविहीन बसले आहेत. त्यांनी आश्रमदीक्षा घेतल्यामुळे त्यांचा मुकुट निराधार झाला होता. तो पुनश्च मंत्रभारित करण्यात आला आहे. मी युवराज बलरामांना विनंती करतो की, वसुदेवमहाराजांच्या वतीनं सर्व सुधर्मा राजसभेच्या साक्षीनं, त्यांनी तो द्वारकाधीशांना सगौरव पुनश्च अर्पण करावा.” अमात्यांनी प्रथेचा राजदंडी

ठोका दिला.

आपल्या आसनावरून धिप्पाड शरीरयष्टीचे युवराज बलराम उठले. आपण आपल्या प्रिय बंधूला द्वारकेत आणण्यात यश घेतलं, याचा आनंद कसा त्यांच्या पुष्ट गोलाकार गौरवर्णी चर्येवरून ओसंडत होता! स्वामींचा मोरपीसधारी मुकुट ठेवलेलं तबक घेतलेल्या सेवकासह दादा स्वामींच्या आसनाजवळ आले. त्यांनी अत्यंत प्रेमभरानं तबकातील मुकुट हलकेच उचलला. तो माझ्या स्वामींच्या मस्तकी ठीक बसविला. तसं आनंदविभोर झालेल्या समस्त यादव सभासदांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट उठविला. मला तो दिवस आठवला, ज्या दिवशी बलरामदादांनी स्वामींच्या

मुकुटात स्वहस्ते मोरपीस खोचलं होतं.ते पीस आजही तसंच होतं. ज्यांना ते स्पर्शून गेलं, त्यांनाच पटलं की, हे बंधू-बंधू आजही तसेच होते – एकमेकांवर जीव ओसंडून प्रेम करणारे.

बलभद्रदादांनी सुधर्मा सभेला आज प्रचंड धक्का दिला. तसे ते युवराज असूनही कधी म्हणजे कधीच राजप्रथेच्या एक-दोन शब्दांशिवाय काहीच बोलले नव्हते. कुणालाच काहीही अपेक्षा नसताना आज मात्र बोलले. ते कितीतरी सुंदर होतं. चिरस्मरणीय होतं. ते हात उंचावून म्हणाले, “या सुधर्मा राजसभेतील सर्व सभासद यादव बांधवहो, महाराज वसुदेवबाबांच्या साक्षीनं सांगतो की, माझा प्रिय-प्रिय बंधू श्रीकृष्ण व मी लहानपणापासूनच एकत्र खेळलो, वाढलो. आम्ही आमच्या बाबांचे व दोन्ही मातांचे दोन डोळेच आहोत. कुठलंही चित्र दोन डोळ्यांनीच एकत्र बघता येतं. प्रिय बंधू श्रीकृष्णाशिवाय हे गणराज्य द्वारका व ही सुधर्मा सभा याची मी कल्पनाच करू शकत नाही. या राज्याचे वसुदेवबाबा महाराज आहेत, मी युवराज आहे; पण माझा बंधू श्रीकृष्ण हा द्वारकाधीश आहे. काल होता, आज आहे, उद्याही तसाच राहील. महाराज-;युवराज जातील येतील, पण द्वारकाधीश एकच आहे – तो काल होता, आज आहे आणि उद्याही तसाच राहील.

“तो प्रयागक्षेत्री आंगिरस आश्रमात आहे, ही वार्ता मला आचार्य सांदीपनींच्याकडून समजली! तसं क्षणाचाही विलंब न लावता, मी क्षेत्र प्रयाग गाठलं. घाईत द्वारकाधीशांचा मुकुट घेणंही विसरलो.

“एकदा स्यमंतक मणिरत्नाच्या अपसमजानं मी त्याला पारखा झालो होतो. आता एकदा तो मला पारखा होऊन परतला आहे. त्या वेळी मी त्याच्या राजकिरीटात सर्वांच्या साक्षीनं मोरपीस भरलं होतं. आज सर्वांच्या साक्षीनं तेच मोरपीस धारण करणारा राजमुकुट मी त्याच्या मस्तकी चढवीत आहे.

“तो माझ्यापेक्षा वयानं लहान आहे. मी त्याला नेहमीच ‘धाकटचा’ म्हणतो. आज मात्र वयानं मोठा असूनही सर्वांच्याच साक्षीनं त्याला म्हणतो की, त्यानं आपलं नसलेलं सर्व-सर्व धाकुटपण टाकून मोठ्या मनानं यादवांच्या या युवराजाला क्षमा करावी! जेवढ्या खोलीनं वसुदेवबाबा व दोन्ही माता त्याच्याकडे पुत्र म्हणून बघतात, जेवढ्या खोलीनं उद्धव, दारुक पितामह भीष्म, विदुर सुदामा, संजय, अर्जुन, राधा व द्रौपदी त्याच्याकडे सखा म्हणून बघतात, तेवढ्याच खोलीनं मीही त्याच्याकडे बंधू म्हणून बघतो. तो हे सर्व जाणतो.

“तो नुसताच द्वारकाधीश नाही, आणखीही कितीतरी गोष्टींचा तो ‘ईश’ आहे. म्हणूनच मी त्याच्याकडे क्षमायाचना केली आहे.

"त्याचा पत्ताच लागला नसता तर – तो द्वारकेला परतलाच नसता तर – तर मीही द्वारका त्यागली असती. त्याच्यासारखीच भगवी वस्त्रं धारण करून भारतवर्षाच्या आश्रमा-आश्रमात फिरलो असतो. कधी ना कधीतरी तो या आश्रमयात्रेत मला भेटला असता. तो मला व सर्वांना भेटला याचं श्रेय आचार्य सांदीपनींना आहे. त्यांनीच याचं रहस्य सभागृहाला विशद करून सांगावं, अशी माझी त्यांना विनंती आहे."

बलभद्रदादांच्या निवेदनानं सुधर्मा सभा हेलावून गेली.

युवराजांच्या सूचनेप्रमाणं आपल्या लाकडी पाठीच्या साध्याच आसनावरून आचार्य सांदीपनी उठले. त्यांच्या शुभ्र उत्तरीयावर उतरलेली पांढरीशुभ्र दाढी क्षणैक थरारली. सभागृहात पराकोटीची शांतता दाटली होती. आचार्य म्हणाले –

"सर्वांचा अपसमज आहे की, माझा शिष्य श्रीकृष्ण कुणालाच न सांगता प्रयागक्षेत्री आंगिरसाश्रमात गेला होता. पण तसं नाही. मीच त्याला घोर आंगिरसांच्या चरणी अत्यंत आवश्यक असलेल्या ब्रह्मविद्येच्या अध्ययनासाठी जाण्याचा परामर्श दिला होता. तसाच तो गेला. जाताना त्यानं हात जोडून मला एक विनंती केली होती. ती ही की, कुणी महत्त्वाच्या व्यक्तीनं मी कुठं आहे याची विचारणा केल्याशिवाय आपणहून मी कुठं आहे, हे कुणालाच सांगू नये!

"मी त्याची विनंती आज्ञेसारखी मानली. कुणालाच काही बोललो नाही. यादव सेनापतींची गुप्तचरांकडून चाललेली धावपळ मला दिसत होती. महाराज वसुदेव व दोन्ही राजमाता यांची कुणाचंही काळीज वेधणारी घनघोर चिंता जाणवत होती. म्हणून तर वेळोवेळी त्यांच्या कक्षात जाऊन, 'धीर धरावा, चिंता करू नये.' असं मी त्यांना विश्वासपूर्वक सांगतही होतो.

"माझी सर्वांत अधिक कुचंबणा पत्नीचे उद्गार ऐकताना होई. ती सतत म्हणे, 'कुठं गेला असेल हा? पुन्हा कधी दर्शन होईल की नाही याचं?' कधी-कधी वाटे आपण त्याचे गुरू आहोत, याचा अधिकार सांगुन गौप्यस्फोट करावा. निकरानं मी तो मनमोह आवरीत असे. त्याची अट ऐकताना मला साधी वाटली होती, पण प्रत्यक्ष गुरूचीही ती परीक्षा बघणारी निघाली. हा अनुभव नवाच होता.

"माझ्या कुचंबणेतून मला मोकळं केलं, ते श्रीकृष्णपत्नी रुक्मिणीदेवींनी. ध्यानी-मनी नसताना, एकदा त्या जांबवतीदेवींसह माझ्या निवासी पर्णकुटीत आल्या. त्यांनी मला कसलाही प्रश्न केलाच नाही. केलं ते स्पष्ट निर्विवाद विधानच. मी ते ऐकताना दिपूनच गेलो. त्यांच्याविषयीचा मनी बाळगलेला आदर द्विगुणित झाला. जे कुणाच्याही ध्यानी आलं नव्हतं, ते त्यांनी आपल्या पतीबाबत अचूक ताडलं होतं. त्या म्हणाल्या – 'माझे श्री गुरूंची आज्ञा घेतल्याशिवाय, त्यांचं दर्शन व आशीर्वाद घेतल्याशिवाय, असं कुठंच आणि कधीही जाणार नाहीत! आपण कृपावंत होऊन मला सांगावं, ते कुठे गेलेत?'

"श्रीकृष्णाची अट पाळूनच मी त्याचा ठावठिकाणा शेवटी त्यांना सांगितला. त्यांनी तो युवराजांच्या कानी घातला आणि युवराजांच्या तत्पर हालचालींमुळे द्वारकेच्या जीवनातील हा सुवर्णदिवस उजाडला.

"खरोखर तो परत आलाच नाही तर? या विचारानं मीच केवढातरी व्यथित होत असे. ती व्याकूळता असह्य झाली की, मलाच तीव्रपणे वाटे की, उठावं नि थेट प्रयागाश्रम गाठावा! पण मी तसं करू शकत नव्हतो. कारण वसुदेवमहाराजांची व दोन्ही राजमातांच्या

मुद्रा समोर उभ्या राहत.”

आता अवघ्या सुधर्मा राजसभेचं लक्ष खिळून पडलं, ते एकट्या रुक्मिणीदेवींवर. त्या शांतपणे आपल्या पतीशेजारी बसल्या होत्या. मला क्षणभर वाटलं स्वामीपत्नी होणं किती कठीण काम! रुक्मिणीदेवी आमच्यासाठी खरोखरच पतिपरायण व बुद्धिवंत देवी होत्या! मनाच्या तीव्र बोचऱ्या क्षणी त्या उठून थेट आचार्य सांदीपनींकडे स्वामींची विचारणा करण्यासाठी गेल्या. तशा त्या गेल्याच नसत्या, तर?

आता संपूर्ण सुधर्मा सभा एकट्या माझ्या स्वामींच्या नावानं व अस्तित्वानं पुरती-पुरती मंत्रभारित झाली होती. इतकी की, अमात्य विपृथूंन प्रथेप्रमाणं स्वामींना ‘द्वारकाकरांसाठी काही बोलावं’ अशी विनंती करण्याचं भानही राहिलं नाही! ते स्वामींकडे केवल बघतच राहिले.

दूर मानस सरोवरावर उगवतीचा क्षण अचूक टिपून ब्रह्मकमळाचा टपोरा कळा तरारून उठावा, तसे स्वामी कुणीही विनंती न करताच उठले, या वेळी ते फार म्हणजे फारच थोडं बोलले. मात्र ते कधीही विसरता न येण्यासारखं होतं. आपल्या मधुर वेणुवाणीत ते म्हणाले, “द्वारकेतील माझ्या प्रिय बंधु-भगीनींनो!!” त्या नुसत्या संबोधनावरच भारावलेल्या सुधर्मा सभेच्या स्त्री-पुरुष सभासदांनी कडाडून टाळ्याच टाळ्यांचा कसा नुसता वर्षाव केला. कितीतरी वेळ अविरत ते नुसत्या टाळ्याच पिटत राहिले. प्रत्येकाच्या मनी दोन गोष्टींचा अनावर आनंद पश्चिमसागराच्या भरतीसारखा दाटून आला होता.

एक आनंद होता, द्वारकाधीश परत आल्याचा. दुसरा आनंद होता, त्यांनी प्रत्येक द्वारकाकर नगरजनाला –स्त्री-पुरुषाला ‘प्रिय बंधू-भगिनी’ म्हटल्याचा.

टाळ्यांचा पर्जन्य संथ होताच स्वामी बोलले. अगदी मोजकंच. “मी प्रयागक्षेत्री आदरणीय गुरुवर्य घोर आंगिरसांच्या चरणी गेलो तो गुपचूप, चोरून मुळीच नव्हे, पांडवांचा मला न भेटता जाण्याच्या कृतीवर व्यथित होऊन नव्हे, तर – तर मानवी मनाला कधी-कधी घनघोर विषाद घेरून जातो, त्याचं मूळ कशात असावं, त्याचं निवारण कसं करावं, याचं योग्य मार्गदर्शन गुरुमुखातून घ्यावं; म्हणजेच आत्मविद्येची – ब्रह्मविद्येची झाडून सारी काटेकोर उजकणी करून घ्यावी, म्हणून!

“कुणी सांगावं, भविष्यात त्याची समस्त आर्यावर्तालाही आवश्यकता भासेल!!

“माझा हेतू कोणताही असो, तो कितीही श्रेष्ठ असो, त्यासाठी बंधू-भगिनींनो

तुम्हा सर्वांनाच जो त्रास सोसावा लागला, त्यासाठी मी मनापासून क्षमाप्रार्थी आहे!

“‘मी निक्षून प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, मी पुन्हा कधीही माझी द्वारका सोडणार नाही! आणि सोडण्याचा प्रसंग आलाच, तर कधी, कधीच पुन्हा म्हणून परत येणार नाही!! यासाठीच सर्वांनी या क्षणी उदार हृदयी मला क्षमा करून पदरी घ्यावं!” स्वामींनी वाकून हात जोडून सर्वांचीच मन:पूर्वक क्षमायाचना करताच यादवांची ती तुंडुब भरलेली अवघी सुधर्मा राजसभा हेलावून गेली.

त्या दिवशी सांजअर्घ्यासाठी स्वामींना मी गरुडध्वजातून पश्चिम सागरकिनाऱ्यावर ऐंद्र महाद्वाराशी आणलं. बरोबर उद्धवमहाराजही होते. त्या दोघांना सागरातून डुंबत्या सूर्यदेवांना डोळे मिटून अर्घ्य देताना पाहणं, हा माझा एक अजोड व अतुल अनुभव होता. डुंबू घातलेल्या तबकाएवढ्या रसरशीत सूर्यबिंबाला डोळाभर निरखताना एकच

एक विचार माझ्या मनी सतत-सतत फिरत राहिला! “छेऽ! स्वामी म्हणजे नेमके कोण आहेत? काही-काही केल्या कळत नाही!!”



# द्रौपदी

# ४

# द्रौपदी

मी द्रौपदी! पांचालराज द्रुपदांची कन्या. मला सर्व जण 'याज्ञसेना' ही म्हणत. योग्यच होतं ते. माझे पिता द्रुपद यांनी ऋषिवर याज व उपयाज यांच्या देखरेखीखाली केलेल्या पुत्रकामेष्टी यज्ञाच्या कुंडातून आम्ही भावंडं जन्मलो. मी आणि माझा यज्ञीय बंधू धृष्टद्युम्न!

या यज्ञामुळेच माझ्या मातेकडे – सौत्रामणीकडे सर्वांचं दुर्लक्ष झालं. खरंच केवळ जन्म देते, तीच माता असते काय? पालन-पोषण करून संस्कारांनी मन घडविते तिला काहीच स्थान नसतं का? नसेल तर असायला हवं, असं मला वाटतं. मी द्रौपदी झाले ती पिता द्रुपदांमुळे. पण यज्ञकुंडातल्या अग्नीसारखीच दाहक मनस्विनी, मानिनी झाले, ती माझ्या माता सौत्रामणीच्या संस्कारांमुळे. तिच्या नुसत्या स्मरणाबरोबर माझ्या डोळ्यांसमोर चित्रासारखं उभं राहतं, ते आम्हा पांचालांचं राजनगर – कांपिल्यनगर. तिथली भव्य राजवास्तू आणि होय, तिच्या स्मरणाबरोबरच डोळ्यांसमोर उभा ठाकतो, तो माझ्या आणि दादा धृष्टद्युम्नाच्या जन्मापूर्वीचा आमचा बंधू शिखंडी! काही एका शापामुळे तो पुरुषत्वहीन झाला होता, असं म्हटलं जाई. त्यामुळेच तर माझे तात – द्रुपदांनी 'पुत्रकामेष्टी' यज्ञ करविला होता. आमच्या जन्मानंतर माझ्या माता-पित्यांना चांगले आठ पुत्र झाले. सुमित्र, प्रियदर्शन, चित्रकेतू, सुकेतू, ध्वजकेतू, वीरकेतू, सुरथ आणि शत्रुंजय अशी त्यांची नावं होती. म्हणजे मी एकूण दहा भावांची एकमेव भगिनी होते. एकमेव भगिनी असल्यामुळे मला सर्वांचंच बंधुप्रेम भरभरून मिळालं.

मला दहा भाऊ असले तरीही द्वारकेच्या श्रीकृष्णानं माझ्या एकमेव बंधूंचं स्थान घेतलं. कसं? तेही सांगणं तसं कधीच न संपणारं आहे. यादवांच्या या अजोड, अतुलनीय नायकाला त्याच्या आप्तगणांसह जवळ-जवळ सर्वच 'श्रीकृष्ण' म्हणत होतो. आम्ही मोजकेच असे होतो की, त्याला प्रेमापोटी नुसतं 'कृष्ण' म्हणत होतो. त्यालाही ते मनापासून आवडे. त्या मोजक्यांत माझ्या सासूबाई – पांडवमाता कुंतीदेवी, कुरूंचे पितामह भीष्म, विदुर, संजय अशा आणखीही काही व्यक्ती होत्या.

कुठल्याही व्यक्तीचं नेमकं मूल्यमापन कसं करायचं? तर त्याच्या दोन कला आहेत. त्यासाठी दोन प्रश्न आहेत. ते असे की, एकतर ती व्यक्ती जन्मलीच नसती तर? आणि दुसरा प्रश्न म्हणजे आपल्या जीवनप्रवासात ती आपल्याला भेटलीच नसती तर? खरोखरच माझा कृष्ण नसता तर? मला तो जीवनात कधी भेटलाच नसता तर? कल्पनाच करवत नाही की, कसकशी वळणं-वाकणं घेतं गेलं असतं माझं – एका याज्ञसेनेचं दाहक जीवन?

जसं मला द्रौपदी व याज्ञसेना म्हणत; तसंच पांचाली, कृष्णा, श्यामा अशा नावांनीही संबोधत. तेही योग्यच होतं.मी वर्णानं तशी सावळीच होते. त्यामुळे सर्व जण मला श्यामा म्हणत. पण मला सर्वप्रथम 'कृष्णा' म्हणून हाकारलं, ते माझ्या कृष्णानं. प्रथम माझा बंधू व नंतर सखा झालेल्या नीलवर्णी कृष्णाशी माझं सावळं नाव 'कृष्णा' जुळत असल्यामुळे, मलाही ते प्रिय झालं. होय, कृष्ण माझा सर्वांत प्रिय बंधू होता. त्याहून अधिक तो सखा होता. त्याच्याशी माझ्या जिवाचं हे सख्य केव्हा जुळलं याचा मी शोध घेत-घेत जाते, तेव्हा डोळ्यांसमोर येतं, ते कांपिल्यनगरातील माझं स्वयंवर.

माझ्या स्वयंवरात दादा धृष्टद्युम्न व पिता द्रुपदांनी मांडलेला मत्स्याच्या नेत्रभेदाचा पण तसा साधायला कठीणच होता. अनेक नामवंत धनुर्धर, नरेश त्यात हरले होते. दादानं जमलेल्या वीरत्वाच्या केलेल्या निर्भत्सनेनं स्वयंवरमंडप पराकोटीच्या तणावावर पडला होता. त्या क्षणी केवढे प्रश्नच प्रश्न फिरून गेले माझ्या मनात! हा अवघड मत्स्यभेदाचा पण खरोखर कुणीच पूर्ण केला नाही तर? मी अशीच राहणार की काय पांचालांच्या या राजवास्तूत? दहा बंधू पाठीशी असले, तरी कसं असेल त्या अविवाहित अभागी भगिनीचं जीवन? कशा-कशाला मांडला आहे हा अवघड पण तात-दादांनी?

नेमक्या या क्षणाला माझा हा सखा आपल्या आसनावरून उठून उभा राहिला. स्वयंवरमंडपात अस्फुट उद्गार उठले –'द्वारकाधीश – सुदर्शनधारी – शार्ङ्गधर – कंसांतक –' ते ऐकताना मी उभ्या कुडीभर कशी थरारून गेले. हाती वरमाला घेऊन एव्हापर्यंत स्त्रीसुलभ लज्जेनं खाली घातलेली मान मी वर केली – द्वारकाधीशांना डोळाभर बघण्यासाठी. ते खरोखरच 'सुदर्शन' होते! विचारांचे कितीतरी धवल राजहंस पक्षीच पक्षी माझ्या मनाच्या सरोवरावरून निळ्या आकाशमार्गी क्षणभरातच झेपावले. मनी पहिलाच विचार आला, यांनी – यांनीच क्षणभरातच शिवधनुष्य बाजूला सारत आपल्या शार्ङ्ग धनुष्यानं मत्स्यभेदाचा पण पूर्ण केला तर? कसं होईल आपलं द्वारकेतील त्यांची पत्नी म्हणून जीवन? त्यांच्या प्रथमपत्नी रुक्मिणीदेवींबद्दल मी खूप काही ऐकलं होतं.करतील त्या माझा स्वीकार? कशा वागतील त्या माझ्याशी?

पण घडलं, घडायचं होतं तसंच. ब्रह्मवेषातील धनुर्धर अर्जुनांनी पण पूर्ण केला. मी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या वीरकंठात वरमाला चढविली. क्षणापूर्वी घेतलेल्या सुदर्शनाकडे पाहिलं. तिथे काही क्षणांपूर्वी असलेल्या माझ्या प्राप्तीच्या अभिलाषेचा आता लवलेशही नव्हता. होती निव्वळशंख स्फटिकासारख्या बंधुभावापेक्षाही पारखायला कठीण छटा! कसली, ते पारखण्याचा मी कितीतरी वेळ यत्न केला. यश काही हाताला लागेना.

स्वयंवरानंतर कुंभकाराच्या घरी तो ज्येष्ठ बंधू बलराम, उद्धव, सात्यकी यांच्या यादवमेळातून माझ्या आणि अर्जुनाच्या भेटीसाठी आला. मी पूर्वी कधीच न पाहिलेलं अतर्क्य हास्य आपल्या नीलवर्णी मुद्रेवर खुलवीत तो सहज म्हणाला, "कृष्णे! हा माझा प्रिय आतेबंधू आहे. धनुर्धर अर्जुन. याच्याशी सुखानं संसार कर." त्याचा 'कृष्णे' हा शब्द ऐकताच मात्र मी समजून चुकले, हा तर आपला सखा – प्राणसखा!

या सख्याच्या प्रिय पत्नीनं – माझ्या वहिनीनं माझ्या पहिल्याच भेटीत राजसूय यज्ञाच्या वेळी इंद्रप्रस्थात मला एक अमोल कानमंत्र दिला. रुक्मिणीवहिनी मला म्हणाली, "याज्ञसेने, स्त्रीचं जीवन म्हणजे निर्माणाची प्रचंड शक्ती असलेलं सुप्त केंद्र

असतं. एकदा का या केंद्राचा तिला शोध लागला की, मग मात्र ती जीवनात मागं नाही वळून बघत. पुढंच चालते." तिच्या या अमोल मंत्रावर विचार करता करताच, मला कधी-कधी प्रकर्षानं जाणवून गेलं. जे जाणवलं, ते आता तिच्या भेटीत पहिल्यानंच सांगायचं असं मी ठरवूनही टाकलं. ते असं होतं – 'स्त्रीला तिच्या ठायीच्या सप्त निर्माणकेंद्राचा नुसता शोध लागूनच भागत नाही. तिला तिच्या जीवनात येणाऱ्या इतर सर्वांच्या – माझ्यासारखीच्या जीवनात तर एकाहून अधिक आलेल्या पतींच्या ठायी असलेल्या नेमक्या जीवनकेंद्राचा शोध, ठाव लागावा लागतो. रुक्मिणीवहिनींच्या विषयी तर तिच्या पतीच्या – माझ्या कृष्णाच्या ठायी असलेल्या एकाहून अनेक जीवनकेंद्रांचा ठाव लागणं कर्मकठीण. खरोखरच महाकर्मकठीण!'

जेव्हा-जेव्हा मी माझ्या पाचही पतींचा विचार करते, तेव्हा-तेव्हा माझा कृष्णसखा हटकून माझ्या डोळ्यांसमोर येतो. त्यानं कसलाही हातचा शिल्लक न ठेवता, माझ्या पाचही पतींची मला संपूर्ण ओळख करून दिली होती. ती दिली नसती तर? या बंधूंच्या पंचकडीत माझा एक मासभरही निभाव लागला नसता. मासभर कसला पळभरही!

कसे होते माझे पाच पती? कसे होते सर्वांचे लाडके, प्रिय – पाचही पांडव?

या पाचही बंधूंत ज्येष्ठ युधिष्ठिर – धर्म! कसा होता माझा ज्येष्ठ पती युधिष्ठिर? माझ्या सर्व पतींचा निर्देश मी एकेरीच करणार आहे. जिथे सर्वांना द्वारकाधीश स्वामी श्रीकृष्ण वाटणाऱ्या यादवनायकाला मी कृष्ण म्हटलं, तिथे त्याला ज्येष्ठ बंधूंहून अधिक मानणाऱ्या माझ्या सर्व पतींचा निर्देश मी एकेरी केला, तर काहीच चुकणार नाही. उलट मी त्यांचा निर्देश 'अहो–जाहो' असा केला, तर तेच सर्वांना खटकेल!

कसा होता माझा ज्येष्ठ पती युधिष्ठिर? तर इंद्रप्रस्थातील पांडवराज्याचा तो अभिषिक्त राजा होता. सदैव धर्मानं वागणारा होता, म्हणून त्याला सहजच धर्म हे नाव पडलं होतं. धर्माची त्याची व्याख्या होती –'धृ-धारयति इति धर्मः।' म्हणजे ज्या विचारांमुळे जिवाचं पोषण व विकास होतो, तो धर्म! माझा हा प्रथमपती सत्यवचनीही होता. त्याच्या सत्यवचनाशी तुलना करता–करता, माझा प्रिय सखा कृष्ण समूळ खोटारडाच ठरवावा लागेल! पण तो तसा नव्हता, हीच तर गोम आहे! जीवनाच्या कठोर अनुभवांनी मला प्रत्यय आला होता की, सत्य हे ज्याच्या-त्याच्या दृष्टीप्रमाणे दिसतं.

माझ्या स्वयंवरानंतर कांपिल्यनगरात कुंभकाराच्या घरी राजमाता कुंतीदेवी मला न बघताच म्हणाल्या, " मोठी भिक्षा असेल, तर ती सर्व भावांनी वाटून घ्या." मला बघताच मात्र त्या मनोमन तीव्र हळहळल्या. एकसारखं म्हणू लागल्या, "कुठलीही कुलस्त्री भिक्षा कशी होईल? अनेकांत ती कशी वाटली जाईल? किती मूर्खासारखी बोलून गेले मी! माझे शब्द मागे घेते मी!"

त्या वेळी हा सत्यवचनी धर्मपरायण पांडुपुत्र काही आपल्या भावंडांचं ज्येष्ठपण राखत ठोसपणे म्हणाला नाही की, " तुझं योग्य आहे माते. कुठलीही कुलस्त्री ही कधीही भिक्षा असूच शकत नाही. धनुर्वेधाच्या कौशल्यानं अवघड पण जिंकून एकट्या अर्जुनानं तिला जिंकलं आहे. आम्हा इतर भावंडांचा तिच्यावर कसलाही तसूभरसुद्धा अधिकार नाही." त्या वेळी मी त्याच्याकडे याच एकमेव अपेक्षेनं बघतही राहिले. पण – पण त्याच्या डोळ्यांत मला कसलंही जाणतेपण दिसलं नाही. दिसली ती निखळ उघडीवाघडी अभिलाषा! माझ्या ज्येष्ठ पतीचे ते डोळे मी पुढे जन्मभर कधी, कधीच विसरू शकले नाही. त्याला त्यामुळेच कधी क्षमाही करू शकले नाही.

माझ्या पहिल्याच भेटीत माझ्या अभिलाषेपोटी त्यानं माझ्यावर घनघोर अन्याय केला. माझ्या प्रिय सखा कृष्णानं ज्या शब्दांत माझी त्या वेळी समजूत काढली, तेच मला तारक ठरलं. कृष्णाच्या सख्यत्वाचा तेव्हा मला पहिलाच प्रत्यय आला. त्या वेळी मला तो भेटला नसता, तर? माझ्या अंगभूत स्वभावाप्रमाणे मी माझ्या आयुष्याच्या विच्छेदनाला कडवा विरोध केला असता. पण त्या वेळी केवढंतरी सख्यत्वाचं हसून कृष्ण मला म्हणाला, "श्यामले – कृष्णे, तू एवढी अप्रतिम सुंदर आहेस की, ते सौंदर्यच तुझ्यावर पुरुषी वासनेचे आघात करील. त्यासाठी तुला भीमार्जुनांच्या जोडवृजनाची नितांत आवश्यकता आहे. माझ्या कुंतीआतेची आज्ञा तू शिरसावंद्य मान."त्याचं ते हास्य त्यालाच शोभणारं होतं. त्याच्या शब्दांहूनही अधिक बोलणारं होतं.

पांडवांचा हा ज्येष्ठ भ्राता युधिष्ठिर माझ्या आयुष्याचं नुसतं विच्छेदन करूनच थांबला नाही, तर स्त्री म्हणून असलेल्या कुठल्याही क्षत्रियानं स्वस्त्रीची म्हणून प्राणपणानं जपावी अशा लाखमोलाच्या लज्जेचे यानं शब्दश: धिंडवडे काढले, तेही कुरूंच्या भरल्या द्यूतसभेत. स्वत: हरलेला असताना यानं मला द्यूतात पणाला लावलं. द्यूताची अभिलाषा याला पत्नीपेक्षा मोठी वाटली. इथंही माझ्या कृष्णसख्यानंच माझ्या लज्जेचं रक्षण केलं. द्यूताच्या प्रसंगापासून माझा कृष्णसखा कुठेही असला तरी माझ्या हृदयातच आहे, याचा निर्विवाद प्रत्यय नि विश्वास मला येऊन चुकला.

माझ्या या पाच पतींपैकी प्रत्येक जण एकांतात मला वेगवेगळ्या नावांनी संबोधित असे. हा पांडवांचा महाराज युधिष्ठिर मला हटकून 'सुगंधे' म्हणे! माझ्या सर्वांगाला चंदनी उटण्याचा यावा तसा, नीलकमलाच्या पराग-केसरांतून पसरतो तसा एक मंद गंध येई. हा गंधच या अभिषिक्त राजाला अतीव प्रिय होता. त्यातही याच्या राजेपणाची सूक्ष्म अभिलाषा मला जाणवून जाई. माझ्या अंगीच्या इतर कुठल्याही गुणाचं तो कधीच मुखभर वर्णन करीत नसे. आपल्या ज्येष्ठ असण्याचा इतर भावंडांवर हा सतत अधिकार गाजवी.

युधिष्ठिराठायी एक कासवी मन होतं. कधी तो ज्येष्ठपणाच्या कवचाआड लपे, तर कधी राजेपणाच्या. विक्रमात हा आपल्या लहान बंधूंपेक्षा कितीतरी कमी होता. ती कमतरता तो आपल्या सुडौल तत्त्वज्ञानानं भरून काढी.

इंद्रप्रस्थाची मी महाराणी झाले, म्हणून तर या ज्येष्ठ पांडवातले असे ठळक दोष मला प्रकर्षानं जाणवले. तरीही त्याच्या मितभाषी स्वभावाप्रमाणे याचे काही गुण अप्रकट होते. त्यालाच ते शोभून दिसणारे होते. त्यातील पहिला आदर्श गुण म्हणजे, कुठलीही गोष्ट तो आपल्या आदरणीय मातेच्या परामर्शाशिवाय कधीच करीत नसे. राजमातेनं त्याच्याशिवाय दुसऱ्या कुणालाच ज्येष्ठ पांडव म्हणून स्वीकारलं नसतं. ज्येष्ठ म्हणून तो जसा इतर लहानांवर प्रभाव टाकी, तसाच आपल्यापेक्षा ज्येष्ठांचा प्रभाव तो नम्रपणे मान्यही करी. द्यूतप्रसंगी तिथे राजमाता असत्या, तर त्यांच्या एका शब्दासाठी माझा हा ज्येष्ठ पती हातचे फासे तसेच फेकून निघून गेला असता, यात मला कसलीही शंका वाटत नाही. इंद्रप्रस्थाची महाराणी म्हणून स्त्री-पुरुष पौरजनांसमोर तो मला योग्य मानही देत होता. खांडववनात इंद्रप्रस्थ राज्य उभारताना प्रत्येक भेटीत कृष्णानं मला मी 'महाराणी' म्हणून कसं वागलं पाहिजे, याची कधीच न विसरता येणारी दीक्षा दिली होती.

मी कांपिल्यनगरातून हस्तिनापूर करत इंद्रप्रस्थात आले, ती माहेरी काही परतले

नाही. माता सौत्रामणी, तात द्रुपदराज, सर्व बंधू व प्रमुख पांचाल यांच्या वार्ता मग मला इंद्रप्रस्थात मिळत होत्या. इंद्रप्रस्थात राजनगर उभारण्याच्या कार्यात कृष्णानं केलेलं सर्व प्रकारचं साहाय्य सर्वांत मोठं होतं. त्याला माझ्या बंधू धृष्टद्युम्नाची तशीच तत्पर साथ लाभली होती. तो अधूनमधून इंद्रप्रस्थात पांचालांची सेनापथकं घेऊन येई. काही दिवस राजनगरीच्या उभारणीत प्रत्यक्ष लक्ष घाली. मग माझं कुशल घेऊन पांचालदेशी परते.

आम्ही खांडववनात येताच माझ्या पाचही पतींनी मला धरून आपापल्या जीवनक्रमाची एक आचारसंहिता ठरविली होती. तिचा भंग सहसा कुणीही करीत नसे. जन्मानं त्यांचा क्रम जसा होता, तसाच माझ्याशी एकांतात राहण्याचाही क्रम होता. त्यानुसार खांडववनात येताच मला युधिष्ठिरापासून प्रथमपुत्र झाला. राजमातेनं त्याचं नाव 'प्रतिविंध्य' ठेवलं. पांडवांचा हा तिसऱ्या पिढीचा ज्येष्ठ अंकुर असल्यामुळे उद्याचा युवराज होता. सर्व जण त्याची डोळ्यांत तेल घालून जपणूक करीत. त्याची मान पित्यासारखी उंच दिसे. तो विंध्य पर्वताच्या कड्यासारखा भक्कम व्हावा, अशा कल्पनेने त्याचे नाव प्रतिविंध्य ठेवण्यात आलं होतं. त्याला यौधिष्ठिरीही म्हणत. माझ्या या प्रथम पुत्राचं त्याचे सर्व काका फार-फार कौतुक करीत. तो जन्मताच मी ठरवून टाकलं, त्याची इतर पाच पांडवांशी दोन प्रकारची नाती येणार. एकीकडे काका आणि दुसरीकडे सापत्न पिता अशी! तरीही त्यानं सर्वांनाच 'तात' म्हणावं, असंच मी त्याला कटाक्षानं शिकवलं. पाच पतींच्या सहवासामुळे माझ्या जीवनाची आचारसंहिताही अशी माझी मलाच ठरवून घ्यावी लागणार होती. ती मी राजमाता व सखा कृष्ण यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे ठरवून घेत होते. जीवनात येणाऱ्या अकल्पित वास्तवांमुळे आम्ही तिघेही नकळतच एकमेकांच्या जवळ येत चाललो होतो.

माझा दुसरा पती होता, बलवीर भीमसेन. मी चांगली जाणून होते की, इतर चारही भावंडांचं भीमसेन हे बळकट कवच आहे. भीमसेन शरीरयष्टीनं अजोड बलदंड होता. अगदी सखा कृष्णाच्या बंधू बलरामांसारखा. त्यांचा तर हा गदा व मल्लविद्येचा शिष्यच होता. त्यांच्यासारखाच मनानं मोकळा. खांद्यावर प्रचंड गदा तोलून, मान मागे टाकीत, वक्ष गदगदवून हसणारा! केवढं अंतर होतं युधिष्ठिरात आणि भीमसेनात! एक उत्तरध्रुव, तर दुसरा दक्षिणध्रुवाचं टोक. भीमसेनाला तीन गोष्टी आवरत नसत. भूक, निद्रा आणि संताप! प्रचंड भुकेमुळे व निद्रेमुळे तो सशक्त व बलदंड दिसे. खांद्यावरच्या प्रचंड गदेसारखं त्याचा क्रोध, हे एक त्याचं दुसरं शस्त्रच होतं, कुठल्याही शत्रूला गदा गोलगोल फिरवत क्रोधतप्त मुद्रेनं त्यानं आव्हान दिलं की, शत्रू अर्धाअधिक खचूनच जाई. भीमसेन पाडाच्या तोरंजनासारखा सतेज गौरवर्णी होता. त्याच्या ढालीसारख्या गोल मुद्रेला त्याच्या भरगच्च मिश्या शोभून दिसत. एवढा बलदंड गदा आणि मल्लवीर असला, तरीही तो ज्येष्ठ तिघांच्या आज्ञा नम्रभावानं मानी. एक ज्येष्ठ बंधू युधिष्ठिर, दुसऱ्या राजमाता कुंतीदेवी आणि तिसरा माझा सखा कृष्ण! तो कृष्णापेक्षा वयानं थोडा मोठा असल्यामुळे कृष्ण त्याला नम्रभावानं वाकून वंदन करू बघे. भीमसेन काही त्याला तसं करू देत नसे. भीमसेनाची दोन प्रमुख शस्त्रं होती – गदा आणि मुसल. इंद्रप्रस्थाच्या राजसभेत तो फारसं बोलत नसे. सभेत बोलणं, हा त्याचा स्वभावच नव्हता. समरांगणात शत्रूला आव्हान देत डिवचून अंगावर घेताना त्याच्या भाषेला

मात्र वीरत्वाची अजोड धार हटकून येई.

या माझ्या वीर पती भीमसेनाचं अतुल शरीरसामर्थ्य, हेच अनेक गोष्टींचं कवच होतं. त्याच्या इतर चार बंधूंच्या पराक्रमाचं होतं. माझ्या मोहक स्त्रीत्वाचं होतं. त्याशिवाय इंद्रप्रस्थाच्या सर्वसामान्य स्त्री-पुरुषांच्या न्याय्य अधिकारांचंही ते कवच होतं. त्यामुळेच इंद्रप्रस्थाच्या पौरजनात इतर चारही बंधूंपेक्षा भीमसेन प्रिय होता. माझ्या कृष्णानं त्याला सर्वप्रथम 'भीमसेन' असं संबोधन दिलं होतं. इतर कुणालाच ते लाभलं नव्हतं. इतर कुणालाही त्यानं धर्मसेन, अर्जुनसेन, नकुल वा सहदेवसेन म्हटलं नाही. किती सार्थ होतं, कृष्णानं त्याचं ठेवलेलं 'भीमसेन' हे नाव! तो एकटा कधी वाटतच नसे. तो आला की, शेकडो गजशक्तींची सेनाच आल्यासारखं वाटे. भय हा शब्दच त्याच्या कोशात नव्हता. म्हणूनच त्याचं नुसतं दर्शन होताच नगरजन वेडावून घोष देत –'वीर भीमसेन जयतु... जयतु!'

माझ्या सर्वच पतींचं माझ्यावर नितांत प्रेम होतं, मात्र स्त्री म्हणून कुणी मला 'त्यांचा कसा क्रम लावशील?' असा प्रश्न विचारला, तर मी प्रथम क्रमांक देईन तो भीमसेनाला. नंतर येईल तो अर्जुन आणि होय सर्वांत शेवटीच लागेल तो क्रम युधिष्ठिराचा!

पण 'इंद्रप्रस्थाची महाराणी' म्हणून मला कुणीही हाच प्रश्न विचारला, तर माझं उत्तर असेल 'प्रथम क्रमांक युधिष्ठिर' हेच. तो लज्जास्पद द्यूत खेळला होता, तरीही मी हे असं का म्हणते आहे? तर इंद्रप्रस्थाची महाराणी झाल्यानंतर माझ्यातही एक आमूलाग्र बदल झाला, तोही कृष्णामुळेच. महाराणीपदाच्या उत्तरदायित्वाची त्यानं दिलेली दीक्षा मी कधीच विसरू शकले नाही. तो अहोरात्र घडविणारा होता, बिघडविणारा कधीच नव्हे. एकदा त्यानं कुणालाही आपलं मानलं की, त्याच्या सहवासात जाणारी व्यक्ती आतबाहेर बदलूनच जाई.

एरवी सर्वांनाच अनावर भीमसेन माझ्या कृष्णाचं मात्र मुकाट ऐके. भीमसेन मला सर्वाधिक प्रिय होण्याची जी अनेक कारणं आहेत, त्यांपैकी हे प्रमुख आहे.

माझ्यावरच्या भीमसेनाच्या अतुल प्रेमाचा प्रत्यय मला देणारे अनेक प्रसंग काम्यकवनातील आमच्या वनवासी जीवनात घडले. हाताशी राज्यवैभव असताना, आज्ञा झेलायला सेवक-सेविका असताना, पत्नीच्या कुठल्याही इच्छेची पूर्तता पतीला करता येईल. तसा अनुभव पांडवांच्याकडून मी अनेकदा घेतला होता. त्यात विशेष असं काहीच नव्हतं. पण वनात तिची इच्छापूर्ती करणं, याला मनात प्रेमकंदच असावा लागतो. काम्यकवनात एकदा फिरताना मी या सर्वच बंधूंसह एका जलसंपन्न सरोवसकाठी आले. त्या सरोवरात मध्यभागी सुंदर काषाय वर्णाच्या कमळाची फुलं उमलली होती. सरोवराच्या निळ्या जलाशयावर ती केवढी उठून दिसत होती. त्यांना बघताच मी चीत्कारले, "किती सुरेख आहेत ती कमलफुलं!" उद्गार ऐकून ज्येष्ठ पांडव युधिष्ठिर म्हणाला, "त्याहून तुझे पायाच्या टाचांपर्यंत उतरलेले, निळी छटा असलेले विपुल केश अधिक सुंदर आहेत. ही पुष्पं तुझ्या केशात कितीतरी सुंदर दिसतील. पर्णकुटीत जाताच एखाद्या वनवासी सेवकाकडून ती आणवून घेऊ!"

ते ऐकून मी श्रेष्ठ धनुर्धर धनंजयाकडे बघितलं. माझ्या बघण्याचा अर्थच होता 'तू काय करणार अर्जुना?' मला अपेक्षित उत्तरच त्यानं दिल, "आता या क्षणी माझ्याकडे गांडीव धनुष्य नाही. नाहीतर मत्स्यभेद करणाऱ्या माझ्या धनुर्वेधाची किमया मी तुला

क्षणात इथंच दाखविली असती. सरोवराच्या मध्यभागी असलेली ती कमळफुलं मी गांडीव पेलताच, दुसऱ्याच क्षणी तुझ्या पायाशी लोळण घेताना दिसली असती तुला, श्यामले.”

नकुल-सहदेवांनी अशीच काहीतरी उत्तरं दिली. आज ती माझ्या लक्षातही नाहीत. सर्वांत शेवटी मी भीमसेनांकडे बघितलं. त्यानं कसलंच उत्तर दिलं नाही. डोळ्यांनीच माझा प्रश्न ताडला. आपल्या कटीच्या वनवासी पांढऱ्या अधरीयाचा काचा कसतच तो म्हणाला, “जरा थांब, हा आलोच मी तुला आवडलेली कमलफुलं घेऊन!” सर्व बंधू बघत असताना तो सरोवरात झेपावलाही. गोरेपान पिळदार बाहू, सपासप चालवत जलाशय चिरत कमलपुष्पांपर्यंत पोहोचला. मंडलात उमललेल्या त्या सुंदर, काषाय पुष्पांभोवती एकदा फिरला. निवडक अर्धोन्मीलित व नुकतीच फुललेली विपुल फुलं त्यानं हेरली. तशीच ती पटापट खुडली. एका काखोटीत बिंडा मारून, दुसरा हात जलावर चालवीत तो परतला. काखेतल्या कमलफुलांचा बिंडा त्यानं चारही भावांसमोर टाकला, वक्ष फुलवून मान मागे टाकत गदागदा हसून तो म्हणाला, “अर्जुना, माळ ती हिच्या केशात!” पाण्यात निथळणारा, गौरवर्णी, धिप्पाड व निरागस हसणारा तो भीमसेन, मी कधीच विसरू शकले नाही.

कुठल्याही स्त्रीला आपल्या पतीची खरी ओळख होते ती एकांतात, समागमात. मला तर पाच पती होते. एकांतातली त्यांची वृत्ती पाच प्रकारची होती. सगळं जीवनच उलगडून दाखवायचं म्हणून मी बोलते आहे. त्यासाठीच हेही विनासंकोच सांगणं, मला भाग आहे. खोटं नाही सांगत. युधिष्ठिर या पहिल्या पतीनंतर भीमसेनांची एकांताची पाळी आली. त्या पहिल्याच रात्री मी केवढीतरी धास्तावले. पण त्याच रात्री मला शोध लागला, तो ढगासारखं गडगडणाऱ्या अनावर संतापानं डरकाळणाऱ्या माझ्या वीर पती भीमसेनाच्या ठायी एक कमळपाकळ्यांसारखं संवेदनशील तरल मनही आहे, याचा. त्यानं एकांतात माझ्याशी कधीच धसमुसळेपणा केला नाही. म्हणून तर एक स्त्री म्हणून मला तो सर्वाधिक आदर्श पती वाटला. होय, मला पणात जिंकणाऱ्या अर्जुनापेक्षाही!

भीमसेनापासून मला एक पुत्र झाला. त्याचं नाव कृष्णानंच ठेवलं ‘सुतसोम’ तो पित्यासारखाच सशक्त निपजला. पराकोटीचा अवखळही.

भीमसेनानंतर जन्मक्रम होता, तो माझ्या तिसऱ्या पतिदेवाचा, अर्जुनाचा. धनुर्धर धनंजयाचा – पराक्रमी पार्थाचा! मला पहिल्याच बाणात अचूक लक्ष्यभेद साधून स्वयंवरात जिंकणाऱ्या नरोत्तमाचा. त्याची एकच गोष्ट मला कधीही पटली नाही. ती म्हणजे, त्यानं माझ्या विभाजनाच्या वेळी धारण केलेलं, वीराला न शोभणारं मौन. आपल्या मातेची आज्ञा आणि ज्येष्ठ बंधूंची इच्छा आपण पाळली, हे समर्थन नंतर एकांतात त्यानं अनेक वेळा मला दिलं. मात्र मला ते कधीच पटलं नाही. त्यानं त्या दोघांचा ज्येष्ठ म्हणून आदर राखायला काहीच हरकत नव्हती. कुणाचीही ती असू शकत नव्हती. पण मला त्याच क्षणी कळून चुकलं की, हा ऐन प्रसंगी स्कंधावरचं गांडीव केव्हाही पायांशी फेकेल.

स्वयंवरानंतर मी अनेकवेळा विचार केला की, माझ्या विभाजनाच्या वेळी माझ्या पतीच्या ठायी - अर्जुनाच्या ठायी श्रीकृष्ण असता तर? काय केलं असतं त्यानं? तोही वडीलधाऱ्यांचा आदर जीवनभर राखत आला होता. तो बसला असता गप्प मौन साधून?

नक्कीच नाही. त्यानं त्या क्षणीच ज्येष्ठपणाची झूल पांघरणाऱ्यां आपल्या बंधूला, स्पष्ट बोलून त्याचे दोष ऐकविले असते. मातेचं वचन पाळण्यासाठी तिच्या इच्छेप्रमाणे सर्व केलंही असतं. म्हणूनच मला अर्जुनाचं त्यावेळचं मौन सतत अक्षम्य वाटत आलं आहे. तो अवसानघातकी आहे, हे केव्हाच मी ताडलं. त्याला अशा प्रसंगी चार कडक बोल ऐकवून पुन्हा सुरावर घेण्याचं सामर्थ्य होतं, ते एकट्या कृष्णाठायी!

माझ्या पहिल्याच भेटीच्या वेळी मी या पाचही पतींचा स्वीकार, तोही हसतच केला पाहिजे, हेही त्यानंच मला पटवलं होतं. एक स्त्री म्हणून माझ्या पतींविषयी कृष्णाशी बोलताना मला कधीच व कसलाही संकोच नाही वाटला. त्याच्याशी जमलेल्या सख्यत्वाचा हाही एक पडताळा होता.

माझ्या सर्व आप्तगणांना वाटत होतं की, अर्जुनच माझा प्रिय पती आहे. सर्व इंद्रप्रस्थकरांनाही तसंच वाटत होतं आणि जेव्हा-जेव्हा मी पार्थाला पुरुषोत्तम वासुदेवासह पाहिलं, तेव्हा मलाही असंच वाटलं. दोघांचेही वर्ण नीलच होते. उंची जवळ-जवळ सारखीच! ते आकृती-सावलीसारखेच दिसत. बिंब-प्रतिबिंबासारखेच वाटत आणि या सर्वांहून एक महत्त्वाचं कारण होतं की, मी ज्याला सखा मानलं होतं त्या कृष्णानं, सर्व पांडवात एकट्या अर्जुनालाच काय तो सखा मानलं होतं. इतर कुठल्याही पांडवाच्या भाग्याला काही ते आलं नव्हतं.

शेवटचे दोन पांडव नकुल-सहदेव. ते मला पतीपेक्षा मित्रच अधिक वाटत आले. एकांतातील दोघांचाही संकोची स्वभाव मलाच पुढाकार घेऊन बदलावा लागला होता. या दोघांचं कुणालाच न जाणवलेलं एक खास वैशिष्ट्य होतं. ते म्हणजे, वरच्या तीनही पांडवांबद्दल जे आणि जसं मला जाणवत आलं, नेमकं ते आणि तसंच या दोघांनाही जाणवलं. दोघेही जसे आपल्या बंधूंपेक्षा वयानं लहान होते, तसेच माझ्याहूनही लहान होते. पण मी त्यांना ते कधीच जाणवू दिलं नाही. जसं राजमाता कुंतीदेवींनी त्यांना ते सापत्न पुत्र आहेत, हे जाणवू दिलं नव्हतं; तसंच मीही कटाक्षानं पाळलं.

दरवर्षी एक पुत्र याप्रमाणे मला या पाचही पतींपासून पुत्रप्राप्ती झाली. अर्जुनापासून मला झालेल्या पुत्राचं नाव 'श्रुतकीर्ती'. हे नावही द्वारकेहून येऊन कृष्णानंच ठेवलं होतं. याच्या नावाचा अर्थ होता, सर्वांनीच ज्याची कीर्ती ऐकली आहे तो! नकुल-सहदेव यांच्यापासून झालेल्या माझ्या पुत्रांची नावं होती, 'शतानिक' आणि 'श्रुतसेन' अशी! शतानिक आपल्या पित्यासारखा, नकुलासारखा अप्रतिम सुंदर होता.

पांडवांच्या या तिसऱ्या पिढीतील पाचही पुत्रांचं संगोपन मी कसं केलं असेल, ते माझं मलाच माहीत! मी सर्व पांडवांना 'तात' म्हणायला या पाचही पुत्रांना शिकवलं. त्यांनी आपल्या पित्यापेक्षा माझ्या दुसऱ्या पतीला कुणाच्याही शिकवणुकीमुळे चुकूनही 'काका' म्हटलं असतं, तर भविष्यात त्या सर्वांपुढे कित्येक यक्षप्रश्न उभे राहिले असते. मुलंही गुणवान, समजदार होती. शिवाय अनुभवी राजमाता माझ्या सोबतीला होत्या. माझी पाचही मुलं मला हवी होती तशी, 'पांडवपुत्र' म्हणूनच ओळखली जात.

पांडवांचं काय, कुरूंचं काय, यादवांचं काय, एक प्रमुख वैशिष्ट्य होतं – बहुपत्नित्व! त्याचं समर्थन ते 'क्षत्रियांना हे आवश्यकच आहे' असं करीत. जवळ-जवळ सर्वांनाच एकाहून अधिक पत्नी होत्या. उद्धवदेवांसारखा एखादाच याला अपवाद होता. म्हणूनच तर ते सर्वत्र वंदनीय होते. या बहुपत्नित्वाच्या प्रथेमुळे प्रत्येक योद्धयाच्या जीवनात येणाऱ्या प्रथमपत्नीला अनेक आघाड्यांवर पराकोटीची धावपळ करावी लागे. या

विषयी रुक्मिणीवहिनी या मी मानलेल्या सर्वाधिक आदर्श कुलस्त्री होत्या. ज्या-ज्या वेळी त्यांची भेट घडली, त्या-त्या वेळी त्यांनी मला 'वीरपुरुषांना कसं प्रेमबंधनात ठेवावं', याची दीक्षाच दिली होती. एका दृष्टीनं मी भाग्यवान होते की, माझं हे रुक्मिणीवहिनींशी असलेलं सख्य, अर्जुनाचं कृष्णाशी असलेल्या सख्यासारखं कुणाच्याही डोळ्यावर आलं नव्हतं. मात्र कृष्णाशी असलेल्या माझ्या सख्यात व रुक्मिणीदेवींशी असलेल्या माझ्या सख्यात कितीतरी अंतर होतं. पांडवांची महाराणी म्हणून मी रुक्मिणीवहिनींना आदर्श मानलं होतं. पण कृष्णाला? - त्याला सखा मानलं होतं, ते संपूर्ण जीवनाचा आदर्श म्हणून.

माझ्या पाचही पतींच्या बहुपत्नित्वाला मला सतत तोंड द्यावं लागलं. युधिष्ठिरानं नंतर पौरवी नावाच्या स्त्रीशी विवाह केला. त्या दोघांना देवक नावाचा पुत्र झाला. भीमसेनाला माझ्या विवाहाअगोदरच हिडिंबा नावाची आदिवासी पत्नी होती. तिलाही एक पुत्र झाला. त्याचं नाव घटोत्कच. जन्माच्या अधिकारानं पांडवांच्या तिसऱ्या पिढीतील हा पहिला अंकुर. हिडिंबा कधीच इंद्रपस्थात किंवा हस्तिनापुरात आली नाही. गंगेच्या पलीकडे असलेल्या अरण्यात, माहेरीच राहिली. मला हे सर्व स्वयंवरानंतर कळलं. कळलं तरी वळवून घेताना पुन्हा कृष्णाचंच मार्गदर्शन कारणीभूत ठरलं. त्याच्या इंद्रप्रस्थातील पहिल्याच भेटीत त्यानं प्रेमळ अगत्यानं मला विचारलं, "कृष्णे, पाचही पतींच्या सहवासात तू आनंदी तर आहेस? कुणाशी काही तंटा?" मी हिडिंबेचा विषय चर्चेत घेऊन म्हणाले, "उद्या घटोत्कचच दत्त झाला सर्वांसमोर - मी तिसऱ्या पिढीतला पहिला पांडव म्हणून – तर?" तसं नेहमीचं खट्याळ हसून तो म्हणाला, "काही काळजी करू नकोस श्यामले. तसा प्रसंग आला, तर घटोत्कचच सर्व पांडवांना संकटातून वाचवील. कितीही केलं, तरी भीमसेनाचा तो प्रथमपुत्र आहे आणि असं बघ की, माझीही एक प्रिय पत्नी जांबवती – हिडिंबेसारखीच आहे." त्यानं मला निरुत्तर केलं. त्याचं हेच वैशिष्ट्य होतं की, तो कुठला संदर्भ कसा नि केव्हा समोर ठेवील, ते सांगता येत नव्हतं. माझ्या भोवतीच्या सर्व-सर्व वीर पुरुषांत तो अजोड बुद्धिमान होता. त्याच्याशी वाद घालण्यात मलाही आनंद वाटे. अशा वेळी शेवटी तो म्हणे, "पांचाली, खरोखरच तू बुद्धिमान आहेस. माझ्या प्रिय पत्नी रुक्मिणीपेक्षाही. म्हणूनच मला प्रिय आहेस - सखी म्हणून! एकच कटाक्षानं कर, माझं हे मत तिला कधीच सांगू नकोस."

भीमसेनाच्या तिसऱ्या पत्नीचं नाव होतं, बलधरा. ती काशीराजकन्या होती. तिच्या पुत्राचं नाव होतं, शर्वत्रात. भीमसेनाच्या चौथ्या पत्नीचं नाव होतं, काली. ही कृष्णाच्या दमघोष-श्रुतश्रवा या आतोबा-आत्याबाईंची कन्या होती. हा विवाह तर कृष्णानंच पुढाकार घेऊन केला होता.

भीमसेन एकांती जीवनात मला 'सुभगे' म्हणे. मलाही ते आवडे.

माझा तिसरा पती अर्जुन! त्याच्या हातून आम्ही सर्वांनी मान्य केलेल्या आचारसंहितेचा एकदा भंग झाला. त्यामुळे तो एक वर्षाच्या तीर्थयात्रेला गेला होता. इंद्रप्रस्थात परतण्यापूर्वी त्यानं चक्क तीन विवाह केले होते. पहिली होती, नागकन्या उलूपी. ही गंगेकाठच्या कौरव्य नागाची कन्या होती. बालपणीच हिचा विवाह ऐरावत नागाच्या पुत्राशी झाला होता, पण तो पुत्र वारल्यामुळे तर ही उलूपी बालविधवा होती. माझ्या या तिसऱ्या पतीनं तिच्याशी गंगेकाठी गांधर्वविवाह केला. पुढे तिला झालेल्या पुत्राचं नाव नागांनी इरावान ठेवलं. ही उलूपीही तिच्या माहेरी कौरव्य

नागाकडेच राहिली.

तीर्थयात्रेत पुढे मणिपूरला गेलेल्या माझ्या या पतीनं तिथल्या चित्रवाहन नावाच्या राजाची कन्या चित्रांगदा हिच्याशी विवाह केला. तिला झालेल्या पुत्राचं नाव मणिपूरकरांनी बभ्रुवाहन ठेवलं. आमच्या राजसूय यज्ञासाठी चित्रांगदा या पुत्रासह इंद्रप्रस्थात आली होती.

माझा हा तिसरा पती अर्जुन – तो कृष्णाला अतीव प्रिय असल्यामुळे मलाही तसाच प्रिय होता. तसा आम्हा तिघांचा इतर सर्वांना कळायला कठीण असा भावत्रिकोण होता. अर्जुनानं त्याचा भावचौकोन केला – सुभद्रेचं हरण करून! सुभद्रा ही त्याची चौथी पत्नी. माझ्या सर्व सवतींशी मी प्रेमाने वागले. त्यातही सुभद्रेशी अधिक प्रेमाने वागले. त्याला कारण, ती कृष्णाची भगिनी होती. सवत म्हणून मी तिला स्वीकारली – भगिनी म्हणून कृष्णासारखीच! तीही मला आल्या-आल्या 'ताई' म्हणून बिलगताना माझ्या कानात म्हणाली, "कृष्णादादानं मला सांगितलंय की, पांडवांत तुझा निभाव लागेल, तो द्रौपदीच्या स्नेहानं!" मीही समजायचं ते समजले. हा कृष्णाचा आपल्या भगिनीला दिलेला परामर्श नव्हता, तर माझ्यासाठी परस्पर दिलेला आदेशही होता आणि कृष्णाचा आदेश द्रौपदी कशी काय नाकारणार होती? माझ्या या प्रिय भगिनी सुभद्रेलाही एक पुत्र झाला. कृष्णानंच त्याचं नाव 'अभिमन्यू' ठेवलं. मलाही ते आवडलं. हा अभिमन्यू माझ्या तोंडी माझ्या अर्जुनपुत्र 'कीर्ती'सारखा 'अभि' झाला. कृष्णाचा भाचा म्हणून नव्हे; तर वागणं, दिसणं, पराक्रम यामुळे तो सर्वांनाच प्रिय झाला. कृष्णभगिनी म्हणून माझ्या ठायी सुभद्रेबद्दल असलेलं प्रेम, 'अभि'ची माता म्हणून अधिक वाढलं. विशेष म्हणजे अर्जुनाशिवाय इतर सर्व पांडवही 'अभि'चे मनापासून लाड व कौतुक करीत. तो होताच तसा – सर्वांना हवाहवासा! त्याच्याविषयी अर्जुनाचा एक सुक्ष्म मनोभावही मी बारीक टिपला होता. सर्व पांडवपुत्रांत अर्जुन त्याला कणभर उजवं माप नकळत देई. ते अभिसाठी होतं की कृष्णासाठी, हे मात्र मला खूप विचार करूनही समजून येत नसे. अर्जुन एकांतात मला 'सुरेखा'... 'श्यामा' म्हणे. आम्हा तिघांच्या म्हणजे माझ्या, कृष्णाच्या व अर्जुनाच्या वर्णात सावळेपणाकडे वळलेली एक छटा होती.

माझा चौथा पती नकुल अप्रतिम सुंदर होता. मी काही मदन पाहिला नव्हता. पाहण्याची इच्छाही नव्हती. पण सर्व जण नकुलाला मदनाचा पुतळा म्हणत. सर्व यादवही कृष्णाच्या प्रथमपुत्राला, प्रद्युम्नाला तसंच म्हणत. या दोघांच्यात आपसूक मिसळला जाईल असा वर्ण होता, तो एकटया उद्धवदेवांचा. नकुल, प्रद्युम्न आणि उद्धवदेव एकत्र बोलत उभे राहिले की, लांबून बघणाऱ्याला पटकन कुठला कोण, हे ओळखूच येत नसे. नकुल भुयार व अश्वतज्ज्ञही होता. त्याला शिशुपालवधानंतर त्याची कन्या करेणुमती विवाहात देण्यात आली. हे सर्व राजकारणाचं व नात्याचं गारूड जुळवून आणण्यात सर्व पुढाकार होता, तो कृष्णाचा! करेणुमती ही नात्यानं तशी सर्व पांडवांच्या मावसभावाची कन्या, म्हणजे चक्क भाची; पण ती नकुलाची कृष्ण-आदेशानं पत्नी झाली. तिला निरमित्र नावाचा मुलगा झाला.

नकुल एकांतजीवनात मला 'याज्ञसेनी' म्हणे.

शेवटच्या पाचव्या क्रमांकाचा माझा पती सहदेव! याला ज्योतिषाचं वेड होतं. कधी-कधी तो माझा डावा तळहात बघून माझं भविष्यही सांगे! ते ऐकून घेऊन मी त्याला

हसून म्हणे, 'एकदा कृष्णाचे दोन्ही हात बघून, त्याचंही भविष्य सांगायला काय हरकत आहे!' तसं तो कपाळावर आठयांचं जाळं उठवीत निमूट कक्षाबाहेर निघून जाई. तो गोतज्ज्ञ व अश्वतज्ज्ञही होता. त्याला माझ्याशिवाय तीन पत्नी होत्या. त्यातील मद्रदेशीच्या पांडवांच्या मामा शल्याची मुलगी विजया, ही एक होती. ही मामेबहीण असून सहदेवाची पत्नी झाली. तिच्या पुत्राचं नाव ठेवण्यात आलं, सुहोत्र!

सुभद्रेसारखी द्वारकेच्या यादवांची आणखी एक कन्या पांडवांत आली. ती होती, भानू राजाची कन्या भानुमती. यातही कृष्णानंच पुढाकार घेतला. तिला काही पुत्रप्राप्ती झाली नाही.

सहदेवाची चौथी पत्नी होती, गिरिव्रजाच्या मगधसम्राट जरासंधाची कन्या. जरासंधपुत्र सहदेवाची भगिनी. म्हणजे या मागधीच्या पतीचं आणि भावाचं एकच नाव होतं, सहदेव!

सहदेव एकांतात मला 'पांचाली' म्हणे. त्याचा पाचवा क्रमांक, हे त्याचं कारण असावं.

युधिष्ठिर हा ज्येष्ठ पांडव माझा प्रथमपती. युधिष्ठिर खरोखरच ज्येष्ठ भ्राता म्हणून शोभणारा होता. आपल्या प्रत्येक भावाच्या ठायी कसकसली गुणवत्ता आहे, याचं त्याला अचूक भान होतं. सर्व पांडव ज्येष्ठ म्हणून जसं युधिष्ठिराला मानत, तसं युधिष्ठिर कुठल्याही विषयातला अंतिम शब्द म्हणून मातेला मानी.

एकांतातल्या माझ्या सहवासात या ज्येष्ठ पांडवाचं मला अधिक सखोल दर्शन घडलं. भावंडातलं ज्येष्ठत्व, इंद्रप्रस्थाचं राजेपण, युद्ध, माझ्याशी असलेलं पतीचं नातं या सर्वांपेक्षा त्याचा ओढा होता, जीवनाच्या पूर्णत्वाकडे. तो ऋषिमुनी आणि ब्रह्मवृंदात अधिक रमणारा होता. त्याच्या चर्चा महात्मा विदुर आणि उद्धवदेव व मध्येच इंद्रप्रस्थात येणाऱ्या मुनिवर व्यास, याज-उपयाज यांसारख्या ऋषिमुनींशी अधिक काळ चालत. अशा चर्चांनंतर एरवी आपल्या मातेचा प्रत्येक शब्द ब्रह्मवाक्य मानणारा हा ज्येष्ठ पांडव, तिलाही काही जीवनसिद्धान्त समजावून सांगी. अशा वेळी त्याची चर्या उद्धवदेव, महात्मा विदुर यांच्यासारखी भासे. कधी-कधी तो कृष्णासारखाही वाटे. या ज्येष्ठ पांडवाची वाणी अतिशय संस्कारशील व मधुर होती. तो क्वचितही रागवत नसे. आपला सर्व क्रोध जसा काही त्यानं भीससेनालाच देऊन टाकला होता. हस्तिनापूरच्या कौरवश्रेष्ठ दुर्योधनात आणि याच्यात मोठं अंतर होतं, ते इथेच. दुर्योधनानं सर्व भावंडांचा क्रोध व रोष ओढून घेतल्यासारखा आपल्यातच मुरवला होता. दुःशासन, विकर्णासारखे दोन-चार कौरव सोडले, तर सर्व कौरव दुर्योधनाच्याच तोंडून बोलतात, असे वाटे. माझ्या पाचही पतींचं मात्र तसं नव्हतं. त्यांना प्रत्येकाला स्वत:चं असं विशेष व्यक्तिमत्त्व होतं.

माझ्या या प्रथमपतीला लाभलेली कारुण्याची देणगी अजोड होती. ते कारुण्य अनेक विपदा सहन केलेल्या कुटुंबातील एका ज्येष्ठ पुत्राचं होतं. यशस्वी झालेल्या इंद्रप्रस्थाच्या सर्वाधिकारी अभिषिक्त राजाचं होतं. त्याला पूर्णत्वाची अंगभूत ओढ असल्यामुळे, ते थेट त्याच्या प्राणांना भिडलं होतं, असं अनेकांच्या प्राणांना भिडलेलं अभिजात कारुण्य, म्हणजेच तर धर्म असतो. अशा कारुण्याचा अधिकारी म्हणूनच तर त्याला सर्व इंद्रप्रस्थकर 'धर्मराज' म्हणत आले होतं. मलाही तो तसाच वाटला होता.

माझा द्वितीय पती भीमसेन. कसा दिसला व वाटला मला हा द्वितीय पती? तो

जसा अमाप सामर्थ्यशाली होता, तसाच विनयीही होता. हा त्याचा नम्रपणा मला बघायला मिळे, तो त्याच्या माता व ज्येष्ठ बंधूसमोर. आणखी दोन व्यक्ती होत्या, त्या म्हणजे माझा सखा कृष्ण आणि त्याचा बंधू बलरामदादा. भीमसेन अचाट शक्तिशाली होता म्हणून तो बुद्धिमान नव्हता, असा अनेकांचा अपसमज होता. द्यूताच्या प्रसंगी त्याने काढलेले उद्गार नंतर मला समजले. ते मी शब्दश: फोडून पाहिले. तो म्हणाला होता 'सहदेवा, थोडा अग्नी आण. द्यूत खेळणारे याचे हातच जाळून टाकतो.' या उद्गारात त्याची बुद्धिमत्ता व प्रसंगावधान स्पष्ट होत नाही काय? त्यानं आज्ञा केली, तीही सर्वांत धाकटचा बंधूला! आणि तो म्हणाला तेही 'द्यूत खेळणारे याचे हातच जाळून टाकतो' असं! तो संतापापोटीही असं नाही म्हणाला की, 'द्यूत खेळणाऱ्या या युधिष्ठिरालाच जाळून टाकतो.'

'आमच्या दैनंदिन जीवनात तर भीमसेनाच्या तत्पर बुद्धिमत्तेची अनेक उदाहरणं दिसून येत. मला सरोवरातून काषायकमलं आणून देणारा भीमसेन, बकासुराला 'अगोदर अन्नभक्षण करतो. मग तुझा समाचार घेतो' असं म्हणणारा भीमसेन संयमी आणि बुद्धिमान नाही, असं कुणी म्हणावं? त्याचं अजोड सामर्थ्य हे आमच्या कुटुंबाचं अभेद्य कवच होतं, स्वत: त्यानं मात्र कधी चुकूनसुद्धा त्याचा उच्चार केलेला नव्हता. हा केवढा त्याचा विनय! कुठल्याही शक्तिशाली पुरुषाचे काही नैसर्गिक आवेग, इतरांना थक्क करणारे असतात. भीमसेनाची निद्रा आणि भूक तशीच होती. तो नुसताच खात नसे. चवीनं भोजन घेत असे. आपणाला आवडणारी फळं, पुत्र सुतसोमासह तो सर्वच पुतण्यांना खायला लावी. त्यांच्याशी न कंटाळता व्यायामशाळेत एकरूप होई. उंच व सुदृढ भीमसेन त्या मानानं कमी उंच व कृश मातेशी ज्या नम्रभावानं बोलत असे, ते बघणं हा एक आनंदी अनुभव होता.

एकांतात मला भेटलेला भीमसेन हा सर्वाधिक आदर्श पती होता. त्याच्या ठायी संगीताची, सौंदर्याची किती खोल जाण आहे, याचा मला त्याच्याशी झालेल्या एकांती संभाषणात प्रत्यय येई. पत्नी म्हणून माझं मन एवढंसंसुद्धा दुखावलं जाणार नाही, याची तो काटेकोर दक्षता घेई. अशा सहवासात मला हिमालयाच्या एखाद्या भक्कम शिखराच्या आश्रयाला असल्यासारखं वाटे.

भीमसेनाचं सर्वच भावंडांवर नितांत व निरपेक्ष प्रेम होतं, माझ्या श्वशुर पांडुमहाराजांना मी काही कधी पाहिलं नव्हतं. ते दिग्विजयी सम्राट होते म्हणे. त्यांची उणीव कुटुंबात या भीमसेनानं अबोल राहून भरून काढली होती. 'तो नसताच तर' अशा प्रश्नातच त्याच्या असण्याचं सर्व श्रेय लपलं आहे, असं मला वाटे. आपल्या प्रचंडदेही गदेच्याही गतिमान हालचाली करून तो आपलं 'वायुपुत्र' हे नाव सिद्ध करी. वायूसारखाच सर्वत्र जीवन फुलवीत-खुलवीत जाई.

माझा तिसरा पती अर्जुन. त्याला पार्थ व धनंजयही म्हणत. कृष्ण तर त्याला गुडाकेशही म्हणे. गुडाकेश म्हणजे निद्रेवर नियंत्रण असलेला सावध पुरुष. तो अष्टावधानी होता. प्रतिस्मृतीविद्येचा म्हणजे इंद्रजाल कलेचा अधिकारी होता. माझ्या या पतीचे लौकिक अर्थाने गुरू दोन – एक द्रोण व दुसरे कृप. पण शस्त्रास्त्रं सोडून लौकिक जीवनार्थाचे खरे गुरू दोनच – एक ज्येष्ठ बंधू युधिष्ठिर आणि दुसरा माझा सखा कृष्ण. या दोघांच्या सहवासात आपलं लहानपण न सोडता, अबोल राहून तो बरंच काही शिकला. शस्त्रास्त्राचं ज्ञान पट्टीच्या गुरूंकडून घेतल्यामुळे तो त्यात पारंगत

झाला. तसाच तो युधिष्ठिर-कृष्णामुळे जीवन समजून घेण्यातही पारंगत झाला. कृष्णाची बहीण सुभद्रा ही त्याची शेवटची पत्नी. कृष्ण तर मला डिवचण्यासाठी नेहमीच्या खोडकरपणे म्हणे, 'कृष्णे, अर्जुनाचं खरं प्रेम सुभद्रेवरच आहे. अगं, वीरांची मनंही गवताच्या भाऱ्यासारखी असतात. त्याला कितीही करकचून पहिल्या बंधानं आवळलं, तरीही दुसरा बंध घालताच पहिला ढिला पडतो!' त्याची कोपरखळी परतवून लावताना मीही हसून म्हणे, 'कुणी सांगितलं तुला वीरांची मनं गवताच्या भाऱ्यासारखी असतात म्हणून? ती असतात यमुनेच्या पात्रासारखी!' तोही काही कमी नव्हता. खटयाळ हसून पुन्हा मला कोपरखळी देत म्हणे, 'तेच म्हणतो मी. वीरांची मनं यमुनेच्या पात्रासारखी म्हणजे यम+ना म्हणजे बंध नसलेली - निर्बंध असतात!' त्याला जराही हलू न देता त्याचं म्हणणं दूर फेकून देत मी म्हणे, 'यमुनेच्या पात्रासारखी म्हणजे दोन्ही किनारे सारखेच फुलवीत वाहणारी!'

सुभद्रेमुळे अर्जुनाच्या माझ्यावरील प्रेमात कमतरता येईल, ही अनेकांची समजूत खोटी ठरली. माझ्या श्रुतकीर्तीला व सुभद्रेच्या अभिला असं दोघांनाही दुहाती घेऊन अर्जुन अनेकवेळा माझ्या कक्षात येई, तसाच तिच्याही कक्षात जाई. त्या दोघांनाही धनुर्वेधाचे अवघड हात एकाच वेळी तन्मयतेनं शिकवी.

जेव्हा कृष्ण इंद्रप्रस्थात येई, तेव्हा अभिमन्यू व श्रुतकीर्ती यांचा आनंद कसा ओसंडून जाई. ते दोघेही 'मामा, मामा' म्हणत सतत त्याच्याबरोबरच राहत. तोही घटकान्घटका त्यांच्याशी भान विसरून बोले. माझे इतर पुत्र प्रतिविंध्य, सुतसोम, शतानिक आणि श्रुतसेन हेही तिथे असत. कृष्णाला सर्वांत अधिक प्रश्न विचारून भंडावून सोडी तो, आमचा अभि!

अभिमन्यू इंद्रप्रस्थाच्या नगरजनांतही इतर पांडवपुत्रांहून अधिक लोकप्रिय झाला होता. त्याला त्याचे गुण जसे कारणीभूत होते, तसंच नगरजनांचं कृष्णार्जुनावरचं प्रेमही कारणीभूत होतं.

कधी-कधी मला माझ्या पाचही पतींना, त्यांनी केलेल्या अधिकाच्या विवाहासंदर्भात चाचपून घेण्याची इच्छा होई. आपल्या सवती कशा आहेत, याचा कयास बांधण्याची ती स्त्रीसुलभ धारणाही असेल. इंद्रप्रस्थाचा महाराज व ज्येष्ठ पांडव युधिष्ठिर याला मी विचारी, ते थोडं तिरकसच असे. मी म्हणे "तुम्ही सर्व पांडव कृष्णाला फार मानता. त्याला मार्गदर्शक म्हणता. मग त्यानं एक नव्हे, दोन नव्हे, सोळा सहस्त्र कामरूपी स्त्रियांचं द्वारकेत पुनर्वसन केलं. तसं तुम्ही का नाही करीत?"

माझ्या या कोडचात घालणाऱ्या प्रश्नानं चक्रावून इंद्रप्रस्थाचा महाराज म्हणे "मी समजलो नाही तुला काय म्हणायचं आहे ते, महाराणी? जे श्रीकृष्णाला शक्य आहे ते आमच्यापैकी कुणालाच शक्य नाही. अशा सहस्त्रावधी स्त्रीया कशा काय आणणार आम्ही इंद्रप्रस्थात?" तो भाबडेपणी उत्तर देई. त्याला मला हव्या त्या सुरावर घेत मी म्हणे, "सहस्त्रावधी नाही, मोजक्याच. तुम्हा प्रत्येक बंधूच्या माझ्याशिवाय अनेक पत्नी आहेत. मला घाबरून त्या इंद्रप्रस्थात येत नाहीत, अशी बोलवा ऐकायला मिळते. काय हरकत आहे, प्रथम पौरवीला इंद्रप्रस्थात आणण्यात?"

माझा तो प्रश्न ऐकून पांडवांचा महाराज निःशब्द होई. तसा तो नेहमीच निःशब्द असल्यामुळे, निरुत्तर केव्हा झालाय, हे काही इतरांना समजत नसे - मी ते अचूक जाणे, मग पौरवीबद्दल मी विचारलेल्या सर्व-सर्व प्रश्नांना महाराज युधिष्ठिर 'हो-ना' अशा

मोजक्याच शब्दांत उत्तरं देई. माझ्या या विचारणा - सत्रातून मी कौशल्यानं माझी सवत - जी कधीच इंद्रप्रस्थात येणार नव्हती, तिच्याविषयीची सर्व-सर्व माहिती काढून घेई. कुणी सांगावं, भविष्यात तिचीही कुठंतरी आवश्यकता भासेल.

जसा युधिष्ठिराला विचारला तसा भीमसेनाला माझ्याशिवायच्या त्याच्या पत्नी - माझ्या सवती हिडिंबा व कालीबद्दल मी चाचपून पाही. मी त्याला एकांतात म्हणे, “असं हिडिंबेला भेटण्यासाठी अधूनमधून गंगेकाठच्या अरण्यात जाण्यापेक्षा, कालीला भेटण्यासाठी चेंदीच्या शुक्तिमती नगराला जाण्यापेक्षा, त्यांनाच इथे आणलं तर?” तसं मान मागे टाकून गदगद खळाळ हसताना निवळशंख मनाचा भीमसेन म्हणे “हिडिंबेला आणलं, तर इंद्रप्रस्थाचं पुन्हा खांडववन करावं लागेल! ते तुझ्या सख्या कृष्णालाही आता शक्य नाही आणि चेदींची काली पांडवांच्या इंद्रप्रस्थात कधीच येणार नाही. तू आडून बाण मारण्याचं सोडून दे. इथं इंद्रप्रस्थात तुझ्या सवती दोनच राहतील. त्याही यादवांकडील - सुभद्रा आणि भानुमती! त्या द्वारकेच्या असल्यामुळे तुला सवतीपेक्षा भगिनीच वाटतात, हे खरं नाही काय?” भीमसेन आपल्या काटेकोर बुद्धिमत्तेचा प्रत्यय देई.

अर्जुनाला माझ्याशिवाय त्याच्या अन्य पत्नींबद्दल मी असंच चाचपून घेई. दूरच्या पूर्वदेशीच्या उलूपी आणि चित्रांगदा यांचा निर्देश करून मी त्यांना इंद्रप्रस्थात आणण्याचा विषय छेडून बघे. तोही काही कमी नव्हता. मला उत्तर देई, “त्या दोघींचे देश फार लांब पूर्वदेशी आहेत. सत्यभामादेवी जशा वासुदेवाबरोबर त्याचं सारथ्य करीत दूरदेशी गेल्या, तशी तूही चल. घेऊनच ये त्या दोघींना इंद्रप्रस्थात. त्या अवश्य येतील. मात्र त्यांची एक अट राहील.”

“कोणती?” मी धनुर्धराला कुतूहलांन विचारलं.

तो हसला. त्याला हसताना बघून क्षणभर मी कृष्णालाच समोर बघत नाही ना, असा भास मला झाला. तो त्याच्या गुरूसारखंच - कृष्णासारखंच तिरकस म्हणाला, “त्यांची अट राहील, सुभद्रेला द्वारकेला परत पाठविण्याची!” ती ऐकून मी चक्रावूनच जाई. सर्वांत प्रथम विचार येई, तो सुभद्रेला असं माहेरी द्वारकेला पाठवलं, तर कृष्णाला काय वाटेल? मी गप्पच राही. तसं डिवचण्याची संधी कधीच न सोडणारा अर्जुन अचूक शरसंधान करीत म्हणे, “त्यापूर्वीची त्यांची अट असेल, ती तुझ्याबाबत! कारण तू प्रथमपत्नी आहेस. महाराणी आहेस आणि सर्वांत म्हणजे आमच्या वंदनीय रुक्मिणीदेवींसारखी अतुल बुद्धिमानही आहेस. एव्हाना तू ताडलंही असशील त्यांची अट कोणती असेल ते!”

मी पुन्हा निरुत्तर होई. गप्पच राही. कारण ती अट म्हणजे प्रत्यक्ष मलाच कांपिल्यनगराला पाठविणारी असणार, हे मी ताडलेलं असे. अर्जुनाला त्याच्या इतर स्त्रीयांबाबत कधीच चाचपून बघायचं नाही, हा निर्णय मी केव्हाच घेऊन टाकलेला असे.

अर्जुनाच्या अनुभवानं पुढच्या दोघांना मी याबाबत काहीच विचारायचं नाही, हाही निर्णय घेऊन टाकला.

मला पाचही पतींच्या मिळून अनेक सवती होत्या. त्यातील दोनच इंद्रप्रस्थात आल्या होत्या - सुभद्रा आणि भानुमती. नगरजनांना आणि दूरच्या आप्तांना एकच माहीत होतं - इंद्रप्रस्थाच्या महाराणी द्रौपदीला पाच पती आहेत, एवढंच अर्धसत्य.

तिला एक-दोन नव्हे, चांगल्या दहा सवती आहेत, हे फारसं कुणाला माहीत नव्हतं. याचं कारण काय होतं? एकतर त्यातील दोघींशिवाय माझ्या सर्व सवती इंद्रप्रस्थाबाहेर होत्या हे! व ज्या दोघी इंद्रप्रस्थात होत्या, त्या कृष्णाशी संबंधित असल्यामुळे सवतीपेक्षा माझ्या भगिनीच अधिक झाल्या होत्या.

कधी-कधी मी विचार करी की, राहिलेल्या माझ्या आठही सवती अधिकार सांगत इंद्रप्रस्थात आल्या तर! कसं वळण घेईल मग माझं जीवन? बहुपतित्वाबरोबर बहुसवतीत्वाला तोंड देताना, माझ्यातली पांचालांची याज्ञसेना वाहून तर जाणार नाही ना? मी मलाच उत्तर देई - तसं कधीच होणार नाही. कारण मी द्वारकाधीशांची भगिनी आहे, कृष्णाची सखी आहे.

माझ्या इंद्रप्रस्थातील वास्तव्यात मी ज्या दोन स्त्रियांच्या अधिक निकट गेले, त्या म्हणजे माझ्या सासूबाई राजमाता कुंतीदेवी आणि भगिनी सुभद्रा. सुभद्रेला भेटलं की, मला वाटे रुक्मिणीदेवीच भेटल्या. राजमाता कुंतीदेवी या प्रथम मला सासूबाई वाटल्या. पाच वीरपुत्रांची माता म्हणून त्या तशा होत्याही. सगळे इंद्रप्रस्थकर त्यांना राजमाता म्हणून आदरानं मान देत. त्यांचं बोलणं सुघड शिवालयातील घुमणाऱ्या मधुर घंटानादासारखं वाटे. त्यात 'शिव' तर असेच पण परिस्थितीचे टोल-तडाखे खाऊन मनाच्या गाभाऱ्यातून आलेला जाणता मधुरपणा असे. माझ्यासमोर आपल्या पाचही पुत्रांतील त्यांना जाणवलेला दोष त्या कधीच बोलून दाखवत नसत. भरभरून बोलत त्या पुत्रांच्या केवळ गुणांबद्दल. आपल्या पुत्रांचे दोष माझ्या कानी घालण्याचं काम त्यांनी कृष्णावर सोपविलेलं असे. तोही ते कौशल्यानं पार पाडी. माझ्या सासूबाई राजमातापदाला सर्वस्वी साजेशा होत्या. कृष्णानं जसं आपलं द्वारका जनपद आर्यावर्तात मानमान्यतेला नेलं होतं, तसंच या राजमातांनाही नवथर असलेलं आपलं इंद्रप्रस्थ गणराज्यही मानमान्यतेला न्यायचं होतं, आपली उत्तरदायी म्हणून त्यांनी सर्व कसोट्या लावून मला पारखलंही होतं.

माझ्या बालपणी जे काही संस्कार झाले, ते माता सौत्रामणीचे होते. इथे इंद्रप्रस्थात महाराणी म्हणून माझ्या मनाची जी जडणघडण झाली, ती या राजमाता कुंतीदेवींच्या संस्कारांवर.

या संस्कारांत सर्वांत कठीण व गुंतागुंतीचा होता, तो माझ्या पाच पतींशी होणाऱ्या एकांतवासाचा संस्कार. त्यासाठी सर्वानुमते एक आचारसंहिता आम्ही सिद्ध केली होती. तिचे सर्व बारकावे राजमातेच्या सूचनेनुसार तयार झाले होते. जेव्हा मी पाचही बंधूंची पत्नी व्हायचं ठरवलं, तेव्हा कांपिल्यनगर सोडतानाच राजमातेनं आपल्या पुत्रांना एक कठोर सूचना दिली होती. सर्वांनाच एकत्र घेऊन त्या म्हणाल्या होत्या "पांचालांची ही द्रौपदी तुम्हा सर्वांची पत्नी आहे हे जेवढं सत्य आहे, तेवढंच हेही सत्य आहे की, ती आता माझी पुत्रीच झाली आहे. तिच्या भवितव्याचं उत्तरदायित्व दोन नात्यांनी मला पार पाडावं लागणार. एक तिची सासू म्हणून आणि दुसरी तिची माता म्हणून. भिक्षा वाटून घेण्याचा माझा आदेश तुम्ही पाळलात. तिची विभागणी होताच पूर्ण दक्षतेनं मी दुसरा आदेशही देत आहे. "ती पत्नी म्हणून तुम्हा प्रत्येकाच्या एकांतात केव्हा व कशी यावी, हे मी ठरवेन. अर्थातच ते तुमच्या व तिच्या संमतीनंच असेल."

माझ्या पाचही पतींचा मला सर्वांत आवडलेला गुणविशेष म्हणजे त्यांची 'पारदर्शक मातृभक्ती' हा होता. आपल्या मातेवरील त्यांची भक्ती अजोड होती. त्यात तर-तम

काहीही नव्हतं. आपल्या मातेच्या शब्दासाठी प्राणही द्यायला त्यातील एकही मागे–पुढे पाहणार नव्हता. त्यांच्या स्वभावात, विक्रमात, रागलोभात अंतर होतं. त्यांची मातृभक्ती मात्र समतोल होती. त्यात पहिला म्हणून युधिष्ठिर अधिक किंवा शेवटचा म्हणून सहदेव कमी, असं काहीच नव्हतं. इतकंच काय, पण नकुल–सहदेव माद्रीदेवींचे पुत्र म्हणूनही त्यांच्या मातृभक्तीत डावं-उजवं काहीही नव्हतं. हे पाचही बंधू म्हणजे हाताच्या पाचही बोटांनी वळलेली सशक्त मूठ होती. त्या मुठीची कळ होती, त्यांची माता - राजमाता कुंतीदेवी - माझ्या सासूबाई.

काही दिवसांतच त्यांच्या नात्याचे हे दृढ धागे मला कळून आले होते. राजमातांनी मला कन्या म्हणून जवळ घेतलेल्या क्षणापासून माझ्या जीवनातील सौत्रामणीमातेची वाणही भरून निघाली होती.

माझ्या प्रत्येक पतीच्या एकांतवासाची जी संहिता ठरली, तीही युधिष्ठिराच्या व माझ्या राज्याभिषेकाच्या वेळी! तोपर्यंत मी कुंतीदेवीकन्या म्हणूनच वावरले. त्याचा सर्वाधिक एक लाभ मला झाला. माझ्या सासूबाईंच्या ठायी केवढी कणखर स्त्री आहे, हे मला जवळून बघता आलं.

आम्ही सहा जणांनी आखलेली माझ्या एकांतवासाची आचारसंहिता अत्यंत गुप्त होती. ती आम्हा सहा जणांशिवाय कुणालाच माहीत नव्हती. यातील राजमातेची प्रमुख भूमिका होती, ती माझ्या मार्गदर्शनाची. आपल्या एका आज्ञेवर मी पाच पती स्वीकारायला तयार झाले, यासाठी त्यांच्या मनी माझ्याविषयी अपार प्रेमभाव तयार झाला होता. त्यांना कन्या नव्हती, ही वाण त्यांनी माझ्याठायी तिला मानून भरून काढली होती.

राज्याभिषेकानंतर माझा पहिला एकांतयोग आला, तो युधिष्ठिराशी. माझ्या एकांतकक्षात प्रवेश करताच स्पष्ट दिसेल, असा एक मानचिन्हस्तंभ उठविण्यात आला होता. त्याच्यावर माझ्या प्रत्येक पतीचं प्रतीकच वाटावं, अशी खूण ठेवण्यासाठी एक पाषाणी खोबण खोदली होती. त्या खोबणीत युधिष्ठिराच्या एकांतसमयी पांडवांच्या राजदंडाची प्रतिकृती ठेवली जाई. भीमसेनाच्या एकांतसमयी त्यांचं प्रिय शस्त्र गदेची प्रतिकृती ठेवली जाई. अर्जुनाच्या समयी त्याचं प्रिय प्रतीक धनुष्य टांगलं जाई. नकुलाच्या वेळी खड्ग आणि सहदेवाच्या वेळी मुसल असे.

माझ्या एकांतकक्षातील पाचही पतींच्या सहवासातले माझे प्रेममग्न दिवस स्वर्गीय होते. या काळात मला माझ्या पाचही पतींतील एक सदैव लक्षात राहील, असं वैशिष्ट्य जाणवलं. एकानंही कधी दुसऱ्याच्या एकांतवासाविषयी एकही शब्द मला विचारला नाही. एकदा आचारसंहिता मानल्यानंतर ती आचरणात आणण्यात कुणीही चुकला नाही. इथेही त्यांच्या मनाच्या एकमेळाचा मला प्रत्यय आला. प्रत्येकाला आपण पाळतो, ते आचरण दुसराही पाळत असणार, याचा पूर्ण विश्वास होता. एकदाच गडबड झाली.

युधिष्ठिराची पाळी संपल्यानंतर एकांतस्तंभावर चिन्ह चढविणाऱ्या सेवकानं गदेऐवजी चुकून धनुष्य चढवलं. याचवेळी अर्जुनालाही चोरटे पळवून नेत असलेल्या एका ब्राह्मणाच्या गोधनाचं रक्षण करण्यासाठी आपल्या धनुष्याची आवश्यकता भासली. आचासंहितेचे सर्व संकेत बाजूला ठेवून, तो आमच्या एकांतकक्षात प्रवेशला. येताना त्यानं भीमसेनाची गदा आणली होती. स्तंभावरचं आपलं धनुष्य उतरवून, तिथे भीमसेनाची गदा त्यानं चढविली. हे सर्व करताना त्याच्या हालचालींत पराकोटीचा

नम्रपणा व मला जाणवेल अशी ओशाळगत होती. त्यामुळे तर अर्जुनाविषयीचं माझं प्रेम अधिकच वाढलं.

इंद्रप्रस्थाचं गणराज्य दिवसागणिक भरभराटत चाललं!. द्वारकेच्या यादवांचं आणि माझ्या माहेरचं पांचालांचं राज्य ही इंद्रप्रस्थाची प्रमुख मित्र गणराज्यं होती. जरासंधानंतर मगधराज्याचा धाक कितीतरी कमी झाला होता. द्वारकेचा डंका तर आर्यावर्तभर दुमदुमत होता. समुद्र पार करून त्याची कीर्ती कालयवनाच्या अंताबरोबर दूरदेशीही पसरली होती. द्वारका आता सुरचित बंदर म्हणूनही ओळखली जात होती. पश्चिमसागरातील देशोदेशीच्या विराट नौका आपापला ध्वज फडकवीत या बंदराला लागत होत्या. 'कृष्ण' या नावाला श्रीकृष्णाचं मोल प्राप्त झालं होतं. तो श्रीकृष्ण आता वासुदेव व भगवान म्हणून सर्वत्र मान्य झाला होता. तरीही अंतरीच्या ओढीनं मी त्याला कृष्णच म्हणत आले होते. त्यात काही चुकतंय, असं मला कधीच वाटलं नाही.

इंद्रप्रस्थ गणराज्याची सगळी ठेवण द्वारकेसारखीच होती. इथल्या राजसभेला सर्व पांडवांनी एकमतानं मिळून कृष्णाच्या स्मरणासाठी 'श्रीप्रसाद' असं नाव ठेवलं होतं. द्वारकेतील 'सुधर्मा' आणि इंद्रप्रस्थातील 'श्रीप्रसाद' या राजसभा म्हणजे दोन परस्परांत प्रेमाने गुंफलेल्या राजभगिनीच होत्या. आमच्या राजसभेची अंतर्गत रचनाही द्वारकेसारखीच होती. इंद्रप्रस्थाला घेर टाकून कृष्णाची लाडकी यमुना नदी फिरली होती. आम्हा पांडवांच्या राजसभेची रचना कुशल शिल्पकारांनी त्या यमुना-वळणाला समांतर अशी केली होती. त्यामुळे यमुनेवरून वाहणारे शीतल वारे आम्हा पांडवांच्या श्रीप्रसाद या राजसभेत पोहोचत.

इंद्रप्रस्थाची महाराणी म्हणून माझ्याकडे आलेलं उत्तरदायित्व होतं. वेगवेगळ्या स्वभावांच्या पाच पतींची मनं राखणं, त्यांच्या पाचही पुत्रांचं पालनपोषण करणं, राजसभेत जाणं, पतींचे दिग्विजय, त्यांना दिलेले निरोप, आगत-स्वागत यात मी पूर्णत: गुरफटून जाई. माझा प्रिय कृष्णसखा अनेकवेळा मला द्वारकेला येण्याचा आग्रह करी. मी त्याला 'हो, हो' म्हणे. मनात कितीही इच्छा असली, तरी माझं द्वारकेला जाणं काही घडत नव्हतं. रुक्मिणीवहिनींना, त्यांनी सांभाळलेल्या सातही भगिनींना एकदा तरी भेटावं असं वाटे. काही केल्या ते साधत मात्र नसे.

खांडववनात राजनगर इंद्रप्रस्थ उठविताना कृष्णाच्या ज्या काही इंद्रप्रस्थवाऱ्या झाल्या, त्याच आमच्या भेटी. मी रुक्मिणीवहिनींना प्रथम पाहिलं, ते आमच्या राज्याभिषेकाच्या वेळी! त्यांच्या प्रथम दर्शनानं तर मी दिपून गेले. खरोखरच त्या अप्रतिम सुंदर होत्या. सुबद्ध अंगलटीच्या होत्या. त्या माझ्यासारख्या काही सावळ्या नव्हत्या. होत्या कोकमगौर. आपल्या पहिल्याच भेटीतही त्या आपल्या उद्धवभावजींविषयी भरभरून बोलल्या. त्यांच्या व कृष्णाच्या बंधुभावाच्या कितीतरी गोष्टी अमाप उत्साहानं त्यांनी मला सांगितल्या. बलिरामदादांच्या अनेक गमती ऐकविल्या. बलिरामदादांच्या गोष्टी ऐकताना मी एकसारखी का हसते आहे, ते रुक्मिणीवहिनींना कळलं नाही. शेवटी न राहवून त्यांनी विचारलंच, "द्रौपदी, तुला मी दादांची काही चेष्टा करते आहे, असं तर वाटत नाही ना?" त्यामुळे मी पटकन म्हणाले, "तसं नाही वहिनी. आमच्याकडेही आहे एक वाण तुमच्या बलिरामदादांसारखा! त्यांचा शिष्यच आहे तो." मग तर आम्ही दोघीही खूप खदखदून हसलो.

रुक्मिणीवहिनींशी घटकान्‌घटका बोलताना मला पहिल्याच भेटीत तीव्रपणे

जाणवलं की, द्वारकेला एकदातरी जायलाच पाहिजे. तिथल्या वसुदेवबाबा, देवकी व रोहिणी माता, रेवतीताई, कृष्णाच्या इतर सर्व स्त्रिया, आचार्य सांदीपनी, गुरुपत्नी, त्यांचा पुत्र दत्त, यादवांचे दोन्ही सेनापती, गर्गमुनी या सर्वासर्वांना एकदातरी बघितलं पाहिजे. रुक्मिणीवहिनींच्या पहिल्याच भेटीत त्या आणखी एका स्त्रीबद्दल बोलल्या. ती होती कृष्णाची गोकुळातील सखी राधा - राधिका. कृष्ण तिला सखी कसं मानतो, हे त्यांच्या तोंडून ऐकताना मला जाणवलं की, माझ्या कृष्णाची दुसरी सखी - गोकुळाची राधिकाही मी कधीच पाहिलेली नाही. कशी असेल ती? कसं असेल तिचं गोकूळ?

रुक्मिणीवहिनींच्या पहिल्या भेटीनंतर माझा एक छंदच झाला. भेटेन तेव्हा कृष्णाला राधिकेविषयी नाना प्रकारानं विचारणं. तो केवढा चतुर होता! हसतच! मला म्हणे, "राधिका माझी सखी कशी हे माझ्या तोंडून ऐकण्यापेक्षा, तूच जा कशी एकदा गोकुळाला! समक्ष भेट तिला. तुझ्या बुद्धिकौशल्यानं तुला हवं ते-ते सर्व काढून घे तिच्याकडून!" तो मला निरुत्तर करी. त्याला पक्कं माहीत होतं की, मी काही कधी गोकुळाला जाणार नाही. मग तो निघून गेला की, माझी मी एकटीच मनोमन गोकुळीच्या राधिकेचं चित्र रेखाटण्याचा यत्न करी. माझ्या हातून काही ते कधीच पूर्ण झालं नाही!

माझ्या जीवनातील तीन वळणं अत्यंत महत्त्वाची होती. पहिलं - माझं स्वयंवर. त्यामुळे तर मला पाच पती लाभले. तशीच एक अनुभवी राजमाताही लाभली. पण नंतर मला अर्जुनाच्याच तोंडून कळून चुकलं की, त्या स्वयंवरामुळेच त्याला एका सर्वांत मोठ्या शत्रूलाही तोंड द्यावं लागणार होतं. तो होता स्वयंवराच्या स्पर्धेत मी नाकारलेला अंगराज कर्ण! स्वयंवरानंतर पेटलेल्या मंडपातीलच युद्धात त्याचा सुदामन नावाचा पुत्र मारला गेला होता, तोही अर्जुनाच्याच बाणानं. त्यामुळे संतप्त कर्णानं अर्जुनाच्या वधाची प्रतिज्ञा केली होती. अर्जुन त्या प्रतिज्ञेचं महत्त्व जाणून होता. तो त्यामुळे धास्तावलेला मात्र कधीच वाटला नाही. खांडववनात इंद्रप्रस्थ उठविताना कृष्ण अनेकवेळा द्वारकेहून इंद्रप्रस्थात येऊन गेला. त्या प्रत्येक भेटीत तो माझ्या पाचही पतींपैकी एकट्या अर्जुनाशी सर्वाधिक बोलला. ते दोघेही श्रीकृष्णाच्या गरुडध्वजरथातून दूर यमुनाकिनारी जात. अशा प्रत्येक भेटीनंतर मला दिसलेला माझा पती अर्जुन अधिक निर्धारी व तेजवंत दिसला होता.

माझ्या जीवनातील दुसरं लक्षणीय वळण होतं ते युधिष्ठिराचा व माझा राज्याभिषेक हे. या राज्याभिषेकासाठी दूरदूरच्या महाजनपदांचे राजे व महाराण्या आल्या होत्या. कृष्ण तर प्रमुख यादवांसह रुक्मिणीवहिनी व सुभद्रेला घेऊन, दोन्ही बंधूंसह आला होता. फार मोठ्या थाटामाटात साजरा झाला आमचा राज्याभिषेक. किती नरेशांच्या, त्यांच्या राण्यांच्या, सैनिक, सेवक-सेविकांच्या पंक्तींमागून पंक्ती उठल्या इंद्रप्रस्थात. त्याची गणतीच नाही. राज्याभिषेकाच्या मागे-पुढे चांगला मासभर यमुनाकाठचं इंद्रप्रस्थ कसं गजबजून उठलं होतं. पांडवांच्या नवथर राज्यासाठी उपहार म्हणून आलेल्या नानाविध वस्तूंचे ढीगच्या ढीग लागले होते. त्यात गांधार देशीच्या अश्व-उष्ट्रांपासून कामरूपातील गज ब्रह्मावर्ताच्या खोरीतील सकस गाई, पुष्ट सांड, अर्बुदगिरीतील चपळ कुत्री असे नानाविध प्राणी होते. तशाच हिमवनातील विविध वनौषधी, पंचनदातील जुन्या मद्याचे बुधले, मगधातील मध, अश्मकातील प्रतिष्ठानची तलम वस्त्रांची ठाणी, देशोदेशीच्या कलाकुसरीचे सोन्या-रुप्याचे अलंकार, नाना प्रकारची खड्गं, गदा, शर-चाप, मुसल, चक्र, अग्निकंकण, शतघ्नी, भृशुंडी, अशी

नानाविध शस्त्रं होती. शब्दश: खांडववनात पांडवांचं मंगलधाम इंद्रप्रस्थाच्या रूपानं उभं ठाकलं होतं. त्याचं सर्व श्रेय माझा सखा कृष्ण आणि त्याचे लक्षावधी कष्टाळू यादव व प्रिय बंधू धृष्टद्युम्न आणि त्याचे सहस्त्रावधी पांचाल यांना होतं. आम्हा पांडवांच्या इंद्रप्रस्थ गणराज्याच्या पाठीशी ते दोघे पर्वतासारखे उभे होते.

आता आर्यावर्तात सशक्त अशी तीन शक्तिकेंद्रं होती – पहिलं द्वारका, दुसरं हस्तिनापूर आणि तिसरं इंद्रप्रस्थ!

माझ्या जीवनातील तिसरं लक्षणीय वळण होतं, ते म्हणजे राजसूय यज्ञ हे! राज्याभिषेक ते राजसूय यज्ञ या कालावधीत अनेक घटनांचं पाणी यमुनेच्या पात्रातून वाहून गेलं होतं

मला महर्षी व्यासांनी राज्याभिषेकाच्या वेळी दूरदृष्टीनं एक सूचना दिली होती, 'तू हस्तिनापूरची स्नुषा आहेस, हे कधीही विसरू नकोस.' मी ते विसरले! विसरणं या सत्याला 'का?' असं पटणारं समर्थन कधीच देता येत नाही. विसरणं म्हणजे ध्यानी न राहणं. अनवधानानं घडत असली, तरी ती चूकच. राजसूय यज्ञाच्या वेळी मयासुरानं उठविलेल्या मयसभेच्या कक्षात माझ्या हातून ती अक्षम्य चूक घडली. एक मनोमन झालेल्या, पुढे मलाच न पटलेल्या सुप्त विचाराची आणि दुसरी मी काढलेल्या उद्गारांची!

हस्तिनापूरहून आलेल्या युवराज दुर्योधनानं मयसभेत प्रवेश केला. स्वयंवरानंतर मी अंगराजांना प्रथमच बघत होते. त्यांना बघताच माझ्या मनी एक अनावर विचार उसळला. माझ्या हिरण्यमयी नावाच्या सेविकेच्या कानात मी पुटपुटले, "हिरण्यमयी, या कवचकुंडलांचं पत्नीत्व दैवी आलं असतं, तर किती कारंजी फुलली असती माझ्या जीवनाच्या उद्यानात!" एवढ्यात दुर्योधनानं कुसरदार गालिचा समजून पाऊल टाकलं, ते नेमकं मायावी रांगोळीच्या जलपृष्ठावर पडलं आणि तो धाडकन समोरच्या जलाशयात कोसळला. मी माझ्या सेविकांसह तिथे सौधावरच उभी होते. कुरूंच्या त्या युवराजाला पाण्यात गटांगळ्या खाताना बघून मला काही हसू आवरलं नाही. मी हसतच सेविकांना म्हणाले, "अंध पित्याचे पुत्रही अंधच असतात की काय?" माझ्या सेविकाही ते बघून, ऐकून हसल्या. त्यांच्या हास्याचा कलकलाट ऐकून कुरूंचा अंगभर भिजलेला युवराज संतापानं कसा नुसता लालेलाल झाला. मुकुट व गदा जलाशयातच सोडून आग ओकणाऱ्या संतप्त नेत्रांनी माझ्याकडे बघत, काहीतरी पुटपुटत दणादण पाय आपटत मयसभेबाहेर निघून गेला.

मी त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघतच राहिले. आपलं काहीतरी चुकलंय, हे पटकन माझ्या ध्यानी आलं; पण आता काहीही उपयोग नव्हता. इतर कुणाचीही क्षमा मागून समजूत काढता आली असती. युवराज दुर्योधनाची कधीच नाही. निसटत्या अपघाती क्षणी हातून घडलेली अशी अक्षम्य चूक, संस्कारशील मनाला मग नंतर सतत टोचणी देत राहते. माझंही तसंच झालं. दुर्योधनानं कधीच केली नाही; पण मीही स्वत:ला त्या अविचारी, मूर्ख क्षणासाठी व उद्गारांसाठी क्षमा केली नाही.

राजसूय यज्ञात कृष्णानं सुदर्शनाचा शिशुपालावर केलेला प्रयोग मी समक्ष पाहिला. त्याचं ते डोळे दिपविणारं तेजवंत रूप मी भविष्यात कधीच विसरू शकले नाही. जग मला नेहमीच म्हणत आलं, 'तू यज्ञकुंडातून जन्मलेली अग्निकन्या आहेस.' मी आयुष्यभर पाहिलेला यज्ञकुंडातील अग्नी, अग्निकन्या म्हणून जीवनभर अनुभवलेला विचाराग्नी,

कृष्णाच्या त्या तेजवंत रूपासमोर काहीच नव्हता. त्याच क्षणी मला कळून चुकलं की, आपण मानतो तसा हा केवळ सखा नाही. त्याहून अधिक शब्दांत न पकडता येणारा, कसल्याही तराजूत न तोलता येणारा, अतर्क्य आहे. त्याला समजून घेण्यापेक्षा त्याला अनुभवून घेणं, हेच काय ते शक्य आहे.

शिशुपालवधाच्या अशौच्यामुळे त्या दिवशीचा राजसूय यज्ञ रहित झाला. नंतर लगतच योग्य मुहूर्त काढून राजसूय यज्ञ त्याच मंडपात संपन्न करण्यात आला. त्या यज्ञकुंडात समिधा वाहणारा कृष्ण मात्र वेगळाच दिसत होता. येणाऱ्या ऋषिमुनींना नमस्कार करीत तो किती निरागस हसत होता. मी पुन्हा त्याचाच विचार करीत असताना, आणखी एक घटना घडली. माझ्या शेजारी आसनावर बसलेल्या महाराज युधिष्ठिरांना भेटून त्यांचा निरोप घेण्यासाठी कुरूंचे गुरू द्रोण, पुत्र अश्वत्थाम्यासह आले. महाराज युधिष्ठिरांनी गुरू द्रोणांना आदरपूर्वक नमस्कार केला. त्यांनी पांडवांच्या महाराजांना मुखभर आशीर्वाद दिले. मीही त्यांना आदरपूर्वक नमस्कार करण्यासाठी वाकले. वर उठताना मात्र माझ्या मस्तकीचा तिकोनी राज्ञीमुकुट त्यांच्या अधरीयात अडकल्यामुले निखळून त्यांच्याच चरणांजवळ पडला. मी अंगभर चरकले. लगबगीनं खाली वाकून तो मुकुट आपल्या अधरीयाच्या शेवानं हळुवार पुसत गुरुवर्य द्रोणांनी माझ्या हाती दिला.

आम्हा पांडवांच्या दृष्टीनं अतिशय महत्त्वाचा असलेला राजसूय यश निर्विघ्न पार पडला. निर्विघ्नच म्हणायला हवा. कारण यज्ञात कृष्णाची निर्भर्त्सना करण्यात शिशुपालाचा अंतस्थ हेतू वेगळा होता. त्याला माझ्या स्वयंवरानंतर त्या मंडपात घडलं, तसंच युद्ध याही मंडपात घडवायचं होतं, या ना त्या कुठल्याही कारणानं पांडवांचा राजसूय यज्ञ पुरा होऊ द्यायचा नव्हता. राजसूय यज्ञ उधळला गेला असता, तर पांडवांची सर्वत्र घनघोर अपकीर्ती झाली असती. कृष्णाच्या द्वारका गणराज्याशी पांडवांच्या इंद्रप्रस्थाच्या जुळत चाललेल्या स्नेहात प्रचंड खीळ बसली असती. त्याला सेनापती करणाऱ्या परमस्नेही जरासंधाच्या वधाचा प्रतिशोध घेतल्याचं समाधान शिशुपालाला मिळणार होतं, त्याचं सर्वाधिक समाधान होतं, ते डोळ्यांदेखत आपली नियोजित पत्नी रुक्मिणीदेवीचं हरण करणाऱ्या काळ्याला योग्य शासन केल्याचं! खरोखरच शिशुपालाचा हेतू साध्य झाला असता तर! आमचा राजसूय यज्ञ उधळला गेला असता तर! कल्पनाच करवत नाही; पांडवांच्या जीवनाला आणि म्हणूनच माझ्याही जीवनाला, कसलं वळण लागलं असतं

यासाठीच राजसूय यज्ञ निर्विघ्न पार पाडल्याच्या परम समाधानात मी होते. उलट या यज्ञाच्या निमित्तानं घडलेल्या शिशुपालवधाच्या सत्यानं कृष्ण–पांडव यांच्या कीर्तीची ध्वजा कितीतरी उंचावली होती. तिची प्रेरक फडफड मुखोमुखी आर्यावर्तभर पसरली होती

इंद्रप्रस्थाच्या राजवास्तूतील माझ्या कक्षात एका भव्य दर्पणासमोर माझे विपुल व दाट केश सावरणं, हा एक विधीच असे. त्यासाठी मी निवडलेल्या चार–पाच कुशल सेविका चांगल्या घटिकाभर गुंतून पडत. दर्पणातील माझं प्रतिबिंब बघताना एकीकडे सेविकांशी बोलत माझी विचारलय लागून जाई. त्या तंद्रीत मी नेहमी माझ्या पाच पतींच्या आठवणी एकमेकींशी पडताळून पाही.

कधी–कधी ही विचारतंद्री मजेदार लय साधून जाई. मी विचार करी तो द्वारकेत,

इंद्रप्रस्थात आणि हस्तिनापुरात वावरणाऱ्या स्त्री–पुरुषामध्ये कुणाकुणाला आणि कसल्या–कसल्या दैवी देणग्या लाभल्या आहेत याचा! त्यात ठळकपणे सर्वप्रथम डोळ्यांसमोर येत ते कृष्ण आणि अर्जुन हे. दोघांचेही वर्ण निळसर होते. ते दोघेही आकृती आणि सावलीसारखे दिसत. दोघे एकत्र बोलत उभे राहिले की, कोण कुठला पटकन ओळखू येई, तो मस्तकीच्या मुकुटातील मोरपिसामुळं आणि वक्षावरच्या टवटवीत वैजयंतीमालेमुळं. परिचितांना अर्जुनही ओळखता येई तो त्यानं खांद्यावर धारण केलेल्या गांडीव धनुष्यामुळे.

कृष्णासारखी आजानुबाहूंची स्वर्गीय देणगी द्वारकेत एकटचा सेनापती सात्यकीला लाभली होती. तो विलक्षण पराक्रमी होता. बुद्धिमान होता. विशेष म्हणजे कृष्णावरील त्याचं प्रेमही अजोड होतं.स्वभावाच्या दृष्टीनं तो काहीसा बलरामदादाकडे झुकलेला होता.

हस्तिनापुरात जन्मजात दैवी देणग्या लाभलेले दुसरे दोन प्रमुख पुरुष होते. एक देवदत्त अभेद्य कवचकुंडल लाभलेला सूर्यभक्त अंगराज कर्ण आणि मस्तकी जन्मजात मांसल मणी लाभलेला गुरुपुत्र अश्वत्थामा.

भीमसेनाची प्रथम पत्नी वनकन्या हिडिंबा हिला मी प्रत्यक्ष कधी पाहिलं नव्हतं. पण ऐकून होते की, तिच्या पुत्राला – घटोत्कचाला जन्मजात काही मायावी शक्ती लाभल्या होत्या. तिन्ही ठिकाणच्या स्त्रियांमध्ये एकमेव मीच काय ती होते यज्ञजा, सुगंधी, सुकेशा.

माझ्या सासूबाई राजमाता कुंतीदेवी यांना फार वर्षापूर्वी मुनिवर दुर्वास यांच्याकडून देवहुती नावाचा दिव्यमंत्र लाभल्याचं मी अनेकांच्या तोंडून ऐकलं होतं. त्या मंत्रशक्तीचा प्रभाव या पाचही बंधूंवर होता. युधिष्ठिरावर पृथ्वीतत्त्वाचा, भीमसेनावर वायुतत्त्वाचा, अर्जुनावर जलतत्त्वाचा आणि नकुल–सहदेवांवर प्रकाशतत्त्वाचा. उषा आणि निशा एकमेकींना अस्पष्ट प्रकाश रेखेनं जोडलेल्या असतात, तसेच हे जुळे बंधू होते. मी या देवहुती मंत्रांच्या खोलार्थात कधीच शिरले नाही. मला त्याची आवश्यकताही कधी वाटली नाही. माझ्या आणि दादा धृष्टद्युम्नाच्या यज्ञीय जन्मात कधी कोणी फारसं खोलवर शिरलं नाही. कुणालाच त्याची कधी आवश्यकताही वाटली नाही.

हस्तिनापूर, इंद्रप्रस्थ आणि द्वारका या तिन्ही शक्तिकेंद्रांत सुदर्शनासारख्या तेजयंत्राचा एकमेव अधिकारी होता तो माझा सखा कृष्ण. त्याच्या तेजस्वी बुद्धिमत्तेची सर तर तिन्ही ठिकाणच्या का, आर्यावर्तातील कुणालाही नव्हती.

इतर अनेकांना कृष्णाविषयी अनेकदा एकच प्रश्न पडे; तो आपल्याकडच्या सुदर्शनाचा प्रयोग वारंवार का करीत नाही हा! राजसूय यज्ञाच्या मंडपात शिशुपालवध करताना त्यानं केलेला सुदर्शनाचा प्रयोग मी समक्ष पाहिला होता. तेव्हापासून तर हा प्रश्न माझ्याही मनी सतत उठत आला होता. त्याचा छडा लावल्याशिवाय माझ्या मनाला शांतता कशी ती वाटेना. म्हणून मी त्याला एकदा स्पष्टच विचारलं, “कृष्णा, तुझ्याकडे एवढं तेजयंत्र सुदर्शन असताना, त्याचा प्रयोग तू सर्वत्र का नाही करीत? त्याविषयी तुला कसलं बंधन तर नाही ना?”

तेव्हा तो हसून म्हणाला होता, “हा प्रश्न तू मला कधी ना कधी विचारणार, हे मला

माहीत होतं.सुदर्शन हे तेजयंत्र मला भगवान परशुरामांकडून प्राप्त झालं आहे. त्यांची आज्ञा आहे, तसं याचा केव्हाही उपयोग करायला मी मुक्त नाही."

त्याचं उत्तर ऐकून माझं कुतूहल अधिकच जागृत झालं. मी त्याला विचारलं, "जेव्हा तू याचा प्रयोग करतोस, तेव्हा तुला त्याची आतून स्पष्ट आज्ञा झालेली असते, असंच नाही काय?"

"खरोखरच द्रौपदी तू अतुल बुद्धिमान आहेस. तू या तेजयंत्रातील रहस्य अचूक ताडलं आहेस. उद्धवालाही ते तसं माहीत आहे. मी अट्टाहासानं सुदर्शनाच्या तेजयंत्राचा प्रयोग करायचं ठरवलं की, चमत्कारिकच अनुभव येतो. जवळ येणारे, हवेहवेसे वाटणारे मानसरोवरातील शुभ्रधवल हंसपक्षासारखे तेजयंत्राचे मंत्रबोल हां–हां म्हणता आठवेनासे होतात! मृगातील विजेच्या कडकडाटानं ते राजहंस कुठच्या कुठे पांगले जावेत, तसे दूर उडून जातात. मग येतो तो शारीरिक अनुभव पराकोटीच्या थकव्याचा असतो. त्या थकव्यात गोकुळातील गोपांचा किसन आणि यादवांचा नि तुझा कृष्ण, गर्ग, धौम्य, महर्षी व्यास यांचा श्रीकृष्ण समूळ वाहून जातो आहे की काय, असं वाटतं. सुदर्शनाच्या प्रयोगाचा विचार गोकुळीच्या गोपींनी यमुनेत कोजागिरीचे द्रोणदिवे सोडून मोकळं व्हावं, तसा दूर सोडून मोकळा होतो."

जिथे स्वत: कृष्ण आपल्याकडील तेजयंत्र सुदर्शनचक्र या दैवीशक्तीचा मनमुक्त वापर करायला मोकळा नव्हता, तिथे अन्यांची गोष्ट काय? इंद्रप्रस्थ, द्वारका, हस्तिनापूर या तिन्ही शक्तिकेंद्रांतील देवदत्त देणग्या लाभलेले कुणीही स्त्री–पुरुष त्यांचा लाभ उठविण्यासाठी मुक्त नव्हते. मीही तशी नव्हते. मला लाभलेल्या अपार सौंदर्यामुळे माझ्या ठायीसुद्धा एक अहंभाव आला आहे, याची मला पूर्ण जाणीव होती. ती जाणीव कृष्णानं अत्यंत कौशल्यानं माझं मन राखून मला वेळोवेळी स्पष्ट करून दिली होती. ती करून देताना तो हसत हसतच म्हणत आला होता, 'सौंदर्याला विनय शोभून दिसतो कृष्णे. अप्रतिम स्त्रीच्या ठायी तो असला, तर सुवर्णाला प्राजक्त फुलाचा सुगंध येतो!'

इंद्रप्रस्थातील माझ्या सर्व पांडवपुत्रांशी तर तो 'मामा' या नात्याने कितीतरी समरस झाला होता. त्यातही त्याचा सर्वाधिक प्रिय होता, तो सुभद्रेचा पुत्र अभिमन्यू. माझ्या पुत्रांत तो श्रुतकीर्तीशी अधिक बोले. तोही वेडा कृष्णाला कुणीच विचारणार नाही असे प्रश्न विचारून भंडावून सोडी. म्हणे, "कृष्णमामा, सर्व जण म्हणतात तुम्हाला ऐंशी पुत्र आहेत. मला सांगा, तुम्ही त्यांना नेमकं कसं काय ओळखता?"

कितीही झालं तरी तो कृष्णच होता. आपल्या भाच्याचं समाधान करतानासुद्धा तो त्याचं कुतूहल हेतुत: वाढवून देई. म्हणे, "माझ्या ऐंशी पुत्रांचं काय घेऊन बसला आहेस कीर्ती? एकदा हस्तिनापूरला जा. तिथे कुरू कुटुंबात शंभर कौरव आहेत. त्यांचे माता–पिता, तेही अंध असून आपल्या पुत्रांना अचूक कसे ओळखतात, ते बघून ये एकदा. तू थक्क होशील. ते आपल्या पुत्रांना नुसतं ओळखत नाहीत, तर आत–बाहेर चांगलेच ओळखतात."

इंद्रप्रस्थाची महाराणी म्हणून माझे दिवस असे आनंदात चालले होते. माझ्या सहा पुत्रांच्या पालनपोषणात, त्यांना संस्कारशील बनविण्यात मी दंग होते. होय, सुभद्रेचा अभिमन्यूही मी माझाच मानला होता. माझे पाचही पती विलक्षण पराक्रमी होते. त्यांनी आर्यावर्ताच्या चारही दिशांचे यशस्वी दिग्विजय केले होते. त्यामुळे धन–धान्य, वस्त्रं,

पशू, सेवक, सेविका यांची अगणित संपत्ती इंद्रप्रस्थात लोटली होती. आमच्या राज्याभिषेकानं त्यात कल्पनाही करता येणार नाही, अशी भर पडली होती. या संपन्न इंद्रप्रस्थाची, इथल्या सुशील स्त्री–पुरुष नगरजनांची मी आदरणीय महाराणी होते. पाच पराक्रमी पांडवांची प्रिय पत्नी होते. सहा आज्ञाधारक पुत्रांची वैभवी माता होते. राजमाता कुंतीदेवींची सर्वांत प्रिय स्नुषा होते. या सगळ्या–सगळ्यांहून अधिक मी होते, द्वारकाधीश कृष्णाची प्रिय सखी! खरोखरीच मला काय कमी होतं? दृष्ट लागावी, असंच हे जीवनवैभव नव्हतं काय?

पण 'नियतीच्या हातातील बाहुलं असलेल्या मानवानं कधीही मी भरून पावलो, मी कृतार्थ आहे, मला काय कमी आहे, मी सगळं–सगळं मिळविलं, असं कधीच म्हणू नये – मानू नये.' माझ्या मार्गदर्शक कृष्णसख्याची ही तर मला सतत दिलेली शिकवण होती. मात्र स्वभावधर्माप्रमाणे माझ्यातील आत्मगौरवी क्षत्राणी मधूनच जागृत होई. मी ही कृष्णशिकवण अजाणतेपणी विसरून जाई.

पांडवांचं गगनाला भिडलेलं अजोड वैभव त्यांची आर्यावर्तात पसरलेली अतुल कीर्ती, द्वारकेच्या कृष्णाशी असलेल्या दृढ स्नेहबंधाचा सर्वत्र वाजणारा डंका, हस्तिनापुरातील युवराज दुर्योधनाला कधीच मानवणारा नव्हता. खरंतर हस्तिनापूरच्या कुरूंचा तो युवराज नव्हता, पण आपण होऊन त्यानं हस्तिनापूर व इंद्रप्रस्थ राज्य विभक्त होण्यापूर्वीच स्वतःला युवराज म्हणून घोषित केलं होतं. माझे पांडव हस्तिनापुराबाहेर पडताच, तो तिथला युवराजच झाला होता. अंध पिता धृतराष्ट्रांना तो कसाही खेळवीत होता. खऱ्या अर्थानं तो केवळ युवराज नव्हता. आपल्या करणीनं अंध पित्याच्या सिंहासनावर न बसताही झालेला 'सर्वाधिकारी राजा'च होता तो!

या दुर्योधनाच्या डोळ्यांत आता इंद्रप्रस्थ सलू लागलं. राजसूय यज्ञाहून परतल्यानंतर शिशुपालवधाचा प्राणथरारक प्रसंग समोर पाहिल्यानंतरही तो शहाणा झाला नव्हता. अद्यापही कृष्णद्वेषानं पेटलेला तो कुरुयुवराज, माझ्या प्रिय कृष्णसख्याचा चारचौघांत 'गाईच्या मलमूत्रानं पाय बरबटलेला गवळी' असाच निर्देश करीत होता.

माणसाचं काय असतं– तो जन्मजात स्वभावाप्रमाणेच वागतो. अहंकारी माणूस कधीच अहंकार सोडत नसतो. अशाच्या हातात सत्ता आली, तर त्याचा अहंकार अनावर फुलतो, युवराज दुर्योधनाच्या हातांत तर दोन प्रकारची सत्ता होती – एक राजसत्ता व दुसरी भावसत्ता. बालपणापासून आपल्या नव्याण्णव बंधूंना डोळ्यांच्या धाकात ठेवण्याची त्याला सवयच जडली होती. आम्ही इंद्रप्रस्थात येताच तर तो अंध पित्याच्या हस्तिनापूरचा स्वतःला अघोषित राजाच मानू लागला होता. संपत्ती, सैनिकी, सामर्थ्य, देशोदेशीचे पुरातन आप्तसंबंध यांमुळे हस्तिनापूर हे तसं बळवंत गणराज्य होतं, त्याचा उत्तराधिकारी मानणाऱ्या दुर्योधनाला आता भरभराटलेलं इंद्रप्रस्थ काटयांसारखं सलू लागलं. आपल्या राजकीय सल्लागारांच्या चौकटीच्या बैठका घेऊन, तो इंद्रप्रस्थाचा पाडाव करण्याच्या अचाट योजना आखू लागला. कृष्णाचा इंद्रप्रस्थ गणराज्यावर केवढा वरदहस्त आहे, याची त्याला अद्यापही नीट कल्पना आलेली नव्हती. त्याच्या कुटिल चौकटीत मामा शकुनी व त्याचे बंधु, राजनीतिज्ञ म्हणविणारा कणक, दुःशासनासह त्याचे प्रमुख बंधू आणि केलेल्या आज्ञा झेलणारा कुरुअमात्य वृषवर्मा असे होते.

महाराणी म्हणून मला मिळणाऱ्या गुप्तचरांच्या वृत्तान्तावरून सूर्यभक्त कर्ण आपल्या चौकटीत यावा, चौकटीची पंचकडी व्हावी, असे दुर्योधन–शकुनीचे आटोकाट प्रयत्न चालले होते. त्यांना त्यात यश मात्र काही येत नव्हते. त्याचेही धागे इंद्रप्रस्थात आमच्या हाताशी आले होते. ते ऐकताना मी थोडीशी चिंतितही झाले होते. सूर्यभक्त अंगराज कर्ण कसल्याही राजकीय डावपेचाच्या ठाम विरुद्ध होता. त्याचा ध्यास एकच होता - पांडवांना सरळ युद्धासाठी ललकारावं. त्यांच्याशी समोरासमोर निर्णायक युद्ध खेळावं. त्याच्या या आग्रहामुळेच मी चिंतित झाले होते. खरं आहे की, मला त्याच्याविषयी एकदा अनाकलनीय आकर्षण वाटलं होतं. मात्र त्यात कोणताही शारीरिक वासनांचा भाव नव्हता. तो निष्ठावान सूर्यभक्त आणि मी जन्मजात अग्निकन्या यांचा तो तेजाकर्षणाचा भाग होता, असं आज पूर्ण विचारांती वाटतं. मला भय वाटत होतं, ते या अंगराज कर्णाच्या अभेद्य कवचकुंडलांचं. अशातच पितामह भीष्मांच्या साक्षीनं प्रतिज्ञापूर्वक तो संपूर्ण आर्यावर्ताचा दिग्विजय करून हस्तिनापुरात परतला होता.

दुर्योधनानं बळकावलेलं हस्तिनापूरचं, माझे श्वशुर सम्राट पांडू यांचं राज्य, हा धडधडीत अन्याय होता. तरीही माझ्या पतींनी खांडववनाचा स्वीकार करून तिथे आता हस्तिनापुरालाही लाजवेल, असं इंद्रप्रस्थ अविश्रांत परिश्रमांनी उठविलं होतं.

या इंद्रप्रस्थ राज्यावर येणारं कुठलंही संकट मला मान्य नव्हतं. स्वयंवरातील माझ्या उद्गारांनी दुखावला गेलेल्या दिग्विजयी आणि कवचकुंडलधारी कर्णाचा दुर्योधन कौशल्यानं उपयोग करून घेणार होता. मात्र आता मी माझा कृष्णसखा पाठीशी असताना कुणाचंच भय बाळगायचं नाही, असं ठाम ठरविलं होतं. माझी त्याच्या सख्यत्वावर नितांत श्रद्धा होती.

अशातच कुरूंचा अमात्य वृषवर्मा हस्तिनापुराहून एक राजआमंत्रण घेऊन इंद्रप्रस्थात येऊन थडकला. आमच्या श्रीप्रसाद राजसभेत माझ्या व महाराजांच्या समोर आमंत्रणाच्या भूर्जपत्राची थैली ठेवून नम्रपणे म्हणाला, “पितामह भीष्म आणि महाराज धृतराष्ट्र यांचं हस्तिनापुराहून इंद्रप्रस्थाच्या समस्त पांडवांना आग्रहाचं निमंत्रण आहे, विष्णुयागाचं! द्वारकेला यादवांसाठीही आमंत्रण गेलं आहे. तिकडूनही श्रीकृष्णमहाराज युवराज बलरामदादांसह या यागासाठी हस्तिनापूरला अवश्य येतील. आपण सर्वांनी अवश्य यां.”

अमात्य वृषवर्माचं अत्यंत आर्जवी भाषेतील ते आमंत्रण ऐकताना का कुणास ठाऊक, माझी उजवी पापणी उगीच फडपडली. मनात शंकेची एक टिटवी केकाटली. मी पटकन बोलूनही गेले, “याग म्हणजे यज्ञाचं निमंत्रण आहे. तिथे दांपत्यानं येण्याची काही आवश्यकता नाही. असेलच तर आपल्या पतीसह सुभद्रा व भानुमती येतील. राजमाता अवश्य येतील.”

तसे जुने, अनुभवी अमात्य म्हणाले, “असं कसं? पांडवांच्या महाराणी व महाराज तर विशेष आमंत्रित आहेत. हे आमंत्रण केवळ हस्तिनापूरच्या महाराज-महाराणींचं नाही. ते आहे पितामह भीष्म, महात्मा विदुर आणि समस्त स्त्री-पुरुष पौरजन अशा सर्वांचं.”

आता इंद्रप्रस्थात हस्तिनापूरला जाण्याची धांदल उडाली. मी एका खास दूताकरवी द्वारकेला कृष्णाकडे संदेश धाडला. तो होता, ‘इतर कोणी आलं नाही तरी चालेल. तू मात्र

हस्तिनापूरला येच. आम्हाला विष्णुयागासाठी हस्तिनापूरला जाणं भागच आहे.'

माझ्या आग्रही संदेशाप्रमाणे यथासमय तो हस्तिनापुरी आलाच. पण किती-किती वेगळ्या रूपात आणि वेगळ्या अर्थानं! तो आला, तो माझ्यासारख्या कुलस्त्रीला कधीच विसरता येणार नाही, अशा वस्त्ररूपात!

मधल्या काळात हस्तिनापुरात जे काही घडलं, त्याचं स्मरण करणंसुद्धा मला नकोसं वाटतं. मग ते सांगणं, तेही स्वमुखेच, केवळ अशक्य आहे.

माझ्या पाचही पतींबाबत माझ्या मनात अपार आदर होता. पण हस्तिनापूरच्या या भेटीत जे-जे घडलं, त्याला कारणीभूत होता ज्येष्ठ पांडव – इंद्रप्रस्थाचा महाराज युधिष्ठिर. एरवी तो अनेक दुर्मीळ गुणांचा अधिकारी होता. आपल्या चारही बंधूंचं नेतृत्व करायला, आमच्या गणराज्य इंद्रप्रस्थाचं राज्य सांभाळायला योग्य होता. पण हस्तिनापुरात येताच त्याला काय झालं, तेच मला कळलं नाही. काही-काही प्रसंगच असे असतात की, त्यांची कारणपरंपरा कितीही पिंजलं, तरी काही सापडत नाही. तसा धर्माचरणी व पापभिरू असलेला माझा गुणवान ज्येष्ठ पती भ्रमचित्त झाला. कसलंही समर्थन देता येणार नाही, असा व्यसनाधीन व बुद्धिभ्रष्ट झाला. अल्पावधीतच कीर्तिकळसाला पोहोचलेल्या गणराज्य इंद्रप्रस्थाला त्याच्या द्यूताच्या व्यसनानं क्षणात विनाशाच्या गर्तेत लोटलं.

हा प्रज्ञाशील ज्येष्ठ पांडव विष्णुयागापूर्वीच कौरवांशी द्यूत खेळला. सर्व प्रकारच्या सेना, सेवक, सेविका, धन, पशुधन यांसह पणाला लावून इंद्रप्रस्थाचं राज्य हरला. एकेक करत आपले चारही बंधू क्रमशः पणाला लावून हरला. आपण एका सुस्थिर राज्याचे अभिषिक्त राजे असून, हजारो पौरजनांच्या सुखदुःखाला बांधलेले आहोत, हे विसरला. द्यूतपणात स्वतःला लावून तोही पण हरला. संभ्रमित झालेल्या द्यूतसभेत विजयाच्या उन्मादानं खिदळणाऱ्या कौरवांच्या वाक्ताडनांनी लज्जित झाला. इतका बुद्धिभ्रष्ट व भ्रमचित्त झाला की, आपल्या पत्नीला – इंद्रप्रस्थाच्या महाराणीला – मला – महाराज द्रुपदांच्या कन्येला – धृष्टद्युम्नाच्या भगिनीला – याज्ञसेनेलाही त्यानं कपटी कौरवांच्या द्यूतयज्ञात पणाला लावलं! आणि सर्वांत शेवटचा तो पणही तो हरला.

नशीब, आम्हा पांडवांचं, की विजयानं खिदळणाऱ्या व आनंदानं उसळणाऱ्या कौरवांपैकी कुणाच्याही बुद्धीचा टेंभा त्या वेळी पालवला नाही की, युधिष्ठिरानं विधवा आणि अपार कष्ट सोसलेल्या त्याच्या मातेलाही पणाला लावण्यासाठी ललकारावं! तसं झालंच असतं तर? तर मला पक्का विश्वास आहे, यानं आपली जन्मदात्री माताही पणाला लावली असती.

मी हे भावनेच्या तीव्र टोकाला जाऊन म्हणते आहे, असं मुळीच नाही. त्या दिवशी भानरहित होऊन चीत्कारत प्रोत्साहन देणाऱ्या कौरवांच्या बळावर निर्लज्ज आणि नीच दुःशासनानं माझ्या अंशुकाच्या निरीला हात घातलाच. जेवढा द्यूत खेळताना युधिष्ठिर भ्रमिष्ट झाला नव्हता, त्याहूनही अधिक माझं वस्त्र फेडायला सरसावलेला दुःशासन बुद्धिभ्रमिष्ट झाला होता.

कुरूंच्या त्या प्राचीन द्यूतगृहात वक्ष पिटत, हंबरडा फोडत, प्रत्येक वीरासमोर मी हात पसरत माझ्या लज्जेचं रक्षण करण्यासाठी प्राणदेठापासून ललकारत फिरले. एकटया विकर्णाशिवाय कुणीही वीर सुपुत्र उठला नाही. काही बोलला नाही. अंगराज कर्णानं त्यालाही दटावून खाली बसवलं. कर्णही बुद्धिभ्रष्टच झाला होता. विमूढ

झालेल्या दु:शासनानं निकरानं माझ्या अंशुकाच्या निरीला हात घातला.

मी उभ्या कुडीभर चवताळून उठले. मी काय बोलते आहे, कुठे आहे, याचं कसलंही भान काही मला राहिलं नाही. अश्रूंनी डबडबलेल्या माझ्या नेत्रांसमोर गरगर फिरत राहिलं, ते केवळ एक निळ्या-जांभळ्या, हिरव्या, सोनेरी रंगच्छटांचं मोरपीस!!

जेव्हा मी भानावर आले, तेव्हा दूरदूर अस्पष्ट होत जाणारी मुरलीची एक अपरिचित धून काय ती ऐकू आली. पितामह भीष्म मला सावरून वस्त्रांच्या ढिगाऱ्यातून द्यूतगृहाबाहेर नेत होते. तेव्हा ती अस्पष्ट होणारी मुरलीधून पूर्ण थांबली होती.

माझं लज्जारक्षण झालं होतं. ते कुणी केलंय, हेही मला स्पष्टच समजलं होतं.

जेव्हा मी माझ्या कक्षात आले, तेव्हा समोर राजमातेला – कुंतीदेवींना बघून कशी जीवदेठापासून भडभडून आले. धावत जाऊन त्यांच्या गळ्यात पडले. अनावर हमसू लागले. त्या इतर काहीच न बोलता 'माझ्या मुली शांत हो' म्हणत माझ्या पाठीवर कितीतरी मायेनं बराच वेळ नुसता हात फिरवीत राहिल्या. तो स्पर्शही पुढे जीवनभर मी कधीच विसरू शकले नाही. ते 'माझ्या मुली' हे शब्दही माझ्या अंतर्मनावर सदैव कोरलेले राहिले. त्यांचा तो स्पर्श होता थेट मोरपिसाच्या स्पर्शासारखा. त्यांचे ते बोल होते, मी नुकत्याच ऐकलेल्या मुरलीच्या धुनीसारखे! मला आज विलक्षण तीव्रपणे उमजून चुकलं की, राजमाता कुंतीदेवी माझ्या सासूबाई नाहीत. पांडवांच्या माता नाहीत. त्या माझ्याच माता आहेत!! पांचालांच्या सौत्रामणीमातेला मी अंतरले होते. ती जागा दृढ मनाच्या या अपार सोशीक कुलस्त्रीनं भरून काढली होती. मला हरवलेली माझी माता त्या क्षणापासून पुनश्च मिळाली!

द्यूताच्या त्या 'न भूतो न भविष्यति' अशा घृणास्पद प्रकारानंतरही माझा ज्येष्ठ पती युधिष्ठिर सावरला का? माणसात आला का? नाही! तो शकुनी-दुर्योधनाने ललकारताच पुन्हा द्यूत खेळला – अनुद्यूत! तेही हरला. पूर्वीच्या द्यूतात तो सेना, पशु, धन, राज्य अशी लौकिक संपत्ती हरला होता. या अनुद्यूतात तो हरला, एक सर्वाधिक मोलाची अलौकिक संपत्ती – 'काळ' नावाची. सूक्ष्म अर्थानं बघितलं, तर पहिल्या द्यूतातील सर्व-सर्व वस्तूंचा तो अधिकारी होता. पण दुसऱ्या अनुद्यूतातील 'काळ' या संपत्तीवर त्याचा काहीतरी अधिकार होता काय? कुणाचाही तसा तो कधीतरी असू शकतो काय?

माझा ज्येष्ठ पती अनुद्यूतात जो पण हरला, तो होता, पाचही पांडवांनी पत्नीसह बारा वर्षं वनवास पत्करावा. बारा वर्षांनंतर एक वर्ष अज्ञातवास स्वीकारावा हा!

आम्ही वनवासावर जाणार ही वार्ता सर्वत्र पसरली. साहजिकच होतं की, आम्ही कुठल्या तोंडानं इंद्रप्रस्थात जाणार होतो? त्यामुळे तिकडे न जाताच, आमच्या इंद्रप्रस्थाच्या पौरजनांना न भेटताच आम्ही वनाची वाट धरणार होतो. वीर अर्जुनानं आपल्या ज्येष्ठ बंधूंसमोर कितीतरी वेळ आग्रह धरला, 'एकदातरी द्वारकेला जाऊ या.' रक्षण करणाऱ्या कृष्णाची एकदातरी भेट घ्यावी. वनातच जायचं असेल, तर त्याच रोखानं येणाऱ्या वनाकडे जावं. पण नाही – मी काहीच बोलू शकले नाही. कारण ज्येष्ठ पांडव युधिष्ठिराचा एकच घोशा होता – 'मी काही तिकडे येणार नाही. वाटल्यास तुम्ही जा सारे जण. तेही कुरुश्रेष्ठ दुर्योधन अनुमती देत असेल तर!' मला तर माझ्या मोठ्या पतीला काय झालंय, तेच कळत नव्हतं. तो नुसताच द्यूत-अनुद्यूत खेळताना भ्रमचित्त झाला होता असं नव्हे, तर एका स्वतंत्र गणराज्याचा राजा असूनही तो 'कुठल्या वनात जायचं

आम्ही ठरवू' अशी शर्त घालून काही अनुद्यूत खेळला नव्हता.

पांडवांना खांडववन देण्यातच दुर्योधन-शकुनीचा हेतू होता, तो ते रानटी जमातींच्या आक्रमणात ते बळी पडावेत हा! हिंस्त्र श्वापदांनी त्यांना गिळंकृत करावं हा! आता तर एक-दोन दिवसांचं नव्हे, तर चांगलं बारा वर्षांचं वनजीवन सर्वांसमोर उभं ठाकलं होतं.

वनात काय उपयोगाची म्हणून अंगावरची भरजरी राजवस्त्रं आम्ही बाजूला सारली. साधी, पांढरी वस्त्रं धारण केली. प्रसंगी पुढे द्याव्या लागणाऱ्या उपवासाच्या सत्याचा सराव व्हावा म्हणून उपोषण धरलं. त्यामुळे दोन दिवसांतच सर्वांच्याच चर्या कशा आक्रसून आल्या. राजमाता कुंतीदेवींचा निरोप घेताना तर त्या अपार-अपार काळवंडल्या. आता त्या आम्ही परत येईपर्यंत हस्तिनापुरातच महात्मा विदुरांकडे राहणार होत्या. त्यांचं एकसारखं एकच म्हणणं होतं, "मला वनाची सवय आहे. मी तुमच्या बरोबर येते."

त्यांचा हा आग्रह द्यूतपटू शकुनीच्या कानांवर घालण्यात आला. पांडवांच्या यातनेची कुठलीही संधी सोडायला तयार नसलेल्या त्या महापुरुषानं, छद्मी गांधारी हास्य लपवीत खोटया असाहायतेनं निगरगट्ट उत्तर दिलं, "त्यांना पणावर लावण्यात आलं नव्हतं. त्यांची इच्छा असली, तरीही त्या वनात जाऊ शकत नाहीत! त्या राजमाताच आहेत – राज्य नसलेल्या! त्यांच्याबद्दल आम्हा सर्व हस्तिनापूरकर जनांत नितांत आदर आहे. त्या राजमाताच आहेत. हस्तिनापूरकरांच्या मनामनांवर राज्य करणाऱ्या, महामंत्री महात्मा विदुरांकडे त्यांनी सुखानं व मोठ्या मनानं राहावं!"

शकुनीच्या या उत्तरानं सर्वाधिक जळफळला, तो माझा पती भीमसेन! पण तो काहीही करू शकत नव्हता. काही-काही वेळाच अशा असतात की, त्या चिलटांनाही चमत्काराचं बळ देतात!

सम्राट पांडूंच्या विषयी, त्यांनी केलेल्या हस्तिनापूरच्या सेवेविषयी कृतज्ञतेची व अपार आदराची भावना असलेले हस्तिनापूरकर स्त्री-पुरुष हस्तिनापूरच्या सीमेपर्यंत आम्हाला निरोप देण्यासाठी आले होते. त्यात पितामह भीष्म, महात्मा विदुर, मंत्री संजय, गुरू द्रोण, कृप, कुरूंचे राजपुरोहित अशी मंडळी होती. एकमेकांच्या सुखदु:खांशी बांधलेले आम्ही सहा जीव त्या सर्वांना निर्धारानं पाठमोरे झालो. येईल त्या संकटाला धैर्यानं तोंड देऊन बारा वर्षांच्या – एक तपाच्या वनवासी व नंतर एक वर्षाच्या अज्ञातवासी जीवनाचा यज्ञ यथासांग पूर्ण करण्यासाठी सिद्ध झालो.

आता आमच्यासमोर होता, तो घनदाट अंधकार. वनांचा हिरवा अंधकार! हस्तिनापूरच्या पश्चिम दिशेनं आम्ही चाललो. पहिलीच आली ती नदी होती, भागीरथी. तिच्या काठावरच्या एका डेरेदार वटवृक्षाखाली आम्ही पहिला पडाव टाकला. या वटवृक्षाला सर्व वाटसरू 'प्रमाण वटवृक्ष' म्हणत. माथ्यावर पोळून काढणारं उन्हं घेतलं, तरी पांथस्थाला मात्र शीतल सावली द्यायची असते, हे जीवनव्रत 'प्रमाण' मानणारा हा वटवृक्ष होता. घडणार होतं का, त्याच्या आशीर्वादानं आमचं भविष्यातलं जीवन यशस्वी? या पहिल्या पडावात खाण्यासाठी आमच्याजवळ अन्नाचा कणही नसल्यामुळे, भागीरथीच्या स्फटिकधवल जलावर आम्ही रात्रीचं भोजन मानलं.

भल्या पहाटे ब्राह्मी मुहूर्तावर उठून, भागीरथीतच आन्हिकं आवरून पुढे निघालो. सहाही जण अनवाणीच. आघाडीला होता निर्भय, निधडा भीमसेन. त्याच्या हातात आडव्या येणाऱ्या झुडपांच्या शाखा व काटेरी वेली छाटण्यासाठी एक धारदार परशू काय

तो होता! संध्याकाळपर्यंत आम्ही सरोवरांनी वेढलेल्या कुरुक्षेत्रावर आलो. आता भीमाच्याऐवजी अर्जुन पुढे झाला. तो नेईल तिकडे आम्ही चाललो. जाता–जाता तो युधिष्ठिराला म्हणाला, “आपण सन्नेथ सरोवराकडे चाललोत. दिग्विजयात मी इथे कुरुक्षेत्रावर चांगला एक मास राहिलो होतो. दररोज या सूर्यकुंडावर स्नानाला येत होतो. हे कुरुक्षेत्र अनेक सरोवरांनी मंडित असल्यामुळे इथे अनेक भाविक येतात. नानाविध धार्मिक कृत्यं बारा मास करतात. म्हणून याला ‘धर्मक्षेत्र’ ही म्हटलं जातं.”

“एक गोष्ट तू विसरलेला दिसतोस धनुर्धर पार्था. सूर्यग्रहणाच्या दिवशी...”

“आपली श्रीकृष्णाशी - माझ्या सर्वांत प्रिय सख्याशी प्रथम भेट इथंच झाली होती.”

“इथे काही दिवस पडाव टाकू या. या द्रौपदीला तिचे विपुल, विमुक्त केश सरोवराच्या जलात नीट धुता येतील.” भीमसेन माझ्याकडे बघत हसत म्हणाला.

एव्हाना कुणी न सांगताच नकुल-सहदेवांनी सरपणासाठी लागणारी वाळलेली लाकडं आणली होती. भीमसेनानं काचा कसून चांगले तीन पाषाणखंड शोधून त्यांची सुघड चूल उठविली. अर्जुन आणि युधिष्ठिर धर्मक्षेत्रावरच्या भाविकांच्या धर्मशाळांतून फिरून सत्तू, ओदन, गोधूम असं कोरडं शिधात्र घेऊन आले. ते भिक्षात्र होतं. येताना त्यांनी ताम्राची भांडीही आणली होती. भीमसेनानं ओदन सरोवरजलात क्षाळून तांब्याचं तपेलं चुलीवर चढवलं. कुरुक्षेत्राच्या धर्मभूमीवर सम्राट पांडूंच्या दिग्विजयी पुत्रांचा उदरभरणाचा ओदन रटरटू लागला.

कुरुक्षेत्रावरच्या दृशद्वती, सरस्वती अशा नद्यांचं व ब्रह्मकुंड, ज्योतिकुंड अशा सर्व सरोवरांचं जल प्राशून तरतरीत झालेले आम्ही सर्व पश्चिमेकडची अनेक वनांमागून वनं पार करीत, शेवटी काम्यकवनात आलो. या वनात एका स्वच्छ निर्झराकाठी आम्हाला पर्णकुटीसाठी हवी तशी विपुल मोकळी जागा नकुलानं निवडली. तो भूमितज्ज्ञ होता. पाचही बंधूंनी काचे कसून पूर्वाभिमुख प्रवेशद्वार असलेली सुघड, सुंदर पर्णकुटी संध्याकाळपर्यंत उठविली. तिच्या आत माझ्यासाठी स्वतंत्र अंत:पुरी कक्ष, स्नानकक्ष आणि स्वयंपाकाचा कक्ष अशी व्यवस्था होती. बालपणी चिवट मातीच्या चिखलाचे गोळे करून ते दूर फेकण्याचा व्यायाम भीमसेन घेतं असे. त्यानं पारखून आणलेली चिवट माती पायानं मळली. त्या मातीतून त्यानं मागच्या पुढच्या आकाराचे दोन-तीन सुंदर रांजण घडविले. गडव्यासारखी सात-आठ मृत्तिकापात्रं तयार केली. त्यानं तयार केलेल्या लहान-मोठ्या आकाराच्या तबकांकडे युधिष्ठिर मात्र एका दर्भासनावर बसून कितीतरी वेळ एकटक बघत राहिला. खरोखरच भीमसेनानं बनविलेली पात्रं, रांजण, तबकं सुरेख होती. मी त्यातील सर्वांत मोठं तबक नकळतच त्याच्यासमोर सरकविलं. तसं मान मागे टाकून खळाळ हसत तो म्हणाला, “कुंतीमातेनं केलं असतं, तेच नेमकं तूही केलंस. माझी भूक लक्षात घेऊनच मी हे तबक घडविलं आहे. या सगळ्यांचीही तशीच आहेत – त्यांच्या भुकेप्रमाणं!”

एव्हाना अर्जुनानं पर्णकुटीसमोरच्या अंगणात चिवट, लाकडी कांबांपासून पाच सुरेख धनुष्यं घडविली होती. दूरवर मोकळ्या जागेत अश्वपारखी सहदेवानं धरून आणलेला रानघोडा जोजावून माणसाळविला होता. त्याच्या पाठीवर मांड घेऊन तो एका लयीत मंडलं घेण्याचा त्याला सराव देत होता. नकुलानं काही वेळूंचे, काही ताम्रांचे सुरेख बाण

तयार केले होते. युधिष्ठिरानं वनभर फिरून आणलेली विविधरंगी फुलं, बेलपत्रं एका मातीच्या तबकात त्याच्या बैठकीजवळ ठेवली होती. पर्णकुटी लख्ख सारवून घेऊन मी एका कोपऱ्यात लाकूड-मातीचा एक छोटासा देव्हारा बनविला होता. त्याचं मुख मी द्वारकेच्या रोखानं ठेवलं होतं. देव्हाऱ्यात मातीच्या शाळुंकेतून उठलेली शिवपिंडी स्पष्ट दिसत होती. मात्र तिला तबकाएवढ्या चांद्रप्रतिमेशी एकरूप करून लिंपलं होतं. शाळुंकेसमोर मातीचा एक छोटा, बैठा अटकर नंदीही होता. पिंडीमागील चांद्रतबकाला टेकवून मी एक रंगीबेरंगी वेळूची मुरलीही ठेवली होती. शिवपिंडीवरच्या बेलपत्राजवळ पांढऱ्या फुलांसह एक टवटवीत ताजं मोरपीसही मांडलं होतं.

पर्णकुटीच्या छतावर बाहेरून बारीक काड्यांचं, नितळ रानगवत दोन दाट थरांत अंथरल्यामुळे पर्णकुटी समशीतोष्ण झाली होती. तिच्यात पावसाळा-हिवाळ्यात थंडीही वाजू शकत नव्हती. ग्रीष्माच्या - ऊनतापीच्या दिवसांत ती सुखद शीतल राहत होती.

वर निळंभोर आभाळ, समोर अहोरात्र खळाळत वाहणारा शुभ्रधवल झरा, पर्णकुटीच्या भोवती एक आखीव मंडल सोडून दाटलेलं दाट अरण्य, त्यात उंच-उंच वृक्षांवर चढलेल्या, एकमेकींत गुंतवळ झालेल्या नानाविध वेली, त्या वृक्षांवर सूर्योदयापासून कलकलणारे अनेक प्रकारचे, आवाजांचे, रंगांचे पक्षी अशी ही काम्यकवनातील आमची रमणीय 'पांडववस्ती' होती. जेवढे इंद्रप्रस्थाच्या राजवास्तूत माझ्यासह हे पाचही बंधू सुखात होते, तेवढेच या वस्तीतही सुखात राहू लागले.

दररोज सूर्योदयानंतरची आन्हिकं आवरून युधिष्ठिर पर्णकुटीतील शिवपिंडीची पूजा बांधी. तिच्यावर एकेक बिल्वपत्र चढवून ती सुशोभित करी. शेवटी शिवप्रिय पांढऱ्याशुभ्र फुलांची ओंजळ तीवर अर्पण करी. त्याच्यानंतर भीम, अर्जुन, नकुल, सहदेव व सर्वांत शेवटी मी शिवपिंडीवर बिल्वपत्र व शुभ्र रानफुलं वाहून शांत, स्थिर चित्तानं माझा ज्येष्ठ पती युधिष्ठिर सांगेल, तशी 'शिवस्तुती' म्हणत असू. आपले दीर्घ नेत्र मिटून तो शांत लयीत म्हणे -

"शिवाकांत शंभो शशांकार्ध मौले
महेशान शूलिन् जटाजूटधारिन्
त्वमेको जगदव्यापको विश्वरूप
प्रसीद प्रभो पूर्णरूप।।"

मिटल्या नेत्री माझ्या ओठांतून पहिल्याच दिवशी आपोआप बाहेर पडली, ती कृष्णस्तुती. मी अंत:प्रेरणेनं म्हणाले,

"ॐ दामोदराय विद्महे –
केशवाय धीमहि
ॐ तंत: कृष्ण: प्रचोदयात!!"

माझी ही कृष्णस्तुती मी न सांगताच, माझ्या पाचही पतींनी आपोआप एका लयीत अनुसरली. मग काम्यकवनातील आमच्या वास्तव्यात एक अलिखित प्रथाच पडून गेली. सूर्योदयाबरोबर युधिष्ठिराची कणखर आवाजातील शिवस्तुती आणि पाठोपाठ माझ्या स्त्रीसुलभ मधुर वाणीतील कृष्णस्तुती!

काम्यकवनातील आमचे दिवस वाटून घेतलेल्या दैनंदिन कर्मांमुळे रंगत चालले. रोज

पाचपैकी एक पती माझ्यासोबत पर्णकुटीत राही. इतर चार मृगया, पूजेचं साहित्य, सरपणाची लाकडं आणि आम्ही आता पाळलेल्या वनगायींच्यासाठी लागणारा चारा यांसाठी वनात फिरत.

आमच्याशी जन्मोजन्मीच्या धाग्यांनी बांधलेले धौम्य ऋषी कसलंही द्यूत न खेळता, स्वेच्छेनं काही दिवसांनी आपल्या शिष्यगणांसह वनात आले. त्यांनीही आपल्या पर्णकुटचा आमच्या वस्तीशेजारीच उठविल्या. आमच्या पांडववस्तीतून रोज पर्णकुटचांच्या छतांतून अग्निकुंडातील जसे धूरलोट भेलकांडत आभाळात चढू लागले, तसेच धौम्यऋषी व त्यांच्या शिष्यगणांनी उठविलेले कणीदार मधुर वेदमंत्रही आभाळात चढू लागले.

पर्णकुटीतील स्वयंपाकाचं काम माझ्याकडे होतं. चुलीतील अग्नी फुलविताना फुंकरी घालून-घालून मी घामेघूम होई. मला चूल फुंकताना पाहून तो एकेकाळचा इंद्रप्रस्थाचा महाराज विचारात पडून निःशब्द होई. तसाच बाहेर पडून झऱ्याकाठच्या पिप्पल वृक्षाखाली कितीतरी वेळ एकटाच पाषाणी पारावर बसे. मग ध्यानस्थ होऊन कसलीतरी आराधना करे.

पर्णकुटीत निवड-टिपणाची कामं करताना मला हटकून आठवण होई, ती कृष्णाची. किती होती त्याची रूपं! किती होत्या त्याच्या आठवणी! माझ्याशी निगडित, माझ्या पाचही पतींशी संबंधित, राजमाता कुंतीदेवींशी जुळलेल्या!

एक गोष्ट मात्र मला स्पष्टच सांगितली पाहिजे की, त्याच्याएवढ्या आठवणी मला माझ्या वनवासात इतर कुणाच्याही आल्या नाहीत. इथे आल्यानंतर पहिले काही दिवस मला माझ्या द्रुपद बाबांची, सौत्रामणीमातेची, धृष्टदादाची, कांपिल्यनगराची आणि दादाबरोबर कांपिल्यनगराला गेलेल्या माझ्या प्रतिविंध्य, सुतसोम, श्रुतकीर्ती, शतानिक आणि श्रुतसेन या पुत्रांची तीव्रपणे आठवण येई. ते प्रेमळ आजोबा, आजी आणि कर्तव्यदक्ष मामाच्या छायेत आहेत, एवढाच काय तो धीर मिळे. माझी सगळीच मुलं गुणवान होती. त्यातील प्रत्येकानं आपल्या पित्याचे गुणधर्म जन्माबरोबरच उचलले होते आणि निरीक्षणानं, अनुकरणानं इतर चारही सापत्न पित्यांचे गुणही उचलले होते. ते पाचही पांडवांच्यापेक्षा अतुल विक्रमी होणार, याविषयी माझ्या मनात कसलीही शंका नव्हती. तेरा वर्षानंतर जेव्हा ते भेटतील, तेव्हा केवढे मोठे झाले असतील, कसे दिसतील, अशाच विचारात मी दिवस-दिवस गढून जाई.

माझ्या पतींच्या इतर पुत्रांना मी फारसं पाहिलं नव्हतं. पण इंद्रप्रस्थातच असल्यामुळे सुभद्रेचा अर्जुनपुत्र अभिमन्यू मला अतीव प्रिय झाला होता. त्याचं प्रमुख कारण होतं की, तो बोलताना आपल्या मधुर वाणीनं मला हटकून आपल्या मामाची - कृष्णाची आठवण देई. राजमाता कुंतीदेवींचं स्मरणही सतत होई.

नंतरच्या काळात मात्र एकटा कृष्ण आणि कृष्णच माझं बाह्य आणि अंतर्मन व्यापून राहिला. एका कटू सत्यानं माझं काळीज कसं पिळवटून गेलं. आम्ही वनात येण्यापूर्वी त्याला एकदातरी भेटण्याचं कर्तव्यही पार पाडू शकलो नव्हतो. काय वाटत असेल त्याला माझ्याविषयी? किती अप्पलपोटी ठरवलं असेल त्यानं मला! या जाणिवेनं मी सैरभैर होऊन जाई. पर्णकुटीच्या दारात कधी-कधी त्याच्या विषयीच्या अशा उदास विचारानं मी उदास होऊन बसे. कृष्णाच्या तीव्र आठवणीनं माझे डोळे पाझरलेले असत. अशावेळी वनातून परतलेला भीमसेन आपल्या बळकट खांद्यावरची लाकूडमोळी पर्णकुटीच्या

कुडाजवळ टाकून माझ्या शेजारी येऊन बसे. आपल्या उत्तरीयानं माझे डोळे पुशीत म्हणे, "पांचाली, धीर धर. विश्वास ठेव, तुला भेटण्यासाठी कृष्णच येईल या वनात. माझं मन सांगतंय." त्याच्या नुसत्या सोबत बसण्यामुळेही मला केवढातरी धीर आलेला असे.

माझ्या तपस्येला फारशी प्रतीक्षा करावी लागली नाही. एके दिवशी माझा भीमसेनच हात उंचावून आरोळ्या ठोकत वस्तीच्या कुंपणातून आत आला. तो एकसारखा काम्यकवनभर ऐकू जाईल असा गर्जत होता, "तो आला! तो आला! द्वारकेचा राणा कृष्ण आला." माझ्यासमोर येऊन धापावत तो म्हणाला, "कृष्णे, कृष्ण आला! त्याच्या रथाची जरीकाठाची केशरी ध्वजा मी ओळखली. त्याच्या रथाबरोबर आणखीही दोन रथ आहेत."

पर्णकुटीच्या भोवती फिरलेल्या लाकडी कुंपणात चारही दिशांना भीमसेनानंच उठविलेले चार उंच दगडी चौथरे होती. ही आपली सोय त्यानं आपणच करून घेतली होती. जेव्हा आवश्यकता वाटेल, तेव्हा अरण्यात पांगलेल्या आपल्या बंधूंना पाचारण करण्यासाठी तो या पाषाणी चौथऱ्यांवरून संकेताच्या आरोळ्या देई. मग काही अवधीतच त्याचे चारही बंधू पर्णकुटीत एकापाठोपाठ एक उपस्थित होत. आज तर कृष्ण आला आहे या आनंदानं वेडावून त्यानं एवढ्या मोठ्यानं आरोळ्या ठोकल्या की, वस्तीच्या गोधनावर झडप घालण्यासाठी टपलेली वाघ-तरसासारखी श्वापदंही भेदरून दूर पळाली! चारही पांडव एकेक करीत वस्तीच्या कुंपणाच्या पूर्वद्वारातून प्रवेशले. पाठोपाठ तीन-चार रथ आमच्या वस्तीसमोर उभे ठाकले. मी पर्णकुटीच्या कवाडातूनच डोळ्यांत प्राण आणून बघू लागले. चार पांढऱ्याशुभ्र घोड्यांच्या नेहमीच्या गरुडध्वज रथातून माझा प्राणप्रिय सखा, सावळा कृष्ण उतरला. पाठोपाठ सारथी दारुक व उद्धवदेव उतरले. मागच्या रथातून माझा बंधू धृष्टद्युम्नदादा उतरला. त्याच्या पाठीशी पांचालांचे सेनापती व अमात्य होते. सर्वांत मागच्या रथातून केवळ सारथी उतरला. तो रथ नुसत्या संसारोपयोगी साहित्यानं खचाखच भरलेला होता.

पाचही बंधुंतून सर्वांना मागे टाकत एकटा अर्जुन झपाझप चालत कृष्णाजवळ गेला. वाकून तो त्याचे चरण धरणार, तोच कृष्णानं त्याला दृढ आलिंगनात घेतलं. एवढा अजिंक्य धनुर्धर; पण त्या मायेनं वितळला. कृष्णाच्या उघड्या पुष्ट स्कंधावर मान ठेवून हताश हमसू लागला. त्याला थोपटून-थोपटून कृष्णानं शांतवलं. पाठोपाठ चारही भावांनी कृष्णाची चरणधूळ घेतली. मी कवाडातूनच बघत होते. त्याचे दीर्घ मत्स्यनेत्र पांडवांशी बोलताना एकसारखे वळत होते, ते कवाडाकडे. मला तिथेही उभं राहणं अशक्य झालं. मी कुटीच्या चक्क अंत:पुरी कक्षात गेले. काय नि कसं बोलावं त्याच्याशी, तेच मला कळत नव्हतं.

तो आपल्या पाचही पांडवबंधूंसह पर्णकुटीत आला. तरीही मी अंत:पुरी कक्षातून काही बाहेर आले नाही. अनेकविध संमिश्र भावनांनी माझं ऊर कसं काठोकाठ दाटून आलं होतं. त्याला सर्व ऋषि–मुनिवर, ज्येष्ठ नरेश, अनेक गणराज्यांतले स्त्री–पुरुष 'सर्वज्ञ' म्हणत आले. मग त्याला कशी काय नाही कळली माझी विटंबना? त्याच्याविषयीच्या संतप्त क्रोधानं क्षणात मन भरून आलं. दुसऱ्याच क्षणी तो भेटीला आला आहे, या आनंदानं मन काठोकाठ भरून आलं. काय बोलावं, तेच मला कळेना.

मला वाटलं होतं, तो तडक आत येईल. पण नव्हता आला. हेच तर त्याचं मला आणि अनेकांना गोंधळात टाकणारं वैशिष्ट्य होतं. तो भाव जाणणारा होता. पण भावुक मुळीच नव्हता. तो सर्वांच्या मनाशी समरस होणारा होता, पण कुणाच्याच मनोभावात वाहून

जाणारा नव्हता. त्याचे वेळोवेळचे विचार आठवून शेवटी मी निकरानं स्वतःला सावरलं.

दुपारची भोजनं झाली. त्याच्यासह सर्वांचा विश्राम झाला. दिवस कलतीला लागलेला असताना पर्णकुटीच्या अंगणात दर्भांच्या बैठकींवर आमची वनसभा भरली. माझ्यासाठीही त्या सभेत एक आसन होतं. प्रत्यक्ष कृष्ण आणि तोही उद्धवदेवांसह समोर असल्यानं कुणीच काही बोलत नव्हतं. कौरवांच्या विष्णुयागासाठी इंद्रप्रस्थ सोडल्यापासून घडलेल्या घटनांनी आणि झालेल्या घनघोर विटंबनेमुळे मी निकरानं दाबून ठेवलेला आत्मक्षोभ प्रकटला. मी कृष्णावरच डोळे रोखून म्हणाले, "ऋषी, मुनी आणि योगी तुला क्षमा आणि सत्य मानतात. दिसणाऱ्या सृष्टीपूर्वी तूच होतास, असं म्हणतात. सर्व सजीव–निर्जीवांचा उत्पादक तूच आहेस, असं मानतात. तिन्ही लोक, सर्व नक्षत्रं, दाही दिशा, आकाश, सूर्य, चंद्र असं दिसणारं ब्रह्मांडं तूच आहेस, असं सर्वच जण सांगतात. मग मी हे विमुक्त सोडलेले केश तुझ्या ब्रह्मांडात नाहीत का? यातील प्रत्येक केशाच्या मुळाशी एकेक वेदना लगटलेली आहे. ती तुला दिसत नाही काय?

"मला सांग पुरुषोत्तमा, मी कोण आहे? या विक्रमी म्हणविल्या जाणाऱ्या पाच पतींची खरोखरच मी प्रिय पत्नी आहे काय? सांग, तुला प्रिय असलेल्या रुक्मिणीवहिनींवर माझ्यासारखा प्रसंग कोसळला असता तर!"

माझे पाचही पती माना खाली घालून ऐकतच राहिले. मी कृष्णाकडे पाहिलं. तो नेहमीसारखा मंद हसतच होता. त्यामुळे तर उफाळून येत मी म्हणाले, "या पाचांची पत्नी, तुझी सखी, या धृष्टद्युम्नदादाची भगिनी असलेल्या मला नीच कौरवांनी भर सभेत दासी मानून केश धरून फरफटत ओढून आणलं, ते योग्य होतं का? कृष्णा, मी रक्तचिंब एकवस्त्रा होते, रजःस्वला होते! अशा स्थितीत आनंदानं खिदळणाऱ्या कौरवांनी सर्वांना साक्षी ठेवून माझी थट्टा आरंभली, ती शोभादायक होती काय? पितामह भीष्म, महाराज धृतराष्ट्र आणि महाराणी गांधारीदेवी यांची मी सून होते की दासी? गुरू द्रोण, कृप, पितामह भीष्म, विदुर आणि संजय हे अर्थाचे दास म्हणून ओठांना खीळ पडल्यासारखे गप्प होते. सांग – एवढा अर्थ अनर्थकारी आहे काय? संपत्ती एवढी शक्तिशाली असते काय?" माझ्या एकाही प्रश्नाला त्याच्याजवळही उत्तर नाही हे मला जाणवलं, तरीही माझ्या मनातलं सर्व जळमट बाहेर फेकल्याशिवाय काही मला राहवेना. आजवर रोधलेला माझा संताप तीव्र ज्वालामुखी होऊन बाहेर पडला. "अन्याय करणारा जेवढा दोषी असतो, तेवढाच प्रतिकार न करता तो सोसणाराही दोषी असतो. कौरवांना काय दोष द्यावा? माझे हे पाचही पती महाबलवान असून, श्रेष्ठ प्रतीचे योद्धे असून, आपल्या कुलस्त्रीचा निर्लज्जपणे होणारा धडधडीत अवमान, तिची विटंबना व अन्याय मुकाट बघत राहिले. हे पाचही पती शरण आलेल्याचा कधीच अपेक्षाभंग करीत नाहीत. मग मी शरण आले असताही ते गप्प कसे काय राहिले? या प्रत्येक पतीपासून मला एकेक तेजस्वी पुत्र झाला आहे. त्या पुत्रांच्या मातेच्या लज्जेचं रक्षण आम्ही करू शकलो नाही, हे कुठल्या तोंडानं ते पुढील पिढीला सांगणार आहेत?

"कपटानं फासे करवून कौरव कुटिलपणे द्यूत खेळले. त्यांनी अन्यायानं यांचं राज्य हिरावून घेतलं. सर्वांना दास केलं. प्राचीन द्यूतगृहात सर्व ज्येष्ठांसमोर एकवस्त्रा, रजःस्वला असलेल्या माझी धिंड काढली. माझ्या या पाचही पतींचा पराक्रम अशा जीवघेण्याप्रसंगी उपयोगी पडणार नसेल, तर तो काय जाळायचा आहे? अर्जुनाचं गांडीव आणि भीमसेनाची गदा काय कामाची? धिक्कार – धिक्कार असो, त्या

भीमसेनाच्या सामर्थ्याला आणि अर्जुनाच्या शौर्याला. ते विद्यमान असता दुर्योधन–दु:शासनासारखे नीच क्षणभरदेखील जिवंत कसे काय राहू शकतात? अर्जुनाने पणात जिंकलेली मी, सासूबाईंच्या आज्ञेनं आणि ज्येष्ठांच्या इच्छेनं पाचांची पत्नी झाले. त्याचा दाखला देत कौरव 'तू पाचांची असलीस काय आणि एकशेपाचांची असलीस काय?' असं मला भर सभेत निर्लज्जपणे विचारून, दात विचकून खदखदा हसले.

"पहिलं द्यूत कमी पडलं म्हणून की काय, हा कुलदीपक ज्येष्ठ पांडव पुन्हा अनुद्यूत खेळला. कशासाठी? तर हरलेलं सर्व परत मिळेल या अभिलाषेनं. कृष्णा, याचं जीवन व्यापून राहिलेली ती मूढ व विनाशकारी अभिलाषा, तुला कधीच जाणवली नाही काय?"

माझ्या एकाही प्रश्नाचं द्वारकाधीश म्हणविणारा तो सर्वज्ञ कृष्ण उत्तर देत नव्हता. त्या वनबैठकीत मुकाट बसून होता. त्याचं मौन तर मला सर्वस्वी असह्य झालं. मी तिडिकेनं म्हणाले, "हे पाचही जण माझे पती व्हायच्या योग्यतेचे नाहीत. मला पती नाहीत. मी कुणाची पत्नी नाही, कुणाची स्नुषा, कन्या नाही. कुणाची माता नाही आणि कृष्णा, तू माझा भाऊ नाहीस, सखा नाहीस. तू माझा कुण्णी, कुण्णी नाहीस. मी आहे एकटी – एकाकी!" असह्य दु:खावेगानं मुख ओंजळीत घेऊन मी त्या वनसभेत गदगद स्फुंदू लागले. मला काहीही दिसत नव्हतं. मान वर करवत नव्हती.

मी हमसतच कसंतरी म्हणाले, "हे पतीही माझे नव्हेत. पुत्रही माझे नव्हेत. बंधूही माझे नव्हेत. पिता पांचालनरेश आणि हा बंधू धृष्टद्युम्नही माझा नव्हे. सर्वांत पिळवटणारं माझं दु:ख आहे कृष्णाऽ, कृष्णाऽ, तूही माझा कुणी नव्हेस, म्हणूनच तर त्या निर्लज्ज कौरवांनी माझा छळ केला. इंद्रप्रस्थाची महाराणी असून आज मी वनवासी झाले. त्याची कसलीही खंत न मानता, वीर असूनही तुम्ही माझी उपेक्षा करीत आहात. कर्ण मला वेश्या म्हणून जो सर्व ज्येष्ठांसमोर कुत्सित हसला, त्यानं पेटलेला माझ्या अंत:करणातील अग्नी क्षणभरही शांत होत नाही रे, कृष्णा!

"तू मला सखी मानतोस. माझीही तुझ्यावर नितांत भक्ती आहे. तुझ्या अंगी अशरण व प्रचंड सामर्थ्य आहे. द्यूतगृहात माझी विटंबना होत असताना मी प्राणपणानं तुलाच शरण गेले. जीवदेठापासून धावा केला तो तुझाच. आजही करीत आहे. उद्याही करेन. कृष्णाऽ, मला स्पष्ट सांग, माझ्या स्त्रीत्वाचे धिंडवडे काढणाऱ्या या पाप्यांना तू शासन करणार की नाही?"

माझ्या अग्निलोळासारख्या बोलांनी ती वनसभा अंगभर थरारली. सारे चिडिचाप झाले. तसं कृष्णच म्हणाला, अगदी मोजकंच; पण आश्वासक – "माझ्या प्रिय सखे, कृष्णे, ज्यांच्यावर तुझा क्रोध आहे, ज्यांनी तुझी ज्येष्ठांसमोर अशोभनीय विटंबना केली, ते–ते सर्व अर्जुनाच्या बाणांनी आणि भीमसेनेच्या गदेनं ठार होतील! हे घडेल तेही माझ्या साक्षीनं. तुझ्यासह पांडवांकरिता जे–जे करावयाचं, ते–ते मी करेन. केश मोकळे सोडून तू जशी शोकग्रस्त वावरते आहेस, तशाच कौरवांच्या स्त्रियाही केश मोकळे सोडून आपापल्या पतीसाठी धाय मोकलून रडतील! जीवनभर मी कधीही कसलीच प्रतिज्ञा केली नाही. आज मात्र ती करतो आहे, केवळ तुझ्यासाठी! कृष्णेऽ, शोक आवर. विश्वास ठेव द्रौपदी, तुझ्या कृष्णाचे हे शब्द कधीच खोटे ठरणार नाहीत. पांडव पुन्हा राजे होतील. तू त्यांची महाराणी होशील."

कृष्णाच्या बोलांनी तरतरी आलेला अर्जुनही न राहवून म्हणाला, "द्रौपदी, कृष्णानं सांगितलं तस्संच होईल."

आता माझा बंधू धृष्टदादाही धैर्यानं म्हणाला, “हे भामिनी, आपल्या पित्याचा घनघोर अपमान करणाऱ्या, गुरू असून तुझी विटंबना अर्थाचा दास म्हणून हताशपणे निमूट बघणाऱ्या द्रोणाचा मी वध करेन. आपला शिखंडी योग्य वेळी भीष्माला ठार करील आणि हा महाबली भीमसेन आपल्या शपथेप्रमाणे दुर्योधनाची मांड चिणून टाकील. हा धनुर्धर धनंजय, तुला वेश्या म्हणणाऱ्या सूतपुत्र कर्णाचा कंठनाळ छेदील. या भगवान वासुदेव श्रीकृष्णाचा पाठिंबा असल्यावर आम्ही अजिंक्यच राहू. धृतराष्ट्राच्या अविवेकी पोरांची कथा ती काय?”

धृष्टदादा व माझा पती अर्जुन यांचे उद्गार ऐकून ती वनसभा शांत झाली. तसं कृष्ण म्हणाला, “कृष्णे, मी द्वारकेत असतो, तर जसा राजसूयासाठी इंद्रप्रस्थात आलो होतो, तसा विष्णुयागासाठी हस्तिनापुरातही आलो असतो. ते विनाशकारी द्यूत मी कधीच होऊ दिलं नसतं. महाराज धृतराष्ट्राला दु:शासन काय काय करतो आहे, हे माझ्या चित्रदर्शी भाषेत ऐकवून, त्याचे अंतश्चक्षू उघडायला लावले असते. त्याला बोलता केला असता. हे घडलंच नसतं, तर महाराणी गांधारीदेवीला तिच्या ठायीच्या स्त्रीत्वाची जाणीव देऊन, स्वहस्तेच तिला डोळ्यांवरची वस्त्रपट्टी जीवनात पहिल्यांदा खेचायला लावली असती. त्यातही यश आलं नसतं, तर तू माझा केलास, तसा मी सुदर्शनाच्या दिव्य मंत्राचा नक्कीच धावा केला असता. मला विश्वास आहे, ते मला स्पष्ट स्मरले असते आणि तुझ्या वस्त्राला हात घालणाऱ्याचा, तुला वेश्या म्हणून हिणवणाऱ्यांचा मी द्यूतगृहातच वध केला असता.

“पण याज्ञसेनी, त्या वेळी मी शाल्वाबरोबरच्या युद्धात गुंतलो होतो. पश्चिम सागरकिनाऱ्यावर होतो. द्वारकेत परतल्यावर अमात्य विपृथूंनी मला सर्व सांगितलं. ते ऐकताच मी इकडे आलो आहे. युधिष्ठिरा, तुम्ही मला न भेटताच वनात निघून आलात, याविषयीही आता माझ्या मनात कसलाही किंतू नाही. लौकिक व्यवहाराच्या सर्व गोष्टी या कृष्णेसाठी व तुम्हा पांडवांसाठी मी कधीच मोलाच्या मानत नाही. जीवनभर जमेल तसं दुष्टांना शासन देत आलो. यापुढे माझं जीवितकार्य राहील, ते तुम्हाला न्याय देण्याचं.”

आता मी व माझे पती कितीतरी सावरलो होतो. काहीतरी आठवल्यामुळे ‘आलोच मी’ म्हणत एकाएकी युधिष्ठिर अंगणातून पर्णकुटीत गेला. काहीतरी वस्तू घेऊन बाहेर आला व पुन्हा आपल्या आसनावर बसला. त्याच्या हातात होतं, एक ताम्रतबक. ते कृष्णाच्या हाती देत तो म्हणाला, “द्रौपदीला चुलीतील अग्नी फुलविताना घामाघूम व्हावं लागतं, म्हणून मी कठोर सूर्याराधना केली. मला एका तेजस्वी योग्यानं साधनेच्या जागी येऊन हे तबक दिलं आहे. तो एवढंच म्हणाला, ‘जेव्हा केव्हा तुमचा पत्नीला अन्न शिजविण्याची आवश्यकता वाटेल, तेव्हा याचा उपयोग होईल. मात्र हे तबक सूर्यकिरणांत ठेवून तुम्ही करता ती आराधना, त्या वेळी करावी लागेल.’

“त्याला साधनाबैठकीतच वाकून नमस्कार करताना मी क्षणैक डोळे मिटले. उघडले, तेव्हा तो पाठमोरा होऊन दूर निघूनही गेला होता. कोण असावा हा, असा प्रश्न स्वत:ला करीतच मी तो गेला त्या वाटेकडे बघतच राहिलो. त्याच्या पायठशांखालील वाळलेलं गवत जळून काळवंडलेलं मला स्पष्ट दिसलं.” युधिष्ठिरानं घडलेला वृत्तान्त सांगितला.

कृष्णानं ते ताम्रतबक हाती घेऊन एकदा निरखलं. तो स्वत:शीच हसला. डोळे मिटून

तो काहीतरी पुटपुटला. तबक पुन्हा युधिष्ठिराच्या हाती देत हसत म्हणाला, "हे तबक गुणवान आहे. तुम्हाला अन्नाची कमतरता ते कधीच पडू देणार नाही."

काम्यकवनातील आमच्या पांडववस्तीवर कृष्णासह ते सर्व, काही दिवस राहिले. एकदा उद्धवदेव मला म्हणाले, "द्रौपदी, तू आणि तुझे पाचही पती भाग्यवान आहात. वनात आहात याचा खेद मनात ठेवू नका आणि माझा दृढ विश्वास आहे, दादा म्हणाला तसंच होईल. तोच ते करवून घेईल. माझ्यापेक्षाही तू त्याला अधिक जाणतेस!"

मी सावध झाले. पटकन त्यांना म्हणाले, "मी त्याला चांगली जाणते, हे तर खरंच. पण देव, तुमच्याएवढी नाही; हेही तितकंच खरं!" ते ऐकताना उद्धवदेव सत्त्वशील हसते. ते बघताना मला दरवेळी वेगळाच प्रत्यय देणाऱ्या कृष्णाच्या हास्याचं तीव्र स्मरण झालं. त्यांच्याकडे बघणं, हा कृष्णाची दर्पणातील मुद्रा बघण्याचाच आनंद देणारं होतं.

धृष्टदादानं रथातून आणलेल्या अर्जुनाचं गांडीव धनुष्य, भीमसेनाची गदा, नकुलाचं खड्ग, सहदेवाचं मुसल अशी सर्व शस्त्रं व जीवनोपयोगी वस्तू सेवकांकडून आम्ही पर्णकुटीत नीट लावून घेतल्या. त्यात माझ्या सौत्रामणीमातेनं दिलेलं केश सावरण्याची फणी आणि नेत्रांत घालायचं अंजन बघून मला तिची तीव्र आठवण झाली.

ते सर्व आमचा निरोप घेऊन परत जायला निघाले. जीवनानं समोर ठेवलेला मार्ग प्रत्येकालाच आक्रमावा लागतो. तरीही कृष्ण जाणार, म्हणून माझं मन भरून आलं. मी त्याला म्हणाले, "पुढच्या वेळी येताना रुक्मिणी आणि भामावहिनींसह सर्व वहिनींना घेऊन ये. सुभद्रेला सांग, मी तिच्या धनुर्धराची नीट काळजी घेते आहे. प्रिय अभिमन्यूसह मला भेटून जा म्हणावं एकदा."

माझा सखा कृष्ण, उद्धवदेव, दारुक व धृष्टदादासह काम्यकवनातून निघून गेला. जाण्यापूर्वी त्यानं तो काय करणार आहे, हे निःसंदिग्ध शब्दांत सांगून मला कितीतरी मोठी मनःशांती मिळवून दिली होती. प्राणप्रिय सख्याचं हेच तर काम असतं– जन्मानं जुळून आलेलं, जिवाभावानं जोडलेलं सख्यत्व जपणं हे! त्यानं दिलेल्या अभिवचनामुळे आमचं वनवासी जीवनही निःशंक व आनंददायी झालं. हा वनवासही काही थोडाथोडका नव्हता. चांगला बारा वर्षांचा होता.

या बारा वर्षांच्या आम्हा सर्वांची सत्त्वपरीक्षा बघणाऱ्या एका तपात आम्ही एकूण तीन वनांत राहिलो. काम्यकवन, द्वैतवन आणि गंधमादन. त्यातील पहिले सहा महिने आम्ही काम्यकवनात होतो. या वनात आम्हा सर्वांचा निर्वाह माझ्या पतींनी गोळा केलेल्या फळांवर, कंदमुळांवर व मृगयेच्या अन्नावर होत असे. मृगयेलाही ते आलटून–पालटून जात असत. कधी–कधी भीमसेन एकटाच दोन–दोन वराह व तीन–चार मृग वनवासींच्या साहाय्यानं कुटीवर आणे. या वनात आणखीही काही आश्रम होते. तेथील तापसांच्या नित्यकर्मात या मृगयेच्या हलकल्लोळामुळे बाधा येऊ लागली. त्यांनी युधिष्ठिराकडे नित्यकर्मात बाधा येत असल्याचं गाऱ्हाणं घातलं.

आम्ही काम्यकवन सोडण्याचा निर्णय घेतला. द्वैतवनात आलो. इथे ध्यानीमनी नसताना, एके दिवशी महर्षी व्यास आमच्या भेटीसाठी आले. दोन दिवस इथे राहिले. या दोन दिवसांत माझे पाचही पती व मी त्यांच्या सेवेत गुंतलो. या काळात पांडवांपैकी कुणीही वनात गेलं नाही. समोर आलेला बिकट वनवास आम्ही कसा पार पाडावा, याचं

महर्षींनी नाना परींनी आम्हाला सूक्ष्म मार्गदर्शन केलं. या वनातही आम्ही सहा मास म्हणजे मार्गशीर्षापर्यंत राहिलो.

वनवासाच्या दुसऱ्या टप्प्यात आम्ही द्वैतवनातून पुन्हा काम्यकवनात आलो. कुरूंच्या द्यूतसभेत माझ्यावर दुर्योधन, दु:शासन, शकुनी, कर्ण यांनी आणलेला प्रसंग हा त्यांच्या राजसूडाचा दर्शक होता. ते काही द्यूतगृहात सर्व ज्येष्ठांसमोर माझ्या शीलावर घाला घालणार नव्हते. माझ्याकडून जाणते–अजाणतेपणी झालेल्या अवमानाचा प्रतिशोध घ्यावा ही, त्यांची भावना प्रबळ होती. त्यातल्या एकाच्याही मनात मजविषयीच्या कामुकतेचा अंशही नव्हता. पण इथे काम्यकवनात माझ्या शीलावर घाला घालणारा एक प्रसंग ओढवला.

सिंधु–सौविरांच्या अधिपती जयद्रथानं हा प्रसंग माझ्यावर आणला. तो आपल्या सिंधू देशाहून शाल्वाच्या मार्तिकावती नगराकडे चालला होता. त्याच्या सोबत शिबींच्या सुरथ राजाचा पुत्र कोटिक होता. त्यांच्या जोडसेनेचा पडाव आमच्या आश्रमाजवळ पडला. होय, आमची पांडववस्ती आता धौम्य ऋषींच्या वास्तव्यामुळे आश्रम म्हणून ओळखली जात होती.

आश्रमात माझ्या पर्णकुटीत मी एकटीच व गुरुकुटीत मुनिवर धौम्य आणि काही शिष्य, सेविका असताना माझ्या कुटीत शिबींचा कोटिक आला. दिवस ग्रीष्माचे होते. उत्तरीयानं कपाळावरचे घर्मबिंदू टिपत त्यानं माझ्याकडे प्यायला पाणी मागितलं. मातीचा गडवा भरून मी ते द्यायला गेले. माझ्या टाचेपर्यंत उतरलेल्या विमुक्त केशभाराकडे आणि सावळ्या कमनीय देहाकडे अनिमिष नेत्रांनी बघत तो पाणी प्याला. गडवा माझ्या हाती देताना माझ्या डोळ्यांत खोलवर बघत म्हणाला, “इथे कुटीत कुठं फुललेली नीलकमळं आहेत काय? तसा गंध येतोय, म्हणून विचारलं!”

“नाही पर्णकुटीत तशी कमळं नाहीत. माझ्यामुळे येतोय तो गंध!” मी निरागस हसत उत्तरले. तोही हसत, धन्यवाद देत निघून गेला.

मी नित्याच्या स्वयंपाकाच्या कामाला लागले. आज संरक्षक पाळीवर असलेला नकुलही कधी नव्हे; तो काहीतरी आणण्यासाठी वनात गेला होता. कुटीत मी एकटीच होते. अर्ध्या घटकेतच माझ्या कुटीभोवती प्रथम सैनिकांचा कलकलाट ऐकू आला. पाठोपाठ एक धिप्पाड शस्त्रसज्ज पुरुष ‘कुठे आहे ती पांडवांची द्रौपदी – कौरवांची वनवासी सुगंधी दासी?’ म्हणत कुटीत शिरला. त्याचे डोळे कामाग्नीनं कसे पेटलेले होते! दुर्योधन–दु:शासनापेक्षा ते कितीतरी वेगळे होते.

कसलाही विचार न करता, त्यानं सरळ माझ्या कटीला हाताचा विळखा घातला. माझं, चक्क एका विवाहितेचं, पाच पतींच्या पत्नीचं दिवसाढवळ्या बलात हरण करून तो चालला. मी पुन्हा जीवदेठापासून हंबरडा फोडला, ‘मुनिवर धावाऽऽ वाचवाऽऽ’ धौम्य ऋषी काही सेवक–सेविकांसह धावले, पण जयद्रथानं मला रथात घालून सारथ्याला धावणीचा आदेश दिला. रथ चालला. त्याच्याबरोबर फरफटत माझं स्त्रीजीवन चाललं. कुणाकुणाच्या कामुक अभिलाषी, अत्याचारी डोळ्यांना द्रौपदी नावाचा माझ्या हा देह बळी पडणार होता?

माझं मनगट जयद्रथानं आपल्या बळकट मुठीत घट्ट धरलं होतं. त्याचा सारथी

रथामागे वाघांची झुंड लागल्यासारखा रथ दौडवीत होता. मी असाहाय्यपणे पिळवटून हंबरत होते, "अच्युताऽ, माधवाऽ मिलिंदाऽ धाव." जयद्रथ तिरस्कारानं विक्राळ हसत म्हणत होता, "तो गवळट राहिला द्वारकेत. तुझ्या पाचही पतींना राहू देत इथं काम्यकवनात लाकडं गोळा करीत! चल, तुला मी सिंधु–सौविरांची महाराणी करतो. तुझ्यासारखं सुंदर रत्न सिंधुअधिपतीच्या किरीटातच शोभून दिसतं. इथे वनात काटक्या–कुटक्या गोळा करण्यासाठी तुझा जन्म नाही. तुझ्या सुगंधाची कीर्ती ऐकून तुझा शोध घेतं मी इथवर आलोय."रथ दौडतच होता. त्याचे शब्द ऐकवत नव्हते.

इकडे आमच्या आश्रमात सर्वांत प्रथम परतला होता, तो माझा वीरपती भीमसेन. त्याला धौम्य ऋषींकडून माझ्या हरणाची वार्ता समजली मात्र, त्यानं क्षणाचाही विलंब लावला नाही. आश्रम–कुंपणातील पश्चिमेकडच्या दगडी चौथऱ्यावर चढून एकटया अर्जुनाला धावण्याची संकेती आरोळी त्यानं दिली. दुसऱ्याच क्षणी सहदेवानं बांधून ठेवलेल्या एका धिप्पाड अश्वावर मांड जमवून धौम्य ऋषींनी संकेत दिलेल्या दिशेनं भीमसेन धावू लागला. जाताना तो एकच दक्षता घेतं होता. आडव्या येणाऱ्या वृक्षांच्या फांद्या आपल्याबरोबर धावतानाच ओरबाडत चालला होता. हत्ती कुठल्या दिशेनं गेला आहे, हे जसं त्यानं ओरबाडलेल्या फांद्यांवरून कळतं, तसं! तसाच हा मागून येणाऱ्या अर्जुनाला संकेत होता.

माझ्यावरच्या तीव्र प्रेमापोटी तत्काळ निघताना तो गदा घ्यायलाही विसरला. अर्ध्यावरच त्याच्या हे ध्यानीही आलं. तिथून मागे परतणं शक्य नव्हतं. त्यानं आपलं ठेवणीतील शस्त्र बाहेर काढलं होतं. ऐकणाऱ्याला भेदरून टाकणारा कितीतरी भसाडा असा वायुपुत्राचा आवाज होता. युद्धात तर तो प्रतिस्पर्ध्याला आपल्या अक्राळविक्राळ आरोळ्यांनीच अर्धमेला करी. कंठ फुलवून तो आरोळ्या देऊ लागला, "जयद्रथाऽ नीचाऽ थांब. पांडवांचं सुगंधी कमळ मी असताना असं खुडून नेता येईल, असं वाटलं काय तुला? पाप्याऽ थांऽब."

मला घेऊन धावणारा जयद्रथाचा रथ एक नदी आडवी आल्यामुळे निरुपायानं थांबला होता. त्याचा सारथी कोणी धीवर मिळतो का, त्याची नौका पाण्यात लोटता येते का, या शोधात असतानाच; मला भीमसेनाच्या धीर देणाऱ्या प्रबळ आरोळ्या ऐकू आल्या. तशी मी निर्भय झाले. मी ऐकल्या तशाच त्या आरोळ्या जयद्रथानंही ऐकल्या. माझं मनगट घट्ट धरून तो मला दूरवर दिसणाऱ्या एका नौकेकडे फरफटत नेऊ लागला. त्याचा शस्त्रधारी सारथी भीमसेनाला रोधण्यासाठी आडवा गेला. भीमसेन तर नि:शस्त्र, हाती लागतील ते पाषाणगुंड सारथ्यावर फेकत तो आरोळ्या देऊ लागला. त्या होत्या, "जयद्रथाऽ नीचाऽ थांब. खरा सिंधुपती असशील, तर माझ्याशी द्वंद्व खेळ!"

पाठीमागून गांडीव धनुष्यासह येणाऱ्या अर्जुनालाही त्या आरोळ्या ऐकू येत होत्या. भीमसेनानं एव्हाना नुसत्या पाषाणांच्या फेकीनं सारथ्याला वधलं होतं. त्याच्या हातातील खड्ग खेचून आपल्या हाती घेतलं होतं.

आता आमच्या रोखानं सुंकारणारे वेगवान बाण धावू लागले. त्यांच्या 'सांऽय सांऽय' आवाजानंच मी ओळखलं की, माझा पती धनुर्धर अर्जुन आला आहे. काही क्षणांतच भीमसेनाच्या शेजारी दूरवर अर्जुनही दिसू लागला. एव्हाना फरफटत ओढल्यामुळे, सतत आक्रोशल्यामुळे मी अर्धमेली झाले होते.

त्या दोघा कुंतीपुत्रांना आपल्या पाठलागावर आणि तेही एकत्र येताना बघून

जयद्रथ हडबडला. माझ्या मनगटावरची त्याची पकड ढिली पडली. मला जागीच सोडून सिंधुअधिपती म्हणविणारा तो वीर क्षत्रिय, काम्यकवनाच्या गर्द वृक्षराजीत हां–हां म्हणता दिसेनासाही झाला. चक्क पळाला.

माझ्या भीमार्जुन या पतींच्या तत्परतेमुळे माझ्या लज्जेचं रक्षण झालं होतं. द्यूतसभेत माझ्यावर ओढविलेल्या प्रसंगी माझे विक्रमी पती पुरुषार्थहीन होऊन मुकाट बसले, यासाठी माझा त्यांच्यावर मनोमन रोष होता. युधिष्ठिरावर तो सर्वाधिक होता. जयद्रथाच्या या घाल्यानं भीमार्जुनावरील रोष कितीतरी कमी झाला. माझं पुन्हा लज्जारक्षण झालं याचा जेवढा आनंद मला वाटला, त्याहून अधिक समाधान वाटलं, ते भीमार्जुनांच्या लुप्तप्राय झालेल्या विक्रमाला पुरा धार आली, धुमारे फुटले याचं! अद्याप मात्र मी युधिष्ठिराला क्षमा करायला काही तयार नव्हते. माझं पाच पतींत विभाजन त्यानंच केलं होतं.मला पणाला लावून निर्लज्ज विमूढासारखा तोच द्यूत खेळला होता. वंदनीय ज्येष्ठांसमोर माझ्या नेसत्या वस्त्राला हात घालण्याचं धैर्य दुःशासनाला त्याच्या करणीमुळेच आलं होतं.

खूप विचारांती मी ठरविलं की, या पाच पतींपैकी दोघांचा पुरुषार्थ फुलला आहे. इतरांचाही फुलला पाहिजे. नाहीतर ते वनातच पाषाणखंडावर पडलेल्या अंगारांसारखे विझून जातील. आमच्या वनबैठकीत निर्णय घेण्यात आला. एकतरी अस्त्र हाताशी पाहिजे. त्यासाठी पाशुपतास्त्र मिलविण्याची योग्यता असलेल्या अर्जुनानं हिमवानात जावं. शिवाकडून ते अस्त्र, पडेल ती घोर तपस्या करून प्राप्त करावं.

सर्वानुमते ठरल्याप्रमाणे आमचा निरोप घेऊन अर्जुन उत्तरेच्या दिशेनं निघून गेला. आश्रमात एकांतवेळी जसजसं मी कृष्णाचं स्मरण केलं, तसतसं मला माझ्यातीलच सुप्त द्रौपदीचा शोध लागत गेला. मला पुरतं–पुरतं कळून चुकलं, वनवासाच्या या दीर्घकाळात पाच पतींची केवळ पत्नी म्हणून जगून माझ्या निभाव लागणार नाही. प्रथम मला या सर्वांची प्रसंगी कान पिळणारी, तेवढंच मनोमन प्रेम करणारी माताही झालं पाहिजे.

आमचं इंद्रप्रस्थ राज्य आता कौरवांनी गिळंकृत केलं होतं. हस्तिनापूरची राजकीय व्यवस्था त्यांनी इंद्रप्रस्थावर लादली होती. आमच्या चतुरंगसेनादलाचे सर्व अधिकारी, दलप्रमुख त्यांनी काढून टाकले होते. त्यांच्या जागी हस्तिनापूरचे अरेराव दलप्रमुख नेमले होते. वनवास माझ्या आणि नुसत्या पांडवांचा नव्हता. वनवास इंद्रप्रस्थाच्या आमच्या अधिकाराखाली, सुखात नांदणाऱ्या अठरापगड प्रजाजनांचाही होता. महात्मा विदुर, मंत्री संजय यांच्याकडून येणाऱ्या वार्तांमधून तो आम्हाला कळत होता.

आता आम्हाला काम्यकवनात येऊन सहा वर्षांचा कालावधी लोटला होता. मध्यंतरी किरात रूपातल्या शिवाकडून पाशुपतास्त्र प्राप्त करून हिमवानातून अर्जुनही परतला होता. या काळात द्वारकेहून कृष्णाकडून कधी अमात्य विपृथू, कधी सेनापती सात्यकी किंवा अनाधृष्टी, कधी अप्रतिम सुंदर दिसणारा कृष्णपुत्र प्रद्युम्न येऊन भेटून गेले होते. जेव्हा–जेव्हा प्रद्युम्न आला, तेव्हा तो नकुलासह एक–दोनदा वनातही धौम्य ऋषींच्या यज्ञासाठी समिधा आणायला गेला. ते दोघं एकत्र आले की, मजेदार दिसत. वनवासी शुभ्र वेषातील नकुल आणि राजवेषातील प्रद्युम्न सारखेच दिसत.

कधी–कधी रेवतीवहिनी व गद–सारण या बंधूंसह बलरामदादाही येऊन जात. त्यांची

भीमसेनाशी गाठ पडली की, निरोपाची वेळ येईपर्यंत दोघंही एकत्रच असत. विशेष म्हणजे या काम्यकवनातील आमच्या अंगणाचाच गदेचा आखाडा करून दोघंही गुरुशिष्य कधीतरी घामेघूम होईपर्यंत इथेही गदायुद्ध खेळत. दोघंही पट्टीचे घोरणारे असल्यामुळे रात्रीच्या समयी दोघांच्याही दर्भशय्या अंगणातच पडत. एक गोष्ट विशेष होती – दोघंही अगदी ब्राह्मी मुहूर्तावर उठून झऱ्यात स्नान आवरून परतलेले असत. कधी–कधी संध्यासमयी सांध्यवंदना होताच भीमसेन आपल्या गुरूच्या तळपायांना तेल चोळून त्यांचं मर्दनही करे.

बलरामदादा आले की, हटकून माझ्या मनात त्यांची व कृष्णाची नकळतच तुलना होऊन जाई. लक्षात येई, बलरामदादांची तुलना भीमसेनाशीच होऊ शकते.

माझ्या पाचही पतींनी या काम्यकवनात धौम्य ऋषींनाच आचार्य व गुरू मानलं होतं. या वनवासामुळे धौम्य ऋषी त्यांच्या अधिक जवळ आले होते. ते इथे आलेत, हे त्यांच्या आर्यावर्तात पसरलेल्या शिष्यांना कळल्यामुळे ते तांडयातांडयांनी काम्यकवनात येत. कधी–कधी त्यांची संख्या पाच–पन्नासच्याही वर असे. मग त्यांच्या भोजनाचा प्रबंध करताना मुनिवरांची तारांबळ उडून जाई. ती हेरलेला युधिष्ठिर मग मला म्हणे, “द्रौपदी, तुझं श्रीकृष्णानं मंत्रभारित केलेलं ताम्रतबक दे मुनिवरांच्या पर्णकुटीत पाठवून.”

मग कितीतरी वेळ ते ताम्रतबक धौम्य ऋषींच्या पर्णकुटीसमोर अंगणात सूर्यकिरणांत तळपत राही. त्यात शिजवलेलं अन्न आलेल्या अतिथींना कधीच कमी पडत नसे. अशा शिष्यगणांच्या पंक्तींना आग्रहानं वाढताना युधिष्ठिराला बघून माझ्या मनीचा त्याच्याविषयीचा रोष हळूहळू कमी होऊ लागला.

काम्यकवन झोडपून काढणारा वर्षा ऋतू उलगडला. दुथडी वाहणाऱ्या वनातील नद्या तासात आल्या. शरद ऋतूच्या कडक थंडीचा माग देणारं धुकं वनावर पडू लागलं. आता लवकरात लवकर काम्यकवन सोडणं भाग होतं. भीमार्जुनांनी आपल्या भावांच्या सहकार्यानं दोन आटोपशीर सुंदर होडया तयार केल्या. पाचही बंधू आलटून-पालटून खांद्यावरून त्या वाहून नेणार होते. कुठलंही वनसंसाराचं साहित्य बरोबर न घेता, आम्ही अंगच्या वस्त्रांनिशी हे वन सोडणार होतो. जाऊ तिथे नव्यानं पुन्हा नवी पर्णकुटी, नवा डाव मांडणार होतो. ठरलेल्या दिवशी आम्ही सर्वांनी धौम्य ऋषींचं दर्शन व आशीर्वाद घेतले. तेही आमच्या मागून नव्या वनात शिष्यगणांसह येणार होते.

अनेक नद्या पार करून आम्ही काम्यकवनातून द्वैतवनात आलो. भीमर्जुनांनी इथेही एक हवी तशी प्रशस्त पर्णकुटी उठविली. ती पूर्वीपेक्षाही आकारानं मोठी होती. माझ्या पाचही पांडवपतींनी तिच्याभोवती मोठा घेर धरून एक बळकट व संरक्षक लाकडी कुंपण टाकलं. लगतच ऋषिवरांच्यासाठी आणि त्यांचा शिष्यगणांच्या तपस्येसाठी लहान–मोठ्या पर्णकुटयांचं संकुल उठविलं. आमचं गोधन व पशुधन मुनिवर्य धौम्य आपल्यासमवेत नंतर घेऊन येणार होते. दोन–एक मासांतच द्वैतवनातील आमची पांडववस्ती सुरळीत नांदती झाली. तसं युधिष्ठिरानं धौम्य ऋषींना नकुलाकडून पाचारण केलं. प्रथम ऋषींचे शिष्य तांड्या–तांड्यानी पशुधनासह आले. सगळयात शेवटच्या तांड्यातून ऋषिवर धौम्यही आले.

आता द्वैतवनातील आमची पांडववस्ती पूर्ण रूपानं नांदती झाली. भल्या पहाटे ऋषिवरांच्या मध्यभागीच्या उंच पर्णकुटीतून साधनाघोष उठू लागले. कुटीकुटीतून उफाळणाऱ्या धूरलोटांत ते मिसळू लागले. धौम्य ऋषींच्या आचार्यकुटीसमोर प्रशस्त

यज्ञकुंड धगधगू लागलं. त्यांच्या शिष्यगणांची आश्वासक सत्त्वशील ईशस्तवना घुमू लागली –

> “ॐ ईशावास्यमिदं सर्वम्
> यत्किंच जगत्यान जगत्
> तेन त्यक्तेन भुञ्जिथा:
> मा गृध: कस्यस्विद्धनम्।।”

हे सर्व विश्वच परमेशाचं वसतिस्थान आहे, अशा अर्थाची त्या ईशस्तवनातील प्रारंभीची प्रार्थना ऐकताना, मला हटकून कृष्णाची आठवण होई. तो दूरदेशी कुठेतरी पश्चिमसागरकिनारी आहे, असं वाटतच नसे. तो सतत सदैव इथे, या द्वैतवनातच आम्हा पांडवकुटुंबातच वावरतो आहे, असं वाटे. जसं मला वाटत असे, तस माझ्या पतींनाही कृष्णाविषयी वाटतं की नाही, याची परीक्षा घेण्याची अनावर इच्छा मला होई. त्या सर्वांनी याविषयी एकदमच विचारलं असतं, तर पहिल्याच्या उत्तराला धरून इतर चौघांनी आपलीही उत्तरं दिली असती. प्रत्येकाच्या मनातलं खरं मत बाहेर पडलं नसतं. माझी परीक्षा मला हवी तशी पूर्ण झाली नसती.

यासाठी एक–एक करीत मी या द्वैतवनात माझ्या सर्व पतींना चाचपून पाहिलं. ऋषिवरांची, पहिल्याच दिवशीची ईशस्तवना ऐकताना ‘ॐ ईशावास्यम् इदम्’ हा प्रारंभ कानी पडताच मी अर्जुनाला विचारल, “ही ईशस्तवना ऐकताना तुला काय वाटतं, धनंजया?”

त्यानं नेमकं उत्तर दिलं, “ही स्तवना मी मनोमन अहोरात्र म्हणतच असतो. यातील तो परमेश माझ्या हृदयातही वास्तव्य करून आहे, असं वाटतं!” त्याचं उत्तर ऐकताना मला परमानंद झालेला असे.

तरीही त्याचं कृष्णप्रेम त्याला झाडून–झटकून पक्कं करून घेण्यासाठी मी विचारी, “कृष्ण इथे तुझ्यासमोर आला, तर तुला ही स्तवना म्हणावीशी वाटेल का?”

तो जसा अचूक लक्षयवेध साधणारा निष्णात धनुर्धर होता, तसाच बुद्धिमान कृष्णसखाही होता. माझ्या प्रश्नाचा रोख तत्काळ त्याच्या ध्यानी येई. तो म्हणे, “'तो समोर असताना स्तवनाची आवश्यकता काय? स्वत:चीच स्तवना स्वत: कधी कोण ऐकतं का? कृष्णे, तो समोर असताना अर्जुन कधी अर्जुन उरला आहे का?” त्याच्या समर्पक आणि चपखल उत्तरानं मीच निरुत्तर होई.

काही दिवसांनंतर हाच प्रश्न मी ज्येष्ठ पती युधिष्ठिराला विचारला, “ही ईशस्तवना ऐकताना तुला कृष्णाचं स्मरण होतं का?”

त्याच्या स्वभावाप्रमाणे ज्येष्ठपणाला शोभेल असं तो म्हणाला, “द्रौपदी, तुझ्या या खोचक प्रश्नाचं अर्जुनानं काय उत्तर दिलं? तेच माझं उत्तर आहे, असं समज!” या त्याच्या उत्तरात त्याचं हरवलेलं राजेपण असे. ज्येष्ठपण असे आणि कृष्णप्रेमही असे. त्यानं हा प्रश्न त्याच्याअगोदर प्रथम अर्जुनालाच विचारलेला असेल, हे अचूक ताडलेलं असे. यात त्याचं ज्येष्ठपण व राजेपण स्पष्ट दिसून येई. अर्जुनानं काय उत्तर दिलं हे माहीत नसतानाही, तो त्याच्याशी सहमती दर्शवी. यात त्याचं कृष्ण आणि अर्जुनप्रेमही व्यक्त होई.

हाच प्रश्न काही दिवसांनी मी भीमसेनाला विचारला. त्यानं उत्तर दिलं, “भूक आणि

सामर्थ्य म्हणजेच मी, असं सर्व म्हणतात आणि मानतात. या दोन्हींशिवाय जग चालत नाही, हे सत्य आहे. मी कृष्णालाच 'भूक' आणि 'सामर्थ्य' मानतो." त्याचं उत्तरही त्याला शोभेसं व अचूकच असे.

नकुलाला हा प्रश्न मी विचारला. तो म्हणाला, "कृष्ण सर्वत्र वास करून आहे. सौंदर्यात तर तो समोरच दिसतो." त्यानं त्याला शोभेसं उत्तर दिलेलं असे.

सर्वांत शेवटी हा प्रश्न मी सहदेवालाही विचारला, "सांग सहदेवा, ही ईशस्तवना ऐकताना तुला नेमकं काय वाटतं?" त्यानं दिलेलं उत्तर त्याच्या स्वभावविशेषाला शोभून दिसेल असंच होतं.

तो प्रश्न ऐकून सहदेव उत्तरला, "श्यामले, जगात सर्वत्र वास करणारा कृष्ण मला अश्वरूपात दिसतो. तो अश्वासारखाच सावध, गतिमान, निद्रेवर नियंत्रण असलेला आहे." त्याचंही उत्तर ऐकून मला समाधानच वाटलं. तेसुद्धा त्याच्या पिंडप्रकृतीला शोभेलसं होतं.

प्रत्येक पांडवाच्या उत्तरात त्याच्या–त्याच्या दृष्टीनं दिसणारा कृष्ण प्रकट झाला होता. निःसंशय त्या सर्वांच्या ठायी अजोड कृष्णप्रेम होतं.

शेवटच्या सहदेवाचं उत्तर ऐकून मीच आत्मलक्षी झाले. आता माझ्यातीलच कृष्णप्रेम कसं आहे, हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न नव्हता काय? मी स्वतःलाच विचारलं, "तुला कसा काय वाटतो कृष्ण?" उत्तर आलं, "बराचसा अर्जुनासारखा. छे–छे, युधिष्ठिरासारखा. नाही, भीमासारखा? छे – मग कोणासारखा? नकुल– सहदेवासारखा? छे-छे – नाही, नाही–" माझ्या मनातील माझ्याच प्रश्नाला काहीही उत्तर मिळत नव्हतं. मी विकल-व्याकूळ झाले. अंतरंगात खोलवटापासून वाटलं, 'तो कसा वाटतो, हे बुद्धीनं तपासून बघण्यापेक्षा प्रत्यक्ष डोळयांनी बघायला मिळालं तर! अगदी या क्षणी!! या द्वैतवनात!!'

सहदेवाचं उत्तर ऐकून व्याकूळ झालेली मी त्याच्याकडे बघत असताना, तो पर्णकुटीतून कुंपणाच्या प्रवेशद्वाराकडे 'अश्वपुरुषऽ अश्वपुरुषऽ' म्हणत आमचं बोलणं अर्धवटच सोडून धावला.

होय! माझ्या भेटीसाठी माझ्या प्रिय सखा, द्वारकेचा राणा प्रत्यक्ष कृष्णच द्वैतवनात आला होता!! त्याचा चार पांढऱ्याशुभ्र घोड्यांचा सालंकृत तेजस्वी गरुडध्वज रथ दारुकानं आमच्या आश्रमाच्या प्रवेशद्वारात आणून उभा केला होता. त्यातून प्रथम माझा कृष्ण उतरला. त्यानं हात देऊन हळुवारपणे भामावहिनींना उतरवून घेतलेलं बघताच, मीही धावले. मी तीव्र स्मरण करताच माझा प्राणप्रिय सखा, भामावहिनी व उद्धवदेवांसह द्वैतवनात समोरच उभा ठाकला होता तर!

कृष्णाची आम्हाला वनात भेटायला येण्याची ही दुसरी वेळ होती. या दुसऱ्या भेटीच्या वेळी मला प्रकर्षानं जाणवलं की, तो वैभवी द्वारकेचा राणा असतानाही आम्हाला भेटायला येताना मात्र सेना, रथ, गजदलं बाजूला ठेवून मोजक्याच माणसांसह अगदी साधेपणानं येत होता. जीवनात कुठलीही गोष्ट त्यानं हेतूशिवाय केली नव्हती. त्याची सजग निद्रासुद्धा जाग्या जगाचं कल्याण चिंतणारी असे. आमच्या भेटीलाही साधेपणानं येण्यात त्याचा एक हेतू होता. आमची वनवासी मनं व क्षत्रिय अस्मिता जपण्याचा! तो जर आर्यावर्तात इतरत्र फिरताना ज्या वैभवानं जात होता, तसा आमच्याकडे आला असता, तर? माझ्या पतींना आपल्या दारिद्र्याची तीव्र जाणीव

झाली असती. जीवनाची अगोदरच अवमानी कोंडी झाल्यामुळे लज्जित झालेली त्यांची मनं, पूर्णत: कोमेजून गेली असती. मला जाणवलेलं कृष्णाचं सर्वांत मोठं वैशिष्टय हेच होत की, तो सतत भोवतीचं जीवन फुलवीत आला होता.

कृष्णाच्या आगमनानं द्वैतवनातील आमचा आश्रम आनंदानं कसा भरून उठला. तो आल्या–आल्या काहीही न खातापिता प्रथम भेटीला गेला, तो धौम्यमुनींच्या. एरवी तेही एकदा तप:साधनेत बसले की, स्वत:ला विसरत. कुणीही सांगितलेलं नसताना ऋषिवरांच्या समोर तो जाताच, त्यांनी हसतच आपोआप डोळे उघडले. कृष्णाला समोर बघताच ते ताडकन उभेच राहिले. कृष्णानं चापल्यानं पुढे होत गुडघे टेकून आपलं मोरपिसानं मंडित, मुकुटधारी नितळ मस्तक त्यांच्या चरणांवर आदरभावानं टेकविलं. ऋषिवरांनी पुन्हा हसून मुखभर आशीर्वाद दिला, 'शुभं भवतु, उठा, द्वारकाधीश!' भामावहिनी व उद्धवदेवांनीही धौम्य ऋषींची पायधूळ मस्तकी घेतली.

प्रसन्न हसणारे ऋषिवर धौम्य आपल्या बैठकीवर बसले. कृष्ण दुहाती उद्धवदेव, भामावहिनी यांना घेऊन दर्भाच्या आसनावर समोरच बसला. त्याला मंडल टाकून उजव्या हाताशी भीमार्जुन, डाव्या हाताशी नकुल–सहदेव व थेट त्याच्या पायाशी येईल, असा युधिष्ठिर बसला. अंग सावरून दारुक पर्णकुटीच्या दारातच उभा होता. त्याच्याकडे लक्ष जाताच कृष्ण म्हणाला, "तू असा दूर का उभा दारुका? ये, जवळ ये. या युधिष्ठिराजवळ बैस." तो संकोचला. चुळबुळत जागीच थांबला. तसं 'ये' अंस पुन्हा त्याला पाचारीत कृष्ण हसला.

'आज्ञा स्वामी' म्हणत दारुक आमच्या यादव व पांडवमंडलात येऊन बसला. धौम्य ऋषींनी द्वारकेतील वसुदेवबाबा, देवकी व रोहिणीमाता आणि बलरामदादा, रेवतीवहिनी या राजमंडळाचं प्रथम कुशल घेतलं.

मग बराच वेळ आम्हा सर्वांच्या वेगवेगळ्या विषयांवर गप्पा झाल्या. त्यात पाशुपतास्त्राचा विषय निघाला. तेव्हा अर्जुनाला त्यानं एक प्रश्न विचारला, "मित्रवरा, तू पाशुपतास्त्र मिळवून परतलास, याचा मला फार आनंद आहे. तुझा अभिमानही वाटतो. अशासाठी की, प्रसन्न व्हायला अवघड असलेल्या शिवालाही तू प्रसन्न करून घेतलंस. मला सांग, पाशुपतप्राप्तीपूर्वीचा अर्जुन व नंतरचा अर्जुन यात तुला काय अंतर वाटतं?"

अर्जुन गडबडला. त्यानं असा कधीच विचार केला नव्हता, तरीही तो चतुरपणे म्हणाला, "तू सर्वज्ञ आहेस. सर्व जाणतोस. मग या सर्वांत माझी का परीक्षा घेतो आहेस?"

कृष्णानं त्याला इकडे–तिकडे सरकू दिलं नाही. विचारलं, "पाशुपतास्त्रातील शिवस्मृतीचे मंत्र अधिक मोलाचे आहेत की प्रत्यक्ष प्रक्षेपणाचे?"

अर्जुन कसलेल्या योद्धयाप्रमाणे उत्तरला, "दोन्हीही!"

"आणखीही एक महत्त्वाची गोष्ट आहे. ती कोणती आहे सांग." कृष्णानं परत प्रश्न घातला.

आता मात्र अर्जुन खरोखरच गडबडला. म्हणाला, "पाशुपतास्त्राच्या पहिली? कळत नाही कुठली ती!" तसं हसूनच कृष्ण म्हणाला, "बंधो उधो, सांग या धनुर्धराला, पाशुपतास्त्रात महत्त्वाची गोष्ट आहे, ती कोणती?"

'होय दादा' म्हणत उद्धवदेव हसतच उत्तरले, "शं करोति इति शंकरा: अशा

अधिकाराचा स्वत: शंकर महत्त्वाचा आहे! पाशुपतास्त्रात मंत्रांपूर्वी प्रत्यक्ष पशुपतीचं स्मरण महत्त्वाचं आहे!”

आता सगळेच अपार आदरानं बघू लागले, ते उद्धवदेवांकडे! धनुर्धर धनंजयाला या दोघा बंधूंसमोर आपण किती कच्चे आहोत, याचा प्रत्यय आला. तो ओशाळला. तेही योग्य नव्हतं. म्हणून कृष्ण पटकन म्हणाला, “बंधो अर्जुना, उधो आणि तू दोघेही माझे सखे आहात. एक पाशुपतास्त्राचा अधिकारी असलेला. एक शिवभक्त असलेला.”

एके दिवशी मी आणि भामावहिनी प्रात:कालची आन्हिकं आवरून वनातील एका सरोवराकाठी आलो. मला धौम्याचार्यांच्या यज्ञविधीत, माझ्या म्हणून कृष्णाच्या स्मरणानं नेहमी अर्पण केल्या जाणाऱ्या समिधा आणायच्या होत्या. हे काम मी कुणावरही सोपवीत नसे. येताना एका मंडलाकार सरोवरातून काषायवर्णी कमलफुलंही माझ्या नित्यपूजेसाठी आणीत असे. आज मझ्या सोबतीला यादवांची कुलस्त्री होती. समिधा गोळा करून आम्ही दोघी सरोवराकाठी येऊन बसलो. सहजच आम्ही सरोवराच्या नील जलात पाय सोडले. आज मला पहिल्यानं तीव्रपणे जाणवलं की, मी किती श्यामल आहे! भामावहिनीचे पाय किती रक्तवर्णी, सुंदर दिसत होते! माझ्या पायांच्या श्यामवर्ण नीलजलात मिसळून गेला होता. तिच्या पायांच्या रक्तवर्णानं नीलजलालाही मागे टाकलं होतं. माझ्या ध्यानीमनी नसताना अचानकच भामावहिनींनी मला विचारलं, “सखी द्रौपदी, बरेच दिवस माझ्या मनात एक प्रश्न रेंगाळत आहे. तुझ्या भेटीत त्याचं निरसन करून घ्यावं, हे मी केव्हाचं योजून आहे.”

“कोणती गोष्ट?” माझ्या मनात कुतूहल उफाळलं.

ती म्हणाली, “प्रश्न तर विचारायचा आहे – पण कसा विचारावा? संकोच वाटतो आहे.”

“तू माझी वहिनी नंतर आहेस. प्रथम आहेस, ती सखी. माझ्या प्रिय कृष्णाची पत्नी. त्यातही तू वडीलधारी. काहीही विचार नि:संकोच अधिकारानं!”

“प्रिय सखे द्रौपदी, मी या द्वैतवनात आल्यापासून बारकाव्यानं बघते आहे, तुझे पाचही पती रात्रंदिवस तुला अत्यंत अनुकूल असे वागतात. तुझ्या वचनाबाहेर जाण्याचं कधीच कुणी नुसतं मनातही आणीत नाही. तुझ्या इच्छेसाठी भीमसेनानं एकदा साहस करून अशाच सरोवराच्या मध्यातून कमलफुलं काम्यकवनात आणून तुला दिल्याचं, बोलण्याच्या ओघात तूच मला सांगितलं आहेस. तर प्रिय कृष्णे, आपल्या पाचही पतींना वश करून ठेवण्यासाठी तू जो उपाय योजतेस, तो मलाही सांग ना!”

माझ्या ध्यानीमनी नसलेला तिचा तो विचार ऐकून मी क्षणैक चक्रावलेच. मला जीवनात पहिल्यानंच कळून चुकलं की, पुरुष तर करतीलच; पण माझ्याविषयी पांडवांबाबत असाही विचार कुण्या एका स्त्रीच्या मनातही येऊ शकतो. आज तो प्रत्यक्ष कृष्णपत्नी भामावहिनीच्या मनात आला होता.

काय उत्तर द्यावं म्हणून मी गोंधळले. तिला म्हणाले, “हे काय विचारते आहेस तू वहिनी? पतीचं मन राखण्याचा असा कुठला वशीकरण मंत्र कधी असतो का?”

ती भामावहिनी होती – रुक्मिणी नव्हे. म्हणाली, “माझा प्रश्न स्पष्ट उलगडूनच सांगते तुला. तुझे हे माझ्या द्वारकाधीशांसारखे विक्रमी व देवतुल्य चांगले पाच पती अहोरात्र तुला वश होऊन कसे काय राहतात? त्यासाठी तू कुठल्या व्रताचं आचरण करतेस? की कामशास्त्रात सांगितलेले काही विशेष उपाय योजतेस? यासाठी तू एखादी

प्रभावी औषधी वनस्पती तर सिद्ध करून घेतली नाहीस ना? सांग, पती कह्यात राहण्यासाठी कुठलं अंजन वापरतेस तू?”

आता मात्र माझ्या आश्चर्याची परमावधी झाली. माझ्या स्वभावाप्रमाणे मीच तिला विचारलं, “प्रिय वहिनी, सखी – आज हा भलताच प्रश्न विचारायचं तुझ्या मनी कसं काय आलं?” माझ्या या प्रश्नानं तिची चर्या थोडीशी उतरली. काही क्षण ती स्तब्धच झाली. बरचसं काही आठवल्यासारखं करून म्हणाली, “काय सांगू सखे द्रौपदी! माझ्या पिता सत्राजितांनी यादवांच्या भरल्या सभेत मला द्वारकाधीशांना अर्पण करून इतकी वर्षं लोटली. माझे पतिदेव कधी–कधी माझ्याशी अत्यंत प्रेमानं, स्नेहानं वागतात. तेव्हा असं वाटतं की, या जगात त्यांना माझ्याइतकं अन्य कुणीही प्रिय नाही. पण दुसऱ्याच क्षणी ते कुठच्या कुठं हरवतात, त्यांनाच ठाऊक! तेव्हा वाटतं, हे माझे कुणीच नव्हेत. यासाठी तुझ्याकडून एखादा वशीकरणाचा मंत्र शिकून का होईना, तुला गुरू करून का होईना, मी द्वारकाधीशांना स्वाधीन ठेवता येईल का, याचा विचार करते आहे.”

तिचा मनोभाव ऐकून प्रथम मला स्त्रीसुलभ संतापच आला. मी तिला म्हणाले, “तू मला असाध्वी स्त्रीयांचे उपाय विचारीत आहेस! आपल्या पतीशी एकनिष्ठ नसणाऱ्या स्त्रिया ज्या उपायांचा अवलंब करतात, ते विचारीत आहेस. मला कसे काय ते ठाऊक असतील?” माझं उत्तर ऐकून ती निरुत्तर झाली. तरीही चिकाटीनं म्हणाली, “यापैकी एकही उपाय तू आचरत नाहीस?”

“नाही!” मी शांतपणे उत्तरले.

“तरीही तू आपल्या पतींना स्वाधीन ठेवलं आहेस, यामागील गारूड काय?”

“पतीशी पूर्णत: मनमेळानं एकरूप होऊन राहणं, म्हणजे त्याला स्वाधीन ठेवणं नव्हे. मला या मनमेळाचं भाग्य लाभलं आहे. तेही एकाशी नव्हे, पाच पतींशी. हे सत्य आहे.”

आता मात्र यादवांच्या त्या कुलस्त्रीचा अभिमान गळून पडला. एवढी ताठर माझी सत्यभामावहिनी, पण ती माझ्यासमोर चक्क दोन्ही हात जोडून म्हणाली, “कृष्णे, मी तुझी आजपासून शिष्या होत आहे. माझ्यावर अनुग्रह करून तू पतींच्या संदर्भात आचरीत असलेला कुलस्त्रीचा धर्म मला एकदा नीट सांग.”

तस तिचे ते हात प्रेमानं ओंजळीत घेतं मी म्हणाले, “सखी, अहंकार आणि क्रोध सोडून मी पतींची सेवा करते. तुझ्या प्रश्नामुळे आता माझ्या मनात येऊन गेलं की, जसा माझ्यावर कुरुसभेत आला, तसा तुझ्यावर यादवसभेत प्रसंग आला असता तर! तुझ्या स्वभावाप्रमाणे क्रोधानं व अहंकारानं तू सर्वच पतींचं पुनश्च कधी तोंडही पाहिलं नसतंस.”

माझ्या विचारानं ती आत्मलीन झाली, मूक झाली. तसं तिच्याजवळ जाऊन, स्वत:चं लहानपण विसरून तिला भगिनीसारखं जवळ घेतं थोपटून मी म्हणाले, “भामे, अहंकार हा नेहमीच चोराच्या पावलांनी मनात शिरत असतो. घरच्या कुलस्त्रीनं सदैव जागृत राहून स्वत:च्याच नव्हे, तर इतरांच्याही मनातून त्याला पिटाळावं लागतं. नाहीतर तो सर्वस्व लुटून फस्त करतो. क्रोध म्हणजे अहंकाराचीच पुढची मात्रा!”

आपलं वडीलपण विसरून ती तन्मयतेनं ऐकत राहिली. माझं छोटेपण विसरून मी बोलतच गेले, “रोज निद्रेतून उठताच करदर्शन करून मी प्रथम पांचालांच्या व पांडवांच्या कुलदेवोंचं स्मरण करते. नंतर एकाग्र चित्ती माझ्या सख्या कृष्णाचं स्मरण

करते. मी पतींशी कधीच दुर्भाषण करीत नाही. चारचौघांत त्यांना सांकेतिक नेत्रकटाक्ष देत नाही. त्यांच्याशी त्यांच्या पुरुषार्थाचा अवमान होईल, असं असभ्यपणे वागत नाही. पतींचं काय, पण सेवकांचंही भोजन झाल्याशिवाय मी भोजनाला स्पर्श करीत नाही. घरातील लहान–मोठी वस्तू स्वच्छ व उत्तम कशी राहील, याची नेहमी मी दक्षता घेतली आहे. म्हणून तर या वनवासातही निभावले." एव्हापर्यंत सरोवरातील आपले गौरवर्णी पाय एकसारखे चालविणारी ती यादवसखी, पाय व मन स्थिर करून ऐकू लागली. मी तिच्या काळ्याभोर, टपोऱ्या, तेजस्वी डोळ्यांत एकटक बघत म्हणाले, "प्रिय भामे, माझे पती सर्वदा संतुष्ट राहावेत, म्हणून मी त्यांच्याकरिता त्यांच्या–त्यांच्या आवडीची रुचकर पक्वान्नं करते. या पाचांच्या जिभेचा संतोष सांभाळताना माझी खूपच तारांबळ उडते. मी थकून, थकून जाते. अशा वेळी माझ्या हातून काही चुकाही होतात. स्वयंपाकात कधी–कधी तिखट–मीठ कमीजास्त होतं. माझे पाचही पती इतके गुणवान आहेत की, ते अशा वेळी बराच वेळ काही न बोलता एकमेकांना नेत्रसंकेत करून, कधी–कधी केलेल्या पदार्थांची नेहमीपेक्षा अधिकच स्तुती करतात! काही कारणांमुळे यातील एखादा प्रवासास दूरदेशी जातो, त्या वेळी त्याच्या कुशलासाठी मी व्रतं करते. जे–जे गृहाचार मला माझ्या सासूबाईंनी सांगितले आहेत, ते–ते मी कटाक्षानं पाळते. राजमाता सासूबाईंची मी कधीच अवज्ञा केलेली नाही. राजमातेपेक्षा मला त्या माताच अधिक वाटतात.

"माझ्या सासरच्या कोषागारात जे–जे मौल्यवान अलंकार आहेत, ते सर्व मला माहीत आहेत. मी त्या स्त्रीधनावर सदैव दक्षतेनं लक्ष ठेवलं आहे. सेवक आपापली कामं वेळेवर व चोख पार पाडतात की नाही, ते मी कटाक्षानं पाहते. या सर्वांहून वेगळा असा कोणताही वशीकरण मंत्र मला माहीत नाही."

आता मात्र द्वारकेची ती स्वामिनी मनोमन वरमली. तिच्या स्वभावात नसलेली छटा प्रकट झाली. अत्यंत मऊपणे ती म्हणाली, "सखी, मला क्षमा कर. तू यादवश्रेष्ठांना सर्व स्त्रियांहून प्रिय आहेस, अगदी गोकुळातल्या राधिकेसारखी. हे त्यांच्या तोंडूनच कित्येकदा ऐकायला मिळाल्यामुळे, तुला मी प्रश्न विचारले. क्षमा कर, तुझ्यातील पांडव कुलस्त्रीला ते खटकले असतील तर!"

तिच्यातील हा पालट मलाही जाणवला. माझ्या प्रिय कृष्णाच्या पत्नीनं माझी क्षमा मागणं, हे मला कसंतरीच वाटलं. अत्यंत प्रेमानं तिची निमुळती, गोमटी हनुवटी चिमटीनं वर उचलीत तिच्या डोळ्यांत खोलवर डुंबून मी म्हणाले, "यादवांच्या राणी, कृष्ण वश व्हायचा असेल, तर अतिशय नम्रपणेच सदैव वागलं पाहिजे. सर्वांशी निकोप प्रेमानं वागलं पाहिजे.

"मीच काय ती त्याची प्रिय पत्नी, असा एक सूक्ष्म अहंकार तुला झाला. त्या अहंकारानंच तुझा आजचा हा प्रश्न निर्माण झाला.

"प्रिय सखी, तेवढा अहंकार द्वारकेला वेढून सतत गर्जणाऱ्या पश्चिमसागराच्या गाजेत बुडवून टाक. एकटच्या कृष्णाची होऊन राहा कशी. आपलं जीवन त्याच्या चरणी निरपेक्ष, समर्पित भावानं ठेव. आपलं व्यक्तित्व त्या महान व्यक्तित्वाशी एकजीव करून टाक. बघ, तो आपल्यापासून दूर गेलाय, अशी जाणीव तुला कधीच होणार नाही. अगं, जे त्याचे होऊन जातात, त्यांचा तो दासानुदास होतो! लक्षात असू दे, त्याला आवडणारा एकच योग आहे – प्रेमयोग!"

कृष्ण द्वारकेला परत जाणार म्हणून माझं मन उदास–उदास झालं. आता द्वैतवनातीलही वनवासाचा अर्ध तपाचा काल संपत आला होता. यापुढे आम्हाला एक वर्ष अज्ञातवासात जाणं भाग होतं. आता पुन्हा कृष्णाची भेट होईल की नाही? झाली, तर कुठल्या स्थितीत आम्ही असू? अशा प्रश्नांनीही मी उदास झाले होते. आमच्या पर्णकुटीच्या बैठकीच्या कक्षात बैठक बसली. भीमानं पूर्वेकडे तोंड करून मांडलेल्या थोडचाशा उंच दर्भासनावर कृष्ण बसला.

आम्ही सर्वच कृष्णासमोर बसलो. त्याच्या उजव्या हाताशी ज्येष्ठ पांडव युधिष्ठिर, आपल्या उजव्या हाताशी भीमार्जुन व डाव्या हाताशी नकुल–सहदेव घेऊन बसला. कृष्णाच्या डाव्या हाताशी मी आणि भामावहिनी बसलो. सर्वांच्या मधोमध कृष्णाला संमुख असे उद्धवदेव बसले. कुटीच्या प्रवेशद्वाराजवळ हातात प्रतोद घेऊन दारुक उभा राहिला. तो धौम्य ऋषींच्या कुठल्याही शिष्यगणाला, सेवकाला कुटीत सोडणार नव्हता. ही द्वैतवनातील यादव–पांडवांची अत्यंत महत्त्वाची बैठक होती. गुप्त तेवढीच सावधपणे आखलेली. तिचा उद्गाता, प्रवक्ता सर्वच कृष्ण होता. यापुढील अभियान होतं, ते अज्ञातवासाचं – पाचही पतींसह माझ्या एक वर्षाच्या काटेकोर अज्ञातवासाचं. या वर्षभरात एवढीशी जरी चूक कुणाकडूनही झाली असती, तर आम्ही पुन्हा वनवास–अज्ञातवास या शिक्षेवर जाणार होतो. त्यासाठीच कृष्णानं आम्हाला सर्व त्या दक्षतेच्या पूर्वसूचना देण्यासाठी ही बैठक बोलविली होती.

जसा कृष्ण उच्चासनावर बसला, तशी त्याची मुद्राच पालटली. एकदमच ती कितीतरी तेजवंत दिसू लागली. तो बसल्या बसल्याच डोळे मिटून काहीतरी पुटपुटू लागला. त्यानं स्वत:शीच उच्चारलेल्या शब्दाशब्दांबरोबर त्याची चर्या अधिकाधिक तेजोमय होत चालली. बऱ्याचवेळा नंतर त्याने आपले मत्स्यनेत्र हळूहळू उघडले.

प्रिय सखा कृष्ण आपल्या स्वर्गीय वेणुवाणीत बोलू लागला. "वीर पांडवबांधवहो, तुमच्या आयुष्यातील सत्त्वपरीक्षा बघणाऱ्या एका अत्यंत महत्त्वाच्या सत्राला प्रारंभ होणार आहे – अज्ञातवासाला! हा कालावधी पुरता एक वर्षाचा आहे. या वर्षात तुम्हा प्रत्येकाला आपण पाच बंधू आहोत, पांडव आहोत, कौंतेय आहोत, माद्रेय आहोत, हे कटाक्षानं विसरावं लागेल. वनात असली, तरीही द्रौपदी तुमची राणी आहे. यापुढे वर्षभर तुम्हाला व तिलाही तुमचं पूर्वजीवन विसरावं लागेल. तिला एका सेविकेची भूमिका स्वीकारावी लागेल. तुम्हाला वेगवेगळ्या सेवकांची भूमिका करावी लागेल. अज्ञातवासाच्या या वर्षात तुम्ही पाचही बंधूंनी कोणकोणत्या भूमिका काटेकोर निभावाव्यात, याचा मी सर्वांगीण व सखोल विचार केला आहे. जी–जी भूमिका तुम्हाला मी देत आहे, ती–ती तुमचे स्वभावविशेष ध्यानी घेऊनच मी ती तशी ठरविली आहे.

"हा अज्ञातवासाचा कालखंड तुम्ही म्हणाल की, आम्ही कुठल्याही दूरच्या वनात जाऊन गुपचूप व्यतीत करू, तर ते शक्य होणार नाही. तुमचा अज्ञातवास सुरू होण्यापूर्वीच दुर्योधनाच्या विराट गुप्तचर विभागाचे निष्णात गुप्तचर, आता आर्यावर्ताच्या अरण्या–अरण्यात सर्वत्र घुसणार आहेत. त्या–त्या वनातील आदिवासी राजाशी संधान बांधून, वनन्वन पिंजून काढणार आहेत ते. त्याचा हा डाव लक्षात घेऊन तुमचा द्वैतवनातील वनवास मी शेवटचा ठरविला आहे. दुर्योधन आणि त्याचा हस्तिनापुरचा गुप्तचर विभाग तुमचा शोध आवर्जून वनातच घेत राहील, अशा काही क्लृप्त्या योजाव्या लागतील. यासाठी काही वनांत तुमच्या राजवेषांत द्वारकेतील पाच

यादव व एक स्त्री राहील. ते पाच शरीरयष्टीनं तुमच्याशी मिळते–जुळते असतील. स्त्री या द्रौपदीसारखी असेल.”

आम्ही सर्वच मंत्रभारित झाल्यासारखे त्याच्याकडे बघतच राहिलो. तो बोलतच राहिला, “हा उपायही फार दिवस चालणार नाही. वनातील कृत्रिम पांडव उघडकीस येताच, ताबडतोब त्यांना मागे घ्यावं लागेल. तुम्ही बंधू पांगून वेगवेगळे वावरता आहात, असं प्रथम भासवावं लागेल.

“यात वर्षाचा पहिला तीन मासांचा कालावधी मी अपेक्षित धरला आहे. त्यानंतर दुसरा उपाय योजावा लागेल. तुमच्यातील दोघांना संपूर्ण आर्यावर्त स्पष्ट ओळखतो. भीमसेनाला गदावीर म्हणून, अर्जुनाला धनुर्वीर म्हणून. इतर तिघांना शस्त्रापेक्षा स्वभावानं लोक अधिक जाणतात.

“माझ्या योजनेतील दुसरा टप्पा असेल, तो तुमच्यातील एकेक वीर एकेक वनात प्रकट होताहेत असं भासविण्याचा! प्रथम एका वनात महापराक्रमी गदावीर भीमसेन प्रकट होईल. तोही कृत्रिमच असेल. त्याच्या गदाविक्रमाचे संदेश आपोआप हस्तिनापुरात दुर्योधन–शकुनीपर्यंत जातील. हस्तिनापुरातील गदावीर व मल्ल यांचं एकत्र पथक त्या भीमसेनाचा निःपात करण्यासाठी हस्तिनापुराबाहेर पडेल. ते त्या भीमाला लवकरच शोधून काढण्याचा यत्न करतील. भीमाच्या सर्व सवयी कौरवांना माहीत आहेत. त्याही कृत्रिम भीमसेनाला शोधून काढण्यापूर्वीच अदृश्य व्हावं लागेल.

“त्यानंतर त्याच्या विरुद्ध दिशेच्या वनात एका अजिंक्य धनुर्वीराचा जन्म होईल. त्याच्याही वार्ता हस्तिनापुरापर्यंत पोहोचतील. सावध दुर्योधन–शकुनी त्याचाही शोध लावू बघतील. त्यालाही वेळीच मागे घ्यावं लागेल. एव्हाना वर्षातील सहा महिन्यांचा कालावधी मागे पडलेला असेल.

“यानंतरच्या सहा महिन्यांसाठी युधिष्ठिर, नकुल–सहदेव यांची भूमिका करणारे राजनिष्ठ यादव वेगवेगळ्या वनांत त्या–त्या वनवासी राजाकडे प्रकट होतील. ते स्वतःबद्दल वन्य जनांत अतिशयोक्तीनं व प्रकटपणे बोलत राहतील. कुणी आपल्या निष्णात ज्योतिषकलेचा आपणच गौरव करतील. कुणी आपण प्रख्यात अश्वतज्ज्ञ आहोत, असं स्वमुखेच सांगेल. कुणी आपण भूमितज्ज्ञ आहोत, असा डंका मिरवील. मात्र तीन वनांत तिन्हीकडे असलेले हे यादववीर, वनातील आदिवासी राजांच्या तावडीत सापडणार नाहीत. ते प्रकटले तसेच भूछत्रासारखे अदृश्यही होतील. एकेक करीत द्वारकेत परततील. मात्र ते त्या-त्या वनातच कुठेतरी आहेत या भ्रमाने, हस्तिनापूरचे सैनिक त्यांना तिथेच शोधत राहतील. एव्हाना अज्ञातवासाच्या सहा मासांचा दुसरा कालखंडही संपलेला असेल.

“हस्तिनापूरच्या गुप्तचर विभागाला या संपूर्ण वर्षात तुम्ही वनातच कुठेतरी अज्ञातवासात आहात, असं वाटलं पाहिजे. या हुलकावणीवर या अभियानाचं अर्धअधिक यश अवलंबून आहे. तुम्ही अज्ञातवासासाठी वनातच आहात – तेही पूर्व देशात असं कौरवांना भासविण्याचं अवघड कार्य, माझा द्वारकेचा निष्णात गुप्तचर विभाग काटेकोर वागून यशस्वी करून दाखवील. त्याविषयी तुम्ही निःशंक असावं.

“या वर्षभरात तुम्ही वनात असणार नाहीत. असणार ते एखाद्या विख्यात राजनगरात! तेही पश्चिम देशातील राजनगरात! या काळात तुम्ही लपून नव्हे, तर प्रकटपणेच वावरणार आहात! मला याची पूर्ण कल्पना आहे की, यात मोठं भय आहे. पण मानवी

जीवनात काही-काही वेळा अशा येतात की, प्राण पणाला लावून सर्वस्वाचा लपंडावही तेव्हा पत्करावा लागतो. माझा तुमच्यातील प्रत्येकाच्या विक्रमावर पूर्ण विश्वास आहे. तेवढाच तुमच्यातील अतूट संयम व आज्ञाधारकपणावरही आहे. या पुढील माझा प्रत्येक शब्द नीट ध्यानपूर्वक ऐका. मी सूचना देतो आहे, तसं आणि तसंच वर्षभरात काटेकोर दक्षतेनं वागा."

आम्ही सर्वच अज्ञातवासाचं वर्ष कुठल्यातरी अज्ञात निबिड अरण्यातच घालवावं लागणार, या विचारात होतो. फारतर माझ्या पाचही पतींना त्या अरण्यात पांगून राहावं लागेल, असा आमचा कयास होता. त्यासाठी आम्ही मनाची तयारीही केली होती. पण माझा हा सखा 'अज्ञातवास पत्करून प्रकटपणे वावरा – तेही एखाद्या राजनगरात – शेकडो, हजारोंच्या समक्ष' असं सरळ-सरळ आम्हाला चक्रावून टाकणारं काहीतरी सांगत होता.

तो बोलतच राहिला. आम्ही सावध एकाग्रतेनं त्याचा शब्दन्शब्द ऐकतच राहिलो.

"अज्ञातवासाच्या या वर्षात तुम्ही राहायचं आहे, ते पश्चिम आर्यावर्तात. मत्स्य देशातील विराटांच्या राजनगरात! विराटांचे सेवक म्हणून! कुठल्याही परिस्थितीत तुम्ही पाचांनी एकमेकांच्या संयमानं संपर्कात असणं, या कठीण वर्षात अत्यावश्यक आहे. द्रौपदीही तुमच्यापासून दूर असता कामा नये. तिच्यावर तर कोणतंही संकट केव्हाही कोसळू शकतं, याचा तुम्ही यापूर्वीही अनुभव घेतला आहे. माणसाचं जाणतेपण अनुभवाच्या टक्क्याटोणप्यांनीच साकारत असतं."

आता त्यानं आपली पारदर्शक आश्वासक दृष्टी एकटक जोडली, ती माझ्या ज्येष्ठ पतीवर – प्रथम पांडव युधिष्ठिरावर. तो त्याला म्हणाला, "ज्येष्ठा, या अज्ञातवासातील सर्वांत मोठं दायित्व आहे ते तुझ्यावर! आपली भूमिका निर्दोष पार पाडून या वर्षभरात तुला इतर पाचांवरही दक्ष लक्ष ठेवावं लागेल. मत्स्यांच्या विराटनगरात पूर्वेच्या महाद्वारातून सर्वप्रथम अज्ञातवासाला प्रारंभ होण्यापूर्वीच दोन मास तू प्रवेश घेशील, 'कंक' नावाचा वेदशास्त्र, पुराण, उपनिषदं, आरण्यकं, ब्राह्मणं व सर्व प्रकारचे धार्मिक विधी जाणणारा निष्णात ब्राह्मण म्हणून. तुम्हा बंधूच्या अंतर्गत सोयीसाठी तुझं दुसरं संकेतनाम असेल 'जय!' सर्व शक्ती पणाला लावून तुम्हा बंधूंना या अभियानात जयच घ्यायचा आहे. तुला ज्योतिषशास्त्राचंही सखोल ज्ञान आहे, असं कौशल्यानं भासवावं लागेल. प्रथम तुला मत्स्य महाराज विराटांचं मन जिंकावं लागेल. त्यासाठी विराटांच्या राजकुलात कोण-कोण आहेत, ते सांगतो. नीट ऐक. विराटांच्या महाराणी आहेत सुदेष्णा – अत्यंत प्रेमळ, धार्मिक वृत्तीच्या व्रतवैकल्यं करणाऱ्या, सत्त्वशील आहेत त्या! या राजदांपत्याला दोन पुत्र व एक कन्या आहे. प्रथम पुत्र भूमिंजय उपाख्य उत्तर नावाचा आहे. तो क्षत्रियकुलोत्पन्न असूनही पराकोटीचा भेदरट आहे. दुसरा पुत्र श्वेत नावाचा असून तो अद्याप लहान आहे. त्यांची भगिनी आहे उत्तरा! अप्रतिम सौंदर्यवती, प्रेमळ, बुद्धिमान व दुर्मीळ गुणांची अधिकारी असल्याने कुणालाही आपलंसं करून घेणारी गुणवती आहे ती. विराटांचा सेनापती आहे, कीचक नावाचा. अतिबलाढ्य व महासामर्थ्यशाली. महाराज विराट वृद्ध व त्यांचा पुत्र उत्तर निष्प्रभ असल्यामुळे, या सेनापती कीचकाचा विराटांवर मोठा वचक आहे.

"एकदा का महाराज विराटांचं मन जिंकल्यावर, तुला ज्योतिषशास्त्राचा आधार घेऊन त्यांच्या राज्यातील उणिवा, त्यांच्या मनावर कौशल्यानं एकेक करीत ठसवाव्या

लागतील. तशी तू सुचवायची आहे ती पहिली उणीव असेल; ऋतुमानानुसार रुचकर स्वयंपाक करणाऱ्या कुशल आचाऱ्याची!"

आता आपली दृष्टी भीमसेनाच्या गोलाकार, पुष्ट मुद्रेवर रोखत द्वारकाधीश त्याला म्हणाला, "विराटांचा असा स्वयंपाककुशल आचारी होशील, तो तू भीमसेना! तुझं नाव असेल 'बल्लव'! एरवी खांद्यावर प्रचंड गदा तोलून वावरणाऱ्या तुला, विराट नगराच्या पश्चिम द्वारातून खांद्यावर तळपाचा जाळीदार झारा घेऊन विराटनगरात प्रवेशावं लागेल! तुझं असं उघडंबंब चमत्कारिक रूप बघून मार्गावरची विराट बालकं प्रसंगी तुझी टवाळीही करतील. ती पुढे वर्षभर सतत होणं, तुझ्या तेथील वास्तव्यासाठी सुरक्षित आहे. तू तुझ्या विराट देहामुळेच विनोदी वाटला पाहिजेस – विक्रमी नव्हे! तू युधिष्ठिराच्या मान्यतेनं राजआचारी झाल्यामुळे तुझ्या प्रचंड भुकेचा प्रश्न आपोआपच मिटणार आहे! तुझ्या कुटुंबाला एकमेव आधार असलेल्या तुझ्या शक्तीचा या काळात क्षय होणार नाही. झाली तर वृद्धीच होईल. तू एकच दक्षता घे, तू कधीही आणीबाणीशिवाय सेनापती कीचकासमोर चुकूनही जाऊ नकोस! विराटांचा तो कुशल सेनापती तुला तत्काळ ओळखल्याशिवाय कधीच राहणार नाही. तुझं संकेतनाम असेल 'जयेश'."

आता आमची उत्कंठा पराकोटीला पोहोचली. त्याचा शब्दन्शब्द आम्हाला थक्क करीत होता. मनाच्या एका नव्याच भूमीवर नेऊन सोडत होता. भीमसेनावरची दृष्टी अर्जुनाच्या धारदार नाकावरून त्याच्या दृष्टीत रोवत, यादवांचा तो सेनाकुशल सेनापती – माझा सखा – कृष्ण त्याला म्हणाला, "प्रिय अर्जुना, या अज्ञातवासातील सर्वांत कठीण भूमिका येते आहे, ती तुझ्याकडे! तू प्रमुख महाद्वारातून विराटनगरीत, तोही स्त्रीवेषात प्रवेश घेशील! उभा आर्यावर्त तुला अशरण व पट्टीचा धनुर्धर म्हणून ओळखतो. पुरुषश्रेष्ठ मानतो. तुझं हे पाहताच डोळयावर येणारं पुरुषी सौंदर्य समूळ बदलावं लागेल, तरच तू अज्ञात राहशील. तुला विराटकन्या उत्तरेला नृत्य व संगीत शिकविणारी 'बृहन्नडा' नर्तिका व्हावं लागेल. तुझं संकेतनाम असेल 'जयंद्र'! गांडीव बाजूला ठेवून चक्क स्त्रीवेष धारण करावा लागेल. दूरदेशी असलेल्या तुझ्या पतीच्या नावानं कपाळावर कुंकुमतिलक रेखून घ्यावा लागेल. चालण्या-बोलण्यात सर्व छटा स्त्रीच्या घ्याव्या लागतील. हे तुला अत्यंत कठीण जाणार आहे. त्यासाठी गुरू म्हणून तुला पांचालीची दीक्षा घ्यावी लागेल! आजवर तिचा पती होतास – आता शिष्य व्हावं लागेल. पुरुषश्रेष्ठ आहेसच, गुणवती स्त्री होण्यासाठी द्रौपदीकडून स्त्रीत्व नीट समजून घे!"

तो आम्हाला नुसतं थक्क करीत नव्हता, दिङ्मूढ करीत होता. अर्जुनासारखा माझा पती, स्त्रीवेष धारण करण्याचं कसं काय मान्य करणार होता? प्रसंगी त्यापेक्षा त्याने दुर्योधनासमोर प्रकट होणं मान्य केलं असतं. त्याच्या मनातील किंतू अचूक हेरून कृष्ण त्याला म्हणाला, "तुला हे केवळ तुझ्यासाठीच करायचं नाही. तुझ्या सर्व प्रिय बंधूंसह पत्नीसाठी व इंद्रप्रस्थ राज्यासह स्त्री-पुरुष नगरजनांसाठी कर्तव्य म्हणून हे करावं लागेल." त्यानं त्याला रेसभरही हलू न देता त्याच्यातील क्षत्रिय पुरुषश्रेष्ठाचं भान त्याला दिलं.

तो दर्भासनावरून उठला. अर्जुनाजवळ गेला. उभा राहिलेल्या त्याच्या खांद्यावर हात ठेवून कितीतरी प्रेमळपणे म्हणाला, "धनंजया, तुझं हे स्त्रीरूपही अजरामर ठरणार

आहे. तुझ्या पुरुषार्थी पर्वाची सुरुवातच या स्त्रीपर्वातून होणार आहे! प्रत्यक्ष पत्नी द्रौपदीही प्रसंगी तुला ओळखणार नाही, अशी तुझी भूमिका निभावून दाखव."

त्याचं ऐकून भरून पावलेला अर्जुन वाकून त्याची चरणधूळ मस्तकी घेत म्हणाला, "तू म्हणशील तसंच होईल अच्युता!"

कृष्णानं आता आमची वनबैठक पूर्णपणे भारून टाकली होती. तो पुन्हा जाऊन आपल्या दर्भासनावर बसला. भविष्याचा अचूक लक्षयवेध घेणारी आपली तीक्ष्ण दृष्टी नकुलावर रोवत म्हणाला, "'ग्रंथिक' या नावानं विराटांच्या नगरीत दक्षिण द्वारानं प्रवेश करशील तू नकुला. तुझं संकेतनाम 'जयत्सेन' असेल. निष्णात अश्वतज्ज्ञ असल्यामुळे तू विराटांची अश्वशाला आपल्या अंगच्या कौशल्यानं एका मासातच अधिकारात घेशील. लक्षात ठेव, कोणत्याही राज्याची अश्वशाला अधिकारात असणं, म्हणजे अर्धंअधिक ते गणराज्यच अधिकारात असणं आहे!"

"जशी तुझी इच्छा मधुसूदना. मला नेमून दिलेलं कार्य मी चोख पार पाडीन." सुंदर नकुल सुंदर हसत शोभेशा शब्दांत उत्तरला.

शेवटच्या बंधू सहदेवावर आपली पाणीदार दृष्टी खिळवीत कृष्ण म्हणाला, "'तंतिपाल' म्हणून तू विराटनगरीत उत्तरेच्या द्वारातून प्रवेश घेशील, सहदेवा. तुझं संकेतनाम असेल 'जयद्बल' हे! तू तंताचं म्हणजे गायींच्या दाव्याचं सखोल ज्ञान घेतलं आहेस. अनुभवी गोपाल म्हणून तू विराटांचं गोधन तुझ्या अधिकारात घ्यायचं आहे. त्यांना गोपालनातील व त्यांच्या रक्षणातील सर्व बारकावे समजावून सांगायचे आहेत. लक्षात ठेव, तुझ्या ज्ञानाचा विराटांना नजीकच्या भविष्यातच फार उपयोग होणार आहे.

"जशी आज्ञा गोपाला. तुझी इच्छा असेल तसंच होईल." सहदेवानंही त्याला सकारार्थी प्रतिसाद दिला.

इतका वेळ केवळ ऐकून घेणारे उद्धवदेव हसून म्हणाले "अर्जुनाला स्त्रीवेष धारण करायला लावणारी योजना आहे तुझी दादा. राहता राहिली द्रौपदी. तिला तू पुरुषवेष धारण करायला सांगणार आहेस की काय? तुझं काहीच आता मलासुद्धा कळेनासं झालंय, म्हणून विचारतो."

"उधो बंधो, थोडा थांब. माझं पूर्ण ऐकून घे. द्रौपदीसाठी मी ठेवली आहे, ती भूमिका योग्यच आहे. ती महाराणी सुदेष्णा व राजकन्या उत्तरा यांच्या कक्षात 'सैरंध्री' म्हणून राहील. सैरंध्री म्हणजे शृंगार सेविका. सर्वांच्या सोयीसाठी तिचं संकेतनाम असेल 'मालिनी'." आपल्या प्रिय बंधूंवरील दृष्टी माझ्याकडे वळवून दूरदृष्टीच्या आमच्या सख्यानं मला सूचना केल्या. "द्रौपदी, तू सैरंध्री म्हणून सुदेष्णादेवी व उत्तरा यांची सेविका होणार आहेस. तू सदैव राजस्त्रियांच्या अंतर्कक्षात वावरणार आहेस.

"प्रिय पांडवबांधवहो! दोन्ही वेळच्या भोजनसमयी विराटांच्या पाकशाळेत तुम्हा बंधूंची भेट होऊ शकते. या ना त्या कारणानं द्रौपदी तर पाकगृहात केव्हाही जाऊ शकते. तुमच्या संकेतनामांच्या कुशलतेनं वापर करून, तुम्हा पाचही बंधूंची बळकट मूठ सखी द्रौपदी सदैव अबाधित ठेवू शकते.

"द्रौपदीऽ चुकलो – सैरंध्रीऽ छे: मालिनी, एकच ध्यानात ठेव. तूही कटाक्षानं कधीही सेनापती कीचकासमोर जाऊ नकोस. तसं झालं, तर तुझ्यावर काहीही प्रसंग ओढवू शकतो. तसा ओढवलाच तर – एकटा भीमसेन तुझं संरक्षण करू शकेल! मी तिथं असणार नाही!"

मला उद्देशून बोलताना त्यानं चूक झाल्याचं केलेलं, नाटक हेतुत: होतं. त्याला आपण केलेली चूक पुढे करून, मला कीचकाविषयी सावधतेचा संकेत द्यायचा होता. माझ्या मनावर 'मालिनी' हे नाव ठसवायचं होतं, मालिनी म्हणजे फुलवाली हे माझं नावही त्यानं सूचकपणे दिलं होतं, कुठल्याही स्त्रीचं शील हे फुलासारखंच असतं. मला ते कोमेजू द्यायचं नव्हतं. मालिनी हे माझं नाव मी या अज्ञातवासात पक्कं लक्षात ठेवावं, असाच त्याचा संकेत होता.

त्यानं इतर कुणाला नाही; पण मला मात्र विचारलं, "तुझी काही शंका द्रौपदी?" त्याचा रोख जाणून घेत मी विचारलं, "माझ्या देहातून येणाऱ्या सुगंधाचं मी काय करावं?" उद्धवदेवांसह माझे पाचही पती विस्फारलेल्या डोळ्यांनी बघतच राहिले.

माझा सखा कृष्ण सर्वांपेक्षा वेगळा होता. अज्ञातवासातील माझी सैरंध्रीची भूमिका स्वत:च वर्षभर जगणार आहोत, अशा अनुभूतीतून तो म्हणाला, "तुझ्या दैहिक सुगंधाचं तुझ्या दाट कुरळ केशभर रोज नवं केतककणीस वापरून निभावेल. मात्र तुझे तू मुक्त सोडलेले विपुल केश, या अज्ञातवासात सावरावेच लागतील. त्यासाठी वस्त्रपट्टीचा वापर करावा लागेल. तूच सौंदर्यसेविका झाल्यामुळे तुझ्या सेवेळा कोणीही असणार नाही."

आमच्या अज्ञातवासाच्या अभियानाची सर्व योजना कृष्णाच्या नेतृत्वाखाली अशी सर्व बारकाव्यांसह आखून झाली. शस्त्रांसह आम्ही मत्स्यदेशात उतरणं योग्य नव्हतं. सर्वांनी आपली शस्त्रं भीमसेनाकडे दिली. तो ती मत्स्यदेशात उतरण्यापूर्वी त्यांच्या सीमेवर सुरक्षित अशा गुप्त ठिकाणी ठेवूनच विराटनगरात उतरणार होता. इडादेवीचं स्तवन व स्मरण करून वनबैठक उठली.

आमचा निरोप घेऊन कृष्ण भामावहिनी व उद्धवदेवांसह द्वारकेला निघून गेला. काही दिवसांतच आमचं वनवासी जीवनपर्व संपलं. कृष्णानं आखून दिलेल्या योजनेप्रमाणे आम्ही अज्ञातवासावर निघालो. त्यापूर्वी युधिष्ठिराच्या मार्गदर्शनाखाली अज्ञातवासात प्रत्येकानं कसं वागावं याची उजळणी घेणारी एक बैठकही झाली. आता आम्हा सहाही जणांच्या मनात अज्ञातवासात कसं वावरावं, याविषयी कसलीही लवमात्र शंका उरली नाही.

ठरल्याप्रमाणे द्वैतवनातून प्रथम युधिष्ठिर एकटाच मत्स्यांच्या विराटनगरीत प्रवेशला. राजा विराटांच्या सेवेत सादर झाला. पाठोपाठ भीमसेन अर्जुनासह एकेक करीत आम्ही सर्व जण विराटनगरीत उतरलो. आपापल्या भूमिका घेऊन सावधपणे कामाला लागलो. युधिष्टिरानं मोठ्या प्रयासानं एका दूताकरवी आम्ही विराटनगरीत सुखरूप पोहोचल्याची वार्ता द्वारकेला कृष्णाकडे धाडली. तो कृष्णाशी आणि द्वारकेशी आमचा शेवटचाच संपर्क होता. आता द्वारकेहून कुठलाही दूत वा कसलाही संदेश विराटनगरीकडे चुकूनसुद्धा येणार नव्हता. आमच्या कानांवर द्वारकेच्या वार्ता पडणार होत्या, त्या विराटांच्या अमात्यांकडून! त्याही सठीसामाशीला एखादी अशी! म्हटलं तर प्रकट, नाहीतर अज्ञातवासी अशा आमच्या कठोर जीवनसंघर्षाला सुरुवात झाली.

शृंगारासाठी असले, तरी सेविका म्हणून वावरताना प्रथम-प्रथम माझ्याकडून कुणाच्याही लक्षात येतील, अशा चुका सहज घडून गेल्या. त्या-त्या वेळी काहीतरी थातूरमातूर कारण सांगून मी त्या निभावून नेल्या. प्रत्येक वेळी मात्र नंतर माझ्या ध्यानी येई की, चूक सावरण्यापूर्वी पटेलसं कारण देण्यापूर्वी माझ्याकडून नकळतच

कृष्णाचं स्मरण झालेलं असे. कधी-कधी निवांत वेळी विचार करताना मला प्रकर्षानं वाटे की, आमचा हा वनवास आणि अज्ञातवास हे सर्व त्याच्याच इच्छेनं घडत असावं, तो आम्हा पांडव कुटुंबाशी एवढा समरस झाला होता की, त्याने घेतलेली प्रत्येक जीवनानुभूती तो आम्हालाही घ्यायला लावत होता. त्यानं स्वत: जन्मत:च अज्ञातवास पत्करला होता. नंतर गुरूंच्या चरणांशी जाऊन जीवनाचं सर्वांगीण ज्ञान घेण्यासाठी तो अवंतीच्या अरण्यात सांदीपनीच्या आश्रमात गेला होता. जरी तो वनवास नव्हता, तरी त्या आश्रमात राहून बालपणी गोवर्धन पर्वतात गुरं चारून वनजीवनाचा त्यानं चांगलाच अनुभव घेतला होता. आताशा हे आणि असे विचार प्रबळपणे मला घेरून टाकत. अधिकाधिक कृष्णाजवळ नेत. या अज्ञातवासात माझ्या पाचही पतींना अनुभव आला की नाही मला माहीत नाही, पण मला मात्र आला तो असा की, कृष्ण स्वत:ही आमच्या समवेतच विराटांचा एक सेवक म्हणून वावरतो आहे! त्यामुळेच अज्ञातवासाचे दिवस विराटनगरीत काढताना मला भय ते कसलं वाटतच नव्हतं

सहा मासांचा आमचा अज्ञातवासाचा कालावधी निर्विघ्न पार पडला. यानंतर द्वारकेची पहिली वार्ता विराटनगरीत पोहोचली, ती आमच्या जांबवतीवहिनीचा पुत्र सांब याचा आम्हाला देशोधडी लावणाऱ्या दुर्योधनाच्या कन्येशी – लक्ष्मणेशी विवाह झाल्याची! या विवाहातील सर्व पुढाकार बलरामदादांचा असल्याची वार्ताही आली. विराटांच्या पाकगृहात एकाकडून दुसऱ्याला अशी ती आम्हा सर्वांना समजली. मी तर त्या वार्तेनं हादरलेच. मनात नाना विचार येऊन गेले. सांब हा माझ्या कृष्णाचा नि जांबवतीवहिनींचा पुत्र – माझा भाचाच. आम्हा पांडवांशी एवढ्या सख्यानं वागणाऱ्या कृष्णानं माझी विटंबना करणाऱ्या दुर्योधनाच्या कन्येला – लक्ष्मणेला स्नुषा म्हणून कसं काय स्वीकारलं? आणि या विवाहामुळे आमचा झाला, तसा कृष्ण दुर्योधनाचाही सखा झाला की काय? तसा तो झालाच असेल, तर मग यापुढे आमची वाट काय? त्यानंच आखलेल्या आमच्या अज्ञातवासाला आता वाली कोण?

मी एकटीच नव्हे – माझे पाचही पती त्या वार्तेनं सैरभैर झाले. समूळ हादरले. आम्हाला एकमेकांना स्पष्ट भेटताही येत नव्हतं. पाकगृहात होईल त्या धावत्या भेटीत या महत्त्वाच्या वर्तेवर स्पष्टपणे सविस्तर बोलताही येत नव्हतं. आमची प्रचंड मानसिक कुचंबणा सुरू झाली.

आमच्या मनावरील हा ताण कृष्णानंच अधिक राहू दिला नाही. कधी नव्हे तो त्याचा पहिला दूत विराटनगरीत आला. विराटांच्या जातकतज्ज्ञ कंकाला भेटला. त्यानं दिलेला वृत्तान्त आमच्या मनावरील ताण एकदम क्षणात वितळवून टाकणारा ठरला. कृष्णाचं हेच तर वैशिष्ट्य होतं की, घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा सर्वदूर परिणाम काय होईल, याचा तो विचार करीत असे. त्यावर तोड काढीत असे, तोही अचूक!

सांब–लक्ष्मणा या विवाहाचा थोडक्यात वृत्तान्त असा होता – सांबानं हस्तिनापुरात जाऊन दुर्योधनकन्या लक्ष्मणेचं हरण केलं होतं. त्याला ती मनस्वी आवडली होती, हेच त्याचं कारण. वास्तविक दुर्योधनानं कृष्णाशी या निमित्तानं येणारे व्याहीपणाचे संबंध दूरदृष्टीनं स्वीकारायला पाहिजे होते. जसे रुक्मिणीवहिनीच्या बंधू रुक्मीनं आपली कन्या रुक्मवती प्रद्युम्नाला देऊन सांधायचा प्रयत्न केला होता. पण दुर्योधन एवढं घडूनही कृष्णाला गवळटच मानत होता. तो राजनीतिज्ञ होता काय? मुळीच नाही. असता, तर त्यानं जामात म्हणून सांबाचा स्वीकार केला असता. मात्र घडलं उलटंच. दुर्योधनानं

पाठलाग करून सांब-लक्ष्मणेला गाठलं. सांबाला चक्क हस्तिनापूरच्या कारावासात टाकलं. लक्ष्मणेला राजवास्तूत धाडलं. झाल्या प्रकारानं द्वारका ढवळून निघाली. स्कंधावरचा संवर्तक नांगर पेलून बलरामदादा ससैन्य हस्तिनापुरावर चालून गेले. दुर्योधनाच्या सेनेशी घनघोर लढाई करून त्यांनी हस्तिनापूर हादरवून टाकलं. आपल्या शिष्याचा पराभव करून, आपला पुतण्या सांब याला कारागृहातून मुक्त केलं. लक्ष्मणेसह त्याला द्वारकेत आणून दोघांचा थाटात विवाहही लावला. हे सगळं कृष्णानं शांतपणे पाहिलं. का? मला त्याचंच आश्चर्य वाटत होतं. पण खूप विचारांनंतर मला पटलं की, या सर्व प्रकरणात तो शांत राहिला याचं कारणही आम्ही पांडवच होतो. आम्ही अज्ञातवासात असताना आपल्या दादाला दुखवणं त्याला योग्य वाटलं नाही. त्यानं धाडलेल्या दूताबरोबर एक विशेष निरोप होता, तो मला. तो होता, “कृष्णे, दुर्योधनाशी माझा कसलाही नातेसंबंध नाही. तुम्ही मनात कोणतीही शंका ठेवू नये. तुमचा अज्ञातवास पूर्ण होताच, प्रकट झालेल्या तुझ्या पाचही पतींकडून मला फार मोठी कामं करवून घ्यायची आहेत. त्यांनाही निःशंक राहायला तूच समजावून सांग.”

त्याचा हा संदेश ऐकताना मला त्याचं आजपर्यंत न जाणलेलं वेगळंच रूप स्पर्शून गेलं. तो खरा राजनीतिज्ञ होता. त्यापेक्षा अधिक बरंच काही होता. भोवती घडणाऱ्या कितीही मोठ्या घटनेचा सतत दूरदृष्टीनंच विचार करीत आला होता. आताशा मला स्पष्ट-स्पष्ट जाणवू लागलं की, माझं त्याच्यावरचं सखा म्हणून असलेलं प्रेम कसलीच व्याख्या करता येणार नाही, अशा भक्तीत रूपांतरित होत होतं, ही सर्व किमया त्याचीच तर होती. तो खरा चंद्रवंशीय नरेश होता. दूर गगनात राहून सरोवरातील कमलफुलं फुलविणाऱ्या चंद्राचाच त्याचा वसा होता. कृष्ण जवळून समक्ष बघताना जाणवण्यापेक्षा, तो दूरस्थ असताना असा तीव्रपणे जाणवणं, हा एक भाग्याचाच अनुभव होता.

कांपिल्यनगरातील कृष्णाच्या व माझ्या पहिल्या भेटीपासून मी त्याच्याविषयीचा एक बारकावा अचूक टिपला होता. माझ्याशी बोलताना तो सदैव भविष्यात घडू शकणाऱ्या घटनांचा सतत सूचक संकेत करीत आला होता. मी पाच पतींचा स्वीकार करणंच योग्य आहे, हे त्यानंच राजमातेला भविष्याचा विचार करून पटवून दिलं होतं, तेही माझ्यासमोर माझ्याकडे बघत! अज्ञातवासाच्या या जीवनात विराटांची राजकन्या उत्तरा हिचे सैरंध्री म्हणून विपुल कृष्णकेश विंचरताना माझी आपोआप लय लागून राही. कधी–कधी अशा वेळी ती राजकन्या माझी कठोर झडती घेताना म्हणे, “सैरंध्री, वेधळ्यासारखी कुठे बघतेस – कुठं काम करतेस! केश नीट सावरण्याचा तुला काही सराव आहे की नाही? माझ्या दाट कृष्णकेशांचा तुला त्रास होत असेल, तर मी दुसरी सैरंध्री निवडून घेते. तू जा कशी तोंड घेऊन!” मला ते सर्व निमूटपणे ऐकून घ्यावं लागे.

तिचा रोष कमी करण्यासाठी मग मी तिला द्वारकेच्या कृष्णाची, इंद्रप्रस्थाच्या अर्जुन–द्रौपदीची आणि सुभद्रा व तिचा पुत्र अभिमन्यू यांची दूरस्थासारखी ऐकीव कथा सांगे. ती त्या कथा मनःपूर्वक ऐकत असे. माझ्या सावध स्वभावाप्रमाणे मी तिच्या स्वभावातील एक बारकावा टिपलाच होता. ती सर्वांपेक्षा अर्जुनाच्या कथा मनःपूर्वक ऐके. मध्येच काही–काही प्रश्नही विचारीत असे. तेही अर्जुनाविषयीच असत.

नेहमीच मी काही ना काही कारण काढून विराटांच्या नृत्यशाळेत व पाकशाळेत जात असे. नृत्यशाळेत अंगावर मत्स्यांचं विशिष्ट अंशुक नेसून, त्याचा काचा व पदर कसलेली

बृहन्नडा दिसे. तिच्या पायातील घुंगरांच्या माळांचा ‘ता थैऽ तक थैऽ’ अशा नृत्यघोषाबरोबर उठणारा नाद ऐकून, माझा जीव कसा गलबलून जाई. माझ्या पाचही पतींत अर्जुन हा पुरुषश्रेष्ठ होता. अनेक दुर्मीळ गुणांचा अधिकारी होता. इतर पांडवांपेक्षा त्यामुळेच त्याच्यावर ही सर्वाधिक कठोर परीक्षा देण्याची वेळ आली असावी – एक य:कश्चित स्त्रीसेविका म्हणून वावरण्याची!

उत्तरेला सराव देताना विराटनगरीतील विख्यात उकाड्यांन बृहन्नडा घामाघूम होऊन जाई. पदरानं मस्तकावर दाटलेली घामाची थेंबावळ टिपताना पाण्यासाठी तो माझ्याकडे बघे. त्याच्या दृष्टीतील तो भाव मी आयुष्यात कधीच विसरू शकले नाही. पुरुषश्रेष्ठ असूनही तो मला आमच्या श्रुतकीर्तीसारखा एक बालकच वाटे त्या क्षणी.

पाकशाळेत बल्लव भेटला की, प्रथम आपल्या चारही बंधूंचं कुशल दबक्या आवाजात माझ्या कानी घाली. पाकशाळेत त्यानं तयार केलेला निवडीचा पदार्थ पात्रातून माझ्या हातात ठेवताना म्हणे, ‘सैरंध्री, प्रकृती सांभाळ!’ हे सर्व खरंतर त्याच्यासाठी मी करायला पाहिजे होतं, त्याला उघडाबंब, घामाघूम असा पाकशाळेत विराटांसाठी भाज्या चिरताना, धान्य निवडताना बघून मी सुन्न-सुन्न होई.

माझी सर्वांत कमी भेट होई ती कंकाशी. तो सदैव महाराज विराटांसमवेत वावरत असे. राजकन्या उत्तरेच्या अंत:पुरातील सैरंध्री दासीनं त्यांच्यासमोर अचानक कसं जायचं? युधिष्ठिराला भेटण्यासाठी, त्याच्या पुढील आज्ञा त्याच्या बंधूंपर्यंत बिनबोभाट पोहोचविण्यासाठी मला बुद्धीचे कितीतरी टेंभे पालवावे लागत. त्यासाठी राजकन्या उत्तरेच्या काही कृत्रिम अडचणी तयार करून, त्या निवारण्यासाठी उत्तरेसह विराटमहाराजांकडे जाता येई. राजकन्या आपल्या पित्याशी बोलत असताना, मी कंकाचं कुशल विचारून पुढील आज्ञा घेतं असे.

ग्रंथिक आणि तंतिपाल या माझ्या नकुल-सहदेव या पतींची अश्व व गोशाळेत भेट घेणं, त्यामानानं सोपं होतं.

आमच्या अज्ञातवासाचा दुसऱ्या सहामाहीचा कालखंडही संपत आला. आता केवळ शेवटचा सप्ताह उरला. त्यानंतर आम्ही अज्ञातवासातूनही रानपाखरांसारखे मुक्त होणार होतो. आताशा तर हा कठीण अज्ञातवास निर्विघ्न पार पडल्यामुळे मला सततच कृष्णाचं स्मरण होत राही. पण... पण... कुठलीही गोष्ट अशी सुखासुखी व्हावी, असा आम्हा पांडवांच्या जीवनाचा योग काही नव्हता. नेहमीसारखी मी कंकाला – युधिष्ठिराला भेटण्यासाठी म्हणून विराटमहाराजांकडे उत्तरेसह गेले. महाराजांच्या कक्षात विराटांचा सेनापती कीचक आपल्या स्वामींशी कसल्यातरी गंभीर एकांतात होता. आम्हाला बघताच महाराज विराट हसून आपल्या कन्येला म्हणाले, “ये उत्तरे, हे सेनापती काय म्हणतात ते ऐकलंस का? इंद्रप्रस्थाचे द्यूत हरलेले पांडव आपल्या मत्स्यदेशातच गुप्तपणे वावरताहेत, अशी त्यांना वार्ता मिळाली आहे! हस्तिनापूरच्या युवराज दुर्योधनानं त्यांचा कसून शोध घेण्याची विनंती केली आहे. सापडताच त्यांना बंदिवान करून कारागृहात टाकावं, असा संदेश आहे! सेनापती त्याच योजनेत आहेत.” ते उद्गार ऐकून मी अंगभर शहारले. एवढी वर्षभर जमून आलेली आमची योजना आता शेवटच्या टप्प्यात उघडी पडणार! आम्हाला कोणीही ओळखलं, तर आम्ही लगेच बंदिवान होणार! पुन्हा वनवास – पुन्हा अज्ञातवास! माझं तर मस्तकच गरगरू लागलं. मी विराटमहाराजांकडे आ वासून बघतच राहिले. माझ्या हे काहीही ध्यानात आलं नाही की, मी आल्यापासून सेनापती

कीचक अनिमिष नेत्रांनी एकटक माझ्याकडेच बघत होता! त्याने उत्तरेला विचारलं, “राजकन्येची ही सैरंध्री वाटतं? नाव काय हिचं?”

“मालिनी.” उतरेनं उत्तर दिलं.

मला तर आता तिथे क्षणभरही उभं राहणं कठीण झालं होतं. या अरेरावी कीचकाला राजमंडळासह विराटांची प्रजासुद्धा कंटाळली होती. क्षणही न गमावता, माझ्या पतींना येऊ घातलेल्या विराट संकटाची सावध कल्पना देणं अत्यावश्यक होतं.

प्रथम मी त्याच्या कक्षात कंकाला भेटले. “आपण मत्स्यांच्या राज्यात आहोत, हे दुर्योधनाला कळलंय! तो आपलाच शोध घेतो आहे!” हे माझ्या तोंडून ऐकताच तो क्षणात पांढराफटक पडला. बराच वेळ काहीच न बोलता स्तब्धच झाला. मग बोलला ते एकच वाक्य, “याच पावली भीमार्जुनांना गाठ. ते सांगतील, तसंच करावं लागेल.”

त्याच्या सूचनेप्रमाणे प्रथम भीमार्जुनांना गाठून मी येऊ घातलेल्या संभाव्य संकटाची त्यांना कल्पना दिली. नकुल-सहदेवांनाही सावध केलं. दिवसभर अत्यंत कौशल्यानं हा उद्योग पार पाडून मी माझ्या कक्षात आले. पदरानं कपाळावरचा घाम पुशीत एका मोठ्या दर्पणासमोरच्या बैठकीवर बसले. आवरून ठेवलेले केश मुक्त सोडले. दर्पणात बघत त्यांच्यातून माझी निमुळती बोटं फिरवीत राहिले. नेहमी असं दर्पणात बघून माझ्या दाट लांबसडक केशसंभारात एका लयीनं बोटं फिरविणं, हा माझ्या छंद व आनंद होता. या क्षणी मात्र नेहमीसारखी केशभारातून बोटं फिरवावी, असं वाटलं नाही. माझ्या या निळसर दाट केशांना खरोखरच कुणी वाली आहे की नाही? की कुरूंच्या द्यूतगृहात हेच केश मुठीत घट्ट धरून दु:शासनानं मला फरफटत आणलं होतं, तसंच इथे अज्ञातवास उघड झाला तर विराटांच्या राजनगरातही घडणार की काय? इथंही दु:शासन लपला असेल तर? त्या नुसत्या विचारासरशी मी अंगभर शहारले. नुसत्या कल्पनेनंही माझं मन आक्रंदून उठलं, ‘अच्युताऽ माधवाऽ मिलिंदाऽ धाऽव —!’

एवढ्यात माझ्या कक्षाची दासी मधुलिका लगबगीनं प्रवेशली. भेदरल्या डोळ्यांनी धापावतच म्हणाली, “मालिनीताई, सेनापती आपल्याच भेटीसाठी येताहेत!”

एरवी सावरलेले असणारे माझे मुक्त केश आता कटाक्षानं सावरले पाहिजेत याचंही भान मला राहिलं नाही. कृष्णाच्या एकच एक सूचनेची मुरली कानामनात खोल शीळ घालत राहिली, ‘द्रौपदी, विराटांच्या सेनापती कीचकासमोर चुकून कधीही जाऊ नकोस!’ त्या नुसत्या स्मरणाबरोबर मी हबकलेच. आकाशात उडून जावं, धरतीत तोंड खुपसावं, कुठं लपावं? मला काहीकाहीच सुचेना.

दर्पणासमोर दिङ्मूढ मी पुतळ्यासारखी उभी असतानाच विराटांचा धिप्पाड सेनापती कीचक खांद्यावर प्रचंड गदा पेलत, दणादण पदन्यास उठवीत माझ्यासमोर येऊन उभा ठाकला! मला क्षणैक ब्रह्मांडच फिरल्याचा भास झाला. तो चमत्कारिक दृष्टीनं माझ्या टाचेपर्यंत उतरलेल्या, पटकन दृष्टीस येणाऱ्या विपुल केशसंभाराकडे डोळे विस्फारून बघतच राहिला. मग खोचक हसत म्हणाला, “तू मालिनी तर आहेसच, सुंदर फुलांची लडी; पण सुकेशाही आहेस – अगदी इंद्रप्रस्थाच्या द्रौपदीसारखी!”

मला काय बोलावं, तेच सुचत नव्हतं. तो समोर असताना अंगावर वीजलोळ कोसळल्यासारखी मी नुसती सुन्न उभी होते. तोच बडबडत राहिला, “अशा लावण्यवती सैरंध्रीनं राजकन्येच्या सेवेत असण्यापेक्षा सेनापतीवर आपल्या सौंदर्याचा अधिकार गाजवावा. महाराजांना सांगून मी तशी व्यवस्थाच करणार आहे. म्हणजे तुझ्या या

केशांच्या अरण्यात मलाही फुलझाडं लावता येतील. ”

माझ्या कानात त्याचा एक शब्दही शिरत नव्हता. नुसते मुरलीबोल घुमत होते – ‘एकटा भीमसेनच तुझं रक्षण करू शकेल.’ एकाएकी माझ्यातील सर्व भय कुठच्या कुठे दूर पळालं. मन निर्धारी झालं. आता माझा विपुल केशभार डाव्या हाताचा लाडीक विळखा घालून मी पुढे घेतला. त्यातील बटांशी चाळे करत मलाच आश्चर्य वाटेल, अशा केवढ्यातरी हुरळलेल्या वाणीत मी म्हणाले, “पायाच्या या दासीला – सैरंध्रीला सेनापतींची सेवा करायला मिळणं, याहून भाग्य ते कोणतं? आज्ञा होईल तेव्हा मालिनी सेनापतींच्या सेवेला सादर आहे!”

माझा तो उत्साही, प्रेरक, प्रतिसाद ऐकताच विराटांचा तो धिप्पाड गदाधर सरळ माझ्याजवळच आला. मी पुढे घेतलेला माझा केशभार पुन्हा मागे टाकत, मलाच ऐकू येईल अशा दबक्या आवाजात मला म्हणाला, “सैरंध्री – मालिनी, शृंगार करून सिद्ध राहा. रात्री मी इथेच येणार आहे. तुझ्या सुगंधी सहवासात रात्र घालवायला!”

कुणीतरी ढकलल्यासारखे माझ्या तोंडून प्रतिसादाचे शब्द सुटले, “आज्ञा सेनापतींची! दासी सेवेला सिद्ध आहे.” ते ऐकून स्वत:वरच प्रसन्न झालेला विराटांचा सेनापती वक्ष गदगदवीत हसला. आला तसा झंझावातासारखा निघूनही गेला. त्याच्या पाठमोऱ्या विशाल देहाकृतीकडे बघताना मला ब्रह्मांड आठवलं. सर्वांत प्रथम स्मरण झालं ते कृष्णाचं. तो जसा काही दाही दिशांतून सुचवीत होता, ‘क्षणही न दवडता भीमसेनाला गाठ.’ खेचल्यासारखी मी विराटांच्या पाकगृहाकडे धावले. मला बघताच भीमसेनानं नुसत्या चर्येवरून जाणलं की, मी कसल्यातरी जीवघेण्या संकटात आहे. मी त्याला लगबगीनं घडलेला वृत्तान्त दबक्या आवाजात सांगितला. तोही क्षणैक विचारात पडला. मग म्हणाला, “हा विराटांचा जयद्रथ दिसतोय. घाबरू नकोस, मी आहे. त्याचा व्यवस्थित समाचार घेतो. तुझ्या या केशाभारात फुलझाडं लावतो म्हणजे काय? त्याच्या देहाचं मढेचाफ्याचं गाठाळ झाड मी चिरूनच टाकतो, तेही तुझ्यासमक्ष. कसलीही चिंता करू नको. त्याला आश्वासन दिलं आहेस, तशी तुझ्या शयनकक्षात शृंगार लेवून मंचकावर बैस.”

विराटनगरात ती रात्र उतरली. संध्याकाळीच भीमसेनानं आपल्या सर्व बंधूंना गाठून, रात्रभर माझ्या शयगृहालगतच थांबण्याची सूचना केली. तसा भीमसेन बुद्धिकौशल्याच्या योजना आखताना मी कधीच पाहिला नव्हता, पण त्या रात्री मला त्याच्यातील एक सूक्ष्म गुणविशेष प्रकर्षानं जाणवून गेला. माझ्याशी निगडित कोणतीही गोष्ट करताना तो ती विचारपूर्वकच करीत असे. अशा गोष्टीत त्याचं माझ्यावरचं प्रेम काठोकाठ भरलेलं असे. तेही मूकपणे! आपल्या सर्व बंधूंना माझ्या शयनगृहाबाहेर दक्ष पहारा करण्याचं कामच त्यानं नेमून दिलं होतं. विराटांचा एकही सैनिक माझ्या शयनागारात आग लागली; तरीही प्रवेश करू शकणार नाही, याची ती कडेकोट व्यवस्था होती.

भीमसेनाच्या आज्ञेप्रमाणे मी ठेवणीतला शृंगार लेवून विमुक्तकेशा अशी शयनागारातील मंचकावर बसले. रात्रीचा दुसरा प्रहर सरतीला आला. अद्याप कीचक काही आला नव्हता. माझ्या मनात कितीतरी शंकांचं मोहोळ उठलं. या सेनापतीला आमच्या अज्ञातवासाचा काही पत्ता तर लागला नाही ना? हा आम्हाला बंदिवान करण्याच्या योजनेत तर नाही ना? तो येण्याऐवजी त्याचे सशस्त्र सैनिकच आत घुसले

तर? मी क्षणाक्षणाला अस्वस्थ होत असतानाच, विराटांचा मद्यधुंद सेनापती कीचक माझ्या शयनागारात घुसला! त्याच्या मस्तकी किरीट नव्हता. खांद्यावर गदा नव्हती. केश विस्कटलेल्या, टरबुजासारख्या त्याच्या गोल गरगरीत चर्येवरचे डोळे वासनेनं कसे काठोकाठ ओसंडून वाहात होते.

धडधडत्या मनानं मी मंचकावर बसले होते अधोवदन! त्याला आवाहक वाटावी म्हणून सलज्ज अशी! माझे विपुल केस मुक्तकेश मी नागिणीसारखे मंचकावर हेतुत: लोंबते सोडले होते. त्यांचं खालचं टोक थेट पायघडीला भिडलं होतं.

विराटांचा वासनाधुंद सेनापती कीचक 'म – मालिनी – स्– सैरंध्री – प्रिये' असं लडखडत बोलत येऊन माझ्या निकटच बसला. मी द्यूतगृहात माझ्या अंशुकाच्या निरीला हात घालणाऱ्या, सूडानं पेटलेल्या दु:शासनाचे डोळे बघितले होते. मान वर घेऊन याचेही बघितले. हे वेगळेच होते. यात सूडाग्नीचा लवलेशही नव्हता. होता उघड्या–वाघड्या वासनेचा अनिर्बंध भडकलेला वडवानल. या क्षणी मला खोलवर तीव्र–तीव्रपणे जाणवलं की, कोणताही जीव डोळ्यांतूनच प्रकट होत असतो. माझ्या प्रिय सखा कृष्णाचे जे डोळे मी पाहिले होते. तसे अद्याप मी एकाचेही पाहिले नव्हते!

उतावीळ कीचक मला कवेत घेण्यासाठी 'लाजतेस का अशी स्–स् – सैरंध्री – म – म – मालिनी' म्हणत जवळ सरकला. मला ब्रह्मांड आठवलं. याच क्षणी माझ्या मंचकावरून पायघडीपर्यंत उतरलेल्या केशपाशाला खालून एक जोरदार हिसडा बसला. त्याची कळ मेंदूपर्यंत शिरली. मी सावध झाले. निर्भयही झाले. इतका वेळ हातात चाळवीत असलेली माझी पाचूधारी नागफणीची अंगठी मी पायघडीवर सोडली. तिचा आवाज झाला 'कुठे पडली अंगठी?' म्हणत मी पायांशी वाकले. माझ्या विपुल केशभारासह, नागीण आपल्या बिळात घुसावी, तशी ठरल्याप्रमाणे मंचकाखाली गेले.

वर कामातुर कीचक अस्वस्थ–अस्वस्थ झाला. समोर दिसणारी, गोड बोलणारी सैरंध्री क्षणात कुठे दिसेनाशी झाली म्हणून 'स–स–सैरंध्री, म–म–मालिनी' म्हणत उठून, वाकून मंचकाखाली बघू लागला. त्यानं आपला केसाळ, पुष्ट हात मंचकाखाली घालून हाताशी लागलेले केश मुठीत घट्ट धरून 'ये – लाडके, बाहेर ये.' म्हणत हात बाहेर खेचला.

त्यानं आपणहून बाहेर खेचला, तो होता माझा महाबली पती भीमसेन! नागिणीऐवजी सदेह गिळंकृत करणारा अजगरच समोर बघावा, तशी त्याची मद्यधुंदी उतरली. तरीही लडखडत तो म्हणाला, "तू... ब... ब... बल्लव इथं कसा?" भीमसेन काही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हताच. तो केवढ्यातरी मोठ्यानं ऐकणाऱ्याचा थरकाप होईल असं ओरडला, "पाप्या, ही सैरंध्री नाही!" म्हणत त्यानं पहिला बळकट तडाखा कीचकाच्या मानेवर दिला. त्यानं तो एका दिशेला कलंडला. मी चापल्यानं मंचकाखालून बाहेर आले. भिंतीची कड धरून डोळे विस्फारून बघत राहिले. भीमसेनाचं अजोड मल्लयुद्ध मी केवळ ऐकून होते. कधीच ते पाहिलं नव्हतं.

"पाऽप्याऽऽ ती मालिनीही नाही!"

बहिरी ससाण्यासारखा झेप घेत भीमसेन त्या धिप्पाड सेनापतीला भिडला.

"ती आम्हा इंद्रप्रस्थाच्या पाच पांडवांची पत्नी द्रौपदी आहे, नीचाऽऽ!" आणखी एक तडाखा त्यानं दुसऱ्या बाजूनं कीचकाच्या मानेवर दिला. तो दुसऱ्या दिशेला कलंडला.

मी भीमसेनाचं हे रूप कधीच पाहिलं नव्हतं. त्याचे डोळे तर आकाशात तळपत्या

चंद्र–सूर्यासारखे या क्षणी अपार तेजस्वी दिसत होते. मृगातल्या वादळी मेघांनी कडकडती गर्जना द्यावी, तसा भीमसेन कीचकाला आव्हान देत कानठळ्या बसविणारे लोहदंड थोपटत गर्जला, "विराटांच्या सेनानायका, सिद्ध हो, पांडवांच्या मल्लवीर भीमसेनाशी निर्णायक द्वंद्व खेळायला!"

आता कीचकही पुरता सावरला होता. त्यानंही दणादण दंड थोपटले. दोन अवाढव्य मत्त रानगज एकमेकांशी टक्करत झुंजावेत, तसे माझ्यासमोरच ते झुंजू लागले. काही वेळातच दोघांच्याही अंगातून घामाच्या धारा लागल्या. कधी नव्हे असा भीमसेन अनावर झाला होता. यमुनेच्या घाटावर रजकानं धुण्याचे पिळे धपाधप आपटावेत, तसे मल्लविद्येचे वेगवेगळे डावपेच वापरून कीचकाला धपाधप आदळत होता. प्रहर झाला. आता कीचक अर्धमेला झाला होता. भीमसेन क्षणाक्षणानं वादळातला रानवारा फुलत जावा, तसा आवेशी होत चालला. क्षणभर मला वाटलं, 'या क्षणी प्रत्यक्ष कृष्ण त्याला आवरण्यासाठी आला, तरी तो आवरेल की नाही कोण जाणे! असंही क्षणभर वाटलं की, तो भीमसेन नाहीच – कृष्णच घामाघूम होत मल्लयुद्ध खेळतो आहे.' स्वत:ला हरवून एकटक मी नुसती बघतच राहिले.

"बघ मालिनी, याची कणिक तुझा बल्लव कसा तिंबतो आहे!" कीचकाच्या उदरावर बसून वज्रमुष्टीचे दणदणते प्रहार अक्राळविक्राळ ओरडत भीमसेन कीचकाच्या विशाल केसाळ वक्षावर उतरवू लागला. प्रत्येक प्रहाराबरोबर असह्य वेदनेनं डोळे मिटून कीचक तडफडू लागला.

शेवटी मल्लयुद्धाच्या चरमसीमेला पोहोचलेल्या आम्हा पांडवांच्या त्या अजिंक्य मल्लवीरानं हां-हां म्हणता बाहुकंटकाचा पाश कीचकाच्या गळ्याभोवती करकचून, दातओठ खात आवळला! दातओठ खात, डोळे विस्फारून तो पाश माझा वीर पती भीमसेन क्षणाक्षणानं अधिकाधिक करकचून आवळू लागला. प्राण कोंडताच टाचा आपटत कीचक उसळ्या घेत असह्य–असह्य धडपडला. पण नाही – तो बाहुकंटक होता. भीमसेनानं त्याला शेवटी गतप्राणच केला.

सेनापती कीचकाचा वध झाला आहे हे समजताच, महाराज विराट प्रथम भेदरले. नंतर पांडवांतील मल्लवीर भीमसेनानंच तो केला आहे, हे समजताच सावरले. आमच्यासाठी राजवस्त्रांची तबकं घेऊन भेटीसाठी प्रत्यक्ष पाकगृहात आले. त्यांच्यासमवेत महाराणी सुदेष्णादेवी, पुत्र उत्तर व श्वेत आणि कन्या उत्तरा व विराटांचे अमात्यही होते. आपल्या राज्यात सेवक म्हणून हलकीसलकी कामं करण्याचा प्रसंग साक्षात दिग्विजयी पांडवांवर आला, याची खंत त्यांच्या शब्दाशब्दांतून व्यक्त होत होती.

विराट महाराजांच्या इच्छेनुसार आम्ही पुन्हा राजवेष अंगी धारण केले. युधिष्ठिरातील एक गुणविशेष त्या दिवशी मला प्रकर्षानं जाणवला. वनवासाची बारा वर्षं आणि अज्ञातवासाचं वर्ष अशी जवळ–जवळ तेरा वर्षं तो विझल्या मनानं, सत्त्वहीन, कीव वाटावी, अशा पडेल भाषेत बोलत आला होता. अंगी राजवेष चढताच मात्र त्याच्यातील राजेपण व क्षत्रियत्व कसं फुलारून आलं. त्यानं ज्येष्ठ पांडवाची जागा घेतली. आम्हा पांडवांच्या पुढील हालचालींचं नेतृत्व हाती घेतलं. माझं मन त्याच्याविषयीच्या एका शंकेनं काळवंडून आलं. हा स्वभावाप्रमाणे यापुढेही द्यूतासारखे पेच उभे करणार काय? हा आम्हाला नेणार तरी कुठे? पण नाही – तो आमूलाग्र बदलला होता. महाराज विराटांना त्यानं पहिलीच सूचना केली, हे त्याच्यातील बदलाचं सूचक

होतं. तो विराटांना म्हणाला, “महाराज, आपला विशेष दूत प्रथम द्वारकेला धाडावा. द्वारकाधीश श्रीकृष्णाला तातडीचा संदेश द्यावा की, आम्ही पांडव आता अज्ञातवासातून प्रकट होतो आहोत, आपले आशीर्वाद असावेत.”

मला याचंच समाधान वाटलं की, त्याला सर्वप्रथम स्मरण झालं होतं, ते कृष्णाचं. आमच्यामुळे आता विराटांवर संकट ओढवणार हे स्पष्ट होतं, आम्हाला हे नगर लवकरात लवकर सोडाणं भाग होतं. आम्ही रात्रीची बैठक घेतली. सर्वानुमते ठरलं, प्रथम विराट आणि इंद्रप्रस्थाच्या सीमेवरील कुठल्यातरी एका गावी जायचं. असं गाव महाराज विराटांच्या संमतीनं निवडायचं. अनुद्यूतात ठरलेल्या अटीप्रमाणे अज्ञातवास पूर्ण होताच, कौरवांना आमचं इंद्रप्रस्थाचं राज्य आमच्या स्वाधीन करणं भाग होतं.

मात्र दुसऱ्याच दिवशी द्वारकेहून आलेल्या कृष्णाच्या विशेष दूतानं पुन्हा माझ्यासह सर्व पतींची झोप उडविली. संदेश होता, ‘हस्तिनापूरचं निवडक सैन्य सर्व निवडक योद्धयांसह गोहरणाच्या निमित्तानं विराटांवर चालून यायला निघालं आहे. कीचकवधामुळे तुम्ही विराट नगरीतच आहात, हे दुर्योधनानं अचूक हेरलं आहे. गोरक्षणासाठी तुम्ही प्रकट व्हालच, हे त्याचं अनुमान आहे. या सैन्यात पितामह भीष्म, गुरू द्रोण, कृप, अंगराज कर्ण, बंधू शोण, अश्वत्थामा, निवडक बंधूंसह स्वत: दुर्योधन व शकुनी चालून येताहेत. तुम्ही विजयादशमीच्या दिवशीच त्यांना विराटांच्या सेनेसह आडवं जाऊन प्रकट व्हावं. तुमचं नेतृत्व अर्जुनानं करावं.’

अश्विन शुद्ध दशमीचा – विजयादशमीचा दिवस उजाडला. मरुस्थलीजवळच्या या मत्स्यदेशात अगोदरच पर्जन्य कमी – वर्षभर थांबून–थांबून शिडकलेला. तोही पर्जन्य संपला होता. विराट नगरावर पांढरट भुरक्या धुक्यानं चढलेलं शालीसारखं पटल चढत्या दिवसाबरोबर दूर हटलं. नगरजन आपल्या नित्यकर्माला लागले. आपापल्या गौळगोठ्यांतून पांढऱ्याशुभ्र, तपकिरी, काळ्याबाळ्या, कबऱ्या गाईंचे कळप दबावून लगतच्या अर्बुद पर्वताच्या उतरंडीवर चरणीसाठी घेऊन गेले. आता नगरातील गोठ्यागोठ्यात उरल्या त्या भाकड वृद्ध गायी व वासरं. दिवस कासराभर वर आला आणि अर्बुद पर्वताच्या उतरंडीकडून प्रचंड हलकल्लोळ ऐकू येऊ लागला. तसे विराट महाराज धापा टाकतच नव्या नेमलेल्या सेनापतीसह पाकगृहात प्रवेशले. मी आणि माझे रणवेषातील पाचही पती भीमसेनाच्या नेतृत्वाखाली तिथे एकवटलो होतो. कृष्णानं वेळीच केलेल्या संकेताप्रमाणे माझे सर्व पती मनानं तयारच होते. मात्र त्यातल्या एकाहीकडे एकही शस्त्रं नव्हतं. महाराज विराटांनी त्यांना हात जोडून कळवळून विनंती केली, “तुम्ही वीर आहात. माझ्या प्रजेच्या गोधनाचं रक्षण तुम्ही केलं पाहिजे. तुम्ही लागलीच रथारूढ होऊन कौरवसैन्य हरण करत असलेल्या माझ्या गोधनाला गाठावं, त्याचं रक्षण करावं, आमची लज्जा राखावी.”

त्यांचं आवाहन ऐकून वीरश्रेष्ठ पाचही पांडव एकमेकांकडे बघू लागले. भीमसेन म्हणाला, “आमच्याकडे आमची शस्त्रं नाहीत. कसं करणार गोरक्षण?”

तसं महाराज विराट तत्परतेनं म्हणाले, “आमच्या शस्त्रागारातील लागतील ती शस्त्रं घेऊन तुम्ही तातडीन निघावं.”

माझ्या वीर पतींची मंत्रभारित शस्त्रं समवेत नाहीत, ही अडचण मी जाणली. म्हणाले, “तुमच्या सीमेवरच एका शमीवृक्षाच्या ढोलीत यांनी आपली सर्व शस्त्रं ठेवली

आहेत. तीच घ्यावी लागतील.”

“युवराज उत्तराला रथ सिद्ध करायला सांगावं. आम्ही तयारच आहोत. मी सांगेन तसा रथ हाकारण्याची आज्ञा महाराजांनी त्याला द्यावी. पुढचं आम्ही बघू.” वर्षभरानंतर आपलं प्राणप्रिय गांडीव धनुष्य दृष्टीस पडणार, म्हणून अर्जुनाची चर्या कशी तेजाळून उठली होती.

आम्ही विराटांच्या राजवास्तृत आलो. महाराणी सुदेष्णादेवी, राजकन्या उत्तरा आणि राजमंडलातील स्त्रिया यांच्यासमक्ष माझ्या रणोत्सुक पाचही पतींचं मी औक्षण केलं. विराटांच्या स्त्रियांनीही केलं. आमचा निरोप घेऊन अर्जुनाच्या नेतृत्वाखाली विराटांचं रथदल गोधनाच्या रक्षणासाठी उधळत निघालं. पाठोपाठ विराटांची विराट सेनाही निघाली. विजयादशमीच्या त्या दिवशी मी दिवसभर इकडे–तिकडे अस्वस्थ फेऱ्या घेतं स्मरण करीत होतं. ते केवळ कृष्णाचं! त्याला मनोमन म्हणत होते, “आजवर पांडवांची लज्जा तूच राखली आहेस. आजही तिचं रक्षण कर. माझ्या अजिंक्य धनुर्वीर अर्जुनाला यशश्री लाभू दे!”

त्या दिवशी मी अन्नग्रहण केलं नाही. पाणीसुद्धा प्याले नाही. माझ्या मनाची सुतारपक्षीण परिस्थितीच्या वटवृक्षाला चोचीचा अविरत ठोका देऊन सांगत राहिली – अज्ञातवासातून माझे पती आज प्रकट होताहेत. सौभाग्यानं त्यांना रणांगणावर प्रकट होण्याची संधी लाभली आहे. विराटांच्या गोधनाच्या रक्षणात त्यांना यशच येऊ दे. कृष्णा, याशिवाय त्यांच्या पदरी तू काहीही टाकलंस तर मी तुझं तोंडही बघणार नाही. पुन्हा अज्ञातवास पत्करेन – जीवनभराचा!

विराटनगरावर विजयादशमीचा संध्याकाल उतरू लागला. अर्बुद पर्वतावर चरणीसाठी गेलेले पक्षयांचे थवे नगराकडे परतू लागले. आणि प्रथम शेकडो गायींचा दुरून येणारा अस्पष्ट हंबर कानांवर पडला. मी सावध झाले. पाठोपाठ विराट महाराजांचा जयजयकार कानी आला. माझी चर्या उजळली. मी कान टवकारले. आता तर स्पष्ट एकच जयघोष कानी पडू लागला – ‘अजिंक्य धनुर्वीर अर्जुन जय हो, गोरक्षक पार्थ – साधु... साधु! गांडीवधारी धनंजय – जयतु! जयतु!’ माझ्या चर्येवर लक्ष–लक्ष दीप उजळले.

कौरवसेनेचा दणदणीत पराभव करून माझे विजयी पती परतले होते. विराटांचं गोधन त्यांनी क्षत्रियत्वाला शोभेलशा शौर्यानं मुक्त केलं होतं. आम्हाला एक वर्ष आश्रय देणाऱ्या विराटांच्या अमोल सहकार्याची ती जमली तेवढी अल्पशी परतफेड होती. तळपत्या विजयी मुद्रेनं माझे पाचही पती माझ्या भेटीसाठी आले. त्यांनी दिलेला वृत्तान्त रोमहर्षक होता. भविष्यासाठी अपेक्षावर्धक होता.

हजारो अश्वसाद पाठीशी घेऊन कौरवसैन्य अर्बुद पर्वताच्या उतरंडीवर विराटांच्या गोधनाला भिडलं होतं. त्या प्रचंड गोधनाला घेर टाकून ते हरण करून न्यायला आले होते. कोण–कोण? तर भगवान परशुरामांकडून प्रस्ताव अस्त्र प्राप्त केलेले, अखंड ब्रह्मचर्यव्रत पाळलेले गंगापुत्र पितामह भीष्म, कौरव–पांडवांना धनुर्वेध शिकविलेले आचार्य द्रोण-कृप, आपल्या पित्याकडून ब्रह्मास्त्र प्राप्त केलेला अश्वत्थामा, दिग्विजयी अंगराज कर्ण, त्याचा बंधू शोण, अनेक कौरव व शकुनी बंधू आणि त्यांचं नेतृत्व करत होते कोण? तर मला भर सभेत उघडी मांड दाखवणारा दुर्योधन आणि खोटे फासे करवून कपटी द्यूत घेळणारा गांधारदेशीचा शकुनी!

माझ्या पतींनी विराटांच्या रथांतून शस्त्र ठेवलेला तो शमीचा वृक्ष गाठला होता. भीमसेनानं त्या वृक्षाला प्रथम वंदन करून, वर चढून एकेक करीत आमची सर्व मंत्रभारित शस्त्रं खाली उतरविली होती. मंत्र म्हणून पुन्हा ती भारित केली होती. मग प्रत्येकानं फुलं वाहून त्या शस्त्रांना वंदन केलं. आपापलं शस्त्रं उचलून ते धारण केलं. आता प्रत्येकाच्या चर्येत जाणवेल असं अंतर आलं. नावालाही त्यांच्या मुद्रेवर भय दिसेनासं झालं. सर्वांचेच डोळे सूर्यपट झाले. देहानं ते पाच शस्त्रसज्ज वीर होते. पण मनानं इडादेवीनं भरलेली बळकट मूठच होते. सर्वांनीच कुलदेवी इडाचा एकमुखी जयकार केला.

विराटांच्या गोधनासह पळून जाणाऱ्या कौरवांना त्यांनी गाठलं. आपापले शंख फुंकले. शरचाप सावरले. खांद्यावरची गदा-मुसल ही शस्त्रं हाती तोलली. अर्बुद पर्वताला साक्षी ठेवून कौरव, पांडव आणि विराट यांचं गोधनाच्या प्राप्तीसाठी रणवाद्यांच्या गजरात घनघोर युद्ध झालं. आज अर्जुनाच्या रोमरोमांत रणदेव संचारला होता. तेरा वर्षं दबून पडलेला त्याचा विक्रम अनावर उफाळून आला होता. त्यानं पितामह भीष्म, गुरू द्रोण-कृप, अंगराज कर्ण – झाडून साऱ्यांचा सायंकाळपर्यंत घनघोर पराभव केला. त्याच्या अमोघ बाणांपैकी एक वर्मी लागून कर्णाचा बंधू शोण रणात पतन पावला. तसं त्याच्या निष्प्राण देहावर कोसळून स्फुंदत कर्णानं प्रतिज्ञा घेतली – अर्जुनवधाची!

सायंकाळी शस्त्रहीन केलेल्या सर्व कौरव योद्धयांवर अर्जुनानं संमोहनास्त्राचा प्रयोग केला. हे अस्त्र त्यानं पाशुपताच्या वेळीच हिमालयात प्राप्त करून घेतलं होतं. त्या अस्त्राच्या प्रभावानं लढून क्लान्त झालेले कौरवयोद्धे एकेक करत प्रथम संमोहित नंतर संभ्रमित आणि शेवटी मुर्च्छित होऊन रणांगणावर पडले.

तसं सख्या कृष्णाचा गगनभेदी जयघोष उठवीत अर्जुनानं विराटांच्या युवराज उत्तराला आज्ञा केली, “जा विराटा, मुर्च्छित सर्वांच्या अंगावरली वस्त्रं मिळतील तशी ओरबाडून घेऊन ये. तुझ्या पित्याला ती आजच्या युद्धाचा शेवट काय झाला हे सांगतील. जा.” तोही आज्ञाधारकासारखा रथातून उतरला आणि इतस्तत: पडलेल्या प्रमुख कौरव योद्धयांच्या अंगावरील वस्त्रं उतरवून घेऊन आला.

‘त्यातलीच ही काही वस्त्रं, तुझ्यासाठी उपहार म्हणून आणली आहेत’ म्हणत युद्धाचा सर्व वृत्तान्त मला सांगून झाल्यावर अर्जुनानं भीमसेनाकडे पाहिलं. तो हसत-हसत पुढे आला. आपल्या हातातील एक निळं उत्तरीय माझ्या हातात देत म्हणाला, “हे अंगराज म्हणविणाऱ्या, तुला वेश्या म्हणून दात विचकणाऱ्या त्या सूतपुत्राचं – दुर्योधनाच्या मित्राचं – कर्णाचं उत्तरीय.”

मी त्या उत्तरीयाकडे एकटक पाहिलं. खरोखरच ते माझ्या कृष्णाचा उत्तरीयासारखं निळं होतं. दोहोंतील लक्षणीय अंतर मात्र आत्ताच माझ्या ध्यानी येऊन चुकलं होतं. कृष्णाच्या उत्तरीयात मोरपिसासारखा सुखद मऊपणा होता. या उत्तरीयात विणलेल्या जरीबतूमुळे असेल, जाणवावा असा खरखरीतपणा होता. त्यानं भर द्यूतगृहात काढलेले ‘वेश्या – पाचांची आणि एकशे पाचांची असली काय?’ हे उद्‌गार माझ्या कानामनात घुमून उठले. तसं पीतांबरधारी कृष्णाचं स्मरण करून मी म्हणाले, “कधीकाळी तरी तुझ्या उत्तरीयातील उबदार मऊपणा, आज समरांगणात मुर्च्छित पडलेल्या एकाला तरी कळेल काय?”

मी या विचारात असतानाच अर्जुनानं एक रक्तवर्णाचं उत्तरीय माझ्या हातात ठेवलं. केवढ्यातरी तळपत्या डोळ्यांनी, वक्ष फुलवीत तो म्हणाला, "हे उत्तरीय आहे, गुरुश्रेष्ठ द्रोणपुत्र अश्वत्थामाचं!" मी त्या उत्तरीयाकडे बघतच राहिले. खूप विचार केला तरी मला कळलं नाही की, कधी नव्हे ते आयुष्यात प्रथमच गोहरणासारख्या ब्राह्मणाला निंदनीय घोर कर्मासाठी हे पिता-पुत्र कसे काय आले? नेहमी तत्त्वज्ञानपर बोलणाऱ्या गुरुपुत्र अश्वत्थाम्यानं हे रक्तवर्णी उत्तरीय कसं काय निवडलं आणि पांघरलं होते? कधीकाळी मला याचं उत्तर मिळालं असतं, तर एकट्या कृष्णाकडूनच!

गोरक्षणासाठी अर्जुनानं व माझ्या अन्य पतींनी केलेल्या कौरवांच्या पराभवामुळे महाराज विराट त्यांच्यावर अतीव प्रसन्न झाले होते. आपली सेविका बृहन्नडा ही स्त्री नसून तो विक्रमी अर्जुनच आहे हे समजताच, राजकन्या उत्तरेचीही दृष्टी बदलली होती. तिने आपल्या पित्याकडे अर्जुनच पती म्हणून लाभावा, अशी स्पष्ट इच्छा प्रकट केली होती. एवढीशी तर होती ती! मला कन्या असती, तर तिच्याएवढीच असती. कुमारिकेच्या पराक्रमपूजक स्त्रीसुलभ विचारांनी ती माझ्या पतीकडे – धनुर्धर अर्जुनाकडे आकर्षिली गेली होती.

माझ्या कानावर तिची ही तिच्या वयाला न शोभणारी विचित्र मनीषा आली. मी भांबावूनच गेले. ती राजकन्या होती. तिच्या पित्याचं तिच्यावर विलक्षण प्रेम होतं. त्यानं तिचा हट्ट मान्यही केला असता आणि अर्जुनाचं मन मी चांगलं जाणत होते. तो तीर्थयात्रेला म्हणून गेला होता नि दोन विवाह करून परतला होता! हे कुठेतरी थांबायलाच पाहिजे होतं. जेव्हा-जेव्हा मी मानसिकदृष्ट्या अडचणीत आले, तेव्हा-तेव्हा कृष्णाशिवाय कुणाचंच स्मरण केलं नव्हतं.

'आम्ही प्रकट झालोत. विराटांच्या वर चालून आलेल्या कौरवांचा पराभव झाला आहे. आम्ही पुढे काय-काय करावं, याची दिशा दाखविण्यासाठी सत्वर भेटीस यावं. प्रतीक्षा आहे.' असा युधिष्ठिराचा संदेश घेऊन द्वारकेला जाणाऱ्या राजदूताला मी स्वत: गाठलं. दासदासींना बाहेर पिटाळून अगदी एकांतात त्याला कानमंत्र दिला, 'कृष्णाला सांग, असशील तसा सत्वर निघून ये. नाहीतर कन्या शोभणाऱ्या उत्तरेशी अर्जुनाचा विवाह झालाच म्हणून समज.'

आता माझे पती – पांडव अज्ञातवासातून प्रकट झालेत, ही वार्ता समजल्यामुळे मत्स्यांच्या लगतच्या जनपदांतील राजे आणि त्यांचे सेनापती व अमात्य विराटनगरीकडे येऊ लागले. सर्वांत प्रथम येऊन थडकला तो सेनेसह माझा बंधू धृष्टद्युम्न. माझ्या नकुल-सहदेवांचा मामा असल्यामुळे मद्र गणराज्याचा शल्यही आला. विराटांचा एक दूत हस्तिनापूरलाही राजमाता कुंतीदेवी व विदुरांकडे गेला होता.

आम्ही कौरवांशी ठरल्याप्रमाणे 'बारा वर्षं वनवास व एक वर्षं अज्ञातवास' ही अट काटेकोर पूर्ण केली होती. आता कृष्णाच्या मध्यस्थीनंच माझ्या पतींना पूर्वी जसे खांडववन मिळाले होते. तसं आता इंद्रप्रस्थाचं राज्य परत मिळायलाही काही हरकत नव्हती. मी इंद्रप्रस्थात भीमार्जुन या सर्व पतींसह गौरवानं पुन्हा प्रवेश करण्याची कल्पनाचित्रं रंगवीत होते.

सगळं विराटनगर फुलमाळांच्या तोरणांनी व आंबवतींच्या कमानींनी सुशोभित झालं होतं. नगराच्या चारही दिशांच्या महाद्वारांवर तेवत्या दिवल्यांच्या रांगा चढल्या होत्या.

उभा मत्स्यदेश अपार उत्साहानं विराटनगरीत एकवटला होता. सर्व जण कृष्णाचं दर्शन व्हावं म्हणून कसे आसुसले होते. त्यासाठी ही सर्व तयारी होती. काही दिवसांतच त्याचा दारुकानं आणलेला विजयवंत सालंकृत गरुडध्वज रथ विराटनगरीच्या दक्षिण सीमेच्या महाद्वारासमोर येऊन थडकला. त्या चार पांढऱ्याशुभ्र घोड्यांच्या सुशोभित उंचशील रथातून माझा प्राणप्रिय सखा कृष्ण उद्धवदेव व बलरामदादांसह उतरला. मी पाचही पतींच्यासह महाराज विराट, महाराणी सुदेष्णादेवी, उत्तरा, उत्तर व श्वेत, विराटांचे अमात्य, नवे सेनापती यांच्यासह दक्षिण महाद्वारावर त्याच्या स्वागतासाठी उभीच होते. त्याचे चरण मत्स्यदेशाला लागले मात्र, दाटीवाटीनं त्याच्या दर्शनासाठी जमलेल्या सर्वांनीच त्याच्या सदापावन नावाचा गगनभेदी हर्षोद्गार उठविला, 'भगवान श्रीकृष्ण महाराऽज जयतु –' .

मी हात जोडून जमल्या स्त्री-पुरुषांना हसत-हसत नम्र अभिवादन करणाऱ्या त्याच्या तेजःपुंज मुखमंडलाकडे बघतच राहिले. त्याच्या दर्शनाबरोबर क्षणातच केवढी अविस्मरणीय जीवनानुभूती घेतली मी! माझे बारा वर्षं वनवास व एक वर्ष अज्ञातवास यातील सर्व-सर्व ताणतणाव कुठच्या कुठे पसार झाले. एक वर्षानंतर तो सदेह समोर दिसत होता, तरीही मला तो कालच दिसल्यासारखा वाटत होता! त्याच्या मस्तकावरच्या सुवर्णकिरीटातील रंगवैभवी मोरपीस झमझम तळपत होते. वक्षावरच्या, टवटवीत वैजयंतीमालेचा कृष्णगंध मला तीव्रपणे आला. पीतांबराच्या वळ्या झळकावीत, तरातर चालत तो माझ्यासमोरच आला. विराटमहाराजांसह सर्व पांडव त्याची चौकशी करीत असताना, मलाच ऐकू येईल असं अस्फुट तो म्हणाला, "तुझा संदेश मिळालाय कृष्णेऽ! कसलीही चिंता करू नकोस! कशी आहेस?" क्षणातच तो विराटमहाराज व सुदेष्णादेवींना वंदन करून पांडवांच्या मेळात लुप्तही झाला.

रात्री विराट आणि यादव, पांडव राजमंडळाची बैठक बसली. या बैठकीपूर्वी कृष्णानं एकटाच्या अर्जुनाला बोलावून घेऊन एकांतात त्याच्याशी कसलीतरी महत्त्वाची चर्चा केली. या बैठकीत कृष्णाबरोबर बलरामदादा, उद्धवदेव, हिमालयातून आलेले पांडवांचे पुरोहित धौम्य, यादव व पांडवांचे अमात्य अशी मंडळी होती. पांडवांच्या वतीने स्त्री अशी मी एकटीच होते. महाराज विराट, सुदेष्णादेवी, विराटांचे पुरोहित, नवे सेनापती, अमात्य व राजपुत्र उत्तर आणि श्वेत होते. सर्वांचं क्षेमकुशल घेऊन झाल्यावर महाराज विराटांनी आपल्या मनातील विचार बोलून दाखविला. ते म्हणाले, "पांडवांनी, विशेषतः धनुर्धर अर्जुनानं पराक्रमाची शर्थ करून आमचं गोधन व लज्जारक्षण दोन्ही केलं आहे. त्यासाठी मी महाराणींच्या संमतीनं एक निर्णय घेतला आहे. आमची नृत्य व संगीतात प्रवीण, लावण्यवती एकुलती एक कन्या उत्तरा विक्रमी अर्जुनालाच अर्पण करावी! या बैठकीतील सर्वांच्या साक्षीनं अर्जुनानं तिचा स्वीकार करावा."

आता सर्वांची दृष्टी अर्जुनाकडे लागली. तो वेळ न दवडता तत्परतेने म्हणाला, "महाराजांची कन्या उत्तरा ही माझी नृत्य व संगीतातील शिष्या आहे. मी तिचा गुरू आहे. या दोन श्रेष्ठ नात्यांमधला विवाह धर्मबाह्य ठरतो. शिष्येकडे कुठलाही गुरू कन्येच्याच दृष्टीनं पाहू शकतो, अन्य नाही. आम्ही पांडव विराटांनी आम्हाला अज्ञातवासात दिलेल्या जिव्हाळ्याच्या वागणुकीला विसरू शकत नाही. यासाठीच महाराजांची आज्ञा मी शिरसावंद्य मानत आहे. त्यांची कन्या उत्तरादेवी पांडवांच्या राजकुळात येईल – पण ती माझी पत्नी म्हणून नव्हे; तर स्नुषा म्हणून! माझ्या पुत्र

अभिमन्यू तरुण आहे, सुंदर आहे. महाराजांना व सर्व विराटांना जामात म्हणून शोभणारा आहे. त्याच्यासाठी मी सर्वांच्या साक्षीनं विराटकन्येला मागणी घालतो आहे.”

अर्जुनानं अंगावर आलेला बाण सावध कौशल्यानं परतवून लावला होता. कितीही झालं तरी तो धनुर्धरच होता. कृष्णानं मूक दृष्टिक्षेपात सांगितलेलंच तो बोलला होता.

अभिमन्यू-उत्तरा विवाह ठरला. तो विराटनगरीतच संपन्न करण्याचंही ठरलं.

कृष्णाच्या स्वागतासाठी अगोदरच सजलेलं विराटनगर आता अधिक सजविण्यात आलं. उभय बाजूंच्या पुरोहितांनी विवाहाचा शिवकर मुहूर्त शोधून काढला. प्रथम द्वारकेचा जानवसा आला. त्यात रुक्मिणीदेवींसह भामा, जांबवती, भद्रा, कालिंदी, लक्ष्मणादेवी अशा सर्व राण्या आल्या. अभिमन्यूसह सुभद्रा रेवतीवहिनींना घेऊन आली. गणराज्य द्वारकेचं सुधर्मा राजमंडळ, दोन्ही सेनापती, सर्व दलप्रमुख आले. गर्गमुनींसह आचार्य सांदीपनी पत्नी व पुत्र दत्तासह आले. आम्हा पांडवांच्या तिसऱ्या पिढीतील हा पहिला विवाह होता. त्यासाठी खूप यावंसं वाटत असूनही दूरच्या प्रवासामुळे वृद्ध वसुदेवमहाराज आणि त्यांच्या दोन्ही महाराण्या काही येऊ शकणार नव्हत्या. त्यांनी अभिमन्यूला द्वारका सोडण्यापूर्वीच उदंड आशीर्वाद दिले होते.

हस्तिनापुराहून आमच्या राजमाता कुंतीदेवी महात्मा विदुरांनी दिलेल्या सशस्त्र सैनिकांसोबत आल्या. अन्य कुणीच येणार नव्हतं, तसं विराटांचं अन्य कुणाला आमंत्रणही नव्हतं.

ठरल्या मुहूर्तावर कृष्ण, बलरामदादा, उद्धवदेव यांचा साक्षीनं त्यांचा भाचा अभिमन्यू व उत्तरेचा विवाह थाटामाटात संपन्न झाला. निळा वर्ण वगळता त्याच्यासारख्याच दिसणाऱ्या तरुण व सुंदर मुंडावळ्याधारी अभिमन्यूला त्याच्या मामा कृष्णानं त्याला ‘उदंड कीर्तिमान हो!’ असा सार्थ आशीर्वाद देत, आपल्या वक्षाशी प्रेमानं बिलगतं घेतलं. उत्तरेला आशीर्वाद देताना तो म्हणाला, ‘आयुष्यमान भव!’

कांपिल्यनगराहून आलेल्या माझ्या प्रतिविंध्य, सुतसोम, श्रुतकीर्ती, शतानिक व श्रुतसेन या पाचही पुत्रांनी आपल्या बंधूंची अभिमन्यूची वक्षभेट घेतली. नवविवाहित अभिमन्यू व उत्तरा यांच्या चर्येवरून आगळंच तेज ओसंडत होतं. मी विवाहमंडपातील कृष्णाकडे पाहिलं. तो अर्जुनाला काहीतरी सांगत होता. काय, ते कोलाहलामुळे ऐकू येत नव्हतं.

विवाहाच्या दुसऱ्या दिवशीच विराटांची राजसभा भरली. या सभेत महाराणी सुदेष्णादेवींच्या शेजारी मी कृष्णाच्या आठही राण्यांसमवेत बसले होते. विराट, यादव, पांचाल व पांडव या सर्वांना या विवाहानिमित्त एकत्र बघून कृष्ण जे बोलला, ते अविस्मरणीयच होत – न्यायाचा पाठपुरावा करण्यासाठी जीवनभर त्यानं केलेल्या आटापिट्याची आच त्यात होती. आम्हा पांडवांवरचं विशुद्ध प्रेम त्यात ओतप्रोत भरलं होतं. त्याहून दूरवरचं काहीतरी प्रत्यक्ष बघत असल्यासारखं जाणतं भान त्यात होतं. तो आपल्या कणीदार, खिळवून ठेवणाऱ्या ठणठणीत वीरवाणीत म्हणाला, “महाराज विराट, प्रिय पांडव, यादव, पांचाल व विराटांच्या ज्येष्ठ योद्धेहो! पाचही विक्रमी गुणवंत पांडवबंधू बारा वर्षांचा वनवास व एक वर्षाचा अज्ञातवास पूर्ण करून आता प्रकट झाले आहेत.

"सर्वप्रथम सर्वांच्या साक्षीनं मी त्यांना पुढील जीवनप्रवासासाठी अभिनंदनासह हार्दिक आशीर्वाद देत आहे.

"समरांगणात प्राणपणाचा विक्रम सिद्ध करणं, म्हणजेच केवळ क्षत्रियत्व नव्हे! संपूर्ण मानवी जीवन हेच समरांगण आहे. माझे आतेबंधू असलेल्या या पाचही वीरांनी वनवास व अज्ञातवासातही आपली कर्तव्यं न चुकता यशस्वीपणे जगून दाखविलं आहे.

"तुम्हांपैकी प्रत्येकाच्या ठायी एक प्रबळ व अशरण क्षत्रिय वास करतो आहे. माझं त्यालाच आवाहन आहे. प्रत्येकानं क्षणभर नुसती कल्पना करून बघावी की, पांडवांसारखा प्रसंग आपल्यावरच आलाय. आपण या सत्त्वपरीक्षेत कितपत टिकलो असतो, याचं निर्विवाद उत्तर परस्पर प्रत्येकाला मिळेल. यासाठीच आता मी जे सांगतो आहे, ते ध्यानपूर्वक ऐकून प्रत्येकानं स्वत:चा असा योग्य निर्णय स्वत:शीच घ्यावा. माझा तुमच्यातील निकोप आत्मशक्तीवर विश्वास आहे.

"विराटांच्या या राजवेदीवरून हस्तिनापूरच्या कुरूंना मी स्पष्ट-स्पष्ट विचारतो आहे, आता तरी पांडवांना तुम्ही न्याय देणार आहात की नाही?" आपल्या निळ्या आकाशवाणीत तो धडधडीत सत्याचं सर्वांना तळपत्या सूर्यासारखं दर्शन घडवू लागला – "अगदी बालपणापासून कौरवांनी – दुर्योधन व त्याचे बंधू, शकुनी आणि त्याचे बंधू, त्यांचे सर्व साथीदार यांनी या पांडवांचा छळ मांडला आहे. कशासाठी? का? त्यांना ते अनाथ वाटले की काय? विराटांच्या राजनगरातून मी स्पष्टपणे घोषित करतो आहे की ते माझे – मी पारखलेले सर्वांत गुणवान असे आतेबंधू आहेत. उद्याच्या आर्यावर्ताचे ते नि:संशय नेते आहेत.

"मी शक्य ते सर्व यत्न करणार आहे. पण जेवढे म्हणून मला दुर्योधन-शकुनी समजले आहेत, त्यावरून नि:संशय खातरी आहे, ते पांडवांना सुखासुखी कधीच न्याय देणार नाहीत. आपल्या न्याय्य अधिकारांसाठी त्यांना मिळेल ते सामर्थ्य एकवटून समरांगणात उतरावं लागेल. तिथेच त्यांना न्याय खेचून आणावा लागेल. तसा प्रसंग आलाच, तर विराटांच्या मत्स्यदेशानं पांडवांच्या पाठीशी ठाम बळकटपणे ससैन्य उभं राहावं, असं मी आजच आवाहन करतो आहे. विराटमहाराजांनी आपला एक पोक्त, शहाणा व अनुभवी राजदूत आजच हस्तिनापुराकडे कुरूंच्या महाराज धृतराष्ट्रांना भेटण्यासाठी पाठवावा. पांडवांचं इंद्रप्रस्थाचं गणराज्य त्यांना आता कौरवांनी सगौरव परत करावं, असा स्पष्ट संदेशही पाठवावा.

"माझं द्वारका गणराज्य व स्वत: मी पांडवांच्या पहिल्या भेटीपासूनच त्यांचे झालो आहोत. त्यांच्या पाठीशी सदैव उभे आहोत. जीवनभराच्या अनुभवाने एकच सांगतो, समरांगणात संहारक युद्ध केल्यामुळे जीवनाचे प्रश्न कधीच मिटत नाहीत. उलट ते अधिकच वाढत जातात, क्लिष्ट होतात. मानवी जीवन आहे त्यापेक्षा सुखद व सुसह्य करण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे प्रेम! त्या नि:संशय प्रेमासाठी पांडवांच्या वतीनं या सभेतील विराट, पांचाल व यादव या गणराज्यांच्या वतीनं माझं हस्तिनापुराला आज प्रकट आवाहन आहे की, इंद्रप्रस्थाचा प्रश्न त्यांनी सामोपचारानं, प्रेमानं सोडवावा.

"जीवनभरच्या प्रवासात असे न्याय-अन्यायाचे प्रश्न सोडविण्यासाठी मी काही केलं असेल, तर त्या तुळशीपत्राएवढ्या पुण्याईचा दाखला देऊन मी आज व इथूनच कुरूंना आवाहन करतो आहे – पांडवांना न्याय द्या!!" शरदातलं दवानं भरलेलं सूर्यफूल दिसावं, तशी घामबिंदू डवरलेली त्याची भावमुद्रा दिसत होती. तो पांडवांचा मामेबंधू

बलरामदादांचा कनिष्ठ – बंधू, उद्धवदेवांचा दादा, कधीकाळचा गोपांचा गोप, आचार्य सांदीपनी व घोर आंगिरस यांचा शिष्य, वसुदेवबाबा, देवकी व रोहिणीमातांचा पुत्र इतकंच काय मला नेहमी जवळचा व परिचित वाटणारा कृष्णसखाही वाटला नाही. तो याहून कुणीतरी वेगळाच वाटला.

नवविवाहित उत्तरा-अभिमन्यूला मोजक्या आप्तगणांसह द्वारकेला परत पाठविण्याचा त्यानं निर्णय घेतला. तसे ते ससैन्य निघून गेले. त्यांना निरोप देऊन विराटांच्या राजवास्तूत परतल्यावर बरेच दिवस मनी घोळणारा एक प्रश्न मी कृष्णाला विचारला, "द्वारकाधीशा, तू तुझ्या राजनगरात तुझ्या जीवनात भेटलेल्या स्मरणीय व्यक्तींच्यासाठी एक सुवर्णी पायदंडयांच्या सोपान उठविला आहेस, असं ऐकून आहे. अनेकांच्या तोंडून त्या भव्य श्रीसोपानाची ख्याती कानी आली आहे. आतापर्यंत अनेक पायदंडयांची भर पडून तो पुरता उंच झाला आहे म्हणे! कृष्णा, तू कधीच बोलला नाहीस म्हणून आता मीच विचारते आहे, तुझ्या त्या श्रीसोपानातील सुवर्णी पायदंडयांत शेवटच्या क्रमांकावर तरी तुझ्या या वनवासी, विटंबित सखीसाठी एखादी पायदंडी आहे काय?" माझा प्रश्न त्याला सर्वस्वी अनपेक्षित होता. प्रथम तो माझ्याकडे चमत्कारिक बघतच राहिला. मग मोहक हसून म्हणाला, "कृष्णे, कुणी सांगितलंय तुला तो एकच सोपान आहे म्हणून! तू सखी आहेस. विचार करून बघ. आणखीही एखादा श्रीसोपान आहे का? असलाच, तर त्यात तुझ्या नावाची रत्नखचित पायदंडी कुठल्या क्रमांकाला असेल?"

त्यानं दिलेल्या उत्तरानं मी गोंधळून गेले. विचार करीत राहिले, दुसरा कुठला सोपान? कुठे असावा तो?

"नाही सापडत? वेडी आहेस तू श्यामले. अगं, दुसरा सोपान आहे, तो तुझ्या या प्रिय सख्याच्या अंत:करणात!! तिथल्या तुझ्या पायदंडीचा क्रमांक तुझा तू ठरवायचा आहेस! दुसऱ्या कुणीही नाही – मीसुद्धा!" तो हसतच माझ्या समोरून सहज निघूनही गेला – यमुनेकाठच्या शरदातील गंधभरल्या वायुलहरींसारखा!

आता आम्ही इंद्रप्रस्थात जाणार हे नक्की होतं. त्यासाठी कृष्णानं विराटमहाराजांसमोर एक प्रस्ताव ठेवला. मत्स्यांच्या सीमेवर इंद्रप्रस्थाला जवळ अशा उपप्लाव्य नावाच्या गावात आमच्या पडावांची व्यवस्था करावी. विराटांचा राजदूत तर केव्हाच हस्तिनापूरला गेला होता. ज्या नगरीत वेष पालटून आम्ही अज्ञातवासातील कठोर सत्त्वपरीक्षेचं वर्ष व्यतित केलं होतं, त्या नगरीचा निरोप घेण्याचा समय आला. मी एकेक करत स्वत: जाऊन सैरंध्री म्हणून काम करणाऱ्या सर्व सेविकांची भेट घेतली. मी अज्ञातवास संपला म्हणून एव्हाना मन बांधलं होतं. त्यांचा निरोप घेताना मात्र त्या गहिवरल्या, काही जणी तर स्फुंदुच लागल्या. त्यांचं निखळ प्रेम बघून मीही गहिवरले.

विराटांच्या पाकशालेत भीमसेनाला निरोप देताना त्याच्या साथीदारांनी तर त्याच्या आवडीचे पदार्थ तयार करून त्याला खाऊ घातले. हाच अनुभव युधिष्ठिर आणि नकुल-सहदेवांना त्यांच्या-त्यांच्या वर्षभराच्या सहकाऱ्यांकडून आला. या निमित्ताने मला आणि माझ्या पाचही पतींना एक जीवनसत्य चांगलं समजून चुकलं की, कुणाच्याही जीवनमंडलात तसं कुणीच अनावश्यक म्हणून कधीच येत नसतं. ती-ती व्यक्ती दूर गेली, पारखी झाली की, मगच तिचं महत्त्व कळून येतं.

विराटांच्या राजवास्तूतील सर्वांचा निरोप घेऊन आम्ही उपप्लाव्य या छोटचा गावात कृष्णासह आलो. विराटमहाराजांच्या आज्ञेनं इथं आमच्यासाठी सर्व सोयींनी युक्त शिबिरं उठली होती. सेवेला तत्पर सेवकही होते. कृष्णाबरोबर त्याचे द्वारकेचे सात्यकी आणि निवडक यादवयोद्धे होते. बलरामदादा, उद्धवदेव आणि यादवांचं स्त्रीमंडल अभिमन्यू-उत्तरा या नवदांपत्यासह द्वारकेला परतलं होतं. आम्ही इथल्या शिबिरात स्थिरस्थावर होताच कृष्णानं मी व माझ्या पतींसमवेत एक महत्त्वाची बैठक घेतली. तो नेहमीच अशा बैठकांतही सतत हसराच वावरत आला होता. या बैठकीत मात्र तो कितीतरी गंभीर झाला होता. यापूर्वी मी त्याची अशी ही मुद्रा कधीच पाहिली नव्हती. या बैठकीत तो अगदीच मोजकं बोलला. म्हणाला, “विराटांच्या राजदूताला हस्तिनापूरच्या कुरूंनी कसलाही प्रतिसाद दिलेला नाही! ते सोयीचं मौन पांघरून बसले आहेत. आता मलाच त्यांना बोलकं करावं लागेल. प्रिय बंधूंनो, तुमच्यासाठी मला शक्य ते-ते सर्व मी करेन. शेवटचा यत्न म्हणून तुमच्यात व कुरूंत भावसमेट व्हावा, याकरिता मी शिष्टाईसाठी हस्तिनापूरला कुरूंच्या राजनगरीतही जाईन. माझं सर्व बुद्धिकौशल्य व वाक्चातुर्य पणाला लावेन. मी जीवनभर न्यायाचा पक्ष घेतला. तुम्हाला सामोपचारानं न्याय मिळावा, यासाठी मी निकराचा प्रयत्न करेन.” ते ऐकून आमच्या भवितव्याची धुरा ज्याच्या हाती होती, तो युधिष्ठिर म्हणाला, “वासुदेवा, सामोपचारानंच हे मिटावं, असं मलाही वाटतं. युद्धामुळे आम्हा बांधवांत कायमची तेढ येणार आहे. त्यांनी आम्हाला द्यूताच्या सर्व अटी पूर्ण केल्यानंतर आता आमचं इंद्रप्रस्थाचं राज्य घेतलं तसं परत करायला हवं. हेच आमचं आग्रहाचं म्हणणं आहे. त्यासाठी युद्ध करावं लागणं आणि त्या युद्धात संबंध नसलेल्या अनेक जिवांची आहुती द्यावं लागणं, हे योग्य नाही. शक्यतो तू सामोपचाराच्या अंगानंच बोलणी कर. माझ्या या बंधूंना हवं तर मत विचार.”

न मागताच मिळालेली अनुमती बघून मला चक्रावून टाकत भीम म्हणाला, “आमचं इंद्रप्रस्थाचं राज्य तेवढं सामोपचारानं द्या म्हणावं!”

मला कल्पनाही नसताना त्याला जोड देत अर्जुनही म्हणाला, “युद्धात आपल्याच संहार होणार – त्यापेक्षा मला समेट बरा वाटतो.”

ज्यांच्यावर माझा सर्वथा भर होता, त्यांचीच ही बुद्धिभ्रष्टता बघून मी खवळले. म्हणाले, “कृष्णा, कुरूंच्या भरल्या द्यूतसभागृहात ज्येष्ठांसमोर झालेली माझी सर्वांनाच लज्जास्पद विटंबना, माझे हे विक्रमी पती विसरलेले दिसतात. माझे मुक्त केश आणि आपल्या प्रतिज्ञाही ते विसरलेत. परदुःख शीतल असंच तेही मानतात. ते विसरले असले, तरी मी माझ्या स्त्रीत्वाचा अवमान कदापिही विसरू शकत नाही. तूही विसरलेला मला चालणार नाही. विसरलास, तर माझे पिता द्रुपद, बंधू धृष्टद्युम्न माझ्या अवमानाचा प्रतिशोध घेतील. तेही घेणार नसतील तर लक्षात ठेव, अभिमन्यूसह माझे सर्व वीरपुत्र तो घेतील.”

माझं ऐकूनही तो शांतपणे म्हणाला, “कृष्णे, प्रथम माझं सर्व शांतपणे ऐकून घे. माझ्या शिष्टाईच्या सद्हेतूला सुयश येईलच असं नाही. माणसानं नेहमीच प्रयत्नशील असावं, त्याचा परिणाम म्हणून अमुकच यश पाहिजे, असा हट्ट कधीही धरू नये. अपयशाचीही मनोमनी मूक सिद्धता ठेवावी! माझ्या या शिष्टाईच्या यत्नाला यश आलं तर, तर तुम्ही पुनश्च इंद्रप्रस्थाचे अधिकारी व्हाल. नाहीच आलं, तर शमीवरून उतरवलेली मंत्रभारित शस्त्रं एका विराट युद्धासाठी तुझ्या पतींना तयार ठेवावी

लागतील. युधिष्ठिर खेळला ते द्यूत प्रकट होतं – माझंसुद्धा हे द्यूतच आहे – अप्रकट. जगन्मान्य युद्ध द्यूत!" तो गंभीर का झाला होता, याच्या खुणा आता प्रकट होऊ लागल्या होत्या.

मी त्याच्या बोलण्याच्या, गंभीर होण्याच्या सूचक ढबीवरून ताडलं की, शिष्टाईच्या पलीकडे जाऊन तो कसलातरी विचार करतो आहे. त्यानं कुरूंच्या महाराज धृतराष्ट्राकडे 'मी हस्तिनापूरला येत आहे' असा संदेश आपल्या विश्वासू यादवदूतांकडून पाठविला. आमचे डोळे त्याच्या परतीच्या वाटेकडे लागले. काही दिवसांतच तो परतला. मात्र काहीही परतीचा संदेश आणल्याशिवाय कुरूंचा मंत्री संजय याच्यासह तो परतला. संजय नुसता मंत्री नव्हता. तो कुरूंचा सारथिदलप्रमुख होता. कृष्णाचा तो परमभक्त होता. त्याच्याकडून परतीचा संदेश पाठविण्यात कुरूंचा राजकीय डावपेच होता. पांडवांना इंद्रप्रस्थाचं राज्य मिळणार नाही, असं स्पष्ट न म्हणता दुर्योधन-शकुनींनी महाराज धृतराष्ट्रांना पुढे करून, ऐकतच राहावा असा मानभावी संदेश धाडला होता.

तो होता – "पांडव युद्ध करू म्हणत असतील, तर त्यांनी हे ध्यानी घ्यावं की, युद्धानं कधी कुणाचं काय भलं झालं आहे? युद्धात असंख्यात वीर योद्धे व सैनिक मारले जातात. राज्याचा विनाश होतो. युधिष्ठिरासारख्या तत्वचिंतक व स्थिरचित्त पुरुषानं विचार करावा की, असं आप्तगणांचा नाश करणारं युद्ध खेळण्यापेक्षा कुरुक्षेत्रासारख्या पवित्र स्थानावर धार्मिक यात्रेकरूंकडून मिळणाऱ्या भिक्षात्रावर आयुष्य व्यतीत करणं श्रेयस्कर नाही काय? 'धर्मराज' हे आपलं नाव स्मरून त्यानं व त्याच्या बंधूंनी शोभेल असं धर्माप्रमाणे वागावं. युद्धाच्या भानगडीत पडू नये!"

मंत्री म्हणून संजयानं सेवकाच्या निष्ठेनं आणला तसा संदेश एका बैठकीत आम्हा सर्वांच्या कानी घातला. तो ऐकून मी तर सुत्रच झाले. कौरव पांडवांना चक्क भिक्षाच मागायला सांगत होते. पांडवांत खळबळ माजली. एकटा कृष्ण काय तो शांत होता. आपल्या आसनावरून उठून संजयाजवळ जात त्यानं आपला उजवा हात त्याच्या खांद्यावर ठेवला. तो क्षणैक थोपटून कृष्ण अपार शांत स्वरात त्याला म्हणाला, "संजया – सख्या, माझा बंधू युधिष्ठिर धर्मराजच आहे. तो नावाप्रमाणे धर्मानंच वागेल आणि तो जसं सांगेल, तसंच त्याचे बंधूही वागतील. त्यांच्यात कधीही अंतर पडणार नाही

"कुरूंच्या महाराज धृतराष्ट्रांना, पितामह भीष्मांना एवढंच सांग की, कृष्ण तुमच्या भेटीस येतो आहे. तुमचं दर्शन व आशीर्वाद घेण्यासाठी!" त्याच्या उत्तरातील सुप्त आशय समजल्यामुळे सखा असलेला संजय क्षणभर त्याचे हात हातात घेऊन त्याच्या काळ्याभोर मत्स्यनेत्रांकडे बघतच राहिला. दुसऱ्याच क्षणी "काय प्रसंग आला माझ्यावर हा!" असं पुटपुटला. आपलं मस्तक कृष्णाच्या नितळ निळ्या पायांवर ठेवत कुरूंच्या त्या मंत्र्यानं अष्टांगी दंडवतच घातला.

"संजया, ऊठ बंधो, असं काय करतोस!" म्हणत कृष्णानं त्याला हलकेच वर उठवून वक्षाला भिडवत आलिंगनात घेतलं.

एक दिवस आमच्या शिबिरात पडाव ठेवून कुरुमंत्री संजय हस्तिनापूरला निघून गेला.

आता महाराज विराटांच्या सहकार्यानं उपप्लाव्यात शिष्टाईसाठी कृष्णाच्या हस्तिनापूर प्रवासाची तयारी सुरू झाली. त्याच्यासोबत सात्यकी आणि निवडक

यादवयोद्धे होते. रथाचं सारथ्य नेहमीसारखं दारुकच करणार होता. महाराज विराटांनी स्वत: लक्ष घालून त्याचा भव्य गरुडध्वज रथ सुशोभित करून घेतला. रथाच्या ध्वजदंडावरही उड्डाणाच्या पावित्र्यात असलेली, पंख फुलविलेली सुवर्णी गरुडध्वजा वाऱ्याला थपडा देऊ लागली.

गरुडध्वज रथामागे दहाएक सुसज्ज सालंकृत रथांची रांग होती. त्यामागे सुसज्ज अश्वसाद आणि पदाती यांच्या रांगा होत्या. महाराज विराट आणि माझे पाच पती यांच्यासह कृष्ण आमच्या भव्य शिबिरातून बाहेर पडला. मीही बरोबर होतेच. सेविकेनं समोर धरलेल्या तबकातील शिजल्या ओदनाच्या मुठी मी गरुडध्वजाच्या चारही अश्वांवरून कृष्णसख्यावरून ओवाळून दूर फेकून दिल्या. आम्हा पांडवांच्या भवितव्याशी निगडित महत्त्वाच्या कार्यावर जाणाऱ्या माझ्या प्रिय सख्याला उद्देशून मी मनोमनच म्हणाले, "आमचा तारक, द्वारकेचा राणा – अश्वांनो, आता तुमच्या स्वाधीन आहे, त्याला सुखरूप वाहून न्या आणि सुवार्ता घेऊनच सारे परता." मी तबकातील तेवत्या निरांजनांनी सात्यकी आणि कृष्णाचं औक्षण केलं. कृष्णाच्या दीर्घ मत्सयनेत्रांना पाण्याची उलटी बोटं लावताना मी त्या काळ्याशार डोळ्यांत खोलवर डोकवून पाहिलं. ते महासागरासारखे नेत्र नितांत-नितांत शांत होते. त्यांचा अंत म्हणून काही लागत नव्हता. प्रथम सात्यकी रथाच्या घेरात चढला. दारुकानं केव्हाच रथनीड पकडून हातचा सुवर्णकाठी केशरी प्रतोद पेलला होता. मागच्या रथातील निवडक योद्धे आपापल्या रथांत चढून स्थानापन्न झाले होते. अश्वसादांनी भाले पेलत घोड्यांच्या पाठीवर मांडा जमविल्या होत्या. पदातींनी हातची धारदार तळपती खड्गं पेलून धरली होती.

पुढे होत महाराज विराटांनी कृष्णाला हातनिर्देश करताच चपळाईने एका झेपेतच तो रथारूढ झाला. पाठीमागच्या रथरांगेत अश्वसाद, पदातींवर त्यानं क्षणैक गरुडदृष्टी टाकली. महाराज विराट व रांगेनं उभ्या असलेल्या माझ्या पाचही पतींकडे त्यानं क्रमश: बघितलं. रथालगतच उभ्या असलेल्या माझ्या डोळ्यांत खोलवर बघताना तो जसं काही म्हणालाच, 'कृष्णेऽ! कसलीही चिंता करू नकोस. सर्व ठीकच होईल. तू इंद्रप्रस्थाच्या सिंहासनावर पुन्हा पांडवांची महाराणी म्हणून बसशील.' शेल्यात आवळलेला पांचजन्य सोडवून घेऊन त्यानं तो प्राणपणानं फुंकला. उजवा हात उंच उभवून दारुकाला हस्तिनापूरच्या दिशेनं प्रस्थानाचा संकेत केला.

कृष्ण उपप्लाव्याहून हस्तिनापूरला निघून गेला. तो कार्तिक मास होता. रेवती नक्षत्रावरील प्रात:कालची 'मैत्र' मुहूर्ताची वेळ होती ती! मग त्याच्या प्रवासात विराटांनी पेरलेल्या हस्तिनातपर्यंतच्या गुप्तचरांच्या वार्ताच काय त्या येत राहिल्या.

कृष्णाची शिष्टाई सफल झाली नाही! पांडवांना इंद्रप्रस्थाचं राज्यच काय त्यानं मागितलेली अविस्थल, वृकस्थल, माकंद, वारणावती आणि शालिभवन अशी पाच ग्रामंसुद्धा पांडवांना परत द्यायला दुर्योधन तयार झाला नाही. एवढंच काय, "भुईला सुईनं टोचलं, तर तिच्या अग्रावर थरथरत उभा राहणारा धुळीचा नगण्य कणही पांडवांना युद्धाशिवाय मुळीच मिळणार नाही!" असं उर्मट उलट उत्तर त्यानं पुन्हा त्याच ज्येष्ठांसमोर दिलं.

या सर्वांहून अधिक माझ्या वर्मी घाव बसला, तो त्याच्या एका अविचारी भकण्याचा. तो भरल्या कुरू राजसभेत कितीतरी अवमानास्पदरीत्या कृष्णाला निकालात काढत म्हणाला, "इतकंच नाही, तर तुझ्या प्रस्तावाला दिलेल्या नकाराची लक्तरं पांघरून

परतणाऱ्या तुझ्या तळपायाला चिकटलेले कुरूंच्या पावनभूमीचे धुलिकणही मी सेवकाकडून निपटून घेतले असते! पण – पण – त्या निमित्तानंही तुझ्या अहोरात्री गायींच्या मलमूत्रानं बरबटलेल्या पायांना – गवळटा, माझ्या साध्या सेवकानंही हातसुद्धा लावू नये, अशीच माझी इच्छा आहे!! या सभागृहातून मुकाट चालता हो, नाहीतर दोरखंडांनी अवळून तुला बंदिवानच करून टाकेन कारागारात, गोकुळाच्या माजलेल्या सांडा!!”

ते ऐकून यादवसेनापती सात्यकी न राहवून त्याच्याच सभागृहात खड्ग उगारून त्याच्या अंगावर धावूनही गेला होता. कृष्णानंच त्याला हातसंकेतानं सावरलं.

तो अशोभनीय वृत्तान्त ऐकतानाही माझ्या अंगावर संतापाचा काटा सरकला होता. हस्तिनापुराहून आल्यानंतरचा कृष्ण हा पूर्वीचा राहिलाच नाही. त्याच्या मुखमंडलावर सहज उमलणारं ते खटचाळ, खोडकर, मोहक खळीदार हास्य कुठच्या कुठे यमुनापार गेलं होतं. तो आता कमीतकमी बोलत होता. तो अधिकात अधिक विचारात जात होता. माझ्या जीवनातील स्वयंवर व त्यानंतर पेटलेलं युद्ध, कुरूंच्या द्यूतसभागृहात झालेली क्रूर विटंबना, त्यानंतर नशिबी आलेला बारा वर्षांचा वनवास, सत्त्वपरीक्षा घेणारा अज्ञातवास, या दोन्ही कालखंडांतील जयद्रथ-कीचकांनी घातलेले माझ्या शीलावरचे घाले, या सर्वांहून माझी घनघोर परीक्षा बघणारा ठरला, तो हा – नंतरचा; त्याच्या असह्य मौनाचा काळ.

कृष्णशिष्टाई अयशस्वी झाल्यानंतर आम्हा सर्वांच्या वतीनं कृष्णानंच निर्णय घेतला – निर्णायक युद्धाचा! हे युद्ध मात्र आता केवळ कौरव-पांडवांचं राहिलं नाही. ते झालं संपूर्ण आर्यावर्ताचं! अन्यायाविरुद्धच्या न्यायाचं! दमनाविरुद्धच्या दया-क्षमेचं! असुरी विरुद्ध मानवी शक्तीचं असत्याविरुद्ध सत्याचं!

हस्तिनापुराहून आलेला कृष्ण आम्हा पांडवांना ‘युद्धाच्या तयारीला लागा’ असं निक्षून सांगून लगेच द्वारकेला निघून गेला. स्वत: यादवांच्या सेनेला युद्धासाठी सिद्ध करण्याच्या तयारीला लागला. हस्तिनापूरच्या सीमा त्यानं पार केल्या तेव्हाच एक गरगरतं वादळ त्याच्या पावलांबरोबर तो जाईल तिकडे आता फिरू लागलं. ते वादळ होतं महायुद्धाचं! द्वारकेतील चतुरंग सेनेला त्यानं तयारीचे आदेश दिले. हस्तिनापुरातही कुरूंनी युद्धासाठी कमरा कसल्या.

या काळात उपप्लाव्यात राहून मी विचार करू लागले, ती आमच्या पांडव कुटुंबाच्या झालेल्या वाताहातीची! मी पतींसह उपप्लाव्यात. राजमाता हस्तिनापुरात. सुभद्रा आपला नवविवाहित पुत्र व सुनेसह द्वारकेत. माझे पुत्र मामा धृष्टद्युम्नासह कांपिल्यनगरात अशी ही स्थिती होती. आम्ही एकमेकांना काही संदेश पाठवायचे म्हटलं, तरीसुद्धा ते एकेक मासानंतर मिळाले असते. कृष्णाचा ‘युद्ध’ हा अटळ निर्णय ठरल्यानंतर, माझे पाचही पती पूर्वी दिग्विजयाला गेले होते, तसे सैन्य-साहाय्यासाठी दशदिशांना पांगले. त्यांच्याही वार्तांची वाट बघणं, हेच माझ्या हाती उरलं. उपप्लाव्याला महाराज विराट मला काहीही कमी पडू देत नव्हते. संपूर्ण आयुष्यात हे असं जीव पिळवटणारं एकाकीपण मी प्रथमच अनुभवत होते.

मत्स्यांच्या पलीकडेच इंद्रप्रस्थाची सीमा होती. आता तर इंद्रप्रस्थ दुर्योधन-शकुनी अशा कौरवांच्या आधिपत्याखाली होतं, आम्ही पांडव मत्स्यांच्या उपप्लाव्यात

आहोत, ही वार्ता हस्तिनापूरला केव्हाच पोहोचली होती. कौरवांची सशस्त्र सेनापथकं त्यामुळे उपप्लाव्याच्या आवतीभोवती घिरट्या घालू लागली. या एवढ्या भयंकर व एकाकी स्थितीतही मला भीती कशी ती वाटतच नव्हती. त्याचं. कारण होतं, कृष्णाचं स्मरण.

जवळ-जवळ मासानंतर एकेक करीत माझे पांगापांग झालेले पती उपप्लाव्याला परतू लागले. प्रथम आला, तो युधिष्ठिर. आर्यावर्ताच्या मध्यदेशातील कितीतरी नरेशांना भेटून तो परतला होता. नंतर परतला अर्जुन! पूर्वदेशातील मगध, कामरूप, कलिंग, वंग, त्रिपुरा, किरात अशा देशांतील, नरेशांना भेटून तो परतला होता. नंतर भीमसेन उपप्लाव्यात परतला. तो पश्चिमदेशातील पंचनद, सिंधु-सौवीर असा थेट कांबोज, गांधार, बाल्हीक अशा गणराज्यांपर्यंत जाऊन आला. नकुल-सहदेवांनी मध्यदेशातील चेदी, अवंती, भोजपूर अशी गणराज्य धरून दक्षिणेकडील थेट अश्मक, पद्मावत, क्रौंचपूर, आंध्र, चोल पांड्य असा मलय पर्वतापर्यंतचा संपूर्ण दक्षिण देश पालथा घातला. तेही परतले.

आता देशोदेशींचे नरेश, अमात्य, सेनापती, राजदूत यांची उपप्लाव्याला एकदम वर्दळ वाढली.

जसे माझे पती आणि श्रीकृष्णानं सैन्य-साहाय्यासाठी हालचाली केल्या होत्या, तशाच हस्तिनापुराहून दुर्योधन-शकुनी यांनीही केल्या होत्या. दुर्योधनाचे तर दहा-दहा बंधू शकुनीच्या दहा बंधूंपैकी एकाला सोबत घेऊन आर्यावर्ताच्या दशदिशांना केव्हाच सुटले होते. कुरूंच्या प्राचीन आप्तसंबंधांना चुचकारण्यासाठी स्वत: दुर्योधन मामा शकुनीसह पंचनद, गांधार, वाहीक, कांबोज अशा गणराज्यांतील नरेशांना भरगच्च उपहारतबकं देऊन भेटून आला होता.

आर्यावर्तातील सर्व जनपदांनी या युद्धात रस दाखविल्यामुळे त्याची व्याप्ती कितीतरी वाढली. ते आता युद्ध राहिलं नाही. नकळतच महायुद्ध झालं. त्याची चक्रं आर्यावर्ताच्या चारही दिशांतील गणराज्यांत गरगरत फिरू लागली. वार्ता येऊ लागल्या की, काही राज्यांची सेनापथकं हस्तिनापूरच्या वाटेला लागली आहेत. आम्हा पांडवांसाठी धक्का देणारी एक वार्ता उपप्लाव्यात येऊन थडकली. हस्तिनापुराहून मामा शकुनीसह निवडक कुरुयोद्ध्यांना घेऊन दुर्योधन प्रत्यक्ष द्वारकेकडे निघाला आहे. युद्धात यादवांचं आपल्यालाच सहकार्य मिळावं, म्हणून तो शिष्य या नात्यानं आपले गुरू युवराज बलरामदादा यांना भेटणार आहे. नंतर तो कृष्णाची भेट घेऊन, त्याला आपला व्याहीसंबंध पुढे करून सहकार्यासाठी आवाहन करणार आहे.

ती वार्ता बारकाव्यांसह ऐकताच आम्हा पांडवांचं तर धाबंच दणाणलं. आम्ही बलरामदादा-कृष्णासह संपूर्ण द्वारका आमच्या पाठबळात आहे, हे गृहीत धरून चाललो होतो. आमची या विषयातील निर्णयासाठी तातडीची बैठक बसली. बैठकीत युधिष्ठिराचं एकच म्हणणं पडलं – पांडवांच्या वतीनं तातडीनं अर्जुनानं द्वारका गाठावी. कृष्णाशी व्यक्तिगत असलेले त्याचे स्नेसंबंध पणाला लावावेत. काहीही करून यादवांचं प्रचंड सामर्थ्य दुर्योधनाच्या पाठिंब्यात जाणार नाही, आम्हालाच मिळेल, याची प्राणपणानं दक्षता घ्यावी.

अर्जुन तर 'दुर्योधन कृष्णाला भेटणार' या वार्तेनंच सुत्र-किंकर्तव्य झाला होता. केवळ हो ला हो, ना ला ना करीत होता. बैठकीत तो फारसं बोलतच नव्हता. मला त्याचं

मूढपण बैठकीच्या शेवटी-शेवटी असह्यच झालं. निर्णय घेऊन बैठक उठण्यापूर्वी मी त्याला पांडवांची महाराणी म्हणून माझं व्यक्तिगत ठाम मत सांगितलं. त्याच्याकडे एकटक रोखून बघत म्हणाले, "धनुर्धर धनंजया, इतर सर्व जग आणि त्याचा पाठिंबा गमावलास तरी चालेल; पण कृष्णाचा पाठिंबा कधीच चुकवू नकोस! त्याला कशासाठीही आम्हा पांडवांपासून दूर जाऊ देऊ नकोस. त्याचा निर्विवाद आशीर्वाद घेतल्याशिवाय द्वारकेहून परतूच नकोस!"

इतका वेळ किंकर्तव्य वाटणाऱ्या, घोटाळलेल्या अर्जुनाची चर्या आता उजळून निघाली. अगदी थेट कृष्णाच्याच ढंगात तो म्हणाला, "कृष्णे, चिंता करू नकोस. तू म्हणतेस तसंच होईल."

एका जीवनसत्याचा मी आजवर अनुभव घेतला होता. ते सत्य होतं, भविष्याचा वेध घेत मनोमन योजावं एक आणि घडावं भलतंच. तेही माझी व माझ्या पतींची सत्त्वपरीक्षा बघणारं!

अर्जुन द्वारकेहून परतला तोच चमत्कारिक वास्तव बरोबर घेऊन!

अर्जुन-दुर्योधन एकाच प्रभातकाली कृष्णाला त्याच्या विश्रामकक्षात भेटले होते. कृष्ण एका शिसमी मंचकावर सुखनिद्रेत होता. त्याचा निद्राभंग होऊ नये म्हणून कक्षात प्रथम गेलेला दुर्योधन त्याच्या उशाशी एका बैठकीवर बसला. नंतर गेलेला अर्जुन, कक्षात दुर्योधनाला बघून चपापला. तो परतण्याच्याच बेतात होता की, त्याला नेमके माझे शब्द आठवले 'कृष्णाचा आशीर्वाद घेतल्याशिवाय परतूच नकोस.' तसं काहीतरी पक्कं ठरवून तो कक्षात प्रवेशला. कृष्णाच्या पायाशी अलगदपणे मंचकावर बसला. निद्राधीन कृष्णसख्याकडे बघत असताना आपण कशासाठी द्वारकेत आलोत, हेही तो विसरला. स्वत:ला हरवून त्याच्या निद्राधीन मुद्रेकडे एकटक बघतच राहिला. त्याचा निद्राभंग होणार नाही, याची दक्षता घेत आपल्या धनुर्धर हातांनी अलवारपणे त्याचे चरण चुरण्याचा योग साधू लागला. त्याच्या पायाचा पहिला स्पर्श होताच गुडाकेश अर्जुनानं पटकन जाणलं की, तो निद्रिस्त नाही! डोळे मिटून नुसताच पहुडला आहे. इतका वेळ तो निद्रेत कसा? या आलेल्या शंकेचं निरसन झाल्यामुळे एक सूक्ष्म हास्याची लकेरही अर्जुनाच्या चर्येवर तरळून गेली.

काही वेळानं कृष्ण 'जागा' झाला! त्याचे विशाल मत्स्यनेत्र उघडले. समोरच पायाशी बसलेल्या अर्जुनाला बघताच तो मंद-मंद हसला. म्हणाला "तू केव्हा आलास पार्था?" इतक्यात "प्रणाम द्वारकाधीश, आपल्याच भेटीस आलोय मी. सर्व क्षेमकुशल?" असं मध्येच हसून म्हणत दुर्योधनानं त्याचं लक्ष आपल्याकडे वेधून घेतलं.

कृष्ण निद्रेतून जागा झाल्यासारखा आळोखेपिळोखे देत उठून मंचकावर बसला. तसं अर्जुनाला बोलण्याची संधीच न देता दुर्योधन म्हणाला, "द्वारकाधीश, आपल्या विश्रामकक्षात मी प्रथम आलो आहे. कुरूंच्या सभेत मी अज्ञानानं आपणाला गवळट म्हणालो, त्याची क्षमा मागायला! ती उदार हृदयानं करून माझं म्हणणं प्रथम ऐकावं."

दुर्योधनाचा शब्दन्शब्द ढोंगी राजकारणानं कसा तुडुंब भरलेला होता. तो जाणून अर्जुनाला डोळे मिचकावीत कृष्ण त्याला हसून म्हणाला, "कुरूंच्या युवराजा, हस्तिनापुरचं सभागृह सोडताना केव्हाच मी तुला क्षमा केली आहे! तरीही आज मी सुप्रभाती पहिल्यानं पाहिलं आहे, ते या पांडवांच्या धनंजयाला. शिवाय तो तुझ्यापेक्षा वयानं कनिष्ठ आहे. यासाठी मला त्याचं प्रथम ऐकून घेतलं पाहिजे. बोल अर्जुना, का

येणं केलंस?” कृष्णानं दुर्योधनाला कुरकुरण्याची संधीच न ठेवता बोलणं एकांगी करून टाकलं.

एव्हाना मंचकावरून उठून उभा राहिलेला अर्जुन कृष्णासमोर नम्रपणे दोन्ही हात जोडून कटीत वाकून म्हणाला, “तुझ्या सखी द्रौपदीनं तुला प्रेमभावानं नमस्कार सांगितला आहे. आम्हा सर्व पांडवांचा तो तुझ्या चरणांशी सदैव आहेच. तुझ्या कुंतीआत्येनं तुला आशीर्वाद सांगितले आहेत. हृषिकेशा, तुझ्या इच्छेप्रमाणे कौरव-पांडवांचं युद्ध आता अटळ आहे. तुझ्या आशीर्वादानंच आमचं इंद्रप्रस्थाचं राज्य उभं राहिल. तू बलरामदादा, उद्धवदेव, वसुदेवमहाराज व राजमाता यांसह सर्व ज्येष्ठ यादवांचे आशीर्वाद या युद्धात आम्हा पांडवांच्या पाठीशी असावेत. ते घेण्यासाठीच मी आलो आहे.”

कृष्ण हसला. त्याच्या विशेष लयीत म्हणाला, “अर्जुना, तुला आणि पांडवांना मी माझे एकट्याचे आशीर्वादच काय ते देऊ शकतो. कालच आमच्या सुधर्मा राजसभेत तुम्हा कौरव-पांडवांच्या प्रश्नावरूनच माझं नि दादाचं तुंबळ भांडण झालं आहे. त्याचं म्हणणं आहे, सर्व चतुरंग यादवसेनेसह त्याच्या व माझ्यासह सर्व ज्येष्ठ यादवयोद्ध्यांनी या समरांगणात कौरवश्रेष्ठ धृतराष्ट्रांच्या पाठिंब्यात उतरावं, नाहीतर तटस्थ राहावं. या युवराज दुर्योधनानं तत्परतेनं त्याची भेट घेऊन त्याचं मन तसं वळवलं आहे. मी सुधर्मा सभेला सांगितलं, ‘कौरव- पांडवांच्या युद्धात ज्येष्ठ योद्ध्यांनी कुणाच्या पक्षात जावं, हे त्यांच्या इच्छेवर सोडावं, युवराज बलरामदादाच्या आदेशानं यादवसेना कुठे जायचं ते ठरेल. मी मात्र या युद्धात हाती शस्त्र घेऊन मुळीच उतरणार नाही. आवश्यकता पडली, तर मी या युद्धात योद्ध्यांना शस्त्रं पुरवणं, घायाळांची सेवा करणं, फार तर कुणाचंतरी सारथ्य करणं, एवढंच काय ते करू शकेन.’

“पांडवांचा प्रतिनिधी म्हणून आलेल्या प्रिय सख्या अर्जुना, अग्रक्रम म्हणून प्रथम तू मला निःसंदिग्धपणे व स्पष्टपणे सांग, तुला कोण हवंय? निःशस्त्र, सुखदुःखाच्या – युक्तीच्या चार गोष्टी सांगणारा मी की यादवांची चतुरंगदल सेना? काय पाहिजे तुला – मी की यादवसेना? ती हवी असेल, तर याच पावली तुला बलरामदादांना भेटावं लागेल. दादाचं तर स्पष्ट मत आहे की, आपण कुणाकडूनही युद्धात भागच घेऊ नये.”

मागचा पुढचा कसलाही विचार न करता, मनात कस्पटाएवढाही किंतु न ठेवता माझा अर्जुन पटकन वाकला. कृष्णाच्या पांघरुणाआडच्या न दिसणाऱ्या चरणांवर आपलं मस्तक टेकवीत नम्रपणे म्हणाला, “कुठल्याही स्थितीत मला केवळ तुझे नि तुझेच आशीर्वाद पाहिजेत अच्युता!”

“तथाऽस्तु!” त्याच्या मस्तकीच्या किरीटावर हात ठेवत कृष्ण हसत म्हणाला. लागलीच दुर्योधनाकडे बघत तो युधिष्ठिराच्या ढबीत म्हणाला, “सुयोधना, तुला आता यादवसेना स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही. काय आहे तुशा निर्णय?”

दुर्योधनही ढोंगी नम्रपणे किंचित वाकून, हात जोडून अंतरंगाल्या आनंदाच्या उकळ्या लपवीत म्हणाला “जशी यादवश्रेष्ठांची इच्छा! कौरव यादवांची सशस्त्र सेना स्वीकारायला तयार आहेत. तशी संमती बलरामदादांकडून मी कालच घेतली आहे. ती बदलण्याचं सामर्थ्य द्वारकाधीशांच्या वाणीत आहे, हे मी जाणतो. म्हणून आपलीही संमती घेण्यासाठी आलो. ती दिलीत – भरून पावलो. एकच नम्र विनंती आहे.”

आपल्या वाणीचा प्रत्यक्ष दुर्योधनाच्या मुखातून गौरव ऐकताना कृष्ण सूचक हसला. त्याची विनंती काय असणार हे ताडून म्हणाला, "कौरवा, घाबरू नकोस. मी हाती शस्त्र धरणार नाही. माझी प्रतिज्ञाच आहे ही! घेईन तो अश्वांना हाकारणारा केवळ प्रतोद. ते लक्षात घेता, मी कौरव-पांडवांच्या या युद्धात असून-नसून सारखाच आहे!"

कितीही केलं तरी तो दुर्योधन होता. द्वारकेच्या कृष्णाला चांगला जाणून होता तो म्हणाला, "शस्त्राबद्दल नाही म्हणत मी, म्हणतोय मौनाविषयी!"

तसं आता मात्र उठून दुर्योधनाचे खांदे थोपटत माझा कृष्ण म्हणाला, "सारथ्यानंसुद्धा मौन राखावं, ही तुझी अपेक्षा चमत्कारिकच आहे सुयोधना. तुम्ही तुमचा सैनिकांना चेतावणी देण्यासाठी हवा तसा आरडाओरडा करणार आणि सारथ्यानं आपल्या आश्वांनाही चेतावणी देण्यासाठी ब्रसुद्धा न काढता मौन धरावं, हा अन्यायच नाही काय? तुझ्याकडे मी कधीच न्याय मागितला नाही. आज मागतो आहे. मला अश्राप जिवांना चेतावणी देण्यासाठी मनसोक्त बोलू दे! मौनाची अट घालू नकोस, सुयोधना."

"तथाऽस्तु! ठीक आहे."आपण कृष्णापेक्षा वडीलधारे आहोत, याचा आधार व भान घेत दुर्योधनानं आपला उजवा हात आशीर्वादासारखा उठवला!!

कृष्ण हसला. त्याचं ते तसलं हास्य अर्जुनानं यापूर्वी कधीच बघितलं नव्हतं. पाठमोरा झाल्यामुळे दुर्योधनाला काही ते बघायला मिळालंच नाही.

घडल्या घटनांनी एक विचित्र सत्य मात्र या काळात साकारलं होतं. यादव कौरवांच्या पक्षाकडून युद्धात उतरावेत म्हणून तंडलेले बलरामदादा, कृष्णाचा पूर्ण निर्णय ऐकून, तो न पटून, सर्वांना त्यागून चक्क हिमालयाकडे निघून गेले होते! पाठोपाठ युद्ध मान्यच नसलेले उद्धवदेवही तिकडेच कुठेतरी निघून गेले होते. उद्धवदेव जाण्यापूर्वी प्रिय बंधू कृष्णाला भेटूनच गेले होते. बलरामदादा मात्र भेटले नाहीत. त्यांच्या स्वभावधर्माला धरूनच ते होतं.

भीमसेनानं कृष्णानं धाडलेल्या गर्गमुनी, मय, विश्वकर्मा, त्वष्ट्ट, कमलाक्ष व विद्युन्माली यांच्या सहकार्यानं कुरुक्षेत्रावर दृषद्वतीच्या पांडवांच्या शिबिराचं संकुल उठवलं होतं.त्यात पांडवांच्या स्त्रियांसाठीही स्वतंत्र अशी शिबिरं होती. प्रमुख योद्धयांच्या स्त्रीयांसाठीही होती. त्रिशूल, तोमर, शर-चाप, चक्र अशा शस्त्रांसाठी बंदिस्त वेगळी भांडारं होती. महाराज विराटांनी चेदी, मद्र, मणिपूर, गिरिव्रज अशा सर्व ठिकाणी विशेष दूत पाठवून विखुरलेल्या पांडवस्त्रिया उपप्लाव्यात एकवटल्या. छोटंसं ग्राम असलेल्या उपप्लाव्याचं रूपांतर आता राजनगरासारखं झालं होतं. महाराज विराट पांडवांसाठी या नगरात येणाऱ्या कोणत्याही स्त्री- पुरुषाला, काहीही कमी पडू देत नव्हते. ते नावाप्रमाणेच देहानं सशक्त होते. आता आम्हा पांडवांसाठी मनानंही विराट झाले.

द्वारकेच्या यादवसेना कुरुक्षेत्राचा वाटेला लागल्याच्या वार्ता आल्या. हस्तिनापुरचं चतुरंगसेनादल तर केव्हाच कुरुक्षेत्रावर पोहोचलं होतं.कौरवांची सेना महापुरात तट फोडून क्षणाक्षणानं वाढणाऱ्या गंगेसारखी फुगत चालली होती आणि द्वारकेहून शेवटचा आदेश आला, "सर्व योद्धयांनी आणि स्त्री-मंडलानं आता उपप्लाव्य सोडावं. कुरुक्षेत्र गाठावं. दृषद्वतीचा काठ धरून उठलेल्या पांडव सेनेच्या शिबिरसंकुलाकडे प्रस्थान ठेवावं."

कृष्णाच्या आदेशाप्रमाणे सुभद्रा आणि गर्भवती उत्तरेसह मी माझ्या

सवतीमंडळातून कुरुक्षेत्रावरच्या दृषद्वतीकाठच्या आम्हा पांडवांच्या शिबिरात आले. प्रमुख पांडवयोद्ध्यांच्या स्त्रियाही आम्हांसमवेत होत्या. नकळतच या सर्व स्त्रीमंडलाचं हवं-नको ते बघण्याचं नेतृत्व माझ्याकडेच आलं.

कांपिल्यनगराहून माझा धृष्टदादा, शिखंडी आणि इतर सर्व बंधूंसह सशस्त्र पांचालसेना घेऊन आला. तो आला आणि कुरुक्षेत्र कसं गजबजून उठलं, आम्हा पांडवांच्या सैनिकशिबिरांत मग दररोज भर पडत चालली. केकेयराज बृहत्क्षत्र आपल्या सेनेसह आला. काशिराज सुबाहू शैव्यासह आला. त्याचं रथदलच तीस हजार रथांचं होते.चेदींच्या शुक्तिमतीहून शिशुपालाचा पुत्र धृष्टकेतू आपला पुत्र वीतहोत्र याला घेऊन एक अक्षौहिणी सेनेसह आला. माझा सखा कृष्ण यानंच त्याला चेदींचा नेता म्हणून शिशुपालानंतर नियुक्त केलं होतं. आपल्या सेनेसह वत्स आले. विशेष म्हणजे द्वारकेहून सेनापती सात्यकी आपल्या सैन्यासह आमच्या पांडव शिबिरात आला. त्यानं बलरामदादा, अनाधृष्टी कृतवर्मन् यांचे कौरवपक्षात येण्याचे आवाहन व आदेश घुडकावून लावले होते. 'जिकडे कृष्ण तिकडे मी', म्हणत तो आमच्या शिबिरात आला होता. यादवांचा दुसरा शूर योद्धा कृतवर्मन् मात्र कौरवांकडे जाणार होता. या दोघांच्याही पाठीशी मात्र यादवांच सर्वच सैन्य काही नव्हतं. त्या सैन्यातील काही दलप्रमुखांनी बलरामदादांच्या इच्छेनुसार या युद्धात तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला होता. ते द्वारकेतच थांबले होते. आमची पांडवसेना आता सात अक्षौहिणी एवढी झाली होती. रोज आम्हा स्त्रीमंडळाच्या शिबिरांत येऊन धृष्टदादा मला आणि राजमातेला दिवसभरात घडलेल्या घटनांचा, सैन्याच्या प्रगतीचा वृत्तान्त द्यायला चुकत नव्हता.

आता मी माझे चार पती, धृष्टदादा, विराटमहाराज, सात्यकी, धृष्टकेतू असे सर्वच जण वाट बघत होतो ती एकटयाची – कृष्णाची! तो आम्हा सर्वांचाच तर सारथी होता. अर्जुन त्याला भेटण्यासाठी द्वारकेलाच गेला होता.

मार्गशीर्ष मासाचा शुक्ल पक्ष सरतीला आला. शरदातलं तेरा योजन घेराच्या धर्मक्षेत्र कुरुक्षेत्राला घेरणारं दाट धुकं विरत चाललं. आमच्या विरुद्ध दिशेला उठलेल्या कौरवसेनेच्या संकुलात एव्हाना चांगलं अकरा अक्षौहिणी सैन्य एकवटलं होतं. म्हणजे आमच्या पांडवसेनेपेक्षा ते दीडपट मोठं होतं.या सेनेत यवन, शक, गबल, बर्बर, किरात, किरात, केकेय, वातधान अशांचा समावेश होता. शकुनीच्या गांधार देशाचं घातकी युद्धात प्रवीण सेनादल आलं होतं. कपिश, कांबोज, वाहीक आणि गांधार असा पश्चिमेकडच्या यवन, शक कुलांचा एक विशाल गट होता. ते सर्वच्या सर्व कौरवांच्या पाठिंब्यात कुरुक्षेत्रावर उतरले होते. ही किमया शकुनीची होती. आम्हा पांडवांचा मामा शल्य मद्रदेशीच्या शाकल नगराहून पुत्र ऋतायनासह आमच्या पक्षात येण्यासाठी निघाला होता, पण त्याला मध्येच गाठून दुर्योधनानं प्रचंड उपहार देऊन कौरवांकडे वळविलं होतं. अश्मक देशीचा अश्मकेश्वर कौरव शिबिरात उपस्थित झाला होता. कौरवांची कितीतरी विराट सेना त्यांनाच मोजमाप ठेवता येणार नाही, अशी अकरा अक्षौहिणींवर गेली होती.

पराक्रमोत्सुक जवळ-जवळ चाळीस लाख योद्ध्यांनी दाटलेल्या धर्मक्षेत्र कुरुक्षेत्रावर सगळ्यांत शेवटी आला, तो दारुकानं आणलेला कृष्णाचा रथ गरुडध्वज!! द्वारकेहून येतानाच तो नागेश्वराच्या शिवालयात जायला चुकला नव्हता. अर्जुन व

दारुकासह तेथील शिवपिंडीवर अभिषेक करवून बेलपत्र व शुभ्र फुलं वाहून मिटल्या मात्स्यनेत्री त्यानं मनाच्या सखोल तकवटातून शिवस्तवन केलं होतं —

"शिवाकांत शंभो शशांकार्धमौले,
महेशान शूलिन् जटाजूटधारिन्
त्वमेको जगद्व्यापको विश्वरूप
प्रसीद प्रभो पूर्णरूप!!"

आपल्या बुद्धिबळावर मानवी महायज्ञाचं प्रलयतांडव माजविण्यापूर्वी तो विलयदेवता शिवाशी एकरूप होऊनच आला होता.

तो दिवस होता, मार्गशीर्ष वद्य प्रतिपदेचा. त्या दिवशी दोन्ही पक्षांकडील काळ्याकभिन्न उघडब्याबंब लाकूडतोड्यांनी हाती वीतभर रुंद धारदार पात्याचे परशू घेऊन या महायुद्धाच्या पहिल्या दिवशीच – उद्या वापरल्या जागा-ज्या चार योजन घेराच्या युद्धभूमीवर उभे असलेले आकाशाशी स्पर्धा करणारे विविध वृक्ष तोडून त्यांचे कडेला ढीग रचण्यास प्रारंभ केला. अशोक, अंजन, आम्र, अल्मली, औदुंबर, अश्वत्थ, ताल, तमाल, केंजळ, कदंब, किंशुक, साग, पुन्नाग, खैर, असे कितीतरी वृक्ष कडाडत कोसळू लागले. उद्यापासून सुरू होणाऱ्या महायुद्धाच्या विविध शस्त्रधारी वीर शिरोमणी असेच कोसळणार होते.

कृष्णाचा गरुडध्वज कुरुक्षेत्रात प्रवेशला तोच कौरवांच्या सेनाशिबिराच्या संकुलाकडून! प्रवेशताच तो अनेकांनी ओळखला. आतापर्यंत सर्वांनाच कल्पना येऊन चुकली होती की, तो पांडवांचा पाठीराखा आहे. तरीही त्याचं दुरून का होईना, दर्शन घेण्यासाठी ते विजयोत्सुक योद्धे शिबिरा-शिबिरांच्या दारात दाटले.

तो कुरुक्षेत्रावर आल्याची वार्ता वाऱ्यावर स्वार होऊन माझ्या शिबिरात आली. ती ऐकताच, प्रथम मला काय करावं ते सुचेना. माझा त्याच्यावर खूप रोष होता. एकतर त्यानं बलरामदादा व उद्धवदेवांना द्वारकेबाहेर जाऊ दिलं होतं. आम्ही त्याला संपूर्ण यादवसेनेसह गृहीत धरलं होतं. पण त्याच्याविषयी कुठलंही गृहीत कधीच धरू नये, हे त्यानं सिद्ध केलं होतं.यादवांची सेना फुटली होती. यासाठी सर्व जण त्याच्या भेटीस गेले पण मी काही गेले नाही. सर्वांना भेटून झाल्यावर तोच माझ्या शिबिरात आला. मी कसल्या रोषात आहे, हे त्यानं केव्हाच ताडलं होतं. मला पाठमोरी बघून तो समजावीत म्हणाला, "कृष्णे, तुझा रोष मला समजला. जरा धीर तरी धर. काय होणार आहे, ते-ते नुसतं बघत चल. युद्धातलं यश हे संख्येवर कधीही अवलंबून नसतं. माझ्या सर्व प्रतिज्ञा, तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होणार आहेत. तू अर्जुनाला दिलेला संकेत त्यानं द्वारकेत मला सांगितला. तुम्ही पांडवांनी नि:शस्त्र असूनही मला स्वीकारलंत याचाच मला परमानंद आहे. तुझ्या विश्वासाला मी मुळीच तडा जाऊ देणार नाही. विश्वास ठेव. विजय तुमचाच आहे. तुझी अनुमती असेल तर निघतो मी!"

शेवटचा मात्र त्यानं माझ्या वर्मीच घाव घातला. सर्व अर्थांनी मी त्याच्याहून लहान असतानाही तो माझी अनुमती मागत होता. त्याच्यावर रोष धरणारी किती मूर्ख होते मी! पाठमोरी होते, ती मी गरकन वळले. पुढे होऊन प्रथम त्याची चरणधूली घेतली. वर उठून त्याच्याकडे बघितलं. तो हसत होता. पूर्वी कधीच नव्हती अशी त्याची चर्या मला अपूर्व तेजवंत वाटली. वर्षानुवर्षं स्मरण देणारं महायुद्ध प्रारंभ करण्यापूर्वी तो मला

म्हणाला, “कृष्णे, तुझा रोष कसा काढायचा ते मी चांगलंच जाणतो. तुझा हा नमस्कार तुझी अनुमतीच मानून मी निघतो!” तो वळला आणि निघूनही गेला. मी विचारात पडले, खरोखरच माझा सखा कृष्ण आहे तरी कोण?

शेवटी मार्गशीर्ष वद्य द्वितीयेचा तो ऐतिहासिक दिवस एकदाचा उजाडला. पहाटेच्या ब्राह्मी मुहूर्तापासूनच दोन्हीकडच्या सेनापतींनी व्यूहरचना करून घेतली होती. सेनापतीपदाचा कृष्णाच्या हस्ते अभिषेक झालेला आम्हा पांडवांच्या सेनेचा सेनापती होता, माझ्या बंधू धृष्टद्युम्न! त्याच्या पाठीशी सात अक्षौहिणी संग्रामोत्सुक पांडवसेना उभी होती. कौरवांचे सेनापती होते, पितामह भीष्म. त्यांच्या पाठीशी अकरा अक्षौहिणी कुरुसेना उभी होती. मी दूर माझ्या शिबिरात होते. अर्जुन पत्नी उलूपी, चित्रांगदा, नकुलपत्नी करेणुमती, सहदेवपत्नी विजया व अनेक सेविका माझ्या समवेत होत्या. भानुमती व सुभद्रा यांचं शिबिर वेगळं होतं. त्या शिबिरात अभिमन्यूची गर्भवती पत्नी उत्तराही होती. आम्हाला रणभूमीवरचं काहीसुद्धा दिसू शकत नव्हतं. दूरवर हत्तींचे चीत्कार, घोड्यांचं खिंकाळणं व त्यातच मिसळलेली सैनिकांची कुजबुज असा संमिश्र रणध्वनी काय तो ऐकू येत होता.

धर्मक्षेत्र कुरुक्षेत्राच्या पूर्व क्षितिजावर आकाशमणी सूर्याचं तेजतबक हळूहळू गगनमंडलात वर चढलं. आम्ही जीव एकवटून आमच्या शिबिरातून आता प्रचंड कल्लोळ ऐकू येणार म्हणून कान टवकारले. आम्ही एवढ्या स्त्रिया होतो, पण एकही शब्द काही फुटत नव्हता. प्रत्येकीचं मन केव्हाच रणभूमीवर पोहोचलं होतं. मला सर्वप्रथम ऐकू आली, ती कृष्णसख्याच्या पांचजन्य शंखाची परिचित ललकार. पाठोपाठ धृष्टदादाच्या शंखाची. त्याला प्रत्युत्तर म्हणून पितामह भीष्मांनी शंख फुंकला असावा. मग माझ्या पाचही पतींच्या शंखांचे परिचित ध्वनी ऐकू आले. पाठोपाठ अंगावर रोमांच उभे करणाऱ्या शंखध्वनींचा उसळलेला केवढातरी मोठा संमिश्र ध्वनी कानी पडला. दोन्हीकडील गजदलांतील हत्ती चीत्कारलेले ऐकू आले. घोड्यांचा संमिश्र खिकाळ कानी पडला आणि एकाएकी काय झालं, कुणास ठाऊक! ते सगळे ध्वनी हळूहळू कमी-कमी होत गेले. चिडिचाप झाले. आम्हा सगळ्या जणींना संभ्रमात टाकणारी शांतताच शांतता पसरली. मी तर न राहवून स्त्रीमंडळातून उठून शिबिराच्या दारातच गेले. न दिसणाऱ्या रणभूमीकडे वेड्यासारखी नुसती बघतच राहिले. काय झालं? काहीही कळत नव्हतं. युद्ध थांबलं की काय? तसं झालंच असेल, तर माझ्या प्रतिज्ञांचं काय? मी विमुक्त सोडलेल्या केशसंभाराचं काय? सैरभैर होऊन मी स्वत:शीच पुटपुटत शिबिरात स्त्रीमंडलातील कुणाशीच न बोलता, एकटीच अस्वस्थ-अस्वस्थ फेर घेऊ लागले. माझ्यातील पांडवांची महाराणी शतशरांनी टोचल्यासारखी व्याकूळ, विव्हळ झाली होती. द्यूतसभेत विंटबिली जाताना झाले नव्हते, तेवढी मी नुसत्या कल्पनेनेच लज्जित व व्यथित झाले होते. कुठल्याही कारणासाठी युद्ध झालंच नाही; ते थांबलं तर माझ्या वस्त्राला हात घालणाऱ्या नीचांना, ते नि:स्तब्ध बघणाऱ्या निर्लज्ज लाचारांना शिक्षा झालीच नाही तर - तर पांडवपत्नी महाराणी द्रौपदीची कीर्ती कस्पटासमान होणार! कलंकित होणार! एवढ्या जिव्हाळ्याच्या सख्या बरोबर होत्या, पण माझ्या मन:क्षोभ त्यातील एकीलाही कळणार नव्हता. मला कुणाशीच काहीही बोलावंसं वाटत नव्हतं.

जवळ-जवळ अशा कुरतडणाऱ्या जीवघेण्या शांततेत घटिका गेली आणि एकाएकी

काय झालं कळलं नाही. पुन्हा शेकडो शंखांचे ध्वनी, गज, अश्व, उष्ट्रांचे आवाज वेगवेगळ्या शस्त्रांचा नाद आणि ‘आरूऽढ... आरोऽह... आऽक्रम’ अशा चेतावणीच्या रणआरोळ्या यांच्या एकाच संमिश्र नादानं अवघं धर्मक्षेत्र कुरुक्षेत्र कल्लोळानं कसं कोंदून गेलं.

कौरव-पांडवाच्या ‘न भूतो न भविष्यति’ रोमांचक महायुद्धाला प्रारंभ झाला होता!!

मी सुटकेचा नि:श्वास टाकला. माझ्या मनावरचा हिमालयाएवढा ताण क्षणात कमी झाला. मी पुन्हा माझ्या स्त्रीमंडळाशी नेहमीसारखं बोलू लागले.

आम्हा क्षत्राणींना रणभूमीवर घडणाऱ्या थरारक घटनांचं जीवनभर कधीच विशेष काही वाटलं नाही. आमच्या रक्तातच भिनलेलं असत की, ‘जीवन हाच एक संग्राम आहे.’

मग रोज कानी पडणारे एकाहून एक घडणारे थरारक संग्रामवृत्तान्त आम्ही साऱ्या जणींनी शांत चित्तानं ऐकले. आमच्यातील एखादी स्त्री तिचा आप्तगण संग्रामात कामी आला की, व्याकूळ होई; विकल होई. तशी मी तिला जवळ घेऊन, थोपटून शांत करी. त्या साऱ्या जणीच आता मला महाराणीऐवजी ‘ताई’ म्हणू लागल्या होत्या. सुभद्रा तर कधी नव्हे एवढी मनानं माझ्या जवळ आली होती. तीही अनेकींचं सांत्वन अंत:प्रेरणेनं करू लागली होती.

युद्धाच्या तेराव्या दिवसाची संध्याकाळ आमच्या शिबिरावर उतरली. वृत्तान्त देणाऱ्या दूतानं आजपर्यंत आणलेले सर्व वृत्तान्त युद्धाच्या निर्णयाच्या दृष्टीनं आशादायक होते. अद्याप पांडवांचा कुठलाही महत्त्वाचा योद्धा काही धारातीर्थी पतन पावला नव्हता.

पण आज गुरू द्रोणांनी मांडलेल्या ‘चक्रव्यूह’ सेनेच्या केंद्रस्थानात दुर्योधनपुत्र लक्ष्मण व आमचा अभिमन्यू यांच्यात घनघोर युद्ध झालं. त्यात मूर्च्छित अभिवर गदाप्रहार करून लक्ष्मणानं त्याचा वध केला.

जयद्रथानं ‘कुठाय तुझी गदा?’ म्हणत उन्मत्तपणे मृत अभिच्या निश्चेष्ट देहावर चक्क लत्ताप्रहार केला. अभिचं मस्तक ज्या धरतीच्या कीर्तीसाठी तो धारातीर्थी पडला होता, तिच्यातच रुतलेलं असल्मामुळे तसंच राहिलं! नुसतं धडच काय ते उलटं झालं.

तो वृत्तान्त ऐकताना माझ्या सर्वांगाची कशी लाही-लाही झाली. वक्ष पिटून ‘अभि - माझा अभि’ म्हणून आक्रोशणाऱ्या सुभद्रेचं स्वत:चा शोकावेग आवरत मी सांत्वन करू लागले. इतक्यात सुभद्रेचं सांत्वन करण्यासाठीच प्रत्यक्ष सखा कृष्ण व अर्जुनच आमच्या शिबिरात आले. अर्जुनाची एरवी उन्नत असणारी मान आज पहिल्यांदाच खाली बघून मीही गलबलले. पुन्हा स्वत:ला सावरत पुढे होऊन त्याचे दोन्ही दंड गच्च धरून त्याला गदागदा हलवीत आक्रोशले, “मला जयद्रथाचं मस्तक बघायचं आहे. माझ्या अभिच्या कलेवराला त्या नीचानं लाथ मारली आहे. बोल धनुर्धरा, तू हे करणार की नाही?”

स्वत:ला सावरत शोकमग्न अर्जुन म्हणाला, ‘कृष्णे, चक्रव्यूहातच मी प्रतिज्ञा घेतली आहे. उद्या सूर्यास्तापूर्वी जयद्रथाला वधीन, नाहीतर मीच अग्निकाष्ठ भक्षण करीन. शांत हो.”

माझं व सुभद्रेचं सांत्वन करून कृष्ण व अर्जुन त्यांच्या शिबिरांकडे निघून गेले. पुत्रशोकानं अजूनही हमसणाऱ्या सुभद्रेच्या पाठीवर सांत्वनाचा हात फिरवीत मी म्हणत राहिले, “उगी हो, सावर. शांत हो सुभद्रे.” तिचा एकुलता एक पुत्र तिनं

गमावला होता. तिला काय वाटत असेल, याची मी कल्पनाच करू शकत नव्हते. मला कृष्णानं कधीतरी काढलेले उद्‌गार स्पर्शून गेले, 'याज्ञसेने, युद्ध म्हणजे महायज्ञ! त्यात कुणाकुणाला आणि कसली-कसली समिधा अर्पण करावी लागेल, सांगता येत नाही.' मला काही-काही समजत नव्हतं. हा महायज्ञ आणखी कुणाकुणाच्या नि किती समिधा मागणार होता!!



# अर्जुन

## ५

# अर्जुन

मी अर्जुन! विख्यात पाच पांडव बंधूंमधील एक! अगदी क्वचितच आमची कुंतीमाता माझा निर्देश 'शेंडेफळ' म्हणून करी. या शेंडेफळाविषयी पुढे जाणत्या वयात मला एक जीवनसत्य कळून चुकलं की, निसर्गक्रम म्हणूनच शेंडेफळात अनेक दुर्मीळ गुण एकवटलेले असतात. मी जीवनात दोनच नाती सर्वश्रेष्ठ मानली. पहिलं माझ्या कुंतीमातेचं मी शेंडेफळ हे! आणि त्याहून अधिक श्रीकृष्णाचा मी प्रथम क्रमांकाचा 'सखा' आहे हे! या 'शेंडेफळ' आणि 'सखा' या नात्यांनी मला जीवनात भरभरून दिलं.

मी जीवनात सर्वश्रेष्ठ मानलं, ते एकट्या श्रीकृष्णाला! प्रत्येक माणसाला 'स्व'चा अभिमान असतो. मला याचाच अभिमान होता की, मी माझा 'स्व' श्रीकृष्णाच्या चरणी अर्पण केला आहे.

प्रथम-प्रथम मी त्याला सर्वांप्रमाणे 'श्रीकृष्ण' असंच संबोधित असे. त्याच्या नावातील 'श्री' या उपाधीला अनेकविध छटा आहेत, हे यादवांचे मुनिवर गर्ग यांनी मला पुढे अनेकवेळा क्रमश: समजावून सांगितलं होतं, मलाही ते जीवनभराच्या अनेक प्रसंगात तीव्रपणे स्पर्शून गेलं होतं. त्याला 'श्रीकृष्ण' म्हणताना तो आपल्यापेक्षा केवढातरी उंच आहे, अगदी थेट गगनाला जाऊन भिडलेला! व्यापक नि असीमही तसाच! गगनासारखा – असं वाटे!

पण जशी का स्वयंवरानंतर द्रौपदी माझ्या जीवनात आली, तसं त्याला 'कृष्ण' म्हणून संबोधणं किती योग्य आहे, तेही मला क्रमश: कळत गेलं. तिच्या या म्हणण्याला कुंतीमातेनंही अनेकवेळा मला पटणारा पाठिंबा दिला. त्याला कृष्ण म्हणताना, कधी-कधी तो आपल्या मूठभर हृदयात सामावला आहे असा प्रत्यय येई, तर कधी-कधी त्याच्या गगनाएवढ्या विशाल हृदयात कणमात्रानं आपणच सामावलेले आहोत असा अनुभव येई आणि त्यानंच तर मला शिकवलं की, 'जीवन म्हणजे प्रत्यक्ष अनुभव! अन्य काहीही नाऽही!'

यामुळेच असेल, पुढे-पुढे तर मला सवयच पडून गेली की, जेव्हा-जेव्हा त्याला तो आपल्यापेक्षा कितीतरी मोठा आहे हे जाणवून द्यायचं असेल, तेव्हा-तेव्हा माझ्या तोंडून नकळतच आपोआप उद्गार बाहेर पडत – 'श्रीकृष्णा' आणि जेव्हा-जेव्हा माझं काहीतरी चुकलंय, मी त्याच्यापेक्षा कितीतरी लहान आहे हे त्याला जाणवून द्यावंसं वाटे, तेव्हा-तेव्हा माझ्या तोंडून सहज उद्गार बाहेर पडत – 'कृष्णा'! असा हा 'श्रीकृष्ण' आणि 'कृष्ण' माझं पुरतं जीवन व्यापूनही दशांगुळं उरलाच होता!

माझ्या 'अर्जुन' या नावाचा स्पष्टार्थ मला नीट समजावून सांगितला, तो कृष्णानं. माझ्या पहिल्याच भेटीत कुरुक्षेत्रावर सूर्यकुंडाकिनारी तो माझ्या डोळ्यांत खोलवर

बघत मला म्हणाला, "अर्जुन हे नाव एकट्या तुलाच शोभणारं आहे. अन्य कुणीही तिकडे फिरकूसुद्धा शकत नाही. तुझ्या नावाचा अर्थ नीट समजून घे आणि सदैव ध्यानी ठेव – 'अर्जन म्हणजे मिळविणे, प्राप्त करणे.' जगातील कीर्तीला नेणारं निवडक ज्ञान म्हणून जे-जे काही आहे, त्याचं अर्जन करणं, हेच तुझं जीवनसाफल्य आहे." तेव्हापासून तो मला सहजच 'अर्जुन' म्हणून संबोधत आला. कधी-कधी प्रेमानं 'सखा'ही म्हणत आला. माझा अनुभव होता की, त्यानं असं 'सखा' म्हटलं की, माझा तो संपूर्ण दिवस अपरिमित आनंदात जात होता. त्या दिवशी हातून हटकून काही ना काही पुण्यकर्म घडतच होतं.

मला बारकाव्यानं स्पर्शून गेलं होतं की, तो आणखी मोजक्यांनाच 'सखा' मानत होता. त्यात त्याचा सारथी दारुक होता. सुदामपुरीचा परममित्र सुदामा होता. हस्तिनापूरचे महात्मा विदुर आणि मंत्री संजय होते आणि सर्वांत महत्त्वाचे होते, ते उद्धवदादा!

'सखी' म्हणून त्यानं एकट्या द्रौपदीलाच संबोधलेलं मी ऐकलं होतं. कधी कुंतीमातेकडून, तर कधी बलरामदादाकडून बालपणी गोकुळात त्यानं राधिकेलाही 'सखी' म्हटल्याचं ऐकलं होतं. स्वत: त्यानं सांगितलं होतं की, राधिकेची आठवण म्हणूनच तो रसरशीत पाढऱ्या फुलांची नवी वैजयंतीमाला रोज वक्षावर वागवीत असतो. म्हणून राधिकेची काल्पनिक मूर्तीही कधी-कधी माझ्या डोळयांसमोर तरळून जात असे. द्रौपदी आणि राधिका अशा त्याच्या सख्या म्हणून मनात घोळत असताना माझ्या मनी हटकून विचार येई, तो रुक्मिणीवहिनींचा. त्या कृष्णाच्या सर्वाधिक आवडत्या पत्नी होत्या. मला कुंतीमातेनंतरच्या वंदनीय स्त्री होत्या. कृष्णाच्या अन्य सात पत्नींनाही मी वहिनीच म्हणत असे. त्या वेगवेगळ्या मनोभावांच्या अधिकारी व आदरणीय होत्या.

त्यानं द्वारकेत पुनर्वसित केलेल्या हजारो कामरूप स्त्रियांचा विचार मनी आला की वाटे, खरोखरीच स्त्रीत्वाचा जो अर्थ त्याला कळला होता, तो आम्हा पांडव, यादव, कौरव, विराट, पांचाल, चेदी, मागध कुठल्याही क्षत्रियसमूहातील एकाही वीराला कळला नव्हता. मी त्याला 'श्री' मानत होतो, त्यातील हे एक प्रमुख कारण होतं. कुंतीमातेनंच त्याच्या या अंगाकडे लक्ष वेधताना मला सांगितलं होतं, 'अर्जुना, माझा कृष्ण भेटणाऱ्या प्रत्येक स्त्रीशी कसा वागतो, ते बारकाव्यानं बघत जा. संस्कृती-संस्कृती म्हणतात, ती म्हणजे हे वागणंच होय. दुसरं काहीही नाही! तूही ते कधीच विसरू नकोस.'

तिच्या या संस्कारांमुळेच, प्रतिज्ञाभंग होऊन तीर्थयात्रेत असताना मी नागकन्या उलूपीशी विवाह केला होता. श्रीकृष्णानं जांबवतीवहिनीशी केलेला विवाह आदर्श म्हणून माझ्या समोर होता. हिडिंबेशी विवाह करतानासुद्धा भीमसेनासमोर हाच आदर्श होता. बालविधवा असलेली नागकन्या उलूपी माझ्या या दोघा सुहृदांना आठवूनच मी स्वीकारली होती.

जीवनाचा हा असा पडताळा घेताना मला अंधूकसा आठवतो, तो गंधमादन पर्वत. कुंतीमातेनं सांगितलं तसं आम्हा सर्व पांडवांचे जन्म या गंधमादन पर्वतावर झाले होते. आम्हाला राज्यभाग म्हणून खांडववन देताना कृष्णाच्या साक्षीनं शकुनी कुत्सितपणे म्हणाला होता, "पांडवांना वनाचा सराव आहे." तो राजकारणी तिरकसपणे म्हणाला होता, ते आम्ही अनुभवलेलं जीवनसत्त्व होतं, आज मला त्या वनजीवनाचा वक्षभर अभिमानही वाटतो. हे जीवनसत्य कसं, तर आम्ही पांडव जन्मलो ते गंधमादन पर्वतराजीच्या शतशृंग शिखरावर. मला तर पुढच्या वनवासाच्या काळात चांगली नऊ वर्षं गंधमादन पर्वतावरच

राहावं लागलं. राज्य करून राहिलो ते खांडववनात. वनवास पत्करून राहिलो ते काम्यक व द्वैतवनात. 'न भूतो न भविष्यति' अशा कुरुक्षेत्राच्या महायुद्धानंतर काही वर्षं इंद्रप्रस्थात राज्य करून अंतिम महाप्रस्थानासाठी गेलो ते हिमवनात – बर्फाच्या वनात! पांडव आणि वन असा जन्मानं जुळलेला अंतापर्यंतचा द्वंद्व समास होता. सतत वनाशी संपर्क राहिल्यामुळेच असेल, सर्व प्रतिकूलतेत आमची मनं निकोप, निष्कपट नि निखळ राहिली. मी व कुंतीमातेनं आम्हा पांडवांवरील कृष्णसख्याची ही कृपाच मानली. कुठेही असलं तरी मनात मंगल असलं की वनातही मंगल होऊ शकतं, हे श्रीकृष्णानंच आम्हाला शिकवलं होतं.

आम्ही पाचही बंधू वरून वेगवेगळे दिसत होतो, म्हणूनच जगाला तसे वाटत होतो. हेही सत्य आहे की, आम्हा प्रत्येकाचा स्वभाव मूलतः वेगवेगळा होता. तरीही आम्हा पाचांचं एकजीव झालेलं बळकट मुठीसारखं एक अभेद्य अस्तित्व होतं. ते तसं राखण्यात मोठा वाटा होता, तो कुंतीमातेचा. तसाच तो तिला स्नुषा म्हणून लाभलेल्या द्रौपदीचाही होता. पण आम्ही पाचही बंधू जाणून होतो की, कुठल्याही तराजूत घालून न जोखता येण्याजोगा यातील श्रेयाचा वाटा होता, तो श्रीकृष्णाचा – आमच्या प्रिय सख्याचा!

आम्हा पाचही बंधूंच्या जीवनाला अमुलाग्र वळण देणारे, जीवनात कधीच न विसरता येण्याजोगे काही प्रसंग घडले. त्यातील पहिलाच प्रसंग होता, लाक्षागृहाचा. दुसरा होता, तो द्रौपदीस्वयंवराचा. नंतर खांडववनाचा दाह, इंद्रप्रस्थनिर्माण, जरासंधवध, राजसूय यज्ञ व शिशुपालाचा वध, युधिष्ठिराचा द्यूतसंभ्रम आणि संकट, द्रौपदीची विटंबना असे अनेक प्रसंग होते. यातील कुठल्याही प्रसंगाच्या निमित्तानं आम्हा पाचही बंधूंची एकजूट दुभंगण्याची दाट शक्यता होती. तसं घडलं मात्र नाही. याचं कारण काय होतं? तर आमच्या जीवनाच्या पहिल्या टप्प्यात आम्हाला लाभलेलं कुंतीमातेचं जीवनदायी मार्गदर्शन आणि दुसऱ्या टप्प्यात लाभलेली श्रीकृष्णाची अमोल कृपाप्रसादाची देणगी. कधी-कधी 'श्रीकृष्ण आम्हा पांडवबंधूंना जीवनात कधी भेटलाच नसता तर?' या नुसत्या विचारानंही मी निरुत्तर, स्तब्ध होऊन जातो. भयकातर, सैरभैर होऊन जातो.

मी तर व्यक्तिशः खरोखरच त्याचा परमसखा होतो. म्हणूनच तर त्यानं पुढे पेटलेल्या भारतीय महायुद्धाच्या प्रसंगी हताश आणि किंकर्तव्य झालेल्या मला हितोपदेश केला.

त्या अमर हितोपदेशासाठी त्यानं एकमेव मलाच का निवडलं? त्या युद्धात वास्तविक पांडवांचा सेनापती होता, पांचालयोद्धा धृष्टद्युम्न. मी किंकर्तव्य झालोय, विमूढ झालोय, हे ध्यानी आल्यानंतर मला माझ्या नंदिघोष रथावर तसंच सोडून, खरं तर त्यानं सेनापती धृष्टद्युम्नाकडे जायला पाहिजे होतं. माझी सेना त्याच्या हाताखाली देऊन पुढचं युद्ध त्याला खेळता आलं असतं. त्यानं तसं तेव्हा केलं नाही. माझ्यावरचं निखळ प्रेम, हेच त्याचं कारण होतं.

गीतेचं अजर व अमर तत्त्वज्ञान सांगण्यासाठी त्यानं माझ्या ज्येष्ठ बंधूंना – युधिष्ठिर, भीमसेनालाही मनोमन नक्कीच पडताळून बघितलं असणार. या त्याच्या सत्त्वपरीक्षेत युधिष्ठिर का उतरला नसावा? माझ्या बुद्धिप्रमाणे मला त्याचं कारण सापडतंय ते असं की, युधिष्ठिरानं आपण द्यूतासारख्या व्यसनाच्या – माणूसपण विसरायला लावणाऱ्या व्यसनाच्या पूर्ण आहारी जाऊ शकतो, हे सिद्ध केलं होतं. ज्येष्ठ

असून त्यागाची वृत्ती सोडून, स्वयंवरानंतर त्यानं द्रौपदीची अभिलाषा व्यक्त केली होती, हे काही कृष्ण विसरला नव्हता. तसं तर कृष्णानं मला सांगितलेल्या गीतेच्या तत्त्वज्ञानासारखं युधिष्ठिर नेहमीच बोलत आला होता. त्याचं ते बोलणं मात्र त्याच्यापेक्षा लहान आम्हा चौघांच्या मनावर काही कधीच ठसलं नाही. भीमसेनाच्या तर नाहीच नाही, हे असं का होतं? तर युधिष्ठिर जीवनभर जसं बोलत होता, तसं नेमक्या सत्त्वपरीक्षेच्या वेळी वागत काही नव्हता. वास्तविक ज्येष्ठ म्हणून सर्वाधिक पराक्रमाचं दायित्व त्याच्यावरच होतं, ज्येष्ठत्वाच्या अधिकारानं तो इंद्रप्रस्थाचा महाराज झाला होता. पण ज्या श्रीकृष्णाच्या अमोल सहकार्यानं इंद्रप्रस्थ उभं राहिलं होतं, त्याच्या द्वारकेला जाण्याची मनीषा त्यानं कधीही बोलून दाखविली नाही. प्रत्यक्षात तर तो तिकडे कधीच गेला नाही. म्हणूनच तर श्रीकृष्णाला मी प्रसंगवशात दादाही म्हणत होतो. युधिष्ठिराला मात्र युधिष्ठिर किंवा महाराजच.

कधी–कधी माझ्या मनी विचार येई, मी किंवा भीमसेन ज्येष्ठ म्हणून जन्मलो असतो तर? आम्हा दोघांपैकी कुणीही एक इंद्रप्रस्थाचा महाराज झाला असता तर? या अर्थानं मात्र एका शब्दानंही मी कधी बोललो नाही. हे माझं मौन राहणं दुटप्पी होतं काय? मुळीच नाही. मी कुंतीमातेचा आणि श्रीकृष्णाचा शब्द जीवनभर शिरोधार्यच मानला होता – अगदी मनापासून! त्यांच्या ठायीची निरपेक्ष भक्तिभावना हेच माझ्या जीवनाचं बळ होतं. किंबहुना तेच माझं जीवनसार व सत्त्व होतं.

आपले बंधू आपल्या शब्दाबाहेर नाहीत, याचा कळून न येणारा अप्रकटसा एक सूक्ष्म राजअहंकार युधिष्ठिराठायी होता. कृष्णाला त्याची पूर्ण जाणीव होती. गीतेसारखं कालजयी जीवनतत्त्वज्ञान त्यानं युधिष्ठिराच्या कानी घातलं असतं, तर भानरहित होऊन द्यूत खेळणारा तो, त्या तत्त्वज्ञानाची सवंग प्रवचनं मांडीत मंदिरा–मंदिरात फिरला असता.

मग महाबली व सामर्थ्यशाली भीमसेनाची त्यानं गीतेचा हितोपदेश सांगण्यासाठी निवड का नाही केली? सर्वांना भीमसेन महासामर्थ्यशाली आहे एवढंच माहीत होतं. त्याचं सामर्थ्य फुललं की, कधी–कधी तो अनावर होत असे. त्याला फुलविणं सोपं होतं. आवरणं कठीण होतं. स्वतः श्रीकृष्ण एक सामर्थ्यशाली मल्लयोद्धा होता. जरासंधाच्या वेळी त्यानं भीमसेनाला पुढे घातलं अशीच सर्वांची समजूत होती. माझी तशी मुळीच नव्हती. अनेक दिवस चाललेल्या गिरिव्रजातील त्या मल्लयुद्धाच्या वेळी भीमसेन अनावर झाला असता, तर? नेमका त्याचा लाभ अजिंक्य जरासंधानं उठविला असता. भीमसेनानं शेवटी आवळलेला बाहुकंटकाचा पाश, उलटं घडून जरासंधानं भीमसेनाच्या कंठाभोवती तो आवळला असता तर? या क्षणी नेमका श्रीकृष्ण पुढे झाला असता. भीमसेनाला अंगठा वर उठवून अभय मागण्याचा निःसंकोच संकेत त्यानं केला असता आणि त्याच आखाड्यात आव्हानानं जरासंधाला अंगावर घेतला असता. कंसासारख्या जरासंधापेक्षा सशक्त व तरुण अजिंक्य मल्लवीराला त्यानं या बाहुकंटकावरच वधलं होतं, हे सर्व विसरले होते, तरी मी पुरेपूर जाणून होतो.

द्वंद्वात असो, रणांगणात असो वा दैनंदिन जीवनात असो, श्रीकृष्ण हिमनगासारखा होता. बाहेरून केवळ मस्तक दिसणारा – जलाआड त्याहून प्रत्यक्षात आठपट असलेला!

भीमसेनाची दुसरी कुबल जागा होती, ती त्याचा आहार आणि निद्रा ही. यासाठीच

त्यानं भीमसेनाचीही गीतेसाठी निवड केली नव्हती.

मग गीता सांगण्यासाठी त्यानं परमप्रिय सखा म्हणून माझीच निवड का केली होती? खरं सांगायचं, तर हा प्रश्नच माझ्या मनी कधीही उठला नाही. मी 'मी' नव्हतोच. होतो तो श्रीकृष्णाचा श्वास! म्हणूनच त्याला वगळून माझं जीवन पूर्ण होऊच शकत नाही. दुसऱ्या अर्थानं सांगणं म्हणजे त्याच्याविषयी बोलणं, हे मी स्वतःलाच उलगडून दाखविणं आहे. सावलीनं आकृतीचं साग्र वर्णन करण्याचा यत्न करण्यासारखं आहे ते.

प्रथम–प्रथम मी त्याला विचारीत असे, कुठलीही अमुक एक गोष्ट का करायची? कशी करायची? तिचे परिणाम काय? ती नाहीच केली तर तिचे परिणाम काय? पण प्रत्येक वेळी तो मला हसत–हसतच असं काही पटवून देत गेला की, पुढे–पुढे मला कळून चुकलं, पाण्याचा प्रचंड ओघ दोन दुबळ्या हातांनी जसा थोपविता येत नाही, तसाच त्याच्या विचारांचा प्रवाह आहे. काही–काही प्रसंगी तर स्पष्ट जाणवून गेलं की, पितामह भीष्म आणि तो जलपुरुषच आहेत. तरीही दोघांत खूप अंतर होतं. आणखीही एक जलपुरुष मला अंतरंगातून जाणवत होता, पण तो कोण हे मात्र स्पष्ट होत नव्हतं!

श्रीकृष्णावर असा विचार करू लागलो की, घटनांचे मृगतांडे मनात धपाधप उड्या घेत अनावर गतीनं धावू लागतात. अनेकविध आकारांच्या रंगवैभवी मयूरपक्षयांचे थवेच थवे मनाच्या किनाऱ्यावर केकारव करीत अलगद उतरू लागतात. त्यातील कुठल्या एकावर म्हणून दृष्टी जखडून ठेवता येत नाही. मला आठवेल तशी ही 'कृष्णार्जुनगाथा' मी सांगतो आहे. मला याची पूर्ण जाणीव आहे की, त्याचं जीवन म्हणजे मला गांडीव धनुष्याबरोबर मिळालेल्या अक्षय्य भात्यासारखं आहे. घटनांनी तुडुंब भरलेलं!

अलीकडे जसजसा मी त्याच्या भेटींचा अर्थ लावत जातो, तसतसा घनदाट अरण्यात वाट चुकलेल्या बालकासारखी माझी स्थिती होते! एक म्हणून मापदंड त्याचं मोजमाप करण्यासाठी पुरा पडत नाही. कुठल्याही अंगानं त्याच्याकडे पाहिलं तरी तो अथांग आणि असीम आहे, हेच प्रकर्षानं जाणवतं – अगदी निळ्याभोर आकाशासारखा! पर्णकुटीच्या छतातून दिसणारा आभाळाचा तुकडा आणि बाहेर येऊन कितीही लांबवर दृष्टी फेकली, तरीही सर्वत्र दिसणारा आभाळाचा व्याप जी अनुभूती देईल, तीच त्याचीही असते.

आताशा मला सतत स्मरते, ती त्याची आम्हा पांडवबंधूंशी झालेली कुरुक्षेत्रावरची पहिली भेट – सूर्यकुंडाकाठची आणि तीही सूर्यग्रहणाच्या दिवशीची! आज कळतंय की, त्या दिवशी सूर्यग्रहण होतं, तरीही माझ्या जीवनातील सूर्योदय त्याच दिवसापासून सुरू झाला होता.

कुरुक्षेत्रावरच्या श्रीकृष्णाच्या या प्रथम भेटीतच मला त्याला वीरासनात वंदन करावंसं आपापत: वाटलं. असंच का वाटलं, त्याच्या प्रथम भेटीतच काय-काय जाणवलं, याचाही जीवनभर शोध-बोध घेण्याचा मी यत्न केला. समाधानकारक कारण काही कधीच मिळालं नाही. पुढे ते तेव्हाच मिळालं, जेव्हा त्यानं मला एका विराट महायुद्धाच्या प्रारंभी कुरुक्षेत्रावरच हितोपदेश केला. कळलं तेही एवढं, थोडक्यात की, त्यात माझं जीवनसारच सामावलेलं होतं. ते असं की, तो आर्यावर्तातल्या संपूर्ण मानवजातीचं साध्य बघणारा द्रष्टा आहे. मी त्या साध्याचं केवळ एक साधनमात्र आहे.

हे त्याच्या मला पुढे कितीतरी वर्षांनी घडलेल्या दर्शनाविषयी मी सांगतो आहे. ते

दर्शन होतं, चाळीस लक्ष योध्द्यांच्या जीवनाचा महायज्ञ मांडलेल्या समरापूर्वीचं. तसा तो मला, आम्हा सर्व पांडवांना दुसऱ्यांदा भेटला तो द्‌रौपदीच्या स्वयंवरात – कांपिल्यनगरात. बऱ्याच लोकांची अशी धारणा आहे की, इथेच तो आम्हाला प्‌रथम भेटला. कुंतीमातेसह आम्ही गंधमादन पर्वतातून लहान वयातच हस्तिनापुरात प्‌रथम प्‌रकट झालो. ही वार्ता त्याला काही दिवसांतच मथुरेत समजली. मग वसुदेवबाबांच्या आग्‌रहावरून तो आमची खडान्‌खडा माहिती उचलत होता. सूर्यग्‌रहणाचा नेमका मुहूर्त साधून तो आम्हाला कुरुक्षेत्‌रावर उद्धवदेवांसह प्‌रथम भेटला होता. त्या दिवसापासून तो आणि उद्धवदेव यांच्या स्मरणाशिवाय आम्हा पांडवांचा आणि कुंतीमातेचा एक दिवस गेला नाही.

त्याची दुसरी भेट कांपिल्यनगरात द्‌रौपदीच्या स्वयंवरप्‌रसंगी झाली. मला काहीच माहीत नव्हतं की, तोही या स्वयंवरासाठी आला आहे. त्या स्वयंवरातील प्‌रमुख तीनच घटना माझ्या अंत:करणावर शिल्पासारख्या कोरल्या गेल्या. पहिली होती सूतपुत्‌र कर्णानं उन्नत वक्षानं येऊन स्वयंवराचं शिवधनुष्य उचलली ही. त्या क्षणीच त्याच्या हालचाली पाहून मला तीव्‌रपणे वाटलं की, श्‌रीकृष्ण आणि पितामह भीष्म यांच्यासारखाच हा कर्णही जलपुरुषच आहे! मात्‌र दुसऱ्याच क्षणी मी तो विचार पटकन झटकून टाकला. एक सूतपुत्‌र पितामहांच्या आणि श्‌रीकृष्णाच्या पंक्तीत कधीही बसणं शक्य नव्हतं. बऱ्याच कालानंतर मला समजलं की, माझ्याच बाणानं कर्णाचा पुत्‌र सुदामन वधला गेला होता. त्यामुळे संतप्त कर्णानं माझ्या वधाची प्‌रतिज्ञाही केली होती म्हणे! दुसरी घटना होती ती द्‌रौपदीच्या उद्‌गारांची! एरवी स्वयंवरातील कुठलीही क्षत्‌राणी स्वत: काही बोलणं शक्यच नव्हतं. तसा शिष्टाचारही नव्हता. पण द्‌रौपदी ठणठणीत निग्‌रहानं म्हणाली, ‘मी कुठल्याही सूताची पत्नी वा स्नुषा होणार नाही!’ आणि तिसरी घटना होती, ती कांपिल्यनगरात आम्ही उतरलो होतो, त्या कुंभकाराच्या घरी श्‌रीकृष्ण, बलरामदादा व उधोदेव भेटले ती! खरोखरच श्‌रीकृष्ण त्या दिवशी आम्हा पांडवांना भेटला नसता तर? ज्या दृष्टीनं द्‌रौपदीनं त्या दिवशी माझ्याकडे पाहिलं, ते लक्षात घेता, कदाचित मी तिच्या विभाजनाला तीव्‌र विरोधही केला असता. तसा प्‌रबळ विचारही माझ्या मनात येऊन गेला. नेमक्या याच दिवशी श्‌रीकृष्ण आणि कुंतीमाता यांच्या ठायीची एक न पुसता येणारी मुद्‌रा माझ्या मनात उमटली. ती होती, या दोघांची कधीही अवज्ञा करायची नाही, ही!

द्‌रौपदी आम्हा पाच बंधूंची पत्नी होणं कसं योग्य आहे, हे श्‌रीकृष्णानं आम्हाला पटविलं. तिलाही ती कोण आहे, हे समजावून सांगितलं. कुंतीमातेनं त्याच्या सांगण्याला पाठिंबा दिला. त्याच दिवशी मला एक सत्य कळून चुकलं की, माझ्या विधवा, अनेक संकटांना धैर्यानं तोंड देणाऱ्या मातेच्या पाठीशी हिमालयासारखा उभा आहे, तो एकटा श्‌रीकृष्ण!

द्‌रौपदीस्वयंवराच्या त्या प्‌रसंगानंतरच माझ्या नि कृष्णाच्या दृढ भावबंधाला प्‌रारंभ झाला. माझ्या जागी दुसरा कुणीही क्षत्‌रिय वीर असता, तर आपल्या पणात जिंकलेल्या पत्नीचं विभाजन करण्यास संमती देणारा म्हणून श्‌रीकृष्णाविषयी त्याच्या मनी अपसमजानं दृढ अढी राहिली असती. माझ्या मनी तशी अढी कधीच आली नाही. द्‌रौपदी पुढे कृष्णाची प्‌रिय सखी झाली. यातही मला कधीच काही खटकलं नाही. उलट जसजशा घटना घडत गेल्या, तसतशी कृष्णाच्या माध्यमातून मला पत्नी द्‌रौपदी

अधिकाधिक उलगडत गेली. नुसती द्रौपदीच उलगडत गेली नाही, तर मला माझी कुंतीमाता 'माता' म्हणून इतर बंधूंपेक्षा अधिक समजत गेली. नुसती माताच समजली असं नव्हे, तर जे–जे जीव म्हणून जगत आहे, ते अखंड जीवनच सर्व मात्रांसह समजलं.

आम्हा पाचही बंधूंच्या पत्नीच्या एकांताची सर्व संहिता आखली ती दोघांनी – श्रीकृष्ण आणि कुंतीमाता यांनी! आम्ही बंधूंनी द्रौपदीशी एकांतात कसं वागावं ते ठरवलं श्रीकृष्णानं! द्रौपदीनं स्त्री म्हणून कसं वागावं, हे निश्चित केलं आमच्या अनुभवी कुंतीमातेनं!

श्रीकृष्ण आपल्यापेक्षा किती बारकाव्यानं इतरांचा विचार करतो, हे त्या संहितेच्या निमित्तानं आम्हा सर्वांनाच कळून चुकलं.

द्रौपदीला शिशु संगोपनाचं सर्व मार्गदर्शन कुंती मातेकडून होई. पुत्र बोलते झाल्यावर द्रौपदी त्यांना सर्वांनाच 'तात' म्हणायला शिकवी. मात्र या शिकवणीत एक सुक्ष्म अंतर असे. आपल्या जन्मदात्याशिवाय इतरांना तो त्यांच्या नावापुढे तात जोडून – अर्जुनतात, भीमतात असे म्हणे. आम्हा सर्व बंधूंना ना द्रौपदीचे पाचही पुत्र – प्रतिविंध्य, सुतसोम, श्रुतकीर्ती, शतानिक, श्रुतसेन – आपलेच पुत्र वाटत. पांडवांच्या तिसऱ्या पिढीतील हे पुत्रही एकमेकांशी मिळून–मिसळून वागत. एकमेळानंच राहात.

मी श्रीकृष्णाच्या अधिकाधिक दाट स्नेहभावात आलो, तो खांडववन दहनाच्या निमित्तानं! दुर्योधन आणि शकुनी या कुरूंच्या उदार नेत्यांनी आम्हा पांडवांना राज्यभाग म्हणून घनदाट अरण्याचं खांडववन दिलं. इथेच मला समजलेला दुर्योधन स्पष्ट सांगितला पाहिजे. तो नावाप्रमाणे युद्धात जिंकायला अवघड होता. युद्धाशिवाय इतर वेळी जीवनात समजायला अवघड होता. हस्तिनापूरच्या प्रजाजनांना तो आपलं नव्याण्णव भावंडावरचं प्रेम किती अलोट आहे, ते वरवर भासवत होता. व्यक्तिगत वागताना त्याच्या अंतरंगात पाच-दहा निवडक बंधू सोडले, तर एकाहीबद्दल प्रेम, जिव्हाळा नव्हता. त्यांना तो आपले आज्ञाधारक दासच मानत होता. आपण न्याय्य हक्कानं व वयानं कुरूंच्या सिंहासनाचा युवराज नाही, हे तो पुरेपूर जाणून होता. ते युवराजपण अधिकारानं आमचा ज्येष्ठ बंधू युधिष्ठिर याचं होतं, हेही तो चांगलंच जाणून होता. युधिष्ठिराचा थोडा सूक्ष्म अहंभाव आणि द्यूतासारखं व्यसन सोडलं, तर तो आम्हा पांडव-कौरव सर्वांशी प्रेमानंच वागत होता. हस्तिनापूरच्या नगरजनांत तो अतिशय प्रिय होता. ते त्याला आपला 'युवराज'च म्हणत असत. पितामह भीष्मांचाही त्याच्या युवराजपदाला विचारपूर्वक पाठिंबा होता.

आम्हा सर्व कौरव–पांडवांत किकर काटयासारखा घुसला होता, तो गांधारनरेश सुबलराजाचा पुत्र शकुनी. अंध महाराज धृतराष्ट्र आणि त्यांच्यासाठी अंधत्व पत्करलेल्या महाराणी गांधारीदेवी यांना दुर्योधन व त्याचे नव्याण्णव बंधू यांच्यासह शकुनी आपल्या हाताच्या बोटांवर थयथय नाचवीत होता. त्याला आणखी चांगले अकरा बंधू होते. ते त्याचे तत्पर हस्तक म्हणूनच हस्तिनापुरात मुक्त वावरत होते. या सर्वांना कणक नावाच्या कुटिल राजनीतिज्ञाची जोड मिळाली होती. दुर्योधनानं आपल्यानंतरचा प्रिय बंधू दु:शासन याला आपली पडछायाच बनविली होती. या चौकडीचा यत्न होता तो दुर्योधनानं अंगराजपद देऊन अंकित केलेल्या अंगराज आणि दिग्विजयी कर्णाला

आपल्या प्रत्येक कुटिल कृतीत समूळ ओढण्याचा! कारण काय ते कळत नव्हतं, पण कर्ण मात्र 'पांडवांना सरळ युद्धाचं आव्हान द्या. त्यांना सरळ समरांगणात गाठू या' असा एकच ठेका धरून होता.

लाक्षागृह हा आम्हा पांडवांच्या सत्त्वपरीक्षेचा पहिला प्रसंग! त्यातून आम्ही निभावलो, ते महात्मा विदुरांच्या वेळीच लाभलेल्या सावधानतेच्या संकेतामुळे. त्या आपत्तीतून एकच इष्ट गोष्ट घडली होती. आमच्या भीमसेनाचा हिडिंबेमुळे राक्षस ज्ञातीशी रक्तसंबंध आला होता. तिचा पुत्र घटोत्कच वनात वाढत होता. खांडववनदाह हा आमच्या जीवनातील दुसरा सत्त्वपरीक्षेचा प्रसंग होता. आज मात्र आमच्या वतीनं हस्तिनापूरच्या राजसभेत राज्यभाग म्हणून श्रीकृष्णानं खांडववन का स्वीकारलं, त्याचा उलगडा होतो आहे. त्यानं तसं ते स्वीकारलं नसतं तर? त्याचा आणि आम्हा पांडवबंधूंचा एवढ्या जिव्हाळ्याचा दृढ स्नेहसंबंध कधी आलाच नसता. आम्ही पाचही पांडव त्याचे आतेबंधू होतो, हे खरं आहे. त्याला आमच्यासारखेच इतरही अनेक आतेबंधू होते. पण तो अशा खोटया रक्तनात्यात कधीच अडकणारा नव्हता, हे त्यानं दुष्ट व अन्यायी मामा कंसाला वधून केव्हाच सिद्ध केलं होतं. जरासंधाला साहाय्य करणारा आतेबंधू शिशुपाल यालाही शिक्षा द्यायला तो कचरला नव्हता. विदूरथ आणि दंतवक्र या दुसऱ्या आतेबंधूंनाही त्यानं कठोर शासन केलं होतं.

श्रीकृष्णानं स्वतःच्या जीवनात जेवढ्या आस्थेनं द्वारकानिर्माणाला महत्त्व दिलं होतं, तेवढंच महत्त्व खांडववन हटवून तिथं सुघटित इंद्रप्रस्थ हे राजनगर उठविण्यालाही दिलं होतं. इंद्रप्रस्थ उभारताना त्यानं अनेकवेळा आम्हाला समक्ष भेटून मार्गदर्शन केलं होतं. त्याचं हे मार्गदर्शन एवढ्या अनुभवी दृष्टीचं होतं की, पुढच्या जीवनात आम्हाला कधीही त्यासाठी दुसऱ्याकडे जावं लागलं नाही. या सर्वांचं कारण एकच होतं, त्याचं आमच्यावर विलक्षण प्रेम होतं. इतर आत्यांपेक्षा आमच्या कुंतीमातेवर त्याचं आदरयुक्त निरतिशय प्रेम होतं. इतर आत्यांना तो आपल्या जीवनप्रवासात एवढं मानताना कधी दिसला नाही.

श्रीकृष्ण हा आप्तगणांतील, गोतावळ्यातील पुरुष होता. सर्व आप्त स्त्री-पुरुषांना वाटे की, तो सर्वांहून आपल्याच अधिक प्रेमात आहे. हेच तर त्याचं वैशिष्टय होतं. बलरामदादा आणि उधोदेव या जवळच्या बंधूंना तो आपलाच वाटे, पण त्याच्या अंतरंगातील दोघांविषयीच्या प्रेमभावनांत कितीतरी अंतर होतं. जसा तो त्या दोन बंधूंना आपलाच वाटे, तसा आम्हा आतेबंधूंना, मावसबंधूंना, चुलतबंधूंनाही तो आपलाच वाटे. हे तर काहीच नव्हे, द्वारकेतील अठराकुलीन लहानथोर सर्व यादवांना तो आपला बंधूच वाटे. ज्या उत्साहानं हस्तिनापूरचे कुरू त्याचं स्वागत करीत आले होते, ते लक्षात घेता दूरदेशीच्या कुरूंनाही तो आपला बंधूच वाटत होता, हे कसं नाकारता येईल? त्याच्याविषयी माझ्या आणि उद्धवदेवांच्या प्रत्येक भेटीत चर्चा झाल्या. त्या चर्चा हा माझ्या जीवनातील एक सुखद अनुभव होता. त्या चर्चांमधून आमच्या हाताला गवसलेलं कृष्णाविषयीचं अत्यंत मोलाचं सत्य आम्ही दोघंही कधीच विसरू शकलो नाही. कुठल्याही गोष्टीला दोन टोकं असतात. एक वरचं नि एक खालचं. एक प्रारंभीचं आणि दुसरं शेवटचं. या विविधढंगी, वसुंधरेलाही दक्षिणेचं आणि उत्तरेचं टोक आहे. आम्हा दोघांना स्पर्शून गेलं ते सत्य एकच होतं की, आमचा श्रीकृष्ण हा जीवनभर ही दोन्ही टोकं अगदी सहजरीत्या सांधत आला होता – जीवनाच्या सर्वच स्तरांवर!

त्याला दोन पिते होते – एक जन्मदाते वसुदेव महाराज आणि दुसरे पालनकर्ते गोकुळातील नंदबाबा. तशाच त्याला दोन माता होत्या. एक जन्मदात्री देवकीमाता आणि दुसरी त्याला बालपणी डोळ्यांत तेल घालून जपणारी आणि संस्कार करणारी गोपस्त्री यशोदामाता!

जसे त्याला दोन माता–पिता होते, तसेच त्याला गुरूही दोन होते. पहिले अवंतीच्या अंकपाद आश्रमातले आचार्य सांदीपनी आणि दुसरे प्रयागाश्रमातले घोर आंगिरस. आचार्य सांदीपनींनी त्याला शस्त्र-अस्त्रांसह चौदा विद्या, चौसष्ट कला यांचं ब्रह्मचर्याश्रमातील मूलभूत सकस ज्ञान दिलं होतं, घोर आंगिरसांनी त्याला चौफेर ब्रह्मज्ञान दिलं होतं.

त्याच्या सहवासात आल्यामुळे माझ्याशिवाय हे कुणाच्याही लक्षात आलं नाही की, आम्हा कौरव–पांडवांना शस्त्रास्त्रविद्येचं ज्ञान दिलं ते गुरू द्रोण व आचार्य कृप यांनी! तसा आम्हाला ब्रह्मविद्येचं शिक्षण देणारा गुरू लाभलाच नाही. आम्ही कौरव–पांडव कधीही कुठल्याही आश्रमात गेलो नाही. आश्रमजीवन हे संस्कार घडविणारं केवढं समर्थ केंद्र असतं, याचा अनुभव आम्हा कौरव-पांडवांना कधीच आला नाही. आताशा मला पूर्णपणे स्पर्शून जात होतं की, आम्हा कौरव-पांडवांत जी दरी पडत गेली तिचं एक सबळ कारण आम्ही आश्रमवंचित होतो, हे तर नसावं ना?

माझ्या इतर बंधूंना जाणवलं होतं की नाही, मला माहीत नाही. मला मात्र त्याच्याशी बोलताना सदैव जाणवत आलं की, कृष्ण हाच माझा 'गुरुणाम् गुरू' 'आहे.

खांडववनाचा दाह करून तिथे इंद्रप्रस्थ उभारताना माझा श्रीकृष्णाशी अधिक जिव्हाळ्याचा घनदाट संबंध आला. त्या वनातील झाडझाडोऱ्याला अग्नी लावून त्याचा वणवा पेटवताना तो एकदा मला सदैव लक्षात राहील असं म्हणाला, "अर्जुना, निसर्गानं अनेक वर्षं तपस्या करून उठविलेलं हे सुंदर वनरूपी धन दग्ध करताना मनाला तीव्र यातना होतात. त्या निर्माणाची ओढ असलेल्या जिवाला किती अस्वस्थ करतात, याचा अनुभव मी एकदा गोमंत पर्वतावर घेतला आहे. माझ्या जीवनातील हे दोन्ही प्रसंग मी कधीच विसरणार नाही. म्हणूनच निरुपायानं गोमंताचं वन नष्ट करण्याचा प्रसंग माझ्यावर आणलेल्या जरासंधाला मी कधीच क्षमा करू शकलो नाही. तुम्हा पांडवांना इंद्रप्रस्थाची राजधानी उठवून देण्यासाठी खांडववनाचा दाह करावा लागला, म्हणून दुर्योधन-शकुनीलाही मी क्षमा करू शकणार नाही. लक्षात ठेव, डोळ्यांना स्पष्ट दिसणारी घनदाट अरण्यं वणवा पेटवून नष्ट करण्याचा जसा प्रसंग येतो, तशी मानवी जीवनातील माजलेल्या अन्यायी अरेरावांची अरण्यंही नष्ट करावी लागतात. जीवन त्याशिवाय प्रवाही होत नाही. नव्या राजनगरातसुद्धा नियोजनबद्ध सुंदर वनं उठवावी लागतात."

या खांडववनातच मला वरुणराजाकडून कपिध्वजाचा, चार शुभ्र अश्वांचा नंदिघोष नावाचा रथ व गांडीव नावाचं अत्यंत सुलक्षणी असं धनुष्य दोन अक्षय्य भात्यांसह मिळालं. ते हाती येताच माझ्यापेक्षा त्यालाच झालेला विलक्षण आनंद मी कधीच विसरू शकलो नाही. कशी होती त्याची त्यावेळची आनंदी मुद्रा? आता इतक्या वर्षांनंतर आज कुठं कळतंय की, ती त्यानं राजसूय यज्ञात आम्हा सर्वांसमक्ष शिशुपालावर सुदर्शन प्रक्षेपित केलं, तेव्हाच्या त्याच्या मुद्रेसारखी होती. मला चर्चेत तो सतत लाभलेल्या गांडीव धनुष्याची महत्ता पटवत आला. एकदा तर त्यानं मला स्पष्ट सांगितलं की, 'एकांतात द्रौपदीला जपतोस त्याहून डोळ्यांत तेल घालून या दुर्लभ गांडीव धनुष्याला

जप!' त्यानंतर कितीतरी वेळा माझ्या मनात सतत विचार फिरत राहिला, तो त्याला लाभलेल्या दिव्य सुदर्शनाचा. कधी–कधी मी याच विचारात हरवून जाई की, त्याला लाभलेल्या बारा आऱ्यांच्या, वज्रनाभीच्या सुदर्शनाचा आणि ज्याच्या प्रत्यंचेच्या टणत्काराचा, रोमांच उभा करणारा ध्वनी दूरवर स्पष्ट ऐकू जातो, त्या माझ्या गांडीव धनुष्याचा, परस्परसंबंध काय असावा? माझा वर्ण त्याच्यासारखाच निळा – तापलेल्या लोहकांबेवर पाणी पडताच त्यातून साकळत जाणाऱ्या विविध रंगच्छटांसारखा का असावा? हा मूलभूत प्रश्न मनी उठला की, मी त्याच्याकडे कितीतरी वेळ नुसता बघतच राही. तेव्हा दर्पणात बघितल्यासारखंच मला वाटे. शेवटी त्याला एकच प्रश्न मी विचारी, "हृषिकेशा, तू आहेस तरी कोण? एकदातरी मला सांग, मी तुझा नेमका कोण आहे ते?"

तसं तो कितीतरी मोहक हसून म्हणे, "तू आहेस माझा प्रिय सखा! तुझ्यासारखाच दुसराही एक आहे –" त्याच्या डोळ्यांत खोलवर बघत मी पटकन म्हणे, "उधोदेव।" तसं वेगळ्याच छटेत हसून तो म्हणे, "बरोबर, माझ्या मनात काय आहे, ते तू अचूक ओळखतोस. म्हणूनच तू माझा प्रिय सखा आहेस."

सुभद्राहरणाच्या वेळी मी द्वारकेलगतच्या सोमनाथाच्या शिवालयात जाऊन बसलो होतो, तो त्याच्याच संकेतानं! संन्याशाच्या भगव्या वेषात होतो मी! मुखभर दाढी वाढलेला असा – 'सुभद्राहरण' या अभियानात त्याचे सर्व–सर्व संकेत मी काटेकोर पाळले होते. एकच गोष्ट मी माझ्या मनाच्या उमाळीनं केली होती. सोमनाथाच्या शिवालयातून निघून एका होडीतून खाडी पार करून द्वारका गाठली होती, सुभद्रेचं हरण करण्यापूर्वी त्याचा श्रीसोपानाचं एकदा डोळाभर दर्शन घेण्यासाठी. अंगच्या भगव्या वस्त्रामुळे त्या वेळी मला कुणीही द्वारकाकर ओळखू शकला नाही. सर्व चौक्या पार करत मी श्रीसोपानाशी आलो. केवढा झळझळीत आणि भव्य दिसत होता तो सुवर्णी सोपान! कितीतरी उंच, कितीतरी पायदंड्यांनी मंडित असा! मी त्याच्या सर्वांत खालच्याच – समोरच्या पायदंडीजवळ गेलो. अनेक संमिश्र भावनांनी माझं वक्ष भरून आलं. मी त्या पायदंडीवर आपलं मस्तक टेकून या श्रीसोपानाला मनोभावानं वंदन केलं. काही वेळ मस्तक या पायदंडीवर तसंच विसावून ठेवलं.

मला काहीही कल्पना नव्हती आणि अपेक्षाही नव्हती. कृष्णाच्या विचारांनीच मन भरलेलं असताना मी मान उचलली आणि बघतच राहिलो. त्या उंच श्रीसोपानाच्या शेवटच्या पायदंडीवर तो उभा होता – केवढातरी उंच. साक्षात श्रीकृष्ण! एकेक पायदंडी उतरत तो माझ्याजवळ आला. अद्याप मला कुणीही ओळखलं नव्हतं, पण त्यानं पहिल्याच दृष्टिक्षेपात ओळखलं. तसा तो एरवी कुठल्याच तापसाच्या खांद्यावर कधीच हात ठेवीत नसे. माझ्या डोळ्यांत खोलवर बघत मात्र त्यानं तो ठेवला. भोवतीच्या सेवकांना काहीही कळणार नाही असं मलाच कळेलसं बोलला, "योगिराज, आपणाला मी जाणतो. आपल्यासारख्या तापसाची सध्या रैवतकांना नितांत आवश्यकता आहे! आपण सत्वर तिकडे जावं. उद्याच माझी भगिनी सुभद्रा कुरुश्रेष्ठ दुर्योधनाशी होणाऱ्या शुभविवाहापूर्वी कुलदेवीचं दर्शन घेण्यासाठी तिकडे निघेल. तिला मी आपलंही दर्शन घेण्यासाठी सांगितलं आहे. तिला योग्य आशीर्वाद आपण द्यालच! द्यावेत!" मला हवा होता तो संकेत, हव्या त्या मुखातून मिळाला होता. माझ्यासाठी तो आशीर्वादच होता.

त्या क्षणापासून तो श्रीसोपान माझ्या मर्मबंधाची एक ठेवच झाला – जशी पुढे सुभद्रा झाली तसा!

अशा किती म्हणून घटना मी सांगाव्यात, ज्या कृष्णाचा प्रिय सखा म्हणून माझ्या अंत:करणावर शिल्पासारख्या कोरलेल्या आहेत. आम्हा पाचही पांडवबंधूंच्या पुत्रांच्या नामाभिधानासाठी तो न चुकता द्वारकेहून इंद्रप्रस्थात आला. युधिष्ठिराच्या पुत्राचं प्रतिविंध्य हे नाव कुंतीमातेनं ठेवलं. प्रतिविंध्य म्हणजे विंध्य पर्वतासारखा. कृष्णाबरोबर आलेल्या बलरामदादांनाही ते आवडलं. आम्हा सर्वांनाच ते आवडलं. पांडवांच्या तिसऱ्या पिढीतील पहिल्याच अंकुराचं नाव ठेवण्याचा अधिकार होता तोही कुंतीमातेचाच. भीमाच्या पुत्राच्या नामाभिधानासाठी तो बलरामदादा, त्याचा पुत्र प्रद्युम्न आणि त्याचे सख्खे दोन व सावत्र दोन अशा बंधूंच्या गोतावळ्यासह इंद्रप्रस्थात आला. भीमसेनाच्या या थोराड व सशक्त पुत्राचं नाव 'सुतसोम' ठेवण्यात आलं. 'भीम माझ्या शिष्य आहे. त्याच्या पुत्राचं नाव मी ठेवणार,' असं म्हणून हे नाव बलरामदादांनीच ठेवलं. ते 'सुतसोम' असंच का ठेवलं, याचं कारणही त्यांनी गमतीदार व पटेल असं दिलं. दादा म्हणाले, "आम्हा यादवांना सोम सदैव प्रिय! त्या सोमाचाच हा पुत्र आहे – म्हणून सुतसोम." ते पाहून हसत श्रीकृष्ण म्हणाला, "दादा, सोम म्हणजे चंद्र. हा चंद्रवंशी पांडवांचा पुत्र आहे, असंच तुला म्हणायचंय ना?"

माझ्या पुत्राच्या नामाभिधानासाठी तो उद्धवदेव, रुक्मिणीवहिनी आणि बलरामदादा यांच्यासह आला होता. माझ्या पुत्राचं नाव श्रीकृष्णानंच 'श्रुतकीर्ती' असं ठेवलं. त्याचं स्पष्टीकरण त्यानं असं दिलं की, "याच्या पित्याला – आमच्या अर्जुनाला उदंड कीर्ती संपादन करण्यासाठी अहोरात्र कष्टावं लागलंय. दिग्विजयात उभ्या आर्यावर्ताची भ्रमंती करावी लागलीय. त्याच्या या पुत्राला जन्मत:च ती लाभणार आहे. हा 'श्रुतकीर्ती' शिवाय अन्य असूच शकत नाही. जन्मत:च कीर्तिवंत!"

माझ्या खालच्या दोन्ही बंधूंच्या नकुल–सहदेवांच्या पुत्रांच्या नामाभिधानालाही तो आला. ही दोन्ही नावं ठेवली, ती आमच्या उधोदेवांनी. तीही कृष्णाचीच तशी इच्छा होती म्हणून! नकुलाच्या पुत्राचं नाव 'शतानिक' आणि सहदेवाच्या पुत्राचं नाव 'श्रुतसेन' असं उद्धवदेवांनीच ठेवलं. ही दोन्ही नावंही सार्थ होती.

आम्ही पाचही बंधू द्रौपदीच्या पाचही पुत्रांना भरभरून पुत्रप्रेम देत होतो. आमचं द्रौपदीवरचं प्रेम, सर्व पुत्रांचे सद्गुण हे जसं त्याचं कारण होतं, तसं आम्ही पाचही बंधू बालपणापासून पितृप्रेमाला वंचित होतो, हेही होतं. आम्हाला काही पित्याचं प्रेम मिळालं नाही. आमच्या जीवनात राहिलेली ही वाण पुत्रांना कधीच जाणवू नये, अशी आमची सर्वांचीच तीव्र इच्छा होती. पितृप्रेम हा विषय निघाला की, माझं मन दोघांच्याविषयी प्रगाढ आदरानं भरून येई. त्यातील पहिली व्यक्ती होती, कुंतीमाता! तिनं वनात काय किंवा इंद्रप्रस्थाच्या राजवास्तूत काय, आम्हाला काहीच कमी पडू दिलं नाही. दुसरी व्यक्ती होती, श्रीकृष्ण ही! तो आमचा मार्गदर्शक गुरू होता. जीवनदर्श ज्येष्ठ आतेबंधू होता. इतर बंधूंना नसेल, पण मला तीव्रपणे जाणवलं की, तो आमचा प्रेमळ पिताही होता!

माझ्यावरच्या त्याच्या प्रेमाला असे कितीतरी पैलू होते. मी कितीही प्रयत्न केला, तरी सगळेच्या सगळे काही मलाच समजून येत नसत.

माझ्या विषयीच्या त्याच्या मनातील दक्षतेचा आलेला प्रत्यय मला त्याच्या पितृप्रेमाची अनुभूती देऊन जाई. हे अनेकवेळा घडलं होतं. तरीही गिरिव्रजातील जरासंधाच्या अभियानात ते माझ्या मनावर फार ठसलं होतं. मागधांच्या त्या राजवास्तूत त्यानं पुढं घेतलं होतं, ते भीमसेनाला आणि स्वतःला, मला नाही!

जरासंधाशी द्वंद्व खेळण्याचा प्रसंग माझ्यावर आला असता तर? त्यानं बुद्धीच्या पराकोटीच्या कौशल्यानं हा जर–तरचा प्रश्न निकालात काढला होता.

द्रौपदीस्वयंवरात तो सहज म्हणू शकला असता, 'मी पण पूर्ण करणार आहे, पण त्या ब्रह्मपुत्राला दूर करा.' पण मी घेतलेल्या नुसत्या वीरासनावर त्यानं मला अचूक पारखलं आणि त्रयस्थ शांत प्रेक्षकाची भूमिका घेतली. हे त्याचं पारखणं एखाद्या पित्याला शोभणारंच होतं. त्यानं काहीही न बोलता माझ्यावर पुत्रवत प्रेम केलं होतं. अनेक प्रसंगी ते केवळ मलाच समजू शकेल, असं तो वागला होता. त्याच्यातील त्या पितृमनाला मी जीवनभर तेवढ्याच शोभेशा संयमानं आदराचा प्रतिसादही दिला होता.

त्याचे ज्येष्ठ बंधू बलरामदादा आम्हालाही दादाच वाटत. मी त्यांना दादाच म्हणत असे. मी एक बारकाव्यानं पाहिलं होतं, कृष्ण त्यांना 'दादा' म्हणे, तेही नाना पद्धतीचं होतं. एखादी चूक आपल्या बलरामदादांना दाखवून द्यायची असली की, तो अधिकच नम्र होई. प्रसंगी तो त्यांच्याशी संपूर्ण विरोधात उभा ठाके. मात्र त्या विरोधाची भाषा कधीच अनादराची नसे.

श्रीकृष्णाच्या आवडत्या, प्रिय पत्नी रुक्मिणीदेवी माझ्याही आवडत्या वहिनी होत्या. मला तर अनेकवेळा जाणवे की, श्रीकृष्णाची समोरच्याला मोहवून टाकणारी भाषा रुक्मिणीवहिनींमुळेच घडली असावी. तसं त्याला स्पष्टच विचारलं की, तो नुसताच हसे. रुक्मिणीवहिनींच्याकडे याचा काही शोध लागतो का म्हणून त्यांना चाचपून पाहिलं की, त्या त्याच्या हास्याचंच प्रतिबिंब वाटावं असं सत्त्वशील हास्य आपल्या गोल चर्येवर उधळीत म्हणत, "अर्जुना, ते कुणालातरी शक्य आहे काय? समुद्रात आपला गडवा ओतून त्याला कुणीतरी भरती आणू शकेल काय?"

रुक्मिणीवहिनी आणि द्रौपदी कोणत्याही कारणासाठी एकमेकींशी बोलत असल्या की, मी आपोआपच मूक श्रोत्याची भूमिका घेई. द्रौपदी बडबडी, ते बडबडणंही आग्रही. तिचा उत्साह कमी होऊ नये, याची दक्षता घेत रुक्मिणीवहिनी अधूनमधून एखादंच वाक्य बोलत. तेही प्रश्नासारखं असे. मग द्रौपदीचा वृषभरथ उधळून धावत सुटे. एक गंमत होती, त्या दोघीही मी ऐकतो आहे, याचं भानच विसरलेल्या असत. अशावेळी कृष्ण तिथे आला की, किमयेची कांडी फिरे. दोघीही एकदमच बोलायच्या थांबत. त्याच्याकडे नुसत्याच बघत राहात. मग तोही त्यांनी माझ्याकडे इतका वेळ दुर्लक्ष केलंय, याचं त्यांना कुशलतेनं भान देई. माझ्याशी एखाद्या चालू विषयावरच्या समस्येसंबंधी गंभीरपणानं बोलताना म्हणे, "आपल्या अभिमन्यूला चक्रव्यूहभेदनाचं इत्थंभूत ज्ञान आहे. माझ्याकडूनच तो ते शिकला आहे. पण केंद्रस्थानावरून चक्रव्यूहाच्या प्रथम कड्याकडे परतण्याचं ज्ञान मात्र त्याला नाही! त्याला घेऊन ये एकदा द्वारकेत. प्रात्यक्षिकच देता येईल त्याला."

आमच्या सर्व पांडवपुत्रांत अभिमन्यू वेगळाच होता. नवनवी शस्त्र व अस्त्रविद्या जाणून घेण्याची त्याला तीव्र ओढ होती. तसाच तो अतिशय विनयी होता. श्रीकृष्णाचा तो अत्यंत लाडका भाचा होता. त्याचंही आपल्या मामावर तेवढंच प्रेम होतं. त्याच्या

शब्दाबाहेर तो कधीच गेला नाही.

कुरुक्षेत्रावर माझी श्रीकृष्णाशी पहिली भेट झाल्यापासून मी एक सत्य अनुभवलं होतं. त्याचं जीवन म्हणजे सहस्रदली कमलपुष्प होतं. रोज वेगळंच दिसणारं, वेगळंच भावणारं, कणाकणानं रोज फुलत जाणारं!

जेव्हा–जेव्हा मी विचार करी की, सुभद्रेच्या आणि माझ्या विवाहात त्यानं बलरामदादांचा रोष पत्करूनही इतका रस का घ्यावा? त्याचं माझ्यावरचं निरपेक्ष प्रेम हे कारण तर होतंच, पण भगिनीवरचं असीम प्रेम हेही होतं. त्यानं मला एकही शब्द न विचारता माझ्या नि सुभद्रेच्या प्रेमभावाचा शोध कसा लावला होता, हे एक आश्चर्यच होतं. सुभद्रेला मी नंतर खोदून–खोदून विचारलं. तिनं दिलेली उत्तरं मला पूर्णत: अनपेक्षित होती. तिनं सांगितलं होतं – हरणापूर्वी कृष्णदादा प्रत्येक भेटीत तुमच्याबद्दल कसली ना कसली तक्रारच करीत आला. म्हणत आला, “तो पांडवांचा अर्जुन म्हणजे पट्टीचा घुम्या आहे. त्याच्यापेक्षा धनुर्धर म्हणून कवचकुंडलधारी अंगराज कर्ण, हिरण्यधनुपुत्र एकलव्य हे सरस धनुर्धर आहेत. इतर बंधूंपेक्षा धनुर्धर स्त्रीलंपट आहे. जाईल तिथे विवाह करून स्त्री आणतो!” सुभद्रेचे हे कथन ऐकताना मी हसत राही. तिचं सर्व सांगून झालं की म्हणे, “वेडी आहेस तू सुभद्रे. तुझ्या कृष्णदादाची, तुझं माझ्यावरचं प्रेम किती दृढ नि बळकट आहे हे पारखून घेण्याची, जगावेगळी हातोटी आहे ती. तुझ्या दादाच्या प्रत्येक कृतीकडे आणि शब्दाकडे जग कृष्णलीला म्हणून बघतं, ते उगीच नाही.”

सुभद्राहरणाच्या निमित्तानं मला झालेलं त्याच्या स्वभावाचं दर्शन, मी कधीच विसरू शकलो नाही. मी सुभद्रेचं हरण कसकसं केलं पाहिजे, याचे सर्व बारकावे त्यानंच ठरविले होते. त्याच्या कयासाप्रमाणे त्यातील एकही चुकला नव्हता. एखाद्या कुशल अभिनेत्याप्रमाणे मला नि सुभद्रेला भेटताना तो एक विशिष्ट भूमिका करीत होता. बलरामदादा आणि रेवतीवहिनींना भेटताना या वेळी तो दुसरीच भूमिका करीत होता. तात्पर्य तो एक कुशल अभिनेता होता. त्याच्या नाटयाचं नाव होतं ‘प्रेमयोग.’ गोकुळात गोप-गोपींच्यासाठी असो, मथुरेत यादवांच्यासाठी असो, आचार्य सांदीपनींच्या आश्रमात आश्रमकुमारांसाठी असो की द्वारका व इंद्रप्रस्थ उभं करताना यादव व पांडवांसाठी असो, किंवा ठिकठिकाणचे अन्यायी राजे निखंदण्यासाठी आर्यावर्ताची अथक भ्रमंती करताना असो – प्रत्येक वेळी आणि प्रसंगी त्याची साधना आणि आराधना होती, ती केवळ प्रेमयोगाची.

मला सुभद्राहरण करायला लावून पांडवांचे व द्वारकाकर यादवांचे संबंध दृढ व घनिष्ट करण्यात त्याची कितीतरी दूरदृष्टी होती. सुभद्रेशी विवाह झाल्यानंतर माझं द्वारकेला जाणं–येणं वाढलं.

द्वारकेच्या माझ्या अशा भेटीत एकदा एक गमतीदार प्रसंग घडला. मी द्वारकेत असतानाच हस्तिनापूराहून गुरुपुत्र अश्वत्थामाही केव्हातरी द्वारकेत आला. आल्या-आल्या कृष्ण, दादा, वहिनी सर्वांना भेटला. संध्याकाळी गुरुपुत्र अश्वत्थामा आणि श्रीकृष्ण त्याच्या गरुडध्वज रथातून समुद्रपुळणीवर सांध्य अर्घ्यदानासाठी गेले. सोबत दारुक होताच. तो रथ नि घोडे सांभाळत राहिला. अर्घ्यानंतर श्रीकृष्ण आणि अश्वत्थामा वाळूवर गप्पा मारत बसले. संध्याकाळचं तबकाएवढं सूर्यबिंब डुंबतीला आलं होतं, ते डोळाभर बघताना अचानक अश्वत्थाम्याला काय वाटलं कुणास ठाऊक? तो

कृष्णाला म्हणाला, “यादवश्रेष्ठ द्वारकाधीशा, या सूर्यबिंबासारखं तुझ्याजवळ जे तेजयंत्र सुदर्शन आहे, त्याचेच विचार नेहमी माझ्या मनात फिरत असतात. त्यासाठीच वेळात वेळ काढून, एवढा लांबवरचा प्रवास करून तुझ्या भेटीला आलो आहे मी. यादवा, मला इथे या समुद्रपुळणीवर बसल्या-बसल्या त्या सुदर्शनासह तुझं दर्शन घडवशील का? ते तुला या क्षणी शक्य आहे का?”

तो चमत्कारिक प्रश्न ऐकूनही कृष्ण त्याच्याकडे बघत मंद हसला. बसल्या बसल्याच तबकाएवढ्या सूर्यबिंबाकडे क्षणैक एकटक बघून त्यानं डोळे मिटले. तेजयंत्राच्या स्वर्गीय मंत्रांचं स्मरण केलं. त्याची चर्या कितीतरी तेजवंत दिसू लागली. क्षणार्धात समुद्राच्या गाजेत मुरलेले, दूरवरून ऐकू यावेत, असे विविध वाद्यांचे कल्लोळ त्या दोघांना ऐकू येऊ लागले.

गुरुपुत्र अश्वत्थामा डोळे विस्फारून भान हरपून बघतच राहिला. कृष्णाच्या वर उद्धरलेल्या उजव्या हाताच्या तर्जनीवर प्रचंड गतीचं तेजयंत्र फिरताना त्याला दिसू लागलं. ते बारा आऱ्यांचं, वज्रनाभीचं होतं. त्याचा प्रकाश आणि कृष्णाच्या मुखमंडलावरचा प्रकाश, यात काहीच अंतर नव्हतं. अश्वत्थाम्यानं ते तेज बघणं असह्य झाल्यानं गपकन डोळे मिटले. आता वाद्यांचा कल्लोळ कमी–कमी होत लुप्त झाला. श्रीकृष्णाच्या उजव्या बाजूशी वाळूवर त्यानं तर्जनीवर उतरलेलं तेच बारा आऱ्यांचं वज्रनाभीचं चक्र ठेवलं. ‘चक्र’ या शस्त्रासारखं दिसणारं सघन साकार सुदर्शन वाळूवर पहुडलं होतं. आता अश्वत्थामाही कितीतरी सावरला होता. डोळे फाडफाडून तो त्या साकार सुदर्शनाकडे बघतच राहिला. तो स्वत: ब्रह्मास्त्र आणि नारायणास्त्र या प्रबळ अस्त्रांचा अधिकारी होता. सुदर्शनावर खिळलेली दृष्टी न हलविताच त्यानं श्रीकृष्णाला प्रश्न केला, “द्वारकाधीशा, मी योग्य वाटत असेन, तर तुझं दिव्य सुदर्शनचक्र मला समंत्र देऊन टाक! तुझ्याकडे समोरच्या पश्चिम सागराएवढं विशाल मन असेल, तर या गुरुपुत्र अश्वत्थाम्याला आज हे सुदर्शन दान करून टाक!”

कधी नव्हे ती आणि कुणीच आणली नसती अशी सत्त्वपरीक्षेची सांजवेळ श्रीकृष्णावर गुरुपुत्रानं आणली होती. तरीही कृष्ण शांतचित्तच होता. तो हलकेच उठला. चालत समुद्रापर्यंत गेला. त्याच्या विविध शुभचिन्हांनी अंकित गुलाबी तळपायांचे ठसे पश्चिमसागराच्या ओल्या वाळूवर क्रमश: रांगेत उमटत गेले. त्या ठशांमध्ये इकडे—तिकडे सरकलेला, कसातरीच पडलेला वाकडा—तिकडा असा एकही ठसा नव्हता. जसा काही प्रत्येक ठसा हा मावळतीच्या सूर्याचं रूप घेऊनच उमटला होता!

कृष्णानं वाकून ओंजळभर सागरजल उचललं. त्याच्या कंठातील वैजयंती व कौस्तुभमणीधारी मौक्तिकमाला ओळंबल्या. मस्तकीच्या सुवर्णमुकुटातील मोरपीस समुद्रवाऱ्यावर फडफडलं. गेला तसा चालत येत, त्यानं ओंजळीतील सागरजल वाळूवरच्या साकार सुदर्शनावर डोळे मिटून मंत्र म्हणत धारेनं वाहिलं. सूर्यदेव आणि सागरदेव यांच्या साक्षीनं आपलं प्राणप्रिय सुदर्शन अश्वत्थाम्याला दान केलं. आता कृष्णाची चर्या कितीतरी समाधानानं पूर्ववत झाली. तो नेहमीसारखं हसून गुरुपुत्राला म्हणाला, “गुरुपुत्र अश्वत्थामा, तुला हे सुदर्शन सांभाळणं व नेणं शक्य असेल, तर ते समवेत घेऊन जा. आजपासून ते तुझं झालं आहे.”

एव्हाना उठून उभा राहिलेला, साकार सुदर्शनावर दृष्टी खिळून पडलेला अश्वत्थामा कितीतरी उत्साहानं पुढे झाला. वाकून त्यानं श्रीकृष्णाच्या त्या साकार सुदर्शनाला हात

घातला. सर्व सामर्थ्य एकवटून तो वीर ते उद्धरू बघू लागला. श्रीकृष्णाचं ते साकार सुदर्शन त्याला तसूभर काही हलता हलत नव्हतं!! त्याच्या चर्येवर विचित्र भाव उमटले. क्षणभर थांबून, उठून वाळूतच मागे सरकून, त्यानं अधरीयाचा काचा कसून घेतला. कक्षबंधन करून, निर्धारी मनानं तो सिद्ध झाला. सर्व सामर्थ्य आणि मन एकवटून पुन्हा त्या साकार सुदर्शनाला भिडला. सुदर्शन काही तसूभरही हलत नव्हतं. तो महारथी वीर नाना प्रकारानं सुदर्शन उद्धरण्याचे प्रयत्न कर करून घामाघूम झाला. थकून, वाळूतच गुडघे टेकून खाली बसला. तो पराकोटीचा किंकर्तव्य आणि ओशाळा झाला होता. मावळतीला सूर्यबिंब डूंबलं होतं. श्रीकृष्णानं पुढे होऊन अश्वत्थाम्याच्या घामेजल्या पाठीवर प्रेमळपणे आपला गुलाबी तळहात ठेवला. क्षणैक त्याची पाठ हळूवार थोपटून तो हलकेच म्हणाला, “चल, निघू या!”

अश्वत्थामाही काहीच न बोलता आज्ञाधारकासारखा उठला. पुढे होत त्याने श्रीकृष्णाचे चरणच धरले. म्हणाला, “तुझं तुलाच लखलाभ होवो हे सुदर्शन हृषिकेशा... तुझ्याशिवाय अन्य कुणालाच ते लाभणार नाही. दयावंत हो आणि ते परत घे.”

त्याला प्रेमानं वर उठवून त्याचे खांदे थोपटत कृष्ण हसला. डोळे मिटून काहीतरी मंत्र पुटपुटून म्हणाला, “घेतलं.” दोघेही गरुडध्वजाकडे चालू लागले. कृष्णानं मध्येच वळून मागे बघितलं. संध्येच्या अंधूक प्रकाशात, पुळणीच्या वाळूवरचं साकार सुदर्शन निराकार झालं होतं! ते मावळलेल्या सूर्यबिंबाला भेटण्यासाठी तर गेलं नसावं?

श्रीकृष्णानंच स्वमुखे हा प्रसंग जेव्हा मला सांगितला, तेव्हा त्याच्या सहस्त्रदली कमलपुष्पासारख्या अगणित व्यक्तिमत्त्वातील एक पाकळी मला दिसली. त्यानं ही घटना दुसऱ्या कुणालाच सांगितली नाही. तेही त्याच्या तोंडून ऐकताना माझ्यातील एका अदृश्य अर्जुनाचा शोध मला लागला. एवढा श्रीकृष्ण माझ्या जवळच्या सहवासात होता, त्याला राजसूय यज्ञात सुदर्शनाचं प्रक्षेपण करताना मी प्रत्यक्ष पाहिलं होतं. अक्षय्य भात्यासह सुलक्षणी गांडीव माझ्याजवळ होतं. मी नारायणास्त्र व पाशुपतास्त्र यांचा अधिकारी होतो. तरी मला श्रीकृष्णाच्या सुदर्शनाचा असा लोभ कधीच झाला नव्हता. तसा विचार चुकूनही कधी मनी आला नव्हता, येणार नव्हता. उलट माझ्याकडील धनुष्य आणि अस्त्रं प्रसंगी मी त्याच्या चरणांशी आनंदानं वाहिली असती. या अश्वत्थाम्याला बघताना, त्याच्याशी बोलताना, नेहमीच मला त्याचे पिता गुरू द्रोणांची आठवण होत असे. गुरू द्रोण म्हणजे साक्षात धनुर्वेद होते. शस्त्रास्त्रांचं त्यांचं ज्ञान, सागरासारखं अथांग होतं. त्यांचं आम्हा कौरव—पांडव शिष्यांवरील प्रेमही गुरूला शोभेसं होतं. त्यांच्या स्वभावातील दोनच जागा दुर्बल होत्या. त्यांचं पुत्रप्रेम आणि प्रतिशोधाची भावना या. त्यांचा पुत्र अश्वत्थामा एकुलता एक होता. त्यामुळेच असेल त्यांना तो प्राणप्रिय होता. आपल्या सर्व शिष्यांत त्यांनी आम्हा दोघांनाच सर्वश्रेष्ठ असं ब्रम्हास्त्र शिकवलं. मला आणि अश्वत्थाम्याला. अन्य कुणालाच त्यांनी या अस्त्रासाठी योग्य मानलं नाही.

गुरू द्रोणांची प्रतिशोधाची भावना इतकी तीव्र होती की, पूर्वी, मित्र असून दरिद्री झालेल्या त्यांचा स्नेही म्हणून स्वीकार करायला द्रुपदराजांनी नकार दिला होता. या अवमानाचा प्रतिशोध घेण्याची प्रतिज्ञाच गुरू द्रोणांनी केली होती. आम्हा कौरव—पांडवांचं शस्त्रास्त्रविद्येचं शिक्षण त्यांच्या हाताखाली पूर्ण झालं. गुरुदक्षिणा

म्हणून त्यांनी आम्हा कौरव-पांडवांकडे मागणी घातली ती – "त्या द्रुपदराजाला बंदिवान करून माझ्यासमोर आणा – तीच गुरुदक्षिणा." कारण होतं ते हे की, पूर्वी एकदा दरिद्री द्रोणांचा स्नेह द्रुपदराजांनी अव्हेरला होता. द्रोण तो अवमान विसरले नव्हते. त्यांची ही मागणी आता पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा लागला, तो मलाच. द्रुपदांना बंदिवान करून गुरूंसमोर 'गुरुदक्षिणा' म्हणून मी सादर केलं. पुढे हेच पांचालराज द्रुपद – द्रौपदीचे पिता माझे श्वशुर झाले! मला वाटलं होतं, त्यांना मी बंदिवान केल्याची काहीतरी अढी त्यांच्या मनात असेल. पण तसं काहीच घडलं नव्हतं. याचं नेमकं कारण मात्र मला बरेच दिवस कळलं नव्हतं. पुढे कधीतरी ते द्रौपदीकडूनच समजलं. पांचालराज द्रुपदांच्या मनी माझ्याविषयी पूर्वी घडलेल्या

गुरू द्रोणांची प्रतिशोधाची भावना इतकी तीव्र होती की, पूर्वी, मित्र असून दरिद्री झालेल्या त्यांचा स्नेही म्हणून स्वीकार करायला द्रुपदराजांनी नकार दिला होता. या अवमानाचा प्रतिशोध घेण्याची प्रतिज्ञाच गुरू द्रोणांनी केली होती. आम्हा कौरव–पांडवांचं शस्त्रास्त्रविद्येचं शिक्षण त्यांच्या हाताखाली पूर्ण झालं. गुरुदक्षिणा म्हणून त्यांनी आम्हा कौरव-पांडवांकडे मागणी घातली ती – "त्या द्रुपदराजाला बंदिवान करून माझ्यासमोर आणा – तीच गुरुदक्षिणा." कारण होतं ते हे की, पूर्वी एकदा दरिद्री द्रोणांचा स्नेह द्रुपदराजांनी अव्हेरला होता. द्रोण तो अवमान विसरले नव्हते. त्यांची ही मागणी आता पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा लागला, तो मलाच. द्रुपदांना बंदिवान करून गुरूंसमोर 'गुरुदक्षिणा' म्हणून मी सादर केलं. पुढे हेच पांचालराज द्रुपद – द्रौपदीचे पिता माझे श्वशुर झाले! मला वाटलं होतं, त्यांना मी बंदिवान केल्याची काहीतरी अढी त्यांच्या मनात असेल. पण तसं काहीच घडलं नव्हतं. याचं नेमकं कारण मात्र मला बरेच दिवस कळलं नव्हतं. पुढे कधीतरी ते द्रौपदीकडूनच समजलं. पांचालराज द्रुपदांच्या मनी माझ्याविषयी पूर्वी घडलेल्या अन्य घटनांमुळे तीव्र रोष होता. तो रोष माझ्यावरच्याच नव्हे, तर आम्हा सर्व बंधूंवरच्या प्रेमात रूपांतरित कसा झाला? तर ही सर्व किमया श्रीकृष्णाची होती!

द्रौपदीनं आम्हा पाचांची पत्नी व्हावं, हेही द्रुपदांना मान्य नव्हतं. आपल्या पित्याचा तसा रोष धृष्टद्युम्नानं स्पष्ट बोलूनही दाखविला होता. पुढे आम्हा पाच बंधूंचे द्रौपदीशी विवाह, रोज एक याप्रमाणे कांपिल्यनगरातच झाले. द्रुपदांनीच ते करून दिले. हे गारूडसुद्धा श्रीकृष्णाचंच होतं.

त्यासाठी धृष्टद्युम्नाला कृष्णानं दोन्ही वेळा मध्ये घातलं होतं. पांचाल राज्यात स्वत: उद्धव, बलरामदादा यांच्यासह अनेकवेळा श्रीकृष्ण गेला होता. द्रौपदीच्या बंधूला – धृष्टद्युम्नाला त्यानं नाना कारणांसाठी द्वारकेत पाचारण केलं होतं. यादवांच्या सुधर्मा राजसभेत त्याचा अनेकवेळा उंची वस्त्रं व निवडक शस्त्रं देऊन सत्कार केला होता. त्याहून अधिक श्रीकृष्ण त्याला सतत एकच ऐकवीत आला होता – 'पांचाल युवराज धृष्टद्युम्ना, तुझ्या विक्रमाचा योग्य गौरव झालेला नाही. लक्षावधी पांचालांचा तू तरुण नेता असून, तुला योग्य मान आजवर मिळालेला नाही. मी तो देईन. त्या गौरवानं तू अजर होशील, अमर होशील!' या सर्व गोष्टी कधी द्रौपदीकडून, कधी धृष्टद्युम्नाकडून मला समजल्या होत्या.

असाच द्रौपदीच्या संदर्भात इंद्रप्रस्थात घडलेला एक भावपूर्ण प्रसंग होता. तोही

कृष्णानंच मला सांगितला. त्या वेळी तो रुक्मिणीवहिनींसह इंद्रप्रस्थात आला होता. आमच्या 'अभि'वर त्याचं अतिशय प्रेम होतं. एके दिवशी त्याला घेऊन आपल्या गरुडध्वज रथातून तो संपूर्ण इंद्रप्रस्थ राजनगराचा फेरफटका करून आला. आमचं इंद्रप्रस्थ तेव्हा नुकतंच नांदतं झालं होतं. आमचे अमात्य येईल त्या अभ्यागताला आमच्या राजवास्तूतील वेगवेगळे कक्ष, त्याच्यातील स्थापत्यशास्त्राचे बारकावे सांगत फिरून दाखवीत. कृष्णालाही ते तसेच दाखवू लागले. सोबत रुक्मिणीवहिनीही होत्या. त्या होत्या म्हणून द्रौपदी व सुभद्राही होत्या. त्यांच्यासह ते आमच्या 'श्रीकृपा' सभेत आले. राजसभेत ते नाव आम्ही का ठेवलं आहे, हे अमात्यांनी स्पष्ट करून सांगितलं. ते ऐकून तो हसत म्हणाला होता, "पांडवांचं माझ्यावरचं प्रेम समजू शकतो मी. ते आहेत कुरुकुलाचे वंशज. कुरुकुल हे चांद्रकुल आहे – सोमकुल आहे. या राजसभेला 'कुरुकृपा' म्हटलं असतं, तरीही चाललं असतं. तुमची ही 'श्रीकृपा' – 'श्री'चा एक अर्थ 'चंद्र'ही आहे! मी तुमची ही राजसभा 'श्रीकृपा' म्हणजे 'चांद्रकृपा' असं मानतो!"

राजवास्तूनंतर आमचे अमात्य त्या सर्वांना वस्त्रागार, धान्यागार, कोशागार असं दाखवीत चालले. श्रीकृष्णाबरोबर असलेला अभिमन्यू आपल्या मामांना नाना प्रश्न विचारीत होता. आपलं कुतूहल त्याच्याकडून समाधानकारक उत्तरं घेऊन शांतवीत होता. ते सर्व शेवटी शस्त्रागारात आले. तिथे आम्हा पांडवांची वेगवेगळी आवडती शस्त्रं रांगेनं मांडली होती. माझ्या शस्त्रांच्या विभागात कितीतरी धनुष्यं रांगेनं उभी केलेली होती. प्रत्येकाच्या जवळ बाणानं भरलेले तूणीर होते. त्यातील 'सूची' म्हणजे डोळ्यासारख्या बारीक लक्षयाचा भेद घ्यायचा बाण, 'जिह्म' म्हणजे नागमोडी शेपटामुळे तसाच नागमोडी सरसरत जाणारा बाण, 'गजास्थी' म्हणजे हत्तीच्या हाडाचा बाण, 'चांद्रमुख' म्हणजे आकाशातल्या चंद्रकोरीसारखे बाण, अशा विविध बाणांची अत्यंत उत्साहानं भाच्याला माहिती देत कृष्ण चालला होता. शेवटी तो 'बस्तिक' बाणांच्या भात्याजवळ आला. या बाणाचं वैशिष्टच होतं – त्याचं धारदार पातं लक्षयात रुतून राही. शेपटाला मळसूत्री तिढा असल्यामुळे फिरवून तो तिढा सैल करताच, बाणाचं शेपूट तेवढं हातात येई. या बाणाच्या अग्राला युद्धसमयी विषारी द्रव्यं माखली जात. त्यांची लाकडी नळी या भात्याशेजारीच रथावर ठेवली जाई. ही सगळी माहिती अभिमन्यूला देऊन बस्तिक बाणाचं मुख लक्षयात कसं रुतून बसतं, हे दाखविण्यासाठी कृष्णानं भात्यातील एक बस्तिक बाण उचलला.

त्या बाणाचं मळसूत्र बरेच दिवस तो न हाताळल्यामुळे घट्ट बसलं होतं. ते पटकन काही निघायला तयार नव्हतं. त्यानं तो बाण तसाच अभिमन्यूच्या हाती दिला. त्याला मळसूत्र फिरवायला सांगितलं. अभिनंही खटपट केली. त्याला यश आलं नाही. ते मळसूत्र गंजल्यामुळे पक्कं बसलं होतं. अभिमन्यूची खटपट थांबविण्यासाठी अमात्यांनी तो हाती घेतला. त्यांनाही यश आलं नाही! आता मात्र हसतच श्रीकृष्णानं तो बाण पुन्हा आपल्या हाती घेतला. खालचा ओठ दातांखाली दाबून धरत कृष्ण बस्तिक बाणाच्या पृष्ठाचं गंजलेलं मळसूत्र फिरविण्याच्या खटपटीला लागला.

मळसूत्र फिरलं पण – पण – बाणाच्या धारदार पात्याचं टोक त्याच्या गुलाबी, लांबसडक बोटांतील तर्जनीत घुसलं. तर्जनीतून रक्ताची धार लागली. उपस्थित स्त्रियांतील तिघीही – द्रौपदी, रुक्मिणीवहिनी, सुभद्रा, 'चक्ऽ चक्ऽ' करत एकदम पुढे धावल्या. अमात्यही गोंधळले. अभिमन्यू आपल्या मामाकडे बघत विव्हळला.

कुणालाच काहीही सुचत नव्हतं. सुभद्रा रुक्मिणीला म्हणाली, “बोट दाबून धरा. रक्त जाऊ देऊ नका. मी आलेच वस्त्रपट्टी घेऊन.” ती धावतपळत आपल्या कक्षाकडे निघून गेली. रुक्मिणीवहिनींनी बोटावरची रक्तधार अंगठ्यानं दाबून धरली.

द्रौपदीनं मात्र कसलाही अनमान न करता अंगावरच्या भरजरी अंशुकाचा पदर टर्रकन फाडला. पुढे होत रुक्मिणीवहिनींचा अंगठा आपल्या प्रिय सख्याच्या तर्जनीवरून दूर केला. हातच्या भरजरी वस्त्रपट्टीनं लागलीच व्रण आवळून रक्तधार थोपवली.

श्रीकृष्ण – जो आपल्या याच तर्जनीनं बारा आऱ्यांचं वज्रनाभीचं सुदर्शन तोलत होता, तो वस्त्रपट्टीकडे हसत बघू लागला. इतक्यात सुभद्रा हाती वस्त्रपट्टी घेऊन परतली. श्रीकृष्णानं तिघींच्याकडेही हसून शांतपणे बघितलं. तो द्रौपदीकडे बघत म्हणाला, “वस्त्रापेक्षा रक्त मोलाचं हे तुला कळलं. वस्त्रासाठीच रक्तही सांडावं लागतं, हेही योग्यवेळी कळेल!”

मला आठवतो तसा श्रीकृष्ण माझं संपूर्ण मन व्यापून राहिला, तो क्षण म्हणजे शिशुपालवधाचा. त्या वेळी मी त्याला सुदर्शनधारी तेजवंत रूपात प्रत्यक्ष समोर पाहिलं. मी किंवा कुणीच कधीही ऐकली नव्हती, अशी शिशुपालानं केलेली त्याची निर्भर्त्सना अक्षम्य होती. याच वेळी मला श्रीकृष्णातील सर्वांत मोठ्या दुर्मीळ गुणाचा प्रत्यय आला. तो गुण होता संयम! शिशुपालाला त्यानं वारंवार सावध करून त्याचे नव्व्याण्णव अपराध सहन केले. जीवनभर तो मामा कंस, जरासंध, नरकासुर अशा कित्येक नरेशांच्या तोंडून ‘गवळट’ हा हेटाळणीचा निर्देश ऐकत आला होता. तरीही शांतपणे त्यानं तो हसत झेलला होता.

तो एकदा का निर्धारी झाला की, त्याची चर्या शतकोटिसूर्यसमप्रभ तळपते, याचा प्रत्यक्ष अनुभव शिशुपालवधप्रसंगी मी घेतला. त्याचं ते मत्स्यनेत्र मिटलेलं सुदर्शनधारी अपार तेजस्वी रुपडं माझ्या मनावर कधीही पुसलं न जाण्यासाठी उमटलं, ते त्या क्षणी. अत्यंत विचारपूर्वक मी त्याच क्षणी माझ्या जीवनाचं नीलकमल निर्धारानं त्याच्या चरणी अर्पूनही टाकलं.

शिशुपालवधापूर्वीचा अर्जुन आणि नंतरचा अर्जुन मलाच वेगवेगळा वाटत आला आहे.

मी श्रीकृष्णाच्या अधिकाधिक जवळ जाण्याचा दुसरा प्रसंग होता सुभद्राहरण —आणि तिच्याशी माझा विवाह हा. त्या वेळी मी आम्हा बंधूंच्या ठरलेल्या आचार-संहितेतल्या एका नियमाचा भंग केल्यामुळे तीर्थयात्रेवर होतो. या तीर्थयात्रेच्या प्रवासात माझे उलूपी आणि चित्रांगदा यांच्याशी विवाह झाले होते. हा प्रत्येक विवाह करण्यापूर्वी मी त्याच्याकडून वेळोवेळी भेटणाऱ्या दूतांकडून त्याची निःसंदिग्ध संमती घ्यायला चुकलो नव्हतो. याच कारणामुळे असेल, सुभद्रेच्या दुर्योधनाशी घाटत असलेल्या विवाहाच्या वेळी त्यानं मला द्वारकेकडे पाचारण केलं होतं. मी संन्यासी वेषात आनर्तात कसं उतरावं, भालका तीर्थाजवळ समुद्रकाठी सोमनाथाच्या शिवालयात एक योगी-संन्यासी-तापस म्हणून कसं राहावं, हे सर्व त्यानं योजलं तसं घडलं होतं.

सुभद्रेचं हरण करून मी इंद्रप्रस्थात परतलो. मला सर्वाधिक चिंता होती, ती

सुभद्रेमुळे मानिनी व आग्रही द्रौपदीची प्रतिक्रिया काय होईल, ही! तिच्या तडक व स्पष्टवक्त्या स्वभावाप्रमाणे ती मला धारेवर धरणार, हे स्पष्टच होतं. कदाचित तिनं श्रीकृष्णालाही तसं धारेवर धरलं असतं. तिच्या या संभाव्य रोषासाठी मी माझं मन बांधूनही घेतलं होतं. तिला काय-काय नि कसकशी उत्तरं द्यावी, हे मनोमन योजूनही ठेवलं होतं. पण ही सर्व तयारी व्यर्थ ठरली. तिनं श्रीकृष्णाची भगिनी म्हणून सुभद्रेचं मन:पूर्वक स्वागतच केलं! स्त्रियांच्या मनाचा काहीच ठाव लागत नाही, हे मला तेव्हा कळून चुकलं. द्रौपदीनं सुभद्रेचं स्वागत केलं, सुभद्रा माझ्या पत्नीएवढीच द्रौपदीची भगिनी झाली!

सुभद्राविवाहानंतर तिच्यासह मी पहिल्याच दिवाळसणासाठी जामात म्हणून द्वारकेत आलो होतो. केवढं-केवढं कौतुक केलं होतं यादवांच्या स्त्री-पुरुषांनी माझं! शिशुपालवध जसा सदैव लक्षात राहिला, तशीच ही द्वारकाभेटही!

त्या वर्षीचा कोजागिरी पौर्णिमेचा दिवस होता. संध्याकाळी जामात म्हणून अमात्य विपृथूंकडून श्रीकृष्णानं मला आपल्या कक्षात पाचारण केलं. दूध व फलाहार होताच यादवांची एक विशेष प्रथा मला समजावून सांगितली. म्हणाला, “प्रिय पार्था, यादवांनी केलेल्या कौतुकामुळे हुरळून जाऊ नको. पाण्यात पडल्यावर पोहता येतं, तसं यादवांचा जामात झाल्यावर रासही खेळता आला पाहिजे. आज रात्री द्वारकेतील मुख्य उद्यानातील सरोवराकाठी तुला माझ्या व बलरामदादा, उधोसह रास खेळावा लागेल. रासाच्या नृत्याची यादवांच्या नृत्यशिक्षकाकडून जमेल तेवढी माहिती करून घे. समरांगणात गांडीव धनुष्य चालवणं जेवढं कौशल्याचं आहे, विसरू नको – तेवढंच कौशल्याचं आहे हे रास खेळणं.”

कोजागिरीचा तबकाएवढा सुंदर चंद्र द्वारकेच्या गगनमंडलावर उगवला. आज झाडून सारे स्त्री-पुरुष द्वारकाकर नगराच्या मध्यभागीच्या प्रमुख विशाल उद्यानातील सरोवराकाठी जमले. काही संगीततज्ज्ञ यादवांनी आठ-आठ हात खोलीचे खड्डे खणले होते. आतून ते चिकणमाती व चुनकळीने लिंपून घेण्यात आले होते. चारी बाजूंनी कमावलेली वृषभकातडी ताणून त्या खड्ड्यांच्या मुखावर बसविली होती. युद्धातील दुंदुभीसारखे हे प्रचंड भूनगारेच तयार करण्यात आले होते. त्याला मंडल टाकून आठ-आठ उघडेबंब, पीळदार, नगारावादक यादव बसले होते. त्यांच्या दोन्ही हातांशी शिंगं, तुतारी, झांजा अशी वाद्यं घेतलेले वादकही बसले होते. संपूर्ण उद्यान तेवत्या दिवल्यांच्या रोषणाईने उजळून निघाले होते. मोठमोठ्या चुल्यांवर चढविलेल्या काहिलीत पांढराशुभ्र गोरस उकळून शांत झाला होता. द्वारकेतील सुधर्मा राजसभेलगतच्या राजवास्तूच्या कक्षाकक्षांतून स्त्री-पुरुष, बालकं बाहेर पडत होती. त्यांनी ठेवणीतील रंगीबेरंगी भरजरी वस्त्रं परिधान केली होती. आज संध्याकाळीच राणीवशाच्या कक्षातून माझ्या सातही वहिन्या महाराणी रुक्मिणीवहिनींच्या कक्षात आपापल्या पुत्रांसह एकवटल्या होत्या. त्या रुक्मिणीवहिनींची अनुज्ञा मिळताच पुत्रांसह एकेक करीत वेगवेगळ्या रथातून प्रमुख उद्यानाकडे जाऊ लागल्या. उद्यानाच्या पूर्वेकडील प्रशस्त द्वाराशी अमात्य विपृथू यादव राजमंडळातील सर्व स्त्री-पुरुषांचं स्वागत करण्यासाठी अगत्यानं उभे होते. त्यांच्या उजव्या हाती यादवांचा रत्नखचित, सुवर्णी कुसरदार राजदंड होता.

मध्यरात्र जवळ आली. ते विशाल उद्यान संपूर्ण भरून गेलं. यादव स्त्री-पुरुष, बालकं यांच्या कलकलाटामुळे समुद्राची गाजही ऐकू येईनाशी झाली. रासासाठी एकवटलेला, उत्साहानं कलकलता यादव समुदाय आता केवळ दोनच रथांची प्रतीक्षा करीत होता. सत्तूच्या पिठासारखं शुभ्र दाट चांदणं फेकणारा चांद्रमणीही अधीर झाला होता – चांद्रवंशीय कृष्णचंद्राचं व रुक्मिणीवहिनींचं मुखमंडल बघायला. आमच्या पुढेच रथ होता, तो रासाचे आजचे प्रमुख मानकरी असलेल्या वसुदेव महाराजांचा! त्यांच्या सुशोभित राजरथात ते, दोन्ही महाराण्या आणि आमचे उधोदेव बसले होते. वृद्ध झालेल्या महाराजांची पांढरीशुभ्र भरगच्च दाढी समुद्रवाऱ्यावर फरफरत होती.

मागच्या गरुडध्वज रथात आम्ही होतो. श्रीकृष्ण, रुक्मिणीवहिनी, सुभद्रा आणि मी! रथनीडावर हाती प्रतोद घेतलेला दारुक होता. मेघपुष्प, बलाहक, सुग्रीव, शैब्य – चारही चांदणशुभ्र अश्वांना तो मंद-मंद हाकीत होता.

आम्ही रासाच्या उद्यानात आलो. अमात्य विपृथूंनी आमचं स्वागत केलं. आजच्या रासाचे विशेष अभ्यागत प्रमुख मानकरी होतो आम्ही – मी आणि सुभद्रा. वसुदेव महाराज, दोन्ही महाराण्या, श्रीकृष्ण, रुक्मिणीवहिनी व उधोदेव यांच्यामागून आम्ही जोडप्याने चाललो. दुधाच्या तयार काहिलीजवळ आलो. श्रीकृष्णानं एक लाकडी पळी आणि तसराळं हाती घेतलं. गर्गमुनींनी मंत्रघोष उठविला. तो संपताच 'जय इडादेवीऽऽ!' म्हणत श्रीकृष्णानं काहिलीत पळी खुपसली. सागपर्णासारखी दाट साय तसराळ्यात घेतली. गडव्यानं त्यावर दूधही ओतलं. ते तसराळं रासाचा प्रसाद म्हणून त्यानं मानकरी जामात या नात्यानं माझ्या हाती दिलं. पाठोपाठ रुक्मिणीवहिनींनी तसलंच तसराळं सुभद्रेच्या हाती दिलं.

आम्ही अवीट गोडीची ती दाट साय चाखली. आकंठ गोरस प्यालो. आमच्या मागून राजमंडळातील सर्व स्त्री–पुरुषांना तो प्रसाद वाटण्यात आला. राजमंडळाचं वाटप संपताच ठिकठिकाणी चुल्यावर चढविलेल्या काहिलीतील गोरसावर यादवांचे तांडे 'जय इडाऽऽ' असा एकच कल्लोळ करीत तुटून पडले. फुलमालांनी सजलेल्या रासमंडलात शुभ्रदाढीधारी वसुदेवबाबा उतरले. त्यांनी ज्येष्ठ मानकरी म्हणून 'जय इडाऽऽ' म्हणत कुंकुमाची ओंजळ गगनमंडलात उधळताच नाना वाद्यांचा रासघोष कल्लोळत उसळून उठला. आज रासमंडलात प्रथम निवडकच स्त्री-पुरुष होते. ते सर्व राजमंडळातीलच होते. त्यात काही काळासाठी वसुदेवबाबा व आता वृद्ध झालेल्या, तरीही उत्साही देवकी व रोहिणीमाता होत्या. श्रीकृष्णाभोवती रुक्मिणीवहिनींसह भामा, जांबवती, सत्या, मित्रविंदा, लक्ष्मणा, कालिंदी, भद्रा अशा सर्व वहिन्या होत्या. विशेष म्हणजे कामरूप स्त्रियांची प्रतिनिधी म्हणून कशेरूसुद्धा होती. मी रासात भाग घेण्याचा हा पहिलाच योग होता. काही चुकू नये म्हणून श्रीकृष्णाला वंदन करण्यासाठी उधोदेव व सुभद्रेसह त्याच्यासमोर गेलो. पूर्ण फुललेल्या चंद्राच्या शुभ्रधवल चांदण्यात, तो नरातील कृष्णचंद्र मला फार-फार वेगळा दिसला. असा तो मला पूर्वी कधीच दिसला नव्हता!

मी त्याचा चरणस्पर्श घेताच त्यानं मला हलकेच वर घेतलं. आज त्याच्या मस्तकावर नेहमीचा सुवर्णमुकुट नव्हता. होता मस्तकाभोवती घट्ट आवळलेला एका रानवेलीचा मुकुट. त्यात त्याचं प्रिय मोरपीस चंद्रकिरणांत उजळत होतं. मी त्याच्या मत्स्यनेत्रांत एकटक पाहिलं. नेहमी सूर्यकिरणांची सतत उधळण करणारे त्याचे नेत्र या क्षणी शांतशीतल चांद्ररस संथपणे पाझरवीत होते.

मला निमूट बघून तो हसला. आजही त्यानं मला कोड्यात घालणारा प्रश्न विचारलाच. म्हणाला, “सख्या अर्जुना, या क्षणी द्रौपदी असती, तर मी काय केलं असतं, माहीत आहे तुला?” मी चक्रावलोच! माझ्या डाव्या हाताशी रासमंडलात त्याची भगिनी सुभद्रा असताना त्याला स्मरण झालं होतं, द्रौपदीचं!

“काही कळत नाही, तू काय केलं असतंस या क्षणी! तुझं बोलणंच काहीवेळा कळत नाही. मग प्रत्यक्ष करणं कसं कळावं?”

तो कोजागिरीच्या प्रसन्न चांदण्यात प्रसन्न हसला. काही न बोलताच त्यानं आपल्या वक्षावरची टपोरी, सतेज वैजयंतीमाला उतरविली आणि माझ्या कंठात चढवीत तो हळुवार म्हणाला, “द्रौपदीचा – माझ्या प्रिय सखीचा प्रतिनिधी म्हणून मला प्रिय ही वैजयंतीमाला आजच्या दिवसाचा मानकरी म्हणून तुझ्या कंठी चढविली आहे! ठाऊक आहे तुला, मला ही कुणी दिली ते?”

“नाहीऽऽ!” मी पुन्हा चक्रावलो.

“गोकुळीच्या राधिकेनं – माझ्या प्रिय सखीनं,” तो पुन्हा हसला. रासनृत्याची लय धरण्यासाठी त्यानं वाद्यवृंदाला संकेत केला. मी तिसरा पांडव – यादवांचा जामात जमेल तसा रास खेळू लागलो, सुभद्रेसह! तो सराईतासारखा रास खेळू लागला – सर्वच स्त्री-पुरुषांशी! क्षणात इथे तर क्षणात तिथे, असा सर्व रासभर तो आणि तोच दिसू लागला. आकाशीचा चंद्र चढत चालला. मी कधीच विसरलो नाही, असा रास रंगत चालला!!

दिवाळसणाहून इंद्रप्रस्थात परतताच मी कुंतीमातेला भेटलो. तिला द्वारकेचा वृत्तान्त सांगताना मी रास खेळल्याचं सांगितलं. कृष्णानं रासमंडलात कधी कुणाच्याच कंठात घातली नाही, ती वैजयंतीमाला माझ्या कंठात कशी घातली, हा वृत्तान्त तिला आवर्जून दिला. तो ऐकताना ती मंदसर हसली. मला आज पहिल्यानं जाणवलं, तिच्या हास्यात श्रीकृष्णाच्या हास्याच्या प्रतिबिंबाची छटा आहे. वसुदेवमहाराज आणि देवकी व रोहिणीमाता यांचं क्षेमकुशल विचारून मग ती म्हणाली, “त्यानं तुझ्या कंठात आपली वैजयंतीमाला घातली, याला खूप अर्थ आहे. अर्जुना, तो केवळ रासमंडलातच रास खेळतो, असं मानण्याची चूक कधीच करू नकोस. तो जीवनभर रासच खेळत आला आहे आणि पुढेही खेळेल. त्यानं तुझ्याच कंठात सर्व यादवांच्या साक्षीनं वैजयंतीमाला चढविली, याचा नीट अर्थ कळला काय तुला?”

“म्हणजे?” मी तिला विचारलं.

“अर्जुना, तो भविष्यात कसलातरी मोठाच रास खेळणार आहे. त्यात तुझ्याकडे प्रमुख भूमिकेचं दायित्व येणार आहे! लक्षात असू दे, क्षत्रियांना सेनापतीपद देताना त्यांच्या कंठात माला चढविली जाते. त्याने कसलाही विधी न करता तुला भविष्यात सेनापतींचा सेनापती केल्याचं मूकपणे घोषित केलं आहे – तेही रासमंडलात!”

माझ्या कुंतीमातेचं असं बोलणं मी बालपणापासून ऐकत आलो होतो. तिचं म्हणणं ऐकून मी विचारात पडलो. जो काही मी घडलो होतो, तो तिच्याच संस्कारी बोलांनी!

बालपणी केव्हातरी गंधमादन पर्वतावर असताना आमच्या पर्णकुटीत एकदा रात्री इंगुदीच्या तेलाची पणती वाऱ्यानं विझली. आम्ही पाचही बंधू भोजनाला बसलो होतो. समोर रानकेळीची पानं होती. तिनं वाढलेले अवीट गोडीचे पदार्थ त्यात होते. माझे चारही

बंधू तिनं चुलीतील अग्नीने पणती पुन्हा पेटवीपर्यंत थांबून राहिले. मी अंधारातच जेवत राहिलो. तिने पणती समोर आणून ठेवेपर्यंत माझं अर्धअधिक भोजन झालंही होतं, ते बघून भूकही न आवरणारा भीमसेन म्हणाला, "अंधारातच कसा काय जेवलास तू, धना?" मी विचारांच्या तंद्रीतच होतो. पानाकडे बघत राहिलो. त्याला काय सांगावं कळत नव्हतं.

तसं कुंतीमाता सर्वांनी स्पष्टीकरण देत म्हणाली, "पुत्रांनो, सर्व गोष्टी सरावानं साध्य होतात. अर्जुनाला ते आपोआप साध्य झालं आहे. जेवताना उजेड असला काय किंवा नसला काय, हात तोंडाशीच जाणार हे त्याच्या आपोआपच अंगवळणी पडलं आहे. तो एकदा समजलेली गोष्ट कधीच विसरणार नाही. तुम्हीही याचा पडताला घ्या." असं म्हणून तिने पेटविलेली पणती फुंकर घालून पुन्हा विझविली. म्हणाली, "जेवा आता रोजच्या सरावानं." आम्हा सर्व बंधूंचं भोजन त्या अंधारातच अचूक पार पडलं होतं. काही वेळानंतर तिने पुन्हा पणती पेटविली. समोर पूर्ण स्वच्छ झालेली केळपानं होती. तिच्या चर्येवर आम्ही पूर्वी कधीच न पाहिलेली तेजाळ छटा उमटलेली होती.

जसे कुंतीमातेचे होते, तसेच आचार्य द्रोणांचेही आमच्यावर जीवनोपयोगी सखोल संस्कार झाले होते. त्यांनी एकदा वृक्षावर टांगलेल्या पेंढा भरलेल्या पक्षयाच्या डोळा आम्हा शिष्यांना एकाच बाणात वेधायला सांगितला.

प्रत्येकानं बाण चढवून प्रक्षेपणाचा पवित्रा घेताच गुरुवर्य विचारीत, "तुला काय दिसतं बाणाच्या अग्रावर?" प्रश्नाचा रोख कुणाच्याच ध्यानी न आल्यामुळे कुणी झाडाची पानं दिसतात, फांद्या दिसतात, अन्य कितीतरी पक्षी दिसतात, आकाश दिसतं अशी उत्तरं दिली होती.

मी त्यांना म्हणालो होतो, "मला त्या पक्षयाच्या डोळ्याला माझ्या बाणाचं अग्र भिडल्याचं स्पष्ट दिसतं आहे!" ते ऐकून गुरुदेव माझ्यावर प्रसन्न झाले होते. मला आवाजाचा लक्षयभेद त्यांनी परिश्रमपूर्वक शिकविला होता. मला आयुष्यात असे आणखी दोनच लक्षयवेधपारंगत धनुर्धर ऐकून माहीत होते – एकलव्य आणि दुसरा सूतपुत्र कर्ण!

हस्तिनापुरातील किशोरवयीन संस्कारशील दिवस आम्हा पाचही बंधूंच्या मनावरून कधीच पुसले गेले नाहीत. निसर्गाचा एक नियम आहे. प्रत्येक जिवामध्ये भोवतीच्या जगाबद्दल एका कुतूहलापोटी अनेक प्रश्न निर्माण होतात. या प्रश्नांची उकल करतच तो पूर्णत्वाकडे सरकत असतो. पुरुषाच्या अंगी वीर्यशक्ती निर्माण झालेली असते. स्त्रीच्या अंगी स्त्रीत्व साकारलेलं असतं. प्रत्येकाच्या जीवनातील हा टाकीचे घाव घेणारा संस्कारशील होण्यापर्यंतचा कालखंड अत्यंत महत्त्वाचा असतो. माणूस जो काय म्हणून असतो, तो घडतो याच काळात. आमचं हे वय कुरूंच्या राजनगरात गेलं होतं. आमचे दिग्विजयी पिता सम्राट पांडू यांच्याविषयी हस्तिनापूरकरांच्या मनात अत्यंत आदरभावना होती. तेच प्रेम आम्हाला स्त्री–पुरूष नगरजनांकडून या काळात ओंजळी भरभरून मिळालं.

महाराज कुरूंनी फार वर्षींपूर्वी उठविलेल्या राजवास्तूत आम्ही सर्व कुरुकुटुंबीय राहत होतो. हस्ती, कुरू, अजमीढ अशा विक्रमी, प्रजाहितदक्ष आणि सत्शील पूर्वजांची थोर परंपरा लाभलेलं हे कुरुकुल होतं. ते या ना त्या कारणानं नष्ट होत असताना, प्राणपणानं

त्याचं रक्षण केलं होतं पितामह भीष्मांनी.

पितामह भीष्म चालते–बोलते साक्षात धनुर्वेद होते. आपल्या पित्याला – शंतनुमहाराजांना दिलेल्या वचनाप्रमाणे प्रतिज्ञेनं आजन्म ब्रह्मचारी होते. विक्रमात तर आपले गुरू साक्षात भगवान परशुरामांचा पराभव करून, त्यांनी पुरुषार्थाची हिमालयाची उंची गाठली होती. कुरूंच्या वैभवी राजवास्तूत राहूनही ते एका निश्चयी राजयोग्याच्या पदवीला पोहोचले होते. हस्तिनापुरातही त्यांचा दिनक्रम हिमालयातल्या ऋषिमुनींसारखा होता. या वयातही ते ब्राह्मी मुहूर्तावर उठत. न चुकता गंगास्नान करून प्रातःकर्म आटोपत. परमेश्वराचं स्मरण करून वेगवेगळी पुरश्चरणं करीत. मग दान चौथऱ्यावर उभं राहून हस्तिनापुरात आलेल्या देशोदेशीच्या गणराज्यांतील अतिथींना वस्त्रं, अलंकार, गायी अशी दानं करीत. मग आम्हा कौरव–पांडवांच्या शस्त्राशालेत येत. कधी त्यांच्याबरोबर महात्मा विदुर असत, कधी राजसारथी संजय असत, कधी देशोदेशीहून आलेले नरेश, सेनापती असत, कधी त्यांच्यासारखेच शुभ्र दाढीधारी दिसणारे तपस्योतेजस ऋषिमुनी असत. ते शस्त्रास्त्राशालेत आले की, आचार्य द्रोण आणि कृप आदतनं सामोरं जाऊन हसतच त्यांचं स्वागत करीत. शस्त्रशाला कशी भरून जाई! आम्हा एकशे पाच राजपुत्रांची ते नावनिशीवार कसून प्रगती विचारत. आमच्याबरोबर कृपाचार्यांच्या शिष्यपथकात असलेल्या, तेजस्वी दिसणाऱ्या सूतपुत्र कर्णाचीही विचारपूस करीत. द्रोणपुत्र अश्वत्थामा तर त्यांचा आवडता होता.

त्या किशोरवयात आमचे सर्वांत मोठे आदर्श होते, गंगापुत्र पितामह भीष्म. त्यांचा रथ शस्त्रशालेत प्रवेशताना दिसताच मी पाखरासारखा धावत जाई. त्यांची चरणधूली सर्वांत अगोदर घेणाऱ्या मला पटकन उठवून माझ्या केशावळीवर सडक बोटांचा उजवा हात ठेवत ते म्हणत, ‘विजयी भव पांडुपुत्र’ . तसे ते क्वचितच हसत. पण त्या क्वचितप्रसंगी त्यांच्या पांढऱ्याशुभ्र भरगच्च दाढीमुले व धवल दंतपंक्तींमुळे हिमालयाचा उंच सुळका सूर्यकिरणांत उजळून निघताना बघितल्याचा आनंद होई. मी त्यांचा प्रत्येक शब्द कानांचे शिंपले करून मनःपूर्वक ऐकून घेई. आमच्या कुंतीमातेबद्दल ते अत्यंत आदरानं व गौरवानं बोलत. त्यांच्या धाकामुळेच आम्हा सर्व द्रोणशिष्यांचं शस्त्रास्त्राचं शिक्षण निर्दोष आणि काटेकोर झालं होतं. पितामहांचं एक वैशिष्टच मला जाणवलं होतं, ते निर्मत्सरी होते. त्यामुळेच अजातशत्रूही होते. पितामह भीष्म हे एकूणच कुरुकुलाच्या पिढ्यापिढ्यांचं पुण्याईसंचित होतं. त्यांचं सदेह वावरणं, रात्री गगनमंडलात नसलेला सूर्य उद्या लाखो किरणं उधळीत पूर्व क्षितिजावर दिसणारच आहे, इतकं आश्वासक होतं. केवळ हस्तिनापुरात नव्हे, तर दूरदेशीच्या गांधारापासून संपूर्ण आर्यावर्तात ते ‘पितामह’ म्हणूनच विख्यात होते. माझ्या सुप्त मनावर या पितामहांचा फार मोठा प्रभाव होता.

त्यामुळेच असेल, त्यांच्या तोंडून माझ्या सर्वथा आदर्श असलेल्या श्रीकृष्णाला त्यांनी सर्वप्रथम ‘वासुदेव’ म्हणून संबोधलं आहे, हे मी कधीच विसरू शकलो नाही. माझ्या सुप्त मनावर सर्वाधिक श्रीकृष्ण ठसून बसला, त्याला कारणच हे असे पितामह होते.

आम्हा कुरूंचे महाराज धृतराष्ट्र हा एक भल्याभल्यांना न उलगडणारा महाग्रंथ होता. विचार आणि कृती या दृष्टीने मी पाहिलेल्या राजमंडळातील पितामह भीष्म आणि श्रीकृष्ण यांचं जीवन घटनासंपन्न होतं. यांची चरित्र म्हणजे एकेक महाग्रंथच होते.

तरीही या महाग्रंथांतील पानन्पान मी वाचू व समजू शकलो होतो. महाराज धृतराष्ट्र हा एकमेव असा महाग्रंथ होता, ज्याच्या पहिल्याच प्रकरणात – राज्य व पुत्रलोभ नावाच्या – मीही जीवनभर घोटाळत राहिलो. या घूटमळण्यातून फार पुढे कितीतरी वर्षांनी मला सुखरूप बाहेर काढलं, ते श्रीकृष्णानं!

महाराज धृतराष्ट्र अंध होते का? आता मला भरपूर अनुभवानंतर स्पष्ट वाटतंय – ते मुळीच अंध नव्हते. त्यांच्या अंतश्चक्षूंनी एकमेवच स्वप्न नाना ढंगात पाहिलं. ते होतं, आपला ज्येष्ठ पुत्र दुर्योधन हस्तिनापूरचा अभिषिक्त सम्राट झाला आहे, हे पाहणं. मला विश्वास आहे, तसं झालं असतं, तर दुसऱ्याच दिवशी हस्तिनापूर त्यागून त्यांनी वानप्रस्थ स्वीकारला असता. मला असं सतत वाटे की, माझ्या जीवनातील महाराज धृतराष्ट्र ही एकमेव अशी व्यक्ती आहे, जी आपल्या पाणथरलेल्या मिचमिच्या डोळ्यांनी जणू आक्रोशून मला सतत सांगते आहे की, 'पुत्रा अर्जुना, आवाजाचा लक्षयभेद करण्यात निष्णात आहेस. माझ्या हृदयाचा हा आक्रोश तुला कसा ऐकू येत नाही! माझी एकमेव इच्छा आहे, माझ्यानंतर माझा पुत्र दुर्योधन हस्तिनापूरच्या सिंहासनावर बसावा. त्यात आडवे येणारे तुम्ही पांडव जसे वनातून अचानक आलात, तसे वनातच परत निघून जावेत.' माणसं स्वार्थापोटी अंध होतात. कुरूचा हा राजा राज्यस्वार्थापोटी मनानं अहोरात्र डोळसच राहिला. स्वप्न बघत राहिला, ते एकमेव पुत्राच्या राज्याभिषेकाचं!

प्रथम–प्रथम मला आश्चर्य वाटे की, कोणीही स्त्री-पुरुष त्यांच्या कक्षात गेलं की, त्यानं नाव न सांगताच ते त्याला पटकन ओळखत. हे कसं काय शक्य होत होतं त्यांना? तर सर्वसामान्यपणे प्रत्येकाला पंचेंद्रियं असतात. हस्तिनापूरच्या या वरवर सौजन्यपूर्ण बोलणाऱ्या महाराजांच्या ठायी एक सहावं इंद्रियं होतं! कुणालाच कधीही न दिसणारं. त्याचं नाव होतं, राज्यस्वार्थ हे!

जरी महाराज धृतराष्ट्रांना चुकूनही मी कधी 'काका' म्हटलं नाही, तरी त्यांच्या महाराणींना – गांधारीदेवींना अनेकवेळा माझ्या तोंडून 'काकी' म्हणणं चुकलं नाही. जेवढी आणि जशी आम्हा पाचही पांडवांना कुंतीमातेविषयी प्रेमाची आदरभावना वाटत होती, तशीच या काकींविषयीही वाटत होती. त्यांनीही आमच्यावर तसंच निखळ प्रेम केलं. जसा श्रीकृष्णाचा सर्वांत प्रिय योग होता, प्रेमयोग हा! तसाच 'प्रेमयोग' हा अत्यंत प्रिय असा मनोभाव होता, गांधारीमातेचा. कधी-कधी माझ्या मनात असाही विचार येऊन जाई की, द्वारकेच्या श्रीकृष्णाच्या यादव गोतावळयात आमची ही माता उपजली असती तर! कल्पनाच करवत नाही इतक्या महत्पदाला ती पोहोचली असती. प्रत्येक स्त्रीसारखं तिनंही जीवनभर एक स्वप्न पाहिलं. आपल्या ज्येष्ठ पुत्राला – दुर्योधनाला सद्बुद्धी सुचली आहे, असं! तिचं ते स्वप्न कधीच साकार झालं नाही – होणारही नव्हतं.

दुर्योधनासंबंधी विचार करताना आताशा मला एका चमत्कारिक विचारानं छळलं होतं, त्याच्यावर विचार करणं हीसुद्धा एक छळवणूकच आहे, हे प्रकर्षानं जाणवलं होतं, आताशा मला वाटे, तो शंभरावा कौरव म्हणून जन्मता तर? कधी-कधी वाटे, तो आमच्यातीलच सहावा पांडव झाला असता तर? पण त्याच्या शब्दकोशात जर-तरला अर्थच नव्हता. एखाद्या माजलेल्या एकल रानवराहासारखं त्याचं मन आणि जीवन होतं,

मनात विचार आला किंवा शकुनीमामांनी भरविला की, तो एकच जाणत असे, समोरच्या पांडवांना सरळ धडक देणं! अशी धडक देताना तो कसलाच विचार करीत नसे.

आमच्या कुरुकुलाच्या कीर्तिचंद्राला खग्रास ग्रहणासारखं ग्रासलं होतं, ते एकाच व्यक्तीनं – गांधारमामा शकुनीनं! तो नखशिखांत कुटिल होता. महाराज धृतराष्ट्रांना एक सहावं इंद्रिय होतं – राज्यस्वार्थाचं. यालाही एक सहावं इंद्रिय लाभलं होतं, अभिजात कुटिलतेचं! त्याच्या कुटिलतेचं अचूक वर्णन एकाच कल्पनेत करता येईल – विंचवाचं कालकूट विष भरलेलं असतं ते त्याच्या वाकड्या नांगीत. या गांधारदेशीच्या विंचवाच्या नसनसेतील कणाकणांत एक कुटिलतेचा नांगीवक्र विंचू भरला होता! हा इतका विषारी होता की, जगाच्या कल्याणासाठी समुद्रमंथनातून आलेलं विष प्राशन करणारा शिवशंकर नीलकंठ याला कधीकाळी भेटला असताच तर! डोळे मिचकावून त्यालाही हा म्हणाला असता, "प्रभो, कंठ वगळता तुम्ही केवढे गौररूप सुंदर! हा निळा कंठ तेवढाच डागासारखा तुमच्या मुखमंडलावर विरूप दिसतो. माझ्या वैद्यकशास्त्रातील गांधारी गुरूनं मला एक दिव्य औषधी दिली आहे. तिचा लेप दिला, तर आपला नीलकंठ क्षणात पार्वतीदेवींच्या वर्णासारखा गौर होईल. मात्र या लेपाचा वर्ण 'कृष्णकाळा' आहे. भोलेनाथांनी त्याच्याकडे न बघण्याची कृपा करावी!"

गांधारदेशीच्या या वैदूनं दिलेला हा लेप केसाळ काळ्या नागसर्पाच्या साठविलेल्या विषासारखाच असता. साक्षात शिवालाही तो सोसला असता की नाही, शिवच जाणे!

शकुनी होत्याचं नव्हतं करण्यात अत्यंत निष्णात होता. मला एक कोडं कधीच उलगडलं नाही की, या गांधारीमातेसारख्या सत्त्वशील भगिनीला हा एवढा कुटिल कपटी बंधू कसा काय लाभला होता? त्या दोघांना क्वचित एकत्र बघताना मला प्रकर्षानं स्पर्शून जाई की, माणसाच्या जन्माचं त्याच्या हाती काहीही नसतं.

हस्तिनापुरातील माझं, बंधूंचं आणि श्रीकृष्णाचं एकमेव विसाव्याचं ठिकाण होतं, ते म्हणजे महात्मा विदुर व त्यांचं हस्तिनापूरच्या सीमेलगतचं साधंच, पण सुरेख निवासस्थान. जसं त्यांचं घरं साधं, स्वच्छ होतं; तसंच त्यांचं मनही होतं. त्यांच्या पत्नी पारसवीदेवी त्यांना शोभेशाच होत्या. महामंत्री विदुर अतिशय विद्वान होते, तपःशुचित होते आणि त्याचबरोबर व्यवहारदक्षही होते. त्यांच्या विद्वत्तेचं तेज त्यांच्या चर्येवर सदैव फाकलेलं असे. त्यांची मुद्रा मला सदैव द्वारकेतील उद्धवदेवांचं स्मरण करून देई. आम्ही सर्व पांडवबंधू आदरानं त्यांना 'विदुरकाका' म्हणत होतो.

विदुरकाका कुरूंचे महामंत्री झाले नसते तर? तर नक्कीच ते श्रीकृष्णाच्या सांदीपनी किंवा घोर आंगिरस अशा गुरूंच्या महत्पदाला केव्हाच पोहोचले असते. त्यांची ही पात्रता जाणूनच पितामह भीष्मांनी त्यांना हिमालयात जाण्यापासून रोधलं होतं. त्यांच्या बोलण्यात नेहमी नाव ऐकू येई, ते श्रीकृष्णाचं! हस्तिनापुरातील ज्या काही थोड्यांना श्रीकृष्ण हे कसल्या सत्याचं नाव आहे, हे माहीत होतं – स्पर्शून गेलं होतं, त्यातील पितामह भीष्म व महात्मा विदुर हे दोघं होते.

जेव्हा–जेव्हा एक क्षत्रिय वीर योद्धा म्हणून, शिष्य म्हणून गुरू द्रोणांचा विचार मी करतो, तेव्हा–तेव्हा कदंबाच्या डेरेदार वृक्षाखालचा विशाल यमुनाडोह माझ्या डोळ्यांसमोर उभा ठाकतो. या डोहाचं पाणीही सूर्यकिरणांत झमझम तळपणारं. डोह थांग न लागणारा. त्यांच्या जीवनचरित्रातील तीन गोष्टींचा उलगडा मला कधीच झाला

नाही. त्यातील पहिली होती, ती त्यांनी अश्वत्थामा व मी यात पुत्र व शिष्य अशा केलेल्या विभागणीची. मी त्यांचा परमप्रिय शिष्य होतो म्हणजे पुत्रासारखाच होतो. माझ्या गुणवत्तेच्या बळावर त्यांच्या पुत्राच्या कंकणभर वरचढच होतो. हे गुण मूकपणे हेरून त्यांनी आपल्या पुत्राला गुप्तपणे ब्रह्मास्त्र दिलं, हे मी कधीच विसरू शकलो नाही.

दुसरी गोष्ट होती, ती त्या घृणास्पद द्यूतप्रसंगाच्या वेळची. त्या वेळी द्रौपदीनं त्यांना दोन्ही हात पसरून रडत-भेकत विनवलं होतं. तिचे ते शब्द आठवले की, आजही अंगभर कसा काटा सरकतो. ती त्या वेळी त्यांना म्हणाली होती, “आचार्य द्रोण, तुम्ही या सर्वांचे आचार्य आहात. आपल्या गुरूपणाची शपथ घालून या दुर्योधन-दु:शासनाला आवरा. द्यूत खेळण्याचा मूर्खपणा केलेल्या माझ्या पतीला सावरा. कुरूंची ही स्नुषा – आपली कन्या, आपले दोन्ही हात पसरून आपल्या लज्जेची भिक्षा आपल्याकडे मागते आहे.” मात्र गुरू द्रोण, पितामह भीष्मांकडे नुसते बघतच राहिले. त्यांच्या डोळ्यांतील ‘या सभागृहातील पुरुष हे अर्थाचे दास आहेत’, ही विवशता बघून तिने फोडलेला हंबरडा मी कधीच विसरू शकलो नाही.

तिसरी गोष्ट होती, ती त्यांनी शिष्य म्हणून कर्ण व एकलव्य या दोन ज्ञानोत्सुक व परिश्रमाची क्षमता असलेल्या तरुणांचा केलेला अव्हेर. तोही त्यांच्या जन्माच्या ज्ञातीवरून. गुरू म्हणून त्यांचं कसलंही मार्गदर्शन लाभलेलं नसताना या दोघांनीही पुढे आपली अलौकिक गुणवत्ता सिद्ध केली होती. एकलव्यानं तर त्यांची मृत्तिकामूर्ती बनवून तिच्या साक्षीनं धनुर्विद्येची घनघोर साधना केली होती. आवाजाचाही लक्षयवेध घेण्यात तो माझ्यासारखाच पारंगत झाला होता. एके दिवशी मृगयेच्या निमित्तानं त्याच्या लक्षयवेधाचं हे लाघव, आम्हा सर्व बंधूंच्या समक्ष गुरू द्रोणांना बघायला मिळालं. एकलव्यानं पाच बाण अशा कौशल्यानं कमी-अधिक दाबानं एकापाठोपाठ एक फेकले होते, तेही एका सतत भुंकणाऱ्या श्वानाच्या मुखात की, त्याच्या धनुर्वेधाच्या या कौशल्यानं त्या भुंकणाऱ्या श्वानाची जीभ व पडजीभ यांना एवढासुद्धा आघात न होता बाणांनी अशी जखडून टाकली होती की, त्या प्राण्याची श्वानवाचा बंदच झाली होती! हे अमोघ शरलाघव अद्वितीयच होतं. ते बघताना मला तरी वाटलं, आपल्या स्कंधावरचं धनुष्य एकलव्याच्या चरणांशी ठेवावं.

गुरू द्रोणांनी मात्र आपण कसलंही शिक्षण न दिलेल्या त्या अद्भुत शिष्यवराकडे चक्क त्या क्षणीच गुरुदक्षिणेची मागणी केली. मला तर ती तेव्हाच कशीतरीच वाटली. पुढे जीवनभर वाटत राहिली. गुरू द्रोणांनी त्या वनवासी शिष्याकडून त्याच्या उजव्या हाताचा अंगठा गुरुदक्षिणा म्हणून मागितला. त्यानंही तो आपल्या समक्ष डाव्या हातानं कापून, तत्काळ त्यांच्या चरणांपाशी ठेवला. या आर्यावर्त देशी यापूर्वी असं कधीच घडलं नव्हतं, पुढे घडेल की नाही सांगता येत नव्हतं. ती अजोड गुरुदक्षिणा गुरुचरणी ठेवताना ज्या आत्मतेजानं एकलव्याचे डोळे तळपले होते, ते तेज मी कधीच विसरू शकलो नाही.

पुढे केव्हातरी गुरू द्रोणांकडूनच मला समजलं की, हे सर्व अघटित माझ्यामुळे व माझ्यासाठीच घडलं होतं. माझ्यापेक्षा कोणीही धनुर्धर वरचढ होऊ नये, याची दक्षता म्हणूनच त्यांनी ती अद्भुत गुरुदक्षिणा मागितली होती.

त्या दिवशीच माझ्या मनी दोन चमत्कारिक विचार येऊन गेले. एकीकडे मी ऐकून होते की, कर्ण हा असाच आवाजाच्या अचूक लक्षयवेधाचा अधिकारी होत चालला आहे.

तो द्रोणांचा शिष्य नव्हता; होता कृपाचार्यांचा! द्रोणांच्या आग्रहामुळे कृपाचार्यांनी त्याच्याकडे अशी काही गुरुदक्षिणेची मागणी घातली असती की – तुझ्या अंगावरचं अभेद्य कवच मला गुरुदक्षिणा म्हणून दे, तर! ज्याचं कारण सांगता येणार नाही असा विश्वास मला वाटला की, त्यानंही ते उतरून असंच गुरुचरणी ठेवलं असतं. दुसरा विचार आला, तो श्रीकृष्णाविषयीचा. सांदीपनींऐवजी आचार्य द्रोण त्याचे गुरुवर्य असते तर? त्यांनी अशी काही मागणी श्रीकृष्णाकडे घातली असती, तर! काय उत्तर दिलं असतं, एक निस्सीम आज्ञाधारक शिष्य म्हणून आपल्या गुरुवर्यांना श्रीकृष्णानं? मला पूर्ण विश्वास आहे, अशा वेळी तो नेहमीसारखं खट्याळ हसून म्हणाला असता – "माझ्या अल्पमतीप्रमाणे रक्तलांच्छित गुरुदक्षिणा गुरू कधीच स्वीकारीत नसतात! माझी तर इच्छा आहे, अंगठा चरणी ठेवण्याची! डाव्या हातानं तो छेदणं मला साधणार नाही. शिवाय गुरुचरणांवर माझं रक्त सांडलेलं मला आवडणार नाही. तेव्हा गुरूंनीच कृपावंत होऊन माझा हा अंगठा छेदून घ्यावा!! मला गुरुदक्षिणेच्या संस्कारातून आपणच मुक्त करून जीवन-साफल्यासाठी आशीर्वाद द्यावा!"

गुरू द्रोणांचे दोन आप्त माझ्या मनावर दोन वेगवेगळ्या रूपात ठसले होते. एक त्यांचे मेहुणे कृपाचार्य हे! ते गुरूंइतकेच कुरुकुलाचे पुरोहितही होते. त्यामुळेच असेल, त्यांचा ओढा राजकुलाच्या धार्मिक विधींकडे अधिक होता. गुरुपुत्र अश्वत्थामा हे दुसरं टोक होतं, कुणालाच नाही, अशी एक जन्मसिद्ध देणगी त्याला लाभली होती. त्याच्या मस्तकावर ब्रह्मरंध्राच्या ठायी एक लालसर मांसल मणी होता. तो कुणाच्या दृष्टीस पडू नये, म्हणून आपल्या मस्तकावर तो एक वस्त्रपट्टी घेत असे. तो बराचसा कर्णाच्या सान्निध्यात असे. कधी–कधी कृष्णबंधू उद्धवदेव हस्तिनापुरातच येत. मग त्याचा सगळा वेळ त्यांच्याच सहवासात जाई. मला हा अश्वत्थामा सतत सर्वांहून वेगळा वाटत आला. कसा, ते मात्र खूप विचार करूनही समजलं नाही. म्हणून पुढे इंद्रप्रस्थात मी एकदा श्रीकृष्णाला विचारलंही – "माधवा, गुरुपुत्र अश्वत्थामा तुला कसा वाटतो? त्याच्याविषयी तुझं मत काय?" तसं अशा प्रश्नांना एरवी त्यानं हसत खोचकपणे जसं उत्तर दिलं असतं, तसं उत्तर दिलं नाही. क्वचितच होई तशी त्याची मुद्रा गंभीर झाली. तो म्हणाला, "खरंतर तो गुरुपुत्रही नाही आणि अश्वत्थामाही नाही. आहे चंद्रावरच्या शाश्वत डागासारखा!" त्याच्या बोलण्यातील एकही शब्द काही मला त्या वेळी कळला नव्हता. म्हणून माझ्या अंगच्या धनुर्धर चिकाटीनं मी त्याला पुन्हा एकदा विचारलं, "तू बोललास यातील एकाही शब्दाचा अर्थ मला कळला नाही." तेव्हा मात्र नेहमीसारखं खट्याळ हसून तो म्हणाला, "सर्वच गोष्टी कळल्या पाहिजेत, असं कुठे आहे धनंजया? काही-काही वेळा अर्जुना, अज्ञानातही अपार सुख असतं!" त्याचं हे विधानसुद्धा मला विचार करायला लावून गेलं.

आमचा ज्येष्ठ बंधू युधिष्ठिर याचा इंद्रप्रस्थातील राज्याभिषेक झाल्यानंतरची आमची काही वर्षं स्वर्गीय सुखात गेली. श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनाखाली आमच्या नव्या गणराज्यानं सावध आणि प्रगतिशील असं अंग धरलं. पहिल्या अर्ध तपाच्या काळातच द्रौपदीला आम्हा पाचही बंधूंपासून पाच तेजस्वी पुत्र झाले. त्यांच्या चैतन्यमय बाललीलांनी इंद्रप्रस्थाची राजवास्तू गजबजून गेली. या काळात आम्ही बंधूंनी पत्नीशी एकांताचे काही नियम केले होते. माझ्या हातून त्या नियमाचा एकदा भंग झाला. त्यामुळे मला एक वर्षं तीर्थयात्रेसाठी इंद्रप्रस्थ सोडावं लागलं. या वेळी मी

आर्यावर्तातील पूर्वदेशीचा प्रवास केला. या प्रवासात अक्षय्यवट, वशिष्ठपर्व आणि तुंगनाथ या तीर्थांच्या ठिकाणी मी सविध पापक्षालन केलं. पूर्वेकडची एकेक तीर्थे पाहात नैमिषारण्यात येऊन पोहोचलो. तेथील उत्पालिनी, नंदा, अपरनंदा, कौशिकी, महानदी आणि गायत्री अशा नद्यांत मंगलस्नांन केली. शेवटी अवघ्या भारतवर्षानं पावन मानलेल्या गंगा नदीत स्नानासाठी उतरलो.

'गंगा: पुनातु माम्।' म्हणत तिच्या उबदार पाण्यात डुबकी घेताना, हस्तिनापुरातले दिवस आठवले. तिथे याच नदीच्या पात्रात आम्ही सर्व भावंडं बालपणी मनसोक्त डुंबत आलो होतो. मी त्या विचारात असतानाच माझ्या स्कंधावर आणखी एका पत्नीचं दायित्व येऊन पडेल, याची मला काहीही कल्पना नव्हती. मला स्नान करताना बघून जलभरणासाठी घाटावर आलेली नागकन्या उलूपी कटीवर जलकलश घेऊनच मला सामोरी आली. अत्यंत आर्जवी व लाघवी शब्दांत म्हणाली, "मी ओळखलं आहे आपण कोण आहात ते! या सेविकेवर कृपा करावी आणि माझ्यासह नागराज्यात चलावं. आम्हा नागांचा पाहुणचार घेऊन मग पुढे तीर्थयात्रेस निघावं." ती खरोखरच अप्रतिम सुंदर होती. मला तिला नकार देणं शक्यच झालं नाही.

तिच्या पित्यानं – कौरव्य नागानं तर मला बघताच तिच्याशी विवाह करण्याचा प्रस्ताव माझ्यासमोर ठेवला. एव्हाना जमलेल्या सर्व नागांना मी कुंतीपुत्र धनंजय आहे हे कळून चुकलं होतं. त्यांनी कलकलाट करून प्रस्तावाला होकार देण्याची मला आर्जवी गळ घातली. त्यांनाही नकार देणं मला शक्य झालं नाही. शेवटी मी नागकन्या उलूपीशी विवाहाला संमती दिली. मी नागांचा जामात झालो. ही नागकन्या उलूपी बालपणीच ऐरावत नावाच्या नागाच्या पुत्राशी विवाहित झाली होती. पती बालपणीच वारल्यामुळे 'बालविधवा' झाली होती. आता माझी धर्मसिद्ध पत्नी झाली. काही काळानंतर मी नागदेश सोडला.

शेवटी श्रीकृष्णाला सुदर्शन देणाऱ्या भगवान परशुरामांनी वास्तव्यानं पावन केलेल्या महेंद्र पर्वतात आलो. तेथील शिखराचं व त्यावर असलेल्या भृगू आश्रमाचं दर्शन करून मणिपूर राज्यात उतरलो. या राज्याचे राजे होते चित्रवाहन. त्यांची कन्या मणिपुरांची चित्रांगदा ही माझी द्रौपदीनंतरची तिसरी पत्नी झाली. तिला नृत्याची अतिशय आवड होती. घटकान्घटका नृत्यशाळेत ती मला एका बैठकीवर बसवून; डोळे दिपवून टाकणारं आपल्या अंगचं नृत्यकौशल्य दाखवी. ती तांबूसगौर होती. घटकाभरानं आपल्या कपाळावरचे आणि मानेवरचे घामबिंदू अंशुकाच्या पदरानं टिपत माझ्याशेजारी येऊन बसे. निरागस, अल्लड बालिकेसारखी विचारी, 'आवडली तुम्हाला माझी नृत्यकला? मी काही चुकत तर नाही ना? आम्हा मणिपूरवासियांत पुरुषसुद्धा स्त्रियांबरोबर नृत्य करतात. तशी प्रथाच आहे आमची. तुम्ही कराल का माझ्यासोबत मनमोकळं नृत्य?'

ते ऐकून मी हसत म्हणे, 'मला नृत्य बघणं आवडतं. दुसरं आवडतं, ते आपल्या बाणांच्या तालावर शत्रूला नृत्य करायला लावणं!' माझं उत्तर ऐकून ती हिरमुसली होई.

एके दिवशी ती अमाप उत्साहानं आपल्याबरोबर द्वारकेचा एक दूत घेऊनच माझ्यासमोर आली. माझ्या तीर्थयात्रेला प्रारंभ झाल्यापासूनच माझा परमसखा श्रीकृष्ण एकामागून एक निष्णात दूत माझ्या भेटीला पाठवून सतत माझ्या संपर्कात

राहिला होता. घार आकाशात कितीही उंच उडत असली, तरी तिचं लक्ष घरट्यातील आपल्या पिलापाशी असतं. माझ्याविषयी श्रीकृष्णाचं प्रेम तर त्याच्या पुत्रांवरच्या प्रेमापेक्षा अधिक होतं. मी ते जाणून होतो.

सोबत आणलेल्या द्वारकेच्या दूताला माझ्यासमोर घालून चित्रांगदा म्हणाली, "धनुर्धर, हा काय म्हणतो ते ऐका. तुमच्या सोनारानंच तुमचे कान टोचायचे ठरवलेलं दिसतंय. यानं द्वारकाधीशांचा संदेश आणलाय की, जोपर्यंत तुम्ही मणिपुरात आहात, तोपर्यंत रोज चित्रांगदेकडून नृत्य शिकावं. नृत्य ही प्रकृती निकोप ठेवणारी कला आहे. कुठल्याही कलेची आराधना कधीच व्यर्थ जात नाही."

श्रीकृष्णाचा तो संदेश म्हणजे माझ्यासाठी आदेशच होता. आता उलटं झालं. नृत्यशाळेत जाताच मी चित्रांगदेला म्हणू लागलो, "चला गुरुदेव, तुमचा विजय झाला आहे. माझा पराभव! मी चांगलं जाणू शकतो की, नृत्याविषयीचं माझं मत तुम्हीच द्वारकेपर्यंत पोहोचविलं असणार. त्याशिवाय तिकडून असा आदेश येणारच नाही. आता मला लय–तालात नृत्य कसं करावं हे शिकवा."

मी मणिपूर राज्यात घेतलेल्या या नृत्यशिक्षणाचाच पुढे विराटनगरीत अज्ञातवासाच्या वर्षात, राजकन्या उत्तरेला बृहन्नडा म्हणून नृत्यशिक्षण देताना उपयोग झाला. 'कुठल्याही कलेची आराधना कधीच व्यर्थ जात नाही.' या कृष्णवचनाचा प्रत्ययही आला. पुढे चित्रांगदेला झालेल्या पुत्राचं नाव श्रीकृष्णाशी चर्चा करूनच मी 'बभ्रुवाहन' असं ठेवलं होतं. बभ्रूचे केश पिंगट वर्णाचे होते. मोठा झाल्यावर तो अश्वासारखं वापरत असे, ते वाहनही पिंगट वर्णाचं होतं. त्याला मणिपूरकर 'याक' म्हणत.

माझ्या जीवनातील अशी एकही बारीकसारीक घटना नव्हती, जी द्वारकेच्या मधुसूदनाशी जाऊन भिडत नव्हती. द्वारका! तेथील सर्वेसर्वा असलेल्या माझ्या प्रिय सखा श्रीकृष्णाविषयी मी सर्वांत शेवटी सांगणार आहे. प्रारंभी झलक म्हणून एवढंच सांगतो की, मी प्रसंगानुरूप त्याला नेहमी संबोधत आलो. जेव्हा-जेव्हा तो मला इतर सर्वांहून अतिशय संयमी व संयत वाटला, तेव्हा-तेव्हा मी त्याला हटकून 'हृषिकेशा' – म्हणजे इंद्रियांवर ताबा असलेला म्हटलं. जेव्हा-केव्हा तो माझ्याशी गोकुळातील गोपजीवनाविषयी बोलला, तेव्हा-तेव्हा त्याला मी 'गोपाला, मुरलीधरा, दामोदरा, नंदनंदना, मोहना, गोविंदा' असं संबोधत आलो होतो. जेव्हा-केव्हा तो मला द्वारकेतील असंख्यात यादवांविषयी बोलला, तेव्हा मी त्याला 'द्वारकाधीशा, वासुदेवा, यादवा' असंच म्हणत आलो. कुठल्याही कोनातून मी माझ्या जीवनाकडे पाहिलं, तर तिथे मला एकटा श्रीकृष्ण आणि कृष्णच दिसत होता.

यासाठीच त्याच्या स्मरणाबरोबर माझ्या डोळ्यांसमोर तरळून जाई ती मुद्रा होती, त्याच्या जन्मदात्या वसुदेवमहाराजांची. ते आता खूपच वृद्ध झाले होते. आमच्या हस्तिनापुरातही तसे पितामह भीष्म आणि धृतराष्ट्र महाराज वृद्धच होते. कधी-कधी महत्त्वाच्या प्रसंगी भेटणारे महर्षी व्यासही वृद्धच होते. पण या सर्व वृद्धांत मूलत: कितीतरी अंतर होतं. जशी बालपणी आम्हा कौरव-पांडवांवर दृष्टी ठेवून शक्य ते सर्व संस्कार करण्याची संधी पितामह भीष्म, महाराज धृतराष्ट्र यांना मिळाली होती, तशी श्रीकृष्ण व बलरामदादा यांच्यावर संस्कार करण्याची संधी वसुदेवबाबांना काही मिळाली नव्हती. ती संधी मिळाली होती, गोपांच्या नंदबाबांना आणि यशोदामातेला. त्यामुळेच

वसुदेवमहाराज, द्वीपद्वारकेहून मथुरेजवळच्या गोकुळातील नंदबाबा आणि यशोदामाता यांना सतत आपल्या राजदूताकरवी द्वारकेत येण्यासाठी आग्रहानं पाचारण करीत होते. ते वृद्ध जोडपं मात्र आपल्या भावबंधाचं गोकूळ काही सोडत नव्हतं. श्रीकृष्णानं मला अनेक वेळा सांगितलं होतं की, "मी आता गोकुळात जाणं चूक होईल. नंदबाबा आणि यशोदामाता यांच्या अंत:करणातील माझी अरागस गोपालकृष्णाची मुरलीधारी प्रतिमा पुसून टाकण्याचा मलासुद्धा काहीही अधिकार नाही." श्रीकृष्णाचा मला सर्वांत मोठा जाणवलेला गुणविशेष होता तो हा की, आपल्या जन्मदात्या माता-पित्यांना आपल्या बालपणी कारागृहात दिवस काढावे लागले, हे तो कधीच विसरला नाही. म्हणूनच त्यांच्या उत्तर आयुष्यात ते शब्दानंही दुखावले जाणार नाहीत, याची दक्षता तो कटाक्षाने घेत आला होता. वसुदेवबाबा व देवकी, रोहिणीमाता यांनाही श्रीकृष्णाच्या या मनोभावाची पूर्ण कल्पना होती. रोहिणीमाता तर बलरामदादांपेक्षाही अधिक कृष्णाला जाणत होत्या.

द्वारकेतील थोडंसं समजायला कठीण होतं, ते व्यक्तिमत्त्व बलरामदादांचं. सुभद्रेच्या विवाहात त्यांनी घेतलेल्या पवित्र्यामुळे मला त्यांच्याविषयी खरंतर नाराजी वाटायला हवी होती. तसं वाटलं मात्र नाही. त्याच्या मागे होतं, तेही श्रीकृष्णाचं बुद्धिचापल्य. माझ्यासमोर बलरामदादांचा विषय कधीही निघाला की, तो सहज बोलल्यासारखं बोलायला कधीच चुकत नव्हता की, "आमच्या बलरामदादांचं काय आहे, ते संतापतात लवकर तसेच सत्वर निवळतातही. ते सत्वर भावविवश होतात, तसेच त्यापोटी केलेलं कर्मही लवकर विसरतात. आम्हा यादवांना त्याचं काहीही वाटत नाही. इतर कुणालाही वाटू नये."

बलरामदादाही एक महाग्रंथच होता. पण निसर्गानं आपल्याच हातांनी उघडून ठेवलेल्या अरवली पर्वताच्या रांगेसारखा! त्यांच्याबाबत श्रीकृष्णाच्या मनात जो आदरभाव होता, तोच माझ्या मनी सदैव राहिला – सुभद्रेशी विवाह झाल्यानंतरही!

यादवांचे सेनापती होते दोन – अनाधृष्टी आणि सात्यकी. अनाधृष्टी आता वृद्ध झाले होते. यादवसेनेला खरा आधार व मार्गदर्शन होतं, ते अनुभवी व श्रीकृष्णाबरोबर आर्यावर्त फिरलेल्या महारथी सात्यकींचं. सात्यकी थोडेसे बलरामदादांच्या स्वभावाकडे झुकणारे होते. श्रीकृष्णाच्या सहवासात असले की, ते अपार उत्साही व तळपते वाटत. त्याच्यापासून दूर गेले की निस्तेज, निष्प्रभ होत. त्यांच्यासारखाच मीही श्रीकृष्णाचा सखाच होतो. मग आम्हा दोघांत नेमकं अंतर होतं ते काय? ते सखा होते परप्रकाशित, मी सखा होतो पूर्ण समर्पित! माझ्या या समर्पणाला सीमा म्हणून कसलीही नव्हती. श्रीकृष्णानंही अनेक प्रसंगी माझ्यातील हा समर्पणभाव अनेक परीक्षा घेऊन पारखून घेतला होता. आम्हा पांडवबंधुंतही 'माझा परमसखा' म्हणत त्यानं मलाच निवडलं होतं. माझ्या इतर चार बंधूंना त्यानं कधी चुकूनही सखा म्हटलं नव्हतं.

यादवांचं स्त्रीमंडळ आणि कौरव–पांडवांचं स्त्रीमंडळ यात कितीतरी अंतर होतं. कौरवाच्या स्त्रियांत, एकट्या गांधारीदेवी वगळता सर्वच स्त्रियांत लाभलेल्या वैभवाचा नकळत आलेला अभिमान होता. यात दुर्योधन पत्नी भानुमती, त्याची भगिनी दु:शला अशा स्त्रिया होत्या. आम्हा पांडवांच्या स्त्रियांत, परिस्थितीशी सतत संघर्ष करावा लागल्यामुळे एक प्रकारची सोशीक जाण आपापत: आली होती. कुंतीमाता हा

तर त्याचा वंदनीय आदर्श होता. द्रौपदीही तिला सून शोभेल अशीच होती. कधी– कधी माझ्या मनात चमत्कारिक विचार येई – कौरवांच्या द्यूतसभेत आला तसा विटंबनेचा प्रसंग दुर्योधनपत्नी भानुमतीवर आला असता, तर? कर्णपत्नी वृषालीवर आला असता, तर? त्या द्यूतसभेत उपस्थित असलेल्या कुणाच्याही पत्नीवर आला असता, तर? म्हणूनच त्या घोर विटंबनेच्या द्यूतप्रसंगानंतर द्रौपदीचं स्थान माझ्या मनी फार उंचावलं होतं. भीमानं प्रकटपणे काही प्रतिज्ञा केल्या होत्या. माझा स्वभाव त्याच्यासारखा नव्हता. म्हणून मी मनोमन तिच्या स्त्रीत्वाच्या अवमानाचा प्रतिशोध घेण्याची प्रतिज्ञा, त्याच क्षणी द्यूतसभेत घेतली होती. द्रौपदी श्रीकृष्णाची प्रिय सखी होती. त्यानं गोकुळची राधिका वगळता द्रौपदीशिवाय अन्य कुठल्याही स्त्रीला 'सखी' म्हटलं नव्हतं. ती होती कृष्णाची प्रिय सखी! मी होतो त्याचा परमसखा. द्रौपदी इतर पत्नीपेक्षा माझ्या अधिक निकट होती.

श्रीकृष्णाच्या द्वारकेतील यादव स्त्रीमंडळाचा यासाठीच माझ्या मनात सतत विचार येऊन जाई. विचारातील त्या–त्या स्त्रीविषयी द्रौपदीला काय वाटत असेल, हाही विचार येऊन जाई. द्वारकेतील यादवांच्या स्त्रीयांत प्रमुख होत्या त्या देवकी व रोहिणीमाता या! श्रीकृष्णानं विचारपूर्वक स्वत: द्वारकेच्या सिंहासनावर न बसता, तो बहुमान वसुदेवबाबांना दिला होता. यामुळे द्वारकेची महाराणी होण्याचा रुक्मिणीवहिनींचा अधिकार बाजूला पडतो, याचाही त्यानं विचार केला होता. त्यांच्याशी विचारविनिमय करूनच त्याने द्वारकेची राज्यव्यवस्था रचली होती. विशेष म्हणजे त्याच्या मनीच्या या व्यवस्थेला रुक्मिणीवहिनींनी शब्दानंही विरोध केला नव्हता. हे त्यांच्या त्यागाचंच बळ होतं की, त्यामुळे त्या आपल्या सातही सवतींवर कसलाही आटापिटा न करता प्रेमाचा सहज अधिकार गाजवू शकत होत्या. खरंतर गांधारी व कुंतीमाता, द्रौपदी आणि रुक्मिणीदेवी हे एकाच मनोबैठकीचे वेगवेगळे आविष्कार होते.

द्वारकेतील श्रीकृष्णाच्या रुक्मिणीवहिनींशिवाय इतर सातही स्त्रीया पूर्णत: वेगवेगळ्या स्वभावांच्या होत्या. अगदी वेगवेगळ्या सुगंधाच्या सात वेगवेगळ्या फुलांसारख्या. त्यांना स्वत: धागा होऊन एकाच वैजयंतीमालेत गुंफण्याचं अवघड आणि अजोड कार्य केलं होतं, ते रुक्मिणीवहिनींनी. यासाठीच त्यांच्याविषयी माझ्या आणि द्रौपदीच्या मनी असीम आदरभाव होता.

द्वारकेतील रेवतीवहिनी, गुरुपत्नी, गर्गपत्नी, दोन्ही सेनापतींच्या स्त्रीया, अमात्य विपृथू, मंत्रिगण आणि सर्व दलप्रमुख यांच्या स्त्रीया, कृष्णानं पुनर्वसन केलेल्या सोळा सहस्र कामरूप स्त्रीया, त्यांची प्रमुख कशेरू या सर्वांवर मोठा प्रभाव होता, तो रुक्मिणीवहिनींचा. सर्वांच्या मनी अजोड आदरभाव होता, तो देवकी व रोहिणीमाता यांच्याविषयीचा. इंद्रप्रस्थ, द्वारका आणि हस्तिनापूर ही त्रिस्थळं माझ्या जीवनाशी बळकट भावधाग्यांनी जुळलेली होती. म्हणूनच द्रौपदीस्वयंवरात कर्णानं केलेली माझ्या वधाची प्रतिज्ञा मी विसरूच शकत नव्हतो. मी ऐकून होतो, त्याच्या अंगावर अभेद्य कवचकुंडलं आहेत. त्याच्या आवाजाचा लक्षयभेद साधणाऱ्या धनुर्विद्येचा प्रत्यय मी व बंधूनी हस्तिनापूरच्या वासंतिक स्पर्धेत घेतलाच होता. त्या स्पर्धेनंतर त्या संध्याकाळीच झालेल्या आमच्या बंधूंच्या बैठकीत युधिष्ठिरनं कर्णाविषयी स्पष्ट चिंता व्यक्तही केली होती. मी त्याला 'तू त्या सूतपुत्राची काळजी करू नकोस' असा धीरही दिला होता, पण मनोमन त्याच्या घोर प्रतिज्ञेच्या आघाताचा ठणका मला सतत ऐकू येई. श्रीकृष्णाच्या

भेटीत मी आवर्जून हा विषय घेई. तो तसा फारसा कधीच गंभीर होत नसे. पण कर्णाचा विषय निघाला की, तोही एकाएकी प्रथम काही क्षण अबोल होऊन जाई. थोड्याच वेळानं नेहमीसारखं प्रसन्नहसत म्हणे, 'तुम्हा बंधूची अभेद्य एकजूट अखंड ठेवा. मग त्याच्या अभेद्य कवचकुंडलांची चिंता करण्याचं तुम्हाला काहीही कारण नाही!'

इंद्रप्रस्थ, हस्तिनापूर, द्वारका या प्रमुख त्रिस्थलांनंतर माझ्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व होतं, ते माझं सासर म्हणून पांचाल राज्वाला आणि पुत्र अभिमान्यूचं सासर म्हणून विराटनगराला! पांचालांच्या कांपिल्यनगरावर प्रभाव होता, तो यज्ञपुत्र धृष्टद्युम्नाचा! तो होताही तसाच. पराक्रमी, तप्त सुवर्णी वर्णाचा, धगधगतं बोलणारा! पांचाल संख्येनं खूप होते. त्यांचे महाराज द्रुपद – माझे श्वशुर – पितामह, महाराज धृतराष्ट्र यांच्या पिढीचे असल्यामुळे आता वृद्ध झाले होते, थकले होते. विराट पांचालदेश अधिपत्याखाली होता धृष्टद्युम्नाच्या! त्यानं कारभाराच्या सोयीसाठी राज्याचे उत्तर पांचाल आणि दक्षिण पांचाल असे दोन विभाग केले होते. पांचाल देशात धृष्टद्युन्माचा शब्द शेवटचा होता. मला माझा हा मेहुणा फार मानत असे. मी केवळ मेहुणा होतो म्हणून नव्हे, तर त्याच्या दृष्टीनं अजिंक्य धनुर्धर होतो म्हणून!

मला कधी स्वप्नातही वाटलं नाही की, आपणाला मत्स्यांच्या विराटनगरीत चांगलं एक वर्षभर राहावं लागेल. पण श्रीकृष्ण नेहमी म्हणत आला ते पटलं होतं की, माणसाच्या जीवनात कोण–कोण प्रवेशेल व त्याला कुठे–कुठे जावं लागेल, काही–काही सांगता येत नाही. त्याचं संपूर्ण जीवन तर याच सत्यानं भरलं होतं. तो जन्मला तो मामा कंसाच्या कारागृहात. जन्मत: तो गोकुळात गेला, तिथेच राहिला. मथुरेत आला, तिथून द्वारकेत प्रवेशला. मग एखाद्या चक्रवर्ती वीराला शोभेल असाच संपूर्ण आर्यवर्तभर फिरला. कुठे–कुठे हे त्यालाही सांगता यायचं नाही. तसंच मलाही वनवासाच्या बारा वर्षांत ठिकठिकाणी फिरावं लागलं.

वनवासाचे पहिले काही दिवस आम्हा सर्व बंधूंना द्रौपदीसह काम्यकवनात काढावे लागले. आमची वनवासात श्रीकृष्णाशी पहिली भेट झाली, ती या काम्यकवनातच. त्याला न भेटताच द्यूताच्या अटीप्रमाणे आम्ही इंद्रप्रस्थालाही न जाता हस्तिनापुराहूनच काम्यकवनात आलो होतो. या पहिल्या भेटीतच संकोचानं आमच्यातील कुणीच कृष्णाशी द्यूताविषयी बोलला नाही. द्रौपदीनं मात्र त्याला खूप काही ऐकवलं. नेहमीसारखं त्यानं ते शांतपणे ऐकून घेतलं. बारा वर्षांचा वनवास व एक वर्षाचा अज्ञातवास आम्ही किती संयमानं, एकमेळानं पार पाडला पाहिजे, याचं बारीकसारीक मार्गदर्शन त्यानं केलं. दोन दिवस काम्यकवनातील आमच्या पर्णकुटीत राहून तो द्वारकेकडे परतला. आम्हीही काम्यकवनातून द्वैतवनात आलो. वनात आमचे सहा मास गेले. आमच्या कुणाच्याही ध्यानीमनी नसताना एके दिवशी साक्षात महर्षी व्यास आमच्या भेटीस काम्यकवनात आले. या वनात अन्य काही ऋषींचे आश्रमही होते. आम्हा बंधूंच्या नित्याच्या मृगयेचा त्यांना काहीतरी त्रास होत असावा. भीमसेन तर मृगयेच्या वेळी प्रचंड आरडाओरडा करून रान उठवीत असे. आश्रमातील तापसांना यामुळे त्यांच्या नित्यकर्मात बाधा येऊ लागली. त्यांनी आपलं गाऱ्हाणं महर्षींसमोर घातलं. त्यांनी संकेत व आदेश दिल्याप्रमाणे आम्ही द्वैतवनातून पुन्हा काम्यकवनात आलो.

या वनात माझ्या जीवनातील मला कधीच न विसरता येणारं एक सत्य साकारलं.

द्रौपदीसह आम्हा बंधूंच्या बैठकीत मी एकट्यानंच हिमालयाकडे जावं, असं ठरलं. श्रीकृष्णाच्या सांगण्याप्रमाणे एखादं बलवंत अस्त्र प्राप्त केल्याशिवाय आमचा इथून पुढे निभाव लागणार नव्हता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे मीच त्यासाठी योग्य होतो. त्यामुळे पाशुपतास्त्र प्राप्तीसाठी मला सर्व बंधू व द्रौपदीचा सहवास सोडाणं भाग होतं. त्यासाठी चिंतनपूर्वक मी मनाची बांधणीही केली. जाण्यापूर्वी ज्येष्ठ म्हणून युधिष्ठिर व भीमसेनाला वंदन केलं. नकुल-सहदेवांना दृढ आलिंगनात घेतलं. निरोपासाठी द्रौपदीसमोर उभा ठाकलो. पूर्वी कधीच वाटली नाही, अशी उभी पर्णकुटी दाटून आल्यासारखं वाटलं. ती मात्र अपार धैर्याची! म्हणाली, “धनुर्धर, अस्त्रप्राप्तीशिवाय परतू नका. माझं जेव्हा- जेव्हा स्मरण होईल, तेव्हा– तेव्हा स्मरणपूर्वक आठवा ते एकट्या कृष्णाला. तो कुठल्याही स्थितीत तुम्हाला एकटं टाकणार नाही.” एरवी एकेरी बोलणारी ती आज आदरानं बोलली, हे मला फार–फार जाणवलं. मी तिला अपेक्षित प्रतिसाद देत म्हणालो, “तो आहे, म्हणून तर माझं सर्व आहे. माझी चिंता करू नको श्यामले, येतो मी.”

त्या क्षणापासून माझं वनवासी जीवन चक्र लागल्यासारखं फिरलं, सर्वांचा निरोप घेऊन मी उत्तरेच्या दिशेनं तीर्थयात्रा करत निघालो – एकटाच! मी हिमालयातील गंधमादन पर्वतावर आलो. केवढ्या आवाहक, टवटवीत निसर्गानं भरला होता हा गंधमादन! कुंतीमातेनं सांगितल्याप्रमाणे इथल्याच शतशृंग शिखरावर आम्हा पांडवांचा जन्म झाला होता. आज पहिल्यानं मला एकट्यालाच ती जन्मभूमी पुन्हा बघण्याचं सौभाग्य लाभलं होतं. सर्वप्रथम शतशृंग शिखरावर जाऊन, कुंतीमातेनं बालपणी अनेकवेळा सांगितलेल्या खाणाखुणा पडताळून, आम्हा सर्व बंधूंच्या जन्माचं स्थल शोधून काढलं.

दोन दिवस मी आमच्या जन्मस्थलीच्या पर्णकुटीतच राहिलो. कृष्णाच्या म्हणण्याप्रमाणे तीर्थकरूला दोन दिवसांपेक्षा अधिक एकाच ठिकाणी राहता येत नव्हतं. केवढं– केवढं अनुभवलं मी त्या दोन दिवसांत! मला धूसर आठवणारं माझं नि बंधूंचं बालपण, त्या दोन दिवसांत माझ्याभोवती गरगर फिरलं. कितीतरी आदिवासी स्त्रियांनी माझ्या कानांवरून इडापिडा घेतं ‘कुंतीमैय्या – अर्जुन – भीमभय्या...’ म्हणत आपली वृद्ध बोटं रानमायेनं कडाकड मोडली. मी त्यांनी प्रेमानं दिलेल्या रुचकर रानफलांचा आणि हिमगायी व बकऱ्यांच्या दुधाचा आहार या दोन दिवसांत घेतला. मुखियाबरोबर जाऊन, भीमसेनानं एकदा वरून उडी घेतल्यानंतर दुभंगलेली पाषाणशिला बघितली. दोन दिवसांनंतर त्या निकोप व प्रेमळ वन्यजनांचा निरोप घेऊन मी गंधमादन पर्वतावरच्या पठारी प्रदेशात आलो. माझ्याबरोबर माझं दोन अक्षय्या भात्यांसह गांडीव धनुष्य होतं. इतरही खड्गासारखी सहज हाताळता येण्यासारखी शस्त्रं होती. गंधमादनाच्या या हवेशीर पठारावर मी एकट्यानंच एक टुमदार पर्णकुटी उठविली.

हस्तिनापुरात गुरू द्रोणांच्या शस्त्रशालेत शिकताना माझा दिनक्रम वेगळा होता. इंद्रप्रस्थात पांडुपुत्र अर्जुन म्हणून वैभवात जगताना माझी दिनचर्या वेगळी होती. इथे गंधमादन पर्वतावर एकटाच राहात असताना, माझी वनचर्या पूर्ण बदलली. इथे मी एकटाच थोडेथोडके दिवस नाही, चांगली पाच वर्षं राहिलो.

अनेकवेळा दंडकारण्य पार करून गेलेल्या अनुभवी कृष्णानं मला सुरक्षित वनजीवनाचीही दीक्षा दिली होती. त्यातील प्रमुख दोन गोष्टी होत्या – वाघ, लांडगे,

तरस अशा हिंस्त्र पशूंपासून रात्रीचं संरक्षण करून घेणं, ही त्यातली पहिली गोष्ट होती. त्यासाठी पर्णकुटीभोवती मी चांगला वावभर रुंदीचा, पुरुषभर खोलीचा खंदकच खणून घेतला होता. पर्णकुटीच्या सरपणाच्या कक्षात वर्षभर पुरतील अशी सुकलेली लाकडं रचून ठेवली होती. रोज रात्री त्या खंदकात लाकडांची खाई पेटत असे. पर्णकुटी रात्रभर सुरक्षित होत असे. दुसरी महत्त्वाची गोष्ट होती – ती वर्षाऋतूसाठी धान्य, सुकलेली फळं साठवून ठेवण्याची. मधासाठी शिंकाळ्यावर मी दोन–तीन मोठे माठही टांगून ठेवले होते.

वर्षा व शरद ऋतूत पर्णकुटीभोवतीच्या खंदकातील पेटत्या खाईमुळे पर्णकुटी उबदार राही. पहिला ग्रीष्म येईपर्यंत मी खंदकाभोवती भक्कम उंच लाकडी कुंपण आवळून घेतलं. त्यामुळे ग्रीष्मात खाईची आवश्यकता राहिली नाही.

इथे मी आलो होतो, तो पाशुपतास्त्र प्राप्तीसाठी. ते तर होतं शिवाकडे! तो तसा प्रसन्नहोऊन दर्शन देणं देवदुर्लभ. त्याच्याकडून अस्त्रप्राप्ती हे तर महाकर्मकठीण.

मी रोज ब्राह्मी मुहूर्तावर उठून, नदीत स्नान करून परतत असे. थोडा फलाहार घेऊन पुरश्चरणाला व तपस्येला बसे. हटकून प्रथम माझ्याकडून स्मरण होई, ते प्रियसखा कृष्णाचं. माझ्या मिटल्या जागत्या डोळ्यांसमोर त्याची मोरपीसधारी सुवर्णी मुकुटाची मुद्रा प्रकट होई. वक्षावर टवटवीत वैजयंतीमाला व कौस्तुभमणीधारी मोतीकंठे रुळलेला, आजानुबाहूंच्या हाती गदा-चक्र पेललेला त्याचा पीतांबरधारी नीलवर्णी देह उभा ठाके.

मी भान हरपून जाई. माझी मनोमन श्रीस्तुती सुरू होई. ध्यानातच मी त्याच्या चरणारविंदांवर मस्तक ठेवी. माझी उभी जाणीव, माझा आत्मा त्याला पूर्ण समर्पित होऊन तळमळून विनवे – 'रक्ष रक्ष प्रभो वासुदेव!'

भानरहित होऊन त्याच्याशी एकरूप पावून माझी अशी भावविनवणी सुरू झाली की, त्याच्या मिटल्या मत्स्यनेत्रांखालच्या विमल ओठांतून फुटलेले स्पष्ट शब्द मला ऐकू येत. नकळतच मी त्याचं अनुकरण करी –

"शिवाकांत शंभो शशांकार्ध मौले।
महेशान शूलिन् जटाजूटधारिन्।
त्वमेको जगद्व्यापको विश्वरूप।
प्रसीद प्रभो पूर्णरूप।।"

माझी शिवस्तुती आपोआप सुरू होई. आता माझ्या मिटल्या जागत्या डोळ्यांसमोर पूर्वीचा मोरपीसधारी मुकुटाचा श्रीकृष्णच शिवशंकराच्या रूपात दिसू लागे! जटाभारात गंगा आणि चंद्रकोर तोललेला, नीलकंठात भुजंगमाळा घातलेला, डमरूधारी, हिमवानाच्या कैलास शिखरावर ध्यानस्थित शिव दिसू लागे. मी तळमळून त्याला विनवी 'रक्ष रक्ष प्रभो शिवशंकर!'

माझा हा गंधमादनावरचा तपस्यायुक्त वनवास चांगली चार वर्षं झाला. गंधमादनावरचा शरदऋतू हटून ग्रीष्म सुरू झाला.

ती माघ वद्य त्रयोदशी होती. मी नित्यासारखा खांद्यावर गांडीव धनुष्य पेलून, पाठीवर दोन–दोन अक्षय्य बाणभाते तोलून मृगयेसाठी बाहेर पडलो. बराच वेळ मला कुठेच मृग दिसला नाही. त्याचा शोध घेत मी गंधमादनाच्या घनदाट अरण्यात शिरलो.

इथे एक गवताळ कुरण होतं. त्यात कितीतरी मृग चरत होते. त्यांना माझी चाहूलही न देता, त्यातील एका पसरट शिंगांच्या उंच नरमृगावर वेध घेऊन मी बाण सोडला. तो चुकणारच नव्हता. मृग उसळला. पाच–दहा हात निकरानं धावला आणि कोसळला. एव्हाना इतर सर्व मृग कुठच्याकुठे पसार झाले होते. मी माझ्या लक्षयवेधाच्या समाधानानं पुढे झालो. मृगाजवळ गेलो. त्याला हात लावणार, इतक्यात एका भरगच्च झुडपाआडून दटावल्यासारखे शब्द आले, "ए नरा! तो नर काळवीट मी वेधला आहे. त्याच्या उरात आहे, तो बाण माझा आहे. मृगया माझी आहे. हात लावू नको!" मी त्या दटावल्या शब्दांच्या रोखानं पाहिलं. हे असलं काही ऐकायची मला कधीच सवय नव्हती. तो एक किरात होता. 'मुखिया' असावा. उंचशील, पीळदार, दाढीधारी, जटांचा केशभार, रानपक्षयांची पिसं माळून झाकलेला, वक्षभर ठिपकेदार व्याघ्रचर्म लपेटलेला. एवढा धैर्यशील मी; पण त्याच्या दर्शनानं प्रथम चपापलोच. तरीही माझ्या धनुर्वेधाच्या अचूकतेवर माझा पूर्ण विश्वास होता. मी म्हणालो, "नर काळविटाच्या मर्मात घुसलेला बाण माझा आहे. मृगया माझी आहे."

'माझी–तुझी, तुझ–माझी, अशी आमची शाब्दिक खडाखडी झाली. तसं त्यानं पहिलं आव्हान दिलं, "मी किरातराज आहे. या गंधमादनाचा सर्वाधिकारी – हिमालयाचाही! खांद्याला धनुकली लटकविणाऱ्या यःकश्चित नरा, पामरा – माझ्याशी युद्धाला सिद्ध हो."

त्याचं आव्हान ऐकून माझं अंग सरसरलं. मी म्हणालो, "मी इंद्रप्रस्थाचा कुंतीपुत्र धनुर्धर अर्जुन आहे. श्रीकृष्णाचा परमसखा धनंजय आहे. एकवेळ माझा अवमान मी सहन करेन, पण माझ्या गांडीव धनुष्याचा मुळीच नाही. किराता, सिद्ध हो. मी स्वीकारलंय तुझं आव्हान."

आम्ही धनुष्यं पेलली. एका घनघोर धनुर्युद्धाला त्या वनातच प्रारंभ झाला. कितीतरी वेळ आम्ही एकमेकांवर आवेशानं विविध बाण फेकले. आमच्या युद्धाचा निर्णय काही लागत नव्हता. मला आजवर भेटलेल्या सर्व–सर्व धनुर्योद्ध्यांत हा वेगळाच कुशल होता. मी त्याच्या प्रत्येक बाणाला प्रत्युत्तर देताना श्रीकृष्णाचं स्मरण केल्याशिवाय राहत नव्हतो. घटिका सरल्या. सांजावत आलं. आमच्याभोवती बाणांचा खच पडला. मध्ये पडलेल्या मृगयेच्या अंगावर रानमाश्या उतरू लागल्या. एकाएकी समोरून बाण वर्षाव थांबला. किरात धनुष्य आपल्या खांद्याला टांगून माझ्याकडे येताना दिसू लागला. मीही थांबलो. तो माझ्यासमोरच येऊन उभा राहिला. माझ्यापेक्षा कितीतरी उंच, सावळा, तेजस्वी! श्रीकृष्णाचं स्मरण देणारा! आपल्या मधुर डमरूवाणीत म्हणाला, "कृष्णभक्ता, कौंतेय पार्था, स्वतःला ओळखलं आहेस. तुझ्या परमसखा कृष्णाला ओळखलं आहेस. मला कसं काय ओळखलं नाहीस!"

मी चक्रावून त्याच्याकडे बघतच राहिलो. शतशृंगाच्या दरीदरींतून घुमून आल्यासारखे त्रोटक शिवबोल माझ्या कानांवर पडले, "मी कैलासाधिपती शंऽकऽर!"

'शं करोति इति शंकरः' ज्याच्या नामस्मरणातच असं सामर्थ्य आहे, तो साक्षात कैलासाधिपती शिवशंकर माझ्यासमोर उभा होता! मी खेचल्यासारखा त्याच्या चरणांवर दंडवतच घातला. माझ्या तोंडून शब्द काही फुटू शकत नव्हता. माझं गात्रन्‌गात्र रोमांचून उठलं होतं.

जसं श्रीकृष्ण मला हळुवार उठवून वर घेत असे, तसंच शिवानंही घेतलं.

त्याच्यासारखंच आपल्या विशाल वक्षाशी दृढ आलिंगनात घेतलं. 'शिव' हा शब्दसुद्धा थिटा पडावा, असा तो साक्षात शिवाचा स्पर्श होता, जो मी कधीच विसरू शकणार नव्हतो. काही वेळानं माझ्या दंडांना धरून सामोरं घेत, माझ्या डोळ्यांत आपली शिवदृष्टी खोल उतरवून तो म्हणाला, "तुझ्या गांडीव धनुष्याच्या शरलाघवानं मी प्रसन्नझालो आहे. ज्यासाठी निर्धारानं तू आलास, ते पाशुपतास्त्र आज तुला समंत्र प्रदान करतो आहे. लक्षात ठेव, तुला अखंड मानवजातीचं एक कल्याणकारी कार्य मार्गी लावायचं आहे. तू नरश्रेष्ठ म्हणून जन्मला आहेस. श्रीकृष्ण हा साक्षात नारायण तुला सखा लाभला आहे. जिथे तो असेल, तिथे धर्म असेल आणि जिथे धर्म असेल, तिथे विजय असेल. तू यशवंतच होशील. माझे तुला कृपाशीर्वाद आहेत. ऐक, पाशुपतास्त्राचे दिव्य मंत्र –"

शिवानं आपले नेत्र मिटले. हिमशिखरांतून गंगौघ कोसळावा तसा त्याच्या डमरूवाणीतून एकेक मंत्रबोल सुटू लागला. माझेही डोळे मिटले गेले. आपोआपच माझ्या तोंडून त्या मंत्रबोलांचा पुनरुच्चार होऊ लागला. शेवटी ते शिवतेज अस्पष्ट म्हणालं, 'तथास्तु' .

मी डोळे – उघडले. समोर किरातराजा नव्हता!

त्या रात्री पर्णकुटीत मला अशी शांत शिवनिद्रा लागली की, पूर्वी मी ती तशी कधीच अनुभवली नव्हती. दुसऱ्या दिवसापासूनच मला जाणवू लागलं की, माझ्या चित्तवृत्तीत कितीतरी आमूलाग्र अंतर आलं आहे. मी एकटा आहे. प्रिय पत्नी द्रौपदी व बंधूंपासून दूर आहे. माझा प्रिय सखा श्रीकृष्ण दूर द्वारकादेशी आहे. यामुले पूर्वी येणारे वियोगाचे विचारच मनी येईनासे झाले. उभा गंधमादन पर्वत मला शिवमय दिसू–भासू लागला.

लवकरच मला शिवप्रसादाचा प्रत्ययही त्या वनात आला. द्रौपदीसह माझे चारही बंधू मला भेटण्यासाठीच गंधमादन पर्वतावर आले. पाच वर्षांनंतरच्या त्यांच्या भेटीनं, मला वर्णन करता येणार नाही, असा आनंद झाला. माझा प्रिय बंधू भीमसेन तर मला असा कडकडून भेटला की, तो माझ्या देहाचं चूर्ण करतो की काय, असं वाटलं. माझ्या पाशुपतास्त्र प्राप्तीची वार्ता ऐकून तर सर्वांच्या मुद्रा सूर्यफुलासारख्या फुलून उठल्या. या भेटीनंतर जवळ–जवळ सप्ताहभर आम्ही एकमेकांशी न कंटाळता अथक नुसते बोलतच राहिलो. या बोलण्यात आम्हा प्रत्येकाच्या तोंडी सातत्यानं विषय होता, तो एकटया श्रीकृष्णाचा!

माझी पूर्वीची एकटयासाठी उभारलेली पर्णकुटी आता पाडण्यात आली. त्या जागीचा खंदकाचा चर भरून, भोवतीचं संरक्षक कुंपणही हटविण्यात आलं. पुढच्या वास्तव्यासाठी दूरवरचं कुबेर शिखर निवडण्यात आलं. तिथे प्रशस्त जागेचा घेर धरून आम्ही पाचही बंधूंनी, इंद्रप्रस्थातील राजवास्तुसारखं प्रत्येकाच्या स्वतंत्र कक्षाचं पर्णकुटी संकुल उठवलं. आमच्या पांडवबंधूंच्या पर्णकुटीसंकुलाच्या पलीकडेच धौम्य ऋषी आणि त्यांचे आश्रमकुमार यांचं आश्रमसंकुलही उठलं. आम्हाला वनवासाला निघून सहा वर्षं झाली होती. आणखी तीन–चार वर्षं तरी या गंधमादन पर्वताच्या कुबेर शिखरावर एकत्रच राहायचं, असं सर्वानुमते ठरलं, द्रौपदी आणि माझे चारही बंधू गेली पाच वर्षं काम्यकवनातच वास्तव्याला होते. हे काम्यकवन तसं हस्तिनापुरापासून जवळ होतं. आता आम्ही एकत्र राहणार होतो तो गंधमादन पर्वत, हस्तिनापुराहून कितीतरी दूर

होता. त्यामुळे आमच्या हालचाली, आम्हाला या प्रसंगात लोटणाऱ्या दुर्योधन–शकुनींना काही कळणार नव्हत्या. हे सर्व नियोजन अर्थात श्रीकृष्णाचंच होतं.

गंधमादन पर्वताच्या कुबेर शिखरावर आम्ही चार वर्षं राहिलो. हस्तिनापूर सोडून आम्हाला चांगली दहा वर्षं झाली होती. अकराव्या वर्षाच्या प्रारंभीच आम्ही एक बैठक घेतली. हिमालयातील गंधमादन पर्वत सोडण्याचा सर्वानुमते निर्णय झाला. हा पर्वत आम्ही दुसऱ्या वेळी सोडत होतो, ते एका कर्तव्यपालनपूर्तिच्या समाधानात. कुंतीमाता बिचारी एकटीच हस्तिनापुरात विदुरकाकांच्या घरी होती. तिच्या चरणांचं दर्शन केव्हा घडेल, असं आम्हा सर्वांनाच झाल होतं, गुडघे टेकवून भुईला मस्तक भिडवीत, आम्ही त्या घनदाट पर्वतदेवाला प्रणाम केले. पुन्हा या हिमालयातील पर्वतराजींचं दर्शन केव्हा घडणार, सांगता येत नव्हतं.

आमच्या या परतीच्या प्रवासातील एक पडाव बद्रिकेदारवर पडणार होता. आम्ही या गंगेच्या तीर्थक्षेत्रावर आलो. एका शिवालयाच्या धर्मशाळेतील ओसरीवर उतरलो. इथे नकुल–सहदेव तीन दगडांची चूल मांडण्यात गढले. भीमसेन सरपणाची लाकडं आणण्यासाठी गेला. द्रौपदी स्वयंपाक शिजवायच्या तयारीला लागली. ज्येष्ठ युधिष्ठिर एका बैठकीवर बसून पाषाणी भिंतीला पाठ टेकून, या सर्वांवर देखरेख करू लागला. आवश्यक त्या सूचना देऊ लागला. मी एक माठ घेऊन पाणी आणण्यासाठी गंगाघाटावर गेलो. माठ पाण्यानं भरून एका बाजूला पाषाणी पायदंडीवर ठेवला. गंगेच्या स्वच्छ, शुभ्रधवल पात्रात उतरलो. स्नान आटोपून बाहेर आलो. माठ खांद्यावर घेऊन घाटाच्या पायदंडया चढू लागलो. पुढे येणारं अज्ञातवासाचं वर्षं कसं काढावं, कुठे काढावं, या विचारातच गढलो होतो. घाटाच्या थोडयाशा पायदंडया राहिल्या असताना 'धनंजयाऽ तू?' ती हाक मला मधाच्या कुंभातून कानी पडल्यासारखी मधाळ वाटली. आवाज तर पूर्ण परिचयाचा होता. माझ्या समोरच्या पायदंडीवर एक तेजस्वी पुरुषश्रेष्ठ उभा होता. त्याच्या अंगावर साधीच शुभ्र वसनं होती. विपुल, कुरळे, दाट मुक्तकेश त्याच्या खांद्यावर रुळत होते. मला ती चर्या व तो आवाज कितीतरी परिचित व जवळचा वाटला. मी निरखून त्या पुरुषश्रेष्ठाकडे पाहिलं.

ते तर आमचे उद्धवदेव होते!!

"उद्धवदेव, आपण?" म्हणत मी खांद्यावरचा माठ खाली ठेवून प्रथम त्यांची चरणधूली मस्तकी घेतली. त्यांनी मला वर उठवून कडकडीत आलिंगनात घेतलं. मी तातडीनं त्यांना विचारलं, "तुम्ही इकडे कसे? आणि तेही या वेषात?" ते हसून म्हणाले, "आश्चर्य वाटलं अर्जुना? सांगतो. तुझे बंधू कुठे आहेत? द्रौपदी कुठे आहे? तुम्ही सर्व कसे आहात?"

त्यांचा एकेक शब्द ऐकताना कित्येक वर्षांनंतर जिवाभावाचं कुणी भेटलं आहे, या जाणिवेनं माझं मन मोहरून उठलं.

"देव, माझ्यासोबतच चला. ते सर्व जण शिवालयाच्या धर्मशाळेत उतरलेत." मी खाली ठेवलेला माठ पुन्हा खांद्यावर घेतला आणि चालू लागलो. माझ्या मागून ते चालू लागले. आम्ही धर्मशालळेत आलो. मी कल्पना केली होती, तसं प्रथम कुणीही त्यांना ओळखलं नाही. मग काही क्षणांतच द्रौपदी मात्र चुलीपासून उठली. डोळे बारीक करीत दृष्टी उद्धवदेरवांवर खिळवून जवळ–जवळ चीत्कारलीच, "हे तर आपले उद्धवदेव! इकडे कसे काय?" ती पुढे आली. प्रथम तिने देवांना त्रिवार वंदन केल. दुसऱ्याच क्षणी

विचारलं "कृष्ण कसा आहे? कुठे आहे? आम्हाला भेटण्यासाठी येणार तरी केव्हा?” तिने प्रश्नामागून प्रश्न विचारल्यामुळे माझ्या इतर बंधूंच्याही ध्यानी आलं, कोण आलंय ते! त्यांनीही देवांची चरणधूली घेतली. युधिष्ठिरानं अत्यंत आदरानं त्यांना हाताला धरून आपल्या बैठकीवर बसवलं. त्यानंही विचारलं, “आपण इकडे कसे काय देव?”

तसं हसून उद्धवदेव म्हणाले, “सांगतो, सगळं निवांत सांगतो. या वनवासात मात्र तुम्ही सर्वच प्रकृतीनं हडकलेले दिसता आहात. त्या प्रथम सुधारा. माझ्या दादाच्या सांगण्यावरूनच मी इथे बद्रिकेदारात आलो आहे. येताना गंगेच्या प्रथम दर्शनातच, द्वारकेच्या यादवांचा राजवेष तिच्यात समर्पण करून आलो आहे. बरीच वर्ष, अगदी सांदीपनींच्या आश्रमात असल्यापासून एकच विचार मनी घोळतो आहे – मानवी जीवनाचा अर्थ काय, याचा शोध घेण्याचा! तो संपत्र द्वारकेत राहून, अंगावर शस्त्रं चढवून कधीच घेता येणार नाही असं वाटल्यामुलळे, हा निर्णय मी घेतला आहे.

“दादाच्या मनी या बद्रिकेदारावर काहीतरी उभं करण्याचा संकल्प घोळत असावा. त्यासाठी या परिसराचं बारीकसारीक निरीक्षण करायला, त्यानंच मला धाडलं आहे. तुमच्या वनवासाची सर्व वर्षं त्यानं काटेकोर मोजली आहेत. तुम्ही गंधमादनावर होता, हे त्याला समजलं आहे. मला वाटतं, तुम्ही इथून सरळ काम्यकवन गाठावं. दादा तिथेच तुम्हाला भेटेल. पुढील योजना सांगेल.”

उद्धवदेवांच्या भेटीने आम्हाला कितीतरी समाधान लाभलं. ते आमच्यासह बद्रिकेदारच्या धर्मशालेतच दोन दिवस थांबले. मग त्यांचाही निरोप घेऊन आम्ही काम्यकवनाकडे निघालो. त्या वनात जाण्याची आमची ही तिसरी वेळ होती. काम्यकवनात पोहोचताच, भीमसेनानं वन फिरून वास्तव्यासाठी तृणबिंदू सरोवराकाठचा रम्य परिसर निवडला. हा आमच्या वनवासातील शेवटचा पडाव होता. वनवासाचं बारावं वर्षं चालू होतं. इथेही आम्ही बंधूंनी पर्णकुटयांचं विस्तृत संकुल उठविलं.

आमची नेहमीची वनचर्या सुरू झाली. वनवासाच्या आमच्या या शेवटच्या वर्षात आम्ही तृणबिंदू सरोवराकाठी असताना, काही प्रमुख घटना घडून गेल्या.

एक होती ती द्रौपदीची सत्त्वपरीक्षा बघण्यासाठी आपल्या शिष्यगणांच्या प्रचंड तांडयासह मुनिवर दुर्वास काम्यकवनात आले, ती! त्या सर्व अतिथींना द्रौपदी कशी काय भोजन वाढणार होती? गृहस्थाश्रमाची तिची प्रतिष्ठा धुळीला मिळणार होती. शीघ्रकोपी दुर्वास तिला शाप देणार होते. पण दुर्योधन–शकुनींनी आखलेल्या या तिरप्या डावपेचाला यश आलं नाही. युधिष्ठिरानं तपस्येनं मिळविलेल्या ताम्राच्या सूर्यतबकामुतळे द्रौपदीची गृहिणीची सुप्रतिष्ठा सुरक्षित राहिली.

याच वेळी श्रीकृष्णाने धाडलेला दूत अत्यंत महत्त्वाची वार्ता घेऊन आला. हस्तिनापुरात दानसत्र मांडलेल्या अंगराज कर्णाच्या संदर्भातील होती ती! त्यानं याचक म्हणून आलेल्या एका ब्राह्मणाला त्याच्या मागणीनुसार आपल्या अभेद्य कवचकुंडलांचं दान केलं होतं. आलेला याचक ब्राह्मण नव्हता. तशा वेषात आलेला देवज्ञातीचा देवराज इंद्र होता. ही देवशाती आणि त्यांचा राजा इंद्र यांच्याविषयी मझ्या मनात अपार आदर होता. देव सदैव आमच्या श्रीकृष्णासारखे न्यायासाठी लढत आले होते. हा आदर त्यांच्या जीवनधारणेपोटी होता. का कुणास ठाऊक, इंद्राने ब्राह्मणवेषात याचक म्हणून जाऊन कर्णाची कवचकुंडलं लुबाडून नेणं, मला मनोमन आवडलं नव्हतं. द्रौपदीची भर द्यूतसभेत अवहेलना करणारा कर्ण माझा क्रमांक एकचा शत्रू होता, तरीही!

दुसरा प्रसंग होता, तो कौरवांच्या घोषयात्रेचा! या घोषयात्रेतही चित्रसेन गंधर्वाकडून बंदिवान झालेल्या दुर्योधन, दु:शासन आणि कर्ण अशा प्रमुख कौरवांना मी आणि भीमसेनानं विक्रमाची शर्थ करून सोडविलं होतं. जीवदान देऊन हस्तिनापूरला परत पाठविलं होतं.

या काम्यकवनात सर्वांत महत्त्वाची गोष्ट घडली, ती म्हणजे, आमची श्रीकृष्णाशी झालेली शेवटची भेट. तृणबिंदू सरोवराकाठी तो जेव्हा निवडक प्रमुख यादवांसह भेटला, तेव्हा आम्हा सर्व बंधूंचा व द्रौपदीचा वनवासाचा शीण कुठच्या कुठे पसार झाला. मनावरचा एक तपाचा असह्य ताण क्षणात दूर हटला.

त्याच्या मन:पूर्वक स्वागतानंतर आम्हा सहा जणांची त्याच्या नेतृत्वाखाली तृणबिंदू सरोवराकाठी बसली, ती बैठक अत्यंत महत्त्वाची होती. आम्ही अज्ञातवासाचं पुरतं एक वर्षं कोणालाही ओळखू न येता कसं काढावं, कुठे काढावं याचा खडान्‌खडा आराखडा त्यानं चित्रवत आमच्यासमोर उभा केला. कितीही झालं तरी शून्यातून द्वारका उठविणारा तो कल्पक योजक होता. त्याच्या दृष्टीतून नखाएवढीसुद्धा असुरक्षित जागा सुटणं शक्य नव्हतं.

अज्ञातवासात आम्ही कसं वागावं, हे पुन:पुन्हा सर्व बारकाव्यांसह सांगून श्रीकृष्ण द्वारकेकडे निघून गेला. आता आम्हाला एक वर्ष त्याचं नखसुद्धा दिसणार नव्हतं. आम्ही सर्व जण अज्ञातवासावर निघालो. श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनाप्रमाणे या अज्ञातवासासाठी आम्हा बंधूंवर विराटनगरीत जाण्याचा प्रसंग आला. जीवनातील ज्या–ज्या काही घटना मी कधीच विसरू शकलो नाही, त्यातील होतं हे विराटनगरीतील अज्ञातवासाचं संपूर्ण वर्ष!

अज्ञातवासाच्या अटीप्रमाणे मला माझ्या संपूर्ण योद्ध्याचा वेष उतरून ठेवावा लागला होता. अंगावर नृत्यशिक्षिकेचं स्त्रीअंशुक चढवावं लागलं होतं. ज्या वक्षावर मी सतत लोहत्राण धारण करीत असे, त्यावर कंचुकी चढवावी लागली. सर्वांत अधिक यातना माझं प्राणप्रिय गांडीव धनुष्य शमीवर लपविण्यासाठी भीमाच्या हाती देताना झाल्या. त्याहून अधिक वेदना, या वर्षभरात माझ्या परमप्रिय सखा श्रीकृष्ण सुरक्षिततेसाठी एकदाही भेटणार नाही, याच्या झाल्या.

द्रौपदीला अंगावरील वस्त्रं खेचली जात असताना ज्या तीव्र वेदना झाल्या असतील, तशाच वेदना अंगावर स्त्रीवेष चढविताना मलाही झाल्या. वीर असूनही, पाशुपतास्त्राचा अधिकारी असूनही, अंगावर स्त्रीवेष चढविण्याचा हा घनघोर प्रसंग माझ्यावर आला, तसा तो माझ्या बंधूंपैकी कुणावरही कधीच आला नाही. श्रीकृष्णावरही तो कधी आला नाही, हे सारखं मनात येत राही. कधीकाळी श्रीकृष्णानं इंद्रप्रस्थात जाता–येता मत्स्यांशी ठेवलेल्या दृढ स्नेहसंबंधामुळे आणि त्यानं मत्स्यांबद्दल वेळोवेळी केलेल्या चर्चेमुळे, त्यांचे स्वभाव आम्हाला कळून आले. विराटनगरीत आम्ही एक वर्ष सुखरूप राहिलो.

या नगरीतील राजा विराट, महाराणी सुदेष्णा, पुढे माझी स्नुषा झालेली उत्तरा, तिचा बंधू उत्तर हेही माझ्या भावमंडलात प्रवेशले. श्रीकृष्णाची कन्या चारुमती ही जशी मला कन्येसारखीच प्रिय होती, तशीच उत्तराही झाली.

पाशुपतास्त्राचे मंत्र लाभल्यापासून माझ्या चित्तवृत्तीत मलाच जाणविणारा पालट झाला होता. ते मंत्र मनात घुमू लागले की, मला तीव्रपणे मी किरात रूपात पाहिलेल्या

शिवाचं स्मरण होई. मात्र हा शिव मला आमच्या नेहमीच्या श्रीकृष्णाच्या वेषात व रूपात दिसे. या रूपातील त्याचा पूर्वीचा निळसर कंठ मात्र अधिक घनदाट निळा झालेला जाणवे!

आमच्या अज्ञातवासानंतर घटनाचक्रं कितीतरी गतिमानतेनं फिरली. श्रीकृष्णाच्या क्वचित प्रकटणाऱ्या सुदर्शन चक्रासारखी! आम्हा कौरव–पांडवाच्या अनेक प्रश्नांचा निर्णय समरांगणात युद्धाशिवाय लागणार नाही, हे सिद्ध झालं. मी द्वारकेला जाऊन श्रीकृष्णाला भेटून आलो होतो – 'यादवांचं शस्त्रसज्ज सैन्य हवं की निःशस्त्र मी?' अशा त्यानं घातलेल्या कुणालाही बिकट वाटेल अशा प्रश्नाला मी पटकन निःसंदिग्ध उत्तर दिलं होतं – "जसा असशील तसा आम्हाला हवा आहेस, तो तू! मला, कुंतीमातेला आणि द्रौपदीसह माझ्या सर्व बंधूंना हवा आहे, तो श्रीकृष्ण आणि त्याचा अजोड आशीर्वाद."

दुर्योधनाला त्यानं यादवसेनेत किती रथी–महारथी आहेत, किती द्वैरथ योद्धे, किती पदाती, अश्वसाद आहेत, याची खडान्खडा माहिती दिली होती. त्याचं पूर्ण सांत्वन करून त्याला हसतमुखानं निरोप देत हस्तिनापूरला धाडलं होतं. एकटा यादवसेनापती सात्यकी व निवडक योद्ध्यांना समवेत घेऊन, माझ्यासह त्यानं द्वारका सोडली होती.

आम्ही उपप्लाव्याला आलो. उपप्लाव्याला येताच त्यानं आपल्या कल्पक बुद्धिमत्तेच्या जोरावर अनेक चक्रं फिरविली. आम्हा कौरव–पांडवांचं, बंधूबंधूचं विनाशक महायुद्ध टाळण्याचा आटोकाट यत्न केला. त्यातील पहिला यत्न म्हणून त्यानं माझे श्वशुर द्रुपद यांना सांगून, पांचालांचे पुरोहित हस्तिनापुरात महाराज धृतराष्ट्र, पितामह भीष्म यांच्याकडे समेटाची बोलणी करण्यासाठी धाडले. ते अयशस्वी होऊन परत आले.

कौरवमंत्री संजय हे श्रीकृष्णाच्या सख्यातील आहेत हे जाणून दुर्योधन, शकुनी, कणक यांनी कौरवांकडून त्याला समेटासाठी उपप्लाव्यात आमच्या शिबिरात पाठवलं. स्वतःला न पटलेला कौरवांचा संदेश मंत्री संजयांनी माझ्या समक्षच श्रीकृष्णाला सांगितला. तो समेटाचा संदेश नव्हताच. होता तिरकस नकाराचा ढोंगी संकेत. संजय माझ्या समक्षच द्वारकाधीश श्रीकृष्णाला म्हणाले, "महाराज धृतराष्ट्रांचा संदेश आहे की, लक्षावधी विक्रमी वीरांना महायुद्धात प्राणाहुती द्यायला लावण्यापेक्षा युधिष्ठिर आणि त्याच्या बंधूंनी त्यांना बालपणापासून प्रिय असलेल्या खांडववनासारख्या दुसऱ्या एखाद्या वनात जाऊन राहावं. आप्तांच्या सहकार्यानं त्या वनातही ते सहज इंद्रप्रस्थासारखं आणखीही एखादं राज्य उठवू शकतील. ते शक्यच झालं नाही, तर धार्मिक वृत्तीच्या धर्मराजानं भिक्षा मागून बंधूंसह आपला निर्वाह केला, तरीही ते शास्त्रसंमत आहे!"

केवळ कर्तव्य म्हणून तो कटू राजसंदेश कृष्णाच्या कानी घालतानाही अनेकविध भावनांनी कंठ दाटून आलेल्या संजयांनी बैठकीत श्रीकृष्णाचे पायच धरले. त्यांना थोपटून, हसतच वर उठवून, वक्षाशी अतीव प्रेमानं बिलगतं घेतं आम्हा पांडवांचा त्राता म्हणाला, "संजया, शांत हो. सावर. तू आपलं कर्तव्य केलंस. यात तुझा काहीच दोष नाही. तुझ्याविषयीच्या माझ्या प्रेमात यामुळे काहीही अंतर येणार नाही. मंत्री म्हणून तू तुझ्या महाराजांचा निरोप मला दिलास. माझा सखा म्हणून माझाही एक संदेश तुझ्या महाराज धृतराष्ट्रांना दे. सांग, पांडवांनी खूप सोसलं. सामोपचारानं त्यांचा पिता सम्राट

पांडूनं जिंकलेलं राज्य, त्यांना विश्वस्त म्हणून आता परत करावं. द्यूतात ठरलेल्या अटी त्यांनी काटेकोर पाळल्या असल्यामुळे, आता ठरल्याप्रमाणे त्यांना निदान इंद्रप्रस्थाचं राज्य तरी परत द्यावं. यासाठी आवश्यक ती शिष्टाई करण्यासाठी मीच हस्तिनापूरला येत आहे, हेही त्यांच्या कानी घाल."

संजय हस्तिनापूरला परत गेले. त्यांनी द्वारकाधीशांचा निरोप शब्दशः कौरवमहाराजांच्या कानी घातला. प्रतिसाद म्हणून हस्तिनापूरकडून काही समजेल, या अपेक्षेनं आम्ही सर्वांनी प्रतीक्षा केली. काहीही घडलं नाही. शेवटी श्रीकृष्णाच्या इच्छेप्रमाणे आमची द्रौपदीसह श्रीकृष्णाच्या नेतृत्वाखाली उपप्लाव्यात अंतिम बैठक भरली. सर्वानुमते आम्हा कौरव–पांडव बंधूंच्या राव्यासंबंधीच्या वादात शिष्टाई करण्यासाठी श्रीकृष्णानं जावं, असं ठरलं.

ठरल्याप्रमाणे कार्तिक मासात चंद्र रेवती नक्षत्रात असताना मैत्र मुहूर्तावर, आम्हा सर्वांचा निरोप घेऊन श्रीकृष्णानं सात्यकी व निवडक योद्ध्यांसह शिष्टाईसाठी उपप्लाव्य सोडलं. गरुडध्वज रथातून दारुकासह तो निघाला.

एका संध्याकाळी तो हस्तिनापुराजवळच्या वृकस्थल ग्रामात पोहोचला. एक रात्र सर्वांसह त्यानं तिथे पडाव टाकला. दुसऱ्या दिवशी पहाटे सर्व आन्हिकं आटोपून संध्या व दानधर्म उरकून, सात्यकीसह तो हस्तिनापूरच्या सीमेवर पोहोचला. कुरुमंत्री संजयांनी अग्रवार्ता दिल्यामुळे, श्रीकृष्णदर्शनासाठी आतुरलेल्या हस्तिनापूरकर स्त्री–पुरुषांच्या झुंडीच्या झुंडी सीमेकडे लोटल्या.

हस्तिनापुरास पोहोचल्यावर श्रीकृष्णानं पितामह भीष्म, धृतराष्ट्र अशा ज्येष्ठांशी प्रथम औपचारिक कुशलवार्ता केल्या. स्वागतासाठी सीमेवर आलेले महात्मा विदुर सोबतच होते. त्यांच्या आग्रहावरून हस्तिनापुरच्या दुसऱ्या सीमेवर असलेल्या त्यांच्या निवासस्थानी जाऊन, त्यांच्याकडे दुपारचं भोजन घेतलं. तिथेच थोडा विश्राम घेऊन कुंतीमातेची तिसऱ्या प्रहरी निवांत भेट घेतली. तिला वसुदेवबाबा आणि दोन्ही राजमातांसह द्वारकेतील सर्वांचं कुशल निवेदन केलं. आपण तुझ्या पुत्रांच्या वतीनं शांतीचा प्रस्ताव घेऊन कसे आलो आहोत, हे तिला समजावून सांगितलं.

संध्याकाळी आपला गरुडध्वज रथ त्यानं दारुकाला कुरूंच्या राजवास्तूतील दुर्योधनाच्या कक्षासमोर उभा करायला सांगितला. तो भेटीला येणार याची दुर्योधन–शकुनींना काहीच कल्पना नव्हती! प्रथम थोडा वेळ ते दोघेही कुटिल राजकारणी गडबडले, श्रीकृष्णाचं हेच तर वैशिष्ट्य होतं की, तो केव्हा काय करेल, कसा वागेल याचा कयास भोवतीच्यांना कधी करताच येत नव्हता. दुर्योधन–शकुनींनी ओशाळं हसत त्याचं स्वागत केलं. आपण त्याच्या स्वागतासाठी सीमेपर्यंत गेलो नाही, ही चूक सावरण्यासाठी दुर्योधनानं त्याला रात्रीच्या भोजनाचा कितीतरी वेळा पुनःपुन्हा हात जोडून आग्रह केला. एका गवळटाला कुरूंचा अहंमन्य युवराज हात जोडून विनवणी करतो आहे, हे दृश्यच फार अघटित होतं. त्याला तसेच हात जोडून श्रीकृष्णानं वारंवार नम्र नकार दिला. रात्रीचं भोजनही त्यानं विदुराकडेच घेतलं. भोजनानंतर महात्मा विदुरांशी रात्री दीर्घकालपर्यंत चर्चा केली. चर्चेत धृतराष्ट्र, दुर्योधन, शकुनी, अमात्य वृषवर्मा या सर्वांच्या मनातील पवित्र्यांचे बारकावे उचलले. विदुरांनी दिलेल्या माहितीप्रमाणे पितामह भीष्म, धृतराष्ट्र व दुर्योधन य पितापुत्रांसमोर हताश झालेत, हे ऐकताना त्याला फार जाणवलं.

दुसऱ्याच दिवशी शांतिवार्तेच्या यात्रेला प्रारंभ झाला. सात्यकीला सोबत घेऊन दारुकाच्या चार पांढऱ्याशुभ्र अश्वांच्या गरुडध्वजातून, आमचा तारक श्रीकृष्ण विदुर–निवासापासून निघाला. त्याची सर्वांगीण कीर्ती इतकी शिगेला पोहोचली होती की, तो यश घेऊनच परतणार, याविषयी आम्हाला कसलीच शंका नव्हती. तो हस्तिनापुरात आला आहे, हे आधीच नगरजनांना समजलं होतं, त्यामुळे त्याच्यावरच्या प्रेमानं वेडावलेल्या नगरजनांनी सडासंमार्जन घालून, रांगोळ्या रेखून उभं राजनगर सजवलं होतं. सुगंधी फुलांच्या कमानी जागोजागी उठवून शृंगारलं होतं. विदुर–निवासापासून कुरूंच्या राजसभेत जायलाच त्याला दोन घटिका लागल्या. नगरस्त्रिया त्याच्या मस्तकी शुभ कुंकुमतिलक रेखून, त्याला करंजेलाच्या निरांजनांनी व भरल्या नेत्रांनी ओवाळत होत्या. जागोजागी गवाक्षांतून त्याच्यावर ओंजळी ओंजळींनी पुष्पवर्षाव केला जात होता.

पितामह भीष्म, महात्मा विदुर, अमात्य वृषवर्मा यांनी कुरूंच्या प्राचीन राजसभागृहाच्या द्वारात अगत्यानं उभं राहून, त्याचं आदरानं स्वागत केलं. सभागारात त्याच्यासाठी विशेष मांडलेल्या उच्चासनावर त्याला बसविलं. त्याच्या पाठीशी सात्यकी आणि सशस्त्र निवडक यादव–पांडव योद्धे होते. दारुक बाहेर रथातच थांबला होता. कुरूंच्या त्या प्राचीन व सभासदांनी गच्च भरलेल्या राजसभेत श्रीकृष्ण आम्हा पांडवांसाठी बोलला. ते त्याचं अजोड वक्तव्य ऐकण्याचं भाग्य, आम्हांपैकी एकट्या सात्यकीला काय ते लाभलं. माझे कान ते कधीच ऐकायला न मिळाल्यामुळे जीवनभर तृषार्त राहिले. जीव तळमळत राहिला.

पण – पण त्या वक्तव्याचा महाराज धृतराष्ट्र, दुर्योधन, शकुनी यांच्यावर कसलाच परिणाम झाला नाही. त्यांनी त्याचा शिष्टाईचा प्रस्ताव फेटाळून लावला. दुर्योधन तर विमूढासारखं बडबडला, “सुईच्या अग्रावर थरथरत उभा राहणारा धूलीचा कणही पांडवांना युद्धाशिवाय कधीच मिळणार नाही. इतकंच काय, सर्व वादाचं मूळ असलेल्या या गवळटालाच मी बंदिवान करून टाकतो! यामुळे सर्वच प्रश्न मिटतील.” अहंपणाच्या अत्युच्च शिखरावर पोहोचलेला तो विमूढ आत्मा, कसंतरीच बरळला – अगदी शिशुपालासारखं!

आपल्या निरनिराळ्या दलप्रमुखांना त्यानं सभागृहातच धडाधड आज्ञाही दिल्या. जसं शिशुपालाला बघणं भाग पडलं होतं, तसंच दृश्य त्याला आणि कुरू सभासदांना बघावं लागलं होतं. श्रीकृष्णानं डोळे मिटून सुदर्शनाच्या दिव्य मंत्रबोलांना आवाहन केलं होतं. त्याच्या एकेक मंत्रबोलांबरोबर कुरूंनी कधीही न ऐकलेला एकेक वाद्यनाद, सभागृहाचा थरकाप उडवीत उमटू लागला. तो इतका भेदक होता की, सभागृहातील यच्चयावत सारेच भेदरून उठून उभे राहिले. प्रथम केवळ तिघेच काय ते बसून राहिले होते. पितामह भीष्म आणि काहीच दिसत नसल्यामुळे महाराज धृतराष्ट्र आणि महाराणी गांधारीमाता. श्रीकृष्णाच्या उद्धरलेल्या उजव्या तर्जनीवर प्रचंड गतिमान असं, बारा आऱ्याचं, वज्रनाभीचं सुदर्शन प्रकटलं होतं. त्याच्या तेजस्वी प्रकाशलाटांनी ती सभा दिपून गेली होती. ते प्रखर तेज सहन करण्याचं एकातही सामर्थ्य नव्हतं. भांबावल्यासारखे महाराज हात जोडून इकडे–तिकडे मान फिरवत काकुळतीनं म्हणताना ऐकू येत होतं, “क्षमा करा द्वारकाधीश, माझा पुत्र विमूढ आहे – विमूढ आहे.”

आसनावर बसलेल्या एकट्या पितामह भीष्मांनी दोन्ही हात जोडून, डोळे मिटून

पुटपुटत कसलंतरी स्मरण चालविलं होतं.

काही क्षणच हे दिव्य दर्शन त्यानं कुरूंना दिलं. तो मोजकंच बोलला, "दुर्योधनाऽऽ! सामर्थ्य असेल, तर तुझ्या राज्यातील सर्व दोरखंड आणून, सर्व सशस्त्र सैनिक मझ्यावर सोडून, मला बंदिवान करून दाखव!!" मग निर्धारानं पाय रोवत तो सभागृहाबाहेर पडू लागला. आस्ते–आस्ते प्रकटलेलं सुदर्शनही लुप्त होत गेलं. सात्यकीसह तो बाहेर पडला, तेव्हा दुर्योधन आपल्या आसनावर घायाळ कोसळलेला होता.

सभागृहाच्या दाराशी गरुडध्वज घेऊन थांबलेल्या दारुकाला तो नेहमीसारखाच दिसला. मात्र या वेळी कितीतरी निर्धारानं पावलांमागून पाऊल रोवत आलेला!

श्रीकृष्णाची दूरदृष्टीची शिष्टाई, उन्मत्त दुर्योधनानं फेटाळून लावली होती. आता महायुद्ध अटळ होतं. ते रोखणं आता कुणाच्याही हातात राहिलं नाही. मला पूर्ण विश्वास होता, ते कसं खेळवावं हे एकट्या श्रीकृष्णाच्याच इच्छेवर व हाती होतं. तो उपप्लाव्याला परतला, तोच आतबाहेर कितीतरी बदलून! आम्हा प्रत्येकाच्या मनात त्याला भेटून आल्यानंतर एकचएक विचार पक्का होत होता, 'संग्राम – प्राणपणाचा – न भूतो न भविष्यति असा – न्याय–अन्यायाचा एकदाच काय तो अंतिम निवाडा करणारा.' एरवी तत्त्वज्ञानपर आणि धार्मिक बोलणाऱ्या युधिष्ठिराला, तो ज्येष्ठ असल्यामुळे मी पुन:पुन्हा खोदून विचारलं, "बंधो, तुझा पक्का निर्णय काय?" त्यानंही शंखासारखी आपली मान ताठ ठेवून उत्तर दिलं, "महासंग्राम!"

आम्ही सर्व कुरुक्षेत्रावरील संग्रामभूमीच्या शिबिरात होतो. श्रीकृष्ण होता उपप्लाव्यात. त्यानं आम्हा पांडवांचे धौम्य मुनी, यादवांचे गर्ग, पांचालांचे याज–उपयाज अशा अनेक तज्ज्ञ ऋषिमुनींच्या बैठकीत महायुद्धाची तिथी पक्की केली. ती होती मार्गशीर्ष वद्य द्वितीया ही! युद्धासारख्या कुठल्याही महत्त्वाच्या सत्याला सामोरं जाण्यापूर्वी, ज्येष्ठांचे आशीर्वाद घ्यावे लागतात. माझे वंदनीय सर्व ज्येष्ठ तर हस्तिनापुरात होते. यासाठी दोन दिवस अगोदरच मी भीमसेन व सर्व बंधूंसह हस्तिनापुरात आलो. सर्वप्रथम कुंतीमातेचं आणि महात्मा विदुरांचं दर्शन घेतलं. नम्रभावानं जेव्हा मी कुंतीमातेच्या चरणांवर माझं मस्तक ठेवलं, तेव्हा माझं मन पूर्णत: निर्भय झालं. तीही मला उठवून वक्षाशी बिलगतं घेत, वृद्ध असूनही जातिवंत क्षत्राणीसारखी म्हणाली, "कुरुकुलाला शोभेल असंच युद्ध कर. कृष्णाच्या शब्दाबाहेर रतिभरही जाऊ नकोस. ध्यानी ठेव, तो केवळ सारथी नाही. रोज समरांगणात उतरण्यापूर्वी त्याच्या चरणांवर मस्तक ठेवून, त्याचे आशीर्वाद शिरावर घ्यायला विसरू नको. सर्व बंधूंनाही घ्यायला लाव. आम्हा पांडवांचा भार सर्वाधिक आहे, तो तुझ्या अद्वितीय विक्रमावर! जा – आयुष्यमंत हो – विजयवंत हो – कीर्तिवंत हो." तिच्या पाणीदार डोळ्यांत मला पूर्वी कधीही न पाहिलेलं, तळपतं निर्धारी क्षात्रतेज स्पष्ट दिसलं.

आम्ही सर्वांनी विदुरांचे आशीर्वाद घेतले. भेटीला गेलो ते पितामह भीष्मांच्या! त्यांच्या चरणांवर ठेवलेलं मस्तक, मला वर घ्यावंसंच वाटेना. ते ध्यानी येऊन तत्परतेनं त्यांनी मला वर घेतलं. कुरुकुलातील तो उंचच उंच देवदार वृक्ष थरारला. भावदाटल्या भीष्मबोलीत पितामह म्हणाले, "पुत्रा अर्जुना, श्रीकृष्ण सांगेल तसंच कर! आयुष्यमंत हो, विजयी हो. या शेवटच्या कुरूचे, नव्या पिढीतील सर्वांत गुणवंत म्हणून तुला कृपाशीर्वाद आहेत!"

आम्ही सर्वांनी गुरू द्रोणाचार्य, कृपाचार्य यांचे व महाराज धृतराष्ट्र आणि गांधारीमाता यांचेही आशीर्वाद घेतले. जेव्हा हस्तिनापुराहून आम्ही कुरुक्षेत्राकडे परतलो, तेव्हा माझं मन संग्रामोत्सुक, निर्धारी झालं होतं. आता हे युद्ध, बंधूबंधूंत आणि केवळ राज्यासाठी राहिलं नव्हतं. तो सत्यासत्याचा, पिढ्यान्‌पिढ्यांनी स्मरावा असा ऐतिहासिक संग्राम ठरणार होता. माझ्यावर त्याचं सर्वांत मोठं दायित्व होतं.

शेवटी लाखोंनी प्राणपणानं प्रतीक्षा केलेला, तो मार्गशीर्ष वद्य द्वितीयेचा महान दिवस उजाडला. आज ब्राह्मी मुहूर्तावर उठून, स्नानसंध्यादी विधी उरकून मी व सर्व बंधू आम्हा पांडवांच्या शिबिर संकुलातील सर्वांत उंच आणि घेरेदार अशा प्रशस्त कृष्ण शिबिरात आलो. प्रत्येकाच्या उजव्या मनगटात पांढऱ्याशुभ्र मोगरीच्या फुलांच्या भरगच्च माळा बांधल्या होत्या. आम्ही पाचही बंधूंनी वक्षांवर बळकट लोहत्राणं धारण केली होती. प्रत्येकाच्या खांद्यांवर त्याचं–त्याचं मंत्रभारित धनुष्य होतं. पाठीवर तसेच वादांनी आवळलेले, बाणांनी भरगच्च भरलेले तूणीर होते. कमरेला खड्गं लटकली होती. आमची गदा, चक्र, मुसल, शतघ्नी, भृशुंडी, अग्निकंकण अशी अनेकविध शस्त्रं, प्रत्येकाच्या प्रशस्त रथातील मागच्या घेरात हारीनं मांडली होती.

शिबिरात पूर्वाभिमुख मांडलेल्या एका आटोपशीर आणि आकर्षक सुवर्णी आसनावर श्रीकृष्ण बसला होता. तो निकरानं नाकारत असताना युधिष्ठिर, भीमसेन, आम्ही सर्वच बंधूंनी तेवढ्याच निश्चयाचा त्याला आग्रह केला होता. त्या आसनावर बसून विधियुक्त पूजन झाल्यानंतर त्यानं आम्हाला आशीर्वाद द्यावेत, असा! तो आमचा आग्रह शेवटी त्यानं मान्य केला होता. युधिष्ठिरानं चरण धुऊन त्याचं यथासांग पूजन केलं. आम्ही क्रमश: एकेक बंधूनं त्याच्या चरणांवर मस्तक ठेवून त्याचे आशीर्वाद घेतले. युधिष्ठिराला तो म्हणाला, 'विजयी भव! अभिषिक्त भव!' भीमसेनाला तो म्हणाला, 'विजयी भव! कीर्तिवंत भव!' मी आशीर्वादासाठी त्याच्यासमोर आलो. मला त्यानं तोंडी कसलाच आशीर्वाद न देता, पटकन वक्षाशी बिलगतं घेतलं. मला हवा तो आशीर्वाद मिळाला होता.

नकुल–सहदेवांना त्यानं 'आयुष्मान भव! कीर्तिमान भव!' असे आशीर्वाद दिले.

आमच्यासमवेत पांचालांचा राजपुत्र धृष्टद्युम्न होता. श्रीकृष्णाच्याच सांगण्यावरून आम्ही त्याला कालच आमचं सेनापतीपद प्रदान केलं होतं. त्या पदाचा रीतसर अभिषेक कालच त्याला समंत्र झाला होता. त्याच्या कंठात सेनापती म्हणून टवटवीत शुभ्र फुलांची माला शोभत होती. त्याहून कितीतरी मोठी, लांब वैजयंतीमाला श्रीकृष्णाच्या वक्षावर रुळत होती.

त्याला सामोरं ठेवून धृष्टद्युम्नामागून आम्ही पाचही बंधू त्याच्या शिबिराबाहेर पडलो. प्रत्येक जण आपापल्या रथावर आरूढ झाला. मीही श्रीकृष्णामागून जात माझ्या सालंकृत, नंदिघोष रथावर आरूढ झालो. सर्व तऱ्हेच्या शस्त्रांनी त्या रथाचा घेर सुसज्ज केला होता. ध्वजदंडावरचा कपिध्वज कुरुक्षेत्रावरच्या दृषद्वती नदीवरून येणाऱ्या वायुलहरींवर फडफडत होता. त्यावरील कपि–वानर अज्ञाताच्या वक्षावर थडाथड उड्या घेत होता. आमच्या पाठीशी पत्ती, सेनामुख, गुल्म, गण, वाहिनी, पुतना, चमू, अनाकिनी अशा सुरचित विभागात मांडणी केलेला सात अक्षौहिणी सेनेचा सागरच सागर पसरला होता.

समोर तशाच रचनेत अकरा अक्षौहिणी सशस्त्र कौरवसेनेचा प्रचंड महासागर पसरला होता. त्याच्या मुखावर आज कौरवसेनापतीपदाचा अभिषेक झालेल्या पितामह भीष्मांचा गंगौघ रथ स्पष्ट दिसत होता. त्यांच्या उजव्या हाताशी रथदलाच्या मुखावर रथारूढ झालेले, शुभ्र दाढीधारी गुरू द्रोण दिसत होते. त्यांच्या उजव्या हाताशी आचार्य कृप होते. पितामहांच्या डाव्या हाताशी गुरुपुत्र अश्वत्थामा, भूरिश्रवा, विकर्ण दिसत होते.

अद्याप श्रीकृष्ण माझ्या नंदिघोष रथाच्या रथनीडावर आरूढ झाला नव्हता. त्यानं प्रथम रथाची सर्व चक्रं मागे–पुढे हलवून ती नीट बसलीत, कार्यक्षम आहेत, याची खातरी करून घेतली. चारही अश्वांच्या तो जवळ गेला. कुणाच्या पाठीवर थाप दे, कुणाची आयाळ घुसळून टाक असं करीत त्यालाच कळणाऱ्या अश्वगीतेत, तो प्रत्येक अश्वाशी काहीतरी बोलला. मग एका झेपेतच त्यानं रथनीड गाठला. अश्वांना आवरणारे, वळवणारे, चेतना देणारे आठही वेग हाती घेऊन, ते त्यानं तोलून पहिले. कटीच्या निळ्या शेल्यात बांधलेला पांचजन्य चाचपून पाहिला. माझ्यावर एक दृष्टिक्षेप टाकून तो हसला. त्याच्या निर्धारी मुखमंडलावरील हे रणहास्य, मी पूर्वी कधी, कधीच पाहिलं नव्हतं. ते कसं होतं, हे केवळ मीच जाणू शकत होतो. त्याचं वर्णन करता येणं, मला शक्य नव्हतं.

एकाएकी काहीतरी आठवल्यासारखं तो म्हणाला, “थोडा थांब धनंजया. आलोच.” त्यानं हातचे वेग पुन्हा खाली ठेवले. रथनीडाजवळ असलेली एक लाकडी नळकांडी घेऊन तो पुन्हा एका झेपेतच रथनीडावरून खाली उतरला. रथाच्या पुढच्या पहिल्या उंच चक्राजवळ जात तो ओणावला. हातच्या नळकांडीतील वंगण एका लवचीक काठीला बांधलेल्या फडक्याच्या बोळ्यानं तो रथचक्राच्या कण्याला देऊ लागला. त्याला वाकून माझ्या रथाच्या चक्राला वंगण देताना पाहून, एका विचारानं मी अंगभर थरथरलो. तो खरोखरच सर्वार्थानं ‘सारथी’ होता. आर्यावर्ताची मानवी जीवनगंगेची रथयात्रा जेव्हा–जेव्हा ‘पुढे काय’ म्हणून क्षणैक थांबली होती, तेव्हा–तेव्हा आपल्या दिव्य विचारांचं वंगण देऊन, त्यानं ती पुनश्च गतिमान केली नव्हती काय? अगदी या क्षणापर्यंत!

जसा वेगानं तो खाली उतरला होता, तसाच नंदिघोषाच्या सर्व चक्रांना वंगण देऊन तो पुन्हा रथनीडावर आरूढ झाला. निळ्या शेल्यात बांधलेला आपला टपोरा पांचजन्य त्यानं सोडवून आपल्या दोन्ही हातांच्या ओंजळीत घेतला. ग्रीवा गगनगामी उन्नत करीत, कंठधमन्या फुगवून त्यानं प्राणदेठापासून पांचजन्य फुंकला. तो ऐकताच, मी अष्टांगी देहभर कसा शहारून उठलो. एवढ्यात समोरच्या आपल्या रथावरून पितामहांनी आपला ‘गंगनाभ’ नावाचा शंख तसाच फुंकला. त्यांच्या पाठोपाठ आचार्य द्रोण, कृप यांनी आपापले शंख फुंकले. कुरुसेनेत रणवाद्यांचा नुसता कल्लोळच कल्लोळ उठला.

माझ्या मनात उलटसुलट विचारांचे असंख्य शंखच शंख घुमू लागले. पांढऱ्याशुभ्र दाढीधारी वृद्ध पितामहांना बघताना, मी पुनश्च शहारलो. ज्यांच्या अंगाखांद्यावर आपण खेळलो, त्या पितामहांवर बाण फेकायचे? ज्यांना वंदन करून आलो, त्यांना वधायचं? ज्या आचार्य द्रोण, कृपांनी शिष्य म्हणून माझ्यावर अपार प्रेम केलं, त्यांना जिवे मारायचं? कशासाठी? एका य:कश्चित राज्याच्या प्राप्तीसाठी? त्यापेक्षा संजयांनी सांगितलेल्या निरोपाप्रमाणे भिक्षा मागून उदरनिर्वाह केलेला काय वाईट? गुरुहत्या – ज्येष्ठ पितृहत्या? राज्य? हस्तिनापूरचं? इंद्रप्रस्थाचं भिक्षा – तीर्थातीर्थांवर

मागितलेली? राज्य की भिक्षा? युद्ध की शांतता? लाखोंचे बळी घेणाऱ्या युद्धापेक्षा लाखोंना शुभेच्छा देणारा वनवास, बरा नाही काय?

माझ्या डोळ्यांसमोर रणभूमीवर माझ्याच बाणांनी गतप्राण होऊन पडलेले पितामह, गुरू द्रोण, कृपाचार्य दिसू लागले. जगातील मी एकटाच सर्वांत पापी ठरणार!

माझ्या डोळ्यांसमोर क्षणात अंधेरी आली. कंठाला कोरड पडली. तोंड कसं शुष्क–शुष्क झालं. सर्वांगाला दरदरून घाम फुटला. असंख्य भाल्यांनी टोचावं, तशा आत्म्याला वेदना झाल्या. डोळे पाण्यानं डबडबून आले. माझ्याच बाणांनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेली प्रेतच प्रेतं मला दिसू लागली. पोटऱ्यांत गोळेच गोळे दाटून आले.

माझा हातून एरवी कधीही न पडलेलं गांडीव धनुष्य केव्हा गळून पडलं, ते मला कळलंही नाही. "नाहऽही – नाहीऽ हृषिकेशाऽ! मी मुळीच युद्ध करणार नाही!!" असं कसंतरी बोलून मी नंदिघोषाच्या मागील घेरात मटकन खालीच बसलो.

डोळ्यांतून न आवरणाऱ्या आत्मरसाची संततधारच धार लागली. कधीच खाली न घेतलेली मान, देठ मोडलेल्या नीलकमलासारखी काही केल्या वर येईना!

समोर रथनीडावरचा हृषिकेश काही क्षण स्तब्धच झाला असावा. दुसऱ्याच क्षणी रथनीडावरून भुईवर झेप घेत तो उतरला. नंदिघोषाच्या मागील घेरात आला. माझ्या खांद्यावर आपले प्रेमळ हात ठेवून ते थोपटून म्हणाला, "काय झालं अर्जुना? तू असा हतप्रभ होऊन बसलास, तो का? कधी नव्हे, ते तुझ्या हातून तुझं प्रिय गांडीव धनुष्य असं गळून पडलं, ते का?" गडवाभर शब्दांत अर्थाचा महासागर भरण्याचं महासामर्थ्य त्याच्या वेणुवाणीत ठासून भरलेलं होतं.

मी खालच्या मानेनं कंठ दाटल्या स्थितीत उत्तरलो, "मधुसूदना, पूजनीय आणि वंदनीय अशा पितामहांना आणि आचार्य द्रोण–कृपांना मी कसा काय वधू? ज्यांची चरणधूली घ्यावी, त्यांच्या कंठावर कसे बाण फेकू? या महात्म्यांना न मारता भिक्षा मागून पोट भरावं लागलं, तरी ते श्रेयस्कर आहे. मला मान्य आहे. तेच श्रेयस्कर आहे!"

या माझ्या उत्तरावर त्यानं मला दिलेला हितोपदेश, जगातल्या कुठल्याही नरानं सदैव स्मरणात ठेवावा, असाच आहे. तो उपदेश त्यानं मला घटकान्‌घटका केला काय? समरणांगणावर ते शक्य तरी होतं काय? या व अशा अनेक प्रश्नांचं स्पष्ट उत्तरं आहे, 'नाही – मुळीच नाही.'

तो माझ्याशी अगदी मोजकंच बोलला, पण जीवनातलं सारसर्वस्व ज्यात सामावलेलं आहे. असंच बोलला. तेवढंच मी सांगतो आहे. माझी किंवा त्याचीही जीवनगाथा अनेकांनी आपणाला हवी तशी अंगडी–टोपडी चढवून, तिखट–मीठ लावून वर्षानुवर्षं सांगितली. तशीच या हितोपदेशालाही मनमुक्त अंगडी–टोपडी चढली आहेत. ती विचारात न घेता, सार विचारात घेणं, हेच मी मोलाचं मानत आलो आहे. त्यानं मला 'तू गप्प का, बोलत का नाहीस?' असं छेडल्यामुळे मी त्याला म्हणालो, "ज्यांना मारून जगण्याची माझी मुळीच इच्छा नाही, ते वंदनीय गुरू व ज्येष्ठ असलेले प्रत्यक्ष माझे बंधू युद्धासाठी समोर उभे आहेत. त्यांना बघून माझी स्वाभाविक क्षात्रवृत्ती नष्ट झाली आहे. या क्षणी योग्य काय, अयोग्य काय, धर्म कोणता, अधर्म कोणता या भयाण संभ्रमात मी पडलो आहे. यासाठी जे निश्चयाचं सत्य असेल, तेवढंच मला सांग. माधवा, मी तुझा परमसखा आहे. शिष्य आहे. मला योग्य तो बोध कर. सर्व इंद्रियंच

शोषून टाकणारा हा माझ्या मनाचा क्षोभ आणि शोक दूर करील, असं मला खरोखरच काहीही दिसत नाही.”

यावर मला अतीव प्रेमानं थोपटून श्रीकृष्ण म्हणाला, “अर्जुना, ज्याचा शोक करू नये, त्याचा तू व्यर्थ शोक करीत आहेस. स्वत:ला काहीतरी अचानकच दिव्य ज्ञान झाल्याच्या गोष्टी करतो आहेस. अरे, कुणाचे प्राण गेले किंवा राहिले काय, ज्ञानी पुरुष त्याचा कधीच शोक करीत नाहीत. तू, मी व हे योद्धे पूर्वी कधीच नव्हतो असं नाही. यापुढेही आपण असणार नाही, असंही नाही. हे सर्व जग ज्यानं व्यापलं आहे, ते मूळ आत्मतत्त्व सदैव अविनाशी आहे. अमर आहे. त्या तत्त्वाचा नाश करण्यास कोणीही समर्थ नाही.

“हे कुंतीपुत्रा, हे आत्मतत्त्व मारणारा मी आहे असे जो मानतो किंवा ते मारले जात आहे असे समजतो, त्या दोघांनाही खरे ज्ञान नसते. हे भारता, हा अमर आत्मा कधीही कुणालाही मारीत नाही आणि कुणाकडून मारलाही जात नाही. तो कधी जन्मत नाही किंवा मरतही नाही. हा एकदा होऊन पुन्हा होणार नाही, असंही नाही. तो अविनाशी, अज, नित्य, शाश्वत व पुरातन आहे.” त्यानं पुन्हा माझे खांदे प्रेमानं हळूवार थोपटले.

भरल्या डोळ्यांनी, किंकर्तव्य मनानं मी त्याच्याकडे नुसता बघतच राहिलो. तो पुन्हा मला समजावीत म्हणाला, “ज्याप्रमाणे एखादा मनुष्य जुनी वस्त्रं टाकून नवी धारण करतो, त्याप्रमाणे शरीराचा स्वामी असलेला आत्मा जुनी शरीरं टाकून नवीन धारण करतो!”

मी पूर्वी कधीच ऐकली नव्हती, अशी आज त्याच्या वाणीला धार चढली होती. हिमालयातून रोरावत कोसळणाऱ्या गंगेचा ओघ त्याच्या सत्त्वशील रणवाणीला आला होता. तो बोलत राहिला, मी ऐकत राहिलो. म्हणाला, “धनंजया, या आत्म्याला शस्त्रे तोडू शकत नाहीत. याला अग्नी जाळू शकत नाही. याला पाणी भिजवू शकत नाही व वायू सुकवूही शकत नाही.”

त्याचा शब्दन्शब्द मला अंतर्मुख करवून, स्वत:मध्येच खोलवर डोकावायला भाग पाडत होता. मी ऐकत राहिलो, तो बोलत राहिला. म्हणाला, “पराक्रमी पार्था, हा आत्मा अव्यक्त आहे. मानवी इंद्रियांना तो सहजासहजी न दिसणारा आहे. त्याला केवळ बुद्धी व मनानं जाणणं सर्वस्वी अशक्य आहे.

“आणि हे महाबाहो पार्था! हा आत्मा नित्य जन्मतो किंवा मरतो असं तू मानीत असलास, तरीही तू त्याचा शोक करणं मुळीच उचित नाही. कारण जो जन्मला, त्याला मृत्यु निश्चित आहे. त्याचप्रमाणे जो मेला, त्याला जन्मही निश्चित आहे. म्हणूनच ज्या गोष्टीतील काहीही तुझ्या हाती नाही, त्यासाठी तू व्यर्थ शोक करणं उचित काय?

“संयमी गुडाकेशा! तू क्षत्रिय आहेस. लक्षात ठेव, धर्माला उचित अशा युद्धापेक्षा क्षत्रियाला श्रेयस्कर असं दुसरं काहीही नाही. या वेळीच हातपाय गाळून तू रणभूमी सोडलीस तर पळपुटा, भीरू म्हणून तुझी पिढ्यान्पिढ्यांची दुष्कीर्ती होईल. छी–थू होईल आणि नीट ध्यानी घे, कुठल्याही सज्जन पुरुषाला दुष्कीर्ती ही मरणापेक्षा अधिक दाहक असते. कुरुक्षेत्राच्या या धर्मभूमीतून तू भयानंच परतलास, असंच समोरचे सर्वच महारथी मानतील. आजवरच्या तुझ्या सामर्थ्याची ऐकूही नये, अशी ते निंदा करतील. तुझे समोरचे शत्रूच बोलू नयेत, अशा गोष्टी तुझ्याविषयी बोलतील. खरोखरच या युद्धात तू वधला गेलास, तर क्षत्रियाला सन्मानाच्या अशा स्वर्गाप्रत जाशील; आणि तू जिंकलास, तर

गौरवानं पृथ्वीचं राज्य भोगशील.

"यासाठी हे अशरण अर्जुना, युद्धाचा निश्चय करून ऊठ! सुख–दु:ख, हानि–लाभ आणि जयापजय सर्वच सारखे मानून लढायला सिद्ध हो! असं केलंस, म्हणजे तुला कोणतंच पाप लागणार नाही.

"हे सव्यसाची अर्जुना! चोहोकडे पाण्याचा पूरच पूर आला असता, जसा विहिरीला काही अर्थ राहात नाही, तसा ज्ञानाची प्राप्ती झालेल्या जिवाला कुठल्याही कर्मकांडात मग अर्थ उरत नाही.

"बीभत्सू कौंतेया। आत्ताच नव्हे; तर जीवनभर लक्षात ठेव, कर्म करण्यापुरताच काय तो तुझा अधिकार आहे. त्याच्या फलावर कधीच असता कामा नये. माझ्या अमुक कर्माला अमुक फळ मिळावं, असा हेतू ठेवून काम करणारा कधीच होऊ नको आणि कर्म न करण्याचाही म्हणजे निष्क्रिय राहण्याचाही आग्रह मूढासारखा धरू नकोस. लक्षात ठेव, निद्रेतही जिवाला कर्म अटळ आहे!

"असं हे अटळ कर्म करण्याची जी चतुराई किंवा कौशल्य आहे, तिलाच 'कर्मयोग' म्हणतात. समतोल बुद्धीनं, स्थितप्रज्ञ वृत्तीनं तो साधावा लागतो. गुडाकेशा, तुझ्या या संभ्रमित स्थितीतल्या विषादयोगावर थोर, ज्ञानी पुरुषांनी सांगितलेला 'सांख्ययोग' हाच उपाय आहे. अन्य कुठलाही नाही."

आता मी कितीतरी सावरलो होतो. माझा मन:क्षोभ कितीतरी कमी झाला होता. त्या जागी त्याच्या विमल मुखातून बाहेर पडणारा शब्दन्शब्द ऐकायला माझं मन आता अपार उत्सुक झालं होतं. हाच तो क्षण होता, ज्या वेळी नानाविध पैलूंचं जीवनसत्य मला त्याच्या तोंडून ऐकायला मिळणार होतं. स्वत:ला सावरत मी त्याला नम्रभावानं विचारलं, "हे केशवा – हृषिकेशा, तू म्हणतोस तो स्थितप्रज्ञ – स्थिरप्रज्ञ म्हणावं तरी कोणाला? मला एकदा सांग तरी, तू म्हणतोस त्या स्थितप्रज्ञाचं बोलणं, बसणं, वागणं असतं तरी कसं?" आता प्रथम मान वर घेऊन मी त्याच्याकडे निर्धारानं पाहिलं. तसं तो कितीतरी मधुर हसला. वक्षावरची भरगच्च वैजयंतीमाला कुरवाळीत तो म्हणाला, "जिष्णु अर्जुना! तुला जाणून घ्यायची आहेत, ती स्थितप्रज्ञाची लक्षणं शांतपणे ऐक. मनातील सर्वच सर्व कामभावना म्हणजे वासना सांडून, आपल्याठायीच संतुष्ट होऊन जो राहतो, त्याला 'स्थितप्रज्ञ' म्हणतात.

"फाल्गुनी–धनंजया! दु:खात ज्याच्या मनाला खेद होत नाही, सुखात ज्याला आसक्तीची उचंबळ राहिली नाही, ज्याची प्रीती, भय, क्रोध ही भावना सुटली, त्याला 'स्थितप्रज्ञ' म्हणतात.

"किरीटिन–कौंतेया! कासव आपले अवयव ज्याप्रमाणे सर्व बाजूंनी आखडून घेतो, तशी ज्या पुरुषानं आपली इंद्रियं विषयापासून आवरून धरली आहेत, त्याला 'स्थितप्रज्ञ' म्हणतात.

"जयिष्णू–पांडवा! जो बरं–वाईट लाभता त्यासाठी आनंदित होत नाही वा संतापत नाही, त्या प्रज्ञा स्थिरावलेल्या पुरुषाला 'स्थितप्रज्ञ' म्हणतात.

"निराहारी पुरुषाचे विषय सुटले, तरी त्यातील गोडी सुटत नाही. ज्याला परब्रह्माचा अनुभव आला आणि दोन्ही सुटले, त्याला 'स्थितप्रज्ञ' म्हणतात.

"धनुर्धर–धनंजया! इंद्रियदमनाचा प्रयत्न करणाऱ्या विद्वान पुरुषाचं मनदेखील ही दांडगी, बलवंत इंद्रियं बलात्कारानं भलतीकडे ओढून नेतात. यास्तव इंद्रियांचं संयमन

करून, त्यांना स्वाधीन ठेवून ज्याची बुद्धी स्थिर झाली, त्यालाच 'स्थितप्रज्ञ' म्हणतात.

"कौंतेय–गुडाकेशा! नीट ध्यानी घे, विषयांचं चिंतन करणाऱ्या पुरुषाचा त्या विषयाच्या ठायी संग वाढत जातो. त्या संगापासून संबंधित विषयाशी आपल्याला पाहिजे ती वासना उत्पन्न होते आणि ही वासना तृप्त करण्यात अडथळा आला, म्हणजे त्या कामापासूनच क्रोधाचा उद्भव होतो.

"सव्यसाची–सख्या! पुढे या क्रोधापासूनच संमोह निर्माण होतो. त्या संमोहापासून स्मृतिभ्रंश, स्मृतिभ्रंशापासून बुद्धिनाश आणि शेवटी बुद्धिनाशापासून सर्वस्वाचा विनाश होतो." त्याची वाणी आता कणाकणानं कशी अनुपम फुलत चालली.

"विक्रमी–वीरा! नीट ध्यानी घे की, राग आणि द्वेष नष्ट झाले की, सर्व इंद्रियं पुरुषाच्या हातात येतात. तो इंद्रियांनी विषयांमध्ये वागूनही प्रसन्नचित्त होतो.

"सव्यसाची–धनुर्धरा! असं एकदा का चित्त प्रसन्न झालं की, सर्व दु:खाचा नाश होतो. कारण ज्याचं चित्त प्रसन्न झालं आहे, त्यालाच 'स्थितप्रज्ञ' म्हणतात.

"दिग्विजयी–कौंतेया! जो पुरुष योगयुक्त झालेला नाही, त्याला दृढ बुद्धीची, निष्ठेची भावनाही नसते. ज्याला भावना नाही, त्याला शांती कुठली? आणि ज्याला शांती नाही, त्याला सुख तरी कसलं मिळणार?

"महारथी–अर्जुना! प्रबळ वाऱ्यानं नौका जशी जळात खेचली जाते, तसं विषयसुखांत संचारणाऱ्या पुरुषाच्या इंद्रियांच्या मागोमाग त्याचं मनही जातं.

"महाबाहो–अर्जुना! इंद्रियांच्या विषयांपासून ज्याची सर्व इंद्रियं सर्व बाजूंनी आवरून धरलेली असतात, त्याला 'स्थितप्रज्ञ' म्हणतात.

"गुडाकेश–अर्जुना! सर्व भूतांना जी रात्र असते, तेव्हाच संयमी स्थितप्रज्ञ जागा असतो. सर्व भूतमात्र जेव्हा जागे असतात, तेव्हा योग्याला ती रात्र असते.

"कौंतेय–किरीटी! चोहोकडून पाणी भरत असताही समुद्र कधी चळत नाही, त्याप्रमाणे ज्या पुरुषात सर्व विषय शांती न मोडता प्रवेश करतात, त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात. विषयाची इच्छा धरणाऱ्याला अशी शांतता मिळणं शक्यच नसतं. कसलंही ममत्व व कोणताही अहंकार नाही, असा अनासक्त पुरुष निस्पृह होऊन व्यवहारात वागतो, तेव्हाच त्याला शांतता मिळते.

"जयिष्णू–धनंजया! स्थितप्रज्ञाची 'ब्राह्मी' स्थिती म्हणतात ती हीच. अंतकाळीही ती न चळता तो मोक्षाप्रत जातो."

आत्ता कुठे मला सूक्ष्मपणे व प्रकर्षानं जाणवून गेलं की, आयुष्यभर तर तो असा स्थितप्रज्ञासारखाच वागला होता. मी स्मरणशक्ती ताणून पाहिलं की, असा एकतरी क्षण त्याच्या जीवनगंगेतला सापडतो का, की तो त्या क्षणी कसलीतरी अपेक्षा ठेवून जगला होता. कुट्टकाळ्या मेघांनी दाटलेलं गगनमंडळ सहस्त्ररश्मी, तेजवंत सूर्याच्या आगमनाबरोबर निवळत जावं, तसं माझं शंकाग्रस्त मन निवळत चाललं! त्यावरील घनदाट संभ्रमाचा पहिला पापुद्रा हटला. यापूर्वी मला कधीच न उलगडलेला श्रीकृष्णातला 'श्री' त्याच्या शब्दाबरोबर आता क्रमश: उलगडत चालला. सर्वांत मोठं आश्चर्य हे होतं की, माझा मीच आता स्वत:ला क्रमश: अधिक उलगडत चाललो. एक पामर नर म्हणून माझ्या मर्यादा मला अगदी स्पष्ट होत चालल्या. सत्याचा अर्धा भाग मला सापडत चालला – मी संभ्रमित नर आहे हा! त्या सत्याचा दुसरा अर्धा भाग अद्याप उलगडत नव्हता – तो कोण आहे हा!

माझ्यातील चतुर व सावध शिष्य आता जागृत झाला होता. हीच वेळ होती, त्याला स्वत:विषयी पूर्ण मात्रेनं बोलतं करण्याची. दोन्ही हात जोडून मी त्याला नम्रपणानं विचारलं, "हे जनार्दना, कर्मापेक्षा समतोल बुद्धीच श्रेष्ट आहे, असं तुझं मत आहे. मग हे वंदनीय केशवा, तू मला युद्धाच्या या घोर कर्मात का बरं गुंतवितो आहेस?

"द्व्यर्थी अर्थ निघेल अशा वचनांनी अच्युता, माझ्या बुद्धीला मोह पडेल, असं तू का बरं करतो आहेस? तरी माधवा, कृपावंत हो आणि मला श्रेयाचं आणि कल्याणाचं काय ते एकच निश्चित करून सांग."

माझी गोंधळलेली चर्या पाहून तो पुन्हा मधुर हसला. माझ्या डोळ्यांत खोलवर पाहून आपल्या समरवाणीत तो म्हणाला, "हे निष्पाप अर्जुना, कुठल्याच कर्माला प्रारंभ केला नाही, म्हणजे त्यापासून सुटका झाली, असं काही कधीच होत नाही. कर्माचा त्याग केल्यामुळे तेवढ्यानंच सिद्धी मिळत नाही. कुणीही झाला, तरी क्षणभरही कर्म केल्यावाचून राहूच शकत नाही. प्रकृती प्रत्येक जिवाला, प्रत्येक क्षणाला, काही ना काही कर्म करायला लावतेच लावते. वरवर पंचेंद्रियं आवरून, मनानं मात्र विषयसुखाचं चिंतन करीत राहतो, त्याला 'ढोंगी' म्हणतात. 'दांभिक' म्हणतात. जो मनानं पंचेंद्रियांचं नीट आकलन करून घेतो आणि अनासक्त बुद्धीनं त्यांना सतत कार्याला लावतो, त्याची योग्यता हे अर्जुना, विशेष आहे आणि निद्राजयी पार्था, जो अहोरात्र आपल्या आत्म्यातच रत, आत्म्यातच तृप्त आणि आत्म्याच्याच ठायी संतुष्ट झाला, त्याला स्वत:चं म्हणून काही शिल्लकच राहत नाही.

"माझे प्रयागाश्रमाचे ब्रह्मज्ञानी गुरू घोर आंगिरस मला एकदा म्हणाले होते, 'प्रिय केशवा, अच्युता, मला त्रिभुवनात कर्तव्य म्हणून काहीही उरलेलं नाही. एखादी वस्तु मिळवायची शिल्लक राहिलेली नाही. तथापि मी कर्मच करीत आहे, तो का?' तेव्हापासून विचार केल्यानंतर आताशा कुठं मला कळतं आहे, आळस झटकून मीच कर्म केलं नाही, तर हे गुडाकेशा, सर्व लोक माझंच अनुकरण करतील. निष्क्रिय, आळशी होतील."

आता त्याची वाणिलीला खुलत चालली. मला बोटाला धरून चालवत तो जीवनाच्या खोल–खोल गुहेत उतरत चालला. म्हणाला, "सव्यसाची पार्था, सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांनी वेढलेली प्रकृतीच अहोरात्र आपलं कार्य करीत असते. विमूढ झालेला अहंकारी माणूस मात्र म्हणतो, मी हे केलं आणि मी ते केलं! यासाठीच ज्या जिवाला अहंकार नीट कळला, तो श्रेष्ठ जीव होय.

"जिष्णू–भारता, दुरून डोंगर जसे साजरे दिसतात, तसे परक्यांचे सर्वच धर्म गोंडस वाटतात. स्वधर्माप्रमाणे वागताना मरण आलं, तरी त्यात कल्याण आहे. कितीही गोड वाटला, भुलविणारा असला, तरी परक्याचा धर्म भयंकर होय."

आता मला कितीतरी दिवसांपासून विचारावेसे वाटलेले प्रश्न त्याला विचारल्याशिवाय राहवेना. मी विचारलं, "वृष्णी आणि अंधकांच्या तारका – कृष्णा, स्वत:ची मुळीच इच्छा नसताना बलात्कार केल्याप्रमाणे मनुष्य पाप करतो, तो कोणत्या प्रेरणेनं?"

आता मात्र तो क्वचितच होत असे, तसा गंभीर झाला. म्हणाला, "यासंदर्भात काम आणि क्रोध हेच प्रबळ शत्रू आहेत, हे नीट जाणून घे धनंजया. धुरानं जसा अग्नी, धुळीनं जसा आरसा आणि वारेनं जसा गर्भ झाकलेला असतो, तसंच या दोघांनी सत्य

गुरफटून टाकलेलं आहे. इंद्रियांच्या किल्ल्यात बसून यातील काम ज्ञानाला, तर–तम बुद्धीला क्षणात झाकाळून टाकतो. यासाठीच हे किरीटिन्, दुरासाध्य अशा कामरूपी शत्रूला तू प्रथम जिंकून टाक.”

आता मी कितीतरी सावरलो होतो. कर्मयोग्याच्या अज्ञात गुहेतील ज्ञान–दर्शन मला त्यानं घडविलं होतं, मला पटत चाललं की, मी त्याचा खरोखरच परमसखा आहे. त्याला सर्वांत प्रिय आहे. त्याला ज्ञानकर्म आणि संन्यासमार्ग या विषयांकडे वळविण्यासाठी मी म्हणालो, “केशवा, तुझा जन्म तर अगदी अलीकडचा आहे. तुझ्या पूर्वी अनेक थोर योगीपुरुष होऊन गेले आणि तू तर म्हणतो आहेस की, योग हे जीवनातील सत्य मीच सांगितलं. हे मी कसं काय मानावं?”

तेव्हा तो नेहमीसारखं अर्थगर्भ हसत म्हणाला, “हे किरीटी-कौंतेया, माझे आणि तुझे पुष्कळ जन्म होऊन गेलेले आहेत, ते सर्व मी जाणतो. हे परंतपा, तू मात्र जाणत नाहीस, हा भेद आहे. मला तुला माझ्या स्तरावर उचलून घ्यायचं आहे. हे ध्यानी घे, मी सर्व भूतांचा धनी व जन्मविरहित आहे.

“हे भारता, जेव्हा-जेव्हा धर्माला ग्लानी येते आणि अधर्माचं प्राबल्य माजतं, तेव्हा-तेव्हा मी जन्म घेतो. साधूंच्या संरक्षणासाठी आणि दुष्टांचा नाश करण्यासाठी, युगायुगांच्या धर्मसंस्थापनेसाठी मी जन्म घेत असतो. अवतार घेत असतो.

“यातील धर्म आणि अवतार हे सखोल शब्द अर्थासह नीट समजून घे–

– जिवाच्या निकोप वाढीसाठी जी संस्कारप्रणाली वापरली जाते, ती म्हणजे ‘धर्म’! शुष्क कर्मकांड किंवा निरर्थक शाब्दिक बडबड म्हणजे धर्म नव्हे!

“‘अव’ म्हणजे खाली, ‘तार’ म्हणजे तारण्यासाठी. जिवाला तारण्यासाठी तेजरूपानं मी खाली अवतरतो, म्हणजे मी अनंत हस्तांचा नेत्रांचा आणि मुखांचा सदेह अवतरणार आहे, अशा भ्रमात कधीच राहू नकोस. जिथे कुठे अन्यायाची चीड असेल, तो दोन हातांचा माणूस म्हणजे मी अंशमात्रानं घेतलेला अवतारच आहे!

“अर्जुना, तुझ्या रूपानंही मी अवतारच घेतला आहे!

बिभत्सू फाल्गुनी, नीट आकळून घे, ज्ञान म्हणजे जाणणे, जाणलेलं सर्वच स्मरणात ठेवण्याच्या योग्यतेचं असतंच, असं नाही. म्हणूनच निवडून जीवनोपयोगी असं स्मरणात ठेवलं जातं, ते खरं ज्ञान. ज्ञानसारखं पवित्र या तिन्ही लोकांत काहीही नाही. हे ज्ञान, जो श्रद्धावान पुरुष प्रमाथी इंद्रियांचं संयमन करून, त्या ज्ञानाच्या प्राप्तीसाठी त्याच्या पाठीस लागला, त्याला मिळतं. लक्षात ठेव, निरामय ज्ञानप्राप्तीसारखी दुसरी कुठलीही श्रेष्ठ गोष्ट या जगात नाही. लाभलेलं ज्ञान किंवा विद्या ही नेहमीच विनयभावानं शोभून दिसते. अशा ज्ञानी माणसाची दृष्टी ब्राह्मण, गाय, हत्ती तसेच कुत्रा आणि चांडाल या सर्वांच्या ठायी समानच असते.”

आता समोरच्या अकरा अक्षौहिणी कौरवसेनेत आणि आमच्या सात अक्षौहिणी सेनेत – म्हणजे जवळ-जवळ चाळीस लक्ष शास्त्र योद्ध्यांत कुजबुज माजत चालली. ती स्पष्ट ऐकूही येऊ लागली. कसल्या बळावर कोण जाणे, तो तिकडे संपूर्ण दुर्लक्ष करून माझ्याशी संन्यासयोगावर मोजकंच बोलला, “गुडाकेश–फाल्गुनी, हा मानवी देह म्हणजे नऊ द्वाराचं एक नगर आहे, हे नीट समजून घे. आत्मा त्यात आनंदानं पहुडलेला आहे. इंद्रियं, बुद्धी व मन संयमन करून जो त्या आत्म्याला निर्धारपूर्वक भिडतो, तो योगी-संन्यासी जीवनमुक्तच होतो.”

त्याच्या एकापेक्षा एक अर्थपूर्ण वचनांनी माझ्या बुद्धीवरचं अज्ञानाचं एकेक मळभ दूर होत चाललं. प्रारंभीची गलितगात्र स्थिती दूर होत चालली. आता माझे प्रश्नही कमी-कमी होत चालले. तो बोलेल ते ध्यानपूर्वक ऐकण्याची भूमिका मी घेतली. त्याची स्वर्गीय वाणी स्रवतच राहिली. मी ऐकतच राहिलो. तो म्हणाला, "मनुष्यानं स्वतःला कधीच खचवू नये. आपणच आपला उद्धार करावा. त्यासाठी नेहमी ध्यानी ठेवावं की, आपणच स्वतःला साहाय्य करणारे बंधू-मित्र असतो किंवा आपणच स्वतःचा घात करणारे शत्रू असतो. हे समजण्यासाठी ध्यानयोगाशिवाय दुसरा पर्याय नाही. तो ध्यानयोग साधण्यासाठी काही पथ्यं प्रत्येकालाच पाळावी लागतात. हे अर्जुना, अतिशय खाणाऱ्याला किंवा मुळीच न खाणाऱ्यास हा ध्यानयोग साधता येत नाही. तसाच तो अतिशय झोपाळूस किंवा रात्र-रात्र जागरण करणाऱ्यासही साधता येत नाही, हे सत्य आहे. ज्याचा आहार-विहार मोजका आहे, ज्याची झोप व जागरण परिमित आहे आणि ज्याचं कर्माचरण बेताचं आहे, त्यालाच हा 'ध्यानयोग' साधतो. हा योग निष्ठावान शिष्याला दुःखनाशक आणि सुखकारक होतो.

"अशा ध्यानयोगाचा अवलंब करणारा पुरुषश्रेष्ठ मला चराचरांत सर्व ठिकाणी पाहू शकतो. माझ्याठायी सर्व आणि सर्वांठायी मी, अशी अनुभूती तो घेऊ शकतो. असा पुरुषोत्तम मला कधीही अंतरत नाही आणि मीही त्याला अंतर देत नाही."

धीर देणाऱ्या त्याच्या वचनांमुळे माझी जिज्ञासा पुन्हा चाळवली गेली. मी त्याला विचारलं, "योगयोगेश्वर कृष्णा, तू म्हणतोस तो कर्मयोग मनाच्या चंचलपणामुळे टिकेल, असं काही मला वाटत नाही. हे चंचल व बलिष्ठ मन वळविण्यास अतिशय कठीण आहे. वाऱ्याची मोट बांधणं जसं अवघड आहे, तसं याचा निग्रह करणं मला कठीण वाटतं."

आज मला इकडे–तिकडे सरकू न देण्याचा त्यानं जसा काही निर्धारच केला असावा. तो सहज म्हणाला, "महाबाहो फाल्गुनी, मन हे चंचल असून, त्याचा निग्रह करणं कठीण, याविषयी शंकाच नाही. पण अभ्यासानं आणि वैराग्यानं कौंतेया, ते मनही स्वाधीन ठेवता येतं. अभ्यास म्हणजे, कोणतीही गोष्ट निर्धारानं पुनःपुन्हा करणं होय. अशा अभ्यासाच्या सरावानं त्या गोष्टीतील दोष–त्रुटी कमी होत जातात. मन क्रमशः आत्मविश्वासी होत जातं."

आता तो थोडचाशा अधिक सखोल अशा ज्ञानविज्ञान योगाकडे वळला. अवंतीच्या अरण्यातील आचार्य सांदीपनींचं स्मरण देत म्हणाला, "जिष्णू अर्जुना, माझ्या गुरुदेव सांदीपनींनी मला केव्हाच सांगितलंय ते ऐक – यंत्र म्हणजे काय? तर स्वरचनेवर गतिमान होणारा आकार म्हणजे 'यंत्र' . माझा गरुडध्वज, तुझा नंदिघोष रथ आणि माझं सुदर्शन ही यंत्रंच आहेत. तुझ्या समोरच्या कुरुसेनेत आणि तुझ्या पांडवसेनेत असे लक्षावधी रथ आहेत. ही विपुल यंत्रं म्हणजे सत्य नव्हे. ते त्या पलीकडे आहे!

"हे भरतश्रेष्ठा–गुडाकेशा, चार प्रकारचे पुण्यवान लोक माझं स्मरण आणि भक्ती करीत असतात. एक आर्त म्हणजे रोगांनी पिडलेले, दुसरे जिज्ञासू म्हणजे ज्ञान प्राप्त करून घेण्याची इच्छा बाळगणारे, तिसरे अर्थार्थी म्हणजे धनाची इच्छा बाळगणारे आणि चौथे ज्ञानी म्हणजे परमेश्वराचं ज्ञान होऊन कृतार्थ झाल्यामुळे निष्काम बुद्धीनं भक्ती करणारे!

"लक्षात ठेव, हा मानवी देह म्हणजे बहात्तर हजार नाडचांवर थडथडणारं एक यंत्रच आहे. ते चालविणारा वाहक ज्याला समजला, त्याला समग्र जीवनाचं ज्ञान प्राप्त

झालं.

"जो–जो भक्त त्या वाहकाला जाणण्यासाठी ज्या–ज्या श्रद्धेची उपासना करू इच्छितो, त्याची तीच श्रद्धा मी स्थिर करतो.

"'श्रद्धा' म्हणजे अटळ विश्वास. ती कधीच डोळस वा अंध असू शकत नाही. ती केवळ असते. तहानलेल्या माणसालाच पाणी प्यायल्यानंतर जे समाधान वाटतं, ते त्यालाच कळतं. इतरांनी सांगून ते कधीच कळत वा पटत नसतं. 'मी श्रद्धा मानत नाही' म्हणणाऱ्याचीही बुद्धिप्रामाण्यावर श्रद्धाच असते! म्हणून नास्तिक माणूस समजू शकतो, श्रद्धाहीन माणूस नाही. श्रद्धा बदलू शकते. आपण श्रद्धाहीन आहोत असं म्हणणाऱ्याचा अहंकार मोठा असतो. मी एवढा फिरलो, आता तुला हे एवढं, सांगतो आहे, तरीही आत्ता या क्षणी माझ्यासमोर आचार्य सांदीपनी किंवा आचार्य घोर आंगिरस उभे राहिले तर? तर क्षणाचाही विलंब न लावता मी तुझा नंदिघोष रथ सोडून खाली उतरेन. मला जीवन समजावून सांगणाऱ्या त्या महानुभावांचे श्रद्धेनं चरण धरेन. अश्रद्ध आणि म्हणून अहंकारी व वृथा ज्ञानी असण्यापेक्षा, सश्रद्ध व प्रसंगी अज्ञानी असणंही मी पत्करेन.

"प्रिय पांडवा, काम म्हणजे वासना आणि राग म्हणजे विषयासक्ती – ही दोन्ही वजा करून बलवान लोकांचं जे बल, ते मीच आहे. धर्माला – म्हणजे जिवाच्या संस्कारशील निकोप वाढीला उपयुक्त – विचारप्रणालीच्या विरुद्ध न जाणारा, सर्व भूतांच्या ठायीचा काम, तो मीच आहे. नानाविध गुणयुक्त अशी ही माझी दिव्य माया, तरून जायला कठीण आहे. म्हणून जे मलाच शरण येतात, ते या मायेला तरून जातात.

"धैर्यशील–धनंजया, अनेकानेक जन्मांनंतर 'जे काही आहे, ते वासुदेवच आहे' असं अनुभवास येतं. ते ज्याच्या अनुभवाला आलं, तो महात्मा अत्यंत दुर्मीळ होय.

भूत, वर्तमान व भविष्यकाळी झालेले, असणारे व होणारे सर्व प्राणी मी जाणतो. पण जयिष्णू ज्ञानलोभी कौंतेया, मला कोणीही जाणत नाही."

आता तो तत्त्वज्ञानाच्या अधिकाधिक गूढ, घनदाट अरण्यात शिरला. म्हणाला, "मला अक्षरब्रह्म योग समजावून सांगणाऱ्या आचार्य घोर आंगिरसांचं स्मरण करून जे तुला सांगतो आहे, ते नीट ऐक – जे 'अ–क्षर' म्हणजे कधीही नाश न पावणारं तत्त्व आहे, ते म्हणजे 'ब्रह्म' . ते सर्व–सर्व मात्रांसह जाणतो, तो 'ब्राह्मण'! त्याला कुठल्याही कुलाची, ज्ञातीची वा वर्णाची कसलीच अट नसते. असं अक्षरब्रह्म जाणण्याची कला वा विद्या, म्हणजे 'अध्यात्म'!

"हे सर्व जाणून अंतकाळी माझं स्मरण करीत जो देह सोडतो, तो माझ्याच स्वरूपाला येऊन पोहोचतो. याचाच दुसरा अर्थ म्हणजे, जन्मभर माझ्याच स्मरणात रंगून गेल्यामुळे तो अंतकाळीही माझ्याच स्वरूपाला प्राप्त होतो."

त्यानं प्रारंभ व अंत म्हटल्यानंतर माझ्या मनात काही प्रश्न उभे राहिले. मी त्याला म्हणालो, "दिवस म्हणजे प्रारंभ आणि रात्र म्हणजे अंत, असंच तर तुला म्हणायचं नाही ना?" माझ्या प्रश्नातील अज्ञानी छटा जाणून तो हसला. म्हणाला, "अहोरात्र म्हणजे काय, तेच नीट समजून घे. तुझ्या दिवस–रात्रीच्या मापानं काळ कधीच मोजता येणार नाही! त्यासाठी ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणजे काय, ते समजून घ्यावं लागेल. कृत, त्रेता, द्वापार आणि कली अशी चार युगं मिळून एक 'महायुग' होतं. सध्या

कलियुगाला प्रारंभ झाला आहे. अशा हजार महायुगांचा जो काल, तो ब्रह्मदेवाचा एक दिवस असतो आणि तशाच हजार महायुगांची त्याची एक रात्र होते. ब्रह्मदेवाचा दिवस सुरू झाला म्हणजे अव्यक्तापासून सर्व व्यक्त पदार्थ निर्माण होतात आणि रात्र सुरू झाली म्हणजे पूर्ववत क्रमशः त्याच अव्यक्तात लय पावतात. जिवांच्या उद्गम–विलयाचं हे सत्र अखंड चालू आहे. यालाच 'तरंगवाद' म्हणतात.

"म्हणजेच जगताच्या शुक्ल व वद्य अशा प्रकाशमय व अंधकारमय अशा दोन शाश्वत गती मानल्या आहेत. एका मार्गानं गेलं, म्हणजे परत फिरता येत नाही. हे सर्व विश्वच गोलाकार आहे. म्हणूनच एका मार्गानं गेलं की, दुसऱ्या मार्गानं परत यावं लागतं.

"सव्यसाची–गुडाकेशा, हे दोन्ही मार्ग नीट जाणणारा कोणताही कर्मयोगी कधीच मोह पावत नाही. विक्रमी अर्जुना, यासाठीच तू सर्वकाल अनासक्त कर्मयोगी हो.

"तसं होण्यासाठी प्रत्येक जिवाला 'कोऽहं? – मी कोण आहे?' हा मूलभूत प्रश्न पडावा लागतो. त्याचं मिळणारं उत्तरही माझ्यातच लय पावतं. म्हणूनच हे महाबाहो, महारथी अर्जुना, माझ्या वचनांनी तू संतुष्ट होतो आहेस. यास्तव तुझ्या हितार्थ एक उत्तम गोष्ट मी पुनश्च सांगतो आहे, ती ऐक." आता तो सर्वांत विलोभनीय अशा, जिवाला पावलोपावली त्याचं स्मरण करायला लावणाऱ्या, दिव्य विभूतियोगाकडे वळला. नाना ढंगांनी, नाना कळांनी आपण कोण आहोत, हे मला समजावून सांगू लागला. खरोखरच मी परम भाग्यवंत होतो की, सर्वप्रथम प्रत्यक्ष त्याच्याच तोंडून मला ते ऐकायला मिळत होतं, तो सांगू लागला – आपण कोण आहोत ते आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, मला ते ऐकताना क्षणाक्षणानं आणि कणाकणानं उलगडत चाललं, मी कोण आहे ते! माझ्यातील मूठभर अर्जुन, त्याच्या कृपेनंच त्याच्याएवढा गगनभर होत चालला. मला कळून चुकलं, मी किती–किती आयामांनी आणि कसकसा त्याच्यात पूर्णतः गुंतलो आहे ते! पाण्यात मिसळणाऱ्या साखरेसारखा मी त्याच्यात विरघळत चाललो. लवणाच्या मासोळीनं सागराचा ठाव घेण्यासाठी डूबी मारावी आणि ती वर येण्याऐवजी त्या सागरातच लय पावावी, तसं माझ्या जाणिवेचं झालं. तो बोलत गेला आणि मला कळत गेलं, तो कोण आहे ते आणि मीही कोण झालो आहे ते!

तो होता साक्षात नारायण. कशातही न अटकलेलं सर्वांचंच विमुक्त कारण! मी होतो नर! त्यानं मनी धरलेल्या सिद्धीच्या पूर्ततेचं केवळ एक नाममात्र साधन!

आता त्याची योगवाणी मृगातील मेघगर्जना ऐकून आपोआप फुलणाऱ्या, लखलखत्या मोरपिसाऱ्यासारखी डवरून आली. मी त्यानं किरीटात माळलेल्या मोरपिसाकडे बघतच राहिलो. तो बोलतच राहिला, मी ऐकतच राहिलो. म्हणाला, "बुद्धी, ज्ञान, असंमोह, संमोह, क्षमा, सत्य, दम, शम, सुख–दुःख, भाव–अभाव, भय–अभय, अहिंसा, समता, संतोष, तप, दान, यश–अयश इत्यादी प्राणिमात्रांचे सर्व भाव–विभाव माझ्यापासूनच उत्पत्र होतात."

ते ऐकून मी पुन्हा भ्रमचित्त होत चाललो! आर्जवी शब्दांत, बसल्या–बसल्याच दोन्ही हात जोडून म्हणालो, "तूच परमब्रह्म व परमपवित्र वस्तू आहेस. दिव्य व शाश्वत असे सर्वव्यापी तत्त्व आहेस. देवर्षी नारद, असित देवल आणि महर्षी व्यासही तेच म्हणतात. आता तर तू स्वतःच मला ते सांगतो आहेस. हे केशवा, तू मला जे काही सांगत आहेस, ते सर्व मी सत्य मानतो. हे सर्व भूते उत्पन्न करणाऱ्या भूतेशा, जगत्पते देवदेवा, हे पुरुषोत्तमा, तू स्वतःच स्वतःला पूर्णपणे जाणतोस. हे नारायणा, कृपा करून ज्या दिव्य

विभूतींनी हे तिन्ही लोक व्यापून वर दशांगुळं तू शेष राहिला आहेस भगवन्, त्या विभूतीच मला स्पष्ट करून सांग. नारायणा, मी अज्ञानी नर आहे. दैनंदिन जीवनात मी तुला कसकशा रूपात पारखावं आणि मानावं, ते मला नीट समजावून सांग."

आता शतकोटिसूर्यसमप्रभ असं त्याचं मुखमंडल अपार तेजस्वी दिसू लागलं. माझ्यासमोरच नंदिघोष रथात उभा असून, क्षणात तो गगनापार दूर गेल्यासारखं वाटू लागलं. दुसऱ्याच क्षणी तो माझ्याच हृदयात सामावल्याचा प्रत्ययही येऊ लागला. त्याचे पापणीदाट मत्स्यनेत्र फडफडले. धनुष्याकृती रक्तिम, दीर्घ ओठ स्फुरले. अतीव प्रेमानं गोकुळातल्या गोपांना ऐकविलेल्या मधाळ वेणुवाणीत तो म्हणाला, "निद्राजयी–अर्जुना, सर्व भूतांच्या अंतरी असणारा 'आत्मा' मीच आहे. त्याचा आदि, मध्य आणि अंतही मीच आहे. बारा आदित्यांत विष्णू मी आहे.

"या क्षणी नंदिघोषावर आणि तुझ्या मस्तकावर तळपणारा सर्व तेजस्व्यांमध्ये किरणमाली सूर्य मीच आहे. मरुतांत मरीचि, नक्षत्रांत चंद्र आणि वेदांपैकी संगीताला वाहिलेला सामवेद मीच आहे. देवांमध्ये इंद्र मी आहे.

"सर्व भूतांच्या ठायी प्राणांची हालचाल करणारी ऊर्जामय चेतना मी आहे. इंद्रियांमध्ये मन मी आहे."

मन एकाग्र करून मानससरोवरातील राजहंस बिसतंतू उचलतो, तसे मी त्याचे अमृतमय शब्दन्शब्द टिपत चाललो. तो बोलतच गेला, मी ऐकतच राहिलो. म्हणाला, "अकरा रुद्रांमध्ये शंकर, यक्ष–राक्षसांत कुबेर, आठ वसूंमध्ये पावक नावाचा वसू आणि पर्वतांत मेरूपर्वत मीच आहे.

"पराक्रमी पुरुषोत्तमा, पार्था – पुरोहितांत मुख्य असा बृहस्पती, सेनानायकांत कार्तिकेय स्कंद, महर्षींतील भृगू मीच आहे. हेच कारण आहे की, भृगुश्रेष्ठ भगवान परशुरामांनी दिव्य मंत्रांसह, दाटलेला अंधकार दूर करणारं आपलं तेजस्वी सुदर्शन मला प्रदान केलं. मीही त्यांच्या प्रेरणेनंच आवश्यक तिथेच ते वापरलं.

"सव्यसाची–जिष्णू–अर्जुना, ध्यानपूर्वक ऐक, एक सर्वांत परमसत्य की, वाणींमध्ये एकाक्षर ॐकारातील अकार, उकार आणि मकार हे क्रमशः माझ्या चरण, उदर व मस्तकात सामावलेले आहेत.

"मनाच्या तळवटातून नेत्र मिटून या प्रणवी ॐकाराचा देहातीत होऊन एकदा उच्चार करून बघ सख्या अर्जुना, माझ्या सर्व तेजवंत रूपासह मी तझ्यासमोर क्षणात उभा ठाकेन.

"यज्ञांपैकी जपयज्ञ मी आहे. स्थावर म्हणजे स्थिर पदार्थांत इथून तिथवर पसरलेला शुभ्रधवल हिमालय पर्वत मीच आहे.

"नानाविध वृक्षांमध्ये अश्वत्थ म्हणजे पिप्पल वृक्ष मीच आहे. तो पिप्पलही चक्क उलटा! ज्याच्या फांद्या खालती आहेत आणि मुळं वर गगनभर पसरलेली आहेत असा!

"देवर्षींमध्ये नारद, गंधर्वांपैकी चित्ररथ, सिद्धांमध्ये कपिलमुनी, अश्वांत अमृतमंथनाच्या वेळी निघालेला उच्चैश्रवस मीच आहे. म्हणूनच तर मला माझ्या गरुडध्वज रथाचे; दुग्धधवल बलाहक, मेघपुष, शैव्य आणि सुग्रीव हे चारही अश्व प्राणप्रिय आहेत – अगदी तू जसा प्रिय आहेस तसाच. अर्जुना, तेही माझे सखेच आहेत.

"गजेंद्रांत ऐरावत, मनुष्यांत राजा आणि आयुधांत वज्र मी आहे. म्हणूनच माझं

सुदर्शन मी वज्रासारखं आवश्यक तेव्हाच वापरलं आहे.

“पराक्रमी पार्था, गायींमध्ये कामधेनू मीच आहे. गोपाल म्हणून मला ती प्रिय आहे. विजिगीषु धनुर्धर धनंजया, प्रजोत्पादन करणारा काम मीच आहे. त्या कामावर संयमानं विजय मिळविणं, म्हणजे मला जिंकण्यासारखंच आहे.

“फाल्गुनी–कौंतेया, सर्पांत वासुकी, नागांमध्ये अनंत, जलवासींत वरुण, पितरांत अर्यमा नावाचं पितर आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे विश्वाचं संतुलन करणारा जो यम, तो मीच आहे!!

“किरीटिन–कौंतेया, दैत्यांमध्ये प्रल्हाद आणि शस्त्रधाऱ्यांमध्ये राम मी आहे.

पुरुषोत्तम–पार्था, पशूंमध्ये वनराज सिंह, माशांमध्ये नक्र आणि पक्षयांत गरुड मीच आहे.

“जयिष्णू–अर्जुना, नद्यांत भागीरथी, वेगवानात वायू आणि ग्रासणाऱ्यात काल मी आहे. प्रिय सख्या अर्जुना, सृष्टिमात्राचा आदि, मध्य व अंत मी आहे आणि विद्यांपैकी अध्यात्मविद्या मीच आहे. अक्षरांपैकी ‘अ’ कार, समासांत द्वंद्व, चौमुखी ब्रह्मदेव मीच आहे.

“कीर्तिवान–कौंतेया, स्त्रियांमध्ये कीर्ती, श्री, वाणी, स्मृती, मेधा, धृती व क्षमा मीच आहे.

“पराक्रमी फाल्गुनी, छंदांपैकी विख्यात सवितृ मंत्राचा गायत्री छंद मी आहे. महिन्यात मार्गशीर्ष आणि ऋतूंत वसंत मी आहे.

“आज्ञाधारी अर्जुना, तेजस्व्यांचं तेज व विजय मी आहे. निश्चय आणि सत्त्व मी आहे.

“सत्शील सव्यसाची, मुनींपैकी व्यास, कवींमध्ये शुक्राचार्य, शासन करणाऱ्यांचा दंड मीच आहे. ज्ञान्याचं ज्ञान मी आहे. सर्व भूतांचं बीज मी आहे. मला सोडून असेल असं चराचर भूत नाही.

“प्रिय सख्या अर्जुना, सर्व पांडवांत मला प्रिय असा तू जो धनंजय, तो मीच आहे. अठराकुलीन समस्त यादवांपैकी वासुदेव मीच आहे!!

“जी–जी वस्तू वैभव किंवा तेज यांनी युक्त आहे, ती–ती माझ्या अंशापासून झाली आहे, असंच तू समज.

“शेवटी तुला एकच सांगतो अर्जुना, माझ्या विराट रूपाचा हा पसारा जाणून तुला करायचं तरी काय आहे? थोडक्यात एवढंच ध्यानी ठेव की, आपल्या एकाच अंशानं हे सर्व जग व्यापून मी राहिलो आहे.”

‘चराचर विश्वात मी भरून आहे’ हे त्याचं कथन ऐकून मी थक्क झालो. त्यानं सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीचा शोध घेत माझी दृष्टी त्याच्या उंचशील देहभर फिरली. त्यानं वर्णन केलेल्या सर्व वस्तू मला त्याच्या मानवी देहात दिसू लागल्या. त्या विराट दर्शनानं माझ्या कंठाला पुन्हा शोष पडला. स्वत:ला सावरत मी कसंबसं त्याला विचारलं, “मी साक्षात काल आहे, असं तू म्हणालास; म्हणजे काय, ते मला नीट कळलं नाही. प्रभो, ते तेवढं स्पष्ट करून सांगशील काय?”

आपले दीर्घ नेत्र मिटते ठेवूनच तो म्हणाला, “खरं आहे ते अर्जुना. मी साक्षात ‘काल’ च आहे. समोरच्या लक्षावधी योद्ध्यांचा अंत करण्यासाठी उद्युक्त झालेला मी स्वत: ‘काल’ आहे.

“धीरोदात्त–धनंजया, काल म्हणजे काय ते नीट समजून घे. किडामुंगीपासून मानवापर्यंत सर्व प्राणी तीन मितीत वावरत असतात. अंतर, भार आणि गुरुत्वाकर्षण या त्या तीन मिती होत. या प्रत्येक मितीला प्रारंभ आणि अंत आहे. चौथी मिती आहे ती ‘काल’ . त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. तो अखंड व एकच आहे. तो साक्षात ‘काल’ मीच आहे, हे नीट जाणून घे!!!

“ज्याला आदि नाही, अंत नाही असा साक्षात अखंड ‘काल’ च मी आहे. समोरच्या लक्षावधी योद्ध्यांना मारायला आता उद्युक्त झालो आहे. हाती शस्त्र न धरता मी ते करणार आहे. यासाठी तुला हाती शस्त्र धरून निमित्तमात्र व्हायचं आहे. समोरच्या योद्ध्यांना वधण्यात तुझ्या हातून कोणतंही पाप घडणार नाही. तुला कसलाही दोष लागणार नाही. सतत पाण्यात असणारं कमलपत्र कधीच भिजत नाही. त्याचप्रमाणे तूही कसल्याही दोषापासून मुक्तच राहशील. यासाठी ऊठ, किरीटधारी कौंतेया, तू हातातून त्यागलेलं गांडीव धनुष्य पुन्हा निर्धारानं हाती पेलून युद्धसज्ज हो!

“मी प्रेमभावानं सांगितलेला हा हितोपदेश जे निष्ठावान मनानं पाळतात, ते श्रद्धावान भक्त मला अत्यंत प्रिय असतात. फाल्गुनी–पांडवा, मानवी देह हा एखाद्या शेतासारखा आहे आणि जागृत आत्मा त्या शेताची काळजी वाहणाऱ्या शेतकऱ्यासारखा आहे. हे ज्याला समजलं, त्याला जीवन कळलं.

“पुरुषोत्तम–पार्था, जसे वेगवेगळे ऋतू शेतातील पिकावर प्रभाव टाकतात, तसे तीन प्रमुख गुण आत्मावरही प्रभाव टाकतात. ते त्रिगुण म्हणजे सत्त्व, रज आणि तम होत. या गुणधर्माच्या प्रभावाप्रमाणे त्या–त्या जिवाला तसतसा आहार आवडतो. सात्विकाला दही–दूधयुक्त मधुर आहार, राजसाला तिखट–मीठयुक्त मसाल्यांचा पौष्टिक आहार आणि तामसाला शिळा, नि:सत्त्व आहार आवडतो. आहाराप्रमाणे त्या–त्या जिवाला तसतसं फलही मिळतं. पुण्यकर्माचं निर्मल फल सात्त्विकाला मिळतं, राजस कर्माचं सुखदु:खयुक्त फल राजसाला मिळतं आणि तामसकर्माचं फल अज्ञानानं भरलेल्या दु:खाच्या रूपात तामसाला मिळतं. जसा दक्ष व कुशल शेतकरी आपलं शेत चांगलं राखतो, तसाच सात्त्विक आत्मा जीवनाचं क्षेत्र निकोप राखतो.

“या सर्व योगाचं ज्ञान करून घेऊन, जो परमेश्वराचं सर्वव्यापकत्व जाणतो, तो पुरुषोत्तम होतो.

“गुडाकेश–कौंतेया, जगात दोन प्रवृत्तीचे लोक असतात – एक दैवी आणि दुसरे असुरी. दैवी गुणानं युक्त पुरुष सव्वीस दुर्मीळ गुणांचे अधिकारी असतात. तेजस्विता, क्षमा, शुचिर्भूतपणा, धृती, उदारता, तप, शुद्ध–सात्त्विक वृत्ती इत्यादी हे गुण असतात. असुरी वृत्तीच्या लोकांठायी दंभ, दर्प, क्रोध, अतिमान, निष्ठुरता, अज्ञान इत्यादी दुर्गुण असतात. दैवी गुणांच्या संपत्तीचा परिणाम मोक्षदायक होतो. असुरी दुर्गुणांचा परिणाम तापदायक होतो.”

तो नाना प्रकारांनी विविध दृष्टान्त देऊन माझ्या बुद्धीवरील अज्ञानाचं घनघोर पटल दूर करण्याचा प्रयत्न करीत आला होता. संभ्रमित झालेला मी मानसिकदृष्ट्या पुन:पुन्हा झाकाळून जात होतो. त्यानं एवढा हितोपदेश सांगूनही मी त्याला विचारलंच, “हृषिकेशा, संन्यासातील तत्त्व आणि त्यागातील तत्त्व वेगवेगळं मी जाणू इच्छितो.”

तसा दोहोंतील अंतर सांगुन मला पुढील कसलाही प्रश्न विचारण्याची संधीच न देता तो निर्धारानं म्हणाला, “तुला काय करायचंय जीवन म्हणजे काय ते जाणून? काय

करायचंय तुला सत्य आणि असत्य जाणून? तू माझ्या ठायीच मन ठेव. माझा भक्त होऊन मलाच वंदन कर. सर्व सोडून तू मला एकट्यालाच शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करेन." त्याचे डोळे विस्फारले. त्याच्या तोंडून कठोर आज्ञाकारी शब्द सुटले, "अर्जुनाऽ ऊठ. धनुष्य गांडीव पेलून तुझा देवदत्त शंख फुंक. युद्धाच्या पक्क्या निर्धारानं पांडवसेनेला चेतना दे. तुझा एकही शब्द यापुढे मी ऐकणार नाही."

त्यानं माझ्यातील क्षत्रियाला गदगद डिवचलं. मी कळसूत्री बाहुलीसारखा ताडकन उठलो. माझ्या हाती आपोआप आलेलं गांडीव धनुष्य होतं. मी ते खांद्यावर घेतलं. कटीच्या शेल्यातील माझा देवदत्त शंख सोडवून ओंजळीत घेतला. कितीतरी मोठ्या अपेक्षेनं श्रीकृष्णाकडे बघितलं. त्याच्या हाती त्याचा विख्यात शुभ्रधवल पांचजन्य शंख होता. तो त्यानं सर्वप्रथम फुंकल्याशिवाय महायुद्धाचा हा महायज्ञ प्रज्वलित होऊच शकत नव्हता.

मार्गशीर्ष वद्य द्वितीयेच्या कुरुक्षेत्रावरच्या निरभ्र गगनमंडलात आपली अशरण ग्रीवा पक्की रोवून, आपले दीर्घ मत्स्यनेत्र मिटते घेऊन, श्रीकृष्णानं आपला सुलक्षणी शुभ्रधवल पांचजन्य शंख प्राणदेठापासून फुंकला!!

तो ऐकताच समोरच्या पितामह भीष्मांनी कौरव सेनापती म्हणून आपला गंगनाभ शंखही तसाच फुंकला. तो ऐकताना माझा रोमरोम वीरश्रीनं कसा फुलून आला. मी मागे वळून बघणाऱ्या कृष्णाकडे एकदाच पाहिलं. मीच नव्हे, त्याच्या जवळच्या कुणीही कधीच न पाहिलेलं कितीतरी अर्थगर्भ असं रणहास्य त्याच्या मुद्रेवर कसं फुलून उतू आलं होतं! ते मला जसं काही आज्ञाच देत होतं–'फुंक शंख अर्जुना – भारतीय महायुद्धाचा.'

मी नेत्र मिटून त्याचं आणि कुंतीमातेचं स्मरण करून प्राणपणानं माझा देवदत्त शंख फुंकला. आम्हा पांडवसेनेचा सेनापती म्हणून धृष्टद्युम्नानं फुंकलेल्या यज्ञघोष शंखाचा नाद कानी आला. पाठोपाठ भीमसेनानं कंठधमन्या टराटर फुगवीत फुंकलेल्या त्याच्या पौंड्र नामक शंखाचा परिचित ध्वनी माझ्या कानी आला. आता माझा पाठकणा कसा वीरश्रीनं काठोकाठ फुलून आला. पाठोपाठ समोरून गुरू द्रोण-कृप, दुर्योधन, अश्वत्थामा यांच्या शंखांचे नादच नाद कानी आले. पाठोपाठ त्यांना आव्हान देत युधिष्ठिरानं फुंकलेला अनंतविजय, नकुलाचा सुघोष, सहदेवाचा मणिपुष्पक अशा दीर्घ परिचित शंखांचे रोमहर्षक नाद निनादले.

दोहोकडच्या सहस्त्र-लाखो वीरकंठातून रणचेतना देणारे घोषणांचे कल्लोळच कल्लोळ उठले – 'आरूऽढ! आऽक्रम! आरोऽह!'

धर्मक्षेत्र कुरुक्षेत्रावर भारतीय महायुद्धाचं यज्ञकुंड धडधडत पेटलं! दोन भरतीचे महासागर एकमेकांवर कोसळावेत, तसे कौरव व पांडवसेनेतील सहस्रावधी रणोत्सुक सैनिकांचे लोळच्या लोळ शस्त्रांचा खणखणाट करीत एकमेकांवर कोसळले.

युद्ध तेरा दिवस भयंकरपणे घुमलं होतं! तेरावा आणि चौदावा दिवस जीवनात मी कधीच विसरू शकलो नाही. त्याला कारणही तसंच होतं. प्रत्यक्ष माझंच जीवन आणि अस्तित्व त्या दोन दिवसांत पणाला लागलं होतं. तेराव्या दिवशी सूर्यडुबीबरोबर नियमाप्रमाणे युद्ध थांबलं. गुरू द्रोणांनी आज मांडलेल्या सेनेच्या चक्रव्यूह रचनेमुळे हाहाकार उडाला होता. दिवसभर युद्ध खेळून मी अपार शिणलो होतो. रोज संध्याकाळी आमच्या शिबिराकडे परतताना माझा सारथी–सखा श्रीकृष्ण संपूर्ण दिवसाचा वृत्तान्त माझ्या कानी घालताना अथक बोलतच असे. तो कधीच शिणलेला मी पाहिलं नाही.

आज मात्र तो चिडिचाप गप्प होता. मला ते तीव्रपणे जाणवलं. मी त्याला त्याविषयी काही विचारणार, तोच त्यानं नंदिघोष समरांगणाच्या मध्यभागी आणला. तिथे भीमसेन, युधिष्ठिरादि माझे सर्व बंधू आणि सेनापती धृष्टद्युम्न, सात्यकी असे प्रमुख पांडवयोद्धे कधी नव्हे ते आज एकवटले होते. कोणीतरी पांडववीर आज पतन पावला होता निश्चित! योध्द्यांच्या मंडलाजवळ माझ्या नंदिघोष आणून उभा करताच, काहीही न बोलता श्रीकृष्णानं रथनीडावरून रणभूमीवर सरळ झेप घेतली. योध्द्यांचं दाटलेलं मंडल भेदत तो मध्यभागी गेला. खेचल्यासारखा मीही त्याच्या पाठोपाठ आत गेलो.

मंडलाच्या मध्यभागी एका वीर योध्द्याचं गतप्राण धड दिसत होतं.त्याचं पालथं मुख भूमीतच रुतलेलं होतं, ते मृत्तिकेनं माखलेलं असल्यामुळे ओळखू येत नव्हतं.

श्रीकृष्ण त्या अचेतन धडाजवळ वीरासनात बसला. कुरुक्षेत्राच्या कुशीत लपलेलं ते मुख हलकेच उचलून त्यानं धडालगत ठेवलं!

माझ्या अंगावर वज्राघात झाला! तो माझ्या सर्वांत प्रिय पुत्र सौभद्र–अभिमन्यू होता. सुभद्रेचा लाडका पुत्रोत्तम, उत्तरेचा पतिदेव आणि कृष्णाचा लाडका भाचा ‘अभि’ होता.

कृष्णानं कधी नव्हे ते नेत्रांत तरळलेल्या आत्मरसातून अंधूक दिसणाऱ्या आपल्या प्रिय अभिच्या विदीर्ण मुखावर कटीचा निळा शेला पांघरला. कुणीतरी हाती दिलेली गौरवमाला सेनापती धृष्टद्युम्नानं अभिच्या देहावर वाहिली.

कृष्ण सुन्न झाला होता–मी स्तब्ध! सेनापती धृष्टद्युम्न शोकावेग आवरत त्रोटक वृत्तान्त देताना म्हणाला, “वीर अभिनं आज अतुल-अजोड विक्रम केला. चक्रव्यूहाची सहा कडी भेदत द्रोण, शकुनी, दुःशासन, जयद्रथ, कृतवर्मा, कृप, अश्वत्थामा, दुर्योधन अशा सर्व प्रमुख कौरवांना संत्रस्त करीत वारुळात भुजंग घुसावा, तसा हा पांडववीर कुरुसेनेत घुसला. त्याला संरक्षण देणारा काका महावीर भीमसेन क्षणाक्षणाला आपोआप मागे पडत गेला. हजारो रथी, गजाती, अश्वसाद यांना कंठस्नान घालत अभिमन्यू एकटाच सात मंडलं भेदून केंद्रस्थानाच्या आठव्या मंडलाला भिडला. बाहू स्फुरण पावलेला, वीरश्रीनं फुललेला वीर अभिमन्यू स्वतःला विसरलेला होता. चक्रव्यूहाच्या केंद्रस्थानी तो एकाकी लढला. त्यानं शत्रुंजय, तक्षक, मेघवेग, चंद्रकेतू, जयत्सेन आणि सत्यश्रवस यांसारखे कौरव अतिरथी धरतीवर धडाधड कोसळविले.

“संध्याकाळचा प्रहर आला, तरी वीर अभिमन्यू काही हटत नव्हता. त्याच्यासमोर हतबल झालेल्या कौरवांनी कधी लागला नव्हता, तो घोर काळिमा युद्धाला प्रथम लावला. सेनापती द्रोण, कृप, कृतवर्मा, अश्वत्थामा, बृहद्बल आणि कर्ण हे सहा महारथी एकाच वेळी सौभद्रावर चालून गेले. वास्तविक द्वैरथ युद्ध झालं, तरी ठरलेल्या नियमाप्रमाणे एकाशी एकाच योद्ध्यानं खेळायचं होतं. तो नियम कौरवांनी पहिल्यानं कठोरपणे आज भंगून टाकला.”

“काय – काय केलं त्या सहा जणांनी?” कृष्णानं सेनापती धृष्टद्युम्नाला शांतपणे विचारलं.

अभिमन्यूच्या पराक्रमानं अभिमानानं वक्ष भरून आलेला सेनापती धृष्टद्युम्न म्हणाला, “त्या सहाही जणांना अभिमन्यू शरण गेला नाही. एकापाठोपाठ एकाला त्यानं रणातून पळवून लावलं. शेवटी दुर्योधनपुत्र लक्षण आणि त्याचं चक्रव्यूहाच्या नेमक्या केंद्रबिंदूच्या स्थानी घनघोर गदायुद्ध जुंपलं! एकाचवेळी एकमेकांवर मर्मभेदी प्रहार

करून दोघेही पाठोपाठ मूर्च्छित झाले.

"अभिमन्यू पालथा पडला होता. कौरव सैनिकांनी औषधमात्रा हुंगविताच प्रथम दुर्योधनपुत्र लक्ष्मण सावध झाला. त्यानं कसलाही विचार न करता आपल्या गदेचा एक मर्मभेदी क्रूर प्रहार, निश्चेष्ट पालथ्या पडलेल्या मूर्च्छित अभिमन्यूच्या मस्तकावर उतरविला!! उरले-सुरले युद्धनियमही पायदळी तुडविले.

""काऽऽका –भीऽम काऽऽका' मृत्यूपूर्वी जाणिवेची एक अस्फुट तार अभिच्या मुखातून छेडली गेली. एव्हाना दूर गेलेले सहाही कौरव योद्धे तिथे एकवटले होते. त्या सर्वांची खंबीर मनंही अभिची अंतिम आर्त हाक ऐकून क्षणभर पाझरली."

मी सुन्न स्तब्ध होऊन कृष्णाच्या निळ्या शेल्याकडे एकटक बघत होतो. माझ्या नेत्रांतून प्राणरसाची अविरत टपटप धार लागली होती. जीव तळमळून आक्रंदत होता –'अभिमन्यू –प्रिय अभिऽ!'

सेनापतीचा शेवटचा वृत्तान्त कानी पडला –"या वेळी एकटा जयद्रथ दैत्यासारखा पुढे झाला. अभिमन्यू खरोखरच मृत झाला आहे की नाही, याची त्याला खातरी करून घ्यायची होती. त्या वीराचा देह तर धरतीकडे मुख करून पालथा पडलेला होता. त्याचं अर्धं-अधिक विदीर्ण मुख कुरुक्षेत्राच्या पावन रणभूमीत लक्ष्मणाच्या गदेच्या सखोल प्रहारामुळे तुटून रुतून बसलं होतं.उन्मत्त जयद्रथानं ते सुलट करण्यासाठी त्याचा देह चक्क लाथेनं ढकलला! वीर अभिचं छिन्नभिन्न मस्तक धरतीत तसंच राहिलं! नुसतं धडच उलटं झालं! त्या विक्रमी वीराला कुरुयोद्ध्यांची मुखं दृष्टीलासुद्धा पडू नयेत, असं वाटत होतं की काय न कळे!!'

एवढा धैर्यशील सेनापती धृष्टद्युम्न, पण त्यानंही वृत्तान्त देताना उत्तरीयाचा शेव भरल्या डोळ्यांना लावला.

ते शब्दन्शब्द अंगावर कोसळलेल्या अंगारांसारखे मला वाटले. अनावर क्रोधानं माझं उभं अंग क्षणैक थरथरलं. डोळे विस्फारले गेले. अभिमन्यूच्या मृत देहापासून मी ताडकन वर उठलो. हातचं गांडीव धनुष्य कुरुक्षेत्राच्या गगनमंडलात शक्य तितक्या वर उंचावून मी घोर प्रतिज्ञा घेतली –"माझ्या प्रिय पुत्राच्या कलेवरावर लत्तेचा निष्ठुर प्रहार करणाऱ्या संस्कृतिहीन, उन्मत्त जयद्रथाला अभिमन्यूचा पिता म्हणून उद्या सूर्यास्तापूर्वीच मी कंठस्नान घालीन! नाहीतर स्वत: अग्निकाष्ठ भक्षण करून माझं पितृछत्र माझ्या प्रिय पुत्रावर मी स्वर्गात धरीन!"

अनावर क्रोधानं अंग थरथरत असताना मी ही सर्वांत स्पष्ट ऐकू जाईल, अशी घनघोर प्रतिज्ञा घेतली होती. माझी कानपाळी कशी रसरसून तापली होती. मला काही-काही सुचत नव्हतं. माझ्या घामेजलेल्या पाठीवर हातानं थोपटत श्रीकृष्ण म्हणत होता, "अर्जुना, प्रतिज्ञेचा पूर्वार्ध तुला शोभेसाच आहे. उत्तरार्ध मात्र कठीण जाणार आहे." त्या वेळी त्याच्या म्हणण्याचा आशय मला नीट कळला नाही. असं बऱ्याचवेळा होत आलं होतं. त्याच्या सर्वच बोलण्याचे आशय मला आणि माझ्या बंधूंना लागलीच कळतच होते, असं नाही.

गेल्या तेरा दिवसांत घडलं नाही, असं रात्री घडलं. श्रीकृष्णानं एका सेवकाकडून मला आपल्या सेनेच्या केंद्रस्थानावरील उंच व भव्य शिबिरात बोलावून घेतलं. त्याच्या आसनासमोर पंचांगांच्या भूर्जपत्री वळ्या मांडून एक राजज्योतिषी बसला होता. दोघं दबक्या आवाजात काहीतरी बोलत होते. श्रीकृष्ण त्याला हाताची बोटं मोजत दबक्या-

दबक्या आवाजानंच काहीतरी सांगत होते. मला त्यातलं काही म्हणता काही कळत नव्हतं.

अभिमन्यूच्या वधानं विदीर्ण झालेल्या माझ्या मनाला त्याच्या आठवणींच्या सहस्र इंगळ्या डसल्या होत्या. निद्रा काही येत नव्हती. शिणल्या मनानं डोळे मिटून केवळ शय्येवर पडून होतो. श्रीकृष्णाच्या आदेशाप्रमाणे आज मी त्याच्या शिबिरात राहणार होतो.

मध्यरात्रीच्या सुमारास मी राजज्योतिषाचे निसटते शब्द ऐकून उठलो. मला ते संदर्भहीन वाटले. तो म्हणाला होता, “यादवराज, आहे! उद्याच्या अमावास्येला खग्रास सूर्यग्रहण आहे, तिसऱ्या प्रहरानंतर!” ते ऐकून कृष्णानं त्याला कंठातील मौक्तिकांची माला काढून दिलेली मी पाहिली. त्याला तो आज्ञावजा म्हणालाही, “ज्योतिषीबुवा, तुम्ही याच पावली हस्तिनापुरात परता. उद्याच तिथून तीर्थयात्रेसाठी हिमालयाकडे निघून जा.”

मी कधीच जीवनात विसरू शकलो नाही, असा युद्धाचा चौदावा दिवस उजाडला. विविध रणवाद्यांच्या संमिश्र नादांनी कुरुक्षेत्र-भूमी कशी दणाणून गेली. आत्तापर्यंत प्रत्येक दिवशीचं समरांगण बदलण्यात आलं होतं. दररोज रणभूमीवर पडणाऱ्या प्रेतांची, शस्त्रांची, रथांची, गतप्राण अश्व, उष्ट्र, गज यांची पुढील व्यवस्था लावण्यासाठी हे आवश्यक होतं. युद्धनियमाप्रमाणे एकाच समरभूमीवर दोन दिवस युद्ध खेळलं जाणार नव्हतं. रात्रीचं युद्ध होणार नव्हतं.

आज माझा नंदिघोष रथ श्रीकृष्णानं तिसऱ्या प्रहरापर्यंत पथकापथकांतून फिरवून आणला. जयद्रथ मात्र आम्हाला कुठेच दिसत नव्हता! दुर्योधन, शकुनींनी त्याला समरांगणातच न आणण्याचा निर्णय घेतला होता! सहस्र सशस्त्र योद्ध्यांनी संरक्षण दिलेल्या एका संरक्षक शिबिरात, तो तलावरच विश्राम घेत बसला होता. जसजसा शोधूनही जयद्रथ सापडेना, तशी माझ्या अंगाची कशी लाही-लाही होत चालली. विवश क्रोधानं मी नियुतायु, मित्रदेव, दंडधार अशा योद्ध्यांना कोसळवीत पथकांमागून पथकं हत करीत चाललो.

‘जयद्रथ दाखवा –माझ्या प्रिय अभिच्या कलेवराला लत्ताप्रहारानं हेटाळणारा नीच जयद्रथ दाखवा’ असं गर्जत श्रीकृष्णाला समरांगणभर माझा नंदिघोष पिटाळायला लावला. तोही न कंटाळता माझ्या रथाच्या अश्वांना त्यांच्या नावानं चुचकारत अथक चेतवीत राहिला. मी हताश झालो आणि रथ थांबविण्याची विनंती करू लागलो की, तो आज्ञाधारकासारखा थांबत होता. बोलत मात्र काहीच नव्हता. थांबताच प्राणदेठापासून आपला पांचजन्य शंख फुंकीत होता. त्याचा दिव्य नाद ऐकून माझा शीण कुठल्या कुठे पसार होत होता.

दोन्ही पक्षांकडील योद्धे व सैनिक स्वत:ला विसरून युद्धमग्न झाले होते. एकाएकी तिसऱ्या प्रहरानंतरच आकाश झाकोळून गेलं. काय घडतंय ते कुणालाच समजलं नाही! काही पळातच सूर्य संपूर्ण ग्रासला गेला! सगळीकडे धूसर अंधार पसरला. एव्हाना आम्ही चौदाव्या रणभूमीच्या पार पश्चिमेकडे आलो होतो. अंधारल्यामुळे पक्षयांचे थवे कलकलत घरट्यांकडे परतू लागले. रात्रकिडे कर्कशपणे करकरू लागले. रात्रसेवकांनी कुरुक्षेत्राचा आसमंत शेकडो पलित्यांनी उजळून टाकला. सर्वांनाच वाटलं दिवस ढळला. माझा प्रतिज्ञाभंग झाला, म्हणून कौरवसेनेनं माझ्यासाठी चंदनी काष्ठांची चिता रचली.

सर्वांना ती स्पष्ट दिसावी, म्हणून सैन्यांच्या शिबिरांच्या मधोमध रचून घेतली.

मी भ्रांतचित्त आणि अपार लज्जित झालो होतो. विराटनगरात बृहन्नडा म्हणून स्त्रीवेष अंगी चढविताना वाटली नव्हती, एवढी स्वतःची आज लाज वाटली. क्रोधित अभिमन्यू स्वर्गाच्या दारात उभा राहून मला परतवून लावतो आहे, असं वाटलं. श्रीकृष्णाला, युधिष्ठिर-भीमसेनासह सर्व बंधूंना, द्रौपदीला आणि विशेष म्हणजे सुभद्रेला माझ्याविषयी काय वाटेल, या विचारानं तर मी सुन्नच झालो. पाझरत्या आत्मरसाला डोळ्यांत घेऊनच मी युधिष्ठिराला, भीमसेनाला आणि माझ्या वृद्ध कुंतीमातेला वंदन केलं. नकुल-सहदेवांना दुःखावेगानं कडाडून आलिंगनात घेटलं. मला अंतिम निरोप देण्यासाठी शेकडो, लाखो योद्धे व्याकूळ होऊन जमले. त्यांना मी हात उंचावून नम्र अभिवादन केलं.

सर्वांत शेवटी मी मला जीवनाचा एवढा हितोपदेश सांगणाऱ्या माझ्या प्रिय कृष्णासमोर आलो. अनेक संमिश्र भावभावनांनी माझं मन कसं भरून आलं. श्रीकृष्णापासून दूर जायचं? कायमचं? कसं शक्य आहे? प्रतिज्ञा तर घेऊन बसलो! आता सर्वांपासून दूर गेलंच पाहिजे. मी माझं मन निर्धारानं बांधून घेतलं. खांद्यावरचं गांडीव उतरून आज ते हतप्रभ झालं, म्हणून त्याच्या चरणांवर ठेवलं. त्यानं तेवढ्याच तत्परतेनं, गंभीर चर्येनं म्हटलं, “वीर अर्जुना, क्षत्रियांना स्वर्गातदेखील शस्त्राशिवाय प्रवेश नाही! तुझ्याशिवाय हे गांडीव धनुष्य कोण सांभळणार? मलासुद्धा ते शक्य नाही!” त्यानं बळेच तूणीर माझ्या पाठीवर ठेवून त्याचे बंध माझ्या वक्षावर आवळले. दुसऱ्याच क्षणी त्यानं मला दृढ आलिंगनात घेतलं. त्याचं निमित्त साधून तो माझ्या कानात पुटपुटला, “गांडीवाचाच कधी नव्हे असा अजोड कौशल्याचा वापर तुला क्षणात आत्ताच करायचा आहे. माझ्या तर्जनीकडे अढळ ध्यान ठेव.” त्यानं माझे खांदे अपार मायेने थोपटले. मी अष्टांगी सावध झालो.

आठ हात उंचीच्या भव्य चितेवर शिडीनं मी चढलो. नतमस्तक, प्रचंड अवमानित असा! अग्निप्रवेशासाठी! श्रीकृष्णाच्या चरणावर दृष्टी ठेवून, दोन्ही हात जोडून मी नेत्र मिटले. सवितृचा धैर्यपूर्ण मंत्र माझ्या ओठांतून आपोआप गायत्री छंदात सुटला – ॐ भूर्भुवः, स्वः, तत्सवितुर्वरेण्यंऽऽ...

मी कुंतीमातेचा तृतीय पुत्र, श्रीकृष्णाचा सर्वांत प्रिय सखा – गांडीवाधिकारी – दिग्विजयी – धनुर्धर अर्जुन मृत्यूला संमुख झालो.

एका सेवकानं थरथरत्या हातानं चितेला करंजेलपलित्याची ज्योत भिडविली. मी आवतीभोवती आता तरी कुठे जयद्रथ दिसतो का, ते पाहातच होतो. उत्तरीयाचा शेव स्त्रिया घेतात तसा मुखाभोवती लपेटून घेऊन तो दुर्योधनामागे गुपचूप उभा होता. आपल्या प्रथम शत्रूचा – अर्जुनाचा अग्निप्रवेश पाहून आपल्या क्रूर डोळ्यांची नि निर्दय मनाची आग शांत करण्यासाठी तो आला होता. त्याला दुरून पाहूनही माझ्या अंगाचा तिळपापड झाला.

एकाएकी सूर्यग्रहणाचे वेध सुटू लागले! फुटलेल्या घड्यातून पाण्याची एकेक सर बाहेर पडते, तशी किरणांची एकेक सलग शलाका धर्मक्षेत्र कुरुक्षेत्रावर स्त्रवू लागली!! समरांगणावरच्या क्षीणकाय पलित्यांना हसत-हसत पाहून, पश्चिम किनाऱ्यावर सहस्त्ररश्मी सूर्यदेव क्षणात पूर्ववत उभे ठाकले. पक्षी पुन्हा घरटी सोडून कलकलत चरायला पुन्हा रानात निघून गेले. रातकिड्यांची कर्णकटू कर्कश करकर एकाएकी गपकन

थांबली!

माझ्या सर्वांगावर रोमांच उठवीत, पांचजन्यालाही लाजवीत, परिचित शब्द माझ्या कानावर पडले, “सव्यसाची-पार्था, तो पाहा गगनमंडलातला सूर्य आणि हा बघ कुरुक्षेत्रावरचा नीच जयद्रथ! सोड बाण आणि साध लक्ष्यवेध.” दोन्ही हातांच्या तर्जन्या दोन भिन्न दिशांवर रोखत तो ताठ उभा होता – हिमालयाच्या कैलास पर्वतासारखा! त्याच्या उजव्या हाताची तर्जनी सूर्याकडे आणि डाव्या हाताची जयद्रथाच्या कंठाकडे अचूक रोखलेली होती. त्याच्या डाव्या बोटाचं अग्र नेमकं पकडत मी हातात पेललेल्या गांडीवावरचा जिद्मपुच्छाचा चंद्रमुख बाण ‘श्रीकृष्णार्पणमस्तु’ म्हणत फेकला. तो कंठनाळ छेदणारा चंद्रमुख – जिद्म आणि नागमोडी जाणाऱ्या शेपटाचा चंद्रकोरी पात्याचा होता. नागमोडी वळणांमागूण वळणं घेतं मधल्या सर्वांना, सरसर चुकवीत तो अचूक जयद्रथाचाच कंठनाळ भेदून गेला. काय आणि कसं घडलं, ते माझं मलाच कळलं नाही!!

माझ्यासाठी कौरवांनी रचलेल्या त्या भव्य चितेवर पांडवसैनिकांनी जयद्रथाचं प्रेत चढविलं. सूर्यग्रहणाची हूल देऊन चौदावा दिवस जयद्रथाची चिता बघत मावळत होता. मला श्रीकृष्ण हितोपदेशात ठामपणे म्हणाला होता, “मन्मना भव – माझ्याठायी मन ठेव. भव मद्भक्तो – माझाच भक्त हो. मद्याजी माम् नमस्कुरु – मलाच नमस्कार कर. अहं त्वाम् सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि–मी तुला सर्व-सर्व पापांपासून मुक्त करेन!”

मा शुच: – भिऊ नकोस! ते ऐकताना मी तेवढ्याच निर्धारानं त्याला म्हणालो होतो, करिष्ये वचनं तव –तुला दिलेलं वचन पाळेन. तू सांगशील तेच करेन!!

मला एक लाखमोलाचं जीवनसत्य, अनुभवानं पूर्ण कळून चुकलं होतं की, मी एक सामान्य नर आहे आणि तो – तो नारायण!

# सात्यकी

## ६

# सात्यकी

मी सात्यकी! यादवांच्या अठरा कुलांतील वृष्णी या विख्यात कुलातला. वृष्णिकुलोत्पन्न शिनींचा नातू – सत्यकांचा पुत्र! माझे पिता सत्यक सुधर्मा राजसभेतील दहा मंत्रिगणांपैकी एक मंत्री होते. माझे पितामह शिनी वसुदेवमहाराजांचे स्नेही होते.

मथुरेच्या कंस-कारागृहात जन्मलेल्या, गोकुळात कृष्ण म्हणून वाढलेल्या, पुढे श्रीकृष्ण, अच्युत, वासुदेव, भगवान अशा चढत्या उपाधी प्राप्त केलेल्या यादवश्रेष्ठ द्वारकाधीशांची माझ्या आयुष्यभर प्रदीर्घ सेवा करण्याचा दुर्लभ सुयोग मला लाभला.

तसा माझा स्वभाव सत्यप्रतिज्ञ! या एकाच गुणामुळे मी श्रीकृष्णमहाराजांच्या निकटच्या मंडलात सतत वावरलो. त्यांच्या त्यांना प्रिय झालेल्या अनेक सख्यांपैकी मीही एक होतो. शेवटच्या क्रमांकावरचा का असेना, पण नक्कीच होतो. मला त्याचा वक्षभर अभिमानही वाटला.

जसा मी सत्यप्रतिज्ञ होतो, तसाच निर्भयही होतो. माझ्यातील ही निर्भयता यादवश्रेष्ठांच्या सहवासामुळे तर साकारली आणि वृद्धिंगत होत गेली. हे आज मला जाणवतं आहे.

माझ्यातील तिसरा यादवश्रेष्ठांनी टिपलेला गुणधर्म होता, तो माझं शत्रुमर्दन हा! द्वारकाधीशांसह मी अनेक समरांगणांत उतरलो. त्यातील कुठल्याच समरात मी अपयश घेऊन काही कधीच परतलो नाही. आज मला हे स्पष्ट केलं पाहिजे की, त्या प्रत्येक यशात माझी 'शत्रुमर्दनता' हे जसं एक कारण होतं, तसं द्वारकाधीशांचं त्या-त्या वेळी समरात नुसतं असणं, हे प्रबल कारण होतं.

स्पष्टवक्तेपणा हा माझा जन्मजात गुणधर्मच होता. तसा तो आम्हा अनेक यादवांचाही होता. बलरामदादा तर त्याचं यादवांपैकी सर्वोत्कृष्ट उदाहरण होतं. माझा स्वभाव बराचसा त्यांच्यासारखाच शीघ्रकोपी आणि लवकर निवळणारा. आम्हा दोघांत अंतर एकच होतं, बलरामदादा वयाच्या ज्येष्ठतेमुळे असेल, द्वारकेतील त्यांच्या युवराजपदामुळे असेल, केव्हाही लगेच क्रोधित होत. त्याचप्रमाणे लागलीच निवळतही. माझा क्रोध जागृत होई, तो युद्धभूमीवर! शत्रूचा पुरता पाडाव केल्याशिवाय तो काही निवळत नसे.

माझ्या या गुणांमुळेच असेल, माझ्या जीवनात एक मजेदार सत्य साकारलं होतं, ते साकारलं होतं, तेही पांडवांसाठी खांडववनात सुघड असं राजनगर इंद्रप्रस्थ उभं करताना! त्या वेळी मला द्वारकाधीशांसमवेत रथांची व कारागिरांची पथकं घेऊन द्वारकेहून खांडववनाकडे सतत जावं लागलं होतं. या काळातच धनुर्धर अर्जुनाठायीचे अनेक गुण मला स्पर्शून गेले होते. त्यामुळेच एके दिवशी मी त्याच्याहून वयानं ज्येष्ठ

असूनही, दोन्ही हात जोडून अर्जुनाला एकदा गळ घातली. म्हणालो, “पराक्रमी पार्थ, आपण वयानं लहान असलात तरी युद्ध आणि धनुर्विद्येसाठी मला आपला एक नम्र असा दीक्षित शिष्य करून घ्यावं!” माझा आग्रह प्रथम त्याला खराच वाटेना! तो मला म्हणाला, “आजानुबाहू, महाबली यादव सेनापती, आपण माझी थट्टा तर करीत नाही ना? मी पूर्ण जाणतो, तुम्हा सर्व यादवांत आणि आम्हा पांडव-कौरवांत केवळ दोघेच वीर आजानुबाहू आहेत. एक आमचा कृष्ण आणि दुसरे स्वत: तुम्ही! महास्कंध – महारथी, मी कालचा पोर, तुम्हाला कसं काय शिकवणार?”

तो त्याला शोभेलसं विनयीच बोलला. मला मात्र युद्धविद्या व धनुर्वेद त्याच्याकडूनच शिकून घ्यावा, याची आंतरिक आच लागली होती.

मी ज्येष्ठता विसरून विद्येसाठी योग्य ती नम्रता पत्करून अर्जुनाला आग्रहाची गळ घातली. त्यानंही माझ्या आग्रही विनंतीला मान दिला. मी अर्जुनाचा दीक्षित शिष्य झालो! त्यामुळे गांडीव सहज हाताळणाऱ्या त्याच्या अनेक अमोघ बाणगती मला सहजच प्राप्त झाल्या. तरीही यादवांचा एक अनुभवी सेनापती म्हणून मी जाणून होतो की, धनुर्वेद आपल्या सर्व ऋचांसह जाणत होते, ते आर्यावर्तातील पाचच वीर. पहिले होते पितामह भीष्म, दुसरे आचार्य गुरू द्रोण, तिसरा अंगराज कर्ण, चौथा अर्जुन आणि पाचवे आमचे द्वारकाधीश! पाचवे की पहिले? लक्ष्मणादेवींच्या स्वयंवरात त्यांनी मत्स्यभेद साधून हे सिद्धच केलं होतं आणि खरोखरच हाती शस्त्र-धनुष्य पेलून ते कुरुक्षेत्राच्या संग्रामात उतरलेच असते तर?

मी जसा अर्जुनाचा नम्र शिष्य झालो, तसा द्वारकेतच यादवश्रेष्ठ श्रीकृष्णांचा अस्त्रविद्येचा शिष्य होतोच. म्हणजे गुरु-शिष्य असलेल्या कृष्णार्जुनांचा मी उभ्या आर्यावर्तात एकमेव शिष्य होतो. मात्र वयानं लहान असल्यानं अर्जुन मला ‘अहो-जाहो’ म्हणे! कृष्णदेव सहजच ‘सात्यकी’ म्हणत. याचाच दुसरा अर्थ असा होता की, गुरु-शिष्य नात्याला धरून आम्हा तिघांचा एक भावत्रिकोण होता. त्या भावत्रिकोणाला धरूनच आम्हा तिघांच्या जीवनाकडे बघितलं पाहिजे, असा माझा आग्रह आहे.

द्वारकाधीशांच्या भावजीवनाचं अधिकाधिक सखोल दर्शन झालं, ते एकट्या उद्धवदेवांना. त्यांचं संपूर्ण जीवन बघायला मिळालं, ते त्यांच्या प्राणसखा झालेल्या अर्जुनाला! मी काय बघितलं? एक विक्रमोत्सुक सेनापती म्हणून मी बघितलं, ते त्यांच्या ठायीचं रणनीतिकुशल अजोड वीर मन आणि अतुल क्षात्रतेज. त्या मनाचं मला जाणवलेलं सर्वांत मोठं वैशिष्ट्य एकच होतं. त्यांनी खेळलेलं प्रत्येक युद्ध हे अंतिमत: संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाला जाऊन भिडत होतं. केवळ एक अजोड, वीर सेनानायक एवढीच कीर्ती मिळविण्याची लालसा त्यात कधीच नव्हती. ती असती, तर हाती शस्त्र न घेता भारतीय महायुद्धात ते उतरलेच नसते. जीवनभर कुठल्याच राजसिंहासनावर त्यांनी अधिकार सांगितला नव्हता. तरीही तसा अधिकार सांगणाऱ्या कौरव-पांडव दोन्ही पक्षांकडील असंख्यात नरेशांना त्यांनी त्वेषानं एकमेकांशी लढायला लावलं होतं, ते का?

हा आणि असे अनेक प्रश्न मनी उठले की, कुरुक्षेत्रावर मार्गशीर्ष वद्य प्रतिपदेच्या रात्री त्यांनी आम्हा सर्व पांडव योद्ध्यांसमोर व्यक्त केलेल्या मनोगताची तीव्र आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

त्या रात्री पांडवांच्या शिबिरात सेनापती धृष्टद्युम्न, पाचही पांडव, मी द्रुपद,

विराट, अभिमन्यू, घटोत्कच, धृष्टकेतू, चेकितान, इरावान असे दोन-तीन पिढ्यांतील योद्धे होतो. त्या रात्री द्वारकाधीशांनी आम्हा सर्वांना उद्देशून केलेल्या वक्तव्यातील एकही शब्द मी जीवनभर कधीही विसरू शकलो नाही. ढणढणत्या पलित्यांच्या प्रकाशात, आपल्या प्रशस्त शिबिरात बोलावून घेतलेल्या महाविक्रमी वीरांवर सभोवार एकदा आपली कृष्णदृष्टी फिरवून, ते धीरगंभीर अशा आपल्या समरवाणीत म्हणाले, "मला माहीत आहे, युद्ध हे कधीच अंतिम सत्य ठरू शकत नाही. युद्धामुळे कधीच समस्या मिटत नाही, प्रश्न सुटत नाहीत. उलट समाज पतनशील होण्याचं भय असतं. राष्ट्राचा सांस्कृतिक पायाच उखडला जाण्याची शक्यता असते. मानवजातीनं पिढ्यान्पिढ्या आपल्या उराशी कवटाळलेली स्वप्नं भग्न होऊ शकतात. तरीही लक्ष-लक्ष योद्ध्यांचा बळी चढविणारा साक्षात मृत्यूचा महायज्ञ मी मांडणार आहे, तो का? का करतो आहे मी हे सर्व? कशासाठी? केवळ द्रौपदीच्या अकलंक चारित्र्याची घोर विटंबना करणाऱ्या दुर्योधन, दु:शासन, कर्ण यांना शासन देण्यासाठी? केवळ असाच काही माझा हेतू असता, तर माझं हे कार्य सोपं होतं. या प्रत्येकाला एकएकटं गाठून निखंदणं काय मला अशक्य होतं? मग कशासाठी मांडणार आहे, मी हा थरारक महायज्ञ?? माझ्या समोर प्रश्न आहे, तो अखिल मानवजातीचा! प्रश्न आहे; तो अंतिम चिरंतन सत्याचा! जगातील अंतिम आणि कधीही न बदलणारं शाश्वत सत्य आहे, प्रकाशमय अमर चैतन्य! कुणालाही त्याचा अनुभव आपल्या विलासी राजवास्तूत राहून कधीच नाही घेता येणार!

"त्यासाठी दिवसामागून रात्र असते, तसा जीवनामागून मृत्यु असतो याचा शरीरातील पेशीपेशींना दाट आणि अमळ परिचय व्हावा लागतो. मन, शरीर, बुद्धी सर्व निकोप, आत्मनिर्भर व्हावं लागतं. मग सत्य दुसऱ्या कुणी सांगावं लागत नाही, पटवावं लागत नाही. ते आपोआपच शरीरशरीरांतून प्रकटन पावू लागतं. 'मुक्ती' किंवा 'सर्वश्रेष्ठ आत्मानुभव' ही कधीही भिक्षा मागून मिळणारी वस्तू नव्हे.

"दुसऱ्याने अन्न खाऊन आपली भूक कधीच शमत नसते. दुसऱ्याने पाणी प्राशल्यानं आपली तृष्णा कधीच तृप्त होत नाही. अगदी तसंच, कुणाच्याही केवळ उपदेशामुळे कुणाचाच उद्धार कधीच होत नसतो. होणारही नाही! जिथे-जिथे जीवन असतं, तिथे-तिथे प्रकटनाचीही अनावर ओढ असते. मुक्तीची तळमळ असते. बाहेरून ती दिसत नसेल, पण आतून अखंडपणे तिचं हे कार्य मूकपणे चाललेलं असतं. जीवन म्हणजे प्रकटन! कधी-कधी या प्रकटनाचा प्रलयकारी देखावा मानवजातीपुढे यावा लागतो! कारण ग्रंथ, उपदेश, नीतितत्त्व यांपलीकडे जाऊन ती आसक्त झालेली असते. व्यक्तिगत अंध स्वार्थानं बरबटलेली असते. जगात दृश्य वस्तूंच्या पलीकडे आणखी काही सूक्ष्म जगत आहे, हे पाहायलाही तिला अवसर नसतो. त्या वेळी तिला कुठेतरी थांबवावं हे लागतंच! आणि त्यासाठी युद्धासारखा दुसरा अन्य प्रभावी असा मार्गच असत नाही! उद्या पेटणारं महायुद्ध आहे, ते यासाठी! केवळ यासाठीच!"

त्या रात्री 'द्वारकाधीशांची आणि माझी पहिली भेट केव्हा झाली?' हा अनावर प्रश्न माझ्या मनी सरसरून उठला. मी त्याचा क्रमश: माग घेत गेलो आणि जसजसं त्यांच्या चरित्राचं चित्र स्पष्ट होत गेलं, तसतसा थक्क-थक्क होत गेलो.

कंसवधाच्या वेळी मथुरेत मी त्यांना स्पष्टपणे सर्वप्रथम पाहिलं होतं. यादवांच्या सेनापती अनाधृष्टींच्या जवळ एक उभारता तरुण यादव म्हणून मी तेव्हा बसलो होतो.

त्या वेळी त्यांनी आणि बलरामदादांनी किशोरवयातच बलाढ्य कुवलयापीड हत्तीचा नि:पात केला, तोच मला दिपवून गेला. त्या वेळचं त्यांचं किशोरवयीन रूप सूर्यबिंबासारखं क्रमश: माझ्यासमोरच फुलत गेलेलं मी पाहिलं.

त्या वेळी त्यांच्या ठायी असलेला प्राणिजीवनाचा सखोल अभ्यास माझ्या मनावर ठसला. युद्धात गज, अश्व आणि उष्ट्र हे प्राणी प्रमुखत: वापरले जात. पुढे जेव्हा ते आचार्य सांदीपनींच्या अंकपाद आश्रमातून परतले, तेव्हापासून या तिन्हीही प्राण्यांवर त्यांना अभ्यासपूर्ण सखोल बोलताना मी ऐकलं. गज हा प्राणी धिप्पाड दिसला नि निर्बुद्ध वाटला, तरी तो अतिशय बुद्धिमान असतो, हे नाना ढगांनी कृष्णदेवांनीच मला पटवून दिलं. हत्तीला माणसाळविताना त्याच्या पुढच्या पायांना काटेरी लोहचाप लावावे लागतात. हे लावताना त्याच्या सोंडेच्या कक्षेत येईल असं माहुतानं कधीच उभं राहू नये. चुकून तसा तो राहिलाच, तर चापामुळे पायात उठलेल्या वेदनेच्या तिडिकीमुळे हत्ती माहुताला सरळ सोंडेच्या कवेत घेऊन रजकानं धुणं धोपटावं, तसं आपटतो. पायातल्या कळीला हत्ती हळवा असतो. आपल्या देहाचा प्रचंड भार तो पायावरच तर सावरत असतो. यामुळेच पायात घुसलेला किकराचा बळकट कंटक त्याला असह्य वेदना देतो. तो कंटक हळूवार हातानं काढणाऱ्या माहुताला तो जन्मभर कधीच विसरत नाही!

आम्हा यादवांच्या राजसारथी दारुकाला तर त्यांनी वेळोवेळी आपली ‘अश्वगीता’च ऐकविली होती. दारुक त्यांच्या गरुडध्वज रथाचा स्वत:ला पाचवा अश्वच मानत आला होता. खरोखरच दारुक कृष्णदेवांच्या गरुडध्वज रथाचा पाचवा सतेज, सावध, गतिमान अश्वच होता. इतर चार अश्वांचे वर्ण दुधासारखे शुभ्रधवल होते. दारुकाचं अंतरंग स्फटिकासारखं शुभ्रधवल होतं.

तसा उष्ट्र हा युद्धात वापरला जाणारा तिसरा प्राणी मूळचा मरुस्थलातला. मथुरेच्या आणि द्वारकेतील आम्हा यादवांना त्याचा फारसा सराव नव्हता. तो करून दिला तो आमच्या द्वारकाधीशांनी. गजगती आणि त्याची वृत्ती याचा जसा त्यांचा सखोल अभ्यास होता, तसा उष्ट्रगती आणि त्याची वृत्ती याचाही होता. वक्राकृती आणि उंच उंटाला बसतं करण्यासाठी त्याला काही सांकेतिक शब्द शिकवावे लागतात. ते कानांवर पडले, तरच तो बैठक घेण्यासाठी मनाची तयारी करतो. बसतो. एरवी घटकान्घटका उभाच राहतो.

उंटाविषयी त्यांनी दिलेली एक सैनिकी दीक्षा मी कधीच विसरू शकलो नाही. उंटाची तिरकी आणि डुचमळती चाल लक्षात घेऊन त्यांचं पथक, जिद्म नावाचे नागमोडी बाण वर्षविणाऱ्या पथकासमोर घालावं, ही ती दीक्षा! ते बाण पुढे-पुढे उंट सरावानं स्वत:च चुकवीत चालतो.

अजूनही ते दिवस स्पष्ट आठवतात – जरासंधाच्या मथुरेवरील सशस्त्र आक्रमणांचे! माझी अनाधृष्टींचे सहसेनापती म्हणून नियुक्ती झाल्यानंतर, सर्वप्रथम मला युद्ध या सत्यालाच सामोरं जावं लागलं. ही आक्रमणं एक-दोन वेळा नव्हे, तर चांगली सतरा वेळा करण्यात आली. त्या काळात कृष्णदेवांनी राजनगर मथुरेच्या पश्चिम महाद्वाराच्या संरक्षणाचं उत्तरदायित्व माझ्यावर सोपविलं होतं. माझ्याकडे हे पश्चिम महाद्वारच का? त्यालाही कारण होतं, मथुरा सम्राट जरासंधाच्या गिरिव्रजापासून थेट पश्चिमेला होती. त्यामुळेच त्याचं कुठलंही सैनिकी आक्रमण प्रथम धडकायला पाहिजे होतं, ते मथुरेच्या पूर्व महाद्वारावर! मात्र तसं घडू शकत नव्हतं. त्याला एक भौगोलिक

कारण होतं. मथुरेला यमुनेनं चंद्राकृती घेर घातलेला होता. शत्रूच्या नौकांना यमुनेच्या पूर्वपात्रात उताराला सोयीची जागा नव्हती. ती होती पश्चिम दिशेला. त्यामुळेच सेनापती म्हणून माझी नियुक्ती याच प्रमुख महाद्वाराच्या रक्षणार्थ वर्षानुवर्षं झालेली होती.

मथुरेचं रक्षण करण्याकरिता मला पश्चिम द्वारापासून पूर्व द्वारापर्यंत अर्धचंद्राकृती यमुनापात्रात सतत नौकाफेर टाकावे लागत. अशा वेळी काही-काही फेरात कृष्णदेवही बरोबर असत. त्यावेळच्या चर्चेत मला ते युद्धनीतीचे अनेक बारकावे सांगत. शत्रूचा समरांगणात पराभव झाला, म्हणून त्याला सोडू नये. लढाऊ वीराच्या मनाचा कधीच पराभव होत नसतो. मनाची बांधणी करून तो पुन्हा येऊ शकतो. यासाठी पराभवानंतर त्याचा पाठलागही करावा लागतो. हे सूत्र ध्यानी ठेवून जरासंधाच्या शेवटच्या आक्रमणात मी त्याचा चांगली पाच योजनं पाठलागही केला होता. यमुनेवरून नौकाभ्रमण करताना मला तीव्रपणे जाणवत असे की, त्यांच्या ठायी यमुनेविषयी अपार प्रेम आहे. अशा विहारात त्यांची चित्तवृत्ती अतिशय प्रसन्न वाटे. यमुनेविषयी आणि एकूणच जल या महाभूताविषयी ते भरभरून बोलत. म्हणत, "याच यमुनेच्या पात्रात गोकुळात मी आणि बलरामदादा यथेच्छ डुंबलो आहोत. हिच्या जीवनदायी जलावर यादवांच्या पिढ्या सतेज व्हाव्यात, म्हणून हाती फावडं घेऊन मी आणि दादानं यमुनेचा पाट आमच्या कृषिक्षेत्राकडे वळवूनही घेतला आहे. सात्यकी, लक्षात ठेव, जीव ज्यापासून जन्मतो आणि ज्यात लय पावतो, ते महाभूत म्हणजे जल."

त्यांचं असं अर्थगर्भ बोलणं ऐकून-ऐकून, पुढे-पुढे मला प्रत्ययच येऊन चुकला की, ते स्वतःच एक जलपुरुष आहेत. जन्मतःच त्यांनी जलावरून प्रवास केला होता – गोकुळ-मथुरेत ते यमुनेकाठी जलकिनारीच राहिले होते. त्यांनी उठविलेली द्वारकानगरी तर जलानंच घेरलेली होती. जलाचा कृपाप्रसादी वरदहस्त लक्षावधी यादवांच्या पाठीशी असावा, ही त्यांची दूरदृष्टी होती. म्हणूनच द्वारकेचा एका सुनियोजित बंदरात त्यांनी विकास करवून घेतला होता.

त्यांच्यातील या सखोल जलपुरुषाचा प्रत्यय सेनापती म्हणून मला आला, तो जरासंधाच्या सतराव्या नि शेवटच्या प्रचंड आक्रमणात! त्या वेळी त्यांनी हंस आणि डिंभक या जरासंधाच्या दोन बलाढ्य सेनापतींचा निःपात केला होता. त्यासाठी त्यांनी यमुनेची जलकृपाच पाठीशी घेतली होती.

यादवश्रेष्ठ मला नेहमी म्हणत, "सात्यकी, तू मला बरं पारखलं आहेस, एक जलपुरुष म्हणून! कुरूंच्या हस्तिनापुरातही माझ्यासारखे आणखी दोन आहेत – जसा तू माझ्यासारखा आजानुबाहू आहेस, तसेच! ओळख पाहू."

गंगापुत्र म्हणून पितामह भीष्मांचं नाव पटकन माझ्या डोळ्यांसमोर येई. ज्यांनी कृष्णदेवांना सुदर्शनचक्र अर्पण केलं, त्या भगवान परशुरामांचेच पितामहही शिष्य होते. प्रस्वाप नावाचं अस्त्र त्यांनी पितामहांना दीक्षेसहित दिलं होतं. मी बोलून जाई, "एकतर गंगापुत्र पितामह हे स्पष्टच आहे. दुसरं कोण? ध्यानी येत नाही." मी कपाळाला आठी घालून त्यांच्याकडे बघितलं की, ते नेहमीसारखं खोचक हसत. म्हणत, "कळेल – योग्य वेळी कळेल." ती योग्य वेळ माझ्या जीवनात फार उशिरा आली.

जरासंधाच्या दक्षिणेतील सेनाघेरातून सुखरूप बाहेर पडण्यासाठी गोमंताचं वैभवशाली अरण्य अग्नीच्या भक्षयस्थानी टाकावं लागलं, याची त्यांना अपार खंत होती.

पांडवांसाठी इंद्रप्रस्थ ही सुरचित राजनगरी उठविण्यासाठी खांडववनासारखं रमणीय अरण्य दग्ध करावं लागलं, याचा सल त्यांच्या मनी जीवनभर सतत होता.

त्यांच्या पायावर चक्रंच उमटली होती. मथुरा ते द्वारका, द्वारका ते इंद्रप्रस्थ, प्राग्ज्योतिषपूर, द्वारका ते कौंडिण्यपूर, करवीर, सौवीर ते जगन्नाथपुरी असा हा संपूर्ण भारतवर्ष त्यांनी उभा-आडवा पिंजून काढला होता.

यादवांचा सेनापती म्हणून त्यांच्यासह भारतवर्षभर फिरताना, मला त्यांच्या ठायीचे अनेक गुणविशेष जाणवले. त्यातील सर्वांत महत्त्वाचा गुणविशेष होता, तो त्यांचा निर्मोह स्वभाव. जसा द्वारकेच्या सिंहासनाचा त्यांनी कधीच मोह धरला नाही. अन्यायी व अरेराव शासनकर्त्यांच्या निरंकुश वरवंटचाखालून प्रजेला मुक्त करणं, हे त्यांचं जीवनव्रत होतं. ते पार पाडतानाच पराभूत झालेल्या नरेशांची राज्यं घशात घालता येणं, त्यांना सहज शक्य होतं. पण त्यांनी असं कुठलंच राज्य कधीच घशात घातलं नाही.

अगदी प्रारंभीच त्यांनी दक्षिणेच्या अन्यायी व निरंकुश अशा करवीरच्या शृगालाचा नि:पात केला. त्यासाठी लाभलेल्या सुदर्शनाचं सर्वप्रथम प्रक्षेपणही केलं. मात्र करवीरच्या राजगादीवर त्यांनी आपला अधिकार सांगितला नाही. शृगालाच्या जागी त्यांनी त्याच्याच पुत्राला – शक्रदेवाला नियुक्त केलं. तिथंच त्यांच्यातील वेगळेपण मला प्रकर्षानं जाणवलं. तिथल्या सहस्रावधी प्रजाजनांची मनं तर त्यामुळेच त्यांनी जिंकली.

मोठमोठ्या द्रष्टचा पुरुषांची एका विषयात नेहमीच चूक होते. जुने मोडकळीला आलेले साचलेले विचार ते अवश्य मोडून काढतात, पण चुकतात ते नेमके नवे जीवनदायी विचार देताना! कृष्णदेवांनी नव्या पिढीचा यादव म्हणून मला जसं हाताशी धरलं, तसंच करवीरच्या शृगालपुत्र शक्रदेवालाही हाताशी धरलं. साचलेलं निकृष्ट, जुनं, मनाच्या निर्धारानं निपटून काढणं; हे तर कृष्णदेवाचं जीवनव्रत होतं. माझ्या मनावर ठसलेलं त्याचं सर्वांत मोठं वैशिष्टच होतं की, त्यांनी नव्या पिढीच्या विक्रमाला सदैव प्रोत्साहन आणि प्रेरणा दिली हे!

कामरूप गणराज्याच्या उन्मत्त आणि माजलेल्या नरकासुरावर आमचे स्वामी कृष्णदेव ससैन्य चालून गेले. मी त्यांच्याबरोबर होतोच. पश्चिम सागरतीरावरच्या आमच्या द्वारकेपासून पूर्वदेशीच्या प्राग्ज्योतिषपुरापर्यंत तडक जाऊन भिडणारं हे प्रचंड महत्त्वाकांक्षी अभियान होतं. या प्रदीर्घ काळच्या सैनिकी अभियानात, मला त्यांच्या ठायीचे कित्येक गुण दिपवून गेले. कामरूपांच्या अन्यायी आणि अरेराव नरकासुराला वधून त्यांनी तिथलं राज्य त्याचा पुत्र भगदत्त याला प्रदान केलं. त्या वेळी त्यांच्या ठिकाणी असलेल्या स्त्रीत्वाच्या निखळ आदरामुळे आम्ही सर्वच यादवयोद्धे चकित झालो. त्यांनी सोळा सहस्र कैदी, पीडित कामरूपी स्त्रियांना उद्धवदेवांच्या हातून आपल्या नावाची मंगलसूत्रं अर्पण केली. त्या सर्व अश्राप जिवांचं आपल्या द्वारकेत सन्मानपूर्वक पुनर्वसन केलं. या प्राचीन आर्यावर्तात हे असं काही करणारे ते पहिलेच द्रष्टे पुरुषोत्तम ठरले.

कृष्णदेवांचं द्वारकेतील सांसारिक जीवन तर मला सर्व बारकाव्यांसह समोरच बघायला मिळालं. राणीद्वीपावरून आपल्या अलंकृत गरुडध्वज रथातून उद्धवदेव व बलरामदादांसह आलेल्या कृष्णदेवांचं सेनापती म्हणून राजसभेच्या द्वारात मी स्वागत केलं की, माझे दोन्ही हात प्रेमभरानं ते आपल्या ओंजळीत घेत. कधी-कधी एका हाती

माझा हात तसाच धरून ते राजवेदीकडे चालू लागत. असं चालताना 'सात्यकी बंधो,' अशी अतिशय प्रेमळ, ठाव घेणारी साद घालत.

मला स्पष्ट आठवतं, माझ्याशी शब्दही न बोलता ते अशाच एके दिवशी सुधर्मा राजसभेत प्रवेशले होते. नेमक्या त्याच दिवशी पुढे श्वशुर झालेल्या सत्राजितांनी त्यांच्यावर स्यमंतक मण्याच्या चौर्यकर्माचा आक्षेप घेतला होता. त्या दिवशी सुधर्मा सभेला दिलेल्या शब्दांप्रमाणे कृष्णदेवांनी नाना खटपटी करून स्यमंतक मणी परत आणून भरल्या सभागृहात तो सत्राजितांच्या स्वाधीन केला होता.

त्या स्यमंतक मणिरत्नाचं एकजात सर्व यादवांना कोण कौतुक वाटलं! मला मात्र त्या निमित्तानं द्वारकेत आलेल्या एका स्त्री-रत्नाचं सर्वाधिक कौतुक वाटलं. त्या होत्या आमच्या जांबवतीदेवी! माझ्या कृष्णदेवांनी ऋक्षवान पर्वताच्या अरण्यातील एक आदिवासी स्त्री-रत्न द्वारकेत आणून यादवांच्या महाराणीपदाला पोहोचवलं. त्या दिवशीच मला कळून चुकलं की, हा पुरुषोत्तम सर्व आर्यावर्तात वेगळाच आहे. कृष्णदेव आणि जांबवतीदेवी यांचा विवाह आदर्श मानूनच पुढे भीमसेनाने हिडिंबेशी लग्न केलं आणि अर्जुनानं उलूपी या एका बालविधवेशी विवाह केला.

सर्वच कौरव – विशेषत: दुर्योधन आपल्या संख्येच्या आणि अधिकाराच्या बळावर गुणवंत पांडवांना देशोधडीला लावायला उत्सुक झाले होते. त्यांनी राज्याचा भाग म्हणून हस्तिनापूरच्या विख्यात राजसभेत खांडववनाचा बिकट भाग त्यांच्या गळ्यात मारला. तोही कृष्णदेवांच्या साक्षीनं! त्यांनी तो त्यांच्या दूरदृष्टीचा वेध घेणाऱ्या बुद्धिकौशल्यावर विसंबून स्वीकारला होता. यादवांचा सेनापती म्हणून मी आर्यावर्तभर फिरलो. या प्रवासात ठिकठिकाणी पट्टीच्या गुरूंच्या चरणांशी बसून विविध अस्त्रं हस्तगत केलेले अनेक वीरशिरोमणी पाहिले. त्यातील एकाकडेही आमच्या द्वारकाधीशांच्या अजोड बुद्धिअस्त्रासारखं अस्त्र नव्हतं. त्यांच्या या अजेय अस्त्राचा अनुभव मी अनेकवेळा घेतला होता. त्यांच्या सर्व हालचालींत खूप-खूप विचार करूनही मला नखभरसुद्धा दोष काढता येत नव्हता. जरासंधवधाच्या अभियानात गिरिव्रजाला जाताना त्यांनी भीमार्जुनांची योग्य निवड केली होती. त्या वेळी ते निघून गेल्यानंतर मी सतत विचार करीत राहिलो की, द्वारकाधीशांनी मला समवेत का घेतल नाही? शेवटी धैर्य करून एकदा मी कृष्णदेवांनाच विचारलं, "का नाही घेतलंत आपण मला गिरिव्रजाच्या अभियानात?" तसं लुभावणारं हसत ते माझ्या डोळ्यांत क्षणभर एकटक बघत राहिले. मग काहीच न बोलता ब्रह्मकूट घातल्यासारखं म्हणाले, "सात्यकी बंधो, कळालं का मी त्या वेळी तुला समवेत का घेतलं नाही ते?"

मी पार गोंधळून गेलो. खरोखरच मला काहीही कळलेलं नव्हतं. त्यांच्या शब्दही न बोलता नुसत्या बघण्यातून कळणार तरी काय? "काहीही कळलेलं नाही. स्पष्ट सांगण्याची कृपा करावी यादवश्रेष्ठांनी!" मी म्हणालो.

तसं माझे खांदे अपार मायेनं थोपटत ते म्हणाले, "यादवसेनापती, मी गिरिव्रजाला गेलो होतो, ते तिसरा पांडव म्हणून! पांडवांच्या वतीनं तुम्हाला असं पांडव होता येणं कधीतरी शक्य आहे का? तुमच्या डोळ्यांतील अभिमानी यादव मलाच काय, कुणालाही एकटक बघितल्यावर सहज दिसेल. तुम्ही – तुम्ही कधीच पहिले वा तिसरे पांडव होऊ शकत नाही. आहात व राहाल अगदी शेवटपर्यंत पहिला नि शेवटचा यादव म्हणूनच!"

त्यानंतरच्या पांडवांच्या राजसूय यज्ञातील शिशुपालवधाच्या प्रसंगी मला

त्यांच्यातील एक आगळाच गुण दिसून आला. संयम हा तर त्यांचा अंगभूत गुण होता. शिशुपालाचे नव्याण्णव अपराध पराकोटीच्या संयमानं त्यांनी सहन केले होते. पण त्यांच्या शंभराव्या अपराधाला ते क्षमा करू शकले नाहीत. त्यांनी सुदर्शनाचं प्रक्षेपण करून अर्वाच्य बोलणारी त्याची जीभ मस्तकासह उखडून काढली, सर्वांसमक्ष! भरलेल्या यज्ञ मंडपाच्या साक्षीनं! त्यांचं ते दिव्य रूप सहन न होऊन मंडपातील यच्चयावत आमंत्रित दिपून गेले होते. दिङ्मूढ झाले होते.

मी मात्र दिपून गेलो, तो यज्ञानंतरच्या त्यांच्या झालेल्या एका दर्शनानं! इंद्रप्रस्थात त्या दिवशी यमुनेकाठी पांडवांनी दिलेल्या भोजनाच्या पंक्तीमागून कितीतरी पंक्ती उठल्या. त्या पंक्तीच्या उष्टावलेल्या पत्रावळ्या काही क्षणांपूर्वी राजसूय यज्ञाच्या अग्रपूजेचा मान लाभलेल्या सुदर्शनधारी द्वारकाधीश यादवश्रेष्ठ कृष्णदेवांनी स्वत: उचलल्या होत्या. अर्जुनाच्या नंदिघोष रथाला, स्वत:च्या गरुडध्वज रथाला हाती लाकडी नळकांडी घेऊन वंगण घालताना ओळंबलेलं आम्ही त्यांना अनेकदा पाहिलं होतं. राजसूयाच्या यज्ञमंडपात आमंत्रितांच्या उष्टया पत्रावळीही उचलताना त्यांना बघून मी केवळ थक्कच झालो होतो. खरोखरच पांडव भाग्यवान होते. द्वारकाकरांना असे कृष्णदेव कधी पाहायला मिळाले नव्हते.

श्रावणात कधी ढगाआड जाणाऱ्या, कधी सर्वांगी प्रकटून नटलेली अवघी सृष्टी उजळून टाकणाऱ्या सूर्यदेवासारखंच त्यांचं प्रत्येक दर्शन होतं. प्रत्येकाला ते त्याच्या क्षमतेप्रमाणे वेगवेगळं घडत गेलं होतं. मी झालं तरी किती म्हणून त्याच्या छटा सांगणार? एक सेनापती म्हणून माझ्या दृष्टीला त्यांचं जे-जे दर्शन घडलं, ते-ते मी स्मरेल तसं सांगतो आहे.

वीर पुरुष क्षमाशील असेलच, असं नाही. कठोरपणे ताडून बघताना आज मला जाणवतं, मीही तसा नव्हतो. यादवराज श्रीकृष्ण मात्र तसे होते. द्वारका सोडून निघून गेलेल्या मंत्री अक्रूरांना, त्यांनी सुधर्मा राजसभेच्या मंत्रिगणांत पुन्हा सामावून घेतलं होतं. स्यमंतक मणिरत्नाच्या निमित्तानं अक्रूरांच्या हातून घडलेल्या तशा अक्षम्य अपराधाला त्यांनी विशाल मनी क्षमा केली होती. त्याचवेळी मला जाणवून गेलं होतं की, आपल्या नव्या गणराज्यातील कुठल्याही माणसाठायीची गुणवत्ता वाया जाऊ द्यायला ते कधीच तयार नव्हते. राजनीती चौफेर पचविलेले ते खऱ्या अर्थानं राजनीतिज्ञ होते.

घरच्या भांडणात परक्याला हस्तक्षेप करू देणं यासारखा मूर्खपणा नाही, हे तर ते चांगलंच जाणून होते. आपल्या सौभ विमानाचा वापर करून आर्यावर्तात कालयवनाला पाचारण करणाऱ्या शाल्वाला त्यांनी कालयवनासह धडा शिकविला.

त्यांनी मनाशी धरलेल्या काही एका विशिष्ट राजकीय ध्येयाचा एक मुख्य भाग होता – हस्तिनापूरचं कुरूंचं साम्राज्य हा! जरासंधाच्या मगधांच्या राज्यानंतर हस्तिनापूरचं राज्य सर्वांत सामर्थ्यशाली होतं. त्याचा प्रमुख पाया होता, भीष्मांच्या हिमालयासारख्या उत्तुंग व त्यागी विक्रमाचा.

तसे हस्तिनापूरला कृष्णदेव फारसे गेलेच नव्हते. फार तर तीन-चार वेळा गेले असतील. द्वारकेत राहूनच त्यांनी हस्तिनापूरच्या कुरूंची खडान्खडा वार्ता उचलली होती. त्यांच्या गुप्तचर विभागाचे पथक प्रमुख कुठल्याही क्षणी आणि कुठल्याही स्थळी त्यांची भेट घेऊ शकत असत. याला अगदी राणीवशाच्या द्वीपातील त्यांच्या आठही राण्यांच्या एकांती कक्षांचाही अपवाद नसे. एखादा गुप्तचर त्यांना व बलरामदादांना

एकत्र बघून बिचकत असे. द्वारकाधीश त्याची कुचंबणा दूर करत. म्हणत, “अरे, हे आपलेच दादा आहेत. बोल निःसंकोच.” असं करण्यात त्यांचा हेतू दुहेरी असे. एक तर संकोचलेल्या गुप्तचराची कुचंबणा दूर होई आणि दुसरं म्हणजे, बलरामदादांना आपल्या बंधूंचं आपल्यावर राजनीतीपलीकडे जाऊन केवढं प्रेम आहे, याचा परस्पर प्रत्यय येई.

मलाच सुतराम माहीत नसलेल्या कुरूंच्या हस्तिनापुरातील वार्ता, यादवांचा सेनापती म्हणून माझ्या कानी घालून, ते मला थक्क करत. हस्तिनापुरातील महत्त्वाच्या सर्व राजकीय स्त्री-पुरुषांचं काटेकोर मूल्यमापन त्यांच्याजवळ तयार होतं. त्यांच्या दृष्टीनं हस्तिनापूरच्या गणराज्यातील सर्वांत महत्त्वाचे होते, ते पितामह भीष्म. त्याखालोखाल ते महत्त्व देत, ते अंगराज कर्णाला!

हस्तिनापुरातील एकेक पुरुषश्रेष्ठाविषयी ते मोजकंच, पण अगदी अचूक बोलत.

“हस्तिनापुरात सत्याची चाड आणि पारख असलेले आहेत, ते एकटे पितामह भीष्म! मात्र वृद्धत्वामुळे ते तिथे हताश झाले आहेत. हस्तिनापुरातील एकाच्याही ध्यानी येत नाही की, राखेनं झाकलेला असला, तरी अंगार विझलेला नसतो! आजही पितामह भीष्म अतुल पराक्रमी आहेत.

“सर्वांत बिकट आणि गुंतागुंतीचं मानसशास्त्र आहे, ते महाराज धृतराष्ट्रांचं. त्यांच्या ठायी आज दोन वेगवेगळे धृतराष्ट्र नांदताहेत. एक आहे, पुत्रप्रेमापोटी अंध असूनही दुर्योधनाला राज्याभिषेक झाल्याची डोळस स्वप्नं पाहणारा लालसी पिता. दुसरा आहे, वरवर राजशिष्टाचाराचं ढोंग करणारा फसवा राजा. कुरूंच्या सभागृहात एक आणि अंतःपुरी कक्षात दुसराच – अशी धृतराष्ट्रांची दोन रूपं वावरताहेत. त्यातील त्यांचं सभागृहातील वागणं गांधारनरेश शकुनीनं पूर्ण झाकोळून टाकलं आहे. अंतःपुरी कक्षातील जीवन महत्त्वाकांक्षी दुर्योधनानं वेढून टाकलं आहे. हस्तिनापुरातील कुरूंच्या वैभवी राज्याचे अधिकारी महाराज धृतराष्ट्र यांच्या स्पष्ट दोन बाहुली झाली आहेत – एक आहे शकुनीच्या हातात, दुसरं आहे दुर्योधनाच्या.

“दुर्योधन-शकुनींच्या कुटिल राजनीतीला धार चढली आहे, ती कणक या कुरूंच्या कुटिल मंत्र्याच्या बुद्धिमत्तेची.

“हे सर्व जण आपल्या प्रत्येक कृतीत कौशल्यानं ओढू बघताहेत ते महाविक्रमी अंगराज कर्णाला! त्याचा स्वसामर्थ्यावर दांडगा विश्वास आहे. भरल्या द्यूतसभागृहात द्रौपदीवर ओढविलेल्या प्रसंगामुळे या सर्वांचे मनोभाव सर्व मात्रांसह प्रकट झाले आहेत.

“कौरवांच्या स्त्रीमंडळात सर्व पुण्याई एकवटली आहे, ती राजमाता गांधारीदेवींच्या ठायी. आजवर त्यांनीच आपल्या कठोर वचनांनी महत्त्वाकांक्षी दुर्योधनाला कसंबसं आवरून धरलं आहे. महात्मा विदुर आणि संजय माझे भक्तच आहेत. ते दोघंही हस्तिनापुरात आहेत आणि तेही महत्त्वाच्या जागांवर. हेच पांडवांना न्याय देण्यासाठी काही आशास्थान आहे.”

जशी कौरवांची खडान्खडा माहिती आमच्या यादवश्रेष्टांना होती, तशी पांडवांचीही होती. राजमाता कुंतीदेवी हे त्यांच्या परमादराचं ठिकाण होतं. दूर-दूर गोकुळात मागे पडलेल्या यशोदामातेच्या ठायीच त्यांनी कुंतीदेवींना मानलं होतं. त्यांच्या ठायीच्या धैर्यशील स्त्रीविषयी तर ते भरभरून बोलत. म्हणत “सर्व-सर्व प्रतिकूलतेत आमच्या या आत्याबाईंनी आपल्या पाचही पुत्रांची जीवनकमळं फुलवून दाखविली आहेत. पाचही

पांडव वेगवेगळया गुणांचे अधिकारी आहेत. त्या सर्वांच्या सामर्थ्याची मूठ वळण्याची कळ द्रौपदीकडे आहे. पांडव हे आजचेच नव्हे, तर उद्याचेही आदर्श राहतील. असेल त्या सामर्थ्यानिशी प्रसंग पडेल तेव्हा-तेव्हा त्यांच्या पाठिंब्यात सक्रिय उभं राहिलं पाहिजे." त्यांचं असं बोलणं ऐकलं की, मला त्यांच्यातील कुशल राजनीतिज्ञ, चक्रवर्ती योद्धा याहून पलीकडचं काहीतरी त्यांच्यात जाणवू लागे.

द्वारकेतील आम्हा यादवांपैकी असा एकही जीव नव्हता की, ज्याला कृष्णदेव नावानं ओळखत नव्हते. म्हणूनच त्यांच्यासमोर कधीच कुणाचीही कसलीही बौद्धिक लटपट-खटपट चालत नसे. कधीकाळी त्यांच्या रोषाला घाबरून काशीराज्यात परागंदा झालेले अक्रूर आता द्वारकेत पुन्हा रुळले होते.

द्वारकेतील रेघन्रेघ कृष्णदेवांना तळहातावरच्या रेषांसारखी पाठ होती. कधीकाळी मथुरेत कंसानं कारागृहात आपले नवजात सहा पुत्र शिळेवर आपटून वधले, हे जीवघेणं दु:ख वसुदेवबाबा आणि देवकी माता काहीसं विसरले होते. त्यांच्या गेलेल्या सहा पुत्रांनी जिवंत राहून जे-जे सुख त्यांच्या पायाशी आणून टाकलं असतं, त्याहून केवढंतरी हिमालयाच्या उंचीचं श्रेयस एकट्या कृष्णदेवांनी त्यांच्या चरणांवर अर्पण केलं होतं.

वसुदेवबाबा आणि दोन्ही राजमाता हे राजमंडळ आता वृद्ध झाल होतं. त्यांचा बराचसा वेळ आचार्य सांदीपनी आणि पुरोहित गर्ग यांच्यासह द्वारकेत आलेल्या ऋषिमुनींच्या सहवासात आणि धार्मिक कृत्यांत जात होता. कृष्णदेवांच्या गाजत्या अकलंक कीर्तीमुळे ते भरून पावले होते. कृतार्थ झाले होते.

कीर्तीच्या वैभवी शिगेला पोहोचलेल्या द्वारकेचं खरं वैभव होतं, एका राजस्त्रीत! रुक्मिणीदेवीच आता संपन्न द्वारकेच्या महालक्ष्मी शोधत होत्या. आता सुरावर आलेल्या त्यांच्या रुक्मीदादा आणि इतर बंधूंनी कितीतरी वेळा अगत्याचा आग्रह करूनही त्या कौंडिण्यपुराकडे कधीच परतल्या नव्हत्या. आपल्या माता शुद्धमतीदेवी यांना त्यांची अधूनमधून क्षेमकुशलाची भूर्जपत्रं जात होती. उपहारतबकंही पोहोचती होत होती. त्यांची येत होती. गारुडविद्येत निष्णात असलेल्या आपल्या आकृतिकाकांना त्यांनी आग्रहानं अनेकवेळा द्वारकेत बोलावून घेतलं होतं. कृष्णदेवांशी त्यांची घटकान्घटका भेट करविली होती. प्रत्येक लहानथोरांकडून मिळेल ते कौशल्य उचलण्याची वृत्ती असलेल्या कृष्णदेवांनी या आकृतिकाकांकडून गारुडविद्याही शिकून घेतली होती.

रुक्मिणीदेवींनी आपल्या सातही भगिनींची अपत्यं आपलीच मानली होती. त्यांच्या दक्ष दृष्टीखाली कृष्णदेवांचा राणीवसा गुणवान पुत्र-कन्यांनी कसा बहरून आला होता. प्रद्युम्न, सांब, भानू, वीर, श्रुत, संग्रामजित, वृक, प्रघोष, चारुदेष्ण, सुभानू आता केवढेतरी धिप्पाड व निष्णात योद्धे झाले होते. विशेष म्हणजे ज्या कौशल्यानं रुक्मिणीदेवींनी भामादेवी आणि त्यांच्या अपत्यांना हाताळलं होतं, त्यानं त्या देवींचा स्वभावही कितीतरी निवळला होता. त्याही आता रुक्मिणीदेवींसारख्या द्वारकाकर स्त्री-पुरुषांना प्रिय झाल्या होत्या. जांबवती, भद्रा, लक्ष्मणा, कालिंदी, सत्या, मित्रविंदा या इतर देवीही जनप्रिय झाल्या होत्या. आपापल्या पुत्र-पुत्रींना द्वारकेत आलेल्या वेगवेगळया गणराज्यांचे नरेश, युवराज, ऋषिमुनी, तापस, कलाकार यांच्या डोळस सहवासात ठेवून, त्यांनी आपापले पुत्र गुणी व संस्कारशील केले होते. कृष्णदेवांच्या वंशाचा वटवृक्ष चौअंगी डवरून आला होता.

बलरामदादांचे बंधू गद, सारण, रोहिताश्वही विवाहित व संसारी झाले होते. त्यांनाही पुत्र-कन्यांची प्राप्ती झाली होती. दादांचे पुत्र निशठ आणि उल्मुक हेही आता कृष्णपुत्रांत इतके मिसळून गेले होते की, ही चुलत भावंडं आहेत, हे सांगूनही पटत नव्हतं. ते सर्वच सख्खे वाटत. रेवतीदेवींनी आपला रैवतक पर्वताचा संपर्क फारच जिव्हाळ्याचा ठेवला होता. माहेर जवळच असल्यामुळे त्या अनेक धार्मिक विधींसाठी सतत रैवतकावर जात. अलीकडे त्यांनी आपल्या पिता ककुद्मिन महाराजांच्या सूचनेनुसार एका आश्रमाचं कामही हाती घेतलं होतं रैवतक आपसात बोलत की, त्या आश्रमात प्रयागचे घोर आंगिरस मुनी येऊन राहणार आहेत. बलरामदादांचं मला जाणवलेलं सर्वांत मोठं वैशिष्टच हे होतं की, ते एकपत्नी व्रताचे अधिकारी होते. त्यामुळे एकटचा उद्धवदेवांशिवाय सर्वच यादव त्यांना दबकून असत. प्रसंगी कृष्णदेवसुद्धा!

कृष्णदेवानंतर सर्व द्वारकाकरांच्या हृदयात मानाचं स्थान होतं, ते उद्धवदेवांना. आपल्या अंगीच्या सत्त्वगुणांनी त्यांनी ते मिळविलं होतं. ते सर्व यादवांहून जन्मतःच वेगळे होते. वेगळेच दिसत, वागत बोलत. द्वारका हे यादवांच्या राजनगरीचं आर्यावर्ताच्या भूमीपासून दूर सागरजलात असलेलं द्वीप होतं. उद्धवदेव हे त्या द्वीपावरील लक्षावधी यादवांपासून दूर असलेलं एक वेगळंच मानवी द्वीप होतं. ते संन्यासी वृत्तीचे, अविवाहित व ब्रह्मचारी होते. यासाठीच त्यांचे पिता देवभाग यांनी वंशवेल चालविण्यासाठी त्यांच्या चित्रकेतू व बृहद्बल या दोन बंधूंचे विवाह करून दिले होते. त्यांच्या संसारवेलीही अपत्यांनी फुलल्या होत्या. द्वारकेतील उद्धवदेव हा एकच यादवश्रेष्ठ असा होता की, जो कृष्णदेवांसह सर्वांनाच आपला वाटे.

त्यांचा आणि रुक्मिणीदेवींचा बंधुभगिनींहून पलीकडचा भावमेळ फार लोभस होता. रुक्मिणीदेवी आपल्या बंधूंपासून माहेरापासून भावनिकदृष्टचा तुटून द्वारकेत आल्या आहेत, हे उद्धवदेवांनी चांगलं जाणलं होतं. त्या कधीच कौंडिण्यपूरला परतणार नाहीत, हे पारखलं होतं. 'मी तुम्हाला बंधूसारखाच आहे. द्वारकेत तुम्ही कौंडिण्यपुरातच असल्यासारख्या आहात.' असं कुठलंही दिखाऊ विधान न करता उद्धवदेवांनी त्यांना भरभरून आदर व बंधूचा प्रेमभाव दिला होता. माझ्या मनावर उद्धवदेवांच्या ठायीच्या या दुर्मीळ गुणांचा मोठाच प्रभाव होता. तो प्रभाव त्यांच्या तोंडून सहज बाहेर पडलेले –'जिथे-जिथे योगेश्वर श्रीकृष्ण आणि पार्थ धनुर्धर आहे, तेथे-तेथे नेहमीच धर्म आणि विजय आहे.' असे उद्गार ऐकताना वाढत जाई. रुक्मिणीदेवीही त्यांचा खूप आदर राखीत.

बलरामदादा हे एक मोठंच प्रकरण होतं! त्यांच्या विक्रमात धाक होता. तसा तो स्वभावात मात्र नव्हता. पण गंमत अशी होती, त्यांच्या मोकळ्या आणि स्पष्टवक्त्या भाबडचा स्वभावामुळे ते केव्हा आणि कुणाला धारेवर धरतील, काही सांगता येत नव्हतं. कृष्णदेवांनी तर जाणीवपूर्वक त्यांच्या स्वभावातील हा धाक, समस्त द्वारकाकरांत कौशल्यानं पेरला होता. प्रत्यक्ष द्वारकाधीश कृष्णदेवांनी आपल्या ज्येष्ठ बंधूचा आदर आणि धाक मान्य केल्यानंतर, इतर कुणालाच तो मान्य करताना काहीच प्रश्न येत नसे. कधी-कधी या दोघा बंधूंत मूलभूत मतभेदाचे कठीण प्रसंग येत. सुभद्रादेवींचा अर्जुनाशी झालेला विवाह, हे तर त्याचं ठळक उदाहरण होतं. त्यांच्या विवाहाच्या काळात हे दोन बंधू तर काही वेळा एकमेकांची दृष्टी चुकवून राजवास्तूत वावरत. या दोन बंधूंच्या मनात पडलेली दरी सांधण्याचा प्रयत्न वसुदेवबाबा आणि दोन्ही राजमाता

करून बघत. त्याला यश येतच असे, असं नाही. त्याचं कारणही होतं, बलरामदादांचा कसलीही तडजोड सरळ फेकून देणारा तडक स्वभाव!

अशा प्रत्येक प्रसंगी या दोन बंधूंत भावसेतू बनण्याचं काम केलं, ते आमच्या उद्धवदेवांनी! रुक्मिणीदेवींनीही त्यांना कौशल्यानं सहकार्य केलं. त्यातही मला जाणवलेली एक मोठीच गंमत होती. कुणाचं फारसं नसलं, तरी रुक्मिणीदेवींचं म्हणणं बलरामदादा शांतपणे ऐकून घेत.

कृष्णदेवांबरोबर इंद्रप्रस्थात जाण्याचा योग मला वारंवार आला. कधी त्यांच्याबरोबर मी असे, कधी उद्धवदेव असत. कधी-कधी आम्ही दोघेही असू. इंद्रप्रस्थाच्या प्रत्येक भेटीत पाचही पांडव बंधू मला क्रमश: उलगडत गेले. ते पाचही बंधू जन्मजात स्वभावत: वेगवेगळे होते. मात्र सर्वांच्या ठायी एकच साम्य होतं, सर्वांचाच कृष्णदेवांठायी अजोड असा भक्तिभाव होता.

पांडवांतील ज्येष्ठ युधिष्ठिर हा अनेक बऱ्या-वाईट गुणांचं किचकट मिश्रण होता. पराक्रमी होता, पण डोळ्यांत भरावा अशा विक्रमाचा अधिकारी नव्हता. त्यागी होता, पण अभिलाषीही होता. जन्मानं ज्येष्ठ होता, तसा करणीनं ज्येष्ठ होताच असं नाही. त्याच्या ज्ञानामुळे तो युधिष्ठिराचा 'धर्मराज' झाला. पण 'धर्म' त्यानं त्याचा अर्थ जाणून राबविलाच, असं काही नाही. म्हणून त्यानं अधर्म केला काय? तसंही नाही. त्यानं केला अक्षम्य अविचार – द्यूत खेळण्याचा. कधी-कधी एक गमतीदार विचार माझ्या मनी तरळून जाई. कौरवांशी क्षत्रिय म्हणून द्यूत खेळण्याचा प्रसंग माझ्या कृष्णदेवांवरच आला असता तर! त्यांनी नाना तर्क-वितर्क लढवून तो टाळला असता आणि खेळावंच लागलं असतं द्यूत तर? मला विश्वास आहे, ते त्यात कधीच हरले नसते!!

इंद्रप्रस्थात कधी-कधी मला तीव्रपणे स्पर्शून जाई की, इथल्या राजसिंहासनावर युधिष्ठिराऐवजी भीमसेन असता तर? अर्जुन असता तर? कसं झालं असतं इंद्रप्रस्थाचं राज्य आणि तेथील नगरजनांचं जीवन? सर्व पांडवांचं जीवन?

पांडवांकडील क्रमांक दोनचा पांडव भीमसेन आम्हा यादवांकडील बलरामदादांसारखा होता. जरासंधाच्या वधासारखा भीमसेनाचा पराक्रम डोळे दिपविणारा होता. त्याचा पराक्रम वेळोवेळी अनेकांनी मान्यही केला. भीमसेन नुसताच महापराक्रमी नव्हता, तो विचारी व बुद्धिमानही होता. झालं एवढंच की, त्यानं आपलं शरीरसामर्थ्य वेळोवेळी प्रकट केलं; त्या मानानं बुद्धीचं नाही. सर्व मात्रांसह भीमसेनानं ते प्रकट केलं असतं तर? झाला असता काय त्याचा कृष्णदेव? मुळीच नाही! कृष्णदेवांच्या एकमेव व अतुल श्रेष्ठत्वाकडे असे कधी 'नेति नेति' मार्गानं, तर कधी 'अस्ति अस्ति' मार्गानं जाणंच भाग होतं. तरीही ते श्रेष्ठत्व कुणालाच संपूर्ण गवसलं नव्हतं. लाक्षागृहात वनवासात कुंतीमातेशी भीमसेन जे-जे बोलला, ते बोलणं त्याच्या बुद्धिमत्तेचा प्रत्यय देतं. पांडवांच्या अखंड जीवनप्रवासातील भीमसेनाच्या पराक्रमाचं त्यांना लाभलेलं बळकट कवच फार मोलाचं होतं. पांडवांत भीमसेन नाही, ही कल्पना करून बघावी. ते केवढ्या अडचणीत आले असते, हे अनेकदा मला तरी स्पष्ट झालं होतं. भीमसेनाचं मला जाणवलेलं वैशिष्टच हे होतं की, त्यानं आपण आपल्या बंधूंचं कवच आहोत, असं स्वमुखानं कधीच म्हटलं नाही. द्रौपदीला भीमसेनाचाच नेहमी आधार वाटला. भीमसेनाची ही गुणवत्ता ध्यानी घेऊन एकदा मी कृष्णदेवांना प्रश्न केला की, "तसाच प्रसंग आला तर भविष्यात पांडवांचं सेनापतीपद पत्करण्यास भीमसेन आपणाला योग्य

वाटेल, की नाही?"

माझ्या या अनपेक्षित प्रश्नानं जराही गोंधळून न जाता त्यांनी अगदी सहज लागलीच हसत उत्तर दिलं होतं, "भीमसेन कुठल्याही सेनेचा सेनापती होण्यास सर्वार्थानं योग्य आहे. तसा प्रसंग आलाच, तर मी मात्र तसं मुळीच करणार नाही! कारण भीमसेनाचा विक्रम फुलविणं जेवढं कठीण आहे, त्याहून अधिक एकदा फुललेला भीमसेन पुन्हा आवरणं अवघड आहे. भीमसेन समरांगणात प्रबळ व अनावर पराक्रमी होतो, यालाही एक कारण आहे. त्याला पांडवांच्या न्याय्य अधिकाराविषयी, पत्नी द्रौपदीविषयी, माता कुंतीदेवीविषयी जे-जे म्हणायचं आहे, ते-ते त्याच्या सुप्त मनात तसंच पडून राहातं. त्याचा हा दबलेला मनोभावच अक्राळविक्राळ रूप घेऊन, समरांगणात पराक्रमाच्या रूपानं प्रकट होतो."

"मग त्याला आवरण्याचं सामर्थ्य कुणातच नाही काय?" मी कृष्णदेवांना प्रश्न विचारी. ते म्हणत, "तसंच काही नाही. भीमसेनाचाही सर्वांत मोठा गुणविशेष आहे, तो त्याची मातृभक्ती. पण त्याच्या आणि युधिष्ठिराच्या मातृभक्तीत फार अंतर आहे. युधिष्ठिराच्या मातृभक्तीला तो वयानं ज्येष्ठ असल्यामुळे आज्ञाधारकपणाची एक सूक्ष्म झाक आहे. भीमाचं मातृप्रेम निस्सीम आहे. सहजस्फूर्त आहे. कुंतीमातेनं 'थांब' म्हटल्यानंतर तो कधीच पुढे जाणार नाही. दुसरा त्याला थांब म्हणू शकतो, तो केवळ मी. मात्र मी तर समरांगणात निःशस्त्र आहे. त्याचा सारथीही नाही – आणि खरं सांगू तुम्हाला सेनापती, भीमसेन पांडवांचा सेनापती न होता अनावर विक्रमी व्हावा, अशीच माझी इच्छा आहे. दायित्वामुळे सेनापतीच्या विक्रमाला मर्यादा पडतात."

माझा पुढचा प्रश्न असे, "मग इंद्रप्रस्थातील असंख्य पांडवसैनिकांचा सेनापती उरतो, तो धनुर्धर अर्जुन! त्याच्याविषयी आपलं काय मत?" माझा प्रश्न ऐकून ते नेहमीचं निर्मळ निकोप हसत. माझ्याजवळ येत आपला – लांबसडक बोटांचा हात माझ्या खांद्यावर ठेवून म्हणत, सात्यकी, "अर्जुन मला सर्वांत प्रिय आहे. त्याची अनेक कारणं आहेत – पांडवांचा, इंद्रप्रस्थाचा, इतकंच काय; पण द्वारकेसह सर्व जगाचा मला अर्जुनाशिवाय विचार करताच येत नाही. तो नावाप्रमाणे केवळ सव्यसाची म्हणजे दोन्ही हातांनी सर्व शंस्त्र चालविणाराच नाही, तर सर्वांगानी बुद्धी हे सर्वश्रेष्ठ शस्त्र चालविणारा सावध व नम्र असा शिष्यही आहे. त्याच्यातील हा कधीच न संपणारा शिष्यभाव मला मनापासून आवडतो. म्हणूनच मला सर्वांशी जे बोलायचं आहे, ते त्याला सर्वांचा प्रतिनिधी मानून मी एकट्या अर्जुनाशीच बोलतो. ज्ञान हे देण्यानं वाढतं, हे चांगलं समजणारा तो नरोत्तम आहे. त्यातही दुर्मीळ असा नम्र व विनयीही आहे. त्यांच्या अर्जुनविषयक या बोलण्यातून त्यांनी कटाक्षानं स्वतः एक नारायण आहोत, हे सांगणं कौशल्यानं टाळलेलं असे. मला मात्र तेच प्रकर्षानं स्पर्शून जाई आणि जाणीव होई, अर्जुन हीसुद्धा कृष्णदेवांची सावलीच आहे."

मग मी कृष्णदेवांना अर्जुनाविषयीच नाना प्रकारांनी विचारून घेई. मलाही पटून जाई की, देवांचं नेतृत्व जसं सेनापती स्कंदानं करणं योग्य होतं, तसंच पांडव, यादव आणि कौरव तिघांचंही सेनापत्य धनुर्धर अर्जुनच निर्दोष करू शकला असता. अर्जुनाची योग्यता एका समर्थ नारायणाला – कृष्णदेवांना सर्वोत्तम नर म्हणून पटली होती, हेच त्याचं मी केलेलं मूल्यमापन मला निर्दोष वाटे.

तरीही राहिलेल्या दोन पांडवबंधूंविषयी अधिक कृष्णदेवांकडूनच जाणून घ्यावं, असं

मला वाटे. मी त्यांना विचारीत असे, “माद्रेय नकुल-सहदेवाविषयी काय वाटतं आपणाला?” इथंही माझ्या प्रश्नातील मला नकळतच सवयीनं सुटलेली एक गोष्ट प्रथम व्यवस्थित करून घेत ते म्हणत, “सात्यकी, ते केवळ माद्रेय नाहीत, कौंतेयही आहेत. दोघेही जुळे बंधू आहेत. दोघेही अश्वचिकित्सक आहेत. त्यातील नकुल आपल्या प्रद्युम्नासारखा अप्रतिम सुंदर, म्हणून आकर्षक आहे. त्या दोघा बंधूंचं जोडअस्तित्वच नेहमी विचारात घ्यावं लागतं – कारण त्यांचा जन्मच जोडीचा आहे. त्या दोघांचं जसं जोडअस्तित्व आहे, तसंच त्यांचं उरलेल्या तीन पांडव बंधूंशीही जोडअस्तित्व आहे. सामान्यांच्या दृष्टीतून हे दुसरं जोडअस्तित्व निसटून जातं. मग ते नकुल-सहदेवांना पांडवांपासून वेगळं करण्यासाठी नकळत ‘माद्रेय’ म्हणतात. बारकाव्यानं पाहिलं तरच ध्यानी येईल की, कुंतीआत्यानं हेच अचूक हेरून पाचही बंधूंवर ‘पांडव’ म्हणून सारखेच संस्कार केले आहेत – कौंतेय किंवा माद्रेय असे केलेले नाहीत!”

कुंतीमातेचा विषय निघाला की, द्वारकाधीश मी कसलाही प्रश्न न विचारता नुसते भरभरून बोलू लागत. कृष्णदेवांना दोन माता आहेत, हे जगाला माहीतच होतं, त्यांची जन्मदात्री माता देवकीदेवी आणि पालनकर्ती माता यशोदादेवी. फारच थोड्यांना हे जाणवून गेलं होतं की, कुंतीदेवी या त्यांच्या तिसऱ्या माताच होत्या. भावमाता! कृष्णदेव त्यांचे भाचे तर होतेच, पण त्या स्वत: कृष्णदेवांच्या निरपेक्ष भक्तही होत्या. त्या त्यांना नेहमी म्हणत, “कृष्णा, मला संकटाशिवाय ठेवू नकोस. ते असलं की, मला तुझी हटकून आठवण होते. ते नसल्यामुळे – सदैव सुखात असल्यामुळेच तुझ्या इतर आत्या तुला विसरल्या, हे मी विसरू शकत नाही. काहींचे पुत्र तर चक्क तुझ्या विरोधात गेले. एकवेळ उभं जग माझ्या पाठीशी नसलं तरी चालेल, पण तुझी कृपा माझ्या व पुत्रांच्या पाठीशी सदैव असली पाहिजे.”

जशा कृष्णदेवांना तीन माता होत्या, तशाच तीन भगिनीही होत्या! ते आणि उद्धवदेव सांगत आले तसं कृष्णदेवांना गोकुळातील नंदबाबा आणि यशोदादेवी यांची कन्या एकानंगा, ही त्यांची प्रथमभगिनी. द्वारकेतील सुभद्रादेवी ही तर बलरामदादा आणि कृष्णदेव या दोन ज्येष्ठ यादवांची प्रिय भगिनी असल्यामुळे विख्यातच होती. तिसरी भगिनी होती द्रौपदीदेवी. तिचं भाग्य पहिल्या दोन भगिनींपेक्षा अधिकच होतं. ती नुसती भगिनी नव्हती, कृष्णदेवांची ती परमप्रिय सखीही झाली होती. जे कुठल्याच स्त्रीला मिळालं नाही, ते भाग्य तिला लाभलं होतं. पाच नरोत्तमांची पत्नी होण्याचं आणि एका नारायणाची प्रिय सखी – भगिनी होण्याचं! या त्यांच्या भाग्यामुळेच माझ्या मनात द्रौपदीदेवींविषयी पांडवमातेएवढाच नितांत आदर होता.

असा पांडवांचा, त्यांच्या इतर स्त्रियांचा, हस्तिनापूरच्या कुरूंचा, त्यांच्या स्त्रियांचा आणि द्वारकेतील आम्हा यादवांचा आणि स्त्रियांचा मी विचार करायला लागलो की, एकाहून अनेक विलोभनीय पैलू स्पष्ट होत जात, ते कृष्णदेवांचे! या सर्व स्त्री-पुरुषांच्या केंद्रस्थानी तर तेच होते. खरोखरच त्यांच्या वक्षावर रुळणाऱ्या मोतीकंठ्यातील नाना छटा बाहेर फेकणाऱ्या कौस्तुभमण्यासारखंच त्यांचं जीवन होतं. ते मस्तकी धारण करीत आलेल्या मोरपिसाच्या नाना रंगच्छटांसारखंच त्यांचं जीवन होतं – विविधरंगी!

हस्तिनापूर, इंद्रप्रस्थ आणि द्वारका या तीन शक्तिकेंद्रांच्या ठिकाणी वावरणाऱ्या नानाविध स्त्री-पुरुषांना, द्वारकाधीशांच्या जीवनात एक विशिष्ट प्रकारचं स्थान लाभलं होतं. तसंच स्थान द्वारकेच्या राजवास्तूतील एका वस्तूलाही लाभलं होतं. ती वस्तू आता

जशी काही एक जिवंत व्यक्तीच झाली होती. तो होता यादवांच्या राजवास्तूतील श्रीसोपान! जेवढं द्वारकेवर होतं, तेवढंच द्वारकाधीशांचं या श्रीसोपानावर प्रेम होतं. द्वारकेच्या निर्माणात त्यांनी जेवढं लक्ष घातलं होतं, तसंच त्यांनी या श्रीसोपानाच्या व्यवस्थेत वेळोवेळी आस्थेनं लक्ष घातलं होतं. त्याच्या प्रशस्त सुवर्णी पायदंडच्या आता कितीतरी वाढल्या होत्या. खालच्या विस्तृत कक्षापासून वरच्या विश्रामकक्षापर्यंत तो कितीतरी उंच नि भव्य झाला होता. जवळ-जवळ तीन वाव रुंदीचा, कितीतरी उंच व अनेक झळझळीत सुवर्णी पायदंडच्यांचा तो प्रशस्त सोपान, सर्व यादवांसाठी एका आदरणीय कुलपुरुषासारखा वंदनीय झाला होता. त्याच्या दोन्हीही कठडच्यांच्या खालच्या प्रारंभीच्या मुखावर दोन भरगच्च आयाळीच्या, जबडा पसरून गर्जना करणाऱ्या सामर्थ्यदर्शक सुवर्णी सिंहमुद्रा होत्या.

आताशा ते घटकान्‌घटका द्वारकेच्या पश्चिमेच्या ऐंद्र महाद्वारालगतच्या पाषाणी खोबणीवर बसत. बऱ्याच वेळा त्यांच्यासमवेत उद्धवदेव, दारुक असत. अमात्य विपृथू, शिनी, अवगाह कृतवर्मन् असे वेगवेगळे योद्धे असत. मी मात्र प्रत्येक वेळी हटकून असेच असे. समोरच्या फेसाळत्या आणि भरतीच्या पश्चिम सागराच्या अविरत लाटांकडे एकटक बघत ते मला म्हणत, “सेनापती सात्यकी, मानवी जीवनसुद्धा या सागरासारखंच आहे. तो जसा क्षणभरही स्थिर राहू शकत नाही, तसंच हे जीवन आहे. क्षणाक्षणाला परिवर्तन, हाच त्याचा गुणधर्म आहे.” अशा वेळी मी काहीच न बोलता त्यांचं नुसतंच तन्मयतेनं ऐकत राही. मन लावून प्राणपूर्वक ऐकावं, असंच त्यांचं अलीकडचं बोलणं होतं, ते कितीही ऐकलं, तरी तृप्ती काही होत नसे.

या बोलण्यात सेनापती म्हणून त्यांनी मला एकदा प्रश्न घातला, “कवचकुंडलं दान केलेल्या दिग्विजयी, महारथी कर्णाचं तुम्हाला कुरुसेनेत नेमकं कोणतं स्थान वाटतं, सेनापती?”

“कवचकुंडलं दानानंतर सूतपुत्र कर्णानं महेंद्र पर्वतावर जाऊन भगवान परशुरामांच्याकडून ‘ब्रह्म’ या दिव्य अस्त्राची प्राप्ती करून घेतली आहे. मात्र शुभदा नावाची एक सुलक्षणी गाय अनवधानानं मृगयेच्या वेळी त्याच्याकडून बाणानं मारली गेली आहे. त्यामुळे भगवान परशुरामांच्या महेंद्र पर्वतावरच त्या गाईच्या पालक ब्राह्मणानं त्या दानवीराला एक मर्मभेदी शाप दिला आहे –‘नेमक्या युद्धसमयी तुझं रथचक्र धरतीमाता गिळेल. जसं तू या गाईला मारून माझा आश्रम गिळला आहेस, तसं.’ ‘तुला नेमक्या युद्धसमयी ब्रह्मास्त्र स्मरणार नाही’ असा शाप त्याच्या गुरुदेव परशुरामांनी ब्रह्मास्त्रप्राप्तीनंतर त्याला दिलेला आहे. त्याला कारणही अस्त्रप्राप्तीसाठी आपल्या जन्माची ज्ञाती सांगताना कर्ण असत्य बोलला, हे घडलेलं आहे. आजचा कर्ण हा कवचकुंडलहीन, शापदग्ध असा, नखं काढलेल्या वनराज सिंहासारखाच आहे. माझ्या दृष्टीनं कुरूंच्या सेनाबळात त्याला फारसं महत्त्व नाही.” मी मला सेनापती म्हणून माहीत होती, ती कर्णासंबंधीची इत्थंभूत वार्ता त्यांच्यासमोर ठेवली.

एकदा पश्चिम सागराकडे आणि एकदा माझ्याकडे बघून हसत ते म्हणाले, “सेनापती सात्यकी, चुकताय तुम्ही! भरती-ओहोटीचं बंधन असलं तरी समोरचा सागर कधीतरी बलहीन मानता येईल का? कुरुसेनेत कर्ण असाच आहे. कौरवांनी आपला सेनापती म्हणून त्याचीच निवड केली तर? तर पांडवांना ते फारच जड जाणार आहे. म्हणूनच पांडवांना

त्यांचे सर्व न्याय्य अधिकार शांततापूर्ण मार्गानं मिळावेत, अशी सर्व खटपट मी करणार आहे. त्यासाठी शिष्टाईचं बोलणंही मला – हस्तिनापुरात जाऊन करावं लागणार आहे. माझ्या त्या भेटीत माझे विश्वासू संरक्षक म्हणून सात्यकी, तुम्ही तुमच्या प्राणकुर्वंडी पथकांसह सोबत असलं पाहिजे. मी सांगतो तुम्हाला, स्वभावाप्रमाणे माझी शिष्टाई दुर्योधन मुळीच मानणार नाही. उलट तो माझाच काही घातपात करण्याची दाट शक्यता आहे. यापूर्वी मी निपटलेले उद्धत, बलशाली, मदांध नरोत्तम काहीच नव्हेत, असा दुर्योधन आहे. गाठ त्याच्याशी पडणार आहे. प्रसंग पडलाच, तर पुढे ती घट्ट आवळली जाणार आहे. तिचं रूपांतर कशात होईल, आत्ताच सांगता येत नाही."

त्यांच्या मनी काय काय चाललं असावं, याचा आताशा कुठे मला अंधूकसा माग लागला.

उपप्लाव्याहून युधिष्ठिराचा संदेश घेऊन विशेष राजदूत द्वारकेत येऊन थडकला.

अज्ञातवासातून प्रकट झालेल्या पांडवश्रेष्ठ युधिष्ठिराच्या इच्छेप्रमाणे द्वारकाधीश उपप्लाव्याकडे जायला निघाले. ठरल्याप्रमाणे मी निवडक प्राणकुर्वंडी योद्ध्यांच्या पथकांसह सोबत होतो. उपप्लाव्य इंद्रप्रस्थाच्या दक्षिण सीमेवरचं आणि हस्तिनापूरच्या पश्चिम सीमेवरचं मत्स्यराज्यातील नगर! आता द्वारका ते इंद्रप्रस्थ हा मार्ग अनेकवेळा पायतळी घातल्यामुले आम्हाला तोंडपाठच झाला होता. ठरलेले पडाव टाकत, आमचं मोजक्याच यादवसैनिकांचं पथक कृष्णदेवांसह उपप्लाव्यात आलं. इथे येताच द्वारकाधीशांनी प्रथम पांडवपुरोहित धौम्य आणि आमचे गर्गमुनी यांना हस्तिनापुराकडे धाडलं. आपली कामं करून ते उपप्लाव्याला परत आले. पाठोपाठ हस्तिनापूरचे राजमंत्री संजय उपप्लाव्यात येऊन थडकले. त्यांनी महाराज धृतराष्ट्रांचा पांडवश्रेष्ठ युधिष्ठिरांसाठी समजावणीचा संदेश आणला होता. उपप्लाव्याच्या बैठकीत संजय यांनी तो पाचही पांडव, द्रौपदीदेवी, कुंतीमाता यांच्यासमक्ष कृष्णदेवांच्या कानी घातला. कृष्णभक्त असल्यामुळे मनावर पाषाण ठेवूनच संजयांनी अत्यंत पडेल शब्दांत सर्वांना तो ऐकविला. उदारहृदयी महाराज धृतराष्ट्रांच्या आपल्या नुकत्याच बारा वर्षांचा वनवास व एक वर्षाचा अज्ञातवास संपवून प्रकटलेल्या पुतण्यांसाठी निर्दय व निर्मम संदेश होता – तो होता मात्र वरवरच्या फसव्या मधाळ, राजकीय भाषेत! 'पांडवांना वनाचा सराव आहे. भिक्षेची त्यांना सवय आहे. त्यांनी यापुढचं जीवन भिक्षा मागून, परमेश्वराचं चिंतन करीत वनात आनंदात घालवावं. हस्तिनापुरात येण्याचे कष्ट घेऊ नयेत!'

तो ढोंगी व अवमानकारक संदेश ऐकून पांडवपत्नी द्रौपदीदेवी स्वभावाप्रमाणेच खवळल्या. त्या स्पष्ट शब्दांत तडक म्हणाल्या, "आम्ही भिक्षा मागू की मागायला लावू, हे ठरविणारे हस्तिनापूरकर कोण?"

कृष्णभक्त असलेल्या संजयांविषयी कुंतीमातांच्या मनी आदर होता. आपल्या स्नुषेचं तडक उत्तर थोडंसं सौम्य करीत त्या म्हणाल्या, "संजय, आम्ही कुरूंच्याकडे भिक्षा मागत नाही. मागतो आहोत, तो न्याय. आम्ही हस्तिनापुरचं राज्य मागितलं, तरी ते विश्वस्त म्हणून सांभाळायला दिलेल्या महाराज धृतराष्ट्रांनी परत करणं कर्तव्याचं आहे. सर्व अटी पाळून माझ्या पुत्रांनी एक तप वनवास आणि एक संवत्सर अज्ञातवास कंठलेला आहे. आता ठरलेल्या अटीप्रमाणे त्यांनी माझ्या पुत्रांचा अधिकार गौरवपूर्वक त्यांना परत करावा. त्यात त्यांच्या राज्याची आणि माझ्या पुत्रांची अस्मिता सुरक्षित राहील."

कृष्णदेवांनी मात्र आपल्या भक्ताला सांगावा, अशा भाषेतच संजयाकरवी धृतराष्ट्रांना संदेश पाठविला. तो होता, 'भिक्षाच मागायची झाली, तर आम्ही तिचा प्रारंभ हस्तिनापुरापासूनच करू. हे कुरुमंत्री संजय, मीच शिष्टाईसाठी हस्तिनापुरी येतो आहे, हे कुरुश्रेष्ठांच्या कानी घालणे.'

उपप्लाव्याल कुरुमंत्री संजय निघून गेले. लागलीच पांडवांची एक तातडीची बैठक कार्तिक शुद्ध चतुर्दशीला कृष्णदेवांनी बोलविली. मूळ प्रश्नालाच हात घालीत त्यांनी सर्व पांडवांना ऐकविलं, "बंधूंनो, तुमच्या वतीनं तुमच्या न्याय्य अधिकारांची मागणी कुरूंच्या प्राचीन राजसभेत मी घालणार आहे. मी जे काही बोलेन, ते तुमच्या हिताचंच असेल. तरीही स्पष्टच विचारतो आहे माझ्या या शिष्टाईसाठी जाण्याला तुमची पत्नी व मातेसह सर्वांची संपूर्णत: विनाअट संमती आहे का? मी बोलेन त्या प्रत्येक शब्दाला तुमची संमती आहे का?"

ते ऐकून सर्व पांडव काही वेळ एकमेकांत कुजबुजले. द्रौपदीदेवी व कुंतीमाता यांच्याशी दबक्या आवाजात काही बोलले. लागलीच त्यांनी एकमतानं निर्णय घेतला. तो युधिष्ठिर व कुंतीमातेच्या तोंडून ऐकविला. पांडवश्रेष्ठ युधिष्ठिर म्हणाले, "श्रीकृष्णा, तू करशील ती शिष्टाई आम्हा सर्वांना मान्य आहे."

आपल्या वचनात वाढविलेल्या ज्येष्ठ पुत्राला संमती देत कुंतीमाता म्हणाल्या, "कृष्णा, माझा ठाम विश्वास आहे, जिकडे तू आहेस, तिकडेच धर्म आणि विजय आहे. तू जे काही करशील ते सदैव योग्यच असेल. माझे पुत्र, स्नुषा आणि मी तुला कुरूंच्या राजसभेत आमच्या वतीनं योग्य वाटेल, ते सर्व बोलण्याचा अधिकार देत आहोत."

कार्तिकी पौर्णिमेचा दिवस धुक्याचं पटल फाडीत उजाडला! हस्तिनापूरच्या पश्चिम महाद्वारातून मी, कृष्णदेव आणि दारुक यादवसेनेच्या निवडक प्राणकुर्वंडी पथकांसह कुरूंच्या राजनगरीत प्रवेशलो.

आज हस्तिनापूरकरांना फार दिवसांनी कृष्णदेवांचं दर्शन घडणार होतं. त्यामुळे सगळं नगर कसं उत्साहानं आणि चैतन्यानं मुसमुसलं होतं. आम्ही काही एकदमच कुरूंच्या राजसभेत प्रवेशणार नव्हतो. गंगेकाठच्या वृकस्थल या हस्तिनापूरच्या उपनगरात आमचा एक पडाव पडला. इथे कृष्णदेवांचा एक भक्त होता. तो विदुरांचाही स्नेही होता. त्याच्याकडे रात्रीची भोजनं झाली. आमच्या इतर पथकांची व्यवस्था महामंत्री विदुरांनी केली होती.

कार्तिक वद्य प्रतिपदेचा दिवस उजाडला. आम्ही वृकस्थलात आल्याची अग्रवार्ता राजनगरात पोहोचली होती. आज कृष्णदेव नेहमीप्रमाणे ब्राह्मी मुहूर्तावर उठले होते. करदर्शन, स्नान, संध्या, गोदर्शन, गुरुस्मरण, पूर्वजांना तर्पण, पुरश्चरण, दानं अशी आपली अन्हिकं त्यांनी आटोपली. उपनगर ते राजनगर हा सर्व मार्ग उत्साही हस्तिनापूरकर नगरजनांनी सजवून काढून एकच करून टाकला होता.

द्वारकाधीशांच्या स्वागतासाठी पितामह, विदुर, मंत्री संजय, अमात्य वृषवर्मा आणि आचार्य द्रोण वृकस्थलात आले. सोबत अंगराज कर्णासह गुरुपुत्र अश्वत्थामाही होता.

दोन्ही हात पसरून शुभ्र दाढीधारी पितामहांनी 'वासुदेवा' म्हणत कृष्णदेवांना दृढ आलिंगनात घेतलं. इतर तिघांनीही त्यांचं क्षेमकुशल विचारलं. 'प्रणाम यादवराज'

म्हणत कर्णानं कृष्णदेवांचा सरळ चरणस्पर्श घेतला. 'जयतु कर्ण' असं कृष्णदेव हळुवार पुटपुटल्याचं मी स्पष्ट ऐकलं.

आम्ही चौघं – कृष्णदेव, मी, ब्रह्मगार्ग्य आणि दारुक गरुडध्वजावर आरूढ झालो. कृष्णदेवांनी आपल्या उजव्या हाताशी घेतलेले उंचशील पितामह भीष्मही एकटेच आमच्या रथात होते. दारुकानं आमचा रथ हाकारला. पाठोपाठ रथांची आणि सशस्त्र पथकांची रांग लागली. कृष्णदेवांची शिष्टाईयात्रा हस्तिनापुरात सुरू झाली. हस्तिनापूरचे नगरजन त्यांच्या नावाचा जयघोष करीत, वाद्यांच्या गजरात भक्तीनं त्यांच्यावर सुगंधी पुष्पांचा आणि कुंकुमाचा अविरत वर्षाव करू लागले.

दोन्ही हात जोडून सुहास्यवदनानं कृष्णदेव हस्तिनापूरकरांच्या प्रेमाचा स्वीकार करू लागले. सारथी दारुकाची वस्त्रंही कुंकुमानं माखून गेली. त्याला आपला गरुडध्वज रथ नीट हाकताही येईना, कारण घोड्यांचे डोळे कुंकुमानं भरून गेले. अर्ध्या-एक घटिकेच्या अवधीत आमचा गरुडध्वज रथ, काही हातच पुढे सरकू शकत होता. सूर्यदेव जसजसे चढू लागले, तसतसं कृष्णदेवांच्या स्वागतघोषांना पुरतं उधाण आलं.

माझ्या स्वामींच्या – कृष्णदेवांच्या दर्शनासाठी आणि स्वागतासाठी आला नव्हता, तो एकटा दुर्योधन! – तो आला नव्हता, म्हणून शकुनीही आला नव्हता. दोघांचे बंधूही आले नव्हते. ते सगळेच दुर्दैवी होते झालं!

दोन प्रहराच्या रसरसत्या उन्हात दारुकानं गरुडध्वज हस्तिनापूरच्या पुरातन राजवास्तूच्या महाद्वारात आणून उभा केला. सर्वांगावरील साचलेलं कुंकुम झटकत, उत्तरीय सावरीत माझे कृष्णदेव हसतच शांतपणे रथातून खाली उतरले. तशा कुरूंच्या राजस्त्रिया पंचारती घेऊन सामोऱ्या आल्या. त्यात अग्रभागी राजमाता गांधारीदेवी, दुर्योधनपत्नी भानुमतीदेवी, कर्णपत्नी वृषालीदेवी, विदुरपत्नी पारसवीदेवी, माहेरी आलेल्या दु:शलादेवी, अमात्य वृषवर्मापत्नी, द्रोणपत्नी कृपीदेवी अशा प्रमुख होत्या.

राजवास्तूच्या कळसावरच्या कुरूंच्या त्रिकोणी भगव्या राजध्वजाकडे पाहत, काहीतरी पुटपुटत कृष्णदेवांनी महाद्वाराचा उंबरठा ओलांडला. कुणीतरी दबक्या स्वरात म्हणालं, 'राजवास्तू आज पावन झाली!' मी दृष्टी रोखून तिकडे पाहिलं. ते होते महात्मा व थोर कृष्णभक्त विदुर!

सर्वांसह कृष्णदेव कुरुश्रेष्ठ धृतराष्ट्रांच्या कक्षात आले. द्वारापर्यंत पुढे आलेले अंध महाराज धृतराष्ट्र लटक्या वाणीत हात जोडून म्हणाले, "यांव द्वारकाधीश. हस्तिनापुरात आपलं स्वागत आहे."

अंगभूत संस्कारांनी आणि विनयानं वाकून कृष्णदेवांनी त्यांची चरणधूली घेतली. त्यांचे दोन्ही हात ओंजळीत घेत द्वारकाधीश म्हणाले, "महाराज, मला इतरत्र कुठंच येण्याची इच्छा नाही. सरळ सभागृहातच जाऊ या."

"चला यादवराज." त्यांनीही अनुमती दिली.

सर्व कुरुयोद्ध्यांसह आम्ही सभागृहाकडे निघालो. कुरूंचा त्या प्रशस्त राजवास्तूच्या पायदंड्या चढताना ते एकीवर थांबले. मी त्यांच्या पाठोपाठच होतो. नकळतच एकेक पायदंडी मोजत चाललो होतो. मला प्रकर्षानं आठवण झाली, ती द्वारकेतील आमच्या वंदनीय 'श्रीसोपानाची!' इथं आम्ही आलो, ती नेमकी पायदंडी होती एकशेपाचावी! क्षणभर तिच्यावर थांबून कृष्णदेवांनी पितामह भीष्मांशेजारी असलेल्या अंगराज कर्णावर हसत एक कटाक्ष टाकला आणि शेवटच्या एकशेसहाव्या पायदंडीवर पाय ठेवला!

कुरूंच्या राजसभागृहात शिरताच कृष्णदेवांनी त्या पुरात न कीर्तिवंत सिंहासनाला मान नमवून प्रणाम केला. कुरुअमात्य वृषवर्मांनी दाखविलेल्या आसनावर ते शांतपणे विराजमान झाले. पाठोपाठ सर्वांनी आपापली आसनं घेतली. महाराज धृतराष्ट्र आणि महाराणी गांधारीदेवी राजसिंहासनावर स्थानापन्न झाले. ही निर्वाणीची – कदाचित शेवटचीच ठरावी, अशी राजसभा होती.

कुरुअमात्य वृषवर्मांनी राजदंड उंचावून सभेचं प्रयोजन सांगितलं. कृष्णदेवांचं आपल्या रसभरित वाणीत स्वागत करून ते म्हणाले, "आता यादवराज भगवान श्रीकृष्ण आपल्या आगमनाचं प्रयोजन स्वतःच सांगतील. सर्व कुरूंनी त्याचा शांतपणे विचार करावा. समय निर्वाणीचा आहे! अटीतटीचा आहे!"

उत्तरीय सावरीत कृष्णदेव आसनावरून शांतपणे उठले! त्यांच्या उत्तरीयाच्या सुरकुत्यांत साचलेलं कुंकुम त्यांच्या त्या बारीकशा हालचालीनंही पीतांबरावरून ओघळलं. खालच्या पायघडीवर पडलं. कणीदार भेदक स्वरात आम्हा यादवांचं पिढ्यापिढ्यांचं श्रेयस बोलू लागलं. त्यांचे दीर्घ गुलाबी ओठ फडफडले. भेदक मत्स्यनेत्र सभागृहाचा वेध घेत शांत फिरले. "पितामह भीष्म, महाराज धृतराष्ट्र, महाराणी गांधारीदेवी, दिग्विजयी कर्ण, आचार्य द्रोण-कृप, महात्मा विदुर, गुरुपुत्र अश्वत्थामा गांधारनरेश शकुनी, अमात्य वृषवर्मा, कुशल राजनीतिज्ञ कणक, दुःशासन आणि दुर्योधन! इथे उपस्थित असलेल्या समस्त कुरुयोद्धयांनो, हस्तिनापूरकर समस्त स्त्री-पुरुष नगरजनहो! मी यादवराज म्हणून आज तुमच्या राजनगराला आलेलो नाही. पांडवांचा मामेबंधू म्हणूनही आलेलो नाही! द्वारकाधीश श्रीकृष्ण म्हणून तर नाहीच नाही. एका न्याय्य पक्षाचा कैवारी म्हणून या पुरातन राजसिंहासनाकडे आज न्याय मागण्यासाठी मी आलो आहे. कारण या सिंहासनाची ख्यातीच न्यायदानासाठी अखिल आर्यावर्तात तळपते आहे!

"आजपर्यंत पांडवांच्या सहनशीलतेची सत्त्वपरीक्षा तुम्ही मर्यादेपलीकडे ताणली आहे. राजमाता कुंतीदेवींसह पांडवांना लाक्षागृहात दग्ध करण्याचं युद्धशास्त्र आपणाला कुणी शिकवलं, हे ज्येष्ठ कौरवराज दुर्योधन आज मला समजावून सांगेल काय? पितृछत्र हरवलेल्या पांडवांना खांडववनाचं घनदाट काटेरी लतावृक्षांनी दाटलेलं रानश्वापदानीं आपल्या डरकाळ्यांच्या गर्जनांनी दणाणून सोडलेलं लोकविलक्षण राज्य देणारे शकुनीमामा, आपल्या राज्याची – गांधार देशाची राजनगरी सोडून, मी त्यांना दंडकारण्याचं राज्य दिलं, तर तिथे जाऊन नव्यानं राजनगर वसवून दाखवतील काय? माझं द्वारकेचं राज्य पणाला लावून मी आज द्यूत खेळायला बसलो तर? आज माझ्याशी खेळतील काय द्यूत आपला गांधार देश पणाला लावून? आपली पत्नी पणाला लावून ती हरली, तर? तर रजःस्वला असली, तरी तिला या सभागृहात सर्वांसमक्ष खेचून आणण्याची संमती मला ते देतील काय? माझा सेनापती सात्यकी यानं भरल्या द्यूतसभेत तिच्या अंशुकाच्या निरीला हात घातला, तर? दुर्योधन-दुःशासनासह मामा शकुनी ते बघतील काय? तेरा वर्षांचा यातनामय वनवास आणि अज्ञातवास सोसतील काय? गोहरण करण्यासाठी तुम्ही सर्व कुरुयोद्धे जसे हस्तिनापुराबाहेर पडलात, तसे माझे मथुरा-द्वारकेतील सर्व लाखो यादवयोद्धे आणि पांडव या तुमच्या हस्तिनापुरात गोहरणासाठी घुसले, तर ते तुम्हाला चालतील काय? तुम्हा प्रत्येकात शाश्वत असा एक शुद्ध ध्वनी

आहे, त्याला साक्ष ठेवून सांगा, कोणता न्याय तुम्ही पांडवांना आजपर्यंत दिला आहे? न्याय म्हणजे काय, हे तुम्हाला आज माहीत तरी आहे काय?

"तरीही तुम्ही कौरव आणि पांडव मी एकच मानतो! एकाच राजमुद्रेच्या दोन बाजू मानतो. तुम्हा सर्वांनाच कुरू मानतो. चांद्रवंशीय मानतो. म्हणूनच आज भूतकालातल्या कटू कृत्यांना अग्नी देऊन मी सांगतो आहे की, महाराज धृतराष्ट्र! पांडवांना त्यांचं न्याय्य अर्धं राज्य देऊन आत्ताच भवितव्यातील विध्वंसाचा विराट वणवा विझवून टाकावा! वास्तविक सम्राट पांडूनी 'विश्वस्त' म्हणून रक्षणार्थ स्वाधीन केलेलं हे राज्य, जसंच्या तस अखंडच तुम्ही त्यांच्या पुत्रांना परत केलं पाहिजे. बोला, तयार आहात का तुम्ही या न्यायदानाला?" आसुडाच्या प्रहारांसारख्या त्यांच्या शब्दांच्या तडिताघातांनी सभागृहभर सर्वत्र भीतिदायक शांतताच शांतता पसरली. त्यांना उत्तर देण्यासाठी महाराज धृतराष्ट्र काही उठत नव्हते. एवढे दिग्गज बसले होते, पण कुणीच ब्रसुद्धा उच्चारू शकत नव्हतं. ती शांतता भेदत पुन्हा कृष्णबोलच कडाडले, "सांगा, तुम्हापैकी कुणीही उठून सांगा, तुमचा अंतिम निर्णय आहे तरी काय?" त्यांची दृष्टी सभागृहभर गरगर भिरभिरत राहिली.

त्यांच्या वक्तव्यातील धारदार शब्दांनी आणि निरुत्तर करणाऱ्या कठोर वास्तवांनी सभागृह-सदस्य तर हादरूनच गेले होते. जाणवावी अशी शांतताच शांतता सभागृहभर दाटून आली होती. "मी सांगतो! तुझ्या या अफाट वक्तव्यानं इथे गरठून गेलेल्या कुरुयोद्धयांचा अंतिम निर्णय आज तुला मी स्पष्ट शब्दांतच सांगतो. पांडवांना अर्धं राज्यही मिळणार नाही!" दुर्योधन ताडकन उठून भुवया उडवीत बोलला. त्यानं आपली आखूड, पण पुष्ट बोटं नकारासाठी हवेत वरच्यावर उडविली.

"का नाही?" तेवढ्याच निकरानं सभागृह हादरवून टाकणारा प्रतिप्रश्न उठला. कृष्णदेवांनी आपले मत्स्यनेत्र आता एकटच्या दुर्योधनावर रोखले.

"त्यांचा या राज्याशी काहीच संबंध नाही. ते महाराज पांडूंचे पुत्र असले, तरीही नाही! राज्याचं आजचं विभाजन उद्या त्याचे शत आणि परत सहस्र तुकडे पाडील. राज्य म्हणजे दहा आश्रमकुमारांनी वाटून घ्यावं, असं एक श्रीफल वाटतंय की काय पांडवांना?" दुर्योधनही आज हट्टाला पेटला होता. त्याचे लालसर डोळे सभागृहात बसलेल्या आपल्या बंधूंवर गरगर फिरले.

"अर्धं राज्य नसेल, तर नसू द्या; पण खांडववनातील इंद्रप्रस्थाचं त्यांनी वसविलेलं, भरभराटीला आणलेलं त्यांचं राज्य तरी आता त्यांना अनुद्यूताच्या ठरलेल्या अटींप्रमाणे परत देऊन टाकणार काय तू? जे न्याय्य आहे, सत्य आहे त्याला दुराग्रहात कोंडू नको, दुर्योधना!" कृष्णदेव स्वरात कितीतरी आर्जव आणून म्हणाले.

दुर्योधन त्यांचं आर्जव उर्मटपणे फेकून देत म्हणाला, "नाही! त्यांनी ते द्यूतात हरवलेलं राज्य आहे. अटीप्रमाणे एक वर्षाचा अज्ञातवास त्यांनी पूर्ण केलेला नाही. अद्याप वर्षाला दोन दिवस शिल्लक आहेत. त्यापूर्वीच ते प्रकट झालेत!"

"नाहीऽ! अज्ञातवास पूर्ण झाला आहे. तुझी कालगणना चुकली आहे. तू अधिक मास विचारात घेतलेला नाहीस. पांडवांना त्यांचं इंद्रप्रस्थाचं राज्य परत देऊन टाक दुर्योधना!" कृष्णदेव आज त्याला इकडे-तिकडे हलूच देणार नव्हते.

"नाहीऽऽ!" अगोदरच हट्टी असलेला तो धृतराष्ट्रपुत्र आज पुरता हट्टालाच पेटला होता.

"का नाही?" यादवश्रेष्ठांनी त्याला त्याच्यासारख्याच मोजक्या शब्दांत विचारलं.

"ते आमच्या महाराज पांडूंचे पुत्र नाहीत! कौंतेय आणि माद्रेय असतील. पण पांडव मुळीच नाहीत."

दुर्योधनाच्या त्या निकराच्या आणि मर्मभेदक कुत्सित उद्गारांनी कुरूंच्या प्राचीन राजसभेत हलकल्लोळ माजला. पांडवमाता कुंतीदेवींच्या वंदनीय चारित्र्याची निर्लज्ज आणि सवंग लक्तरं दुर्योधन पूर्णत: अविचारानं हस्तिनापूरच्या वेशीवर टांगू बघत होता.

आता मात्र पितामह भीष्म ताडकन उठलेच. वक्षावरचं उत्तरीय मुठीत घट्ट पकडून कडाडले, "अविचारी दुर्योधना, मुकाट बैस. मला समजलंय तुला काय म्हणायचं आहे ते! तुला राज्यशास्त्र आणि नीतिशात्र यांतील अक्षरही माहीत नाही. किंदम ऋषींच्या शापामुळे सम्राट पांडूला वनात पुत्र होणं शक्यच नव्हतं. सम्राटानं निपुत्रिक मरणं अशक्य झालेल्या लज्जित पांडूनं पत्नी कुंतीदेवीला आपली व्यथा सांगितली. त्याला 'पू' नावाच्या नरकातून तारण्यासाठी पतिपरायण कुंतीनं नियोग पद्धतीच्या पुत्रप्राप्तीसाठी स्वत:ची संमती दिली. त्या दोघांनी महर्षी व्यासांकडून तसा संदेश आम्हाला पाठविला. तो मिळताच मी, महाराज धृतराष्ट्र आणि विदुर या तिघांचीच विशेष बैठकही झाली. आम्ही त्यांना नियोगाला संमती कळविली. पांडव सम्राट पांडूचे धर्मसंमत नियोगपुत्र आहेत. कुरू आहेत. या राज्याचे न्याय्य अधिकारी आहेत!"

कृष्णदेवांच्या या शिष्टाईच्या सभेत पितामह असे अंगावर येणार, आपणाला अडचणीत आणणार, हे दुर्योधनानं गृहीतच धरलं होतं. त्याच्या वक्षात खदखदणारा पांडवद्वेष त्याला सभागृहात सर्वांसमक्ष ओकून टाकायचा होता. आपली आखूड पुष्ट बोटं हवेत उडवत पुन्हा उठून तो म्हणाला, "मग मी आणि माझे कौरवबंधू यांचं हस्तिनापुरातील स्थान आहे तरी काय? कुरू म्हणून आमची नेमकी योग्यता काय, ते पितामहांनी सभागृहाला एकदा स्पष्टच सांगावं." आता सभागृहात कुजबुज माजत चालली. ती वाढू देता कामा नव्हती. वृद्ध पितामह पुन्हा उभे राहिले. तपस्यातप्त निर्धारी ठणठणीत बोलांत म्हणाले, "दुर्योधना, तू घनघोर अज्ञानी आहेस. तुम्ही कौरव-पांडव – कुणी कुणीच कुरुकुलोत्पन्न नाहीत!!" कुरूंच्या राजसभेला बसणारा हा आश्चर्याचा दुसरा तीव्र धक्का होता. आता कौरवांच्या कक्षातील दुर्योधन, दु:शासन, शकुनीमामा, दोघांचे बंधू, अंगराज कर्ण यांच्यात कुजबुजाट माजला. दबक्या आवाजातील काहीतरी निर्णय पक्का झाला. तो पाठबळात घेऊन गांधारनरेश शकुनी उठला. म्हणाला, "महाराज पुत्र दुर्योधन आणि त्याचे बंधू कुरू नाहीत. नियोगानं पुत्र मानलेले युधिष्ठिर आणि त्याचे बंधू हेही कुरू नाहीत. मग कुरू आहेत तरी कोण? हे राज्य आहे तरी कुणाचं?" त्यांचे छद्मी बोल सभासदांच्या काळजाचे टवके उडवत गेले.

आता पुन्हा निर्वाणीच्या निर्धारानं उभे राहिलेले पितामह भीष्म ठाम शब्दांत म्हणाले, "तो शेवटचा कुरू आहे मी! शांतनुपुत्र गांगेय भीष्म! कुरूंचा वंशलोप होऊ नये, म्हणून माझी माता सत्यवतीदेवी हिच्या संमतीनं फार पूर्वी कुरुवंशानं नियोगपद्धती स्वीकारली आहे. महाराज धृतराष्ट्र, सम्राट पांडू आणि महात्मा विदुर हे नियोग पद्धतीचे धर्मसंमत व्यासपुत्र आहेत. तसा शेवटचा कुरू एकमेव मी आहे. मी हात जोडून तुम्हा कौरव-पांडवांना विनंती करतो की, वासुदेव श्रीकृष्णाचा एकही शब्द तुम्ही खाली पडू देऊ नये. या क्षणी ती कधीही न भरून येणारी हिमालयाएवढी अक्षम्य चूक ठरेल. तुम्ही पांडव-कौरव भाग्यवान आहात की, आज तो तुमच्यात शिष्टाई करण्यासाठी या सभागृहात

आला आहे. त्याच्या एकाही शब्दाचा तुम्ही अनादर करू नये, असं मला मनापासून वाटतं.”

आता तर सभागृहात पराकोटीची शांतताच शांतता पसरली. भीष्मांनी वळवून आणलेल्या वातावरणाचा लाभ उठवीत कृष्णदेव म्हणाले, “कौरवा – दुर्योधना, हस्तिनापुरचं राज्य नाही, इंद्रप्रस्थाचं राज्य नाही, तर तुझ्या बंधूंनी जावं कुठे? त्यांना आश्रयासाठी निवारा म्हणून या राज्यातील अविस्थल, वृकस्थल, माकंदी, वारणावत अशी पाच ग्रामं तरी तू त्या पाच बंधूंनी द्यायला तयार आहेस काय?” सर्व सभासद योद्धययांची हृदयं ते निर्वाणीचं आवाहन ऐकताना हेलावली.

कुजबुज सुरू झाली. ती वाढू द्यायला दुर्योधन आज मुळीच तयार नव्हता. त्याच्या अंगी जसा काही आज साक्षात कलीच संचारला होता. कृष्णदेवांच्या आर्जवी प्रस्तावाला उन्मत्तपणे फेकून देताना तो तडकाफडकी म्हणाला, “नाही! नाही! नाही! त्रिवार, त्रिकाल नाही. या कुरुराज्याचे उत्तराधिकारी आम्ही नाही. कारण आम्ही कुरू नाही! नियोगपद्धतीचे हे पांडवही उत्तराधिकारी नाहीत! तेही कुरू नाहीत. कुरू आहेत ते एकटे पितामह भीष्म! ते तर आहेत, कायावाचामनानं ब्रह्मचर्याला प्रतिज्ञ! मग या कुरूंच्या प्राचीन सिंहासनाला अस्वामिक करायचं काय? त्याला उत्तराधिकारी कोण आहे ते आता ठरेल, केवळ समरांगणात! सामर्थ्यावर!

पाच ग्रामंच काय, पण सुईच्या अग्रावर थरथरत उभा राहणाऱ्या धुळीच्या कणाएवढाही भाग या राज्यातून पांडवांना कधीच युद्धाशिवाय मिळणार नाही!!”

आता संतापानं थरथरणाऱ्या दुर्योधनानं आपले संतप्त, आग ओकणारे डोळे एकट्या कृष्णदेवांवर रोखले. पराकोटीच्या उन्मत्तपणानं त्यांचं वंदनीय वासुदेवपण दूर भिरकावून देत तो बरळला, “इतकच काय, पण हा नकार घेऊन परत जाणाऱ्या तुझ्या पायांना चिकटून येणारे धूलिकणसुद्धा पांडवांच्या हाती पडू नयेत, म्हणून मी माझ्या सेवकांकरवी ते निरपून घेतले असते. पण त्या निमित्तानंसुद्धा माझ्या सेवकांचेही हात तुझ्या गाईंच्या मलमूत्रानं बरबटलेल्या अमंगल पायांना कधीच लागू नयेत, अशी माझी इच्छा आहे! जा, तुझ्या संधीच्या प्रस्तावाची लक्तरं लपेटून घेऊन तू हस्तिनापूरच्या सीमेबाहेर लवकरात लवकर चालता हो! नाहीतर –”

“दुर्योऽऽधऽऽन!!” कृष्णदेवांचे ओठ सत्त्वसंतापानं आता थरथरू लागले. मत्स्यनेत्र आरक्त झाले! मी तर अंगावर वज्राघात झाल्यासारखा ताडकन उठलोच. माझं अंगन्अंग संतापानं कसं थरथरत होतं, हात कटीच्या आवळलेल्या खड्गाच्या म्यानाला केव्हा भिडले, ते मला कळलंच नाही. ‘उन्मत्त नीचाऽऽ’ म्हणून गर्जत मी खड्ग सरकन म्यानाबाहेर खेचलंही! तिकडे दुर्योधनाचे नळ्याण्णव बंधू, तसेच शकुनीचे सर्व बंधूही आता उठून उभे राहिले होते. दुर्योधन धुंदपणे गरजला, “अंगराज कर्ण, सर्व उलथापालथीचं मूळ असलेल्या या गवळ्यालाच मी आज बद्ध करणार आहे! मथुरेच्या कारागृहात जन्मलेला हा गवळी हस्तिनापूरच्या कारागृहातल्या अंधारातच नष्ट झाला पाहिजे! तीच त्याची योग्य जागा आहे!!

त्याचे शब्द माझ्या कानांत तप्त लोहरसासारखे शिरले. वळवळणाऱ्या विषारी भुजंगांसारखे ते माझ्या मस्तकाला डंख मारू लागले. हा मदोन्मत्त दुर्योधन माझ्या कृष्णदेवांना बंदिवान करणार होता तर! विचाराची एक वीज माझ्या मनात लखकन तळपून गेली. कधी नव्हे, ते या अभियानात प्राणकुर्वंडीपथकं सोबत घेण्याची सूचना

द्वारकाधीशांनी मला का केली होती, याचा आता स्पष्ट बोध झाला.

कुणाचाही कसलाही विचार न करता कटीच्या खड्गावर मूठ रुपवीत मी तरातर चाललो – प्राणकुर्वंडी पथकांना देवांभोवती बळकट कडं टाकायची आज्ञा द्यायला! सभागृहाबाहेर एकाएकी माझ्या कानांवर राजसूय यज्ञात ऐकलेले तेच नानाविध वाद्यांचे अस्फुट संमिश्र ध्वनी पडले. पाठोपाठ द्वारकाधीशांचे शेवटचे निसटते शब्दही कानी आले –

"अंगराज कर्ण, त्याच्या राज्यात असतील तेवढे साखळदंड आणून सामर्थ्य असेल, तर मला बद्ध कर म्हणावं त्याला!"

दुसऱ्याच क्षणी आम्हा यादवांची प्राणकुर्वंडी करणारी, सभागृहाबाहेर असलेली सशस्त्र पथकं घेऊन मी कृष्णदेवांच्या नावाचा जयघोष करीतच कुरूंच्या सभागृहात घुसलो – 'द्वारकाधीश वासुदेव कृष्ण – जयतु, इडा माताऽऽ जयतु!!' माझ्या या निवडक पथकांतील सशस्त्र सैनिक नग्न शस्त्रं नाचवीत 'इडादेवीचाऽ जयघोष' करत सभागृहात घुसलेही. महापुरातल्या यमुनेच्या लाटांनी पुरातील द्वीप घेरावं, तसं चहुबाजूंनी कृष्णदेवांना त्यांनी सशस्त्र घेर टाकला. आज सुदर्शनाचं प्रक्षेपण सुदैवानं झालं नव्हतं! हे सुदैव कुणाचं होतं? हे एकटे कृष्णदेवच जाणू शकत होते. हाती नग्न खड्ग पेलून भिंगरीसारखं कृष्णदेवांभोवती फिरत माझ्या कुर्वंडी सेनापथकांतून मी त्यांना सुरक्षित सभागृहाबाहेर आणलं.

हां-हां म्हणता तरातर चालत चिंचोळा मार्ग पार करीत, ते दारुकानं समोरच आणलेल्या गरुडध्वजात आरूढ झाले, जाताना त्यांच्यासोबतच फरफटत आल्यासारखे, ऋणानुबंधानं बांधलेले काही योद्धे होते. त्यात पितामह भीष्म, महात्मा विदुर, अंगराज कर्ण, संजय असे निवडक होते. त्या सर्वांचं अभिवादन स्वीकारून त्यांतील एकट्या कर्णाला 'चला अंगराज, तुमच्याशी काही बोलायचं आहे!' असं म्हणत कृष्णदेवांनी हाताला धरूनच आपल्या रथात अलगद घेतलं. दारुकानं रथ पिटाळला. आम्हीही आमचे रथ गाठले. रथांची रांग गरुडध्वजामागून हस्तिनापूरच्या सीमेकडे धावू लागली. कृष्णदेवांची शिष्टाई संपली होती!

त्या दिवशी हस्तिनापूरच्या सीमेवर असलेल्या एका विशाल वटवृक्षाखाली अंगराज कर्ण आणि कृष्णदेव यांची गंगेला साक्ष ठेवून चांगली घटकाभर काहीतरी अटीतटीची चर्चा झाली. ती दोघांतच व गुप्त होती. आमच्या प्राणकुर्वंडी पथकांसह दूरवर दारुकाच्या गरुडध्वजाशेजारी, त्या दोन वीरांची बोलणी होईपर्यंत मी एका वृक्षाखाली थांबलो. काही वेळानं दोघंही महावीर परतले. आदरानं 'येतो मी' म्हणत अंगराज कर्णानं कृष्णदेवांचा निरोप घेतला. त्यांनी त्या दानवीर सूतपुत्राच्या वक्षाला वक्ष भिडवून त्याला दीर्घ आलिंगनात घेतलं. कृष्णदेव रथारूढ झाले. दारुकानं रथ हाकारला. आमचे रथही त्याच्या पाठीमागून धावू लागले. मी कुतूहलानं मागे वळून पाहिलं. कर्णाची पाठमोरी बोटभर उंचीची आकृती हस्तिनापुराकडे अदृश्य होत परतत होती. एकटी, एकाकी! माझ्यासमोर गरुडध्वजात रथाची काठाळी धरून कृष्णदेव उभे होते – कितीतरी उंच, आभाळाएवढे, कवेत न मावणारे!

आम्ही उपप्लाव्यात आलो. दुसऱ्याच दिवशी कुरूंच्या, अमात्य वृषवर्मांचा अग्रदूत उपप्लाव्यात आला. धर्मक्षेत्र कुरुक्षेत्रावर त्यांनी विशेष बैठक योजली होती. कौरव-

पांडवांत आता अटळ झालेल्या युद्धाची तिथी व दोन्ही पक्षांनी काटेकोर पाळावयाचे युद्धनियम ठरविण्यासाठी ही विशेष बैठक होती. या बैठकीत कौरवांच्या वतीनं पितामह भीष्म, आचार्य द्रोण, कृप, अश्वत्थामा, दुर्योधन, कर्ण असे प्रमुख असणार होते. पांडवांच्या वतीनं कृष्णदेव, मी, विराट व द्रुपदराज आणि त्यांचा युवराज धृष्टद्युम्न असे असणार होते.

ठरल्या दिवशी आम्ही कुरुक्षेत्राकडे प्रस्थान ठेवलं. कौरवांचे प्रतिनिधी परस्पर कुरुक्षेत्रावर आले. अतिशय गंभीर वातावरणात युद्धनियमांची ही बैठक बसली. या बैठकीची सूत्रं कौरवांकडून पितामह भीष्मांच्याकडे आणि पांडवांकडून एकट्या कृष्णदेवांकडे गेली होती. अमात्य वृषवर्मांनी बैठकीचं प्रयोजन सांगून तिला तोंड फोडलं.

पितामहांनी पहिला युद्धनियम सांगितला – "ठीक सूर्योदयाबरोबर रोज युद्धाला प्रारंभ होईल."

"तसंच सूर्यास्ताबरोबर त्या दिवशीच्या युद्धाची समाप्तीही होईल." कृष्णदेवांनी तो नियम पूर्ण केला.

"सर्व युद्धाचं स्वरूप द्वंद्वयुद्धाचं राहील." पितामह बोलू लागले, "द्वंद्वयुद्ध म्हणजे गजातीशी गजाती लढेल, अश्वसादाबरोबर अश्वसाद लढेल, उष्ट्रसादाबरोबर उष्ट्रसाद लढेल, सशस्त्र पदातीबरोबर तसाच पदाती लढेल. रथ्याबरोबर रथी लढेल. ते युद्ध द्वैरथयुद्ध असेल. भूमीवर लढणाऱ्या दोन सशस्त्र योद्ध्यांच्या हातांत एकच प्रकारचं शस्त्र असेल. खड्गधारीशी खड्गधारी, गदाधारीशी गदाधारी, चक्रधारीशी चक्रधारी, मुसलधारीशी मुसलधारी अशी ही द्वंद्वयुद्धं असतील." ते ऐकून मान डोलावून त्याला संमती देत कृष्णदेव म्हणाले, "निःशस्त्र योद्ध्यावर किंवा सारथ्यावर कुणीही शस्त्र किंवा अस्त्र चालविणार नाही!" कृष्णदेवांनी सांगितलेला हा नियम ऐकून हसत पितामह भीष्म काही बोलणार तोच मी म्हणालो, "जिथे एकाच प्रकारचं युद्ध अनेक योद्धे लढत असतील, तिथे त्या शस्त्रप्रकाराचं संकुल युद्ध मानलं जाईल. एका पक्षाचे अनेक रथी दुसऱ्या पक्षाच्या अनेक रथ्यांशी लढत असतील, तेव्हा ते रथांचं संकुल युद्ध असेल. असेच अनेक अश्वसाद दुसऱ्या अनेक अश्वसादांशी लढत असतील, तेव्हा ते अश्वसादांचं संकुल युद्ध ठरेल. याच प्रकारानं गदेची, खड्गाची, अग्निकंकणाची, मुसलांची संकुल युद्धं मानली जातील."

आता बैठक युद्धाच्या बारीकसारीक नियमांचा कीस काढण्यात गढून गेली.

"एकाच योद्ध्याला दुसऱ्या पक्षातील अनेक योद्ध्यांनी घेरणं, हे निषिद्ध असेल. ते अधर्मयुद्ध मानलं जाईल." पितामह भीष्म म्हणाले.

"या महायुद्धाची धर्मक्षेत्र कुरुक्षेत्र ही रणभूमी असेल. या रणभूमीवर कुठल्याच अधर्माची अपेक्षा नाही. रणभूमी नेहमीच पवित्र असावी लागते. यासाठी रोज नव्या रणभूमीवर दोन्ही पक्षांना सैन्याची व्यूहरचना करावी लागेल."

द्वारकाधीश निःशस्त्र सारथ्याविषयी बोलले, "निःशस्त्र योद्ध्याविषयी काय?" अंगराज कर्णानं कृष्णदेवांना प्रश्न घातला.

"हा बरा प्रश्न काढला दानवीरानं." कृष्णदेव हसत म्हणाले. पुढे बोलू लागले, "या युद्धात शस्त्रांचा आणि अस्त्रांचा वापर होणार आहे. त्यासाठी निःशस्त्र म्हणजे काय याची व्याख्या ठरवावी लागेल. मला वाटतं, ते त्या-त्या परिस्थितीवर सोपवावं."

"कौरव-पांडवांच्या या महायुद्धात स्त्री समरांगणात येणार नाही. आलीच तर काय?"

मी बैठकीला प्रश्न घातला.

"वीर योद्ध्यांच्या या महायुद्धात स्त्री अपेक्षित नाही. तशी ती आलीच, तर ती अवध्या मानावी." पितामह भीष्म म्हणाले.

"विरथ व घायाळ वीराला समरांगणातून निवृत्त होण्याची अनुज्ञा असावी." आचार्य द्रोणांनी कृष्णदेवांकडे पाहिलं.

"अवश्य होता येईल. पण आचार्य, खरा वीर निद्रेतसुद्धा निवृत्त होत नसतो." हसत-हसत द्वारकाधीशांनी उत्तर दिलं.

"हा कार्तिकाचा मास आहे. थंडीचा कडाका आहे. यासाठी योग्य युद्धतिथी याच बैठकीत पक्की करावी." अनुभवी द्रुपद पितामहांकडे बघत म्हणाले.

"हे कालाचं आणि कालमापनाचं सर्व तंत्र वासुदेव श्रीकृष्ण जाणतो. त्यानंच त्याला योग्य वाटेल ती तिथी महायुद्धासाठी ठरवावी." पितामह बैठकीच्या समापनाकडे येत म्हणाले.

"अशी योग्य तिथी मी उपप्लाव्याला गेल्यानंतर सर्व गोष्टींचा विचार करून ठरवेन आणि सर्वांना कळवेन. रणक्षेत्र मात्र हे पवित्र धर्मक्षेत्र कुरुक्षेत्रच राहील. त्याविषयी कुणाचं दुमत आहे का?" कृष्णदेवांनी नेहमीसारखं नितळ हसत प्रश्न घातला.

"नाऽही! कुणाचंच दुमत नाही." एकमुखी प्रतिसाद आला. कुरुक्षेत्रावरची विशेष बैठक उठली.

दुसऱ्या दिवशीच कौरवांच्या वतीनं पितामह भीष्म आणि द्रोण, दुर्योधन, पांडवांच्या वतीनं कृष्णदेव, मी आणि धृष्टद्युम्न अशा मोजक्याच योद्ध्यांनी कुरुक्षेत्राचा जवळ-जवळ तेरा योजनांचा परिसर फिरून पाहिला. अनेक ठिकाणी उंचच उंच विविध प्रकारचे शाखासंपन्न वृक्ष होते. ते तोडून युद्धभूमी समतल करण्याचा निर्णय घेण्यात आला. या भूमीवर निसर्गतःच पुरेशी सरोवरं असल्यामुळे पिण्याच्या आणि भोजन स्नानादी पाण्याचा प्रश्न नव्हता. सरोवराकाठची दाटलेली लव्हाळ्यांची कुरणंही स्वच्छ करून घेण्याचे आदेश देण्यात आले.

पितामहांचा निरोप घेऊन यादवराजांसह आम्ही उपप्लाव्याला परत आलो. कृष्णदेवांनी विराटांच्या निष्णात ज्योतिर्विदाला बोलावून त्याच्याशी उलटसुलट चर्चा करून युद्धाची तिथी एकदाची पक्की केली. हस्तिनापूर, पांचाल, मध्यदेश, पूर्व व पश्चिम देश सगळीकडे ती कळविण्यात आली. कौरव-पांडवांच्या होऊ घातलेल्या महायुद्धाची द्वारकाधीश वासुदेव कृष्णदेवांनी अंतिमतः घोषित केली, ती तिथी होती, 'मार्गशीर्ष वद्य द्वितीया'.

आता प्रथम ज्येष्ठांचे आशीर्वाद घेण्यासाठी आम्हाला पुन्हा द्वारकेला जाणं भाग होतं. तशी माझी व द्वारकाधीशांची जाण्याची तयारी सुरू झाली. महाराज विराटांना व द्रुपदांना एकत्र बोलावून द्वारकाधीशांनी त्यांना अनेक महत्त्वाच्या अंतिम सूचना दिल्या. द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न आपले बंधू शिखंडी, सुमित्र, प्रियदर्शन, चित्रकेतू, सुकेतू, ध्वजकेतू, वीरकेतू, सुरथ, शत्रुंजय यांच्या सहकार्यानं कांपिल्यनगरात महायुद्धाच्या प्रचंड तयारीला लागला.

विराटांचं मत्स्य हे गणराज्य पांचालांपेक्षा कुरुक्षेत्राला बरचसं जवळ असणारं राज्य होतं. यासाठी पांडवसेनेला अन्नधान्याचा पुरवठा करणं, मत्स्यांनाच शक्य होतं. ते

दायित्व त्यांच्यावर सोपविण्यात आलं. इंद्रप्रस्थ कुरुक्षेत्राला सर्वांत जवळचं असलं, तरी आता ते कौरवांच्या अधिकारात होतं. उलट त्याचा लाभ आपल्या विराट सेनेला धान्यपुरवठा करण्यासाठी हस्तिनापूरलाच अधिक होणार होता. हे चमत्कारिक वास्तव होतं. अपार परिश्रम करून खांडववनात यादव-पांडवांनी उठविलेल्या संपन्न राज्याचा लाभ होणार होता, तो कुरूंना! कुरुक्षेत्र आणि मत्स्यांचं विराटनगर यांच्याबरोबर मध्ये येत होतं, ते इंद्रप्रस्थ! त्याचा राजकीय लाभ उठविण्यासाठी दुर्योधनासारखा प्रतिस्पर्धी कधीच मागे हटणार नव्हता. त्यानं आपल्या चक्री सैनिकांकरवी सीमा बंद केल्या, तर कुरुक्षेत्रावर पांडवसेनेला धान्यपुरवठा होऊ शकणार नव्हता, अशी स्थिती होती. त्यासाठी इंद्रप्रस्थ राज्याला वळसा घालून मत्तमयूरांच्या राज्यात जाणं भाग होतं. तेथील राजाशी संधान बांधून मगच लढणाऱ्या पांडवांना धान्यपुरवठा होऊ शकत होता. त्यासाठी द्वारकाधीशांनी तत्परतेनं विराटांच्या अमात्याला मत्तमयूरांकडे राजदूतासह धाडलं.

आता भारतीय महायुद्धाची पांडवपक्षाची सर्व सूत्रं अंतिमाधिकारी म्हणून द्वारकाधीशांनीच हाती घेतली. मी द्वारकाधीशांसह द्वारकेत आलो. एव्हाना कौरव-पांडव यांचं प्रचंड महायुद्ध होणार, ही वार्ता द्वारकेत येऊन पोहोचली होती. आल्या-आल्या कृष्णदेवांना एका अत्यंत बिकट प्रसंगाला तोंड द्यावं लागलं.

हस्तिनापूर, उपप्लाव्य, विराटनगर आणि कांपिल्यनगर इथे घडलेल्या अनेक घटनांनी बलरामदादा बिथरले होते. कृष्णदेव भेटीस येण्याची वाटही न बघता तेच दणादण पाय आपटत आपल्या धाकल्याच्या कक्षात आले. नेहमीसारखं बंधूंना तडक धारेवर धरत म्हणाले, "श्रीकृष्णा, तू काय चालवलं आहेस हे? कौरव आणि पांडव दोघेही आपले निकटचे आप्त. त्यांच्यात मेळ घालण्यासाठी तू इथून गेलास! आणि दोघांचं सर्वसंहारक महायुद्ध ठरवून आलास! मी तुझ्या या राजकारणाला कंटाळलो आहे. त्या दोघांत समेट होत नाही याची खातरी होताच, तू इकडे द्वारकेला निघून यायला हवं होतंस. ते राहिलं बाजूलाच! उलट कौरव-पांडवांच्या या जुन्या भांडणात तू यादवांनाही ओढलं आहेस. आमच्या यादव राज्यातच आता कृतवर्मा व सात्यकी अशा दोन स्पष्ट फळ्या झाल्या आहेत. कशासाठी करतो आहेस हे सर्व?"

दादांचे प्रश्न ते ऐकणाऱ्याला वर-वर सार्थ वाटणारेच होते. पण खरोखरच ते तसे होते का? मुळीच नाही. कौरव-पांडवांच्या हस्तिनापूर राज्याचे अधिकार, हाच केवळ आता युद्धाचा विषय राहिला नव्हता. जवळ-जवळ सर्व आर्यावर्त आणि कपिश, कांबोजपर्यंतचा भाग त्यात गुंतला होता. यात स्वतःला अलिप्त ठेवून भविष्यात द्वारका खरोखरच सुरक्षित राहू शकली असती का? एकदा का पांडवांचा पाडाव केला की, दुर्योधन पूर्व, मध्य, उत्तर असा आर्यावर्त युद्धाच्या शेवटाबरोबरच घशात घालणार नव्हता काय? तसं झाल्यावर मगध आणि कामरूप ही पूर्वेकडील आमची स्नेहीराज्यं धोक्यात येणार नव्हती काय? आपण आपलं द्वारकेचं राज्य नंतर किती काळ सुरक्षित राखणार होतो? शत्रू घरात येण्यापूर्वी तो अंगणात आलेला आहे, हे समजायला नको काय? दादांना तेच समजत नव्हतं. आपला परमशिष्य म्हणून दुर्योधनाला तर ते मित्रच मानत होते. त्यांच्या तडक स्वभावामुळे कुणीही त्यांच्यासमोर उभं राहून त्यांना समजावू शकत नव्हतं.

एकमेव एकच मध्यस्थ त्यासाठी द्वारकाधीशांच्या डोळ्यांसमोर येत होता. ते होते, उद्धवदेव! त्यांनी उद्धवदेवांना बोलावून घेतलं. कुरुक्षेत्रासाठी द्वारका सोडण्यापूर्वी यादवांची अंतिम निर्णायक सुधर्मा राजसभा भरविण्याचं तिघांच्या मते ठरलं.

द्वारकेतील आजची सुधर्मा राजसभा अभूतपूर्व होती. या सभेला झाडून सारे यादव उपस्थित होते.

अमात्य विपृथूंनी यादवांचा रत्नखचित राजदंड प्रथेप्रमाणे उंच उचलून सभेचं प्रयोजन निवेदन केलं. ते म्हणाले, "द्वारकाधीश श्रीकृष्णमहाराज कुरुक्षेत्राच्या पवित्र धर्मक्षेत्र भूमीवर लवकरच एक महायज्ञ प्रज्वलित करणार आहेत. केवळ कौरव-पांडवांच्याच नव्हे; तर एकूणच आर्यावर्ताच्या, मानवजातीच्या न्याय्य-अन्याय्यच्या निर्णयासाठी एका 'न भूतो न भविष्यति' अशा महायुद्धाचा महायज्ञ असेल तो!

"आपल्या द्वारका गणराज्यातून सेनासाहाय्य घेण्यासाठी कौरव दुर्योधन व पांडव अर्जुन नुकतेच द्वारकेत येऊन कृष्णदेवांना भेटून गेले आहेत. या भेटीत ज्येष्ठ कौरव दुर्योधनानं यादवांची सशस्त्र चतुरंगदल सेना स्वीकारली आहे. मात्र पांडव अर्जुनानं आपला सारथी म्हणून एकटच्या श्रीकृष्णदेवांची निवड केली आहे. हे सारथ्यही ते निःशस्त्रपणे करतील. वेळ पडली, तर पांडवांना युक्तीच्या केवळ चार गोष्टी काय ते सांगतील. त्यांच्या हाती अर्जुनाच्या नंदिघोषाचे चार शुभ्र अश्व हाकण्यासाठी घेतलेला नुसता प्रतोद असेल. समयच ठरवेल की, हा प्रतोद व चतुरंगदल यादवसेना यातील कोण विजयी झालं आहे!....

"द्वारकाधीशांनी या महायुद्धात यादववीरांना कौरव-पांडवांपैकी योग्य वाटेल तो पक्ष निवडण्याची मुक्तता दिली आहे. म्हणूनच महावीर सात्यकी आपल्या निवडक पथकांतील वीरांसह पांडवांच्या पक्षाकडे जाणार आहेत, तर यादवांचं एक अक्षौहिणी सैन्य घेऊन महारथी कृतवर्मा कौरवांच्या पक्षाकडून या महायुद्धात उतरणार आहेत. इतर सैन्य घेऊन कृष्णदेवांचे सर्व पुत्र द्वारकेच्या रक्षणार्थ द्वारकेतच थांबणार आहेत. त्यांचं नेतृत्व युवराज प्रद्युम्नांच्याकडे राहील. त्यांना बलरामदादांचे पुत्र आणि बंधू द्वारकेत राहूनच सहकार्य करतील.

"युवराज बलरामदादा आणि कृष्णसखा उद्धवदेव यांनी या महायुद्धाविषयी आपलं मनोगत व्यक्त केलेलं नाही. ते त्यांनी करावं, अशी त्यांना नम्र विनंती.

खचाखच भरलेल्या यादवांच्या सुधर्मा राजसभेला आपलं मनोगत सांगण्यासाठी बलरामदादा उठले. त्यांची सुधर्मा सभेत काहीतरी मनमोकळं बोलण्याची ही पहिलीच वेळ होती. कसं बोलावं, यासाठी शब्द धुंडाळीत ते प्रथम काही क्षण खाकरले. मग घोगरेपणी म्हणाले, "राजकारण हा काही माझा विषय नव्हे. मी एक रांगडा यादव सैनिक आहे. माझ्या सर्व यादवबंधूंना या युद्धाविषयी माझं स्पष्ट मत कळावं, म्हणूनच बोलतो आहे. हस्तिनापूरच्या कौरव-पांडव यांच्या वादात आम्ही द्वारकाकर यादवांनी मुळीच पडू नये, असं मला वाटतं. दोन्ही पक्ष आपले सारखेच आप्त आहेत. आपल्या राज्याचा तंटा त्यांनीच मिटवावा. इतरांनी त्यात, विशेषतः आम्ही यादवांनी कोणताच भाग घेऊ नये, असं मला वाटतं. तसा घेतला, तर त्यातून काहीही चांगलं निघणार नाही. यासाठी मी आजच द्वारका सोडून हिमालयाकडे निघून जाणार आहे. जेव्हा वाटेल, तेव्हाच परत येईन आणि वाटलंच नाही, तर येणारही नाही. यासाठी माझं सर्वांना हार्दिक अभिवादन आहे.

माझ्या स्वभावाप्रमाणे तडक बोलताना आजवर माझ्याकडून कुणाच्या उपमर्द झाला असेल, तर मला उदारहृदयी त्यांनी क्षमा करावी.” बलरामदादांनी सर्व सभागृहाला विनंती केली. याच सभागृहात पूर्वी त्यांचं आणि कृष्णदेवांचं झालेलं भावपूर्ण मनोमीलन आठवून अनेक जण हळहळले.

बलरामदादांचा स्पष्ट निर्णय ऐकून सभागृहात शांतताच शांतता पसरली. आचार्य सांदीपनी, ब्रह्मगार्ग्य यांच्याशेजारी मांडलेल्या आपल्या विरक्त चंदनी आसनावरून आता उद्धवदेव उठले. त्यांची सतेज, सत्त्वशील, गोलाकार चांद्रमुद्रा परमशांत होती. त्यांच्या चर्येवर, डोळ्यांत कसलीच खळबळ नव्हती. सभागृहभर आपली प्रेमळ, शांत दृष्टी एकदा फिरवून, ते आपल्या विलक्षण नादमधुर भाषेत म्हणाले, “समस्त यादवबांधवहो, मीही बलरामदादांसारखाच हिमालयाकडेच जाणार आहे! त्यांच्या जाण्यात आणि माझ्या जाण्यात मात्र अंतर आहे. आमचं उभयतांचं बोलणं झालं आहे. आम्ही दोघं एकदमच द्वारकेबाहेर पडू. “आम्ही उभयता बदरीकेदार या गंगेकाठच्या तीर्थापर्यंत एकत्र असू. पुढे मी त्या तीर्थावरच थांबेन. बलरामदादा त्यांना हवं तिकडे पुढे जातील.

“मी बदरीकेदारला जाणार आहे, तोही द्वारकाधीशांच्या इच्छेप्रमाणे आणि त्यांच्या आदेशानं! बदरीच्या त्या निवांत आणि पावन क्षेत्रावर आचार्य सांदीपनींच्या अंकपाद आश्रमासारखा एखादा आश्रम उठवावा, अशी कृष्णदादांची इच्छा आहे. त्याची पूर्वतयारी करण्यासाठी त्यांनी माझी निवड केली आहे. त्यामुळे मी स्वतःला परम भाग्यवान समजतो. द्वारकेच्या कीर्तीला शोभेल अशीच त्या श्रीकृष्णआश्रमाची मी पूर्वतयारी करून घेईन, असं वसुदेवबाबा, दोन्ही राजमाता आणि परमादरणीय आचार्य सांदीपनींच्या साक्षीनं यादवांच्या या सभागृहाला मी नम्र अभिवचन देत आहे.

“ज्या महायुद्धाचा महायज्ञ प्रज्वलित करण्यासाठी कृष्णदादा कुरुक्षेत्राकडे निघतो आहे, त्यात तो यशस्वीच होईल. गेले अनेक दिवस मी या महायज्ञाविषयी त्याचे सर्व विचार मनःपूर्वक ऐकले आहेत. या महायुद्धात तो अर्जुनाचा निःशस्त्र व केवळ प्रतोदधारी सारथी म्हणून उतरणार आहे. तरीही मला पूर्ण विश्वास आहे की, तो धनुर्धर अर्जुनाच्या साहाय्यानं जे काही करेल, ते आर्यावर्ताच्या पिढ्यान्पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल. माझा ठाम विश्वास आहे की, जिकडे धनुर्धर अर्जुन व सुदर्शनधारी श्रीकृष्ण असेल, तिकडेच धर्म व विजय असेल. आपण सर्व ज्येष्ठ यादव स्त्री-पुरुषांनी माझ्या परमप्रिय दादाला त्यासाठी शुभाशीर्वाद द्यावेत. या क्षणी मी आपल्या इडादेवीला साकडं घालतो की, ‘माझ्या दादाची ओंजळ सदैव तिच्या यशाच्या कृपाशीर्वादानं भरलेलीच राहो!!!’ ”

सभागृहातले सर्व यादव उद्धवदेवांचे शब्द उचलून धरत, दोन्ही हात उभवून कृष्णदेवांकडे बघत अनावर प्रेमानं आणि भक्तीनं गरजले, ‘द्वारकाधीश जयतु, जयतु!!’

शेवटी सर्व सभासदांचे ज्यांच्यावर डोळे खिळले होते, ते कृष्णदेव उठले. महाराज वसुदेव, राजमाता देवकीदेवी आणि त्यांच्या पाठीशी बसलेल्या रोहिणीदेवी यांना तसेच बलरामदादा आणि रेवतीवहिनींना अभिवादन केलं. लागलीच दृष्टी आचार्य सांदीपनींच्याकडे वळवून त्यांनाही अभिवादन केलं. डाव्या हाताशी बसलेल्या रुक्मिणीदेवींवर हसऱ्या मुखानं एक कटाक्ष टाकला. अवघ्या सुधर्मा राजसभेवर आपले दाट पापण्यांचे मत्स्यनेत्र एकदा फिरविले. मग त्या श्रीमुखातून केवळ दोनच शब्द

बाहेर पडले. त्या दोनच शब्दांत एवढं प्रचंड सामर्थ्य होतं की, ते ऐकणाऱ्या सर्वांच्या अंगावर सरसरून रोमांच उठले आणि पळभरातच मृगसरींसारख्या अविरत कडाडत्या टाळ्यांच्या गजरात यादवांची ती सुधर्मा राजसभा दणाणून गेली. ते मंत्रासारखे बोल होते, 'जैऽऽ इडादेवीऽऽ!!' सर्व सुधर्मा सभेत पुनःपुन्हा तोच घोष उठविला, 'जैऽऽजैऽऽइडादेवी!'

द्वारकेतील निर्णयाची सुधर्मा राजसभा उलगली.

दुसऱ्याच दिवशी प्रथम वसुदेवमहाराजांना आणि दोन्ही राजमातांना वंदन करून कुरुक्षेत्राकडे जाण्यासाठी कृतवर्मांनी द्वारका सोडली. त्यांच्यासोबत एक अक्षौहिणी सशस्त्र यादवसेना होती. राजसभेत घोषित केल्याप्रमाणे बलरामदादा उद्धवदेवांसह निवडक यादव घेऊन हिमालयाकडे निघून गेले. सर्वांत शेवटी सर्व ज्येष्ठांचे आशीर्वाद घेऊन राणीवशाकडील सर्व राण्यांना व पुत्रपुत्रींना भेटून कृष्णदेवांनी द्वारका सोडली. मी, दारुक आणि त्यांनी निवडलेले मोजकेच यादववीर त्यांच्यासोबत होते. सर्व जण द्वारका खाडी पार करून पश्चिम सागरकिनाऱ्यावर आलो. दारुकानं कृष्णदेवांचा सालंकृत गरुडध्वज रथ किनाऱ्यावर सिद्ध ठेवला होता. कृष्णदेवांनी इच्छा व्यक्त केल्याप्रमाणे यादवांचे पुरोहित ब्रह्मगार्ग्य आचार्य सांदीपनींसह अगोदरच सोमनाथाच्या शिवालयात पुढे गेले होते. सर्वांनी महारुद्राभिषेकाची जय्यत तयारी करून ठेवली होती. दारुकानं आमचा गरुडध्वज रथ सोमनाथावर आणला. आम्ही सोमनाथाच्या शिवालयातील गर्भगृहाच्या समोरील दर्शनी चौकात आलो. पायाशीच असलेल्या नितळ पाषाणी कासवमूर्तीजवळ कृष्णदेव थांबले. माझ्या खांद्यावर आपला आजानुबाहू चढवून म्हणाले, "सात्यकी, माणसानं नेहमी या कासवाचा आदर्श गुरुवत समोर ठेवावा. त्यानं आपले काम, क्रोध, मद, मोह, मत्सर असे षड्रिपू आपल्या पायांसह ओढून घेतले आहेत. स्थितप्रज्ञ भावानं ते शिवाच्या पायाशी बसलं आहे. माणसानंही असंच स्थितप्रज्ञ होऊन, तांडव माजविणाऱ्या शिवाच्या दर्शनासाठी निकोप मनानं गेलं पाहिजे." गर्भगृहाच्या मुखाशी उभे असलेले ब्रह्मगार्ग्य, आचार्य सांदीपनी आणि कितीतरी ऋषिमुनी कृष्णदेवांना पाहून आदरानं पुढे आले. सर्वांसह वाकून कृष्णदेव गर्भागारात उतरले. सुवर्णी वर्खाच्या अभिषेक पात्रातून वर्षणाऱ्या धारेखाली सोमनाथाची नितळ वज्रलेपी शिवपिंडी झमझम तळपत होती. महारुद्राभिषेकाची सर्व तयारी अनेक हातांनी मांडून सिद्ध केली होती. द्वारकाधीश पिंडीसमोरच्या चौरंगावर बसले. ब्रह्मगार्ग्य, आचार्य सांदीपनी आणि भोवतीच्या ऋषिमुनींनी वेदवर्णित शिवस्तुतीला प्रारंभ केला. कृष्णदेवांनी आपले दाट पापण्यांचे मत्स्यनेत्र मिटले, आपल्या कृष्णदेहातील बहात्तर हजार नाड्यांवर नियंत्रण घेत, शिवध्यान धरलं. मी आणि दारुक गर्भागारातच एका कोपऱ्यात हात जोडून, डोळे मिटून उभे राहिलो. गर्भागार शिवस्तुतीच्या रोमांचक स्तवनांनी घुमू लागलं –

"पशूनां पतिं पापनाशं परेशं गजेंद्रस्य कृतिं वसानं वरेण्यम्।
गिरीशं गणेशं गले नीलवर्णं गवेंद्राधिरूढं गुणातीतरूपम्।
शिवाकांत शंभो शशांकार्धमौले, महेशान शूलिन् जटाजूटधारिन।
त्वमेको जगद्व्यापको विश्वरूप प्रसीद प्रभो पूर्णरूप।।
अजं शाश्वतं कारणं कारणानां शिवं केवलं।

भासकं भासकानात्। तुरीयं तमः पारमाद्यंतरीनं।
प्रपद्ये परं पावनं द्वैतहीनम्।
नमस्ते नमस्ते विभो विश्वमूर्ते।
नमस्ते नमस्ते चिदानंदमूर्ते।
नमस्ते नमस्ते तपोयोगगम्य।
नमस्ते नमस्ते श्रुतिज्ञानगम्य।
प्रभो शूलपाणे विभो विश्वनाथ।
महादेव शंभो महेश त्रिनेत्र।
शिवाकांत शंभो शशांकार्धमौले।
महेशान शूलिन् जटाजूटधारिन्।
त्वमेको जगद्व्यापको विश्वरूप।
प्रसीद प्रसीद प्रभो पूर्णरूप।।"

जमलेल्या सर्व शिवभक्तांना महारुद्राभिषेकाचा तीर्थप्रसाद वाटण्यात आला. बाहेर आलेल्या दर्शनार्थींना दानं देण्यात आली. तिथून आम्ही आनर्तातल्या नागेश्वर या दुसऱ्या शिवालयात आलो. इथेही असाच महारुद्राभिषेक करण्यात आला. तीर्थप्रसाद व दानं वाटण्यात आली. या दोन्ही ठिकाणच्या शिवपूजनानंतर कृष्णदेवांची सत्त्वशील मुद्रा आता वेगळीच दिसू लागली. आता ती अभिषेकधारेखाली उजळून निघालेल्या शिवपिंडीसारखीच सतेज दिसू लागली. बारकाव्यानं बघताना मला स्पष्ट जाणवलं की, त्यांच्या नीलवर्णी देहाचा कंठ आता गडद नीलवर्णी झाला आहे.

आमचा पहिला पडाव कुंतिभोजनगरात पडला. आम्ही अवंती राज्यात हेतुतः थांबलो नाही. अवंतीचे विंद-अनुविंद, मित्रविंदादेवींचे बंधू होते. कृष्णदेवांचे आतेबंधू होते, पण ते या युद्धात दुर्योधनाच्या कौरवपक्षाकडून उतरणार होते! एक अक्षौहिणी शस्त्रसज्ज सेना घेऊन ते कुरुक्षेत्राकडे केव्हाच निघून गेले होते.

आमचा दुसरा पडाव दशार्णांच्या राज्यात पडला. दशार्ण पांडवांकडून युद्धात उतरणार होते. तेही कुरुक्षेत्राकडे निघून गेले होते. आमचा शेवटचा पडाव मत्स्यांच्या उपप्लाव्यात पडला. मत्स्यराज विराटही आपले पुत्र उत्तर, श्वेत, शतानिक व वसुदान यांच्यासह ससैन्य कुरुक्षेत्रावर पोहोचले होते.

आता कार्तिकातील वद्य पक्षाचा शेवटचा सप्ताह सुरू होता. वातावरणात अद्याप थोडी थंडी होती. कार्तिक संपता-संपता आमचं पथक कृष्णदेवांसह कुरुक्षेत्रात प्रवेशलं. आम्ही ज्या दिशेनं आलो तिकडे प्रवेशताच, प्रथम लागला तो कौरवपक्षाचा संयुक्त भव्य सैनिकतळ! जाता-जाताच पसरलेल्या कौरवसेनेचा नुसत्या दृष्टिक्षेपावर कृष्णदेवांनी कयास केला होता. मला ते म्हणालेही, "सात्यकी, ही कुरुसेना नक्कीच दहा अक्षौहिणींच्या वर आहे. सुसंघटित दिसते आहे. सेनेचे नित्याचे व्यायाम रीतसर चालू आहेत. हे युद्ध वाटतं तितकं पांडवांना सोपं जाणार नाही!"

त्यांच्या संकेतानं सचिंत होत, मीही कौरव-तळ बारीक दृष्टीनं निरखीत चाललो होतो. एका भव्य शिबिरासमोर आमच्या सारथी दारुकाला गरुडध्वज थांबवावाच लागला. ते शिबिर होतं कौरवांचे सेनापती झालेल्या पितामह भीष्मांचं. ते आपल्या निवडक सेवकांसह मार्गातच उभे होते. कवच आणि रणवेषधारी पितामहांना बघताच कृष्णदेव

लगबगीनं रथातून उतरले. त्यांची चरणधूली घेण्यासाठी वाकू लागले. त्यांना तसं न करू देता लगबगीनं वर आलिंगनात घेताना पितामह पुटपुटले, "वासुदेवाऽऽ! आता देह कुरुक्षेत्रावर पडला, तरी त्याची चिंता नाही. सर्वप्रथम तुझं दर्शन झालं. कुरूंनी मला सेनापतीपदाचा अभिषेक केला आहे. आज मी रथी-महारथींची नियुक्ती करणार आहे."

पितामहांचा निरोप घेऊन आम्ही आमच्या पांडवतळावर आलो. इथंही कृष्णदेवांच्या आगमनाची वार्ता सर्वत्र पसरली होती.

सर्व पांडव व धृष्टद्युम्नासह अनेक योद्ध्यांनी कृष्णदेवांचं स्वागत केलं. सर्व योद्ध्यांच्या मेळातून शेवटी आम्ही पांडवसेनेच्या बरोबर मधोमध येईल अशा, कृष्णदेवांसाठी उठविलेल्या सर्वांत उंच व प्रशस्त शिबिरात आलो. आत महाराज विराट व द्रुपद होते. कृष्णदेवांनी त्यांना नम्रभावानं वंदन केलं.

थोडा विश्राम व फलाहार झाला. मार्गशीर्ष वद्य प्रतिपदेची संध्याकाळ कुरुक्षेत्रावर उतरली. कृष्णदेवांच्या प्रशस्त शिबिरात पूर्वाभिमुख अशी इडादेवीची मूर्ती उभी करण्यात आली होती. आता जेवढे म्हणून दिवस हे महायुद्ध चालणार होतं, तेवढे दिवस पांडवपक्षाची सर्व सूत्रं या कृष्णशिबिरातून हलणार होती. या शिबिरात निवडक रथी, महारथी, अतिरथी यांच्या उपस्थितीत इडादेवीला प्रिय रक्तवर्णी पुष्पं अर्पून, पांडवांची पहिली बैठक बसली. बैठकीत मध्यभागी एका व्याघ्रचर्मांकित उंच सुवर्णी आसनावर यादवराज श्रीकृष्णदेव बसले होते. त्यांच्या उजव्या हाताशी पांचालराज द्रुपद, मत्स्यराज विराट, द्रौपदीबंधू धृष्टद्युम्न आणि युधिष्ठिर, भीमसेन, अर्जुन, नकुल-सहदेव असे पांडवबंधू बसले होते. डाव्या हाताशी मी, चेदींचा शिशुपालपुत्र धृष्टकेतू, चेकितान, जरासंधपुत्र जयसेन, पांड्यांचा मलयध्वज, पांचालांचे उत्तमौजा, व्याघ्रदत्त, सिंहसेन, सत्यजित, शिखंडी, विराटांचा उत्तर, त्याचे बंधू श्वेत, शतानिक, वसुदान, त्यांच्या शेजारी पौरवराज, मालवराज असे कितीतरी योद्धे बसले.

पांडवांच्या सेनापतीपदाच्या निवडीची महत्त्वाची बैठक सुरू झाली. हलकेच विषयाला तोंड फोडत कृष्णदेव म्हणाले, "आपल्या सात अक्षौहिणी सेनेचं समर्थपणे सेनापत्य करू शकेल, अशा वीराची तुम्ही एकमुखी एकमतानं निवड करावी. सांगा, याविषयी कुणाला काय वाटतं, ते मोकळ्या मनी बोला. ही निवड असंख्य योद्ध्यांच्या प्राणांशी निगडित आहे, एवढंच ध्यानी घ्या. या सेनापतीच्या हाताखाली सात विभाग प्रमुख आताच निवडायचे आहेत."

आता बैठक पराकोटीची गंभीर झाली. काही क्षण तसेच गेले. मग सर्वांत प्रथम कनिष्ठ पांडव सहदेव म्हणाला, "अज्ञातवासाच्या आमच्या कठीण व कसोटीच्या वर्षात विराटांनी आम्हाला मोलाचं सहकार्य केलं आहे. एक अक्षौहिणी सेना घेऊन ते रणात उतरताहेत. मला वाटतं, महाराज विराटांना आमच्या पांडवसेनेचं सेनापत्य प्रदान करावं."

त्या नावावर बैठकीत काहीतरी कुजबुजती चर्चा झाली. तिला अधिक वाव न देता प्रत्यक्ष विराटच म्हणाले, "कोणतंही दायित्व घ्यायला मी कचरत नाही, पण कुरुसेनेचे सेनापती वृद्ध पितामह भीष्म आहेत, हे ध्यानी घेऊन या बैठकीनं प्रामुख्यानं एखादा तरुण योद्धा सेनापती म्हणून निवडावा, असं मला वाटतं."

त्यांच्या या विधानावर कृष्णदेव हसले. नेहमीच्या खटचाळपणानं म्हणाले, "मग वृद्ध

पितामहांची सेनापती म्हणून निवड करण्यात कौरव चुकले म्हणायचे की काय? मला नाही तसं वाटत. नकुला, तुला काय वाटतं?" त्यांनी प्रश्नाचा रोख अप्रतिम सुंदर माद्रीपुत्राकडे वळविला. तसं तत्परतेनं उठून उभं राहात, उत्तरीय सावरून नकुल म्हणाला, "द्वारकाधीश, खरंतर आमच्या सेनेचं सेनापत्य तुम्हीच करायला हवं होतं, पण तुम्ही प्रतिज्ञापूर्वक युद्धसंन्यास घेतला आहे. शस्त्रत्याग केला आहे. तुम्ही करणार आहात, ते केवळ अर्जुनाच्या नंदिघोष रथाचं निःशस्त्र सारथ्य! अशा स्थितीत मला वाटतं, ज्या पांचालांची संख्या आमच्या सेनेत सर्वाधिक आहे, त्यांच्या नेत्यानं हे दायित्व स्वीकारावं. आमच्या पांडवसेनेचं सेनापत्य महाराज द्रुपदांनी स्वीकारावं."

ते ऐकून अनुभवी वृद्ध द्रुपदच उठले. म्हणाले, "सेनापतीपदाची धुरा वाहण्याची क्षमता पांडवांतच भीमसेन किंवा अर्जुनात नाही काय? केवळ सैनिकांची संख्या हा यासाठी अंतिम निकष असू नये. सेनापती म्हणून भीमसेनाला अभिषेक करायला काय हरकत आहे?"

द्रुपदांची सूचना विचार करायला लावणारी होती. काही पळांनंतर स्वतः भीमसेनच उठून उभा राहून बोलला, "कौरवसेनापती पितामह आहेत, म्हणूनच पांचालपुत्र शिखंडीला हा अभिषेक होणं योग्य आहे, असं मला वाटतं."

आता मात्र उलटसुलट विचारांची स्पष्ट ऐकू यावी, अशी कुजबुज बैठकीत माजली. तसं कृष्णदेव म्हणाले, "सर्व दृष्टींनी विचार करता, आम्हा यादवांचे सात्यकी आणि पांडवांचा धनुर्धर अर्जुन पांडवसेनेचे सेनापत्य करायला योग्यच आहेत. पण... पण युद्धात अंतिम विजय हाच मोलाचा असतो. या सर्वांचा विचार करून मला वाटतं, पांचालांच्या तरुण युवराज धृष्टद्युम्नाला पांडवसेनेचा सेनापती म्हणून सर्वांनी अभिषिक्त करावं!"

बैठकीतल्या सर्व महावीरांनी 'पांडवसेनापती – पांचाल युवराऽज – धृष्टद्युमऽऽ... जयतु...' असा जयघोष करून सेनापतीचा एकमुखी स्वीकार केला. तो स्वीकारताना यज्ञपुत्र धृष्टद्युम्नाची चर्या यज्ञाग्नीसारखी कशी फुलून रसरशीत झाली. वक्ष फुलल्यानं त्यावरचं त्याचं लोहत्राण घट्ट दाटून आलं.

पांडवसेनापती म्हणून निवड झालेल्या धृष्टद्युम्नानं अत्यंत नम्रभावानं कृष्णदेव आणि ज्येष्ठ द्रुपदांना व विराटांनाही प्रणाम केला. युधिष्ठिरानं आज्ञा करताच पांडवसैनिकांनी सेनापतींचं सुवर्णी आसन शिबिरासमोर आणलं. अभिषेकविधीच्या वस्तूंची तबकंही शिबिरासमोर आणण्यात आली. सर्व जण शिबिराबाहेर पडले. मुनिवर धौम्य, आणि मत्स्यपुरोहित. यांनी प्रथम यज्ञाग्नी प्रज्वलित केला. त्याला विविध समिधांच्या आहुती दिल्या. मग पांडवसेनापतीला सेनापतीचं सिंहासन स्वीकारण्याची विनंती केली. धृष्टद्युम्नानं सुवर्णी आसनावर वीरबैठक घेतली. आसनासमोरच्या यज्ञकुंडात दोन्ही आचार्यांच्या शिष्यगणांनी उठविलेल्या मंत्रगजरात यज्ञाहुती पडू लागल्या. गंगा-सिंधु-यमुना अशा सप्तनद्यांतील मंत्रभारित पवित्र जल आचार्यांच्या हस्ते सुवर्णकुंभातून मंत्रनादात पांडवसेनापतीच्या मस्तकावर सिंचलं जाऊ लागलं. महावीर धृष्टद्युम्न त्या पावन जलाखाली नखशिखांत न्हाऊन निघाला. नजीकच असलेल्या आपल्या शिबिरात तो सेनापतीचा रणवेष धारण करण्यासाठी निघून गेला. सेवकांनी कोरड्या वस्त्रांनी सेनापती आसन स्वच्छ पुसून घेतलं. ते पूर्वाभिमुख मांडलं. त्याच्या दुहाती सर्व प्रमुख वीरांची सुवर्णआसनं मांडण्यात आली. सेनापतीच्या उजव्या हाताशी कृष्णदेवांनीच सूचना केल्याप्रमाणे एक साधंच चंदनकाष्ठाचं आसन मांडण्यात आलं. ते

त्यांच्या स्वत:साठी होतं.

आता शिबिराबाहेरची ही सेनाबैठक रीतसर सेनापतीच्या अधिकारात गेली. धृष्टद्युम्नानं आसनावर बसूनच दोन्ही हात जोडून कृष्णदेवांना विनंती केली – “पांडवांच्या सात अक्षौहिणी सेनेचा सेनापती म्हणून मी द्वारकाधीशांना विनंती करतो की, त्यांनी आमच्या सेनेच्या सात विभागप्रमुखांची नावं घोषित करावीत!” मी सेनापती धृष्टद्युम्नाकडे अत्यंत अभिमानानं बघितलं. ही विनंती कृष्णदेवांना करून आपण योग्य सेनापती आहोत, हेच तो निर्विवाद सिद्ध करत होता. हसतच कृष्णदेव मांडलेल्या चंदनी आसनावरून उठले आणि यापुढे प्रत्येक पांडव सैनिकानं कसं वागावं, याचा आदर्श पाठ देत म्हणाले, “आमच्या सेनापतींच्या आज्ञेप्रमाणे मी सात विभागप्रमुखांची नावं घोषित करतो आहे. आपलं एकूण सैन्य झालं आहे सात अक्षौहिणी. यातील पांचालांच्या एका अक्षौहिणीचं नेतृत्व करेल, स्वत: सेनापती महारथी धृष्टद्युम्न. पांचालांच्या दुसऱ्या अक्षौहिणीचं नेतृत्व करतील, पांचालराज महाराज द्रुपद. तिसऱ्या अक्षौहिणीचे प्रमुख असतील, मत्स्यराज महाराज विराट. चौथी अक्षौहिणी आज्ञा पाळील, द्रुपदपुत्र महावीर शिखंडीची. ज्यात आमचे यादवसैनिक अधिक आहेत अशा पाचव्या अक्षौहिणीचं नेतृत्व राहील, माझे यादवसेनापती आजानुबाहू महारथी सात्यकी तथा युयुधान यांच्याकडे. सहावी अक्षौहिणी आज्ञेत राहील, महारथी चेकितानच्या आणि सातव्या भरारी अक्षौहिणीचं नेतृत्व राहील; महारथी, महावीर आणि महाबली भीमसेनाकडे.”

शिबिरासमोरची सेनापती नियुक्तीची बैठक यावर समाप्त झाली.

मी आणि कृष्णदेव सोबत निवडक सशस्त्र यादवयोद्धे घेऊन टेंभ्याच्या प्रकाशात सेनातलाच्या पार पाठीमागच्या विभागाकडे चाललो. इथे पांडवसेनेची राणीवशाची शिबिरं होती. आम्ही पांडवमाता कुंतीदेवींच्या शिबिरात आलो. इथे पांडवपत्नी द्रौपदीदेवीही होत्या. त्यांच्याभोवती भीमसेन, अर्जुन यांच्या इतर पत्नीही बसल्या होत्या. आत जाताच पांडवमाता कुंतीदेवींची चरणधूळ घेण्यासाठी द्वारकाधीश वाकू लागले. त्यांना पितामहांसारखंच दृढ आलिंगनात घेऊन पांडवमाता म्हणाल्या, “कृष्णा, तू माझ्या अर्जुनाला सेनापतीपदाच्या जोखडात अडकवलं नाहीस, हे फार बरं केलंस. तो अंगच्या विक्रमासाठी सदैव विमुक्त व मोकळाच पाहिजे. तसंच तू त्याला ठेवला आहेस. खरोखरच मला मनोमन वाटतं, जिकडे तू आणि तो आहे, तिकडे धर्म आणि विजय ठरलेलाच.”

कृष्णदेवांनी पांडवपत्नी द्रौपदीदेवींना क्षेमकुशल विचारलं, सुभद्रादेवींच्या मस्तकावर आपला हात प्रेमानं ठेवून आशीर्वाद दिला, ‘आयुष्यमान भव.’

सर्वांचा निरोप घेऊन, सर्व शस्त्रगारांची पाहणी करून, आम्ही पुन्हा कृष्णदेवांच्या शिबिरात आलो. आत येताच कृष्णदेवांनी माझ्यावर एक विशेष कामगिरी सोपविली. म्हणाले, “सात्यकी, आपला सेनापती पांचाल युवराज धृष्टद्युम्न याची एकमतानं निवड झाली आहे. हे तू कुरूंचे सेनापती भीष्म यांच्या कानी घाल.”

तसा मी त्यांचा निरोप घेऊन, सोबतीला हाती पेटते टेंभे घेतलेले दोन यादवसैनिक घेऊन, कुरुसेनेतील पितामह भीष्मांच्या शिबिराकडे चाललो. त्या शिबिराच्या दारातच मला नग्न खड्गधारी पहारेकऱ्यानं थोपविलं. कुरुसेनापतींच्या डेऱ्यात नुकतीच काहीतरी अटीतटीची चर्चा झालेली असावी. अंगराज कर्णाचे निसटते शब्द माझ्या कानी पडले,

"या वृद्ध आणि मला अर्धरथी म्हणणाऱ्या अहंमन्य भीष्मांचं समरांगणात पतन होत नाही, तोपर्यंत मी समरांगणात उतरणारच नाही! माझ्या शिबिरातच सूर्यसाधनेत मग्न राहीन."

पाठोपाठ कुरुसेनापतींच्या शिबिरातून बाहेर पडलेला दिग्विजयी अंगराज कर्ण माझ्या समोरूनच आपल्या शिबिराकडे तरातर निघून गेला. मी कुतूहलानं सेनापती भीष्मांच्या शिबिरात प्रवेशलो. तिथे जमलेल्या राजांच्या व महावीरांच्या कुजबुजत्या चर्चेतून नुकताच झालेला प्रकार माझ्या ध्यानी आला.

पितामह भीष्मांनी कौरवपक्षाकडे महारथी, रथी, अर्धरथी योद्ध्यांची नामावली नुकतीच घोषित केली होती. त्यात त्यांनी दिग्विजयी व भगवान परशुरामांकडून ब्रह्मास्त्र प्राप्त करून आलेल्या अंगराज कर्णाचा एक य:कश्चित अर्धरथी असा सर्वांत शेवटी निर्देश केला होता. कर्णाला ते विलक्षण खटकलं होतं. मलाही ऐकताना खटकलं. कर्णाची प्रतिक्रिया मात्र यावी तशीच बोलकी आली होती. 'भीष्मांचं पतन होत नाही, तोपर्यंत आपण समरांगणात उतरणारच नाही. स्वत:ला महारथी समजणाऱ्या अहंमन्य भीष्मांच्या आज्ञा त्यांच्या हाताखालचा एक य:किश्चित अर्धरथी म्हणून आपण मुळीच मानणार नाही' असं म्हणत तो निघून गेला होता.

हा वृत्तान्त समजताच मी भीष्मांची भेट घेऊन, त्यांच्या कानी पांडवसेनापतीच्या नियुक्तीची वार्ता घालून परतलो. आलो, तो थेट कृष्णदेवांच्या शिबिरातच! ऐकलेला वृत्तान्त त्यांच्या कानी घातला. तसा सुटकेचा नि:श्वास सोडत ते म्हणाले, "कर्ण थांबला? अर्जुनाच्या दृष्टीनं छान झालं. सात्यकी, हेच घडावं म्हणून मी किती खटाटोप केला होता! अमात्य वृषवर्मांकडून पितामहांना निरोप धाडला होता की, 'महारथी कर्णाशिवाय कुरुसेनेत मला कोणीच अन्य महारथी दिसत नाही! आमच्या महारथ्यांसमोर त्यामुळेच तुमची कौरवसेना फारसा टिकाव धरू शकणार नाही.' माझ्या अपेक्षेप्रमाणे पितामहांनी त्या निरोपाला प्रतिसाद दिला आहे. एक शब्द त्यांनी पाळला आहे. भविष्यात त्यांचाही एखादा शब्द मला पाळावा लागेल. बघू इडादेवी त्या वेळी कशी बुद्धी देते ते!"ते कितीतरी गूढ बोलले. मला काहीच समजलं नाही. त्यावर मी काही प्रश्न विचारणार तोच मला तिसरीकडेच नेत ते म्हणाले, "यादवसेनापती चला, आपल्या सात अक्षौहिणी सेनेचा, त्यातील प्रमुख वीर यांचा एकदा क्षेमसमाचार घेऊन येऊ." त्यांनी मला दारुकाला बोलावून घ्यायला सांगितलं. तसं दारुकाला घेऊनच मी त्यांच्यासमोर सादर झालो. ते दारुकाला म्हणाले, "उद्या आपल्या गरुडध्वजाचे चारही अश्व चांगला खरारा करून, त्यांना चंदी देऊन, सालंकृत करून तू स्वत:ते अर्जुनाच्या नंदिघोष रथाला जुंपायचे आहेत. लक्षात घे, त्याच्या रथाचे चारही अश्व माझ्या गरुडध्वजाच्या अश्वांसारखेच पांढरेशुभ्र आहेत. मात्र मला त्यांचा व त्यांना माझा मुळीच सराव नाही. मला उद्यापासून कुरुक्षेत्राच्या समरांगणात चुकूनही वाटता कामा नये की, मी नंदिघोषावर आहे! वाटलं पाहिजे की, मी माझ्या गरुडध्वजच हाकारतो आहे."

समोर हात जोडून उभ्या असलेल्या दारुकाला त्यांनी अधिक सावध सूचना दिल्या. म्हणाले, "आता सैन्य पाहणीसाठी सात्यकीसह निघायचं आहे, ते मात्र अश्वांसह अर्जुनाच्या कपिध्वजाच्या नंदिघोष रथातून! आपले दमलेले घोडे तोपर्यंत पुरेसा विश्राम घेतील. तुला मी बरोबर आणला आहे, तो कुरुक्षेत्रावरचं युद्ध बघण्यासाठी नव्हे. आणला आहे; तो नंदिघोष व गरुडध्वज या दोन्ही रथांच्या देखरेखीसाठी. तुझ्यावर विसंबून माझे

प्रिय शैब्य, बलाहक, मेघपुष्प आणि सुग्रीव हे अश्व जसे विश्राम घेतील, तसा मीही घेणार आहे. दुर्योधनानं मला तुमचा गरुडध्वज रथ व सारथी घेऊन कुरुक्षेत्रावर येऊ नये, अशी काही अट घातलेली नाही!"

दारुकानं 'आज्ञा स्वामी' म्हणत बाहेर जाऊन काही वेळातच अर्जुनाचा सालंकृत कपिध्वजधारी नंदिघोष रथ आणून आमच्या शिबिरासमोर उभा केला. मी, कृष्णदेव, धृष्टद्युम्न, अर्जुन असे त्या रथात चढलो. दारुकानं आता नंदिघोष हाकारला. मध्यरात्रीपर्यंत आम्ही आमच्या सर्व सेनापथकांची बारकाव्यानं पाहणी केली.

मध्यरात्रीला कृष्णदेव आपल्या शिबिरातील अंतःपुरी कक्षातील शयनागारात गेले. काही वेळातच त्या कक्षातून आलेले ईशस्तवनाचे बोल माझ्या कानी पडले —

"ॐ ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यांजगत्।
त्येन त्यक्तेन भुञ्जिथाः मा गृधः कस्यस्विद्धनम्।
ॐ शांतिः शांतिः शांतिः।।"

मी त्यांच्या शिबिराबाहेर पडलो. दूरवर कुरुसेनातळावर पेटते पलिते इकडे-तिकडे नाचताना दिसत होते. बहुधा कौरवसेनापती पितामह भीष्म त्यांच्या अकरा अक्षौहिणी सैन्याची देखरेख करून, त्यांच्या शिबिरात नुकतेच परतले असावेत.

माझ्या शिबिराच्या निकटच आमच्या सेनापती धृष्टद्युम्नाचं शिबिर होतं. इतर पाच विभागप्रमुखांची शिबिरंही रातोरात सेनापतींच्या शिबिराभोवती उठविण्यात आली होती. प्रारंभीची व्यूहरचना, सेनेच्या तत्पर हालचाली, त्यासाठी आवश्यक सर्व प्रमुखांच्या बैठका यांसाठी ही शिबिरांची अशी रचना करण्यात आली होती. विभागप्रमुखांची मूळ शिबिरं त्यांच्या-त्यांच्या सेनाविभागात होतीच. मध्यरात्र टळली असताना आमच्या सेनापतींच्या शिबिराच्या रोखानं कसलातरी कलकलाट ऐकू येऊ लागला. तसा मी शिनी, अवगाह असे मोजकेच यादवयोद्धे सोबतीला घेऊन सेनापतींच्या शिबिराकडे गेलो. त्यांच्या शिबिराच्या दारातच सेनापती उभे होते. त्यांच्या आलिंगनात मला दिसला, तो चक्क दुर्योधनबंधू युयुत्सु हा! धृतराष्ट्रांचा दासीपुत्र असलेला हा कौरव युयुत्सु अन्यायी पक्ष सोडून स्वतःच्या निर्णयानं रातोरात आमच्या पांडवसेनेत उपस्थित झाला होता. धृष्टद्युम्नानं अगत्यानं त्याचं स्वागत केलं. मीही त्याची विचारपूस करून माझ्या शिबिरात आलो. पहाटे अगदी ब्राह्मी मुहूर्तावर सेनापती धृष्टद्युम्नांच्या सेवेत उपस्थित व्हायचं होतं.'इडादेवी नमोऽस्तुते।' म्हणत मी आस्तरणाला पाठ टेकली. क्षणातच माझ्या डोळा लागला. मार्गशीर्ष वद्य द्वितीयेचा दिवस फुटू घातला. ब्राह्मी मुहूर्तावर रानकाक पक्षयांची करकर ऐकतच उठलो. करदर्शन करून 'पादस्पर्शं क्षमस्व मे' असं कुरुक्षेत्राच्या पवित्र भूमीला म्हटलं. शिबिराबाहेर येऊन मुख प्रक्षाळलं. नजीकच्या ज्योतिसरोवरावरून निवडक यादवयोध्यांसह स्नान करून परतलो. माझ्या सेवेसाठी असलेल्या यादवसेवकांच्या साहाय्यानं वक्षावरच्या लोहत्राणासह माझा यादवसेनापतीचा रणवेष अंगी धारण केला. एका सेवकानं माझ्या कमरेला जाड पात्याचं कोटबंद खड्ग आवळलं. पाठीवर विविध बाणांचा तूणीर चढवून त्याची गाठ वक्षावर घेतली. डाव्या खांद्यावर माझं पूजन करून पुष्पमाला बांधलेलं 'इडाप्रसाद' हे धनुष्य चढविलं. उजव्या खांद्यावर माझी नेहमीची प्रशस्त गदा पेलली.

मी शिबिराबाहेर येताच माझ्या अक्षौहिणीतील पंचवीस-एक पथकप्रमुखांनी मला,

'जैऽ इडामाताऽऽ' म्हणत वंदन केलं. मी त्यांचा मेळासह सेनापती धृष्टद्युम्नांच्या शिबिराजवळ आलो. पांडवसेनापतींचं ते गोलाकार भव्य शिबिर कृष्णदेवांनी नेमलेले इतर पाच सेनाप्रमुख व त्यांचे सहकारी यांनी घेरलेलं होतं. इथे पांडवांपैकी एकटा भीमसेन होता. प्रथम आम्ही सात सेनाप्रमुखांनी 'जयऽ कृष्णदेव' म्हणत एकमेकांची वक्षभेट घेतली.

सेनापतींमागून मी, पांचालराज द्रुपद, मत्स्यराज विराट, शिखंडी, चेकितान आणि भीमसेन असे त्यांच्या शिबिरात प्रवेशलो. आत एकीकडे तीन, दुसरीकडे तीन अशी समाकार आसनं मांडली होती. दोन्ही आसनरांगांच्या मध्ये थोडंसं उंच असं सेनापती आसन होतं. सेनापती धृष्टद्युम्न त्यावर बसले. आम्हीही एकेका आसनावर बसलो. आमच्या सेनापतींची रात्रीच आजच्या सैन्यव्यूहाचा विचार करून ठेवला होता. त्या व्यूहाची छोटीशी मृत्तिका–प्रतिकृती त्यांच्या उजव्या हाताशी आस्तरणांवर मांडली होती. आजच्या पहिल्याच दिवशी त्यांनी आपल्या यज्ञकुमार या नावाला शोभेल, अशी यज्ञकुंडाची व्यूहरचना मनी धरली होती. जवळच्या मृत्तिका–प्रतिकृतीवरून त्यांनी ती आम्हा सर्वांना बारकाव्यानं समजावून सांगितली. थोडासा फलाहार घेऊन, सेवकांनी आणलेले धारोष्ण दुधाचे कुंभ रिचवून आम्ही बाहेर पडलो. आपापल्या दलप्रमुखांना आम्ही यज्ञकुंड व्यूहरचना समजावून दिली. त्यांचासह प्रत्यक्ष युद्धभूमीकडे चाललो. शिबिरा–शिबिरांतून उठलेले ज्योती, सत्रेथ अशा सरोवरांत व दृषद्वती, सरस्वती अशा नद्यांत स्नान केलेले सैनिक आपापल्या शिबिरांत परतले होते. शस्त्रागारांच्या संकुलातून आपापलं शस्त्र उचलून परतत होते. या संकुलात वेगवेगळी शस्त्रागारं होती. त्यांतील बाणागारात चंद्रमुख, शिलिमुख, सर्पमुख, गोमुख, गजास्थी, गवास्थी, बस्तिक, अंजलिक जिद्म, सूची, नाराच अग्निपुंख, सुवर्णपुंख, चंद्रपत्ती, सन्नतपर्वव, गृधपत्र, कंकपत्र, नतपर्व भल्ल अशा विविध प्रकारांचे सहस्त्रावधी बाण तूणीरांत भरून एका बाजूला रांगेने मांडले होते. त्यांच्यासमोरच भित्तीला टेकून विविध आकारांची आणि प्रकारांची सुलक्षणी प्रत्यंचेची सहस्त्रावधी धनुष्यं. मंत्रमंडित करून मांडून ठेवली होती.

बाणागारालगतच गदागार होतं. त्यात सूर्यफुलं, कंटककंकण, सूर्यबिंबी अशा विविध प्रकारच्या शेकडो तळपत्या लोहगदा सुवर्णवर्ख देऊन रांगेत मांडल्या होत्या.

अशीच खड्गागारात लहान–मोठी कोटबंद नग्न अशी सहस्त्रावधी धारदार खड्गं, ढाली आणि उंच दंडात बसविलेले भाले रांगेनं मांडले होते.

यानंतर चक्र, अंकुश, मुसल, भृशुंडी, शतघ्नी, तोमर अशा प्रत्येक शस्त्राची वेगवेगळी आगारं होती. शस्त्रागारांच्या या संपूर्ण संकुलाला सशस्त्र सैनिकांचा घेर फिरला होता. शिबिरा–शिबिरांतील सुस्नात सैनिक रांगेनं या शस्त्रागार संकुलाकडे सरकत होते. आपापली शस्त्रं त्या–त्या कक्षाच्या प्रमुखाकडून पारखून स्वीकारत होते. ते अंगावर धारण करीत होते. कक्षात येणारा प्रत्येक जण सैनिक म्हणून प्रवेशत होता. बाहेर पडताना मात्र शस्त्रसज्ज योद्धा म्हणून बाहेर पडत होता.

आम्ही सर्व सेनाप्रमुखांनी आपापल्या शस्त्रवार विभागलेल्या सेना प्रमुख सेनापती धृष्टद्युम्नांसमोर आणून उभ्या केल्या. आता सेनापती महावीर धृष्टद्युन्मांच्या कितीतरी चपळ हालचाली सुरू झाल्या. त्यांनी आम्हा सहाही जणांच्या हाताखाली पांचालांचे उत्तमौजा, व्याघ्रदत्त, सिंहसेन, सत्यजित व विराटांचे शतानिक, वसुदान,

उत्तर आणि श्वेत असे तरुण योद्धे दिले. आपल्या हाताखाली सुमित्र, प्रियदर्शन, ध्वजकेतू, चित्रकेतू, वीरकेतू, सुकेतू, सुरथ आणि शत्रुंजय असे वीर बंधू घेतले.

महारथी धृष्टद्युम्नांच्या कल्पक नेतृत्वाखाली आमच्या पांडवसेनेची यज्ञकुंडाकृती व्यूहरचना तयार झाली.

आमची सेना होती, एकूण पंधरा लक्ष तीस हजार नऊशे सैनिकांची! आमच्याबरोबर मध्ये पुरेशी मोकळी जागा सोडून कौरवांची प्रचंड सेना पितामह भीष्मांनी मकराकृती व्यूहरचनेत मांडली होती. कौरवसेनेचे एकूण सैनिक होते, चोवीस लक्ष पाच हजार सातशे! पितामहांनी या सैन्यासाठी स्वत:सह अकरा विभागप्रमुख नेमले होते. ते होते कृतवर्मा, भगदत्त, जयद्रथ, दुर्योधन, शल्य, द्रोण, शकुनी, शुशर्मा, भूरिश्रवा आणि कृप! या प्रत्येकाच्या हाताखाली एक अक्षौहिणी सेना लढणार होती.

कुरुसेनेच्या अकरा अक्षौहिणी शस्त्रसज्ज सैनिकांची सेनापती पितामह भीष्म यांनी अत्यंत कौशल्याने रचना केली होती. त्यांच्या सेनेत द्रोण, कृप, जयद्रथ, शकुनी, अश्वत्थामा, दुर्योधन, दु:शासन, शल्य, विविंशती, भगदत्त, भूरिश्रवा, सुशर्मा, विकर्ण, चित्रसेन, दु:सह, पुरुमित्र, सत्यव्रत आणि जय असे पट्टीचे महारथी योद्धे होते. आपापल्या रथदलाच्या अग्रभागी शस्त्रसज्ज रणवेषात ते वक्ष फुलवून आपल्या सेनापती पितामह भीषांच्या रथाकडे आक्रमणाच्या संकेतासाठी बघत रथात उभे होते. त्यांच्या रथांचे विशाल घेर विविध प्रकारचे बाण भरलेले तूणीर, निरनिराळ्या आकारांची धनुष्य, गदा, खड्ग, मुसल, भाले, चक्र, अग्निकंकण अशा विविध शस्त्रांनी ठासून भरले होते.

काही-काही रथांत भृशुंडी आणि शतघ्नी अशा पाषाणफेकीच्या थोराड गोफणी बसविल्या होत्या. त्यांच्या प्रक्षेपणासाठी ते–ते रथ वेगवेगळ्या आकाराच्या पाषाणगुंडांनी तुडुंब भरले होते. काही रथांना तेरा, काहींना अकरा, काहींना नऊ, सात, चार व कमीत कमी दोन अश्व जुंपलेले होते. रथांचे अश्व सम उंचीचे असतील अशी कटाक्षानं दक्षता घेतली गेली होती. काही रथांना दहा, काहींना आठ, काहींना सहा, चार व दोन अशी समांतर उंचीची किकराची भव्य रथचक्रं होती. महारथ्यांच्या रथचक्रांचं संरक्षण करण्यासाठी वेगवेगळी सेनापथकं होती. पितामह भीष्मांचा गंगौघ रथ दहा रथचक्रांचा आणि आठ पांढऱ्याशुभ्र पुष्ट कंबोजी अश्वांचा होता. त्यांच्या रथावर तालध्वज डौलात फडफडत होता.

पितामहांनी आपल्या सेनेच्या डाव्या–उजव्या अंगाच्या फळ्या प्रचंड गजदलातील सालंकृत गज एकापाठोपाठ एक उभे करून बळकट व अभेद्य करून टाकल्या होत्या. या गजांच्या अंबाऱ्याही विविध शस्त्रांनी भरलेल्या होत्या. कौरवसेनेच्या मकराच्या मुखावरच स्वत: कौरव सेनापती भीष्म खांद्यावर धनुष्य पेलून उभे होते. त्यांची भरगच्च पांढरीशुभ्र दाढी वाऱ्यावर मंद-मंद फरफरत होती. त्यांच्या उजव्या हाताशी द्रोण, दुर्योधन, दु:शासन, शकुनी, सर्व कर्णबंधू व कर्णपुत्र, डाव्या हाताशी कृप, अश्वत्थामा, कृतवर्मा, जयद्रथ, शल्य असे रणोत्सुक महारथी आपापल्या रथात होते. त्यांच्या पाठच्या रांगेत त्रिगर्त राज्याचा संशप्तक सुशर्मा रथारूढ होता. त्याच्या दुहाती त्याचे बंधू सत्यरथ, सत्यधर्मन, सत्यवर्मन, सत्यकर्मन, सत्येषु हे विख्यात संशप्तक होते. हे संशप्तक आणि त्यांचे अनुयायी वीर प्रतिज्ञेवर एखाद्या पथकाचा वा योध्द्याचा वध करण्यात प्रसिद्ध होते. पितामहांनी आपलं प्रचंड उष्ट्र, अश्वदल या सर्वांच्या मागे

मकराच्या उदरासारखं पेरत नेलं होतं. मकराच्या शेपटाकडे पदाती आणि काही एकेरी अश्वसाद होते.

कौरवांच्या या सेनेत क्षेमधूर्ती, विंद–अनुविंद, अपराजित, उलूक, सहदेव, भगदत्त, लक्ष्मण असे अतिरथी व कुहर, कर्काक्ष, गवाक्ष क्रथ, अंबष्टक, आर्जव असे अर्धरथी, कोशल देशीचा बृहद्बल, कलिंगराज भानुमान आणि त्याचा पुत्र शक्रदेव, निषधराज केतुमान, श्रुतायु, कपिश, कांबोज आणि गांधार या तिरफळी राज्यांचे सुदक्षिण, सुबलपुत्र असे महायोद्धे पितामहांनी आपल्या सेनेत जागोजागी पेरून ती कुठूनही अभेद्यच राहील, याची काटेकोर दक्षता घेतली होती.

आज ब्राह्मी मुहूर्तावर उठलेल्या कौरव–सेनापती पितामह भीष्मांनी सूर्यसरोवरात स्नान केलं होतं. नेहमीच्या सेवकांकडून वक्षावर अभेद्य लोहत्राण चढवून घेतलं होतं. सर्वांगावर वेगवेगळी शस्त्रं धारण केली होती. त्यांच्या कंठात गुडघ्यापर्यंत उतरलेली शुभ्र फुलांची सेनापतीमाला शोभून दिसत होती. लोहत्राणावर रूळणाऱ्या भरगच्च पांढऱ्या दाढीशिवाय त्यांच्या आवतीभोवतीसुद्धा वृद्धत्वाचं कसलंही लक्षण दिसत नव्हतं. कुरूच्या पुरोहितांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे त्यांनी रणभूमी धर्मक्षेत्र कुरुक्षेत्राचं सविध पूजन करून घेतलं होतं.

आमची पांडवसेनाही सेनापती पांचालयुवराज धृष्टद्युम्नाच्या नेतृत्वात सिद्ध झाली होती. या सेनेत माझ्यासह पाचही विभागप्रमुखांनी आपापल्या जागा घेतल्या होत्या. आमच्या सात अक्षौहिणी सेनेची यज्ञकुंडाकृती व्यूहरचना सिद्ध झाली होती. आमच्या सेनापतीच्या उजव्या हाताशी पांचालराज द्रुपद, मत्स्यराज विराट, चेकितान, शिखंडी, पांडवसेनेसह भीम, त्याचे युधिष्ठिर, नकुल, सहदेव असे तीन बंधू आपापल्या रथावर आरूढ होऊन उभे ठाकले. आमच्या पाठीशी पांचालांचे राजपुत्र व्याघ्रदत्त, सिंहसेन सत्यजित व विराटपुत्र शतानिक, वसुदान, उत्तर व श्वेत रथारूढ झाले. त्यांच्यामागे पौरव, मालव, सुदर्शन असे राजे, द्रुपदपुत्र सुमित्र, प्रियदर्शन, चित्रकेतू, सुकेतू, ध्वजकेतू, वीरकेतू, सुरथ, शत्रुंजय रथारूढ झाले.

भीमसेनाच्या पाठीमागे युधिष्ठिरपुत्र प्रतिविंध्य, भीमपुत्र सुतसोम, घटोत्कच, अर्जुनपुत्र श्रुतकीर्ती, इरावान व बभ्रुवाहन, नकुलपुत्र शतानिक व सहदेवपुत्र श्रुतसेन ही पांडवांची दुसरी फळी रथारूढ झाली.

आमच्या सेनापती धृष्टद्युम्नानंही पांडवपुरोहित धौम्य ऋषींच्या मार्गदर्शनाप्रमाणे धर्मक्षेत्र कुरुक्षेत्राचं सविध पूजन करून घेतलं. आता कौरव–पांडव सेनेचे दोन अविरत गर्जते महासागार एकमेकांसमोर जीवघेण्या युद्धासाठी उभे ठाकले. एकमेकांच्या सामर्थ्याचा वेध घेत गिरनारच्या कडेकपारीतील दोन भरगच्च आयाळींचे वनराज अविरत पंजेफाडीसाठी डरकाळत एकमेकांसमोर उभे ठाकावेत, तसं ते दृश्य होतं.

दोन्ही पक्षांकडील लाखो रणोत्सुक सशस्त्र योद्धे या महायुद्धरूपी महायज्ञाच्या अध्वर्यूची – आमच्या कृष्णदेवांची आणि त्यांचा शिष्योत्तम अर्जुन व त्याच्या नंदिघोष रथाची प्रतीक्षा करीत होते.

आज कृष्णदेव नेहमीसारखे ब्राह्मी मुहूर्तावरच उठले होते. अर्जुन आणि नेहमीचे विश्वासू यादवसेवक संगती घेऊन जवळच असलेल्या ज्योती सरोवरावर आले होते.

सरोवरात एक डुबकी मारून, अद्याप दिवस उजाडायचा असतानाही उगवू घातलेल्या सूर्यदेवांना डोळे मिटून त्यांनी अर्घ्य दिलं होतं. स्नान आवरून शिबिरात येताच नित्याची

आन्हिकं आवरली होती. ती आवरताना आज कधी नव्हे, एवढी त्यांची शिवध्यानात लय लागली होती. म्हणूनच त्यांना समरभूमीवर यायला हा एवढा समय लागला होता.

दूरवरून अर्जुनाच्या नंदिघोष रथावरच्या कपिध्वजाचा हातभर ठिपका येताना दिसला आणि आमच्या पांडवसेनेत चैतन्याचा लोळच लोळ उसळला.

भीमसेनाच्या अक्षौहिणीच्या मुखावर अर्जुनाच्या नंदिघोष रथाची जागा रिती होती, ती घेण्यासाठी चार पांढऱ्याशुभ्र अश्वांचा नंदिघोष रथ आमच्या सेनेकडे येत होता. मी ते अश्व अचूक पारखले!

कृष्णदेवांनी नंदिघोष अर्जुन व त्याचे शस्त्रसाहाय्यक यांच्यासह अणून पांडवसेनेत उभा केला. हातातील वेगांना त्यांनी एक सूचक झटका देताच त्यांच्या नेहमीच्या सरावाच्या चारही अश्वांनी पुढचे खूर उंचावून खिंकाळत प्रतिसाद दिला. नेत्रपातं लवायच्या आत कृष्णदेवांनी आपल्या शेल्यात गुंथलेला टपोरा, सुलक्षणी पांचजन्य आपल्या ओंजळीत घेतला. आपली ग्रीवा गगनगामी उंच उठवून प्राणदेठापासून तो फुंकणार, म्हणून आम्हा सर्वांच्या अंगावर रणरोमांच उठले. कुणी धनुष्य, कुणी गदा कुणी खड्ग आपापलं शस्र पेलून धरलं. समोरच्या पंचवीस लक्ष सेनेवर धनुर्धर धनंजयानं नंदिघोषातून एक दृष्टी फिरविली आणि काय झालं कुणास ठाऊक, त्यानं हाती पेललेलं गांडीव धनुष्य चक्क गळून पडताना मी पाहिलं! एवढंच नाही, दुसऱ्याच क्षणी आपल्या डाव्या हातानं त्यानं कृष्णदेवांच्या पांचजन्याला थोपवून 'नाहीऽ – नाहीऽ – मी लढू शकत नाहीऽ' अशा अर्थाची डावी-उजवी मान डोलवून तो मटकन खालीच बसला.

वीर अर्जुन हताश होऊन नंदिघोषाच्या मागील घेरातील बैठकीवर चक्क बसलेला सर्वांना दिसू लागला. तो एकसारखी नकाराची मान हलवून कृष्णदेवांना काहीतरी सांगत होता. मध्येच हाताची ओंजळ जोडून आर्जवं करताना दिसत होता. नंदिघोषावर कोणतं रणनाटच चाललंय कुणालाही काहीच समजत नव्हतं. दोन्ही सेनेतील चाळीस लक्ष शस्त्रसज्ज योद्धे चुळबुळत तटस्थ उभेच होते. सर्वांना कृष्णदेवांनी आपल्या चारही अश्वांचे आठ वेग पायांशी ठेवलेले दिसले. आता त्यांनी आपला पुढा हताश, गलितगात्र अर्जुनाकडेच वळविला होता. आपली सर्वसमावेशक दृष्टी त्याच्या व्याकूळ पाणावलेल्या दृष्टीत रोखली होती. ते मला नेहमी सांगत आले होते, 'आचार्य सांदीपनींच्या आश्रमात आचार्यांनी माझ्या दृष्टीत दृष्टी रोवून शक्तिपातानं मला जो अमोघ कृपाशीर्वाद दिला, तो मी कधीच विसरू शकलो नाही!' तसंच काहीतरी आताही चाललं असावं.

कृष्णदेव मध्येच आपल्या आजानुबाहूच्या नीलवर्णी सडक बोटांचा तळवा अर्जुनाच्या लोहत्राणधारी भक्कम स्कंधावर थोपटत होते. मध्येच उजव्या हाताची तर्जनी त्याच्यावर रोवून धडाधड काहीतरी बोलत होते.

अर्धी घटका झाली. रणज्वर असह्य झालेल्या दोन्हीकडच्या लक्षावधी शस्त्रसज्ज योद्ध्यांत आता चुळबुळ माजत चालली. चौखूर थयथयाट करणारे अनावर अश्व खिंकाळू लागले. जागीच डुलणारे प्रचंड गज सोंडा ऊंचावून चीत्कारू लागले. कुणालाच काहीही कळत नव्हतं की, युद्ध का थांबलं आहे!

अर्जुनाला सांगून-सांगून कृष्णदेव श्रमले होते. जवळ-जवळ घटिका संपली होती. त्यांनी आपला पुढा पुन्हा अश्वांकडे वळविला होता. पायींचे वेग ऊंचावून ते हातांत पेलले होते. जीव पिळवटून टाकणाऱ्या एका आशंकेने मी कळवळलो. ते आता नंदिघोष

रणाबाहेर काढणार होते की काय? माझ्या रथातून अनावर तिडिकेनं झेप घेत मी खाली उतरलोही. धावतच नंदिघोषाजवळ आलो. माझ्या कानांवर कृष्णदेवांचे निर्धारी बोल पडले –

"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मामू नमस्कुरु।....
.... अहं त्वाम् सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि – मा शुचः।

ते वासुदेवबोल ऐकून मात्र अर्जुनाची चर्या पूर्ववत तळपून उठली होती. त्याच्या चर्येवरून वीर धनुर्धराचा आवेश आता पुनश्च ओसंडून चालला होता. पायी पडलेलं गांडीव धनुष्य निर्धारानं उचलताना तो म्हटल्याचं मी स्पष्ट स्पष्ट ऐकलं की –

"नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा।
स्थितोऽस्मि गतसंदेहः।
करिष्ये वचनं तव।।'

"अच्युता! तुमच्या उपदेशाच्या प्रसादानं माझा सर्व मोह आता नष्ट झाला आहे. मला माझ्या कर्तव्यधर्माची पुन्हा जाण आली आहे. आता निःसंदेह झालेला मी तुमच्या इच्छेप्रमाणे युद्धच करेन!" ते वीरोचित उद्गार ऐकून कृष्णदेवांची जी फुललेली मुद्रा मी पाहिली, तशी पूर्वी कधीच पाहिली नव्हती.

मला रथारूढ होण्याचा अंगुलिआदेश करून त्यांनी आपला सुलक्षणी शुभ्रधवल पांचजन्य शंख आता मात्र निर्वाणीच्या निर्धारानं फुंकला!!

निघाला तो ध्वनी इतका प्रणवसंपन्न होता की, दोन्ही सेनेतील लाखो अश्वांनी आपल्या शेपट्या उभारून कान टवकारले. हत्तींनी सोंडांची रणशिंगं उभवून रोमांचक चीत्कार उठविले. ज्यांना-ज्यांना तो पांचजन्य नाद ऐकू आला, त्यांच्या-त्यांच्या अंगावर रोमांच उठले. एव्हाना सूर्यदेव हातभर वर आले होते. श्रीकृष्णदेवांनी नंदिघोषाचे आठही वेग उचलले – निःशस्त्र सारथी म्हणून!

कृष्णदेवांचा पांचजन्याचा शंखनाद ऐकताच पितामहांनी आपला गंगनाभ शंख तेवढ्याच प्राणपणानं फुंकला, प्रत्युत्तर म्हणून आमच्या सेनापती पांचालराज धृष्टद्युम्नानं आपला यज्ञदत्त नामक शंख फुंकला. पाठोपाठ अर्जुनानं देवदत्त, युधिष्ठिरानं अनंतविजय, भीमानं पौंड्र, नकुलानं सुघोष व सहदेवानं मणिपुष्पक अशा दिव्य शंखांचे नाद एकापाठोपाठ एक असे उठविले. ती शंखनाद लय पकडून दोन्ही सेनांच्या विभागप्रमुखांनी आपापल्या सेनेला रणचेतना देणारे नानाविध शंखनाद उठविले. पाठोपाठ ठिकठिकाणच्या रणवाद्य पथकांनी रणभेरी, रणदुंदुभी, रणहलग्या रणनगारे, रणशिंगं अशा कितीतरी रणवाद्यांचा कसा हलकल्लोळच कल्लोळ उठविला. तो ऐकताच अगोदरच खिंकाळणारी अश्वपथकं, चीत्कारणारी रथदलं, उष्ट्रपथकं, अधिकच त्वेषानं गर्जू लागली. त्यात जमलेल्या वेगवेगळ्या गणराज्यांच्या सैनिकांचे कंठनाद फोडून उठविलेले 'आऽरूढ, आरोऽऽह, आऽचल, आऽक्रमऽऽ' असे अगणित रणघोष मिसळले. चाळीस लाख योद्ध्यांच्या एकमेकांवर तुटून पडताना होणाऱ्या विविध शस्त्रांचा खणखणाट, ठणठणाट त्या आवाजात एकदमच मिसळून गेला.

दोन्हीकडच्या सैनिकांचा, शस्त्रांचा, वाद्यांचा, चेतनाघोषांचा, पशूंचा असा वेगळाच संमिश्र तुंबळ रणनाद कुरुक्षेत्राच्या आसमंतात कसा कोंदून राहिला. पितामह भीष्म आणि धृष्टद्युम्न यांचे सेनापती रथ ध्वजदंडांवरील ध्वज फरफरवीत झेपावले.

कुरुक्षेत्राच्या पावन समरभूमीवर कृष्णदेवांनी मांडलेले न्याय-अन्यायाचा निवाडा करणारं, सत्य-असत्याचा रोकडा प्रत्यय देणारं, आर्यावर्तातील 'न भूतो न भविष्यति' अशा महायुद्धरूपी महायज्ञाचं यज्ञकुंड धडधडत पेटलं.

या महायज्ञाचा शेवट काय होणार होता, निर्णय काय लागणार होता, हे एकटे श्रीकृष्णदेवच जाणोत. यातून मानवजातीसाठी पिढ्यान्पिढ्या जतन करावीत अशी कोणती जीवनमूल्यं उभारून येणार होती, तेही भगवान वासुदेवच जाणत होते. या महायुद्धात लढणाऱ्या प्रत्येक लहानथोर जिवाला मात्र नक्कीच माहीत झालं होतं की, हे कौरव-पांडवांचं राज्यासाठी वा स्त्रीच्या लज्जेसाठी वा केवळ दुष्टांच्या निर्दालनासाठी चाललेलं नुसतं महायुद्ध नव्हतं, त्याहून ते अधिक काहीतरी व कितीतरी होतं!

प्रलयकालचे अक्राळविक्राळ गर्जते दोन प्रचंड काळमेघ एकमेकांवर आदळावेत तशा दोन्ही शस्त्रसज्ज सेना एकमेकींवर एकदाच्या कोसळल्या. एवढ्या प्रचंड गदारोळातही आपली अवजड गदा कुरुक्षेत्राच्या अवकाशात नाचवीत भीमसेनानं फोडलेली भेदक डरकाळी स्पष्ट ऐकू येऊ लागली. तिचा पहिलाच धक्का एवढा असह्य होता की, सर्वांत प्रथम प्रत्यक्ष त्याचाच सारथी विशोक अंगभर दचकला! क्षणभर देहभर थरथरला. त्याच तिडिकेतून त्यानं भीमसेनाचा रक्तवर्णी सात अश्वांचा प्रचंड शस्त्रसंपन्न रथ सरसरून सर्वांपुढे काढला.

दुर्योधन आणि त्याचं सर्वांत प्रथम सूर्याला आच्छादून टाकणारं शर-चापाचं घनघोर द्वैरथ युद्ध माजलं.

आता तारुण्यानं मुसमुसलेले यापूर्वी विक्रमाला कुठेच वाव न मिळालेले द्रौपदीदेवींचे पाचही पुत्र अटीतटीनं कौरवसेना फोडत चालले. धर्मपुत्र प्रतिविंध्य, भीमपुत्र सुतसोम, अर्जुनपुत्र श्रुतकीर्ती, नकुल-सहदेवपुत्र शतानिक व श्रुतसेन या पाच पांडवपुत्रांची पाच पर्वतरांगांसारखी सलग फळी एकमेकांना संरक्षण देत, शत्रुसैनिकांची शिरकमळं उडवीत चेतक रणघोष देत क्षणाक्षणानं पुढे सरकू लागली. सुतसोमाच्या हातात पित्यासारखीच अवजड गदा होती. तो गदेच्या युद्धात कुणालाच आवरत नव्हता. श्रुतकीर्ती शर-चापाचा इतक्या लाघवानं वापर करीत होता की, तो बोटांच्या नुसत्या स्पर्शानं वेगवेगळे शर केव्हाच ओळखत होता, एकाच वेळी पाच-पाच शरांचं प्रक्षेपण कसं करीत होता, काहीच कळत नव्हतं. ज्या दिशेला मुख असेल, त्याच्या उलटच्या दिशेलाही तो अचूक लक्ष्यभेद साधत होता.

भीष्मांच्या गंगौघ रथावरून त्यांच्या एवढ्याच उंचीच्या पुष्पमंडित धनुष्यातून एका मागोमाग एक शेकडो अमोघ बाण सुंकारत सुटू लागले. त्यांचं लक्ष्य होता, एकटा पांडववीर धनुर्धर अर्जुन. अर्जुनानं दूरवरूनच प्रथम त्यांना नम्र अभिवादन केलं. आता त्यानं शुभ्र टपोऱ्या पुष्पमालांनी मंडित आपलं सुलक्षणी, अपराजित गांडीव धनुष्य तोलून धरलं. त्याच्या टणक प्रत्यंचेचा झणकारता टंकार एकदा उठविला. तो आमच्या द्वारकेला घेरून सतत ऐकू येणाऱ्या समुद्रगाजेसारखा दूरवर पसरत गेला. एवढं करताना चालून आलेले भीष्मशर त्यानं मान वाकडी करून, वाकून कौशल्यानं चुकविले होते. जसं काही बालपणी अंगाखांद्यांवर खेळविलेल्या पूज्य पितामह भीष्मांच्या या प्रारंभीच्या दहा-एक शरांना आदरानं अभिवादनच केलं होतं त्यानं! खरोखरच तो अर्जुन होता! त्यानं अभिजात विनयाचंही अर्जन केलं होतं. पितामह भीष्मांचा तो त्यांना शोभेलसा पौत्र

अर्जुन होता.

आता त्यानं एकदा तोललेलं त्याचं अशरण गांडीव धनुष्य स्पष्ट निर्णय लागेपर्यंत थांबणार नव्हतं. प्रथम अर्धा घटिका भीष्मांचे नानाविध अरोध बाण त्यानं नुसता प्रतिकार करून, थोपवून निष्प्रभ करून पाडले.

मी आणि माझे निवडक यादवयोद्धे यांच्यावर प्रामुख्याने दायित्व होतं, ते अर्जुनाच्या नंदिघोषाच्या रथचक्रांच्या संरक्षणाचं. त्यामुळे माझा रथ सतत कृष्णदेव सारथ्य करीत असलेल्या नंदिघोषाच्या ध्वजावर ध्यान ठेवून आवतीभोवतीच फिरणार होता. त्यांच्या समरभूमीवरच्या सर्व बारीकसारीक हालचाली मला जवळून बघायला मिळणार होत्या. आजवर जीवनाच्या रणात मी त्यांचे अनेक गुणविशेष जवळून पाहिले होते. कधी–कधी त्यातील गगनभेदी बौद्धिक उंची बघून मी थक्क झालो होतो. दिपून गेलो होतो.

कुरुक्षेत्रावरच्या या महायुद्धाच्या पहिल्याच दिवशी सूर्य थेट मस्तकावर आला असताना मी मनोमन ठरवून टाकलं – बारकाव्यानं लक्ष देत धनुर्धर अर्जुनाच्या रथचक्राचं आटोकाट रक्षण करायचं आणि बुद्धी सावध ठेचून काहीही न बोलता, रोज घडणाऱ्या कृष्णदेवांच्या बुद्धिचक्राचं निरीक्षण करायचं. तेच मला भावी जीवनात अधिक उपयुक्त ठरणार होतं.

आमचा महारथी कृतवर्माच सर्वप्रथम नंदिघोषावर चालून आला. मी माझ्या रथदलासह पुढे होत त्याला अंगावर घेतलं. मूळ द्वारकेचे असून, यदुवंशीय असून कुरुक्षेत्रावर आमचं तुंबळ युद्ध जुंपलं.

मनात वर्षानुवर्षांचा व्यक्तिगत संताप असलेल्या दुर्योधनानं भीमसेनावर आक्रमण केलं. भरतीच्या सागरानं अंगावर चालून आलेला पाणओढा दूर फेकून द्यावा, तसं भीमसेनानं ते काही वेळातच फेकून दिलं. अर्जुनपुत्र तरुण अभिमन्यूनं अनुभवी कोसलाधिपतीशी चिवट युद्ध मांडलं. दु:शासनानं मात्र आमच्या सौंदर्यवान नकुलाला आपल्या बाणांनी संत्रस्त केलं. रक्तवर्णी नकुलाच्या देहात घुसलेल्या दु:शासनाच्या बाणांनी तो ग्रीष्मातल्या फुलत्या पलाश वृक्षासारखा दिसू लागला. कृष्णदेवांनी कितीतरी चापल्यानं नंदिघोष रथ त्याच्या दृष्टिक्षेपात नेला. घायाळ नकुलाला त्याच्या स्वत्वाचं भान देत नंदिघोषावरूनच कृष्णदेव त्याला म्हणाले, "नकुलाऽ— नावाप्रमाणेच दिसतो आहेस! नुकत्याच सर्प लोळविलेल्या नकुलासारखा – मुंगसासारखा! द्रौपदीला डसणारा तो सर्प – दु:शासन तुलाही डसतो आहे. भिऊ नको!" त्या कृष्णबोलांनी किमया केली. घायाळ नकुलानं आपलं धनुष्य पेलून हां–हां म्हणता दु:शासनाच्या मस्तकीचा किरीट कुरुक्षेत्राच्या आसमंतात उडवून भुईवर पाडला.

पांडवसेनापती धृष्टद्युम्न द्रोणांच्या सेनेवर लढाऊ पांचालांचं पाठबळ घेत तुटून पडला. त्याच्या पित्यानं – द्रुपदांनी पूर्वी केलेल्या दारिद्र्याच्या कुचेष्टेने खवळलेल्या द्रोणांनी द्रुपदपुत्र धृष्टद्युम्नाच्या धनुष्याचे तुकडे करून टाकले. आमचा महारथी शिशुपालपुत्र धृष्टकेतू बाल्हिकावर चालून गेला होता. पित्यासारख्याच थरारक रणगर्जना करीत भीमपुत्र घटोत्कच अलंबुषावर तुटून पडला होता. शिखंडी आणि अश्वत्थामा, विराट आणि भागदत्त, द्रुपद आणि जयद्रथ यांची घनघोर युद्धाची तुंबळ माजली होती. युधिष्ठिरपुत्र प्रतिविंध्यावर गांधारनरेश शकुनी आपल्या दहा बंधूंसह चालून आला होता.

आता पहिल्या दिवसाची दुपार कलतीला लागली. कौरवांच्या कृतवर्मा, कृप, दुर्मुख, शल्य आणि विविंशती या पाच वीरांनी भक्कम पाठबळ दिलेले सेनापती पितामह भीष्म, आमच्या पांडवसेनेचा डोळ्यांदेखत कधीही भरून न येणारा पाडाव करू लागले. मृगाच्या सुसाटलेल्या वाऱ्यानं डेरेदार आम्रवृक्ष झोडपून काढावा, त्यावरची शेकडो आम्रफळं पटापट धरतीवर लोळवावीत, तसे खवळलेले पितामह भीष्म आपल्या अमोघ बाणांनी आमचे पांडव सैनिक धरतीवर लोळवू लागले. त्यांचा गंगौघ रथ नावाप्रमाणेच हिमालयाच्या कडेकपारीतून गंगेचा ओघ मनसोक्त धावावा, तसा आमच्या पांडवसेनेत कुठेही संचारू लागला. ते पाहून संतापलेला अभिमन्यू पुढे झाला. त्यानं एका बाणानं पितामहांना कडं केलेल्या कृतवर्म्याचा ध्वज मोडला. पाच बाणांनी शल्याला जखडून टाकलं. एका सन्नतपर्व बाणानं दुर्मुखाच्या सारथ्याचं शिर उडविलं. एक नागमोडी जिह्म बाण प्रक्षेपून कृपाचार्यांचं धनुष्यही अचूक तोडून टाकलं. आता पितामहांभोवतीचं पंचकडं खिळखिळं झालं.

तरुण अभिमन्यूचा तो थक्क करणारा विक्रम पाहून पितामह भीष्म त्यांच्या गंगौघ रथात क्षणभर स्थिर झाले. अभिमन्यूकडे भावभरला कौतुकाचा कटाक्ष टाकून म्हणाले, 'जयतु – पार्थपुत्रा, वीर अभिमन्यू, विजयी भव!' या काळात कुठून– कुठून आलेले शर त्यांनी चपळ हालचाली करून वक्षावरच्या लोहत्राणावर घेत निष्प्रभ करून टाकले होते.

पितामहांच्या डाव्या बाजूच्या रणक्षेत्रावर विराटपुत्र उत्तर आणि मद्रराज शल्य यांचं घनघोर युद्ध जुंपलं होतं, उत्तर एका उंच व बलाढ्य हत्तीवरच्या अंबारीत बसला होता. त्याच्या पाठीशी विराटांची सेना लढत होती. उत्तरानं आपला गज माहुताला शल्याच्या रथावर सोडण्यास सांगितला. माहुत निष्णात होता. त्यानं हत्तीच्या कानामागे अंकुशमार देऊन हत्ती बाण फेकणाऱ्या थेट शल्याच्या रथाला नेऊन भिडविला. त्या प्रचंड हत्तीनं सोंडेच्या तडाख्यांनी शल्याच्या रथाचे घोडे झोडपून काढले. त्याच्या सारथ्याला सोंडेत धरून गोल गरगर फिरवून दूर भिरकावून दिलं. हताश झालेल्या शल्यानं मोडक्या रथातून एक सर्पतुल्य लोहमय शक्ती उत्तरावर सोडली. उत्तराचं लोहत्राण फोडून ती त्याच्या हृदयात शिरली. रणघोष देणारा लढता विराटपुत्र उत्तर, हत्तीवरून खाली कोसळला. तडफडून गतप्राण झाला. तसा आमच्या सेनेत हाहाकार माजला.

हे बघून उत्तराचा बंधू श्वेत शल्यावर त्वेषानं चालून गेला. त्याला जयत्सेन, रुक्मरथ व अनुविंद आडवे आले. शल्याच्या मदतीसाठी आलेल्या पितामह भीष्म आणि उत्तरबंधू श्वेत यांचे युद्ध पेटले.

विराटपुत्र वीर श्वेतानं पांडवांच्या वतीनं आज पहिल्या लक्षणीय विक्रमाची नोंद केली. त्यानं कौरवसेनापती अजिंक्य धनुर्धर परशुरामशिष्य भीष्मांचं धनुष्य सर्वप्रथम तोडून टाकलं. ते पाहून चेतलेल्या पांडवसैनिकांनी वीर श्वेताच्या नावाचा 'विराटपुत्र श्वेत जयतु – जय हो!' असा विजयनाद घुमविला. तो ऐकून देवव्रत भीष्म संतापले. त्यांनी दुसरं धनुष्य घेतलं. पहिल्याच प्रक्षेपणात श्वेताच्या रथाचे सर्व घोडे मारले. पाठीमागच्या एका बाणानं त्याच्या सारथ्याचं मस्तकही उडविलं. तसं विद्ध झालेल्या श्वेतानं एक अतिउग्र शक्ती भीष्मांवर फेकली. ती अचूक पारखून भीष्मांनी बाणांचं एक अष्टक अशा काही रचनेत फेकलं की, त्यानं ती शक्ती कोंडून, निष्प्रभ करून भुईवर

पाडली.

आता सांजावत आलं. सूर्याचं तेजतबक पश्चिम क्षितिजाला येऊन टेकलं. पहिल्या दिवसाच्या युद्धसमाप्तीचे काहीच क्षण शिल्लक उरले असताना, भीष्माचार्यांनी ब्रह्ममंत्रानं भारलेला एक लखलखीत बाण विराटपुत्र श्वेतावर सोडला. तो श्वेताचं वक्ष भेदून गेला. श्वेत आपल्या रथातच गतप्राण होऊन पडला. सूर्य मावळला. युद्ध थांबलं.

मार्गशीर्ष वद्य द्वितीयेच्या संध्येच्या लांबट छाया कुरुक्षेत्रावर पसरल्या. सरोवरांनी युक्त या रम्य हिरव्यागार प्रदेशातील रोज कलकलणारे अनेकविध पक्षी, आज सकाळीच थरकविणारा रणनाद ऐकून दूर कुठेतरी परागंदा झाले होते – सदासाठी. काही घरट्यांत त्यांची चिमणी पिलं चोच वासून माता-पित्यांची केकाटत वाट बघून थकली होती. माना टाकून निपचित पडली होती. या कुरुक्षेत्रावरच्या सूर्यकुंडात सूर्यग्रहणादिवशी स्नान करून दानं वाटणं, अनेक क्षत्रियांनी पिढ्यान्‌पिढ्या पवित्र मानलं होतं, सूर्यग्रहणाच्या वेळी दरवर्षी या सरोवराकाठानं चौथऱ्याच्या असंख्य दानवेदी उभारल्या जात होत्या. त्याच ठिकाणी आज दोन्ही सेनांच्या व्यवस्थापकीय पथकांनी आम्र, चंदन, बिल्व अशा पवित्र काष्ठांच्या रांगेनं कितीतरी चिता रचल्या होत्या. उत्तर आणि श्वेतासाठी विराटांनी दोन सर्वांत उंच चंदनी चिता रचल्या होत्या. आता वृद्ध झालेल्या मत्स्यराज विराटांना आपल्या शूर पुत्रांच्या चितांना अग्नी द्यावा लागला. अनेक सैनिकांची कलेवरं तर त्यांच्या–त्यांच्या अक्षौहिणीप्रमाणे पारखून लांबच लांब सामूहिक चितांवर पेटविण्यात येत होती. कुठून-कुठून कुरुक्षेत्रावर आलेले विधींचे पुरोहित त्यांच्यासाठी अग्निसंस्कारांचे मंत्र म्हणत होते. काठानं पेटलेल्या चितांची प्रतिबिंब सूर्यसरोवरात पडल्यामुळे, नाव सार्थ करीत ते सरोवरच पेटल्यासारखं दिसत होतं.

रात्रीच्या भोजनानंतर आम्हा सात विभागप्रमुखांची, पांडवसेनेतील रथी, अतिरथी, महारथी यांची सर्व पांडवांसह कृष्णदेवांच्या प्रशस्त शिबिरात बैठक बसली.

ज्येष्ठ पांडव युधिष्ठिर म्लान, पडेल चर्येनं कृष्णदेवांना म्हणाला, "पितामहांनी असाच पांडवसेनेचा संहार केला, तर आमचा पराजय नक्की होणार!" ते ऐकून कृष्णदेव हसले, टेंभ्यांच्या मंद प्रकाशात त्यांच्या गुलाबी ओठांआडचा जोडदात तळपून उठला. युधिष्ठिराला ते म्हणाले, "धर्मा, इतक्यातच असं धैर्य सोडू नकोस. भिऊ नकोस. काही लढायांत आपला पराजय हा होणारच. युद्धाचा अंतिम विजय मात्र नक्कीच आपला आहे. आपल्या सेनेत महारथी सात्यकी, विक्रमी विराट, धैर्यशील धृष्टद्युम्न असे वीर आहेत.

"प्रसंगी प्रलयंकार तांडव माजविणाऱ्या शिवशंकराबरोबर संग्राम केलेला तुझा बंधू गांडीवधारी पार्थ आपल्या सेनेत आहे. महाबली, शक्तिसागर भीमसेन आपल्याकडे आहे. चिंतित होऊ नको. विजयश्री अंतिमत: तुलाच माळ घालील. तू आणि सर्वांनीच ध्यानी ठेवावं की, माझ्या भक्तांचा विनाश कधीच होणार नाही. मी तो कधीच करू देणार नाही. न मे भक्त: प्रणश्यति!"

कृष्णदेवांचं ते धीरोदात्त वचन ऐकून निर्भय झालेल्या सर्व योद्ध्यांनी त्यांना भक्तिभावानं प्रणाम केला. मी न राहवून विचारलं, "आपलं उद्याचं सेनापत्य पांचालयुवराज धृष्टद्युम्नाकडेच राहणार काय?" पुन्हा हसून माझ्याकडे बघत ते उद्गारले, "जोपर्यंत समरांगणात वीर सेनापतीचं पतन होत नाही, तोपर्यंत कधीच सेनापती बदलला जाणार नाही. माझ्या कयास आहे, हेच तत्त्व कौरवही स्वीकारतील.

पितामह भीष्म हा नुसता साचलेला विक्रम नाही. वृद्धत्वामुळे तो अनुभवीही आहे. त्यांच्या अचूक लक्षयवेधी बाणांसमोर सर्वांनी पाय रोवून उभं राहिलं पाहिजे. उद्या त्यांना कसं तोंड द्यावं, याचाच मी विचार करतो आहे."

आजच्या दिवसातील रणांगणावरची कृष्णदेवांची प्रमुख बौद्धिक खेळी कुणाच्या नसली, तरी माझ्या ध्यानी आली. आजच्या रणांगणावरच्या तुमुल युद्धात कितीतरी सारथी वधले गेले होते. अर्जुनाच्या रथावरच्या सारथी कृष्णदेवांच्या नील देहावर मात्र बाणाचा एक साधा ओरखडासुद्धा नव्हता! त्यांनी स्वतःला निःशस्त्र सारथी घोषित करून, स्वतःला युद्धनियमाप्रमाणे अखंड संरक्षित करून घेतलं होतं! त्यांच्या बुद्धिमत्तेची ही मेख दुर्योधनासह कुणाच्याही ध्यानी आली नव्हती.

पहिल्या दिवशीची बैठक आटोपून आम्ही आपापल्या शिबिराकडे चाललो. व्यवस्थापकीय पथकं उद्याच्या नव्या रणभूमीची मांडणी करताना दिसत होती.

मार्गशीर्ष वद्य तृतीयेचा दिवस उजाडला. आमच्या सेनापती धृष्टद्युम्नानं क्रौंचारुण व्यूहाची रचना केली. ही रचना क्रौंच पक्षयाच्या आकाराची होती. त्याच्या लांबच लांब चोचीच्या भागाकडे आमच्या सात विभागप्रमुखांपैकी चौघे महारथी ठेवण्यात आले. त्यात मी, भीमसेन, स्वतः धृष्टद्युम्न आणि चेदिराज धृष्टकेतू असे होतो. क्रौंचाच्या उदराच्या आणि शेपटाच्या भागाकडे विराट, जरासंधपुत्र जयसेन आणि पांड्या असे नेमण्यात आले.

पितामह भीष्मांनी कुरुसेना बाणाच्या आकारात उभी केली. या बाणाच्या तिकोनी अग्रावर सेनापती भीष्मांच्या उजव्या हाताशी आपल्या दुर्मुख, दुःशासन, दुःसह, दुर्घर्ष अशा दहा बंधूंसह स्वतः दुर्योधन उभा होता.

आमच्या सेनेच्या क्रौंच पक्षयाकडे आपल्या मूळच्याच जाड व वक्र भुवया वर चढवून बघत तो तिरस्कारानं गरजला, "कुरू वीरहो! पांडवांच्या या यःकश्चित क्रौंचाचं आज आपण पितामहांच्या साक्षीनं हृदय भेदून टाकू." आपल्या कंठधमन्या फुगवत आपला 'विदारक' 'नावाचा शंख त्यानं प्राणाच्या देठापासून फुंकला. त्याच्या भोकरांसारख्या डोळ्यांतील शिरांत रक्तच रक्त उतरलं. सेनापती पितामहांनी त्यांचा 'गंगनाभ' शंख फुंकताच आपल्या खांद्यावरची अवजड गदा हवेत नाचवीत दुर्योधन आपल्या सेनेला चेतना देताना कितीतरी मोठ्यानं ओरडला, "आरोऽह – आऽक्रम". तसं कौरवसैन्य व्याघ्रानं सावजावर झेप घेऊन तुटून पडावं, तसं पांडवसेनेवर कोसळलं. खड्गाच्या हाताहातीला, गदांच्या ठणकाठणकीला, मुसळामुसळीला रणघोषांच्या कल्लोळात प्रारंभ झाला. पितामहांवर भीमसेन, अभिमन्यू, धृष्टद्युम्न, विराट आणि मी चालून गेलो. आम्हा सर्वांना महापराक्रमी पितामहांनी आपल्या अथक शरवर्षावानं जागीच खिळवून टाकलं. माझ्याभोवती तर त्यांनी सात नाराच बाणांचा सापला टाकला. मोठ्या निकरानं मी तो तोडला. आमच्या क्रौंचारुण व्यूहाच्या अभेद्य चोचीचे दोन भाग त्यांनी विलग केले. आपली भरगच्च शुभ्र दाढी थरकावीत पाठीमागच्या रथदलाला त्यांनी 'आऽक्रम' अशी चेतना देताच, त्यांच्या रथदलानं आमच्या क्रौंचारुण व्यूहाचा भेद केला. आमच्याकडील रथी आणि अश्वसाद मागे–मागे हटू. लागले. दूरवरून हे बघणारा धनुर्धर खवळला. कृष्णदेवांना म्हणाला, "वासुदेवा, आता मात्र माझा नंदिघोष तू पितामहांच्या समोरच उभा कर."

अगदी कालच 'ज्यांच्या अंगाखांद्यावर मी खेळलो, त्या या पितामह भीष्मांवर प्राणभेदक बाण कसे काय सोडू?' असं कळवळून विचारणारा हाच तो अर्जुन होता. आजचे त्याचे पूर्णत: दुसऱ्या टोकाचे उद्‌गार ऐकून, कृष्णदेव किंचित नाकळतं खट्याळ हसले. पार्थाला म्हणाले, "धनंजया, नक्की घेऊ काय पितामहांच्या रथासमोर तुझा हा रथ?" तसं गडबडीनं अर्जुन म्हणाला, "होय नक्कीच घे. नाहीतर पांडवांचे ते पाच योद्धे पितामहांसमोर अधिक काळ टिकणार नाहीत. "ते ऐकताच कृष्णदेवांनी आपला पांचजन्य शंख असा काही फुंकला की, कौरवसेनेला वाटलं, अर्जुनाच्या ध्वजावरील साक्षात हनुमानच भुभु:कार करून झेपा टाकत चालून येतो आहे.

पितामह भीष्म आणि अर्जुन यांचं घनघोर धनुर्युद्ध सुरू झालं. अशातच दुर्योधन, शल्य, जयद्रथ आणि शकुनी हेही पितामहांच्या साहाय्यार्थ धावले. पितामहांच्या रणक्षेत्रात द्वैरथ युद्धाची कशी झुंबडच झुंबड माजली. कुरुक्षेत्राच्या भूमीवर शेकडो बाणांचा नुसता खच पडला. त्यातच दोन्हीकडून विद्ध झालेले व मृत सैनिक आडवे–तिडवे पडले. महाधनुर्धर धनंजय एका पाठोपाठ पितामहांसह चार महायोद्ध्यांना तोंड देत, पर्वतासारखा समरांगणात अचल लढत राहिला.

तिकडे द्रोणाचार्य आणि सेनापती धृष्टद्युम्न यांची रणधुमाळी माजली होती. द्रोणांनी कालदंडासारखा एक भयानक घोर बाण धनुष्याला जोडला. डोळे मिटून, काही मंत्र पुटपुटून तो धृष्टद्युम्नाच्या रोखानं सोडला. त्याचा आवाज इतका भेदक व कर्कश होता की, दोन्हीकडचे सैनिक श्वास रोखून त्याच्याकडे बघतच राहिले. सावध धृष्टद्युम्नानं तो कुठला बाण आहे, हे ओळखलं. त्याच्यावर एक प्रत्याघाताची शक्ती फेकली. तिने द्रोणांच्या कडकडत्या बाणाचे मध्येच तुकडे करून टाकले.

आता खवळलेल्या द्रोणांनी धृष्टद्युम्नाला शरवर्षावाची संततधार प्रक्षेपून घेरूनच टाकला. तेव्हा सेनापतीचं रक्षण करण्याकरिता महाबाहू भीमसेन पुढे सरसावला. तसं कलिंग आणि त्याचं अफाट कलिंगसैन्य भीमसेनाला आडवं गेलं. त्यांनी त्या महाबली वीरपुरुषाला चौअंगांनी घेरून टाकलं. एखाद्या बंदिस्त कक्षात कोंडलेला रानमांजर खवळून ठिस्कारत दिसेल त्याच्या अंगावर धावून जातो, तसा भीमसेन आपल्या रथातून रणभूमीवर पायउतार होऊन डरकाळ्या फोडत कलिंगांवर चालून गेला.

गदेच्या द्वंद्वयुद्धात भीमसेनानं प्रथम कलिंगपुत्राचा वध केला. कलिंगपुत्र पडलेला बघून, त्याचा संतप्त पिता कलिंगराजही गदेसह भुईवर पायउतार झाला. भीमसेनाचं आणि त्याचं भयंकर खणखणाटी असं गदायुद्ध झालं. दोन्हीकडचे सैनिक ते आ वासून बघतच राहिले. शेवटी धिप्पाड भीमसेनानं चपळ हालचाल करत आपल्या अवजड गदेचा भक्कम प्रहार कलिंगराजाच्या वक्षावर अचूक उतरविला. त्या प्रहारानं कलिंगराजाच्या वक्षावरचं लोहत्राण तडकून रुधिराची संततधार लागली. कलिंगराजही वधला गेला. कलिंगांचं सैन्य भीमसेनाच्या खांद्यावरची गदा बघून, भयानं थरकापत वाट फुटेल तिकडे धावू लागलं.

वीर अभिमन्यूला दुर्योधनासह अनेकांनी गाठून घेरलं. तो अडचणीत आल्याचं पाहून कृष्णदेवांनी 'मेघा, बला, शैब्या, सुग्रीवा' असं नावांनी आपल्या आश्वांना हाकारत नंदिघोष अभिमन्यूजवळ आणला. अनेक वीरांनी घेरलेला आपला पुत्र मुक्त करण्यासाठी अर्जुनानं गांडिवातून बाणांचा पर्जन्य वर्षविला. त्यानं दुर्योधन आणि त्याचे सहकारी यांची दाणादाण उडविली. दुसऱ्या दिवशीचा सूर्य कुरुक्षेत्राच्या क्षितिजाआड

मावळला. रणभेरी, रणदुंदुभ्या यांच्या नादानं संचार झाल्यासारखं कुदणारं कुरुक्षेत्राचं समरांगण, पितामहांच्या दिवस समाप्तीचा शंखनादावर स्थिरावलं. हातातली शस्त्रं रथात, रणभूमीवर जागीच ठेवून श्रांतक्लांत झालेले योद्धे आपापल्या शिबिराकडे परतू लागले.

रात्रीच्या भोजनानंतर नेहमीसारखी कृष्णदेवांच्या शिबिरात आमची बैठक बसली. आम्हा योद्ध्यांना धनुर्धर अर्जुन उद्याच्या अर्धचंद्राकृती व्यूहरचनेची माहिती करून देऊ लागला. आम्ही त्याच्या वीरमुद्रेकडे बघत उद्याच्या दिवसाला कसं सामोरं जावं, या विचारात गढून गेलो होतो. इतक्यात आमच्या सेनेच्या गुप्तचर विभागाचा प्रमुख वायुसेन लगबगीनं धापावत शिबिरात घुसला. उच्यासनावर मध्यभागी बसलेल्या कृष्णदेवांना वंदन करून त्यानं कौरवसेनापतीच्या शिबिराची उचललेली महत्त्वाची वार्ता सर्वांच्या कानी घातली.

"कौरव शिबिरात सेनापती भीष्मांना दुर्योधन फारच कठोर बोलला, 'दोन दिवसांत लक्षावधी कुरू सैनिक कामाला आले. तुम्ही अनुभवी व वृद्ध म्हणून आम्ही तुम्हाला सेनापतीपदाचा अभिषेक केला. तुमच्या हातून म्हणावा तसा कसलाच पराक्रम होत नाही. तुम्ही पांडवांचे पक्षपाती आहात. जाणीवपूर्वक त्यांच्याशी सौम्य युद्ध खेळता आहात, 'असा अवमानास्पद, धडधडीत बोचरा आरोपही त्यानं वंदनीय वीर पितामहांवर सर्वांसमक्ष केला.

"तसं अवमानित झालेल्या प्रक्षुब्ध भीष्मांनी प्रतिज्ञा केली आहे की, 'उद्या निःशस्त्र म्हणविणाऱ्या द्वारकाधीश श्रीकृष्णाला मी हाती शस्त्र धारण करणं भाग पाडीन! नाहीतर रणात देह ठेवीन!!'

"त्यांच्या या भीष्मप्रतिज्ञेमुळे कौरव शिबिर चैतन्यानं कसं फुलून उठलं आहे. दुर्योधनानं त्या बैठकीतच पुढील रणनीती घोषित केली आहे.

"द्वारकाधीशांनी हाती शस्त्र धरताच तो 'युद्धनियमांचा भंग झाला. युद्धात निःशस्त्र उतरणाऱ्या श्रीकृष्णानं हाती शस्त्र धरलं आहे. आता तो पुन्हा समरांगणात उतरण्यास पात्र राहिलेला नाही. त्याला अर्जुनाच्या नंदिघोष रथाच्या सारथिपदावरून निवृत्त करावं.' असं आकांडतांडव करण्याच्या योजनेत तो आहे."

ती वार्ता ऐकताच आमची बैठक एकदम गंभीर झाली. कृष्णदेवांशिवाय कुरुक्षेत्र म्हणजे आमचा धडधडीत पराभव! ती कल्पनाच कुणालाही करवत नव्हती.

भांबावलेला अर्जुन म्हणाला, "मला वाटतं, श्रीकृष्णानं उद्या समरांगणात उतरूच नये! हाती शस्त्र घेण्याचा प्रश्नच येणार नाही." कित्येकांनी त्याची योजना उचलून धरली. पितामहांची प्रतिज्ञा म्हणजे काळ्या दगडावरची रेघ, हे माहीत असलेले सर्व पांडवयोद्धे आपापसात कुजबुजू लागले.

कृष्णदेव शांतच होते!

काही वेळानं बैठक संपविण्याचा आदेश देत ते शांतपणे सर्वांना म्हणाले, "भीष्मप्रतिज्ञेचं काय करायचं, ते मी बघतो! तुम्ही नित्यासारखे युद्धकर्माच्या तयारीला लागा. आता शांत निद्रायोग साधा! जय इडादेवी!" त्यांनी बैठकच संपविली.

मार्गशीर्ष वद्य चतुर्थीचा दिनपुरुष कुरुक्षेत्राच्या रक्तस्नात भूमीवर क्षितिजाआड उभा ठाकला. अद्याप उजाडायचं होतं, द्रोण, दुर्योधन व त्याचे पाच बंधू, कृप,

अश्वत्थामा, जयद्रथ, कृतवर्मा, शल्य यांनी दुहाती फेर धरलेले कौरवसेनापती शांतनुपुत्र गांगेय भीष्म सहस्त्ररश्मी सूर्यदेवांसारखेच दिसत होते. निर्धारी तेज त्यांच्या चर्येवरून कसं ओसंडून वाहात होतं. सर्व योद्ध्यांच्या मेळातून ते आपल्या सेनेची शिस्तबद्ध रचना पाहण्यासाठी चालतच रणभूमीवर आले. दोन दिवसांत दोन्हीकडचं मिळून दोन अक्षौहिणी सैन्य कामी आलं होतं. त्यात आमच्या पांडवसेनेच्या सैनिकांची संख्या अधिक होती. जवळ–जवळ दहा अक्षौहिणी शस्त्रसज्ज कौरवसैनिकांनी पक्षिराज गरुडाच्या आकाराची व्यूहरचना पितामहांच्या आदेशावरूनच मांडली होती. या गरुडाकार व्यूहरचनेतील महत्त्वाची होती ती अग्रभागाची – गरुडाची चोच. त्या चोचीच्या आकारात अग्रभागी महाविक्रमी पितामह भीष्म उभे राहणार होते. या चोचीच्या मागे गरुडाची मान होती. तिचे रक्षण कैकेय व गांधार करणार होते. गरुडाच्या पसरलेल्या उजव्या पंखात आम्हा यादवांचे कृतवर्मा आणि सैंधवाधिपती जयद्रथ ससैन्य उभे राहाणार होते. गरुडाच्या डाव्या पंखाचं संरक्षण भगदत्त आणि भूरिश्रवा करणार होते. गरुडाच्या उदरात सुदक्षिण, नील असे राजे दुर्योधनाचं संरक्षण करणार होते. कौरवसेनेच्या विशालकाय गरुडाच्या शेपटाच्या जागी मद्रराज्य शल्य आणि अवंतीपुत्र विंद–अनुविंद उभे ठाकणार होते.

गरुडाच्या पसरलेल्या दोन्ही पायांच्या नख्या महत्त्वाच्या असतात. आपलं सावज तो या बळकट नख्यांतच आवळून धरतो. कौरवसेनेच्या गरुड पक्षयाच्या पायांच्या नख्यांच्या जागी त्रिगर्तातील संशप्तक बंधू डावीकडे आणि बर्बर, निषाद यांची पथकं उजवीकडे उभी ठाकणार होती.

पितामहांची ही सैन्यरचना अत्यंत कल्पक होती. अभेद्य व आक्रमक होती.

सर्व योद्ध्यांसह आपल्या सेनेच्या गरुडाच्या कंठातून उतरून, दोन्ही पंखांतील पथकांत जाऊन पितामह उदरात आले. तिथल्या दुर्योधनाला म्हणाले, “सुयोधना, आज कृष्णाला मी त्याची प्रतिज्ञा भंगायला लावेनच लावेन. त्याला समरातून पुढे बाहेर कसा काढायचा, ते तुझं तू बघ. एकदा का तो समराबाहेर गेला की, विजश्रीची माळ तुझ्याच गळ्यात पडणार आहे!” ते ऐकताना वक्ष फुलून आलेला अभिमानी दुर्योधन स्वभावधर्माप्रमाणे अविचाऱ्यासारखं बरळला, “तसं झालंच तर पितामह, आता कसलंही द्यूत न खेळता पांडवांना – त्या पाच पापी पुत्रांना मी कौरवांचा युवराज म्हणून पुन्हा वनातच धाडणार आहे. तेही या वेळी हिमालयाच्या पार पलीकडे!”

त्याच्या स्कंधावर हात ठेवून पितामह क्षीण हसत म्हणाले, “माझ्या माहितीप्रमाणे पांडव आज अर्धचंद्राकृती सैन्यरचना मांडणार आहेत. त्या चंद्राला कसं ग्रहण घालता येईल, त्याचा विचार कर. मी तुला ठाम सांगतो, जोपर्यंत वासुदेव पांडवांच्या बाजूनं उभा आहे, तोपर्यंत तुम्हाला यश मिळणं दुरापास्त आहे.”

सर्वांशी बोलत रणवेषधारी धिप्पाड पितामह गरुडपक्ष्माच्या शेपटात आले. इथला शल्य थोडा नाराज होता. तो मद्रदेशाहून निघाला होता, तो भाचे असलेल्या पांडवांना सहकार्य करायला! प्रवासात त्याला मध्येच गाठून दुर्योधनानं त्याला अगणित उपहार देऊन, गोड–गोड बोलून कौरवपक्षाकडे वळविलं होतं, दुर्योधनानं कालच्या बैठकीत त्याला कुरुसेनेच्या शेपटाकडे ठेवावा, अशी सूचना पितामहांना केली होती.

आता कुरुक्षेत्रावरचं हे युद्धनाट्य कल्पनातीत रंगत चाललं. आम्हा पांडवांत सर्वांत मोठं बलस्थान होतं, ते कृष्णदेव! दुसरं बलस्थान होतं, ते सर्व पांडवांची एकी! पांडवांतील

भीमार्जुनांच्या पराक्रमावर जमलेल्या सर्व राजांचा आणि योद्ध्यांचा पूर्ण आणि अढळ विश्वास होता.

दुर्योधनाच्या कौरवसेनेत आतल्या छुप्या मतभेदांच्या वरवर झाकलेल्या कितीतरी दऱ्या होत्या. कृष्णदेव त्या दऱ्यांचाच सावध कुशलतेनं लाभ उठविणार होते, यात मला तिळमात्रही शंका नव्हती. शस्त्र–अस्त्रांनी ठासून भरलेला अर्जुनाचा नंदिघोष रथ आमच्या पांडवसेनेच्या मध्यभागी आणून कृष्णदेवांनी उभा केला. ते अर्जुनासह नंदिघोषातून खाली उतरले. प्रथम त्यांनी आपल्या चारही अश्वांशी कुणालाच न कळणाऱ्या भाषेत बोलून घेतलं. कुणाच्या खुब्यावर, कुणाच्या पाठीवर थाप दिली. कुणाचीतरी आयाळ प्रेमभरानं कुरवाळली. दुसऱ्याच क्षणी ते मी, भीमसेन, त्याचा पुत्र घटोत्कच, पांचालराज द्रुपद, मत्स्यराज विराट, युधिष्ठिर, नकुल–सहदेव, धृष्टकेतू अशा अनेक प्रमुखांसह सेना पाहणीला पायीच निघालो. या टोकापासून त्या टोकापर्यंत बाहेरची व आतली अशा दोन कडा असलेली आमच्या सेनेची चंद्रकोर पाहून, आम्ही पुन्हा पहिल्या जागी परतलो.

या चंद्रकोर रचनेची विशेषत: तिच्या समोरासमोर येणाऱ्या दूरवरच्या दोन टोकांत होती. या दोन्ही ठिकाणी चपळ हालचालींचे युद्धनिपुण सैनिक पेरले, तर योग्य समयी सेनापतीच्या संकेतावर ही दोन्ही टोकं एक करून, मध्ये येणारा श्येन काय, गिद्ध काय आणि गरुड काय; कुठलाही पक्षी आमची सेना उभाच्या उभा गिळंकृत करू शकत होती.

दोन्ही सेनापतींनी आपापल्या जागा घेतल्या. आता चंद्राला बोचकारायला टपलेला लक्षावधींचा बळकट गरुड आणि त्याला प्रसंगी उभाच्या उभा गिळून टाकण्यासाठी टपलेली लक्षावधींची चंद्रकोर, असं रोमहर्षक दृश्य कुरुक्षेत्रावर उभं ठाकलं.

तेजस्वी सूर्यबिंब क्षितिजावर आलं, तसा मान वर उठवून कृष्णदेवांनी नंदिघोषातून आपला दुग्धधवल दिव्य पांचजन्य शंख फुंकला. पाठोपाठ पितामह भीष्म आणि महारथी धृष्टद्युम्न या दोन्ही सेनापतींनी शंखनाद उठविले. पाठोपाठ पाचही पांडवबंधूंचे दिव्य शंख निनादले. मग कितीतरी शंखांचे नाद एकमेकांत मिसळले. रथ आणि अश्वदलांतील घोडी फुरफुरली. गजदलातील सहस्त्रावधी गज चीत्कारत सोंडा वळवळू लागले, 'आरोऽह – आऽऽक्रम'च्या चेतनाआरोळ्यांत दोन्ही सेनासागर मृगाच्या गर्जत्या विशालकाय कभिन्नकाळ्या ढगांसारखे एकमेकांना थडकले.

आज भीष्म आणि द्रोण हट्टाला पडले होते. पांडवसैन्याचा अर्धचंद्राकृती व्यूह फोडण्यासाठी त्यांनी निकराची आक्रमणं केली. ती भीमसेन आणि घटोत्कच यांनी लीलया परतवून लावली. या वेळी चवताळलेला दुर्योधन पुढे झाला. त्यानं बाणांच्या पर्जन्यात घटोत्कचाला झाकून टाकलं. आपला पुत्र कुठेच दिसत नाही, म्हणून बिथरलेल्या व खवळलेल्या भीमसेनानं एक तेजस्वी बाण त्वेषानं दुर्योधनाच्या वक्षावर फेकला. तो त्याचं लोहत्राण भेदून त्याच्या वक्षात घुसला. विद्ध दुर्योधनाच्या हातातून त्याचं पुष्पमंडित धनुष्य खाली कोसळलं. पाठोपाठ तो स्वत:च मूर्च्छित होऊन रथात कोसळला. आपला सेनानायक मूर्च्छित झालेला बघून भेदरलेलं कौरवसैन्य चौबाजूंनी इतस्तत: धावू लागलं. दु:शासन दोन्ही हात उंचावून ओरडत त्यांना रोधण्याचा निष्फळ प्रयत्न करू लागला. मूर्च्छित दुर्योधनाचा सात काळ्या अश्वांचा भव्य रथ त्याच्या सारथ्यानं एका बाजूला घेतला.

शकुनी आणि त्याचे दहा बंधू यांच्या गांधारसेनेत मी आणि अभिमन्यू 'आरोऽह

आऽक्रऽम' असे रणघोष देत घुसलो. आम्हाला उजव्या बाजूकडून धनुर्धर अर्जुनाच्या सेनेचा बळकट आधार मिळत होता.

एव्हाना सेनेबाहेर रथ आणलेल्या दुर्योधनाच्या सारथ्यानं त्याला लाकडी नळकांडीतील औषधी वनस्पतीचा वास हुंगवून सावध केलं होतं. शुद्धीवर येताच तो कडाडला, "कुठे आहे तो पांडवांचा खादाड? आपले सैनिक हे असे का पळताहेत?" सारथ्यानं त्याला वस्तुस्थितीची जाणीव देताच तो सावरला. त्यानं आपल्या सेनेत आपला रथ गरगर फिरवून, दोन्ही हात ऊंचावून सैनिकांना, 'अरे भेदरटांनो, पळताय कुठे? मी तुमचा पोशिंदा आहे. मला मूर्च्छित टाकून, असं पाय लावून पळताना तुम्हाला लज्जा कशी वाटत नाही? मागे फिरा. लढा.' असा तोंडाला खरस येईपर्यंत आक्रोश केला. त्याच्या आकांडतांडवानं भेदरलेले त्याचे सैनिक थांबले आणि शस्त्रं परजून परतले. हायसं झालेल्या दुर्योधनानं सारथ्याला रथ थेट पितामह आणि द्रोणांसमोर घेण्याची आज्ञा केली.

पितामहांना तो कठोर शब्दांत म्हणाला, "पितामह, तुम्ही आणि आचार्य द्रोण यांच्यासारखे दिग्गज धनुर्धर असताना, आपल्या सेनेचे घाबरलेले सैनिक सैरावैरा धावत सुटताहेत. हे योग्य आहे काय? तुम्ही खरोखरच माझ्यासाठी लढता आहात, की लढण्याचं नाटक करता आहात? या माझ्या सैनिकांना पळताना बघून माझी पुरेपूर खातरी झाली आहे की, तुम्ही माझ्या वैऱ्यांचे – पांडवांचेच कैवारी आहात. आपण दोघंही आज मनापासून लढत नाही आहात. शरीर माझ्या सेनेत आणि मन पांडवांच्या हितात, अशा ढोंगानं तुमची प्रत्येक कृती भरलेली आहे.

"पितामह, हे प्रारंभीच स्पष्ट बोलला असतात, तर मी अंगराज, दिग्विजयी आणि अजिंक्य धनुर्धर कर्णाला सेनापतीपदाचा अभिषेक केला असता. मग माझ्यावर हा अपकीर्तीचा प्रसंगच आला नसता."

दुर्योधनाचं हे कठोर वाक्ताडन ऐकूनही पितामह भीष्म शांतच राहिले. त्याला म्हणाले, "गांधारीपुत्रा, तू अर्धं राज्य पांडवांना देऊन टाक! कुठल्याही अन्यायाचा अधिकारी होऊ नकोस. पांडव अजिंक्य आहेत – ते श्रीकृष्णाच्या – वासुदेवाच्या कृपेच्या सावलीत आहेत, हे तुला सांगून मी श्रमलो. तू कुणाचंही आणि काहीएक ऐकलं नाहीस.

"तुझी चर्पटपंजरी एकदम शब्दश: बंद कर आणि भीष्म प्रतिज्ञा ही काळाच्याही काळ्या कातळावरची कशी धवल रेष आहे, हे डोळे उघडे ठेवून बघ."

पितामहांनी आपला रथ सरळ अर्जुनाच्या नंदिघोषासमोर नेण्याची सारथ्याला एकाच कठोर घोषात आज्ञा केली –

'नंदिघोषऽ – नंदिघोऽष!' अलातचक्राप्रमाणे, गरगरत्या अग्निकंकणाप्रमाणे दिसणारा त्यांचा रथ त्यांच्या जुन्या व कुशल सारथ्यानं कृष्णदेवांचा वेध घेतं नंदिघोषासमोर आणून उभा केला. भोवतीच्या रथांतील योद्ध्यांनी आणि सारथ्यांनी जागीच थरकावून जाऊन हातचं शस्त्र मुकाट खाली ठेवावं, असं ते केवढ्यातरी मोठ्यानं म्हणाले, "विमूढ कौरवाऽ आज मी साक्षात वसुदेवपुत्र वासुदेवाला, जीवनभर यशाशिवाय काहीच न मिळविलेल्या यशोदानंदनाला हाती शस्त्र धरायला लावलं नाही, तर मीही गंगापुत्र भीष्मच नव्हे."

अनावर झालेल्या भीष्मांच्या सुंकारत्या गतिमान बाणांनी माझा सारथी अचूक टिपला. तो रथनीडावरून खाली युद्धभूमीवर कोसळला. माझा रथ त्यामुळे एका जागीच

जखडून बसला. मला काय करावं ते सुचेना. त्यातच माझा सारथी पडलेला बघून अर्जुनाच्या रथचक्राचं संरक्षण करणाऱ्या माझ्या पथकातील अन्य रथांवरचे कितीतरी सारथी रथ सोडून पळाले. अर्जुनाच्या रथचक्रचं संरक्षक कडं त्यामुळे खिळखिळं झालं. रणकुशल देवव्रत भीष्मांनी ही संधी अचूक साधून, आपल्या पाठीमागच्या रथ्यांना नंदिघोषाला घेरण्याची आज्ञा दिली. संतप्त धनुर्धर अर्जुन कृष्णदेवांना ऐकवीतच होता – "यादवश्रेष्ठा, माझ्याशी युद्ध करण्यास कोण समर्थ आहे? मी अतुल, प्रतापी राक्षस वधले आहेत. तू रथ पुढे घे." म्हणत त्यानं भीष्मांवर शरपर्जन्य वर्षविला.

अर्जुनाचं ते आक्रमक शरसंधान भीष्मांना डिवचून गेलं.

आता गांगेय भीष्म अनावर संतप्त झाले. किती केलं, तरी आमचा धनुर्धर अर्जुन त्यांच्या दृष्टीनं कालचा पोर होता. भीष्मांची चर्या प्रलयकालीन महोदधीसारखी दिसू लागली. क्षुब्ध असूनही युद्धसंचार झाल्यामुळे ते अर्जुनाहूनही युवा धनुर्धारी झाले. कंदुकांप्रमाणे अर्जुनाच्या सैनिकांची शिरं आकाशात उडवू लागले. त्यांच्या टणकारत्या धनुष्यातून सपासप सुटणाऱ्या बाणपर्जन्याच्या धारा, त्यांच्या दृष्टिक्षेपात येणाऱ्या योद्ध्याला विद्ध करू लागल्या. त्यांच्या कितीतरी अंजलिक, सर्पमुख भल्ल, नाराच अशा बाणांनी आमच्या सेनेतील गजांची मदरसानं, माखलेली गंडस्थळं भेदून टाकली. चंद्रमुख, बस्तिक, कंकपत्र, गजास्थी, शिलिमुख अशा बाणांनी आमच्या अश्वदलातील पुष्ट अश्व घायाळ करून टाकले. पितामहांच्या जिह्म, सूची, बस्तिक अशा बाणांच्या माऱ्यांनी संत्रस्त झालेले उष्ट्र, इकडे–तिकडे सैरावैरा कसेतरीच धावताना आपलेच सैनिक पायांखाली तुडवू लागले. 'भीष्म म्हणजे भयावह', ही आपली उपाधी तो कौरवसेनानी योग्य असल्याचं सिद्ध करीत होता.

नंदिघोषाचे सारथी असलेले कृष्णदेव अंगी असलेलं सारथ्यकर्माचं सर्व कौशल्य पणाला लावीत होते. कधी रथाचे चारी घोडे त्यांच्या हातातील वेगांच्या संकेतावर खिंकाळत ऊर उठवून उसळत होते. कधी त्यांच्या संकेतावर पाय मुडपून चारही अश्व गपकन एकदमच खाली झुकत होते. त्यामुळे भीष्मांचे बाण निष्प्रभ होत होते. तरीही त्यांचा कुशल सारथी अशा कौशल्यानं नंदिघोषाभोवती त्यांचा रथ फिरवत होता की, अर्जुनाला क्षणात समोर क्षणात मागे असे दशदिशांत पितामह आणि पितामहच दिसू लागले. तो भ्रमला. त्याच्या हातचं गांडीव क्षणैक स्थिरावलं. नेमकी ही संधी साधून भीष्मांनी त्याच्या हातचं गांडीव धनुष्य त्याच्या रथातच बाणांनी पाडलं. ठिकठिकाणी त्याच्या शरीरात घुसलेल्या भीष्मांच्या बाणांनी घायळ झालेला अर्जुन, विकलांग होऊन नंदिघोषाच्या ध्वजदंडाला टेकून घसरत मूर्च्छित झाला. त्यासरशी त्याच्या अक्षौहिणीत प्रचंड हलकल्लोळ माजला. हातातील शस्त्रं कशीतरी नाचवीत जो–तो प्राणदेठापासून कृष्णदेवांची आण भाकू लागला, 'वाचवा – द्वारकाधीऽश – पितामहांच्या बाणांपासून आमचं रक्षण करा. आम्हाला प्राणदान द्या.'

चारही दिशांतून याच अर्थाचा आक्रोश सुरू होताच, कृष्णदेव निरुपायानं नंदिघोषातून खाली उतरले. एव्हाना दुसरा सारथी घेऊन मी अर्जुनाच्या साहाय्यार्थ नंदिघोषापाशी आलो होतो. अर्जुनाला शुद्धीवर आणणं, हे माझं पहिलं कर्तव्य होतं. त्यासाठी नंदिघोषावर ठेवलेल्या लाकडी नळकांडीतील दिव्य वनस्पतीचा गंध मी अर्जुनाला हुंगविला. तसा तो सचेतन झाला. शुद्धीवर येताच त्यानं पहिलाच प्रश्न केला, "कृष्ण कुठे आहे?" आमची दृष्टी समरांगणभर भिरभिरू लागली. तिकडे पितामहांच्या

रथातही नंदिघोषावर कृष्णदेव कुठेच न दिसल्यामुळे, पितामहांच्या मनीही गोंधळ माजला होता. त्यांनी धनुष्य त्यागून शरसंधान थांबविलं होतं. तेही आपल्या सारथ्याला विचारत होते, "कृष्ण कुठे आहे?" तेही आपल्या रथातून रणभूमीवर उतरले होते.

कृष्णदेव त्यांच्या रथाच्या रोखानंच, पण रणभूमीवर काहीतरी शोधत चालले होते. एव्हाना नंदिघोष सोडून मी आणि अर्जुनानं त्यांना गाठलंही. इतक्यात समोरून धीमी पावलं टाकत चालत येणारे कुरुसेनापती भीष्म कृष्णदेवांना दिसले. तसं रणभूमीवर पडलेलं एक रथचक्र उचलून, कृष्णदेवांनी प्रथम ते दोन्ही तळहातांवर त्वेषानं गरगर फिरविलं. क्षणैक अवकाशात उडविलं आणि पुन्हा दोन्ही हातांवर तोललं आणि अतिशय आवेशानं ते भीष्माच्या रोखानं धावणार तोच माझ्या शेजारीच चालणाऱ्या अर्जुनानं पुढे झेपावत त्यांच्या चरणांना हातांचा विळखा भरला. त्यांना साकडं घातलं, 'अच्युताऽ! नको रे चालवूस हे चक्र!' दोन्ही हातांनी तोललेलं चक्र सावरत कृष्णदेवांनी हसतच अर्जुनाकडे पाहिलं.

समोर हात जोडून, डोळे मिटून, शुभ्र दाढीधारी पितामह भीष्म रणवेषात एका जागीच निश्चल शांत उभे होते.

समोरच्या निश्चल उभ्या भीष्मांकडे बघून कृष्णदेवांनी हसतच आपल्या हातांतील रथचक्र पुन्हा भूमीवर फेकलं. दोन्ही हात पसरून आपणाला 'वासुदेव' ही उपाधी सर्वप्रथम देऊन अचूक ओळखणाऱ्या पितामह भीष्मांना दृढालिंगनात घेतलं.

हस्तिनापूरचा जलपुरुष द्वारकेच्या जलपुरुषाला मिळाला!

ते दोघेही महापुरुष एकही शब्द न बोलता विलग झाले.

याच वेळी कुरुक्षेत्राच्या पश्चिम क्षितिजाआड सूर्य मावळला. युद्ध थांबलं. दोन्हीही महापुरुष आपापल्या शिबिराकडे शांतपणे चालू लागले.

त्या दिवशी रात्री भोजनानंतर श्रीकृष्णदेवांच्या शिबिरात भरलेल्या आमच्या बैठकीत चर्चा झाली, ती नुसती दुसऱ्या दिवशीच्या व्यूहरचनेची!

तिकडे पितामहांच्या शिबिरात झालेल्या कौरवयोद्धयांच्या बैठकीत मात्र दुर्योधनाच्या आखलेल्या सर्व मनोरथांवर पाणी पडलं होतं. कृष्णदेवांनी हाती शस्त्र–चक्र धरलं याचा निर्देश करून, तो आपल्या सेनापतींना कंठधमन्या फुगवून सांगत होता की, 'त्या गवळटाचा प्रतिज्ञाभंग झाला आहे. त्याचा शिबिराकडे तातडीनं दूत धाडून युद्धनियमभंगासाठी त्याला अर्जुनाच्या सारथिपदावरून निवृत्त केल्याची समज द्या.' आपल्या सेनापती उच्चासनावरून उठून त्याच्या जवळ जात वडीलकीच्या नात्यानं त्याचे पुष्ट खांदे थोपटत पितामह त्याला म्हणाले, "दुर्योधनाऽऽ! अजूनही हे विनाशकारी महाभयानक युद्ध थांबव! तू नाही, तुझ्या बंधूंपैकी कुणीही नाही, एवढंच काय; अकरा अक्षौहिणीतील आता आपल्या उरल्यासुरल्या कुरुसेनेतीलसुद्धा कुणीही श्रीकृष्णाच्या आसपासही उभं राहू शकत नाही! त्याला नीट पारखताना तुझी चूक होते आहे. सावर नि सांभाळ! श्रीकृष्णानं कोणताही नियमभंग केलेला नाही. त्यानं हाती धरलं होतं, रथाचं चक्र – कसलंही शस्त्र नव्हे!! ते तरी त्यानं का हाती धरलं? ते केवळ मीच जाणू शकतो. ते हाती धरून त्यानं माझी प्रतिज्ञा पूर्ण होऊ दिली आहे. तीही आपली प्रतिज्ञा न मोडता! म्हणूनच माझं तुला वडीलकीचं निकराचं सांगणं आहे, हे युद्ध आता थांबव. पांडवानां त्यांचं इंद्रप्रस्थाचं राज्य परत देऊन टाक. म्हणजे तो गवळी द्वारकेला निघून जाईल, पण तेही आम्हा कौरवांना हस्तिनापुराला व पांडवांना इंद्रप्रस्थाकडे धाडूनच!!"

दुर्योधनाला काही हे पटणं शक्यच नव्हतं.

कुरुक्षेत्राच्या स्थितप्रज्ञ आणि शाश्वत क्षितिजावर चौथ्या दिवसाचा सतेज आकाशमणी तळपू लागला. सेनापती भीष्मांनी काटेकोर सूचना दिल्याप्रमाणे कौरवयोध्द्यांनी आज पहाटेच आपल्या सेनेची झुंजसिद्ध वृषभाच्या आकारात सैन्यरचना मांडली होती. सेनेच्या निमुळत्या मुखाग्रावर स्वतः भीष्म, द्रोण, कृप, दुर्योधन, अश्वत्थामा अशा योद्ध्यांसह शस्त्रं पेलून उभे ठाकले. वृषभाच्या विस्फारलेल्या नाकपुड्यांच्या जागा अवंतीच्या विंद–अनुविंदांनी घेतल्या. वृषभाच्या उगारलेल्या टोकदार शिंगांच्या जागेत चल आणि शल्य या राजांनी आपले सैनिक पेरून टाकले. वृषभाच्या पुष्ट स्कंधाच्या जागा सुदाक्षिण आणि नील यांनी घेतल्या. वृषभाच्या उजवीकडे कललेल्या पुष्ट वशिंडाच्या ठिकाणी कैकेयांनी आपले सैनिक रांगांत उभे केले. वृषभाच्या विशाल उदराच्या जागी भगदत्त, भूरिश्रवा, जयद्रथ उभे ठाकले. आमच्या यादवांचा प्रमुख महारथी कृतवर्मा वृषभाच्या उभारलेल्या वर्तुळाकार शेपटाच्या आकारात आपलं यादवसैन्य रचून अग्रभागी स्वतः उभा राहिला. या यादव–पथकांना आज पितामहांनी ही विश्रांतीच दिली होती. या विशालकाय सेनावृषभाच्या पुढच्या दोन आणि पाठच्या दोन पायांच्या जागी उभ्या ठाकल्या होत्या, त्या प्रमुख्यानं लढाऊ रानटी जमाती! पुढच्या पायांत होते दरद आणि यवन सैनिक, तर पाठच्या पायांत होते, बर्बर आणि निषाद सैनिक!

आमच्या गुप्तचरांनी रात्री या वृषभ–रचनेची वार्ता कानी घालताच, कृष्णदेवांनी सेनापती धृष्टद्युम्नाला पांडवसेना झुंजसिद्ध गजराजाच्या रचनेत मांडण्याचा कानमंत्र दिला! हा गजराज गंडस्थळं खाली घेऊन, त्यानं समोर येईल त्याला धडक देण्याच्या पवित्र्यात उभा ठाकला. गंडस्थळाची महत्त्वाची जागा माझ्या प्राणकुर्वंडी करणाऱ्या पथकांनी आणि समुद्राजवळच्या सोशिक पांड्या सैनिकांनी भरून काढली. या गजाच्या मागे घेतलेल्या सोंडेच्या आकारात उभे राहिले, ते धृष्टकेतूचे चेदी. आमच्या विशालकाय गजराजाच्या देहउदराचा भाग पाचही पांडव, जयसेनाचे मागध सैनिक यांनी भरून काढला होता. हत्तीच्या खुब्याच व पृष्ठभागाचा विभाग विराट आणि द्रुपदसैनिकांनी व्यापला होता. तीन दिवस अथक लढणाऱ्या त्या दोन्ही सैन्यांना विश्रांती मिळावी, हा त्यात कृष्णदेवांच्या रणनीतीचा अत्यंत महत्त्वाचा विचार होता. आमच्या सेनेच्या गजराजाच्या आखूड शेपटाचा भाग म्लेंच्छांना दिला होता.

दणदणत्या रणगजरांत चौथ्या दिवशीच्या भयंकर युद्धाला प्रारंभ झाला. द्रोण, दुर्योधन यांच्यासह बाल्हिक, दुर्मर्षण, जयद्रथ यांच्या रथांनी घेरलेला पितामह भीष्मांचा सात पांढ्याशुभ्र आश्वांचा गंगौघ रथ पुढे झेपावला. ते सर्व अर्जुनावर चालून गेले. आमच्या सेनेत उजव्या बाजूला लढणाऱ्या वीर अभिमन्यूला पाच वीरांनी घेरलं. अर्जुन–अभिमन्यू हे पिता–पुत्र धैर्यशील खंबीरपणानं आपल्यावरील ही सामुदायिक आक्रमणं युद्धकौशल्यानं थोपवून लढत राहिले. अर्जुनाचं दिव्य गांडीव धनुष्य मृगात कडाडत्या सौदामिनीसारखं तळपू लागलं. आमच्या धृष्टद्युम्नानं चल राजाच्या पुत्राचा वध केला. तसा त्या बाजूला हलकल्लोळ माजला. चल आणि शल्य यांनी एकमेकांची सोबत करीत धृष्टद्युम्नाला घेरून, त्याचं धनुष्य तोडून टाकलं. धृष्टद्युम्नाची शस्त्रहीन स्थिती बघून वीर अभिमन्यू चापल्यानं त्याचा साहाय्याला धावला. त्यानं शल्याला आपल्या अरोध

बाणांनी असं जखडून टाकलं की त्याचे सैनिक साहाय्यासाठी दुर्योधनाला हाकारू लागले. त्यांचा आक्रोश ऐकून दुर्योधनानं प्रथम कंठनाळ फुगवून लालेलाल होत आपला 'विदारक' शंख फुंकला. जयद्रथाच्या सैंधव पथकातले प्रचंड हत्ती, शल्याच्या साहाय्यासाठी वळविले. सोंडा उगारून चीत्कारणाऱ्या गजसेनेच्या तांडचात दुर्योधनाचे अक्राळविक्राळ घोष मिसळू लागले, "आऽक्रम – चिरडून उद्ध्वस्त करून टाका अभिमन्यू–धृष्टद्युम्नाची पथकं."

दुर्योधनाच्या गजलोळात पुत्र अभिमन्यूचा टिकाव लागणार नाही, हे ध्यानी आलेला भीमसेन आता मात्र रथाखाली उतरला. डोळे विस्फारून 'आऽक्रमऽ' म्हणत त्यानं खांद्यावरची सुवर्णवर्खी अवजड लोहगदा प्रचंड गतीनं फिरविण्यास सुरुवात सात्यकी केली. समोर दिसेल त्या हत्तीच्या गंडस्थळावर तो अशा कौशल्यानं व चपळाईनं धपाधप प्रहार उतरवीत चालला की, वर्माघात घेतलेले अनेक गज बिथरले. चक्क उलटे फिरले. चींऽचींऽ चीत्कारत नरगज भीमसेनाला भेदरून, आपलेच सैनिक पायांखाली चिरडीत उलटे धावू लागले. या रणधुंदळीत दुर्योधन कुठे फेकला गेला, कुणालाच कळलं नाही.

भीमसेनाला आवरण्यासाठी धृतराष्ट्राचे आठ पुत्र रथांतून पुढे आलेले भीमसेनानं दुरून पाहिले. तो चटक्यानं पुन्हा रथात बसला. कडाडला "विशोकाऽ वेग मोकळे सोड आणि रथ तुझ्या नुसत्या संकेतावर त्या अष्टकासमोर घे." दुर्योधनाचे आठ बंधू दृष्टिपथात येताच भीमसेनानं विद्युल्लतेच्या गतीनं त्यांच्यावर एकापाठोपाठ एक अशी संतत बाणफेक केली. मृगवाऱ्यानं झोडपून गदगद हलवून पिकलेली आम्रफळं टपाटप खाली पडावीत, तसे दुर्योधनाचे आठही बंधू रथावरून भुईवर कोसळविले.

आपल्या एक नव्हे, आठ बंधुंचं पतन बघून खवळलेला दुर्योधन गर्जना करीत भीमावर धावून आला. त्यानं एक अमोघ शक्ती भीमावर फेकली. भीमाचं मस्तक तिच्यामुळे भ्रमू लागलं. तो ध्वजस्तंभाला रेलून रथातच खाली बसला. भीमाला – आपल्या पित्याला प्रथम मूर्च्छित झालेला पाहून, त्याच्या मदतीला हिडिंबापुत्र घटोत्कच धावला. त्यानं आपल्या राक्षसी मायावी युद्धानं दुर्योधन सेनेत भयंका निर्माण केली. तेव्हाभीष्म दुर्योधनाला म्हणाले "कौरवा संध्याकाळच्या वेळी राक्षस बलवान असतात! घटोत्कच राक्षसकुलोत्पन्न आहे. सूर्य डुबतो आहे. थांब."

पितामहांच्या आज्ञेनं दुर्योधन थांबला. चौथ्या दिवशीचं युद्धही समाप्त झालं.

पांडवसेनेनं मूर्च्छित भीमसेनाला शिबिरात आणलं हे कळताच, कृष्णदेवांनी नंदिघोष रथ धडाधड उधळीत सरळ भीमसेनाच्या शिबिरासमोर आणला. नंदिघोषातील दिव्य वनस्पती–चूर्णाची लाकडी नळकांडी सोडवून घेतच ते रथातून खाली उतरले. सर्व पांडवसैनिकांनी त्यांना नमस्कार करीत मार्ग मोकळा करून दिला. आत जाताच आस्तरणावर ठेवलेल्या मूर्च्छित भीमसेनाचं मस्तक कितीतरी मायेनं त्यांनी आपल्या मांडीवर घेतलं. त्याच्या नाकासमोर हातच्या दिव्य वनौषधीचं नळकांडं धरलं.

काही वेळानं भीमसेन सावध झाला. पश्चिम सागराच्या उदरातून देवमासा उसळावा, तसा चक्क उठून बसला. उठताच त्यानं प्रश्न केला 'कुठे आहे तो नीच धृतराष्ट्रपुत्र'? तसं निर्मळ हसून आमचे यादवराज द्वारकाधीश म्हणाले "आपल्या शिबिरात! युद्ध थांबलं आहे. तू हत्तींशी लढून श्रमला आहेस. विश्रांती घे. उद्या बघू" बळेच त्यांनी भीमसेनाला पुनश्च मांडीवर झोपविला. तो घोरू लागताच काही बेळानं बालपणी गोकुळांत गुरं

राखताना कधीतरी मांडीवरच झोपलेल्या बलरामदादाचं तांबूसगौर, मस्तक जेवढ्या अलवारपणे आपल्या निळसर हातांनी ते उचलून खाली ठेवत, तसंच भीमसेनाचं घामानं डवरलेलं तांबूसगौर, गोल गरगरीत मस्तक हळुवारपणे खाली ठेवत ते उठले. कुणाशीही काहीच न बोलता धिम्या पावली आपल्या शिबिराकडे चालले, मी त्यांच्या पाठीशी झालो.

रात्री नेहमीसारखी आमची कृष्णदेवांच्या शिबिरात बैठक बसली. आमच्या गुप्तचर–प्रमुखानं भीष्मांच्या शिबिरातून उचललेली वार्ता कृष्णदेवांसमोर नम्र अभिवादन करीत ठेवली. पितामह भीष्म उद्याच्या पाचव्या दिवसासाठी पुन्हा मकरव्यूहाची रचना करणार होते.

कृष्णदेवांनी भीमसेनाला सामोरं घेऊन उद्यासाठी श्येन पक्षाच्या आकाराची व्यूहरचना कसकशी करावी, याची माहिती सर्वांना दिली. आजची बैठक त्यांनी तशी लवकरच आवरती घेतली. सर्व सेनाप्रमुख त्यांचा चरणस्पर्श घेऊन रात्रीच्या विश्रामासाठी आपापल्या शिबिराकडे निघाले. मीही निघालो. तस एकटचा मलाच थोपवून घेण्यासाठी त्यांनी "सात्यकी, थोडा थांब तू, " म्हणत मला थांबघून घेतलं. आजच्या त्यांच्या 'सात्यकी' या सादेत आगळाच जिव्हाळा असल्याचं मला नेहमीच्या सरावानं जाणवलं. सर्व योद्धे निघून जाताच ते मला कितीतरी प्रेमानं म्हणाले "यादव सेनापती आजपर्यंत किती सैन्य समरांगणात कामी आलंय कल्पना आहे?"

मी सावध झालो. हा प्रश्न अनपेक्षित होता. म्हणालो "नाही आर्य, काही कल्पना नाही."

तसं आपल्या उच्चसनावरून उठून माझ्याजवळ येत, आपला उजवा हात माझ्या डाव्या स्कंधावर ठेवत कितीतरी स्थितप्रज्ञ मनानं ते म्हणाले "दोन्हीही सेनेतील सहा अक्षौहिणी, म्हणजे जवळ–जवळ पंधरा लक्ष योद्धे वीरगतीला प्राप्त झालेत. त्यांच्या–त्यांच्या आप्तांना, स्त्रियांना काय वाटत असेल? सख्या सात्यकी, युद्धात आपल्या हाती काहीही राहत नाही. काळाला मान्य असेल, तोच युद्धाचा निर्णय असतो. उद्याच्या आपल्या श्येन पक्षयाच्या व्यूहरचनेत यादवसेनानीला शोभेल असाच वाग. जा, निद्रादेवीच्या कुशीत सुख हो!"

त्यांची चरणधूळ घेऊन शिबिराबाहेर पडताना नाही म्हटलं तरी मला प्रकर्षानं जाणवलं की, त्यांनी मला एकटचालाच मागे थोपवून घेतलं होतं आणि युद्धापासूनच्या गेल्या चार दिवसांत मला प्रथमच 'सख्या' असं संबोधून हाकारलं होतं, यादवांपैकी ज्येष्ठ म्हणून कुरुक्षेत्रावर एकटा मीच त्यांच्या निकट होतो, म्हणूनही हे घडलं असेल, अशी मी स्वत:ची समजूत घातली.

मार्गशीर्षाची वद्य षष्ठी उजाडली. कृष्णदेवांच्या पांचजन्य शंखनादाबरोबर कौरवांच्या मकराकृती सेनेवर, आमच्या सेनेचा श्येन पक्षी रणघोषणेची गगनभेदी चीत्कारती शीळ भरत कोसळला. पांचालपुत्र शिखंडी आपल्या अक्षौहिणीसह भीष्माचार्य व चित्रसेनाला भिडला. सेनेच्या मध्यभागी आचार्य द्रोण आणि शिष्य धनंजय पार्थ यांचा घनघोर संग्राम जुंपला. अर्जुनाच्या चपळ चालीमुळे गुरुवर्य द्रोण चहुबाजूंनी घेरले गेले. तसं कौरवसेनापती भीष्मांनी शंखसंकेत देऊन कलिंग, जयद्रथ आणि शकुनी यांना

आपापल्या सेनेसह अर्जुनावर तुटून पडण्याची आज्ञा केली. भीमसेन जयद्रथावर चालून गेला. युधिष्ठिर मद्रपती शल्याबरोबर युद्ध करू लागला. श्येन पक्षयाच्या एका पंखावरून सहदेव विकर्णावर कोसळला. दुसऱ्या पंखावरून आमचा सेनापती धृष्टद्युम्न नकुलासह कृपाचार्यांच्या सेनेला भिडला.

मी माझ्या दहा विक्रमी पुत्रांपैकी पाच उजव्या व पाच डाव्या हाताशी घेऊन भूरिश्रवावर तुटून पडलो. त्याला रथी म्हणून त्याचे बंधू भूरी व शल यांनी संरक्षण दिलं होतं. हा भूरिश्रवा सोमदत्ताचा पुत्र! कुरुश्रेष्ठ बाल्हीकांचा नातू व प्रत्यक्ष पितामह भीष्मांचा चुलत पुतण्या होता. विक्रमी आणि खड्गाच्या द्वंद्वयुद्धातील अजिंक्य कुरुवीर होता.

भूरिश्रव्यानं पहिल्या धडकेतच आपल्या अमोघ सुवर्णी सर्पमुख बाणांनी माझं आघाडीचं सैन्य उधळून लावलं. माझे पितृनिष्ठ दहा पुत्र मात्र मला संरक्षण देत लढत पुढेच चालले. त्यांचं आणि भूरिश्रवा व त्याचे बंधू यांचं अटीतटीचं धनुर्युद्ध पेटलं. माझा रथ मध्ये ठेवून, माझे दहाही धनुर्धर शूर पुत्र पुढे सरसावून अथक प्रहरभर लढत राहिले. त्यांनी हां–हां म्हणता भूरिश्रव्याला घेरून टाकलं. माझ्या पुत्रांनी भूरिश्रव्याला बाणांनी वेधून ठार मारण्याचाच निर्धार केला होता. मात्र भूरी आणि शल या त्याच्या कुशल धनुर्वीर बंधूंनी त्याला बलवंत कवच दिलं होतं. तिसऱ्या प्रहराला संतप्त झालेला भूरिश्रवा आपल्या दोन्ही बंधूंना मागे सरण्याची आशा करून, सागरातून मगर उसळावा, तसा कुरुसेनेतून आपला रथ पुढे घेत उसळला. तो जसा अजिंक्य खड्गयोद्धा होता, तसा साक्षात पितामह भीष्मांकडून धनुर्वेध शिकलेला धनुर्वीरही होता. त्यानं दहा वेगवान सर्पमुख बाण माझ्या दहाही पुत्रांवर एकापाठोपाठ एक अचूक सोडले. ते कुणाला वक्षात, कुणाच्या कंठनाळात, कुणाच्या सरळ मस्तकात घुसले. माझे दहाही आज्ञाधारक वीरपुत्र एकापाठोपाठ एक कोसळले. कुणी रथात, कुणी समरभूमीवर! ती वाताहात बघताच मी क्षणभर सुन्नच झालो. माझं पितृहृदय शतशः विदीर्ण झालं.

एकापाठोपाठ एक दहा विक्रमी पुत्र गतप्राण होणं, हा माझ्यावरचा साक्षात वज्राघातच होता. पायाच्या नखांपासून मस्तकीच्या सेनापतीकिरीटापर्यंत मी संतापानं कसा पेटून उठलो. भूरिश्रवाला कंठस्नान घातल्याशिवाय, आता मला क्षणाचाही विश्राम कसा तो मिळणार नव्हता. मी माझ्या मांडीवरील ज्येष्ठ पुत्राचं मस्तक डोळ्यांतील अश्रुलोट आवरत रणभूमीवर ठेवलं. त्याच्याभोवती सैनिकांनी ठेवलेल्या माझ्या गतप्राण नऊ पुत्रांची मंडलाकृती मस्तकं होती. मी त्या प्रत्येक पुत्राच्या मुखाचं अंत्यदर्शन घेतलं. मला फार–फार तीव्रपणे वाटलं की, या क्षणी माझ्या पाठीवर हात ठेवायला द्वारकाधीश श्रीकृष्णदेवच जवळ पाहिजे होते. ते तर श्येन पक्षयाच्या दुसऱ्या पंखावर, द्रोणाचार्यांशी लढणाऱ्या अर्जुनाच्या नंदिघोषावर पार दुसऱ्या टोकाला होते.

“भूरिश्रव्याऽ नीचाऽ यादवांचा हा सेनापती – सत्यकपुत्र सात्यकी आज समरांगणात तुला वधल्याशिवाय कधीच राहणार नाही! जय इडाऽमाता!” असं गर्जून, धनुष्य पेलून, उठून मी रथारूढ झालो. माझ्या भडकलेल्या संतप्त पितृहृदयाचा एकचएक मूक आक्रोश स्फोटून उठला – ‘भूरिश्रवाऽ भूरिश्रवाऽ!’

त्या आवेगात भूरिश्रव्याच्या रथाला रथ भिडवून मी त्याच्या रथाची चकरं प्रथम

उद्ध्वस्त केली. त्याचा रथ कलंडला. जोपर्यंत त्याच्या हातात शरचाप आहे, तोपर्यंत त्याला युद्धनियमाप्रमाणे शरानंच टिपावं, म्हणून मी माझ्या सारथ्याला त्याच्या रथाभोवती मंडलं घ्यायला सांगितलं. माझा रोख ओळखून भूरिश्रव्यानं तत्परतेनं धनुष्य त्यागलं. हाती नग्न खड्ग घेऊन तो सरळ रणभूमीवर उतरला. मला खड्गाच्या द्वंद्वाचं ललकारतं आव्हान देत म्हणाला, "तुझे दहा पुत्र कोसळविलेतच. रानटी यादवांच्या पळपुट्या नायकाच्या प्रिय सख्या, वीर सेनापती म्हणविणाऱ्या भ्याडा, तू अकरावा!"

ते ऐकताना माझ्या अंगाची कशी लाही–लाही झाली. त्यानं मला भ्याड म्हटल्याचं काही नव्हतं – माझ्या प्रिय यादवांना रानटी म्हटल्याचं काही नव्हतं – त्यानं माझ्या प्राणप्रिय कृष्णदेवांना 'पलपुटा' म्हटल्याचं मला असह्य होतं.

मीही त्याला तितकंच कडवं आव्हान देत म्हणालो, "रजःस्वला कुलस्त्रीच्या नेसत्या वस्त्राला भरसभेत हात घालण्याची ओंगळ आज्ञा देणाऱ्या दुर्योधनाची थुंकी झेलणाऱ्या कुरुवंशजा, तू वधलेल्या माझ्या दशपुत्रांच्या कलेवरांना साक्षी ठेवून तुला आज इडादेवीचा इंगा चाखवितो!"

आमची वीतभर जाडीच्या पात्यांची कणखर खड्गं ठणठणत एकमेकांना भिडली. आमचं खड्ग–द्वंद्वयुद्ध जुंपलं. चौथा प्रहर सरतीला आला, तरी ते अविश्रांत चालूच राहिलं.

भूरिश्रवा हटत नव्हता – मी तर हटणारच नव्हतो. एकाएकी भोवतीच्या बघ्यांच्या मंडलातून खांद्यावर आपली विशाल गदा पेललेला रक्तस्नात भीमसेन आम्हा दोघांमध्ये येऊन पहाडासारखा उभा राहिला. द्वंद्व थांबलं. मी काही भीमसेनावर वार करणार नव्हतो. भीमसेनाच्या हाती गदा असल्यामुळे, दोघे समशस्त्र नसल्यामुळे तो भीमसेनावर वार करू शकत नव्हता. भीमसेनानं 'चला सेनापती' म्हणत माझ्या पाठीवर थाप भरली. माझ्या घामेजल्या पाठीवरून रक्तमिश्रित घामथेंब उडाले. माझ्या हातीचं खड्ग आपल्या हाती घेत, मला सावरत भीमसेनानं आपल्या रथात नेलं. सूर्य डुबला. समरभूमीच्या दुसऱ्या टोकाकडून प्रथम पांचजन्याचा, नंतर गंगनाभाचा युद्धसमाप्तीचा शंखध्वनी ऐकू आला.

भीमसेनाच्या रथातून शिबिराकडे परतताना आत्ता कुठे माझ्या ध्यानी आलं की, रात्री कृष्णदेवांनी मला एकट्यालाच सर्वांत मागे का थोपवून घेतलं होतं! 'सख्या' अशी प्रेमभावानं का साद घातली होती!

पुत्रवियोगामुळे त्या रात्रीच्या सेनाबैठकीसाठी मी काही कृष्णदेवांच्या शिबिराकडे गेलो नाही. सुन्न मनानं माझ्याच शिबिरात राहिलो. मध्यरात्रीच्या दरम्यान समवेत एक टेंभाधारी यादवसैनिक घेऊन साक्षात कृष्णदेवच माझ्या भेटीसाठी शिबिरात आले!

त्यांना बघताच पुत्रशोकानं माझं पितृहृदय भडभडून आलं. तरीही त्यांच्या आदरासाठी मी जागीच उठून उभा राहिलो.

काहीही न बोलता टेंभ्यांच्या मंद प्रकाशात ते माझ्याजवळ आले. दोन्ही हात पसरून त्यांनी मला दृढालिंगनात घेतलं. माझ्या डोळ्यांतून सरसर पाझरणारे पुत्रशोकाचे उष्ण अश्रू त्यांच्या पाठीच्या पन्हाळीतून पाझरू लागले. ऐंशी पुत्रांचं पितृत्व स्थितप्रज्ञ वृत्तीनं मिरवणाऱ्या एका पित्याचा विमल हात, दहा पुत्रांच्या शोकानं विद्ध झालेल्या एका पित्याच्या पाठीवरून त्याचा क्षोभ शांतवीत फिरू लागला. माझं मन त्यांच्या नुसत्या स्पर्शानं निरामय शांत झालं.

मार्गशीर्ष वद्य सप्तमीला – युद्धाच्या सहाव्या दिवशी कुरुसेनापती पितामहांनी क्रौंचपक्षयाच्या आकाराची व्यूहरचना केली. तिला प्रत्युत्तर म्हणून पांडवसेनेचा सेनापती धृष्टद्युम्न यानं भीमसेनाच्या मदतीनं बाणाकार सेना रचली. सूर्याचा सारथी अरुण आकाशमंडलात दिसू लागताच, कृष्णदेवांनी पांचजन्याचा व पितामहांनी गंगनाभाचा युद्धारंभाचा शंखनाद घुमविला. आतापर्यंत वीस–एक दुर्योधन–बंधू वधलेल्या भीमसेनाचा, कुरुसेनेच्या पायातील किकरकाटा समूळ उखडून काढण्यासाठी दुर्योधन आज हट्टाला पेटला. त्यानं भीमसेनसारथी विशोकानं पुढे घेतलेला सात ताम्रवर्णी घोड्यांचा रथ आपल्या दहा बंधूंसह हां–हां म्हणता घेरून टाकला. त्यात दुःशासन, दुर्विषह, दुःसह, दुर्मद, जय, जयसेन, विकर्ण, चारुमित्र, दुर्धर्ष व सुवर्मा असे रथी होते. अंगी युद्धसंचार झालेला भीमसेन, धावत्या रथातील मैरेयक मद्याचे बुधले रिचवून गुंजलाल डोळ्यांनी, आपली विशाल गदा उगारत रथातून चक्क उडी घेत समरभूमीवर उतरला. मद्यापेक्षा समोर दहा धृतराष्ट्रपुत्र बघूनच त्याचा रणावेश अनावर झाला. त्याचं आणि धृतराष्ट्रपुत्रांचं काळीज थरकविणारं थरारक संकुल गदायुद्ध सुरू झालं.

मी रात्रभर निद्राहीन, जागाच होतो. एकेक करीत माझ्या दहाही गतप्राण पुत्रांच्या मुद्रा माझ्या जागत्या डोळ्यांसमोर फिरत होत्या. त्यांच्या अनेक आठवणी मनी दाटून आल्या होत्या. पहाटे ब्रह्मसरोवरात स्नान आवरून होताच मी तडक कृष्णदेवांच्या शिबिरात गेलो. अंगी सारथिवेष घेतलेले कृष्णदेव हाती प्रतोद घेऊन शिबिराबाहेर पडण्याच्या तयारीतच होते. मी त्यांचा चरणस्पर्श घेत असतानाच, मला खांदे थोपटून हलकेच वर उठविताना ते म्हणाले, “सख्या सात्यकी, रात्रभर झोपलेला दिसत नाहीस तू! तुझ्या मनातील सल मी जाणतो. चिंता करू नकोस.” मला आता सवयच झाली होती, त्यांच्या बोलण्यातील रिकाम्या जागांचा आशय भरून घेत सर्व ऐकण्याची! त्यांचे बोल ऐकून मी निर्भय झालो.

आजच्या युद्धात खरी अटीतटी झाली ती आचार्य द्रोण आणि पांचालराज द्रुपद यांच्यात! धृष्टद्युम्नानं भीमसेनाच्या साहाय्यासाठी, मार्गात पडलेल्या मृत हत्तींचे देह कौशल्यानं ओलांडत रथासह त्याला गाठलं. भीमसेन धृतराष्ट्रपुत्रांनी वेढलेला होता. निकरानं गदायुद्ध खेळत होता. लाल मुंग्यांसारखे चवताळलेले दुर्योधनबंधू भीमसेनाचा घात करणार हे जाणलेल्या धृष्टद्युमानं, आज समरात प्रमोहनास्त्र या पहिल्या अस्त्राचा उपयोग केला. त्यानं फेकलेल्या अग्निबाणांतून अशी धुम्रवलयं बाहेर पडू लागली की, ती नाकात शिरताच एकेक करीत धृतराष्ट्रपुत्र मुर्च्छित होऊन कोसळू लागले. निश्चेष्ट पडले. त्यांच्या साहाय्यासाठी आपल्या उंचशील सालंकृत रथातून द्रोणाचार्य धावले. त्यांनी प्रज्ञास्त्राचं प्रक्षेपण करून बाणांच्या पहिल्या टप्प्यात धृष्टद्युम्नाच्या संमोहनास्त्राची धुम्रवलयं पिटाळून लावली. दुसऱ्या अग्निबाणांच्या टप्प्यात दिव्य वनस्पतींचा सुगंध पसरवून निश्चेष्ट पडलेल्या दुर्योधनबंचं शुद्धीवर आणलं. द्रोणाचार्य आज अंगी युद्ध संचारल्यानं अनावर झाले होते. त्यांचासमोर महाबली गदावीर भीम आणि पांडवसेनापती धृष्टद्युम्नही टिकाव धरू शकत नव्हते. त्यांनी शंखनादांच्या विशिष्ट लयी उठवून अर्जुनपुत्र तरुण अभिमन्यूला सहकार्यासाठी ललकारलं. तसं सुभद्रापुत्र अभिमन्यू बारा रथ्यांचं कडं भोवती घेऊन, त्या दोषांचा साहाय्यार्थ धावला. वीर अभिमन्यूनं समरहीवर उतरून प्रथम गदायुद्ध अंगी भिनलेल्या

काका भीमसेनांना हात जोडून, विनंत्या करून एकदाचं आपल्या रथावर घेतलं. इतर रथ्यांनी धृष्टद्युम्नाला त्याच्या रथावर चढविलं. आता सांजावत आलं होतं.

आज माझं आणि भूरिश्रव्याचं दिवसभर नाना प्रकारांचं युद्ध जुंपलं होतं. सांजावत आलेलं बघून भूरिश्रवा आपलं वीतभर जाडीचं नग्न खड्ग घेऊन रथातून खाली उतरला. मला खड्गाच्या द्वंद्वासाठी आव्हान देत ललकारला, “यादवांचा सेनापती म्हणविणाऱ्या कृष्णासारख्याच पळपुटचा, काल भीमसेनामुळे वाचलास. आज कोण आहे तुला सोडवायला, तेच बघतो!” आमच्या खड्गांचा थरारक खणखणाट ऐकून भोवतीचे योद्धे युद्ध थांबवून बघे झाले. मी अत्यंत निकरानं ‘जय इडादेवीऽ’ गर्जत भूरिश्रव्याशी लढू लागलो. आमच्यापैकी कुणीच कुणाला हटत नव्हतं, शरण जात नव्हतं. दोघांच्याही शरीरांवर उतरलेल्या खड्गांच्या आघातांनी रक्ताच्या धारा लागल्या होत्या. घामात मिसळलेलं ते रक्त, कुरुक्षेत्राच्या समरभूमीवर अर्घ्यासारखं अर्पण केलं जातं आहे, याचं आम्हा दोघांनाही भान उरलं नव्हतं आणि तो क्षण आला. घायाळ होऊन मी समरभूमीवर गुडघे टेकले. माझं खड्गं निसटून दूर पडलं होतं. चपळाईनं भूरिश्रव्यानं हा क्षण साधून, निःशस्त्र माझा शिरच्छेद करण्यासाठी आपलं रक्तस्नात वीतभर रुंदीचं खड्ग माझ्यावर निर्णायक वार करण्यासाठी उगारलं. मला कळून चुकलं, कुठला क्षण आला आहे ते! डोळे मिटून, ज्यांची मी आयुष्यभर सावलीसारखी पाठराखण करीत सेवा केली होती, त्या कृष्णदेवांचं जीवदेठापासून स्मरण केलं. आता एकच क्षण होता की, भूरिश्रव्यानं उगारलेलं खड्ग माझ्या कंठनाळावर उतरून माझं मस्तक धडावेगळं होणार होतं. माझ्या मिटल्या जागत्या डोळ्यांसमोर उभे होते, केवळ हाती प्रतोद घेतलेले सारथी कृष्णदेव!

तो क्षण परतला, दुसराही उलटला, तिसराही निघून गेला. ‘धप्प’ अशा कानी पडलेल्या ध्वनीमुळे मी खाडकन डोळे उघडले. ज्यांचं मी स्मरण केलं होतं, ते प्रतोदधारी कृष्णदेव साक्षात तसेच मला समोर नंदिघोषावर दिसले! नंदिघोषाच्या रथनीडामागील घेरात गांडीव धनुष्य पेललेला धनुर्धर अर्जुन माझ्याकडे बघत हसत उभा होता. त्याच्या रथावरील ध्वजावरचा कपि हात उंचावून उड्डाणाच्या पवित्र्यात फडफडत होता. कृष्णसखा अर्जुनानं आपल्या एकाच अमोघ चंद्रमुख बाणानं भूरीश्रव्याचा माझ्यावर खड्ग उगारलेला हात, वरच्यावर छेदून अवकाशात उडविला होता. त्या दिवशी मी नंदिघोषातूनच शिबिराकडे परतलो होतो. भूरीश्रव्यानं नियमभंग करण्यापूर्वीच अर्जुनानं कृष्णदेवांच्या तत्पर संकेतानुसार त्याला टिपलं होतं.

रात्रीच्या आमच्या बैठकीत कुरुशिबिराची वार्ता आली – सेनापती पितामह भीष्मांच्या नेतृत्वाखाली बसलेल्या त्यांच्या रात्र–बैठकीत दुर्योधनानं कसा थयथयाट केला होता. एकच आक्षेप उठवून की, “भूरीश्रव्यावर मागून बाण फेकून धनुर्धर म्हणविणाऱ्या अर्जुनानं युद्धनियमांचा चक्क भंग केला आहे. पांडवांच्या शिबिरात तातडीनं राजदूत धाडून अर्जुनाला युद्धातून कठोरपणे निवृत्त केलं पाहिजे.”

त्याचा थयथयाट बराच वेळ शांतपणे ऐकून शेवटी अनुभवी व वृद्ध कुरुसेनापती पितामह एकच उत्तरले, “एकटच्या भीमसेनाला दहा धृतराष्ट्रपुत्रांनी घेरून गदेचं संकुलयुद्ध तुम्ही प्रथम मांडलं, तोही नियमभंगच होता. त्यांचं नेतृत्व प्रत्यक्ष तू केलं होतंस दुर्योधना. तू होशील का प्रथम निवृत्त युद्धातून? शिवाय निःशस्त्र सात्यकीला भूरिश्रवा वधणार होता. हा नियमभंग उलट अर्जुनानंच थोपविलेला नाही काय?” ते

ऐकून निरुत्तर झालेला दुर्योधन चरफडत निघून गेला होता.
ती वार्ता ऐकून आमच्या कृष्णदेवांच्या मुखमंडलावर एक हसरी छटा तरळून गेली.

युद्धाच्या सातव्या दिवशी आमच्या सेनेची युधिष्ठिरनं धृष्टद्युम्नाच्या सहकार्यानं वज्र नावाच्या व्यूहाची रचना केली. ही रचना देवराज इंद्राच्या प्रसिद्ध वज्र या शस्त्राच्या आकाराची होती. त्याला प्रत्युत्तर म्हणून पितामहांनी कुरूंच्या सेनेची रचना मंडल नावाच्या व्यूहात केली.

आमच्या वज्रव्यूहरचनेच्या दातेरी अग्रभागी मी आणि भीमसेनपुत्र घटोत्कच आज उभे ठाकलो. आमच्या मागे मत्स्यराज विराट आणि पांचालराज द्रुपद वज्राच्या मध्यभागी अर्जुनासह ससैन्य उभे राहिले. वज्राच्या शेपटाकडील भाग अर्जुनपुत्र इरावान, चेकितान, नकुल–सहदेव अशा वीरांनी सावरला. आज भीमसेन आपल्या वेगवान सात ताम्रअश्वांच्या रथातून सारथी विशोकाच्या साहाय्यानं वज्राची कड सांभाळत सेनाभर मंडलाकृती गर्जत फिरणार होता.

आमचं दातेरी सेनावज्र पितामहांच्या सेनामंडलावर गर्जत कोसळलं. कौरवांच्या मंडलातून अग्रभागी असलेला बकासुरबंधू राक्षस अलंबुष मला आणि घटोत्कचाला भिडला. अलंबुष राक्षसी मायावी युद्धात पारंगत होता. तो त्याच्या रथासह सेनेत क्षणात पूर्वेला, तर दुसऱ्या क्षणी पश्चिमेला दिसत होता. लढता–लढता दक्षिणोत्तर रथ धावडवीत होता. माझं आणि अलंबुषाचं द्वैरथ युद्ध दुपारपर्यंत अटीतटीनं चाललं. अलंबुषानं माझ्याभोवती असलेलं घटोत्कचाचं सेनाकवच कौशल्यानं विलग करून, त्याला भगदत्ताच्या सेनेसमोर ढकललं.

एकमेकींत मिसळलेल्या दोन्ही सेनांच्या मध्यभागी द्रोण आणि विराट, विंद-अनुविंद आणि इरावान, पितामह भीष्म आणि भीमार्जुन यांचं घनघोर रणकंदन जुंपलं. निकरानं लढणारा नरकासुरपुत्र भगदत्त आवरत नाही, म्हणून संध्यासमयाला घटोत्कचानं त्याच्यावर एक राक्षसी मायावी शक्ती सोडली. असुरपुत्र भगदत्तानं त्या शक्तीचे तीन तुकडे करून रणभूमीवर पाडले. ते बघताच भयकातर झालेला घटोत्कच रणातून शिबिराकडे पळत सुटला. कृष्णदेवांनी पूर्वी केलेले उपकार विसरून नरकासुरपुत्र भगदत्त कौरवांकडून युद्धात उतरला होता. समरांगणातून पळणाऱ्या भीमपुत्राला बघतच सातव्या दिवसाचा सूर्य मावळला. युद्ध थांबलं.

आत्तापर्यंत कुरुक्षेत्राच्या वेगवेगळ्या नव्या रणक्षेत्रांवर हे महायुद्ध खेळविण्यात आलं होतं. गेल्या सात दिवसांतील प्रत्येक बदलत्या रणक्षेत्रावर घडलेल्या बारीकसारीक घटनेचा वृत्तान्त, रोज हस्तिनापूर आणि द्वारकेला, तसेच भोवतीच्या गणराज्यांतील राजनगरांना गुप्तचरांकरवी जात होता. हस्तिनापुरात सर्वप्रथम तो कुरुमंत्री सारथिप्रमुख संजय यांच्या कानी पडत होता. ते त्याचं चित्रवत वर्णन आपल्या अंध महाराज धृतराष्ट्रांना व गांधारीदेवींना यथासांग कथन करीत होते. आतापर्यंत चाळीस–एक धृतराष्ट्रपुत्र वधले गेले होते. त्यांतील अधिक ते एकट्या भीमसेनानंच वधले होते. त्यांची नावं आणि वृत्तान्त ऐकताना भीमसेनावरच्या क्रोधानं अंध धृतराष्ट्रमहाराज संतापानं थरथर कापत होते.

युद्धाचा आठवा आणि नववा दिवस एकट्या भीष्मांच्या गगनवेधी पराक्रमानं गाजला. आठव्या दिवशी त्यांनी आपल्या सेनेची महाव्यूहाची रचना केली. आमच्या

सेनापती धृष्टद्युम्नांन तिला शृंगाटक नावाची गुंतीगुंतीची सेनारचना करून उत्तर दिलं. आठव्या दिवशीच्या पहिल्या प्रहरातच दुर्योधनानं सेनापती भीष्मांचं प्राणपणानं रक्षण करण्यासाठी त्यांच्याभोवती पेरलेले सुनाभ, आदित्यकेतू, पंडितक, महोदर अपराजित, विशालाक्ष आणि बव्हाशी असे त्याचे आठ बंधू वृकोदर भीमसेनानं वधले. आठवा दिवस उलूपी व अर्जुनाचा पुत्र इरावानानं गाजविला.

नवव्या दिवशी आपल्या सेनेची 'सर्वतोभद्र' व्यूहात रचना केलेल्या कुरुसेनापती पितामह भीष्मांनी सेनेच्या अग्रभागी उभे ठाकून, आपला दिव्य गंगनाथ शंख फुंकला. गेले आठ दिवस त्यांनी अतुल विक्रम करून पांडवांची तीन अक्षौहिणी सेना यमसदनाला धाडली होती. मात्र पहिल्या दिवशीच्या विराटपुत्र उत्तर व श्वेत यांच्या पतनाशिवाय एकही नामवंत पांडवयोद्धा काही कामी आला नव्हता. यामुळे सेनापती म्हणून स्वत:वरच असंतुष्ट असलेल्या भीष्मांच्या शंखाचा नाद आज एवढा भेदक होता की, तो ऐकूनच कृष्णदेवांनी ताडलं की, पितामह आज कुणालाही आवरणार नाहीत. तसंच घडलं. द्रोणाचार्य, दुर्योधन, सुशर्मा, भगदत्त अशा महारथ्यांच्या सोबतीनं पितामहांनी पांडवांची एक अक्षौहिणी सेना आजच्या एका दिवसात संध्याकाळपर्यंत धराशायी केली. पितामहांना आवरलं नाही तर पांडवसेना समूळ नष्ट होईल काय, या भयंकेनं अर्जुनाचे चारही बंधू आपल्या रथांसह त्याच्या नंदिघोषाभोवती एकवटले. मीही माझा रथ घेऊन नंदिघोष जवळ केला. पांडवश्रेष्ठ युधिष्ठिर हातातील धनुष्य थांबवून, कृष्णदेवांना दोन्ही हात जोडून विनवताना म्हणाला, "यादवश्रेष्ठा, आता तूच पांडवसेनेला तार."

पितामह भीष्मांच्या रणावताराला भेदरलेला पांडवांचा सेनापती धृष्टद्युम्न नंदिघोषाकडेच येतो आहे हे बघून, कृष्णदेवांनी निकरानं नंदिघोष आपल्या शैब्य, बलाहक, मेघपुष्प, सुग्रीव या सद्‌गुणी अश्वांना विशेष संकेत करीत पितामहांच्या गंगौघ रथासमोर आणला.

गेल्या आठ दिवसांत कृष्णदेवांनी चुकूनही चेतना देणारा कुठलाही रणघोष केला नव्हता. ते नित्य करीत त्या इडादेवीचासुद्धा! या क्षणी मात्र धनुर्धर धनंजयाला पितामहांसमोर आणूनही, पुन्हा त्याला गांडीव नुसतंच हाती पेलून क्रियाशून्य झालेलं बघताना कृष्णदेव चक्रावले. हातचे आठही वेग झटकत नंदिघोष गंगौघाभोवती गरगर फिरवीत, आज पहिल्यानं कंठनाळ फुलवीत त्यांनी रणघोष दिला, 'जैऽइडाऽ – आऽक्रऽम' तरीही अर्जुन स्वस्थच! कृष्णदेव आपले प्रिय अश्व आवरताना त्याला स्मरण देत म्हणाले, "युद्धारंभी मी तुला केलेला हितोपदेश पार्था, इतक्यातच विसरलास काय? पितामहांच्या अमोघ बाणांना घाबरलास की काय?"

अर्जुनानं नकाराची केवळ मान डोलावली. पण – पण गांडीव धनुष्य काही उचलून पेललं नाही. तो पुन्हा संभ्रमित झाला होता. मोहग्रस्त झाला होता! आता मात्र त्याला कसलाही हितोपदेश न करता, एकाच प्रत्यक्ष कृतीनं त्याच्यातील पुरुषार्थ जागृत करणं अटळ होतं. निर्धारी मुद्रेनं कृष्णदेव त्याला म्हणाले, "ठीक आहे. एकदा पितामहांच्यासाठी शस्त्र धरणार नाही, ही प्रतिज्ञा मोडली. आता तुझ्यासाठीही मोडावी लागणार!"

हातचे वेग नंदिघोषाच्या रथनीडावर खाली ठेवून, हातचा प्रतोद उगारत द्वारकाधीशांनी कुरुक्षेत्रावर झेप घेतली.

आता मात्र धनुर्धर अर्जुन खरोखरच गडबडला. त्यानंही गांडीव धनुष्य रथातच ठेवून

खाली झेप घेतली. पितामहांच्या रथाकडे त्वेषानं धावणाऱ्या आर्यश्रेष्ठ कृष्णदेवांच्या समोर दोन्ही हात पसरून आडवं येत तो कळवळून म्हणाला, "हृषिकेशा, थांब! आपली प्रतिज्ञा तू भंगू नकोस. मी उद्या पितामहांशी निकरानं युद्ध करेन – हनिष्यामि पितामहम्।"

ते उद्‌गार ऐकतच कुरुक्षेत्राच्या समरभूमीवरचा नवव्या दिवसाचा सूर्य मावळतीला गेला.

आपल्या रथातून कृष्णार्जुनांची उडालेली ती तारांबळ, पितामहांनी हसतच बघितली. हातचं धनुष्य आपल्या गंगौघ रथात खाली ठेवून मावळलेल्या सूर्याला दोन्ही हात जोडून दोन्ही सेनेतील तो योद्धासूर्य डोळे मिटून पुटपुटला, "ॐ भूर्भुवः स्वः तत्सवितर्वरेण्यं भर्गो: देवस्य धीमहि।"

आजच्या रात्री कृष्णदेवांच्या शिबिरात भरलेली सेनाप्रमुखांची बैठक त्यांनी दहाव्या दिवसाच्या सूचना सर्वांना देऊन लवकरच आवरती घेतली. शिबिराबाहेर पडणाऱ्या सर्व पांडवांतील एकट्या अर्जुनाला मात्र ते म्हणाले, "अर्जुना थांब, तुझ्याशी काही बोलायचं आहे."

आज्ञाधारक अर्जुन थांबला. आता आपली चांगलीच कानउघाडणी होणार, म्हणून मन बांधून घेऊ लागला. तसं आसनावरून उठून त्याच्या जवळ जात, त्याच्या पुष्ट वृषस्कंधावर आपला उजवा आजानुबाहू ठेवत, त्याला थोपटून ते म्हणाले, "भिऊ नकोस. तू पुन्हा कसा काय संभ्रमित झालास, असा प्रश्न मी तुला काही आता विचारणार नाही! आता एकच कर. तू स्वत: पांडवांच्या स्त्रीमंडळाच्या शिबिरसंकुलात असाच जा आणि सखी द्रौपदीला मी भेटीला बोलविल्याचा निरोप दे!"

'आज्ञा आर्य' म्हणत अर्जुन निघून गेला. 'युद्धात स्त्रीचं काय काम?' असा विचार करीत मीही जायला निघालो. तसं मलाही थोपवून घेतं ते म्हणाले, "सख्या सात्यकी, तुला थोडं थांबायचं आहे. एक काम मार्गी लावायचं आहे – यादवांचा सेनापती म्हणून!"

काय काम असावं? उद्या हे धृष्टद्युम्नाला कोणता व्यूह रचायला सांगणार आहेत. माझं त्यातील कोणतं दायित्व असेल? माझ्या मनात क्षणात अनेक विचार तरळून गेले.

तिकडे कुरुसेनापती भीष्मांच्या शिबिरात संतप्त दुर्योधन शकुनी-दु:शासनासह निर्धारपूर्वक घुसला होता. एकच विचारायला की, त्यांनी समोर आलेला, हाती गवसलेला भ्रमचित्त अर्जुन आज कसा काय सप्राण सोडला?

सायंसंध्या आवरून शिबिराच्या आतल्या कक्षात ध्यानस्थ बसलेल्या पितामहांना त्यानं सेवकाकरवी अशिष्टपणे उठवून बाहेर बोलवून घेतलं. नेहमीच्या तडतडत्या अरेरावी भाषेत तो म्हणाला, "पितामह, हे युद्ध चाललंय की, कुक्कुटांची करमणुकीची लढत? नऊ दिवस झाले. आमची निम्म्याच्यावर सेना भीमार्जुनांनी वधली. माझे पन्नास-एक बंधू वीरगतीला गेले. अद्याप एकाही पांडवाच्या अंगावर बाणाचा साधा ओरखडा नाही! हा काय प्रकार आहे? आपण पांडवांच्या प्रेममोहाला बळी पडून सेनापतीपदाचं कर्तव्य विसरला आहात काय? की हा माझ्या मंदभाग्याचा आघात आहे? आपण पांडवप्रेम त्यागू शकत नसाल, तर सेनापतीपदाचा आता त्याग करावा, अशी विनंती करण्यासाठी मी आलो आहे. आम्हा कौरवांना मग दिग्विजयी अंगराज कर्णाला पाचारून सेनापतीपदाचा अभिषेक तरी करता येईल. मला विश्वास आहे, तो नक्कीच विजयश्री खेचून आमच्या पक्षात आणील. काय करणार? स्पष्ट बोलण्याची कृपा व्हावी."

ते ऐकून स्वनामधन्य, निग्रही पितामह भीष्म आतून मनोमन डिवचले गेले. तरीही निकराच्या शांतपणानं जसा कृष्णदेवांनी अर्जुनाला केला होता, तसा हितोपदेश दुर्योधनाला करताना म्हणाले, "दुर्योधना, कृष्णार्जुनांना ओळखायला तू चुकतो आहेस. मीच कृष्णाला विचारपूर्वक 'वासुदेव' म्हटलं आहे, हे तू विसरला आहेस. वृद्धत्वाचा अनुभव म्हणून सांगतो, पांडवांना त्यांच्या इंद्रप्रस्थाचा राज्यभाग देऊन टाक! ते सर्वांच्याच हिताचं आहे."

पितामहांचे अनुभवी बोल; भरतीच्या समुद्रानं गंगेचं पाणीही वरच्यावर फेकून द्यावं तसे फेकून देत दुर्योधन म्हणाला, "ती वेळ केव्हाच निघून गेली आहे. माझं सहा अक्षौहिणींवर सैन्य युद्धात वीरगतीला गेलं आहे. आपण सेनापतीपद त्यागणार की कौरवांच्या निःसंदिग्ध विजयासाठी निकोप लढणार?" त्या अहंमन्य धृतराष्ट्रपुत्रानं पितामहांना अपराध्याच्या कोठडीतच उभं केलं.

हे मात्र सत्यप्रतिज्ञ, आजन्म ब्रह्मचारी, ब्रह्मास्त्रधारक, परशुरामशिष्यांना असह्य झालं. दुर्योधनानं लवकरात लवकर आपल्या शिबिराबाहेर तोंड काळं करावं म्हणून पितामह भीष्म निर्धारानं संथपणे म्हणाले, "उद्या मी ही पृथ्वी निष्पांडवी करीन! नाहीतर माझ्या देहाची समिधा रणयज्ञात अर्पण करीन!! तू जाऊ शकतोस."

कितीही केलं तरी ती 'भीष्मप्रतिज्ञा' होती! ती लपून राहणं शक्यच नव्हतं. वाऱ्यावर आरूढ होऊन ती आमच्या कृष्णदेवांच्या शिबिरापर्यंत पोहोचली. ती ऐकताच, मी पाहिलं, ते कधी नव्हे तितके सैरभैर झाले. त्यांच्या डोळ्यांसमोर आता एकचएक प्रश्न होता – अर्जुनासह सर्व पांडवांचं रक्षण करण्याचा! त्यासाठी प्रसंगी पितामह भीष्मांना वधण्याचा!

नवव्या दिवसाची मध्यरात्र जवळ आली. अर्जुनानं निरोप दिलेल्या द्रौपदीदेवी दारुकानं वाहून आणलेल्या नंदिघोष रथातून कृष्णदेवांच्या शिबिरासमोर उतरल्या. त्यांना समोर बघताच नित्याच्या प्रेमळ बोलीत देव म्हणाले, "सखी द्रौपदी, तुला तुझ्या पतिदेवांसाठी आणि पांडवसेनेच्या रक्षणासाठी या क्षणी मोठीच कामगिरी करावी लागणार! तुला आत्ताच कौरवसेनापती पितामह भीष्मांच्या दर्शनासाठी आमच्या या सात्यकीसमवेत जावं लागणार. जाताना एकच दक्षता घे. तुझ्या अंशुकाचा पदर पितामहांना नमस्कार करताना मुखभर वेढलेला राहील, अशी दक्षता घे. तुझी मुद्रा त्यांना टेंभ्यांच्या अंधूक प्रकाशात वृद्धत्वामुळे दिसणार नाही. तू एकच दक्षता घ्यायची आहे, ते प्रथम काही बोलल्याशिवाय आपणहून एकही शब्द बोलायचा नाही. त्यांना नमस्कार करताना, तुझ्या हातातील सुवर्णकंकणांचा स्पष्ट नाद उठला पाहिजे, हेही विसरू नकोस. ते बोलल्यानंतर काय नि कसं बोलावं, हे आपोआप तुझं तुलाच सुचेल!"

आज्ञेप्रमाणे मी द्रौपदीदेवींसह निघालो – कुरुसेनापती पितामह भीष्मांच्या शिबिराकडे! मला शिबिराबाहेरच थांबण्याची व पितामहांच्या सेवकाला 'कुणी स्त्री पितामहांच्या दर्शनासाठी आली आहे,' एवढंच बोलण्याची कडक सूचना होती.

कुरुक्षेत्राच्या समरभूमीला घेरून रातकिड्यांची करकर घुमत होती. कुठून-कुठून आलेल्या घुबडांचे घुत्कार मधूनच ऐकू येत होते. मानवी देहांचे अवयव ओरबाडायला चटावलेल्या लांडग्या–कोल्ह्यांची कुई दूरवर ऐकू येत होती. ठरल्याप्रमाणे पितामह भीष्मांच्या शिबिराजवळ येताच, मी कुरुसेनापतींच्या सेवकाला संदेश देऊन बाहेरच

थांबलो. द्रौपदीदेवी मुखभर अंशुकाचा पदर ओढून शिबिरात गेल्या. सेवकानं अग्रवार्ता देताच, आतल्या कक्षातून भव्य शरीरयष्टीचे सत्त्वशील सेनापती भीष्म 'स्त्री? दर्शनासाठी? समरांगणावर? कोण असावी?' असा विचार करीतच बाहेर आले. टेंभ्यांच्या मंद प्रकाशात द्रौपदीदेवींनी लगबग पुढे होत, मनगटीच्या सुवर्णकंकणांचा स्पष्ट किणकिणाट उठवत, समोरच्या परशुरामशिष्यांना तीनवार सादर नमस्कार केला.

सत्यव्रत, आजन्म ब्रह्मचारी पितामहांच्या तपस्वी ओठांतून आशीर्वादपर शब्द सुटले, "अखंड सौभाग्यवती भव, आयुष्यमान भव!!"

मलाही ते बाहेर स्पष्ट ऐकू आले. द्रौपदीदेवी आता काय बोलणार, म्हणून उत्कंठेनं ऐकण्यासाठी मी कान टवकारले.

द्रौपदीदेवी आपल्या ठणठणीत स्पष्ट शब्दांत पितामहांना म्हणाल्या, "पितामह, आजच आपण 'पृथ्वी निष्पांडव करीन', अशी प्रतिज्ञा केली आहे आणि आत्ताच आपण मला 'सौभाग्यवती भव' असा आशीर्वादही दिला आहे. क्षमा असावी. लहान तोंडी मोठा घास घेते आहे. यातील सत्यव्रत पितामहांचे खरे शब्द कोणते?" अंशुकाचा पदर मुद्रेमागे टाकलेल्या आपल्या कुलस्त्री नातसून द्रौपदीदेवींकडे बघत बर्फाच्छादित उंच देवदार वृक्षासारखा दिसणारा तो महावीर प्रसन्न हसला. म्हणाला, "तुला दिलेला माझा आशीर्वाद सत्य आहे. कृष्णाला माझा एकच निरोप सांग, तुला 'वासुदेव' ही सार्थ उपाधी दिल्याचा मला अत्यानंद होत आहे. द्रौपदी, ही भीष्मप्रतिज्ञा आहे – तू अखंड सौभाग्यवतीच राहशील!!

"तुझं सौभाग्य अक्षय राहण्यासाठी त्याला एकच सांग की, उद्या नंदिघोषावर अर्जुनाला कवच म्हणून पुरुषदेहात स्त्रीमन घेऊन वावरणाऱ्या पांचालपुत्र शिखंडीला चढवायला विसरू नकोस. सर्व जग जाणतं की, परशुरामशिष्य शांतनव गंगापुत्र भीष्म स्त्रीवर कधीच बाण प्रक्षेपित नाही.

"जा द्रौपदी, ज्या शिखंडीला तुम्ही भावंडांनी जीवनभर बायकी, पुरुषार्थहीन म्हणून संबोधलं, त्याचा पुरुषार्थच उद्या कवच म्हणून अर्जुनाचं संरक्षण करणार आहे." त्या हिमालय उंचीच्या कुरुश्रेष्ठानं आपल्या नातसुनेला, पांडवपत्नी द्रौपदीला पुन्हा मुखभर हसत-हसत हात उंचावून आशीर्वाद दिला.

तो ऐकताना भारावलेली निःशब्द द्रौपदी, त्या उंचशील कुरुसेनानीसमोर नमस्कारासाठी पुन्हा नमली.

मी द्रौपदीदेवींसह कृष्णदेवांच्या शिबिरात परतलो. येताना माझ्या मनी एकच विचार होता – पांडवांनी सर्व सेनाप्रमुखांसह रात्रभर बैठक घेतली असती, तरी प्रलयातील महोदधीसारख्या विक्रमाच्या हट्टाला पेटलेल्या, सत्यव्रत, महाबाहो भीष्मांना आवरण्याचा एवढा सुलभ उपाय त्यांना कधीतरी सुचला असता काय?

तेवढ्या मध्यरात्रीही कृष्णदेवांच्या आज्ञेनं मला पांचालपुत्र शिखंडीच्या शिबिरातही जावं लागलं. त्याला समवेत घेऊनच मी निःशस्त्र पांडवसारथ्यासमोर सादर केलं. मग बराच वेळ यादवश्रेष्ठांनी आपल्या कृष्णबोलीत शिखंडीला त्यानं उद्या कसकशा हालचाली कराव्यात, याचा कानमंत्रच दिला.

युद्धाचा दहावा दिवस कुरुक्षेत्राच्या पूर्वक्षितिजावर अंग झडझडून उभा ठाकला. आज कृष्णदेवांना त्यांचा विख्यात प्रणवोद्गार काढणारा पांचजन्य पितामह भीष्मांनी

प्रथम त्यांना मनसोक्त फुंकू दिला. त्यांनी त्याचा रोमांचक नाद कानभर ऐकला.

एकीपेक्षा एक चढत्या व दोन्ही सेनेतील सैनिकानी पूर्वी कधीच न ऐकलेल्या पांचजन्याच्या रोमांचक ध्वनिलहरी एकीपाठोपाठ एक उमटू लागल्या. पांचजन्याच्या त्या नादानं गेल्या नऊ दिवसांत नव्हतं, असं कुरुक्षेत्राचं समरांगण निनादून उठलं. शंख पांचजन्य फुंकून–फुंकून कृष्णदेवांची नीलवर्णी मुद्रा कशी आरक्त झाली. त्यांच्या मत्स्यनेत्रांच्या दीर्घ दाट पापण्यांच्या काठावर 'शंखफुंकीच्या ताणामुळे' पाणी दाटून आलं! वक्षावरच्या उत्तरीयानं त्यांनी ते हळुवार टिपून घेतल्याचं माझ्या रथातून मी स्पष्ट पाहिलं. यापूर्वी कुरुक्षेत्रावर त्यांच्या संदर्भात असं कधीच घडलं नव्हतं.

बऱ्याच वेळानंतर पांचजन्याला प्रत्युत्तर म्हणून पितामह भीष्मांनी आपल्या गंगनाभ शंखाची कुरुसैनिकांना ऐकू येईल न येईल, अशी अफुट लय उठविली. आज त्यांना संरक्षण देत द्रोण, कृप, दुर्योधन, अश्वत्थामा, जयद्रथ, भगदत्त असे निवडक कुरू महावीर पांडवसेनेवर चालून आले. आमच्या सेनेच्या अग्रभागी आज कृष्णदेव आणि धनुर्धर धनंजय यांच्यामध्ये धनुष्य पेलून उभा ठाकलेला शिखंडी दिसत होता! मी द्रोणपुत्र अश्वत्थाम्यानं सावरलेल्या पितामहांच्या डाव्या सेनापंखांवर माझ्या सेनेसह कोसळलो. अभिमन्यू दुर्योधनावर चालून गेला. विराट आणि जयद्रथ, युधिष्ठिर आणि शल्य, धृष्टद्युम्न आणि शकुनी यांचं समरांगणाच्या मध्यभागात थरारक युद्ध पेटलं. अक्राळविक्राळ कडाडत भीमसेन कुरूंच्या गजदलावर कोसळला.

आज नंदिघोषावरच्या अर्जुन, शिखंडी आणि कृष्णदेव यांच्या अतर्क्य आणि चपळ हालचाली सुरू झाल्या. पितामह भीष्म आणि अर्जुन यांचं प्रलय माजविणारं घनघोर युद्ध भडकलं. मृगसरीसारख्या दोघांच्या शरवर्षावात कुरुक्षेत्रावरचा तळपता सूर्य झाकोळून गेला. दिसेनासा झाला. पितामहांची एखादी बाणसर अर्जुनाचा मर्मभेद करण्यासाठी येते आहे असं दिसताच, लोहत्राणधारी शिखंडी चापल्यानं अर्जुनाला आच्छादून टाकत मध्ये आडवा येत होता. त्याला लक्षयवेधात समोर बघून पितामह शरवर्षाव रोधून आपलं धनुष्य खाली घेतं होते. या संधीचा अचूक लाभ उठवत, शिखंडीनं सहा नाराच बाणांनी पितामहांचा सारथी प्रथम वधला. दुसऱ्या शरसरीत त्यांचा तालध्वज मोडला आणि तिसरीत पौरुषहीन शिखंडीनं पुरुषार्थसंपन्न पितामह भीष्मांचं धनुष्य छिन्नभिन्न करून टाकलं. त्या वृद्ध महाबलीनं चापल्यानं दुसरं धनुष्य पेललं. एकाच वेळी प्रत्यंचेवर सूची, जिद्म, चंद्रमुख असे वेगवेगळ्या दबावात कौशल्यानं फेकण्याचे बाण चढविले. आता काही शिखंडी मध्ये असूनसुद्धा अर्जुनाची धडगत नाही, हे ध्यानी आलेल्या कृष्णदेवांनी, आपल्या चारही गुणवंत अश्वांना संकेत देत उभ्या नंदिघोष रथाचा अग्रभाग अधांतरी वर उचलला. उचललेल्या रथामुळे अर्जुन, शिखंडी पितामहांच्या दृष्टिआड गेले. स्वत:शीच हसत पितामहांनी चढविलेले शर अर्जुनावर फेकण्याऐवजी धनुष्यच खाली घेतलं. असं आपल्या शिक्षित अश्वांच्या साहाय्यानं, नंदिघोष रथाच्या अतर्क्य नृत्याचं प्रदर्शन, दोन्ही सेनेतील महावीरांना कृष्णदेवांनी आज घडविलं. ते नुसते पट्टीचे वक्ते नव्हते. हातच्या वेगांच्या हलक्या दबावावरही आपल्या शुभ्रधवल सर्व अश्वांना हवं तस नृत्य करायला लावणारे खरोखरच कुशल सारथीही होते.

आजच्या दिवसाचं भीष्मार्जुनांचं प्रहर-प्रहर चाललेलं घनघोर युद्ध इतकं थक्क करणारं होतं की, जयद्रथ, शल्य, भगदत्तासारखे महारथीही आपलं युद्ध थांबवून त्यांचा रणकल्लोळ अवाक बघतच राहिले.

सांजावत आलं. पितामह भीष्म अरवली पर्वताच्या उतरंडीवरील ग्रीष्मातील रक्तवर्णी फुलांनी डवरलेल्या पलाश वृक्षासारखे आता दिसू लागले. नंदिघोषावर सारथी आणि शिखंडी सुखरूप होते. केवळ काही निसटते बाण घुसले होते, ते अर्जुनाच्या नीलवर्णी देहात, तेही संधी मिळताच शिखंडीनं उपसून रणभूमीवर फेकून दिले होते. झालेल्या व्रणांवर लाकडी नळकांडीतील दिव्यौषधी चापल्यानं माखल्या होत्या. कुलस्त्री द्रौपदीचं सौभाग्य अक्षय आणि अखंडच होतं.

सूर्यबिंब पश्चिम क्षितिजाला टेकलेलं असताना, अर्जुनानं सर्पमुख, सूची, कंकपत्र, बस्तिक, नाराच, शिलिमुख असे वेगवेगळे दहा-दहा बाण दोन फेकीत पितामह भीष्मांवर वर्षविले. त्यातील काही सूची बाण त्यांच्या वक्षावरचं लोहत्राण भेदून मर्माला भिडले. धनुष्य छिन्नभिन्न झालेले, सारथी वधला गेलेले, वीरदेहात जागोजागी बाण घुसलेले, मावळतीच्या तेजाळ सूर्यतबकासारखे रक्तबंबाळ दिसणारे पितामह भीष्म रथातून रणभूमीवर कोसळले! ज्या जागी ते कोसळले, तिथे 'शर' नावाच्या गवताचं कुरण होतं. त्यांचं मावळतीच्या सूर्याला साक्षी ठेवून झालेलं पतन बघताच, कुरुसेनेत वार्ता पसरली – सेनापती पितामह भीष्म 'शरपंजरी' झाले.

कुरूंचा पहिला सेनापती धरणीवर कोसळताच, कुरुसेनेत हाहाकार माजला. हातची शस्त्रं तशीच भुईवर ठेवून दोन्ही सेनेतील वीरांच्या वृद्ध, वीर सेनानीच्या दर्शनासाठी रांगाच रांगा लागल्या. मीही सर्व पांडवांसमवेत कृष्णदेवांच्या मागून पितामहांच्या दर्शनासाठी गेलो. ते 'शर'शय्येवर शांत पहुडले होते. कृष्णदेवांना बघताच ते क्षीण सुरात म्हणाले, "ये वासुदेवा!" मला आणि पाचही पांडवांना सोबत घेतलेले कृष्णदेव, त्यांच्या निकट शरतृणावर वीरासनात बसले. मी आणि इतर सर्व उभेच राहिलो. वीरासनात बसलेल्या द्वारकाधीशांचा उजवा हात आपल्या हातात प्रेमभरानं घेत, गंगापुत्र यमुनापुत्राला म्हणाले, "वासुदेवा, तुझ्या मनी असेल तेच होईल! चिंता करू नको. मी आत्ताच देह त्यागत नाही. जसा तू आहेस, तसा मीही सूर्यभक्त आहे. जोपर्यंत दक्षिणायनातला सूर्य उत्तरायणात प्रवेशत नाही, तोपर्यंत मी देह त्यागणार नाही!"

आपल्या हातीचा पितामहांचा हात हळुवार प्रेमानं हलकेच दाबत कृष्णदेव म्हणाले, "सूर्य उत्तरायणात यायला अद्याप छपन्न दिवस आहेत. महाबाहो गांगेय, आपण त्याच्या उत्तरायणातील आगमनाची प्रतीक्षा का करता आहात, हे मला समजलं आहे, तसंच आपल्या दर्शनासाठी जमलेल्या या समस्त वीरांना समजणं आवश्यक आहे. आपणच त्याचा मथितार्थ सर्वांसाठी स्पष्ट करावा."

देहातून सतत रक्तस्राव झाल्यामुळे क्षीण झालेले पितामह सौम्यसं हसले. म्हणाले, "यमुनापुत्र, ती प्रतीक्षा मी गंगापुत्र का करतो आहे, हे तूच समजावून सांग सर्वांना! मलाही ते तुझ्याच विमल मुखातून ऐकण्याचं भाग्य, दे वासुदेवा!" दिवसभर त्या महावीरानं अर्जुनाचे असंख्य बाण हसत झेलले होते. कृष्णदेवांचा हा बाण मात्र त्यांनी तसाच त्यांच्याकडे परतवून लावला!

जमलेल्या वीरांना आसन्नमरण भीष्मांच्या मनातील शब्दन्शब्द वासुदेवमुखातून ऐकायला मिळाला.

कृष्णदेव म्हणाले, "पितामह, तुम्ही काय प्रत्येक स्त्री-पुरुषाच्या देहात दोन आयनं – ध्रुव आहेत. एक दक्षिण, दुसरं उत्तर! दक्षिणेचं आयन आहे, ते देहाच्या कटीखालील भागाचं. मलमूत्राचं विसर्जन करण्याचं, अपवित्र वाटणारं; पण आवश्यक असलेलं कार्य

करणारं! देहाच्या उत्तरायनात बहात्तर हजार नाड्यांची मूल केंद्र धारण करणारं मस्तक आहे – बुद्धीचं पवित्र मानलेलं वसतिस्थान!

"या उत्तरायणातच योगी आणि तापसांनी परमपवित्र मानलेलं – तसं अनुभवलेलं ब्रह्मरंध्र आहे. पितामहांना आपल्या देहातील जीवनशक्ती दक्षिणायनातील पायांच्या बोटांपासून खेचून ती उत्तरायणातील ब्रह्मरंध्रातून सूर्यकेंद्राला भिडवायची आहे. तेही तो त्याचा पवित्र उत्तरायणात प्रवेशल्यावर! काय परशुरामशिष्य, मी योग्य बोललो?"

"सुदर्शना, तू कसं काय चुकीचं बोलशील? आता एकच कर. मी अर्धरथी म्हटल्यामुळे रुष्ट होऊन गेले दहा दिवस आपल्याच शिबिरात निष्क्रिय बसलेल्या अंगराज कर्णाला मला भेटण्यासाठी पाठविण्याची व्यवस्था कर. मला त्याच्याशी काही विशेष बोलायचं आहे."

"आज्ञा पितामह!" हळुवारपणे त्यांचा हात सोडून कृष्णदेव उठले. पितामहांच्या चरणांवर क्षणैक आपलं मस्तक ठेवलं. आम्हा सर्वांना सोबत घेऊन आपल्या शिबिराकडे ते चालू लागले. जाताना त्यांनी धृष्टद्युम्नाला सूचना केली, "सेनापती, पितामह देह त्यागत नाहीत, तोपर्यंत सशस्त्र सैनिकांचे रक्षक रात्रंदिवस त्यांच्याभोवती अभेद्य कवचासारखे बसवा. विकलांग पितामहांना कुठल्याही हिंस्त्र श्वापदापासून त्रास होणार नाही, याची दक्षता घ्या."

'आज्ञा द्वारकाधीश' म्हणत धृष्टद्युम्न त्या व्यवस्थेसाठी मागेच राहिला.

ठरल्याप्रमाणे अंगराज कर्णाला पितामहांचा निरोप देण्याचं काम मलाच करावं लागलं. रात्री केव्हातरी दानवीर कर्ण परस्पर पितामहांना भेटून आपल्या शिबिरात परत गेला. त्यांचं काय बोलणं झालं ते मलाच काय, कुणालाच कधीच कळलं नाही. कारण पितामहांनीच सशस्त्र सैनिकांसह सर्वांनाच दूर पिटाळून कर्णाची पूर्ण एकांती भेट घेतली.

आता महारथी, दिग्विजयी, ब्रह्मास्त्रधारक कर्ण समरांगणात उतरणार होता! पितामहांच्या पतनामुळे कुरूंच्या सेनासामर्थ्यात येणारी त्रुटी सर्वथा भरून काढायला तो समर्थ होता.

अकरावा दिवस उगवून कर्ण समरांगणात उतरण्यापूर्वीच काहीतरी करणं आवश्यक आहे, अशी चर्चा रात्रीच्या बैठकीत बराच वेळ चालली. कुणी काय, कुणी काय सुचेल तो उपाय सांगितला. काही न बोलता द्वारकाधीश ते सर्व उपाय केवळ ऐकून घेत राहिले. आजच्या बैठकीतून त्यांनी सर्वांनाच जाऊ दिलं. नेहमीसारखं मला एकट्यालाच मागे थोपवून घेण्यासाठी ते म्हणाले, "सख्या सात्यकी, तू एकटाच थांब." त्यांच्या आज्ञेप्रमाणे मी थांबलो. क्षणातच आता कोणतं दायित्व पत्करावं लागणार, या विचारांत गेलो.

मी समोर उभा. ते आसनावर बसलेले असा बराच वेळ गेला. मग काहीतरी निर्धारानं ते म्हणाले, "सेनापती, दारुकाला घेऊन नंदिघोषासह पांडवांच्या कुलस्त्रियांच्या शिबिरसंकुलात तू जायचं आहेस. आत्याबाई कुंतीदेवींना त्या असतील तशा रथात घालूनच समवेत घेऊन यायचं आहे!"

'आज्ञा आर्य' म्हणत मी बाहेर पडलो. नाही म्हटलं तरी एका चमत्कारिक विचारानं मी चक्रावलोच. आज भीष्मांसमोर शिखंडी घातला, तसं उद्या कृष्णदेव कर्णासमोर अर्जुनाच्या रथावर प्रत्यक्ष कुंतीदेवींना घालतात की काय? ते काय करतील हे इतके दिवस त्यांच्या निकट सहवासात राहूनही मला सांगता येत नव्हतं.

असे अनेकानेक विचार, कयास मनात घोळवतच मी पांडवांच्या कुलस्त्रियांच्या शिबिरात गेलो. वंदन करून कुंतीदेवींना नंदिघोष रथातून घेऊनच कृष्णदेवांच्या शिबिरात आलो.

त्या आल्या–आल्या आपल्या लाडक्या भाच्याला म्हणाल्या, "कृष्णा, तू साक्षात सदेह इथे असताना, माझ्या वीरपुत्रांना आज माझी कशी काय आवश्यकता भासली? सर्व क्षेम तर आहे?" ते ऐकून हसतच हृषिकेश म्हणाले, "मी असून काय उपयोग! मी कुणाची माता नाही होऊ शकत! तुझे सर्व पुत्र अद्याप क्षेम आहेत. ते तसेच राहावेत, अशी माझी इच्छा आहे. त्यासाठी या युद्धाचं रूपच पालटून टाकणारी एक महत्त्वाची कामगिरी आता तुला करायची आहे.

"उद्या तुझा प्रथमपुत्र अंगराज कर्ण समरांगणात प्रथमच उतरतो आहे. मला आहे तशी तुलाही पूर्ण कल्पना आहे की, भीमार्जुनासह तुझ्या पाच पुत्रांपैकी एकही त्याच्या साचलेल्या विक्रमासमोर टिकू शकत नाही. "अर्जुनाच्या वधाची तर त्यानं केव्हाच प्रतिज्ञा घेतली आहे. अर्जुनाशिवाय तू काय आणि मी काय, जगू तरी शकतो काय? यासाठी मनावर पाषाण ठेवून, क्षत्राणीचा गौरव दूर सारून, तुला एक करावं लागणार आहे."

"काय?" विस्फारलेले डोळे भाच्यावर रोखत कुंतीदेवी चाचपडल्या.

"गंगेत अखेरचं स्नान करण्यासाठी कर्ण कुरुक्षेत्रावरून केव्हाच निघून गेला आहे. तो अर्घ्यदान करून परतण्यापूर्वीच गंगाकिनारी तुला त्याला गाठावं लागेल, एक सामान्य याचिका म्हणून! त्यासाठी आत्ताच तुला सात्यकीसमवेत गंगाकिनाऱ्याकडे निघावं लागेल!"

संभ्रमित झालेल्या राजमाता कुंतीदेवी आपल्या भाच्याकडे बघतच राहिल्या. त्या न राहून म्हणाल्या, "याचिका? मी? पुत्राकडे?"

"होऽय! तुला अर्जुनासह तुझे पाचही पुत्र जिवंत हवे असतील, तर याचिका म्हणूनच जावं लागेल. तेही दानवीर कर्णाकडे! आत्ताच!"

बराच वेळ कुंतीदेवी विचारात पडल्या. मग काहीतरी निर्धारपूर्वक ठरवून माझ्याकडे बघत म्हणाल्या, "चला यादवसेनापती, मी तयार आहे तुमच्याबरोबर यायला!"

ठरल्याप्रमाणे आपल्या सर्व पुत्राचं नसलं, तरी अर्जुनाशिवाय चार पुत्रांच्या जीवनाचं अभयदान दानवीर कर्णाकडून घेतलेल्या राजमाता कुंतीदेवींना त्यांच्या शिबिरात सोडूनच मी रणांगणात उतरलो.

रात्रीच सेनापतीपदाचा अभिषेक झालेले आचार्य द्रोण, अकराव्या दिवशी रथारूढ झाले. पितामहांना भेटून आलेला दुर्योधन रात्रीच त्यांच्या शिबिरात प्रवेशून म्हणाला होता, "हे आचार्य! आपण साक्षात धनुर्वेद आहात. दक्षता, कृतज्ञता, जयशीलता आणि अशरण विक्रम हे गुण आपल्या ठायी वसतात. रुद्रांमध्ये जसा कपाली, तसे आपण आहात. वसूंमध्ये ज्याप्रमाणे पावक, त्याप्रमाणे आपण आहात. यज्ञामध्ये कुबेराशीच आपली तुलना होऊ शकेल. अमर नरेशांत जसा इंद्र, तसेच आपण आहात. समस्त विप्रांमध्ये ज्याप्रमाणे वसिष्ठ मानले जातात, तसेच आपण ज्ञानवंत आहात. दैत्यांमध्ये जो मान शुक्राचार्यांचा आहे, पितरांमध्ये यमधर्माला आहे, तोच आपणालाही आहे!" दुर्योधनानं एकही विशेषण आपल्या सेनापती व आचार्य गुरू द्रोण यांना लावायला कमी

केलं नाही.

शेवटी दोन्ही हात जोडून, वाकून वरकरणी विनयी नम्रभावानं तो एकच म्हणाला, "आचार्य, उद्या कुरूंचा युवराज म्हणून हस्तिनापूर आणि इंद्रप्रस्थावर उठता–बसता अधिकार सांगणारा युधिष्ठिर, जिवंत माझ्यासमोर उपस्थित व्हावा! त्याला वधून चालणार नाही. त्यामुळे भीमार्जुन अनावर क्रोधसंतप्त होतील. त्यांचासमोर उरल्यासुरल्या कौरवसेनेचाही निभाव लागणार नाही."

दुर्योधनाच्या पाठीशी असलेला गांधारनरेश शकुनी आपले धारदार, पिंगट–घारे डोळे द्रोणांवर जोडून, कटीत वाकून म्हणाला, "आचार्य सेनापतींनी ज्येष्ठ पांडवाला जिवंत पकडूनच आमच्यासमोर सादर करावा. मी त्याला पुन्हा डिवचून द्यूतच खेळायला लावीन. त्याचं सर्वस्व जिंकून आम्ही पुन्हा त्याला वनात धाडू!"

शकुनीची ती मूर्ख बडबड असह्य झालेल्या गुरुवर्य द्रोणांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केलं. दुर्योधनाला आश्वासून ते म्हणाले, "दुर्योधना, अर्जुन त्याच्यापासून दूर आहे ही संधी साधून, मी युधिष्ठिराला उद्या जिवंत पकडीन."

द्रोणाचार्यांचा प्रतिज्ञापूर्ण मनोदय आमच्या सेनापती धृष्टद्युम्नाला समजला. तो सावध झाला. कृष्णदेवांच्या शिबिरात रात्रीच आमचं ठरलं होतं की, प्राणपणानं युधिष्ठिराचं सर्वांनी संरक्षण करायचं. याचं प्रमुख दायित्व त्यांनी विराट, द्रूपद, केकय, व्याघ्रदत्त आणि सिंहसेन यांच्या साहाय्यानं माझ्यावरच सोपविलं.

युद्धाचा अकरावा दिवस उजाडला! गुरू द्रोण कौरवांचं नेतृत्व करण्यासाठी, कुरूंचा त्रिकोणी भगवा राजध्वज पेलून निग्रहानं आमच्या समोर उभे ठाकले। द्रोण! द्रोण म्हणजे सर्व शस्त्रास्त्रांचा साक्षात चालता–बोलता शस्त्रवेद होता! भीष्मांच्या दहाव्या दिवशीच्या पतनामुळे रात्रभर विकल झालेली कुरुसेना, द्रोणांना सेनापतीच्या वेषात पाहून पुन्हा रणोत्सुक होऊन आवेशानं चेतून गर्जना करू लागली.

आज पहिल्याप्रथमच द्रोणांच्या नेतृत्वाखाली प्रचंड रथदलाचा प्रमुख म्हणून कर्ण समरांगणात उतरला होता. लतावेलींनी सुशोभित केलेल्या, तळपत्या शुद्ध सुवर्णानं मंडित अशा आपल्या जैत्ररथात तो हिमालयावर कैलासपर्वताचं उत्तुंग शिखर शोभून दिसतं, तसा सर्वांत उंच असल्यामुळे शोभिवंत दिसत होता. हत्तीच्या साखळदंडांचं सुचिन्ह असलेल्या त्याच्या रथावरचा काषायवर्णाचा तलम राजध्वज फरफरत होता.

आज सर्वप्रथम कुरुसेनानी आचार्य द्रोण युधिष्ठिरावरच तुटून पडले. मी कृष्णदेवांच्या आज्ञेप्रमाणे विराट, द्रूपद, केकय, व्याघ्रदत्त आणि सिंहसेन यांच्या बळकट फळीसह त्यांच्या रक्षणार्थ धावून गेलो. पण आज द्रोण अनावर झाले होते. त्यांनी दोन अचूक भल्ल बाणांनी आमच्या फळीतील व्याघ्रादत्त आणि सिंहसेन यांची मस्तकं आकाशात उडविली. कृतांतकालासारखे दिसणारे द्रोण युधिष्ठिराच्या रथासमोरच उभे ठाकले. त्यांची प्रतिज्ञा ऐकलेले पांडवसैनिक त्यांचा रणावेश बघून भयकातर होत एकमेकांत ओरडले, "ज्येष्ठ पांडव धर्मराज वेढले गेले. आता बंदिवान होणार! द्रोण त्यांचा वध करणार! धावाऽ वाचवा!ऽ"

तो आकांती आक्रोश ऐकून वीर अर्जुन आपल्या ज्येष्टाच्या संरक्षणार्थ कृष्णदेवांना कळवळून म्हणाला, "माधवा, नंदिघोष प्रथम आचार्य द्रोणांसमोर घे."

ते ऐकताना त्याचा निःशस्त्र सारथी असलेले आमचे द्वारकाधीश मनःपूर्वक हसले.

आजवरच्या युद्धात आज प्रथमच नकळत अर्जुनानं आपल्या सारथ्याला रथ कसा हाकारावा, याची आज्ञा दिली होती! कृष्णदेवांनी ती सारथी म्हणून हसतच पाळली होती.

आज तर नव्हेच, पण जोपर्यंत कोंडलेल्या ज्वालामुखीसारख्या विक्रमाचा अधिकारी असलेला कर्ण समरांगणात निर्वेध संचारत होता, तोवर त्याच्यासमोर अर्जुनाला नेणं धोक्याचं होतं, यासाठीच तर त्यांनी माझ्याकडून भीमसेनाला सूचना देऊन कर्णावर पिटाळलं होतं, त्या दोघांचं एकमेकांना शरण न येणारं अटीतटीचं घनघोर युद्ध बघतच अकरावा दिवस मावळला.

बाराव्या दिवशी प्रतिज्ञेवर योद्धा वधणाऱ्या किंवा देह ठेवणाऱ्या संशप्तकांनी शपथेवर अर्जुनालाच घेरलं. मी त्याच्या साहाय्यासाठी माझ्या यादवसेनेसह जात असताना, त्यानंच मला रोधून धर्माच्या रक्षणासाठी धावण्याचा विनंतीपूर्वक संकेत केला. संशप्तरकांचं ब्रीद माहीत असलेला मी, संभ्रमानं त्याच्या नंदिघोषाकडे बघू लागलो. मला क्षणात कळून आलं, त्यानं केलेल्या संकेताची प्रेरणा कृष्णदेवांकडेच होती. ते आपल्या हातातील प्रतोद युधिष्ठिराच्या दिशेनं रोखून मला तिकडे जाण्याचा आदेश देत होते.

मी पांचालवीर सत्यजित आणि विराटाचे पुत्र शतानिक व वसुदान यांच्यासह युधिष्ठिराचं द्रोणांपासून रक्षण करण्यासाठी निकरानं लढू लागलो. पण द्रोण आज खरोखरच कुणालाही रोधता न येण्यासारखे अनावर झाले होते. त्यांनी तिघाही पांचाल व विराटपुत्रांचा माझ्या डोळ्यांदेखत हां–हां म्हणता वध केला.

या वेळी भीमसेन कर्णाच्या नेतृत्वाखालील कुरूंच्या गजदलावर कोसळला होता. त्यानं दातओठ खात आपल्या प्रचंड गदेचे एकामागून एक प्रहार करून कितीतरी हत्तींची गंडस्थळं फोडली. आपल्या बाहूंतील सहस्र गजशक्ती त्यानं प्रत्यक्षात सिद्ध केली. चीत्कारत कोसळणाऱ्या हत्तींनी धूळीचे लोळच लोळ उठविले.

अर्जुनानं संशप्तकांबरोबर निकराचं युद्ध केलं. त्यांची प्रतिज्ञा खोटी ठरवत प्रथम सुधन्वाला वधलं. मग सुशर्म्यासह त्याच्या पाचही बंधूंना निपटलं.

अर्जुनाच्या पराक्रमानं आनंदी झालेल्या कृष्णदेवांनी नंदिघोष रथ आता युधिष्ठिराच्या रक्षणासाठी त्याच्याकडे धावडविला. इथे नरकासुरपुत्र भगदत्तानं युधिष्ठिराला घेरून त्याला पुरतं जखडून टाकलं होतं.

भगदत्त असुर होता. त्याच्या लांब, दाट भुवया त्याच्या पापण्यांवरूनही डोळ्यांवर उतरत होत्या. त्यांचा अडथळा वारण्यासाठी त्यानं एक वस्त्रपट्टी भुवया आवरून कपाळावर बांधली होती.

असुराची ही कुबल जागा माहीत होती, ती एकट्या कृष्णदेवांना! त्यांनी अर्जुनाला असुराची वस्त्रपट्टी प्रथम छेदण्याचा कानमंत्र दिला. अर्जुनानं एका बाणातच ते कार्य साधलं. वस्त्रपट्टी तुटल्यामुळे भगदत्ताच्या लांब भुवया त्याच्या डोळ्यांवर आल्या. त्याला कुरुक्षेत्र वस्त्रपट्टीतून दिसावं, तसं अस्पष्ट दिसू लागलं. तो गडबडला. भुवया आणि धनुष्य कसं सावरावं, त्याला सुधरेना. यातच धनंजयानं एक अर्धचंद्राकृती बाण त्याच्या प्रचंड हत्तीच्या गंडस्थळावर मारला. तो प्रचंड गज खाली कोसकळा. तसा भुईवर पडलेला भगदत्त सावरून उठून हातचं धनुष्य पेलत पळू लागला. कृष्णदेवांनी त्याला नरकासुरवधानंतर प्राग्ज्योतिषाचं सिंहासन देऊन योग्य समयी पांडवांना

साहाय्य करण्याचं आवाहन केलं होतं, ते तो विसरला होता.

अर्जुनानं आणखी एक चंद्रमुख बाण प्रक्षेपून त्याचा कंठनाळ भेदला. ते बघून संतप्त शकुनी आपले कडवे गांधारसैनिक सोबतीला घेऊन अर्जुनावर चालून आला. अर्जुनानं आज प्रथम एका अस्त्राचं प्रक्षेपण केलं. आदित्य अस्त्राला फेकून त्यानं गांधारसेनेसह शकुनीला पिटाळून लावलं. तुंबळ युद्धात अश्वत्थाम्यानं नरेश नीलाचा वध केला.

अगदी सांजावत आलं असताना, कर्णाचा जैत्ररथ आज प्रथम अर्जुनाच्या नंदिघोषासमोर आला. कशीतरी दोघांची पहिली बाणफेक झाली. कुरुक्षेत्राच्या पवित्र समरभूमीवरून नंदिघोषातूनच हात जोडून हसत कृष्णदेवांनी मावळतीच्या सूर्यबिंबाकडे बघून डोळे मिटत मंत्रोच्यारण केलं – 'ॐ भुर्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यं...'

याच वेळी सूर्यभक्त कर्ण तोच सवितृ मंत्र डोळे मिटून जैत्ररथावर सूर्यवंदन करीत म्हणत होता. दोन्ही स्वीकारून आकाशस्वामी सूर्यदेव मावळला.

रात्री ढणढणत्या टेंभ्यांच्या प्रकाशात, आमची सर्व सेनाप्रमुखांची नित्याची बैठक कृष्णदेवांच्या प्रशस्त शिबिरात बसली. सर्वच चिंताक्रांत होते. आमच्या गुप्तचरप्रमुखानं कुरूंच्या गोटातून उचलून आणलेली वार्ताच तशी होती. त्यांच्या सेनापती-शिबिरात नात्याची सर्व बंधनं झुगारून देऊन, दुर्योधन सेनापती द्रोणांवर सर्वांसमक्ष कठोर शब्दांत उखडला, "बारा दिवसांत बारा लक्ष कुरुसेना कामी आली, तरी एकही पांडव मात्र गतप्राण होत नाही! माझे अर्ध्याहून अधिक बंधू मारले गेले, तरी एकाही पांडवाच्या केशाला काही धक्का लागत नाही! युधिष्ठिराला जिवंत पकडण्याची प्रतिज्ञा तुम्ही घेतली होती. काय चाललंय हे? हे युद्ध आहे की, विष्णुयाग यज्ञाचं भोजन? गुरू द्रोऽण, पांडवांना कंठस्नान घालण्यासाठी तुमचं धनुष्य असमर्थ असेल, तर तुमच्या राजरथावरचा राजध्वज उद्या कर्णाच्या हाती द्या। आम्ही बघतो कसं युद्ध खेळवायचं ते!"

ती कठोर निर्भर्त्सना असह्य झालेल्या गुरू द्रोणांनी उच्यासनावरून उठून घोर निर्धार घोषित केला होता – "माझ्या पराक्रमाची विवेकशून्य शंका घेणाऱ्या दुर्योधनाला मी दाखवून देईन की, एक ना एक सर्वश्रेष्ठ पांडवाचं चक्रव्यूहात पडलेलं निश्चेष्ट कलेवर पाहिल्याशिवाय उद्याचा सूर्य मावळणारच नाही!"

यासाठीच सचिंत पांडवांना काय-काय सुचतं, हे ऐकत कृष्णदेव कितीतरी वेळ बैठकीत स्तब्धच राहिले होते. प्रश्न होता अत्यंत गुंतागुंतीच्या नागमोडी मंडलांची गुंतवळ असलेल्या चक्रव्यूह भेदनाचा!

त्यासाठीच सर्व चिंताक्रांत नि स्तब्ध झाले होते. काही वेळानं अतिशय गंभीर चर्येनं यादवश्रेष्ठांनी मला आज्ञा केली, "सेनापती, वीर अभिमन्यूला पाचारण करा!"

'आज्ञा यादवश्रेष्ठ!' म्हणत मी त्याप्रमाणे महारथी अभिमन्यूला त्याच्या शिबिरात गाठलं. नुकताच रणवेष उतरवून तो सेवकांशी बोलत विश्राम घेत होता. सोळा-एक वर्षांच्या त्या नवथर युवक योद्ध्याला बघून, निरोप देतानाही मी थोडा घुटमळलोच. 'मामांनी स्मरण केलंय' हे ऐकताच खांद्यावर रुळणाऱ्या कुरलकेशांवर परत शिरस्त्राण घेऊन तो 'चला सेनापती' म्हणत तत्काळ निघाला.

शिबिरात शिरताच कृष्णदेवांनी त्याला 'ये अभिऽ!' अशी कितीतरी घोगरट शब्दांत अत्यंत प्रेमळ साद घातली. कृष्णदेवांचा हा असा घोगरलेला आवाज, यापूर्वी मी कधीच

ऐकला नव्हता.

नेहमीसारखं 'अभिमन्यू' न म्हणता मामांनी आपणाला आज 'अभि' म्हटलंय हे त्या तत्पर अर्जुनपुत्रानंही तत्काळ अचूक जाणलं. 'आज्ञा मामाऽ!' म्हणत हसतच तो पुढे झाला. आपल्या वंदनीय मामांची चरणधूल मस्तकी घेऊन, हात जोडून हसत समोर विनयानं उभा राहिला. त्याचे टेंभ्यांच्या मंद प्रकाशातही चमकून उठलेले उल्कांसारखे धवल दात बघताना, मी क्षणैक मनभर चरकलो. एक वर्षापूर्वीच तो तरणाबांड अर्जुनपुत्र विवाहित झाला होता. त्याची गर्भवती सुशील, सौंदर्यवान पत्नी उत्तरा स्त्रियांच्या शिबिरात होती.

सर्वांनाच स्तब्ध बघून त्या अर्जुनपुत्रानंच विचारलं, "आपण सर्वच असे स्तब्ध का? चिंताक्रांत का?"

आपल्या उच्चासनावरून उठून त्याच्याजवळ जात, आपला नीलवर्णी उजवा आजानुबाहू त्याच्या पुष्ट खांद्यावर चढवून कृष्णदेव म्हणाले, "उद्या गुरू द्रोण चक्रव्यूहाची अवघड सैन्यरचना करणार आहेत. ती फोडण्याचं कार्य – " प्रत्यक्ष कृष्णदेवांनाही पुढे कसं बोलावं ते सुचेना.

"ते कार्य माझ्यावर पडणार असेल, तर माझं ते सौभाग्य आहे. आपले सर्वांचे शुभाशीर्वाद पाठीशी असतील, तर मी ते आनंदानं स्वीकारेन!" सर्वांना श्रद्धेनं अभिवादन करून, ज्येष्ठ आणि वडीलधाऱ्यांत बसण्याची संस्कारहीनता माहीत नसलेला तो सुभद्रापुत्र, शांत चालीनं शिबिराबाहेर पडलाही.

खांद्यावर कुरल, दाट केश मंद रुळते घेऊन जाणाऱ्या त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी भारावून बघतच राहिलो.

आपल्या दीगंतकीर्त द्वारकाधीश मामांना शोभणाराच तो वीर भाचा होता!

महायुद्धाचा तेरावा दिवस अभिमन्यूच्या गगनभेदी अशरण विक्रमानं गाजला. द्रोणांनी मांडलेल्या चक्रव्यूहाचं भेदन करण्यासाठी आज अभिमन्यू भीमसेनासह कौरवसेनेत घुसला. मंडलामागून शत्रूमंडलं भेदत, चक्रव्यूहाच्या थेट केंद्रस्थानी गेला. तिथे दुर्योधनपुत्र लक्ष्मणाचं नि त्याचं घनघोर गदायुद्ध झालं. दोघेही एकदमच मूर्च्छित झाले. प्रथम शुद्धीवर आलेल्या लक्ष्मणानं निश्चेष्ट अभिमन्यूला गदप्रहारानं वधलं. उन्मत्त जयद्रथानं पालथ्या पडलेल्या अभिमन्यूच्या कलेवराला सरळ करण्यासाठी चक्क लत्ताप्रहार केला. प्रिय पुत्राचा तो घनघोर अपमान ऐकून अर्जुनानं प्रतिज्ञा केली, 'दुसऱ्या दिवसाच्या अस्तापर्यंत जयद्रथाचा वध करण्याची! ते शक्य झालं नाही, तर स्वत: चंदनचितेवर अग्निकाष्ठ भक्षण करण्याची!"

चौदाव्या दिवशी कुरुसेनापती द्रोणाचार्यांनी शकट म्हणजे रथाच्या आकाराची व्यूहरचना केली. श्वेतवर्णाचं कवच, तसलंच वस्त्र व शिरस्त्राण धारण केलेले द्रोणाचार्य थरारक शंखनाद करीत समरांगणात अवतरले. जयद्रथवधाची घोर प्रतिज्ञा घेतलेल्या अर्जुनाचा नंदिघोष त्यांच्यासमोर उभा करून, कृष्णदेवांनी पांचजन्य फुंकला. आज कुरूंनी सिंधुअधिपती जयद्रथाला समरांगणातच न आणण्याची काटेकोर दक्षता घेतली होती!

'जयद्रथ दाखवा! जयद्रथ दाखवा!' असं पुत्रवियोगाच्या संतापानं आक्रोशणाऱ्या अर्जुनाचा रथ त्याच्या नि:शस्त्र सारथ्यानं दिवसभर समरभूमीवर धावडविला, पण व्यर्थ!

जसजसे प्रहरामागून प्रहर जाऊ लागले, तसतसा जयद्रथ कुठेच न भेटल्यामुळे संत्रस्त झालेल्या अर्जुनानं मध्येच अंगावर आलेल्या अवंतीच्या विंद–अनुविंद या बंधूंचा वध केला.

संध्याकाळी कठोर प्रतिज्ञेप्रमाणे चंदनी चितेवर चढलेल्या अर्जुनानं सूर्यग्रहणाच्या सुटत्या वेधांचा लाभ घेत, कृष्णदेवांच्या तर्जनीचा अचूक माग धरून एका चांद्रमुखी-जिद्म बाणानं उन्मत्त जयद्रथाचा शिरच्छेद केला. ते थक्क करणारं दृश्य पाहून दोन्ही सेनेतले उरले-सुरले काही लक्षावधी सैनिकही शहारले. पांडवसैनिकांनी उत्साहविभोर होऊन अविरत रणघोष उठविले – 'यशोदानंदन, देवकीपुत्र – नारायण श्रीऽकृष्ण – जयतु! कुंतीपुत्र अजिंक्य धनुर्धर नरवीर अर्जुऽन जयतु!' ते रोमांचक रणनाद ऐकतच चौदाव्या दिवशीचा सूर्य डुबतीला गेला.

जयद्रथाच्या आकस्मिक वधानं द्रोण, कृप, कर्ण, अश्वत्थामा आणि दुर्योधन सर्वच कुरू योद्धे खवळले. कधी नव्हती ती आता सरळ रात्रीच्या युद्धाला सुरुवात झाली. शेकडो पेटत्या पलित्यांच्या टळटळीत प्रकाशात गुरू द्रोण शिबी राजावर चालून गेले.

माझं आणि सोमदत्ताचं घनघोर रात्रयुद्ध जुंपलं. शिबी आणि बाल्हिक यांना कंठस्नान घातलेले गुरू द्रोण पांडवसैन्याची धूळधाण करू लागले. पाची पांडवांनी एकाच वेळी चोहोकडून घेरलेला कर्ण सर्वांना आपल्या बाणांच्या वर्षावात झाकाळू लागला. त्यानं पराभूत करून पिटाळलेला युधिष्ठिर द्रोणांसमोर उभा ठाकला. नकुल शकुनीला सामोरा गेला. आज प्रथमच अर्जुन-कर्णाची गाठ पडली – तीही रात्रियुद्धात!

कर्णाला रात्रियुद्धाचाही सराव होता. तो अर्जुनाला पुन:पुन्हा विद्ध करू लागला. पांडवसैन्यात त्याच्या रूपानं तापल्या रसरशीत लोखंडाच्या रसाचा एक महानदच अरोध फिरू लागला. त्याचा जैत्ररथ केकय, पांचाल, महारथ यांची पथकांमागून पथकं तुडवून स्वैर भ्रमण करू लागला. झंझावाती प्रभंजनानं महासागर घुसळून काढावा, तसा त्यानं समोर दिसेल तो पांडव-सेनाविभाग घुसळून काढला. भीम, अर्जुन, युधिष्ठिर, धृष्टद्युम्न आणि मी कुणीच त्याच्यासमोर टिकाव धरू शकत नव्हतो. 'सकाळपर्यंत हा राधेय आमची काहीतरी सेना मागे ठेवणार आहे की नाही? की तिचं दृषद्वतीसारखं केवल एका रक्तमय नि:शब्द नदीत रूपांतर करणार?' असा प्रश्न भेदरलेला युधिष्ठिर प्रत्येक योद्धद्याला विचारू लागला. कर्णाला थोपविला नाही, तर उद्याचा दिवस पांडवसेनेला दिसणारच नाही, असा बिकट समय आला.

मी आणि धृष्टद्युम्नानं चार पांडवांसह अर्जुनाचा नंदिघोष गाठला. हात जोडून सारथी कृष्णदेवांना विनवणी केली, "काहीही करा योगयोगेश्वर! कर्णाला आवरा!"

त्यांनी आपल्या मेळातील एकटचा भीमसेनाला नंदिघोषाजवळ पाचारण केलं. रात्रियुद्ध असल्यानं गुप्त बैठक घेण्याचाही अवसर हाताशी नव्हता. द्वारकाधीश हातचे नंदिघोषाचे वेग सावरत, आज पहिल्याप्रथम सर्वांना ऐकू जाईल असं मोठचानं भीमसेनाला म्हणाले, "तुझ्या हिडिंबापुत्र घटोत्कचाला त्याच्या राक्षससेनेसह तत्काळ कर्णासमोर घे!"

ते ऐकून भीमसेन सारथी विशोकाला म्हणाला, "पुत्र घटोत्कचाला गाठ." घटोत्कच या वेळी समरांगणाच्या पार दुसऱ्या टोकाला, पश्चिमेला पुत्र अंजनपर्वासह लढत होता. भीमसेनाच्या सारथ्यानं चपळाईनं त्याला गाठलं. भीमसेन आपल्या रथातून उतरून त्या महारथ्याच्या राक्षसी रथावर आरूढ झाला. दोघेही पिता-पुत्र अस्वलाच्या

कातडयांनी आच्छादलेल्या त्या प्रचंड रथातून कर्णासमोर आले. चौदा काळ्याकभिन्न पुष्ट घोडयांचा तो रथ, गृधपक्षयाच्या भयंकर चित्राच्या ध्वजानं भयावह दिसत होता. रक्तवर्णी तो राक्षसध्वज चक्क ओल्या आतडयांच्या माळांनी शृंगारला होता. त्या रथाच्या मागे एक अक्षौहिणी राक्षसांचं सैन्य उभं ठाकलं. अग्रभागीच्या राक्षसरथातील घटोत्कच, पेटलेल्या पर्वतशिखरासारखा भयंकर दिसत होता. शंकूसारखे कान, बटबटीत आणि विरूप डोळे, जाड भुवया आणि पालथ्या घातलेल्या कढईप्रमाणे दिसणारे त्याचे केशाळ पोट पाहूनच कौरवसैनिक भेदरले.

कर्णाकडे त्वेषानं बघून तो राक्षसनायक घटोत्कच कडाडला, “जैऽ हिडिंबामाताऽ!’ पुत्राला प्रेरणा देण्यासाठी भीमसेनही भयावह डरकाळला, “जै कुंतीमाताऽ’

सेनेच्या मध्यभागी राक्षस अलायुधाला समोर घालून लढणारा कर्ण आणि भीमसेनाला पाठीशी घेतं लढणारा घटोत्कच, यांचं रात्रीचं थरारक राक्षसयुद्ध पेटलं. शेवटी मध्यरात्री अलायुधाचा घटोत्कचानं अंगावर रोमांच उभे करणारा, थरकविणारा असा वध केला. तसं भयाकुल झालेलं कुरुसैन्य, ‘दिग्विजयी अंगराज कर्णऽ या राक्षसापासून वाचवा, दानवीर अंगराज कर्णऽ या राक्षसापासून वाचवा. दानवीऽर, आम्हाला जीवनाचं दान द्या.’ म्हणत हातची शस्त्रं नाचवत पिळवटून आक्रोशू लागलं.

‘दान!’ तो दोन अक्षरी शब्द त्या दानवीराला जीवनभर सदैव मोहवीत आला होता. कर्ण द्रवला! डोळे मिटून त्यानं क्षणभरच आपल्या जैत्ररथात कसलंतरी चिंतन केलं. मग आपल्या भात्यातील कवचकुंडलं दानाच्या वेळी इंद्रानं संतुष्ट होऊन भेट दिलेली वैजयंती शक्ती, डोळे मिटून मंत्रभारित करून घटोत्कचावर फेकली! कर्णाचं संरक्षण करण्यासाठी ती एकमेव शक्ती काय ती त्याच्याजवळ उरली होती. तीही फेकताच त्याचं जीवन रिक्त भात्यासारखं झालं.

त्या शक्तीनं वक्ष भेदलं जाताच, मायावी घटोत्कच कसातरीच अक्राळविक्राळ ओरडला. केकाटत खाली कोसळताना त्यानं आकाशाचं छतच कोसळून अंगावर पडत आहे असं वाटावं, इतका विशाल देह धारण केला. अशोकवृक्ष कोसळताच त्या खाली वारुळातील अगणित मुंग्या चेंगरून ठार व्हाव्यात, तसे नुसते चेंगरूनच कित्येक कुरुसैनिक ठार झाले! रात्रियुद्ध संपलं!

कर्णाला वैजयंतीविरहित करण्याचं कृष्णदेवांनी मनी योजलेलं घटोत्कचाचं जीवितकार्यही संपलं.

अद्याप उजाडायचं होतं, दोन्ही सेनेतील थकलेले, भागलेले सैनिक शस्त्रं थांबवून कुरुक्षेत्रावरच्या वेगवेगळ्या सरोवरात स्नानासाठी उतरले. त्यांची पहाटकर्मं होत असतानाच कृष्णदेवांनी आज्ञा केल्याप्रमाणे ज्येष्ठ पांडव युधिष्ठिराला त्यांचासमोर मी सादर केलं.

कृष्णदेवांनी युधिष्ठिराला कर्णापासून सावध राहण्याचा सर्व प्रकारचा संकेत केला. शरपंजरी पडलेल्या पितामहांना एकदा भेटून येण्याची सूचना दिली. अर्धा घटका त्याला वेगवेगळ्या सेनादलातील उद्याच्या सैनिक हालचालींची माहिती दिली. मला एकच कळलं नाही, हे सर्व सांगण्यासाठी त्यांनी एकटया युधिष्ठिरालाच का पाचारण केलं होतं! सेनापती असूनही धृष्टद्युम्नाला कसं काय बोलावलं नव्हतं! शेवटी युधिष्ठिर आपल्या शिबिराकडे जायला निघाला. तसं आपल्या उच्चासनावरून उठून त्याच्या जवळ जात, आपला हात त्या ज्येष्ठ पांडवांच्या स्कंधावर चढवून ते म्हणाले, “ – आणि होय

युधिष्ठिरा, तुला दोन गोष्टी सांगतो आहे, त्या आज कटाक्षानं ध्यानी ठेव. आपल्या गजदलात अनेक विशालकाय गज आहेत. तसंच कुरूंच्या सेनेतील मालवराज इंद्रवर्माच्या गजदलातील एका गजाचं नाव 'अश्वत्थामा' आहे. त्याच्यावर उद्या भीमसेनाला पाठवायला चुकू नकोस. तू एकच कर, तुला समरांगणात कुणीही विचारलं तरी एकच उत्तर दे, 'अश्वत्थामा हतो – नरो वा कुंजरोवा!" '

काहीच न कळल्यामुळे मी तर चक्रावलो होतो, पण चर्येवरून युधिष्ठिरही गोंधळल्यासारखा दिसत होता.

पंधराव्या दिवशी गुरू द्रोणांनी श्येन पक्षाकारात आपली सैन्यरचना उभी केली. इंगुदी संपलेल्या जागोजागच्या पलित्यांमधून नुसताच कडवट धूर बाहेर पडत होता. नंदिघोषावरून कृष्णदेवांनी पांचजन्य आणि गुरू द्रोणांनी त्यांचा शंख फुंकताच दोन्ही सेना 'आरोऽह... आरूढ... आऽक्रम' असे रणनाद उठवीत एकमेकींना भिडल्या.

कुरुक्षेत्रावरच्या सेना जसजशा क्षीण होत होत्या, तसतशा सरस्वती आणि दृषद्वती मात्र वीरांच्या उष्ण रक्ताचे पाट घेऊन फुगत होत्या! सगळ्या युद्धभूमीवर रक्त, मांस आणि धूल यांचा कर्दम साचला होता. धडधडणाऱ्या चितांची प्रतिबिंबं दृषद्वतीच्या रक्तमय पात्रात भेसूर दिसत होती. युद्धभूमीवर ना पांडवांचं राज्य होतं, ना कुरूंचं! अदय, विकराल मृत्युच तिथला अनभिषिक्त सम्राट झाला होता.

दोन प्रहरापर्यंत गुरू द्रोण निकरानं लढले. पण एकाएकी कुणीतरी 'अश्वत्थामा पडला, अश्वत्थामा पडला!' अशी मायावी आरोळी ठोकली. वास्तविक तो अश्वत्थामा नावाचा मालव प्रांताच्या इंद्रवर्मा या राजाचा हत्ती होता. तो भीमानं ठार केला होता.

सत्यासत्याची परीक्षा पाहण्यासाठी द्रोणांनी सगळ्या समरांगणातून फिरवीत आपला रथ शेवटी सत्यप्रिय युधिष्ठिराच्या रथाजवळ आणला. "युधिष्ठिरा, सर्व जण आक्रोश करताहेत की 'अश्वत्थामा पडला!' खरोखरच माझ्या प्रिय अशू गतप्राण झाला काय? सांग, माझ्या तुझा सत्यप्रियतेवर विश्वास आहे!" द्रोण पिळवटून म्हणाले.

"गुरुदेव, अश्वत्थामा पडला हे सत्य आहे; पण तो मानवांतील की हत्तींतील, ते मला माहीत नाही!!" युधिष्ठिर जीवनात प्रथमच असत्य बोलला. दुसरं वाक्य अस्पष्ट, तोंडातल्या तोंडातच त्याला स्वतःलाही ऐकू न येईलसं बोलला.

तसं हातातील धनुष्य फेकून पुत्रवियोगाच्या दुःखानं विव्हल झालेल्या द्रोणांनी रथातच पद्मासन घालून ध्यान धरलं. इतक्यात आरक्त नेत्रांचा धृष्टद्युम्न वृक्षावर कोसळणाऱ्या विजेसारखा आपल्या रथातून खाली उतरला. हातातील खड्ग उगारून धावला. पांडव 'थांब, थाब' म्हणून ओरडत मागून धावत असतानाच द्रोणांच्या रथावर, एका झेपेतच चढला. कुणाला काही समजायच्या आतच, मस्तकावर एकत्र बांधलेले त्या वृद्धाचे विपुल केश मुठीत घट्ट धरून एका प्रहारातच त्यांचं मस्तक धडावेगळं करून दोन्ही सेनांच्या मध्ये त्यानं सरळ धुळीत फेकून दिलं. हस्तिनापुरातील शेकडो युवकांना शिकविणारा, मनामनांवर राज्य करणारा गुरुश्रेष्ठ धुळीत पडला.

पौष शुद्ध द्वितीयेची सोळाव्या दिवशीची पहाट सुवर्णकिरणांच्या प्राजक्तफुलांचा सडा कुरुक्षेत्रावर शिंपत उजाडत होती. आकाशदेवाला मानवांच्या क्रौर्य-करुणेशी

सर्व देवादिकांनी असुरांच्या नाशासाठी स्कंदाला केला, तसा सर्व कुरुसैन्याला एकत्र करून दुर्योधनानं कर्णाला सेनापतीपदाचा अभिषेक केला. ज्या मूळ स्थानावर युद्धाला सुरुवात झाली होती, ते स्थान आता तीन कोस उत्तरेकडे राहिलं होतं, रोज समरांगणं बदलली जात होती. दक्षिणेकडे सरकत होती.

सेनापती झालेल्या कर्णानं आपल्या सैन्य रचनेसाठी सोयीची जागा हेरली. कौरवसेना एका विशाल मगराचा आकार धरून युद्धसंमुख उभी ठाकली.

त्या मगराच्या नेत्रभागाची स्थानं शकुनी व उलूक यांनी घेतली होती. मस्तकाची जागा संतप्त अश्वत्थाम्यानं स्वीकारली होती. डाव्या पायाच्या स्थानी कृतवर्मा आणि उजव्या पायाच्या स्थानी गौतम उभा ठाकला होता. मागच्या पायाच्या जागी मद्रराज शल्य उभा होता आणि मगराच्या मधोमध लाखो कुरूंच्या वेढ्यात दुर्योधनाला लपवून स्वत: कर्ण मुखाग्रावर उभा होता.

मगराच्या मध्यातून दुर्योधनानं 'विदारक' नावाचा शंख फुंकून लढाईचा संकेत करताच, कर्णानं आपल्या हातातील पुष्पमालांनी सुशोभित विजय धनुष्य उंचावून गरगर फिरविलं. आपला हिरण्यगर्भ शंख आपल्या कंठाच्या धमन्या फुगवीत इतक्या मोठ्यानं फुंकला की, समरांगणाभोवती आशाळभूतपणे रेंगाळणारे तित्तिर, गृध, वाग्गुध यांसारखे मांसभक्षक पक्षीही भेदरून आकाशात उडाले! हत्तींच्या अंगावरील केश ताठ झाले.

"आऽऽरोऽह! आऽऽक्रऽम!' लोहत्राणातील आपल्या पीळदार बळकट भुजा खूप उंच उंचावीत, त्यानं कुरुसैन्याला आज्ञेची गगनभेदी रणआरोळी दिली. कुरुसेनेचा विशाल मगर कर्णाचा जबडा करून पांडवांना गिळण्यासाठी पुढे सरकला.

अर्जुनाच्या सेनापतित्वाखाली आज आमची पांडवसेना अर्धचंद्राचा आकार धरून पुढे सरसावली.

अर्जुनाचा कपिध्वज कुठेच दिसत नाही, हे पाहून क्षणभर गोंधळलेल्या राधेयानं आपला रथ सरळ आमच्या प्रचंड गजदलाकडे वळविला. अग्रांना विष माखलेले असंख्य बाण तो मृगधारेसारखे इतके सलग फेकत होता की, पहिल्या एका प्रहारातच त्यानं प्रचंड गजदल सरळ उधळून लावलं.

सूर्य माथ्यावर आला आणि भीमानं क्षेमधूर्ती या समर्थ योद्ध्याला रथावरून खाली कोसळविला. संशप्तकांशी भिडलेल्या अर्जुनानं दंड व दंडधार या राजांना कंठस्नान घातलं म्हणून अश्वत्थाम्यानं चवताळून त्याच्यावर झेप घेतली. ज्या पांचाल-पथकांत कर्ण घुसला होता, तिथे सरळ-सरळ संकुलयुद्धाला सुरुवात झाली होती.

मत्स्य आणि पांचाल यांचे वीर पथकप्रमुख कर्णासमोर धडाधड कोसळताहेत, हे पाहून त्याला बांध घालण्यासाठी कृष्णदेव पांचजन्य शंखातून विशिष्ट स्वरांतील सांकेतिक बोल काढून नकुलाला पुन:पुन्हा सांगत होते, 'नकुलऽऽ! नकुलऽऽ! कर्णाकडे रथ वळव!' त्यांचा संकेत नकुलाला त्या घनघोर घुमश्चक्रीत अर्ध्या घटकानंतर कसातरी समजला. दोन प्रहर टळत असताना त्यानं आपलं सैन्यदल आपल्या मागे घेत मत्स्यांच्या पथकांत प्रवेश केला आणि पुढे होत सरळ कर्णाला अंगावर घेतलं.

पण त्यानं अंगावर घेतलेला सेनानायक म्हणजे होता, विजेचा लोळ! तो नकुलाचे बाण सहज परतवीत त्याला पुन:पुन्हा विरथ करून हसत-हसत नि:शस्त्र केलेल्या नकुलाला म्हणाला, "जा, आपल्या ज्येष्ठ बंधूला – त्या अर्जुनाला माझ्यासमोर पाठवून

दे!”

लज्जित नकुल मान खाली घालून त्याच्यासमोरून परतला.

संध्याकाळची तिरपी सौम्य किरणं कुरुक्षेत्राभोवती उंच वृक्षांच्या लांबट पडछाया पसरवीत असतानाच कृष्णदेवांनी अर्जुनाचा नंदिघोष पहिल्यानंच कर्णाच्या जैत्ररथासमोर आणला! एकमेकांना समोर पाहताच ते भयानक बिथरले. ते दोघेही कितीतरी मोठ्यानं एकमेकांवर ओरडले. एकमेकांचा वेध घेत त्यांनी आपापल्या गांडीव आणि विजय या अवजड धनुष्यांतून बाणांची अनवरत फेक करत कुरुक्षेत्राचं आकाश झाकाळून टाकलं. एक घटकाभर त्यांचे अमोघ, वेगवान, नादमय बाण भयानकपणे एकमेकांशी टक्करले. त्यांच्या लोखंडी अग्रांतून ठिणग्याच ठिणग्या उफाळल्या. त्या ठिणग्यांनी कर्णाचा सारथी सत्यसेन पोळून काढला. शेवटी अर्जुनाच्या बाणांनी तो मृत शाला. पौष शुद्ध द्वितीयेचा बिकट असा सोळावा युद्धदिवस कसातरी संपला.

त्या रात्री दुर्योधनानं त्याला विचारलं, “अंगराज, तुझा सारथी सत्यसेन पडला. उद्या तुझ्या सारथ्याचं काय?” दुर्योधनाचं धारदार नाक पलित्याच्या धूसर प्रकाशातही स्पष्टपणे तरारलेलं दिसत होतं.

“युवराजा, मला एक कुशल असा प्रामाणिक सारथी दे, म्हणजे उद्या माझा रथ वाऱ्याचाही गर्व हरण करणाऱ्या गतीनं समरांगणावर स्वैर धावताना तुला दिसेल!” कर्ण उत्तरला.

‘कुशल सारथी? प्रामाणिक सारथी?’

ते दोघेही क्षणकाल शांतच उभे राहिले. कुरूंच्या राजकक्षातील पाषाणमूर्तीसारखे!

“अंगराज, खेद मानणार नसशील, तर असा एकच योद्धा मला सुचवावासा वाटतो, जो आज सर्व दृष्टींनं तुझ्या रथाचं सारथ्य करण्यासाठी योग्य आहे.” दुर्योधनाची पाषाणमूर्ती बोलकी झाली.

“कोणता?” कर्णानं शिरावरचा मुकुट आणि अवजड लोहत्राण काढून ते तबकात ठेवलं.

“मद्रराज शल्य!” दुर्योधनानं आपला बळकट उजवा हात त्याच्या विशाल खांद्यावर चढविला.

“शल्य? राजा, तू विसरतोस की शल्य हा पांडवांचा मामा आहे. राजमाता माद्रीदेवींचा सख्खा बंधू आहे तो!”

“कर्णा, शल्याला या युद्धापूर्वीच मी सर्व राजांहून वेगळी अशी मानाची वागणूक दिलेली आहे. मद्र देशाहून तो कुरुक्षेत्राकडे यायला निघाला होता, ते वास्तविक पांडवांना मिळावं म्हणूनच! पण जागोजागी त्याच्या मार्गावर वेशी उभारून, राजदूत ठेवून त्याला बहुमोल उपाहार देऊन, मी त्याला आपल्या पक्षाकडे वळवून घेतलं आहे. गेले सोळा दिवस तो प्राणपणानं निष्ठेनं आपल्यासाठी लढला आहे. विश्वास ठेव, शल्य आता कधीच मागे परतणार नाही. क्षत्रिय पश्चात्ताप करीत नसतात, परतत नसतात, प्रसंग पडल्यास पावन होण्यासाठी मृत्यूलाही कवटाळतात!”

मद्रराज शल्य कर्णाचा सारथी नियुक्त झाल्याची वार्ता आमच्या गोटात पोहोचली. आज कृष्णदेवांनी पहिल्यानंच माद्रेय नकुलाला सादर करण्याची आज्ञा मला दिली. माद्रेयाला समोर घेऊन ते आज कोणती युद्धनीती खेळणार, असा विचार करीतच मी नकुलाच्या शिबिरात गेलो. वासुदेवांची आज्ञा म्हटल्यानंतर तो मदनवत अप्रतिम सुंदर

पांडुपुत्र नकुल माझ्याबरोबर निघाला.

"नकुला, आत्ताच तुला तुझा मामा मद्रराज शल्यांच्या शिबिरात जायचं आहे". कृष्णदेव नकुलाला म्हणाले

यादवसेनापती म्हणून मी शंका व्यक्त केली की, "गेले सोळा दिवस मद्रराज शल्य कुरूंच्याकडून निष्ठेनं लढला आहे. तो या क्षणी पांडवांसाठी कस काय लढेल?"

माझ्याकडे हसून बघत कृष्णदेव म्हणाले, "त्यानं तसं लढावं, अशी आमची इच्छाही नाही. नकुलानं आपल्या मामाचं दर्शन घेऊन त्यांना एकच विनंती करावी की, उद्या समरांगणात कर्णाला तो सूतपुत्र आहे, दुर्योधनाचा आश्रित आहे, एवढंच नाना कळांनी त्याला वारंवार सांगाव! नकुलानं कौशल्यानं मामांकडून एवढंच वचन घेऊन परतावं."

'आज्ञा द्वारकाधीश' म्हणत माद्रेय नकुल आपल्या शल्यमामाच्या भेटीसाठी एकटाच निघून गेला. काही वेळानं तो आपल्या कार्यात यशस्वी होऊन परतला.

आजची रात्रबैठक अधिक न लांबविता कृष्णदेवांनी सर्वांनी शांतपणे झोपी जायला सांगितलं. मला कळून चुकलं की अमावास्या संपली असली, तरी आता येणाऱ्या रात्री अधिकच अंधाऱ्या होत जाणार!

युद्धाचा सतरावा दिवस उजाडला. शुद्ध तृतीयेचा दिवस होता तो! दोन्ही पक्षांकडील सैन्यसंख्या आता अर्ध्याहून अधिक कमी झाली होती!

कृष्णदेवांच्या आज्ञेनं आजचं रणक्षेत्र एका अतिशय उंच टेकडीच्या पायथ्याजवळ दक्षिणेला निवडण्यात आलं होतं! पूर्वेकडून कुरूंची आणि पश्चिमेकडून पांडवांची सेना रणभूमीजवळ दाटत होती. मद्र, मागध, मत्स्य, मथुरा, मालव, वत्स, वंग विदेह, विदर्भ, कुलिंद किरात, काशी, कोसल, कपिश, कांबोज, कामरूप, निषेध आभिर गांधार – आर्यावर्तातील सर्व-सर्व देशांचे उरले-सुरलेले युद्धोत्सुक योद्धे युद्धाचा शेवट काय होणार, या साशंकतेनं कुरुक्षेत्राभोवती दाटले होते. एकनिष्ठेनं लढण्यासाठी सिद्ध झाले होते. शाकल, द्वारका, गिरिव्रज, विराटनगर, अवंती, प्रयाग, ताम्रनगर, मिथिला, हस्तिनापूर, कुसुमपूर, कुंडिनपूर, चंदनावती, काष्ठमंडप, वाराणसी, अयोध्या, चंपावती, माहिष्मती, पुष्करावती सर्व राजनगरांचे विविध रंगांचे, वेगवेगनळ्या आकारांचे सर्व राजध्वज रणक्षेत्राला मानवंदना देत डोलू लागले.

आज कुरुसैन्याची रचना सूर्यबिंबासारखी गोलाकार होती. कितीतरी योजनं घेराचा हा सेनासज्ज गोल, सेनापती कर्णाच्या जैत्ररथाच्या मागे पसरला होता. त्या राधेयानं आपल्या जैत्ररथाला वंदन करून प्रदक्षिणा घातली. डोळे मिटून तो सूर्यस्तोत्र म्हणत होता, 'ॐ भूर्भुवः स्वः–'

मृत्युदेव यमाचं वाहन असलेल्या महिषासारखा आकार देऊन पांडवांचं सैन्य अर्जुनाच्या नंदिघोष रथामागे कृष्णदेवांनी आज उभं केलं होतं, त्याचं शेवटचं पथक सरळ टेकडीच्या पायथ्याशी जाऊन भिडलं होतं, मी उरल्या-सुरल्या यादवसेनेसह महिषाची डावी फळी सांभाळली. वीर सेनापती कर्ण रथारूढ होताच त्याचा सारथी शल्य रथनीडावर झेपावला. त्यानं त्याच्या हस्तिदंतासारख्या शुभ्रधवल दिसणाऱ्या उंच, पुष्ट घोड्यांचे वेग हाती घेतले. व्याघ्रचर्मानं वेढलेल्या घेरात खोचलेला प्रतोद उपसून शल्यानं हाती घेतला.

शल्य – पांडवांचा मामा – कर्णाचा सारथी! मी स्वत:शीच हसलो.

पांडवसैन्याच्या अग्रभागी उभ्या असलेल्या अर्जुनाला कृष्णदेवांनी रथारूढ व्हायला सांगितलं पण तो तसाच उभा राहिला. ते रथारूढ झाल्याशिवाय तो आज नंदिघोषावर चढणारच नव्हता. क्षणभर हसून कृष्णदेवांनी नंदिघोषावर पाय ठेवला. जाणीवपूर्वक डावा!

रथारूढ होऊन कृष्णदेवांनी त्यांच्या शुभ्र पांचजन्य शंखातून युद्धप्रेरक रोमांचक बोल काढताच अर्जुनही रथारूढ झाला. आज पहिल्यानंच दोन्ही सेनांनी केवळ दोघांच्याच नावांचा जयघोष करून कल्लोळ माजविला. 'कुंतीपुत्र अर्जुऽन – जयतु!' राधेय दानवीऽर अंगऽराज कर्ण – जयतु!'

पांडवसैन्यातील जयनाद ऐकताच कुरूंचा तो सेनापती सरसरत फुलणाऱ्या सूर्यफुलासारखा एकदम फुलून निघाला – आता तो केवळ कर्ण नव्हता. राधेय नव्हता, कौंतेय नव्हता, तो होता केवल सेनापती – केवळ जळता सूर्य!

आपल्या उजव्या हातातील विजय धनुष्य पुन:पुन्हा उंच उंचावीत 'आऽऽरोऽऽह, आऽक्रम' अशा घोषणा देत तो खवळलेल्या समुद्रासारखा गर्जना करीत येऊ लागला. त्याला संरक्षण देत त्याचे पुत्र वृषसेन, प्रसेन व चित्रसेन, अश्वत्थामा, शकुनी, दु:शासन, कृप, दुर्योधन, कृतवर्मा, सर्व अतिरथी कौरवयोद्धेही त्वेषानं आमच्या पांडवसेनेवर चालून येत होते.

कृष्णदेव नंदिघोषाल खाली उतरले. वंगणाच्या काष्टनलिकेतील एरंडीचं तेल व इंगुदीमिश्रित वंगण त्यांनी नंदिघोषाच्या सर्व रथचक्रांना दिलं.

नंदिघोषाला संरक्षण देत भीम, उत्तमौजा, धृष्टद्युम्न, नकुल, सहदेव यांचे रथ धावू लागले. धुळीचे प्रचंड लोळच लोळ अवकाशात झेपावू लागले. रणवाद्ये, जयघोष, हत्तींचे चीत्कार, घोड्यांचे खिंकाळणं, रथचक्रांची घरघर, ताणलेल्या प्रत्यंचांचे टंकार या सर्वांचा मिळून तयार झालेला एक विचित्र संमिश्र-संमिश्र आवाज टेकडीच्या तटबंदीला थडकत घुमून प्रतिध्वनित होऊ लागला.

दोन्ही सैन्यांचे योद्धे, बाण फेकीत एकमेकांवर भयंकरपणे आदळले. सैन्याला सैन्य भिडलं! कर्णाचा पाच हंसवर्णी पांढऱ्या घोड्यांचा जैत्ररथ धरतीला भयानक हादरे देत आमच्या पांडवसेनेतील पांचालांच्या आघाडीच्या फळीत केव्हा घुसला ते कळलंही नाही.

तो जवळ येताच आमच्या थोडंसं पुढे गेलेल्या डाव्या हाताचं धृष्टद्युम्नाचं पांचाल सैन्य एकदम आडवं घुसून आमच्या सेनेसमोर उभं ठाकलं. अचानकपणे पांचालांची पथकं समोर आलेली पाहून, तो सरळ पांचालांच्या पथकांत घुसला. हातातील विजय धनुष्य उंच उंचावीत, विषारी बाणांच्या संतत मृगधारेसारख्या सरींवर सरी पांचालांच्या अफाट गजपथकावर वर्षवू लागला. केवल अर्ध्या घटकेतच त्यानं पांचालांची आघाडीची सर्व पथकं वधली.

पहिल्या घटकेतच कर्णानं भानुदेव, चित्रसेन, सेनाबिंदू, तापन आणि शूरसेन या विख्यात पांचालवीरांना कंठस्नान घातलं, कृष्णदेवांनी पांचालांमागची अर्जुनाची पथकं हळूच काढून, ती संशप्तकांच्या सेनेला भिडविली. अर्जुनाचे अमोघ बाण त्यांच्या माथ्यावरून सूँऽ सूँऽऽ असा सलग आवाज करीत उधळत होते. संशप्तक वाट फुटेल तसे धावत होते. अर्जुनाची सेना त्यांना पाठलाग करून गाठू लागली. बाणफेकीनं टिपू लागली.

आघाडीची रणफळी फोडून आत घुसलेल्या कर्णाची आणि युधिष्ठिराची आता गाठ पडली. बराच काळ युधिष्ठिराची त्रेधा करून, शेवटी त्यानं त्याचा सारथी इंद्रसेन याला

रथावरून कोसळविला. इंद्रसेन क्षणातच गतप्राण झाला. असहाय युधिष्ठिर रणांगणाबाहेर पळाला. आपल्या शक्तिशाली पुत्राचा – घटोत्कचाचा अंत कर्णानं केला याचं शल्य मनात रुतलेला वायुपुत्र भीम, समरांगणावर कुठे कर्णाचा पुत्र आपल्या भक्कम बाहूंच्या विळख्यात कवटाळायला मिळतो काय, याची भिरभिरत्या डोळ्यांनी संधी पाहात होता आणि त्याला ती संधी मिळाली.

विक्रमी कर्णपुत्र प्रसेन भीमाशी अर्धा घटका लढला. पण – पण शेवटी भीमानं फेकलेल्या एका चंद्रमुख बाणानं घायाळ होऊन धरतीवर कोसळला. तडफडून गतप्राण झाला.

माझं आणि कर्णपुत्र वृषसेनाचं घनघोर युद्ध जुंपलं, पण अर्ध्या घटकेतच एक विषारी लिप्त बाण मारून मी वृषसेनाला मूर्च्छित केलं. चपळाईनं पुढे होत दु:शासनानं त्या मूर्च्छित वीराला समरांगणाबाहेर काढलं.

आपल्या पराभवाचा प्रतिशोध घेण्यासाठी अस्वस्थ झालेला युधिष्ठिर द्राविड आणि निषाध यांची राखीव पथकं घेऊन, पुन्हा समरांगणात कर्णासमोर उभा राहिला. पण आपल्या पुत्राच्या वधामुले क्रोधानं भडकून गेलेल्या त्या महारथ्यानं पहिल्या धडकेतच युधिष्ठिराच्या दंडधार व चंद्रदेव या चक्ररक्षकांना धरतीवर धाडकन लोळविलं! युधिष्ठिरही निकरानं त्याच्या रथाला भिडला. त्यानं बाणफेकीनं कर्णाचा रथ झाकाळून टाकला. कर्णानं त्याचं बाणांचं आवरण क्षणात उधळून लावलं.

त्याची बाणफेक असह्य होताच युधिष्ठिर, मी आणि युयुत्सु एकाच रथात चढलो आणि पुन्हा समरांगणाबाहेर पळू लागलो. युधिष्ठिरानं फेकलेला एक सूची बाण त्या राधेयाच्या उजव्या कानाजवळच्या मर्मस्थानावर अचूक बसला. मूर्च्छित होऊन तो खाली कोसळला.

कर्णासमोरून पळालेला युधिष्ठिर रणांगणाच्या बाहेर जाऊन शिबिरात स्वस्थ बसून राहिला होता. त्याचं काही बरंवाईट झालं की काय, या भयानं साशंक झालेल्या अर्जनाचे वेध चुकू लागले. त्याला युधिष्ठिर सुखरूप आहे, हे पटविल्याशिवाय तो स्थिरचित्त होणारच नव्हता. नंदिघोषाची गती मंद-मंद करीत कृष्णदेवांनी अर्जुनाला सेनेबाहेर काढलं. त्याचा रथ युधिष्ठिराच्या शिबिरासमोर आणला. रथचक्रांचा आवाज ऐकून युधिष्ठिर धावतच बाहेर आला.

परंतु अर्जुनानं आपणाला कर्ण अजून समरांगणात भेटलाच नाही, असं खाली मान घालून त्याला सांगताच, तो संयमी आणि शांत म्हणून सर्वांनी गौरविलेला भूमिपुत्रही खवळला.

“हातातील गांडीव धनुष्य कुरुक्षेत्रावरच्या सूर्यकुंडात फेकून का देत नाहीस तू अर्जुना?” असं युधिष्ठिरनं अर्जुनाला भान सोडून क्रोधानं म्हणताच, युद्धात लढून ज्याच्या सर्वांगातील रक्तकण रसरसून तापले होते असा अर्जुन, आपलं गांडीव धनुष्य ऊंचावून, जीवनभर पितृवत मानलेल्या आपल्या प्राणप्रिय ज्येष्ठ बंधूवरही सरळ धावून गेला.

काही-काही प्रसंगच माणसाच्या संयमाचे बांध फोडण्यासाठी नियतीनं योजलेले असतात. आज ती नियती युधिष्ठिर-अर्जुन यांच्यामध्ये उभी ठाकली.

कृष्णदेवांनी मध्ये होऊन त्या दोघा कौंतेयांचा समेट घडविला. ‘कर्णाला वधल्याशिवाय शिबिराकडे परतणारच नाही!’ अशी घोर प्रतिज्ञा अर्जुनानं केली.

शुद्धीवर आलेल्या वृषसेनाला घेऊन, दु:शासन पुन्हा कौरवसैन्याच्या खवळलेल्या महासागरात पाणलोटासारखा घुसला. त्याला समोर पाहताच क्रोधानं आपला विशाल जबडा ताणून भीम चीत्कारला, “नीचा, थांब!” क्रुद्ध भीमानं विशोकाला दूर सारून आपल्या रथाचे वेग स्वत: हातात घेतले.

मध्ये-मध्ये येणाऱ्या आपल्या आणि कौरवांच्या सैनिकांना सरसहा आपल्या रथाखाली चिरडत, दुसऱ्या प्रहराला अनावर भीमसेनानं दु:शासनाला गाठलं. मनातील सूडाची भावना अनावर झालेला तो वायुपुत्र आकाशवाऱ्यासारखा गडगडाट करीत विकटपणे मोठ्यानं हसला. मृत्यूलाही थरकापायला लावील अशी ‘दु:शासना नीऽचा!’ अशी केवढीतरी कर्कश आरोळी ठोकीत, तो दु:शासनाच्या रथाला सरळ भिडला!

अर्धा-एक घटका त्यांना एकमेकांशिवाय कुरुक्षेत्रावरच्या इतर लाखो योद्ध्यांचं भानच नव्हतं. शेवटी भीमानं एका भक्कम प्रहारानं दु:शासनाला खाली पाडलं. हातातील गदा फेकून दिली. त्या वायुपुत्रानं चपळाईनं, पुढे धावत, गर्जत दु:शासनाचा गदा पेललेला उजवा हात आपल्या दोन्ही हातांच्या भक्कम पकडीत पकडला. आपला जडशील उजवा पाय त्यानं दु:शासनाच्या उजव्या स्नायुपुष्ट काखेवर दाबून ठेवला. दु:शासनाच्या हातातील गदा केव्हाच गळून पडली होती.

“पांचालीच्या पवित्र प्रावरणाला स्पर्श करणारा तुझा हा पापी बाहू मी मुळासकट उखडून हा असा आकाशात फेकून देतो आहे!” असं मोठ्यानं ओरडत, त्या अचाट शक्तीच्या गदावीरानं दु:शासनाचा बाहू एका दमदार झटक्यातच खांद्याच्या सांध्यातून मुळासकट उखडून काढला. धुंदपणानं आकाशाकडे पाहात त्यानं तो विविध आभूषणांनी भूषविलेला, रक्तरंजित बाहू गरगर फिरवून, दिशाहीन कुठेतरी दूर फेकून दिला.

तेवढ्यानंही त्या भानरहित भीमाचं समाधान काही झालं नाही. दु:शासनाचीच, हातातून निसटलेली गदा त्यानं उचलली. आपल्या डोक्याच्याही वर ती खूप उंच ऊंचावून त्यानं तिचा एक भक्कम आघात विव्हळणाऱ्या दु:शासनाच्या वक्षावर घालून, त्याचं उन्मत्त वक्ष लोहत्राणासह छित्रविच्छित्र करून टाकलं!

गगनभेदी आर्त अंतिम चीत्कार फोडून टाचा घासत दु:शासन शांत झाला. रक्ताची कारंजी उफाळली.

हातातील गदा दूर फेकून देऊन भीमसेन गुडघे टेकून खाली बसला. “या, कोणात सामर्थ्य असेल, तर या भीमसेनाला थोपवा!” भोवती दूरवर उभ्या असलेल्या दुर्योधन, शकुनी, कृप, अश्वत्थामा आणि कर्ण या सर्व-सर्व कौरवयोद्ध्यांना उद्देशून तो भयानक ओरडला.

दु:शासनाच्या छातीतून वाहणाऱ्या रक्ताच्या पाटात आपलं वाघासारखं गोल गरगरीत तोंड खुपसून, दु:शासनाचं उष्ण रक्त तो घटाघट प्यायला. माझ्यासह यच्चयावत सर्वांच्या अंगावर काटाच उभा राहिला.

सर्वांनी डोळ्यांवर हात ठेवले. कित्येक मूर्च्छित झाले. एकट्या कृष्णदेवांनी नंदिघोषातून उतरून भीमसेनाला सावरलं. आत्ता कुठे मला पटून चुकत होतं की, कृष्णदेवांनी त्याला पांडव-सेनापती करण्याचं का टाळलं होतं, कृष्णदेवांनी त्याचं रक्तमाखलं मुख आपल्या निळ्या उत्तरीयानं टिपून, त्याला द्रौपदीदेवींच्या शिबिराकडे धाडलं – त्याचा प्रतिज्ञप्रमाणे द्रौपदीदेवींचे मुक्त केश, दु:शासनाच्या रक्तानं सावरण्यासाठी.

आता समरांगणाचे सरळ-सरळ दोन भाग पडल्यासारखे झाले होते. उत्तरेकडे मी, भीमसेन, धृष्टद्युम्न, सहदेव, युधिष्ठिर यांच्याशी लढणारे दुर्योधनबंधू, कृप, सैंधव यांचा भाग व दक्षिणेकडे वृषसेन, अश्वत्थामा, शकुनी, दुर्योधन यांच्या कड्यातून अचूक वृषसेनाला टिपण्यासाठी टपलेल्या अर्जुन, नकुल, उत्तमौजा यांचा दुसरा भाग!

आपल्या पुत्राला अर्जुनाच्या बाणजालातून वाचविण्यासाठी आलेला कर्ण कसातरी प्रयासानं वृषसेनाभोवती पडलेल्या कड्यापर्यंत येऊन थडकला. एवढ्यात शकुनी, अश्वत्थामा, दुर्योधन यांना आव्हान देणाऱ्या अर्जुनानं नुकत्याच समोर उभ्या ठाकलेल्या कर्णालाही, "सूतपुत्रा! तुझा हा पुत्र वृषसेन आज तुम्हा सर्वांच्या समक्ष ठार करतो आहे. जसा तुम्ही माझ्या प्रिय 'अभि' मारलात तसा!" असं मोठ्यानं ओरडून एक चंद्रमुख बाण असा फेकला की, पूर्वीच बाणांच्या कुंपणात रथात खिळलेल्या वृषसेनाचं मस्तक क्षणात धाडकन धरतीवर कोसळलं.

जैत्ररथातून उतरून वृषसेनाच्या कपाळाचं एकदा दीर्घ अवघ्राण करून उठताना कर्णानं कंठभाग फुलवून गगनभेदी आरोळी ठोकली – 'आऽक्रम!'

अर्जुनाच्या पराक्रमानं भयभीत होऊन धावणारे कुरुसैनिक खिळल्यासारखे जागच्याजागीच थांबले. कुरूंचं उरलं-सुरलं सर्व सैन्य एकत्र बांधून कर्ण आता अर्जुनाच्या नंदिघोषाकडे येत होता. आता तिसरा प्रहर सुरू झाला होता.

दक्षिणेकडच्या चिखलाच्या दलदलीत कर्णाचा रथ उतरविल्याशिवाय शल्याला तो अर्जुनाच्या रथासमोर उभाच करता येणार नाही, अशा मोक्याच्या जागी आणून कृष्णदेवांनी नंदिघोष उभा केला. कुशल शल्यानं त्या दलदलीच्या पट्ट्यात चार हात तरी कोरडी जागा मिळते काय, हे पाहण्यासाठी त्याचा रथ त्या पट्ट्याभोवती कितीतरी वेळ गरगर फिरविला. शेवटी निरुपायानं थांबून तो कर्णाला म्हणाला, "राधेया, आजचा दिवस अर्जुनाशी युद्ध करण्यासारखा नाही. या दलदलीत रथ घालण्यात धोका आहे."

काही न बोलता कर्णानं दलदलीच्या पट्ट्यांच्यामध्ये रथ नेण्यासाठी बोट उंचावून शल्याला आज्ञा केली. अर्जुनाचा नंदिघोष आणि त्याचा जैत्ररथ आता प्रथमच एकमेकांसमोर उभे ठाकले. झटकन खाली उतरून कृष्णदेवांनी वंगणाचा एक जाड लेप नंदिघोषाच्या चक्रांना सगळीकडे दिला. वेडावलेल्या दोन्ही सेनांतील सैनिकयोद्ध्यांनी आपल्या रथांवरच्या, तुटलेल्या पुष्पमाला संपूर्ण तोडून, जयघोष करीत त्यांचा आपापल्या सेनानायकांवर वर्षाव केला.

कृष्णदेवांनी त्यांचा पांचजन्य कितीतरी आवेगानं फुंकला. चंदनउटी लेपलेले आपले भक्कम, पुष्ट, मांसल दंड सावरून कृष्णार्जुनांनी आपापले पांचजन्य व देवदत्त शंख शिरा ताणून प्राणपणानं फुंकले. कर्णानंही जैत्ररथावर त्याचा हिरण्यगर्भ शंख प्राणपणानं फुंकला.

एका क्षणाचीच शांतता पसरली आणि मग त्यांनी एकदम कानठळ्या बसविणाऱ्या रणआरोळ्या फोडीत एकमेकांवर अविरत बाणांची भयानक फेक सुरू केली. त्यांचे बाण अवकाशातून असे सुटत होते की, तारकामंडलासह आकाशच कोसळून अंगावर पडतं की काय, असा भास दोन्ही सैन्यांना झाला. गेल्या सोळा दिवसांत अशी चित्तथरारक बाणफेक मीही पाहिली नव्हती. भीष्म, द्रोण, अभिमन्यू यांनी केलेल्या संग्रामापेक्षा त्यांचा संग्राम सर्वसंहारक होता. सर्वांच्या अंगावर रोमांच उभे करणारा होता.

शेकडो-हजारो कपिश बाण आकाशात फेकून, ते त्यांतून मृगधारेसारखा शत्रूवर

पाऊस पाडू लागले. त्यातूनच पांढऱ्या जिद्म बाणांची विजेसारखी असंख्य नागमोडी वळणं रेखून, त्या जिद्म बाणांनी एकेक पथकाचा प्रमुख अचूक टिपून, परस्परांची सेना क्षीण करू लागले. सामर्थ्य कमी करू लागले. सैनिकांना कळेना की, बाण कोठून येताहेत!

आता रथाभोवतीचा चिखल अधिकच रटरटू लागला. आपापल्या सेनानायकाला प्रोत्साहन आणि चेतावणी देण्यासाठी भोवतीचे योद्धे त्यांच्या नावांचा अखंड जयघोष करू लागले. आता तो आवाज कोणत्याही आवाजापेक्षा क्षणाक्षणाला जास्त-जास्तच गगनभेदी होत चालला होता. एक घटकाभर त्यांनी वेडावल्यासारखी नुसती परस्परांवर बाणफेकच केली. मात्र दोघांच्याही उघड्या दंडांवरच्या जखमांतून उष्ण रक्ताचे पाट वाहू लागले. तिकडे लक्ष देण्याइतका अवसरही त्यांना नव्हता! त्या रक्ताचा परस्परांशी नाजूक नातेसंबंध आहे, हे फुललेल्या कर्णाच्या आता लक्षातही राहिलं नव्हतं!!

आता ते दोघेही प्राणाच्या मोलानं, अतीव कष्ट करून प्राप्त केलेली दिव्यास्त्रं एकमेकांवर फेकण्यासाठी सज्ज झाले. या वेळी त्यांना जन्म देणारी राजमाता – प्रत्यक्ष कुंतीदेवी जरी समरांगणात आल्या असत्या, तरी त्यांनीसुद्धा ते दोघे एकमेकांचे बंधू आहेत, हे मान्य केलं नसतं. जीवनाच्या दोन परस्पर विरोधी ध्रुवांच्या अगदी कडेवर जाऊन ते आता उभे राहिले होते. त्यांच्यापुढे एकच एक दृश्य दिसत होतं – समोरच्या योद्धयाचं निष्प्राण कलेवर!! त्यासाठीच ते आसुसलेले होते. स्वत:ला संपूर्ण विसरले होते.

भात्यातील एक सर्पमुख दिव्य बाण कर्णानं अर्जुनावर फेकण्यासाठी बाहेर काढला. त्याच्या नकळतच त्या बाणावर एका नागशक्तीनं संचार केला होता. अर्जुनाच्या कंठाचा वेध घेऊन कर्णानं मंत्र पुटपुटत, तो भयानक बाण सोडला. तो बाण आपल्या कंठाचा वेध घेत वायुवेगानं येतो आहे, याचं अर्जुनाला थोडंसुद्धा भान राहिलं नव्हतं. कृष्णदेवांनी हातातील वेग चपळाईनं आखडून एक असा झटका घोड्यांच्या पाठीवर दिला की, पाचही घोडे एकदम पाय मुडपून गपकन खालीच बसले. अर्जुनाच्या कंठाचा प्राणघातक वेध कसातरी चुकला. रथ खाली झुकल्यामुळे त्याच्या मस्तकावरच्या किरीटावर खणकन आदळलेल्या त्या भयानक गतिमान बाणानं त्याचा सुवर्णी मुकुट उधळून लावला. त्याखाली असलेलं गोलाकार शिरस्त्राणही घरंगळून रथात पडलं. अर्जुनानं सुटकेचा दीर्घ नि:श्वास टाकला. त्याचे काळे, कुरळे केस विखुरले. त्याच्याकडे पाहून कृष्णदेव हसले.

कटीभोवती लपेटलेला पांढराशुभ्र शेला काढून अर्जुनानं आपल्या विपुल केशांभोवती तत्परतेनं गुंडाळला. नियतीचं आव्हान आता तर अधिकाधिक उग्र होऊ लागलं.

बाणांचा ओघ वर्षवून अर्जुनानं कर्णाच्या सारथ्याला, शल्याला पिंजऱ्यातील श्येन पक्ष्यासारखा एका जागी कोंडून टाकला. आता त्या कुशल सारथ्याला इकडे-तिकडे हलताच येईना. समोरचा गजशृंखलाध्वजांकित जैत्ररथ आता एका जागी स्थिर झाला.

कर्णाचे निवडक बाण कृष्णदेवांच्या किरीटावरून धावत होते. या घनघोर युद्धात त्यानं चुकूनसुद्धा एकही बाण कृष्णदेवांच्या दिशेनं फेकला नाही.

संतप्त झालेल्या अर्जुनानं मनाच्या निर्धारानं आग्नेयास्त्रापूर्वीचे सूचक मंत्र पुटपुटायला सुरुवात केली. एक प्रकारचं अतीव दिव्य तेज त्याच्या मुद्रेवरून ओसंडू लागलं. अर्जुनाच्या गांडीव धनुष्यातून सुटलेले अगणित अग्निबाण कृष्णदेवांच्या

माथ्यावरून आग ओकत, समोर फरफरत धावू लागले. सगळ्या आकाशमंडलाचं यज्ञकुंडच झालं आहे की काय, या भयानं कौरव सैनिक भयभीत होऊन इतस्तत: धावू लागले. अर्जुनाचे बाण अग्नीचा पाऊस पाडू लागले.

अर्जुनाच्या अग्निबाणांना निष्प्रभ करण्यासाठी कर्णानं गुडघे टेकून वरुणास्त्राचे दिव्य मंत्र डोळे मिटून आळविले. त्याच्या ओंजळीतून अर्घ्यदान करताना जीवनभर पडलेले पाणीच त्याच्या साहाय्यासाठी काळ्या मेघांबरोबर विजांचं अनिर्बंध तांडवनृत्य घेऊन धावलं. त्या पाण्याच्या दानानं त्या दानवीरानं अर्धवट मेलेल्या जखमी वीरांनाही जीवनाचं दान केलं.

पण – पण कर्णाला माहीत नव्हतं की, त्याच्याच वरुणास्त्रानं त्याच्या रथचक्रांभोवतीचा चिखल अधिकच दाटत चाललाय!!

कर्णाच्या वरुणास्त्राचे वर्षणारे मेघ परतवावेत, म्हणून अर्जुनानं निवारक अशा वायव्यास्त्राची कुशल योजना केली. सुसाट, घोंगावत धावणाऱ्या वाऱ्यानं आकाशात दाटलेली मेघांची कोंडी उधळून लावली. कुरुक्षेत्र पुन्हा सूर्यकिरणांनी उजळून निघालं. आनंदित झालेल्या अर्जुनानं जयनाद करीत वज्रास्त्राचं अभिमंत्रण करून ते असंख्य तीक्ष्ण शस्त्रं घेऊन धावणारं असं कर्णावर फेकलं. कर्णानं प्रत्युत्तर म्हणून महेंद्र पर्वतावर प्राप्त केलेल्या भार्गवास्त्राची योजना केली.

अर्जुनान फेकलेल्या दिव्य अशा सर्वनाशी ब्रह्मास्त्राचंही निवारण त्यानं निर्धारानं केलं. पिनाक, पाश, तोमर, भिंदिपाल, चक्र, त्रिशूल सर्व-सर्व प्रकारची शस्त्रं त्यांनी एकमेकांवर फेकली. कोणी थकत नव्हतं. युद्धाचा निकाल काही लागत नव्हता. तिसरा प्रहर संपवून आता सूर्य पश्चिमेकडे कलू लागला.

निशित, नाराच, जिह्म, सन्नतपर्व, कंकपुंख, बस्तिक, रुक्मपुंख, क्षुर अशा असंख्य बाणांचा खचच खच संपूर्ण समरांगणावर पडला होता. त्यांची इच्छा नसतानाही, त्यांनी फेकलेल्या दिव्य अस्त्रांनी असंख्य योद्धे कामी आले. दोघेही हटत नव्हते. सोळा दिवसांत झालेल्या युद्धापेक्षा, त्यांचं एक दिवसाचं हे घनघोर युद्ध आता कुरुक्षेत्रालाही पाहावत नव्हतं.

निर्वाणीचं म्हणून कर्णानं अति कष्ट करून महेंद्र पर्वतावर प्राप्त केलेलं परशुरामांकडील अथर्वण अस्त्र अर्जुनावर फेकलं. त्याचा वेध चुकविण्यासाठी कृष्णदेवांनी सर्व घोडे गर्रकन गोल फिरविले. अथर्वण अस्त्राचा मारा चुकला.

नंदिघोष त्याच्या रथाच्या दिशेनं पाठमोरा होऊन येत असलेला पाहून शल्य दातओठ खात हलण्याचा यत्न करू लागला. घोड्यांना चेतावणी देण्यासाठी शिरा ताणून हाकारा देत, त्यानं हातातील वेग फटाफट पांढऱ्या घोड्यांच्या पाठीवर आदळले. घोड्यांनी खूर रुपवून सर्व सामर्थ्यानिशी रथ वळविण्यासाठी जिवाची शर्थ केली, पण एक सूतभरही तो जैत्ररथ काही हलला नाही. आता तो हलणार नव्हता.

अर्धा-एक घटका एका जागीच दलदलीत खिळलेला तो रथ, सूर्यकिरणांनी ती दलदल तापवून-तापवून घट्ट केल्यामुळे धरतीनं घट्ट पकडून ठेवला होता. त्याच्या रथाचं डावं चक्र रणभूमीत फसलं होतं!

“अंगराज, रथ हलत नाही! डावं चक्र धरतीनं गळलं आहे.” शल्य भयाकुल स्वरात ओरडला.

“माद्रेया, थरकू नकोस. रथचक्र बाहेर खेचतो.” पाठीवरचा भाता आणि हातातील

अखंड बाणफेक करणारं विजय धनुष्य सावरीत, तो रथातून एका झेपेतच खाली उतरला.

त्यानं उजवा हात डाव्या रथचक्राच्या एका भक्कम आऱ्याला घालून, ते उद्धरण्यासाठी सर्व सामर्थ्य एकवटलं. रथचक्र काही हललं नाही.

त्याच्या हातात धनुष्य पाहून अर्जुन बाण फेकीतच होता. ते बाण त्याच्या उघड्या दंडात रुपू लागले. तो खाली बसला. रुपेल तितकं धनुष्य धरतीत खाली रुपवून त्यानं ते स्थिर केलं. आता त्यानं बाणफेकीचा बैठा पवित्रा घेतला. त्यानं एका हातानं फेकलेल्या एका मर्मभेदी बाणामुळे अर्जुन मूर्च्छीत झाला. ते पाहून निर्धारानं त्यानं हातातील विक्रमी विजय धनुष्यही क्षणभर खाली ठेवलं. दोन्ही हात ताणून सर्व-सर्व सामर्थ्यानिशी तो आता रथचक्र बाहेर काढण्यासाठी झटू लागला. रथचक्र तसूभरही हलत नव्हतं.

लाकडी नळीतील औषधी वनस्पती कृष्णदेवांनी अर्जुनाच्या नाकासमोर धरली. तो क्षणात सावध होऊन पुन्हा उभा राहिला.

कर्णाला निःशस्त्र पाहून मात्र अर्जुनानं आपलं गांडीव धनुष्यही खाली घेतलं!!

उजव्या हाताची तर्जनी त्या रथचक्र उद्धारण्यासाठी झुंजणाऱ्या ज्वालामुखीवर रोखून कृष्णदेव अर्जुनाला म्हणाले, “अर्जुना, अर्धचंद्राकृती अंजलिक बाण!”

“ पण – तो निःशस्त्र आहे. पदस्थ आहे. मी रथारूढ आहे.” अर्जुन चाचरला. पुन्हा संभ्रमित झाला.

“अर्जुना, ही आज्ञा आहे.” कृष्णदेवांचा स्वर तीव्र कठोर झाला. धारदार झाला.

आज्ञाधारक अर्जुनानं अंजलिक बाण सरकन भात्यातून खेचून, प्रत्यंचा ठीक आहे की नाही हे पाहण्यासाठी, ती चिमटीत धरून तिचा एकदा टंकार केला. तेवढा, अगदी तेवढा सूक्ष्म आवाज ऐकूनही त्यानं रथचक्रावरचे आपले डोळे नंदिघोषाकडे गर्रकन फिरविले. अर्जुनानं फेकीसाठी सावरलेलं धनुष्य पाहून तो ओरडला, “अर्जुना थांब. मी निःशस्त्र आहे. पदस्थ आहे. निःशस्त्र पदस्थावर शस्त्र फेकणं, हा युद्धधर्म नाही. तू वीर आहेस. क्षत्रिय आहेस.” तेवढ्यात त्यानं महेंद्रावर प्राप्त केलेलं ब्रह्मास्त्र आठवण्याचा कसून प्रयत्न केला असावा. ते त्याला काही केल्या स्मरेना.

“धर्म! राधेया, धर्माचा अर्थ तरी तुला माहीत आहे काय? सूतपुत्रा, कुरूंच्या प्राचीन द्यूतगृहात पांचालीला वारांगना म्हणताना, तुझा हा दिव्य धर्म कुठे गेला होता? लाक्षागृहात पांडवांची राख झाली, ही वार्ता ऐकताना तुझा धर्म का आक्रोशला नाही? सोळा वर्षांच्या कोवळ्या अभिमन्यूला तुम्ही सहा जणांनी घेरलंत, तेव्हा हे सूतपुत्रा, तुला तुझा आता आठवणारा धर्म त्या वेळी का आठवला नाही? राधासुता, कुठे गेला होता तुझा हा धर्म त्या वेळी? अर्जुना, वेध साध!” कृष्णदेवांनी तर्जनी कर्णाच्या कंठाच्या दिशेनं. अचूक रोखली.

अर्जुनाच्या धनुष्यातून निघालेला सुसाट अंजलिक बाण त्याच्या भरगच्च कंठावर असलेल्या लोहकवचाचाही भेद करून, त्याचा कंठनाल अर्धवट छेदून, कचकन रुतून बसला. तो महारथी रथचक्राजवळ चिखलात कोसळला.

कर्ण कोसळताच कृष्णदेवांनी युद्ध समाप्तीचा शंख फुंकला. रक्तमांसाच्या चिखलात पडलेला कर्ण आणि त्याचा दिव्य हिरण्यगर्भ शंख बघतच सूर्य मावळला. युद्ध थांबलं.

मी अंगीचा रणवेष तबकात उतरवीत असतानाच कृष्णदेवांचा सेवक आला. त्यांनी तातडीनं मला पाचारण केलं होतं. मी साध्या वेषातच त्यांच्या सेवेला सादर झालो. मी

कृष्णदेवांसमोर येताच ते मला म्हणाले, “सख्या सात्यकी, सांगाती चल. मी त्यांच्यामागून मुकाट चाललो. अंगदेशीच्या सहस्र सैनिकांनी कडं दिलेला कर्णाचा निष्प्राण देह कुरुक्षेत्राच्या धर्मभूमीवर जिथे पडला होता, तिथे आलो. जवळच कर्णाच्या जैत्ररथाचा त्याला सर्वांत प्रिय पांढराशुभ्र वायुजित अश्व आपल्या धन्याच्या देहाकडे बघत उभा होता. कृष्णदेवांनी संकेत करताच भोवतीचं सैनिकाचं कडं दूर हटलं. कृष्णदेवांनी मानेनं संकेत करताच मी पुढे झालो. आम्ही दोघांनी कर्णाचा निद्राधीन झाल्यासारखा दिसणारा उंचशील सुवर्णी देह वायुजिताच्या पाठीवर समतोल आडवा ठेवला.

कृष्णदेव मला म्हणाले, “दानवीर अंगराज कर्णाची अंतिमेच्छा होती की, मीच त्याला अखेरचा अग्निदाह द्यावा – एका कुमारी भूमीवर. या टेकडीवरच्या माथ्यावरील प्रशस्त कातळावर तो अग्निदाह मी देणार आहे – स्वहस्तांनी, एकटाच! मी येईपर्यंत तू इथेच थांब – पायथ्याशी.” त्यांनी सेवकांकरवी चंदनकाष्ठ टेकडीवर पाठविण्याची व्यवस्था केव्हाच केली होती.

मी पायथ्याशी थांबलो. कृष्णदेव एका हाती पलिता, दुसऱ्या हाती वायुजिताचे वेग घेऊन टेकडी चढू लागले. काही वेळानं टेकडीच्या माथ्यावर एक चंदनी चिता पेटलेली मला स्पष्ट दिसली. तिच्या रोखानं कुरूंच्या स्त्री-शिबिरातील एक श्वेतवस्त्रा स्त्रीही धावत गेल्याचं मी स्पष्ट पाहिलं. कोण असावी ती? मला काही कळालं नाही.

काही वेळानं कृष्णदेव एकटेच टेकडीच्या पायथ्याशी आले. त्यांच्या हाती पलिता नव्हता. ते काहीही बोलत नव्हते. त्यांच्यामागून मी तसाच चाललो. दोघेही त्यांच्या शिबिरात आलो. जवळ येऊन आपल्या हातात माझ्या हात घेऊन, जवळीकीच्या स्वरात ते म्हणाले, “सख्या सात्यकी, आज तूच सर्व सेनाप्रमुखांच्या शिबिरात जाऊन सर्वांना कल्पना दे की, युद्धासंबंधी कसलीही चर्चेची बैठक मी आज घेणार नाही. कर्णार्जुनांच्या घनघोर युद्धात दोन्हीकडची सेना जवळ-जवळ संपुष्टात आली आहे. या सर्वांचं मूळ असलेला एकटा दुर्योधन आता उरला आहे. त्याला मी उद्या बघून घेईन.” मी तिथंच थांबून कृष्णदेवांना अंगीचा सारथिवेष तबकात उतरवायला साहाय्य केलं. त्यांच्या मस्तकीचा मोरपीसधारी मुकुट तबकात ठेवताना, त्यांनी मला एक धक्का देणारं सत्य ऐकविलं. म्हणाले, “सात्यकी, गेल्या सतरा दिवसांत रक्ताचा एक थेंबही या मोरपिसावर उडणार नाही, याची मी काटेकोर दक्षता घेतली आहे. गोकुळात सखी राधेनं दिलेली ही प्रेमभेट, मी तेवढ्याच आदरानं सदैव जपली आहे.”

उद्यासाठी दुर्योधनानं मद्रराज शल्याला सेनापतीपदाचा अभिषेक केल्याची वार्ता प्रथम आली. पाठोपाठ कुरूंच्या राजस्त्रियांच्या गोटातून आलेला ‘मलय’ नावाचा कुशल गुप्तचरप्रमुख वासुदेवांसमोर उभा ठाकला. त्यानं एकदा माझ्याकडे नखशिखांत बघत कृष्णदेवांसमोर वार्ता देण्यासाठी तोंड उघडलं. म्हणाला, “कुरूंच्या स्त्रीमंडळातून अत्यंत महत्त्वाची वार्ता उचलली आहे. पण, ती एकट्या हृषिकेशांच्या कानी एकांती घालावी अशीच आहे. तेव्हा, तेव्हा – ”

सर्वांसारखेच मलयाजवळ जात आपला आजानुबाहू त्याच्याशी खांद्यावर ठेवत कृष्णदेव त्याला आपलासा करीत म्हणाले, “मलया, निःशंक सांग. सेनापती सात्यकी माझ्या उजवा हात आहे. सखा आहे.”

टेंभ्यांच्या मंद प्रकाशात धीराचं अवसान घेतं गुप्तचरप्रमुख मलय म्हणाला,

"कुरूंच्या महाराणी गांधारीदेवींनी दुर्योधनांना भेटीसाठी पाचारण केलं आहे. 'तातडीनं' भेटीस ये – तू माझ्या कुशीतून जन्मलास तसाच! आभाळासारखा नग्न!' कुरुश्रेष्ठ दुर्योधन तिकडे जाण्याच्या तयारीतच आहेत."

ती वार्ता ऐकताना मी चक्रावलो. दुर्योधन, दुःशासन आणि त्यांचे आता युद्धात मारले गेलेले बहुसंख्य बंधू यांच्याविषयी माझ्या मनी प्रेमाचा तिळमात्र नसला, तरी माता गांधारीदेवींविषयी माझ्या मनी अपार आदर होता. त्या साध्वीनं हा जगावेगळा निरोप आपल्या पुत्रासाठी का धाडावा? काऽही कळेना.

मला विचार करायला वेळही न देता कृष्णदेव मला म्हणाले, "सेनापती, चला. " आम्ही निघालो ते जिथून कुरुस्त्रियांची शिबिरं सुरू होत होती, त्या सीमेवर येऊन थांबलो. माझ्या हातात ढणढणता पलिता होता. काही वेळानं अंगी नेहमीचा राजवेष घातलेला दुर्योधन पाठीशी पलिताधारी सेवकसैनिक घेऊन समोरून येताना दिसला. तसं 'चल' म्हणत माझ्यासह अच्युत केशव पुढे झाले. दुर्योधनाला गाठून सहज बोलल्यासारखं म्हणाले, "कौरवा, असा घाईनं तू कुठे निघाला आहेस, ते मी जाणतो. तू या क्षणी का गोधळळा आहेस, तेही ओळखू शकतो. आता मात्र गांधारीदेवींनी तुला एकटच्यालाच आणि तेही तू जन्मलास तसा म्हणजे विवस्त्र आपल्या भेटीला बोलावलं आहे. त्यांचं बरोबरच आहे. त्या अद्यापही तुला अजाण बालकच मानतात. सर्वांनी केला, तसा युद्धबंदीचा हितोपदेश तुला करण्याचा त्यांचा विचार दिसतो. त्यांनी बोलावलंय म्हणून तू खरोखरच विवस्त्र त्यांच्या भेटीला जाणार आहेस की काय?"

आपले भोकरांसारखे घारे डोळे कृष्णदेवांवर एकटक रोखून दुर्योधन म्हणाला, "कृष्णकारस्थानी म्हणून तू विख्यात आहेस. तुझ्या हितोपदेशानं अर्जुनाशिवाय कुणाचंच भलं झालेल नाही. तुझ्या बोलण्यात काहीतरी गोम असावी, अशी मला शंका येते आणि पुत्र असून प्रत्यक्ष मातेला विवस्त्र भेटीला कसं जावं, या संभ्रमातही मी पडलो आहे. त्यातून बाहेर पडण्याचा काहीही मार्ग सुचत नसल्यामुळे मी माताजींच्या भेटीला जाण्याचं टाळण्याच्याच विचारात आहे."

"ती तर फार मोठी अवज्ञेची चूक होईल. अनादर होईल तो त्यांच्या आज्ञेचा. तू राजमातेच्या दर्शनाला आणि तेही एकटंच, त्यांना हवं तसं जाता येणं शक्य आहे. त्यांच्या मातृत्वाचा आदरही तुला राखता येणं शक्य आहे."

"कसं? कोणताही राजकारणी डावपेच न करता मला सरळ-सरळ सांग." दुर्योधनानं लगबगीनं विचारलं. तसं कृष्णदेव शांतपणे म्हणाले, "तू राजमातेच्या अंतःकक्षाच्या दारापर्यंत तुझा नेहमीचा हा वेष परिधान करून जावं. जाताना एक मोठं केळपान बरोबर न्यावं. कक्षात प्रवेशण्यापूर्वी केळपान कटीला लपेटन, इतर सर्व राजवस्त्रं उतरावीत. तू राजमातेच्या आज्ञेप्रमाणे विवस्त्रही होशील आणि तुझ्या मातृभक्तीचा आदर्श म्हणून पिढ्यापिढ्यांना स्मरणीयही ठरशील, कारण केळपान हे काही वस्त्र नव्हे!!"

दुर्योधनाचे घारे डोळे कसल्यातरी जीवघेण्या प्रसंगातून सुटकेच्या आनंदानं कसे लखलख चमकले. तो म्हणाला, "खरोखरच कुरूंच्या हस्तिनापूरच्या राजसभेत कणक आणि शकुनीमामांसारख्या अनेकांच्यापेक्षा तू एकटाच असतास, तर माझे सर्व मनोरथ केव्हाच तडीस गेले असते. तू सूचना दिलीस, तसाच मी राजमातेच्या दर्शनासाठी जाईन!"

तसाच तो राजमाता गांधारीदेवींच्या दर्शनासाठी गेला. आणि नंतर आम्हाला इत्थंभूत वार्ता कळली ती अशी की, राजमाता गांधारीदेवी पुत्राचं कठोर वाक्ताडन

करताना त्याला प्रथमच म्हणाल्या, “दुर्योधऽऽना, तू मूर्ख तर आहेसच, पण पराकोटीचा दुर्दैवीही आहेस. जन्मदात्या मातेच्या शब्दांपेक्षा तुला श्रीकृष्णाचा शब्द खरा वाटला. वेड्या तुला, समोर जन्मलास तसा पाहून मी दिला असता, तो दृष्टीच्या शक्तीपासून वज्रदेहाचा अखेरचा आशीर्वाद! आता तो आशीर्वाद तुला अर्धवट मिळाला आहे. तुझ्या जेवढ्या देहावर माझी तापस मातृदृष्टी पडली आहे, तेवढा तुझा देह वज्राचा झाला आहे. केळपानाआडचा देह मर्त्य-मानवी राहिला आहे. जा, पुत्र कितीही कुपुत्र निपजो, माता कधीही कुमाता होऊ शकत नाही. माझे तुला आशीर्वाद आहेत.”

आता युद्धाचा अठरावा दिवस कुरुक्षेत्राच्या शाश्वत क्षितिजावर उगवला. आजच कुठेतरी हिमालयात गेलेले बलरामदादा उद्धवदेवांसह कुरुक्षेत्रावर कृष्णदेवांच्या शिबिरात आले होते. कौरवांच्या पक्षात काही हजारांनीच लढाऊ सैनिक आता उरले होते. आमच्या पांडवांच्या सेनेत त्याहून कमी सैनिक होते. आता कसल्याही चक्रव्यूहाचा प्रश्नच नव्हता. कृष्णदेवांच्या तरल बुद्धीच्या चक्रव्यूहानं संख्या कमी असूनही, विजय पांडवांच्या दृष्टिपथात आणला होता. दुर्योधनानं उरल्यासुरल्या सैनिकांच्या साक्षीनं मद्रराज शल्याला सेनापतीपदाचा अभिषेक केला. त्याच्या विजिगीषु कौरवी राजमनाचा पीक एवढा बळकट होता की, अद्यापही त्याला यशाची खातरी वाटत होती!

आमच्या सेनेतून पांचजन्यामागोमाग धृष्टद्युम्नानं पांडवांचा सेनापती म्हणून आपला यज्ञदत्त नावाचा शंख फुंकला. शल्यानं आपल्या शंखफुंकीनं त्याला प्रत्युत्तर दिलं. एखादं दंडकारण्यासारखं घनदाट अरण्य चौफेर दग्ध करून, एका चावरभर शिल्लक उरलेल्या तुकड्याला रानवणवा भिडावा, तशी दोन्ही सैन्यं एकमेकांना भिडली. आज खरं युद्ध जुंपलं, ते कौंतेय युधिष्ठिर आणि कुरुसेनापती शल्य यांच्यात! दुसरीकडे पांचालयुवराज धृष्टद्युम्न आणि त्यानं निर्घृणपणे केलेल्या पिता द्रोणांच्या वधानं पेटून उठलेल्या अश्वत्थाम्यात ते जुंपलं. त्यात कोणीही हटत नव्हतं. दोन प्रहरपर्यंत युधिष्ठिरनं अटीतटीनं लढून प्रत्यक्ष मामा असलेल्या मद्रराज शल्याचा वध केला. युद्धभूमीच्या दक्षिणेला रक्तमांसाच्या कर्दमात उरलेसुरले एक- दोन बंधू घेऊन गांधारनरेश शकुनी, माद्रेय सहदेवाशी लढत होता. दुर्योधनाच्या प्रत्येक कुटिल डावपेचामागे शकुनीची गांधारदेशीय उंटासारखी चालणारी कुटिल, निर्दय आणि निर्मम बुद्धीच होती. सहदेव त्याला आज निपटल्याशिवाय राहणार नव्हता. तसंच झालं. तूणीराचा वाद आवळलेल्या शकुनीच्या वक्षावर फुली मारणारे खड्गाचे दोन प्राणछेदक वार सहदेवानं उतरविले. तशी रक्ताची कारंजी उसळली. पायीच्या कर्दमात, कौरव-पांडवांच्या लक्षावधींच्या जीवनाचं कर्दम करणारा गांधारी नराधम कोसळला. एका कूटपर्वाचा अंत झाला.

कौरवांचा सेनापती शल्य आणि कुटिल बोलून त्याच्या महत्त्वाकांक्षेचा अंगार सतत फुलविणारा शकुनीमामा पडताच, भेदरलेला दुर्योधन युद्धातून रथासह अदृश्य झाला. आजवर पावन म्हणून लाखो योद्ध्यांनी स्नान केलेल्या सन्नेथ ऊर्फ सूर्यकुंड या सरोवरात जाऊन तो लपून बसला!!

‘दुर्योधनाची सूतगृहात सर्वांसमक्ष द्रौपदीला दाखविलेली मांडी चिणून टाकीन’, अशी घोर प्रतिज्ञा घेतलेला गदावीर भीम ‘दुर्योधन दाखवा – दुर्योधन दाखवा’ म्हणत उरल्या-सुरल्या दोन्ही सेनेत गदा नाचवत, ओरडत फिरला.

दुर्योधन दृष्टीस पडत नाही, म्हणून भीम हताश होऊन कृष्णदेवांच्या नंदिघोष रथाजवळ आला. आग ओकणाऱ्या संतप्त डोळ्यांनी त्वेषानं कडाडला," हृषिकेशा, या सगळ्या विनाशाचं मूळच मला उखडून काढायचं आहे. कुरूंच्या त्या काळसर्पाला, त्या नीच दुर्योधनाला मला सर्वांसमक्ष वधायचं आहे. तो समरांगणातून पळाला आहे. त्याला कुठे शोधू?"

आज पहिल्यानं अर्जुनाला मागोमाग येण्याचा संकेत देऊन, कृष्णदेव नंदिघोषावरून उतरले. झपाझप चालत त्यांनी भीमसेनाचा रथ गाठला. अर्जुनाला स्वत: सारथ्य करून नंदिघोष मागून घेण्याचा संकेत केला. भीमसारथी विशोकाला रथाच्या मागील घेरात बसवून, त्याच्या जागी ते स्वत: बसले. त्यांनी प्रथम युधिष्ठिराचा रथ गाठला. त्याला पाठीशी घेतं भीमसेनाचा रथ सन्नेथ सरोवराकाठी आणला. सरोवराच्या मध्यभागी मधेच पाण्याबाहेर येणारा आणि बराच काळ प्राणायामाच्या बळावर पाण्याखाली लपणारा दुर्योधन, युधिष्ठिरानं कितीही हाका घातल्या, तरी बाहेर पडायला काही तयार होईना. शेवटी तो पाण्यात डुंबला आहे ही संधी साधून, कृष्णदेवांनी युधिष्ठिराला कानमंत्र दिला. आता दुर्योधनाला पाण्याबाहेर आणण्यासाठी युधिष्ठिर मोठ्यान गरजला, "दुर्योधना! पाण्याबाहेर ये आणि तुला वाटेल त्या आम्हा पाच बंधूपैकी कुणाशीही द्वंद्व खेळ. तू तसं केलं नाहीस, तर या सरोवरात हंड्याहंड्यांनी आमच्या सर्व सैनिकांना ब्रह्म आणि ज्योती सरोवरातील पाणी कुसुंब्याचं विष मिश्रित करून ओतावं लागेल. तुला तर बाहेर पडावंच लागेल, पण सरोवरातील निष्पाप जलचर नाहक मरतील."

या कृष्णदेवसूचित जलमात्रेचा मात्र त्या निर्दय कुरूवर परिणाम झाला. "मला द्वंद्व खेळण्याची तू नक्की संधी देशील काय?" असा युधिष्ठिराला पुन्हा प्रश्न विचारून त्यानं होकाराची मान डोलावताच, सूर्यकुंडातील दुर्योधनानं सरोवसकाठच्या गुरुदेव बलरामदादांकडे अपेक्षेनं पाहिलं. बलरामदादांना दुर्योधनाच्या गदानैपुण्यावर पूर्ण विश्वास होता. त्यांनीही होकाराची मान डोलविताच, दुर्योधन पोहत सूर्यकुंडातून बाहेर आला. सेवकानं सादर केलेल्या तबकातील गदायुद्धाचा वेष त्यानं परिधान केला. आपले नव्याण्णव बंधू यमसदनाला पाठविणाऱ्या भीमसेनांना बघून अनावर क्रोधानं त्यांनाच गदेच्या द्वंद्वयुद्धासाठी आव्हान देऊन ललकारताना म्हणाला, "माझ्या सहोदर नव्याण्णव बंधुंना वधणाऱ्या या खादाड, नीच पांडुपुत्राचं वक्ष फोडल्याशिवाय, माझ्या बंधूना तर्पणाचं जल मिळणार नाही. याच्या भग्न वक्षातील उष्ण-उष्ण रक्त मैरेचक मद्यासारखं प्यायल्याशिवाय, माझ्या अतीव प्रिय बंधू दु:शासनाच्या आत्म्याला शांतता लाभणार नाही. तुम्हा सर्वांसमक्ष या खादाड, वृकोदर भीमाला, मी कुरूंचा युवराज दुर्योधन निर्णायक गदेच्या द्वंद्वयुद्धाचं आव्हान देत आहे."

आजवर असंख्यात क्षत्रियपुत्रांनी सूर्यग्रहणाच्या दिवशी स्नान करून पवित्र मानलेल्या त्या सूर्यसरोवराच्या काठीच त्या दोन मत्त, चांद्रवंशीय राजपुत्रांचं भयानक, रोमांचक गदाद्वंद्व पेटलं.

"शकुनीच्या ओंजळीनं पाणी पिणाऱ्या भ्याडा, ज्येष्ठ कुरूंच्या साक्षीनं द्यूतगृहात माझ्या प्रिय पत्नीला विवस्त्र करण्याची निर्लज्ज आज्ञा देणाऱ्या मुर्दाडा, तिला भर सभेत उघडी मांड दाखवणाऱ्या असंस्कृत नीचा, या पांडुपुत्र भीमसेनानं तुझं आव्हान स्वीकारलं आहे."

कृष्णदेव, बलरामदादा, उद्धवदेव, मी, सर्व पांडव, कृपाचार्य, कृतवर्मा, धृष्टद्युम्न

अश्वत्थामा, सर्वच दोन्ही सेनेतील योद्धे मंडल धरून अंगावर शहारे आणणाऱ्या त्या गदायुद्धाचे साक्षी झालो.

दोघांच्या प्रचंड गदा एकमेकींवर आदळताच प्रचंड ठणठणाट उठू लागला. तो ऐकून सांजावल्यामुळे घरट्यांकडे परतू बघणारे पक्षी, भेदक चीत्कारत पुन्हा अरण्याकडे वळू लागले. दोघांच्याही वज्रप्रहारांमुळे गदांच्या गोल घेरातून टक्करताना ठिणग्या वर्षू लागल्या. प्रहरभर त्यांचं बघणाऱ्यांच्या काळजाचं पाणी-पाणी करणारं भीतिदायक, भयाण गदायुद्ध माजलं. त्यांच्या चपळ हालचालींनी पायाखालचं दर्भाचं कुरण उद्ध्वस्त झालं. दोघांच्याही पीळदार, भव्य देहांतून घाममिश्रित रक्ताचे ओघळ लागले. दोघांचीही शिरस्त्राणं एकमेकांचे प्रहार चुकविताना मस्तकावरून उडून केव्हाच धुळीत पडली. यांचे विमुक्त, दाट, कुरळे केश स्कंधावर रुळू लागले. आमचा भीमसेन संधी मिळेल तेव्हा आणि तसा दुर्योधनाच्या कधी भरगच्च वक्षावर, कधी पीळदार दंडावर, तर कधी विशाल पाठीवर दातओठ खात गदाप्रहार उतरवीत होता. पांडवांचे वीर योद्धे त्याला चेतना देण्यासाठी ‘भले रे गदावीरा! साधु-साधु महाबली!’ म्हणून चीत्कारत होते.

दुर्योधनावर मात्र त्या प्रहारांचा काहीही परिणाम होत नव्हता, होणारही नव्हता. तो विकराल हसत भीमसेनाला डिवचताना अधिकच त्वेषानं कडाडत होता – “हत्तींची गंडस्थळं फोडणारं तुझ्या लोहदंडातलं सामर्थ्य आता कुठे गेलं? दिवस-रात्र नुसतं भक्षण करणाऱ्या खादाडा, कुठे गेली तुझी सहस्र गजांची शक्ती?”

भीमसेन गोंधळून मस्तकावरचा घाम तर्जनीनं निपटण्याच्या निमित्तानं सारखा कृष्णदेवांकडे बघत होता. कृष्णदेव त्याला आपली मांडी थोपटून कसलातरी संकेत केव्हापासून देत होते! काही केल्या तो भीमसेनाच्या ध्यानी काही येत नव्हता.

गांधारीमातांनी आपल्या पतिव्रतेच्या तपःसाधनेनं, शक्तिपातानं पुत्र दुर्योधनाचा देह वज्राचा केला होता. भीमसेनाला ते काहीही माहीत नव्हतं. गुरुदेव बलरामांच्या आशीर्वादानं, कृष्णदेवांच्या कृपाशीर्वादानं आपण दुर्योधनाचं वक्ष भेदू, या वेड्या भ्रमानं भाबडा भीमसेन गदायुद्ध निकरानं खेळत होता. ठिकठिकाणी दुर्योधनाचे गदाप्रहार वरच्या वर झेलून क्षणाक्षणाला अधिकाधिक रक्तबंबाळ होत होता. कृष्णदेव एकसारखी मांडी का थोपटताहेत, त्याला कळत नव्हतं. हे असंच चाललं, तर संध्याकाळपर्यंत दुर्योधन भीमसेनाला वधल्याशिवाय राहणार नाही, या भयंकेनं सर्वच पांडव आता चिडिचूप झाले होते.

आता मात्र दुर्योधनानं कुरूंच्या द्यूतगृहात द्रौपदीला आपलं अधरीय वर खेचून, स्पष्ट उघडी मांड थोपटून दाखविली होती, तसंच करणं भाग होतं. कधी नव्हे ते कृष्णदेवांनी आपली पीळदार, निळसर तांबूस वर्णाची मांड पीतांबर दूर सारत पहिल्यानंच उघडी केली. हाताची मूठ घट्ट आवळून तिचा आपल्या मांडीवर एक सांकेतिक प्रहार केला. आत्ता कुठे भीमसेनाला कृष्णदेवांच्या मनी काय आहे, त्याचा नेमका बोध झाला. दुसऱ्याच क्षणी धिप्पाड भीमसेनानं आपल्या प्रचंड गदेचा वज्रप्रहार दातओठ खात दुर्योधनाच्या पुष्ट मांडीवर उतरविला. ‘मातेऽ गांधारीऽ!’ असं केवढ्यानंतरी कळवळत उजवी मांड चुणलेला दुर्योधन, गदा कुरुक्षेत्राच्या अवकाशात दूर फेकत कोसळला. तसं भानरहित झालेल्या भीमसेनानं तसलाच एक वज्रप्रहार दुर्योधनाच्या डाव्या मांडीवरही उतरविला. रक्ताची चिळकांडी उडाली. त्या मांडीचंही चूर्ण झालं. कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर दोन्ही मांड्या पाऽर चुणलेला दुर्योधन पालथा पडला. दोन्ही गदावीरांचे गुरू

असलेले बलभद्रदादा ते बघताच संतापानं थरथरत गदा सावरत भीमसेनावर धावले. म्हणाले, “कटीखाली प्रहार करून गदायुद्धाचा नियमभंग करणाऱ्या मूर्ख शिष्या, तुला वधूनच मला माझ्या प्रिय शिष्याला तर्पण द्यावं लागणार. जै इडादेवीऽ!” त्यांना कृष्णदेवांनी, “कुलस्त्रीला भर द्यूतसभेत उघडी मांड दाखविणाऱ्या या गदावीराची मांड चिणायची नाही, तर काय कुलस्त्री द्रौपदीला पुन्हा त्याच्या मांडीवर आणून बसवायची? दादा, या क्षणी तुमच्या जागी मी असतो, तर माझ्या खांद्यावरची कौमोदकी गदाही मी शिष्यवर वीर भीमसेनाला गौरव म्हणून दिली असती.” म्हणत दोन्ही हात आडवे पसरून आवरलं.

“या सगळ्याचं मूळ तूच आहेस, धाकट्या! भीमाच्या अगोदर तुलाच शिक्षा द्यायला पाहिजे. पण काय करणार? आम्ही पडलो ज्येष्ठ!” बलरामदादा असाहाय्यपणे चडफडले. आपल्या विद्ध, पालथ्या शिष्याकडे धावले.

जसे ते धावले होते, तसे आणि त्याच कारणासाठी, ‘नियमभंग – नियमभंग’ म्हणत कृतवर्मा, कृप आणि अश्वत्थामाही भीमसेनावर धावले होते. मी आणि अर्जुनासह उरल्या तीन पांडवांनी मध्ये शस्त्रं घालून त्यांना निकरानं थोपविलं होतं. तसं इतर चारही पांडवांपैकी अर्जुनाला कृष्णदेव म्हणाले, “चल, तुला अहंकाराचा महावृक्ष दाखवितो.” चारही पांडव त्यांच्या पाठीशी झाले. उजव्या हाताशी उद्धवदेव, डाव्या हाताशी मी, असे सर्व पालथ्या दुर्योधनाजवळ गेलो.

कृष्णदेवांनी ओणवं होत वाकूनच त्या अहंमन्य ज्येष्ठ कौरवाला निर्वाणीचं विचारलं, “दुर्योधनाऽ! अरे, आता तरी तुला तुझ्या केलेल्या कृतकृत्यांचा लवभर तरी पश्चाताप होतो आहे काय? असेल, तर सांग – अहं त्वम् सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि – मी तुला सर्व पापांपासून अजूनही मुक्त करीन.”

तसं मांडच्या चुणल्यामुळे पालथा पडलेल्या त्या अहंमन्य कौरवानं आपला कटीवरचा वक्षाचा भाग नागफण्यासारखा केवळ कोपरांवर उचलला. मान तिरकी करून कृष्णदेवांकडे अत्यंत तिरस्कारानं बघत, अगोदरच वक्र आणि जाड असलेल्या भुवया अधिक वक्र करीत, तो स्पष्ट शब्दांत म्हणाला, “अरे जा! क्षत्रियाला हे असं समरांगणातील मरण केवढं गौरवाचं असतं, हे गायीच्या मलमुत्रानं पाय बरबटलेल्या तुझ्यासारख्या यःकश्चित गवळटाला काय कळणार!!”

ते ऐकताना आम्ही सर्वच थरारून गेलो.

आपल्या वंदनीय गुरुदेव बलरामांकडे बघत तो म्हणाला, “गुरुदेव, आपणाला हे अखेरचं वंदन. तुमच्या या सर्वार्थानं छोट्या असलेल्या बंधूला – या गवळट श्रीकृष्णाला द्वंद्वाचे नियम काय असतात, ते एकदा समजावून सांगा.”

एव्हाना खाली वीरासनात बसून, त्याचा हात आपल्या हाती घेतलेले बलरामदादा ताडकन उठले. कृष्णदेवांना म्हणाले, “भीमसेनानं कटीखाली मांडीवर वार करून, गदेच्या द्वंद्वयुद्धाचा नियमभंग केला आहे.”

“दादा, बालपणीच जलतरणाच्या नावाखाली भीमसेनाला मिष्टान्नातून विष घालून, त्याला गंगेच्या पाण्यात फेकणाऱ्या या तुमच्या परमशिष्यानं कुठला बंधुधर्म पाळला होता? कुरूंच्या द्यूतसभागृहात त्यानं सर्व ज्येष्टांसमक्ष भावजय असलेल्या कुलस्त्री द्रौपदीला विवस्त्र करण्याची निर्लज्ज आज्ञा केली. तेव्हा कोणता राजधर्म युवराजपदाचा अधिकार सांगणाऱ्या तुमच्या या शिष्यानं पाळला होता? पांडवांना

शकुनीद्वारा पुन्हा द्यूत खेळण्याची विवेकशून्य मागणी दूरदृष्टीचा अभाव असलेल्या या तुमच्या पट्टशिष्यानं केली नव्हती काय? आमच्या प्रिय अभिमन्यूला सहा वीरांनी एकाच वेळी घेरण्याचं धैर्य, कुणाच्या पाठबळावर त्यांनी केलं होतं? दादा, नशीब समजा या वीर कुंतीपुत्र भीमसेनानं, वनराजानं मत्त रानवराहाचं रक्त प्राशावं तसं दुर्योधनाच्याही फोडलेल्या मांडीचं रक्त अद्याप प्राशलेलं नाही!" दुर्योधनाच्या येऊ घातलेल्या अंतामुळे आनंदित झालेले हृषिकेश शांतपणे बलभद्रांना म्हणाले.

"काही झालं तरी धाकल्या, हा युद्धनियमभंगच आहे. तोही माझ्यासमक्ष झाला आहे. कटीच्या खाली वार करू नये, असं युद्धशास्त्र असताना भीमानं तुझ्यामुळेच त्याचा भंग केला आहे. मला त्याचं आणि तुझंही तोंड बघण्याची मुळीच इच्छा नाही. तू बैस युद्ध खेळत! मी चाललो द्वारकेला!" असं स्वभावाप्रमाणे फेकून देणारं कठोर वक्तव्य कृष्णदेवांना ऐकवीत, कुरुक्षेत्रावर अचानक आले होते, तसेच बलरामदादा तडक निघूनही गेले.

सूर्य डूबला. आम्ही सर्व शिबिरांकडे परतलो. रात्रीच्या बैठकीत कृष्णदेव धृष्टद्युम्नाशी 'दुर्योधनाच्या अंताबरोबर युद्ध संपलं आहे. उरलेल्या योद्ध्यांनी उद्या शिबिरं मोडून कुरुक्षेत्र सोडायचं आहे.' अशी चर्चा करत असतानाच, त्याच मलय नावाच्या गुप्तचरप्रमुखानं आणलेली वार्ता कृष्णदेवांसमोर ठेवली.

दुर्योधनाच्या मरणापूर्वी त्याला भेटायला आलेल्या कृपाचार्यांना दुर्योधनानं कळवळून विनंती केली होती – अश्वत्थाम्याला कुरूंच्या शेवटच्या सेनापतीपदाचा अभिषेक करण्याची! त्याच्या दोन्ही मांड्या चुणल्या होत्या, तरीही त्याचं अशरण, संतप्त राजमन चुणलेलं नव्हतं – ते अद्यापही पराजय मानायला तयार नव्हतं. अद्याप ते प्रतिशोधाच्या दिवास्वप्नातच होतं!

कृपाचार्यांच्या हस्ते सेनापतीपदाचा अभिषेक झालेल्या अवत्थाम्याच्या मस्तकी दुर्योधनानं पडूनच स्वहस्ते सेनापतीपदाचा मुकुट चढविला. त्याचा आपल्यावरील विश्वास बघून द्रोणपुत्र अश्वत्थामाही गहिवरला. त्याला उद्देशून आसत्रमरण दुर्योधन त्याच्या डोळ्यांत डोळे रुपवीत म्हणाला, "गुरुपुत्र, कुरुसेनानी अश्वत्थाम्या, तू आमचा शेवटचा वीर सेनापती आहेस. कृष्णाकडे सुदर्शन असलं, तरीही बरेच दिवस त्यानं त्याचं उपयोजन न केल्यामुळे, तो त्या दिव्यास्त्राचे मंत्र विसरून गेला आहे. तसं नसतं, तर गेल्या अनेक वर्षांत असे अनेक प्रसंग आले की, त्यानं सुदर्शनच वापरायला पाहिजे होतं, त्याची स्थिती कवचकुंडलं दान केलेल्या शापदग्ध कर्णाची होती, आज माझी आहे तशीच, म्हणजे तीक्ष्ण नखं छाटलेल्या वनराजासारखीच आहे. तुझ्याकडे आमचे आचार्य, तुझे पिता गुरू द्रोणांनी दिलेलं दिव्य ब्रह्मास्त्र आहे. आमच्या विजयाचा तूच अंतिम उद्गाता ठरणार आहेस! माझी शेवटचा कुरू म्हणून तुला सूचना व मित्र म्हणून विनंती आहे की, पांडवांचा समूळ नाश कर!"

"कौरवा, तू इच्छा व्यक्त केलीस, तसंच होईल! पांडवांचा मी समूळ वंशच्छेद करीन!" विद्ध दुर्योधनाचा आपल्या हातातील हात त्याला आश्वासक आधार देत गुरुपुत्रानं किंचित दाबला.

"जै गांधारीऽऽ" 'माता' म्हणण्यापूर्वीच पीळदार दुर्योधनानं सूर्यसरोवराकाठी अश्वत्थाम्याच्या हातात हात ठेवूनच प्राण सोडला होता.

कुरुक्षेत्रावर भयाण रात्र उतरली. त्या चाळीस योजन रणक्षेत्राचा पश्चिमेचा केवळ

अर्ध्या योजनाचा एक तुकडा अद्याप कसातरी कोरडा राहिला होता. इतर सर्व रणभूमी दोन्ही सेनांकडील चाळीस लक्षांवर योद्धे, लक्षावधी गज, अश्व, उष्ट्र यांच्या रक्तानं लांच्छित झाली होती. त्या विशाल रणभूमीला घेरून रोज कित्येक चितांच्या रांगाच रांगा धडधडल्या होत्या. रणक्षेत्रावरील दृषद्वती, शरावती, सरस्वती या नद्या ब्रह्म, सूर्य, ज्योती अशी सरोवरं गतयोद्धयांच्या केलेल्या रक्षाविसर्जनामुळे काळीठिक्कर पडली होती. संपूर्ण रणक्षेत्रावर उद्ध्वस्त रथांची चक्रं, खंडित खड्गं, भग्न गदा, शूल, तोमर अशा शस्त्रांचे खंडित भाग, मानवी देहांचे जागोजागी पडलेले अवयव, हत्तींच्या तुटलेल्या सोंडा, घोड्यांच्या खंडित शेपट्या यांचा सडा पडला होता. पाणवठ्यांकाठी अद्याप काही चिता जळतच होत्या. संपूर्ण कुरुक्षेत्र गृध, तरस, कोल्हे, लांडगे, रानकुत्री, व्याघ्र यांच्या चित्रविचित्र आवाजांनी कोंदून गेले होते. उरल्यासुरल्या वृक्षांच्या ढोलीत घुबडांचे भयाण घुत्कार घुमत होते. रात्री पेटलेले टेंभे त्यांच्यावर करंजेल सोडायला सैनिक नसल्यामुळे मंदावले होते. काही पूर्ण विझल्यामुळे त्यांचा कडवट धूर सर्वत्र कोंदटला होता. कुरुक्षेत्र धर्मक्षेत्र राहिलं नव्हतं. त्याचं झालं होतं, विराट स्मशानक्षेत्र!

माझ्या शिबिरात उरल्यासुरल्या चार-पाच यादव सैनिकांसह मी आस्तरणावर पडलो होतो. एकसारखी कूस पालटत होतो. गेल्या अठरा दिवसांतील घनघोर युद्धाची क्षणचित्रं माझ्या डोळ्यांसमोर थयथय नाचत होती. काही केल्या आज मला निद्रा काही वश होत नव्हती. कशी होणार? आवतीभोवती हिंस्त्र श्वापदांचा गुरगुराट, चित्रविचित्र आवाजांचा कलकलाट माजला होता.

मध्यरात्र झाली असावी. कुठूनतरी एका स्त्रीचा माझ्या हृदयाचा थरकाप उडविणारा हंबरडा ऐकू आला. मी कान टवकारले. जागेच असलेले डोळे विस्फारले. कानांवर सूची बाणाच्या अग्रासारखे तीक्ष्ण बोल पडत होते – “अच्युताऽ? माधवाऽ, मिलिंदाऽ मधुसूऽदनाऽऽ घात झाला रे, घात झाला. नीचानं माझे सगळे अंकुर, ते निद्रेत असतानाच कापून की रे काढले! भूतमात्र झोपलेले असताना मी जागा असतो म्हणणाऱ्या हृषिकेशा, आजच कसा रे झोपलास? ऊठ, कृष्णाऽ ऊठ!”

मी आस्तरणावर ताडकन उठून बसलो. हंबरडा फोडणारी स्त्री दुसरी-तिसरी कुणी नव्हती. त्या पांडवपत्नी साक्षात द्रौपदीदेवीच होत्या! शिबिरातला एक भकभकता टेंभा उपसून, मी त्या आवाजाच्या रोखानं धावत सुटलो. माझ्यामागून माहे यादवसैनिकही धावले. काय झालंय काहीच कळत नव्हतं. धावत जाताना, आलेला आक्रोश कृष्णदेवांच्या शिबिराच्या रोखानं येत असलेला जाणवला. मीही त्या रोखानं धावतच निघालो. कृष्णदेवांच्या शिबिरात आलो. त्यांचा मोरपीसधारी मुकुट तबकात तसाच होता. त्यांच्या उजव्या हाताशी आता अंगी भगवी वस्त्रं धारण केलेले उद्धवदेव होते. दोघेही वक्ष पिटून आक्रोशत हंबरडा फोडणाऱ्या द्रौपदीदेवीचं ‘काय झालं कृष्णेऽ? काय झालं पांचाली?’ म्हणत सांत्वन करू बघत होते.

अनावर वेदनेनं दोन्ही हातांनी वक्ष पिटताना, त्या कुलस्त्रीला धड बोलताही येत नव्हतं. ती एकसारखा नुसताच हंबरडा फोडत होती – ‘माझा प्रतिविंध्यऽ, माझ्या श्रुतकीर्तीऽऽ, माझ्या सुतसोमऽऽ, माझ्या शतानिऽक, माझ्या श्रुतसेऽन!’ आम्हाला एवढंच कळत होतं की, त्या पाचही पांडवपुत्रांचं आक्रोशून स्मरण करीत होत्या. का? कशासाठी? काही कळत नव्हतं. त्यांचा आक्रोश थांबत नव्हता. आमचा संभ्रम मिटत

नव्हता. कृष्णदेवांनी पुढे होत त्यांच्याजवळ बसून भीमसेनानं सावरलेल्या त्यांच्या केशांवर मायेनं थोपटून त्याहून मायेनं विचारलं, “सखे श्यामलेऽ, काय झालं? शांत हो, सावर. नीट सावर, तुझ्या पुत्रांना काय झालं?”

तसं हमसत-हमसतच अविरत अश्रुधारा लागलेल्या द्रौपदीदेवी म्हणाल्या, “माझ्या पाचही पुत्रांचा ते निद्रिस्त असताना – नीचानं खड्गानं वध केला आहे. माझ्या बंधूंचा – धृष्टदादाचाही घात त्यानं केला आहे!!”

एव्हाना कृष्णदेवांच्या शिबिरात आलेल्या पाचही पांडवांनी आपल्या पत्नीभोवती मंडल धरलं होतं. भीमसेन आपल्या पत्नीच्या पाठीवर आपला बळकट हात फिरवत पुनःपुन्हा म्हणत होता, “द्रौपदीऽ शांत हो, नीट सांग, कुणी केलं हे पापकृत्य?” भडभडून आलेल्या द्रौपदीदेवी भीमसेनाकडे केवढ्यातरी आशेनं बघत कळवळून म्हणाल्या, “तुम्ही एकाहून एक सामर्थ्यवान पाच पती असूनही मी विधवाच आहे. काय करायचाय, जाळायचा आहे तुमचा विक्रम? भर द्यूतसभेत त्यांनी माझ्या वस्त्राला हात घातला, मी स्वस्थ बसले. इंद्रप्रस्थाच्या सिंहासनावर बसावं, ते त्यांनी मला अनवाणी वनवासात धाडलं, तेही मी मुकाट भोगलं. आज माझ्या, एका मातेच्या कुशीतून तिला प्राणप्रिय असलेले तुमचेच अंकुर त्यानं, त्या निर्दय वधिकानं कापून काढले, तरीही मला शांत हो म्हणता?”

द्रौपदीदेवींना गदगद हलवून शेवटी कठोर शब्दांत भीमसेन उद्गारला, “कुणी केलं हे पापकृत्य? त्याचं नाव सांग.” श्रीकृष्णदेवांनीही त्यांचं मस्तक थोपटत तसंच विचारलं, “नाव सांग द्रौपदी!”

तसं उरातील कढ निकरानं आवरत, हमसूनच ती कुलस्त्री एकेक शब्द स्फुंदत म्हणाली, “तुमच्या – तुमच्या गुरू – गुरू द्रोणांच्या पुत्रानं – त्या – त्या पापी अ-श्व-त्था-म्या-नं...!”

“क्काऽय?” पाचही पांडव अंगभर शहारून एकदमच उद्गारले. भीमसेन तर आपल्या पुत्रांच्या वधिकाचं नाव ऐकताच आपली प्रचंड गदा पुष्ट खांद्यावर सावरत शिबिराबाहेर पडलाही! तत्पर चपळाईनं कृष्णदेवांनी त्याला गाठलं. मी आणि उद्धवदेव खेचल्यासारखे त्यांच्या पाठोपाठ धावलो.

प्रथमपासूनच पांडवांचा सेनापती असलेल्या धृष्टद्युम्नाच्या शिबिरात भीमसेन आला. त्याला कुणाचीही मती बधिर व्हावी, असं दृश्य दिसलं. पांडवसेनापती धृष्टद्युम्नाचं निद्रेतच मस्तक छाटलेलं धड, रक्ताच्या थारोळ्यात कसंतरीच पडलं होतं. त्याच्या दुहाती झोपलेल्या पाचही पांडवपुत्रांची – त्याच्या प्रिय भाचरांची प्रेतं रक्ताच्या थारोळ्यात अस्ताव्यस्त कशीतरीच पडली होती. बहुतेकांच्या वक्षावर खड्गाचे हातभर लांब क्रूर प्रहार दिसत होते. आपल्या मामाच्या वक्षावर हात ठेवून निर्घोर पालथं झोपलेल्या एकट्या प्रतिविंध्याच्या पाठीवर लांबचलांब प्रहार केलेला स्पष्ट दिसत होता. बहुतेक सर्व पांडवपुत्र झोपलेल्या स्थितीतच गतप्राण झाले होते. सगळीकडे साकळलेल्या रक्ताची तांबसर काळपट थारोळी पसरली होती. एवढा पर्वतवक्षी भीमसेन – पण तोही पुत्रांचं आणि सेनापतीचं ते रूप बघताना आपलं मुख ओंजळीनं झाकून घेतं क्षणैक खालीच बसला. दुसऱ्याच क्षणी उठून ‘अरे कुणीतरी मला तो निर्दय वधिक अश्वत्थामा नुसता दाखवा – अश्वत्थामा दाखवाऽ’ असं कंठधमन्या फुगवत, ओरडत त्याला शोधत पहाटेच्या धूसर प्रकाशातच रणक्षेत्राच्या पश्चिमेकडे

निघाला. पायांखाली हत्तीच्या सोंडा, गतयोद्धयांची मस्तकं, त्यांचे अवयव, घोडयांच्या शेपटया येताहेत, याचं कशाचंही भान त्याला उरलं नाही. जवळ-जवळ पहाटेच्या संधिप्रकाशात तो प्रहरभर 'अश्वत्थामा दाखवाऽ अश्वत्थामा दाखवाऽ' गर्जत गुंजलाल डोळ्यांनी रणक्षेत्रभर सर्वत्र भिरभिरला. त्याच्यामागून आम्ही फरफटलो. अश्वत्थामा काही सापडत नव्हता. श्रांत-क्लांत झालेला भीमसेन रणक्षेत्राच्या पश्चिमेकडील एका तमाल वृक्षाच्या बुंध्याजवळ एका पाषाणखंडावर शेवटी हताश बसला. आम्ही त्याला गाठलं. तो रडकुंडीलाच आलेला बघून कृष्णदेव त्याला म्हणाले, "वायुपुत्रा, शांत हो! तुझा क्रोध मी समजू शकतो. अद्याप अश्वत्थाम्याचा समय आलेला नाही. तो कधी येईल, सांगता येत नाही!"

पौष शुद्ध पंचमीचा सूर्य कुरुक्षेत्रावर उगवला. भीमसेनाला सावरून शिबिराकडे आणणाऱ्या कृष्णदेवांना दूरवर डोंगर उतरंडीला एका फुललेल्या पलाशवृक्षाच्या छायेत पाषाणखंडावर बसलेली मनुष्याकृती दिसली. तसं ते भीमसेनाला म्हणाले, "पांडवा, एरवी फुललेल्या पलाशवृक्षासारखा रणक्षेत्रावर दिसणारा तू असा सागवृक्षासारखा हिरवट, काळपट का झालास? समोर बघ, तो पलाश कसा फुलला आहे."

डबडबलेल्या विशाल डोळ्यांनी वस्त्रातूनच बघावं, तसं भीमसेनानं समोर पाहिलं. लाल फुलांनी डवरलेल्या पलाशावरून त्याची दृष्टी पाषाणखंडावर गेली. अश्वत्थाम्याला दुरूनच त्यानं ओळखलं. तसं केवढयातरी मोठयानं तो कडाडला, "निद्रिस्त पांडवपुत्रांना वधणाऱ्या वधिक नीचाऽ अश्वत्थाम्याऽऽ तुला पित्याची शपथ आहे. तिथेच थांब. सामर्थ्य असेल, तर या भीमसेनाच्याही वक्षावर तुझं खड्ग चालवून दाखव."

दहा-दहा हातांच्या उडया घेतच हां-हां म्हणता भीमसेनानं त्याला गाठलं. अश्वत्थाम्याच्या अंगावरची रक्तलांच्छित वस्त्रं, ते रक्त सुकल्यामुळे तडाडली होती. डोळ्यांत मात्र युद्धाचा अशरण त्वेष होता. रणक्षेत्राच्या कोरडया राहिलेल्या शेवटच्या पश्चिम भागात, त्या दोघांचं गदाद्वंद्व पेटलं. आम्ही सगळे ते बघत मंडलाकृती उभे राहिलो. सूर्यदेव चांगले दोन हात आकाशमंडल चढून आले, तरी त्यांचं प्रथम गदेचं नंतर अनेक शस्त्रांचं द्वंद्व काही आवरेना! आता सूर्य थेट मस्तकावर आला. भीमसेनानं हातातलं खड्ग दूर फेकून, आपले लोहदंड थोपटून अश्वत्थाम्याला निर्वाणीच्या मल्लद्वंद्वाचं आव्हान दिलं. जरासंधासह अनेक मल्लांना धूळ चारणाऱ्या अजिंक्य भीमसेनाची मल्लयुद्धातील कीर्ती माहीत असूनही, अश्वत्थाम्यानं त्याचं आव्हान स्वीकारलं. त्यानंही दंड थोपटले. भीमसेनाला ललकारलं. तसं द्वारकाधीश श्रीकृष्णदेव आता दोघांच्याही मध्ये उभे ठाकले. म्हणाले, "भीमसेना, तुझ्या या आव्हानाची काहीच तड लागणार नाही. जरासंधाशी तू सत्तावीस दिवस मल्लयुद्ध लढलास. अश्वत्थाम्याशी वर्षभर का, सत्तावीस वर्षं लढलास, तरीही उपयोगाचं नाही. अश्वत्थामा अमर्त्य आहे, चिरंजीव आहे!"

त्यांनी अश्वत्थाम्याकडे पुढा करून त्यालाही समजावलं, "जरासंधानंतर भीमसेनासारखा मल्ल आर्यावर्तात दुसरा कोणीही राहिलेला नाही! तू त्याला ललकारू नयेस! तरीही दोघेही ऐकण्याच्या मन:स्थितीत नसाल, तर ललकारीची मृत्तिका देऊन मीही तुमचं मल्लद्वंद्व बघावं म्हणतो!"

सर्प-मुंगसासारखे ते दोघेही एकमेकासमोर उभे होते. दोघांवरही कृष्णवचनाचा काहीही परिणाम झाला नाही!

कृष्णदेवांनी दिलेली ललकारीची मृत्तिका स्वीकारून, मल्लद्वंद्वासाठी दोघेही सैनिकांनी तयार केलेल्या साध्याच आखाड्यात उतरले. अभ्याकर्ष, रजकपुष्ठ, आकडी असे एकमेकांवर डाव-प्रतिडाव करीत लढले. दोन्हीकडे आता शेकड्यांतच उरलेल्या सैनिकांचं कडं आखाड्याभोवती दाटलं होतं, दोघंही घामाघूम झाले. कुणी कुणालाही आटपत नव्हतं. शेवटी दिवस तिसऱ्या प्रहरात कलला असताना, भीमसेनानं आपला बाहुकंटकाचा निर्णायक डाव अश्वत्थाम्याच्या कंठाभोवती आवळला. पण आज विचित्रच घडत होतं. भीमसेनानं आयुष्यभर निर्वाणीचा म्हणून वापरलेला बाहुकंटक, अश्वत्थाम्याचा कंठ आवळण्यासाठी कितीही सामर्थ्य लावून बाहु आखडले, तरीही अश्वत्थामा योगबळावर श्वास कोंडून कंठधमन्या अशा काही फुलवीत होता की, शेवटी भीमसेनच श्रांत-क्लांत होत होता. कितीतरी वेळ हे चाललं, तसं पुढं होत, भीमसेनाजवळ एक खड्ग ठेवून कृष्णदेव त्याच्या कानाला लागले. त्यांनी भीमसेनाला आपल्या कृष्णबोलीत निर्वाणीचा कानमंत्र दिला, "कौंतेया, नीट कान- मन उघडं ठेवून ऐक, अश्वत्थामा चिरंजीव आहे! तो कधीच मरणार नाही. माणसाची मरणं दोन असतात – एक शारीरिक आणि एक लौकिक! त्याच्या मस्तकावर जो एक जन्मजात मांसल मणी आहे, तो दिलेल्या खड्गनं कापून घे. त्याच्या मस्तकावरचा व्रण कधीच भरून येणार नाही. सदैव रक्तबंबाळच राहील. जशी तुम्हा पांडवांच्या पुत्रांची कलेवरं राहिली, तसा! कधीच न भरणारा रक्तओघळता व्रण घेऊनच अश्वत्थामा चिरंतन जगेल! लौकिक अर्थानं ते त्याचं मरणच असेल. चापल्य कर आणि त्याच्या मस्तकावरचा मांसल मणी खड्गनं कापून घे!"

घामाघूम भीमसेनानं कृष्णदेवांनी सांगितलं तसं केलं. डाव्या हातानं अश्वत्थाम्याचा कंठ आवळून, उजव्या हातीच्या खड्गानं त्याच्या मस्तकावरचा मांसल मणी मस्तकापासून वेगळा केला.

रक्तलांच्छित खड्ग रणक्षेत्रावरच फेकून, हातचा मौल्यवान मांसल मणी घेऊनच तो पांडव-शिबिराकडे परतला.

प्रिय पत्नी द्रौपदीदेवींच्या हाती तो मांसल मणी ठेवून भीमसेनानं इतिवृत्तान्त सांगितला. कृष्णदेवांनीही त्यांना कुरूंचा शेवटचा सेनापती अश्वत्थामा चिरंजीव कसा आहे, हे सांगून त्यांचा पुत्रशोक कमी केला.

एकोणिसाव्या दिवसाची सायंकाळ जवळ आली. द्वारकाधीशांनी आपलं प्रशस्त शिबिर उखडून गुंडाळण्याची आज्ञा आम्हाला दिली. त्याप्रमाणे मी, उद्धवदेव, अर्जुन अशा त्यांच्या प्रिय सख्यांनी शिबिराच्या खुंटाळ्या कुरुक्षेत्राच्या भूमीतून उखडून काढल्या. त्या उंचच उंच शिबिराच्या मध्यभागीचा प्रमुख लाकडी स्तंभ प्रत्यक्ष कृष्णदेवांनी स्वहस्ते इकडे-तिकडे हलवून उखडून काढला. एका दलप्रमुखानं पांडवसेनेची अंतिम गणती केली. ती काही शेकड्यांतच भरली. कौरवांच्या सेनेत तर आता केवळ तीनच योद्धे जिवंत होते – कृपाचार्य, कृतवर्मा आणि अश्वत्थामा!

सर्व गतप्राण योद्ध्यांना तर्पण देण्याचं धर्मकार्य अद्याप करायचं राहिलं होतं. त्यासाठी आम्ही सर्व दृषद्वती नदीच्या किनारी आलो. पाचारण केलेल्या धौम्य ऋषींना कृष्णदेव तर्पणाच्या विधीची तयारी सांगत असताना, सर्वांनी महायुद्ध संपलं म्हणून

सुटकेचा नि:श्वास सोडला. युगानुयुगं वाहणारी दृषद्वती नदी शांत होती. काठावरच्या मानवी प्रलयाचं तिला कसलंही सुखदु:ख नव्हतं.

मी, उद्धवदेव, दारुक, अर्जुनासह सर्व पांडव आणि अच्युत द्वारकाधीश दृषद्वतीच्या घाटावरच्या एका दगडी पायदंडीवर बसून सैनिक व पुरोहित करीत असलेली तर्पणाची व्यवस्था बघत असतानाच, अद्याप न संपलेल्या भारतीय महायुद्धातील अखेरची कटु वार्ता घेऊन गुप्टचरप्रमुख मलय धापा टाकतच दृष्टद्वतीकिनारी पोहोचला. कृष्णदेवांना वंदन करून थरथरत म्हणाला, "स्वामी, घात झाला आहे. मस्तकीचा ओघळता व्रण घेऊन अरण्यात अदृश्य होण्यापूर्वी अश्वत्थाम्यानं ब्रह्मास्त्राचं प्रक्षेपण केलं आहे!"

"क्काऽय? ब्रह्मास्त्र? कृष्णदेव पायदंडीवरून ताडकन उठून उभेच राहिले. "होय स्वामी, ब्रह्मास्त्रच! युद्ध समाप्त झालं म्हणून आपली शिबिरं उठविणाऱ्या उरल्यासुरल्या आपल्या सर्व सैनिकांना वधून, ते ब्रह्मास्त्र आपल्या स्त्रीमंडळातील उत्तरादेवींच्या गर्भावर उतरलं आहे. पांडवस्त्रिया त्यांच्या उदरात असलेल्या पांडवांच्या तिसऱ्या पिढीचा एकमेव अंकुर मृत झाला, म्हणून वक्ष पिटून आक्रोशताहेत! आपलाच धावा करताहेत! सुदैव म्हणून केवळ आपल्याच सहवासात असल्यामुळे सर्व पांडव जिवंत राहिले आहेत. धौम्य ऋषींना पाचारण करण्यासाठी गेलो, म्हणून मीही वाचलो आहे. सर्व पांडवस्त्रिया 'वंश वाचवा! काही करा, पण उत्तरापुत्राला जगवा.' म्हणून ऊर पिटून आक्रोशताहेत!"

एव्हाना आम्ही सर्वच कृष्णदेवांच्या मुखाकडे सुन्न होऊन बघत उभे राहिलो होतो. काय बोलावं, काय करावं, कुणालाच काही-काही सुचत नव्हतं. एकटे उद्धवदेव द्वारकाधीशांचे दोन्ही दंड घट्ट धरून पोटतिडिकेनं म्हणाले, "वासुदेवा, पांडवांचा कुलक्षय वाचविणं आता केवळ तुझ्या आणि तुझ्याच हाती आहे. तुझ्या आजवरच्या जीवनातील तप:साधना स्मरून ब्रह्मास्त्रांचा प्रभाव उत्तरेच्या गर्भावरून घालविण्यासाठी तूच आता दृषद्वतीचं समंत्र आचमन घेणं अटळ आहे, नारायणा! नाहीतर पांडवांचं नावही जगात अस्तित्वात राहणार नाही, चल!"

कृष्णदेवांना पाठीशी घेत उद्धवदेव दृषद्वतीच्या पात्राजवळ गेले. त्यांनी एक छोटं आस्तरण अंथरलं. कृष्णदेवांनी तिथे बैठक घेऊन पद्मासन धारण केलं. आपले मत्स्यनेत्र मिटले, उद्धवदेवांनी ओंजळींनी तळहातांवर सोडलेल्या जलांजलीच्या तीन धारा भूमीवर सोडताना, ते सर्वांना स्पष्ट ऐकू येईल एवढ्या स्वच्छ शब्दांत म्हणाले, "मी पुण्यश्लोक वसुदेवमहाराज व देवकीमाता यांचा पुत्र असेन तर, गोकुळीच्या नंददेव-यशोदामाता यांचा पुत्र म्हणविण्याचा मला अधिकार असेल तर, मी पुण्यश्लोक आचार्य सांदीपनी व घोर तापस आंगिरसांचा सर्वार्थानं योग्य शिष्य असेन तर, आर्यावर्तातील न्यायाची वाट मुक्त करण्यासाठी अन्यायाचं निखंदन करताना मी कुठलाही स्वार्थ केला नसेल तर, जीवनाच्या कुठल्याही घटनेत दिवसा वा रात्री माझ्या हातून अनृताचं कोणतंही पापकर्म झालं नसेल तर, माझ्या आचमनाबरोबर पांडवांच्या कुलस्त्री उत्तरेच्या गर्भात असलेला पांडवांचा तिसऱ्या पिढीचा अंकुर ॐकाराचा प्रणवहुंकार देईल!!" नारायणांनी आचमन घेतलं. डोळे उघडले. उद्धवदेवांकडे बघून ते हसतच म्हणाले, "सख्या उधो, असाच पांडवांच्या स्त्रीमंडळात जा. उत्तरेच्या गर्भाची स्थिती काय आहे, ते मला उलटपावलीच परतून सांग."

'आज्ञा दादांची' म्हणत उद्धवदेव दृषद्वतीच्या घाटाच्या पायदंड्या तरातर चढून

पांडवांच्या स्त्रीमंडळाच्या शिबिरसंकुलाकडे निघून गेले. अभिमन्यूच्या पतनापासून उत्तरादेवी कुरुक्षेत्राच्या पांडवांच्या स्त्रीशिबिरात येऊन राहिल्या होत्या.

सूर्य डुबतीला लागलेला असताना भगवी वस्त्रं घातलेले उंचशील उद्धवदेव लगबगीनं, हसतमुखानं आम्हा सर्वांकडे परत येताना दिसले. कृष्णदेवांशिवाय आम्ही सर्वांनी अपार उत्कंठेनं पुढे होत त्यांना घेरलं. ते अपार उत्साहानं लगबगीनं म्हणाले, "उत्तरेच्या गर्भाचं चलनवलन पुन्हा सुरू झालं आहे. पांडवांचा तिसऱ्या पिढीचा अंकुर सुखरूप आहे!

"महायुद्धात केवळ दहा योद्धे वाचले आहेत. कौरवांकडील कृतवर्मा, कृप आणि अश्वत्थामा आणि पांडवांकडील सर्व पांडव आणि महारथी सात्यकी." वंश वाचला म्हणून सुस्कारा सोडणाऱ्या एकाही पांडवाच्या ध्यानी आलं नाही की, दहावा योद्धा कोण? मी तो विसरूच शकत नव्हतो. तरीही सर्वांनी उद्धवदेवांच्या तोंडूनच ते नाव ऐकावं म्हणून मी विचारलं, "उद्धवदेव, तुम्ही दहा योद्धे म्हणालात! सांगितलेत मात्र नऊ! तो दहावा कोण?"

तसं हसून माझ्या खांद्यावर हात ठेवत कृष्णदेवांचे परमसखा उद्धवदेव उद्गारले, "युगंधर श्रीकृष्ण!!"



# उध्दव

## ७

# उद्धव

मी उद्धव! पिता देवभाग आणि माता कंसा यांचा पुत्र! माझे पिता देवभाग वसुदेवमहाराजांचे सख्खे बंधू होते. माझी माता कंसा ही मथुरेच्या महाराज कंसांची सख्खी भगिनी! म्हणजे मी पिता देवभागांकडून कृष्णाचा चुलत बंधू होय, तसा माता कंसेकडून चुलत-मावस बंधू होतो. या कसल्याही नात्यापेक्षा श्रीकृष्णाचा मी जिवलग 'परमसखा' होतो – त्याचा भावविश्वस्त होतो. हे नातंच मला जीवनभर मोलाचं वाटत आलं.

मी त्याचा 'भावविश्वस्त' ही काही स्वत:च लावून घेतलेली उपाधी नव्हे! त्यानंच मला ती सहज दिली होती. त्यानं दिली, म्हणून तर ती जीवनभर माझ्या स्मरणात राहिली.

श्रीकृष्ण माझा ज्येष्ठ बंधू, म्हणून मी त्याला मन:पूर्वक आदरानं 'दादा' म्हणून संबोधित आलो. मी त्याला 'दादा' म्हणण्यात नुसता आदरभाव नव्हता, तर त्यात आणखी अनेक भावछटा होत्या. त्याच्या जीवनातील एकही अशी घटना नव्हती, जी त्यानं मला सांगितली नाही. कधी-कधी तर तो माझ्याशी बोलला, ते अगदी स्वत:शीच बोलल्यासारखं बोलला.

प्रथा म्हणून आम्हा अठराकुलीन यादवांतील महत्त्वाच्या विवाहसमारंभानंतर रास खेळला जाई. मी विवाह केला नाही. त्यामुळेच मी कटाक्षानं रास खेळण्याचं टाळत होतो. ते ध्यानी येताच, प्रथम दादानंच मला 'उधो, बंधो, उतर रासात' म्हणून हाताला धरून एकदा रासमंडलात खेचलं. तो मला प्रेमानं नेहमी 'उधो' म्हणत असे.

मी विवाह का करीत नाही, असा प्रश्न माझे बाबा, थोरले बाबा, माता, थोरल्या, धाकट्या दोन्ही माता, बलिदादा माझे सहोदर ज्येष्ठ बंधू आणि अनेक यादवांनी मला संधी मिळेल तेव्हा आवर्जून विचारला. माझ्या दादानं – द्वारकाधीशानं मात्र मला ते कधीच विचारलं नाही. माझ्या मनातील त्याच्या विषयीच्या परम आदराचं हे तर सर्वांत प्रबळ कारण होतं.

युद्ध हा काही माझा स्वभाव नव्हता. मी मानत होतो, ते प्रत्येकाच्या मनात अहोरात्र चाललेलं मनोद्वंद्व! द्वारकेतील लाखो यादवांत ते एकट्या माझ्या मनातच चाललेलं आहे, हे माझा दादा – द्वारकाधीश चांगलंच जाणून होता. म्हणून तर पितामह भीष्म, महात्मा, विदुर, सुमित्र सुदामा, संजय, बलिदादा, जलपुरुष कर्ण आणि ज्वाला त्यानं प्रत्यक्ष रणभूमीवर जीवनाचा हितोपदेश सांगितला तो धनुर्धर अर्जुन या सर्व सख्यांत त्यानं मला 'परमसखा' मानलं होतं. मी काय होतो, हे तो पूर्णपणे जाणून होता. तो कोण आहे, हे जाणण्याचा मी जीवनभर यथामती यत्न केला. न दिसणाऱ्या, पण प्रचंड वेगानं अवघं विश्व व्यापून टाकणाऱ्या वाऱ्यासारखाच तो होता. तो नीलवर्णी

होता, मस्तकावरच्या अनंत आकाशासारखा! त्या नीलवर्णातही काळीच भासावी अशी एक छटा होती. अनंत आकाशाच्या पलीकडे असलेल्या कृष्णवर्णी असीम अवकाशासारखी! अंकपाद आश्रमात आचार्य सांदीपनींनी हे आकाश–अवकाश प्रकरण आम्हा सर्वांना कितीतरी प्रकारांनी समजावून सांगितलं होतं, आता कुठे मला कळतंय की, एरवी तर ते नेहमीच म्हणत आले, पण गुरुदक्षिणेच्या दिवशी, गुरुदेवांनी माझ्या दादाला अनेकवेळा 'कृष्णा, श्यामा' असं का म्हटलं होतं!

अलीकडे माझ्या ध्यानात आलं, त्याचं हसणं हे प्रत्येक वेळी वेगळंच होतं – धरतीसारखं! धरती नाही का, एका ऋतूतील रंगसौंदर्य दुसऱ्या ऋतूत तसंच कधीही दाखवीत नाही. खरोखरच तो धरतीसारखाच होता – क्षमाशील!

जलाविषयी त्याचं सहज आकर्षण मथुरेपासून मी द्वारका, हस्तिनापूर, इंद्रप्रस्थ असं अनेक ठिकाणी समक्षच पाहिलं. त्याच्या जीवनाच्या यमुनेला काही ठळक. डौलदार वळणं होती. बालपणीचं 'गोकूळ' हे त्यातील सर्वांत डौलदार व कुणाच्याही मनावर सखोल व सदैव ठसावं, असं अत्यंत सुंदर पहिलंच वळण होतं. आचार्य सांदीपनींच्या अवंतीच्या अरण्यातील अंकपाद आश्रमातील मिळेल ते ज्ञान टिपणारं आश्रमजीवन, हे दुसरं वळण तितकंच सुंदर होतं. तो गोकुळातून मथुरेत आला, तेव्हा त्याला सर्वांत प्रथम भेटणारा मी मथुरेतील एकमेव यादव होतो. तेव्हापासून महाभारतीय युद्धाच्या प्रारंभापर्यंत मी सतत त्याच्या सहवासात वावरलो. मथुरेत राहून त्यानं मगधांच्या सम्राट जरासंधाची थोपविलेली आक्रमणं मी पाहिली. हे अवंती–मथुरेतील त्याच्या जीवनयमुनेचं वळणही अतीव सुंदरच होतं.

आपल्या क्रियाशील असंख्यात यादवांच्या सहकार्यानं त्यानं सुवर्णी द्वारकेचं नवं गणराज्य उठविलं; तेही सतत उफाळत्या, गाज देणाऱ्या, अखंड चैतन्यशील पश्चिम सागराच्या वक्षावर.

तो मथुरा सोडून निर्धारानं द्वारकेला आला तेव्हाच त्यानं मला काहीही न बोलता एक शिकवण दिली. फार मोलाची होती ती! प्रसंगी आपल्या प्राणप्रिय जन्मभूमीचाही त्याग करावा लागतो – कर्तव्याच्या पालनासाठी! त्याच्या जीवनातील प्रत्येक प्रसंगानं मला काही ना काही जीवनदायी विचार दिला.

द्वारकेत लाखो यादवांत सुखेनैव राहात असतानाही त्यानं विस्थापित पांडवांच्या सुखदुःखात जाणीवपूर्वक लक्ष घातलं. त्यानं खेळविलेलं 'भारतीय महायुद्ध' हा तर त्याच्या दिव्य प्रतिभेचा कळसच होता. चाळीस लक्ष योद्धयांच्या महाआहुतीचा हा महायज्ञ ठरला. हाती कसलंही शस्त्र न घेता, तो हे अठरा दिवसांचं महायुद्ध खेळला. त्यानं हाती शस्त्र न घेतल्यामुळेच, या युद्धाला महायज्ञाचं स्वरूप लाभलं.

'माणसानं कसं वागू नये', हे शाश्वत जीवनतत्त्व सांगणाराच त्याचा हा 'महायज्ञ' ठरला नाही काय? धर्मक्षेत्र कुरुक्षेत्रावरच्या त्यानं अठरा दिवस खेळविलेल्या महायुद्धाचं त्याच्या जीवनातील वळण, हे सर्वांत विराट आणि थरारक वळण ठरलं. त्यामुळेच तर तो 'युगंधर' झाला.

माझ्या दादाच्या – श्रीकृष्णाच्या या सर्व जीवनवळणातील मला समजलेला अर्थ माझ्या बुद्धीच्या क्षमतेप्रमाणे मी सांगणार आहे. मला याची पूर्ण जाणीव आहे की, मी तो कितीही सांगितला, तरी दशांगुळं शिल्लक उरणारच आहे.

हिमालयाच्या पायथ्याशी बदरीकेदाराच्या परिसरात एक आश्रम उभारण्याची त्याची

मन:पूर्वक इच्छा होती. त्याच्या पूर्वतयारीसाठीच मी बदरीकेदाराकडे गेलो होतो. भारतीय युद्धाच्या प्रारंभापूर्वीच कितीतरी दिवस! हिमालयात तीर्थ बदरीकेदारावर मी आश्रमासाठी योग्य स्थळ निवडलं. आश्रमासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू आसपास मिळू शकतील का, याची पाहणी केली. हिमालयाच्या भ्रमंतीत मला अनेक योगी, तापस, मुनिवर व ऋषि भेटले. त्यातील कुणालाही मी गुरू करून घेतलं नाही. आचार्य सांदीपनींची रीतसर दीक्षा घेतल्यामुळे व दादाच्या सहवासात उभं जीवन कंठल्यामुळे, मला त्याची कधी आवश्यकताही भासली नाही. मात्र विचारपूर्वक मी आता भगवी वस्त्रं परिधान केली होती. कसलाही गाजावाजा न करता, त्यागाचं आणि विरक्तीचं अवडंबर न माजविता!

द्वारकेला जाण्यासाठी परतीच्या वाटेवर असताना भेटलेल्या अनेक ऋषिमुनींकडून, मला कुरुक्षेत्राचा इतिवृत्तान्त क्रमश: कळत गेला. तो ऐकून, द्वारकेला जाणारे माझे पाय आपोआपच कुरुक्षेत्राकडे वळले. एकाच ओढीनं – माझ्या प्राणप्रिय दादाचं क्षेमकुशल काय असावं म्हणून!

भारतीय युद्धाच्या अगदी शेवटच्या टप्प्यात मी कुरुक्षेत्रावर आलो. जसा मी आलो, तसाच बलिदादाही हिमालयातूनच आला होता.

श्रीकृष्णदादानं पांडवांच्या तिसऱ्या पिढीच्या अंकुरासाठी – उत्तरेच्या गर्भासाठी दृषद्वतीच्या तीरी सर्व पुण्याई पणाला लावून निर्वाणीचं आचमन घेतलं. त्याचा परिणाम म्हणून उत्तरेचा गर्भ पुन्हा संचलित झाला. पांडवांच्या तिसऱ्या पिढीचा अंकुर वाचला. त्यांचा वंश वाचला.

महायज्ञासारख्या अठरा दिवस पेटलेल्या महायुद्धाच्या सांगतेचा एकच विधी आता उरला होता. धराशायी पडलेल्या कौरव–पांडव दोन्ही सेनांच्या चाळीस लक्षांवर वीर योद्धयांना सविध तर्पण देण्याचा! त्यासाठी दादानं पाचारण केलेले पांडवपुरोहित धौम्य ऋषी, धर्मक्षेत्र कुरुक्षेत्रावर आपल्या शिष्यगणांसह उपस्थित झाले होते. त्यांच्या व दादाच्या सांगण्याप्रमाणे हे तर्पण ज्येष्ठ पांडव असलेल्या युधिष्ठिरानं सर्वांच्या वतीनं द्यायचं होतं. तर्पणानंतर अर्पायच्या तिलांजलीसाठी द्रौपदीसह सर्व पांडवस्त्रिया, गांधारीदेवींशिवाय ज्यांना शक्य झालं, त्या सर्व कौरवस्त्रिया कुरुक्षेत्रावर आल्या होत्या. मुहूर्ताप्रमाणे धौम्य ऋषींनी तर्पणविधीला प्रारंभ केला. प्रथम सर्व पितरांचं स्मरण करून युधिष्ठिरानं त्यांना पिंडदान केलं. महायुद्धात कामी आलेल्या आचार्य द्रोण धृष्टद्युम्न, अभिमन्यू, घटोत्कच अशा प्रमुखांची नावं घेऊन पिंडदान करण्यात आलं. इतर सर्वांसाठी एकत्रच पिंडदान झालं. जमलेल्या सर्व स्त्री–पुरुषंनी पिंडांवर तिलांजली अर्पण केल्या. पितामह भीष्म अद्याप सैनिकांच्या कड्यात शरपंजरीच होते.

आज युधिष्ठिर योद्धयाचा रणवेष उतरवून साध्या गृहस्थी वेषात होता. इतर चारही पांडव अद्याप रणवेषांतच होते. भीमाच्या खांद्यावर त्याची प्रचंड यशस्वी गदा होती. अर्जुनाच्या वृषस्कंधावर त्याचं पुष्पमालामंडित अजिंक्य गांडीव धनुष्य होतं. नकुलाच्या कटीला त्याचं प्रिय खड्ग आणि सहदेवाच्या खांद्यावर त्याचं उचं, घोटीव मुसल होतं. तर्पणविधीच्या अग्निकुंडाच्या एका बाजूला आता कितीतरी वृद्ध झालेल्या, थकलेल्या, श्वेतवस्त्रधारी राजमाता कुंतीदेवी होत्या. त्यांच्या डाव्या हाताशी द्रौपदी, चित्रांगदा, उलूपी, पौरवी, विजया, हिडिंबा, सुभद्रा, उत्तरा अशा तिलांजलीसाठी आलेल्या पांडवस्त्रिया बसल्या होत्या. मी आणि दादा पुरोहित धौम्य ऋषींच्या निकट

दर्भासनावर बसलो होतो.

समंत्र सर्व विधी झाले. धौम्य ऋषींनी संकेत केल्याप्रमाणे युधिष्ठिर अग्निकुंडापासून उठला. धौम्य ऋषींनी संकेत केल्याप्रमाणे भारतीय युद्धात वीरगती प्राप्त झालेल्या सर्व योद्धयांना तर्पणाची अखेरची तिलांजलीनंतरची जलांजली अर्पण करण्यासाठी दृषद्वतीकडे चालला. त्याच्या हातांत तेवत्या निरांजनांचं, अक्षदा, गंध–कुंकुम, फुलं असलेलं सुवर्णी तबक होतं. प्रथम तो दृषद्वतीचं जलमाता म्हणून पूजन करणार होता. अनेक वीरांच्या स्मरणानं त्याचं मन कसं काठोकाठ भरून आलं होतं. धौम्य ऋषींनी त्याला विधिवत संकेत दिला होता की, प्रथम लोकमाता दृषद्वतीचं पूजन करावं. मग नात्यागोत्यातल्या वीर योद्धयांना नावानुसार उच्चार करून ज्येष्ठतेप्रमाणे क्रमश: तर्पणाची जलांजली द्यावी.

अगदी याच क्षणाला आत्याबाई कुंतीदेवींनी दादाला हाताचा संकेत करून जवळ बोलावून घेतलं. त्याच्याशी काहीतरी कानगोष्ट केली. दादानं ती ऐकताच होकाराची मान डोलावून, तर्पणविधीचे प्रमुख पुरोहित धौम्य ऋषी यांच्या कानाशी तशीच काही गुजगोष्ट केली. तसं धौम्य ऋषी आपल्या दर्भासनावरून लगबगीनं उठले. एव्हाना दृषद्वतीच्या पात्राजवळ पोहोचलेल्या शिष्यवत युधिष्ठिराला थोपवून धरण्यासाठी मोठ्यानं म्हणाले, “पांडवा, थांऽब!” त्यांनी नेहमीसारखं युधिष्ठिराला ‘ज्येष्ठ पांडवा’ न म्हटल्यामुळे मला शंका आली. तर्पणविधीत काहीतरी त्रुटी राहत असावी. त्याचीच सूचना आत्याबाईंनी केली असावी.

युधिष्ठिर जागीच थांबला. लगबगीनं त्याच्याजवळ जात धौम्य म्हणाले, “कृष्णदेवांचा संकेत आहे, तर्पणाची सर्वांत पहिली ओंजळ अंगराज कर्णासाठी अर्पण करावी! ते तुम्हा सर्व पांडवांचे ‘ज्येष्ठ’ बंधू होते!!”

उभ्या जागीच युधिष्ठिर अनेकविध अनावर भावभावनांनी कसा अंगभर थरथरू लागला. त्याच्या हातातील तर्पणविधी–साहित्याचं सुवर्णी तबक लडलड थरथरू लागलं. पायाखालची दृषद्वतीकिनारीची तळपती वाळू सरकते आहे की काय, असंच त्याला वाटलं असावं.

युधिष्ठिर जलांजली का देत नाही, म्हणून पांडवांतील प्रथम भीमार्जुन, नंतर नकुल–सहदेव लगबगीनं पुढे झेपावले.

अद्याप युधिष्ठिर काही नीट सावरला नव्हता. थरथरतच होता. त्याला भीमानं विचारलं, “काय झालं ज्येष्ठा?”

भीमाकडे अश्रुभरल्या नेत्रांनी बघत थरथरत्या हातांनी आणि तशाच वाणीनं युधिष्ठिर त्याला म्हणाला, “आजपासून मला ‘ज्येष्ठ’ म्हणू नकोस! बंधुवर भीमसेना, मी ज्येष्ठ नव्हतो, नाही!”

पुढे होत अर्जुन त्याला प्रेमानं म्हणाला, “असं काय करतोस युधिष्ठिरा? तूच तर आमचा ज्येष्ठ बंधू नाहीस का? त्याशिवाय का तू हे तर्पणविधी केलेस?”

“नाऽही! मी तुमचा ज्येष्ठ बंधू नाही. तुमचा–माझा सर्वांचाच ज्येष्ठ बंधू होता दिग्विजयी दानवीर, महारथी अंगराज. आपण सर्वांनी सूतपुत्र म्हणून ठायी–ठायी हिणविलेला कर्ण!!”

“क्काऽय?” भीमार्जुन दोघेही प्रथम डोळे विस्फारून एकेक पाऊल मागे हटले. मग लगेच युधिष्ठिराच्या जवळ जात, त्याचे दंड गदागदा हलवून पिळवटत्या सुरात अर्जुन

म्हणाला, “काय सांगतोस हे युधिष्ठिरा? लक्षावधींच्या झालेल्या प्राणहानीमुले भ्रमिष्ट तर नाही झालास तू?”

भीमही आपल्या गदेचं टोकदार अग्र दृषद्वतीच्या वाळूत खुपसून, कधी–कधी अनावर संतापानं बडबडायचा तसं म्हणाला, “युद्धसमाप्तीनंतर तू रात्री घेतलेल्या मैरेयक सोमरसाचा प्रभाव तुझ्यावरून उतरलेला दिसत नाही. ज्येष्ठाऽ! तर्पण दे आणि जाऊन विश्राम कर.”

“तुला सांगितलं ना मी की, मला ‘ज्येष्ठा’ म्हणू नकोस म्हणून भीमसेन! तुझा–माझा सर्वांचा ज्येष्ठ होता – कर्णऽ! मी त्याला सर्वांत पहिली तर्पणाची ओंजळ, तीही कृष्णाच्याच आज्ञेनं आता देणार आहे. माझ्यानंतर तुम्हा प्रत्येकालाच ती द्यावी लागेल!” युधिष्ठिर म्हणाला.

एव्हाना सैरभैर झालेला अर्जुन अंगावर वीज कोसळल्यासारखा काही क्षण निःस्तब्धच झाला. दुसऱ्याच क्षणी वळला नि अग्निकुंडाजवळ बसलेल्या स्त्रीमंडळाच्या रोखानं तो धावला. क्षणातच त्यानं आत्याबाई कुंतीदेवींना गाठलं. नुकत्याच झालेल्या अठरा दिवसांच्या भारतीय महायुद्धात ज्याच्या प्रत्यंचेचा टंकार उठवीत त्यानं मी–मी म्हणविणाऱ्या महाविक्रमी योधद्यांना यमसदनाला धाडलं होतं, ते त्याचं दिव्य गांडीव धनुष्य खांद्यावरून खेचून घेतलं. त्याचा कधीच न बघितलेला आविर्भाव बघून भेदरलेल्या आत्याबाई उठून थरथरत उभ्या राहिल्या.

“पापिणीऽ! माझ्या हातून तू भ्रातृहत्या करवून घेतलीस!!” असं कडाडत त्यानं आपलं दिव्य गांडीव धनुष्य प्रत्यक्ष आपल्या जन्मदात्या मातेच्या कंठात सरळ पाशासारखं घातलं! ते गदागदा हलवीत आपण आपल्या ज्येष्ठ बंधूचा पुत्र सुदामन, वृषसेन वधला; त्याचा मानसबंधू शोण मारला; या जाणिवेनं देहभर थरारून गेलेला धनंजय कसातरीच बरळला. प्रत्यक्ष आपल्या मातेला “पापिणीऽ, या गांडीव धनुष्यानं मी आपल्या ज्येष्ठ बंधूला वधलं! अनेकांना यमसदनाला धाडलं. आज याच्या प्रत्यंचेचा पाश तुझ्या कंठाभोवती आवळून भ्रातृहत्येमुळे घनघोर नरकाच्या कलंकाला पोहोचलेला मी, तुलाही ठार करतो!”

अर्जुनाचा तो अनावर आविष्कार बघून सर्वच थरारले. आता तर्पणाचा धार्मिक विधीही रक्तलांच्छित होणार की काय, म्हणून मीही अवाक झालो. एका झेपेतच अर्जुनाचा गांडीवधारी हात रोखून धरत म्हणालो, “पांडवाऽ शांत हो. स्वतःला सावर!”

दादानं माझ्यामागून शांतपणानं येऊन त्याच्या पाठीवर आपला हात ठेवून त्याची पाठ क्षणैक प्रेमानं थोपटली. मग आपल्या नेहमीच्या भल्याभल्यांना ताळ्यावर आणणाऱ्या वक्रोक्तिपूर्ण वक्तव्यात तो म्हणाला, “भले शिष्यवरा! आजही जिची चरणधूल घेण्याची माझी योग्यता नाही असं मी मानतो, त्या माझ्या पूज्य आत्येला तू वधायला निघालास! सख्या अर्जुना, तिला काय म्हणायचं आहे ते ऐकून न घेताच, तू अनावर क्रोधानं तिच्या अंगावर धावलास! तू कसा काय माझा प्रिय अभि गेला म्हणून माझ्या भगिनी सुभद्रेची समजूत घालणार? तिचं सांत्वन करणार?”

त्याच्या एकेक शब्दाबरोबर, ओहोटीचा पश्चिम सागर मागे हटतो, तसा धनुर्धर अर्जुनाचा उद्रेकी संताप हळूहळू हटला. दादाच्या खांद्यावर आपलं श्रांत–क्लांत मस्तक हताशपणे त्यानं टेकलं. त्याच्या डोळ्यांतून पाझरणारी उष्ण आत्मरसाची धार बघून मीही त्याच्या पाठीवर प्रेमानं हात फिरवत राहिलो. त्याच्यां डोळ्यांतून दादाच्या

वैजयंतीमालेवर पाझरणारी आत्मरसाची धार, अज्ञानानं झालेल्या भ्रातृहत्येच्या मनस्तापाची होती की जाणतेपणी झालेल्या जन्मदात्या मातेच्या अवहेलनेसाठी होती, कुणालाच कधीही कळलं नाही. दादाशिवाय ते कुणालाही कळणं शक्यही नव्हतं.

तिकडे दृषद्वतीच्या पात्रात आपल्या अश्रुभरल्या डोळ्यांनी न दिसणाऱ्या सूर्यबिंबाला पहिली तर्पण ओंजळ देताना युधिष्ठिर पुटपुटत होता – 'ॐ भूर्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यं भर्गो: देवस्य धीमहि धियोयोन: प्रचोदयात।'

एका बाजूनं मी आणि दुसऱ्या बाजूनं दादानं कुंतीमातेची चरणधूली घेऊन, दृषद्वतीत जाऊन तर्पण देऊन, हात–मुख प्रक्षाळून आलेल्या अर्जुनाला सावरून दारुकानं सिद्ध केलेल्या आमच्या गरुडध्वजाकडे नेलं.

दृषद्वतीवरून आम्ही आलो, ते पांडवस्त्रियांच्या शिबिरसंकुलात! अद्याप ती शिबिरं मोडलेली नव्हती. आत्याबाई कुंतीदेवी सर्व स्त्रियांसह पांडवांच्या रथांतून येऊन आपल्या शिबिरात बसल्या होत्या. मी दादासह त्या शिबिरात जाताच सर्वप्रथम स्फुंदत धावत आली, ती सुभद्रा! तिला सावरण्यासाठी तिच्या पाठोपाठ द्रौपदीही आली. खरंतर तिचं पाच पुत्रांचं दुःख सर्व पांडवस्त्रियांत अतिशय जीवघेणं होतं. पण जीवनात एकापाठोपाठ एक आलेल्या सत्त्वपरीक्षेच्या अनेक प्रसंगांतून तिचं मन तावून–सुलाखून निघालं होतं. द्रौपदीच सर्वांत लवकर सावरली होती.

दादाच्या गळ्यात पडून 'माझा अभि कुठं गेला रे कृष्णदादा – मला त्याचं एकदा तरी दर्शन घडव' असं हमसून म्हणताना सुभद्रा अंगभर गदगदली. दादाची निळसर लांबसडक बोटं तिच्या पाठीवर काही क्षण मायेनं अबोल नुसतीच फिरली. जशी काही ती तिला मूकपणे सांगत होती – 'माझ्या प्रिय भगिनी सुभद्रे, शांत हो. मी काय म्हणतोय, ते नीट ऐकून घे.'

दुसऱ्याच क्षणी तो शांत, स्थिर स्वरात म्हणाला, "सुभद्रे, आपला अभि कीर्तीच्या कळसाला पोहोचला आहे. झालेल्या महायज्ञात वयानं लहान असून सर्वाधिक विक्रम करणारा तोच एकटा ठरला आहे. पांडवांच्या कुरुकुलाचं नाव तर त्यानं अजर केलंच आहे, पण तुझ्यामुळे आम्हा यादवांचंही नाव अमर केलं आहे. अश्रू ढाळू नकोस – त्याचा सार्थ अभिमान बाळग!" त्याच्या शब्दाशब्दांत आणि विशेषत: त्याच्या स्वर्गीय स्पर्शात एवढं सामर्थ्य होतं की, स्फुंदून–स्फुंदून रडणारी सुभद्रा लवकरच शांत झाली. मीही पुढे होत तिच्या खांद्यावर हात ठेवून, तिला थोडं थोपटलं. मग दादाच्या शब्दांचे प्रतिध्वनी वाटावेत असं म्हणालो, "भगिनी सुभद्रे, वीरमाता म्हणून मला तुझा अभिमान वाटतो, आर्यांच्या पुढील अनेक पिढ्यांना वाटत राहील. शांत झालीच आहेस. इडादेवीचं स्मरण करून आता मनानं निर्लेपही हो!"

सर्वांपेक्षा आता मीच उत्सुक झालो होतो, तो दादा आपल्या प्रिय आत्याबाईंशी काय बोलणार या विचारानं! त्या तर क्षितिजापार झाल्यागत शांत चित्तानं आसनावर बसलेल्याच होत्या – एखाद्या मूर्तीसारख्या! दादा पुढे झाला. त्यांच्या उजव्या चरणाला आपली बोटं भिडवून ती मस्तकीच्या किरीटावरून मागे घेत त्यांच्या उजव्या चरणापाशीच आस्तरणावर बसला. मीही आत्याबाईंच्या डाव्या चरणाचा स्पर्श घेऊन तिथेच आस्तरणावर बसलो.

काही क्षण घनदाट दाटलेल्या शांततेत तसेच निघून गेले. कुणीच काही बोलत नव्हतं. आम्ही सर्व जण वाट बघत होतो, ते द्वारकाधीश आता काहीतरी बोलणार म्हणून! तो वाट

बघत होता, आत्याबाई काहीतरी बोलतील म्हणून! त्या ज्येष्ठ होत्या. त्यांचा ज्येष्ठ गेला होता. तरीही त्या शांतच होत्या. तसं सगळं वातावरणच नेहमीसारखं पालटून टाकणारी दादाची किमयागार वेणुवाणी स्रवली.

अत्यंत मायेनं आपले दोन्ही हात जोडून दादा शांतपणे त्यांना म्हणाला, “मला क्षमा कर! त्याच्या जागी मला मानून क्षमा कर!” भोवतीच्या आम्हापैकी कुणालाच त्याच्या म्हणण्याचा काहीच अर्थ लागला नाही. आत्याबाईंना मात्र तो लागला असावा. त्या म्हणाल्या, “तुला कशासाठी क्षमा? आणि ती करण्याची माझी योग्यता तरी आहे का? तुझं काहीच चुकलेलं नाही.”

आम्हा सर्वांना, किमान मला तरी वाटलं की, “युद्धात धर्म म्हणजे काय हे कर्णाला ऐकवून, अर्जुनाकडून त्याचा वध करविल्यासाठीच, तो आत्याबाईंची क्षमा मागतो आहे.’

आत्याबाईंसह आम्हा सर्वांचा भ्रम दूर करण्यासाठी तो म्हणाला, “मी क्षमा मागतो आहे; ती माझा प्रिय सखा अर्जुन पुत्रधर्म विसरून माझ्यासमक्ष तुझ्या अंगावर अज्ञानानं सरळ धावून गेला, म्हणून!! ज्येष्ठ कर्णाविषयी म्हणशील, तर तो आमच्या अभिपेक्षाही कीर्तिपदाला पोहोचला आहे. तू दोन्ही अर्थानं धन्य आहेस – माता म्हणून आणि महामाता म्हणूनही!”

आता मात्र आत्याबाई आसनावरून उठल्या. दोन्ही हात पसरून त्यांनी आपणाला मनाच्या सर्व मात्रांसह जाणणारा कुणीतरी आहे, या अपार समाधानानं ‘कृष्णाऽ’ एवढंच म्हणत त्याला आलिंगनात घेतलं.

दादानं द्वारकेहून परतलेल्या सात्यकीला सर्व पांडवस्त्रियांना कुरुक्षेत्रावरून हस्तिनापुराकडे सुखरूप धाडण्याची आज्ञा केली. सर्व पांडवांसह त्यांच्या स्त्रियांनी हस्तिनापुराकडे प्रस्थान ठेवलं. कृतवर्मा तर केव्हाच द्वारकेकडे निघून गेला होता. मस्तकावर भीमानं काढून घेतलेल्या मांसल मण्यामुळे ओघळता व्रण घेऊन अश्वत्थामा कुठल्या अरण्याच्या दिशेनं केव्हा निघून गेला, कुणाला कधीच कळलं नाही.

दारुकानं जोडलेल्या दादाच्या पांढऱ्याशुभ्र अश्वांच्या गरुडध्वजातून सर्वांत शेवटी आम्ही चौघांनी उजाड कुरुक्षेत्र सोडलं – दारुक, सात्यकी, मी आणि माझा दादा! आम्हीही हस्तिनापुराकडे चाललो. मार्गावर त्या राजनगराच्या सीमेवर वृकस्थलाजवळ दादाच्या एका भक्ताच्या निवासात एक पडाव केला.

दुसऱ्या दिवशी सूर्योदयाबरोबरच आम्ही हस्तिनापूरच्या सीमेत गरुडध्वजासह प्रवेश केला. जेव्हा दादा शिष्टाईसाठी या नगरात आला होता, तेव्हा त्याचं केवढं हर्षोत्फुल्ल स्वागत हस्तिनापूरच्या नगरजनांनी केलं होतं, आता मार्गाच्या दुहाती चिटपाखरूही नव्हतं. हस्तिनापूरच्या प्रत्येक घराघरातील कुणी ना कुणी कुरुक्षेत्रावर वीरगतीला गेलं होतं. मागे उरले होते वृद्ध, स्त्रिया आणि बालकं. तीही बंद द्वारांच्या आत दुःखात चूर!

आम्ही सीमेवरच्या महात्मा विदुरांच्या निवासासमोर आलो. कसं कुणाला ठाऊक, कुणीही अग्रवार्ता न देताही दादाच्या स्वागतासाठी कटीत वाकलेले, हात जोडलेले महात्मा विदुर उभे होते. ते लगबगीने गरुडध्वजाजवळ आले. तसं दादा त्यांना म्हणाला, “सख्या विदुरा, तूही रथात बैस. कुरूंच्या महाराजांना भेटायचं आहे. तू त्यांचा महामंत्री आहेस.”

“आज्ञा द्वारकाधीश!” म्हणत त्याच लगबगीनं विदुर गरुडध्वजाच्या घेरात आले.

दादानं त्यांना ‘सखा’ म्हटलेलं मला तीव्रपणे जाणवलं. कारण आज या क्षणी

गरुडध्वजात असलेले आम्ही चौघेही त्याचे सखेच होतो – दारुक, सात्यकी, विदुर आणि मी!

तांबसर जांभ्या पाषाणांची कुरूंची भव्य प्राचीन राजवास्तू समोर आली. आम्ही सर्व रथातून खाली उतरलो. दादानं सांगितल्याप्रमाणे पुढे आलेले पाचही पांडव दादाला बघून वंदन करीत सामोरे आले. दादानं महामंत्री विदुरांशी काही कानगोष्टी केल्या.

धृतराष्ट्रमहाराजांना पांडवांसह भेटीसाठी आलेल्या दादाची अग्रवार्ता देण्यासाठी, स्वत: विदुर त्यांच्या कक्षाकडे निघून गेले. ते जाताच सर्व पांडवांना जवळ बोलावून घेऊन दादानं माझ्यासमक्ष संकेत केला, "प्रिय बंधूंनो, तुम्हाला कर्तव्य म्हणून तुमच्या काकांचं दुरूनच वंदन करून दर्शन घ्यायचं आहे. त्यांच्या आसपास कुणीही जायचं नाही. विशेषत: भीमसेना, तू सर्वांपासून दूरच राहायचं आहे. शंभर पुत्रांच्या शोकामुळे ते देतील तो शाप, शांत मनी ऐकून घ्यायचा आहे!"

सर्व पांडवांनी दादाच्या सर्व बारीकसारीक सूचना मन:पूर्वक ऐकल्या. सर्वांना घेऊन दादा सरळ कुरूंच्या शस्त्रागाराच्या रोखानं चालला. त्या शस्त्रागारासमोरच्या मोकळ्या पटांगणात पूर्व दिशेला कुरूंचा मल्लविद्येचा राजआखाडा होता. पश्चिमेला एकच लोहमूर्ती होती. खांद्यावर गदा पेलून उभा राहिलेल्या भीमाची साक्षात प्रतिकृती वाटावी अशी! दादा आम्हा सर्वांसह नेमक्या त्या लोहमूर्तीसमोरच उभा राहिला.

तसं भीमासेनानं नावरत्या कुतूहलानं विचारलंच, "माझी लोहप्रतिमा आणि तीही कुरूंच्या शस्त्रागारी पटांगणात कशी काय श्रीकृष्णा? कुणी बसवली ही इथे?"

तसं हसून त्याच्याकडे बघत दादा म्हणाला, "अपसमजात जाऊ नकोस कौंतेया! तुझी पूजा मांडण्यासाठी किंवा तुझ्यावर फुलं चढविण्यासाठी ही लोहप्रतिमा उभारण्यात आलेली नाही. प्रत्यक्ष दुर्योधनानंच ती आपल्या निष्णात लोहकारांकरवी तुझ्या देहाच्या मापाचा साचा घडवून ओतवून घेतली आहे. रोजच्या गदायुद्धाच्या प्रत्यक्ष सरावासाठी! आपल्या दु:शासन, दुर्मुख, दुर्घर्ष अशा निवडक बंधूंसह इथे तो नित्यनेमानं गदायुद्धाचा सराव घटकान्‌घटका करीत होता. जेव्हा–जेव्हा प्रतिस्पर्ध्यावर प्राणघातक गदाप्रहार करण्याची संधी त्याला येत असे, तेव्हा–तेव्हा आपल्या चुकलेल्या बंधूला गदेचा एक हलकाच तडाखा देऊन तो त्याला सोडून देई आणि 'भीमसेऽन' असं त्वेषाने ओरडत तोच प्रहार त्याच पद्धतीने तुझ्या या लोहमूर्तीवर उतरवीत असे! जवळ जाऊन बघ, त्या मूर्तीवर अशा प्रहारांचे जागोजागी पडलेले लहान–मोठे पोचे तुला दिसतील!"

भीमसेन तर ऐकत होताच, पण सर्वच पांडव थक्क होऊन ते कृष्णकथन ऐकत होते.

इतक्यात 'असं यावं महाराज, इकडून–इकडून' असं म्हणत हाताला धरून कुरूंच्या महाराज धृतराष्ट्रांना समवेत घेऊन महामंत्री विदुर शस्त्रागाराच्या प्रांगणात प्रवेशले. तसं ठरल्याप्रमाणे दादानं आम्हा सर्वांना संकेत केला. आम्ही चारही दिशांना पांगलो. भीमसेनाच्या लोहमूर्तीसमोर एकटा दादा उभा राहिला. हाताला धरून चालवत आणलेल्या कुरूंच्या त्या अंध महाराजांना महामंत्री विदुर म्हणाले, "कुरूक्षेत्रावरून परतलेले द्वारकाधीश आपला चरणस्पर्श घेताहेत, महाराज." तसं दादा झटकन पुढे झाला आणि वीरासनात बसून त्यानं महाराजांच्या चरणांवर हाताची बोटं ठेवली. त्या निष्णात राजकारणी महाराजानं आवाज पारखण्यासाठी 'कोऽण?' असा प्रश्न केला. तसं दादा बसूनच त्यांना म्हणाला, "मी, द्वारकेच्या वसुदेव–देवकींचा पुत्र श्रीकृष्ण आहे महाराज." तरीही त्या चाणाक्ष महाराजानं दादाच्या मस्तकीचा मुकुट चाचपून त्यात मोरपीस आहे

का, याची खातरी करून घेतली! मग तो सवयीच्या मानभावीप्रमाणे मनात एक ठेवून बाहेर दुसरंच म्हणाला, "श्रीकृष्ण? तुझा काहीच दोष नाही. तू निःशस्त्र होतास! सारथी होतास!! श्रीकृष्णा, माझे शंभर पुत्र मला एकदा भेटून गेले, ते परतलेच नाहीत. त्यासाठी तू माझ्या सांत्वनाला आलास, हे मी जाणतो. पण तुम्ही द्वारकेचे यादव काय आणि आम्ही हस्तिनापूरचे कुरू काय, जन्मानं पडलो क्षत्रिय! समरांगणात झालेल्या संहारासाठी क्षत्रिय कधीच खेद वा शोक करीत नसतात. जे झालं ते रणमर्दिनीला अर्पण असंच ते मानतात. मीही मानतो. तूही मानत असशील." क्षणभर तो धूर्त राजा दादाच्या मनाचा कानोसा घेण्यासाठी थांबला.

दादाही उठून उभा राहत, त्याला त्याच्या मनोगतीवर अंधपणानं तसंच जाऊ देत म्हणाला, "सांत्वनासाठीच मी आलो आहे महाराज. स्त्री म्हणून राजमाता गांधारीदेवींचं अग्रक्रमानं प्रथम दर्शन घ्यायला पाहिजे होतं. पण – पण शंभर पुत्रांच्या शोकानं आपण किती विरहव्याकूळ झाला आहात, ते मी जाणतो. या प्राचीन सिंहासनाचे अधिकारी म्हणून आपलं दर्शन प्रथम घेणं योग्य, असं मानूनच आलो आहे. महाराज, आपण शांतचित्त व्हावं."

'मी स्थिरचित्तच आहे. हस्तिनापूरच्या सिंहासनावर माझ्या प्रिय बंधूंचे, सम्राट पांडूचे पुत्र आले, तरी माझे पुत्रच आल्यासारखेच नाही काय? मी युद्ध संपल्यापासून वैर संपलं असंच मानतो. पांडवांच्या भेटीसाठी तळमळतो आहे. विशेषतः भीमसेनाला केव्हा एकदा भेटीन, त्याला वक्षाशी बिलगतं घेईन, असं मला झालं आहे. मूढ दुर्योधन आणि त्याचे सर्व बंधू यांचं दुःख मला पिता म्हणून झालं, हे सत्यही आहे. पण मी ते केव्हाच गंगेला अर्पण केलं आहे. 'मरणान्तानि वैराणि' – हेच तर आम्हाला ऋषिमुनींनी शिकविलं.

"प्रिय पुत्रा श्रीकृष्णा, तू एकटाच आलास? विदुर तर म्हणाला, तुझ्यासह माझे प्रिय पुत्र पांडवही आले आहेत. कुठे आहेत ते? कुठे आहे माझा प्रिय भीमसेन?" एवढ्यात दादा चपळाईनं भीमसेनाच्या लोहप्रतिमेमागे सरकला. तिथूनच म्हणाला, "महाराज, आपलं अभय मिळताच त्यांना हायसं वाटलं आहे. इतका वेळ ते आपल्यासमोर काय नि कसं बोलावं, म्हणून मूकच उभे होते. भीमसेन तर आपल्या समोरच उभा आहे. आपण त्याला आपल्या मायेच्या प्रेमळ दृढालिंगनात घ्यावं! आपले मुखभर आशीर्वाद घेण्यासाठीच तो आसुसला आहे."

ते ऐकताच महाराज धृतराष्ट्रांनी पटकन विदुरांचा हात सोडला. आपले पुष्ट दोन्ही बाहू पसरून सर्वांना स्पष्ट ऐकू जाईल अशा कणखर शब्दांत ते म्हणाले, "प्रिय भीमसेनाऽ! पुत्रा ये, मला कडकडून आलिंगन दे." हस्तिनापूरच्या निर्माणापासून कधीच घडलं नाही, असं थरारनाटच आम्ही डोळे विस्फारून बघतच राहिलो.

भीमसेन म्हणून त्याच्या लोहप्रतिमेला शंभर पुत्रांच्या वधामुळे शोकव्याकूळ झालेल्या त्या वृद्ध पित्यानं असं कडकडून आलिंगन दिलं की, गदा पेललेला साक्षात त्या लोहप्रतिमेचा बाहू जोडसांध्यातून निखळून खाली पडला. त्याच्या खणखणाटानं प्रत्यक्ष भीमसेनच समोर आहे नि त्याची गदाच कोसळली की काय, या भ्रमानं त्या विरहव्याकूळ कुरुपित्यानं उरल्या लोहप्रतिमेला अधिक कडकडीत आलिंगन दिलं. प्रतिमेचा डावा हातही निखळला. मग 'भीमाऽ पुत्राऽ भीमसेनाऽ वीराऽऽ' असं म्हणत आलिंगनामागून आलिंगनं अशा आवेशात कसलेल्या त्या वृद्ध शोकमग्न पित्यानं

समोरच्या भीमसेनाच्या लोहप्रतिमेचे केलेले कटीच्या वरच्या भागाचे तुकडे–तुकडे पायीच्या पाषाणघडीवर खणखणाट करीत उतरले.

भीमसेन म्हणून प्रत्यक्ष लोहाचे तुकडे करताना, त्या वृद्ध कुरूचा देहही रक्तबंबाळ झाला. आपल्याच रक्ताच्या उष्ण स्पर्शाबरोबर भान येताच आपलं पांढरीशुभ्र दाढीमिश्याधारी मुख ओंजळीत घेऊन खाली बसताना, तो असाहाय्य वृद्ध पिता कसातरीच ओरडला, "माझ्या शंभर पुत्रांनो, तुम्हाला वधणाऱ्या त्या क्रूर भीमाचे मी तुकडे–तुकडे करून टाकले आहेत!! या, बघा ते! कुठे रे आहात तुम्ही पुत्रांनो!"

त्या अंध बंधूच्या पाठीवर आपला प्रेमळ हात ठेवून महात्मा विदुरांनी त्याला प्रथम थोपटलं. मग आपल्या हाताचा आधार देत विदुर त्याला त्याच्या कक्षाकडे संथ चालवीत घेऊन जाऊ लागले.

मी पाचही पांडवांसह दादाजवळ आलो. सात्यकी माझ्या निकटच होता. दारुक मात्र बाहेर गरुडध्वजातच थांबला होता.

भीमसेनाच्या लोहप्रतिमेतील पाषाणघडीवर पडलेल्या तुकड्यांतील एक तुकडा मी उचलला. त्याच्यावर रक्ताचे चुकार थेंब होते, पण ते एका विषण्ण पित्याचे! त्या तुकड्यांकडे बघत मी दादाला म्हणालो, "कुरुक्षेत्रावरच्या अठरा दिवसांतील एकेका महान योद्ध्याला वधताना तुझ्या सावध बुद्धिमत्तेचे झालेले सर्व आविष्कार या सात्यकीकडून मला ऐकायला मिळालेत. आज मात्र या बुद्धिमत्तेचा कळसाचा अध्याय समक्षच बघायला मिळाला. खरोखर आज तू नसतास, तर या महाबली भीमसेनाचं काय झालं असतं?"

त्या रात्रीचा आम्हा सर्वांचा पडाव हस्तिनापूरच्या सीमेवरच्या विदुरांच्या निवासात पडला.

विदुरपत्नी पारसवीदेवी पाककक्षात आम्हा सर्वांच्या भोजनाच्या तयारीला सेवक–सेविकांसह लागल्या. आम्ही सर्वच महामंत्र्यांच्या बाहेरच्या बैठकीच्या कक्षात बसलो. कक्षाच्या मध्यभागी मांडलेल्या सुवर्णी आसनावर दादा बसला. आम्ही त्याच्या समोरच बसलो. विदुर त्याच्या उजव्या हाताशी दोन्ही हात जोडून उभे राहिले. सर्व पांडव, त्यांच्या कुंतीमाता व द्रौपदीसह सर्व स्त्रिया लगतच्याच विश्रामकक्षात विश्रांतीसाठी गेले.

समोरच्या विदुरांना दादा म्हणाला, "सख्या विदुरा, तू कौरवांचा महामंत्री म्हणून इतकी वर्षं काम पाहिलंस, अत्यंत निष्ठेनं तुझं दायित्व सांभाळलंस. यापुढे तुला तेच काम पांडवांसाठी करावं लागणार आहे. सर्वप्रथम युधिष्ठिराच्या येथील राज्याभिषेकाची सर्व तयारी करून घे. अद्याप पितामह भीष्म कुरुक्षेत्रावर निर्वाणासाठी सूर्याच्या उत्तरायणाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांनी देह ठेवली की, लागलीच मला द्वारकेला वार्ता दे."

"आज्ञा द्वारकाधीश. माझ्यावर सोपविलेल्या कार्यात कसलीही त्रुटी राहणार नाही." महामंत्री विदुर किंचित वाकून अत्यंत आदरानं बोलले.

"दोन दिवस युधिष्ठिराला इथे विश्राम घेऊ दे. नंतर लागलीच त्याला पुन्हा कुरुक्षेत्रावर पाठव. पितामह त्याची प्रतीक्षा करताहेत. त्यांना युधिष्ठिराशी एकट्याशीच काही महत्त्वाचं बोलायचं आहे."

मला ते ऐकताना प्रकर्षानं जाणवलं की, पितामहांच्या भेटीसाठी कर्ण गेला होता,

तेव्हाही त्यांनी त्याच्याशिवाय इतरांना दूर जायला सांगितलं होतं. कर्णानंतर जन्माच्या अधिकारानं त्यांना युधिष्ठिराशीही काही एकांती बोलायचं असावं. बहुधा ते त्याला एकांतात राजनीती, धर्म, युद्धनीती, राजकर्म यांविषयी काही अनुभवाचं जीवनसार सांगणार असावेत. तसे सर्व पांडव कुरुक्षेत्रावर त्यांचं दर्शन घेऊनच निघाले होते. विशेष म्हणजे राजमाता कुंतीदेवी, द्रौपदी व सर्व पांडवस्त्रियांसह पितामहांना भेटून आल्या होत्या. त्यांच्याशी बोलताना पितामहांनी एक महत्त्वाची सूचना त्यांना दिली होती. अर्जुनाकडूनच मला ती समजली. पितामहांनी आमच्या आत्याबाईंना अनुभवाची सुज्ञ सूचना दिली होती की, 'युधिष्ठिराला हस्तिनापूरच्या सिंहासनाचा अभिषेक झाला की, दुसऱ्याच दिवशी तू हस्तिनापूर सोडून वानप्रस्थाचा मार्ग धरावा. त्यानंतर महाराज धृतराष्ट्र व गांधारी क्षणभरही हस्तिनापुरात थांबणार नाहीत. ते निकरानं वानप्रस्थाचाच आग्रह धरतील. युद्धात काहीही घडलं असलं, तरी तू आपल्या दीर–जावेची सोबत सोडू नये. त्या एकाकी दांपत्याला वनातही सहवासाचा आधार द्यावा.'

विशेष म्हणजे आत्याबाई कुंतीदेवींनी पितामहांच्या चरणांना मस्तक भिडवून त्यांच्या सूचनेला होकाराची मान डोलावली होती.

हे सर्व समजताच, माझा दादा आत्याबाई कुंतीदेवींना एवढं का मानत आला होता, त्याच्यावर माझ्या मनात स्वच्छ प्रकाश पडला. कुरुंच्यात काय, आम्हा यादवांच्यात काय, काही–काही स्री–पुरुष समजून घ्यायला तसे अवघडच होते. दादा तर मला अद्याप काहीच समजला नव्हता. मी एकाच गोष्टीच्या समाधानात होतो की, त्यानं मला आपला निःसंशय परमसखा मानलं होतं. "भावविश्वस्त' म्हणून माझा अनेकांशी बोलताना निःसंशय निर्देश केला होता.

भोजनाचा समय होताच महात्मा विदुर सर्वांना पाचारण करण्यासाठी आले. हात जोडून दादाला म्हणाले, "द्वारकाधीशांनी सर्वांसह भोजनाला चलावे."

तसं हसून दादा विदुरांना म्हणाला, "काय बेत आहे भोजनाचा विदुर?"

"आर्य, भोजन हे यज्ञकर्म जाणून साधाच ठेवली आहे. आपल्या आवडीच्या लवण घातलेल्या ताकातील कण्या मात्र पारसवीनं मी न सांगताच शिजविल्या आहेत. चलावं."

तसं आसनावरून उठून विदुरांच्या जवळ जात त्यांच्या खांद्यावर आपला हात ठेवत दादा म्हणाला, "विदुर, आज कण्यासुद्धा खाण्याची इच्छा नाही. देवी पारसवींना मला क्षमा करा म्हणावं. केवळ गडवाभर दूध घेईन मी – तेही यज्ञकर्म म्हणून!"

दादानं 'नाही' म्हणताच 'जशी इच्छा आर्यांची' म्हणत विदुरांनी त्याला वाकून पुन्हा वंदन केलं. लगेच माझा हात प्रेमानं धरून ते म्हणाले, "तुम्ही चलावं उद्धवदेव."

"मीही दूधच घेईन!" मी त्यांना नम्र नकार दिला.

मी आणि दादा बैठकीच्या कक्षात बसलो. विदुर दारुक, सात्यकींना घेऊन आत भोजनकक्षाकडे गेले. काही वेळातच राजसारथी संजय भेटीला आल्याची सेवकानं अग्रवार्ता आणली.

थोड्याच वेळात हात जोडून वंदन करीत दादासमोर कुरूंचे राजसारथी संजय उभे राहिले. तेही हस्तिनापुरातील दादाचे सखाच होते. पुढे होऊन त्यांचे दोन्ही हात प्रेमाने आपल्या ओंजळीत घेत दादा म्हणाला, "प्रिय संजया, उदयिक आम्ही द्वारकेकडे प्रस्थान ठेवणार आहोत. आजच राजमाता गांधारीदेवींना प्रातःकाली आम्ही त्यांच्या

भेटीस येत आहोत, अशी अग्रवार्ता दे.” ‘आज्ञा स्वामी’ म्हणत संजय निघून गेले.

दुसऱ्या दिवशी प्रातःकालची आन्हिकं आवरताना मला विदुरांकडून समजलं की, दादानं रात्री अन्नभक्षण न केल्यामुळे महात्मा विदुर आणि आमचा सारथी दारुक यांनीही दुधाशिवाय काहीही घेतलं नव्हतं. एकटा महारथी सात्यकी पोटभर जेवला होता

प्रातःकालच्या हस्तिनापुरी सूर्यदेवाला आपल्या चित्रविचित्र कलकलाटाचं अर्घ्यदान देत हस्तिनापूरच्या वना–उपवनांतील नानाविध पक्षी आकाशात भरारले. जीवनाचा नव्या दिवसाचा अर्थ शोधण्यासाठी अरण्यात निघून गेले. तत्पर दारुकानं दादाचा प्रिय सालंकृत गरुडध्वज विदुरांच्या निवासासमोर सिद्ध केला. दारुक रथनीडारूढ झाला. पाठीमागे पाचही पांडवांचे रथ होते. दादा प्रवासाचं वंदनीय वाहन म्हणून गरुडध्वजाच्या पायदंडीला नेहमीसारखं विनयानं हाताची निमुळती निळसर सडक बोटं टेकून ती मस्तकाला भिडवल्यानंतर एका झेपेतच रथारूढ झाला. त्याचं अनुकरण करीत एका बाजूनं मी आणि सात्यकी रथाच्या घेऱ्यात चढलो. दुसऱ्या बाजूनं कुरूंचे महामंत्री विदुर रथाच्या घेरात आले. गरुडध्वज रथाच्या ध्वजदंडावरील आम्हा यादवांचा राजध्वज गंगेवरून सुटलेल्या प्रातःकालच्या वाऱ्यावर मंद–मंद फडफडू लागला. त्याच्यावरचा उड्डाणाच्या पवित्र्यातील पंख विस्फारलेला, यादवांचं मानचिन्ह असलेला सुवर्णी गरुडही फडफडू लागला. चामडी खोबणीतील प्रतोद उपसून क्षणैक दादाचंच स्मरण करून दारुकानं ‘फटाऽफट!’ असा प्रतोदाचा हवेतच एक नित्याचा फटकारा दिला. नेहमीप्रमाणे अश्वांची धावती नावं घेत त्यानं ‘मेघाऽ शैब्याऽ बलाऽ’ म्हणत हातचे वेग आवरून चारही अश्वांना धावणीचा संकेत म्हणून झटका दिला. तसे चारही अश्व पुढचे सूर एकदमच उचलून सुजाणपणे ‘हिंःऽ हिंःऽ हिंःऽ’ म्हणत हिणहिणले. आता गरुडध्वज कुरूंच्या त्या प्राचीन राजवास्तूच्या रोखानं उधळणार तोच ‘कॉऽव कॉऽव’ करणारा एक काकपक्षयांचा थवा रथाच्या माथ्यावरून आडवा गेला. त्यातील काही पक्षयांची उडतानाच सोडलेली काळपट पांढऱ्या शिटेची रेघ चारही पांढऱ्याशुभ्र अश्वांच्या धवल पाठीवरून कुणालाच न कळता उमटून गेली. एका पक्षयाची शीट तर ध्वजावरच्या यादवांचं मानचिन्ह असलेल्या पक्षिराज गरुडाच्या विस्फारलेल्या दोन्ही सुवर्णी पंखांना छेदून गेली – कुणालाही नकळतच! माझ्या निकटच असलेला दादा डोळे मिटून पुटपुटला, ‘इडादेवी पुनातु माम्!’ गरुडध्वजाच्या रथाची समतोल चक्रं घरघरत फिरू लागली.

आमच्या कुशल सारथी दारुकानं हां–हां म्हणता रथ कुरूंच्या राजवास्तूच्या भव्यच भव्य महाद्वारावरच्या पूर्णविकसित सुवर्णी चांद्रप्रतिमेखालून प्राकारात घातला. राजमाता गांधारीदेवींच्या निवासी कक्षासमोरच आणून उभा केला. पाठोपाठ पांडवांचे रथही आले. अलीकडून मी व सात्यकी गरुडध्वजातून उतरलो. पलीकडून कुरुमंत्री महात्मा विदुर उतरले. सर्वांत शेवटी दादानं कुरूंच्या राजवास्तूच्या भूमीवर आपलं निळसर सडक बोटांचं चक्रवर्ती पाऊल ठेवलं.

विदुरांच्या मागून आम्ही सर्व जण चालू लागलो. इतक्यात जवळच असलेल्या गंगेच्या वळणावरून कर्कश केकाटत गेलेल्या टिटवीची कर्णभेदक लांबट, रेंगाळती शीळ सर्वांनाच ऐकू आली. तसं मस्तकावरच्या निळ्याभोर आभाळाकडे बघत दादाने आपले मत्स्यनेत्र मिटते घेतले. वक्षावरून उतरलेल्या टवटवीत वैजयंतीवरून त्याची निळसर सडक बोटं शांत फिरली.

राजमातेच्या निवासकक्षाकडे जाणारी वेगवेगळया वर्तुळाकार वळणं पायीच पार करीत, आम्ही त्या कक्षासमोर आलो. समोरच राजसारथी – कृष्णसखे संजय उभे होते. ते लगबगीने दादाला सामोरे आले. वंदन करून त्याचा उजवा हात आपल्या हातात घेऊन राजमातेच्या भेटीसाठी नेऊ लागले. दादाच्या डाव्या हाताशी विदुर चालले. उजव्या हाताकडून मी व सात्यकी चाललो. पाठीमागे सर्व पांडव होते. राजमातांना संजयांनी अगोदरच अग्रवार्ता दिल्यामुळे, काही सेविका दादाच्या स्वागतासाठी सामोऱ्या आल्या.

राजमाता अंत:पुरी कक्षात एका शिसमी मंचकावर बसल्या होत्या. मंचकाच्या पायथ्याशी अंथरलेल्या आस्तरणावर कितीतरी कुरुस्त्रिया बसल्या होत्या. त्यात दुर्योधनपत्नी भानुमती, दुर्योधनभगिनी व जयद्रथपत्नी दु:शलादेवी, गुरुद्रोणपत्नी कृपीदेवी अशा कितीतरी कुरुस्त्रिया होत्या.

दादाला व आम्हा सर्वांना येताना बघून राजमातेशिवाय सर्वच जणी आपापल्या मुखावर पदर ओढून घेत, उभ्या राहिल्या. काही स्पष्ट, काही कोंदटलेले हुंदकेही ऐकू आले. डोळ्यांवर शुभ्र पट्टी कितीतरी वर्षं घेतलेल्या राजमाता गांधारीदेवी मात्र मंचकावर निश्चल बसूनच राहिल्या होत्या. शांत – संगमरवरी मूर्तीसारख्या! त्यांना बघताच दादाची पावलंही क्षणैक अडखळली. दुसऱ्याच क्षणी लगबगीने तो पुढे झाला. मंचकावरून अधांतरी उतरलेल्या राजमातेच्या सुरकुरतलेल्या गौरवर्णी चरणांवर, गुडघे टेकून आपलं मस्तक चक्क भिडविताना म्हणाला, “मी वसुदेव, देवकीपुत्र – श्रीकृष्ण आपणाला वंदन करतो आहे, राजमाता.” राजमाता गांधारीदेवी क्षणैक गोंधळल्याच.

दुसऱ्याच क्षणी झटकन आपले दोन्ही चरण वर ओढून घेत, आपल्या शंभर पुत्रांच्या वियोगानं पिळवटून निघालेली ती राजस्त्री प्रथम अंगभर कसकसून गदगदली. दादाच्या हाताचा स्पर्शही नको म्हणून तिने आयुष्यात कधीच घातली नव्हती, अशी चक्क मंचकावर मांडी घातली. आजपर्यंत ज्याच्या चरणांचा स्पर्श व्हावा म्हणून आर्यावर्ताच्या नानाविध गणराज्यांतील स्त्री–पुरुषंनी ज्याच्या चक्रवर्ती चरणांवर आवेगानं धडाधड लोळण घेतली होती, त्या माझ्या दादाला त्याचं मस्तकही चरणांपासून लाथाडण्याचा हा पहिलाच अनुभव होता.

मी तर ते दृश्य बघून सटपटूनच गेलो. माझ्यासारखीच पांडवांसह दादाच्या सर्व सख्यांचीही स्थिती झाली. आता कक्षभर चमत्कारिक कोंदटलेल्या भावभावनांची दाटीच दाटी झाली. जिथे दादाचं जीवनभर एवढं ऐकत राहावंसं वक्तव्य करणारं मुखच बंद नि अवाक झालं होतं, तिथे इतर कोण काय बोलणार होतं?

बराच वेळ उभ्या देही बसल्या–बसल्याच गदगद हमसणाऱ्या एकटच्या राजमातांवर सर्वांची दृष्टी खिळून पडली होती. जिचे शंभर पुत्र भारतीय महायुद्धात वधले गेले आहेत, अशा त्या तापस व अतुल पतिव्रता राजस्त्रीच्या मनाच्या स्थितीची कल्पना कुणालाच करता येण्यासारखी नव्हती. प्रत्यक्ष दादालाही!

हमसून–हमसून शेवटी त्यांच्या त्याच केव्हातरी शांत झाल्या. डोळ्यांतून सतत पाझरणाऱ्या आत्मरसाच्या धाराच धारा श्वेत अंशुकाच्या पदरानं पुसून–पुसून त्या अपार श्रांत–क्लान्त झाल्या होत्या. स्वत:च स्वत:ला सावरून त्या काहीसं स्वत:शीच बोलल्यासारखं तुटक–तुटक म्हणाल्या, “कळत नाही – कळत नाही तुझ्या मनी काय–काय आहे ते! माझ्या शंभर पुत्रांचा विनाश करून, त्यांना निर्ममपणे वधून, तू माझ्या

भेटीलाही आलाहेस!" मंचकाच्या आस्तरणावर स्थिरावलेला त्या राजमातेचा सुरकुतलेला हात प्रेमानं थोपटत माझा प्रिय दादा म्हणाला, "राजमाते, पुत्र कितीही कुपुत्र झाला, तरी माता कधीच कुमाता होऊ शकत नाही. मी खरोखरच केवळ आपलं दर्शन घेण्यासाठी आलो आहे, कसलंही सांत्वन करण्यासाठी नाही. त्यासाठी तत्त्वज्ञानाचे ढीगभर हितोपदेश करणाऱ्या माझ्याजवळसुद्धा शब्दच नाहीत.

"तुला काय वाटतं, इतर सर्व जण फसले, तशी मीही तुझ्या शब्दजंजाळात फसेन? मनी आणलं. तर एकदा डोळ्यांवरून वस्त्रपट्टी खाली खेचून मी पुत्र दुर्योधनाला वज्रदेहाचा आशीर्वाद दिला, तशी आज या क्षणीही दुसऱ्यादा वस्त्रपट्टी खेचून एका दृष्टिक्षेपात तुझीही या सर्वांसमक्ष रक्षारांगोळी करू शकते! तू भ्रमात आहेस की, एकटचा तुलाच विश्वभरातले शब्द शरण आले आहेत. तू भ्रमात आहेस, एकटचा तुलाच काय ती राजनीती कळते. पण विसरून जा ते." गांधारीदेवी कडाडल्या.

एरवी समोरच्या कुठल्याही माणसाच्या मनाचा अचूक वेध घेणारा दादाही गोंधळला. तरीही नम्रपणे म्हणाला, "तेही मी पूर्णपणे जाणतो. तरीही मी न्रमपणाने दर्शनासाठी आलो आहे! मन:पूर्वक."

आता मात्र राजमाता गांधारीदेवी मंचकावरून उतरून ताठ उभ्याच राहिल्या. ऐकणाऱ्या आम्हा सर्वांच्याच अंगावर काटा यावा असा त्या राजमातेनं, कुलस्त्रीनं आपली जीवनभराची सर्व तपस्या पणाला लावून कणीदार स्पष्ट शब्दांत दादाला थरकावून टाकणारा भयाण शाप दिला, "माझ्या शंभर पुत्रांचा निर्दय, निर्मम वध करणारं महायुद्ध तूंच पेटविलंस. माझ्या कुरुवंशाचा तूच निर्वंश केलास. माझ्या सर्व सुनांना तूच विधवा केलंस. तुझ्या एकटचाची रक्षारांगोळी करून माझ्या मातृहृदयाला कधीच शांतता मिळणार नाही. यासाठी मी, गांधारांची कन्या, कुरूंची राजमाता, शिवभक्त गांधारी तुला, द्वारकेच्या यादवांच्या नायका, वसुदेव – देवकीच्या पुत्रा, श्रीकृष्णाऽऽ – तळतळून शाप देते आहे, आजपासून तीन तपांतच तुझाही तुझ्या सर्व यादवकुलांसह असाच वंशविनाश होईल!!! तुझ्या यादव कुलातील स्त्रियाही अशाच विधवा होतील! अर्जुनाला, युद्धात मारला गेलास तर स्वर्गात जाशील, जिंकलास तर राजा म्हणून या हस्तिनापूरचं राज्य उपभोगशील असं गौरवानं सांगणाऱ्या श्रीकृष्णा, मी शंभर पुत्रांची माता तुला पिळवटून शाप देते की, कुठल्याही युद्धात तू वीरगतीला न जाता, कुठल्यातरी रानावनात कुणालाही कळणार नाही, असा एकाकी य:कश्चित मरून पडशील!! जशी मी माझ्या पुत्रांना शोकानं तीळतीळ तुटते आहे, तशाच तुझ्या देवकी आणि रोहिणी या दोन्ही माता तुझ्यासाठी तीळतीळ तुटतील! तुझ्या आठही राण्या माझ्या सुनांसारख्याच विधवा होतील." अंगभर थरथर कापणाऱ्या त्या वृद्ध राजमातेनं आपली कृश बोटं कानशिलांजवळ जोरदार दाबून कडाकड मोडली. त्यांच्या पायाशी आस्तरणावर बसूनच दादानं अत्यंत पराकोटीच्या शांतपणानं तो शाप ऐकला. त्याहून शांतपणे तो म्हणाला, "शांत व्हावं राजमाते. मला आपल्याकडून या क्षणी हा असाच काहीतरी भयाण शाप मिळणार, याची पूर्ण अटकळ बांधूनच मी आपल्या दर्शनासाठी आलो आहे. चिंता करू नये. मी कसलाही उ:शाप मागणार नाही! आपला शाप मी स्थितप्रज्ञ मनानं स्वीकारला आहे. आज या क्षणीही आपण मला देवकी आणि रोहिणीमाता यांच्या ठायीच वंद्य आहात. इडादेवीच्या ठायीच मी आपणाला मानतो. ते ध्यानी घेऊन, आता मला आशीर्वादही द्यावेत – आपला शाप सोसण्याचं सामर्थ्य त्यामुळे मला लाभेल." दादानं

अत्यंत नम्रभावानं आपलं मस्तक त्यांच्या चरणांवर ठेवलं. आता मात्र मनाचा उद्रेक कितीतरी शांत झालेल्या त्या राजमातेनं वाकून थरथरत्या हातांनी दादाला वर उठविलं."

आपल्या तप:सामर्थ्यावर, सत्यनिष्ठेवर आभाळाएवढ्या उंच झालेल्या त्या राजमातेनं समोरच्या माझ्या दादाला, आवेगानं दुर्योधनाला घ्यावं तसंच गाढ आलिंगनात घेतलं. ते दोघेही काही क्षण नि:स्तब्धच एकमेकांच्या आलिंगनात तसेच राहिले. दोघांनीही सतत धावणाऱ्या काळालाही जसं काही जागीच थोपवून धरलं. त्या नि:स्तब्धतेतही ते एकमेकांशी मूकपणे काय नि केवढं बोलले, ते थांबलेल्या त्या काळालाही कळलं नसेल. ते केवळ त्या दोघांनाच माहीत होतं!!

ब्रही न बोलता राजमाता गांधारीदेवींना भेटून दादा त्यांच्या कक्षातून बाहेर जायला निघाला. हेलावलेले आम्ही सर्व त्या राजमातेचा चरणस्पर्श घेऊन विचारमग्न स्थितीतच त्याच्यामागून खेचल्यासारखे आपोआप निघालो. प्राकारात येताच त्यानं ज्येष्ठ पांडव युधिष्ठिराला सांगितलं, "तुम्ही सर्व बंधूनी विदुराच्या निवासात मातेच्या चरणाशी जावं. तीही पितामहांच्या आदेशाला मान देऊन पुढे वनातच जाणार आहे. तुम्ही शक्य तितकं कुंतीआत्येच्या सहवासातच राहावं. तिची काळजी घ्यावी." 'आज्ञा द्वारकाधीश' म्हणत दादाची चरणधूली मस्तकी घेऊन युधिष्ठिरासह सर्व पांडव निघून गेले.

आता गरुडध्वजानं द्वारकेकडे प्रस्थान ठेवलं. मी, दादा आणि सात्यकी रथारूढ झालो. दारुकानं 'जै इडादेवी' म्हणत गरुडध्वज हाकारला. मत्स्य, दशार्ण, कुंतिभोज अशा राज्यांत पडाव टाकत आम्ही निघालो. आनर्त पार करून आम्ही सौराष्ट्रातील नागेश्वर शिवालयात आलो. दादा आणि मी तर या शिवालयात पूर्वी अनेकवेळा येऊन गेलो होतो. हे आणि सोमनाथाचं शिवालय दादाचं अतीव प्रिय श्रद्धास्थल होतं. नागेश्वरात शिवपिंडीला अभिषेक करून आम्ही द्वारकेजवळच्या पश्चिम सागराच्या खाडीवर आलो.

दादानं सात्यकीकरवी होडीतून खाडीपार प्रद्युम्नाला अग्रवार्ता पाठविली. काही वेळातच तो आता पार थकलेल्या अमात्य विपृथूंसह सांब, संग्रामजित, वृक, चारुदेष्ण, बृहत्सेन, उन्नद, प्रघोष, वीर, श्रुत, भानु असे कित्येक बंधू व चुलत बंधू यांच्या समवेत दोन मोठ्या नौकांसह आमच्या भेटीला सादर आला. आम्ही नौकांतून द्वारकेच्या शुद्धाक्ष या पूर्वेच्या भव्य महाद्वारासमोर आलो. यापूर्वी अनेक वेळा या महाद्वारातून मी, माझे बंधू चित्रकेतू, बृहद्बल, बलिदादा व त्याचे बंधू गद आणि सारण कितीतरी हर्षोत्फुल्ल द्वारकाकरांचं स्वागत स्वीकारत प्रवेशलो होतो. आजचा माझा नि दादाचा सात्यकी व दारुकाबरोबरचा प्रवेश केवढातरी वेगळा होता. आम्ही अक्षौहिणीवर लढाऊ यादव वीर कुरुक्षेत्राच्या समरभूमीवर हरवून आलो होतो. दादा महाद्वारावरच्या मानचिन्हांकडे काही क्षण बघत उभाच राहिला. मग मात्र 'नमोऽस्तु इडामाते' एवढंच पुटपुटून वाकून त्यानं पूर्व महाद्वाराच्या समोरील प्रथम पायदंडीला हातस्पर्श देऊन, तो मस्तकाला भिडविला. तिच्यावर उजवा पाय ठेवून तो शांतपणे, स्वस्थचित्तानं चालू लागला. मला कळून चुकलं, या क्षणापासून तो जीवनाच्या एका वेगळ्या पर्वात प्रवेशत होता. कारण यापूर्वी त्यानं पूर्व महाद्वारं ओलांडताना, शुद्धाक्षासमोरील पायदंडीला हात लावून द्वारकेत प्रवेशताना, इडामातेचं कधीही स्मरण केलं नव्हतं.

कुरुक्षेत्रावरच्या महायुद्धाच्या इत्थंभूत वार्ता द्वारकेत केव्हाच पोहोचल्या होत्या. त्यामुळे पांडवांच्या विजयापेक्षा आपल्या असंख्य महावीरांच्या बलिदानानंच सर्व जण दु:खित झाले होते. शुद्धाक्षावर बलिदादा, वसुदेवबाबा, सुधर्मा सभेचे मंत्रिगण - कोणीच

आलेलं नव्हतं. दादाचा हा असा पहिलाच द्वारकाप्रवेश होता. तो मात्र नितांत शांत होता. भेटीस आले, त्यांना हात जोडून हसत विनयी प्रणाम करीत होता. हे त्याचं हास्य तर नेहमीसारखं नव्हतंच. ते बघ्या द्वारकाकरांना विलक्षण जाणवत होतं.

त्यानं सर्वांत प्रथम दर्शन घेतलं, ते देवकीमातेचं. त्यांच्या कक्षात त्यांच्या भेटीसाठी गेल्यानंतर त्यांची चरणधूल घेऊन तो एका आसनावर बसला. मी पुढे होऊन देवकीमातेचा चरणस्पर्श घेतला, तरीही त्यांनी मला ओळखलंच नाही. द्वारकेत नेहमी अनेक भगवी कौपिन धारण करणारे योगी, तापस येत असत. त्यांना मी त्यांपैकीच कुणीतरी एक वाटलो.

माझ्या रोखानं हातसंकेत देत दादा म्हणाला, “याला मी लवकरच गोकुळाकडे धाडणार आहे. याला तू ओळखलं नाहीस थोरले! हा आपला उद्धव आहे.” देवकीमाता माझ्याकडे बघतच राहिल्या. त्यांच्या मनी त्यांनी दादाला विचारायचेच म्हणून तयार करून ठेवलेले, कुरुक्षेत्राविषयीचे सर्व प्रश्न रानपाखरासारखे कुठच्या कुठे दूर उडून गेले होते. आता पार वृद्ध झालेल्या, सुरकुतल्या चर्येच्या, आम्हा सर्वांच्या थोरल्या माता डोळे बारीक करीत माझ्याजवळ आल्या. डोळे रोखून मला पारखून घेत म्हणाल्या, “खरंच की, हा आपला उद्धव आहे. मी ओळखलंच नाही. ही असली कसली वस्त्रं धारण केलीस पुत्रा? असेना का, सुक्षेम तरी आहेस!” त्यांनी माझ्या चर्येवर इडापिडा घेत, आपली थरथरती वृद्ध बोटं कानशिलाजवळ मोडली. मी न राहूवून त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवलं. मग माझ्या नि त्यांच्या बदरीकेदारचा आश्रम, माझा प्रवास, सगळ्यांचं क्षेमकुशल अशा वेगळ्याच विषयांवर बऱ्याच वेळ गप्पा झाल्या. त्यात कुरुक्षेत्रावरच्या भारतीय महायुद्धाचा विषयसुद्धा निघाला नाही.

मला दादाच्या चपखल व उचित बुद्धिमत्तेचं पुन्हा दर्शन घडलं. त्यानं एका वाक्यातच आमच्या भेटीतील वातावरणच बदलून टाकलं होतं. कितीही मोठे दाटलेले काळमेघ असले, तरी वातावरण समूळ बदलून टाकण्याचं प्रचंड सामर्थ्य त्याच्या केवळ एकेका शब्दात होतं, याचा मला पुन्हा प्रत्यय आला.

थोरल्या मातेचं दर्शन व भेट आटोपून आम्ही वसुदेवबाबांच्या भेटीसाठी गेलो. त्यांना भेटल्यानंतर गुडघे टेकून आपलं मस्तक त्यांच्या चरणांवर टेकून उठताच, त्यानंच बाबांना प्रश्न केला, “उग्रसेन महाराजांची काही वार्ता?”

आता द्वारकेतील इतर कुणाहूनही वयस्क झालेले वसुदेवबाबा, त्या प्रश्नाबरोबर पटकन मथुरेत जाऊन पोहोचले. मान डोलावत म्हणाले, “बरेच दिवस झाले, त्यांची काहीच वार्ता नाही. कसे आहेत ते आणि माझी मथुरा, इडा जागे!”

तसं त्यांना अधिक चिंतेत न ठेवता दादा पटकन म्हणाला, “महाराज, आपण किंचितही चिंता करू नये. आपल्या वृद्ध शालेल्या अमात्य विपृथूंना आपण विश्रांतीस्तव घरीच ठेवलं आहे. त्यांच्या स्थानावर त्यांचा पुत्र सुकृत नियुक्त केला आहे. त्यालाच धाडावं मथुरेला. आपलं काय मत आहे यावर?”

“तुझा निर्णय बदलणार तरी कसा? तो योग्यच आहे.” वसुदेवबाबा म्हणाले.

माझ्याकडे आशयपूर्ण बघत तो हसून म्हणाला, “ठीक आहे तर मग! या उद्धवाला धाडतो अमात्य विपृथूंच्या निवासावर. त्यांनाही तेवढंच समाधान मिळेल.”

पाऽर थकलेल्या वसुदेवबाबांनीही कुरुक्षेत्राच्या प्रश्नाला आपणहून स्पर्श केला नाही. दादाला सुखरूप समक्ष सुक्षेम पाहून, त्यांचे इतर प्रश्न त्यांनी आपणहूनच मनात

ठेवले.

मग आम्ही रोहिणीमाता, बलिदादा, रेवतीवहिनी, आचार्य सांदीपनी आणि गुरुपत्नी यांच्या भेटी घेतल्या. दादाला समक्ष समोर बघताच सर्वांच्याच मरगळलेल्या चर्या पुन्हा तरारून आल्या. एकटा बलिदादा त्याच्या प्रिय शिष्याच्या – दुर्योधनाच्या नियमबाह्य वधामुळे अद्याप आपल्या प्रिय बंधूवर रोषातच होता. भेटीत तो दादाला म्हणालाही – अगदी राजमाता गांधारीदेवींच्या शब्दांत, "कुरुक्षेत्रावरच्या उत्पाती महायुद्धाचं सगळं मूळ तूच आहेस. त्या बिचाऱ्या राजमातेचे शंभर पुत्र वधले गेले. काय वाटलं असेल त्यांना? असेल इतरांसाठी अहंमन्य – दुर्योधन तुझा प्रत्यक्ष व्याही होता. तुझ्या सांबाचा दुर्योधनाच्या लक्ष्मणेशी मीच पुढाकार घेऊन विवाह लावून दिला होता. एकाच उद्देशाने की, व्याही-च्याही म्हणून तरी तू आणि दुर्योधन भविष्यात कधीतरी एक व्हाल – एकमेकांचे स्नेही व्हाल!"

आपल्या भोळ्या दादाच्या मनातील राजकारणाचे आडाखे ऐकून कृष्णदादा मजेदार हसला. म्हणाला, "ज्येष्ठा, अगदी विचारपूर्वक गांधारीदेवींची भेट घेऊन, त्यांनी दिलेला घोर शाप स्थितप्रज्ञ वृत्तीनं स्वीकारूनच मी द्वारकेत आलो आहे. माझा ज्येष्ठ बंधू म्हणून तुलाही त्या शापाची झळ लागणार आहे. त्यामुळेच रुष्ट होऊन तूही मला या वेळी शापच देणार असशील, तर तोही स्वीकारण्याची माझी तयारी आहे – अगदी त्याच स्थितप्रज्ञ वृत्तीनं!"

"शाप? कसला शाप?" बलिदादानं आपले भोकरनेत्र अधिक विस्फारत विचारलं.

"यादवांच्या वंशविनाशाचा!!"

आता मात्र एवढा प्रचंड गदावीरांचा गदावीर, रैवतक पर्वताच्या वक्षाचा, धडाडीचा निर्भय बलिदादाही सुन्न झाला – नि:शब्द झाला.

तो काहीच बोलत नाही हे बघून माझा दादा त्याला धीर देत म्हणाला, "बलभद्रदादा, या विश्वात जे–जे म्हणून जन्म पावत ते-ते कधी ना कधी विनाश पावणारच असतं! अग्नीच्या भक्षयस्थानी पडणारं असतं! तू मला विश्वास देऊ शकतोस काय की, मला शाप देणाऱ्या वंदनीय राजमाता गांधारीदेवी अग्नीच्या भक्षयस्थानी पडणार नाहीत असा! मी चांगलं जाणतो की, जिकडे धनुर्धर पार्थ आणि चक्रधर श्रीकृष्णा, तिकडेच धर्म आणि विजय, हे काही खरं नाही. ज्याला आदि नाही आणि अंत नाही, त्या काळाच्या मनी असेल तोच धर्म! आणि त्याचाच विजय – हे सत्य आहे. माझा तुला बंधू म्हणून एकच परामर्श आहे..."

"कसला? तुझा परामर्श म्हणजे तुझी कुटिल राजनीती, हे आता आणखी काही सिद्ध व्हायचं राहिलं आहे काय? सांग, कसला आहे तुझा परामर्श?"

"दादा, तू मनोवेग आवरावा. तू पटकन संतप्त होतोस आणि अलीकडे पटकन शांत होण्याची पूर्वीची तुझी सवय मोडली आहे. दोन्हींचाही मनोमन एकदा शांतपणे त्याग करता येईल काय, स्थितप्रज्ञ होता येईल काय, याची चाचपणी करून बघ."

नेहमीसारखी 'पण – परंतु'ची कसलीही संधी बलिदादाला न देताच, दादा त्याच्या कक्षाबाहेर जायला वळला. मी आपोआपच त्याच्या पाठीशी झालो.

दादाच्या सूचनेनुसार दोनच दिवसांत यादवांचा युवराज या नात्यानं बलिदादानं सुधर्मा राजसभा बोलावली. राजसभा यादव स्त्री–पुरुषांनी कशी खचाखच भरून गेली.

सर्वांना एकच उत्सुकता होती – दादा काय बोलणार याची! कुरुक्षेत्रावरच्या अठरा दिवसांच्या घनघोर युद्धाचे सर्व वृत्तान्त द्वारकेत पोहोचले होते. या युद्धात उत्तरायणाची प्रतीक्षा करीत शरपंजरी पडलेल्या भीष्मांखेरीज, केवळ नऊ योद्धे एका निःशस्त्र सारथ्यासह वाचले होते. द्वारकेच्या यादवांतील एक अक्षौहिणीवर योद्धे वीरगतीला गेले होते. जवळ-जवळ प्रत्येक घरातील एक ना एक योद्धा कुरुक्षेत्राच्या समरभूमीवर वधला गेला होता. त्यांच्याविषयी कृष्णदादा काय बोलतो, याची सर्वांनाच अपार उत्कंठा होती.

सभेच्या कामकाजावर आपल्या उंचशील देहानं आणि कणखर आवाजानं आजपर्यंत अमात्य विपृथू शासनबद्ध नियंत्रण ठेवत आले होते. आता ते पार म्हणजे पारच थकले होते. तरीही आज दादावरच्या नितांत श्रद्धेनं आणि प्रेमानं ते आपला कार्यभाग पार पाडण्यासाठी आले होते. त्यांच्या निकटच आसनावर त्यांचा पुत्र नवनिर्वाचित सुकृतही बसला होता. वृद्ध विपृथूंनी आपल्या अमात्याच्या जागी उभं राहून यादवांचा रत्नजडित राजदंड उंचावताच, सभागृहात कळ दाबावी अशी, पश्चिम सागराची गाज तेवढीच स्पष्ट ऐकू यावी, अशी शांतता पसरली.

वृद्ध अमात्य त्रोटक–त्रोटक शब्दांत सभेचा प्रारंभ करताना म्हणाले, “द्वारकाधीशांचं द्वारकेच्या नगरजनांना – हे... हे... कितीतरी दिवसांनी होणारं शुभदर्शन आहे.

“आम्हा – आम्हा यादवांना जरासंधापासून समराचा – समराचा सराव आहे. आमची मनं – मनं आम्ही युद्धातील लक्षावधींची हानी सोसण्यासाठी केव्हाच तयार केली आहेत. एक सत्य आमच्या रक्ताच्या कणाकणांवर आता कोरलं गेलं आहे की, सत्याच्या आणि धर्माच्या रक्षणासाठी लाख मरोत, पण – पण त्या लाखांचा पराक्रमी पोशिंदा – पोशिंदा सुखरूपच राहो!

“मी – मी द्वारकाधीश कृष्णदेवांना निरामय आरोग्याचं उदंड आयुष्य लाभो, असं त्या इडादेवीला समस्त यादवगणांच्या वतीनं आणि माझ्या वतीनं साकडं घालतो, आणि सभेला प्रारंभ करून तिची सूत्रं आपल्या हाती घ्यावीत, अशी हलधर बलरामांना मी विनंती करतो.

जय इडादेवी!”

थकल्या वृद्ध अमात्यांनी राजदंडाचा प्रथेचा ठोका मात्र सवरंना स्पष्ट ऐकू जाईल असा आवेशान उठविला.

आम्हा यादवांचा युवराज बलिदादा आपल्या प्रशस्त सुवर्णी सिंहासनावरून उठला. गच्च दाटलेल्या सभागृहभर एकदा दृष्टी फिरवून तो म्हणाला, “यादवबांधव हो! बोलणं हा काही माझा स्वभाव नाही. आज तर मी काहीच बोलणार नाही. केवल ऐकणार आहे. तुम्हा सर्वांच्या द्वारकाधीशानं, माझ्या कनिष्ठ बंधू श्रीकृष्णानं, त्याला वाटतंय ते स्पष्ट मोकळ्या मनानं तुम्हा–आम्हाला सांगावं.” बलिदादा आमच्याकडे बघत पुन्हा खाली बसलाही.

आता यच्चयावत सुधर्मा राजसभेतील सर्व स्त्री–पुरुषंचे डोळे एकटक जोडले गेले, ते माझ्या प्रिय दादावर. निकटच्या वहिनी आणि मीही केवढयातरी उत्कंठेनं त्याच्याकडेच बघू लागलो.

तो उठला. सुधर्मा सभागृहभर आपली शांत दृष्टी त्यानं एकदा फिरविली. आचार्य

सांदीपनी आणि गुरुमाता यांना दृष्टीनं दुरूनच वंदन करून तो बोलू लागला. त्याच्या विमल दीर्घ ओठांतून यादवगणांनी कधीच विसरू नये, अशी अमर कृष्णवाणी स्त्रवू लागली. आजही ती तेवढीच वेणुवाणीसारखीच मधुरच होती. तो म्हणाला, "अठरा कुलांतील माझ्या प्रिय समस्त यादवबांधवहो! तुम्हा प्रत्येकाच्या डोळ्यांत मला एकच उत्कंठापूर्ण प्रश्न तरळताना स्पष्ट दिसतो आहे. त्याचं मला समजतंय ते उत्तर देण्यापूर्वी, तुम्हा लक्षावधी यादवांची जीवनभर निष्ठेनं सेवा केलेल्या आणि आता वृद्धत्वामुळे थकलेल्या अमात्य विपृथूंना मी विनंती करतो की, केवळ प्रथा म्हणून त्यांनी सभागृहात यापुढे एक क्षणही ताटकळत उभं राहू नये. कुणीतरी सेवकानं त्यांना बसण्यासाठी आसन द्यावं. अमात्यांनी पूर्ण विश्वास धरावा की, ते बसल्यामुळे यादवांचा राजदंड किंवा राज्य बसणार नाही. ते आमच्या उडत्या पवित्र्यातील पक्षिराज गरुडासारखं सदैव भरारतच राहील – अमर होईल!" त्याच्या शब्दाशब्दांबरोबर सर्व यादवांनी टाळ्यांचा कडकडाट करून त्याला तसाच प्रतिसाद दिला.

टाळ्यांचा कडकडाट ओसरताच दादा पुन्हा बोलू लागला, "मी मघा म्हणालो, तुम्हा प्रत्येकाच्या डोळ्यांत एक प्रश्न तरळताना मला स्पष्ट दिसतो आहे. कोणता तो प्रश्न? कुरुक्षेत्रावरच्या महायुद्धानं काय साधलं? कौरव– पांडवांना पुढे करून आर्यावर्तातील लक्षावधी योद्धे मृत्यूच्या खाईत लोटून या द्वारकाधीशानं काय मिळवलं? हस्तिनापुरातील, द्वारकेतील आणि आर्यावर्तातील लक्षावधी विधवांचं आता कोण आणि कसं सांत्वन करणार? या महायुद्धाची भारतवर्षाला खरोखरच आवश्यकता होती काय? कशासाठी पेटविण्यात आला हा मृत्यूचा महायज्ञ?" त्यानं जमलेल्या प्रत्येकाच्या मनामनातील प्रश्न आपणच स्पष्ट उच्चारून दाखविला. त्यामुळे तर पूर्वीच दाटलेली शांतता, आता समुद्रगाजेचं बोट धरून अंगावर धावून आल्यासारखी असह्य झाली. तसं पुन्हा एकदा क्षणमात्र हेतुत: थांबून, त्यानं सुधर्मा सभागहभर अर्धवर्तुळाकार दृष्टी फिरविली. आणि तो बोलू लागला.

"प्रिय बांधवहो! तुम्ही काय, मी काय, जीवनाचा एकाच अंगानं नेहमी विचार करतो. दुसऱ्या दिशेन त्याचा विचार करण्याचा कधी यत्नच करीत नाही. तुम्ही सर्वांनी असाही विचार करून बघावा की, कुरुक्षेत्रावरचं भारतीय महायुद्ध झालंच नसतं तर? तर आर्यावर्ताच्या ठिकठिकाणच्या गणराज्यांचं रूप कसं झालं असतं?

"युधिष्ठिराच्या द्यूतातून प्रेरणा घेऊन ठिकठिकाणचे नरेश काहीही पणाला लावून, अगदी जन्मदात्री मातोश्रीसुद्धा पणाला लावून, द्यूत खेळले नसते का? हस्तिनापूरच्या कुरूंनी द्यूतगहात केलेल्या द्रौपदीच्या विटंबनेतून प्रेरणा घेऊन, देशोदेशींच्या राजनगरातील चौकाचौकांत असाहाय्य कुलस्त्रियांची रस्त्या–रस्त्यांवर होणारी विटंबना बघायची होती काय? मीच कर्ता, मी म्हणेन तेच सत्य, असा अहंपणा निष्ठेनं जोपासणाऱ्या दुर्योधनापासून प्रेरणा घेऊन देशोदेशीचे नरेश वागले असते तर? काय झालं असतं स्वरूप या आर्यावर्ताचं? दूरच्या गांधारदेशाहून येऊन हस्तिनापुरात यथेच्छ राजकीय धूमाकूळ घालणाऱ्या शकुनीपासून प्रेरणा घेऊन, इथे कुठूनही आलेल्या कुटिलांनी आपलं घरं केलं असतं तर?

"बंधूंनो, मानवजात जशी कधी–कधी मानवतेच्या अत्युच्च शिखरापर्यंत पोहोचते, तशी ती क कधी–कधी अमानुषतेच्या परमनीच रसातळालाही जाते. रात्रीमागून दिवस असतो, तसाच या दोन्हींना संधिप्रकाशही असतो. अखंड गर्जत्या या पश्चिम सागराला

चरमसीमेची भरती असते, तशी मागे हटण्याच्या चरमसीमेची ओहोटीही असते. दोन्ही वेळांना किनाऱ्याच्या वाळूत मुरणाऱ्या पाण्यासाठी सागराला हकहळून चालत नाही.

"कुरुक्षेत्रावरच्या या भारतीय महायुद्धाच्या महायज्ञचंही तसंच आहे. माझ्या प्रिय सख्या अर्जुनाला, या बंधू उद्धवाला मी नेहमीच सांगत आलो, काळ हा अखंड आहे. जीवन हे तसंच चिरंतन आहे. असीम आहे. दुर्योधन असो, दुःशासन असो, महात्यागी पितामह भीष्म असोत वा दिग्विजयी कर्ण असो, कुणालाच आपल्या कोटबंद जीवनात राहून या चिरंतन सत्याचा आत्मप्रत्यय कधीच घेता येणार नाही. त्यासाठी गगनमंडलात तळपत्या तेजमण्याखाली प्रत्येकालाच कधी ना कधी जीवनाच्या संग्रामात उतरावंच लागेल.

"कुणी सांगावं उद्या तुम्हा समस्त यादवांना आणि परवा मलाही तसंच उतरावं लागणार नाही म्हणून!

"कुरुक्षेत्रावर वीरगतीला पोहोचलेल्या लाखो योद्ध्यांचा जीवनानुभव तुम्ही कधीच विसरू नये. प्रसंगी याहून विदारक जीवनानुभवाला तुम्हा लाखो यादवांनाही सामोरं जावं लागेल. यासाठी अर्जुनाला समरभूमीवर केलेल्या हितोपदेशातील मोजक्याच भागाचा मी पुनरुच्चार करतो. लक्षात असू द्या, अखंड आणि अमाप भोग–उपभोग म्हणजे जीवन नव्हे. प्रत्येक स्त्रि–पुरुषला पंचेंद्रिय लाभलीत. त्यातील चवीचा अनुभव देणाऱ्या एका जिभेचंच उदाहरण देतो. या जगात इतकी म्हणून काही विविध चवींची फळं आहेत की, त्या प्रत्येकाची एकदा तरी चव ध्यायची असा कुणी दृढ अट्टाहास धरला, तर त्याचं उभं एक जीवनही त्यासाठी त्याला पुरं पडणार नाही. हेच उदाहरण इतर सर्व इंद्रियांनाही लागू आहे.

"कुठल्याही फलाची अपेक्षा न धरता निष्काम कर्म करणं, हाच जीवन अधिक सहजरीत्या समजून घेण्याचा एकमेव सोपा मार्ग आहे. तो आचरायला अवघड अवश्य आहे, पण कडू औषधी वनस्पती जशी हितकारक ठरते, तसाच तो हितकारक आहे

"यापेक्षा अधिक मला तुम्हाला या क्षणी काहीही सांगायचं नाही. दोन गोष्टी मात्र आवर्जून करायच्या आहेत. त्यातील पहिली गोष्ट आहे, आपल्या सुधर्मा राजसभेची आमुलाग्र सुधारणा ही! या सुधर्मा सभेतील अर्ध्याहूत अधिक वृद्ध मंत्रिगणांना मी उचित असा विश्रांतीचा परामर्श देतो आहे. त्याचा प्रारंभ आजच अमात्यांपासून करतो आहे. उद्यापासून अमात्यपदाचा कार्यभार त्यांचे पुत्र सुकृत सांभाळतील. पूर्वीच घोषित केलेली ही नियुक्ती उद्यापासून प्रत्यक्षत येईल. इतरांची नियुक्ती युवराज बलरामदादा करतील.

"सर्वांत महत्त्वाचं काम मी आज करणार आहे, ते आहे माझ्या परमसखा बंधू उद्धवाच्या विषयी! तुम्हा लाखो यादवांत तो सर्वथा त्यासाठी मला यथायोग्य वाटतो आहे. मी त्याला तुम्हा सर्व यादव बंधूभगिनींच्या साक्षीनं आणि संमतीनं 'अवधूत' ही उपाधी घोषित करतो आहे.

"'अवधूत' म्हणजे सर्व लौकिकापासून कमलदलासारखा अलिप्त झालेला – खरा जीवनमुक्त. संन्याशालासुद्धा मोक्षाची कामना असते. अवधूताला तीही नसते!"

त्याच्या घोषणेबरोबर समोरच्या सहस्त्रावधी यादवांनी टाळ्यांच्या कडकडाटाचा पर्जन्य वर्षविला. दादा आपल्या आसनावरून उठून माझ्या आसनासमोर आला. त्याच्या आदरापोटी मीही आपोआपच उभा राहिलो. तसं माझ्या ध्यानीमनी नसताना त्यानं

आपल्या कंठातील टपोऱ्या शुभ्रधवल फुलांची लांबलचक वैजयंतीमाला उतरवून ती माझ्या कंठात चढविली. सभागृहाकडे वळून तो म्हणाला, "आपल्या या एकट्या अवधूत उद्धवानं मी गोकुळातून मथुरेत आलो, त्या पहिल्याच दिवशी पहिल्याच भेटीत यमुनेच्या वाळवंटात माझ्या कंठात चढविलेली कदंब फुलांची माला, मी जीवनभर कधीच विसरू शकलो नाही!"

हर्षोत्फुल्ल झालेल्या असंख्य यादवांनी टाळ्यांचा पुन्हा गजर केला. चोहोकडून बोल उठले, "अवधूत उद्धवदेवाऽऽ धन्य होऽऽ जय होऽ!", "काहीतरी बोला अवधूत उद्धवदेव! बोला, थांबू नका." सर्वांनी आग्रह धरला.

सर्व प्रिय यादवांचा आदेश शिरोधार्य मानून मी वाकून नम्रपणे म्हणालो, "माझ्या प्रिय दादाला, तुम्हा सर्वांच्या द्वारकाधीशाला प्रथम मी नम्रभावानं वंदन करतो. जीवनभर 'मी कोण आहे' याचा शोध घेतं चिंतन केलं. मला माझी ओळख करून देणारा मार्ग सापडत नव्हता. चिंतनाच्या एका टोकावर येऊन मी कित्येकदा थांबलो. आज नेमकं मला कळलं, मी कोण आहे! दादाचं म्हणणं खरं आहे. मी 'अवधूत' पदासाठीच जगलो. तळमळलो. त्याला जसं योग्य मुखातून, पितामहांच्या तोंडून सर्वप्रथम 'वासुदेव' ही साद ऐकताना वाटलं असेल, तसंच प्रत्यक्ष त्याच्या तोंडून आज मला 'अवधूत' शब्द ऐकताना वाटतं आहे. त्यानं अचूक पारखून प्रेमभावानं मला दिलेल्या 'अवधूत' या उपाधीचा मी नम्रपणे स्वीकार करतो. पण – पण त्यानं कंठी चढविलेली ही वैजयंतीमाला काही क्षणांपेक्षा अधिक धारण करण्याची माझी खरोखरच योग्यता नाही. तो अधिकार केवळ त्याचा आणि त्याचा एकट्याचाच आहे. कारण ती कुणी दिली आहे, हे सर्व मी चांगलं जाणतो. त्यानं 'अवधूत' म्हणून माझ्यासमोर उभ्या केलेल्या सर्व–सर्व कर्तव्यांचं दायित्व मी आजपासून निष्ठापूर्वक स्वीकारलं आहे. पण ही त्याची व त्याच्या सख्या, भक्तांची प्रिय वैजयंतीमाला मी नम्रपणे त्याच्याच चरणांशी ठेवीत आहे." मी कंठातील वैजयंतीमाला पटकन उतरवून ती पुन्हा दादाच्या चरणांशी ठेवली. दादानं हसतच ती उचलून वक्षाशी बिलगती घेतली. तसा आनंदविभोर यादवांच्या टाळ्यांचा पुन्हा एकदा कडकडाट झाला.

हस्तिनापुराहून वार्ता आली – कुरुक्षेत्रावर उत्तरायणाचा मुहूर्त साधून शरपंजरी पितामह भीष्मांनी निर्वाण केलं होतं, युधिष्ठिरानं पुन्हा कुरुक्षेत्रावर जाऊन रोज थोडा–थोडा असा त्यांचा राजाची समस्त कर्तव्य सांगणारा अंतिम हितोपदेश ऐकला होता. जसा अर्जुन दादाच्या मुखातून गीतेचा हितोपदेश ऐकून धन्य झाला होता, तसा युधिष्ठिरही पितामहांच्या तोंडून राज्योपदेश ऐकून कृतार्थ झाला होता. त्याच्यासह चारही बंधू होते. त्यांनाही तो ऐकायला मिळाला होता.

पांडवबंधूंनी कुरुक्षेत्रावरच ब्रह्म सरोवराकाठी पितामहांचे यथाविध सर्व धार्मिक अंत्यसंस्कार केले होते. सर्व बंधू आता युधिष्ठिराच्या राज्याभिषेकाच्या तयारीला लागले होते. दादानं ती वार्ता ऐकताच सात्यकीला हस्तिनापुरी धाडलं. आता तो द्वारकेतील दैनंदिन नित्यकर्म पार पाडली की, रोज सायंकाळी हटकून पश्चिमेच्या ऐंद्र महाद्वाराजवळच्या पाषाणी बैठकीवर बसण्यासाठी माझ्यासह जाऊ लागला. अशा एका बैठकीत समोर दिसणाऱ्या अविरत गर्जत्या लाटांकडे बघत तो एकदा मला म्हणाला, "अवधूता, तुला आश्चर्य वाटलं असेल की, मी पितामह भीष्मांच्या अंत्यविधीसाठी कसा

काय गेलो नाही! पण अंगराज कर्णाचं दहन मात्र मी स्वहस्ते केलं हे कसं काय?

"हे समजण्याची केवळ तुझीच क्षमता आहे म्हणून सांगतो. आम्ही तिघंही जीवनभर जलपुरुष म्हणूनच वावरलो. यातील आजन्म ब्रह्मचारी सत्यवचनी, घोर प्रतिज्ञ पितामह भीष्म जन्मत: जीवनमुक्तच होते. त्यांना कसल्याही जलांजलीची आवश्यकताच नव्हती. दुर्योधनाच्या कुटिल राजकारणी स्नेहात अडकलेल्या कर्णाला ती होती. म्हणून तर महाभारतीय युद्धातील लक्षावधी योद्धयांपैकी एकटया कर्णाला मी ती दिली. उधो बंधो, तूच एकटा समजू शकतोस की, कुंतीआत्येनं त्याचा जन्मत:च त्याग केला नसता तर – जीवनभ्रमंतीत तो दुर्योधनाच्या मंडलात आलाच नसता तर – तर माझ्याप्रमाणेच पितामह भीष्मांनी त्यालाही 'वासुदेव' म्हटलं असतं!" त्याच्या शब्दाशब्दांबरोबर समोरच्या पश्चिम सागराच्या लाटांकडे बघत मी विचारात पडलो. जसा लाटांचा लागत नव्हता, तसा त्याच्या विचारांचा अंत लागत नव्हता.

मला स्तब्धच बघून दंडाला धरून गदगद हलवत दादा म्हणाला, "अरे अवधूता! कुठे हरवलास एवढ्यात? माझा निरोप आणि संदेश घेऊन सात्यकी हस्तिनापुराकडे गेला आहे. तुला जायचं आहे गोकुळाकडे – जसा मी गोकुळाहून मथुरेत प्रथम येताच, माझा संदेश घेऊन गोकूळवासी जनांच्याकडे गेला होतास तसाच!"

केवढी–केवढी कल्पनाही न करता येणारी जीवनाची वळणं तो पार पाडून आला होता. तरीही गोकुळीच्या अश्राप गोपगोपींचं चाखलेलं दही, दूध, लोणी तो काही विसरला नव्हता. त्याच्यासंगती जन्मदात्या मात्यापित्यांना विसरून, घरदार विसरून, रानावनांत नाना खेळ खेळलेल्या सवंगड्यांना तो जीवनदेठापासून पारखा झाला नव्हता. मी त्याच्या मत्स्याकृती काळ्याशार सखोल दीर्घ नेत्रांत एकटक बघत राहिलो. तो हसूनच म्हणाला, "उधो, बंधो, तुला नि तुलाच गोकुळाकडे जायचं आहे – माझा प्रतिनिधी म्हणून – अवधूत म्हणून – मीच म्हणून!"

दादाच्या आज्ञेप्रमाणे दुसऱ्याच दिवशी दारुकासह त्याचा गरुडध्वज घेऊन मी शुद्धाक्षातून खाडी उतरून मथुरेकडे निघालो. सौराष्ट्र, दशार्ण, भोजपूरनगर असे पडाव टाकीत युमना नदी पार करून मथुरेत आलो. केवढी पालटली होती आता ही मथुरा! आज मला प्रकर्षानं जाणवलं की, वासुदेव श्रीकृष्ण म्हणत आला, ते किती–किती सत्य होतं! भोवतीचं हे जग क्षणाक्षणाला बदलतं आहे. 'वाढ आणि विकास' हीच त्याची लक्षणं आहेत. जरासंधाची आक्रमणं टळल्यामुळे मथुरेची आता कितीतरी भरभराट झाली होती. अपार वृद्ध उग्रसेनमहाराज आता राजसभेत येत नव्हते. त्यांनी नियुक्त केलेला राजा मथुरेचा कार्यभार बघत होता. उग्रसेनमहाराजांचं दर्शन घेऊन, आमची राजवास्तू एकदा संपूर्ण फिरून, नौकेतून मी रथासह दारुकाला घेऊन गोकुळात प्रवेशलो. आता नंदबाबानंतरच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीतील गोप सर्वत्र वावरताना दिसत होते. आमचा चार शुभ्र घोड्यांचा गरुडध्वज नंदबाबांच्या त्याच जुन्या मुखियावाड्याच्या पश्चिम द्वारासमोर उभा राहिला. मी आल्याची अग्रवार्ता आता पार थकलेल्या, कटीत वाकलेल्या नंदबाबांना तिसऱ्या पिढीतील एका तरुण गोपानं दिली. ती ऐकताच नंदबाबा आणि यशोदामाता, दोघेही अनेक गोपांच्या मेळांतून वाड्याच्या पश्चिम द्वारपाशी आले. सुरकुतल्या देहाची, चर्येची आणि पांढऱ्याशुभ्र केशावळीची यशोदामाता भुवयांवर हाताची झड घेऊन माझ्यासमोर आली. ती नंदबाबांना मागे टाकून केव्हाच पुढेशी झाली होती. थकलेले डोळे झडीखालून बारीक करीत तिने माझ्याकडे कितीतरी वेळ नुसतंच

निरखून बघितलं. मग मात्र ती थरथरत्या बोलांत म्हणाली, “हा – हा आपला कन्हैय्या नव्हे!” नंदबाबाही तिला साथजोड देत म्हणाले, “नक्कीच नव्हे. हा आपला कान्हा नव्हे. त्यानं कधीच – कधीच अशी भगवी वस्त्रं पांघरली नसती!”

मी झटकन पुढे होत त्या दोघांची चरणधूली मस्तकी घेतली. म्हणालो “मी तुमचा कान्हा – कन्हैय्या नव्हे. तो द्वारकेत सुक्षेम आहे. मी त्याचा चुलतबंधू उद्धव. तो द्वारकेच्या कार्यभारात एवढा गुंतला आहे की, त्याला क्षणाचाही समय नाही. त्याच्या आज्ञेवरूनच मी आलो आहे. मागंही एकदा मी आलो होतो. त्याचा संदेश आहे – तुम्ही कुणीच चिंता करू नये. मी क्षेमकुशल आहे. लवकरच भेटीस येत आहे!”

माझ्या उद्‌गारांसरशी त्या वृद्ध गोप जोडप्याच्या मुद्रा कशा क्षणातच आनंदविभोर होऊन उठल्या. समोरचे असंख्यात गोप आपापसात कुजबुजले, ‘कान्हा लवकरच येणार – द्वारकेचा मोठ्ठा राणा येणार!’ मी त्यांचा कुजबुजाट ऐकत असताना दादाच्या एकाच विचाराचा माग घेतं राहिलो. जीवनाच्या वास्तव सत्यापेक्षा त्याचा आभासच काही–काही वेळा अधिक सुंदर असतो, अतिशय जीवनदायी असतो.

एव्हाना माझ्या येण्याची वार्ता त्या इवल्या गोकुळात केव्हाच घरोघरं पसरली होती. मी नंदबाबांच्या मुखियावाड्याच्या गोपचौकात ओवरीतल्या कांबळं अंथरलेल्या बैठकीवर बसलो. दारुक माझ्या निकटच बसला होता. इतक्यात आमच्या रेवतीवहिनींच्या वयाची एक गोपस्त्री भिरभिरत्या डोळ्यांनी वाड्यात प्रवेशली. दोन गोपांनी तिला हाताला धरून सावरत–सावरत आमच्या बैठकीजवळ आणलं. तिची केशावळही आता पांढरीशुभ्र झाली होती. माझ्यासमोर येताच इतरांसारखी ती गोंधळली नाही. म्हणाली, “परमसखे अवधूत, ओळखलंत का या तुमच्या दादाच्या सखीला?” तसं लगबगीनं उठून पुढे होत, मी त्या गोपस्त्रीचा चरणस्पर्श घेतला. म्हणालो, “तुम्हाला न ओलखणं म्हणजे दर्पणात बघून मी स्वतःला न ओळखण्यासारखं आहे. दादानं तुम्हाला क्षेमकुशल सांगितलं आहे. तुमचा परतीचा संदेश काय नेऊ?”

ती किंचितशी हसली. तिच्या हसण्यात दादाच्या हास्याची छटा होती. ती राधिका होती. ती म्हणाली, “त्याला सांगा, तुझ्या कृपेनं मीही सुक्षेम आहे. तुझी वाट बघण्याचं मी केव्हाच सोडून दिलं आहे. मी स्वतःच अहोरात्र द्वारकेतच असते. “त्यानं दिलेली ही भेट मी आतापर्यंत प्राणपणानं जपली. आता ती त्यालाच जपायला सांगा.” तिने अंशुकाच्या निरीजवळ खोचलेली एक मुरली काढून माझ्या हातात दिली!!

दुसऱ्या दिवशी दादाच्या पावनस्मृती अंगावर झेलणाऱ्या गोकुळातील एकेक स्थळाला मी भेट दिली. शेवटी यमुनेच्या वाळवंटातील त्याच ठिकाणी आलो, जिथं त्यानं बलिदादासह खेळताना वाळूची शिवपिंडी उठविली होती. त्या स्थलावर आता नंदबाबांनी उठविलेली पाषाणी शिवालयाची लहानसर स्मृती होती.

गोकुळात दोन दिवस राहून, मी गेलो त्याच मार्गानं पुरत्या दोन सप्ताहांच्या प्रवासानंतर पुन्हा द्वारकेत परतलो. दादाला गोकुळात घडलेल्या सर्व गोष्टींचा इतिवृत्तान्त सादर केला. त्याच्या गोपसखी राधिकेनं दिलेली त्याची प्राणप्रिय मुरली त्याच्या हाती ठेवली. ती घेऊन माझ्यासह बोलत तो द्वारकेच्या रत्नागारात आला. तिथे रत्नागारप्रमुखांनी, त्याच्या आजोबांनी दिलेलं चांदीचं कडं, एका शिसमी पेटिकेत जपून ठेवलं होतं. तिथे क्षणैक थांबून ‘बंधो अवधूता ऐक’ म्हणत त्यानं आपले मत्स्यनेत्र मिटले. मुरलीशी संपूर्ण एकजीव होत त्यानं अशा काही एकापेक्षा एक सरस सुरावटी

आळविल्या की, माझ्याही मिटल्या डोळ्यांसमोर तलम वस्त्रठाणाच्या लडीच लडी अलगद उलगडत गेल्या. मग त्याच शिसमी पेटिकेत हातातील मुरलीही ठेवून त्यानं पेटिका बंद केली. आम्ही बोलतच परत त्याच्या कक्षाकडे चाललो. समोर नित्याचा श्रीसोपान आला. आता तो झळझळीत सुवर्णवर्खी पत्र्यांच्या पायदंडयांचा सोपान कितीतरी उंच नि भव्य दिसत होता.

एका सेवकाला पाचारून त्यानं आता अमात्य झालेल्या विपृथूपुत्राला – सुकृताला व गर्गमुनींना संकेत केला. आम्ही दोघं एकेक पायदंडी चढत समोरचा सोपान पार करून त्याच्या कक्षात आलो. तो काहीही बोलत नव्हता. कसल्यातरी विचारात गढला होता.

काही वेळातच विपृथुपुत्रासह गर्गमुनी आले. दोघांचंही हसत स्वागत करून त्यानं आपल्या मनीची योजना त्यांना ऐकविली. म्हणाला, "अमात्य, इंद्रप्रस्थाहून स्थापत्यविशारद मयाला त्याच्या सहकाऱ्यांसह बोलावून घ्या. मुनिवर गर्ग, आपल्या या सोपानाच्या रचनेत काही बदल करायचा आहे. त्याच्या पायदंडया चढवून घ्यायच्या आहेत. भारतीय युद्धात विक्रम केलेल्या काही महावीरांच्या स्मरणार्थ या सोपानात अधिक पायदंडया उठवाव्या लागणार. ती व्यवस्था तुम्ही व्यक्तिश: लक्ष घालून बघा."

ते दोघे दादानं त्यांच्यावर सोपविलेल्या कामगिरीच्या पूर्ततेसाठी निघून गेले.

दादा कुरुक्षेत्रावरून परतल्यानंतर राणीवशाच्या द्वीपात एक विशेष गोष्ट घडली होती. रुक्मिणीवहिनींशिवाय त्याच्या सातही राण्यांच्या स्वभावात, पटकन जाणवावा असा कितीतरी बदल झालेला होता. सर्वांत मोठा बदल झाला होता, तो आमच्या भामावहिनीत. त्यांनी आपल्या स्वभावातला तसा सोडायला कठीण असा हट्टीपणा व आग्रहीपणा आता समूळ सोडला होता. त्या थेट रुक्मिणीवहिनींच्या सारखंच बोलायला–वागायला शिकल्या होत्या. त्यांच्या जन्मजात सौंदर्यामुळे ते वागणं त्यांना आता कितीतरी शोभून दिसत होतं. तरीही दादाच्या सर्वांत प्रिय पत्नी होत्या, रुक्मिणीदेवीच!

कुरुक्षेत्रावरून द्वारकेत आल्यापासून दादा एकदाही राणीवशाच्या द्वीपावर गेला नव्हता. रुक्मिणीवहिनी आता बऱ्याचशा मूळ द्वारकेतच राहायला लागल्या होत्या. त्यांच्या सातही भगिनींतही लक्षणीय बदल झाले होते. माहेर मूळ द्वारकेत असूनही भामावहिनी तिकडे आता महिनोत्महिने फिरकत नव्हत्या. आपल्या भानु, सुभानु, स्वर्भानु, प्रभानु, बृहद्भानु या विवाहित पाच पुत्रांच्या संसारात गुंतल्या होत्या. रुक्मिणीवहिनींच्या सहकार्यानं आपल्या भानुमत, चंद्रभानु, अतिभानु, श्रीभानु आणि प्रतिभानु या कनिष्ठ पाच पुत्रांचे चार हात कसे करावेत, त्यांना योग्य वधू कशा गाठून द्याव्यात, या विचारांत त्या सदैव गुंतलेल्या असत. एका गोष्टीचा हट्ट त्यांनी मात्र अद्याप सोडला नव्हता. दादाला एकसारखं राणीवशाच्या द्वीपावर येण्याचा आग्रह त्या वारंवार करीतच राहिल्या.

रुक्मिणीवहिनींची कन्या, दादाची लाडकी चारुमती – चारू आता उपवर झाली होती. तारुण्यात आमची सुभद्रा दिसे, तशी अतिशय सुंदर दिसू लागली होती. तिला शोभेल असा विक्रमी व क्षात्रतेजी वर शोधण्यात रुक्मिणीवहिनींचे प्रद्युम्न, चारुदेष्ण आणि सुदेष्ण हे ज्येष्ठ तीन पुत्र खटपटीत होते. रुक्मिणीवहिनींचे चारुदेह, सुचारू चारुगुप्त, भद्रचारू, चारुचंद्र विचारू आणि चारू असे कनिष्ठ सर्व पुत्र आता निष्णात आचार्यांच्या दृष्टीखाली शूल, तोमर, चक्र, भिंदीपाल, खड्ग, शर–चाप अशी शस्त्रं

वापरण्यात निष्णात झाले होते.

जांबवतीवहिनींचं माहेर ऋक्षवान पर्वतात होतं, तो पर्वत द्वारकेलगतच्या आनर्त गणराज्याला लागूनच होता. त्यांचा सर्वांत ज्येष्ठ पुत्र सांब दिसायला सुंदर असला तरी नावासारखा काही साधाभोळा नव्हता. अतिशय खोडचाळ होता. तो आणि त्याचे बंधू सुमित्र, पुरुजित, शतजित, सहस्त्रजित, विजय सतत ऋक्षवान पर्वतात आपले आजोबा जांबवान यांच्याकडे जात. विशेष म्हणजे ते व त्याचे कनिष्ठ बंधू चित्रकेतू, वसुमत, द्रविड आणि ऋतू शर–चापात आता अत्यंत निष्णात झाले होते. त्या सर्वांतील मोठा सांब याला अरण्यातील वेगवेगळ्या प्राण्यांचे वाघ, सिंह हत्ती, वराह यांचे कृत्रिम मुखवटे घालून, सर्वांत लहान दोन–तीन भावंडांना भिवविण्याची खोड होती.

दादाच्या विशाल कीर्तीसारखंच त्याचं कुटुंबही विशाल होतं, त्यातील भद्रावहिनी व मित्रविंदावहिनी या तर त्याच्या आतेभगिनीच होत्या. त्यातील मित्रविंदावहिनी होत्या, अवंतीनरेश जयसेन व आत्याबाई राजाधिदेवी यांच्या कन्या. त्यांचे पुत्र वृक हर्ष, अनिल, गृध्र, वर्धन हे आपले बंधू उन्नाद, महाश, पावन, वह्नि आणि क्षुधी यांच्यासह अवंती राज्य जवळ असल्यामुळे, द्वारकेची समुद्रखाडी ओलांडून अनेक वेळा आजोळी अवंती राज्यात जात असत. त्यांचं हे आजोळी जाणं भारतीय युद्धापूर्वी अरोध चालू होतं. भारतीय युद्धानंतर मात्र त्यांनी कटाक्षानं आपल्या सर्व पुत्रांचं आजोळी जाणं रोधलं होतं. हे सर्व पुत्रही शस्त्रास्त्रांत पारंगत झाले होते.

भद्रावहिनी या केकयाधिपती धृष्टकेतू व आत्याबाई श्रुतकीर्ती यांच्या कन्या होत्या. त्या व लक्ष्मणावहिनी दोघीही पंचनदातील होत्या. लक्ष्मणावहिनी मद्रदेशातील बृहत्सेनांच्या कन्या होत्या. या दोघींचं एकमेकींकडे येणं–जाणं साहजिकच अधिक होतं. भद्रावहिनींचे प्रथम पंचपुत्र संग्रामजित, बृहत्सेन, शूर, प्रहरण व अरिजित् हे नेहमी लक्ष्मणावहिनींचे प्रथम पंचपुत्र प्रघोष, गात्रवत, सिंह, बल, प्रबल यांच्यासमवेत असत. पंचनदाचे हे दशपुत्र नेहमीच गदेचा, मल्लविद्येचा, खड्गाचा सराव एकत्रच करीत आले होते. पंचनदाचं पाणी अंगी असल्यामुळे ते एकमेकांशी खूप तंडत, भांडत. मात्र ज्येष्ठ संग्रामजित व प्रघोष यांनी दटावताच आपोआप शांतही होत. भद्रावहिनींचे लहान पुत्र जय, सुभद्र, वाम, आयू आणि सत्यक व लक्ष्मणावहिनींचे लहान पंचपुत्र ऊर्ध्वग, महाशक्ती, सह, ओज आणि अपराजित हे पाठोपाठच्या वयाचे असल्यामुळे एकत्रच असत. त्यांचा लहानांचा हा चमू मोठ्यांच्या नादी कधीही लागत नसे. या लहान चमूला अधिक रस होता, तो रथ, गज, अश्व व उष्ट्र अशा विषयांत! जेव्हा–केव्हा इंद्रप्रस्थाहून नकुल आणि सहदेव हे पांडव द्वारकेत येऊन गेले होते, तेव्हा–तेव्हा भद्रा व लक्ष्मणावहिनींच्या या दशपुत्रांच्या लहान चमूनं घोड्यांविषयी नाना प्रश्न विचारून त्यांना नुसतं भंडावून सोडलं होतं. जेव्हा–जेव्हा मल्लवीर भीमसेन द्वारकेत आला होता, तेव्हा– तेव्हा हे दशपुत्र त्याच्या धिप्पाड आणि पीळदार देहाकडे बघायला मिळावं, म्हणून देवमाशामागोमाग अनेक लहान मासे आपोआप फिरतात तसे त्याच्याकडे एकटक बघत, काही न बोलता नुसतेच त्याच्यासह फिरून आले होते.

कोसलदेशीच्या सत्यावहिनींनी आता नृत्यातून लक्ष काढून घेतलं होतं. त्यांनी आपले दशपुत्र युद्धकलेत मागे राहू नयेत, या विषयाकडे नृत्याएवढंच दक्षतेनं लक्ष दिलं होतं. त्यांचे वीर, चंद्र, अश्वसेन, चित्रगू, आणि वेगवत हे प्रथम पंचपुत्र गोरक्षण आणि संवर्धन या विषयांत रस घेणारे निपजले होते. कधी–कधी ते पुढाकार घेऊन यादवांमध्ये

वृषभरथांच्या रोमांचक स्पर्धाही भरवत. सत्यावहिनींचे वृष, आम, शंकू, वसू, आणि कुंती हे लहान पंचपुत्र आपल्या ज्येष्ठ बंधूंना या वृषभरथांच्या स्पार्धांत अत्यंत उत्साहानं साहाय्य करीत. होय, यातील एका पुत्राचं नाव कुंतीआत्येच्या स्मरणासाठी दादानंच कुंती असं ठेवलं होतं. अनेक गणराज्यांत अशी पुत्र–पुत्रींना एकच नाव ठेवण्याची प्रथाही होती.

यमुनेकाठी माहेर असलेल्या कालिंदीवहिनी इतर सर्व वहिनींहून वेगळ्या होत्या. दादाला त्यांनी आपल्या तपस्येच्या बळावरच जिंकलं होतं. त्यांचे प्रथम पंचपुत्र श्रुत, कवी, वृष, वीर आणि सुबाहू हे आपला समय अधिकतर आचार्य सांदीपनी आणि मुनिवर गर्ग यांच्याच सहवासात घालवीत. त्यांचे कनिष्ठ बंधू भद्र, शांती, दर्श, पूर्णमास आणि सोमक कधी–कधी व्यायामशाळेतून बाहेर काढून, दटावून, आपल्यासमवेत आचार्य सांदीपनींकडे घेऊन जात.

दादाला राणीवशाच्या द्वीपाकडे येण्याचा आग्रह करून–करून भामावहिनी कंटाळल्या. इतर सहा वहिनींनीही तो यत्न करून बघितला. दादा सर्वांचं नुसतं हसून ऐकून घेत होता. 'येतो, येतो' म्हणत होता. विशेष म्हणजे रुक्मिणीवहिनींनी त्याला तसा आग्रह काही एकदाही केला नाही. त्या चांगल्या जाणून होत्या की, त्याच्या मनी येईल, तेव्हाच तो राणीवशाच्या द्वीपाकडे येणार होता. महायुद्धातून परतलेला आपला पतिदेव मानसिकदृष्ट्या कितीतरी पालटलेला आहे, हे त्यांनी त्याच्या तो कुरुक्षेत्रावरून आल्यानंतरच्या पहिल्या भेटीतच पारखलं होतं. त्या स्वत: मूळ द्वारकाद्वीपावरच्या त्यांच्यासाठी असलेल्या राजवास्तूतच येऊन राहिल्या होत्या. प्रद्युम्नासह आपल्या सर्व पुत्रांना त्यांनी द्वारकाधीशांच्या सतत सेवेत राहण्याचा आदेशच दिला होता. आपल्या सातही भगिनींना त्यांनी दादाला सतत भेटत राहण्याचा संकेतही केला होता. कितीही केलं, तरी त्या ज्येष्ठ होत्या. दादाच्या इतर सर्व पत्नींहून स्वभावत:च वेगळ्या होत्या. दादाचा त्या दुसरा श्वासच झाल्या होत्या!

दादानं नव्या अमात्यांना सांगितल्याप्रमाणे स्थापत्यविशारद मय, त्याचे सहकारी ताराक्ष, कमलाक्ष, विद्युन्माली द्वारकेत आले. विश्वकर्माही उपस्थित झाले. गर्गमुनींच्या हाताखाली दादाच्या सूचनेनुसार श्रीसोपानाच्या नवनिर्माणाला प्रारंभ झाला. या कामावर दादा स्वत: लक्ष देऊ लागला. अतिशय बारीकसारीक सूचनाही तो कारागिरांना स्वत: करू लागला. तेव्हाच माझ्या लक्षात आलं की, हा श्रीसोपान ही दादाची यापुढे मर्मबंधाची एकमेव ठेव ठरणार आहे.

असेच आम्ही या कामावर देखरेख करीत असताना एक यादवसेवक वार्ता घेऊन आला की, 'सुदामदेव भेटीसाठी आले आहेत.' दादानं त्याला तसाच पिटाळून सुदाम्याला आदरपूर्वक समोर घेऊन यायला सांगितलं.

तसा सुदामा सेवकांच्या मेळातून श्रीसोपानाजवळ आमच्यासमोर आला. आता तोही कितीतरी वयस्क दिसत होता. तरीही त्याच्या अंगलटीची छडी होती तशीच काटक दिसत होती. खांद्याला नेहमीची प्रवासी पडशी तर होतीच. आतल्या त्याच्या प्राणप्रिय चंदनी पादुकांसह!

दादानं आपले दोन्ही बाहू पसरून त्याला दृढालिंगनात घेतलं. सुदामा स्वत:शीच बोलल्यासारखा पुटपुटला, "केवढं– केवढं मोठं युद्ध! तुझी – तुझी काहीच वार्ता कळेना! म्हणून – म्हणून राहावलं नाही आणि समक्षच आलो. केशवा, कसा – कसा आहेस तू?"

त्याला दृढालिंगनातून सोडून त्याच्या दोन्ही दंडांना धरून त्याला समोर घेत दादा हसून म्हणाला, “मी आहे हा असा आहे – तू कसा आहेस? मला आवडणारी – वहिनींनी दिलेली पुरचुंडी कुठे आहे?” सुदाम्यानं आपल्या भावभेटीची पुरचुंडी त्याच्या मित्रवर्य द्वारकाधीशाच्या हाती देताना डोळे बारीक करून माझ्याकडं बघितलं. तो कसल्या गोंधळात गेला आहे हे ताडलेला दादा माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, “सुदामा, अरे, हा आपला उद्धव – माझा उधो – आता अवधूत झाला आहे.”

माझ्या अंगावरच्या भगव्या वस्त्रांमुळे त्यानं प्रथम मला ओळखलंच नाही. मग मात्र हर्षविभोर होऊन दादाला दिलं, तसंच मलाही सुदाम्यानं दृढालिंगन दिलं. मग आम्हा तिघांपैकी बराच वेळ कुणीही काहीही बोलल नाही. नाही तरी कसं म्हणावं– मूकपणीच उदंड–उदंड बोललो आम्ही तिघंही!

श्रीसोपानाच्या निर्माणाचं काम करणारे कारागीर, काम थांबवून आमची भावभेट बघतच राहिले होते. दादानं त्यांच्यावर नुसता कटाक्ष टाकताच सर्व जण श्रीसोपानाच्या निर्माणाच्या कार्याला पुन्हा जुंपले गेले.

जवळ–जवळ एक मासभर खपून मय, त्याचे सहकारी, विश्वकर्मा या सर्वांनी गर्गमुनींच्या सूचनांनुसार श्रीसोपानाचं अतिभव्य असं नवनिर्माण केलं. आता त्या श्रीसोपानाच्या सोनेरी वर्खाच्या ताम्रपत्र्यांच्या पायदंड्या जवळ–जवळ शंभरावर झाल्या होत्या. इतकी तरी दादाच्या मर्मबंधाची स्त्री–पुरुष माणसं त्यानं निवडून ध्यानी ठेवली होती, असा याचा अर्थ होता. त्याच्या भोवती वावरणाऱ्या कुणालाही त्या पायदंड्या कुणाकुणाच्या स्मरणासाठी आणि कोणत्या क्रमानं आहेत, याची काहीही कल्पना नव्हती – अगदी मलाही. अर्जुन तर दूरच होता – हस्तिनापुरात.

तिकडे हस्तिनापुरात युधिष्ठिराच्या राज्याभिषेकाची सर्व जय्यत तयारी झाली होती. जशी राजसूय यज्ञाची व्यवस्था धौम्य या पांडवपुरोहितांनी डोळ्यांत तेल घालून केली होती, तशीच हीसुद्धा केली. त्यांच्या साहाय्याला आता पांचालांचे याज–उपयाज, द्वारकेहून गेलेले गर्ग आणि देशोदेशींचे कितीतरी विद्वान व जाणते ऋषिमुनी होते. आता युधिष्ठिराच्या राज्याभिषेकाची आमंत्रणं घेऊन पांडवांचे अश्वसाद देशोदेशी सुटले होते. दादाशी वेळोवेळी परामर्श करूनच पांडवांनी हा राज्याभिषेक आयोजित केला होता. दादानं हस्तिनापुरातील युधिष्ठिराच्या राज्याभिषेकाची सर्व सूत्रं द्वारकेत राहूनच हलविली होती. त्यासाठीच सर्वांत प्रथम धनुर्धर अर्जुन पूर्वी कुरूंचे असलेले, पण आता पांडवांचे झालेले अमात्य वृषवर्मा व धौम्य ऋषी यांच्यासह द्वारकेत येण्यासाठी, पश्चिम सागराच्या खाडीकिनारी आला. त्याच्यासमवेत पांडवांची कितीतरी सशस्त्र दलं होती. त्यांच्या संरक्षणात वृषभरथांतून लादून आणलेले यादवांसाठीचे विविध प्रकारचे उपहार होते.

दादाला भेटायला उतावीळ झालेला अर्जुन, खाडी पार करण्यासाठी नौकेत चढलाही; पण दादानं सेनापती सात्यकीला संदेश देऊन त्याला खाडीकिनारीच थांबण्यास सांगितलं. प्रत्यक्ष दादा बलिदादा, मला व नव्या अमात्यांना घेऊन एका नौकेतून त्याच्या स्वागतासाठी खाडीपार गेला. अर्जुनाचं त्यानं केवळ महायुद्धातच सारथ्य पत्करलं नव्हतं, त्याच्या जीवनाचंही पत्करलं होतं. अर्जुन आता एका अभिषिक्त सम्राटाचा बंधू होणार होता. त्याच्याशी आर्यावर्तातील सर्व गणराज्यांच्या नरेशांनी

इथून पुढे कसं आदरानं वागावं, याचाच वस्तुपाठ दादाला सर्वांना द्यायचा होता. पांडवांचा केवळ भारतीय युद्धात विजय होणं; दुर्योधन, दु:शासन, शकुनी यांच्या रूपानं माजलेल्या अशिव शक्तींचं निर्दालन करणं; हेच त्याचं जीवितकार्य नव्हतं, तर शिवकर विचारांची आर्यावर्तात पेरणी करणं, हे त्याचं ध्येय होतं. कुठल्याही चांगल्या गोष्टीची सुरुवात तो स्वत:पासून करीत आला होता.

प्रत्यक्ष द्वारकाधीशांनी स्वागत करून, धनुर्धर अर्जुनाला द्वारकेच्या पूर्वेच्या शुद्धाक्ष महाद्वारातून द्वारकेत आणताच, लक्षावधी द्वारकाकर स्त्री–पुरुष यादवांनी त्याच्या नावाचा जयघोष उठवीत, त्याचं पूर्वी कधीच नव्हतं, असं प्रचंड स्वागत केलं. सुधर्मा सभेत आपल्या ज्येष्ठ बंधूंच्या राज्याभिषेकाच्या आमंत्रणाची थैली अर्जुनानं विनयानं वसुदेवमहाराजांच्या चरणांजवळ ठेवली. तेव्हा सुधर्मा सभा टाळ्यांच्या कडकडाटांनी निनादून उठली. दादानं होऊ घातलेल्या पांडवांच्या राजाला आमंत्रणप्राप्तीचे प्रतिउपहार देण्याची सूचना नव्या अमात्यांना माझ्यासमोरच देऊन ठेवली होती. त्याप्रमाणे उपहारांची तबकं हस्तस्पर्शासाठी वसुदेवबाबा आणि दोन्ही राजमातांच्या समोर आली. वसुदेवबाबांनी त्या तबकांना आपला थरथरता वृद्ध हस्तस्पर्श देताच, पांडवांना जगातील सर्वश्रेष्ठ कृपाशीर्वाद लाभला.

हे उपहारांचं आदान–प्रदान हजारो यादवांच्या समक्ष भरल्या सुधर्मा सभेत होतं. दादा पूर्ण स्थितप्रज्ञ, अलिप्त वृत्तीनं ते डोळाभर बघत होता. त्याच्या डोळ्यांत कधी नव्हतं, ते कर्तव्यपुर्तीचं अपार समाधान काठोकाठ उतरलेलं मला स्पष्ट जाणवलं.

युधिष्ठिराच्या आमंत्रणाप्रमाणे राज्याभिषेकासाठी हस्तिनापूरला जाण्याची आता द्वारकेत घाईगर्दी उडाली. प्रथम सर्व राजस्त्रिया सशस्त्र सैनिकांच्या दलांसह द्वारकाखाडी उतरून हस्तिनापूरच्या मार्गाला लागल्या. पाठोपाठ सर्व सैन्यदलप्रमुखांसह निवडक यादवयोद्धे घेऊन दादाच्या व आपल्या सर्व पुत्रांसह यादवांचा युवराज म्हणून बलभद्रदादा निघून गेला. दादानं कामरूपी स्त्रियांची प्रमुख कशेरू हिला बोलावून घेतलं. आता ती विवाहित व पुत्र–कन्या असलेली वयस्क स्त्री झाली होती. निवडक कामरूपी स्त्रीयांसमवेत घेऊन तिलाही हस्तिनापुरी जाण्याचा आदेश दादानं दिला. त्यांच्या संरक्षणासाठी सशस्त्र सैनिकांची पथकं सोबत द्यायला तो विसरला नाही.

सर्वांत शेवटी माझ्यासह वसुदेवबाबा व दोन्ही मातांचा आशीर्वाद घेऊन आपल्या भव्य सालंकृत गरुडध्वज रथासह मोठ्या नौकेतून तो द्वारकाखाडी उतरला. आमच्या समवेतही निवडक यादववीरांची सशस्त्र पथकं होती. आम्ही नेहमीच्याच मार्गानं सौराष्ट्र, आनर्त पार करून, नर्मदेच्या काठाकाठानं पडाव टाकीत मध्यदेशातून चाललो. एक पडाव गोपालगिरीजवळ पडला. दिवस थंडीचे होते. एका रात्री आम्ही शिबिराबाहेर एक मोठी शेकोटी पेटवून भोवती शेकत, गप्पा मारत बसलो होतो. एकाएकी गोपालगिरीच्या अरण्यातून प्रचंड आरडाओरडा ऐकू आला. तसं दादा ताडकन उठून उभा राहिला. त्यानं दृष्टी फिरविताच आमच्या पथकातील लढाऊ यादवांनी शिबिरातून शर–चाप, गदा, खड्ग, मुसल अशी हाती लागतील ती शस्त्रं घेऊन, येईल त्या संकटाला तोंड देण्याचा लढाऊ पवित्रा घेतला. प्रथम चोहोबाजूंनी पावलांचे धपाधप आवाज ऐकू आले. पाठोपाठ मार्गातली झुडपं बाजूला सारल्याची सळसळ कानी पडली. क्षणातच हातात रानटी शस्त्रं घेतलेले दहा–वीस धिप्पाड पुरुष दिसू लागले. ते धड नागरी नव्हते, धड रानटी नव्हते. त्यांना बघताच रणावेश अंगी संचारलेले आमचे सैनिक

'जै इडादेवीऽ' म्हणत त्यांच्यावर तुटून पडले. अंधारातच हातघाईला प्रारंभ झाला. झालेल्या कलकलाटानं शिबिरात निद्रिस्त झालेले आमचे उर्वरित सैनिकही हाती शस्त्रं घेऊन साहाय्यार्थ धावले. त्यांनी उठविलेला 'जै इडादेवीऽ' चा रणघोष एवढा मोठा होता की, चालून आलेले दरोडेखोर अंधाराचा लाभ घेऊन आले तसे अरण्यवाऱ्यासारखे निघून गेले. जाताना त्यापैकी काही घायाळांच्या हातातील एक–दोन शस्त्रं खाली पडली होती. ती आमच्यापैकी काहींनी उचलून दादाला दाखविली.

दादा हातातील ती शस्त्रं उलटी–पालटी करून पारखत असताना सर्व यादवयोद्धे त्याच्याभोवती एकवटले.

काहीवेळानं दादा म्हणाला, "हे मरुप्रदेशातील वन्य ज्ञातीचे लोक होते. अशी अचानक चालून येण्याची त्यांची पद्धतच आहे. तुम्ही तयार नसता, तर त्यांनी माझा आणि या अवधूत उद्धवाचा इथे वधही केला असंता!"

"पण कोण होते हे लोक? कशासाठी आले होते?" दलप्रमुखानं भुवया उंचावून दादाला विचारलं.

"ते होते मरुप्रदेशातील लुटारू – अंगावरचे अलंकार, सोबतची जनावरं, भांडीकुंडी इतकंच काय; पण स्त्रियाही लुटून नेणारे –'अभिर' ज्ञातीचे होते हे लोक!"

नंतर बराच वेळ शेकोटी शेकत, आम्ही देशोदेशींच्या लुटारूंवरच गप्पा मारत बसलो. उत्तर रात्रीला केव्हातरी सशस्त्रांचे पहारे ठेवून शिबिरात जाऊन निद्राधीन झालो.

काही दिवसांतच गंगेकाठच्या हस्तिनापूर राज्याच्या सीमेवर आलो. इथे बलिदादा, रेवतीवहिनी व पुत्रांसह आम्हाला मिळाला. आमच्या स्वागतासाठी युधिष्ठिरासह चारही पांडव कुंतीआत्येला व द्रौपदीदेवींना घेऊन सीमेपर्यंत आले होते. सोबत महात्मा विदुर आणि संजयही होते. आम्ही हस्तिनापुरात प्रवेश करताच, आता सावरलेल्या हस्तिनापूरकर स्त्री–पुरुषंनी आमचं उचित स्वागत केलं. इथून पुढे आपल्या गुणवत्तेच्या बळावर पांडवांना अद्याप बरीच पडझड सावरायची होती. हे स्वागत पूर्वीच्या अभूतपूर्व आणि हर्षोत्फुल्ल स्वागतासारखं नव्हतं.

युधिष्ठिरानं कितीही आग्रह केला, तरी याहीवेळी दादानं सखा विदुरांच्याच घरी निवास करण्याचा निर्णय घेतला. त्याच्यासोबत अर्थातच मी, सात्यकी आणि दारुक होतोच.

ठरलेल्या मुहूर्तावर युधिष्ठिराच्या हस्तिनापूरच्या राज्याभिषेकाच्या शास्त्रसंमत विधींना यथाक्रम प्रारंभ झाला. चांगले सप्ताहभर हे विधी संपन्न झाले. पांडवांच्या प्रेमापोटी देशोदेशींच्या आलेल्या अतिथींनी हस्तिनापूर पुन्हा गजबजून उठलं. दादा मला समवेत घेऊन, सप्ताहभर मंत्रघोषात चाललेल्या या सर्व विधींना रुक्मिणीवहिनी व त्यांच्या सर्व भगिनींसह उपस्थित राहिला. मात्र कुरूंच्या या प्राचीन राजसभेत सर्व विधींना उपस्थित राहूण्याची त्यानं म्हणून स्वत:शीच ठरविलेली एक संहिता कटाक्षानं पाळली. युधिष्ठिर, अर्जुनासह सर्व पांडव प्रेमाचा अत्याग्रह करीत असंतानाही, तो रुक्मिणीवहिनींसह पांडवांनी सिद्ध केलेल्या विशेष सुवर्णी आसनांवर काही बसला नाही. बसला, तो आलेल्या अतिथी नरेशांच्या आसनांच्या पंक्तीत. रुक्मिणीवहिनींना त्यानं पांडवांच्या स्त्रीमंडलात बसण्याची सूचना केली. मला सांगितलं, राजपुरोहित आणि ऋषि–तापसांच्या कक्षात बसायला!

जेव्हा युधिष्ठिराच्या मस्तकावर कुरूंच्या महाराजपदाचा आणि द्रौपदीदेवींच्या मस्तकी महाराणीपदाचा मंत्रभारित सुवर्णी किरीट ठेवण्यात आले, तेव्हा त्याच्या मत्स्यनेत्रांत उतरलेलं कर्तव्यपूर्तीचं अपार समाधान वेगळंच होतं. राज्याभिषेकानंतर अतिथींनी गच्च भरलेल्या सभागृहात महाराज युधिष्ठिर आणि महाराणी द्रौपदी, ज्येष्ठ म्हणून त्याचे आशीर्वाद घेण्यासाठी आले. वयानं ज्येष्ठ असलेला युधिष्ठिर मस्तकी कुरूंचा किरीट घेऊन, दादाची चरणधूली घेण्यासाठी वाकू लागला, तेव्हा त्याला तसं करू न देता, दंडाला धरून तसंच वर घेत दादा त्याला म्हणाला. "युधिष्ठिरा, तू वयानं माझ्यापेक्षा ज्येष्ठ आहेस. मी जीवनभर कधीच तुला चरणस्पर्श करू दिलेला नाही. भीमसेनालाही करू दिलेला नाही. आता तर तू कुरूंचा अभिषिक्त महाराज आहेस – ज्येष्ठाहून ज्येष्ठ आहेस. तू मला मुळीच नमस्कार करावयाचा नाहीस. आत्याबाईंना कर, इतर ज्येष्ठांना कर." त्या दोघांचं बोलणं चाललं आहे, तोवर महाराणी द्रौपदीदेवींनी दादाच्या चरणांवर आपलं मस्तक ठेवलंही. तसं हसून तिच्याकडे बघत दादा म्हणाला, "या प्रिय सखीचा नमस्कार मात्र मी आनंदानं स्वीकारला आहे. दोघेही उदंड आयुष्यमान व्हा! पूर्वजांच्या कीर्तीला शोभेल असं राज्य करा."

सर्व ज्येष्ठांचे आशीर्वाद घेऊन महाराज युधिष्ठिर आणि महाराणी द्रौपदीदेवी आपल्या राजसिंहासनावर विराजमान झाले. नंतर आलेल्या देशोदेशीच्या उपहार–तबकांना हस्तस्पर्श देण्यातच त्यांची घटिका गेली. मग जुने अनुभवी अमात्य वृषवर्मांनी नूतन महाराजांच्या नावाचा हातातील कुरूंचा प्राचीन रत्नखचित राजदंड उंचावून जयघोष दिला – 'कुरू गणराजप्रमुख हस्तिनापुराधिपती पांडुपुत्र कौंतेय युधिष्ठिर महाराजऽ – महाराणी द्रौपदीदेवीऽऽ' सर्व उपस्थितांनी त्यांना कंठरवानं त्रिवार प्रतिसाद दिला –'जयतु – जयतु – जयतु!!'

राजप्रथेत निष्णात असलेले अमात्य वृषवर्मा दादाकडे बघत अचूकपणे म्हणाले, "आर्यावर्तातील या प्रमुख राज्याभिषेक समारंभाला वंदनीय द्वारकाधीश रुक्मिणीदेवींसह उपस्थित आहेत. भारतीय युद्धाच्या पार्श्वभूमीवर या राज्याभिषेक समारंभाला केवढं महत्त्व आहे, हे उपस्थित जाणतातच. या नूतन राज्याचा अमात्य म्हणून मी द्वारकाधीशांना नम्र विनंती करतो की, त्यांनी उभयतांनी राजवेदीजवळ येऊन नूतन महाराज–महाराणींना आशीर्वाद द्यावेत."

दादानं 'कौशल्यानं' युधिष्ठिराला आशीर्वाद देण्याच्या आपत्तीतून टाळलं होतं. वयोवृद्ध अमात्यांना तो कसं काय टाळणार, हे मी कुतूहलानं पाहू लागलो. दादानं अमात्यांच्या विनंतीचा मान राखला. तो राजवेदीवर सिंहासनाजवळ गेला. त्यानं तिथूनच राजस्त्रियांच्या मंडलातील रुक्मिणीदेवींवर कटाक्ष टाकला. त्या कटाक्षाचा आशय पकडून रुक्मिणीवहिनीही त्याच्या निकट गेल्या.

दादाला यादवांच्या सुधर्मा राजसभेत मुखभर बोलताना मी अनेक वेळा ऐकलं होतं. आता तो कुरूंच्या राजसभेत काय बोलणार, म्हणून मी उत्कंठ झालो. त्यानं कुरूंच्या सभागृहभर आपली तेजवंत दृष्टी फिरविली. एकदा ऐकली की जीवनभर ध्यानी राहावी, अशा सागरगाजेसारख्या वाणीत तो म्हणाला, "कुरूंचे नूतन महाराज युधिष्ठिर यांच्या शुभकर नावाचा 'युधिष्ठिर–शक' या क्षणापासून प्रारंभ झाला, असं अमात्यांनी घोषित करावं. महाराज युधिष्ठिर, महाराणी द्रौपदीदेवी, गदावीर भीमसेन, माझा प्रिय सखा धनुर्धर अर्जुन, माद्रेय नकुल–सहदेव आणि राजमाता – आत्याबाई कुंतीदेवी आणि

त्यांच्या स्त्री–पुरुष नगरजनांना भविष्यासाठी मी एवढंच म्हणतो की, शिवं भवतु!!”

त्याचं वक्तव्य अचानकच संपलं. राजवेदी उतरून तो नरेशांच्या आसनपंक्तीत व रुक्मिणीदेवी राजस्त्रियांच्या मंडलात गेल्या, तरीही टाळ्यांचा कडकडाट थांबत नव्हता. हस्तिनापूरचे व देशोदेशीचे जमलेले अतिथी एकच एक जयघोष देत होते –‘द्वारकाधीश वासुदेव भगवाऽन श्रीऽकृष्ण – जयतु – जयतु – जयतु!’

या भरघोस राज्यारोहण समारंभात अंध धृतराष्ट्र महाराज आणि गांधारीदेवी कुठेच नव्हत्या. युधिष्ठिरनं द्रौपदीदेवींसह रीतसर आमंत्रण देऊनही ते दांपत्य आलं नव्हतं. आत्याबाई कुंतीदेवींनीही त्यांना खूप आग्रह करून बघितला होता, “आम्ही दोघे अंध. आम्ही काय बघणार? तिथे असलो काय आणि इथेच आपल्या कक्षात असलो काय, सारखंच आहे. तुम्ही सुखानं राज्य करा. तुझे पुत्र आयुष्यमान होवोत!” असं त्या अंध पित्यानं नेहमीच्या दुहेरी भाषेत बोलून आत्याबाईंना परतवून लावलं होतं.

दादा मात्र हस्तिनापूर सोडण्यापूर्वी आवर्जून त्या वृद्ध राजदांपत्याच्या भेटीसाठी माझ्यासह जायला विसरला नाही. वृद्ध महाराजांच्या चरणांचा स्पर्श घेतं तो म्हणाला, “मी वसुदेव महाराजांचा पुत्र – द्वारकेचा श्रीकृष्ण, पत्नी रुक्मिणीसह आपणाला वंदन करतो आहे, महाराज–महाराणी.” आता मात्र चाचपून खांदे धरत दादाला वृद्ध महाराज धृतराष्ट्रांनी सामोरे घेतले. त्यांच्या खाचा झालेल्या नेत्रकडांवर अवगुंठलेलं पाणी थरथरलं.

हातातील दादाचे दंड घट्ट आवळून तो अंध पिता कळवळून म्हणाला, “कृष्णाऽ!” आजपर्यंत त्या अधिकारी मुखातून ‘द्वारकाधीशा, वसुदेवपुत्रा किंवा श्रीकृष्णा अशीच दादाला नेहमी साद घालण्यात आली होती. आज शंभर पुत्र हरवलेल्या त्या पित्याच्या तोंडून आपोआपच आत्याबाईंसारखी ‘कृष्णा’ अशी जवीळकीची साद आली होती!

“कृष्णा, तू सर्वांसाठी आयुष्यभर उदंड काय–काय करीत आलास. शंभर पुत्रांच्या शोकानं विव्हल झालेल्या या भग्नहृदय पित्यासाठी एकच कर, युधिष्ठिराला सांगून माझ्या आणि गांधारीच्या वानप्रस्थाची व्यवस्था कर. आता क्षणभरही हस्तिनापुरात राहूणं आम्हाला शक्य नाही.”

ते काय बोलणार याची अटकळ दादाला होती.

शांतपणे तो महाराज धृतराष्ट्रांना म्हणाला, “माझी आपणा उभयतांना विनंती आहे की, आपण हस्तिनापुरातच राहावं. मी पांडवमहाराज युधिष्ठिरांना पूर्ण जाणीव देऊनच हस्तिनापूर सोडणार आहे की, महाराज धृतराष्ट्र आणि महाराणी गांधारीदेवी यांना पूर्ण गौरवानं आणि सन्मानानं सर्वांनी सदैव वागवावं. ज्या क्षणी आपला अवमान झाल्याचं मनोमन जाणवेल, तेव्हा हस्तिनापूर सोडून वानप्रस्थात जाण्यासाठी आपण मुक्त आहात. ज्येष्ठांनी मागणं करायचं नसतं – दान करायचं असत. मी वसुदेवपुत्र द्वारकाधीश श्रीकृष्ण दोन्ही हात जोडून आपणाकडे हे मागणं घालतो आहे!”

दादानं धृतराष्ट्रमहाराजांना बोलण्यासाठी काहीही जागा ठेवली नव्हती. ते सहज म्हणून गेले, “जशी तुझी इच्छा कृष्णाऽ!”

तेथून दादा आणि मी सर्वांसह निरोप घेण्यासाठी आत्याबाई कुंतीदेवींच्या कक्षात आलो. येताना दादा मला म्हणाला, “अवधूता, पितामहांच्या सूचनेनुसार या वृद्ध जोडप्यासमवेत आपल्या आत्याबाई कुंतीदेवीही त्यांची सेवा करण्यासाठी वनात गेल्याशिवाय कदापिही राहूणार नाहीत. तिथे वनात कधी आणि काय घडेल, कुणालाही

सांगता येणार नाही. आता माझा मागण्याप्रमाणे महाराज धृतराष्ट्र आणि गांधारीदेवीच हस्तिनापुरात थांबल्या की, आत्याबाईही आपोआपच थांबतील.”

दादानं कयास केल्याप्रमाणे आत्याबाई कुंतीदेवीही आम्ही त्यांचा चरणस्पर्श घेऊन ‘येतो’ म्हणताच निग्रहानं म्हणाल्या, “कृष्णाऽ! तुझी कर्तव्यं तू केलीस. माझा युधिष्ठिर हस्तिनापुराधीश झाला. माझी सून महाराणी झाली. आता मी वानप्रस्थासाठी प्रस्थान ठेवणार!”

आता मी अधिक सावधपणानं दादा काय बोलणार ते ऐकू लागलो. मला पक्कं माहीत होतं की, निर्धारी आत्याबाईंच्या समोर त्याची कसलीही मात्रा चालणार नाही. आत्याबाई काही त्याची बौद्धिक खटपट–लटपट मुळीच ऐकून घेणार नाहीत. निदान कर्तव्यपूर्तीच्या त्यांच्या जीवनातील या परमोच्च क्षणी तरी नक्कीच नाही. दादानं काही क्षण तसेच जाऊ दिले. मग मात्र तो नेहमीच आपल्या प्रिय आत्याबाईंशी खट्याळ ढंगात बोलत आला होता, तसं म्हणाला, “तुला वनात राहायचीच फार हौस! आता चार दिवस राज्यवैभवात राहा की! त्यामुळे वनाचं काही बिघडणार नाही!”

ते ऐकताना आत्याबाई क्षणभर घोटाळल्या. मग म्हणाल्या, “तू नेहमीच काहीतरी विचारांचा चक्रव्यूह रचत असतोस. तो मी काहीच ऐकून घेणार नाही. जाणार म्हणजे जाणार!”

आता दादा काय करणार म्हणून मी उत्सुकतेनं ऐकू लागलो. त्यानं धूर्तपणं काही क्षण तसेच जाऊ दिले. मग मात्र ठेवणीतला विचारांचा ‘कृष्णबाण’ काढून म्हणाला, “एकटीच जाणार की संगती आणि कुणी आहे?”

दादांचा हा तिढा मात्र नामी होता. आत्याबाई सहजच म्हणाल्या, “पितामहांच्या आज्ञेप्रमाणे भावजी आणि जाऊबाई यांची वनात उर्वरित आयुष्यात सेवा करणार आहे मी! त्यांच्या मागूनच वनाची वाट धरणार आहे मी. यात बदल नाही.”

दादाचं काम झालं! होतं. तोही नेहमीसारखं सहज हसून म्हणाला, “जशी तुझी इच्छा! ते जातील तेव्हा तूही अवश्य त्यांच्यामागून जा! आता मात्र मला द्वारकेला जाताना मुख भरून आशीर्वाद दे.” दादा–रुक्मिणीवहिनी, दोघांनीही आत्याबाईंच्या खूप सोसलेल्या पावन चरणांवर मस्तक ठेवून त्यांना नम्र भावानं वंदन केलं.

मीही त्यांच्या सुरकुतल्या चरणांवर मस्तक ठेवून पांडवांच्या त्या अब्द–अब्द सोसलेल्या वृद्ध मातेला आदरानं वंदन केलं.

हस्तिनापूर सोडून आम्ही द्वारकेला जाण्यासाठी गरुडध्वजातून हस्तिनापूरच्या सीमेवर आलो. पाठीमागून येणाऱ्या पाचही पांडवांचे पाच वेगवेगळे रथ आणि त्यांच्या मागून येणारे त्यांचे सेनापती, अमात्य, मंत्रिगण यांचे पाच–दहा रथ थांबले. दादासह मी गरुडध्वजातून खाली उतरलो. पाचही पांडव दादाजवळ आले. त्यातील युधिष्ठिर आणि भीमसेनाला माझ्यासह दादानं थोडं बाजूला घेतलं. हलक्या आवाजात तो युधिष्ठिराला म्हणाला, “पांडवांच्या महाराजा, एक निक्षून सांगतो आहे, ते नीट ध्यानी ठेव. पुत्रशोकानं व्याकूळ झालेल्या महाराज धृतराष्ट्र आणि गांधारीदेवींचा कसल्याही कृतीनं आणि साध्या शब्दानंही तसूभरसुद्धा अवमान होणार नाही, याची काटेकोर दक्षता घे. विशेषत: भीमसेनाला चुकूनही त्यांच्यासमोर जाऊ देऊ नकोस. भीमसेना, तूही हे कटाक्षानं पाळ.”

“आम्हाला वनात धाडणाऱ्या, माझ्या प्रिय द्रौपदीची द्यूतगृहात झालेली क्रूर

विटंबना कान पाडून साळसूदपणे ऐकणाऱ्या, कुरुक्षेत्रावर चाळीस लक्ष योद्धयांच्या प्राणांची आहुती देणाऱ्या या महाराज–महाराणीचं तोंडही बघण्याची माझी इच्छा नाही!" भीमसेन तशाच कठोर शब्दांत म्हणाला.

मी भीमसेनाच्या घामेजल्या विशाल स्कंधावर हात चढवून त्याला थोपटीत समजावणीच्या शब्दांत म्हणालो, "दादानं त्यांना शब्द दिला आहे – त्यांचा तसूभरही अवमान पांडव करणार नाहीत असा! तसा तो झालाच, तर महाराज धृतराष्ट्र आणि महाराणी गांधारीदेवी क्षणभरही हस्तिनापुरात थांबणार नाहीत. तसेच वनात निघून जातील. आणि ते गेले की, त्यांच्या मागून तुमची माता – आमच्या आत्याबाई कुंतीदेवीही निघून जाणार! यासाठीच भीमसेना, कटाक्षानं तू त्या वृद्ध जोडप्यासमोर जाऊ नयेस." मी भीमसेनाची माझ्या सौम्य शब्दांत समजूत पाडण्याचा यत्न केला. विशेष म्हणजे माझ्या म्हणण्यावर भीमसेनानं होकाराची मान डोलवली.

पांडवांचा हस्तिनापूरच्या सीमेवरच निरोप घेऊन आम्ही द्वारकेला प्रस्थान ठेवलं.

खाडी पार करून आम्ही मूळ द्वारकेत आलो आणि इथे एक नवाच विषय दादासमोर आला. शोणितपूरच्या नरेश बाणासुरानं दादाच्या नातवाला, तरुण अनिरुद्धाला आपल्या राज्यात कारावासात कोंडून ठेवलं होतं. बाणासुर राक्षसवंशीय – त्याची कन्या उषा ही प्रद्युम्न आणि रुक्मवतीपुत्र अनिरुद्ध याच्या प्रेमात पडली होती. रुक्मिणीवहिनींचा सख्खा बंधू रुक्मीची, रुक्मवती ही कन्या होती. रुक्मीच्या पुत्राची दुसरी कन्या रोचना हिच्याशी अनिरुद्धचा विवाह पूर्वीच झाला होता. त्यांना व्रज नावाचा एक लहान पुत्रही होता. रोचना–अनिरुद्ध विवाहात प्रथा म्हणून द्यूत खेळताना रुक्मीनं द्वारकेच्या यादवांचं काही उणंदुणं काढलं होतं. त्यामुळे क्रुद्ध झालेल्या बलरामदादानं सोनेरी द्यूतपटानंच रुक्मीला चक्क वधलं होतं. रोचनेला त्यामुळे माहेर भोजकटकनगर कायमचं मुकलं होतं.

अशातच बाणासुरानं अनिरुद्धला कारावासात टाकल्यामुळे सैरभैर झालेली दादाची नातसून रोचना, लहान पणतू वज्राला घेऊन दादाच्या भेटीसाठी आली. आपली कथा आणि व्यथा लहान पुत्र वज्राला सामोरं घालून सांगताना म्हणाली, "द्वारकाधीशांनी सगळ्या जगाला न्याय दिला. माझं काय? माझे पतिदेव शोणितपूरला कारावासात आहेत. राक्षसराज बाणासुराची कन्या उषेमुळे हे सर्व घडलं आहे. मी उषेला भगिनी म्हणून स्वीकारायला तयार आहे. पण माझ्या पतिदेवांना द्वारकाधीशांनी मुक्त करून द्वारकेत आणावं."

दादासमोर हा नवाच कौटुंबिक प्रश्न आला होता. यापूर्वी जांबवतीवहिनींचा पुत्र सांबानं असाच प्रसंग द्वारकेवर आणला होता. दुर्योधनकन्या लक्ष्मणा हिच्या स्वयंवरासाठी हस्तिनापूरला गेलेल्या सांबानं लक्ष्मणेला स्वयंवरातूनच हरण करण्याचा यत्न केला होता. त्याला कन्येसह हस्तिनापूरच्या सीमेवरच पकडून दुर्योधनानं असंच कारावासात टाकलं होतं. बलरामदादांनी शर्थ करून त्याला सोडवून द्वारकेत आणलं होतं. लक्ष्मणेशी त्याचा विवाह करून दिला होता.

आता नातू अनिरुद्धासंबंधी हीच समस्या दादासमोर आली होती. सात्यकी आणि नवे अमात्य सुकृत यांना बोलावून त्यानं, अभियान शोणितपूरची त्यांना सविस्तर कल्पना दिली. त्यांनी चतुरंगदल सेनेची सिद्धता केली. वसुदेवमहाराज आणि दोन्ही माता यांचे आशीर्वाद घेऊन दादा त्या सेनेसह या उतारवयातही खाडी उतरला. हे त्याच्या

जीवनातील अखेरचं युद्ध ठरणार होतं. या युद्धासाठी त्यानं जाणीवपूर्वक बलिदादाला सोबत घेतलं नाही. मात्र अनिरुद्धपिता प्रद्दूम्नाला सोबत घ्यायला तो चुकला नाही. दोघेही पिता–पुत्र सेनेसह शोणितपूरला भिडले. तिथे दादाचं आणि बाणासुराचं मोठं युद्ध झालं. राक्षस आपणाला सदैव सामर्थ्यशाली मानत आले होते. मायावी युद्धाच्या पारंगततेमुळे क्षत्रियांना ते दुर्बळ समजत. आपली प्रिय कन्या उषा एका क्षत्रियाला देण्यासाठी त्यामुळेच बाणासुराचा तीव्र विरोध होता. संध्याकाळपर्यंत हे अटीतटीचं युद्ध चाललं. शेवटी बाणासुर शरण आला. प्रद्दूम्नासह वीर सात्यकीनं अनेक राक्षस निकरानं झोडपून काढल्यामुळे, त्याला हा निर्णय घ्यावाच लागला. आपल्या सेनादल प्रमुखासह संध्याकाळी त्यानं अनिरुद्ध आणि उषा यांना सात्यकीच्या स्वाधीन केलं.

राक्षसकन्या उषेला घेऊन द्वारकाधीश, सात्यकी, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध येताहेत, अशी अग्रवार्ता सप्ताहातच द्वारकेत येऊन थडकली. द्वारका उत्साहविभोर होऊन उठली. राक्षसकन्येचं द्वारकाकरांनी दादाच्या जयघोषातच स्वागत केलं. विशेष म्हणजे अनिरुद्धपत्नी रोचनेनंही उषेचा स्वीकार केला. राक्षसकन्या असूनही उषा अप्रतिम सुंदर होती. ती नृत्य, चित्रकला, संगीत अशा कलांची भोक्ती होती.

पंधरा दिवसांतच द्वारकेवर कोजागिरी पौर्णिमेची रात्र उतरली. यादवांच्या प्रथेप्रमाणे नववधूच्या सहर्ष स्वागतासाठी रात्री राजमंडलातील सर्व स्त्री–पुरुष रास खेळण्यासाठी नगराच्या मध्य भागातील विशाल उद्यानात एकवटले.

चांद्ररस ओतणारा तबकाएवढा चंद्रगोल द्वारकेच्या गगनमंडलात तळपू लागला. त्याच्या दुग्धवर्णी चांदण्यात उद्यानात मांडलेल्या पाषाणी चुलाणावर गोरसाच्या काहिली चढल्या होत्या. जवळ–जवळ सर्व उद्यान यादव स्त्री–पुरुषंनी खचाखच भरलं होतं.

दारुकानं जोडलेल्या गरुडध्वजातून दूधरंगी चांदणं अंगावर घेत, दादाच्या रथाचे शुभ्रधवल अश्व उद्यानाकडे चालले. ही त्याच्या रथाच्या अश्वांचीही तिसरी पिढी होती. सर्वांची नावं मात्र पूर्वीचीच होती – मेघपुष्प, बलाहक, सुग्रीव व शैब्य हीच! रथात दादासमवेत मी, बलिदादा आणि सात्यकी होतो. आमच्या मागील रथात अनिरुद्धपिता प्रद्युम्न आपल्या बंधूंसह बसला होता. त्यांच्यामागे इतर सर्व बंधूंचे रथ होते. दारुकानं आमचा सालंकृत गरुडध्वज उद्यानाच्या पूर्वेच्या द्वारात आणून उभा केला.

सामोरं येत नूतन सुकृत अमात्यांनी आम्हा सर्वांचं स्वागत केलं. सर्व रासखेळे स्त्री–पुरुष दादाचीच प्रतीक्षा करीत होते.

माझ्यासह चालत दादा रासमंडळात आला. त्याच्या वक्षावर नित्याची वैजयंतीमाला होती. त्याच्या सोनकिरीटात मढवलेलं पश्चिम सागरवऱ्यावर फडफडणारं मोरपीस होतं. आता त्याच्या सोनकिरीटातून बाहेर डोकविणाऱ्या केशावळीच्या कुरळ बटा चांदण्यासारख्या शुभ्रधवल झाल्या होत्या. मुद्रेवर मात्र तेच शतकोटिसूर्यसमप्रभ तेज तसंच होतं.

रासमंडलात येताच त्याची सर्व जण प्रतीक्षा करीत होते, ती तबकातील कुंकुमाची मानाची प्रथम ओंजळ दादानं भरून घेतली. गगनमंडलाकडे मान उंचावीत 'जै इडादेवीऽ' म्हणत ती उधळली. पाठोपाठ मला व बलरामदादालाही मानेनंच पाचारून उधळायला लावली.

भुईनगारे, रणहलग्या, दुंदुभ्या, भेऱ्या, रणशिंगं अशा वाद्यांचा एकच स्वरकल्लोळ उठला. एव्हाना रुक्मिणीवहिनींच्यासह रासमंडलात आलेल्या त्यांच्या सातही भगिनींनी – दादाच्या सर्व पत्नींनी रासात भाग घेतला होता.

दादा, बलरामदादा युद्धात खड्ग फिरवावं त्या चापल्यानं, आजही रासनृत्य करीत यादव स्त्री–पुरुषंच्या मेळात रासनृत्य करू लागले.

सरोवरात पडलेलं चंद्रप्रतिबिंब हिंदोळू लागलं. आम्हा यादवांचा पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीचा रास, चांदण्या रात्रीला वाकुल्या दाखवत रंगू लागला.

एकदा मी आणि दादा उत्तरेच्या भल्लात द्वाराजळील शिवालयाच्या पाषाणी ओवरीवर बसलो होतो. नुकतंच आम्ही शिवदर्शन केलं होतं. आमच्यासमवेत दारुक होताच. आता दादा द्वारकेत कुठेही गेला, तरी सुवासिक फुलाभोवती कुणी न सांगताच एकामागोमाग एक भ्रमर गोळा व्हावेत, तसे यादव स्त्री–पुरुष येत असत. आताही आले होते. शिवालयातच पाषाणघडीवर बसले होते. दादानं त्या सर्वांचं काही दुखलं–खुपलं ऐकून घेतलं होतं, सर्वांच्याच वेगवेगळ्या समस्यांना परस्पर उत्तरं मिळतील, असं तो आपल्या मधुर वाणीत बोलत होता. सर्व नगरजन त्याचं तन्मयतेनं ऐकत होते.

अर्धा घटका बोलून झाल्यानंतर माझा ध्यानीमनी नसताना दादानं मला पुढे घेतलं. म्हणाला, "तुमचे–आमचे अवधूत – हे उद्धवदेव हिमालयात भ्रमंती करून आले आहेत. भविष्यात ते शिवाच्या पायाशी बदरीकेदारला एक आश्रम उठविण्याच्या विचारात आहेत. ते काय सांगतात, ते तुम्ही सर्वांनी शांतपणे ऐकून घ्यावं. त्यांचा प्रत्येक शब्द, हा अनुभवाचं सार म्हणून जीवनभर समोर ठेवावा. शक्य झाल्यास, त्यांच्या विचारातील एक तरी विचार प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी प्रत्येकानं यत्न करावा."

दादा मला माता-पित्यांच्या ठायी होता. आचार्य सांदीपनींएवढा वंदनीय होता. माझ्यासाठी तो या सर्वांहूनही अधिक काही होता. मी त्याचा शब्द टाळूच शकत नव्हतो. उठलो आणि मनोमन दादाचंच स्मरण करून बोलू लागलो –

"द्वारकेतील माझा प्रिय बंधू–भगिनींनो – " मी बोलायला प्रारंभ करणार एवढ्यात अमात्य सुकृत, सात्यकी आणि काही यादवसैनिक यांच्यासह लगबगीनं येताना दिसले. बसलेल्या सर्व स्त्री–पुरुषंची दृष्टी त्यांच्याकडे वळली. त्यांच्यासमवेत शुभ्र वस्त्र परिधान केलेले धौम्य ऋषी आणि त्यांचे शिष्यगण बघताच मी आपोआपच थांबलो. त्यांचा मेळ जवळ येताच, पाषाणी ओवरीवर बसलेला दादा उठला. आम्ही दोघांनी पुढे होत, प्रथम ऋषिवर्यांचा चरणस्पर्श घेतला. त्यांच्यासमवेत राजवास्तुकडे चालताना दादानं विचारलं, "ऋषिवर, हस्तिनापुरात सगळं क्षेमकुशल तर आहे?"

"तसं क्षेमच म्हणायचं! एक आमंत्रण आणि एक निरोप घेऊन मी आलो आहे. महाराज धृतराष्ट्र आणि गांधारीदेवी वानप्रस्थासाठी निघून गेले आहेत!" ऋषिवर पुढे काय सांगणार याचा कयास आला, तरीही दादाच म्हणाला, "भीमसेनाचा आणि महाराज धृतराष्ट्रांचा काहीतरी वाद झाला असणार! भीमसेन भान न राहून त्यांना अनादराचं

काहीतरी बोलला असणार. म्हणूनच ते वनात निघून गेले असणार – त्यांचे पायठसे उचलत आत्याबाईही वनात गेल्या असणार!”

चालते धौम्य ऋषी क्षणभर थांबून दादाकडे आश्चर्याने बघत म्हणाले, “होय, अगदी असंच घडलं आहे. निरोप आहे तोही कुंतीदेवींचा – द्वारकाधीशांना.” मुनिवर थांबले.

“काय?” दादानं विचारलं. मीही सावध होऊन ऐकू लागलो.

वनात जाताना पांडवमाता कुंतीदेवी म्हणाल्या, “कृष्णाला सांगा, तुला शक्य होतं तेवढं तू केलंस. मी ज्येष्ठांची सेवा करण्यासाठी वनात जाते आहे. मला हस्तिनापूरची राजवास्तू काय आणि वन काय, दोन्ही सारखीच आहेत. आम्ही हिमालयाच्या पायथ्याच्या वनाकडे चाललोत. पूर्वी काम्यकवनात भेटीस आला होतास, तसा कधीतरी तिकडेही येऊन जा!”

दादा कसल्यातरी अंत न लागणाऱ्या विचारात गढल्यासारखा झाला. मग सावरून म्हणाला, “आमंत्रण कसलं आहे ऋषिवर?”

“हस्तिनापुऱ्हाधिपती शककर्ते महाराज युधिष्ठिर यांचं तुम्हा दोघांना आमंत्रण आहे – बलदेवांना आणि तुम्हाला. पांडव अश्वमेध यज्ञ करणार आहेत. त्यासाठी निवडलेल्या सुलक्षणी अश्वाचं येत्या पौर्णिमेला हस्तिनापुरात सुमुहूर्तावर नगराच्या मध्यचौकात सर्व नगरजनांच्या साक्षीनं पूजन आहे. ते तुम्हा उभय बंधूंच्या हस्ते व्हावं, अशी शककर्त्या पांडवमहाराजांची व सर्व पांडवांची इच्छा आहे. त्यासाठीच त्यांच्या वतीनं यथावत आमंत्रण घेऊन मी आलो आहे.”

दादा काय उत्तर देतो म्हणून मी त्याच्या विचारगत चर्येकडे बघितले. अमळशानं तो म्हणाला, “ऋषिवर, मी आता द्वारका सोडणार नाही! आमच्या सेनापती सात्यकींना द्वारकेचे प्रतिनिधी म्हणून समवेत घेऊन जावं. त्यांच्याबरोबर पांडवांना अश्वमेधासाठी माझे आशीर्वाद आणि उपहारही येतील. बलरामदादांच्या मनी काय आहे, ते आपण त्यांनाच विचारून घ्यावं.”

दुसऱ्या दिवशीच धौम्य ऋषींनी हस्तिनापूरचं आमंत्रण सुधर्मा राजसभेत रीतसर वसुदेवमहाराजांसमोर सादर केलं. दादानं ‘नाही’ म्हटल्यावर बलिदादानंही तिकडे जायचं टाळलं. ठरल्याप्रमाणे उपहार व काही सैनिक घेऊन, सप्ताहानंतर सेनापती सात्यकी धौम्य ऋषींच्या समवेतच हस्तिनापूरला निघून गेले.

काहीतरी मनी योजून दादानं एके दिवशी लोहशालेच्या प्रमुखाला बोलावून सामोरं घेतलं. आलेला मध्यवयस्क लोहकार यादव खड्ग, गदा, भाल्यांची पाती ओतून घडविण्यात निष्णात होता. तो आला होता, तो द्वारकाधीश आपल्यावर कुठल्या शस्त्राच्या ओतकामाचं दायित्व टाकतील या विचारातच! तो हात जोडून समोर उभा राहताच, दादानं त्याला अनपेक्षितच प्रश्न केला. विचारलं, “लोहकार, तुम्ही द्वारकेच्या शुद्धाक्ष द्वारालगतच्या चौकात बसविलेल्या लोहतबकाचे समयाचे टोल समुद्रगाजेत मुरून जातात. नीट ऐकू येत नाहीत. तुम्हाला सर्वांना नीट ऐकू येईल, असं मोठ्यात मोठं केवढं समयतबक साच्यात ओतता येईल?”

लोहकार गडबडला. जे काही मनी धरून तो आला होता, त्यापेक्षा ही आज्ञा कितीतरी वेगळी होती. तो विचारात पडला. समोरच्याला विचारात टाकणं, गोंधळात पाडणं, चालू असलेल्या बोलण्यातील विचारांतून दुसरीकडे नेणं, ही तर दादाची खोडच होती. तो

स्वतःच लोहकार आता काय उत्तर देतो, म्हणून ऐकू लागला.

"द्वारकाधीशांनी मला दोन दिवसांचा अवधी द्यावा. मोठ्यात मोठं केवढं, टोलाचा घुमरा आवाज अधिकात अधिक दूर नेणारं, टिकाऊ समयतबक किती दिवसांत साच्यात ओतता येईल, याची अचूक माहिती पायांशी ठेवीन."

लोहकारच नव्हे, तर द्वारकेतील सर्व लहानथोर कारागीर, सैनिक, दलप्रमुख महाभारतीय युद्धानंतर पक्के समजून गेले होते की, दादासमोर थातूरमातूर बोलून निभाव लागत नाही. तिथे बोलावं लागतं, ते विचार करून; करावं लागतं, ते पक्कं!

"ठीक आहे. जा तू! विचार करून सांग." दादानं लोहशाळेच्या प्रमुखाला निरोप दिला.

वृत्तीत आमूलाग्र बदल झालेल्या भामावहिनी दादाला सतत राणीवशाच्या द्वीपावर येण्याची गळ घालतच होत्या. दादा त्यांना काहीही दाद देत नव्हता. मग नाराज झालेल्या भामावहिनी आपल्या सहा भगिनींना एकापाठोपाठ एक दादावर सोडून तसाही प्रयत्न करून बघत होत्या.

आपल्या चार–पाच पुत्रांसह मूळ द्वारकेत आलेल्या जांबवतीवहिनी दादाला म्हणत, "आर्यांनी आपल्या सर्व पुत्रांची शस्त्रांतली गती आणि अश्वारोहणातील प्रगती बघण्यासाठी तरी राणीवशाच्या द्वीपावर एकदा यावं." त्या आता बोलण्यावागण्यात इतर सगळ्या वहिनींशी इतक्या समरस झाल्या होत्या की, त्या एकेकाळच्या अरण्यकन्या होत्या, हे कुणाला सांगूनही पटलं नसतं. आपल्या ज्येष्ठ पुत्र सांबाला, अंगाशी येणारा खोडिलपणा सोडायला सांगून मात्र त्या थकल्या होत्या. त्याच्यात मात्र काहीही सुधारणा होत नव्हती.

भद्रा आणि लक्ष्मणावहिनी पंचनदातील असल्यामुळे सर्वत्र एकत्रच वावरत. दादाला आग्रह करण्यासाठी येत त्याही एकत्रच! त्या दोघी आळ्या की, त्यांचे वीस पुत्र व दोन कन्या कलकलाट करीत त्यांच्याबरोबर असतच. त्यांच्या मेळात मात्र दादाही हसून–खेळून वावरताना भारतीय युद्धातील भीष्म, द्रोण, कर्ण, उत्तर, अभिमन्यू, घटोत्कच, दुर्योधन, अश्वत्थामा या सर्वांच्याच आठवणी समूळ बाजूला ठेवी.

लक्ष्मणावहिनींचा प्रघोष नावासारखाच जाडच्याभरडच्या आवाजाचा, कर्कश्श ओरडणारा होता. तो आपल्या बल, प्रबळ, अपराजित अशा लहान बंधूंची चेष्टा करताना भसाड्या आवाजात म्हणे, "तुम्ही कसले बल–प्रबळ! तुम्ही तर दुर्बल!" अपराजिताला डिवचण्यासाठी तो म्हणे, "कशाला लावतोस अपराजित हे नाव? मी तुझा खड्ग, गदा, मुसल सर्व शस्त्रांत रोजच तर पराजय करतो!"

सत्यावहिनींचे ज्येष्ठ तीन पुत्र वीर, चंद्र, अश्वसेन सर्वांत धाकट्या कुंती नावाच्या बंधूंची जीवघेणी टिंगल करताना म्हणत, "कुंतीबाई – कुंतीबाई, इथे कशाला राहता जा की हस्तिनापूरला!"

मित्रविंदावहिनींच्या एका पुत्राची मान उंचच उंच असल्यामुळे, त्याचं नाव चक्क गृध्र ठेवण्यात आलं होतं! त्याला त्याचेच बंधू चक्क 'गिधाड' म्हणून आपल्या माना लटकेच त्या पक्षयाच्या मानेसारख्या हलवून, त्याला डिवचून नुसतं भंडावून सोडीत.

नाही म्हणायला कालिंदीवहिनींचे सर्व पुत्र रुक्मिणीवहिनींच्या पुत्रांसमवेत सदैव वावरत. या सर्वांत ज्येष्ठ असलेल्या व विक्रमी प्रद्युम्नाचा इतरांवर मोठा वचक होता. तो समोर आला की, दादाच्या सर्व पुत्रांचा कलकलाट, एकमेकांना कोपरखळ्या देत

'ज्येष्ठ आला – ज्येष्ठ' म्हणत आपोआप थांबे.

लहान सातही वहिनींनी राणीवशाच्या द्वीपावर येण्याची दादाला गळ घालूनही कुणाचीच डाळ शिजली नाही. त्यांची हिरमुसली तोंडं आताशा रुक्मिणीवहिनींनाच जाणवू लागली. त्या इतर सगळ्या वहिनींपेक्षा जन्मत: व स्वभावत:च वेगळ्या होत्या. आता काहीतरी मनोमन योजून त्यांनीच दादाला राणीवशाच्या द्वीपाकडे एकदा तरी वळविण्याचं ठरविलं.

त्यासाठी त्यांनी सर्वांत प्रथम हाताळलं ते मला! एके दिवशी त्या मला अगदी सहज म्हणाल्या, "अवधूतभावजी, किती दिवस झाले तुम्ही माझ्या हातचा लवण घातलेला गुरगुटचा ओदन खाल्लेला नाही! एकदा राणीवशाच्या द्वीपावर या ना! येताना तुमच्या दादांना काही समवेत आणू नका! तुम्ही 'अवधूत' झाला आहात. भगवी वस्त्रंही धारण करता. ते मात्र एकीकडे अंगी योद्ध्याचा रणवेष धारण करून दुसरीकडे अवधूतांचे अवधूत झालेत! आपल्या कन्या–पुत्रांना, पत्नींना विसरलेत!"

रुक्मिणीवहिनींचे हे उद्गार मी कानामात्रेचाही बदल न करता, दादाला जसेच्या तसे ऐकविले. रुक्मिणीवहिनींची ही वैदर्भी भावपूर्ण मात्र मात्र दादाला अचूक लागू झाली! तो म्हणाला, "उधो, बंधो, तुझ्याबरोबर मीही लवण घातलेला गुरगुटचा ओदन चाखायला राणीवशाच्या द्वीपावर यावं म्हणतो. महायुद्धापासून मला तो खायलाच मिळालेला नाही. मात्र मी तुझ्यासमवेत येतो आहे, हे काही तू रुक्मिणीला सांगू नकोस!"

लवकरच दादाला हव्या तशा समयतबकाचं काम पत्करलेला लोहकारप्रमुख दादासमोर सादर झाला. त्यानं येताना आठ–दहा लोहकारांनी वाहून आणलेलं पुरुषभर उंचीचं, वेगवेगळ्या टिकाऊ धातूंच्या प्रमाणबद्ध मिश्रणाचं समयतबक आणलं होतं. त्यावर चांद्रप्रतिमा, शस्त्रं उगारलेली इडादेवीची प्रतिमा, उडत्या पवित्र्यातील गरुड, जबडा विस्फारलेला वनराज, त्याच्यासमोरच निर्भय चरत असलेली पुष्ट गाय, खड्ग, चक्र, गदा, मुसल अशा शस्त्रांच्या यादवांनी मानचिन्ह मानलेल्या प्रतिमा होत्या. दादाची मुद्रा ते समयतबक बघताच कशी फुलून उठली. तबकाला हात न लावताच, भोवतीच्या मोठ्या छिद्रातून ओवून घेतलेल्या दोरखंडावर लोहकारांनी ते प्रशस्त समयतबक अधांतरी तोलून धरलं होतं. दादानं उत्साहानं पुढे होत, लोहकारप्रमुखानं दिलेला मोठा लोह–हातोडा हाती घेतला. त्याचा एक समर्थ टोल आम्हा सर्वांसमक्ष त्या तबकावर दिला. आमच्या कानठळ्या बसल्यासारख्या झाल्या. दादाचा कक्ष समयटोलाच्या नादानं कसा दणाणून गेला. खरोखरच त्या टोलाच्या गजरात समुद्रगाजही ऐकू येत नव्हती. कितीतरी वेळ त्या टोलाचे निनादच आमच्या कानांत रेंगालत राहिले.

अतिशय प्रभावित होऊन दादा लोहकारप्रमुखाला म्हणाला, "द्वारकेच्या पूर्वेकडील शुद्धाक्ष महाद्वाराजवळच्या राजमार्गावरच्या अंतिम चौकात चौथऱ्यावर याची रीतसर स्थापना करा."

द्वारकेच्या पूर्वेकडे राजमार्गाच्या अंतिम चौकात त्याच्या मनी होतो, तशी मी समयतबकाची स्थापना करून घेतली. दादाची कडक आज्ञा होतो की, 'द्वारकेतील पूर्वीची समयतबकं नगरजनांसाठी तशीच चालू ठेवावीत. त्यांच्या नित्यक्रमात कसलाच विक्षेप येऊ नये. मात्र केवळ मलाच भेटण्याच्या उद्देशानं आलेल्या तशाच विशेष महत्त्वाच्या अतिथीच्या आगमनाच्या वेळी या नव्या समयतबकाचा वापर करावा.'

दादाच्या आज्ञेप्रमाणे तशी द्वारकाभर दवंडीही पिटविण्यात आली.

सात्यकी, दारुक, प्रद्युम्न, बलिदादाचे पुत्र निशठ व उल्मुक, सर्व पुत्र, कन्या नित्यनेमानं सकाळ–संध्याकाळ दादाचं दर्शन घेण्यासाठी राजवास्तूतील त्याच्या कक्षात श्रीसोपान चढून येत होते. एके दिवशी त्यानं अशाच आलेल्या सात्यकीला सात–आठ नौका सिद्ध ठेवायला सांगितल्या. मी, दारुक, सात्यकी, अमात्य– विपृथुपुत्र सुकृत यांच्यासह तो पश्चिम सागरात नौकांतून उतरला. आम्ही कुठे चाललो आहोत, कुणालाच माहीत नव्हतं. सागरात बरंच आत गेल्यानंतर त्यानं सर्व धीवरांना नौका आमच्या द्वारका बंदराच्या मार्गदर्शक क्रोष्टू दीपस्तंभाकडे वळविण्यास सांगितलं. दादाची ही कितीतरी वर्षांनी त्या दीपस्तंभाला प्रत्यक्ष भेट होतो.

कुरुक्षेत्रावरच्या महायुद्धानंतर द्वारका बंदराकडे येणाऱ्या, निकटच्या देशांतील नौकांची संख्या कमी झाली होतो. ती बंद मात्र पडली नव्हती. आता हे बंदर 'द्वारका बंदर' म्हणूनच शेजारच्या देशांत ओळखलं जात होतं. 'कुठलं द्वारका बंदर?' असा खलाशांनी एकमेकांना प्रश्न केला की, त्यांच्यातीलच एखादा उत्तर देई, 'श्रीकृष्णचं द्वारका बंदर – सोन्याचं द्वारका बंदर!'

त्या दिवशी अर्धा दिवस क्रोष्टू दीपस्तंभावर काढून मावळतीची किरणं पाठीवर घेत आम्ही परतलो. नौकेतच दादा सात्यकीला म्हणाला, "द्वारकेतील नव्या पिढीच्या तरुण यादवांना सागराची चांगली माहिती देणारा आचार्यांच्या अंकपाद आश्रमासारखा आश्रम, आपण द्वारकेतही उठविला पाहिजे. आपलं गणराज्य द्वारका तीन बाजूंनी समुद्रानं वेढलेलं गणराज्य आहे, हे विसरता येणार नाही." त्याचा एकेक विचार मला नेहमीच काळाचे कितीतरी पटल फाडून द्रष्ट्यासारखा भविष्यात झेपविणारा सततच वाटत आला होता.

एके दिवशी तो स्वतःच मला म्हणाला, "उधो अवधूता, उद्याच तुझ्या ज्येष्ठ वहिनीचा – रुक्मिणीचा लवणमिश्रित गुरगुट्या ओदन खाण्यासाठी राणीवशाच्या द्वीपावर जायचं आहे. सात्यकी, अमात्यांना सांगून व्यवस्था कर. रुक्मिणीच्या द्वीपावर अग्रवार्ता दे."

सात्यकीकरवी मी राणीवशाच्या द्वीपाकडे 'द्वारकाधीश सर्वांच्या भेटीसाठी येत आहेत' अशी वार्ता धाडली. ती वार्ता ऐकताच राणीवशाचं संपूर्ण संकुल मोहरून उठलं. दादाच्या सर्व राण्यांनी कुठं–कुठं पांगलेले आपापले पुत्र तातडीचे अश्वसाद धाडून बोलावून घेतले.

या भेटीत आमच्याबरोबर अमात्य, सात्यकी वा सुधर्मा सभेकडील कोणीही नव्हतं. आम्हा दोघांबरोबर होता, तो एकटा दारुक. नेहमी गरुडध्वजाच्या रथनीडावर बसणारा दारुक, आज आमच्यासह नौकेत बघताना मला गंमत वाटली. दादानं अमात्य आणि सात्यकींना स्पष्ट सूचना देऊन ठेवल्या होत्या की, एक मासभर तो द्वारकेत मुळीच परतणार नाही. नित्याच्या माता–पित्यांच्या प्रभात व सांध्यवंदनाची अडचण पडू नये, म्हणून त्यानं वसुदेवबाबांच्या पायीच्या राजखडावाही मला बरोबर घ्यायला सांगितलं होतं. त्या खडावांवर रोज सकाळ–संध्याकाळ गंध–फुलं वाहून, तो तिघांचंही स्मरण करून त्यांना वंदन करणार होता. त्यासाठीच आचार्य सांदीपनींच्या चंदनी खडावाही त्यानं मला न विसरता बरोबर घ्यायला सांगितलं होतं. याचसाठी बलरामदादानं असंतुष्ट होऊ नये, म्हणून निघतानाच त्याला अष्टांगी दंडवत घालून त्याची समजूत घातली होतो.

राणीवशाच्या या जोडद्वीपावर आमचा एक मास कसा आनंदात गेला, काहीही कळलं नाही. आपल्या प्रत्येक प्रिय पत्नीकडे चार–चार दिवस राहून, त्या–त्या वहिनींच्या पुत्रांची, त्यांच्या पत्नींची अगत्यानं विचारणा करून, सर्वांत शेवटी तो रुक्मिणीवहिनींच्या कक्षात निवांत वास्तव्याला आला. त्याची अत्यंत लाडकी कन्या चारू अतीव मायेनं आपल्या जगदवंद्य चक्रवर्ती पित्याला काय हवं–नको, ते मायेनं बघत होतो. तिच्या समवेत तिच्या तीन सापत्न भगिनीही असत. त्याला रोज प्रभातकाली मुखप्रक्षालनानंतर सुवर्णकुंभात रात्रभर ठेवलेल्या कमलपुष्पांच्या देठांचं जल लागतं, हे चारूला चांगलं माहीत होतं. ते ती न चुकता सिद्ध ठेवी.

या वास्तव्यात मी, दादा आणि रुक्मिणीवहिनी कितीतरी विषयांवर भरभरून बोललो. त्यात अनिरुद्धपत्नी रोचनेच्या विवाहात बलरामदादांच्या क्रोधाला बळी पडलेल्या रुक्मीची, भोजकटकनगराची आठवणही निघाली. तसं बोलण्याच्या ओघात रुक्मिणीवहिनी नकळतच मला दोन वेळा थेट दादासारखंच 'बंधो उधो' असंही म्हणून गेल्या!

रुक्मिणीवहिनींनी दादाचं ते खड्ग अजून जपून ठेवलं होतं, जे त्यानं द्वंद्वात रुक्मीवर उगारलं होतं आणि वहिनींनी रथातून मुठीत पकडून ठेवलं होतं. वहिनींनी ते सेवकाकडून दादाला दाखविण्यासाठी आणवून घेतलं. दादानं हाती घेताच ते परस्पर माझ्याकडे दिलं. मला चाचपून घेण्यासाठी तो म्हणाला, "अवधूता, तुझ्या या भगव्या वेषात हाती शस्त्र बरं दिसत नाही, हे खरं आहे. तुझ्याकडे मी ते कुणाचं आहे, हे पारखण्यासाठी दिलं आहे." मी हातीचं खड्ग बारकाव्यानं निरखलं. त्यावर आम्हा यादवांची मानचिन्हं पाहून म्हणालो, "हे तर तुझंच नंदक खड्ग आहे!"

माझं उत्तर ऐकून आनंदविभोर झालेल्या रुक्मिणीवहिनी न राहवून पुन्हा म्हणाल्या, "किती झालं, तरी बंधू उधो आहेत ते!"

आता तिसऱ्यांदा त्यांच्या तोंडून स्पष्ट 'बंधू' हे संबोधन ऐकताना मला प्रकर्षानं जाणवून गेलं की, मला; माझा बंधू चित्रकेतू, बृहद्बलाला सख्खी बहीण नव्हती. मी रुक्मिणीवहिनींना वहिनींच्या ऐवजी भगिनी मानत आलो. तेही तोंडून तसा उच्चार कधीही न करता! त्याची पाळंमुळं ही अशी माझा अबोध मनात होतो.

दादा, रुक्मिणीवहिनी बऱ्याच वर्षांनंतर एकमेकांच्या सहवासात राहिले, मन:पूत एकमेकांशी बोलले, याचा मला अपार–अपार आनंद झाला होता. सर्व वहिनींचा आणि आप्तांचा निरोप घेऊन मूळ द्वारकेकडे परत निघताना, जांबवतीवहिनींच्या पुत्र सांबाला माझ्यासह बाजूला घेऊन दादा माझ्यासमक्ष म्हणाला, "पुत्रा सांब! तुझ्या नावात 'शिव' आहे. शिवाच्या पायात जसं प्रलयाचं सामर्थ्य आहे, तसं त्याच्या वाणीतही आहे. वाणीचं सामर्थ्य ज्याला कळलं, त्याला 'शिव' कळला. त्यालाच 'सांब' म्हणतात. ज्याला ते कळलं नाही, त्याला 'शुंभ' म्हणतात. शुंभ असुरांत आहेत, मानवांत नाहीत आणि वाणीही प्रलय माजवू शकते, हे कधीच विसरू नकोस!"

आम्ही मूळ द्वारकेत परतलो.

आता भारतीय युद्धापूर्वी होतो, तशीच दादाची दिनचर्या पुन्हा सुरू झाली. चारणगणांनी आळवलेल्या रुद्रवीणांच्या संगीतावर तो ब्राह्मी मुहूर्तावर उठत होता. लांबसडक बोटांच्या गुलाबी तळहातांवरील शंख, चक्र, स्वस्तिक, ध्वज, मत्स्य, यव

अशा दुर्मीळ रेषाचिन्हांचं दर्शन घेत होता. कुणालाच न कळणाऱ्या विचारानं मनोमन हसत होता. 'पादस्पर्शं क्षमस्व मे', म्हणत भुईला पहिला पदस्पर्श करीत होता. किकरकाडी, दंतमंजन यांनी दात घासून सुगंधी जलानं मुख प्रक्षाळत होता. पहाटेचे योगआसनांचे व्यायाम घेत होता. प्राणायाम, भगवत्स्तवन, पुरश्चरण करून मगच कासंडीभर धारोष्ण दूध पीत होता. पितरांना तर्पण, सूर्यदर्शन, ज्येष्ठ दर्शन, दानधर्म आटोपत होता. सुधर्मा सभेच्या समोरील प्रजाजनकक्षात येऊन द्वारकाकर स्त्री–पुरुषंची, बालकांची सर्व गाऱ्हाणी मन:पूर्वक ऐकत होता. विपृथूपुत्र सुकृत, सात्यकी, वेगवेगळे दलप्रमुख यांना सांगून त्यांची पटापट तड लावीत होता. द्वारकेबाहेरच्या गणराज्याचा विषय असला की, त्याच्याविषयीचा निर्णय बलरामदादाला घ्यायला सांगत होता. त्यानं घेतलेल्या निर्णयात कसलीही ढवळाढवळ करीत नव्हता. आता त्याच्या म्हणून असलेल्या गुप्तचरदलांकरवी, दोनच राज्यांच्या वार्ता लक्षपूर्वक ऐकत होता. एक हस्तिनापूर आणि दुसरं इंद्रप्रस्थ! इंद्रप्रस्थाचं राज्य पांडवांनी अनिरुद्ध–रोचनापुत्र वज्रासाठी तसंच राखून ठेवलं होतं, वज्र अद्यापि लहान होता. तो योग्य वयाचा होताच, राज्याभिषेकाच्या समारंभपूर्वक सर्व पांडव ते त्याला प्रदान करणार होते. तसं वचनच आत्याबाई कुंतीदेवींनी वनात जाण्यापूर्वी युधिष्ठिरासह सर्व पांडवांकडून घेतलं होतं, आम्हा द्वारकाकर यादवांच्या चौथ्या पिढीचाही हस्तिनापूरकर कुरूंशी दृढ भावसंबंध असावा, हाच त्यात हेतू होता.

तसं दादानं कामरूपी हजारो स्त्रियांचं द्वारकेत पुनर्वसन केलं होतंच. त्यानं विशेष लक्ष घालून कुरुक्षेत्रावर धारातीर्थी पडलेल्या यादववीरांच्या कुटुंबाचंही, त्यांना काहीही कमी पडणार नाही, असं पुनर्वसन करून घेतलं होतं. आता त्यानं कटाक्षानं सुधर्मा सभेत जाणं टाळायला सुरुवात केली होतो.

आताशा दादा सैनिक, योद्धे, दलप्रमुख, वीर यांच्यापेक्षा ऋषी, मुनी, योगी, तापस, संन्यासी यांच्या सहवासात अधिक रमलेला मला प्रकर्षानं जाणवू लागला. अशातच एके दिवशी पूर्वेच्या राजमार्गावरील चौकातील नव्या प्रशस्त समयतबकावर पहिला ठणठणता घणसर टोल पडला. पाठोपाठ दुसरा आणि तिसराही उठला.

नव्या समयतबकाचे घणघणते टोल ऐकताच, दादानं आपले मत्स्यनेत्र क्षणैक मिटले. समय टोल ऐकून तो मला म्हणाला, "बंधो अवधूता, कोण विशेष अतिथी असावा? बघू या तर, चल." निघताना त्यानं एका सेवकाकरवी बलिदादाला समयचौकात परस्पर येण्याचा संदेशही धाडला.

आम्ही राजमार्गाच्या समयतबकाच्या चौकात आलो. समयतबकाच्या पाषाणी चौथऱ्यावर एक शुभ्र वस्त्र आणि दाढी–मिशीधारी उंचशील ऋषिवर होते. त्या सावळ्या ऋषिवरांना त्यांच्या दहा–पंधरा शिष्यगणांचा वेढा पडला होता. त्या ऋषिवर्यांची दृष्टिभेट होताच, दादानं प्रथम आमच्या सोबतच्या सशस्त्र सैनिकांना जागीच थांबवलं. एकटचा माझ्यासह तो झपाझप चालत पुढे निघाला. आम्ही समयचौथऱ्याच्या पायदंड्या चढून वर आलो. समयतबकावरची यादवांची मानचिन्हं डोळे बारीक करून बघण्यात दंगलेल्या त्या पाठमोऱ्या महर्षींच्या चरणांवर दादानं अष्टांगी लोटांगण घेतलं. पाठोपाठ मीही घेतलं. ते होते, अपार वृद्ध महर्षी व्यास!!

महर्षींच्या अंगावर ते विवाहित असल्मामुळे शुभ्र वसनं होतो. त्यांच्या तशाच दाढीजटाभारामुळे ती त्यांना शोभूनही दिसत होतो. दादाला लगबगीनं उठवून

आलिंगनात बिलगतं घेताना महर्षी लहान बालकासारखं हसून म्हणाले, "तू तर आत्ताच माझ्यासारखा दिसू लागलास! युवराज कुठे आहे?"

आपल्या गद आणि सारण या बंधूंसह बलरामदादांना दुरून येताना बघून महर्षिशिष्य आपापसांत कुजबुजले, 'द्वारकाधीशांचे ज्येष्ठ बंधूही येताहेत.' त्या सर्व शिष्यांच्या अंगांवर माझ्यासारखी भगवी वस्त्रं होती.

येताच बलरामदादानं बंधूंसह महर्षींना दंडवत घातले. आम्ही सर्व जण पायी चालतच सुधर्मा राजसभेत आलो. बलरामदादानं येतानाच सूचना दिल्यामुळे महर्षींच्या सत्काराचं उचित साहित्य घेऊन अमात्य सुकृतही आले. बलरामदादानं युवराज म्हणून महर्षींचा आणि त्यांच्या शिष्यगणांचा सत्कार केला. महर्षींच्यासाठी हे सर्व तातडीनं करण्यात आले. कारण ते दोन दिवसांपेक्षा अधिक एकाच स्थली कधी आणि कुठेच थांबत नव्हते.

या दोन दिवसांत त्यांनी वसुदेवबाबा, दोन्ही राजमाता यांची भेट घेतली. आचार्य सांदीपनी आणि गुरुपत्नी यांच्या निवासी जाऊन त्यांचं क्षेमकुशल घेतलं. महर्षींचं दर्शन घेण्यासाठी राणीवशाच्या स्त्रीमंडळाला मूळ द्वारकेत बोलावून घेण्याचं दादानं मला सांगताच महर्षीच म्हणाले, "त्यांना इकडे बोलावून घेण्याची मुळीच आवश्यकता नाही. मीच तिकडे जाईन. तुझी राणी रुक्मिणी अतिशय चविष्ट गुरगुट्या ओदन करते, असं ऐकून आहे. तो तू गोकुळात यथेष्ट खाल्लेला आहेस. मला एकदा तरी त्याची चव चाखायची आहे!" एवढा थोर पराकोटीच्या ब्रह्मपदाला पोहोचलेला तो महर्षी, ते बोलून एखाद्या लहान अर्भकासारखा खळाळ हसला.

नेहमी एवढं बोलणाऱ्या दादाची ते ऐकताना वाणीच बंद झाली. तोही नम्रपणानं हात जोडून महर्षींना म्हणाला, "जशी महर्षींची आज्ञा."

महर्षी व्यास शिष्यगणांसह राणीवशाच्या द्वीपावर गेले. सोबत मी आणि दादाही होतोच. तिथे त्यांनी रुक्मिणीवहिनींसह सर्व वहिनींना दादाच्या सर्व पुत्रांना व कन्यांना दर्शन दिलं. एक दिवस तिथे पडाव टाकला. दुसऱ्या दिवशीच ते द्वीप सोडून मूळ द्वारकेत आले. आता ते नित्याच्या भ्रमणासाठी द्वारका सोडणार होते. मी, दादा, बलरामदादा असे तिघेच महर्षींच्या शिष्यगणांसह खाडी पार करणाऱ्या मोठ्या नौकेजवळ आलो. शिष्यगण एकेक करत नौकेत चढले. आम्ही चौघंच मागं राहिलो. महर्षी, दादा, मी आणि बलरामदादा! महर्षी त्यांचा उजवा हात दादाच्या खांद्यावर ठेवत माझ्याकडे बघून म्हणाले, "कुरुक्षेत्रावर झालेला आघात काहीच नव्हे, अशा सत्त्वपरीक्षेच्या सत्याला तुम्हा तिघांनाही सामोरं जावं लागेल!" आम्ही तिघंही बंधू त्यांच्या तपःतप्त, शुभ्र दाढीजटाधारी तेजस्वी मुद्रेकडे बघतच राहिलो. महर्षी बलरामदादाला म्हणाले, "युवराज बलभद्रा, तुझ्या राजनगर द्वारकेची, माझ्या शिष्यगणांनी उचललेली खडान्खडा माहिती माझ्या कानी घातली आहे. तू हिमालयातून आल्यापासून फारसा राजवास्तूबाहेर पडलेला नाहीस. श्रीकृष्ण, तू कुरुक्षेत्रावरून आल्यापासून पराकोटीचा विमनस्क आहेस. अहोरात्र तुझ्या सेवेत हा अवधूत उद्धव गुंतून पडला आहे. तुमचे प्रजाजन – लक्षावधी यादव आज शासनरहित झाले आहेत. ते मनोविनोदनाकडे आणि मनोरंजनाकडे झपाट्यानं वळले आहेत. रोजची विहित नित्यकर्मं विसरत चालले आहेत. तुम्ही तिघांनीही वेळीच सावध झालं पाहिजे. प्रजाजनांतील कुणाच्याही तथाकथित मोठेपणाचं भय न मानता, कठोर शासनाचा अवलंब तुम्ही केला पाहिजे. यात हेळसांड झाली, तर पश्चात्तापालाही समय उरणार नाही.

"तुम्ही मला पुत्रांसारखे आहात. यासाठी स्पष्ट शब्दांत संकेत केला आहे. यामुळे असंतुष्ट होऊ नका. मला असाही वृत्तान्त कळला आहे की, तुमच्या नगरजनांत मद्याचं आकर्षण झपाट्यानं वाढतं आहे. त्यामुळे स्त्रियांच्या उचित आदराला ठायी–ठायी पायदळी तुडवलं जात आहे. तुमचे पूर्वीचे युद्धसंमुख वीर यादवसैनिक स्त्रीलंपट होताहेत. वास्तव ध्यानी घेऊन, योग्य ते करा. माझे तुम्हाला आशीर्वाद आहेत. आता मला निरोप द्या."

पाठमोरे झालेले महर्षी व्यास धीमी पावलं टाकीत नौकेत चढले. शिष्यगणांत मिसळून गेले. मागे ठेवून गेले, ते आम्हा तिघांसाठी एक अंत न लागणारं चिंतासत्र.

दुसऱ्याच दिवशी युवराज बलरामदादांनी द्वारकेच्या नगरजनांसाठी कठोर आज्ञापत्रं काढली. दवंडी देऊन ती हजारो नगरजनांच्या निवासांपर्यंत पोहोचविली. एक सप्ताहभर, नंतर पंधरवडाभर, मग मासभर द्वारकेत शांतताच शांतता नांदू लागली. आता दादा माझ्यासह खाडी उतरून कधी सोमनाथ, कधी नागेश्वर, कधी वेरावळजवळचं भालकातीर्थ अशा ठिकाणी वारंवार जाऊ लागला. कधी–कधी तो सात्यकी, दारुक आणि मी असे प्रभासतीर्थावरही जाऊ लागलो.

कामरूपी हजारो स्त्रिया आता वृद्ध झाल्या होत्या. त्यांनी आपापल्या इच्छेप्रमाणे योग्य त्या–त्या यादवसैनिकांशी विवाह करून संसार थाटले होते. त्यासाठी त्यांना पूर्वी प्राग्ज्योतिषपुऱ्हात दिलेल्या सामूहिक अभयातून दादानं शास्त्रानुसार मुक्त केलं होतं. त्यांचीही तिसरी पिढी त्यांच्या वसाहतीत नांदत होती.

एके दिवशी दादाच मला म्हणाला, "उधो बंधो, आज कसलीही कामं काढू नकोस. आज दिवसभर आपण कामरूपी स्त्री–पुरुषंच्या वसाहतीत घालवायचा आहे. कशेरूला अग्रवार्ता दे."

त्यानं इच्छा व्यक्त केल्याप्रमाणे दुसऱ्या प्रहरात आम्ही म्हणजे दादा, मी, बलरामदादा, सात्यकी, दारुक, अमात्य सुकृत कामरूपी वसाहतीत आलो.

ती सगळी वसाहत कशी मोहरून उठली. त्या वसाहतीतील मध्यवर्ती चौकात उंच चौथऱ्यावर आस्तरणाची बैठक मांडली होती. कितीतरी वेळ आम्ही सर्वांनी त्या बैठकीवर बसून कामरूपी स्त्री–पुरुषंची नृत्यं पाहिली. गाणी ऐकली. इतकंच नव्हे, तर नृत्याच्या शेवटी बैठकीवरून दादा आपणहून उठला. गोकुळात, मथुरेत चांदण्यारात्री रासात पूर्वी तो नाचला होता, तसाच कामरूपी वृद्ध स्त्रियांसहसुद्धा नाचला.

आता बलरामदादांच्या आज्ञांप्रमाणे द्वारकेचे नगरजनही बरेचसे शासनबद्ध वागू लागले होते. सुधर्मा सभेतील नव्या पिढीचे मंत्रिगण आणि दलप्रमुख आपापला कार्यभार नीट संभाळू लागले होते. द्वारकेत पूर्वीसारखे भरगच्च रथोत्सव होऊ लागले होते. वृषभरथांच्या, कुक्कुटांच्या, अश्वांच्या अटीतटीच्या स्पर्धा हर्षोल्हासात पार पडू लागल्या होत्या. गदेची, खड्गाची, मल्लविद्येची द्वंद्वं कलहविरहित झडू लागली होती. दादा आता क्वचितच सुधर्मा सभेत जात होता. युवराज म्हणून बलभद्रदादाला जावंच लागत होतं. वृद्ध वसुदेवबाबांना आणि दोन्ही राजमातांना आवश्यक विश्राम देऊन, तोच आता सुधर्मा सभेचा कार्यभार समर्थपणे सांभाळत होता. आताशा आचार्य सांदीपनी मात्र अवंतीच्या अंकपाद आश्रमाचा विषय काढून पुत्र दत्तासह तिकडे जाण्याच्या गोष्टी करीत होते. मी आणि दादा त्यांना आग्रह करून त्यापासून परावृत्त करीत होतो.

पांडवांचा अश्वमेध यज्ञाचा अश्व सर्व आर्यावर्तभर फिरवून धनुर्धर अर्जुन यशस्वी

होऊन हस्तिनापुरात परतला होता. त्यालाही आता कितीतरी कालावधी झाला होता.

कुरुक्षेत्राच्या युद्धात झालेल्या पंचपुत्रांच्या वधांमुळे व्याकूळ झालेली पांडवपत्नी द्रौपदीदेवी आता कितीतरी सावरली होती. ती पुनश्च पांडवांच्या महाराणीपदाचं दायित्व डोळसपणे सांभाळते आहे, हे ऐकून दादा समाधानी झाला होता. आमची भगिनी सुभद्रा हीसुद्धा अभिमन्यू–उत्तरा यांचा पुत्र परीक्षिताचं संगोपन दक्षतेनं करीत होती. तोही आता मोठा झाला होता.

आणि अशाच एका दिवशी समयतबकाच्या चौथऱ्यावरून विशेष अतिथीचा संकेत देणारे त्रिवार टोल पुन्हा निनादले – ठणऽ ठणऽ ठणऽ! त्यांनी आपल्या झणत्कारांनी समुद्रगाजही झाकाळून टाकली. दादा ते टोल ऐकताच सावध झाला. मला त्यानं बलभद्रदादाच्या कक्षाकडे पिटाळलं. त्याला सोबत घेऊनच मी पुनश्च दादाच्या कक्षात आलो.

प्रथम दादा, मी आणि बलरामदादानं कोण अतिथी आला असावा, असा विचार करतच समयतबकाचा चौथरा गाठला. चौथऱ्यावर आपले शिष्यगण व आमचे यादवसैनिक यांच्या मेळात उभे होते, प्रयागक्षेत्रीचे साक्षात आचार्य घोर आंगिरस!

ऋषिवर घोर आंगिरसांनीही दादाला, बलभद्रदादाला व मला महर्षी व्यासांसारखं दृढ आलिंगनात घेतलं. पूर्वीसारखीच त्यांच्या मुखावर शुभ्र वस्त्रपट्टी होती. तेही आता पूर्वीपेक्षा कितीतरी वयस्क झाले होते. पूर्वीपेक्षा कितीतरी कमी बोलत होते. त्यांच्या वयामुळे व वस्त्रपट्टीमुळे ते जे काय बोलत होते, ते अस्पष्ट ऐकू येत होतं.

त्यांनी दादाला अत्यंत शांत, स्थिर आवाजात सांगितलं, "तुला मी प्रयागक्षेत्रीच्या आश्रमात सांगितलेली ब्रह्मविद्येची जपणूक तू किती व कशी केली आहेस, हे प्रत्यक्ष बघण्यासाठी मी आलो आहे. तू कुरुक्षेत्रावर खेळविलेलं महायुद्ध एक महायज्ञच होता. तो आवश्यकही होता, हे मी जाणतो. तो चेतला नसता, तर या आर्यावर्ताचं रूप किती विरूप झालं असतं, हेही समजू शकतो. मात्र आता तुला कसलाही ब्रह्मोपदेश करण्यासाठी मी आलो नाही – तर तुझ्याकडूनच या जीवनवळणावर मला जीवनाचा योग्य अर्थ समजेल, म्हणून तुझं ऐकायला आलो आहे!!"

"हे मोठ्याच संकटात घालता आहात आपण मला, आचार्य." दादानं नेहमीच्या विनयानं दोन्ही हात जोडून किंचित वाकून त्यांना आदर दिला. म्हणाला, "चलावं निवांत बोलू!"

महर्षी व्यास तडक सुधर्मा राजसभेत गेले, तसे घोर आंगिरस काही तिकडे जायला तयार झाले नाहीत. ते मोजक्या शब्दांत म्हणाले, "राजधर्म – कर्म – सत्कारसमारोह यांत मला आता कसलाही रस नाही. इच्छा आहे, केवळ तुझ्याशी मनसोक्त बोलण्याची! तीही तुझ्या एकट्याशीच! ऐकायला हा माझा शिष्य उद्धव आणि दारुकही चालतील. तुझ्याशी बोलणं! झालं की, वसुदेवबाबांचं, तुझ्या दोन्ही मातांचं आणि तुला घडविणाऱ्या आचार्य सांदीपनींचं दर्शन घेऊन मी रैवतक पर्वताकडे नित्याच्या वास्तव्यासाठी जाणार आहे."

तापसांच्या प्रथेप्रमाणे तेही दोन दिवसच द्वारकेत राहिले. त्यांनी कसलाही सत्कार स्वीकारला नाही. ते अत्यंत मिताहारी व मितभाषी झाले होते. दादाच्या कक्षात येताच, आपल्या बैठकीवरच्या आस्तरणावर उजव्या हाताशी त्याला बसतं करून, समोर आम्हाला बसण्याचा हातनिर्देश देऊन, दादाच्या पाठीवर हातानं थोपटत ते म्हणाले, "जे–

जे अर्जुनाला तू कुरुक्षेत्रावर सांगितलंस, त्यातील मोजकंच निवडक मलाही सांग. मी केवळ ऐकणार आहे. बोलायचं आहे, ते एकट्या तूच. तुला सर्वांना ऐकविण्याचा अधिकार पूर्वीही होता, आताही आहे. निःसंकोच बोल.”

मग दादा बोलत राहिला. आम्ही ऐकतच राहिलो. विषादयोग, कर्मयोग, राजयोग, ज्ञानयोग अशी कितीरी वळणं घेत, तो त्याच्या आवडत्या प्रेमयोगावर भरभरून बोलला. त्याचं हे बोलणं! ऐकतच राहावं, असं होतं. कितीतरी वेळानं तो आपली निमुळती निळसर बोटं ओठांकडे दोन–तीन वेळा नेऊन सर्वांना भोजनाचं स्मरण देत म्हणाला, “हे यज्ञकर्म अगोदर सर्वांनी उरकून घ्यावं!”

तसं आता कुठे पहिल्यानं हसून आचार्य घोर आंगिरस म्हणाले, “श्रीकृष्णा, तुझी गोकुळातील खट्याळ वृत्ती जराही कमी झालेली नाही. एवढं, बौद्धिक खाद्य दिलंस, तरीही भोजनाचं नित्यकर्म तू विसरत नाहीस.”

ते पुढे काही बोलणार, तोच त्यांना हाताला धरून प्रेमानं भोजनासाठी उठवीत दादा म्हणाला, “मला माहीत आहे, आता आपण एकभुक्त तीर्थंकर आहात. तरही दूध आणि फलाहार घ्यावा. आपल्या शिष्यगणांशिवाय इतर सर्व आपल्या पंगतीत भोजन घेतील.”

आचार्य घोर आंगिरसांच्या सहवासातले हे दोन दिवस कसे निघून गेले, तेच कळलं नाही. या ना त्या मिषानं त्यांनी दादालाच सतत बोलतं ठेवलं. ते द्वारकेत आल्याची वार्ता रैवतक पर्वतावरील नरेश ककुद्मिन यांना समजली. ते आपल्या अमात्य व सेनापतींसह आचार्य घोर आंगिरसांच्या स्वागतासाठी तत्परतेनं आले. ते आचार्यांना रैवतक पर्वतावर आता नित्यासाठी नेणार होते. आचार्यांसाठी त्यांनी रैवतकावर आत कसलीही प्रतिमा नसलेला, सुसज्ज असा एक आश्रमही उठविला होता.

दादानं राणीवशाच्या द्वीपावर मला धाडून आपल्या सर्व राण्यांना व पुत्र– कन्यांना आचार्यांच्या दर्शनासाठी बोलावून घेतलं. माझ्याकडूनच रुक्मिणीवहिनींना विशेष निरोप धाडला की, “तुझ्या हातचा लवणाचा गुरगुट्या ओदन, आचार्यांसह त्यांच्या शिष्यांना यादवांचा प्रसाद म्हणून द्यायचा आहे. येताना तो भरपूर आणि स्वच्छ पात्रांतून न विसरता घेऊन येणे!”

रुक्मिणीवहिनी तशा आल्या. दादा, मी बलभद्रदादा, महाराज ककुद्मिन, अमात्य सुकृत, सात्यकी, दारुक, आचार्यांचे सर्व शिष्य सर्वांनीच त्यांच्या हातचा प्रसाद दादाच्या कक्षात आनंदानं भक्षण केला.

सांगितल्याप्रमाणे वसुदेवबाबा, दोन्ही राजमाता, आचार्य सांदीपनी, गुरुपत्नी, गुरुपुत्र दत्त यांची भेट घेऊन, घोर आंगिरसांनी शिष्यगणांसह मूळ द्वारका सोडली. ते रैवतकनरेश ककुद्मिनांसह रैवतक पर्वताकडे शिष्यगणांसह निघून गेले.

ते गेल्यावर आम्हा तिन्ही बंधूंना एक भावपोकळी कितीतरी दिवस जाणवत राहिली. त्यांना निरोप देण्यासाठी आलेल्या माझ्या सर्व वहिनींच्या स्वभावातील एका मजेदार पैलूंचं दर्शन मला घडलं. त्या सगळ्या जणींचं दादावर नितांत प्रेम होतं. त्या वेगवेगळ्या कारणांनी मला दादाच्या कक्षात बोलावून घेत होत्या. त्या सगळ्या जणींच्या ठायी अपार कुतूहल होतं, ते दादानं उठविलेल्या श्रीसोपानविषयी! प्रत्येकीला जाणून घ्यायचं होतं की, आपल्या नावाची पायदंडी त्या श्रीसोपानात आहे की नाही? ती असणारच, याचा प्रत्येकीला विश्वास होता. आहे ती कितव्या क्रमांकाची आहे, हे जाणून घेण्याची प्रत्येकीला सखोल उत्सुकता होती. त्यातही आणखी एक

मजेदार बारकावा होता. आपल्या खालची पायदंडी कुणाची व वरची कुणाची, हेही समजून घेण्याचा अट्टाहास होता. या सर्वाला अपवाद होत्या त्या आमच्या एकट्या रुक्मिणीवहिनी! सर्व जणी जशा मला खोदखोदून याविषयी विचारीत – प्रसंगी मला श्रीसोपानाजवळ नेऊन आपल्या नावाची पायदंडी प्रत्यक्ष दाखविण्याचा आग्रह करीत. एकट्या रुक्मिणीवहिनींनी मात्र मला कधीच याविषयी काहीही विचारलं नाही.

जेव्हा मी इतर सातही वहिनींच्या विचारणीची गोष्ट त्यांच्या कानी घातली, तेव्हा त्या नुसत्या हसल्या – अगदी दादासारखं. मी गोंधळून त्यांना विचारलं, "वहिनी, तुम्हाला कशी काय वाटत नाही याविषयी काहीही उत्सुकता?"

त्या अगदी सहज म्हणाल्या, "करायची काय मला पायदंडी? मी माझ्या श्रींच्या पायाची धूलच तर आहे! सततच त्यांच्या पायांबरोबर नसते काय?" हे उत्तर त्यांनाच सुचणारं होतं. किंबहुना ते उत्तर नव्हतंच, तो त्यांचा सहजोद्गार होता!

आता भामावहिनीत झालेला आमूलाग्र बदल या निमित्तानं तर मला स्पष्टच जाणवून गेला. मी त्यांनाही विचारलं, "तुम्हाला का वाटते उत्सुकता, श्रीसोपानात आपल्या नावाची पायदंडी आहे की नाही हे जाणून घेण्याची?" माझ्या या प्रश्नानंतर एकदा त्यांनी सावधपणे मलाच विचारलं, "हा प्रश्न तुम्ही कधी रुक्मिणीताईंना विचारला काय? काय उत्तर दिल त्यांनी?" मी त्यांना रुक्मिणीवहिनींनी दिलेलं उत्तर सांगताच त्या डोळे विस्फारून म्हणाल्या, "असं म्हणाल्या ताई?" मग मात्र त्या काहीच बोलल्या नाहीत.

दादाच्या एवढ्या पुत्रांत मात्र एकालाही कधी या श्रीसोपानाचं काही औत्सुक्य वाटलेलं मला जाणवलं नाही. कधी–कधी माझ्या मनात तीव्रपणे विचार येई की, दादा, बलभद्रदादा, त्याचे बंधू, माझे बंधू या सर्वांच्या पुत्रांची पिढीच वेगळी आहे. रोज समोर दृष्टीला पडणारं द्वारकेतील झळझळीत सुवर्ण बघून त्यांची दृष्टीच मृत झाली होती. त्यांना श्रीसोपानाच्या सुवर्णी पायदंड्या आणि सुवर्णाची तटबंदी, यात काहीही अंतर वाटत नव्हतं.

आचार्य घोर आंगिरस येऊन गेल्यापासून, दादाच्या चित्तवृत्तीतही एक सूक्ष्म बदल झाला होता. रोज संध्यावंदनासाठी वसुदेवबाबा आणि दोन्ही राजमातांच्या दर्शनासाठी आम्ही जात होतो. यापूर्वी दादा त्या सर्वांना वंदन करून द्वारकेत त्या दिवशी घडलेल्या एखाद्या महत्त्वाच्या घटनेची थोडक्यात उडती चर्चा करून, 'येतो' म्हणून त्यांच्यासमोरून पुन्हा वंदन करून लागलीच निघत असे. आता मात्र तो वसुदेवबाबांना वंदन करून त्यांच्याजवळ मंचकावरच बसत असे. बाबांना प्राणायाम आसनातील शवासनासारखं आग्रहानं मंचकावर लेटायला सांगे. त्यांचे चरण आपल्या मांडीवर घेऊन, आपल्या निळसर सडक बोटांनी ते घटकान्‌घटका चुरत बसे. तो बसला की, पुढे होऊन वसुदेवबाबांचा दुसरा चरण मीही आपोआपच आपल्या मांडीवर घेऊन चुरत बसे. अशा वेळी मात्र दादा वसुदेवबाबांशी नाना विषयांवर त्याच्या मधाळ वाणीत बोलतच राही. ते बोलणं ऐकणं, हा तर माझा सर्वांत मोठा आनंद होता.

दादाच्या पाय चुरण्यानं पुरेसा विश्राम लाभलेले वसुदेवबाबा निद्राधीन झालेले असत. तसं माझ्याकडे बघून 'काम झालंय' अशा अर्थाचे डोळे मिचकावून दादा शुभ्र दाढीभर हसे. मांडीवरून बाबांचा चरण हलकेच उतरवून शय्येवर ठेवून तो जायला निघे. मीही त्याचंच अनुकरण करी.

मग आम्ही दोन्ही राजमातांच्या कक्षात जात असू. जो प्रयोग त्यानं बाबांच्यासाठी केला होता, तसाच देवकीमातेच्यासाठी तो करू बघे, त्यांनाही मंचकाच्या शय्येवर आग्रहानं विश्रामासाठी लेटायला लावी. त्यांचाही चरण आपल्या मांडीवर घेऊन चुरू लागे. मीही त्याच्याजवळ बसून त्याच कर्मात गढून जाई.

थोरलीला निद्रा काही लागत नसे. तीच काही वेळानं म्हणे, "पुरे झाली आता तुझी चरणसेवा. तू द्वारकाधीश – मोठ्या कामाचा. आता धाकटीलाही तुझ्या चरणसेवेचा लाभ दे! जा." मग आम्ही तिच्या अंगावर नीट पांघरूण घालून धाकट्या राजमातेच्या – रोहिणीमातेच्या तशाच सेवेसाठी तिच्या कक्षाकडे जात असू.

त्याच्या या मात्या–पित्यांच्या ठायीचा नितांत नम्र आदरभाव बघताना, एके दिवशी मला फार–फार प्रकर्षानं जाणवून गेलं. त्याला एक नव्हे, दोन नव्हे, चांगले ऐंशी पुत्र होते. प्रथा म्हणून केलेल्या चरणस्पर्शाशिवाय त्यातल्या एकानंही आपल्या पित्याची अशी चरणसेवा कधीही केली नव्हती! तसा विचारही कधी कुणी बोलून दाखविला नव्हता. याचा अर्थ एकच होता, आकाशात तळपत्या सूर्यदेवाखाली वाढणारी प्रत्येक पिढी वेगळी असते. तिचे आचार–विचार, आदर्श नेहमीच वेगवेगळे असतात, हे शाश्वत तत्त्वच खरं होतं

दादाचं माझ्यासह द्वारकाखाडी उतरून कधी सोमनाथाला, कधी नागेश्वराला, कधी वेरावळच्या भालका तीर्थाला जाणं चालूच होतं, कधी–कधी प्रभास क्षेत्राच्या तीर्थालाही आम्ही जात होतो. पार पूर्वी द्वारकेत होतो, तशीच आता दादाची दैनंदिनी विनाविक्षेप सुरू झाली होतो.

आम्हा दोघांच्या संभाषणात सतत विषय असे, तो पांडवांचा. आसपासच्या सर्वच राज्यांशी पांडवांचे अत्यंत स्नेहाचे आणि सलोख्याचे संबंध प्रस्थापित झाले होते. महात्मा विदुर आणि अनुभवी मंत्री संजय यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा कारभार सुरळीत चालला होता. पांडवांच्या यशस्वी अश्वमेध यज्ञामुळे भोवतीची अलोट संपत्ती पांडवांच्या राजनगराकडे दरवर्षी न चुकता लोटत होतो. धार्मिक व प्रजाहितदक्ष पांडवांनी, गंगेवर ठिकठिकाणी सुरेख पाषाणघाट उठविले होते. जागोजागी पाण्याच्या विहिरी व कूप खोदले होते. प्रशस्त उद्यानं, सुरचित क्रीडांगणं, मल्लविद्येच्या व्यायामशाळा यांनी पांडवांच राजनगर हस्तिनापूर गजबजून गेलं होतं, पांडवांची कीर्ती ऐकून भोवतीच्या राज्यातील कलाकार, कारागीर हस्तिनापुराकडे कायमच्या वास्तव्यासाठी लोटले होते. काही जण कुरुक्षेत्राचं घनघोर महायुद्ध जिंकणारे विराट विक्रमी भीमार्जुन यांचं केवळ डोळाभर दर्शन घेण्यासाठी कुतूहलानं हस्तिनापुरात येत होते. पांडवांनीही आता नगराच्या मध्यभागी इडादेवीचं सुघड पाषाणी मंदिर उठविलं होतं. पांडवपुरोहित धौम्य ऋषींचा एक सुसज्ज आश्रमही नगराच्या उत्तरेच्या सीमेवर उठला होता. त्याच्यात चहुबाजूच्या गणराज्यांतील शिष्यगण जीवनाच्या मार्गदर्शनासाठी निष्ठेनं दाटला होता. पांडवांनी इंद्रप्रस्थाचं राज्य दादाचा पणतू वज्र, याला रीतसर राज्याभिषेक करून अर्पण केलं होतं. मात्र हा अनिरुद्ध–रोचनापुत्र वज्र अद्याप लहान असल्यामुळे, सज्ञान होईपर्यंत हस्तिनापुरातच राहणार होता. त्याच्या वतीनं एक महामंत्री त्याच्या नावे इंद्रप्रस्थाचा राज्यकारभार बघणार होते.

अभिमन्यू–उत्तरेचा पुत्र परीक्षित वृद्ध धौम्य ऋषी, देशोदेशीचे निष्णात आचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रअस्त्रविद्या व राजकुलाचे आचार–विचार, शिष्टाचार

यांची सखोल माहिती घेऊन तयार होत होता.

द्वारकेत येणारे वेगवेगळ्या राज्यांचे सेनापती, अमात्य, राजर्षी, राजपुरोहित वेगवेगळ्या ढंगानं एक गोष्ट न विसरता आमच्या कानी घालायला चुकत नव्हते. अशा राज्यांतील राजपुत्र, प्रज्ञाशील आश्रमकुमार संधी मिळेल, तेव्हा हस्तिनापूरला जाऊन येत होते. पाचही पांडवांपैकी धनुर्धर अर्जुनाची भेट घेतल्याशिवाय, त्यातील कुणीही परतत नव्हतं. एकवेळ महाराज युधिष्ठिर व इतर तीन पांडवांपैकी एखादा त्यांना नाही भेटला तरी चालत असे, पण अर्जुन भेटला नाही, तर तो भेटेपर्यंत ते हस्तिनापुरातच पडाव टाकून राहात होते.

अत्यंत नम्रभावानं अर्जुनाला भेटून, त्याची वारंवार विनवणी करून, दादानं त्याला कुरुक्षेत्राच्या समरभूमीवर युद्धारंभीच जो हितोपदेश केला, त्याची माहिती काढून घेत असत. अर्जुनही दादाचं नाव घेऊन कुणी साकडं घालताच, त्यानं दिलेल्या हितोपदेशाविषयी स्मरेल तसं रंगून बोले. अशा प्रकारे दादानं एकट्या अर्जुनाला केलेला हितोपदेश, आता अनंतमुखी झाला होता. एकाकडून दुसऱ्याकडे तो जात असताना, त्याच्यात नकळतच भर पडत होती. कुरुजांगल, हस्तिनापूर, इंद्रप्रस्थ अशा ब्रह्मावर्ताच्या खोरीतील प्रजाजन त्याला 'श्रीकृष्णगीता' म्हणूनही ओळखू लागले होते.

हे सर्व समोर घडत असताना, ऐकत असताना, कधी–कधी मला प्रकर्षानं जाणवून जाई की, दादा मला 'परमसखा' म्हणत असला, 'भावविश्वस्त' 'अवधूत' म्हणत असला, तरीही अर्जुनच त्याचा जिवलग व परमप्रिय सखा होता.

असेच एकदा आम्ही दादाच्या कक्षात बोलत बसलो होतो. पांचालांच्या कांपिल्यनगराहून आलेले सेनापती, अमात्य, याज–उपयाज हे ऋषिवर बैठकीत होते. ऋषिवर याज–उपयाज आणि पांचाल अमात्य दादाची 'श्रीकृष्णगीता' गंगेच्या खोऱ्यात पांचालजनांच्या घरोघरं कशी पोहोचली आहे, याची वार्ता दादाला देत होते. तो निर्लेप मनानं, काहीही न बोलता, मध्येच नेहमीसारखं हसून सर्वांच नुसतं ऐकत होता. इतक्यात श्रीसोपानाच्या दिशेनं प्रथम कसलातरी कलकलाट ऐकू आला. तो ऐकताच आमच्या बैठकीत शांतता पसरली. पाठोपाठ समयचौथऱ्यावरच्या सैनिकी चौकीचा दलप्रमुख हातीचा भाला व कटीचं खड्ग सावरत लगबगीनं कक्षात घुसला. काहीसा भेदरत, चाचपडत म्हणाला, "मी नाना परीनं सांगितलं – मुनिबाबा, इथंच थांबा. तबकाचे टोल द्या – तुम्ही देत नसाल, तर मी देतो. द्वारकाधीशांना आपोआप अग्रवार्ता जाईल. त्यांना कुणीही अचानक भेटलेलं आवडत नाही. पण – पण त्या शुभ्र दाढीवाल्या बाबांनी माझं काहीएक ऐकलं नाही! माझं बोलणं फेकून देत ते म्हणाले, 'छट् – तुझ्या द्वारकाधीशाला भेटायला मला अग्रवार्तेची काय आवश्यकता आहे? हा मी निघालो तडक त्याच्याकडेच.' असं म्हणून ते शेलाटे, हातात वाकडी बिल्वकाठी असलेले मुनिबाबा हातची काठी भुईवर थडाथड आपटत निघालेत! द्वारकाधीशांची अवज्ञा केल्याचा दोष मस्तकी येईल, म्हणून मी धावतच त्यांच्या पुढे आलो आहे." धापावणारा तो दलप्रमुख सुटकेचा नि:श्वास टाकतो न टाकतो, तोच वक्र बिल्वकाठीधारी शिडशिडीत उंच, श्यामवर्णी, दाढी–जटाधारी एक ऋषिवर्य श्रीसोपान चढून दादाच्या कक्षात घुसलेही.

त्यांना बघितलं मात्र, दादाच एकदम ताडकन बैठकीच्या आसनावरून उठला. लगबगीनं पुढे जात त्यानं, गरगर डोळे फिरवत आलेल्या ऋषिवर्यांच्या चरणांवर सरळ

लोटांगण घेतलं. आता त्यानंच घेतलं म्हटल्यानंतर माझ्यासह सर्व पांचालही ताडकन उठले. आम्ही सर्वांनीच त्यांना दंडवत घातले. दादानं त्यांचा बिल्वकाठीधारी कृश हात प्रेमानं हाती घेतला. “केव्हा आगमन झालं ऋषिवरांचं द्वारकेत?” म्हणत आदरानं त्यांना आपल्या आसनावर आणून बसवलं. नम्रपणे झुकून, दोन्ही हात जोडून दादा त्यांना म्हणाला, “आज्ञा व्हावी ऋषिश्रेष्ठ! का आगमन झालं?”

तडक आलेल्या त्या काटकुळ्या ऋषिवर्यांनी भोवतीच्या आम्हा सगळ्यांवरच आपली तांबरलेली दृष्टी एकदा गरगर फिरविली. मग हातातली वक्र बिल्वकाठी हवेत एकदा उडवून ते कडाडले, “अरेऽरेऽरेऽ, द्वारकाधीश म्हणविणाऱ्या कृष्णा, काय रेऽ तुझ्या द्वारकेची आणि तुझी ही स्थिती? मी सगळं नगर फिरून आलो. इथे चौकाचौकांत मद्यालयं उठलीत. तुझे लढाऊ यादव क्षत्रियत्व विसरून, मद्य ढोसून दिवसा-रात्री एकमेकांशी अरेरावीनं साध्या कारणास्तवसुद्धा भांडत-तंडत असतात. तुझे शस्त्रधारी दलप्रमुख दिसले की तेवढ्यापुरते चिडिचाप होतात. साळसूद बनतात.”

मी दादाकडे बघतच राहिलो. तो कसलीही प्रतिक्रिया देत नव्हता.

आलेले पांचालप्रमुख समोरचा प्रकार बघून गर्भगळीत झाले होते. एकमेकांना भुवया उंचावून, कोपरखळ्या मारून, दबकेच विचारीत होते, “आलेले महानुभाव कोण आहेत? कोण?...”

तसं आलेले ऋषिवर्यच हातची काठी आणि तांबारलेले डोळे गरगर फिरवीत कडाडले, “कुणाला कशाला पाहिजे, मी कोण आहे ते? पाहिजेच असेल तर ऐका. मी - मी आहे ऋषिश्रेष्ठ अत्रींचा पुत्र - दुऽर्वाऽस!” लागलीच दादावरच डोळे रोखून दुर्वास पुन्हा गरजले, “द्वारकाधीशाऽ! कुठून-कुठून कशाला गोळा केले आहेस, हे नागरगोटे? हाकलून दे सगळ्यांना. एवढं मोठ्ठं महाभारतीय युद्ध पेटविलंस! काय निघालं त्यातून? ते पेटविण्यापेक्षा तुझ्या सुवर्णी द्वारकेच्या स्त्री-पुरुषंची मनं सोनेरी करण्यात आयुष्य वेचलं असतंस, तर? आता तुझं इंद्रप्रस्थाकडे नाही, हस्तिनापुराकडे नाही आणि धड द्वारकेकडेही लक्ष नाही. तुझे सहस्रावधी द्वारकाकर नगरजन यादव तुझ्या कुरुक्षेत्राच्या यशामुळे, द्वारकेत लोटणाऱ्या प्रचंड संपत्तीमुळे उन्मत्त झालेत. शासनरहित झालेत. कुणालाही मानेनासे झालेत. अरे, शासन नसेल, तर हा तीन हातांचा देहही नीट काम देत नाही. मग राज्य कसं देईल? ते सोन्याचं असलं, तरी मृत्तिकेचं व्हायला कितीसा वेळ लागेल? समजतोस कोण तू स्वतःला वासुदेव? भगवान? कर्तुमकर्तुम?”

आम्ही सर्वच थरारून नुसते ऐकतच राहिलो. दादा तर मान खाली घालून ऐकत होता. काहीही बोलत नव्हता.

ते बघून दुर्वास अधिकच कडाडले, “माझी सेवा करणाऱ्या पांडवांच्या मातोश्री असलेल्या तुझ्या आत्याबाई, माझा देवहुती मंत्राच्या अधिकारी कुंतीदेवीचं काय झालं —तुला काही कल्पना?”

आता मात्र दादानं चमकून मान वर घेतली.

“दीर अंध धृतराष्ट्र, तशीच जाऊ गांधारी यांची त्यांच्या अंधत्वामुळे सेवा करायला वनात गेलेली तुशी आत्याबाई कुंतीदेवी वनात अचानक पेटलेल्या वणव्याच्या भक्षस्थानी पडली आहे. वारणावताच्या वनात लाक्षागृह उठवून तिच्या पाच पुत्रांची रक्षा करायला निघालेला अंध धृतराष्ट्र, आपल्या साध्वी पत्नीसह स्वतःच त्या वणव्यात रक्षा होऊन पडला आहे!! हस्तिनापुराला याची गंधवार्ताही नाही!!”

ती हृदयभेदक कर्णकटू वार्ता ऐकताना कधी, कधीच नव्हे ते तुझ्या स्थितप्रज्ञ, निर्लेप आणि विसर्जनवादी वृत्तीच्या दादाचे मत्मनेत्रही पहिल्यांदा डबडबून आले.

ते बघून मात्र ऋषिवर्य दुर्वास आता कुठे थोडे सौम्य झाले. म्हणाले, "भाचा म्हणून तू त्या सोशीक साध्वी आर्येचे अंत्यसंस्कार कर. पांडवांना तिघांचेही अंत्यसंस्कार करण्यासाठी सत्वर संदेश धाड. हे केवळ तुला सांगण्यासाठीच, हिमालयातून पश्चिमेच्या मार्गानं अरवली पर्वताच्या कडेकडेनं प्रवास करीत, जवळच्या मार्गानं, सर्वांत प्रथम मी तुझ्याकडे आलो आहे."

"हा भगवी वस्त्रधारी कोण?" त्यांनी माझ्याकडे हातनिर्देश केला.

त्याचं उत्तर दादानं देण्यापूर्वीच मीच कटीत वाकून हात जोडून उत्तरलो, "मी – मी देवभाग आणि कंसापुत्र उद्धव. ऋषिवर्य, द्वारकाधीशांचा चुलत बंधू."

"हे ठीक केलंस. आपला परिचय तू मला 'अवधूत' म्हणून करून दिला नाहीस! मात्र मी सांगतो, तू अवधूतपदालाच पोहोचला आहेस. तुझे डोळेच ते सांगतात! भेटू पुढे बदरीकेदारात!

"कृष्णाऽऽ मी तुझ्या मात्या-पित्यांना भेटून, युवराज बलरामला भेटून, आचार्य सांदीपनींचं दर्शन घेऊन उघाच परतणार आहे. जाताना प्रभासतीर्थावर स्वहस्तेच स्वतःचाच राहिलेला श्राद्धविधी करूनच पुन्हा हिमालयाकडे परतणार आहे!"

दादानं सेवकाकडून आणविलेला दूध आणि फलाहारच काय तो दुर्वासांनी स्वीकारला. तो आपलासा केल्यानंतर ते कितीतरी सौम्य झाले. आता कुठे त्यांच्या अंतरंगातला दादाविषयीचा 'कृष्णभाव' मोजक्याच शब्दांत पण थबथबून आला. त्यांनी हाताची वक्र बिल्वकाठी बाजूला ठेवली. ते दादाकडे एकटक बघून त्याचे दोन्ही हात प्रेमळपणे आपल्या हातात घेऊन म्हणाले, "वासुदेवाऽ! माझ्या स्वभावाप्रमाणे मी बोललो. त्यानं तू दुखावला गेला असशील, तर जीवनभर भ्रमंती करणाऱ्या या निःसंग भ्रमिष्टाला क्षमा कर!"

आता दादानंच त्यांचे कृश हात आपल्या ओंजळीत घेऊन, ते अपार प्रेमभरानं थोपटले. त्यांनी बाजूला ठेवलेली वक्र बिल्वकाठी पुन्हा त्यांच्या हातात दिली. तो हसून म्हणाला, "मी मुळीच दुखावलेलो नाही, ऋषिवर्य. आपण असं काहीतरी बोलला नसतात, तरच मला चिंता वाटली असती! त्या चिंतेनं मात्र मी दुखावला गेलो असतो. आपण या अवधूतासमवेत माझ्या माता-पित्यांच्याकडे जावं, आत्ताच मी राणीवशाच्या द्वीपाकडून माझ्या सर्व स्त्रियांना व पुत्रांना बोलावून घेत आहे. त्यांनाही दर्शन आणि आशीर्वाद द्यावेत. प्रभासतीर्थावरील सर्व व्यवस्था बघण्यासाठी माझा हा बंधू अवधूत आपल्या समवेत येईल. आणखीही कुणीतरी असेल."

दुर्वास ऋषी दादाच्या आसनावरून उठले. कटीत वाकलेल्या नम्र दादाच्या सुवर्णी मुकुटावर हात ठेवून आशीर्वादासाठी म्हणाले, "द्वारकाधीशा, शिवम् अस्तु! कल्याणम् भवतु!"

आशीर्वाद देऊन दादाच्या किरीटातील रंगवैभवी मोरपिसाकडे ऋषिवर्य काही क्षण एकटक बघतच राहिले. मग मात्र सहजच म्हणाले, "कृष्णा तुझ्यासारखं हे असलं प्रतीकात्मक मोरपीस आर्यावर्तात दुसऱ्या कुठल्याही क्षत्रियानं मस्तकीच्या किरीटात जीवनभर वागवलं नाही. पुढे कुणी वागवील, असं काही मला वाटत नाही. जीवनाचा जो अर्थ तुला कळला, तो आमच्यासारख्या भल्या—भल्या ऋषिमुनींनाही कळलेला नाही.

खरंतर तुला आशीर्वाद देण्याची माझी योग्यता नाही. ज्येष्ठ म्हणून तुला दिल्या आहेत, त्या केवल शुभेच्छा आहेत!"

दुर्वास ऋषी माझ्यासमवेत दादाच्या कक्षातून बाहेर पडले. सर्वांसमवेत श्रीसोपानाच्या खाली उतरणाऱ्या प्रथम पायदंडीजवळ क्षणैक उभे राहिले. दादा मागेच कक्षात थांबला होता. ऋषिवर्यांनी मला विचारलं, "हा एवढा भव्य सुघड सोपान कशासाठी उठविला आहे, अवधूता?"

एरवी कुणीही हा प्रश्न विचारला असता, तर दादासारखं विचारणाऱ्याला तिसरीकडे नेणारं तिरकस उत्तर मीही दिलं असतं. इथे गाठ होती तपस्वी – साक्षात दुर्वास ऋषींशी! मी मला माहीत होती, ती श्रीसोपानाची माहिती त्यांच्या कानी घातली. म्हटलं, "दादाच्या जीवनात ज्या—ज्या संस्मरणीय व्यक्ती आल्या, त्यांच्या स्मरणासाठी दादानंच हा सोपान स्वत: लक्ष घालून घडवून घेतला आहे. यातील पायदंड्या मात्र कुठल्या क्रमानं आहेत, हे त्याचा तोच जाणतो. इतरांजवळ त्याविषयी कधीच, काहीही बोलत नाही. मलाही सांगतो, ते त्रोटकच असतं."

ते ऐकून मात्र ऋषिवर्य स्वत:शीच दाढीभर हसले. कपाळावर आठ्यांचं जाळं उठवीत, त्यांनी तो भव्य सोपान वरपासून खालच्या शेवटच्या टोकापर्यंत एकदा निरखून घेतला.

इकडे दादाने विशेष सेवक धाडून राणीवशाच्या द्वीपातील सर्व वहिनींना आणि त्यांच्या पुत्रांना मूळ द्वारकेत बोलावून घेतलं.

मी दुर्वासांची सर्वांना भेट घडविली. आता ते प्रभासतीर्थाकडे जायला निघाले. त्यांच्यासाठी फुलमाळांनी मंडित गरुडाच्या मानचिन्हांकित पताकांनी सुशोभित भव्य नौका नौकादलप्रमुखांनी सिद्ध केली. दादा, बलरामदादा, सात्यकी, दारुक अमात्य वेगवेगळे दलप्रमुख, ऋषिवर्यांना निरोप देण्यासाठी शुद्धाक्ष महाद्वारातून खाडीतटावर आले. माझ्या सर्व वहिनी ऋषिवर्य दुर्वासांचं दर्शन घेऊन आपल्या द्वीपाकडे परतल्या होत्या.

आता दादाही दुर्वासांना निरोप देण्यासाठी खाडीकाठावर आला. सर्व जण त्याच्यासाठी तर खोळंबले होते. प्रत्यक्ष दुर्वासही त्याचीच प्रतीक्षा करीत होते. सर्वांना विचारीत होते, 'कृष्ण कुठे आहे? कृष्ण कुठे आहे?' इतक्यात दादा आला. त्याच्यासमवेत दादाच्या पुत्रांपैकी प्रमुख होता, तो सांब! सांबासह आणखीही त्याचे वीस-एक सापत्न बंधू होते. त्या मेळात रुक्मिणीवहिनी आणि कालिंदीवहिनी यांचा एकही पुत्र नव्हता. इतर सगळ्या जणींचे दोन-तीन पुत्र होते. ते सर्व सांबाहून कनिष्ठ असल्यामुळे, त्याच्या पाठीमागून चालत होते. दादा आणि त्याचा पुत्रमेळ दुर्वासांना प्रभासक्षेत्री नेण्यासाठी खाडी पार करणाऱ्या नौकेजवळ आला. सर्वांसमक्ष दादानं ऋषिवर्यांच्या चरणांवर आपलं मस्तक नम्र भावानं टेकून, त्यांना अखेरचं वंदन केलं. त्याच्या पाठोपाठ बलरामदादा, मी, सात्यकी, दारुक अशा सर्वांनी केलं. सांबासह दादाचे पुत्र मात्र तिऱ्हाइतासारखे हा सगळा वंदनसोहळा दूर राहून बघत राहिले. ऋषिश्रेष्ठ दुर्वासांनीही दादाला अखेरचा आशीर्वाद दिला, "शुभं भवतु - शिवम् अस्तु!!'

आता पाठीमागे न बघताच या वयातही एका झेपेतच ऋषिवर्य नौकेत चढले. त्यांच्या शिष्यगणांनी त्यांना वंदन करून पटापट मागे हटत त्यांना मध्यस्थान दिले. दादाच्या आज्ञेप्रमाणे मीही नौकेत चढलो. दादानं पुत्र सांबाला खांद्यावर हात ठेवून काही

कानगोष्टी सांगितल्या. मला साहाय्य करून ऋषिवर्य दुर्वासांची रीतसर बोलवण करण्यासाठी, सांब आपल्या वीस—एक सख्ख्या व सापत्न बंधूंसह नौकेत चढला. त्या सर्वांजवळ गदा, चक्र, शूल, तोमर, खड्ग, मुसल अशी शस्त्रं होती. आम्ही नौकेतून निरोपाचे हात डोलविले. बलरामदादा, सात्यकी, अमात्य, मंत्रिगण, पांचाल यांच्या मेळाव्यातून पाठीमागे पडणाऱ्या किनाऱ्यावरून दादाही ऋषिवर्य दुर्वासांना म्हणून हात डोलवीत उभा राहिलेला स्पष्ट दिसत होता.

ऋषिवर्य दुर्वासांसह आम्ही प्रभासतीर्थावर आलो. दुर्वासांनी मनी योजलेल्या स्वतःच्याच श्राद्धकर्माला यथाविधी प्रारंभ झाला. ते सांगतील तसे त्यांचे शिष्यगण पटापट त्यांच्यासमोर एकेक वस्तु ठेवू लागले. ऋषिवर्यांच्या आतापर्यंत घडलेल्या दर्शनामुळे व दादाच्या विशेष सूचनेनुसार, मी त्यांना लागणाऱ्या कुठल्याही वस्तूत कसलीही त्रुटी पडणार नाही, याची काटेकोर दक्षता घेऊ लागलो. सांबासह दादाचे सर्व पुत्र दूरवर एका डेरेदार वृक्षाच्या छायेत बसले होते. ते आपसात काहीतरी हास्यविनोद करीत हसत-खिदळत होते. दुरून त्यांचा कलकलाट आम्हाला अस्पष्ट ऐकू येत होता.

दुर्वासांचं विधिकर्म प्रभासक्षेत्रीच्या एका जाणत्या धर्मज्ञ पुरोहिताच्या देखरेखीखाली घटकाभरात पार पडलं. दुर्वासांनी मावळत्या सूर्याला जलांजलीचं अर्घ्यदान दिलं. ते त्यांचे शिष्यगण आणि मी एका मोठ्या कर्मपूर्ततेच्या समाधानानं आपसात बोलत, दादाचे पुत्र बसले होते, त्या वृक्षाजवळ आलो.

वृक्षाखालचं दृश्य आता बदललं होतं. दादाच्या पुत्रमंडळात आता चक्क एक स्त्री दिसत होती. तिने मुखभर पदर घेतला होता. तिच्या ओटीपोटाच्या आकारावरून ती चक्क गर्भवती असल्यासारखी दिसत होती. एवढा वेळ त्यांचं नेतृत्व करणारा सांब मात्र कुठेच दिसत नव्हता. आम्ही सर्व त्यांच्या जवळ जाताच, दादाच्या सर्व पुत्रांनी त्या गर्भवती स्त्रीला ऋषिवर्य दुर्वासांचे आशीर्वाद घेण्यासाठी खुणावलं.

अगदी दिवसांत असलेल्या त्या गर्भवती स्त्रीनं निकरानं एकेक जड पाऊल टाकत ऋषिवर्यांना गाठलं. गर्भभारामुळे वाकणंही अवघड जात आहे, असा आविर्भाव करून ती स्त्री म्हणाली, "मला पुत्र होणार की कन्या, हे सांगून ऋषिवर्यांनी मला सुखरूप प्रसूतीचे आशीर्वाद द्यावेत!"

ऋषिवर्य आपले तांबार डोळे बारीक करून समोरच्या गर्भवती स्त्रीला निरखून म्हणाले, "कोण तू आर्ये? इथे अचानक कशी काय आलीस?" समोरच्या गर्भवतीनं एक लटका मुरका मारला. स्त्रीसुलभ चिरक्या बारीक आवाजात ती म्हणाली, " आपण एवढे अंतर्ज्ञानी, मी कुलस्त्री पतिदेवांचं नाव स्वमुखी कसं काय सांगणार? माझे हे सेवकच सांगतील."

तसे दादाचे तीन-चार पुत्र एकदम म्हणाले, "ही आमच्या बभ्रु यादवाची धर्मपत्नी आहे. ऋषिवर्य हिला आशीर्वाद देऊन, हिच्या गर्भातून पुत्र की कन्या काय निपजेल, ते सांगण्याची कृपा व्हावी."

दुर्वास ऋषी आपल्याकडे निरखून बघताहेत, हे त्या गर्भवतीला जाणवलं. त्यांची दृष्टी चुकविण्यासाठी त्या स्त्रीनं संकोचाचा पुन्हा एक लटका मुरका घेतला. या अचानक झालेल्या हालचालीत तिच्या डाव्या बाजूचं नेसू ढिलं झालं. पाठोपाठ 'धप्प' असा एक आवाज आला. गोंधळून त्या स्त्रीनं ओटीपोट सावरण्याची धडपड केली. पाठोपाठ आणखी दोन 'धप्प' असे आवाज आले. आता पूर्ण गोंधळून अंगचं नेसू सावरणारी ती

स्त्री, दादाच्या पुत्रांच्या घोळक्यात फिदिफिदि हसत अदृश्य झाली. पाठोपाठ कुत्सित हास्याचा कल्लोळच कल्लोळ उठला. ती उभी होती, त्या जागेवर मुसल या लाकडी शस्त्राचे कापलेले तीन समभाग एकमेकांवर पडलेले स्पष्ट दिसू लागले!

समोरचे लाकडी ओंडके बघताच, ऋषिवर्य दुर्वास घोर संतापानं अंगभर कसे थरथरू लागले. त्यांच्या हातातील वक्र बिल्वकाठी त्यांच्या संतापाबरोबर लडलडू लागली. आधीच तांबारलेले डोळे यज्ञकुंडातील अग्नीसारखे क्षणार्धात लालबुंद झाले. ते ओंडके बघताच, मी भयानं थरारलो. ऋषींचा शिष्यगण भेदरला.

दुर्वासांच्या समोर दिवसांतील गर्भवती स्त्री आली नव्हती! बभ्रु यादवाची गर्भवती पत्नी आली नव्हती! तो होता दादा—जांबवतीवहिनी पुत्र सांऽब! द्वारकेत आल्यापासून दुर्वास या हाती बिल्वकाठी घेऊन विक्षिप्त वागणाऱ्या, सर्वांनाच बेधडक आज्ञा सोडणाऱ्या, काटकुळ्या आणि बेंगरूळ अशा या ऋषीची चांगली खोड जिरविण्याची उबळ सांबाला आली होती. त्याचा जन्मजात खोडचाळ अवखळपणा त्याला हा असा नडला होता! गर्भवती स्त्री, तसा लटका वेष, ऋषिवर्य दुर्वासांच्या आशीर्वादाची खोटी याचना, त्यांच्या सर्वज्ञपणाची घोर टिंगल उडविण्यासाठी गर्भातून काय निपजणार अशी केलेली विचारणा, त्यासाठी राबविलेले आपले बंधू ही सर्व-सर्व सांबाच्या कल्पक मेंदूतील कलाकृती होती! त्याला लहानपणापासून कुणीही त्याच्या अवखळपणासाठी वेळीच कठोर बोललं नव्हतं. कुणीतं त्याला कधीच रोखलं नव्हतं. दादासमोर फारसा कधी तो आलाच नव्हता. त्याचाच हा परिपाक होता.

आम्ही सर्वच भेदरून आता याचा परिणाम काय होणार, म्हणून ऋषिवर्य दुर्वासांकडे बघू लागलो. संतापानं थरथर कापणारे दुर्वास ऋषी समोर पडलेल्या मुसलाच्या तीन तुकड्यांजवळ गेले. आपल्या हातातील वक्र बिल्वकाठीनं त्यांनी ते तुकडे, उलटे-पालटे करून बघितले. त्यांच्यावर काठीचे दोन—चार कठोर तडाखे दिले. मग उजव्या हातीची काठी डाव्या काखेत घेऊन त्या हातातील कमंडलूतील पाणी उजव्या तळहातावर घेऊन, डोळे मिटून त्यांनी कसलंतरी स्मरण केलं आणि काहीतरी पुटपुटत ते पाणी मुसळाच्या तिन्ही ओंडक्यांवर सपकन मारताना तो तप:कठोर ऋषिवर्य कडाडला, "माझ्यासारख्या ऋषीचा घनघोर अवमान करणाऱ्या निर्बुद्ध यादवांनो, हेच मुसल लवकरच तुम्हा सर्व यादवांचा विनाश करील! मुसलातून जन्माला येईल, तो तुमचा विनाश! आता मी इथे क्षणभरही थांबणार नाही. चला."

माझ्याकडे, दादाच्या एकाही पुत्राकडे ढुंकूनही न बघता, उत्तर दिशेला तोंड करून ऋषिवर्य दुर्वास तरातरा चालूही लागले. ओढल्यासारखा त्यांचा शिष्यगण त्यांच्या पाठीमागून चालू लागला. सुन्न झालेला मीही त्यांची समजूत घालता येईल काय, यासाठी त्यांच्या मागे धावलो. माझ्या पराकोटीच्या विनवण्याकडे कसलंही लक्ष न देता, माझ्याशी शब्दही न बोलता ऋषिवर्य दुर्वास निघून गेले.

मी पुन्हा सांबासह दादाचे पुत्र जिथे होते, त्या वृक्षाजवळ आलो. तिथे ते विनाशकारी मुसलही नव्हते आणि दादाचे पुत्रही नव्हते. त्या सर्वांनी आणखी एक अक्षम्य अविचार केला होता. मी ते मुसल दादाच्या हाती देऊन, त्याला झाला प्रकार सांगणार होतो. तो त्याची दुर्वासांच्या तोडीच्या ऋषिमुनींना बोलावून यज्ञकुंडात आहुती देऊ शकला असता. प्रसंगी त्यासाठी त्यानं प्रत्यक्ष दुर्वासांनाही द्वारकेत पुन्हा पाचारण केलं असतं.

दादाच्या अचाट प्रतिभेचा अधिकारी असलेल्या पुत्र सांबानं, किकराच्या त्या

ओल्या मुसलाचे आपल्या बंधूंसह पाषाणांनी कुटून चूर्णासारखे बारीक कण केले होते. मूळच नष्ट केलं, तर इतर प्रश्नच निर्माण होणार नाहीत, ही त्याची कल्पना होती. त्यानं आणि त्याच्या बंधूंनी त्या मुसलाचं चूर्ण पश्चिम सागराच्या फेसाळत्या लाटांत ओंजळींनी भरभरून अर्पणही करून टाकलं होतं.

जेव्हा प्रभासतीर्थावरून मी एकटाच द्वारकेत परतलो, तेव्हा माझं मन पराकोटीचं विषण्ण-विषण्ण झालं होतं, केवळ यादवांचा विनाश होणार म्हणून नव्हे, तर तो रोधण्यासाठी मी काहीही करू शकलो नाही म्हणून! आणि या सर्वांहून अधिक हे कटू-कटू वृत्त माझ्या तोंडूनच माझ्या प्रिय दादाला सांगावं लागणार, या सत्यानं!

जेव्हा दादानं मला 'मुनिवर्य दुर्वास सुखरूप परतले काय?' असा प्रश्न विचारला तेव्हा 'होय – 'एवढंच उत्तर देऊन मी थांबलो. माझ्या स्वभावाप्रमाणे माझं उत्तर पुरेसं नाही, हे त्यानं तत्काळ ताडलं. माझ्या जवळ येत माझे खांदे थोपटून तो म्हणाला, "अवधूता, तुला माझ्यापासून कधीच आणि काहीही लपविता येणार नाही. जे काही घडलं असेल, ते इत्थंभूत मला सांग. मग ते कितीही अमंगल असो!" कसं बोलावं म्हणून मी अडखळलो. यादवांसाठी त्यानं काय केल नव्हतं? गोकूळ सोडून तो मथुरेत आला होता. मथुरेसाठी जरासंधाबरोबर सतरा युद्धं प्राणपणानं खेळला होता. तिथे गजान्त लक्ष्मीचं अर्घ्य देऊन, कुशल कर्मयोग राबवून त्यानं द्वारकेची सुवर्णी राजनगरी उठविली होती. यादवांच्या या नवथर गणराज्याला आर्यावर्तात सन्मान मिळवून दिला होता. त्यांच्याच विनाशाची, हृदय उखाडणारी कठोर वार्ता, त्याला मी कशी काय सांगायची? मला काही-काही सुचेना.

त्यानंहून स्पष्ट विचारलं असताना, काहीच न सांगणं, हेही मला शक्य नव्हतं. सांगतानाही कसलंही बुद्धिकौशल्य योजून त्याच्यापासून काहीही लपवून ठेवणं, त्याहून अशक्य होतं. शेवटी मनावर पाषाण ठेवून मी प्रभास क्षेत्रावर घडलेला सर्व वृत्तान्त जसाच्या तसा त्याच्या समोर ठेवली.

तो ऐकून कधी नव्हे, असा तो कितीतरी वेळ गंभीर झाला. मी त्याला असा यापूर्वी कधीच गंभीर पाहिला नव्हता – अगदी महाभारतीय युद्धानंतरही! बराच वेळ तो माझ्याशी काहीच बोलला नाहीं. मग मात्र नुसताच हसला नि थांबला. काही वेळानं त्यानं मलाच विचारलं, "उद्धवा—अवधूता, या वेळी माझ्या जागी तू असतास, तर काय केल असतंस?" त्याच्या विचारण्याचा रोख माझ्या ध्यानी आला. तो मला मी त्याच्याशी किती एकरूप शालो आहे, हे चाचपून बघत होता.

मी उत्तरलो, "तुझ्यासारखाच सुधर्मा सभेत मी परखड बोललो असतो."

आता मात्र तो नेहमीसारखं हसला. मला त्यानं सांगितलं, "तेच होईल. असाच जा नि अमात्य सुकृताला पाठवून दे."

अमात्य सुकृतानं युवराज बलभद्रदादाला गाठून तातडीच्या सुधर्मा सभेची मंत्रिगणांशी चर्चा केली. त्यानं दिली तशी आज्ञा संपूर्ण द्वारकाद्वीपभर दवंडीनं कानाकोपऱ्यांतही पसरविली. ही आज्ञा राणीवशाच्या द्वीपावरही पोहोचविण्यास दोघेही चुकले नाहीत. दवंडीच्या आज्ञेचा आशय होता 'द्वारकाधीश भगवान वासुदेव श्रीकृष्णमहाराज द्वारका जनपदाच्या सर्वच स्त्री-पुरुषांशी काही महत्त्वाचं बोलू इच्छितात – येत्या बृहस्पतीवारी – यानंतर त्यांना सुधर्मा सभेत वा कुठल्याही अन्य सभेत, राजसभेत बोलताना कुणीही कधीही ऐकू शकणार नाही. ज्यांना कुणाला त्यांचे

श्रीबोल ऐकण्यात रस असेल त्यांनी हा बृहस्पतीवार न चुकविता सुधर्मा राजसभेत उपस्थित राहावं होऽऽ!”

द्वारका निर्माण झाल्यापासून कधीच नव्हती, अशी स्त्री-पुरुष नगरजनांची झिंबड कलकलत्या तांड्यातांड्यांनी सुधर्मा सभेची वाट चालू लागली. आज थकलेले असूनही वसुदेवबाबा दोन्ही राजमातांसह सुधर्मा सभेत आले होते. त्यांच्या अगोदर युवराज बलभद्रदादा रेवतीवहिनींसह सभागारात येऊन आसनस्थ झाला होता. दशमंत्रिगणांनी आपापली आसनं घेतली होती. आचार्य सांदीपनी, यादवांचे कल्पक स्थापत्यविशारद गर्गमुनी उपस्थित झाले होते. चतुरंगदल सेनेतील सर्व नवे दलप्रमुख, सागरसेनेचे नवे प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या खालच्या रांगेत प्रद्युम्न, भानू, वृक, श्रुत, संग्रामजित, प्रघोष, वीर हे सर्व दादापुत्र आपापल्या कनिष्ठ बंधूंसह बसले होते. होय, सर्वांवर आपल्या अविचारी अवखळपणानं घोर प्रसंग ओढवून आणलेला सांबही आपल्या बंधूंसह त्यात होता. सर्वांत खालच्या रांगेत तिसऱ्या पिढीचा अधिकारी अनिरुद्ध आपल्या सख्ख्या व सापत्न बंधूंसह बसला होता.

महाराज वसुदेवबाबांच्या मुख्य आसनाला धरून उंचीवर उजव्या व डाव्या हाताला कुसरदार बैठका असलेली प्रशस्त वातायनं होती. त्यातील उजव्या हातीच्या वातायनात भामावहिनींसह दादाच्या जांबवती, मित्रविंदा, लक्ष्मणा, सत्या, भद्रा, कालिंदीदेवी या पत्नी – माझ्या सर्व वहिनी आपापल्या स्नुषांसह बसल्या होत्या. डाव्या हाताच्या वातायनात गद, सारण यांच्या पत्नी – माझ्या वहिनी – त्यांच्या स्नुषा, कन्यांसह बसल्या होत्या. या राजस्त्री मंडलात भामावहिनीशेजारीच दादाची प्रिय कन्या चारुमती - चारू आपल्या अन्य भगिनींसह बसली होती.

अमात्यांच्या नियोजित उंच स्थानावर अमात्य सुकृत यादवांचा रत्नजडित राजदंड घेऊन उभे होते. केवढातरी आवाका असलेली ही सुधर्मा राजसभा खचाखच नि तुडुंब भरली होती. तिच्यात मुंगी शिरायलाही आता वाव उरला नव्हता.

अमात्यांसह सर्व जण आता प्रतीक्षा करीत होते, ते एकट्या द्वारकाधीशांची - त्यांच्यासह त्यांच्या सुखदु:खाला जन्मानं बांधल्या गेलेल्या रुक्मिणीवहिनींची!

तशी दादाच्या निवासी कक्षापासून सुधर्मा राजसभा जवळच होती. तरीही दादाच्या आज्ञेप्रमाणे दारुकानं त्याचा नित्याचा गरुडध्वज सालंकृत करून सुसज्ज ठेवली होता. त्यातूनच आम्ही सुधर्मा सभेकडे चाललो. मार्गातच तो समयतबकाचा चौक आला. तसं ‘थांब’ म्हणून दादानं दारुकाला हातसंकेत देताच, त्यानं त्याचे प्रिय मेघपुष्प, बलाहक, शैब्य आणि सुग्रीव हे चारही नव्या पिढीचे तरतरीत, पुष्ट आणि सतत शेपट्या चालविणारे दूधरंगी अश्व वेग आखडून आवरले. गरुडध्वज थांबला. दादा एकटाच रथातून खाली उतरला. अत्यंत धीमी संथ पावलं टाकत समयचौथऱ्याच्या पायदंड्या चढून एकटाच त्या वावभर रुंदीच्या, पुरुषभर उंचीच्या सुवर्णवर्खी लोहतबकाजवळ गेला.

समयतबकावरची यादवांची मानचिन्हं मान वर करून एकटक निरखू लागला. त्यानं यादवांची सर्व मानचिन्हं एकेक करत नीट डोळाभर निरखली. तो स्वत:शीच हसला.

त्यानं तबकाशेजारीच असलेल्या चामडी खोबणीतील सुवर्णवर्ख दिलेला लोहहातोडा उचलला.

काहीतरी मनोमन पक्कं ठरवून त्यानं हातच्या अवजड हातोड्याचे तीन सशक्त प्रहार, एकापाठोपाठ एक त्या विशाल समयतबकावर उतरविले! उठलेले तीन नाद एवढे

भेदक होते की, त्यांच्यामुळे आत्तापर्यंत ऐकू येणारी समुद्रगाजही कळ दाबल्यासारखी बंद झाली. आम्हाला ऐकू येईनाशी झाली. ते एकेकाळी सुदर्शन धारण करणाऱ्या आजानुबाहूनं दिलेले प्रत्यक्ष समयतबकावरचे बलवंत प्रहार होते. आता अतिशय शांत मुद्रेने, त्याने हातीचा सोनवर्खी हातोडा पुन्हा चामडी खोबणीत होता तसा ठेवली. अत्यंत शांत मुद्रेने, संथ पावली तो चौथरा उतरला. गरुडध्वजाच्या रोखानं येऊ लागला.

त्याला पूर्ण कल्पना होती की, त्याने दिलेल्या बलवान प्रहारांमुळे समयतबकावरील यादवांची सुवर्णवर्ख ल्यालेली मानचिन्हं तो वर्ख उखडून निघाल्यामुळे आता उघडी पडली होती. मूळची लोहाची, काळपट, कळाहीन झाली होती. त्यानं खोबणीत ठेवलेल्या हातोड्यावरचाही सुवर्णी वर्ख तडकून गेला होता. आता हे असंच होत जाणार होतं.

मी दादा-वहिनींना सामोरं ठेवून त्यांच्यामागून दारुकासह सुधर्मा राजसभेत प्रवेशलो. आम्हाला बघताच वसुदेवबाबा, दोन्ही राजमाता, युवराज, रेवतीवहिनी, आचार्य सांदीपनी सोडून उभी सुधर्मा राजसभा टाळ्यांचा पर्जन्यच पर्जन्य वर्षवीत, उठून उभी राहिली.

आम्ही तिघे आमच्या आसनांजवळ आलो. दादानं किंचित वाकून दोन्ही हात जोडून उभ्या सभागृहाला विनम्र वंदन केलं. पाठोपाठ रुक्मिणीवहिनींनी आणि मीही केलं. अद्याप टाळ्यांचा कडकडाटी पर्जन्य कोसळतच होता. तो बाहेर ऐकू जाताच, आतलं काहीही दिसत नसतानाही, बाहेर दाटीवाटी केलेल्या कृष्णप्रेमी जनसमूहातून थोड्या वेळानं उठलेला टाळयांचा नाद सभागृहात शिरत होता.

पक्व, कृतार्थ दादानं दोन्ही आजानुबाहू उंचावून सभागृहाला बसून घेण्याचा नम्र संकेत केला. त्याचा आशय अचूक पकडून, सुधर्मा सभेतील यच्चयावत सगळे सदस्य यादव बसले. सभागृहाबाहेर थोडा कलकलाट झाला. बाहेरच्या सर्वांनीही जागा मिळेल तिथे आणि तसं बसून घेतलं.

यादवांच्या नूतन आणि तरुण अमात्य सुकृतानं माथ्यावर उडत्या गरुडाचं चिन्ह असलेला यादवांचा रत्नखचित राजदंड उंचावला. कणीदार आवाजात तो मोजकंच म्हणाला, "प्रिय यादवबांधवहो, ही सुधर्मा सभा अत्यंत महत्त्वाची आहे. द्वारकाधीश, वासुदेव-भगवान श्रीकृष्ण महाराजांनी स्वत: ती बोलविली आहे.यापूर्वी त्यांनी कधीही सुधर्मा सभा स्वत:हून बोलविली नव्हती. ते कार्य वसुदेवमहाराज आणि युवराज बलरामदादा यांच्या आज्ञेनुसार वेळोवेळी झालं आहे. द्वारकाधीश आता सांगतील तो शब्दन्शब्द त्यांच्या बुद्धिसागरातून चिंतन, मनन आणि जीवनानुभव यांतून तावून—सुलाखून निघालेला असेल. आपण सर्वांनीच त्यांचा शब्दन्शब्द नीट ध्यानपूर्वक ऐकून, मन:पूर्वक स्मरणात ठेवावा. बोलताहेत द्वारकाधीश भगवान वासुदेव!”

अमात्यांनी उंचशील राजदंड पायाजवळच्या पाषाणघडीवर आदळताच शांतताच शांतता पसरली – सभागृहात आणि बाहेरही.

माझा प्रिय दादा उठला. तो बोलला ते त्याचं जीवनसार होतं, त्याचा आवाज पहिल्यासारखाच कणीदार आणि वेणुवाणीसारखा मधुरच होता. तो म्हणाला, “माझ्या प्रिय यादव बंधु-भगिनींनो बालक-बालिकाहो!”

समोर आणि बाहेरही यादव नसलेले आपले कितीतरी चाहते स्त्री-पुरुष आहेत, हे ध्यानी घेऊन तो पुन्हा म्हणाला, “मजवर निकोप प्रेम करणाऱ्या सर्व जिवांनो, मी फारच थोडं बोलणार आहे. अधिक बोलून काहीही उपयोग होत नाही, हा माझा अनुभव आहे.

गेली लक्षावधी वर्षं हा पश्चिम सागर बोलतो आहे, गर्जतो आहे. कुणीतरी ऐकलं आहे काय त्याचं? तो गर्जून सांगतो आहे, माझ्या उदरात अनेक मोत्ये, रत्नं आहेत. पण – पण सर्वांना दिसतं, ते माझं खारं पाणी! ज्याच्याकडे बुद्धिमत्ता आहे, सारासार विचार आहे, तो त्या खाऱ्या पाण्यांचही शुभ्र लवण – मीठ करून त्याचाही जीवनदायी उपयोग करून घेऊ शकतो.

“माझं आजचं बोलणं, हा हितोपदेश नाही. जे जीवनानं मला दिलं, ते विनंतीपूर्वक तुम्हाला सांगणं, हे माझं कर्तव्य आहे.

“कुरुक्षेत्रावर अर्जुनाला मी सर्व प्रकारचे जीवनयोग सांगितले. आज तुम्हाला निक्षून सांगतो आहे, जीवनाचं सार आहे प्रेमयोग! प्रेमाला अंत नाही. ते अनंत आहे. मानवजातीचं निर्माणच प्रेमयोगासाठी आहे. द्वेषाला अंत आहे. एका माणसाचा दुसऱ्यानं केलेला द्वेष, दुसऱ्याचा अंत होताच संपतो. एका ज्ञातीनं केलेला दुसऱ्या ज्ञातीचा द्वेष, ती संपुष्टात येताच संपतो. एका मानवसमूहान दुसऱ्या मानवसमूहाचा केलेला द्वेष, तो मानवसमूह निकालात निघताच संपुष्टात येतो. एका राष्ट्रानं दुसऱ्या राष्ट्राचा केलेला द्वेष, ते नष्ट होताच नष्टप्राय होतो. तात्पर्य द्वेष कुठेतरी जाऊन थांबतो. तो थांबेपर्यंत दोन्हीकडच्या व्यक्तींची ज्ञातींची समूहांची, राष्ट्रांची प्रचंड व कधीही न भरून येणारी हानी झालेली असते. प्रेमाचं तसं नाही. ते द्यावं तितकी त्याची कक्षा वाढतच जाते. ते दिल्यानं कधीही कमी होत नाही.

“सत्ता, संपत्ती, स्त्री यांच्या असीम अभिलाषेतूनच युद्धं पेटतात. विनाश ओढवतो. कौरव-पांडवांच्या युद्धानं हेच सत्य सिद्ध झालं आहे. ते युद्ध रोधण्यासाठी मी शक्य तेवढे व अटीतटीचे प्रयत्न केले. शेवटी ते युद्ध अटळ ठरताच, त्याला महायज्ञाचं रूप मला द्यावं लागलं.

“त्या महायुद्धापासून आता माझं ऐकणाऱ्या तुम्ही सर्वांनी एक धडा ध्यावा. सर्वांत मोठं युद्ध, महायुद्ध—महायज्ञ पेटलेला असतो, तो आपल्या प्रत्येकाच्या अंतरंगात. ज्याला अंतरंग कळलं त्याच्यातील सुष्ट-दुष्ट शक्ती कळल्या त्याला जीवन कळलं. जीवनाचा अर्थच आहे – जगणं, जगू देण. भोवतीच्या विराट निसर्गातील बारीकसारीक घटनेचा कार्यकारणभाव तेव्हाच लक्षात येईल, जेव्हा स्वत:तील अहंभाव प्रथम ध्यानी येईल, आपल्या अभिलाषेच्या शतनांग्या जेव्हा आपणालाच कळतील.

“तुमच्यातील प्रत्येकात बाहेरच्या विराट रूपाचं सूक्ष्म प्रतिबिंब पडलेलं आहे. ते अलिप्तपणे बघण्याची शक्ती जेव्हा तुमच्या ठायी येईल, तेव्हा तुम्हाला स्वत:च्याच ठायी विराट-दर्शन होईल!

“तुमच्याशी जन्मानं जखडलेल्या अटूट नात्यानं पुन:पुन्हा निक्षून सांगतो आहे वंदनीय ऋषिवर्य दुर्वासांची कुचेष्टा करणारा सांब तुमचा प्रतिनिधी होता. तुमच्या प्रत्येकाच्या मनात एक सांब लपलेला आहे. त्याला वेळीच पारखा. समूळ उखडून दूर फेकून द्या. एकमेकांचा द्वेष करू नका. अहंपणाला बळी पडून एकमेकांशी लढू नका. अहंभाव पेटविणाऱ्या मद्यासारख्या व्यसनाला बळी पडू नका. लालसा व्यसन, अभिलाषा, आलस्य, अनास्था, अप्रामाणिक भ्रष्टता ही कालची होती, आजची आहेत आणि उद्याचीही असत्यंच राहतील.

“प्रेम, ज्ञान-विज्ञान आणि प्रज्ञान यांची लालसा, जगू-जगवू अशी अभिलाषा, विहित कमाची आस्था, त्टासाठी अभ्यासाची-स्वाध्यायाची आवड, प्रामाणिकतेची

आवड व भ्रष्टतेची चीड ही कालची होती, आजची आहेत आणि उद्याचीही सत्यंच राहतील.

"मीच काय तो कर्तुम-अकर्तुम, माझ्यामुळेच चंद्र-सूर्य प्रकाशतात, माझ्यामुळेच नदी-नाले, वारे वाहतात, माझ्यामुळेच सुमद्र गर्जतात, विजा लखलखतात, शेते फुलतात, वृक्ष फळांनी लहडतात, फुलं सुगंधानं डोलतात असं मी आणि माझं समजणारा जीव सत्यापासून अनंत योजनं दूर असतो.

"कितीही मनात आणलं तरी रक्ताचा व दुधाचा एक साधा थेंबही आपणाला इच्छेप्रमाणे निर्माण करता येत नाही. भक्षतो त्या अन्नापासून मातेच्या उरात आणि चारा खाते त्या गोमातेच्या कासेत दुधाचा थेंब व देहात रक्ताचा थेंब कसा तयार होतो, हे सांगता येत नाही. मग कशाला धरायचा मीपणाचा अहंकार?

"तुम्हा यादवांत लहानाचा मोठा झाल्यामुळे, तुमचे सर्व-सर्व गुणदोष मला आता तोंडपाठ झाले आहेत. तुम्ही तुमचा विनाश करणारा अहंभाव त्यागावा. शीघ्र संतापीपणा सोडावा. व्यसनाला तर विषासारखं दूर ठेवावं.

"या सभागृहात असलेल्या माझ्या आचार्य सांदीपनींच्या साक्षीनं, तुम्हाला निक्षून सांगण्याचं कर्तव्यही मी पार पाडलं आहे. अलीकडे आचार्य द्वारका सोडून अवंतीच्या अरण्यातील आपल्या अंकपाद आश्रमाकडे जाण्याचा मनोदय वारंवार बोलून दाखविताहेत. मलाही त्यांनी तिकडे जाण्यासाठी, अंतरीच्या कौलानं हीच वेळ योग्य वाटते आहे. आपणा सर्वांना आशीर्वाद देऊन, आचार्य सांदीपनींनी त्यांच्या कुटुंबासह आनंदानं अंकपाद आश्रमाकडे प्रस्थान ठेवावं असं मी घोषित करतो. युवराज बलरामदादानं नंतर त्यांच्या निवासी जाऊन यादवांना साजेल, असा त्यांचा उचित गौरव करावा.

"हस्तिनापुराहून धनुर्धर अर्जुनाला पाचारण करावं. अश्वमेध यज्ञासाठी यादवांच्या वतीनं त्याचाही उचित गौरव करावा. पांडवांच्या आता स्थिर झालेल्या हस्तिनापूर राज्याला सुवर्ण, रुपं, माणिक, वैदूर्य, धनधान्य, उपयुक्त पशू, सेवक-सेविका यांचा भरघोस उपहार द्यावा.

"या सभागृहातील माझी प्रिय पत्नी रुक्मिणीदेवी आणि तिच्या सातही भगिनी यांना मी आता घोषित करतो आहे, ते ऐकणं फार कठीण जाईल."

सभागृहात अस्पष्टशी कुजबुज माजली. तिचा रोख 'द्वारकाधीश आता काय घोषित करणार?' असा होता. तो कुजबुजाट क्षणाक्षणाला वाढत चालला. जसा सभागृहात माजला, तसा सभागृहाबाहेरही तो माजला. तसं दादानं काहीएक हेतूनं तरुण अमात्यांकडे बघितलं. त्यांनी "शांतता!" म्हणत हातीचा राजदंड पुन्हा उंचावून पायालगतच्या पाषाणघडीवर आदळला. तशी सभागृहभर शांतताच शांतता पसरली.

दादानं आपला मनोदय स्वच्छ, स्पष्ट शब्दांत प्रकट केला, 'यादवबांधवहो, उद्यापासून मी माझा परमसखा अवधूत उद्धवाखेरीज कुणाचीही सेवा म्हणून घेणार नाही! माझ्या प्रिय पत्नी रुक्मिणीसह अन्य सात पत्नींचीसुद्धा नाही! याचा अर्थ माझ्या भेटीची त्यांना बंदी आहे, असा मुळीच नव्हे. त्या मला माझ्या निवासी कक्षावर येऊन केव्हाही भेटू शकतात. त्यांच्या मानमान्यतेत द्वारकाकर यादवांनी कुठलाही बदल करू नये. पूर्वीसारख्याच त्या माझ्या पत्नी आहेत. मी मात्र उद्यापासून राणीवशाच्या द्वीपाकडे जाणार नाही.

"जसा मी तिकडे जाणार नाही, तसाच या यादवांच्या सुधर्मा राजसभेतही पुन्हा कधीच येणार नाही. तुमचे असतील ते राजकीय, सैनिकी, सामाजिक, व्यक्तिगत सर्व प्रश्न युवराज म्हणून बलरामदादा सोडवेल. माझ्यासमोर यापुढे ते कुणीही आणि कधीच आणू नयेत. हा निर्णय मला कधीतरी घ्यावाच लागणार, याची पूर्ण जाणीव असल्यामुळेच मी या राजसभेतील कुठलंही पद प्रथमपासून विचारपूर्वक स्वीकारलेलं नाही.

"लवकरच द्वारका सोडून जाणाऱ्या माझ्या परमादरणीय आचार्य सांदीपनींच्या साक्षीनं सांगतो आहे, माझा हा वानप्रस्थाश्रमाचा प्रारंभ आहे. तोही वनात मुळीच न जाता! माझा हा वानप्रस्थाश्रम कायिक नाही, वाचिक नाही; तो आहे मानसिक आहे आत्मिक!

"कुरुक्षेत्रावर अर्जुनाला मी सर्वांत महत्त्वाचा सांगितलेला विचार होता, तो स्थितप्रज्ञ वृत्तीचा. जीवनात विहित कर्म करीत असताना मनानं निर्लेप, अलिप्त राहण्याचा! उद्यापासून त्याच अर्थाचा माझा मानसिक व आत्मिक वानप्रस्थाश्रम सुरू होत आहे. मी तुम्हा हजारो यादवांत आहे, प्रत्येकातही आहेच आहे, तरीही कशातही नाही!

"उद्यापासून माझी सर्व प्रकारची सेवा करील, तो माझा परमप्रिय सखा – एकटा उद्धव! माझ्याशी भाषण-संभाषण करील तो प्रामुख्याने, तुम्हा सर्वांचा अवधूत – माझा प्रिय बंधू उधो!!" त्यानं उजवा आजानुबाहू उंच उचलून, अमात्यांना नेत्रसंकेत देताच, त्यांनी प्रथेचा राजदंड उचलून पाषाणघडीवर आदळला. दादाच्या जीवनातील अखेरची सुधर्मा राजसभा संपली. सर्वांना उंचावलेले दोन्ही हात जोडून त्यानं नम्र वंदन केलं. तो खाली बसला. सुत्र-सुत्र झालेले सभासद, यादव स्त्री-पुरुष काहीही न बोलता भिरभिरत्या मनानं एकेक करत सभागृहाबाहेर पडू लागले. त्यांना चांगली कल्पना होती की, ती कृष्णवचनं आहेत. त्यात कुणीही आणि कसलाही बदल करू शकणार नाही.

दादाच्या सेवेच्या माझ्या जीवनातील महत्त्वाच्या कर्मयोगाला आता प्रारंभ झाला. मी माझ्या निवासाकडे जायचं सोडून, आता दादाच्या कक्षातच राहू लागलो.

दादाच्या सेवेसाठी एक-दोन दिवसांतच मी माझ्यातील साधक निर्धारानं दूर सारला. त्या जागी एक नम्र सेवक दोनच दिवसांत अंगी मुरवून घेतला. द्वारकाधीशाच्या नित्यकर्मात बाहेरून आलेल्या अतिथीला कसलाही बदल जाणवला नसता. चारणगणांच्या वीणावादनावर तो ब्राह्मी मुहूर्तावर अचूक उठत होता. करदर्शन करून 'पादस्पर्शम् क्षमस्व मे' म्हणत मंचकावरून भूमीवर उतरत होता. हस्त, मुख प्रक्षाळून सूर्यदर्शन करीत होता. पुरश्चरण, प्राणायाम, आसनव्यायाम घेतं होता. स्नान करून प्रथम सूर्यदर्शन मग वसुदेवबाबा, दोन्ही माता, बलभद्रदादा, रेवतीवहिनी अशा ज्येष्ठांचं दर्शन घेतं होता. गोमातेचं दर्शन करून द्वारकेत आलेल्या अतिथींना दानचौथऱ्यावर उभं राहून दानं वाटत होता. आलेल्या ऋषिमुनींशी चर्चेला बसून एखादाच प्रश्न विचारून, घटकान्‌घटका नुसती श्रवणभक्ती करीत होता. आलेल्या ऋषि—तापसांची उठबस करणं, त्यांना दूध—फलाहार देणं, ही कामं मी निष्ठापूर्वक करू लागलो. सूर्य मस्तकावर आला की, त्याच्या समोर लाकडी चौरंगीवर बसून सुवर्णी पात्रातून भोजन घेऊ लागलो. त्याला दुधादह्याचे पदार्थ आवडतात हे ध्यानी घेऊन, ते

त्याच्या तबकात न चुकता असतील, याची दक्षता घेऊ लागलो. भोजन आवरल्याचं आचमन त्यानं घेतल की, मीही घेई. तबकाजवळ असलेला सुगंधी जलांचा कुंभ उचलून त्याच्यामागून स्वच्छतागृहापर्यंत जाई. बोलत-बोलतच एकधारेनं त्याच्या खरकटया हातावर डाव्या हातानं पाणी सोडी. पटकन आपला उजवा हातही क्षाळून त्याच्या हातांत ते टिपण्यासाठी कोरहं वस्र देई. तो मंचकावरच्या शय्येवर बसला की, ऋतुमानानुसार पिकलेल्या ताज्या फळांच्या पोडी त्याच्या गुलाबी तळहातावर, मंचकालगतच्या आस्तरणावर बसून एकेक करत देई. त्यानं न मागताच कधी- कधी सुगंधी तांबुलही त्याच्या हाती देई. तो भोजनानंतरच्या वामकुक्षीसाठी लेटला की, त्याच्या चरणांशी जाऊन त्याच्याशी बोलतच, अलवार हातांनी त्याचे चरण चुरत राही.

त्याचा श्वास लयीत सुरू झाला की, त्याच्या उंचशील देहावर पांघरूण घालताना मला हटकून त्याच्या एका विचाराची तीव्र आठवण होई. तो जीवनभर म्हणत आला होता, 'या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी —' तो नुसतं तसं म्हणाला नव्हता, तर तसं वागतही आला होता. यासाठी त्याचा निद्राभंग होऊ नये, म्हणून त्याच्या देहावर अलवार हातानं हलकेच पांघरूण घालण्याची मी दक्षता घेई. काही-काही वेळा त्याच्या चरणांशीच आस्तरणावर बसलेला मी, शम्येवरच्या त्याच्या चरणांवरच मस्तक ठेवून केव्हा झोपी गेलेला असे, कळत नसे! अशा वेळी त्याच्या मनातील माझ्याविषयीच्या सखोल प्रेमभावनेचा मला प्रत्यय येई. माझ्याअगोदर जागा झालेला दादा, माझा निद्राभंग होऊ नये म्हणून आपले चरण जराही न हलवता, तसाच पडून राही!

दोन प्रहर झाल्यानंतर दारुकानं गरुडध्वज दादाच्या निवास-कक्षासमोर चौकात आणून उभा-केलेला असे. मग आम्ही कधी उत्तरेच्या भल्लात महाद्वाराकडे शिवालयात, कधी दक्षिणेच्या पुष्पदंत महाद्वाराकडे फेरपटका टाकत असू. दादाला आणि मलाही पश्चिमेच्या ऐंद्र महाद्वारालगतच्या पाषाणी बैठकांवर बसून समुद्रलाटांचं गाजेसह चाललेलं अविरत नृत्य बघणं अतिशय आवडे. त्याच्या गाजेचं रुद्र व अखंड संगीत तर आम्हाला आता सवयीचंच झालं होते, संध्याकाळी त्या बैठकांवर बसून आम्ही कितीतरी विषयांवर मनमोकळं बोललो.

कधी-कधी आमच्या समवेत बलरामदादा, सात्यकी, तरुण अमात्य सुकृत, मंत्रिगणांतील एखादा सदस्य असेही असत.

दादाच्या माझ्यावरील अकृत्रिम, निखळ प्रेमाचा प्रत्यय मला एके दिवशी प्रकर्षानं आला. त्यानं त्या दिवशी आमचा गरुडध्वज दारुकाला थेट माझ्या पित्याच्या निवासाकडे घ्यायला सांगितलं, हे असं अग्रसूचना न देता एरवी तो कुणाच्याही निवासाकडे कधीच गेला नव्हता. आम्ही आमच्याच निवासाकडे चाललोत हे ध्यानी येताच, मी विचारात पडलो. माझे देवभागबाबा वसुदेवबाबांच्याच वयाचे होते. तेही आता वृद्ध झाले होते. थकले होते. माझी कंसामाता दोन्ही राजमातांच्याच वयाची होती. तशीच दिसतही होती.

दादा सरळ अंत:पुरी कक्षात, शयनागारातच गेला. पाठोपाठ मी होतोच. त्याला समोर बघून शय्येवरून उठू बघणाऱ्या माझ्या देवभागबाबांना त्यानं बळंच पुन्हा लेटतं केलं. त्यानं माझ्या देवभागबाबांचे चरण मांडीवर घेऊन चुरायला केव्हा सुरुवात केली, ते त्यांनाही कळलं नाही. जेव्हा कळलं, तेव्हा बराच वेळ झाला होता.

तसंच माझ्या कंसामातेच्या शय्येजवळ जात मंचकावर बसून तो म्हणाला, '“माझ्या वसुदेवबाबा नि देवकीमातेनं एकत्रच कंसमामाचा कारावास भोगला. यादवांची अशीही प्रथा आहे की, पतिपत्नींनं सुखदु:ख एकत्रच, एकाच जाणिवेनं आपलं म्हणावं. मी प्रेमानं देवभागकाकांचे चरण चुरले आहेत. तुम्हाला त्यांचं पत्नित्व सिद्ध करण्याशिवाय पर्याय नाही. ” माझ्या मातेला बोलण्यासाठी काहीही वाव न ठेवता त्यानं बाबांना दिली, तीच सेवा कंसामातेलाही दिली. त्या दिवशीचा त्याचा नम्रपणा आणि मजविषयीचं प्रेम बघून मी तर मुग्धच झालो. कारण निरोप घेताना तो माझ्या मात्या-पित्यांना म्हणाला होता, “हा अवधूत उद्धव जसा तुमचा पुत्र आहे, तसा मी वसुदेवबांबाचा श्रीकृष्णा तुमचा उद्धवच आहे!

एके दिवशी आम्ही दादाच्या कक्षात बोलत बसलो असताना, द्वारावरच्या सैनिकानं वार्ता आणली – ‘प्रभासक्षेत्रीचे क्षेत्रपाल द्वारकाधीशांच्या भेटीसाठी आले आहेत. त्यांच्या काखेत असलेला कसलातरी गवतकाड्यांचा बिंडा द्वारकाधीशांना समक्षच दाखवायचा आहे, असं म्हणतात. भेट मागताहेत. स्वामी कुणालाच भेटणार नाहीत असं निक्षून सांगितलं, तरी ते ऐकायला तयार नाहीत. स्वामींना भेटायचंच म्हणतात.“ती वार्ता ऐकताच दादाच्या नितळ नीलवर्णी भव्य कपाळावर आडव्या आठ्याच आठ्या उमटल्या.

वार्ता ऐकून दादानं माझ्याकडे सहेतुक बघितलं. ते बघणं म्हणजे प्रेमळ विश्वासाची आज्ञाच होती. याची आता मला सवय झाली होती. मी उठलो. कक्षाबाहेर जाऊन प्रभासक्षेत्रीच्या क्षेत्रपालाची भेट घेतली. त्यानं मला वंदन करून काकुळतीच्या चर्येनं विनंती केली – “अवधूता, काहीही करा. मला काही क्षणांसाठी द्वारकाधीशांना भेटवा. हे बघा.”

त्यानं काखेतल्या बिंड्यातील दोन-तीन गवतकाड्ता खेचून त्या माझ्या हातात ठेवल्या. ते खांद्यापर्यंतच्या पूर्ण हात लांबीचे दर्भ होते. नेहमीच्या धार्मिक विधीसाठी वापरतात त्या दर्भासारखेच. मात्र ते हिरव्या वर्णाचे नव्हते. रापलेल्या लोहाच्या वर्णाचे – काळपट होते. त्यांची अग्रं नेहमीसारखी नव्हती. ती बाणाच्या पात्याच्या आकाराची तिकोनी व टोकदार होती.

डोळे विस्फारलेला क्षेत्रपाल म्हणाला, “उद्धवदेव, हे दर्भ नेहमीचे नाहीत. ते मोडतात का, यत्न करून बघा! ते मोडत नाहीत. लोहाच्या तारेसारखे केवळ वाकतात – पुन्हा आपला होता तसा पूर्वीचा आकार घेतात!”

त्यानं एक लोहदर्भ वाकवून पुन्हा सोडून दिला. मीही तो दोन तुकडे, करण्यासाठी मोडून बघितला. यश आलं नाही. आता मात्र मीही त्या लोहदर्भाकडे बारकाव्यानं बघू लागलो.

न राहवून भेदरलेला क्षेत्रपाल त्रोटक-त्रोटक बोलतच राहिला, “माझ्या संपूर्ण आयुष्यात – मी हा असला भयंकर लोहदर्भ कधीच बघितलेला नाही. ही काहीतरी अभद्र लक्षणं आहेत. आमच्या प्रभासक्षेत्री, सागरकिनारी अशा लोहदर्भांची काळपट कुरणंच कुरणं उगवली आहेत. माझ्या सेवकांनी मला दाखविताच, कुरणा-कुरणात जाऊन नमुन्याचे म्हणून एक-दोन दर्भ प्रत्येक कुरणातून उपटून, त्याचा बिंडा द्वारकाधीशांना दाखविण्यासाठी क्षणाचाही विलंब न करता मी आलो आहे. मला एकदा त्यांना भेटवा, अवधूत.”

मला त्याच्या बोलण्यात कितीतरी मोठं तथ्य जाणवलं. त्यानं पुढे केलेला दर्भबिंडा

हाती घेऊन, “माझ्यासमवेत चला. दादा माझ्याशिवाय फारसा कुणाशीच बोलत नाही, हे सत्य आहे. तरीही हे अक्रीत बघून तो तुमच्याशी नक्कीच बोलेल.” मी प्रभासक्षेत्रीच्या क्षेत्रपालासह पुन्हा कक्षात प्रवेशून दादासमोर आलो.

हातांतील दोन-चार काळपट लोहदर्भ दादाच्या हाती देऊन सर्व इतिवृत्तान्त त्याच्या कानी घातला. दर्भाचा त्याच्या हाताला स्पर्श होताच मघासारख्याच क्वचितच उठणाऱ्या उभ्या- आडव्या आठ्याच आठ्या त्याच्या भव्य निळसर कपाळावर सरासर दाटल्या.

आलेला क्षेत्रपाल मग बोलतच राहिला. हातातील लोहदर्भाचं अग्र निकरानं त्यानं आपल्या डाव्या तळहातावर द्वारकाधीशांसमोरच ते मोडत नाही, हे सिद्ध करण्यासाठी शकतीनं खुपसलं. दर्भाचं अग्र त्याच्या तळहातावर जिथं घुसल तिथे निमिषातच त्याच्या रक्ताचा एक थेंब तरारून आला. चुकचुकत त्यानं खुपसलेला दर्भ खेचून मागे घेतला. दादानं पुढे होत आपल्या केशरी उत्तरीयानं प्रथम तो रक्तथेंब टिपून घेतला. मग क्षेत्रपालाचा व्रण काही वेळ आपल्या निळसर निमुळत्या अंगठ्याखाली दाबून धरला. काही वेळातच रक्त थांबलं. दादानं माझ्या हातातील एक लोहदर्भ पुन्हा आपल्या हाती घेतला. त्याची काळी मुळं उपटण्याचा यत्न केला. ती वक्र होत होती, दर्भापासून मात्र काही केल्या दूर करता येत नव्हती. दादाच्या कपाळीचं आठ्यांचं जाळं आता अधिक घनदाट झालं होतं. लोहदर्भ त्यानंही वाकवून मोडता येतो का, याचा पडताळा पुन:पुन्हा घेऊन बघितला. तो मोडत नव्हता. दबाव दूर करताच पूर्ववत सरळ होत होता. दादानं त्याचं त्रिकोणी टोकदार अग्र बारकाव्यानं निरखलं, स्वत:शीच म्हणाल्यासारखा; पण आम्हाला स्पष्ट ऐकू येईल असं म्हणाला —

“नाऽही! हा लोहदर्भ नाही! हा आहे दर्भबाण! लोहाचा दर्भबाण! आपल्या नेहमीच्या टोकदार सूची बाणापेक्षाही प्रभावी – विनाशक लोहदर्भबाण!!”

हातातील दर्भबाण त्यानं माझ्या हातात दिला. मी सर्व बाहेर खेचलेले दर्भबाण आता दादानं ‘विनाशक’ म्हटल्यावर काळजीपूर्वकच पुन्हा बिंड्यात खुपसून तो बिंडा क्षेत्रपालाच्या हाती दिला. त्याला ‘या तुम्ही’ म्हणून निरोपाचा संकेत केला. तो निघून गेला. आपल्या कक्षात अस्वस्थ फेऱ्या घेणारा माझा दादा आज पुन:पुन्हा एकच एक म्हणत होता – ‘रक्ष-रक्ष इडादेवी, रक्ष-रक्ष शिवशंभो!’

आमचा नित्यक्रम पूर्वीसारखाच चालू झाला. देशोदेशींचे ऋषि-मुनिवर, विद्वान तापस, विविध कलांचे अधिकारी द्वारकेत येतच होते. प्रथम युवराज म्हणून बलरामदादाला भेटून, दादाला भेटण्याची इच्छा व्यक्त करीत होते. बलरामदादा त्यांना सुचतील ती कारणं सांगून परस्परच वाटेला लावत होता. त्यातूनही काही चिवट निर्धारानं दादाला भेटण्यासाठी येत होते. मला त्याची भेट घडवून देण्याची नाना परीनं गळ घालत होते. मीही सर्व बुद्धिकौशल्य पणाला लावून आलेल्यांची समजूत घालून, त्यांना निरोप देत होतो. तरीही एखादा कृष्णभक्त काहीच ऐकत नसे. चातुर्यानं राणीवशाच्या द्वीपावर जाऊन रुक्मिणीवहिनींच्या निवासासमोर अहोरात्र निर्जळी उपोषणाला बसण्याचा निग्रह बोलून दाखवी! ही मात्र आम्हा दोघांनाही लागू पडे. निरुपायानं तो निग्रह मी दादाच्या कानी घाली. दादाचाही निरुपाय होई. अशा निग्रही भक्ताला तो भेट देई. त्याच्याशी मनमोकळं बोले.

पुढे-पुढे याचा वास आपोआपच आणखी काही भक्तांना लागला. ते हाच उपाय वापरू लागले. त्यावर दादानंच तोड काढली. आताशा तो पूर्वीसारखं आज्ञेच्या रूपात बोलतच

नसे. बोले ते स्वत:शी बोलल्यासारखं म्हणे – रुक्मिणीलाच इथे मूळ द्वारकेत येऊन राहायला सांगितलं तर – '

मी त्याच्याशी इतका एकरूप झालो होतो की, त्याची असली स्वगतं, त्यामागील आशय ओळखून सत्वर मार्गी लावी.

माझ्या संदेशानुसार रुक्मिणीवहिनी राणीवशाचं द्वीप सोडून आता मूळ द्वारकेत महाराणी म्हणून असलेल्या त्यांच्या निवासात येऊन राहिल्या. त्याही काही कमी चतुर नव्हत्या. द्वारकाधीशांचं आपल्यासारखं आपल्या भगिनींना दुरून का होईना नित्य दर्शन व्हावं म्हणून त्यांनी त्या सगळ्या जणींना एकेक करत हळूहळू आपल्या निवासाच्या पंखाखाली घेतल. रुक्मिणीवहिनींच्या इथल्या महाराणी निवासाला आठ-दहा गवाक्षं होती. त्यांच्यातून माझ्यासह दारुकामागून गरुडध्वजाकडे निघालेला दादा लांबूनच, पण स्पष्ट दिसत असे. दादाच्या राण्यांचं त्याच्यावर एवढं निस्सीम प्रेम होतं की, त्या आलटून-पालटून गवाक्षात उभं राहून, एकीला जरी दादा निसटता दिसला, तरी सगळ्या जणींना त्याचा काही पळांतच संकेत मिळे. मग सगळया जणी एकदम गवाक्षात दिसणार नाहीत याची दक्षता घेत, चतुराईनं 'श्रीदर्शन' करीत.

सर्व वहिनींना केव्हाही भेटीस येण्याची दादाची अनुमती होती, पण त्याचा 'वानप्रस्थाश्रम' रुक्मिणीवहिनींनी आपल्या सगळ्या भगिनींपर्यंत पोहोचविला होता. दादाच्या नित्य जीवनात विक्षेप न आणता सगळ्या जणींनी यापुढे कसं वागलं पाहिजे, हे नाना परीनं, त्यांच्या कंठी उतरविलं होतं. त्यातही भामावहिनी इतर सर्व विषयांत स्वभावानं आमूलाग्र बदलल्या होत्या, तरी दादावरील आपलं प्रेम पहिल्या क्रमांकाचं आहे, हे सिद्ध करण्याच्या मनोवेगाला बदलायला मुळीच तयार नव्हत्या.

दादाला भेटण्याची त्यांची उबळ जेव्हा अनावर होई, तेव्हा त्या फारच चतुराई करीत. प्रथम मला बोलावून घेऊन म्हणत, "अवधूत भावजी, श्रींची प्रकृती ठीक नाही असं समजतं. काय होतंय त्यांना?"

ते ऐकून मी गोंधळून जाई. पटकन म्हणे, "एवढा मी त्याची दक्षता घ्यायला असताना त्याच्या प्रकृतीला आता काय झालं? आणि ते मला कसं काय कळलं नाही? त्यालाच विचारतो, काय झालं ते!" असं म्हणून भामावहिनींच्या निवासातून मी चिंतेतच निघून येई.

थोड्या वेळातच दादाच्या कक्षासमोर रुक्मिणी आणि भामावहिनी दोघींनाही उभ्या पाहून मी चक्रावून जाई. त्यांना तत्परतेच्या दादाच्या भेटीस नेई. या भेटीत रुक्मिणीवहिनी बोलताना पुन:पुन्हा चिंतेनं विचारीत, "आता श्रींची प्रकृती कशी आहे?" तसं दादा नेहमीसारखं हसून म्हणे, "मला कुठे काय झालंय? मी क्षेम आहे." या भेटीत मध्येच एखादा शब्द बोलून, भामावहिनी नुसती नेत्रभक्ती करून डोळयांत न मावणाऱ्या दादाला डोळाभर बघून प्रेत. दोघीही समाधानानं निघून जात. माझ्या लक्षात नेमकं काय झालं असावं, ते आता येई. या सर्वांचं मूळ भामावहिनींवकडे असे. माझी भेट झाल्यानंतर लागलीच त्यांनी रुक्मिणीवहिनींच्याकडे दादासंबंधी असा विषय काढून ठेवलेला असे की, 'अवधूत भावजी श्रींची प्रकृती कशामुळे तरी बिघडली आहे, हे बघण्यासाठी आताच मला सांगून गेले.'

ते ऐकताच रुक्मिणीवहिनी सैरभैर होत. म्हणत, "लागलीच गेलं पाहिजे. भामे, तूच चल कशी माझ्यासमवेत!" हो-ना' करत आपणच सर्व घडवून, रुक्मिणीवहिनींना पुढे

घालून, माझं बोलणं फिरवून, भामावहिनी रुक्मिणीवहिनींसह दादाच्या भेटीला येत.

दिवस कसे निवांत चालले होते. कुरुक्षेत्राच्या महायज्ञानंतरचा तीन तपांवरचा काळ मागे पडला होता. त्या महायुद्धाच्या कितीतरी स्मृतीही मागे पडल्या होत्या. मी तर प्रभासक्षेत्रीच्या क्षेत्रपालांच्या भेटीची स्मृतीही विसरून गेलो होतो. एके दिवशी दादानं दारुकाला गरुडध्वज युवराज बलरामदादाच्या निवासी कक्षाकडे घ्यायला सांगितलं. आम्ही बलभद्रदादाच्या निवासासमोर आलो. मी आणि दादा रथातच थांबलो. दारुक युवराजांना अग्रसूचना देण्यासाठी आत गेला. थोड्या वेळानं परत आला तो खाली मान घालूनच. मी त्याला विचारलं "काय झालं दारुका, लगेचच परतलास? बलिदादा आहे की नाही?"

तो खाली मान घालूनच उत्तरला, "आहेत. पण त्यांच्या भेटीसाठी मलाही सैनिकांनी आत सोडलं नाही. त्यांच्या बैठकीच्या कक्षात ते कुणावरतरी अनावर संतापानं कडाडून बोलताहेत. अशा समयी मी त्यांच्यासमोर जाणं योग्य नाही, असं सैनिकांचं म्हणणं आहे. म्हणून थोडा वेळ थांबून तसाच परतलो."

हे ऐकताच मात्र, दादा एका झेपेतच रथावरून खाली उतरला. मी त्याच्या मागे झालो. आम्हाला बघताच मात्र बलभद्रदादाचे सशस्त्र सैनिक आदरानं अभिवादन करून दूर झाले. आम्ही थेट आतल्या बैठकीच्या कक्षात गेलो.

बलिदादा आम्हाला पाठमोरा उभा होता. तरीही तो संतापाने थरथरत होता हे जाणवलं. त्याच्यासमोर उभा होता, आता त्याच्याहून कितीतरी वयस्क दिसणारा कृतवर्मा!

भारतीय युद्ध झाल्यापासून कृतवर्म्यानं सुधर्मा सभा टाकली होती. दादासमोरही तो कधीच आला नव्हता. मलाही क्वचितच भेटला होता. तो यादवांच्या मंत्रिगणांतील एक मंत्री असूनही, दिवसरात्र मद्यपानाच्या नशेत चूर राहत होता. त्याच्या निवासाभोवतीचे यादवसैनिक त्यामुळेच मद्यपी झाले होते. हळूहळू ही लागण सर्व द्वारकाभर, सर्व यादवयोद्धयांतच पसरली होती. या एवढ्या मोठ्या राजनगरात चौकाचौकांत पुन्हा मद्यालयं उठली होती. तिथे मद्यधुंद झालेले यादवयोद्धे एकमेकांशी भांडत-तंटत होते.

दादाच्या मानसिक वानप्रस्थापासून त्यानं सुधर्मा सभेत जाणं सोडून दिलं होतं. राज्यकारभारात तर तो कसलंही लक्ष घालत नव्हता. युवराज म्हणून आज्ञापत्र काढून, दवंड्या पिटवून युवराज बलभद्रदादा कंटाळला होता. कुणीच यादव कुणालाही मानेनासे झाले होते.

एरवी कमी बोलणारा बलभद्रदादा विचारीत होता, "कुरुक्षेत्रावर तुला जे जमलं नाही, ते कुलघातक्या – नीचा, आतल्या अंगानं तू इथे साधतो आहेस. अश्वत्थाम्यानं ज्या रात्री द्रौपदीचे सर्व पुत्र वधले, तेव्हाच तुला ओळखायला पाहिजे होतं आम्ही. त्या रात्री त्या शिबिराच्या द्वारावर आपले नग्न खड्ग घेऊन तू कृपासह पहारा दिला होतास. त्यानंतर तू द्वारकेत उरले-सुरले सर्व युद्धनिपुण यादववीर बिघडवून टाकलेस. त्यांना मद्यपी, व्यसनी केलंस. तू काखेतला अंगार आहेस. तू आजच द्वारका सोडून चालता हो. नाहीतर मी स्वहस्तेच तुझा भरचौकात शिरच्छेद करीन."

आता मात्र दादा पुढे झाला. त्या दोघांच्या मध्ये उभं राहून शांतपणे म्हणाला, "ज्येष्ठा, तुझा संताप मी जाणतो, तो आवर. तुझ्या या कठोर कृतीला खूप उशीर झाला

आहे. मला वाटतं, तूच आता प्रभासतीर्थी जाऊन यादवांच्या भल्यासाठी परमेश्वराची आराधना करावी. बघ, तुला योग्य वाटेल ते कर!" योहुन अधिक काहीही न बोलता तो बलभद्रदादाच्या निवासातून बाहेरही पडला. त्या दिवशी आम्ही पश्चिमेच्या ऐंद्री महाद्वाराजवळील इडादेवीच्या मंदिराच्या पाषाणी ओवरीवर कितीतरी वेळ बसलो – दोघेच, नि:शब्द. नुसते सागरलाटांच्या अखंड नृत्याकडे बघत! काळाची थांग न लागणारी गाज ऐकत!

कोजागिरी शारदीय पौर्णिमेचा दिवस उजाडला. या पौर्णिमेला प्रभासक्षेत्री यात्रेला जाण्याचा यादवांचा प्रघात होता. त्याप्रमाणे प्रमुख यादव नौकानौकांनी प्रभासक्षेत्राकडे निघून गेले. मागे राहिले ते वृद्ध आणि अगदी बालक असे मोजकेच यादव. सर्वांत शेवटी बलरामदादाही आपल्या गद, सारण अशा बंधूंसह आणि त्यांच्या नि आपल्या निशठ, उल्मुक अशा सर्व पुत्रांसह निघून गेला. गेलेल्या सहस्रावधी यादवांच्या मनोरंजनासाठी मैरेयक मद्याचे बुधले व सोमरसाचे हंडे भरलेल्या शंभर–एक नौकांचा विशेष तांडाही निघून गेला. दादानं आता अशा सामूहिक समारोहात जाणं केव्हाच सोडून दिलं होतं.

कोजागिरी पौर्णिमा असल्यानं रात्री स्वच्छ, सुंदर चांदण्यात आम्ही दोघेच दारुकासह ऐंद्र महाद्वारालगतच्या पाषाणी बैठकीवर बसलो. समोर पिठूर स्वच्छ चांदण्यात पश्चिम सागर लाटालाटांनी उचंबळत होता. अशा कित्येक कोजागिरी पौर्णिमांना विवाह व नामकरणाच्या निमित्तानं मी दादाला यादव स्त्री-पुरुषंसमवेत रास खेळताना पाहिलं होतं. म्हणून गर्जत्या फेसाळत्या लाटांकडे बघत मी रासाचा विषय काढला. दादाला म्हटलं, "तू रास खेळताना सर्वांशी एकरूप झालेला दिसतोस. प्रत्येक स्त्री-पुरुषसमवेत तूच नाचतो आहेस, असं वाटतं. याचं रहस्य काय?"

तो एकदा चांदण्यात न्हालेल्या गर्जत्या, पश्चिम सागराकडे आणि एकदा माझ्याकडे असं कितीतरी वेळ आलटून–पालटून बघत राहिला. मग हसून अगदी मोजक्या शब्दांत म्हणाला, "अवधूता, 'रास' हे प्रतीक आहे. जीवसृष्टी निर्माण करणारा परमात्मा, प्रत्येक क्षणाला रासच खेळत असतो. या क्षणालाही दूरवर तो तसा रासच खेळतो आहे!" मग मात्र काहीच बोलला नाही. मीही काही बोललो नाही. त्या रात्री कोजागिरीच्या पिठूर चांदण्यात कितीतरी वेळ आम्ही सागरकिनारी पाषाणी बैठकांवर बसलो. नि:शब्द. मध्यरात्र उलटल्यानंतर केव्हातरी परतलो.

दोन दिवस उलटले. तिसऱ्या दिवशी, कधी नव्हे ते फार दिवसांनी द्वारकाधीशांची विशेष भेट मागणारे समयतबकावरचे तीन कणीदार टोल प्रभातकालीच ऐकू आले. 'कोण आलं असावं?' मी आणि दादानं एकमेकांकडे प्रश्नार्थी बघितलं.

काही वेळानं समयतबकाचा पालक प्रथम आला. त्याच्या पाठोपाठ अग्रवार्ता पाठविण्याच्या प्रथेचं भान नसलेला प्रभासक्षेत्रीचा तोच क्षेत्रपाल, लटलट कापत सरळ दादाच्या चरणांवर लोटांगण घालून हमसत राहिला.

आम्हा दोघांनाही काय प्रकार आहे काहीच कळेना. मी दादाच्या चरणांवर लोटांगणात पडलेल्या त्या क्षेत्रपालाला, बसून थोपटून शांत करण्याचा प्रयत्न करू लागलो.

दादा मात्र त्याच्या नेहमीच्या पद्धतीने असे पाय धरणाऱ्याला तत्पर न उठविता निश्चल उभाच राहिला. मी शांतवून क्षेत्रपालाला उठतं केलं. त्याचे खांदे थोपटून त्याला

आग्रहानं आवर्जून म्हणालो, “तुम्ही मुळीच भेदरू नका. शोक करू नका. आभाळाएवढ्या अभयदानी महापुरुषसमोर तुम्ही उभे आहात. बोला, काय क्षालं? बोला.”

नेत्रांतल्या अविरत अश्रुधारा उत्तरीयाच्या शेवानं वारंवार टिपत, तो एकेक शब्द निकरानं कसंतरी बोलला, “द्वारकाधीश, अवधूत – मोठा घात झाला आहे. परवा रात्री – रात्री कोजागिरीच्या चांदण्यात – चांदण्यात प्रभासक्षेत्री – क्षेत्री – प्रलय माजला. सगळे अठराकुलीन प्रमुख यादव मद्यधुंद होऊन आपसात लढून – लढून विनाश पावले!!”

“क्काऽय?” मी जवळ-जवळ किंचाळलोच.

दादा मात्र शांतच होता. निश्चल. स्वत:शीच बोलल्यासारखा म्हणाला, “क्षेत्रपाल, शांत, स्थिर मनानं, काय नि कसकसं झालं, सर्व – सर्व सांगा.”

आता सावरलेला क्षेत्रपाल थोडं सलग आणि स्पष्ट बोलू लागला, “कोजागिरीच्या पौर्णिमेचा चंद्र आभाळात उठताच सहस्त्रावधी यादवांनी काहिली-काहिलीत भरलेल्या मैरेयक मघाचं आणि सोमरसाचं सामूहिक प्राशन करायला प्रारंभ केला. मध्यरात्री चंद्र मस्तकावर येईपर्यंत, ते सर्वच मद्य ढोसून–ढोसून अनावर धुंद झाले.

“प्रथम कृतवर्म्यानं स्यमंतक मण्याचा विषय काढून सेनापती सात्यकींना डिवचलं. द्वारकाधीशांना तो चक्क ‘चोर’ म्हणाला. ते ऐकून अनावर संतप्त झालेल्या सात्यकींनी लगतच्या लोहदर्भ कुरणातील मिळतील तसे लोहबाण, हातांनीच कृतवर्म्यावर अखंड फेकायला सुरुवात केली. मग उभयतांत कितीतरी वेळ त्या दर्भबाणाचंच युद्ध झालं. भारतीय युद्धात नसेल इतक्या गतीनं महारथी सात्यकी कुरणातील दर्भबाण मुळासकट केव्हा नि किती उपटत होते आणि कृतवर्म्यावर फेकत होते, ते कळत नव्हतं. दर्भबाणांनी घेरलेल्या आपल्या मद्यगुरू कृतवर्म्याला बघून सांबाला संताप आला. तो सात्यकींवर धावला. त्यानंही सात्यकींवर अगणित दर्भबाण फेकले. सेनापतींवरचा हा आघात प्रद्युम्नाला सहन झाला नाही. त्यानं प्रथम सांबाला वधलं. भद्रादेवींचा ज्येष्ठ पुत्र संग्रामजित याला त्याचाच बंधू सुभद्रानं ‘माझा सतत अवमान करतोस –’ असं दातओठ खात दर्भबाण फेकून वधलं.

“मग कितीतरी वेळ मद्यधुंद झालेले यादव ज्येष्ठता, कनिष्ठता, सर्व नाती, नीती विसरून प्रचंड आरडाओरडा करीत एकमेकांवर दर्भबाण फेकत तुटून पडले.

“दोन्ही हात उंचावून ‘थांबा! तुम्हाला इडादेवीची शपथ आहे. थांबा.’ म्हणत युवराज बलभद्र सर्वांना रोधण्यासाठी आक्रोशून, धावधावून, विनवून थकले. कुणीही त्यांच्याकडे लक्ष दिलं नाही. उत्तररात्रीपर्यंत धुंद यादवांचा आरडाओरडा नि बाणफोक चालली होती. मस्तक हातात घट्ट धरून युवराज एका पाषाणखंडावर थकून सुत्र होऊन बसले.

“कुठल्याही युद्धात नाही इतक्या निर्दय निर्ममपणानं यादवांनी बंधू–बंधूंना दर्भबाण फेकून वधलं.

“सूर्योदय होईपर्यंत प्रभासक्षेत्राचं – कुरुक्षेत्र झालं होतं. मृगाच्या वादळी पावसात डेरेदार आम्रवृक्षावरची फळं वाऱ्यानं झोडपून काढल्यामुळे बुंध्याशी इतस्तत: पडावीत, तसे यादवांचे मृतदेह इतस्तत: कसेतरीच पडले होते. दर्भबाणांची सर्व कुरणं उद्ध्वस्त झाली होती. अशी बोटभरही जागा त्या कुरणांना धरून असलेल्या सागरपुळणीवर

शिल्लक नव्हती, जिथे मृत यादवाचा देह पडला नव्हता.

"वाचलेल्या एका तरुण यादवाच्या स्कंधाचा आधार घेत विषण्ण युवराज बलभद्र पश्चिम सागरकिनारी आले. पुळणीच्या वाळूतच पद्मासन घालून त्यांनी ध्यान धरलं. एवढ्यात सागरभरती आली. त्यांच्या सोबतच्या तरुण यादवानं नंतर मला सांगितलं की, 'दादांच्या मिटल्या नेत्रांतून एक शुभ्रधवल शलाका निघाली. वळवळत ती सागरलाटांत दूरवर कुठेतरी निघून गेली.'

"भरतीचा गर्जता समुद्र बघून त्यांच्यासोबतचा तरुण भयानं पळून आला. आम्ही नंतर तिथे गेलो. युवराजांचा देह काही सापडला नाही.

"द्वारकाधीऽश – आपले युवराज बलभद्रदादा आपणाला सोडून सागरप्रिय झाले!!" क्षेत्रपाल उत्तरीयांत आपले मुख लपवून उभ्या देहीचा गदगदला.

मी सुन्न-सुन्न होऊन, मस्तक ओंजळीत धरून मटकन खालीच बसलो.

दादा एकच वाक्य बोलला आणि अंतर्कक्षात निघून गेला – "थोरल्या, एकदा तू रुष्ट होऊन मला सोडून गेलास, म्हणून माझे प्रिय मोरपीस धाडून मी तुला परतविला. आता मात्र तुला परतविण्यासाठी या धाकल्याच्या हाती काही काहीही नाही!"

वार्ता कळताच दादानं दारुकाला गरुडध्वज सिद्ध करायला सांगितलं. मला आणि रेवतीवहिनींना रथात घेऊन त्यानं प्रभासक्षेत्राकडे प्रस्थान ठेवलं. अमात्यांना वसुदेवबाबा आणि रोहिणीमातेसह थोरलीला प्रभासक्षेत्राकडे घेऊन येण्याची सूचना करूनच तो निघाला होता. हस्तिनापूर, कांपिल्यनगर, इंद्रप्रस्थ, विराटनगर, रैवतकनगर अशा सर्व ठिकाणी वार्ता देण्यासाठी दूत धाडायलाही त्यानं सूचना केली.

आता बलभद्रदादाचे सर्व धार्मिक विधी होईपर्यंत, आम्हा सर्वांचा पडाव प्रभासक्षेत्रावरच पडणार होता. दादानं यादवीत गेलेल्या सर्व यादववीरांच्या अठरा ठिकाणी मोठमोठ्या चिता रचून घेतल्या. सोबत आणलेल्या त्या–त्या कुलातील वृद्धाकडून त्यांना एकत्रच समंत्र अग्निदाह दिला. बलभद्रदादाच्या चंदनी चितेला अग्नी देतानाही तो निश्चल, शांत होता.

सर्वांच्या तिलांजलीसाठी हस्तिनापूरहून युधिष्ठिर व द्रौपदीसह इतर चारही पांडव प्रभासक्षेत्री आले. त्यांच्यासोबत महात्मा विदुर आणि संजयही होते.

तिलांजलीचा विधी समंत्र पार पडताच, दादानं पांडवांतील एकट्या धनुर्धर अर्जुनाला बाजूला घेतलं. मी दोघांच्या सोबत होतोच. अतिशय शांतपणे त्याने अर्जुनाला पहिलाच प्रश्न केला, "हिमालयाच्या वनात जाऊन आत्याबाईंचं कार्य यथाविध केलंत?"

बलभद्रदादाच्या आठवणीनं डोळे भरून आलेल्या अर्जुनाला हा प्रश्न तसा कितीतरी अनपेक्षित होता. तो भरल्या डोळ्यांनी दादाकडे नुसताच बघत राहिला. तोही आता कितीतरी वयस्क दिसत होता. त्यानं कुंतीमातेचे सर्व विधी समंत्र केल्याची होकारार्थी नुसती मान डोलविली. त्याला काय बोलावं, सुचतच नव्हतं.

आपला उजवा आजानुबाहू अर्जुनाच्या विशाल वृषस्कंधावर चढवून तो हलकेच थोपटून दादा त्याला म्हणाला, "माझा थोरला गेला. सर्वांनाच जावं लागतं. उद्या मलाही जावं लागेल. या क्षणी कुंतीआत्येला आणि बलभद्रदादाला साक्षी ठेवून मला एक वचन दे!"

दादानं कधीच काहीही कुणाकडे मागितलं नव्हतं – वचनसुद्धा! ते जाणवल्यामुळे डोळे अधिकच डबडबलेल्या अर्जुनानं, दादानं पसरलेल्या निळसर गुलाबी तळहातावर आपला निळसर हात हलकेच ठेवून पुन्हा होकारार्थी मान हलवून, त्याला मूकपणेच वचन दिलं.

दादा संथ लयीत अर्जुनाला म्हणाला, "माझ्या पश्चात द्वारकेच्या सर्व यादवस्त्रियांचं संरक्षण तू करायचं आहेस, पार्था!"

ते ऐकताना मात्र मी शहारलो. तो असं काही बोलेल, असं मला मुळीच वाटलं

नव्हतं. अर्जुन तर दिङ्मूढच झाला होता. पांडव हस्तिनापूरला परत जाण्याचा समय आला. त्यांचा निरोप घेताना, आज मात्र आचार्य सांदीपनी आणि मुनिवर घोर अंगिरस यांना केलं होतं, तस गुडघे भुईवर टेकून दादानं ज्येष्ठ पांडव युधिष्ठिराला व भीमसेनाला त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून वंदन केलं. ते दोघे मात्र यादवांचा विनाश आणि बलभद्रदादाची कुवार्ता याच विचारानं इतके हादरून गेले होते की, दोघांच्याही ते काही ध्यानी आलं नाही.

अर्जुनासह दोन लहान पांडवांनी – नकुल–सहदेवांनी दादाला दंडवत घातले. त्यानं या वेळी एकटच्या नरोत्तम सख्या अर्जुनाला दृढालिंगनात घेतलं. मग बराच वेळ दोघंही त्याच स्थितीत निःशब्द उभे राहिले. इतर कुणाला दिसला की नाही मला माहीत नाही, पण अर्जुनाच्या नेत्रांतून पाझरलेला आत्मरस दादाच्या सखोल निळसर पाठपन्हाळीतून उतरलेला मी पाहिला.

त्याच्याशी नेहमीच एवढं निर्भीड बोलणारी द्रौपदी, आता मात्र काही–काहीच बोलत नव्हती. निरोपासाठी तिच्यासमोर दादा जाताच ती नमस्कारासाठी वाकू लागली. अपार प्रेमानं तिचे दोन्ही हात ओंजळीत घेत, दादानं तिला रोधलं.

तिला वाटलं, अर्जुनाला केला तेवढा नसला, तरी दादा या क्षणी तिला काहीतरी उपदेश करणार. पण – पण "सखीऽ – तुला या क्षणी हवेत शब्द! मी देतो आहे, ते माझं प्रेम! वस्त्ररूपातच! सांभाळ ते." एवढं एकच वाक्य बोलून त्यानं आपल्या निळसर कंठाभोवती घेतलेलं केशरी उत्तरीय तिच्या ओंजळीत ठेवलं!

पांडव द्रौपदीसह हस्तिनापूरला निघून गेले. आम्ही वसुदेवबाबा आणि दोन्ही मातांसह द्वारकेला परतलो. आता तर मला जाणवावी अशी त्रुटी दादाच्या दिनचर्येत पडू लागली. त्यानं समुद्रकिनारी जाऊन सूर्यदेवांना सांध्यअर्घ्य देणं सोडून दिलं. द्वारकेत येणाऱ्या कुठल्याही ऋषिमुनी, तापस, सिद्धाची भेट घेणं कटाक्षानं बंद केलं. न चुकता तो रोज वसुदेवबाबा आणि दोन्ही राजमातांचं दोन्ही वेलचं दर्शन मात्र घेत होता. आता त्याचा सर्वाधिक समय दानसत्राच्या चौथऱ्यावर जात होता. आताशा तो फारसा माझ्याशीही बोलत नव्हता. बोलला तो तेव्हाच, जेव्हा बलभद्रदादाच्या निमित्तानं रैवतक पर्वतावरून एकदा तीर्थंकर घोर आंगिरस भेटीला येऊन गेले तेव्हा आणि एकदा पुत्र दत्तासह अवंतीच्या अरण्यातील अंकपाद आश्रमातून आचार्य सांदीपनी येऊन गेले तेव्हा!

त्याचा मौनासारखा वाटणारा अबोला जसा मला जाणवत होता, तसाच रुक्मिणीवहिनींनाही तो जाणवत होता. आम्ही दोघं भेटलो की, याच एका विषयावर कितीतरी वेळ बोलत असू. अशी चर्चा संपविताना त्या म्हणत, "काही चिंता करू नका तुम्ही, अवधूतभावजी. मी सांगते तुम्हाला, श्री बोलतील ते केवळ तुमच्याशीच आणि तेही भरभरून!"

मी त्याचीच प्रतीक्षा करीत राहिलो. आतल्या आत मनानं थिजत चाललो. अशातच जलदलप्रमुखानं सर्वांनाच गंभीरपणे विचार करायला लावणारी एक वार्ता आणली. पश्चिम सागरात कसलीतरी भूकंपासारखी उलथापालथ झाली होती. त्यामुळे बंदर द्वारकेला मार्गदर्शन करणारा क्रौष्टू दीपस्तंभ पायात खचला होता. दादा काही यावरही मन भरून माझ्याशी बोलत नव्हता आणि तो दिवस एकदाचा उगवला. दादाच्या

बोलण्याचा – युगाच्या अंताचा!

त्या दिवशी भल्या पहाटे ब्राह्मी मुहूर्तावर मुरलीच्या एकामागून एक उठणाऱ्या मधुर धुनी ऐकतच मी जागा झालो. आश्चर्यात पडलो. प्रत्यक्ष द्वारकेत स्वत: मुरली वाजविताना मी आज त्याला पहिल्यांदा बघत होतो. अद्याप नित्याचे चारणगणही आले नव्हते. त्यांनी नित्याच्या रुद्रवीणांवर दादाला जागं करण्यापूर्वीच, त्यानं कधीही विसरता येणार नाहीत, अशा मुरलीच्या अज्ञात सुरावटी घुमवून मलाच जागं केलं होतं.

मला उठलेलं बघून हसतच त्यानं मुरली थांबविली. मी कुतूहलानं विचारलं, “आज चारणगण येण्यापूर्वीच तू कसा काय जागा झालास?”

तो म्हणाला, “मुख प्रक्षाळून ये, सांगतो.” त्याचीही नित्याची सर्व प्रभात आन्हिकं आवरली होती.

मी मुख प्रक्षाळून आलो. त्याच्या समोरच नित्यासारखा भुईवरच्या आस्तरणावर मांडी घालून बसलो. आणि पुन्हा तोच प्रश्न केला, “नित्याचे चारणगण येण्यापूर्वीच आज कसा काय जागा झालास तू, दादा?”

तो हसला व म्हणाला, “तू शांतपणे ऐकावंस म्हणूनच मी मुरली थांबविली आहे. नीट ऐक. काय ऐकू येतंय तुला?” त्यानं माझी परीक्षा घ्यायला आज उठल्यापासूनच सुरुवात केली. मी डोळे मिटून एकाग्रतेने ऐकू लागलो, ‘कर्ररऽऽ धपऽऽ कर्ररऽऽ धपऽ!’ पश्चिम सागराची अखंड गाज स्पष्ट ऐकू येत होती. मी म्हणालो, “पश्चिम सागर आपली गाजेची नित्याची मुरली वाजवितो आहे. ती ऐकू येते आहे.”

“नाही रे माझ्या प्रिय सख्या, अवधूता! अजून एकाग्र होऊन नीट ऐक.” आजच्या त्याच्या पहिल्याच वाक्याबरोबर मला एक स्पष्ट बदल तीव्रपणे जाणवला. मानसिक वानप्रस्थाश्रम स्वीकारल्यापासून आजपर्यंत एकदाही कधी त्यानं मला आज्ञा दिली नव्हती. माझ्याकडून काहीही करवून घेताना, तो स्वगतासारखं बोलत आला होता. आज मात्र त्यानं फार दिवसांनंतर ही पहिली आज्ञा केली होती. ती ऐकताना मला मनोमन न कळणारा आनंद झाला होता. हरवलेलं काहीतरी मोलाचं पुन्हा सापडलंय, असं वाटून गेलं. पण नेमकं काय ते कळेना!

मी ध्यानपूर्वक डोळे मिटून पुन्हा एकाग्रपणे ऐकू लागलो. थोड्या वेळानं म्हणालो, “वस्त्र फाडाल्यासारखा कसलातरी सूक्ष्म नाद मधूनच ऐकू येतो आहे.”

तो पुन्हा हसला. हे त्याचं असलं हसणं, फार वर्षांपूर्वी कधीतरी मी त्याच्यासह अंकपाद आश्रमात असताना पाहिलं होतं – अत्यंत निरागस, अतीव अवखळ!

तो म्हणाला, “बंधो उधो, ते वस्त्र नाही रे! अवंतीच्या अंकपाद आश्रमात असताना आपण पहिल्याच दिवशी ब्राह्मी मुहूर्तावर ऐकलेली ती रानकाक पक्षयाची तीच पहाट करकर आहे. आज चारणगणांपूर्वी माझ्या या जुन्या स्नेह्यानं आपल्या करकरीची मुरली वाजवून मला जागं केलं. माझा त्याचा स्नेह फार, फाऽर जुना आहे!”

मी दादाकडे डोळे विस्फारून बघतच राहिलो. तो म्हणत होता, ते सत्य होतं. आजच्या दिवसाचा त्यानं मला दिलेला हा दुसरा आघात होता.

आम्ही स्नान, प्राणायाम, पुरश्चरण, गोदर्शन, दुग्धप्राशन अशी नित्यकर्मं आवरली. दादानं एका सेवक यादवाकरवी दारुकाला निरोप धाडला. काही वेळातच दारुक दादासमोर सेवेला सादर झाला. त्यानं आमच्या कक्षासमोरच्या अंगणात गरुडध्वज

आणून उभा केला होता. आज तर त्यानं पूर्वीच सालंकृत असलेला गरुडध्वज दादाच्या प्रिय कदंबपुष्पांच्या मालांनी सजविलेला होता. दादा रथारूढ होताच मीही झालो. आम्ही वसुदेवबाबांच्या आणि दोन्ही मातांच्या प्रभातवंदनासाठी निघालो. दारुकानं द्वारकेच्या महाराजाधिराज वसुदेवबाबांच्या निवासाच्या राजवास्तूसमोर आणून रथ उभा केला.

नित्यासारखा दारुक सुवर्णी काठाळीच्या वस्त्रंच्या झुली घातलेल्या आपल्या प्राणप्रिय चार अश्वांची नावं घेऊन चुचकारला नव्हता. दादानं ते अचूक टिपलं होतं. रथातून उतरण्यापूर्वी तो दारुकाला म्हणाला, “सख्या दारुका, दोन दिवस तू माझ्या प्रिय अश्वस्नेह्यांचा खरारा केलेला दिसत नाहीस. ते नेहमीसारखे शेपटचा चाळवीत नाहीत. फुरफुरत नाहीत. वाऱ्याच्या झुळकीबरोबर अंगी भवरा उठवीत नाहीत!”

“खरं आहे स्वामी. त्यांच्या खराऱ्यासाठी लागणाऱ्या काटेरी रानवेली अरण्यातून आणावयाच्या राहिल्या. त्यामुळेच खराराही राहिला. त्यासाठीच ते थोडे मलूल झालेत आज! नाहीतर आपल्या कक्षाच्या अंगणात आपलं दर्शन होताच, ते नित्यासारखे केव्हाच आनंदविभोर होऊन खिंकाळले असते.” दारुकानं काहीसं ओशाळत इतिवृत्तान्त सादर केला.

“ठीक आहे. तू नको, दोन प्रहरी मीच आणेन त्यांच्या खराऱ्याच्या काटेरी रानवेली.” दादा त्याला हसून म्हणाला. गरुडध्वजातून उतरला. आम्ही तिघेही वसुदेवबाबांच्या भव्य आणि वैभवी राजवास्तूत शिरलो. अंतर्कक्षात वसुदेवबाबा, थोरली नि धाकलीच्या दर्शनासाठी गेलो. दादानं त्या तिघांचंही अष्टांगी दंडवतात दर्शन घेतलं. त्याच्यानंतर मी आणि दारुकानं घेतलं. आज दादा नित्यासारखा लगबगीनं त्यांच्या कक्षातून बाहेर काही पडला नाही. थोरलीच्या – देवकीमातेच्या मंचकावर बसला. काही क्षण गेले. कुणीच काही बोलत नव्हतं. यादवी झाल्यापासून आणि बलभद्रदादा गेल्यापासून हे असंच घडत आलं होतं, सर्वांचीच ती मानसिक कोंडी फोडत दादा थोरलीला म्हणाला, “किती दिवस झाले तुझ्या हातचं दूध पिऊन! देतेस?” तिच्याकडे बघत तो असं काही हसला की, तिला काही बोलणंच सुधारलं नाही. सेविकेला आज्ञा न देता ती हसतच ‘ही आलेच’ म्हणत स्वत:च अंतर्कक्षात निघून गेली. वसुदेवबाबांच्या जवळच आसनावर बसलेल्या धाकलीच्या – रोहिणीमातेच्या जवळ जाऊन तिच्या समोर तो उभा राहिला. बलभद्रदादाच्या स्मृतीनं ती दोन्ही जाणती राजमनं भरून आली. धाकली अंशुकाचा शेव तोंडात घेऊन गदगदू लागली. दादानं पुढे होत तिचे सुरकुतलेले दोन्ही हात आपल्या ओंजळीत घेतले. एरवी कधीच त्याचा आवाज बदललेला नव्हता. आता मात्र घोगरला. धाकलीचे हात थोपटत तो म्हणाला, “शांत हो धाकले! तुझ्यापेक्षा खरंतर मीच अधिक शोक करायला पाहिजे. किती-किती त्रास दिला मी माझ्या ज्येष्ठाला – तुझ्या पुत्राला!”

देवकीमातेनं आणलेला गोरसाचा प्रसाद डोळे मिटून दादानं अवीट गोडीनं प्राशन केला. आम्ही तिघेही त्या मातृ–पितृवास्तूतून बाहेर पडलो. दादानं कालच सूचना दिल्याप्रमाणे अमात्यांनी वेगवेगळ्या दानांची सुवर्णतबकं नगराच्या मध्यभागातील दानचौथऱ्यावर मांडून ठेवली होती. आज त्यांची संख्या कितीतरी वाढली आहे, हे काही माझ्या लक्षात आलं नाही.

दारुकानं न सांगताच नित्याच्या सवयीप्रमाणे गरुडध्वज दानचौथऱ्याजवळ आणला.

आम्ही दोघंही चौथऱ्यावर चढलो. दादानं नित्यासारखं गंधफूल वाहून सर्व दानतबकांचं पूजन केलं. मी एकेक वस्तु, तो हस्तनिर्देश करील तसतशा त्याच्या हातात देऊ लागलो. मंत्रघोषांच्या गजरात तो द्वारकाकर स्त्री–पुरुषंना हसत–हसत दानं वाटू लागला. त्याच्या दर्शनानंच संतुष्ट झालेले नगरजन त्याला हात उंचावून मुखभर आशीर्वाद देऊ लागले – "आयुष्यमान भव द्वारकाधीश! कल्याणमस्तु! शिवं भवतु!"

मूळ द्वारकाद्वीपाला उजळणारा सूर्यदेव, मानवी जीवन उजळणाऱ्या त्यांच्यातीलच सूर्यदेवाचं दर्शन घेत, हाताहाताने वर चढू लागला. आज कितीतरी वेळ दादा दानं वाटत राहिला.

आम्ही त्याच्या निवासी कक्षावर परत आलो. आता भोजनाचा समय झाला होता. रोज दारुक या वेळी आपल्या निवासाकडे जात असे. आज दादानं 'चल' म्हणून त्याच्या स्कंधावर हात ठेवताच, तो कळसूत्री बाहुलीसारखा काहीही न बोलता दादाबरोबरच आला होता.

कसं कळत नाही, रुक्मिणीवहिनींनी आम्हा तिघांना एकत्र येताना बघितलं होतं. दादानं मला नि दारुकाला आपल्या पाठोपाठ हात प्रक्षाळायला लावलं. आम्ही तिघेही भोजनासाठी मांडलेल्या तीन शिसमी चौरंगांवर बसलो. समोरच्या भोजनाच्या तबकांसाठी तसलेच तीन चौरंग होते. रुक्मिणीवहिनींच्या कक्षाकडून दोन सेविका तीन तबकं घेऊन आल्या. आमच्या कक्षाच्या दारातच उभ्या राहिल्या. लगबगीनं पुढे होऊन मी त्यांच्याकडून एकेक तबक घेऊन एकेक चौरंगावर ठेवलं. दादा मधल्या चौरंगावर बसल्यानंतर त्याच्या उजव्या हाताशी मी आणि डाव्या हाताशी दारुक बसला. मी भोजनतबकावर बारकाव्यानं दृष्टी फिरविली. आज दादाला आवडणारे सर्व पदार्थ सुवर्णी तबकातील छोटया–छोटया सुवर्णी वाडग्यांत होते. नक्कीच ही तबकं स्वत: सिद्ध करून रुक्मिणीवहिनींनी धाडली होती.

आम्ही गप्पा मारत भोजनाचं यज्ञकर्म करू लागलो. मी दादाला मध्येच विचारलं, "दारुकानं दोन दिवस तुझ्या प्रिय अश्वांना खरारा केलेला नाही, हे त्यानं न सांगताच तू कसं काय जाणलंस?" मुखातला गुरगुटचा ओदनाचा घास गिळून तो हसत म्हणाला, "आज ब्राह्मी मुहूर्तावर जसं मी रानकाकांची करकर ऐकून उठलो, तसंच! या दारुकाला मी नेहमीच सांगत आलो की, गरुडध्वजाचे चारही अश्व मला माझे अवयवच वाटतात. कुरुक्षेत्रावर अर्जुनाला जशी 'जीवनगीता' सांगितली तशी या दारुकाला मी कितीतरी वेळा 'अश्वगीता' समजावून सांगितली आहे. काय दारुका?"

"होय स्वामी, मी ती सर्व नीट ध्यानातही ठेवली आहे." दारुक आदरानं उत्तरला.

मग कितीतरी वेळ अशा नाना विषयांवर मनमुक्त संभाषण करीत आम्ही भोजनाचं यज्ञकर्म संपविलं. उठतानाच दादानं समोर ठेवलेला सोन्याचा जलकुंभ डाव्या हातानं उचलला.

आम्ही बोलतच स्वच्छतागृहाकडे आलो. आता माझ्या लक्षात आलं – गेली तीन–चार तपं भोजनोत्तर मीच त्याच्या हातावर पाणी घालत होतो. म्हणून लगबगीनं पुढे होत मी त्याच्या डाव्या हातातील कुंभ घेण्याचा यत्न केला. तसं झटकन आपला हात मागे घेत तो कितीतरी प्रसन्नहसून म्हणाला, "नाऽही – अवधूता, आजचा दिवस तुझा! आजपर्यंत तू माझ्या हातावर पाणी घातलंस. आज मी तुझ्या हातावर पाणधार धरणार. दारुकाच्याही! आजवर तुम्ही माझी सेवा केलीत. ही एवढी तरी मला आज करू द्या!

त्यानं मला नित्यासारखं निरुत्तर केलं. मी मुकाट दोन्ही हात पुढे केले. तो हसून माझ्याकडे प्रेमानं बघत एकधारेनं पाणी सोडत राहिला. माझे हात क्षाळून होताच, त्यानं दारुकाच्याही हातांवर एकधारेनं तसंच पाणी सोडलं. सर्वांत शेवटी स्वत:चे हात माझ्याकडून पाणी घेऊन प्रक्षाळले.

ओले हात मी पुढे धरलेल्या कोरड्या वस्त्रानं पुसतानाच तो दारुकाला म्हणाला, "तुला हव्या असलेल्या अश्वांच्या खराऱ्यासाठी लागणारा काटेरी रानवेली नेहमी कुठल्या अरण्यातून आणतोस तू, दारुका?"

"वेरावळजवळच्या भालका तीर्थाच्या अरण्यातून, स्वामी!" दारुक सादर उत्तरला.

"असं कर दारुका, आज तू विश्राम घे. माझ्या वामकुक्षीनंतर मी आणि उद्धवच तिकडे जाऊन त्या रानवेली आणू. माझ्या वामकुक्षीनंतर निघू. तू जोडलेला गरुडध्वज काही मोडू नकोस. छान सजविला आहेस आज तू तो! तसाच अश्वशालेत नेऊन सोड."

'जशी द्वारकाधीशांची आज्ञा' म्हणून दादाची चरणधूली घेऊन दारुक जायला निघाला. त्याला हळुवार वर घेऊन दादानं दृढालिंगनात घेतलं. स्वामींनी आज सहभोजनाचा व पाठोपाठ दृढालिंगनाचा सन्मान का द्यावा, याचा विचार करतच दारुक निघून गेला.

दादा आपल्या उंचशील शिसमी मंचकावर लेटला. मी आस्तरणावर बसून त्याचे चरण चुरू लागलो. काही वेळानं मिटल्या डोळ्यांनीच तो म्हणाला, "पुरे, जा तू आता उद्धवा. दुसरा प्रहर टळतीला लागताना मात्र परत ये. आपणाला भालका तीर्थाकडे जायचं आहे. त्यासाठी लागणाऱ्या नौकेची सिद्धता ठेव."

"होय दादा." मीही त्याची चरणधूली मस्तकी घेऊन त्याच्या कक्षाबाहेर पडलो. जातानाच मी त्याच्या कक्षाची प्रशस्त द्वारं बाहेरूनच ओढून घेतली. सकाळपासून घडलेल्या घटनांचा विचार करतच, मी नौकेची सिद्धता करण्यासाठी शुद्धाक्षाजवळच्या खाडीकडे निघालो.

दादा नि दारुक म्हणाले, ते भालका तीर्थ सोमनाथ–वेरावळलगतच्या अरण्यात होतं. हे अरण्य खाडी पार केल्यावर वीस योजनांच्या अंतरावर होतं. तिकडे गरुडध्वजातूनच जावं लागणार होतं. हा गरुडध्वज नित्यासारखा मोठ्या नौकेतूनच खाडीपार करावा लागणार होता.

दोन प्रहराचा समय असल्यामुळे बंदर द्वारकेचे मोठ्या नौकांचे बरेचसे धीवर उदरभरणाच्या यज्ञकर्मासाठी आपल्या पर्णकुटयांकडे गेले होते. त्यांना शोधून त्यांच्यातीलच एक कुशल धीवर निवडण्यातच माझा प्रहर गेला. आता दोन प्रहर टळतीला आला होता. लवकरात लवकर दादाच्या सेवेला सादर होणं, आवश्यक होतं. एव्हाना तो उठला असेल. त्याला मुख क्षाळायला पाणी दिलं पाहिजे. तो नेहमीच गूढ बोलतो, दूरदृष्टीचं बोलतो. कधी नव्हे, ते त्यानं आज माझ्या हातावर पाणी कसं घातलं? विचारांच्या तंद्रीतच मी श्रीसोपानाच्या खालून वर जाणाऱ्या प्रथम पायदंडीवर आलो.

मी तो भव्य सोपान डोळाभर भरून घेत दृष्टी उंचावली. अगदी वरच्या टोकाच्या पायदंडीवर माझा उंचशील साक्षात दादाच हसत उभा होता. मला तिथूनच त्यानं विचारलं, "उद्धवा, झाली का तुझी सर्व सिद्धता? उतरू काय मी खाली?"

"होय दादा, झालीय सगळी सिद्धता! पण – पण तू खाली उतरू नकोस, हा मीच

आलो वरती.” असं लगबगीनं त्याला उत्तर देत मी तो उंचच उंच सोपान तरातर चढून जात त्याला गाठलंही.

त्याच्याकडे बघताच मात्र मी थक्क झालो. गेली तीन तपं – कुरुक्षेत्रावरून आल्यापासून कधीच परिधान न करता त्यानं पेटिकेत बंदिस्त करून ठेवलेला निःशस्त्र सारथ्याचा सुरक्षित रणवेष, आज पहिल्यानं अंगी धारण केला होता. पाठचा भाग गोलाकार असलेला कुसरदार मोरपीसधारी सुवर्णी मुकुट त्यानं आपल्या दाट शुभ्र केशावळीवर घट्ट बसविला होता. तो नित्याचा नव्हता. तीन तपांपूर्वीचा होता. त्या डोळे दिपवणाऱ्या झळझळीत सोनकिरीटाच्या खोबणीत त्याचं अत्यंत प्रिय नित्याचं रंगवैभवी टवटवीत मोरपीस होतं. आज या क्षणीही त्याच्या चर्येवरून शतकोटी सूर्यांची आभा फाकली होती. आताच घातली आहे अशी वाटावी, अशी शुभ्र फुलांची भरगच्च वैजयंतीमाला त्याच्या वक्षावरून उतरून गुडघ्याच्या खाली पोहोचली होती. तिने भवताल कसा दरवळून टाकला होता. तिच्या खाली तळपत्या कौस्तुभमण्याच्या पदकांच्या मौक्तिकमाला शोभत होत्या. या दोन्हींच्या खाली, त्याच्या विशाल वक्षावर नित्याचं सुवर्णी वर्खाचं लोहत्राण होतं. त्यावर कौस्तुभमणीधारी मोतीकंठे शोभत होते. त्याच्या वृषस्कंधांवरून त्याचं आवडतं केशरी वर्णाचं सुवर्णकाठी उत्तरीय खाली उतरलं होतं. दोन्ही दंडांत, मनगटांत कुसरदार सुवर्णी बाहुभूषणं होती. कमरेला झळझळीत सुवर्णवर्णी पीतांबर तळपत होतं. त्यावर आकाशरंगी शेला आवळला होता. त्या शेल्यात बांधलेला त्याचा सुलक्षणी शुभ्र पांचजन्य शंख होता. डाव्या हातात त्यानं लांब देठाचं काषायवर्णाचं टवटवीत कमलपुष्प घेतलं होतं. तीन तपांपूर्वीच्या या वेषात आज त्यानं दोनच नव्या गोष्टींची भर घातली होती. त्यानं आज उठल्या–उठल्या मनःपूर्वक घुमविलेली रंगीत वेळूची लांब मुरली कमरेलगत पीतांबरात खोचली होती. त्याच्या उजव्या हातात गोकूळ सोडताना त्याच्या चित्रसेन आजोबांनी दिलेलं अभिरभानू वंशाचं प्रतीक असलेलं चांदीचं कडं होतं!

खरोखरच दृष्ट लागावी असंच त्याचं रूपसौंदर्य होतं – अगदी आजही. आजही तो नाव सार्थक करणारा – आकर्षून टाकणारा ‘कृष्ण’ च होता – श्रीनं युक्त ‘श्रीकृष्ण’ च होता!

मी बघतच राहिलेलं ध्यानात येताच तो म्हणाला, ‘निघायचं? तर मग चल. आजचा दिवस तुझा आहे. आज ज्या या श्रीसोपानाविषयी तू मला सतत विचारत आला आहेस, त्याची तुला संपूर्ण माहिती देतो.” माझ्यासह तो श्रीसोपानाच्या प्रथम पायदंडीपर्यंत आला. क्षणैक थांबून त्यानं आपले मत्स्यनेत्र मिटते घेतले. कसलंतरी मनोमन स्मरण केलं. मग म्हणाला, “या श्रीसोपानाची ही प्रथम पायदंडी आहे, ती कंसाच्या कारागृहात नवजात सहा पुत्रांच्या निर्मम हत्येच्या मरणयातना सोसणाऱ्या माझ्या जन्मदात्री मातेच्या देवकीमातेच्या नावाची!” तीवर तो क्षणैक थांबला.

“दुसरी आहे, ती माझ्या प्रिय पत्नीच्या – रुक्मिणीच्या – द्वारकेच्या लक्ष्मीच्या नावाची! तिसरी आहे, ती माझ्या जन्मदात्या बाबांच्या नावाची – द्वारकाधीश महाराजाधिराज वसुदेवबाबांच्या नावाची.” तो एकेक करीत पहिल्या दोन पायदंड्या उतरलाही. तिसरीवर क्षणैक थांबला. त्याच्यासह मीही थांबलो. चौथीकडे बघत तो म्हणाला, “ही चौथी पायदंडी कुणाच्या नावाची आहे, हे मी तुला सांगणार नाही. तुझं

तूच ते ओळखायचं आहे." क्षणभर थांबून आम्ही खाली उतरलो. पाचव्या पायदंडीवर उभं राहून तो म्हणाला, "ही आहे, माझ्या ब्रम्हाविद्येच्या गुरूंच्या नावाची – घोर आंगिरसांची." सहा आणि सातवीकडे बघत तो म्हणाला, "या दोन आहेत माझ्या जलबंधूंच्या नावाच्या. पहिली गांगेय पितामह भीष्मांची – नंतरची प्रथम कौंतेय, राधेय दानवीराची." त्याही तीन पायदंड्या उतरून आम्ही खाली गेलो. आता आम्ही आठवीवर आलो होतो. तिथे थांबून तो म्हणाला, "तुला माहीतच आहे, मला जन्मामुळे आठ हा अंक प्रिय आहे. ही आहे, माझा प्रिय सखा अर्जुनाच्या नावाची." आम्ही दोघेही त्या आठव्या पायदंडीवर कितीतरी वेळ उभे राहिलो. हसून तो म्हणाला, "लौकिकासाठी ही पायदंडी आठवी आहे. मानली तर पहिली, नाहीतर अखेरचीच आहे." ते ऐकून मी घोटाळ्यात पडलो. समोरच्याला घोटाळ्यात पाडणं, हा तर त्याचा स्वभावच होता. मला तर तो सतत घोटाळ्यातच पाडत आला होता. मग क्रमश: बलभद्रदादा, राहिलेलं सर्व पांडव, आमचा सर्वांचा प्रिय भाचा अभिमन्यू यशोदामाता, नंदबाबा, रोहिणीमाता, कुंतीमाता, सखी राधिका, द्रौपदी, सुभद्रा, रेवतीवहिनी!

नंतर होत्या दादाच्या सर्व राण्या, माझ्या इतर वहिनी! त्याही जांबवती, सत्यभामा, कालिंदी, लक्ष्मणा, भद्रा, मित्रविंदा, सत्यावहिनी अशा क्रमानं!

नंतर होत्या कौरवमाता गांधारीदेवी!

नंतर होती कन्या चारुमती!

नंतरच्या पायदंड्या होत्या – दादाचे सखे महात्मा विदुर, सुमित्र सुदामा, दारुक, संजय, सात्यकी अशा!

एव्हाना आम्ही अर्धाअधिक श्रीसोपान उतरून आलो होतो. पहिल्या दोन पायदंड्यांनंतरच मी घोटाळत चाललो होतो. मी विचार करीत होतो, दादा आपल्या आचार्य सांदीपनींना विसरला की काय?

आता तो एकेक सुहृद स्त्री–पुरुषंचं नाव घेत, आपलं पाऊल उतरू लागला. मीही त्याच्यासमवेत उतरू लागलो. सुहृद म्हणून त्यानं पहिलं नाव घेतलं, ते माझ्या पित्याचं – देवभागबाबांचं. मग घेतलं, गोकूळच्या चित्रसेन आजोबांचं. नंतर घेतलं, कौरव विकर्णाचं! मग माझ्या कंसामातेचं. नंतर विराट, द्रुपद, धृष्टद्युम्न, द्रोण, कृप, धौम्य, गर्ग, विश्वकर्मा, मय अशी भराभर नावं घेत तो श्रीसोपान भराभर उतरत चालला. सुहृद स्त्री–पुरुषंत सर्वांत शेवटी त्यानं कुब्जेचंही नाव घेतलं.

आपल्या सप्तपत्नींच्या प्रथम सप्तपुत्रांची नावं घ्यायलाही तो विसरला नाही. पण त्यांच्यापूर्वी त्यानं नाव घेतलं, ते नातू अनिरुद्धाचं. नंतर होती ती नावं प्रद्युम्न, भानू, संग्रामजित, वृक, वीर, श्रुत, प्रघोष आणि पणतू वज्र अशी!

यात यादवांचा विनाश ओढविणाऱ्या जांबवतीवहिनींच्या पुत्राचं – सांबाचं नाव नव्हतं. ते होतं, दादाला जीवनभर नडलेल्या कुपुरुषत! होऽय! अशा उन्मत्त, अरेराव, अत्याचारींचं स्मरण ठेवायलाही तो विसरला नव्हता!!

अशांच्या क्रमांकात सर्वप्रथम होता कंस. त्यानंतर शृगाल, नरकासुर, कालयवन, जरासंध, शिशुपाल, दंतवक्र, विदुरथ, पौंड्रक वासुदेव, शाल्व, दुर्योधन, धृतराष्ट्र आणि दादाचा पुत्र आणि माझा पुतण्या सांब, कृतवर्मा आणि शकुनी!

आता श्रीसोपानाची अखेरची एकच पायदंडी उरली होती. न राहवून मी दादाला विचारलं, "तू आपल्या परमवंदनीय आचार्य सांदीपनींना आणि गुरुपुत्र अश्र्वत्थाम्याला

कसा काय विसरलास दादा?" तसं माझ्याकडे बघून हसत तो म्हणाला, "उधो – अवधूता, त्यांचं विस्मरण मला कधीतरी होणं शक्य आहे काय? आपण उभे आहोत ती – ती ही अखेरची पायदंडी आहे, ती मला सुष्ट-दुष्ट जसा काही मी असेन तसा घडविणाऱ्या माझ्या वंदनीय आचार्य सांदीपनींच्या स्मरणाची! बंधो, कुठलाही पुरुष असो; तो एकदा नव्हे, दोनदा जन्म घेतो. दैहिक अर्थानं मातेच्या कुशीतून सर्वप्रथम आणि लौकिक अर्थानं विचार-सुविचारांच्या, संस्कारांच्या टाकीचे घाव घालून त्याला गुरूनं पूर्णत: माणूस घडविल्यानंतर! कुठल्याही जिवाचा जीवनसोपान या दोन पायदंड्यांतच मर्यादित झालेला असत नाही काय?"

त्याच्या स्पष्टीकरणानं मी विचारात पडलो. मला तिथे अधिक काळ अडकवून न ठेवता त्यानं लगेच प्रश्न केला, "माझ्या परमसख्या अवधूता, बंधो उद्धवा – उधो, आता तूच मला सांग, ज्या क्रमांक चारच्या पायदंडीवर मी कुणाचंच नाव घेतलं नाही, ती कुणाच्या नावाची आहे?"

"माझ्या!" मी पटकन उत्तरलो. मग आम्ही खळखळून हसलो. अंकपाद आश्रमात असताना अनेक वेळा हसत होतो, तसे. शेवटचा प्रश्न मी विचारला, " – आणि अश्वत्थाम्याचं काय?" तो नित्याचं अरागस हसून उत्तरला, "तो चिरंजीव आहे! मानवी वेदनांच्या रूपात!" क्षणभर थांबून, मागे वळून काहीही न बोलता सोपानाकडे पुढा करून दादा निश्र्चल उभा राहिला. ज्याचं दर्शन घेऊन अवघे स्त्री–पुरुष, बालक धन्य होत होते, त्या श्रीसोपानालाही त्यानं हात जोडले.

आम्ही द्वारकेच्या सुसज्ज अश्वशालेच्या रोखानं आता चालू लागलो – भालका तीर्थाकडे जाण्यासाठी! मी सहज उजव्या हातीच्या रुक्मिणीवहिनींच्या निवासाकडे दृष्टी टाकली. निवासाच्या सौधाच्या पहिल्याच गवाक्षात एकट्या रुक्मिणीवहिनी उभ्या असलेल्या मला स्पष्ट दिसल्या. त्या आमच्याकडेच एकटक बघत होत्या. त्यांना नेत्रांनीच वंदन करून मी हसलो. तसं त्यांच्या मुखावरही अस्पष्ट स्मित तरकलेलं दिसलं. नक्कीच त्या नेहमी बोलत आल्या त्या विचारात असाव्यात की, 'श्रींना तुमच्या खांद्यावर हात ठेवून असं चालताना पाहिलं की, त्यांचा आकाशरंगी आजानुबाहू तुमच्या कोकमवर्णी खांद्यावर किती–किती शोभून दिसतो! बघतच राहावासा वाटतो. कसा दिसतो, ते मात्र नाही सांगता येत!'

नेहमी काही मी दादाला गवाक्षात रुक्मिणीवहिनी आहेत, याचा माग लागू देत नसे. आज मात्र थांबून त्याला म्हणालो, "एक वेळ श्रीसोपानाला तू दर्शन दिलं नसतंस, तरी चाललं असतं. पण उजव्या हातीच्या रुक्मिणीवहिनींच्या सौधावरील गवाक्षाला तू आज ते द्यावं, असं मला वाटतं." कसल्यातरी तंद्रीतून जागं झाल्यासारखा त्यानं थांबून त्या गवाक्षाकडे कटाक्ष टाकला. रुक्मिणीवहिनी आणि दादा यांची क्षणैक दृष्टिभेट झाली मात्र, त्या गडबडल्या. हा असा अनुभव त्यांना पहिल्यानंच आला होता. त्या लगबगीनं गवाक्षाआड झाल्याही! दादा माझ्या खांद्यावरचा गुलाबी तळहात हलकेच थोपटत म्हणालाही – "मनकवडा आहेस, म्हणून तर तुला मी अवधूत म्हणतो!"

अश्वशाला आली तसं दारुक नसल्यामुळे समोरच अनेक रथांत स्पष्ट उठून दिसणाऱ्या सुसज्ज गरुडध्वजाचा रथनीड घेण्यासाठी मी पुढे जाऊ लागलो. ते ओळखून आपल्या हातानं माझ्या खांदा घट्ट दाबून दादानं मला जागीच थोपटलं. तो हसून म्हणाला, "अंहं – आजचा दिवस तुझा आहे. रथनीड मी घेणार. माझ्या अश्वमित्रांशी

बोलत, मी तुझं आज सारथ्य करणार. तुझी सेवा करणार – अगदी अर्जुनासारखी! त्याच्यापेक्षा तू भाग्यवान आहेस. कुरुक्षेत्रावर त्याच्या नंदिघोषाला एक रणनीती म्हणून मी माझ्या रथाचे केवळ माझे प्रिय अश्वच जोडले होते. तुझ्या सेवेसाठी आज सुवर्णी गरुडचिन्हांकित कदंबपुष्पमालांनी सजविलेला सालंकृत रथच साक्षात आहे. माझ्याकडे नीट बघ, तुझं सारथ्य करण्यासाठीच तर मी हा वेष धारण केला आहे.”

मी विचारात पडलो. तेवढ्यात झपाझप चालत एका झेपेतच त्यानं गरुडध्वज रथातला रथनीड घेतलाही. तसं सकाळपासून मलूल दिसणाऱ्या रथाच्या चारही अश्वांनी एकापेक्षा एक चढीनं खिंकाळत, पुढचे आठही खूर उचलून त्याला आपल्या प्रतिक्रियेचं अश्ववंदन दिलं. हसतच त्यानं गरुडध्वजाचे आठही सुवर्णकाठी वेग मुठीत बळकट आवळून ‘मेघा, बला, शैब्या, सुग्रीवा’ असं आपल्या तिसऱ्या पिढीच्या स्नेह्यांना प्रेमानं सादवीत ‘झ्याऽ’ म्हटलं. जागीच गिरकी घेऊन सुज्ञासारखा त्या जनावरांनी रथ अश्वशालेबाहेर घेतला.

द्वारकेच्या राजमार्गावरून गरुडध्वज पक्षिराज गरुडाच्या डौलात शुद्धाक्ष महाद्वाराच्या दिशेनं धावू लागला. दोन प्रहर असल्यामुळे राजमार्गावर फारशी वर्दळ नव्हती. वेगवेगळ्या शालांतील सेवक, उतारवयाचे काही चुकार यादवसैनिक गरुडध्वज बघून आदरानं थांबत होते. रथनीडावर सारथ्याच्या रणवेषातील साक्षात दादा आहे, हे फारसं कुणाच्या लक्षात येत नव्हतं! ज्या एखाद्याच्या ते ध्यानी येत होतं, तो आश्चर्यानं जागीच खिळून रथ दृष्टिआड होईपर्यंत बघतच राहत होता. आम्ही द्वारकेच्या पूर्वेचं प्रमुख शुद्धाक्ष महाद्वारं पार करून, बळकट पळ्यांच्या आधारे, मी निवडलेल्या भव्य नौकेत रथासह उतरलो. नौका पश्चिम सागरातील भृगुकच्छाची खाडी पार करू लागली. अथांग परसलेल्या जलतत्त्वावरून जलपुरुष ‘पैलतीरा’ कडे चालला. दूरवर जाणाऱ्या अठराकुलीन यादवांच्या सुवर्णी द्वारकेचं डोळाभर दर्शन यादवश्रेष्ठ घेत होता. पैलतीर जवळ येऊ लागला, तसं दोन्ही हात जोडून लाटांवर हिंदकळणाऱ्या पिवळ्याधमक प्रतिबिंबासह आपल्या प्रिय राजनगर द्वारकेला वंदन करून दादा पुटपुटला, “जलदेवता: पुनातु माम् – अर्पणमस्तु!” त्याच्यासारखंच मीही द्वारकेला वंदन केलं. धीवरांनी घातलेल्या नौका आणि भूमीला जोडणाऱ्या फळ्यांवरून दादानं कौशल्यानं गरुडध्वज नौकेत घेतला होता. तो सौराष्ट्राच्या पैलतीरावर नेला. कंठातील अनेकांपैकी एक मौक्तिकमाला काढून ती धीवरप्रमुखाच्या ओंजळीत ठेवून तो त्याला म्हणाला, “जै इडादेवी!” धीवरप्रमुखानं आणि त्याच्या साहाय्यकांनी दादाला ‘जै इडा’ म्हणत दंडवत घातले. दादानं कटीच्या पीतांबरात खोचलेलं लांब देठाचं काषायवर्णी कमलपुष्प माझ्या हातात दिलं. आपला उजवा हात उंचावून, त्यानं धीवरांना मूकपणे आशीर्वादांसह निरोप दिला.

आमचा प्रिय गरुडध्वज सोमनाथाच्या दिशेनं धावू लागला. योजनांमागे योजनं मागे टाकत आम्ही प्रथम सोमनाथाच्या पाषाणाच्या छोट्या शिवालयात आलो. आम्हाला बघताच शिवालयाच्या शिवभक्त पुजाऱ्यानं काहीही न सांगताच, सोमनाथाच्या अभिषेकाची सिद्धता केली. देवालयाच्या गर्भागारातील सुघड पाषाणी पिंडीच्या शाळुंकेजवळ मांडलेल्या कुसरदार शिसमी चौरंगावर दादा बसला. त्याच्या डाव्या हाताशी दुसऱ्या चौरंगावर मी बसलो. समोरच्या वज्रलेपी शिवपिंडीवर हाती घेतलेलं पहिलं बिल्वपत्र वाहण्यापूर्वी दादा मला म्हणाला, “अवधूता, आजचा दिवस

तुझा आहे! तुझ्या तोंडून मला शिवस्तुती ऐकण्याची इच्छा आहे. मला आहे तशीच शिवालाही आहे – म्हण!”

मी हात जोडून डोळे मिटले. माझ्या मुखातून अभिषेकधारेसारखं शिवस्तवन स्त्रवू लागलं —

“पशूनां पतिं पापनाशं परेशं, गजेंद्रस्य कृतिं, वसानं वरेण्यम्।
जटाजूटमध्ये स्फुरद्गांवारिं, महादेवमेकं स्मरामि स्मरारिम्।
शिवाकांत शंभो शशांकार्धमौले, महेशान शूलिन् जटाजूटधारिन्।
त्वमेको जगद्व्यापको विश्वरूप, प्रसीद प्रभो पूर्णरूप।।
अजं शाश्वतं कारणं कारणानां, शिवं केवलं भासकं भासकानाम्।
तुरीयं तम: पारमाद्यंतहीनं, प्रपद्ये परं पावनं द्वैतहीनम्।।
नमस्ते नमस्ते विभो विश्वमूर्ते, नमस्ते नमस्ते चिदानंदमूर्ते।
नमस्ते नमस्ते तपोयोगगम्य, नमस्ते नमस्ते श्रुतिज्ञानगम्य।।
प्रभो शूलपाणे विभो विश्वनाथ, महादेव शंभो महेश त्रिनेत्र —
त्वय्येव गच्छति लयं जगदेतदीश, लिंगात्मकं हर चराचर विश्वरूपिन्।। —
प्रसीद प्रसीद प्रभो विश्वरूप, प्रसीद प्रसीद शिवं पूर्णरूप।।”

पुजाऱ्यानं दिलेला तीर्थप्रसाद ओठांआड करून आम्ही सोमनाथाच्या शिवालयाबाहेर पडलो. दादानं पुन्हा गरुडध्वजाच्या रथनीडाची जागा घेतली. मी पाठीमागच्या घेरात त्यानं न सांगताच आरूढ झालो. अगदी छोटं ‘वेरावळ’ नावाचं ग्राम आलं. हातचे आठही वेग सावरून दादा आपल्या अश्व स्नेह्यांशी त्यांच्या अश्वबोलीत बोलत, प्रतोद त्यांच्या पाठीला न लावता हवेत फटकारत रथ हाकारीतच होता.

भालका तीर्थाजवळचं घनदाट अरण्य आलं. दादानं रथ थांबविला. हातातील वेग रथनीडावर ठेवले. एका झेपेतच तो भालका तीर्थाजवळच्या आनर्ताच्या भूमीवर उतरला. मीही पाठीमागच्या घेरातून उतरलो. माझ्या अंगावरच्या भगव्या वस्त्रांना शोभेल असं काषायकमल त्यानं दिलं होतं. तेही मी स्वहस्तेच त्याच्या पीतांबरात कटीजवळ खोचलं.

कधी नव्हे, ते दृश्य मला बघायला मिळालं. प्रथम त्यानं डाव्या बाजूच्या दोन अश्वांच्या खुब्यांवर प्रेमानं थोपटलं. त्यांच्या पाठीवर आपला नीलवर्णी आजानुबाहू मायेनं फिरविला. ते दोन्हीही अश्व त्याच्या स्पर्शाला प्रतिसाद देत अंग थरकावीत खिंकाळले. दादा त्यांच्यासमोर गेला. त्या दोन्ही अश्वांची दाट आयाळ त्यानं घुसळून टाकली. जसं तो अर्जुनाला गळ्यात गळा घालून दृढालिंगन देत होता, तसं अगदी डाव्या बाजूच्या सुग्रीव अश्रवाच्या पुष्ट मानेला आपल्या नीलवर्णी आजानुबाहूची मिठी घालून, म्हटलं तर त्याच्याशी, म्हटलं तर स्वत:शी असं पुटपुटला – “अरे होऽ अरे होऽ खूप सेवा केलीस!” तसाच पुढे झाला. दुसऱ्या अश्र्वचीही आयाळ घुसळून त्याच्या मानेला मिठी भरत म्हणाला, “शैब्याऽ मित्राऽ तुला पंचनदाची – चंद्रभागेची आठवण होते, जाणतो मी. शांत हो.” एक पाऊल पुढे होत तो अश्व ‘बला’ समोर आला. त्याच्या लांबट जबड्याला आपलं शुभ्र दाढीधारी मुखमंडल भिडवून म्हणाला, “बलाऽ मला मान्य आहे रे, माझ्या दाढीपेक्षा तुझा वर्ण धवल आहे.” त्या अश्र्वानंही ते जणूकाही समजलंच अशा प्रतिसादानं, दादाचं दरदरीत धारदार नीलवर्णी नाक व डोळ्यांखालचा

भाग जिभेनं चक्क चाटला. शेवटी दादा उजव्या बाजूच्या पहिल्या अश्वासमोर आला. त्याचीही आयाळ घुसळून डाव्या हातानं त्याची पाठ प्रेमानं थोपटत त्याच्याशी बोलला, “मेघा, पांढरेशुभ्र ढगसुद्धा हिमशिखराला तटून थांबतात. तू मात्र एकदा रथनीडाचं जू घेतलं की कधीच थांबला नाहीस.” मेघपुष्प प्रतिसाद देत फुरफुरला. आता दादानं पुऱ्या गरुडध्वजाला शांत चालीनं निरखत एक मंडल घेतलं. पुन्हा तो अश्वांसमोर आला. माझ्याकडून रथाच्या घेरातील गदा घेऊन ती आपल्या स्कंधावर घेतली. आपल्या प्रिय रथाच्या ध्वजदंडाकडे त्याने बघितलं. त्यावरील फरफरणाऱ्या केशरी वस्त्रावरील उड्डाणाच्या पवित्र्यात असलेल्या यादवांच्या गरुडाच्या मानध्वजाकडे एकटक पाहिलं. तो ध्वज आनर्ताच्या पश्चिम सागरावरून आलेल्या वाऱ्यावर अखंड फडफडत होता.

“चल, यांच्या खराऱ्यासाठी लागणाऱ्या काटेरी रानवेली घेऊन येऊ.” असं म्हणत कंठातली टवटवीत वैजयंतीमाला उजव्या मुठीत हलकेच धरून तो समोरच्या घनदाट अरण्यात शिरला. त्याच्या मागून मीही गेलो. जवळच असलेल्या एका डेरेदार वटवृक्षाच्या शीतल छायेत आम्ही आलो. दादानं मला अनेकवेळा सांगितलेल्या गोकुळातील भांडीर वृक्षासारखाच हा वटवृक्ष कितीतरी फांद्यांचा, पारंब्यांचा, पर्णांचा आणि विशाल होता. इथून आमचा रथही स्पष्ट दिसत होता. आतून, अगदी आतून मला प्रकर्षानं जाणवलं की, हाच तो समय होता, जेव्हा त्याला गेली तीन तपं माझ्या मनात रेंगाळणारा, मला सतत छळणारा एक महत्त्वाचा प्रश्न विचारायलाच पाहिजे होता.

उबळीसारखा पुढे होत मी त्याचा हात हाती धरून त्याला थांबवीत म्हटलं, “दादा, तू काहीही म्हण, पण माझ्यापेक्षा – माझ्यापेक्षा अर्जुनच तुझा प्रिय परमसखा आहे हे नक्की! तसं नसतं, तर गेली तीन तपं तू माझ्याकडून सर्व प्रकारची केवळ सेवा करून घेतलीस. पण – पण – ” कसं बोलावं म्हणून मी थांबलो.

“पण काय? बोल बंधो उधो, नि:संकोच बोल.” दादा म्हणाला.

“तसं नसतं, तर जसा तू अर्जुनाला युद्धापूर्वी कुरुक्षेत्रावर जीवनोपदेश केलास, ज्याला सगळेच आता ‘गीता’ म्हणतात, तसं मला काहीतरी सांगितलं असतंस! त्यासाठी मला योग्य मानलं असतंस. तुझा परमप्रिय सखा अर्जुनच! मी नव्हे, मी काय एक परम सेवकच!” मी संकोचून मान खाली घालून त्याच्यासमोर उभा राहिलो. हे एवढं स्पष्ट मी त्याच्यासमोर यापूर्वी कधीच बोललो नव्हतो.

आपला हात माझ्या हातून सोडवून घेत, त्यानं माझे खांदे अतीव प्रेमानं थोपटले. त्या स्पर्शात कितीतरी माया ओथंबलेली मला स्पष्ट जाणवली. हसून तो म्हणाला, “तसं काही नाही उद्धवा, वेडा आहेस तू. अर्जुन किती झालं तरी माझा सखा आहे – आतेबंधू आहे. तो माझा कुरुक्षेत्रावरच्या युद्धातील लौकिकाचा विश्वस्त होता. तू माझा चुलतबंधू आहेस – परमसखा आहेस – पारलौकिकाचा एकमेव भावविश्वस्त आहेस. तुला ऐकायचंच आहे म्हणून सांगतो, ऐक – ” त्यानं इकडे-तिकडे बघून बसण्यासाठी एक शीसवर्णाचा शिलारसी पाषाणखंड निवडला. त्याला टेकून गदा ठेवली. पाषाणावरची धूळ आपल्या केशरी उत्तरीयानं झटकून, तो त्यावर बसला. मला चांगलं माहीत होतं की, आयुष्यात तो कधीच कुठल्याही राजसिंहासनावर बसला नव्हता. आज मला तो बसला होता तो शिलारसी पाषाणखंडच इंद्रप्रस्थाच्या, हस्तिनापूरच्या, द्वारकेच्या, इतकंच काय; कुठल्याही राजसिंहासनाहून सुवर्णी वाटला. मी त्याच्या चरणांजवळ भुईवरच बसलो.

तो बोलू लागला, मी ऐकू लागलो. त्यानं विचारलं, "तुझं नाव काय?"

"उद्धव." मी गोंधळलो. उत्तर देऊन प्राण कानात एकवटून ऐकू लागलो.

त्यानं पुन्हा विचारलं, "उद्धव म्हणजे काय?"

"उद्धव म्हणजे उत्–धव – वर जाण्याची इच्छा बाळगणारा जीव." मी उत्तरलो.

तो हसला. त्यानं पुन्हा विचारलं, "जीव म्हणजे काय?"

"जीव म्हणजे असण्याची जाणीव." मी उत्तरलो.

माझ्याकडे एकटक बघत तो म्हणाला, "आता असं कर, तुला 'उद्धव' हे नाव नाहीच अशी कल्पना कर."

"केली." मी चौकस झालो.

तो पुन्हा म्हणाला, "तुझा नाव नसलेला जीव आता आहे की नाही?"

"आहे." मी सावधपणे त्याचा शब्दन्शब्द ऐकू लागलो.

माझ्याकडे एकटक बघत त्यानं विचारलं, "तो जीव कुठे बसला आहे? कशावर? कशाखाली?"

"तुझ्यासमोर. आनर्ताच्या सौराष्ट्रातील भूमीवर. निळया आभालाखालच्या डेरेदार वटवृक्षाखाली."

"ठीक. हे सौराष्ट्र, आभाळ, वृक्ष, मी – या सर्वाला काय म्हणतात?"

"सृष्टी!" मी उत्तरलो.

"या सृष्टीची उत्पत्ती कशातून होते, माहीत आहे?"

"पंचमहाभूतांतून – आणि अशाच नित्य नव्या जाणवत राहणाऱ्या मूलतत्त्वांतून."

"बरोबर चालला आहेस. ही पंचमहाभूतात्मक सृष्टी निर्माण होते, ती परमात्म्याच्या तामस अहंकारापासून."

"परमात्मा म्हणजे काय?" मी अतीव उत्कंठेनं त्याला प्रश्न घातला.

तो म्हणाला, "अचूक नि छान प्रश्न विचारलास तू. मी, तू, माझ्या पीतांबरावर चढलेले पाहतो आहेस ते कीटक, आपापल्या परिमाणात – आयामात – जगत असतो. जिवासाठी ही परिमाणं तीन आहेत – वस्तुभार, अंतर आणि वेळ. वेळालाच 'काळ' हे दुसरं संबोधन आहे. तू म्हणालास ती सर्व सजीव आणि निर्जीव सृष्टी या तीन परिमाणांत वावरते."

"तू मद्या म्हणालास, तो परमात्म्याच्या अहंकाराचा विषय तसाच राहिला. तो तामस हा एकच आहे काय?" तो बोलत जाणार होता, ते-ते समजून घेण्यासाठी जिथे बुद्धी थांबत होती, तिथे वेळेच समजून घेणं मला आवश्यक वाटत होतं.

"नाही, तामस हा एकच अहंकार नाही. आणखीही दोन आहेत. राजस आणि सात्त्विक असे! ते समजून घेण्यापूर्वी अहंकार म्हणजे काय, तेही नीट समजून घे. तू मद्याशी म्हणालास, मी जिवंत आहे – म्हणजे असण्याची जाणीव म्हणजे जीव. तशीच परमात्म्याला त्याच्या असण्याची जाणीव असणे, म्हणजे अहंकार. 'अहंकार' म्हणजे गर्व किंवा अहंभाव नव्हे. अहंकार म्हणजे 'मी आहे' याचे सुजाण भान! ते जसे तुला आहे, तसेच परमात्म्यालाही आहे. तुझा, माझा प्रत्येकाचा जीव हा परमात्म्याचा अंशमात्र आहे. म्हणूनच तो परमात्मा म्हणजे काय, हे नीट समजून घेणं अगत्याचं व आवश्यक आहे. त्यानं तुला समजून न घेण्यामुळे त्याचं काही बिघडत नाही. तू मात्र त्याला समजून घेतलं नाहीस, तर तुझं सर्वच बिघडतं."

मला पटत चाललं की, तो मला त्याच्या विशेष भावविश्वात खोलवर घेऊन चालला आहे. त्यानं परमात्म्याच्या राजस आणि सात्त्विक अहंकाराचा नुसता निर्देश केला होता, म्हणून मी त्याला विचारलं, “परमात्म्याच्या तामस अहंकारापासून पंचमहाभूतात्मक सृष्टी निर्माण झाली, तसं त्याच्या राजस अहंकारापासून काय निर्माण झालं?”

“राजसापासून सर्व विकार उत्पन्न झाले. विकार इंद्रियांना बांधलेले आहेत. मानवाची ही इंद्रियं दहा आहेत – कान, त्वचा, नाक, डोळे, हात, पाय, वाणी, जिव्हा, गुद आणि शिश्न.”

“सात्त्विकापासून काय निर्माण झालं?”

“सात्त्विकापासून निर्माण झालं, ते मन! या वरच्या वटवृक्षाला जशा अनंत फांधा, पारंब्या आणि पानं आहेत; तसंच मानवाचं मन आहे, अनेक पैलूंचं. मनाची देवता आहे चंद्र!”

आता तो रंगत चालला, सुधर्मा सभेत त्याला ज्यांनी-ज्यांनी ऐकलं होतं, त्यांना तोच हा श्रीकृष्ण – कृष्ण हे सांगूनही पटलं नसतं. ते पटलं असतं, एकट्या कुरुक्षेत्रावर युद्धारंभी शर–चाप त्यागून हताश, किंकर्तव्य आणि निष्प्रभ झालेल्या केवळ अर्जुनाला! त्यानं फुलत्या मनानं बोलावं, म्हणून मी विचारलं, “विकार हे ओज, बल किंवा वीर्यशक्तीला बांधलेले आहेत. मग त्यांची देवता कोणती?”

“त्यांची देवता सूर्य. म्हणूनच आकाश ढगाळून सूर्य झाकला गेला की, मानवाचं शरीर प्रथम मलूल होतं, निरुत्साही होतं, मरगळतं आणि मग मनही मलूल, निरुत्साही होतं, आता क्रमश: ध्यानी धे - तामसापासून अज्ञान निर्माण होतं, राजसापासून विकार निर्माण होतात आणि सात्त्विकापासून मन निर्माण होतं. स्त्री -पुरुष जिवांचा जीवनभर आटापिटा चाललेला असतो, तो हे मन समजून घेण्यासाठीच! त्या मनाच्या पलीकडे आहे, ती बुद्धी. बुद्धीच्याही पलीकडे आहे, तो प्राण किंवा आत्मा.”

मला अजून काही गोष्टी स्पष्ट करून घ्यायच्या होत्या. म्हणून म्हणालो, “तू सांगितलेली तीन परिमाणं समजली - वस्तुभार, अंतर व वेळ ही! तू सांगितलेले तीन भाव ध्यानी आले - तम, रज आणि सत्त्व. तू सांगितलेली मन, बुद्धी, प्राण ही तीन तत्त्वं आता ध्यानी येताहेत. मात्र तू म्हणालास, ते परमात्मा प्रकरण अदघाप माझ्या नीट ध्यानी येत नाही.”

माझ्याकडे बघून तो कितीतरी गोड हसला. हे त्याचे हसणे मी पूर्वी कधीच पाहिले नव्हते. म्हणाला, “सांगतो, सोप्यात सोपं करून सांगतो. कारण आजचा दिवस तुझा आहे आणि तू माझा परमसखा, भावविश्वस्त चुलतबंधू अवधूत आहेस. ध्यानपूर्वक ऐक. परमात्मा ही कसलीही केवळ संकल्पना नाही. तू रोज उगविणारा सूर्य बघतोस, तेवढं ते सत्य आहे. भोवतीची सृष्टी, अनंत आकाश, त्याच्या पलीकडे असलेलं अवकाश यामध्ये विश्वकिरणांच्या रूपानं अरोध आणि अखंड संचार करीत असते ती भाररहित तेजशक्ती म्हणजे परमात्मा. तो चिरंतन आहे, अजर आणि अमर आहे. अखंड काळाला हाताशी धरून ती तेजशक्ती नित्य काही ना काही घडवीत - बिघडवीत असते! ती सर्वांचं नियमन करीत असते.”

आता तो सर्वांहून मला वेगळा का वाटत आला होता, याची खूणगाठ पटत चालली. त्यानं बाहुत स्वच्छ, स्पष्ट बोलावं म्हणून मी विचारलं, “मग त्या परमात्मशक्तीवर सर्व भार टाकून माणसानं स्वस्थ बसलं पाहिजे, असाच या सर्वांचा अर्थ आहे ना?”

कधी-कधी सुधर्मा सभेत बोलताना त्याची मान नागफण्यासारखी ताठ होत असे. तशी करीत तो म्हणाला, “मुळीच नाही. इथंच पिढ्यापिढ्यांची चूक होते. मी सांगितलेलं सत्य तू अर्धसत्याच्या अर्थानं बघतो आहेस. एकाच दिशेनं व अर्थानं सोयीचं करून घेतो आहेस. त्या विराट परमात्म्याचा अंशच प्रत्येकाच्या ठायी जीव म्हणून वावरतो आहे आणि जीव म्हणजे अस्तित्वाची - असण्याची जाणीव असं तूच म्हणालास. त्या जाणिवेचा रात्रंदिन सर्वांगीण शोध घेणं म्हणजेच जीवन!”

मी त्याच्याकडे एकटक बघत राहिलो. त्याच्या काळ्याभोर डोळ्यांचा थांग काही लागता लागत नव्हता. म्हणूनच तो बोलतच राहावा यासाठी मी विचारलं, “तो शोध लागल्यामुळे असं काय मोठं होतं?”

***

तो म्हणाला, ” परमात्म्याशी असलेल्या आपल्या जिवाच्या संबंधाच्या जाणिवेचा शोध एकदा लागला की, मऊ वस्त्राचं ठाण उलगडत जावं, तसं अवघं जीवन उलगडत जातं. केवळ आपलंच नव्हे; भोवतीच्या सर्व सजीव-निर्जीव यांचं, दृश्य-अदृश्य सृष्टीचं, दूरवर पसरलेल्या आकाशाचं, त्यापलीकडच्या अवकाशाचं आणि या सर्वांत वावरणाऱ्या त्या अरोध वजनरहित तेजशक्तीचं तर न संपणारं जान होत जातं.”

“त्या ज्ञानाला काय म्हणायचं?”

“प्रज्ञान. ज्ञान-विज्ञान याच्या पलीकडची ती स्थिती आहे. अविद्या-विद्या यांच्या पलीकडचं ते प्रविद्येचं क्षेत्र आहे.”

“ते क्षेत्र समजण्यासाठी, तो शोध घेण्यासाठी नेमका मार्ग कोणता?'' मी आता अपार कुतूहलानं विचारलं.”

“संपूर्ण समर्पित भक्तिभाव आणि सर्व जिवांवर निरपेक्ष प्रेम हाच!’ काही क्षणांपूर्वी त्याला आपल्या रथाच्या अश्वांना आलिंगनात घेताना मी पाहिलं होतं, ती त्याची कृती, त्याची ती ‘अश्वगीता’ आता मला काहीशी उलगडत चालली.

“तू सांगितलेल्या गीतेमुळे व ती ऐकण्याची संधी मिळाल्यामुळे तुला सर्व जण ‘नारायण’ म्हणतात आणि अर्जुनाला ‘नर’ म्हणतात. या नर-नारायणाविषयी मला काही सांगशील”

“नार म्हणजे पाणी-उदक-जल. अयन म्हणजे वसतिस्थान! मी जीवनभर जलाकाठीच राहिलो. तुला आठवत असेल, गुरुवर्य सांदीपनींनी आपल्याला सांगितलेला जलाचा अर्थ - ‘जायते यस्मात् च लीयते यस्मिन् इति जल:’ - कुठल्याही प्राणिमात्राचा जीव, वृक्षवल्लरींचा जीव जलावरच अवलंबून आहे. ‘जल’ जसं सतत समपातळी गाठतं, तसाच जिवाचाही मूळ भाव आहे. तो जाणून घेणं म्हणजेच जीवन!”

“तू उभारलेल्या श्रीसोपानात गंगापुत्र पितामह आणि प्रथम कौंतेय दानवीर कर्ण यांच्या स्मरणाच्या पायदंड्या इतक्या वर कशा, हे आता माझ्या ध्यानी येतं आहे. त्यांनी सतत तुझ्याशी समतल होण्याचा जीवनभर आटोकाट यत्न केला. तू ते पूर्ण जाणून होतास. त्या दोघांच्याहून दशांगुळं सतत उंचच राहिलास. म्हणून तर पितामहांनी सर्वांत प्रथम तुला ‘वासुदेव’ म्हटलं - नारायण मानलं. कर्णानंही तुझ्या भेटीत तसंच म्हटल व मानलं. आता अर्जुन ‘नर’ म्हणजे नेमकं काय?”

“सर्व प्राण्यांमध्ये नर-मादी दोघांनाही स्तन असतात. एकट्या अश्वामध्ये ते केवळ मादीलाच असतात. म्हणून तर अश्वाला पुरुषार्थाचा परमोच्च मानबिंदू मानला आहे.

त्याची धावण्याची शक्ती इतर कुठल्याही प्राण्याहून अधिक आहे. ती अधिक काळ टिकणारीही आहे. म्हणूनच शक्ती ही 'अश्वशक्ती'च्या परिमाणात मोजली व मानली जाते. अश्व कधीच भूमीवर बसून निद्रा घेत नाही. जिवाला आवश्यक निद्रा तो उभ्याउभ्याच घेतो. अर्जुनाचा सर्वाधिक मोठा गुण आहे, निद्रेवरचं नियंत्रण हा! म्हणूनच त्याला 'गुडाकेश' हे नाव पडलं."

"मी तुला मद्या सांगितलं की, प्रत्येक जिवात परमात्म्माचा अंश आहे. या सर्व जिवांचा मी निवडलेला प्रतिनिधी, म्हणजे अर्जुन! नर म्हणजे संतत्वाकडे जाण्याची क्षमता असलेला प्राथमिक अवस्थेतला जीव."

"अर्जुन हा प्राण्यांतील अश्वासारखा, मानवातील पूर्ण नर आहे. त्याला स्तन नाहीत. त्याचं निद्रेवर नियंत्रण आहे. तो अश्वाच्या गतीनं विविध शस्त्रं हाताळतो. म्हणूनच तर कुरुक्षेत्रावर हितोपदेश सांगण्यासाठी मी वेगवेगळ्या दुर्मीळ गुणांनी युक्त असलेल्या पाचही पांडवांतून योग्य नर म्हणून एकटच्या अर्जुनाची निवड केली."

"मग आता हा उपदेश देण्यासाठी तू माझी निवड केलीस ती का?' मी माझा मूलचा प्रश्न पटकन उच्चारला."

तो कितीतरी मधुर हसला. असं तो केवळ अंकपाद आश्रमात असतानाच हसला होता. म्हणाला "उधो, बंधो, तू चतुर आहेस. तरीही सरोवरात उगवलेल्या कमलाच्या दलासारखा निर्लेप आहेस. अर्जुन पूर्ण नर आहे, म्हणूनच तो इतर बंधूंपेक्षा अधिक नारीत मनानं अडकला. तू यादव असून गुरुवर्य घोर आंगिरसांसारखा त्यापासून अलिप्त राहिलास. निर्लेप राहिलास. म्हणूनच तुला भरल्या सुधर्मा सभेत मी 'अवधूत' म्हणून संबोधलं. सर्व यादवांनी तुझ्याविषयीची ती उपाधी स्वीकारली. मी विचारलं नसतानाही अखेरच्या भेटीत गुरुवर्य घोर आंगिरसांनीही त्याला मान्यता दिली. तुला चांगलं माहीत आहे की, ते माझे ब्रह्मविद्येचे गुरू आहेत."

आता त्याच्याकडून महत्त्वाच्या जवळ-जवळ सर्व गोष्टींचं माझं निरसन झालं होतं, एक-दोन राहिल्या होत्या, त्यांचंही याच वेळी निरसन करून घेणं आवश्यक आहे, म्हणून मी विचारलं "स्वत:तील तेजशक्तीचा शोध म्हणजे जीवन, असं तू म्हणालास. तो शोध लावून घेण्याचा मार्ग म्हणजे समर्पित भक्तिभाव व निर्लेप प्रेम असं तू सांगितलंस म्हणून विचारतो, 'भक्ती' म्हणजे काय आणि 'प्रेम' म्हणजे नेमकं काय?"

"भक्ती म्हणजे नि:स्वार्थ विश्वास, सेवा आणि पूजन. प्रेम म्हणजे कसलीही अपेक्षा न ठेवणारं - निरपेक्ष आदरयुक्त आकर्षण!"

आता मी त्यानं माझ्या व अर्जुनाच्या दोघाही त्याच्या विश्वस्तांच्या मधील अंतर सांगणाऱ्या सर्वांत महत्त्वाच्या विषयाला संभाषणात घेतं विचारलं "तू मद्या नराबरोबर नारीचाही उल्लेख केलास. ती तुला समजलेली, तू मानलेली नारी स्त्री म्हणजे नेमकं काय?"

आता त्याचे डोळे कितीतरी पाणीदार झाले. तळपून उठले. मस्तकावरच्या पर्णदार वटवृक्षातून दिसणाऱ्या नीलवर्णी आभाळाकडे एकटक बघत तो म्हणाला, "ऐक, स्त्री म्हणजे कन्या, पुत्र जन्माला घालणारं यंत्र नव्हे! स्त्री म्हणजे वात्सल्य. वात्सल्य म्हणजेच स्त्री!

"परमात्म्याचा घराघरांत वावरणारा वैश्विक तेजशक्तीचा, अखंड निर्माणशील वात्सल्याचा अंश म्हणजे स्त्री! हे वात्सल्य वस्तुभार अंतर वेळ या परिमाणांच्या

पलीकडे असतं. अज्ञान ज्ञान प्रज्ञान या तिन्हींच्या पलीकडे असतं. अविद्या विद्या प्रविद्या यांच्या पार असतं. तम रज सत्त्व या तिन्ही भावांच्याही ते पलीकडे असतं.

"स्त्री, माता, महामाता, सखी, पत्नी, भगिनी, भावजय, कन्या, काकी, मामी, आत्या, सचिव, सेविका म्हणूनच नव्हे; तर केवळ स्त्री म्हणूनही सर्वदा वंदनीयच असते."

"माझ्याबरोबरच मला बघणाऱ्यांना परमात्म्याचं स्त्रीरूप नीट व अखंड कळावं, म्हणूनच मी जीवनभर हे मोरपीस मस्तकीच्या किरीटात आदतनं वागविलं. नारीच्या सर्व श्रेयसाच्या निर्माणशील योनिद्वाराचं ते अजोड प्रतीक आहे. आज तर मी पूर्ण त्यागलेल्या चक्र सुदर्शनापेक्षाही हे मस्तकीचं मोरपीस हाच माझा जीवनसंदेश आहे. '' त्यानं मला मुग्ध, नि:शब्द करून टाकलं होतं, गेली तीन तपं अखंड मनोभावे मी त्याची जी सेवा केली होती, त्याचा पूर्ण कृपाप्रसाद मला मिळाला होता. नेमक्या याच क्षणी त्यानं अर्जुनासमोर पसरला होता, तसा आपल्या उजव्या आजानुबाहूचा गुलाबी हाततळवा माझ्यासमोरही पसरला. त्यावरची ध्वज, चक्र, शंख, स्वस्तिक, त्रिकोण, चौकोन, यव अशी मी कुणाच्याच तळहातावर न बघितलेली दुर्मीळ चिन्हं उजळून उठली. माझ्या डोळ्यांत खोल- खोल बघत तो म्हणाला, " अवधूता, कळलं तुला तू कसा माझा, माझ्या आध्यात्मिक जीवनाचा परम भावविश्वस्त आहेस ते? मला वचन दे, मी आता तुला जे-जे सांगितलं, ते-ते बदरीकेदारला आश्रम उठवून, तिथे स्वत: राहून मानवांच्या पिढ्यानपिढ्यांपर्यंत तू पोहोचवशील."

मी सहजच त्याच्या तळहातावर हात ठेवली. तसं तो हसून म्हणाला, "उद्धवा, तुझी ही 'अवधूतगीता'ही लोक मनापासून स्वीकारतील. चल, निघू या आता. ज्या कर्मासाठी बाहेर पडलो, ते आपल्या अश्वांच्या खराऱ्यासाठी काटेरी रानवेळी आणण्याचं कार्य मार्गी लावू या. "

मी आदरानं पुढे होत, त्याची कौमोदकी गदा त्याच्या हाती दिली. ती खांद्यावर घेत तो अगदी सहज म्हणाला, "तू आता असं कर, आपला गरुडध्वज रथ घेऊन राजनगराकडे परत जा! मी आता तुला सांगितलं, त्या सर्वांवर नीट विचार करून ठेव. तू पुढे हो. हा मी आलोच तुझ्या मागोमाग काटेरी रानवेळींची पुरचुंडी घेऊन, आनर्ताचा पश्चिमवारा अंगावर घेत, कसं?"

"नारायणा, जशी तुझी इच्छा आणि आज्ञा." मी त्याची चरणधूल मस्तकी घेतली. त्यानं मला डाव्या आजानुबाहूचा लपेटा टाकत दृढ आलिंगनात घेतलं. क्षणैक आम्ही दोघं तसेच थांबलो. मग मी अरण्याबाहेर पडलो. तो काटेरी रानवेळी आणण्यासाठी भालका तीर्थाच्या रोखानं अरण्यात शिरला."

मी त्यानं सांगितलेल्या एकाहून एक वरचढ विचारांत गुरफटलो होतो. रथ हाकताना वेरावळ केव्हा मागे पडलं, तेही मला कळलं नाही. त्यानं सांगितलेल्या विचारांचा तळ आणि उंची दोन्ही मनाशी नीट पडताळून घेण्यासाठी निवांत स्थळी चिंतनात बसणंच आवश्यक होतं, त्यासाठी सोमनाथाच्या शिवालयाशिवाय अन्य कुठली योग्य जागा असणार?

सोमनाथाच्या शिवालयासमोर मी गरुडध्वज उभा केला. गर्भगृहात जाऊन अभिषेकजलाखाली निथळणाऱ्या वज्रलेपी सोमनाथाचं पुन्हा दर्शन घेतलं. तीर्थ-प्रसाद घेऊन गर्भगृहाच्या बाहेर येऊन पाषाणी ओवरीवर बसलो. दादाच्या मुखातून नुकत्याच ऐकलेल्या एकेका शब्दाला पिंजून काढताना माझा कितीतरी वेळ गेला. आता

चौथा प्रहर सुरू झाला होता. राजनगराकडे परतणंच भाग होतं. अद्याप मी दादानं सांगितलेल्या विचारांच्या जाळ्यातून काही नीट बाहेर पडलो नव्हतो. त्यांच्या तंद्रीतच अतिवेगानं रथ धावडवीत मी शुद्धाक्ष द्वारासमोरच्या खाडीच्या ऐलतीराजवळ आलो. मी येताना निवडलेला धीवर वाट बघत उभाच होता. त्यानं घातलेल्या फळ्यांवरून गरुडध्वजासह मी नौकेत आलो. खाडीजलावरून नौका मूळ द्वारकेकडे चालली. खाडीतूनच दूर अंतरावरून द्वारकेकडून आम्ही निघालो त्या किनाऱ्याकडे, नौकांचे कितीतरी तांडेच तांडे समोरून येताना स्पष्ट दिसत होते.

माझा गरुडध्वज शुद्धाक्ष महाद्वारातून राजनगर द्वारकेत प्रवेशला. दाटलेले ढग वाऱ्यानं पिटाळून लावल्यानंतर आभाळ स्वच्छ निवळत जावं, तसं आता कुठे माझं मन निवळत आलं होतं, मी गरुडध्वज अश्वशालेत आणला. रथाचे चारही शुभ्रधवल अश्व दादाला केवढे प्रिय आहेत, हे मी समोरच पाहिलं होतं, बराच वेळ ते रथनीडाच्या जूला जुंपलेलेच होते. त्यांना मोकळं करणं आवश्यक होतं, पण अश्वशालेत एकही सेवक दिसत नव्हता. अश्वही कितीतरी थकल्यासारखे स्पष्ट जाणवत होते.

दादानं सांगितलेल्या विचारांच्या तंद्रीतच मी अश्वांना जूमुक्त केलं. त्यांच्या नेहमीच्या जागी बांधलं. त्यांच्यासमोर चाऱ्याच्या पेंढ्या पसरून टाकल्या. दादानं सांगितलेले विचार स्वत:शीच उकळत श्रीसोपानाजवळ आलो. त्यानं आचार्य सांदीपनींच्या नावाची म्हणून जी पायदंडी दाखविली होती, तिला उजव्या हाताची बोटं भिडवून ती मस्तकी घेत समोरचा उंचशील सोपान चढू लागलो. मी स्वत:तच गुंतलो होतो. दादाचे कितीतरी विचार आता मला पूर्णत: कळून आले होते. त्याच्या इच्छेप्रमाणे बदरीकेदारला केव्हा नि कसं जायचं, याचं माझं मनोमन आयोजन चाललं होतं, इतक्यात —

इतक्यात वरून खाली येणारे अमात्य विपृथूपुत्र सुकृत ‘उद्धवदेव, तुम्हालाच शोधतो आहे. कुठे होतात इतका वेळ? काय झालंय, काही कळलंय का?’ म्हणत माझ्या समोरच उभे ठाकले. त्यांच्या उजव्या हातात यादवांचा रत्नखचित, सुवर्णी राजदंड होता. मी दचकून त्यांना विचारलं ‘काय झालं? खाडीत दूरवर घाईगर्दीनं एकाच दिशेनं जाणारे नौकांचे तांडे दिसले. राजमार्गावर एकही स्त्री- पुरुष - कुणीच दिसलं नाही. ”

“अवधूत - अवधूत, घात झाला आहे. द्वारकाधीशांचा देह भालका तीर्थावरच्या अरण्यात एका अश्वत्थ वृक्षाखाली निष्प्राण पडला आहे. त्यांच्या डाव्या तळपायात ज्या व्याधाचा - जरा नावाच्या व्याधाचा - प्राणघातक सूची बाण रुपला आहे, तो काही वेळापूर्वी आपल्या दोन-चार तरुण सोबत्यांसह येऊन गेला. त्यानंच ही वार्ता नगरात आणली. रुक्मिणीदेवींसह सर्व द्वारका तिकडेच लोटली आहे. नगरात कुणीही नाही. मी थांबलोय ते केवळ तुमचीच वाट बघत! अवधूत, आपले द्वारकाधीश आपणाला सोडून गेऽलेऽत! ” अमात्यांनी उत्तरीयाचा शेव डाव्या हातानं डोळ्यांना भिडवून ते टिपत, गदगदून अनावर इंद्रका दिला. मग ते देहभर नुसते गदगदतच राहिले. त्यांच्या हातचा यादवांचा रत्नखचित राजदंड ही हृदयभेदक कटू वार्ता मला सांगताना भरून आलेला हुंदका थोपविण्याच्या यत्नात त्यांच्या हातून केव्हाच घरंगळून पडला होता. पायदंडी-पायदंडीवर थडाथडा आदळत, आपटत सोपानाच्या शेवटच्या पायदंडीवर जाऊन पळभर हिंदोलला होता. तिभूनही खाली कोसळला होता.

आतापर्यंत काहीसं निवळत आलेलं माझं मन, त्यांचे शब्द ऐकताना पुन्हा

काळ्याकुट्ट मेघांनी कसं गच्च-गच्च दाटून आलं. अंगावर विजेचा लोळच लोळे कोसळावा, तसा मी उभ्या देही बधिर, सुन्न, संज्ञाहीन झालो. मी कुठे आहे, पायाखालचा सोपान म्हणजे काय, मी परम भावविश्वस्त म्हणजे काय, काही-काही कळेना!

काही पळांपूर्वी तर त्यानं मला जीवनाविषयी एवढं, भरभरून व रसाळ ऐकविलं होतं, माझी जाणीवच बधिर झाली.

समोरचे अमात्यही केव्हाच निघून गेले होते. मला काही केल्या हुंदका फुटत नव्हता. डोळ्यांत आत्मरसाचा टिपूसही उतरत नव्हता. मी माघारी वळलो. दोन- तीन-चार अशा उडया टाकत पायदंडया केव्हा उतरलो, काहीच कळलं नाही. धनुष्यातून सुटलेल्या बाणासारखा सुन्न, बधिर मी शुद्धाक्ष महाद्वाराकडे धावू लागलो. अश्‍वशालेकडे जाण्याचं भानही मला राहिलं नाही. खाडीकाठ तर द्वारकाकर स्त्री-पुरुषंनी कसा दाटून गेला होता. मला पायीच धावत येताना बघणारे आपोआपच वाट करून देत होते. पाठमोरे होते त्यांना ढकलून, मी कसातरी खाडीकाठ गाठला. समोर आली त्या नौकेत घुसलो. धीवराला म्हणालो, “लवकर चला. ''तोही प्राणाची शर्थ करून नौका झपाझप वल्हवू लागला. माझ्याभोवती खाडीचा एवढा पाण्यानं भरलेला विराट समुद्र होता, पण माया डोळ्यांत अघाप आत्मरसाचा टिपूसही काही उमटला नव्हता. मी बधिरच होतो - संशाहीन.

पैलतीर येताच उडीसारख्या झेपेतच नौका सोडली. समोर दिसला त्या रथात घुसून सारथ्याला आशा देताना अनावर बडबडलो, "लवकर... लवकर चल. कुठेही थांबू नकोस. भालका तीर्थ गाठ. ‘’ येताना मी गरुडध्वजातून आलो होतो. आता मी कुणाच्या रथातून जात होतो, काही-काही समजत नव्हतं. नौका हाकताना धीवरानं नाही एवढी या सारथ्यानं शर्थीर्ची सेवा केली. वेरावळ मागे टाकून जेव्हा त्यानं भालका तीर्थाजवळच्या अरण्यालगत आणून रथ थांबविला, तेव्हा त्या रथाच्या घोख्यांच्या तोंडातून पेरसाच्या धारा लागल्या होत्या. माझ्या डोळ्यांत अघाय अश्रूचा थेंबही नव्हता. माझं मलाच कळत नव्हतं, मी कोण आहे, काय शालं आहे. रथ सोडून धावतच मी समोरच्या अरण्यात घुसलो. माझ्या वक्षावरचं उत्तरीय उडून कुठे पडलंय, तेही मला कळलं नाही.

वृक्षामागून वृक्ष मागे टाकत मी भालका तीर्थावरच्या त्या अश्वत्थ वृक्षाजवळ आलो. हा वृक्ष यादव स्त्री-पुरुषंनी घेरून टाकला होता.

मला येताना बघून त्यांतील एकेक करत सगळेच ‘उद्धवदेव आले - अवधूत आले’ असं कुजबुजत पटापट दूर हटत मला मार्ग करून देऊ लागले.

मी तिथे आलो, जिथे दादाच्या निष्प्राण देहाभोवती रुक्मिणीवहिनींसह सातही वहिनी अनावर शोक करीत होत्या. मी समोर बघत होतो - त्यानं उजव्या गुडघ्यावर ठेवलेल्या डाव्या पायाच्या तळव्यात एक सूची बाण घुसलेला होता. त्यातून ओघळलेलं रक्त त्याचं पीतांबर भिजवून त्याच्या पायाशी थारोळ्यात पसरलं होतं, ते थारोळं आता गोठून काळपटलं होतं,

मी शोक करीत नाही, माझ्या डोळयांत अश्रूचा थेंब नाही, या दृश्यामुळे थिजलेले यादव आता अधिकच नि:शब्द शाले होते. मी कितीतरी कोंदटलो होतो. माझं मलाच कळत नव्हतं, मला रडू का येत नव्हतं! माझ्या डोळ्यांत आत्मरसाचा एकही थेंब का उमटत नव्हता? विजेचा लोळ अंगावर कोसळल्यासारखी माझी जाणीव सुन्न-बधिर का झाली होती? त्याच्या पायाशी दाटलेल्या रक्तथारोळ्याला चिकटलेल्या त्याच्या नीलवर्णी पायाच्या सडक बोटांकडे बघताना मला फार- फार जाणवलं की - की,

मस्तकावरचं इथून तिथवर पसरलेलं असीम आकाश त्याच्या साडेतीन हात देहात सामावून गेलं आहे.

आनर्ताच्या अशाच अरण्यात त्याचा निरोप घेताना स्नेही सुदाम्यानं 'भेटवस्तू म्हणून काहीतरी दे' अशी मागणी घालताना आपली दृष्टी त्याच्या मस्तकीच्या सोनकिरीटातील मोरपिसापासून क्रमशः खाली नेली होती. शेवटी त्याच्या पायीच्या चंदनी खडावांना मिठी घालून, त्याच भेट म्हणून मागितल्या होत्या. त्यानं खडावांतून पाय मागे घेताच, त्याच पादुका म्हणून नेल्या होत्या.

आज माझी दृष्टी त्याच्या पायाच्या नखांपासून क्रमशः वर-वर जात त्याच्या गुलाबी ओठांपर्यंत गेली. माझा जीव तळमळून म्हणाला, "तुझा एक शब्द ऐकव. मला एकदा 'उधो-अवधूत' म्हण. अश्रूचा एक थेंब मला दे!"

तो काही-काही बोलत नव्हता. बोलणार नव्हता. काही पळांपूर्वीच त्यानं मला उदंड ऐकविलं होते. त्याहून उदंड ऐकविण्यासारखं त्याच्याजवळ खूप काही होतं, पण - पण आता मात्र ते कधी, कधीच कुणालाही ऐकायला मिळणार नव्हतं. त्या विचारासरशी मात्र माझा जीवदेठ पिळवटून निघाला.

"दाऽऽद!" असा टाहो फोडून, मी कोसळलो. माझा अश्रुकोश फुटला होता. गदगदून हमसून-हमसून रडणारा मी तेव्हाच शांत झालो, जेव्हा रुक्मिणीवहिनींचा हात माझ्या पाठीवर पडला.

मी निकरानं स्वतःला सावरलं. तो असता, तर त्याला काय आवडलं असतं हे ध्यानी घेऊन, रुक्मिणीवहिनींसह सातही वहिनींचं शांत मनी सांत्वन केलं. दारुकासह त्यांना श्वेत वस्त्रं लेऊन यायला त्यांना द्वारकेकडे पाठवून दिलं. अमात्यांनी काही यादवांच्या सहकार्यानं भालका तीर्थावरच चंदनी चिता रचून घेतली. आता सांजावत आलं होतं, दारुक, मी, अमात्य यांच्या साहाय्यांसाठी दहा-बारा ज्येष्ठ मानकरी यादव पुढे आले. त्याचा नीलवर्णी, उंचशील, चक्रवर्ती देह, त्यानं जीवनभर अंगी धारण केलेल्या पांचजन्य, गदा, पद्म, वैजयंतीमाला, कौस्तुभमणी, मोरपीसधारी किरीट, नंदक खड्ग यांसह त्या चंदनी चितेवर ठेवण्यात आला. त्यात गोकुळीच्या आणखी दोन वस्तूही स्पष्ट दिसत होत्या. पीतांबरात खोचलेली मुरली आणि त्याच्या मनगटीचं चंदेरी कडं. दूरवर एका वृक्षाखाली बसलेल्या काही वृद्ध यादवांनी आतापर्यंत सावरलेल्या वसुदेवबाबा व थोरली, धाकली माता यांना हाताला धरून अमात्यांसह चंदनी चितेजवळ आणलं. तिघांनीही त्याचं डबडबल्या डोळयांनी शेवटचं दर्शन घेऊन, एकेक चंदनकाष्ठ त्याच्या नील देहावर ठेवलं. अठराकुलीन ज्येष्ठ यादवांनीही एकेक ठेवलं. यादवपुरोहित गर्ग व त्यांच्या शिष्यागणांनी ठेवलं. दारुक अमात्यांनी ठेवलं. आता त्याचा नील देह चंदनकाष्ठांनी पूर्ण आच्छादला गेला. सगळ्यात शेवटचं चंदनकाष्ठ मी ठेवलं. कुणीतरी माझ्या हातात पेटता चंदनी चूड दिला. भोवतीच्या यादव पुरोहितांनी प्रथम 'ॐ हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखं तत्त्वं पूषत्रपावृणु सत्यधर्माय हुब्टये।।' 'सत्याचं मुख हे नेहमी हिरण्यवर्णी झाकण्यानं झाकलेलं असतं. त्या सत्याच्या दर्शनाची आच असलेल्या मला हे परमेश्वर, त्याचं ओझरतं तरी दर्शन घडव, 'या ऋग्वेद ऋचेचा त्रिवार घोष केला. मग मंत्रघोषाच्या गजरात द्वारकाधीशाचा चुलतबंधू म्हणून, रक्ताचा आप्त 'अवधूत' म्हणून मी समोरच्या चितेला अग्निचूड दिला. अग्निपक्षी नीलवर्णी आकाशमार्गी झेपाबू लागले. अमात्यांनी वसुदेवबाबा दोन्ही माता व सर्व ज्येष्ठांना

राजनगराकडे धाडण्याची व्यवस्था केली. सर्वांत शेवटी हातातील चंदनी चूड त्या चितेत फेकून, सशस्त्र यादवदलाचं एक पथक तिथे ठेवून, निवडक दोन-चार यादवांसह मीही द्वारकेकडे यायला निघालो. मला अश्वशालेतल्या त्याच्या स्नेहांचं सांत्वन करणं आवश्यक होतं,

कुणीच काही बोलत नव्हतं. बरचसं चालल्यावर एक नीलवर्णी सरोवर लागल. त्याच्याकडे एकटक बघत मी चाललो असताना, पायीच्या हिरव्याकंच दाट कुरणावर पाच-सात मोरपिसं पडलेली दिसताच माझ्या उभ्या देहभर काटा सरकला. आज सकाळी केव्हातरी सरोवरातील पाणी पिऊन कुरणावर मनसोक्त नाचताना, काही मोरांनी ही पिसं ढाळली होती.

मला पुढे जाववेचना. वाकून मी त्यातलं एक मोरपीस उचललं. हातातील कंचहिरव्या, गर्दजांभळ्या, दाटसोनेरी, रंगवैभवी मोरपिसाकडे नुसता बघतच राहिलो. त्याच्या रंगीबेरंगी कितीतरी आठवणींनी मनःकोश कसा गच्च दाटून आला. माझ्या डोळ्यांतून सरसर ओघळणारी आत्मरसाची धार हातातील मोरपिसाचा नीलवर्ण उजळण्याचा व्यर्थ-व्यर्थ यत्न करू लागली.

मन भडभडून एकच एक प्रश्न सारखं विचारू लागलं - 'दादा, खरोखर तू कोण होतास? तुला जन्म देणाऱ्या थोरलीला - देवकीमातेला तरी ते कधी कलल का? धाकलीला - रोहिणीमातेला ते समजलं का? वसुदेवबाबांच्या तरी ते कधी ध्यानी आल का? तुझी जन्मभर सोबत करणाऱ्या बलभद्रदादाला ते कधी समजलं का? तू म्हणालास त्या दुसरा जन्म देणाऱ्या गुरुवर्य सांदीपनी आणि आचार्य घोर अंगिरस यांना तरी त्याची अटकळ आली काय? ज्यांना तू जलतत्त्वाचे पुरुष मानलेस, त्या पितामह भीष्म आणि दानवीर कौंतेय कर्णाला तरी याचा माग कधी लागला काय? तुझं पालनपोषण करून तुला संस्कारांचं संचित देणाऱ्या चित्रसेनआजोबा, यशोदामाता आणि नंदबाबा यांना तरी त्याची संगती कधी लागली काय? तुझं स्मरण व्हावं म्हणून दुःखाचं मागणं घालणाऱ्या आत्याबाई कुंतीदेवींना तरी तू नीट कळलास का? कौरवमाता गांधारीदेवींच्या कठोर शापानं तरी तू संपणार आहेस काय?

'तू सुहृद मानलेल्या गर्ग धौम्य, देवभागबाबा, विराट द्रुपद धृष्टद्युम्न अशाना तरी तुझ्या हृदयाचा ठाव कधी लागला का? तू वधलेल्या खलपुरुषंचं तुझ्या हातून वध झाल्यामुळे जीवन धन्य झालं नाही काय? तू सखे मानलेले दारुक संजय महात्मा विदुर सुदामा सात्यकी आणि सख्या मानलेल्या राधा द्रौपदी भगिनी सुभद्रा एकानंगा भाचा अभिमन्यू? त्याची पत्नी उत्तरा यांपैकी कुणाच्यातरी नेमकं ध्यानी आल काय की तू कोण होतास?

'प्रद्युम्नासह तुझ्या सर्व पुत्रांपैकी एकाला तरी शोध घेता आला काय की, तू कोण होतास? तुझी लाडकी कन्या चारुमती व तिच्या सर्व भगिनी यांना तरी तो शोध घेता आला का?

'रुक्मिणीवहिनी सोडून सातही वहिनींना तुझी पत्नी होण्याचं भाग्य लाभणं म्हणजे काय हे कधी कळलं का?

'युधिष्ठिरासह ज्या पांडवांचा तू पाठपुरावा केलास त्या पांडवांना तरी कधी योग्य कयास करता आला काय की तू कोण होतास?

'इतरांचं राहू देच, ज्याला तू एवढी ज्ञानसमृद्ध गीता ऐकविलीस, आपल्या लौकिकाचा

परमप्रिय सखा म्हणून गौरवलंस, त्या धनुर्धर अर्जुनाला तरी तुझ्या जीवनाच्या सर्व आयामांचं नीट दर्शन झाल का?

'बाकीच्या सर्वांचं राहू द्याच तुझी गेली तीन तपं पडेल ती अखंड सेवा करणाऱ्या प्रत्यक्ष मला - मला तरी तू नीट कळलास काय?

'मला वाटतं, तू जो काय थोडाफार कळला असशील तो एकटचा रुक्मिणीवहिनींना जेव्हा-केव्हा ज्याला कुणाला तू सर्व-सर्व काहीही कणमात्रही शिल्लक न राहता समजशील तेव्हा माझ्या दादा - युगंधरा' तो या आर्यावर्ताचाच नव्हे तर सगळ्या विश्वातील सोन्याचा दिवस असेल!'

माझं मन आक्रंदतच होतं - 'माझ्या दादा - श्रीकृष्णा - युगंधरा, खरोखर तू कोण होतास?'

माझा डोळयांतून पाझरणाऱ्या अविरत अश्रुधारांनी हातातील मोरपिसावरचा असीम, अनंत नीलवर्ण उजळून-उजळून निघत होता.

आनर्ताच्या - सौराष्ट्रातील भालका तीर्थाच्या पश्चिम क्षितिजावरचा सूर्य आता मावळला होता.

युगान्त झाला होता!!!

## 'युगंधर' कालीन अठरा यादवकुले

१. वृष्णी
२. अंधक
३. भोज
४. सात्वत
५. कुकूर
६. यदू
७. तुर्वसू
८. महाभोज
९. शूर
१०. भजमान
११. आभीर
१२. क्रथकैशिक
१३. द्विमीढ
१४. दारिकेय
१५. शैनेय
१६. दाशार्ह
१७. मधू
१८. चेदी

## वातावरणनिर्मितीसाठी आलेले काही कठीण शब्द व त्यांचे सुलभ अर्थ

१. उपलेपक –गवंडी
२. कौपिन –संन्याशाची कफनी, छाटी
३. कक्ष –दालन किंवा खण
४. गोरसकक्ष –दुभत्याची कोठी
५. ओदन –शिजवलेला किंवा साधा भात, तांदूळ
६. उष्ट्र –उंट
७. अश्वसाद –घोडेस्वार
८. उत्तरीय –उपरणे
९. अधरीय –कटिवस्त्र, धोतर
१०. पुरश्चरण –एकच मंत्र पुन:पुन्हा म्हणणे
११. काष्ठकार –सुतार
१२. लोहकार –लोहार
१३. ग्रीवा –मान, गर्दन

१४. वक्ष –छाती
१५. गोधूम –गहू
१६. आजानुबाहू –ज्याचे हात गुडघ्याखालीही पोहोचतात असा
१७. संकर्षण –आकर्षून घेतलेला
१८. द्वीप –बेट
१९. धीवर –कोळी, मच्छीमार
२०. प्रत्यंचा –धनुष्याची दोरी
२१. भृशुंडी –पाषाणफेकीचे यंत्र
२२. शतघ्नी –पाषाणफेकीचे यंत्र
२३. तूणीर –बाणांचा भाता
२४. आचमन –पवित्र कार्याचा प्रारंभ करण्यापूर्वी तळहातावर पळीभर पाणी घेऊन पिणे
२५. अर्घ्य –देवाला किंवा वंदनीय शक्तीला सादर वाहिलेली पाण्याची ओंजळ
२६. रथनीड –रथावर घोडे सावरण्यासाठी सारथी बसतो ती जागा
२७. दर्भासन –दर्भ नावाच्या गवताची बैठक
२९. पडशी –प्रवासी झोळी
२९. अपूप –अनारसे
३०. खदिरवृक्ष –खैराचे झाड
३१. शिसम –शिसव्याचे लाकूड किंवा वृक्ष
३२. पलाशवृक्ष –पळसाचे झाड
३३. अश्वत्थ –पिंपळाचे झाड
वृक्ष
३४. संकुल –समुदाय
३५. वातायन –खिडकी, सज्जा
३६. माल्यवत –आधुनिक 'हिंदुकुश' पर्वत
पर्वत
३७. विराट नगर –आधुनिक जयपूर
३८. इंद्रप्रस्थ –आधुनिक दिल्ली
३९. सुदामपूर –आधुनिक पोरबंदर
४०. –आधुनिक गुवाहाटी
प्राग्ज्योतिषपूर
४१. करवीर –आधुनिक कोल्हापूर
४२. गांधार –आधुनिक अफगाणिस्तान
४३. सौवीर –आधुनिक सिंध
४४. लोहमेख –घोड्याच्या खुराला ठोकतात तो नाल
४५. लोहमेखी –नालबंदी

४६. भल्लाईत –भालाईत
४७. दायित्व –जबाबदारी, जोखीम
४८. प्रतोद –आसूड, चाबूक
४९. ब्रह्मकमळ –हिमालयात विशिष्ट उंचीवर सरोवरात फुलणारे दुर्मीळ कमळाचे फूल, याचा सुगंध दूरवर पसरतो. हे चांगले टिकते. इतरत्र दाखविले जाते ते कृष्णकमळ, ब्रह्मकमळ नव्हे!
५०. सवितृ मंत्र व गायत्री छंद –'ॐ भूर्भुवः स्वः...' हा विज्ञानाच्या कसोटीवर सर्वसमर्थ म्हणून सिद्ध झालेला 'सूर्यमंत्र' आहे. 'सवितृ' म्हणजे सूर्यदेवता. तिच्या आराधनेसाठी उच्चारांचे तंत्रशुद्ध नियम आहेत. तो 'गायत्री छंदा'त म्हटला जातो. अनेक लोक याचा 'गायत्री मंत्र' म्हणून चुकीचा नसला, तरी अर्धसत्याला धरून निर्देश करतात. अनादी काली हा मंत्र 'त्रिशंकू' आसनात महर्षी विश्वामित्रांनी अंतःप्रेरणेने सर्वप्रथम उच्चारला.
५१. अमात्य –प्रधानमंत्री
५२. लोहत्राण –चिलखत
५३. शिरस्त्राण –युद्धात मस्तकावर घ्यायचे लोखंडी चिलखत, हेल्मेट
५४. इंगुदी –इंगुदीच्या बियांचे तेल
५५. करंजेल –करंजीच्या बियांचे तेल
५६. ठाणवयी –दगडी समई

# संदर्भ-ग्रंथ (इंग्रजी)

1. Concept of State in the Maharashtra : Dr. D. Tiwary ‘Vidyanidhi', Oriental Publishers, C/117, Gali No. 11, Khajuri Khas, New Delhi – 110 094-Ed.1990.

2. Geography of the Mahabharata : Prof. B.S. Suryavanshi, Published by Ramanand Vidya Bhavan, J-3, 227, D.D.A.Flat, Kalkaji, New Delhi-Ed.1986.

3. Kurukshetra War – A Military Study : by Sensarma, Published by Darbari Udyog, Jessore Road, Ganganagar-Ed.1995.

4. An Index to the names in the Mahabharata : S. Sorensen.

5. Dwarka : By Shambhuprasad Harprasad Desai I.A.S. (Retd.) ‘Ojas’, Sardar Chowk, Junagad 362 001 (Sourashtra) Ed. 1992.

6. Kurukshetra Past & Present : by S. P. Singhsud.

7. The Mahabharata : By Prakashchandra Roy.

8. Ancient India : By Mookirji.

9. Tribes in Ancient India : By B.C.Law, Published by Bhandarkar O.R. Institute, Pune 411 004.

10. Report of Tour in Gangetic Provencies : Alexander Kunningham.

11. Historical Geography of Ancient India : by B.C.Law Bhandarkar O.R. Institute, Pune 411 004.

12. Arjuna in the Mahabharata : by R.C. Katz, Published by Motilal Banarasidas, 41, U.A.Banglow Rd., Jawaharnagar, New Delhi 110 007, Ed.-1989.

13. Geographical & Economic Studies in the Mahabharata : Dr. Motichandra.

14. Mountains of India : by B.C.Law, Published by Calcutta Geographical Society, Calcutta, Ed.-1944.

15. Rivers of India : by B.C.Law, Published by Calcutta Geographical Society, Calcutta Ed. 1944.

16. Classical Age.

17. Ancient Indian Education.

18. The Philosophy of the Mahabharata.

19. Prabhas & Somnath : By Shambhuprasad H. Desai, Prabhas Prakashan, ‘Ojas’, Sardar Chowk, Junagadh 362 001 (Sourashtra) Ed.1973.

20. KRSNA : by Dr. Sadanand More, Published by Mrs. Ratnaprabha Borkar, Gaaj Prakashan, B.K.Complex, Dhangar Galli, Anand Bazar, Ahmednagar, Edn.1995.

21. Super Learning : Shella Osrander & Lynn Shroeder, with Nancy

Osrander. Publisher Laurel Book, Dell Publishing, New York (U.S.A.)

22. Sri Krishna : By Bankimchandra Chatopaddhaya Translation (with Comments) by : Shri. Pradip Bhattacharya, I.A.S. Principal Secretary, Govt. of West Bengal, Calcutta.

23. Hymns from the Rgveda : by A.A.Macdonell, Oxford University, London.

24. Vedic Grammer for Students : by A. A. Macdonell

25. Atharva-Veda Samhita : by W.D.Whitney, Published by Motilal Banarasidas, New Delhi 10, Edn. 1962.

26. Krishnavatara – 11 The Wrath of an Emperor by K.M.Munshi, Published by Bharatiya Vidya Bhavan, Chowpatty Bombay 7, Edn. 1963.

27. The Magic Flute (Krishnavatara Vol.1) by K.M. Munshi.

28. The Five Brothers (Krishnavatara Vol. III) by K.M. Munshi.

29. The Book of Bhima (Krishnavatara Vol. IV) by K.M. Munshi.

30. Hymns of the Rugveda (Popular Commentry) by R.T.H. Griffith Parimal Publication, New Delhi 7, Edn. 1971.

31. Samveda Samhita Sanskrit Text with English Translation of R.T.H.Griffith Publisher - Parimal Publication, 27/28, Shakti Nagar, Delhi 7, Edn.1996.

32. Yajurveda Samhita Sanskrit Text with English Translation : of R.T.H. Griffith Publisher : Parimal Publication, 27/28, Shakti Nagar, Delhi 7, Ed.1996.

33. The Mahabharata an Epic Poem by Celebration Veda Vyasa Rishi - Edited by learned Pandits attached to the establishment of Education Committee, Calcutta 1834.

# संदर्भ-ग्रंथ


१. प्राचीन चरित्रकोश : म.म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव. भारतीय चरित्रकोश मंडळ, शिवाजीनगर, पुणे – ४११००४, १९६४.

२ अ. The Mahabharata critically edited Vol. 1 to 22, by Bhandarkar Oriental Institute, Pune - 411004. (हे सर्व खंड संस्कृतमध्ये आहेत.)

महाभारताची चिकित्सक आवृत्ती, खंड १ ते २२ - भांडारकर प्राच्यविद्या संस्था, भांडारकर मार्ग, पुणे – ४११००४.

२ ब. अष्टाध्यायी सूत्रपाठ (१९७७), श्री. नारायण मिश्र. चौखंबा ओरियंटलिया, चौखंबा, गोकुलभवन, वाराणसी (उ.प्र.) – २२१००१.

३. महाभारताची गूढ रहस्ये : कवीश्वर ३४, जानकीनगर, इंदौर (म.प्र.) – ४५२००१.

४. पाणिनीकालीन भारतवर्ष : श्री. वासुदेवशरण अग्रवाल (१९६९), चौखंबा विद्याभवन प्रकाशन, वाराणसी (उ.प्र.)

५. महाराष्ट्रीय ज्ञानकोश : डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर.

६. महाभारताचा उपसंहार : लेखक भारताचार्य चिं. वि. वैद्य, वरदा प्रकाशन, सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११०१६.

७. श्रीकृष्णचरित्र : लेखक भारताचार्य चिं. वि. वैद्य, वरदा प्रकाशन, सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११०१६.

८. विश्वकोश (खंड १ ते १७) : संपादक – लक्ष्मणशास्त्री जोशी, विश्वकोश मंडळ, वाई, जि. सातारा.

९. आमचा महाभारतपूर्व राजकीय व सांस्कृतिक इतिहास : लेखक – डॉ. एच.आर. दिवेकर, पुणे विद्यापीठ, पुणे – ४११००७.

१०. महाभारत (सटीप) : संपादक – बापटशास्त्री व देवस्थळी.

११. श्रीमन्महाभारत : संपादक – आप्पाशास्त्री राशिवडेकर.

१२. व्यासांचे शिल्प : लेखक – नरहर कुरुंदकर, संपादन : शंकर सारडा, इंद्रायणी साहित्य, २७३, शनिवार पेठ, पुणे – ४११०३०.

१३. Towards The Silver Crest of Himalayas, मूळ लेखक : जी. के. प्रधान, अनुवादक : डॉ. रामचंद्र जनार्दन जोशी, मराठी अनुवाद – 'साद देती हिमशिखरे', प्रकाशक – उत्कर्ष प्रकाशन, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११००४, (आवृत्ती १९७३).

१४. महामानव श्रीराम व श्रीकृष्ण : लेखक डॉ. वा.वि. भागवत, प्रकाशक - अस्मिता प्रकाशन, ४५८/२, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०, (आवृत्ती १९८६).

१५. गीतार्थसोपान : लेखक व प्रकाशक – रामकृष्ण मोरेश्वर धर्माधिकारी, १९१, कसबा पेठ, पुणे – ४११०११, (आवृत्ती १९७३).

१६. महाभारत काही कथा, काही व्यथा – निवेदक विश्वनाथ कृष्ण श्रोत्रिय, श्रोत्रिय प्रकाशन, १९४३, माडीवाले वसाहत, पुणे – ४११०३७, (आवृत्ती नोव्हेंबर १९८३)

१७. महाभारत : संपादक – प्रा. न. र. फाटक.

१८. महाभारत : संपादक – प्रा. भालबा केळकर.
१९. नीलकंठी महाभारत : चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०, (आवृत्ती १९२९).
२०. व्यासकृत हरिवंश पुराण : भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, भांडारकर मार्ग, पुणे – ४११००४.
२१. भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश : संपादक कै. र. भा. गोडबोले.
२२. श्रीकृष्ण : पं. बाळशास्त्री हरदास.
२३. महाभारतावरील व्याख्याने : पं. बाळशास्त्री हरदास.
२४. श्रीकृष्णायन : श्री. गो. नी. दांडेकर.
२५. श्रीकृष्णजीवन दर्शन : पं. पांडुरंगशास्त्री आठवले, प्रकाशक – सद्विचार दर्शन ट्रस्टकरिता श्री. विठ्ठलदास सी. मेहता, 'विमल-ज्योति', ६ - ८, विल्सन स्ट्रीट, व्ही. पी. रोड, मुंबई – ४००००४, (आवृत्ती १९७६).
२६. श्रीमन्महाभारताचे भाषांतर : उपासनी व अभ्यंकर.
२७. व्यासपर्व : दुर्गा भागवत, मौज प्रकाशन, गिरगाव, मुंबई – ४००००४, (आवृत्ती १९६२).
२८. हा जय नावाचा इतिहास : आनंद साधले, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई – ४००००४, (आवृत्ती १९६४).
२९. हरिवंश पुराण (जैन) : पं. पन्नालाल जैन साहित्याचार्य, भारतीय ज्ञानपीठ, नवी दिल्ली – ३.
३०. आर्याभारत : मोरोपंत भांडारकर, प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे – ४११००४.
३१. श्रीमहाभारत कथा : लेखक – त्र्यं. ग. बापट, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे – ४११०३०.
३२. गोकुल (हिंदी) : लेखक रघुवीर चौधरी, राधाकृष्ण प्रकाशन प्रा. लि., २/३८, अंसारी मार्ग, नवी दिल्ली – ११०००२, (आवृत्ती १९९०).
३३. मथुरा (हिंदी) : लेखक – रघुवीर चौधरी, राधाकृष्ण प्रकाशन प्रा. लि. २/३८, अंसारी मार्ग, नवी दिल्ली – ११०००२, (आवृत्ती १९९०).
३४. कठोपनिषद (हिंदी भाष्य) : लेखक – भगवान श्री रजनीश, प्रकाशक – स्वामी अमृत बोधिधर्म, १०१, टिंबर मार्केट पुणे – ४११००२, (आवृत्ती एप्रिल १९८२).
३५. पातंजल योगविद्या : लेखक – स्वानंदसरस्वती, प्रकाशक – गजेंद्र विठ्ठल रघुवंशी, रघुवंशी प्रकाशन, ३४७१/१२३, पंतनगर, घाटकोपर, मुंबई – ४०००७५, (आवृत्ती मार्च १९७९).
३६. पाँच पांडव (हिंदी) : लेखक – कन्हैय्यालाल मा. मुन्शी, अनुवादक – प्रफुल्लचंद्र ओझा, राजकमल प्रकाशन प्रा. लि., १-बी, नेताजी सुभाष मार्ग, नवी दिल्ली – ११०००२, संस्करण १९८६.
३७. रुक्मिणीहरण : लेखक – कन्हैय्यालाल मा. मुन्शी, हिंदी अनुवादक – ओंकारनाथ शर्मा, राजकमल प्रकाशन प्रा. लि., १ बी, नेताजी सुभाष मार्ग, नवी दिल्ली – ११०००२, संस्करण १९८६.
३८. युधिष्ठिर : लेखक – कन्हैय्यालाल मा. मुन्शी, हिंदी अनुवादक : शिवरतन थानवी, राजकमल प्रकाशन प्रा. लि., १ बी, नेताजी सुभाष मार्ग, नवी दिल्ली – ११०००२,

संस्करण १९८६.
३९. सत्यभामा : लेखक – कन्हैय्यालाल मा. मुन्शी, हिंदी अनुवाद : प्रफुल्लचंद्र ओझा, राजकमल प्रकाशन प्रा. लि., १ बी, नेताजी सुभाष मार्ग, नवी दिल्ली – ११०००२, संस्करण १९८६.
४०. गीत गोविंद : कवी जयदेव.
४१. गीत गोपाल व गीत सौभद्र : कवी ग. दि. माडगूळकर, केसरी प्रकाशन, ५६८, नारायण पेठ, पुणे – ४११००२, आवृत्ती १९६५, कवी. ग. दि. माडगूळकर, सोमय्या प्रकाशन, मुंबई, (आवृत्ती डिसेंबर १९६८).
४२. सूरसागर : कवी सूरदास.
४३. वेदधरातल : गिरीशचंद्र अवस्थी.
४४. स्वयंवर (नाटक) : कृ. प्र. खाडिलकर.
४५. कीचकवध (नाटक) : कृ. प्र. खाडिलकर.
४६. सौभद्र (संगीत नाटक) : अण्णासाहेब किर्लोस्कर.
४७. पांडवप्रताप : श्रीधरकवी.
४८. सुबोध पांडव चरितम् : दिगंबर शर्मा.
४९. गीताई : विनोबा.
५०. विष्णुसहस्त्रनाम.
५१. वेदसारशिवस्तव.
५२. हिमालयाच्या कुशीत : स्वामी अखंडानंद.
५३. गीतारहस्य : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, केसरी प्रकाशन, ५६८, नारायण पेठ, पुणे – ४११०३०.
५४. श्रीमद्भगवद्गीता (सभाष्य) : प्रकाशक – ज. श्री. टिळक, ५६८, नारायण पेठ, पुणे – ४११०३०.
५५. नवनीत श्रीमद्भगवद्गीता : पं. राजारामशास्त्री नाटेकर, नवनीत प्रकाशन केंद्र, भवानीशंकर मार्ग, दादर, मुंबई – ४०००२८.
५६. कृष्ण साधना-रहित सिद्धी : भगवान श्री. रजनीश, संकलन संपादन स्वामी योग प्रताप भदिती, प्रकाशक – डायमंड पाकेट बुक्स प्रा. लि. नवी दिल्ली – ११०००२, संस्करण १९९४.
५७. संख्या-संकेत कोश : लेखक – श्रीधर शामराव हणमंते, प्रकाशक – श्री. मनोहर य. जोशी, प्रसाद प्रकाशन, १८९२, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०, (आवृत्ती १९५८).
५८. कृष्णस्मृति : (ओशोंच्या श्रीकृष्णावरील व्याख्यानांचे संकलन) ‘ओशो', आचार्य रजनीश, द रिबेल पब्लिशिंग हाऊस, ताओ पब्लिशिंग प्रा. लि., कोरेगाव पार्क, पुणे, (आवृत्ती १९८९).
५९. सार्थ श्रीगणपत्यथर्वशीर्ष (महर्षी अथर्वणकृत) : भाषांतर : वे.शा.सं. पं. पांडुरंग सदाशिवशास्त्री आठल्ये, जयहिंद प्रकाशन, मुंबई – ४००००२, (आवृत्ती १९९०).
६०. भागवत पुराण (मूळ महर्षी व्यासकृत) : भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, भांडारकर मार्ग, पुणे – ४११००४.
६१. एकनाथी भागवत (संपूर्ण) : भांडारकर प्राच्यविद्या संशोधन केंद्र, भांडारकर

मार्ग, पुणे – ४११००४.

६२. श्रीमद्भागवत (सभाष्य) (खंड १ ते १६) : पं. महादेवशास्त्री जोशी, कार्यकारी संपादक अच्युत प्रभू, प्रकाशक विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, ९६९, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०, (आवृत्ती १९९६).

६३. प्राचीन महाराष्ट्र (कुरुयुद्धापासून) : श्री. व्यं. केतकर.

६४. भारत सवित्री (खंड १ ते ३) : पं. वासुदेवशरण अग्रवाल, सस्ता साहित्य मंडल, एन-७७, कनॉट सर्कल, नवी दिल्ली – ११०००१, (आवृत्ती १९८५).

६५. गिरनार : लेखक शंभूप्रसाद हरप्रसाद देसाई (IAS), प्रभास प्रकाशन, सरदार चौक, जुनागढ – ७१२००१.

६६. जयतु श्रीद्वारकाधीश : (भौगोलिक बेट द्वारका) : गोस्वामी श्री किशोरचंद्रजी महाराज, प्रकाशक श्री बेट देवस्थान समिती, जुनागढ (सौराष्ट्र).

६७. हरिवंशपुराण का सांस्कृतिक विवेचन : श्री. वीणापाणि पाण्डे, प्रकाशन शाखा, सूचना विभाग, उत्तर प्रदेश राज्य सरकार, (आवृत्ती १९६०).

६८. महाभारत कथाभाग आणि शिकवण : ज. स. करंदीकर.

६९. भगवान श्रीकृष्ण आणि भगवद्गीता : स्वामी विवेकानंद, रामकृष्ण मठ, धंतोली, नागपूर – ४४००१२, (आवृत्ती १९८७).

७०. श्रीमद्भगवदगीता की जन्मभूमी : कुरुक्षेत्र – प्रकाशक : पुस्तक संसार, १६७, एक्झिबीशन ग्राउंड, जम्मू – १८०००१.

७१. वैदिक सूक्तपाठ : लेखक म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, शिवाजीनगर, पुणे.

७२. पातञ्जल योगशास्त्राचा अभिप्राय : श्री. ना. स. रेळे (हेमाडपंत).

७३. भारतीय मानसशास्त्र अथवा योगदर्शन : श्री. कृष्णाजी केशव कोल्हटकर.

७४. श्रीकृष्ण चरित्र : (हिंदी) लेखक बंकिमचंद्र चट्टोपाध्याय, प्रकाशक राजपाल ॲन्ड सन्स, काश्मिरी गेट, नवी दिल्ली – ११०००६, (आवृत्ती १९८५).

७५. अनंताकडे झेप : लेखक – श्री. अ. ल. भागवत.

७६. संगीत सौभद्र – घटना व स्वरूप (प्रबंध) : डॉ. व. दि. कुळकर्णी, प्रकाशक – व्हीनस प्रकाशन, पुणे. १९७५.

७७. द्रौपदी : (मूळ : याज्ञसेना) अनुवाद. उरिया लेखिका – प्रतिभा राय, राजपाल ॲन्ड सन्स, नवी दिल्ली – ११०००३, (आवृत्ती १९९३).

७८. गर्गसंहिता : (मूळ संस्कृत) भांडारकर इन्स्टिटय़ूट, पुणे – ४११००४.

७९. सार्थ तुकारामाची गाथा : संपादक आणि अनुवादक – ह.भ.प. विष्णु नरसिंह जोगमहाराज, प्रकाशक – केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ सदन, बहिली भटवाडी, गिरगाव, मुंबई – ४०००० ४, (आवृत्ती १९८२).

८०. सार्थ ज्ञानेश्वरी : ह.भ.प. विनायकबुवा (जोशी) साखरे महाराज, प्रकाशक व विक्रेते – बाळकृष्ण लक्ष्मण पाठक, मुंबई – ४००००२, (आवृत्ती १९५९).

८१. हस्तिनापूर : म. रं. शिरवाडकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे – ४११०३०, (आवृत्ती १९७२).

८२. हरिवरदा : श्रीकृष्ण दयार्णव कोपर्डेकर, प्रकाशक – श्याम कोपर्डेकर, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, २७३, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (प्रथम प्रकाशन १९५० ते १९६१, आठ खंड) संकलित खंड १ ते ३, (पुनर्मुद्रण १९९२).

# शिवाजी सावंत यांचा परिचय

हिरण्यकेशी नदीच्या तीरावर वसलेल्या, कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा या निसर्गसुंदर व छोटेखानी, टुमदार गावात एका शेतकरी कुटुंबात, ३१ ऑगस्ट १९४० साली शिवाजीराव सावंत यांचा जन्म झाला. तिथंच व्यंकटराव प्रशालेतून ते शालान्त परीक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. परिस्थितीमुळे महाविद्यालयीन शिक्षणाला एफ.वाय.बी.ए. नंतर रामराम ठोकून त्यांना वाणिज्य विषयाच्या लघुलिपी आणि टंकलेखन यांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागला. कोल्हापुरातील राजाराम प्रशालेमध्ये त्यांनी अध्यापक म्हणून वीस वर्षे सेवा केली. तेथून परसेवेवर पुण्यात येऊन महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्याच्या 'लोकशिक्षण' मासिकामध्ये त्यांनी सहा वर्षे काम पाहिले.

भारतीय जीवन आणि संस्कृती याबद्दल सावंतांना प्रारंभापासूनच सार्थ अभिमान होता. 'माझा भारत म्हणजेच महाभारत,' हे समीकरण एकदा मनात रुजल्यानंतर अभ्यासूवृत्तीमुळे त्यांचा महाभारताचा सखोल व्यासंग सुरू झाला. अस्मिता विसरू पाहत असलेल्या भारतीय समाजपुरुषाला सूर्यपुत्र, 'मृत्युंजय' कर्ण आपत्तीतही धैर्यशाली व तेजस्वी बनवील, असे उत्तर त्यांना गवसले. मग प्रदीर्घ संदर्भशोधन, सखोल व उलट-सुलट चिंतन, मनन आणि डोळस प्रवासाने टिपलेले प्रत्ययकारक निरीक्षण यातूनच या प्रदीर्घ व रससंपन्न कादंबरीचा जन्म झाला.

महाराष्ट्र शासन, केसरी-मराठा संस्थेने न. चिं. केळकर: तसेच कोल्हापूरच्या 'ललित' आणि पुणे महानगरपालिका यांनी पारितोषिक देऊन 'मृत्युंजय'चा गौरव केला. सर्वांत लक्षणीय गोष्ट म्हणजे मर्मज्ञ आणि गुणज्ञ बंगाली वाचकांच्या 'विवेक संस्थान' या कलकत्त्यातील संस्थेने वीस वर्षांनंतर १९८६ साली 'पूनमचंद भुतोडिया' हा सर्जनशील साहित्याचा पुरस्कार देऊन 'मृत्युंजय'चा सन्मान केला होता. दिल्लीतील भारतीय ज्ञानपीठ या संस्थेने १९९५ सालचा १२ वा 'मूर्तिदेवी पुरस्कार' भारताचे उपराष्ट्रपती डॉ. के. आर. नारायणन यांच्या हस्ते दिल्लीत प्रदान करून त्यांना सन्मानित केले होते.

१९७४ सालीच दिल्लीतील भारतीय ज्ञानपीठ या विख्यात प्रकाशन संस्थेने 'मृत्युंजय'चे हिंदीत भाषांतर प्रकाशित केले. मृत्युंजयची कन्नड – १९९०, गुजराथी – १९९१ व मल्याळम – १९९५ अशी भाषांतरे प्रसिद्ध झाली आहेत. १९८९ मध्ये 'मृत्युंजय'चे कलकत्त्यातील प्राध्यापक पी. लाल यांनी इंग्लिशमध्ये भाषांतर प्रसिद्ध करून ही मूळ मराठी कर्णगाथा आता आंतरराष्ट्रीय साहित्यात नेण्याचे ऐतिहासिक कार्यही केले आहे. गुजराथी भाषांतराला अहमदाबाद येथे त्या राज्य शासनाने आपला 'साहित्य अकादमी' हा पुरस्कार देऊन १९९० मध्ये गौरविले आहे. १९९२ मध्ये याच भाषांतराला 'केंद्रीय साहित्य अकादमी'चा पुरस्कारही प्रदान करण्यात आला.

१९८० साली सावंतांनी छत्रपती संभाजीराजांच्या जीवनावरील 'छावा' ही कादंबरी लिहून वाचकांसमोर ठेवली. तिचाही हिंदी अनुवाद ज्ञानपीठाने प्रसिद्ध केला आहे. ही कलाकृतीही महाराष्ट्र राज्य पुरस्काराची मानकरी ठरली.

सावंतांनी १९७५ साली लिहिलेले 'मृत्युंजय' हे नाटक मोहन वाघांच्या चंद्रलेखा या नाट्यसंस्थेने मराठी रंगमंचावर पुरे एक तप सादर केले. 'छावा' नाटकही त्यांनीच सादर

केले.

१९८३ साली सावंत बडोदा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. १९८६ मध्ये बेळगावला द. महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे उद्घाटन त्यांनी केले होते. तसेच ते महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या संस्थेत उपाध्यक्षही होते.

१९८६ साली ऑगस्टमध्ये सावंतांनी महाराष्ट्राच्या कृषि-औद्योगिक आघाडीवर आद्य जनकाचे काम करणाऱ्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांची 'लढत' नावाची द्विखंडात्मक चरितकहाणी वाचकांना सादर केली. त्यांची 'संघर्ष' ही गोदी व माथाडी कामगारांचे झुंजार नेते भाई मनोहर कोतवाल यांच्यावरील चरितकहाणी प्रकाशित झाली आहे.

विविध पैलूमय जीवन लाभलेल्या व भारतीयांना सदैव प्रेरक आदर्श असलेल्या योगयोगेश्वर श्रीकृष्णाच्या चरित्रग्रंथावर 'युगंधर' ही कादंबरी त्यांनी सिद्ध केली. रामकृष्ण मिशनच्या हरिद्वार मठाच्या प. पू. स्वामी अकामानंद यांच्या हस्ते पूजन विधी होऊन 'युगंधर' शनिवार दि. २९ जुलै, २००० रोजी समारंभपूर्वक प्रकाशित झाली.

२००२ मध्ये त्यांची माननीय पी. के. अण्णा पाटील यांच्यावरील 'पुरुषोत्तम नामा' ही चरित्रकहाणी प्रकाशित झाली. याच वर्षी भारतीय ज्ञानपीठाने 'युगंधर'चा हिंदी अनुवादही प्रकाशित केला.

सावंतांचा एकसष्टी समारोह बालगंधर्व रंगमंदिर येथे शनिवार, दि. ३० डिसेंबर, २००० रोजी प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या शुभहस्ते व ज्येष्ठ साहित्यिक भा. द. खेर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

७६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कऱ्हाड येथे संपन्न होणार होते. त्यासाठी अध्यक्षपदाच्या उमेदवारीच्या प्रचारार्थ सावंत दौऱ्यावर असताना त्यांना दि. १८ सप्टेंबर, २००२ रोजी मडगाव-गोवा येथे आकस्मिक तीव्र हृदय आघातामुळे वैद्यकीय उपचार प्रयत्न करूनही मृत्यु आला.

सावंतांच्या मागे त्यांच्या पत्नी मृणालिनी, कन्या कादंबिनी धारप व मुलगा अमिताभ असा परिवार आहे.

संपर्क : ए-९०२, द गेटवे, भारती विद्यापीठ शाळेजवळ, बालेवाडी, पुणे – ४११०४५.

ही कादंबरी हिंदी भाषेतही भाषांतरित झाली आहे.

# शिवाजी सावंत यांची ग्रंथसंपदा

**मृत्युंजय** (कादंबरी)

**छावा** (कादंबरी)

**युगंधर** (कादंबरी)

**मृत्युंजय** (नाटक)

**छावा** (नाटक)

**लढत** (कादंबरी)

**अशी मने असे नमुने** (व्यक्तिचित्रे)

**मोरावळा** (व्यक्तिचित्रे)

**संघर्ष** (चरित कहाणी)

**शेलका साज** (ललित लेख)

**कांचनकण** (ललित लेख)

**कवडसे** (ललित लेख)

**क्रांतिसिंहाची गावरान बोली** (संपादन)

**युगंधर एक चिंतन** (प्रस्तावना)

हजारो वर्षांपासून श्रीकृष्ण भारतीय मन व्यापून दशांगुळे उरला आहे. भारतीय समाज व संस्कृती यांवर त्याचा अमीट असा ठसा उमटलेला आहे. 'श्रीमद्भागवत', 'महाभारत', 'हरिवंश' व काही पुराणांत श्रीकृष्णचरित्राचे अधिकृत संदर्भ सापडतात.

परंतु गेल्या हजारो वर्षांत त्यावर सापेक्ष विचारांची आणि अतर्क्य चमत्कारांची पुटंच पुटं चढलेली आहेत. त्यामुळे त्याचं 'श्री'युक्त सुंदर, तांबूस–नीलवर्णी, सावळं रूपडं घनदाट झालं आहे, वास्तवापासून शेकडो योजनं दूर दूर गेलं आहे. श्रीकृष्ण हा 'भारतीय' म्हणून असलेल्या जीवनप्रणालीचा पहिला उद्गार आहे! त्याच्या चक्रवर्ती जीवनचरित्रात भारताला नित्यनूतन व उन्मेषशाली बनविण्याचा ऐवज ठासून भरला आहे.

श्रीकृष्णाच्या जीवनसरोवरातील दाटलेलं शेवाळ तर्कशुद्ध सावधपणे अलगद दूर सारल्यास त्याचं 'युगंधरी' दर्शन शक्य आहे, हे 'मृत्युंजय'कारांनी जाणलं. आणि त्यांच्या प्रदीर्घ चिंतनातून, सावध संदर्भशोधनातून, डोळस पर्यटनातून व जाणत्यांशी केलेल्या संभाषणातून साकारली ही साहित्यकृती – 'युगंधर'!!

मेहता पब्लिशिंग हाऊस
www.mehtapublishinghouse.com